म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२८५

# माझी जीवनकथा

गंगाधरराव देशपांडे


मौज प्रकाशन गृह
मुंबई ४

REFBK-0010980

दा.क्र.
१००८०

# माझी जीवनकथा

ग्रं. क्र. १००८०.



'कर्नाटकसिंह' गंगाधरराव देशपांडे : सन १९५१

मेरी उर्वरित आयु राष्ट्र सेवा हेतु मैं
व्यतीत करूंगा और आपकी मोहब्बत का
पात्र बनूंगा। मेरी दृष्टीसे आप लोगोंने
बताई हुई मोहब्बत का उऋण होने का यही
एक नेक और निजी रास्ता है।

आपका विनीत,
गंगाधर देशपांडे

२

पुणे येथील सत्कारप्रसंगीं उत्तराचें भाषण करतांना (१९५०)



# माझी जीवनकथा

गंगाधरराव देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २७६३० वि: चरित्र
क्रमांक ८०१ नों: दि: १६/१२/६०

REFBK-0010980

मौज प्रकाशन गृह
मुंबई ४

मौज प्रकाशन : ४५

आवृत्ती पहिली
१५ सप्टेंबर १९६०

किंमत १५ रुपये

© १९६०, मौज प्रकाशन गृह

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

# राष्ट्रपतींचा पुरस्कार

यह मेरा सौभाग्य रहा है कि प्रायः असहयोग आंदोलन के प्रारम्भ से ही श्री गंगाधरराव देशपांडे से मेरा घनिष्ट परिचय हुआ और जैसे जैसे समय बीता यह संबंध अधिक घनिष्ट होता गया। श्री गंगाधररावजी उन लोगों में से हैं जिन्होंने अपनी युवावस्था से ही देशसेवा के व्रत को धारण किया है और उन्होंने लोकमान्य तिलक के नेतृत्व में बहुत दिनों तक काम किया है। उस समय के महाराष्ट्र और बंबई में जुड़े हुए क़र्नाटक में राजनीतिक जीवन जागृत और संगठित हुआ, उसका बहुत श्रेय श्री गंगाधररावजी को है, क्योंकि वे लोकमान्य तिलक के एक तरह से दाहिने हाथ थे। उन पर उनका पूरा विश्वास था। अपनी योग्यता, उत्साह, दृढ़ता और कार्यकुशलता से उन्होंने प्रांतीय और जिला संमेलनों का अनेको स्थानों पर आयोजन किया और इस प्रकार से सहज ही लोगों के विश्वास-पात्र और श्रद्धा-भाजन बन गये।

जब महात्माजी का काम भारत में बड़े पैमाने पर आरम्भ हुआ, उनकी नीति, उनकी कार्यशैली, और उनकी दूरदर्शिता से प्रभावित हो कर गंगाधररावजी ने महात्माजी का साथ देना आरम्भ किया। यद्यपि कुछ बातों में लोकमान्य और महात्मा गांधीजी के कार्यक्रमों में अन्तर हुआ करता था, पर उद्देश तो एक ही था। अतः गंगाधररावजी जैसे कर्मठ व सच्चे कार्यकर्ता के लिये तो दोनों ही नेता बराबर आदरणीय और पूजनीय थे। जिस प्रकार वे सच्ची निष्ठा से उस समय तक तिलक के कार्यक्रम का प्रचार और प्रसार करते आये थे, उसी निष्ठा के साथ उन्होंने गांधीजी के नये कार्यक्रम को भी अपनाया और अपना सारा समय और सारी शक्ति लगाकर उसको जनता तक पहुँचाया।

श्री गंगाधररावजी बहुत ही बड़े और प्रभावशाली वक्ता हैं और यद्यपि मैं स्वयं इतनी मराठी का ज्ञान नहीं रखता कि मैं उसके संबंध में कुछ विशेष लिख सकूँ, पर मुझे अनेको बार गंगाधररावजी को बड़ी बड़ी सभाओं में भाषण देते हुए देखने को मिला है और मैंने श्रोताओं के चेहरों को देख कर और वातावरण से यह पाया है कि उनके भाषणों का बहुत ही प्रभाव पड़ता है। असहयोग के आरम्भ काल में लाऊडस्पीकर नहीं हुआ करते थे और ऊँची आवाज से जो बोल सकता था वही बड़ी बड़ी सभाओं में भाषण सफलतापूर्वक दे

सकता था। गंगाधररावजी ऐसे ही वक्ताओं में से हैं जो एक जमाने में अपनी बुलन्द आवाज से जोश और उत्साह पैदा कर सकते थे। पर वे केवल भाषणों से क्षणिक उत्साह पैदा करनेवाले वक्ता ही नहीं, बल्कि ठोस संगठन करने में भी वैसे ही सिद्धहस्त थे। वे कितने ही वर्षों तक अखिल भारतीय कार्यसमिती के सदस्य रहे हैं और वह भी ऐसे समय में जब देश के सत्याग्रह आंदोलन के संबंध में बड़े बड़े निश्चय किये गये और उन निश्चयों को अपने अपने इलाकों में काँग्रेस कार्यसमिती के सदस्यों ने लोगों तक पहुँचाने और उनके द्वारा कार्यान्वित कराने का भार उठाया था। गंगाधररावजी इसमें किसी से पीछे नहीं रहे।

महात्माजी के रचनात्मक कार्यक्रम में भी उनका बहुत ही गहरा विश्वास था और इस लिये वे अपने प्रांत के 'चरखा संघ' और 'ग्रामोद्योग संघ.' के कई वर्षों तक संचालक रहे। जब बेलगांव में, १९२४ में, काँग्रेस का अधिवेशन हुआ था, स्वभावतः गंगाधररावजी स्वागत समिती के प्रमुख बने और उस समय हम लोगों ने न केवल उनकी संगठनशक्ति का, बल्कि दौड़-धूप करने की उनकी अद्भुत क्षमता का भी परिचय पाया। दिनरात, जहाँ जरूरत हों, वह घोड़ेपर सवार हो दौड़ते ही रहते थे। उसी अधिवेशन में गांधीजी काँग्रेस के सभापति हुए थे और काँग्रेस में, कौंसिलप्रवेश को लेकर जो मत-भेद हो गया था उसका निपटारा होना था, इस कारण से वहाँ प्रतिनिधियों की अच्छी भीड़ थी और प्रदर्शिनी का आयोजन भी बहुत ही बड़े पैमाने पर हुआ था।

एक बार 'गान्धी-सेवा-सम्मेलन' का अधिवेशन सन १९३७ में हुदली में हुआ जिसका सारा प्रबन्ध भार उन्होंने उठाया था। मैं इस बात को नहीं भूल सकता कि जब बिहार में भयंकर भूकंप की विपत्ति आई थी, उन्होंने वहाँ की जनता की सहायता के लिये महाराष्ट्र व कर्नाटक में घूम घूम कर पैसा जमा किया और मेरे पास भेजा।

यह कहने की जरूरत नहीं है कि जब जब जरूरत हुई और जब जब सत्याग्रह की पुकार हुई, वे हमेशा जेल गये। जब जेल से बाहर रहे तो सारा समय रचनात्मक कार्य में देते रहे। बंबई के लोगों ने, पूना के सभी दल के लोगों ने और बेलगाव के लोगों ने भी उनका स्वागत-सत्कार किया है। यद्यपि, आज अपनी अवस्था के कारण वे अब कोई दौड़-धूप का काम नहीं कर सकते, मगर बैठे बैठे लोगों को उनसे सत्परामर्श मिलता ही रहता है। एक बार, कई वर्षों के बाद, मुझे उनके गाँव जाने का मौका मिला था और अब भी जब कभी मौका मिलता है और मैं उस तरफ जाता हूँ तो अवश्य उनसे एक बार मिल लेता हूँ। मैं देखता हूँ कि उनको उस से बड़ी प्रसन्नता होती है, पर मुझे तो प्रसन्नता के साथ साथ लाभ भी होता है। ऐसे बुजुर्ग का आशीर्वाद व सद्भाव पा लेता हूँ और पुरानी स्मृतियाँ सहज ही नयी प्रेरणा देती हैं। मनुष्य की ऐसी स्मृतियां का संग्रह ही जो जीवन की कहानी बन जाता है। मेरा विश्वास है कि गंगाधररावजी की यह जीवनी उसके पाठकों के लिये भी प्रेरणादायिनी होगी।

राष्ट्रपतिभवन, नई दिल्ली
चैत्र १६, १८८२ (शक)

**राजेन्द्र प्रसाद**

# प्रस्तावना

विद्यमान काँग्रेसभक्तांत कर्नाटकचे पुढारी श्री. गंगाधररावजी देशपांडे हे वयानेच नव्हे तर निःस्वार्थी देशसेवेने ज्येष्ठ व श्रेष्ठ आहेत असें मला वाटतें. त्यांच्या वयाला १९६०च्या मार्च ३१ ला ८९ वर्षें पूर्ण होऊन ९० वें वर्ष लागलें आहे. सन १८९७ पासून १९५७ पर्यंतच्या साठ वर्षांच्या प्रदीर्घ काळांत त्यांनी भारतमातेची जी विविध रूपाने सेवा केली व विशेषतः तिच्या अपत्यांना परकीय दास्यांतून मुक्त करण्याकरिता देशांत झालेल्या निरनिराळ्या चळवळींच्या यशःप्राप्तीसाठी जे अविश्रांत परिश्रम केले त्याचा मनोरम व रोमांचकारी वृत्तांत त्यांनी स्वतः लिहिलेल्या या ग्रंथांत वाचकास वाचावयास मिळतो. तो भारताच्या भावी पिढ्यांना मोठा स्फूर्तिप्रद व उद्बोधक होईल याबद्दल मला यत्किंचित् संशय वाटत नाही.

या ग्रंथाचें एक वैशिष्ट्य असें सांगतां येईल की या ग्रंथांतून दिसणारें गंगाधररावांचें चित्र आपण गेल्या साठ-सत्तर वर्षांत त्यांना जसें पाहत आलों तंतोतंत तसेंच आहे. नाही तर सामान्यतः असें पाहण्यांत येतें की एखाद्यास स्वतःचें छायाचित्र काढून घ्यावयाचें असलें म्हणजे तो आपली चेहरेपट्टी अधिक साफ, सतेज व गुळगुळीत करून नंतर परीटघडीचे कपडे ज्याची मोडीची रेघ अगदी सरळ व ठसठशीतपणें दिसून येईल अशा रीतीने अंगावर घालून, आणि एकंदरीने आपण खुलून दिसावें म्हणून फार बारकाईने व दक्षतेने काळजी घेऊन, कलाकाराने 'रेडी प्लीज' म्हणून बोटाने बटन दाबण्याची वेळ येतांच आपल्या ओठांवर हसण्याची कृत्रिम लकेर निर्माण करून कॅमेऱ्याच्या काचेकडे पाहत असतो. आपण लोकांना अधिक सुंदर दिसावें, अगदी आहोंत तसे दिसूं नये, अशी सामान्य माणसाची सार्वत्रिक प्रवृत्ती आहे. यांतून मोठे मुत्सद्दी, जगद्विख्यात तत्त्वज्ञ, ब्रह्मरंध्रीं प्राण नेऊन समाधिसुख भोगणारे योगी, हेदेखील प्रायः सुटलेले नसतात. या आत्मप्रतिमेला सुंदर बनविण्याच्या मायेने मोहित झाले नाहीत असे लोकोत्तर पुरुष विरळा. "Paint me as I am with all the scars on my face" असें निक्षून चित्रकारांना बजावून सांगणारा क्रॉमवेल कधी कधी दृष्टीस पडतो. आपल्या

वैगुण्याची निर्भीडपणें चर्चा करणारे म. गांधींसारखे 'सत्यान्वेषणप्रयोग' म्हणून आत्मचरित्र लिहिणारे सत्यैकनिष्ठ लेखकही लेखनसृष्टीच्या सहारा मरुभूमींतील दुर्लभरमणीय वृक्षछायाश्रित स्थळाप्रमाणे क्वचित् दृष्टीस पडतात. पण अशा सत्यैकजीवी सुजनांची संख्या एकंदरीने फारच अल्प अशी असते. प्रस्तुत ग्रंथांतील लेखनशैलींत कृत्रिमतेचा अभाव व प्रांजळतेचा सद्भाव हा वाचकास प्रत्ययास आल्याशिवाय राहत नाही.

या ग्रंथाच्या शैलींतील सुलभता व साहजिकता यांचें एक कारण माझ्या मतें त्याच्या जन्मकथेंतच सापडूं शकते. तुरुंगांतील दिनचर्येंत एक प्रकारचा उद्वेग उत्पन्न करणारा सारखेपणा असतो. तेथील रटाळ राहणींत वैचित्र्याचा व वैविध्याचा पूर्ण अभाव असतो. अशा स्थितींत समानशील व समदुःखी सहकारी, कैदी म्हणून एकत्र आले असतां, आपल्या आयुष्यांतील सुखदुःखाच्या कथा कांही अंशीं तुरुंगांतील कंटाळवाणा काळ कंठण्याकरिता व कांही अंशीं परस्परांचा मनोविनोद करून नीरस व शुष्क आणि कर्कश वातावरणांत कांही तरी आर्द्रता व मार्दव निर्माण करण्याकरिता, परस्परांस सांगाव्याशा वाटतात. अशाच परिस्थितींत प्रस्तुत जीवनकथेचा आरंभ कसा झाला याची हकीकत 'तें असें झालें' या पहिल्या प्रकरणांत ग्रंथकर्त्यांनी सांगितली आहे. ती जेव्हा वाचक वाचतील तेव्हा त्यांच्या लक्षांत येईल की गंगाधररावजींच्या मनांत कथा सांगतांना आपण आत्मचरित्रग्रंथ निर्माण करीत आहोंत असा अभिनिवेश मुळीच नव्हता. याचे उलट, घरचा वडील माणूस घरांतील लहान मुलांना क्षणभर मौज वाटावी म्हणून कहाण्या सांगतो त्याच तऱ्हेच्या मनःस्थितींत त्यांनी आपली ही जीवनकथा सांगण्याचा उपक्रम केला; व त्या वाणीने अथवा लेखणीने जें सुलभतेचें व प्रांजळतेचें वळण सुरुवातीला घेतलें, त्याच वळणावर ती कथा अखेरपर्यंत वाहत राहिली. यामुळे हा ग्रंथ सजावटीच्या कृत्रिम तऱ्हेपासून आणि वेषभूषेच्या नखऱ्यापासून प्रायः अलिप्त आहे. गोष्टी व विचार हे मित्रांशीं संभाषण सुरू असतांना जसे सुचले तसेच ते येथे प्रकट झाले आहेत. त्यांत भाषेचा डौल आणण्याचा प्रयत्न नाही किंवा साहित्यिक रंग देण्याचा हव्यास नाही. या पुस्तकांतील लेखनपद्धती प्रायः अलंकाररहित, विवादविकाररहित, स्वमतप्रतिपादक निवेदन शब्दावडंबररहित असें आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. तथापि हा ग्रंथ असल्या साधेपणानेच एक प्रकारचें अभिनव आकर्षण वाचकाच्या मनांत निर्माण करतो, व त्याचें कुतूहल वृद्धिंगत करतो, हें जेव्हा लक्षांत येतें तेव्हा 'किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम्' या कालिदासाच्या उक्तीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

गंगाधररावांच्या या जीवनकथेचें मला आणखी एका कारणाकरिता विशेष महत्त्व वाटतें. लो. टिळक किंवा म. गांधी यांच्यासारख्या लोकोत्तर व नवराष्ट्र निर्माण करणाऱ्या विभूतींचें कार्य व व्यक्तिमत्त्व यांचें यथार्थ निरूपण व आकलन केवळ त्यांनी स्वतः लिहिलेल्या किंवा त्यांच्या संबंधाने व त्यांचेवर दुसऱ्यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथांवरून होणें शक्य नाही असें मला वाटतें. असल्या व्यक्ती या 'व्यष्टी' नसून 'समष्टी'

असतात. ज्याप्रमाणे विशाल वटवृक्षाची कल्पना जेव्हा आपण करतों तेव्हा त्या वृक्षाला खांबापरी सावरून धरणाऱ्या शंभर 'थोर बुंध्यां'चीही कल्पना एकसमयावच्छेदाने आपल्या डोळ्यासमोर उभी राहते, तद्वतच थोर राष्ट्रविभूतींच्या नामोच्चाराबरोबर त्यांच्या प्रभावळीचेंही चित्र त्याबरोबरच आपल्या अंतश्चक्षूंसमोर उभें राहतें. या सर्वांचें साकल्याने दर्शन होणें म्हणजेच त्या थोर विभूतींचें यथार्थ दर्शन होय. जसें आपण आपल्या उपास्यदेवतेच्या पूजेच्या आरंभीं त्या देवतेचें आवाहन करतांना 'सांग, सायुध व सशक्तिक' यावें म्हणून प्रार्थना करतों आणि नंतर ध्यान करतांना त्याच 'सांग, सायुध, सशक्तिक व सपरिवार' देवतेच्या रूपअंतःकरणांतील पटावरून तिला अंतर्दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न करतों, तसेंच आपल्या राष्ट्रपुढाऱ्यांच्या यथार्थ दर्शनासाठी त्यांच्या प्रभावळींतील व परिवारांतील तेजःपुंज अनुयायांचेंही दर्शन होणें आवश्यक आहे. अंतरिक्षांतील कोणत्याही ग्रहाचें पूर्ण ज्ञान होण्यास त्याच्या सभोवती दिसणाऱ्या उपग्रहाचें स्वरूप व गती यांच्या ज्ञानाची आवश्यकता असते, हें कोणासही सहज समजण्यासारखें आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे निर्माते गंगाधररावजी देशपांडे यांचें जीवन लो. टिळक व म. गांधी यांच्या जीवनकार्याशीं इतकें निबद्ध व निगडित झालें आहे की, त्याची यथार्थ ओळख झाल्याशिवाय वरील दोन पुरुषोत्तमांच्या पराक्रमांची मीमांसा करणेंही कठीण आहे. म्हणून प्रस्तुत ग्रंथाचें परिशीलन लो. टिळक किंवा म. गांधी यांच्या कार्याच्या अभ्यासकांस आवश्यक आहे; व या दृष्टीने विचार केला असतां, गंगाधररावजींनी ही जीवनकथा प्रकाशित करून भारताच्या विसाव्या शतकांतील पूर्वार्धाच्या राजकीय इतिहासाच्या साधनांत फार मोलाची भर घातली आहे असें म्हणणें योग्य होईल.

दुसऱ्याही एका कारणाकरिता गंगाधररावजींची 'जीवनकथा' वाचकांना विलोभनीय व चिंतनीय वाटेल असा माझा अंदाज आहे. आज त्यांच्या राष्ट्रीय जीवनाला साठापेक्षा अधिक वर्षे झालीं आहेत. या प्रदीर्घ काळांतील त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे स्थूलमानाने चार विभाग पडतात. त्या प्रत्येक विभागास भारतीय धर्मशास्त्रकारांच्या परिभाषेचा उपयोग करून बोलावयाचें असल्यास चार आश्रम असेंही म्हणतां येईल. गंगाधररावजींनी सार्वजनिक जीवनांत पदार्पण केल्यानंतर म्हणजे राजकारणी द्विजत्व प्राप्त झाल्यानंतर आपल्या चारही आश्रमांची कशी पूर्तता केली हें वाचकांस या जीवनकथेचें पठन करीत असतां कळून येईल असा मला विश्वास वाटतो. या चारही आश्रमांचीं कर्तव्यें करण्याची अपूर्व संधी त्यांना चार निरनिराळ्या गुरूंच्या सान्निध्यांत जाण्याचा जो योग आला त्यामुळे प्राप्त झाली. सार्वजनिक जीवनांतील प्रथमाश्रमाचें म्हणजे ब्रह्मचर्याश्रमाचें गुरुपद कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखले या राजकारणी महापुरुषाकडे होतें. दुसऱ्या म्हणजे सार्वजनिक गृहस्थाश्रमाचीं कर्तव्यें करण्याच्या वेळीं त्यांचे गुरू व मार्गदर्शक लोकमान्य टिळक हे झाले. लोकमान्यांच्या स्वर्गवासानंतर तिसऱ्या आश्रमाची म्हणजे वानप्रस्थाश्रमाची दीक्षा त्यांना महात्मा गांधींनी दिली. महात्माजींच्या महानिर्वाणानंतर हळूहळू त्यांनी आपल्या चतुर्थाश्रमाचे कर्तव्याकडे अधिक लक्ष देण्याचें निश्चित केलें. या

आश्रमांत चिंतनादि साधनांनी आपलें जीवित कृतार्थ करण्याचें पुण्यमार्गाचें निदर्शन त्यांना प्रसंगविशेषीं ब्रह्मीभूत गुरुदेव रामभाऊ रानडे यांजकडून होत असे असें माझ्या ऐकण्यांत आहे. या आश्रमाचीं कर्तव्यें करण्याचा मुख्य उद्देश सर्वत्र भगवंताचें अधिष्ठान असल्याचा प्रत्यय येणें व आपलें जीवन या विशाल व व्यापक विचाराशीं समरस करून, त्या आनंदांत काळक्षेप करणें हाच आहे, असें मी समजतों.

जो कोणी आपली दृष्टी निर्मळ व निर्विकार ठेवून या जीवनकथेचें पठन करील त्यास कर्नाटकांतील एका वतनदार घराण्यांतील तरुण मुलाची भिन्न भिन्न गुरूंच्या साहचर्यांत मानसिक व आध्यात्मिक उत्क्रांती कशी होत गेली व या उच्च विचारांच्या निर्मल वातावरणांत ते आता कां व कसे विहार करूं शकतात याची कांहीशी कल्पना करतां येईल. 'चणे खावे लोखंडाचे, तरीच ब्रह्मपदीं नाचे' या तुकोबारायाच्या वाणींत दिग्दर्शित केलेल्या खडतर त्यागी जीवनाचें महत्त्व लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या चरित्रांतून जसें पाहावयास मिळतें, तसेंच ही जीवनकथा वाचत असतां वाचकांस बव्हंशाने पाहावयास मिळेल असा मला भरवसा वाटतो.

या जीवनकथेंतील कांही प्रकरणें हीं महाराष्ट्र व कर्नाटकांतील मध्यमवर्गाच्या साठ ते पंचाहत्तर वर्षांपूर्वीच्या सामाजिक व कौटुंबिक जीवनाची ओळख करून देण्यास फार उपयुक्त आहेत. त्याचप्रमाणे जुन्या पद्धतीच्या व प्राचीन रूढी आणि आचार यांचा अभिमान बाळगणाऱ्या कुटुंबांत जन्मलेल्या तरुणाच्या मनाची, तो सुशिक्षित झाल्यानंतर व सुधारकी कल्पनांची त्याच्यावर छाया पडल्यानंतर, कशी ओढाताण होत असे, किंबहुना आंतून कसा जळफळाट होत असे, याचें बरेंच स्पष्ट चित्र या जीवनकथेंत वाचकाच्या दृष्टीस पडतें.

कर्नाटकांतील विवाहसंस्थेसंबंधी दिलेली हकीकत पुष्कळांना मनोरंजक वाटेल. भूम म्हणून विहिणी, वरमाय व त्यांच्याकडील बायकांच्या पंक्तींत ज्या खुळचटपणाच्या तशाच आचरटपणाच्या गोष्टी शिष्टाचार म्हणून करण्यांत येत, त्यांचें मोठें रसभरित वर्णन या ग्रंथांतील 'तरुण वयांतील संस्कार' या प्रकरणांत आलेलें आहे. यांत अन्नाची अतोनात व निरर्थक नासाडी होत होती व तशी ती करून आणि अश्लील गाणीं म्हणून विहिणींनी एकमेकींची उखाळी काढून परस्परांचीं मनें थोड्या वेळपर्यंत कलुषित झालीं म्हणजेच तें लग्न श्रेष्ठ प्रतीचें झालें असें मानण्यांत येई. कर्नाटकांतील लग्नपद्धतींत जें आक्षेपार्ह होतें तें महाराष्ट्रांतील, विदर्भांतील व तेलंगणांतील लग्नांतही थोड्याबहुत फरकांनी होतेंच. लग्नसमारंभास दोन्हीकडून येणारे आप्त आणि वऱ्हाडी हे परस्परांशीं स्पर्धा करण्याच्या आणि एकमेकांचें न्यून काढण्याच्या पक्षपाती वृत्तीनेच समारंभाला येत. लग्नसमारंभ हा दोन भिन्न कुटुंबांत नवीन प्रेमाचे संबंध उत्पन्न करण्यासाठी आहे असें मानण्यापेक्षा दोघांच्या मनांत परस्पराविषयी विक्षेप उत्पन्न करण्याचा उत्तम प्रसंग आहे, असेंच प्रायः जमलेल्या 'इतरेजनांना' वाटत असे. पुढे कांही महिन्यांनी किंवा वर्षांनी लग्नप्रसंगीं झालेल्या मानापमानांच्या गोष्टी अजिबात विसरून जात व त्यांचे पारस्परिक संबंध घनिष्ट व आतमत्वाचे व आदराचे होत असत, हेंही तितकेंच खरें आहे. पण

लग्नप्रसंगांत वरपक्षाची दृष्टी वधूपक्षाचें न्यून किंवा वैगुण्य काढण्याचीच प्रायः असे हें खरें आहे. कधीकधी लग्नप्रसंगीं झालेल्या मानापमानांचे दुष्परिणाम निरंतरच्या वैमनस्यांत होऊन त्याची झळ मुलीस लागून तिचें जीवन सासरीं सुखाचें न होतां दुःखाचें होत असे. आताच्या काळांत या चालीरीतींचा लोप झाला, याबद्दल एक प्रकारें मनाला समाधान वाटतें. गेल्या पंचाहत्तर-ऐंशी वर्षांत तरी आर्थिक व वैचारिक स्थित्यंतर बऱ्याच मोठ्या प्रमाणांत घडून आल्यामुळे या जुन्या अनिष्ट रूढींचा लोप झाला हें खरें असलें, तरी हुंडा वगैरेंच्या दुसऱ्या कांही समाजसौख्यविघातक रूढींना अनिष्ट वळण लागल्यामुळे विवाहसंस्काराचे समारंभ वैवाहिक जीवनांत निर्भेळ प्रेम व सौख्य निर्माण करणारे झाले आहेत, असें म्हणणेंही धाष्टर्याचेंच होईल असें मला वाटतें. वधूवरांच्या वयोमर्यादा आणि सुशिक्षणाचें प्रमाण वाढल्यामुळे, विड्या तोडणें, घास घालणें, नाव घेणें, एकत्र न्हाणें वगैरे प्रकार आपोआपच नष्ट झाले आहेत. पण त्यांच्या ऐवजी दुसरेही कांही प्रकार सुरू झाले आहेत; तेही कांही वधूपक्षाला कमी अनिष्ट नाहीत. असो. पण दांपत्यजीवन हें पूर्वींपेक्षा अधिक मोकळें आणि परस्परांस अधिक विश्वासांत घेणारें आणि अधिक सहकार्याचें होत चाललेलें आहे असें सामान्यतः म्हणतां येईल.

पण या सर्व किरकोळ बाबींपेक्षा प्रस्तुत ग्रंथाचें महत्त्व सामाजिक उत्क्रांतीच्या दृष्टीने जें मला वाटतें तें सुशिक्षित पती आणि अशिक्षित पत्नी अशा ज्या दोनतीन पिढ्या इंग्रजी राज्य सुरू झाल्यानंतर गेल्या, त्यांच्यांतील परस्परसंबंधांवर त्यामुळे एक मोठा विचारप्रवर्तक प्रकाश पाडला जातो त्यामुळे होय. मराठी नाटककार व कादंबरीकार यांनी हा विषय कित्येकदा हाताळलेला आहे. पण त्यांचें काल्पनिक वर्णन हें वस्तुस्थितीशीं कितपत मिळतेंजुळतें होतें हें आजच्या वाचकास कळणें कठीण आहे. कारण तशीं शिक्षण व संस्कार या दृष्टींनी विसदृश असलेलीं जोडपीं प्रस्तुतच्या पिढींत विरळ झालेलीं आहेत. म्हणून प्रस्तुत ग्रंथासारख्या विश्वसनीय आत्मचरित्रविषयक ग्रंथांतून येणाऱ्या या संबंधाच्या अनुभवाच्या बोलास समाजशास्त्रवेत्त्यांच्या दृष्टीने फार मोठी किंमत आहे. आज तरी गंगाधररावजींनी आपल्या पत्नीसंबंधी आणि स्वतःच्या वैवाहिक जीवनासंबंधाने प्रदर्शित केलेल्या विचारांची फार मोठी किंमत वाटते. त्यांत हिंदू पुरुषांच्या आणि हिंदू स्त्रियांच्या अत्यंत श्रेष्ठ अशा मनोवृत्तीचें आपणांस दर्शन होतें, व त्याबरोबर जुन्या संस्थांसंबंधाने मनसोक्त निंदा करून नवीन, पाश्चात्यांच्या संस्थांचें अनुकरण करण्यास सुचविणाऱ्या लेखकांच्या विचारसरणीच्या उथळपणाचाही प्रत्यक्ष परिचय होतो.

गंगाधररावांच्या मनावर प्रि. मोडकांच्या घरांतील माणसांशीं त्यांचा निकट संबंध आल्यामुळे सुधारकी विचार व आचार यांसंबंधाने विशेष प्रेम व आदर कसा उत्पन्न झाला याची त्यांनी माहिती दिलेली आहे. गंगाधरराव लिहितात, "आमच्या तिकडील राहणीपेक्षा पुण्याकडील अस्सल सुधारकांच्या राहणींत पुष्कळच सुधारणा दिसली." (पान ६९)..."त्या वेळीं माझ्या मनावर सुधारकांसंबंधाने, त्यांच्या कुटुंबव्यवस्थेसंबंधाने

बरेच अनुकूल परिणाम झाले." (पान ६९). पण त्याच्याच पुढे त्यांनी जो एक विचार प्रदर्शित केला आहे तो महत्त्वाचा व गंगाधररावांच्या मार्मिकतेचा निदर्शक असल्यामुळे तोही येथे उद्धृत करणें योग्य होईल असें मी समजतों. "पण वरवर दिसणारी राहणी सोडून सुधारकांच्या मनोभावनेसंबंधाने माझा तितका अनुकूल ग्रह झाला नाही हेंही कबूल केलें पाहिजे. कौटुंबिक राहणीवरून सोवळेंओवळें किंवा जातिभेद मानण्याकडे प्रवृत्ती वरवर पाहणाऱ्यांना दिसत नसे ही गोष्ट खरी, पण या भावना पूर्णपणें मनापासून गेलेल्या आहेत असें मला वाटलें नाही." (पान ६९).

ज्या काळांत सुधारणेच्या विचाराकडे त्यांच्या मनाची ओढ अधिकाधिक होत चालली होती, त्याच काळांत सुधारकांच्या मनोभावनांविषयी त्यांच्या मनांत किंतू उत्पन्न झाला होता, हें त्यांच्या वरील उद्गारांवरून स्पष्ट दृष्टीस पडतें. गंगाधररावांच्या आयुष्यांत गोखल्यांना सोडून टिळकांकडे गेल्यामुळे जें महान् स्थित्यंतर झालें त्याच्या कारणांचा शोध करणारास सुधारकांच्या मनोभावनेविषयी त्यांचा जो प्रतिकूल ग्रह बनत चालला होता तेंही एक प्रबळ निमित्त असावें असें म्हणण्याचें मी धाष्टर्य करतों.

गंगाधरराव पुण्यांत सुधारक म्हणून समजले जात. पण पुण्याचा एखादा अस्सल सुधारक घरीं पाहुणा म्हणून आला म्हणजे त्यांच्या घरांतील कडकडीत सोवळेंओवळें हें त्या पाहुण्यांना कसें भोवत असे व त्यामुळे त्यांना स्वतःला कसें शरमिंदे झाल्यासारखें होत असे, हें मोडकांच्या धाकट्या मुलीचा त्यांच्याकडे एकदा मुक्काम असतांना जी हकीकत घडली, तीवरून कळून येण्यासारखें आहे. परक्या तरुण स्त्रीबरोबर एकटेंच गाडींत बसून फिरण्याचा जेव्हा पहिला प्रसंग आला, तेव्हा "मलाही कसेंसेंच वाटलें" असें त्यांनी प्रांजळपणें लिहून ठेविलें आहे. सुधारकी विचारांचीं जीं पुटें पुण्याच्या मुक्कामांत गंगाधरराव यांच्या मनावर चढत असत, तीं ते बेळगावला घरीं परत आले व आपल्या आई, वडील, व पत्नी आणि बहीण इत्यादिकांच्या सान्निध्यांत आले की उडून जात व त्यांच्या पिढ्यान्पिढ्या रोमरोमीं भिनलेल्या संस्कारांचा प्रभाव त्यांच्यावर पुन्हा पडत असे. अशी त्यांच्या मनोभूमीवर जुनी व नवी या दोन राहणींची झुंज नित्य चाललेली होती. गावच्या पारावरल्या मारोतीच्या मूर्तीस अनेक वर्षें शेंदूर चढविला गेल्यामुळे मूर्तीचें स्वरूप दिसेनासें होतें; व नुसता शेंदराचा एक मोठा पाषाण म्हणजेच मारोती असें वाटावयाला लागतें. पण वर्ष दोन वर्षांनी ती शेंदराची खोळ पडून जाते व आंतील तेजस्वी मारोतीरायाची मूर्ती दृष्टीस पडते. तद्वतच मानवी मनाचीही गोष्ट आहे. त्याच्यावर निरनिराळ्या संस्कारांचीं पुटें चढतात, कांही काळाने तीं पडून जातात आणि मूळचे आनुवंशिक संस्कार पुन्हा प्रभावी होऊं पाहतात. गंगाधररावांच्या चरित्रांत या संस्कारांच्या चक्रनेमिक्रमाचें, खालीवर होणाऱ्या पूर्व व नूतन संस्कारांच्या स्थित्यंतराचें सुंदर चित्र पाहावयास मिळतें. त्यांनी आपल्या पत्नीला सुधारण्याकरिता केलेले प्रयत्न व त्यांत त्यांना आलेलें अपयश याची मोठी हृदयद्रावक कथा या ग्रंथांत लिहिलेली वाचतांना वाचकाच्या मनास चटका लाविल्याशिवाय राहत

नाही. पत्नीच्या जुन्या रूढीस चिकटून राहण्याच्या निश्चयामुळे "आपल्या गृहसौख्यांत बरीच अडचण उत्पन्न होणार ही कल्पना झाली, व ती कल्पना माझी बायको मरेपर्यंत खरी ठरली." या प्रकरणाचा शेवट "त्यामुळे माझे सर्व बेत फिसकटले व प्रपंचाच्या एकी मुख्य भागाचें सौख्य मला लाभलें नाही." हे हृदय पिळवटून टाकणारे उद्गार काढून त्यांनी केला आहे (पान ७२).

'प्रजया मनुष्यः पूर्णः', पुत्राशिवाय पुरुषास अथवा स्त्रीस मरणोत्तर सद्गती नाही, निपुत्रिकाचा पुन्नाम नरकांतून उद्धार होऊं शकत नाही, या विचाराचा वैदिक धर्मानुयायांच्या मनावर फार मोठा पगडा बसला आहे. निपुत्रिकपणाचें दुःख पुरुषापेक्षाही स्त्रियांना अधिक जाणवतें व या आपत्तीमुळे त्या कशा बेचैन होतात, याचें दिग्दर्शन गंगाधररावांनी स्वतःच्या पत्नीच्या निधनासंबंधाने आपल्या अंतःकरणांतील दुःखाला वाट फोडण्याकरिता म्हणून जे विचार प्रदर्शित केले आहेत त्यावरून होतें. आपल्या वंध्यत्वामुळे आपल्या पतीला पुत्रसौख्याचा लाभ होत नाही या दुःखाने त्या साध्वी स्त्रीचें अंतःकरण होरपळून जातें आणि आपल्या पतीच्या सौख्यासाठी स्वतःच्या सुखाचा सर्वस्वी होम करण्यासही ती तयार होते, व नवऱ्याला दुसरें लग्न करण्याची गळ घालते. गंगाधररावांनी आपल्या पत्नीच्या आग्रहाचा थोडक्या मार्मिक शब्दांत उल्लेख करून अशिक्षित, मागासलेल्या म्हणून मानलेल्या आर्यमहिलांच्या अंतःकरणांत ज्या उदात्त त्यागवृत्तीची ज्योत पेटलेली असते, तिचें डोळे दिपविणारें व बुद्धी स्तिमित करणारें दर्शन प्रेमकलहाच्या व प्रियाराधनेच्या कथा नित्य वाचणाऱ्या आणि पाहणाऱ्या प्रस्तुतकालीन युवकयुवतींस करून दिलें आहे. आर्यमहिलांचें पतिप्रेम आणि आर्ययुवकांचें पत्नीप्रेम हीं एखाद्या खळखळा शब्द करीत वाहणाऱ्या उथळ ओढ्याप्रमाणे नसून प्रशांत दिसणाऱ्या पण अथांग पाणी असलेल्या शुचिर्भूत व स्पर्श करणारास पावन करणाऱ्या गंगौघाप्रमाणे आहे. गंगाधरराव लिहितात, "मला माझ्या पत्नीच्या मृत्यूची बातमी माझ्या मेहुण्याच्या तारेवरून कळली. त्या वेळीं मला अत्यंत दुःख झालें. तेव्हापासून तिची योग्यता मला कळूं लागली व तिच्याकडे दोष नसतां माझ्या हातून तिला वागविण्यांत ज्या चुका घडल्या त्यांची आठवण होऊन पश्चात्ताप होतो." गंगाधररावांच्या दांपत्यजीवनाचा हा वृत्तांत दोघांच्याही थोर अंतःकरणाची साक्ष पटविणारा आहे, व पुढील काळांत असलीं हृदयें प्रायः दुर्लभ व अप्राप होतील असे विचार मनांत येऊन क्षणभर मन विषण्ण होतें.

गंगाधरराव हे मनाने सुधारक होते व त्यांच्या आयुष्यांतील पूर्वभाग पुण्यांतील थोर सुधारकांच्या संगतींत व सहवासांत गेला. त्यामुळे व कै. वा. गोपाळराव गोखले यांच्या एकंदर राहणींत व विचारसरणींत जें चटकन डोळ्यांत भरणारें सौजन्य आणि विद्वानांच्या नित्य प्रत्ययास येणारें राजकारणाच्या अभ्यासाचें प्रेम आणि संघटनात्मक व विधायक कार्य करण्याविषयींचें औत्कट्य होतें यामुळे त्यांना गोपाळरावजी गोखले या थोर विभूतीसंबंधाने नितांत आदर वाटूं लागला व ते आपणास त्यांचे

अनुयायी म्हणून मानूं लागले, हें अगदी स्वाभाविक आहे. त्यांचा हा संबंध बंगालच्या उपसागरांतून वंगभंग आंदोलनाचें १९०५ मधील वादळ उठेपर्यंत कायम होता. योगी अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, ब्रह्मबांधव उपाध्याय इत्यादि बंगाली पुढाऱ्यांच्या क्रांतिकारी विचारगंगेच्या धो धो वाहणाऱ्या प्रवाहानें त्यांचें मन ओढलें गेलें. त्याच विचारांची मीमांसा 'केसरीं'तील लेखांतून मोठ्या मार्मिक रीतीने होऊं लागली व बंगालच्या फाळणीविरुद्ध आकाशपाताळ एक करून भारताने इंग्रजी सार्वभौम सत्तेशीं निकराने लढा दिला पाहिजे असा आदेश 'केसरीं'तील लेखांतून टिळक देऊं लागले. गंगाधररावांच्या मनाची तेव्हा चलबिचल होऊं लागली. त्यांनी आपल्या मनःस्थितीचें ज्ञान ना. गोखले यांस करून दिलें, व त्यांच्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा केली. त्यांनी गंगाधररावांना लो. टिळकांकडे जाण्यास सांगितलें. टिळकांनी गंगाधररावांचें अंतःकरण ओळखलें व आपले सहकारी म्हणून आपल्या कार्यकर्त्यांच्या मंडळांत त्यांना प्रमुखस्थान देऊन त्यांचा आदर केला. या ग्रंथांत गंगाधररावांच्या या आश्रमांतराचा वृत्तांत त्यांनी स्वतःच सांगितला आहे. तो वाचत असतां, मेंढ्यांच्या कळपांत वाढलेल्या सिंहाच्या छाव्याच्या कथेची वाचकास आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्या बालसिंहास इतर मेंढ्यांबरोबर ब्यां ब्यां करण्याची सवय झाली होती; तसें करतांना त्याला कष्ट होत होते; तरी पण आपल्या अजाबंधूंच्या बरोबर तो तसाच आवाज काढून त्यांच्याशीं एकसुरांत राहण्याचा प्रयत्न करीत असे. एके दिवशीं तो आणि इतर मेंढ्या पाणी पिण्यास गेल्या असतां एका सिंहाने त्या कळपावर झडप घातली. त्यासरशी मेंढ्या सैरावैरा रानोमाळ पळत सुटल्या. हा सिंहाचा छावाही त्यांच्याबरोबर पळावयाला लागला. तेव्हा त्या गर्जना करीत येणाऱ्या वनराजाने त्याला धरलें आणि विचारलें, "तूं कां पळतोस?" तो म्हणाला, "या मेंढ्या माझ्या आप्त आहेत, मी त्यांचा आहें." मृगराज म्हणाला, "या पाण्याच्या प्रवाहांत तूं पाहा, व तुझें रूप आणि मेंढ्यांचें रूप कसें आहे हें पटवून घे." वाहत्या पाण्याच्या प्रतिबिंबांत त्या सिंहाच्या छाव्याला आत्मदर्शन झालें, आपल्या वंशाची ओळख पटली आणि मृगेंद्राच्या गर्जनेचा प्रतिध्वनी करण्याची सहज स्फूर्ती झाली. त्याबरोबर त्याने मेंढ्यांच्या कळपाबरोबर मेंढवाड्यांत जाण्याची वाट सोडून, मृगराजाच्या मागे केसरीच्या गुहेंत प्रवेश केला. तेव्हापासून म्हणजे १९०५ ते १९२० पर्यंत लोकमान्यांचा उजवा हात म्हणून या कर्नाटकसिंहाने जी कामगिरी केली तिचें वर्णन गंगाधररावांनी या ग्रंथांत साद्यंत केलें नाही. कर्नाटकाच्या जागरणाचा जेव्हा इतिहास लिहिण्यांत येईल तेव्हाच गंगाधररावांच्या कार्याची साद्यंत हकीकत वाचकास वाचावयास सापडेल. निजलेला कर्नाटक गंगाधररावांनी जागा केला, इतकेंच नाही तर शैव, वैष्णव व लिंगाईत इत्यादि पंथांच्या मतभेदांतून निष्पन्न झालेल्या परस्परसंशयी व विरोधी वृत्तीचा बीमोड करून या सर्व पंथांच्या लोकांना टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाच्या आघाडीवर उभें केलें; आणि पुढे महात्मा गांधींच्या अभिनव अहिंसावादी आंदोलनांत सर्वस्वार्पण करण्यास तयार असलेल्या हजारों तेजस्वी कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण करून

कर्नाटकाला महात्मा गांधींच्या युद्धांतील एक अजिंक्य बुरूज बनवून दिला.

सत्याग्रहासारख्या आवेशप्रधान लढाऊ कार्यक्रमांत जसा कर्नाटक आघाडीवर होता तसाच तो त्यांच्या खादी, अस्पृश्योद्धारादि विधायक कार्यांतदेखील अग्रमालिकेंतच राहिला. त्यांच्या या दुहेरी कार्यपद्धतींतील यशस्वितेकडे पाहून मला प्रख्यात शीख-पंथीय नेते गुरु गोविंदसिंग यांच्या चरित्राची आठवण येते. युद्धाचे वेळीं ज्या हातांनी विजेसारखें तळपणारें खड्ग हातांत घेऊन शत्रूवर ते तुटून पडत आणि त्यांचीं शिरकमलें धडापासून वेगळीं करीत, त्याच हातांत युद्ध संपतांच जपमाळ घेऊन गुरुजींचें स्वास्थ्य रक्षण करण्यांत ते तासचे तास घालवीत. दोन्ही कार्यांचा उद्देश एक. सत्याचें रक्षण करावें, असत्याचें पारिपत्य करावें; असद्विचाराचें निर्मूलन करावें, सद्विचाराचें बीजारोपण करून त्याला वाढीस लावावें. हीं दोन्ही कार्यें एकच आहेत व हीं कार्यें तेच यशस्वी रीतीने करूं शकतात की ज्यांनी गीतेंतील स्थितप्रज्ञाची शिकवणूक आत्मसात् केली आहे.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोस्त्वकर्मणि ॥**

लोकमान्यांनी 'गीतारहस्यां'त कर्मयोगशास्त्राचा हा मुख्य सिद्धांत म्हणून लोकांसमोर ठेविला, व त्याचें आयुष्यभर प्रतिपालन केलें.

ही गोष्ट त्यांच्या अनुयायांत ज्यांच्या चरित्रांत प्रमुखपणें प्रतिबिंबित झालेली दृष्टीस पडते त्यांत मी गंगाधररावांच्या चरित्रास अग्रस्थान देतों. थोर माणसांच्या चरित्रांची तुलना करून त्यांची योग्यायोग्यता ठरविणें योग्य नाही असें म्हणतात. तें मला मान्य आहे. पण आपल्या तीव्र राजकारणामुळे सरकारचा रोष व संशय आपल्यावर झाला आहे व पुढेही तो राहणार हें ज्ञान असून, व त्या द्वेषाच्या व अधिकारी-सूडबुद्धीच्या षड्यंत्रांतून आपणास फासावर चढविण्याचे व्यूह अत्यंत निमकहराम लोक हातांत घेऊन करण्यांत येत आहेत हें दृष्टीस पडत असतां, न डगमगतां, मोठ्या धैर्याने त्या बिकट प्रसंगाला तोंड देऊन, आपलें असिधाराव्रताचें काटेकोर परिपालन करणारे लो. टिळकांच्या असंख्य त्यागी अनुयायांच्या कंपूंतदेखील चारदोनच शिष्य निघतील, असें मी निःसंशय म्हणूं शकतों. त्यांचेवर कोल्हापूरच्या संस्थानिकांच्या प्रोत्साहनाने कसे भीषण प्रसंग आले व त्या सर्व प्रसंगांत गंगाधररावांनी यत्नांची पराकाष्ठा करून सरकारी व्यूह कसे ढासळून पाडले ही हकीकत वाचत असतां लोकमान्यांच्या अलौकिक धैर्याचा व 'सत्यमेव जयते' या आध्यात्मिक सिद्धांतावरील त्यांच्या निष्ठेचा वाचकास पदोपदीं प्रत्यय येतो.

लोकमान्यांच्या प्रभावळींत गंगाधरराव देशपांडे यांचें अनन्यसाधारण असें स्थान होतें. लोकमान्यांबरोबर काम करतां करतां, भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस्तवच आपल्या जीवनाचा व्यय करावयाचा या मुख्य व सूत्रभूत सिद्धांतावर स्थिर राहून ते आपली जीवनयात्रा कंठीत होते व आहेत; म्हणूनच त्यांना लोकमान्यांच्या स्वर्गवासानंतर

महात्मा गांधींच्या कार्यक्रमाशीं तन्मय होऊन कार्य करण्यांत कोणतीही अडचण वाटली नाही व तत्त्वच्युतीचा कोणत्याही प्रकारचा संशय आला नाही. उलट त्या कार्यक्रमासाठी सर्वस्व अर्पण करून सतत यत्नशील असणें ही लोकमान्यांच्या तत्त्वाची परिपूर्ती होय ही त्यांची निष्ठा होती, व तीच बरोबर होती असें आज मलाही वाटतें, हें मी प्रांजलपणें मान्य करतों.

परमेश्वर गंगाधररावजींचा दिव्य आदर्श शक्य तितका दीर्घ काल भारतीयांसमोर सत्प्रेरणा देण्यासाठी कायम ठेवो, ही प्रार्थना करून, हा प्रस्तावनालेख लिहिण्याची संधी देऊन ज्यांनी मला उपकृत केलें त्या पुंडलीकजींचे मनःपूर्वक आभार मानून लेखणीला विश्रांती देतों.

**लो. टिळक जयंती**
*नागपूर, ता. २३ जुलै १९६०*

**मा. श्री. अणे**

# आभार

आपले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें प्रथम दर्शन मला सन १९१५च्या मुंबई कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळीं झालें. गांधीजींच्या स्वातंत्र्यलढ्यांतील असहकाराच्या आंदोलनापासून त्यांचा व माझा दाट परिचय झाला, तो आजपर्यंत वाढतच गेला व कायम राहिला. त्यांनी या माझ्या जीवनकथेस पुरस्कार लिहून त्या परिचयावर एका अर्थीं शिक्कामोर्तबच केलें आहे. माझे स्नेही लोकनायक माधव श्रीहरी अणे यांनी या जीवनकथेचा समग्र ग्रंथ बारकाईने वाचून, आपल्या कार्यबाहुल्यांतून मुद्दाम सवड काढून, प्रस्तावना लिहून दिली. या दोन्ही थोर पुरुषांचा मी सदैव ऋणी आहें.

माझी ही जीवनकथा छापून प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत मी राजी नसल्यामुळे ती कांही वर्षें पडूनच होती. मध्यंतरीं चित्रशाळेने ही जीवनकथा छापून प्रकाशित करण्याचें मानस व्यक्त केलें होतें; पण पुढे तें होऊं शकलें नाही. म्हणून ही जीवनकथा प्रकाशित न करण्याच्या माझ्या मूळ विचारावर मी ठाम झालों होतों. परंतु माझे स्नेही व सहकारी स्वामी आनंद यांनी मला पुन्हा तशी परवानगी द्यावयास लाविलें. ही जीवनकथा प्रकाशित झाल्याबद्दल त्यांनाही समाधान झालें. मी त्यांचा आभारी आहें.

माझ्या जीवनकथेचीं हस्तलिखितें पुंडलीकजींनी मुंबईस नेलीं. स्वामी आनंद यांनी त्यांपैकीं कांही वाचलीं, आणि माझे स्नेही श्री. न. र. फाटक यांना या पुस्तकाच्या छपाईकडे लक्ष देण्यास विनंती केली. त्याचप्रमाणे 'मौज प्रकाशन गृहा'चे श्री. भागवत व स्वामी आनंद यांचें बोलणें होऊन तीं हस्तलिखितें श्री. भागवत यांना वाचावयास दिलीं. त्यांनी प्रकाशनाच्या दृष्टीने तीं वाचलीं. श्री. न. र. फाटक यांनीही तीं वाचलीं व ही 'माझी जीवनकथा' छापावयाचा सल्ला दिला. श्री. भागवत यांना अर्थात् तो सल्ला पटला व त्यांनी ती प्रकाशित करण्याचें मान्य केलें. तुरुंगांत असतांना मीं या आठवणी लिहून काढलेल्या असल्यामुळे, त्या वेळीं माझ्याकडे संदर्भासाठी पुस्तकें आणि जुनीं वर्तमान-पत्रांचीं फाइलें वगैरे कांहीच नव्हतें. अर्थात् कित्येक ठिकाणी माहिती व तारखा भरण्यासाठी जागा सोडावी लागली होती. ती सर्व माहिती श्री. फाटक यांनी भरली आणि

मजकुराच्या दृष्टीने सबंध ग्रंथाचीं शेवटचीं प्रुफें—आपली स्वतःची प्रकृती चांगली नसतांनाही—काळजीपूर्वक तपासण्याचें काम माझ्यासाठी केलें, याबद्दल श्री. न. र. फाटक आणि 'मौज प्रकाशन गृहा'चे श्री. भागवत यांचे आभार मी मनःपूर्वक मानतों.

मी मराठीमध्ये भाषणें करीत असें व तीं लोकांना पसंत पडत असत. परंतु लेखनाचें काम मीं फारसें केलेलें नाही. साधारणतः खाजगी पत्रव्यवहार व क्वचित् प्रसंगीं वर्तमानपत्रांत लिहिण्यापलीकडे मीं लेखन केल्याचें मला आठवत नाही. माझी ही जीवनकथा प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर अनुकूलप्रतिकूल टीका येणें स्वाभाविक आहे; त्याबद्दल मला कांहीही वाटणार नाही. स्वामी आनंद, श्री. न. र. फाटक व 'मौज प्रकाशन गृहा'चे श्रीयुत भागवत यांना ही 'माझी जीवनकथा' छापवून प्रकाशित करणें योग्य वाटलें यांत मला समाधान आहे.

माझें वय झालें आहे. मी आता जवळजवळ नव्वदाच्या घरांत पदार्पण केलें आहे. आता प्रकृतीही बरी राहत नाही. दिवसांतून व रात्रींतून पुष्कळ वेळ पडूनच राहावें लागतें. झोपही फारशी येत नाही. अशक्तपणाही वाढला आहे. या जीवनकथेचें कानडी भाषेंत भाषांतर होऊन, तें छापून प्रसिद्ध झाल्याचें मला पाहावयास मिळेल असें वाटत नाही. तथापि ही जीवनकथा प्रथम मराठी भाषेंतून प्रसिद्ध होत आहे, याबद्दल मला आनंद होतो.

माझे सहकारी व आमच्या घरचेच श्री. पुंडलीकजी यांच्या मागे अनेक सार्वजनिक कामें असतांनाही, माझ्या या जीवनकथेच्या प्रकाशनाच्या कामीं त्यांनी सतत व दीर्घ परिश्रम घेतलेले आहेत. त्यांचे आभार मी मानणें अप्रशस्त व आम्हा दोघांनाही शोभून दिसणारें नसलें तरी त्यांचेही आभार मानल्याशिवाय मला राहावत नाही.

माझ्या या जीवनकथेच्या ग्रंथाची सूची तयार करण्याचें काम माझी पणती—माझ्या थोरल्या मुलीची नात—चि. सौ. इंदुमती तथा उमा देशपांडे बी. ए. (ऑनर्स) हिने केलें आहे. तिचे आभार मीं मानल्यास तिला कसेंसेंच वाटेल; म्हणून माझ्या मनांत असूनसुद्धा, मीं तें टाळलें आहे.

*२७ जुलै १९६०*
*बेळगाव*

**गंगाधर बाळकृष्ण देशपांडे**

# अनुक्रमणिका


१ **आमचें घराणें** **पृष्ठ १ ते २०**

तें असें झालें (१); पुढे येरवडा तुरुंगामध्ये (३); आठवणी सांगण्यास प्रारंभ (४); आमचें घराणें (५); येडूर गावाचे महत्त्व (७); आमचा गाव व देशपांडेगिरी (८); हुदली गावाची माहिती (१०); निपाणीकर आप्पासाहेब देसाई (१२); देसाई-देशपांडे इंग्रजांचे अंकित (१२); घराण्याची कांही माहिती (१३); जलालपूरकर देशपांडे (१४); वडिलांचें शिक्षण व वकिली (१५); माझ्या शिक्षणाला प्रारंभ (१६); माझे वडिलांची वकिली (१९).

२ **माझें शिक्षण** **पृष्ठ २१ ते ३१**

तत्कालीन समाजस्थितीचें चित्र (२१); कै. अण्णासाहेब किर्लोस्कर (२३) आमचें शिक्षण व शिक्षक (२५); हायस्कूलमधील माझे स्नेही (२६); शिस्तीचा अनिष्ट परिणाम (२६); माझा 'मुखहीन'पणा (२७); मीं मुंबई पाहिली (२८); पुण्याचें पहिलें दर्शन (२९); वैद्य बापूसाहेब मेहेंदळे (३०).

३ **तरुण वयांतील संस्कार** **पृष्ठ ३२ ते ५०**

विवाहसमारंभांतील 'भूम' (३२); माझा विवाह (३४); माझ्या लग्नांत मी रुसून बसलों (३५); वराचा पोशाख व अहेर (३६); सामाजिक रुढी व नैतिक बंधनें (३७); जुन्या पद्धतीचें कुटुंब (३७); मीं पाहिलेली पहिली कॉंग्रेस (३८); घरीं चालत असलेली चर्चा (४०); नरगुंदकर भावे व कित्तूर चिन्नम्मा (४१); संगोळी रायण्णा (४२); पेशवाई बुडाल्याबद्दलचें सुतक (४३); सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचें वक्तृत्व (४३); अलाहाबादची कॉंग्रेस (४६); कॉंग्रेसनंतर यात्रा (४७); १८८९ सालची मुंबईची कॉंग्रेस (४८).

४ **माझें कॉलेजजीवन** **पृष्ठ ५१ ते ७९**

माझ्या कॉलेजशिक्षणास आरंभ (५१); डॉ. शिरगावकरांच्या मताची छाप (५४);

टिळकांची एकदोन वेळां भेट (५५); सामाजिक सुधारणेचे संस्कार (५८); संमती-वयाच्या वादाला तोंड (६०); संस्कृत मृच्छकटिक नाटक (६१); अखेर बी. ए. झालों (६२); कानडी-मराठी विरोध (६३); डेक्कन कॉलेजांतील चार वर्षें (६५); सुधारक प्रिन्सिपॉल मोडक (६८); तरुण स्त्रीबरोबर फिरण्याचा अनुभव (६९); कुटुंबाला सुधारण्याचे प्रयत्न (७०); कायद्याच्या अभ्यासाचा निश्चय (७३); सबंध वर्ष खेळांत गेलें (७४); राष्ट्रीय सभा व सामाजिक परिषद (७५); फर्ग्युसन कॉलेजांतील आरोप (७७); परीक्षेच्या मंडपाला आग लागली (७८).

५ **माझा वकिलीचा व्यवसाय** पृष्ठ ८० ते ८९

कॉस्मॉपालिटन क्लबांतील प्रकार (८०); 'धुरीण' पत्राची कुळकथा (८१); गोखल्यांची माफी (८३); तेलंगांशीं मतभेद (८४); माझा वकिलीचा अनुभव (८५); 'ठळकवाडी' नावाचें मूळ (८७); नावाजलेले कांही वकील (८७).

६ **सार्वजनिक जीवनांतलें पदार्पण** पृष्ठ ९० ते ११५

म्युनिसिपालिटीचें आव्हान (९०); अष्टेकरांचा दिलदारपणा (९२); 'बेळगावचे पाटील' भीमराव (९२); म्युनिसिपालिटींतील 'वतनदारी' (९४); आमच्या प्रयत्नांना यश (९६); 'वतनदारी' मोडली (९७); म्युनिसिपालिटींतील कामगिरी (९९); स्वतंत्र मतदार संघास संमती (१००); जपानच्या जयाची स्फूर्ती (१०१); तेलंगांशीं जाहीर मतभेद (१०२); गोखले यांनीच टिळकांकडे पाठविलें (१०४); राजकीय चळवळीला प्रारंभ (१०६); गोविंदराव याळगींचा स्नेह (१०८); स्वदेशी कापडाचें दुकान (१०९); डेक्कन स्टोअर्सचा जन्म (१११); आमचा 'व्यापार' (११२); स्वदेशीच्या प्रचाराची झोड (११३); मोहरमच्या धर्तीवर शिमगा (११४); दुकानची भागिदारी सोडली (११४).

७ **लोकमान्यांचें मार्गदर्शन** पृष्ठ ११६ ते १३८

गणपती-उत्सवाची मुहूर्तमेढ (११६); बेळगावांतही गणपती-उत्सव (११७); टिळकांना निमंत्रण (११८); टिळकांचें बेळगावांत शुभागमन (१२०); टिळकांची व याळगींची भेट (१२२); टिळकांच्या चर्येवरील तेज (१२३); टिळकांची वक्तृत्वशैली (१२४); 'टिळकांचा खास जिल्हा' (१२६); पंढरपुरांत टिळक (१२७); टिळकांचें मला मार्गदर्शन (१२८); भाषेबाबत राष्ट्रीय दृष्टि (१३०); टिळकांच्या आग्रहानें कानडी भाषा (१३१); वीरनवालीवरील अत्याचार (१३२); बेळगावांत शिवाजी-उत्सव (१३३); कलकत्याची कॉंग्रेस व टिळक (१३४); टिळकांची व माझ्या वडिलांची भेट (१३७).

८ चळवळीचें वाढतें उग्र क्षेत्र पृष्ठ १२९ ते १५१

सामान्य जनतेशीं संपर्क (१३९); मद्यपानप्रतिबंधक चळवळीस प्रारंभ (१४०); स्वदेशी चळवळीचा आढावा (१४३); कॉंग्रेस नागपुराहून सुरतेला कां नेली? (१४३); सुरतेची इतिहासप्रसिद्ध कॉंग्रेस (१४५); अधिवेशनाचा पहिलाच दिवस (१४६); बॅ. बॅप्टिस्टा आणि टिळक (१४७); 'राष्ट्रमत' पत्राचा जन्म (१४८); टिळकांवरील खटला (१४८); जहालांची निष्क्रियता (१४९).

९ राष्ट्रमताचा 'राष्ट्रमठ' पृष्ठ १५२ ते १६८

जे. आबासाहेब रामचंद्र (१५२); जे. आबासाहेबांची मडगावची संस्था (१५४); आबासाहेबाला अटक व शिक्षा (१५६); 'राष्ट्रमता'ची सांपत्तिक स्थिति (१५९); बाबासाहेब सोमण यांचा संबंध (१६१); वीर वामनराव जोशी आणि 'राष्ट्रमत' (१६२); काकासाहेब कालेलकरांची ओळख (१६४); 'राष्ट्रमत' बंद करावें लागलें (१६६).

१० क्रांतिकारकांशीं संबंध पृष्ठ १६९ ते २१०

नाशिक येथील क्रांतिकारकांची भेट (१६९); वासुदेवराव कुलकर्णी यांची थाप (१७१); गोखल्यांची फिर्याद (१७२); जॅकसनसाहेबाचा खून (१७३); पकडापकडी आणि कबुलीजबाब (१७४); गायडरने केलेली चौकशी (१७५); बॅ. विनायकराव सावरकर (१७७); नाशिकचा खटला व बॅ. बॅप्टिस्टा (१७८); श्री. बाबुराव गोखले (१७९); कोल्हापूरचा शिवाजी क्लब (१७९); जगन्नाथ महाराजांचें दत्तविधान (१८०), वेदोक्त प्रकरण हा काय वाद आहे? (१८१) तडजोडीचे माझे प्रयत्न (१८२); टिळक आणि कोल्हापूरदरबार (१८३); पाध्ये व पागे मला अपरिचित (१८६); बेळगावांतील झडत्यांची तयारी (१८७); काका पाटील आणि बॅ. बॅप्टिस्टा (१८८); हणमंतराव देशपांड्यांवरील खटला (१८९); आमचीं वतनें खालसा (१८९); दामू जोशी यांचें गुप्त पत्र (१९१); दामूची जबानी म्हणजे कादंबरी (१९१); गणपतराव मोडकांची फसगत (१९२); पोलिसांचे नवे मदतनीस (१९४); श्रीधर हरी खेर यांचें धाडस (१९६); कोल्हापूरचा 'कावळ्याचा बंगला' (१९८); थोडीशी तात्त्विक चर्चा (२००); शाहू महाराजांचा स्वभाव (२००); मला अडकविण्याचा कट (२०२); शाळिग्रामचा डाव उलटविला (२०३); दामू जोशाची जबानी (२०५); अण्णासाहेब लठ्ठे (२०७); झुंजणारी दरबारी कोंबडीं (२०७); एक धाडसी व हुषार राजा (२०८); सर्व उत्पन्न खालसा झालें (२०९).

११ एक अव्यापारेषु व्यापार पृष्ठ २११ ते २२५

उद्योगधंद्याचे बेत (२११); बँकांचें पीक (२१२); आमच्या बँकेचा जन्म (२१४)

छोटालालने दिलेला दगा (२१५); आमचे डोळे उघडले (२१७); बाळाजी आवाजी यांची मदत (२१८); गुलाबचंदांची युक्ती (२१९); भोगावा लागलेला भूर्दंड (२२०); गोविंदराव याळगींचें साहाय्य (२२१); वडिलांची आठवण (२२३).

१२ माझ्यावरील खुनाचा खटला पृष्ठ २२६ ते २५०

शंकर कालकुंद्रीकरांचा 'खून' (२२६); पोलिसांचें चक्र सुरू (२२७); हरीनानांना पकडलें (२२९); माझ्यावरील आरोप व अटक (२३०); गोविंदरावांचे धाडसी बेत (२३१); साक्षीदाराला लांबविलें (२३३); सांगलीकरांशीं पोलिसांचें संगनमत (२३५); बॅरिस्टर मिळविण्याची खटपट (२३६); बाबासाहेब परांजपे आणि हार्डे (२३७); बॅरिस्टर नॉर्टन यांचें कौशल्य (२३९); लोकमान्यांच्या सुटकेची तार (२४०); निर्दोषी म्हणून माझी सुटका (२४१); हाडांच्या पुराव्याला सुरुंग (२४३); हरीनानांच्या कुटुंबाची साक्ष (२४४); माझी उलटतपासणी (२४५); लोकमान्यांची भेट व आशीर्वाद (२४७); जाफर इमामचा खून (२४७); ऑपरेशन होऊन पत्नीचा मृत्यु (२४९).

१३ लोकमान्यांचें 'पुनश्च हरिः ॐ' पृष्ठ २५१ ते २६५

लोकमान्य पुनः घडी बसवूं लागले (२५१); कॉंग्रेसला कार्यक्षम करण्याचा हेतू (२५२); पुण्यांत भरलेली परिषद (२५३); बेळगावची प्रांतिक परिषद (२५५); गांधीजींची परिषदेंत उपस्थिती (२५७); टिळकांची व गांधीजींची भेट (२५९); ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद (२६०); ब्राह्मणेतरांचें गांधीजींना निमंत्रण (२६१); लोकमान्यांनी दिलेली अमूल्य भेट (२६२); गोविंदरावांची इच्छा (२६३); पुंडलीकजींचा व माझा संबंध (२६३); स्वराज्यांतही सरकारला विरोधच (२६५).

१४ टिळक-विजय पृष्ठ २६६ ते २८७

लोकमान्यांचा साठीचा सत्कार (२६६); टिळकभक्तांच्या वतीने माझें भाषण (२६७); टिळक व गांधी यांची मिरवणूक (२६८); अखिल-भारतीय पुढारी टिळक (२६९); राष्ट्रीय पक्षाचा विजय (२७१); लखनौ करार (२७२); बेझंटबाईंच्या अटकेचा परिणाम (२७३); मॉंटेग्यूकडे गेलेलें शिष्टमंडळ (२७४); बेळगाव जिल्ह्यांत टिळकांचा दौरा (२७५); 'क्यारप्पा लोकमान्य' (२७६); वऱ्हाड-नागपूरकडे दौरा (२७६); बेझंटबाई आणि कलकत्त्याची कॉंग्रेस (२७७); गांधीजी चंपारण्यांत गेले (२७८); बाबासाहेब सोमण चंपारण्यांत (२७८); पुंडलीकजींच्या 'भलत्या कल्पना' (२७९); शंकर दत्तात्रय देव यांचा संबंध (२८०); रिक्रूटभरती, टिळक आणि गांधी (२८०); विजापुरांत मुंबई प्रांतिक परिषद (२८२); सेनापती बापटांचें प्रेमळ अंतःकरण (२८३); टिळक-गांधीजींची चर्चा (२८४); प्रत्यक्ष कॉन्फरन्समध्यें काय घडलें? (२८५); टिळकांची मनधरणीची खटपट (२८६); टिळकांची तारतम्यबुद्धी (२८६).

१५ टिळकांच्या गैरहजेरींत पृष्ठ २८८ ते ३०२

चिरोल खटल्याकरिता प्रस्थान (२८८); टिळकांनी सांगितलेलीं दोन कामें (२९०); आम्ही कोलंबोपर्यंत गेलों (२९०); भारतीय मराठा राजकीय परिषद (२९२); अथणीची 'बेळगाव जिल्हा परिषद' (२९३); कानडी-मराठी वादाचीं पाळेंमुळें (२९४); स्वदेशीची उच्च नैतिक पातळी (२९४); माझे नवे सहकारी (२९७); गोविंदराव याळगींवरील फौजदारी (२९९); चिरोल केस फंड व गांधीजी (३००); पालथ्या घागरीवर पाणी (३०१); रौलट बिल आणि गांधीजी (३०२).

१६ टिळकयुगाचा उपसंहार पृष्ठ ३०३ ते ३२४

टिळक इंग्लंडहून परत आले (३०३); 'प्रतियोगी सहकारिते'चा जन्म (३०४); शौकत अल्लींचा मी 'गुरु' (३०६); नेमस्तांचे विरोधाचे उपद्व्याप (३०६); टिळकांनी केलेला माझा गौरव (३०७); संकेश्वरची बेळगाव जिल्हा परिषद (३०९); ब्राह्मणेतरांनी केलेला विपर्यास (३१०); नेमस्त-ब्राह्मणेतरांची युति (३१०); टिळकांच्या मृत्यूचें भविष्य (३१२); कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी व मी (३१३); असहकारिता आणि टिळक (३१४); हिंदी मुसलमान समाजाची जागृती (३१५); काशीमध्ये ऑल इंडिया कॉंग्रेस (३१६); केळकरांच्यावर निराधार आरोप (३१७); टिळकांनी निवडणुकीला उभें राहावें (३१८); उमेदवारांत माझें नांव (३१९); माझ्यावरील पेच (३२०); निवडणुकींतील अनुभव (३२०); लोकमान्यांचें देहावसान (३२२); गोविंदराव याळगींची प्रतिज्ञा (३२४).

१७ असहकार युगाचा उपक्रम पृष्ठ ३२५ ते ३४९

दहा पुढाऱ्यांची समिती (३२५); गांधींना विरोध केला असता? (३२५); कलकत्ता कॉंग्रेसमधील बलाबल (३२७); कॉंग्रेसला विरोध करावयाचा नाही (३२८); मुसलमानांचेही डोळे उघडले (३२९); टिळकांनी गांधींना सोडलें नसतें (३३०); पुण्यांतील एक दिवसाचा मुक्काम (३३१); कानडी-मराठी वादाचें दर्शन (३३२); गांधी टोपीचा स्वीकार (३३४); गांधीजींचा दौरा (३३५); लाख रुपयांची खोटी गोष्ट (३३६); बॅ. दासांशीं विचारविनिमय (३३७); कॉंग्रेसची भाषावार प्रांतरचना (३३८); असहकारितेचा निर्णय (३३९); मराठी दैनिक 'लोकमान्य' (३४०); कॉंग्रेससंघटनेच्या नवीन कमिट्या (३४१); कॉलेजांवर बहिष्कार (३४३); मुंबईमधील विद्यार्थ्यांमध्ये काम (३४४); 'साधकाश्रमा'ची स्थापना (३४४); महाराष्ट्रांत बहिष्कार मंदावला (३४६); चोहोकडे राष्ट्रीय शाळांची स्थापना (३४६); 'राष्ट्रीय' शिक्षणांतील नुकसान (३४८); वकिलीवर बहिष्कार व खादी-प्रचार (३४८).

१८ माझा तुरुंगवास पृष्ठ ३५० ते ३६५

कर्नाटकांत खादीप्रचार सोपा (३५०); धारवाडांतील गोळीबार (३५१); काँग्रेस-तर्फे चौकशी (३५२); अपुरा दौरा पूर्ण (३५३); बेझवाडा येथील काँग्रेस (३५३); असहकारितेचा प्रचार (३५४); माझ्यावर १२४ अ प्रमाणे खटला (३५५); बेळगावला गुप्त रीतीने आलों (३५६); मला प्रत्यक्ष अटक झाली (३५७); गोविंदराव याळगींचा सल्ला (३५९); उलटतपासणीचा अनावर मोह (३६०); विजापूरच्या तुरुंगांतील वास्तव्य (३६०); विजापूर जेलमधून येरवड्यास (३६१); सुटकेपूर्वीचे तुरुंगांतील दिवस (३६४).

१९ फेर-नाफेर पक्षांतील ओढाताण पृष्ठ ३६६ ते ३८७

सुटकेनंतरचा माझ्यापुढील प्रश्न (३६६); सहकाऱ्यांशीं विचारविनिमय (३६७); मुळशी सत्याग्रहासाठी परिषद (३६९); लखनौची वर्किंग कमिटीची बैठक (३७०); फेर-नाफेर पक्षांतील ओढाताण (३७१); ब्राह्मण-लिंगायत तंट्याचें मूळ (३७३); असहकारितेचा उपाय (३७४); देशांतील वाढते मतभेद (३७५); कोऱ्या कागदाची कहाणी (३७५); कंटाळवाणा वादविवाद (३७६); निवडणुकीच्या तक्रारीची चौकशी (३७७); राजगोपाळाचार्य यांची कुशाग्र बुद्धी (३७७); चौकशी कमिटीचें काम व अनुभव (३७८); स्वराज्यपक्षाची स्थापना (३७९); गोविंदराव याळगींचें अकालीं निधन (३८०); काँग्रेसमधील स्थित्यंतरें (३८१) नागपूरचा झेंडा सत्याग्रह (३८२); काँग्रेसचे अध्यक्ष महमदअली (३८३); दिल्लीची जादा काँग्रेस (३८४); काँग्रेसच्या ठरावाचा अर्थ व मर्यादा (३८५); दळवींना मीं कां मदत केली ? (३८६).

२० कर्नाटकांत काँग्रेसला निमंत्रण पृष्ठ ३८८ ते ४०४

काँग्रेसला कर्नाटकाचें निमंत्रण (३८८); काँग्रेसच्या चिटणिशीसाठीं नांव (३८८); काँग्रेस कुठे भरवावी ? (३८९); हुबळींतील बेळगावची शिफारस (३९०); हुबळीस दिसलेला देखावा (३९२); बेळगावच्या बाजूने कौल (३९३); काँग्रेसच्या तयारीला प्रारंभ (३९५); बेळगावाला पुनः विरोध (३९६); एकदिलाने काम चालू (३९७); वल्लभभाईची चौकशी (३९८); जळगावची महाराष्ट्र प्रांतिक परिषद (३९९); अहमदाबादची वादग्रस्त बैठक (३९९); गांधींचें 'रुदनपर्व' (४०१); गांधीजींचा २१ दिवसांचा उपवास (४०२).

२१ बेळगावची काँग्रेस पृष्ठ ४०५ ते ४२५

बेळगाव काँग्रेसचे अध्यक्ष (४०५); बेळगाव काँग्रेसचा तंबू (४०५); सर्वारंभा-स्तंडुलाः प्रस्थमूलाः (४०६); 'विजयनगर'ची आठवण (४०७); रागलोभांतील

विवेक (४०८); स्वयंसेवक दल आणि सफाई खातें (४०९); भोजनाची आदर्श व्यवस्था (४११); खादीचा 'राजवाडा' (४१२); कॉंग्रेस अधिवेशनाचे मदतगार (४१३); बेळगावची 'कॉंग्रेस विहीर' (४१४); घोडेस्वार स्वागताध्यक्ष (४१५); स्वराज्यपक्षाशीं समेट (४१६); भाषणांवर मर्यादा घातली (४१८); गांधीजींची प्रार्थना (४१९); आधी पाठिंबा, मग टाळाटाळ (४२०); चोख हिशेब दिला (४२१); महात्माजींची तत्त्वनिष्ठ वृत्ती (४२२); महाराष्ट्राची खोड (४२३); कॉंग्रेसबरोबरच्या इतर परिषदा (४२४);

**परिशिष्ट १** ... ४२६ ते ४३४

**परिशिष्ट २** ... ४३५ ते ४३८

**परिशिष्ट ३** ... ४३९

**सूची** ४४० ते ४५२

## *शुद्धिपत्र*

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १० | २ | सुळेभावी | सुळधाळ |
| १० | २० | सुळेभावी | सुळधाळ |
| ३२ | ३ | भम | भूम |
| ५५ | २६ | वळां | वेळां |
| १६४ | ४ | काल्ककरांची | कालेल्करांची |
| २२६ | ३ | शंकर काळकुंद्रीकरांचा खून | शंकर देशपांडे यांचा खून |
| २७१ | १ | राष्टीय | राष्ट्रीय |
| ३१० | १ | ब्राह्मणतरांनी | ब्राह्मणेतरांनी |
| ३७८ | १५ | कमिटीच | कमिटीचे |
| ३८८ | १ | प्रकरण बाविसावें | प्रकरण विसावें |
| ४०५ | १ | प्रकरण तेविसावें | प्रकरण एकविसावें |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... वि: ...................
क्रमांक ...................... नों. दि. ...................

अनुक्रम............
विभाग..............
क्रमांक ........
नों. दि. .......

# माझी जीवनकथा



वनारस येथे लोकमान्यांच्या प्रभावळींत गंगाधरराव (खुर्चीवर डावीकडून पहिले)

बेळगांवांत लोकमान्यांसमवेत गंगाधरराव (खुर्चीवर डावीकडून पहिले)





बनारस येथे लोकमान्यांच्या प्रभावळींत गंगाधरराव (खुर्चीवर डावीकडून पहिले)

बेळगांवांत लोकमान्यांसमवेत गंगाधरराव (खुर्चीवर डावीकडून पहिले)





बेळगांवांत लोकमान्यांचें स्वागत : १६ जानेवारी १९१७
(डावीकडून दुसरें गोविंदराव याळगी व सहावे गंगाधरराव)

हिंडलगा तुरुंगाच्या दारांत
सेनापती बापटांसमवेत
गंगाधरराव





वडील भाऊसाहेब देशपांडे



मातोश्री राधाबाई



सून सौ. प्रमिला
व नात चि. अंजली



बनारस येथे लोकमान्यांच्या प्रभावळींत गंगाधरराव (खुर्चीवर डावीकडून पहिले)

बेळगांवांत लोकमान्यांसमवेत गंगाधरराव (खुर्चीवर डावीकडून पहिले)





बेळगांवांत लोकमान्यांचें स्वागत : १६ जानेवारी १९१७
(डावीकडून दुसरे गोविंदराव याळगी व सहावे गंगाधरराव)



हिंडलगा तुरुंगाच्या दारांत
सेनापती बापटांसमवेत
गंगाधरराव





मातोश्री राधाबाई

वडील भाऊसाहेब देशपांडे



सून सौ. प्रमिला
व नात चि. अंजली



हणमंतराव देशपांडे व भीमराव पोतदार यांच्यासमवेत गंगाधरराव



स्वामी आनंद व रंगराव दिवाकर यांच्यासमवेत गंगाधरराव





जीवनराव व कृष्णराव याळगी
यांच्यासमवेत गंगाधरराव

निष्ठावंत व कर्तबगार सहकारी
गोविंदराव याळगी आणि गंगाधरराव देशपांडे



परमस्नेही दा. वि. गोखले आणि गंगाधरराव देशपांडे



रा. व्यं. वडवी व पुंडलीकजी कातगडे यांच्यासमवेत गंगाधरराव



बाबासाहेब सोमण



खीरा कुटुंबियांसमवेत गंगाधरराव



पहिल्या खेर मंत्रिमंडळाची
चर्चा करतांना
अच्युत पटवर्धन व गंगाधरराव



विनोबा
आणि
गंगाधरराव

राज्य-पुनर्रचना-समितीशीं
चर्चा करतांना
गंगाधररावांच्या घरीं





गंगाधररावांच्या वाढदिवसानिमित्त
राजेंद्रबाबूंनी बेळगावीं भेट दिली तेव्हा (१९५९)

प्रकरण पहिलें

# आमचें घराणें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८६०

*तें असें झालें!*

इ. स. १९३२ च्या जानेवारी महिन्याच्या ७ तारखेस कुमरी येथे रात्रीं ९ वाजतां मला सरकारने नुकत्याच लागू केलेल्या ऑर्डिनन्स-अन्वयें अटक करण्यांत आली, व दुसरे दिवशीं बेळगावच्या सेंट्रल जेलमध्ये डेटिन्यू म्हणून ठेवण्यांत आलें. जानेवारी ता. ७ पासून मार्च ता. ४ पर्यंत बेळगावच्या तुरुंगांत डेटिन्यू म्हणून असल्या वेळीं माझ्याबरोबर असलेल्या एकदोन मित्रांनी माझ्या आयुष्यांतल्या कांही महत्त्वाच्या गोष्टी सांगण्याबद्दल मला आग्रह केला. संगतवार असें कांही न सांगतां प्रसंगानुसार कांही कांही ठळक गोष्टी सांगेन, असें त्या मित्रांना कळवून त्यांचें मीं कसें तरी समाधान केलें. पण या दोन महिन्यांत असे प्रसंग फारच थोडे आले. ता. ४ मार्च रोजीं, कायदेभंगाच्या चळवळींत मीं भाग घेऊं नये, बेळगाव शहर म्युनिसिपालिटीची हद्द व बेळगाव लष्करची हद्द सोडून जाऊं नये, इत्यादी अटी घालून मला सोडण्यांत आलें. त्यानंतर मी बेळगावासच राहिलों. ता. २३ एप्रिल रोजीं कॉंग्रेसच्या त्या वेळच्या अध्यक्ष श्री. सौ. सरोजिनीदेवी यांना अटक करण्यांत आली. त्यांनी त्या वेळीं आपल्या जागीं माझी नेमणूक केली. कॉंग्रेसचा सर्वाधिकारी अध्यक्ष या नात्याने मी काम करीत असतां ता. २४ जून १९३२ रोजीं मला पुन्हा ऑर्डिनन्सखाली पकडून बेळगावच्या तुरुंगांत डेटिन्यू म्हणून ठेवण्यांत आलें. त्या वेळीं बेळगावच्या तुरुंगांत पाच-सहाशे राजकीय कैदी असावेत. त्यांमध्ये माझे विद्वान मित्र श्री. काकासाहेब कालेलकर व सहकारी श्री. पुंडलीकजी हे होते. हा माझा तुरुंगवास वर्ष-दोन-वर्षें मुदतीचा होईल ही कल्पना पुंडलीकजींना व काकांना असावी; कारण मी तुरुंगांत आल्याबरोबर या खेपेला माझ्या आयुष्यांतील अनुभव लिहून ठेवावे असें त्यांनी ठरविलें होतें व ही गोष्ट पुंडलीकजींनी पहिल्याच दिवशीं मला सांगितली. पण अनेक कारणांमुळे मला ती कल्पना

पटली नाही, व तसें मीं पुंडलीकजींना कळविलें. दुसरे दिवसाच्या भेटींत दुसरी जी कल्पना पुन्हा माझ्यापुढे मांडण्यांत आली ती अशी : स्वतःच्या गोष्टी लिहिण्याला संकोच किंवा अडचणी वाटत असल्या तरी गेल्या पंचवीस-तीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांत अप्रसिद्ध पण कर्तृत्ववान अशा अनेक लहानसान व्यक्तींशीं माझा संबंध आला आहे. त्यांपैकी कित्येक निवडक व्यक्तींचीं चरित्रें मीं लिहावीं, अशी या दोघांचीही इच्छा असल्याचें मला सांगण्यांत आलें. पहिल्या कल्पनेपेक्षा ही दुसरी कल्पना मला पटली. आपल्या देशांत चरित्रें लिहिण्याची कल्पना अगदी नवीन आहे. त्यांतून मोठ्या व नामांकित व्यक्तींचीं चरित्रें थोडींबहुत लिहिण्याचा उपक्रम चालू आहे—कांही सुप्रसिद्ध व्यक्तींनी अलीकडे आत्मचरित्रेंही प्रसिद्ध केलीं आहेत. पण देशाच्या प्रचलित उलाढालींत अनेक लहानसान लोकांनी मोठ्या लोकांनी दाखवून दिलेल्या मार्गानें जाऊन, आपली शिकस्त करून कर्तव्य बजावल्याचीं उदाहरणें कांही थोडीं नाहीत. तथापि त्याबद्दलची माहिती स्थानिक लोकांनादेखील फारशी नसते. त्यामुळे अशा लोकांच्या कर्तृत्वाचा विसर पडतो, व राष्ट्राच्या इतिहासाला एक प्रकारचें तेवढें वैगुण्य येतें. मोठे लोक साधारण लोकांपेक्षा बुद्धीने, अनुभवाने, चारित्र्याने, वगैरे फारच मोठे असतात. त्यांनी केलेली कामगिरी इतरांच्या आटोक्याबाहेर असते. म्हणून त्यांच्याकडे आदरपूर्वक पाहण्यापेक्षा अधिक कांही साधारण माणसाकडून होत नाही. उलट एखाद्यास आपल्या बरोबरीच्या माणसाने कांही महत्त्वाची कामगिरी करून दाखविली व त्याचें चीज होत आहे असें दिसल्यास, त्यालाही पुष्कळ कामें आपल्या शक्तीच्या बाहेरचीं आहेत असें न वाटतां कामांत पडण्याला हुरूप येतो. म्हणून अशा माणसांबद्दलची माहिती संकलितपणें होणें जरूर आहे. अशाच प्रकारची कल्पना एकदा श्री. दे. भ. तात्यासाहेब (नरसिंह चिंतामण) केळकर यांनी माझ्याजवळ बोलून दाखविली होती. माझ्या अनुभवांत अशा कांही व्यक्तींचा संबंध आल्याने, त्या दिशेने प्रयत्न करून पाहावा असें माझ्या मनांत आलें. म्हणून पुंडलीकजींच्या सांगण्याला मीं मान्यता दिली. या खेपेला चार-पाच दिवसच मला डेटिन्यू म्हणून ठेवण्यांत आलें. ता. २८ जून १९३२ रोजीं माझ्यावर कांही अपमानास्पद अटी लादण्यांत येऊन मला सोडण्यांत आलें. त्या अटींमध्ये मी दररोज दोन प्रहरीं बारा-एकच्या दरम्यान शहर पोलीस सबइन्स्पेक्टरकडे हजेरी द्यावी अशी एक अट होती. अर्थात ही अट मीं मानली नाही म्हणून मला ता. २९ जून १९३२ रोजीं पकडण्यांत आलें, व त्याच दिवशीं हुकूम अमान्य केल्याबद्दल बेळगाव सिटी मॅजिस्ट्रेट यांनी एक वर्षाची साधी कैदेची शिक्षा दिली. मला पुन्हा ता. २९ रोजीं बेळगावच्या तुरुंगांत 'ब' वर्गाच्या कैद्यांच्या बराकींत बिऱ्हाड ठेवावें लागलें. त्या वेळीं 'ब' वर्गांत माझे मित्र रंगराव दिवाकर, अथणीचे डॉ. कुद्धोशे, सत्तीचे रा. कुलकर्णी, हुकेरीचे श्रीनिवासराव देशपांडे व शेट्टी, गोपाळरावांचे वकील व्यंकटराव जोशी व डॉ. करगुप्पीकर, अकोल्याचे श्री. शामराव जोशी हे राजकैदी होते. आम्हां सर्वांना तुरुंगाच्या अगदी दक्षिणेकडील भिंतीजवळ असलेल्या क्षयरोग्यांच्या आवारांत ठेवण्यांत आलें होतें. बाकीची मंडळी

तेथे पूर्वीपासूनच होती. मी जाण्यापूर्वीच त्यांपैकी प्रत्येकाने आपापली हकीकत व अनुभव सांगितला होता. मीं गेल्यानंतर माझी हकीकत सांगण्याला मला मंडळींनी आग्रह केला. पण माझी हकीकत न सांगतां माझे स्नेही काकासाहेब कालेलकर यांची माहिती सांगण्याचें कबूल करून दुसऱ्या दिवसापासून त्यांच्या आयुष्यांतल्या ठळक गोष्टींबद्दलची आणि माझा व त्यांचा संबंध कसा व केव्हा आला व तो पुढे कसा वाढत गेला याबद्दलची माहिती सांगितली. ती बरीच बोधप्रद वाटणाऱ्या मंडळींनी माझी माहिती सांगण्याचा आग्रह केल्यावरून कांही कांही गोष्टी सांगितल्या. तथापि ता. १८ जुलै १९३२ रोजीं एकाएकी बेळगावाहून माझी रवानगी येरवड्यास करण्यांत आली. त्यामुळें तें काम अर्धवटच राहिलें. त्या वेळींही बेळगाव तुरुंगांत असलेल्या माझ्या एका मित्राने माझी सर्व हकीकत लिहून ठेवण्याबद्दल मला कळविलें होतें.

### *पुढे येरवडा तुरुंगामध्ये*

येरवड्याच्या 'ब' वर्गाच्या राजकीय कैद्यांत मी ता. १९ जुलै १९३२ रोजीं आल्यावेळीं मुंबईचे प्रसिद्ध कार्यकर्ते शेठ जमनादास द्वारकादास, मुंबई क्रॉनिकल पत्राचे विद्वान संपादक श्री. सयद ब्रेलवीसाहेब, नाशिकचे 'स्वातंत्र्य' पत्राचे संपादक बाळासाहेब मराठे, येवल्याच्या राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक आपटे, पुण्याच्या युवक संघाचे चालक खाडीलकर अशी पूर्वपरिचित मंडळी होती. याशिवाय पुणें जिल्ह्यांतील खेड्यांत राहून काम करणारे श्री. कर्वे, नगरचे श्री. लुकतुके होते. याशिवाय टिळक महाविद्यालयांतील आयुर्वेद शाखेचे चालक डॉ. लागू हे डेटिन्यू म्हणून होते. हे १९३० सालीं रत्नागिरीच्या तुरुंगांत माझ्याबरोबरच असल्याने माझा व त्यांचा चांगला परिचय झाला होता.

यानंतर पुढे मराठा पत्राचे संपादक श्री. आगाशे, नगरचे सट्टा व अच्युतराव पटवर्धन, नेवासकर, पुण्याचे डावरे वगैरे मंडळी आली. ता. १९ जुलई रोजीं मी गेल्यानंतर कांही दिवसांनी तेथे असलेल्या मंडळींत प्रत्येकाने आपली हकीकत व अनुभव सांगावा म्हणजे एकमेकांची चांगली ओळख होऊन पुढील कार्यालाही अनुकूलता होईल अशी कल्पना निघाली. पण कल्पनेच्या चर्चेच्या वेळीं मंडळींत मी नव्हतों. फक्त श्री. ब्रेलवी यांनी मला लो. टिळकांसंबंधाने व म. गांधींसंबंधाने माहीत असलेल्या आठवणी सांगण्याला सांगितलें होतें; व ही गोष्ट मीं कबूलही केली होती. पण हें बोलणें आमच्या दोघांतच झालें होतें.

सर्वांनीच आपापला अनुभव सांगावा असें ठरल्यानंतर सर्व मंडळींत मी वयाने मोठा असल्याकारणाने माझा अनुभव फार दिवसांचा म्हणून माझी हकीकत सांगण्याबद्दल मला मंडळींनी आग्रह केला. तथापि मीं ही गोष्ट टाळण्याचा प्रयत्न केला.

वयाने मी मोठा असलों तरी माझ्यापेक्षा शेठ जमनादास यांचें सार्वजनिक आयुष्य व अनुभव अधिक महत्त्वाचा असल्याने त्यांनी प्रारंभ करावा व पुढे मी स्वतःबद्दल कांही

गोष्टी सांगेन असें मंडळींना कळविलें. ही माझी विनंती मंडळींनी मान्य केली; व शेट जमनादास यांनी आपली हकीकत सांगण्याला प्रारंभ केला.

ता. १ ऑगस्ट रोजीं आम्हीं लो. टिळकांची पुण्यतिथी साजरी केली. त्या वेळीं लोकमान्यांसंबंधी माझ्या एकदोन प्रसिद्ध न झालेल्या अशा आठवणी सांगितल्या. त्यामुळे आणखी माझी हकीकत ऐकावी असें कित्येक मंडळींना वाटलें. त्यांतून डॉ. लागू यांच्या सुटकेची मुदत जवळ येत चालली होती; व सुटण्यापूर्वी माझी हकीकत ऐकण्याची इच्छा त्यांना झाली होती. म्हणून त्यांनी व (जमनादाससहित) इतरांनीही जमनादास यांचें सांगणें थांबवून माझी हकीकत सांगण्याबद्दल आग्रह केला. जमनादास यांचा बिझांटबाई, लो. टिळक, म. गांधी, सर तेजबहादूर सप्रू, ना. शास्त्री, बॅ. जीना, सर पुरुषोत्तमदास, सर सी. पी. रामस्वामी, पं. मोतीलाल, पं. जवाहरलाल, पं. मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय, दास, श्री. सौ. सरोजिनीदेवी, बिर्ला इत्यादि हिंदुस्थानांतील नामांकित व्यक्तींशीं अनेक कारणांमुळे आलेला निकट संबंध, त्याचप्रमाणे मोठमोठ्या सरकारी युरोपियन अमलदारांचा ऋणानुबंध, असेंब्लींतील कामाचा अनुभव, परदेशगमन, मुंबईसारख्या शहरांत राहून व्यापारउद्योगधंद्याची प्रत्यक्ष माहिती व तेथील प्रसिद्ध व्यापारी वर्गाशीं बरोबरीचें दळणवळण, इत्यादि कारणांमुळे त्यांच्या हकीकतीस एक प्रकारची अपूर्वता होती व ती पुष्कळ बोधप्रदही होती. शिवाय त्यांची माहिती वेळेच्या व अनुक्रमाच्या बाबतींत व तपशिलाच्या बाबतींत अगदी व्यवस्थित व तंतोतंत होती. आपला अनुभव लिहून प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार प्रथमपासून असल्याने त्यांनी आपलीं टिपणें वगैरे व्यवस्थित ठेवलीं आहेत. माझें तसें कांहीच नाही. खासगी रीतीने संगतवार माझी हकीकत सांगण्याचा योग कधी तरी येईल याचीदेखील मला कल्पना नव्हती. डायरी अशी मीं कधीच ठेवली नाही. माझ्याजवळ कोणत्याही प्रकारचीं टिपणेंही नाहीत. लोकांनी केलेला पत्रव्यवहारही माझ्याजवळ नाही. माझ्यापाशी झालेल्या पत्रव्यवहारांतील कांही महत्त्वाचीं पत्रें मीं ठेवलीं होतीं. पण चार-पाच वेळां घराच्या झडतींत तीं पत्रें पोलिसांच्या तडाक्यांत सापडून जप्त होऊन गेलीं. कांही टिपणेंही त्याबरोबरच गेलीं; सरकारकडे तीं मागितलीं तरी मिळालीं नाहीत. याशिवाय, महत्त्वाची अशी कांही कामगिरी माझ्याकडून झाली नाही याची जाणीव मला असल्याने माझी हकीकत सांगण्याचें माझ्या अगदी जिवावर आलें. बेळगावच्या तुरुंगांतील मंडळी अधिक घरोब्याची असल्याकारणाने कांही कांही गोष्टी सांगावयास संकोच वाटला नाही. येरवड्यांतील मंडळी परिचित असली तरी माझ्या हकीकतींत विशेष कांही नसल्याने सांगण्याचें धैर्य होईना.

### आठवणी सांगण्यास प्रारंभ

त्या दिवशीं जमनादासांच्या हकीकतीने विशेष दडपण आल्यासारखें वाटलें. तथापि जमनादासांचें सांगणें झाल्यानंतर माझे कांही अनुभव

सांगेन असें बोलून गेलों होतों; व त्यामुळे या कार्यक्रमाला प्रारंभ झाला, म्हणून माझी हकीकत सांगण्याचें टाळणें कठीण झालें. म्हणून ऑगस्टनंतर, लोकमान्यांच्या पुण्यतिथी-नंतर, सांगण्यास प्रारंभ केला; व दररोज तास-दीड तास याप्रमाणे पाच-सहा आठवडे कांही गोष्टी सांगितल्या. माझे मित्र आगाशे यांनी या हकीकतींचीं टिपणेंही केलीं आहेत. त्यांचे मनांत माझें लहानसें चरित्र प्रसिद्ध करावें असें आहे. हें मला त्यांनी त्यांची सुटका झाल्यानंतर कळविलें. पण माझें चरित्र लिहिलें जावें अशी माझी योग्यता नाही व त्या कामाला आवश्यक साधनेंही नाहीत म्हणून ही गोष्ट मीं मनावर घेतली नाही. आगाशे हे मला तुरुंगांत भेटण्याकरिता दोन-तीन वेळां आले असतां त्यांनी पुनःपुन्हा ही गोष्ट काढली, पण मीं त्यांना या बाबतींत कोणत्याही प्रकारें उत्तेजन दिलें नाही.

यानंतर गेल्या म्हणजे जानेवारी महिन्यांत येवल्याचे श्री. आपटेगुरुजी यांनी या बाबतींत फारच आग्रह धरला व त्यांच्या प्रेमापुढे माझा नाइलाज झाला. हें टाचण माझ्याचजवळ राहूं द्यावें या अटीवर मीं हें लिहिण्याचें कबूल करून त्याप्रमाणे प्रारंभही केला.

## आमचें घराणें

आमचें घराणें ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मणांचें असून आमचें गोत्र विश्वामित्र आहे. हल्ली सांगली संस्थानांत असलेलें सरंजामी गाव महिसाळ (मिरजेजवळ) येथील देशपांड्यांचें गोत्रही विश्वामित्र आहे. त्याचप्रमाणे बेळगाव जिल्ह्यांतील अथणी तालुक्यांतील देशपांडे व गोकाक परगण्याचे देशपांडे व पाच्छापूर परगण्यापैकी कुंदरगी संमतचे देशपांडे, तसेंच बागेवाडी नेसरगावांतले देशपांडे हेही विश्वामित्र गोत्राचेच आहेत. पाच्छापूरचे देशपांडे यांची पिढी तुटून बरेच दिवस झाले असले तरी अद्यापि आमच्या व त्यांच्या घराण्यांतील पत्रव्यवहारामध्ये 'चि.' व 'ती. स्व.' असा मायना लिहिण्याची पद्धत आहे. जुन्या पाच्छापूर परगण्यांत दोन संमती अथवा कर्याती आहेत. एक कुंदरणी संमत व दुसरी अंकलगी संमत. माझें घराणें अंकलगी संमतचे देशपांडेगिरीचें आहे.

आमचें घराणें मूळचें कोठलें याबद्दल कागदोपत्रीं पुरावा अद्यापि उपलब्ध नाही. तथापि पूर्वीच्या पद्धतीला अनुसरून 'हेळव' म्हणजे 'भाट' हे अद्यापि दरसाल आपल्या भेटी देतात. कानडींत हेळव याचा अर्थ 'सांगणारा' असा आहे. हे लोक हातांत एक रुप्याचा तोडा घालून जुनी तांबडी बनात अथवा शाल पांघरून येत असतात व पहाटेला वाड्याच्यापुढे बसून बरीच मोठी वंशावळ सांगून घराण्यांतील प्रमुख पुरुषांचें व बायकांचें वर्णन करीत असतात. आमच्या घराण्यांतील उपलब्ध वंशावळींत माझ्यापासून वर पिढी दाखविली आहे. या वंशावळीबरहुकूम हे हेळव आपल्या तोंडाने सर्व पिढ्या सांगतात. माझ्या लहानपणीं हे हेळव आमच्या घरापुढे आठ-आठ दिवस बसून घराण्याचा पराक्रम गाऊन आपली बहुमानाची बिदागी घेऊन

जात असत. हे सुगीच्या दिवसांत येत असत. त्यामुळे त्यांना धान्यही पुष्कळ मिळे. याच हेळवांचें घराणें पाच्छापूरकर देशपांडे, गोकाक देशपांडे, बागेवाडी नेसरी कर्यातीचे देशपांडे यांच्याकडे जात असतें. यावरून हीं सर्व घराणीं मुळांत एकच असावीं असें दिसतें. घराण्यांतील ज्या ज्या लोकांनी जेथे जेथे वटाने इनामें संपादन केलीं, त्या त्या ठिकाणीं ते जाऊन राहूं लागले व त्या ठिकाणचे देशपांडे म्हणून ओळखूं जाऊं लागले. बैलहोंगल तालुक्यापैकी कित्तूर या गावचे मल्लसजी या नावाचे एक देसाई यांनी आपल्या हयातींत बरीच पुंडगिरी केली; ते जातीचे लिंगायत असून त्यांनी ब्राह्मणांवर बरेंच अस्त्र उचललें होतें असें सांगतात. त्यामुळे बागेवाडी व नेसरगी कर्यातीचे देशपांडे यांचें महत्त्व बरेंच कमी झालें. पण त्याचा उपसर्ग पाच्छापूर व अंकलगी संमतच्या देशपांड्यांनी आपल्याला होऊं दिला नाही.

मूळ आमचें घराणें कोठून आलें याबद्दल जरी अद्यापि कागदोपत्रीं पुरावा उपलब्ध झाल्याचें मला माहीत नसलें, तरी वर सांगितलेल्या हेळव लोकांच्या तोंडून आम्ही 'शहर बेदर'हून आल्याचें मीं ऐकलें आहे. पूर्वीच्या काळीं एक शाही नष्ट झाल्यानंतर किंवा अन्य कारणामुळे एक शाही सोडून दुसऱ्या शाहीच्या आश्रयाला जाण्याचा प्रघात असे. बेदरची बरीदशाही सोडून विजापूरच्या आदिलशाहीच्या आश्रयाला आमचे मूळ पुरुष आले असावेत असें वाटतें. बेदरचा कांही-ना-कांही संबंध असल्याखेरीज तेथून आम्ही प्रथम इकडे आलों हें विनाकारण हेळव लोकांनी सांगणें असंभवनीय आहे.

आमच्या घराण्यांतील अंकलगी शाखेचे बापूसाहेब या नावाचे एक गृहस्थ होते. त्यांना आमचें मूळ ठिकाण शोधून काढण्याचा नाद होता. म्हणून ते मुद्दाम बेदर येथे गेले होते व तेथून पैठणला गेले होते. महाभगवद्भक्त एकनाथमहाराज यांचें गोत्रही विश्वामित्र आहे. त्यांनी लावलेल्या तपासावरून एकनाथमहाराजांच्या घराण्याशीं आमच्या घराण्याचा संबंध लागतो असें त्यांचें म्हणणें होतें; व त्यांनी आपल्या घरीं एकनाथषष्ठीचा उत्सव करण्याचा पायाही घातला. इतर भाऊबंदांनी आपापल्या घरीं हा उत्सव करावा असा त्यांचा आग्रह असे. त्यांनी या बाबतींत कांही पुरावाही गोळा केला होता असें म्हणतात. हल्ली ते मयत असल्यामुळे या बाबतींत माहिती मिळत नाही. कोणत्याही कारणाने एखाद्या महाविभूतीशीं बादरायणसंबंध जोडण्याची इच्छा कित्येकांना असते. त्यांतलाच हाही प्रकार नसेल असें कोणीं म्हणावें? पण त्यांचा मात्र या गोष्टीवर पूर्ण विश्वास होता हें मला निश्चित माहीत आहे. पैठणचा व आमचा संबंध असो किंवा नसो—पण बेदरशीं मात्र असावा असें दिसतें.

आमच्या उपलब्ध वंशावळींत जीं आमच्या पूर्वजांचीं नावें आहेत त्यांत वीरअरस, वीरपरस, अरस अशीं नावें आढळतात. कानडींत अरस याचा अर्थ राजे असा आहे. पण महाराष्ट्रांतील कांही ऐतिहासिक कागदपत्रांत अरस या आडनावाचे लोक होते, व तशीं आडनावें असलेलीं प्रचलित घराणीं कोठे आहेत किंवा कसें याबद्दलची पृच्छा एका इतिहाससंशोधकांनी 'केसरी' पत्रांतून कांही दिवसांपूर्वी केली होती. त्यांना कोणाकडून

काय माहिती मिळाली हें मला माहीत नाही. पण आमच्या भाऊबंदांपैकी एका गृहस्थानें त्या संशोधकांना पत्र लिहून आमच्या पूर्वजांच्या नावापुढे 'अरस' हें पद लावीत असत, असें कळवलें होतें. पण पुढे त्या बाबतींत काय झालें याची माहिती मला नाही.

## येडूर गावाचें महत्त्व

आमच्या घराण्यांत आणखी एक आख्यायिका परंपरागत आली आहे. आमचे पूर्वज मूळ ठिकाणाहून दक्षिणेकडे येत असतांना, वाटेंत कृष्णातीरीं येडूर या नावाच्या गावांत त्यांनी मुक्काम केला.

हल्ली हा गाव बेळगाव जिल्ह्याच्या चिकोडी तालुक्यांत मोडतो. या गावीं वीरभद्रेश्वराचें देवालय आहे. तेथे मुक्काम असतां आमच्या पूर्वजांना साक्षात्कार होऊन तुमच्या कुटुंबाचे दुःखाचे दिवस संपत आले असें देवाने सांगितलें. याबरोबर याच वीरभद्राला आपलें कुलदैवत असें त्यांनी मानिलें. या देवाची पूजाअर्चा वगैरे लिंगायत जंगमाकडून होत असावी. त्या परंपरेला अनुसरून वर्षप्रतिपदेच्या दिवशीं लिंगायत जंगमाला घरीं बोलावून, त्याला पाटावर बसवून शिधा, दक्षिणा वगैरे देण्याची चाल आमच्या घराण्यांत अद्यापि चालू आहे. त्याचप्रमाणे लिंगायत लोकांत लग्न वगैरे कांही शुभकार्य झाल्यास स्त्रीपुरुष डोकीवर पेटविलेल्या शेगड्या घेऊन देवाला जात असतात. ही चालही आमच्या घराण्यांत चालू केली गेली. पुढे या देवाचे ब्राह्मण भक्त जेव्हा प्रबल झाले तेव्हा या देवाची पूजा ब्राह्मणाकडून होऊं लागली असावी. बरींच वर्षें आंत गाभाऱ्यांत देवाची ब्राह्मणाकडून पूजा होण्याचा प्रघात पडला; व आंत दक्षिणा वगैरे ठेवली जाई ती ब्राह्मण पुजारी घेत असत. पण लिंगायत जंगमाचें अगदीच उच्चाटन झालें नाही. या देवाचे लिंगायत भक्तही पुष्कळ आहेत. म्हणून त्यांच्याकरिता लिंगायत जंगम गाभाऱ्याबाहेर बसत असे. दक्षिणा वगैरे जी बाहेर मिळे ती तो घेत असे. त्याचप्रमाणे बाहेरचे उत्सव वगैरे सर्व लिंगायत जंगमाच्या मार्फत होत असत. ब्राह्मण भक्त जंगमालाही दक्षिणा पूजाद्रव्य देत असत; पण ती ब्राह्मण पुजाऱ्याच्या मानाने फारच थोडी असे व हक्काची नसे. हा क्रम बरेच दिवस चालू होता. पण अलीकडे ब्राह्मण समाजांत व लिंगायत समाजांत आमच्या प्रांतांत वितुष्ट पडल्यापासून फक्त ब्राह्मणाकडून पूजा होत असलेल्या बहुतेक प्रसिद्ध शंकराच्या देवालयांच्या गाभाऱ्यांत प्रवेश मिळवून देवाची पूजा करण्याचा हक्क मिळविण्याचा प्रयत्न लिंगायत समाजाकडून जारीने चालू आहे. त्याप्रमाणे येडूर येथेही हा प्रयत्न झाला. मागील दाखले वगैरे पाहून आपापलें म्हणणें कोर्टांत शाबीत होईल असें ब्राह्मण व लिंगायत पक्षांना वाटूं लागलें. त्यांतून लिंगायत समाजाचे पुरस्कर्ते व ब्राह्मण समाजाचे द्वेष्टे असे प्रसिद्ध असलेले रा. ब. रुद्रगौडा अर्ताळ हे त्या भागाचे प्रांत अंमलदार असल्यावेळीं त्यांनी या तंट्याला बरेंच उत्तेजन दिलें. त्यांच्या जोरावर लिंगायतांनी जबरदस्तीने आंत प्रवेशही केला व देवाची पूजा केली. ब्राह्मणांनी लगेच देवाची 'शुद्धी' केली. अखेर

हें प्रकरण कोर्टांत जाऊन हजारो रुपयांचा चुराडा उडाला, व लिंगायतांना ही पूजा करण्याचा हक्क आहे असें ठरलें.

या प्रकरणीं ब्राह्मण समाजाकडून माझी साक्ष करवण्याचा प्रयत्न झाला; पण मीं तें मान्य केलें नाही. माझ्या मनांतून हा तंटा आपसांत मिटवावा असें होतें. पण दोन्हीही पक्ष आग्रहाला पडल्यामुळे मला यश आलें नाही. याबद्दलची जबाबदारी मी ब्राह्मण पक्षावर विशेष टाकतों. लिंगायत जंगम हा देवाचा प्रतिनिधी म्हणून त्याला शिधा वगैरे देण्याचा संप्रदाय आमच्यासारख्या ब्राह्मण भक्तांच्या घराण्यांत जर चालत होता, तर लिंगायत लोकांना अर्थात स्नान वगैरे करून शुचिर्भूत झाल्यानंतर पूजेला मज्जाव कां असावा हें मला समजलें नाही. शिवाय त्यांच्याजवळ दाखलेही होते. असो. हायकोर्टापर्यंत वाद गेल्यानंतर वर सांगितल्याप्रमाणे लिंगायत लोकांनी पूजेचा हक्क मिळविला. पण याचा परिणाम असा झाला की, हा देव लिंगायत लोकांचा झाला व ब्राह्मण भक्तांनी या देवावर बहिष्कार घातला! हायकोर्टाच्या निकालानंतर येड्डरला कोणी ब्राह्मण भक्त जात नाहीत व चुकून कोणी गेले तरी पूजा-नैवेद्य वगैरे करीत नाहीत. घरीं मात्र त्याच देवाला कुलदैवत समजतात. कोर्टांत ठरल्यानंतर ज्या गोष्टी अंमलांत आणण्यांत अधर्म वाटला नाही त्याच किंवा तशाच प्रकारच्या गोष्टी तडजोडीने अमलांत आणण्यापासून काय बिघडलें असतें हें समजणें कठीण आहे. निदान देवावर तरी बहिष्कार पुकारला गेला नसता. या तंट्यांत देऊळ हें सार्वजनिक हिंदूंचें असून सर्व हिंदूंना देवदर्शन घेण्याची मोकळीक आहे असें लिंगायत लोकांचें म्हणणें होतें. आता देवाल्याची व्यवस्था पूर्णपणें लिंगायतांच्या ताब्यांत आहे. तेव्हा हल्ली हरिजनांना मंदिर-प्रवेश असावा म्हणून जी चळवळ चालू आहे त्यांत लिंगायत लोक कोणतें धोरण स्वीकारतात हें पाहण्याची संधी आली आहे.

### *आमचा गाव व देशपांडेगिरी*

आमचें हल्लीचें राहण्याचें ठिकाण हुदली हें आहे. हा गाव हल्ली बेळगाव तालुक्यांत आहे. हें आमचें राहण्याचें ठिकाण असलें तरी आमची वतनवृत्ती आजूबाजूच्या खेड्यांतही आहे. आमच्या घराण्याच्या कांही शाखा निरनिराळ्या वतनाच्या खेड्यांतही राहण्याला हल्ली गेल्या आहेत व त्यांना त्या त्या गांवचे देशपांडे म्हणून ओळखलें जातें. परगणे पाच्छापूरपैकी सर्व अंकलगी समतची देशपांडेगिरी आमच्या एका पूर्वजाने संपादन केली होती. त्यांत बावीस खेड्यांचा समावेश होतो. या गावांच्या कुलकर्णीपणाचे हक्कही मिळवले होते व ते हल्ली चालतातही. कांही गांवची पाटीलकीही आमच्याकडे आहे. एकदोन गावें इनामही होतीं पण तीं खालसा करण्यांत आलीं आहेत.

आमच्यापैकी एक शाखा सांगलीकर पटवर्धनांच्या आश्रयास गेली, व त्यांच्या कृपेने त्या शाखेने कांही इनाम गावें संपादन केलीं. त्याच घराण्यापैकीयांना अट्टेकर म्हणतात.

बापूसाहेब नावाच्या गृहस्थानें बंडाच्या वेळीं इंग्रज सरकारकडूनही इनाम गावें संपादन केलीं. तीं त्या शाखेकडे चालतात.

आमचा गाव ज्या भागांत मोडतो त्याला 'कुंदरनाड' म्हणतात. नाड हा शब्द कानडी आहे. याचा अर्थ प्रांत किंवा देश असा आहे. कुंदर याचा अर्थ मात्र बरोबर समजत नाही. तथापि कुंदरगी म्हणून एक गाव याच भागांत आहे; व तो त्या वेळीं प्रसिद्धही असावा. कारण त्या नावावरून संमत कुंदरगी असें या 'नाडा'च्या एका भागाला म्हणत असत. म्हणून या गावाच्या नावावरून या सबंध प्रांताला 'कुंदरनाड' हें नाव पडलें असावें.

हल्ली हुक्केरी तालुक्यांत असलेल्या पाच्छापूर या गावापासून दक्षिणेकडे सांगली संस्थानच्या हद्दींत असलेल्या मारीहाळ गावापर्यंत दक्षिणोत्तर अजमासें बारा-चौदा मैल व पूर्वपश्चिम सात-आठ मैल असा सरासरी शंभर चौरस मैलांचा हा प्रांत आहे. सह्याद्रीच्या फाट्याच्या लहानलहान टेकड्यांनी हा प्रांत व्यापलेला आहे. मधूनमधून सपाट जमीन आहे. जमीन चांगली पिकाऊ आहे. पुष्कळ टेकड्या जवळ असल्याकारणानें व सह्याद्री-जवळील मावळ भाग फार लांब नसल्यानें पावसाची सरासरी ३०-४० इंचांपर्यंत असते.

पाऊस न पडून पिकें गेलीं असें क्वचितच होतें. कांही कांही भागांत तर उत्तम सुपीक जमीन आहे. जोंधळा, तंबाकू, कापूस, मिरची हीं मुख्य पिकें होतात. बागाईत जमिनींत मुख्यत्वें ऊस, मिरची होते. लिंगायत, मुसलमान, ब्राह्मण, जैन, बेरड लोकांची वस्ती आहे. लिंगायत व बेरड विशेष आहेत.

बेळगावापासून आमचा गाव सतरा-अठरा मैल लांब आहे. मारीहाळपासून सात-आठ मैल रस्ता सांगलीच्या हद्दींतून आहे. तो फारच वाईट आहे. ब्रिटिश हद्दींतील रस्ता लोकल बोर्डाच्या ताब्यांत असून तोही चांगला नाही. बेळगावपासून मारीहाळपर्यंतचा रस्ता चांगला आहे. रेल्वे होण्याच्या पूर्वीं या रस्त्यानें बेळगावला जावें लागत असे, व आताही गाड्या याच रस्त्यानें जातात. माझ्या लहानपणीं बेळगांवाहून हुदलीला पावसाळ्यांत यावयाचें तर मारीहाळपासून गाडीला केव्हा केव्हा चार-चार बैल जोडावे लागत असत. तीच स्थिती अद्यापि कायम आहे.

१८८७ सालीं या प्रांतांतून सदर्न मराठा रेल्वे गेली. पूर्वीं पाच्छापूर स्टेशना-नंतर बेळगावकडे जातांना सुळेभावी हें स्टेशन होतें. पाच्छापूर व सुळेभावी या दोन्ही स्टेशनांपासून हुदली हें गाव सहा-आठ मैलांच्या अंतरावर मध्ये थोडेंसें बाजूला आहे. रेल्वे जाऊनही आमच्या गावाला फायदा मिळत नव्हता. आम्ही पुष्कळ वेळां सुळे-भावीला अगर पाच्छापूरला उतरून घोड्यावरून आमच्या गावीं येत होतों. केव्हा केव्हा गाडीच्या ड्रायव्हरला अनुकूल करून घेऊन आमच्या गावाच्या जवळ गाडी आली म्हणजे गाडी थांबविण्याचा अगर मंदगतीनें नेण्याचा प्रयत्न करणें भाग पडत असे; व त्यांत आम्हांला यशही येत असे. रेल्वेकामगारांना अनुकूल करून घेण्याचे मार्ग प्रसिद्धच असतात. लाइन नवीनच असल्यानें वरील प्रयत्नाचा फारसा बभ्राही होत नसे. पण

पुढे आमच्या वडिलांनी पुष्कळ अर्ज वगैरे करून व इतर खटपटीही करून आमच्या गावापासून एक मैल अंतरावर असलेल्या सुळेभावी गावानजीक त्याच नावाचें एक स्टेशन मिळविलें व गाड्या त्या स्टेशनावर थांबूं लागल्या. तेव्हा आणखी बरीच सोय झाली. पूर्वी अत्यंत जरुरीच्या कामाखेरीज लोक गाव सोडून जात नसत. स्टेशन झाल्यापासून रहदारी वाढली. नाटक-सिनेमा पाहण्याला, कुस्त्या पाहण्याला, बाजाराला, प्रसंगविशेषीं कोर्टातील खटले ऐकण्याला व केवळ कंटाळा घालवण्याला पुष्कळ लोकांच्या येरझारा चालू झाल्या. प्रथम स्टेशन हंगामी म्हणून झालें; पण त्याची लोकप्रियता वाढलेली पाहून तें कायम करण्यांत आलें. तथापि मेलगाड्या कधी कधी थांबत नाहीत म्हणून लोकांच्या तक्रारी चालू असतातच.

पाच्छापूरच्या खालोखाल अंकलगी आणि हुदली हीं दोन गावें मोठ्यांपैकी आहेत. दोन्हीही गावांत आठवड्याला बाजार भरतो. हल्ली हुदलीच्या गावापेक्षा अंकलगीचा बाजार भरभराटीचा आहे. हल्ली अंकलगी येथे एक लहानसा जिनिंगचा कारखाना आहे. पिठाची गिरणीही आहे. या गिरणीला हुदलीहून (म्हणजे तीन मैल) चालत जाऊन पीठ दळून आणणारे लोक आहेत. या गावचे व जवळच्या खेड्याचे लोक तर गिरणीचा फायदा घेतातच.

## *हुदली गावाची माहिती*

हुदलीस कोष्ट्यांचीं पंचवीस-तीस घरें आहेत. त्यामुळे पूर्वी हुदलीच्या बाजाराला हातसुताचीं चिवटें विकण्याकरितां येत असत. त्याच सुताने कोष्टी धोतरें, लुगडीं विणत असत व स्थानिक लोकांना पुरवठा करून जास्ती माल अंकलगी, पाच्छापूर, सुळेभावी वगैरे ठिकाणीं विकीत असत. माझ्या लहानपणीं हुदलीसदेखील हातसुताची पैदास होत असे हें मला आठवतें. पण अलीकडे एकोणतीस-तीस वर्षांत हा धंदा अजिबात नष्ट झाला. महात्मा गांधींच्या खादी चळवळीपासून माझ्या प्रयत्नाने पुन्हा हा उद्योग सुरू झाला. याबद्दलची हकीकत पुढे येईल.

हातसूत मिळण्याचें बंद झाल्यापासून कोष्टी लोक गिरणीचें (मुंबईचें व अलीकडे परकी) सूत वापरूं लागले. पण त्यांची स्थिती फारच हलाखीची झाली आहे. त्यांतून कांही कांही ठिकाणीं लहानलहान ऑइल एंजिनवर लुगडीं काढण्याचा उपक्रम सुरू झाल्यापासून तर हाताने विणणाऱ्या लोकांच्या धंद्याला बराच धक्का बसूं लागला. शिवाय गिरण्यांचा माल तर आता पुष्कळच येऊं लागला आहे.

हुदली गावांत ४५०-५०० घरें असून लोकसंख्या २२०० आहे. जमीन थोडी व कुळभरणा फार आहे. जमीन बहुतेक इनामदार, देसाई, देशपांडे, पाटील, नाईक वगैरे वतनदार व हक्कदार लोकांत वाटली गेली आहे. प्रत्यक्ष स्वतःच्या मालकीच्या जमिनी फार करून नाहीत. त्यामुळे मूळपासून रयतांची सांपत्तिक स्थिती खालावलेलीच आहे.

हुदली गावचे देसाई व इनामदार हे मुसलमान आहेत. विजापूरच्या आदिलशाहींत त्यांना इनामें मिळालीं आहेत. देशपांडेगिरी त्यांच्या पूर्वीची. इनामदारांचें उत्पन्न देशपांडे यांच्यापेक्षा पूर्वीं मोठें होतें; तरी देशपांडे यांचें महत्त्व सरकारदरबारांत जास्ती होतें. इनामदार हे सय्यद घराण्यांतील असून त्यांचे पूर्वज फकिरी वृत्तीने राहणारे होते. दुवागीर फकीर म्हणून त्यांना इनाम देण्यांत आलें आहे. पुढे पेशवाईत इनामदार वगैरे सर्व हक्कदारांच्या सनदा कायम करण्यांत आल्या. इनामदार दुवागीर लोकांना वेरड वगैरे लोकांकडून उपसर्ग होऊं नये म्हणून आमच्या पूर्वजांना पेशव्यांच्या दरबारांतून ताकिदी येत असत.

या प्रांताचा वसूल करून पाठवण्याचें काम पूर्वीं देशपांडे यांचें होतें. पण वसूल सुरळीत पोचत नसे; त्यामुळे हुजूरहून वरचेवर ताकिदी व तगादा येत असे. फारच जिकीर झाली म्हणजे कांही रक्कम पाठवून वेळ भागवावयाची व पुन्हा ये रे माझ्या मागल्या असा क्रम चालावयाचा.

माझे सहावे पूर्वज केशवराव यांच्या नावच्या सनदा आहेत. त्यापूर्वीं कांही मिळकत मिळवली होती किंवा नाही हें निश्चितपणें सांगतां येत नाही. पण हा पुरुष त्या वेळच्या स्थितिमानाप्रमाणे कर्तृत्ववान निघाला. हुदलीस व वतनदारीच्या आजूबाजूच्या खेड्यांत देवळें वगैरे बांधवून आपलें महत्त्व याने बरेंच वाढविलें. आबदागिरी जमीन, पालखी शेत, भोई शेत अशीं कांही जमिनींचीं नावें असून तीं अद्यापि आमच्याकडे चालतात. यावरून या जमिनीच्या उत्पन्नांतून आबदागिरी, पालखी, मेणा वगैरे इतमामाचा खर्च त्या वेळीं चालत असावा.

केशवरावांच्या पश्चात त्यांचे नातू म्हणजे माझे पणजे बाळकृष्णराव हे अव्वल इंग्रजींत होऊन गेले व त्यांनीही बरीच कर्तबगारी करून उत्पन्न वाढविलें. त्यांना ते धरून चार भाऊ होते व त्यांच्याच वेळीं चारीही भाऊ वेगळे होऊन हुदलीस चार शाखा झाल्या. त्यांत माझे पणजे बाळकृष्णराव यांचें घराणें वडील. इंग्रजांचा पूर्ण अंमल बसेपर्यंत या प्रांतांत बरीच धामधूम होती. त्यांत बाळकृष्णराव हे प्रामुख्याने भाग घेत असत. माझ्या आजीने आमच्या पणज्यांना पाहिलें होतें. त्यांचें शरीर धिप्पाड असून त्यांची काठी उंच होती असें ती सांगत असे. रात्रीं निजतेवेळीं म्यानांतून तरवार बाहेर काढून अंथरुणाजवळ ती ठेवून निजण्याचा त्यांचा संप्रदाय होता असें म्हणतात. त्यांचे जवळ हत्यारें, बंदुका वगैरे शिबंदी सामान होतें. तीस-चाळीस घोडींही पागेंत असत. पाच्छापूर स्टेशनापासून पाच्छापूर दीड मैल आहे. गाव एका टेकडीच्या सभोवार वसलेला आहे. टेकडीवर एक किल्ला आहे. तो रेल्वेवरून दिसतो. हा किल्ला कांही दिवस बाळकृष्णरावांच्या ताब्यांत होता असें म्हणतात. पाच्छापूर हें नाव पादशहापूर या नावाचें अपभ्रष्ट रूप आहे. पूर्वीचें नाव रुसडमपूर आहे. पण बादशहाच्या मुलाचा मुक्काम कांही दिवस येथे होता तेव्हापासून या गावाचें नाव पादशहापूर किंवा पाच्छापूर असें पडलें.

ग्रं. क्र. नों. दि.

## निपाणीकर आप्पासाहेब देसाई

पेशवाईच्या अखेरीला इकडील प्रांतांत निपाणीकर आप्पासाहेब देसाई यांचा दरारा होता. बाळकृष्णपंतांनी त्यांचा स्नेह संपादन करून या प्रांतीं आपली छाप चांगली बसवली होती. माझ्या आजीचें माहेर निपाणी-करांच्या दिवाणजींचेंच घराणें. आमच्या घराण्यापैकी अष्टेकर या नावाने प्रसिद्ध असलेल्या घराण्याचा उल्लेख वर आला आहे. त्या घराण्यावर सांगलीकर पटवर्धनांचा लोभ होता व त्यामुळे त्यांचीही या प्रांतांत प्रतिष्ठा वाढत चालली होती. श्रीमंतीच्या मानाने आमच्या-पेक्षा तें घराणें अधिक होतें. त्यांच्या व आमच्या घराण्यांमध्ये भाऊबंदकी, मत्सर बराच वाढला होता. त्या प्रसंगीं आमच्या पणजोबांनी निपाणीकर देसाई यांच्या लोभाचा उपयोग करून घेतला. याशिवाय या प्रांतांतील बेरड वगैरे डोंगरी लोक आमच्या पणजोबांना जास्ती वश होते. चिकलदिभी म्हणून हुदलीपासून सात-आठ मैलांवर एक गाव आहे. तेथील सरनाईक गुडदप्पा या नावाचा एक बेरड जातीचा शूर मनुष्य होता. आपल्या गावच्या एका टेकडीवरील किल्ल्यांत आपलें ठाणें करून पदरीं चारपाचशे बेरड त्याने ठेवले होते. त्याचा व आमच्या घराण्याचा जुना ऋणानुबंध आहे. त्याची जरबही अष्टेकरांना होती. गुडदप्पा नाईक हा हुदलीस येत असे तर तो मेण्यांतून लव्याजम्यानिशी येत असे असें सांगतात.

## देसाई-देशपांडे इंग्रजांचे अंकित

पेशवाई बुडाल्यानंतर पेशव्यांच्या मुलुखांत बंदोबस्त करून आपले पाय रोवण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला हें प्रसिद्धच आहे. त्या वेळीं देसाई, देशपांडे पाळेगार वगैरे जे लोक होते त्यांना इनामें चालवण्याची लालूच दाखवून व कित्येकांना नोकऱ्या देऊन इंग्रजांनी आपले अंकित करून घेतले. या धोरणाला अनुसरून आमचें उत्पन्न आमच्या घराण्याकडे ठेवून वर आमच्या पणज्यांना धारवाड जिल्ह्यांत हुबळी, शिग्गाव वगैरे तालुक्यांची मामलत दिली व ती त्यांनी स्वीकारली. आताच्या मामलेदाराप्रमाणे त्या वेळच्या मामलेदाराची स्थिती नव्हती. सरकारी अंमलदार म्हणून त्यांची बडेजाव किती तरी जास्ती असे. पगाराखेरीज कचा खर्च मिळत असे. शिपाई, पाणक्ये, स्वयंपाकी, मशालजी वगैरे दिमतीला देण्यांत येत. त्यामुळे त्या पिढींतील पुष्कळ कर्त्यासवरत्या वतनदार वगैरे लोकांना मोह सुटला व ते सहजच नवीन राजवटीच्या कह्यांत गेले. आमचे पणजे कांही वर्षे मामलत करून सेवानिवृत्त होऊन हुदलीसच आमच्या राहत्या घरीं वारले. पण मरणापूर्वी त्यांनी त्रास-खटपट करून माझ्या आजोबांना वरणी लावून नोकरी दिली होती. ते धारवाड जिल्ह्यांतच महालकऱ्याच्या कामावर होते. आमच्या पणज्यांना तीन मुलें होतीं. पैकी माझे आजे हे दुसरे चिरंजीव. त्यांचें नाव गंगाधरराव. त्यांच्या हातचीं पत्रें, हिशेब, याद्या वगैरे आहेत. मोडी अक्षर

सुंदर लिहीत असत. हे महालकऱ्याच्या कामावर असतांनाच या तीन भावांमध्ये वाटण्या झाल्या. तरी गंगाधररावांच्या वाटणीची वहिवाट वडील बंधू देवरावदादा किंवा धाकटे बंधू आप्पाराव हे हुदलीस राहून करीत असत.

### घराण्याची कांही माहिती

गंगाधररावांना बढती पाहिजे होती, म्हणून त्यांनी सरकारकडे एक अर्ज केला होता. त्यांत आपले वडील सरकारशीं फार एकनिष्ठपणाने वागले व सरकारची सेवाचाकरी केली त्याचप्रमाणे आपणही करीत आलों व पुढे आपले वंशजही करतील, म्हणून आपल्याला मामलतीच्या जागेवर बढती मिळावी, असा मजकूर होता. पण त्याच वंशांत त्यांच्या नातवाचा जन्म होऊन व तेंच गंगाधर हें नाव धारण करून, इंग्रज सरकारचें राज्य अबाधित १५० वर्षें चालत असतां त्या नातवाकडून राजद्रोहाचा आरोप घडावा व त्याबद्दल तुरुंगवासाची पाळी यावी व वडिलार्जित देशपांडे-गिरी वतन खालसा करून घेण्याचा योगायोग यावा, हा एक दैवाचा विलासच आहे. असो. गंगाधरराव हे महालकऱ्याच्या नोकरीवर असतांनाच धारवाडजवळील मुगद येथे वारले. त्या वेळीं आमची आजी मुलांबाळांसह हुदलीसच होती. आमचे वडील त्या वेळीं सात-आठ वर्षांचे होते व तीन अविवाहित मुली होत्या. प्रपंचाचा सर्व भार आमच्या आजीवर पडला. घराण्यांत भाऊबंदकी शिरलीच होती. त्यामुळे उत्पन्नाची फारच हेळसांड झाली होती. तरी पूर्वींपासूनच आमच्या घरीं कारकुनीच्या जागांवर असलेल्या दोघांच्या मदतीने आमच्या आजीबाईंनी प्रपंच नीटनेटका चालवला. उत्पन्नाची वहिवाट आपल्या दिराकडून आपल्या हातीं घेतली; व तिन्ही मुलींचीं लग्नें आपल्या जबाबदारीवर जुन्या पद्धतीला अनुसरून घराण्याच्या इभ्रतीला साजेल त्या मानाने केलीं. आमच्या वडिलांची मुंज व लग्नही आजोबांच्या मरणानंतरच झालें. तीन मुलींपैकी दोन मुली लग्नानंतर लवकरच वारल्या. एक मुलगी कृष्णाबाई ही लवकरच वारली. हिला बेळगावजवळ कुरुंदवाड इलाख्यापैकी येळूर या गावच्या कुळकर्णी यांचे घरीं दिली होती. आमच्या आजीबाई (उमाबाई) या महत्त्वाकांक्षी होत्या. मुलें लहान, आपण अशिक्षित, उत्पन्नाची वाताहत, अशा स्थितींत भाऊबंदांमध्ये आपली फजिती होणार व आपल्याला वाईट दिवस येणार, याची त्यांना फार काळजी वाटत असे. म्हणून घरीं मुद्दाम पंतोजी वगैरे ठेवून आमच्या वडिलांना चांगलें शिक्षण देण्याचा त्यांनी विचार केला व त्याप्रमाणे अंमलांतही आणला. त्या वेळीं बायकांच्या शिक्षणाचा पूर्ण अभाव होता. नाही म्हणायला आमच्या वडिलांची गोदूबाई म्हणून एक मावळण होती, ती बालविधवा होती (लग्न झाल्यानंतर आठ-पंधरा दिवसांतच तिचा नवरा वारला), म्हणून पोथ्यापुराणें वाचण्या-पर्यंत तिला मराठीचें शिक्षण देण्यांत आलें होतें. तिला पाहिल्याचें मला आठवतें. सकाळीं स्नान करून तुळशीच्या कट्ट्यावर बसून गीता वाचतांना तिला पाहिल्याचें मला स्मरतें. घरांतील इतर बायकांना लिहितांवाचतां येत नव्हतें व बायकांनी शिक्षण घ्यावें ही कल्पनाही

त्या वेळीं नव्हती. अशा स्थितींत आमच्या वडिलांना शिक्षण द्यावें ही कल्पना त्या बाईला आली हें विचित्रच समजलें पाहिजे. गावांत शाळा नव्हती म्हणून घरीं पंतोजी ठेवून कानडी, मराठी, हिशेब वगैरेचें शिक्षण सुरू केलें. त्याचप्रमाणे वेदाध्ययनालाही प्रारंभ केला. बखरी लिहून घेणें व त्या वाचून घेणें हीं कामें आमच्या आजीबाई स्वतः कधी कधी करीत असत. आमच्या वडिलांचें मोडी व कानडी अक्षर चांगल्या प्रतीचें असे. ते पुष्कळ जलद् लिहीत असत. घरींच अभ्यास करून ते मुलकी परीक्षेंत पास झाले. मुलकी परीक्षा पास होण्यापूर्वीच त्यांचें लग्नही झालें होतें. आमच्या आईचें माहेर वंटमुरी म्हणून हुदलीपासून नऊ-दहा मैलांवर एक लहानसें तेथील देसाई यांचें इनाम गाव आहे. हल्लीचे देसाई हे चांगले सुशिक्षित असून त्यांना राजा हा किताब मिळाला आहे. आमच्या आईचे वडील या देसाई घराण्याचे कारभारी असत. त्यांना आमची आई ही एकुलती एक मुलगी असून लग्नाच्या वेळीं आमच्या आईची आई वारलेली होती. आमच्या आजीने हें लग्न थाटाने केलें. लग्न वंटमुरीस झालें. हुदलीहून तीनचारशे माणसें गेलीं होतीं. लग्नानंतर आमच्या आईचे वडीलही लवकरच वारले. त्यामुळे आमच्या आईला माहेर नाहीसें झालें. आईचें आजोळ कोल्हापूर संस्थानापैकी जलालपूर येथे आहे. त्या गावचे इनामदार हे आमच्या आईचे मामा. त्यांची आई म्हणजे माझ्या आईची आई त्या वेळीं हयात होती. तिने व आईच्या मामांनी आईच्या माहेरपणांत कमी पडूं दिलें नाही. आमच्या आईला मीच पहिला मुलगा. माझा जन्म चैत्र शुद्ध १० शके १७९३ सालीं जलालपूर येथेंच झाला. माझ्या लहानपणीं मी जलालपूरला जात असें. त्या वेळीं माझ्या आईच्या आजीला दिसत नव्हतें. तरी ती वृद्ध बाई मला मांडीवर घेऊन माझ्या अंगावरून हात फिरवीत बसत असे हें मला आठवतें.

## जलालपूरकर देशपांडे

जलालपूरकरांच्या वाड्यांत लहानमोठीं घोडीं असत. माझ्या आईचे मामेभाऊ श्रीमंत आप्पासाहेब हे घोड्यावर चांगले बसत असत. त्यांना घोड्यावर बसलेले पाहून माझ्या मनांतही घोड्यावर स्वार होण्याची इच्छा होई. आणि ती हौस माझ्या लहानपणीं आप्पासाहेबांनी आपल्यापुढे मला घेऊन पुरवली. तेव्हापासून मला घोड्यासंबंधाने प्रेम वाटतें. चांगला घोडा पाहिला म्हणजे त्याकडे बघत राहावें असें अद्यापि वाटतें. पुढे मुंबईस लॉ क्लासमध्ये असतां संध्याकाळी फिरावयाला जावयाचें झाल्यास बॅकबेवरील समुद्राला लागून असलेल्या पायरस्त्याने न जातां क्वीन्स रोडच्या रहदारीच्या मोठ्या रस्त्याने मी पुष्कळ वेळां जात असें. त्या वेळीं मुंबईस मोटारी नव्हत्या व श्रीमंत लोक चांगल्या घोड्यांच्या गाड्यांतून फिरावयाला जात असत. त्यामुळे चांगले घोडे पाहण्याची माझी हौस मी भागवून घेत असें. घोड्यावर बसण्याची हौस अद्यापि आहे, व माझ्या गावीं मी असलों म्हणजे प्रायः दररोज घोड्यावरून फिरून येत असतों. तथापि घोड्यावर चांगलें बसतां येतें असें नाही.

जलालपूरकरांच्या घरांतील आणखी एक गोष्ट मला आठवते. हा गाव कृष्णाकाठीं आहे. इनामदारांचीं कुरणें वगैरे आहेत. त्यामुळे त्यांचे घरीं दूधदुभतें बरेंच असे. माझ्या लहानपणीं त्यांच्या घरीं जेवणाला पुष्कळ मंडळी असत. त्या वेळीं आपल्या शेतींत जें पिकतें त्याचेच जेवणाचे मुख्य पदार्थ असावयाचे, असा प्रघात आमच्याकडे असे. अगदी जरुरीचे जिन्नस बाजारांतून आणावयाचे. जलालपुरास भात पिकत नाही, उत्तम शाळू जोंधळा पिकतो. तेव्हा पानावर प्रथम थोडा भात वाढून भाकरी, कण्या, आमटी, उत्तम ताक, दूध, तूप, लोणी, भाजी हे जिन्नस नेहमीच्या जेवणांत असत. कण्या पूर्वीं मीं खाल्लेल्या नव्हत्या. पण उत्तम ताकांत कालवून कण्या खाणें मला आवडत असे. पण मी लाडका असल्यामुळे व कण्या खाण्याची मला सवय नाही हें माहीत असल्यामुळे कण्या मला न वाढतां भातच वाढीत असत. त्या कारणाने मी रुसत असें व मला ताकांतील खीर पाहिजे म्हणून हट्ट धरून बसत असें. हल्ली तो काळ बदलला आहे. आता प्रतिष्ठित लोकांच्या घरीं जोंधळ्याच्या अथवा मक्याच्या कण्या व भाकरी खाणें कमीपणाचें समजलें जाऊं लागलें आहे. भाताचा प्रचार वाढला आहे, व त्यांत प्रतिष्ठितपणा आहे असा समज झाला आहे. असो.

## वडिलांचें शिक्षण व वकिली

आमच्या वडिलांची मुल्की परीक्षा झाल्यानंतर त्यांनी जर प्रयत्न केला असता तर चांगली सरकारी नोकरी मिळाली असती. पण त्यांनी तो प्रयत्न केला नाही. तथापि सरकारी नोकरी करणें वाईट आहे असा त्यांचा समज असावा असें वाटत नाही. कारण मी कॉलेजमध्ये अभ्यास करतांना व पुढे बी. ए. व एलएल. बी. झाल्यानंतर मीं सरकारी नोकरींत जावें असें त्यांचें म्हणणें होतें. याबद्दलची हकीकत पुढे येईल. सरकारी नोकरींत जाण्याचा प्रयत्न माझ्या वडिलांनी केला नाही; तरी केवळ मुल्की परीक्षा पास होऊन घरीं बसल्याने कांहीच फायदा नाही हें ते जाणून होते. म्हणून त्यांनी घरीं बसल्या बसल्या कायद्याचा अभ्यास केला. त्या वेळीं देशी भाषांतून वकिलीची परीक्षा होत असे. घरीं कांही दिवस अभ्यास केल्यानंतर ते बेळगावास गेले. तेथे गणपतराव आठवले म्हणून एक गृहस्थ असत, त्यांच्याबरोबर त्यांनी आपला अभ्यास पुरा केला. गणपतराव एक-दोन वेळां वकिलीच्या परीक्षेला गेले होते. त्यामुळे गणपतरावांची आमच्या वडिलांना चांगलीच मदत झाली. मुंबईला दोघेही वकिलीच्या परीक्षेला गेले. आमचे वडील परीक्षेंत पास झाले. गणपतराव नापास झाले. पुढे त्यांनी तो नाद सोडला; व बेळगावनजीक सांगली संस्थानच्या शहापूर तालुक्यांत वकिली सनद मिळवून वकिली करूं लागले. त्यांचा व माझ्या वडिलांचा चांगला स्नेह असे व आपल्या वकिलीच्या कामांत आमचे वडील केव्हा केव्हा गणपतरावांचा सल्ला घेत असत.

वकिलीची परीक्षा पास झाल्यानंतर आमचे वडील बेळगावास वकिली करण्याकरिता

येऊन राहिले. अर्थात त्यांचे बरोबर माझी आई, मी व माझी धाकटी बहीण ताराक्का याप्रमाणे आम्ही बेळगावास येऊन राहिलों. हुदलीकडील घरची व्यवस्था पूर्वीप्रमाणे दोन कारकून ठेवून घेऊन आमच्या आजीबाई पाहात असत. आमचे वडील मधून-मधून जाऊन येत असत. उन्हाळ्याच्या सुट्टींत आम्ही सर्वच जण हुदलीस जात होतों. बेळगावहून हुदलीला गेलों म्हणजे मक्यांतून हिंडणें, ऊस, मक्याचीं कणसें खाणें वगैरेकडे माझा ओढा असे. हुदली हा गाव आंब्यांबद्दल तिकडे प्रसिद्ध आहे. अलीकडे गोमांतक, बंगलूर, वेंगुर्ला वगैरे बाहेरठिकाणांहून बेळगावच्या बाजारांत पुष्कळ आंबे येऊं लागले आहेत. त्यामुळे हुदलीच्या आंब्याला बेळगावच्या बाजारांतून पाय काढावा लागला असला, तरी मुधोळ, जमखंडी वगैरे संस्थानांत व ज्या ठिकाणीं आंब्याचीं झाडें नाहीत अशा आजूबाजूच्या ठिकाणीं हुदलीच्या आंब्यांचा अद्यापि लौकिक कमी झाला नाही. जुन्या सरकारी कानडी दुसऱ्या क्रमिक पुस्तकांत आंब्यावर एक धडा आहे, व त्यांत हुदलीचे आंबे उत्तम असतात असा उल्लेख आहे. उन्हाळ्याच्या सुट्टींत हुदलीस गेल्या वेळीं आंबराईतून हिंडण्यास मला फार मौज वाटे. एप्रिलपासून आंब्याच्या मोसमाला सुरुवात होई. मला झाडावरील पाडाचे आंबे खाण्याची हौस होती. त्यामुळे गावांतील चार-पाच मुलें गोळा करून मी पाडाचे आंबे खाण्याकरिता बहुतेक दररोज आंबराईतून हिंडत असें. झाडावरील पाडाचा आंबा ओळखणें व तो दगडाने मारून खालीं पाडणें यांत मला करमणूक वाटत असे. रखवालदारांनी पाडाच्या आंब्याबरोबर कच्चे आंबे पडतात म्हणून गिल्ला करावा व पाडाचे आंबे झाडावर चढून काढून देतों असें म्हणावें; पण त्याप्रमाणे त्यांनी केलें तरी माझें समाधान होत नसे. आंबे पाडण्यांतच मौज वाटे. घरीं एखादें तट्टू असावयाचेंच. बरोबर कोणाला तरी देऊन आमचे वडील मला घोड्यावरून फिरण्याकरिता पाठवीत असत. बेळगावास आम्ही होतों त्या वेळीं प्रथम घरीं घोडा नव्हता. तेव्हा एडक्यावर खोगीर घालून बसून मी दररोज बाहेर जात असें. पुष्कळांच्या घरीं मुलांकरिता त्या वेळीं एडके असत. पण तो प्रघात हल्ली बंद आहे.

## माझ्या शिक्षणाला प्रारंभ

माझ्या वयाच्या पाचवे-सहावे वर्षी मला लिहिणें शिकविण्याचा मुहूर्त झाला असावा. खेड्यांत पूर्वी स्लेट-पाट्या नसत. लहानशी फळी घेऊन तीवर वस्त्रगाळ माती पसरून बांबूच्या कांबीच्या लेखणीने मुलांना अक्षरओळख करून देण्याची पद्धत होती. त्याचप्रमाणे याच पद्धतीने मलाही अक्षर-संस्कार झाला. बाळबोध 'श्रीगणेशायनमः'पासून प्रारंभ झाला. आमच्या गावची भाषा जरी कानडी आहे, तरी पत्रव्यवहार, स्टँप, हिशेब वगैरे मराठींतच ठेवण्याची पद्धत होती. कानडीही शिकण्याची पद्धत होती. देशपांड्यांपैकी बहुतेक सर्व पुरुष मंडळींना कानडी व मराठी दोन्ही लिहितां-वाचतां येत असे. तथापि मला प्रथमपासूनच बाळबोध अक्षराचीच

ओळख करून देण्यांत आली. बेळगावास शाळेंत घालण्याची जेव्हा वेळ आली त्या वेळीं मला मराठी शाळेंतच घातलें. घरीं आई, वडील, आजी, बहीण यांचेबरोबर मी मराठींतच बोलत असें. हुदलीस गडीमाणसें, रयत वगैरे लोकांबरोबर कानडी बोलत असें. आमचा प्रांत कानडींतच असल्याने कानडी मला सहज येईल म्हणून मला मराठींतच प्रथमपासून शिक्षण देण्यांत आलें व लहानपणापासून मराठीकडे माझा ओढा जास्ती होता. आमच्या प्रांतांत कानडी-मराठी वादाला अलीकडे तीव्र स्वरूप आलें आहे. या वादाशीं माझा संबंध कोणत्या प्रकारें आहे याबद्दल माहिती पुढे येणारी आहे. त्या वेळीं याबद्दलची माहिती जास्ती विस्तृत येईल.

लहानपणीं लिहिण्यावाचण्याकडे माझें फारसें लक्ष नसे. शाळा चुकवून घरीं राहणें अगर मुलांबरोबर बाहेर खेळणें हें जास्ती आवडत असे. मी मराठी शाळेंत जाऊं लागल्यानंतर मला जबरदस्तीने घरांतून उचलून शाळेंत पोचविल्याचे कित्येक प्रसंग मला आठवतात. आमच्या घरीं कोकणांतील एक नोकर होता. तो माझ्या लहानपणापासून मी वकिली करूं लागेपर्यंत (व त्यानंतरही कांही वर्षें) आमचेकडेच होता. माझ्या आठवणींत तरी त्याने दुसरीकडे नोकरी केली नाही. पगार दरमहा पाच रुपये होता. मी वकिली करूं लागल्यानंतर पाचाचे सहा व नंतर सातपर्यंत त्याचा पगार वाढविला. मी बी. ए. झाल्यानंतर व पुढे कधीकधी त्याला रागें भरण्याचे प्रसंग येत. "माहीत आहे. उचलून शाळेंत नेतांना किती तरी लाथाबुक्क्या मला खाव्या लागल्या आहेत व चावे घेतल्याच्या किती तरी खुणा अजूनही माझ्या अंगावर आहेत. आता मला शहाणपणा शिकविण्याची वेळ आली आहे." अशा अर्थाचे शब्द त्या वेळीं त्याचे तोंडांतून निघत. त्यामुळे मला हसूं येई व रागही शांत होई.

मला बेळगावें येथे मराठी नंबर दोनच्या शाळेंत प्रथम घातलें. या शाळेला पूर्वी ब्रँच स्कूल असें नाव होतें. ही शाळा सुंठणकरांच्या वाड्यांत होती व हल्लीही तेथेंच आहे. आमचें राहतें भाड्याचें घर या शाळेजवळ होतें. म्हणून ही शाळा सर्व दृष्टींनी सोईची होती. मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतच येथे शिक्षण होत असे. माझ्या या शाळेंतील मास्तरांपैकी कऱ्हाडचे श्री. गणपतराव कुलकर्णी हे अद्यापि हयात आहेत. हे मास्तर ट्रेनिंग कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाची परीक्षा पास झालेले आहेत. त्यांची शिकवण्याची पद्धत चांगली होती. माझ्या मराठी चार इयत्ता झाल्यानंतर मला गणपतीगल्लींतील मराठी नंबर एकच्या शाळेंत घालण्यांत आलें. प्राथमिक चार इयत्ता झाल्यानंतर त्या वेळीं घरींच मुलें इंग्रजी शाळेंत जात असत. माझीही इच्छा इंग्रजी शाळेंत जाण्याची होती. पण आमच्या वडिलांनी मला जाऊं दिलें नाही. त्यामुळे माझा हिरमोड झाल्याचें मला स्मरतें. शाळेंतील अभ्यासाखेरीज मला खाजगी शिकविण्याकरिता मास्तर ठेवलेले असत. शाळेंतून घरीं आल्यानंतर या खाजगी मास्तरांचा ससेमिरा माझ्यामागे लागावयाचा; त्यामुळे शिकण्याचा कंटाळा येई. कोर्टाच्या सुट्टीमध्ये हुदलीला जाण्याचा परिपाठ असे. सुट्टी संपल्यानंतर कोर्टें सुरू झालीं म्हणजे वडील-मातोश्री बेळगावला परत येत असत. मी

मात्र आमच्या आजीबाईकडे वशिला लावून महिना-दीड-महिना मागे राहात असें. अभ्यास बुडतो म्हणून मला वेळगावला पाठवण्याबद्दल अगदी निकड लागली म्हणजे मला पाठवण्यांत येत असे. हुदली सोडतेवेळीं माझ्या अगदी जिवावर येई.

त्याचप्रमाणे माझ्या आत्याबाई मला आपल्या गावीं म्हणजे येळूर येथे मधूनमधून घेऊन जात असत. माझ्या आत्याबाईंना मूलबाळ नव्हतें. त्यामुळे त्यांचें व त्यांच्या नवऱ्याचें माझ्यावर फार प्रेम असे. येळूर येथे असतेवेळीं तेथील शाळेंत मी जात आहें या सबबीवर बेळगावला जाणें लांबणीवर टाकण्याला माझ्या आत्याबाईंना सबब मिळे; व त्याचा फायदा मला पुष्कळ वेळां मिळे. याशिवाय माझे मित्र कै. कृष्णराव गेर्जी यांचे वडील पहाटेला उठून विष्णुसहस्रनाम, गीता म्हणत. गावांतील देवळांना व पिंपळाच्या पारांना प्रदक्षिणा घालीत. प्रदक्षिणेच्या वेळीं मोठ्याने 'नारायण, नारायण, नारायण' असा त्रिवार उच्चार करीत. आमच्या घराजवळ एक पिंपळाचा पार आहे. त्या पाराच्या प्रदक्षिणेच्या वेळीं नारायणाची गर्जना झाली म्हणजे आम्हांला उठवण्यांत येई. त्यामुळे नारायणाच्या गजराबरोबर माझ्या पोटांत धडकी भरे. यांचें ओरडणें कोणी बंद कां करीत नाही, असें कित्येकदा मला वाटलें असेल. पण पहाटे उठण्याची लहानपणापासूनची सवय अद्यापि माझी कायम आहे. हा एक फायदा झाला. वडील रूपावली, समासचक्र, अमरकोश, संस्कृत सुभाषितें, श्लोक वगैरेंचे पाठ स्वतः पहाटेला देत असत. संध्या, रुद्र, पवमान, पुरुषसूक्त हीं सांगण्याकरिता भटजीची योजना होतीच. जुन्या पद्धतीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे असें आमच्या वडिलांना वाटत होतें; व नवीन पद्धतीच्या शिक्षणाखेरीज चालावयाचें नाही असेंही वाटे. या कारणाने दोन्हीही नव्हांनी मीं शिक्षण घ्यावें म्हणून त्यांनी प्रयत्न चालविला होता. शिक्षणाची गोडी माझ्यासारख्या चुकार मुलाला कशी लागावी? अभ्यासाकडे दुर्लक्ष झालें तर धाकदपटशा दाखवून शिक्षणाकडे माझें मन वळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आमच्या वडिलांबद्दल मला लहानपणीं फार भीती वाटत असे. त्यांनी मला जवळ घेऊन प्रेमाचे दोन शब्द बोलल्याचे प्रसंग फारच थोडे असतील. नाही म्हणायला मी एखादे वेळीं आजारी झालों म्हणजे मात्र घाबरत असत व माझी शुश्रूषा स्वतः करीत असत. त्या वेळीं मात्र मला 'बापा', 'बच्चा' अशा लाडक्या नावांनी संबोधीत असत. माझी धाकटी बहीण ताराबाई ही माझ्यापेक्षा दोन वर्षांनी लहान आहे. तिला मुलींच्या शाळेंत घातली होती. तिच्याशीं माझे वडील गोडीगुलाबीने बोलून तिला शिकण्याबद्दल उत्तेजन देत असत. माझ्यावर मात्र अगदी करडी नजर असे. "दश वर्षाणि ताडयेत्" हा प्रकार माझ्यासंबंधी होता. माझ्या वडिलांची शरीरप्रकृती उत्तम होती. सहा फुटांवर त्यांची उंची होती व हाडापिंडाने ते मजबूत होते. त्यामुळे त्यांच्या माराचा एखादा चपाटा गालावर वगैरे बसल्यास त्याची आठवण बरेच दिवस राही. म्हणून चपाटी मारतांना ते सर्व बोटांचा उपयोग न करतां उजव्या हाताच्या दोन बोटांचा प्रायः उपयोग करीत. आमच्या वडिलांना जुन्या पद्धतीप्रमाणे संध्या, स्तोत्रें, कांही मंत्र वगैरे पाठ येत

असत. नियमितपणें त्यांनी त्यांचा उपयोग करावा याच हेतूने त्यांना शिकविण्यात आलें होतें. पण त्यांनी त्यांचा कधी उपयोग केला नाही. फक्त गणपतीच्या वेळीं देवे म्हणणें, श्रावणी, श्राद्ध-पक्ष स्वतः चालविणें, याखेरीज आपल्या या शिक्षणाचा उपयोग त्यांनी केला नाही. अशा स्थितींत माझ्यावर हें शिक्षण घेण्याची सक्ती कां करण्यांत येत असे हें समजत नाही.

## *माझे वडिलांची वकिली*

माझ्या वडिलांना इंग्रजी येत नसल्याने इंग्रजी न्यायाधिशापुढे काम चालवणें कठीण जाऊं लागलें. ते मराठींतच काम चालवीत असत. त्यांच्यापूर्वी वकिलीला प्रारंभ करणाऱ्यांपैकी इंग्रजीचें ज्ञान असणारे कोणी नव्हतेच. साधारणपणें रटफ करणारे एकदोन वकील होते व त्यांची वकिली आमच्या वडिलांपेक्षा जास्त किफायतशीर होती. ही अडचण पाहून आमच्या वडिलांनी इंग्रजीच्या अभ्यासाला खाजगी रीतीने प्रारंभ केला व चिकाटीने अभ्यास करून 'लॉ रिपोर्ट्स' वगैरे वाचून समजून घेण्यापर्यंत त्यांनी प्रगती केली. तथापि इंग्रजी बोलतां येत नसे, त्यामुळे डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टात त्यांना अडचण पडे. मॅजिस्ट्रेट वगैरे कोर्टांत त्यांची वकिली उत्तम प्रकारें चालली होती. विशेषतः उलटतपासणी करण्यांत ते बरेच वाकबगार होते. इंग्रजी शिक्षणाची संधी आपण दवडली याबद्दल त्यांना फार वाईट वाटे. गणपतराव लिमये या नावाचे एक गृहस्थ बेळगावांत असत. त्यांची बी. ए.ची परीक्षा पास झालेली होती. व ते 'बी. ए. गणपतराव' या नावानेच ओळखले जात असत. बेळगावांत ते एकटेच बी. ए. त्या वेळीं असल्याने त्यांचेबद्दल लोकांना व आम्हां मुलांना बरेंच कौतुक वाटे. इंग्रजी शिक्षण घेतलेले व इंग्रजींतून वकिलीची परीक्षा देऊन प्रथम वकिलीकरिता येणारे गृहस्थ म्हणजे कै. श्रीपादराव छत्रे व सदाशिव बाळकृष्ण ऊर्फ भाऊसाहेब भाटे. छत्रे हे बेळगावच्या सरदार्स हायस्कुलांत शिक्षक होते, व भाटे हे कारवारच्या शाळेंत मास्तर होते. भाऊसाहेब भाटे यांना कॉलेजचें कांही दिवस शिक्षण मिळालें होतें. भाटे यांना शिक्षणाची आवड विशेष होती, व इंग्रजी–मराठी भाषांवर त्यांचें प्रभुत्व चांगलें होतें. ते चांगले वक्तेही होते. या दोघांच्याही वकिलीची घडी लवकरच चांगली बसली. बेळगावांत सार्वजनिक कामाची कल्पना या दोघांमुळे प्रथम आली असें म्हणण्यास हरकत नाही. भाऊसाहेब भाटे यांच्या मनांत पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या धर्तीवर एक इंग्रजी शाळा काढण्याचें आलें व त्यांनी त्याप्रमाणे भाटे स्कूल म्हणून एक शाळा काढली. त्या वेळीं बेळगावांत एकच हायस्कूल होतें व तेथे चौथ्या इयत्तेपासून मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देण्यांत येई. पहिल्या तीन इयत्तांचें शिक्षण अँग्लो-व्हर्न्याक्युलर स्कूलमध्ये होई. बेळगावचें हायस्कूल हें दक्षिण महाराष्ट्रांतील सांगली, कुरुंदवाड, मुधोळ वगैरे संस्थानिकांच्या मदतीने स्थापन करण्यांत आलें असल्याने त्याला सरदार्स हायस्कूल असें नाव देण्यांत आलें व तेंच अद्यापी चालू आहे. 'अँग्लो-व्हर्नॅक्युलर स्कूल' त्र्यंकोबाच्या देवालयाजवळ

हल्ली जेथे कानडी नंबर एक शाळा आहे त्या इमारतींत होतें. या शाळेचे हेडमास्तर संगाप्पा अंकले हे होते. या शाळेंत अभ्यास बरा करवून घेत असत. पण हेडमास्तर छडीचा उपयोग फार करीत असत, असा त्यांच्याबद्दल मुलांत लौकिक होता. या कारणामुळे व तीन इयत्तांकरिता तीन वर्षें घालवणें बरें नाही असें वाटल्यावरून भाटे यांच्या नवीन शाळेंत मला घालण्यांत आलें. पहिल्या तीन इयत्ता वर्ष-दीड-वर्षांचे आंतच संपवितां येतील अशी हमीही श्री. भाटे यांच्याकडून आमच्या वडिलांना मिळाली होती. शाळा स्थापन झाल्यावेळीं स्वतः भाटे हे इंग्रजी शिकवीत असत. शिकविण्याची त्यांची पद्धत चांगली होती. शिक्षणाची गोडी उत्पन्न करण्यांत ते बरेच प्रवीण असत. बेळगावांत बूट-पाटलोण घालणारे हेच पहिले वकील होते. कोर्टांतून आपलें काम संपवून हे तास-अर्धा-तास शाळेंत शिकविण्याकरिता येत असत. त्या वेळीं त्यांचा पोशाख पाहून आम्हांला मौज वाटे. माझ्या बाबतींत एक गोष्ट आठवते. ती ही की, मला इंग्रजी d हें अक्षर चांगलें काढतां येत नसे. हें भाटे यांना एकदा समजलें. त्यावरून त्यांनी d काढावयाला स्वतः शिकविलें व एका गमतीने शिकवलें. त्यांनी मला सतार किंवा तंबोरा पाहिला आहे काय, असा प्रश्न केला. मीं 'होय' म्हणून सांगितल्यानंतर त्याच्या आकाराप्रमाणे (अर्थात तारा व खुंट्या खेरीजकरून) d चा आकार असतो अशी कल्पना माझ्या मनांत ठसविली. त्यानंतर d काढण्यांत मीं कधीही चूक केली नाही. ल्हानल्हान गोष्टी सांगून इंग्रजी 'डायरेक्ट मेथड'ने ते शिकवीत असत. त्यांच्या वकिलीचा व्याप जसजसा वाढूं लागला तसतसें त्यांना शाळेकडे वेळ देणें कठीण होऊं लागलें. त्यामुळे शाळेची स्थिती खालावत चालली. शाळेचा खर्चही त्यांचे अंगावर येऊं लागला. त्यामुळे चांगले शिक्षक ठेवणें कठीण होऊं लागलें. म्हणून मला ती शाळा सोडून हायस्कूलमध्ये जावें लागलें. यापुढील माझ्या शिक्षणाची हकीकत लिहिण्यापूर्वी त्या वेळची आजूबाजूची स्थिती कशी होती याबद्दल माझी कल्पना थोडक्यांत देत आहें.

प्रकरण दुसरें

# माझें शिक्षण

*तत्कालीन समाजस्थितीचें चित्र*

माझी खेड्याबद्दलची माहिती व कल्पना म्हणजे तीन गावांवरून. एक हुदली, दुसरें येळूर व तिसरें जलालपूर. आणि माझ्या माहितीचें शहरगाव म्हणजे बेळगाव.

बेळगावांत त्या वेळीं आधुनिक शिक्षणाचा प्रसार फार झाला नव्हता. सरकारी नोकरांखेरीज सर्वसाधारणपणें सुशिक्षित म्हणवून घेणारे म्हणजे वकील लोक. सरकारी नोकरवर्गांत, हिंदी लोकांत शिक्षणाची हौस असणारे किंवा विद्याव्यासंगी कोणी असल्याचें मला आठवत नाही. वास्तविक शिक्षणखात्यांत काम करीत असणाऱ्यांना तरी विद्येची अभिरुची असावयाला पाहिजे. पण त्या वर्गांतदेखील तसे लोक नव्हते म्हटलें तरी चालेल. अपवादात्मक एखाददुसरा असेल. शाळाखात्यांतील शिक्षक लोकांची प्रतिष्ठा कमी दर्जाची समजली जात असे. त्यांच्या मानाने मुल्की किंवा न्याय या खात्यांतील नोकरांची प्रतिष्ठा अधिक असे. खेड्यापाड्यांतही हाच प्रकार असे. शाळाखात्यांतील अधिकारी शाळा तपासण्याकरिता फिरतीवर गेल्यास शाळांच्या मास्तरांखेरीज त्याच्या सरबराईकरिता कोणी येत नसत. गावचे पाटील-कुलकर्णीही बेफिकीर असत. परंतु एखादा पोलीस नाईक किंवा हवालदार यांच्या बाबतींत मात्र निराळा प्रकार दिसे. मुलेंच आपल्या आपल्या कुळाचा सर्वतोपरी उद्धार करणार अशी धर्ममूलक भावना असते, असें सर्वसाधारणपणें सांगण्यांत येत असे, व बाह्यतः तसें मानण्यांतही येत असे असें दिसे. ज्या मुलांवर एवढी भिस्त त्या मुलांना तयार करण्याचें काम ज्यांच्यावर सोपवलें आहे त्यांच्याबद्दल अथवा त्यांच्या कर्तव्याबद्दल इतका अनादर असलेला पाहून आज आश्चर्य वाटतें. जुन्या ग्रंथांतून गुरुशिष्यसंबंधाचीं केलेलीं वर्णनें व प्रत्यक्ष व्यवहारांत चालू असलेल्या गोष्टी यांची तुलना केल्यास किती तरी अंतर दिसून येईल. मराठी शाळेंतील शिक्षकांचा पगार दरमहा चारपाच रुपये

असे. मुख्य अध्यापकाचा पगारदेखील वीसपंचवीसपेक्षा जास्ती नसावा. घरची झाडलोट करणाऱ्या नोकरांनादेखील दरमहा चारपाच रुपये पगार मिळे. पोलीस, मुल्की, न्याय या खात्यांतील लोकांचे पगार शिक्षणखात्यांतील नोकरांपेक्षा जास्ती असत. हा भेद जरी लक्षांत न घेतला तरी शाळाखात्यांतील लोकांपेक्षा पोलीस वगैरे खात्यांतील नोकरांच्या हातीं कल्याण किंवा अकल्याण करण्याची सत्ता जास्ती असते म्हणून त्या नोकरांची प्रतिष्ठा वाजवीपेक्षा जास्ती असे. सामान्य जनतेमध्ये या लोकांचा बराच दरारा असे. मुनसफ, डेप्युटी कलेक्टर, मामलेदार, शिरस्तेदार, फौजदार वगैरे अधिकारी हल्लीपेक्षा त्या वेळीं फारच तोऱ्यानं वागत. डिस्ट्रिक्ट जज्ज, पोलिस सुपरिंटेंडेंट, कलेक्टर, असिस्टंट कलेक्टर वगैरे अधिकारी प्रायः युरोपियन असत. त्यांच्या संबंधाने विशेष वर्णन करण्याची आवश्यकता नाही. हिंदी नोकरवर्ग आपल्या लोकांबरोबर ज्या प्रमाणांत उन्मत्ततेने वागत असे त्याच प्रमाणांत किंवा त्यापेक्षा जास्ती वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्याची खुशामत करणें त्यांना भूषणावह वाटे.

अलीकडे वकील हे स्वतंत्र धंद्याचे लोक असें समजलें जातें. त्या वेळीं मात्र तसा प्रकार नव्हता. अधिकारी वर्गाची खुशामत करणें, त्यांची सरबराई करून, मेजवान्या देऊन, त्यांच्या सन्मानार्थ नाचरंग करवून त्यांची मर्जी संपादन करून घेणें किंवा आपल्यावर अधिकाऱ्याची मर्जी आहे असें पक्षकारांना भासवून आपला फायदा करून घेणें यांत कमीपणा आहे असें त्या वेळच्या वकिलांना वाटत नसे. त्या वेळच्या हिंदी सरकारी अधिकाऱ्यांत लाच न घेणारे अधिकारी दुर्मिळच. वशिले लावून, पैसे खर्च करून बेळगाव जिल्ह्यांत व विशेषतः चिकोडी तालुक्यांत बदली करून घेणारे पुष्कळ सरकारी अधिकारी असत. पुष्कळ प्रसंगीं बरेच प्रतिष्ठित म्हणवून घेणारे वकीलदेखील अधिकाऱ्यांना लाचलुचपत देण्याच्या कामीं मध्यस्थी करीत. अशा प्रकारचे वकील मोठे कर्तबगार म्हणूनही गणले जात असत. साक्षीदाराकरिता वगैरे वकिलांच्या ऑफिसांत शाळा सर्रास चालत. बेळगावास शासाहेब या नावाचे एक डिस्ट्रिक्ट जज्ज होते. त्यांचा जन्म कर्नाटकांतच झाला होता. त्यांना मराठी, कानडी या भाषा येत होत्या. दयावंत म्हणून त्यांची ख्याती होती. त्याचप्रमाणे इकडील बऱ्याच घराण्यांशीं त्यांचा स्नेहसंबंध होता. खटले चालवण्याची त्यांची पद्धत विलक्षण असे. एखादें अपील त्यांनी विचाराकरिता घेतलें म्हणजे वकिलांच्या व त्यांच्या मध्ये प्रश्नोत्तरांची झोड उठत असे. मधूनमधून वकिलांना उद्देशून 'fool' किंवा तदर्थनिदर्शक संबोधनांचा उपयोग करण्याची त्यांना आवड असे. तथापि वकिलांनी त्याबद्दल निषेध दाखविण्याची परंपरा नव्हती. त्यांनी fool' म्हटलें की कित्येक वकील "होय साहेब" असें मोठ्या अदबीने म्हणून मुजरा करीत असत, असें मी लहानपणीं ऐकत होतों. वकील त्या वेळीं थोडेच होते. प्रत्येकाला पैसे मिळावेत अशी त्यांची इच्छा असे. म्हणून ते कोर्टांत कोणत्या वकिलांना किती किफायत झाली याबद्दल चौकशी करीत आणि जर कोणाला कमी पैसे मिळाले असें त्यांना वाटलें तर त्यांच्या वतीने कांही मुकदम्यांचा निकाल करीत. अशा त्यांच्या 'सौजन्या' बद्दलच्या गोष्टी आमच्या कानावर येत असत. फौजदारी खटल्यांत साधारण प्रतिष्ठित

मनुष्य अपराधी ठरला तरी त्याला कैदेची शिक्षा न देतां दंडावर भागवतां येईल किंवा नाही, हें ते कसोशीने पाहात असत, असाही त्यांचा लौकिक असे. त्यांनी पेन्शन घेतलें त्या वेळीं महिना-दीड-महिनापर्यंत सारख्या पानसुपाऱ्या चालल्या होत्या. पानसुपारीच्या समारंभाला नायकिणीचें गाणें ही बाब अगदी जरुरीची असे. त्यांनाच काय, कोणाही अधिकाऱ्याला पानसुपारी झाली म्हणजे नाच-गाणें पाहिजेच अशी पद्धत होती. बेळगाव हें हल्ली मुंबई इलाख्यांतील दक्षिण भागाचें हेडक्वॉर्टर समजलें जात असून रेव्हिन्यू कमिशनर तेथेंच असतात. पण त्या वेळीं हें ऑफिस पुण्यास असे. वर्षांतून एक वेळ हें ऑफिस फिरतीवर बेळगावास येई. त्या वेळींदेखील अशाच मेजवान्या, पानसुपाऱ्या, नाचरंग यांची रेलचेल उडे.

केवळ पानसुपाऱ्यांकरिताच नाच वगैरे होत असत असें नाही. लग्नमुंजींत, देवादिकांच्या उत्सवांतही हे प्रकार चालत, व त्यांत प्रतिष्ठितपणा वाटे. नाच वगैरे नसला तर व्याही, विहिणी, जावई रुसत. पण असे रुसण्याचे प्रसंग बहुशः येतच नसत. अशा प्रकारच्या करमणुकीशिवाय उत्सव-समारंभ करणें हें गरिबीचें किंबहुना अडाणीपणाचें समजलें जाई.

याशिवाय साधारण मध्यम स्थितींतील लोकांमध्ये अंगवस्त्र ठेवण्याची चाल बरीच लोकप्रिय होती. असें करण्यांत कांही कमीपणा आहे असें तरी वाटत नसलें पाहिजे. त्यामुळे शिमग्यासारख्या सणांना बराच रंग येत असे. फाल्गुन शुद्ध १०-११ पासून या उत्सवाला प्रारंभ होऊन धुळवडीच्या दिवशीं समाप्ती व्हावयाची. या पाच-सात दिवसांत गाणीं, नाच, जलसे, मैफली यांची चंगळ उडावयाची, व बऱ्याच प्रतिष्ठित लोकांनी हे समारंभ साजरे करावयाचे, अशी पद्धत होती.

## *कै. अण्णासाहेब किर्लोस्कर*

कै. अण्णासाहेब किर्लोस्कर हे मूळ बेळगाव जिल्ह्यांतील सवंदत्ती तालुक्यापैकी गुर्लहसूर या गावचे राहणारे. ते माझ्या लहानपणीं शाळाखात्यांत व पोलीस खात्यांत बेळगावासच नोकर होते. कविता करण्याचा, नाटकें लिहिण्याचा व बसवण्याचा त्यांना नाद तेव्हाही होता. या बेळगावच्या शिमग्याच्या सणाकरिता म्हणून पदें त्यांनी किती तरी केलीं आहेत. त्यांत कोणत्या गृहस्थाचा कोणत्या अखंड सौभाग्यवतीशीं कशा प्रकारचा संबंध आहे याचीं वर्णनें नावनिशीवार आलेलीं आहेत. हीं पदें म्हणत लोक रस्त्यानें जात असत. ज्यांना उद्देशून जें पद असेल तें त्यांच्या घरापुढे म्हणत राहावयाचें असा परिपाठ होता. हीं पदें शाळांतील लहान मुलेंदेखील गुणगुणत असत. या पदांतून बीभत्स शब्द पुष्कळ असत. रस्त्यावर, चवाठ्यावर, सार्वजनिक देवळांतून हीं पदें गाण्याचे 'समारंभ' होत असत. लहान पोरासोरापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांचा श्रोतृवर्गांत समावेश होत असे. फक्त घरच्या मुली व बायका मात्र यांत भाग घेत नसत—हें भाग्यच म्हटलें पाहिजे. अण्णासाहेब बेळगावास असल्याकारणाने ललितकलांसंबंधाने बेळगावच्या लोकांत अभिरुची त्या वेळीं

होती. कर्नाटकांत 'श्रीकृष्ण पारिजातक' या खेळाला बरीच मान्यता होती. पारिजातकाचीं झाडें कोणाच्या मंदिराजवळ असावीं यासंबंधानें श्रीकृष्णाच्या मुख्य राण्या रुक्मिणी व सत्यभामा यांच्यामध्ये तंटा लागून बिचाऱ्या श्रीकृष्णाची खूप धांदल उडावयाची, तेव्हां तोड म्हणून श्रीकृष्णानें झाड सत्यभामेच्या मंदिराजवळ लावून फुलें मात्र रुक्मिणीच्या मंदिरांत पडावयाचीं अशी युक्ती काढली, असा थोडक्यांत या खेळाचा कथाभाग आहे. हल्लीच्या संगीत नाटकांप्रमाणे हा खेळ गद्यपद्यात्मक आहे; आणि कर्नाटकी पद्धतीला अनुसरून गाणें चांगल्या प्रतीचें असे. हा खेळ करणाऱ्या एका प्रसिद्ध मंडळींत नायिकांचीं—रुक्मिणी व सत्यभामा यांचीं—कामें स्त्रियाच करीत आणि त्यांचा आवाज व गाणीं म्हणण्याची पद्धत अत्यंत लोकप्रिय असे. या बाया डोंबारणी असत. तथापि त्यांची कानडी भाषा अत्यंत शुद्ध असे, अशी त्यांची ख्याती असे. या मंडळींना उपयुक्त सूचना करून अण्णासाहेबांनी खेळांत कांहीं सुधारणा केल्या. या कथानकाला अनुसरून मराठींतही एक खेळ अण्णासाहेबांनी बसवला होता व त्यांतील मराठी पदें जुन्या लोकांच्या तोंडीं होतीं. बेळगावास अण्णासाहेबांच्या देखरेखीखाली एक बेळगावकर नाटक मंडळी निघाली होती. त्या मंडळींत बन्याबापू केळकर म्हणून एक गृहस्थ प्रमुख होते, आणि त्यांच्याच बखळींत—हल्ली ज्याला 'केळकर बाग' म्हणतात त्यापैकी कांहीं भागांत—हंगामी थिएटर बांधून ही मंडळी खेळ करीत असे. अण्णासाहेबांचा व आमच्या वडिलांचा स्नेह होता, म्हणून नाटकें पाहण्याची संधी मला मिळत असे. अण्णासाहेब पोलीस खात्यांत असतांना पोलीस जमादाराच्या पोषाखांत त्यांना पाहिल्याचें मला स्मरतें. पुढे त्यांनी कमिशनर, दक्षिण भाग, यांच्या कचेरींत नोकरी धरली व पुण्यासच ते राहावयास गेले आणि तेथे त्यांच्या गुणांचें चीज होऊन आज मराठी संगीत नाटकाचे आद्य प्रवर्तक म्हणून ते प्रसिद्ध आहेत. तथापि कानडी पारिजातक खेळावरून मराठींत संगीत नाटकें लिहिण्याची त्यांना स्फूर्ती झाली असावी, असें कर्नाटकांतील लोकांना वाटणें साहजिक आहे. पुढे त्यांच्या 'शाकुंतल', 'सौभद्र' या नाटकांची पुण्यामुंबईकडे प्रसिद्धी झाल्यानंतर त्यांनी आपली मंडळी घेऊन बेळगावास यावें अशी खटपट तेथील पुढारी मंडळींनी केली. पण त्यांच्या हयातींत हा योग आला नाहीं. त्यांच्या पश्चात भाऊराव कोल्हटकर, मोरोबा, बाळकोबा वगैरे प्रसिद्ध नट या 'मंडळीं'त असतांना कंपनी बेळगावला आली. त्या वेळीं मी हुद्लीस होतों. संगीत शाकुंतल (१ ते ४ अंक) पाहण्याकरिता आमच्या वडिलांनी मला मुद्दाम बेळगावास पाठवल्याचें मला स्मरतें. आणि तो खेळ या 'मंडळी'चा मीं पाहिलेला पहिलाच असावा. त्या वेळीं 'मंडळी'च्या व्यवस्थापकांनी भाषण करून 'मंडळी'च्या व बेळगावकरांच्या संबंधाचा उल्लेख केला होता व बेळगाव हें 'मंडळी'चें माहेरघर आहे असें बेळगावला उद्देशून म्हटलें होतें. नाटकाच्या पत्रिकेवर गावांतील पाचसहा प्रतिष्ठित लोकांच्या व्यवस्थापक म्हणून सह्या असत. किर्लोस्कर मंडळीच्या हस्तपत्रकावर व्यवस्थापक म्हणून सह्या करणें हें मानाचें आहे अशी समजूत बऱ्याच लोकांची असे.

### आमचें शिक्षण व शिक्षक

भाटे स्कूलमध्ये साधारणपणें माझ्या तीन इयत्ता संपवल्यानंतर मला सरदार्स हायस्कूलमध्ये घालण्यांत आलें. भाटे स्कूलची स्थिती अगदी खालावत चालली होती. त्यामुळे त्या शाळेंत शिक्षण चांगलें होत नव्हतें. मला हायस्कूलमध्ये घालण्याबद्दलची माझ्या वडिलांची कल्पना मला पटली. बेळगाव शहरांत व जिल्ह्यांतील कांही भागांत मराठी भाषेचा प्रसार आहे. त्यामुळे बेळगाव हायस्कुलांत कानडी व मराटी अशा प्रत्येक इयत्तेच्या दोन शाखा असत. माझें प्राथमिक शिक्षण मराठींतच झालें असल्याकारणाने माझें नाव मराठी शाखेंतच नोंदवलें गेलें. त्या वेळीं हल्लीचा कानडी-मराठी वाद नव्हता. हायस्कूलचे हेडमास्तर मि. डुगवर्क म्हणून होते. ते पूर्वी असिस्टंट मास्तर होते. ते अँग्लोइंडियन होते. त्यांचें स्वतःचें शिक्षण विशेष झालेलें नव्हतें. तथापि त्यांचें अक्षर चांगलें होतें. नीटनेटकेपणाकडे तें विशेष लक्ष देत. पुष्कळ दिवस बेळगावांतच राहात असल्याने व त्यांना कानडी बोलतां येत असल्याने त्यांची व गावांतील बऱ्याच शिष्ट मंडळीची चांगली ओळख असे. त्यांच्या ओळखीच्या घराण्यांतील विद्यार्थ्यांवर त्यांचें प्रेम असे. त्यांची बदली दुसरीकडे कोठे झाली नाही. "Let him spoil the school only" असा त्यांच्यासंबंधाने शिक्षणखात्यांत उल्लेख असल्याबद्दल आख्यायिका होती. शिकवण्यापेक्षा मार्क देणें, नंबर लावणें, वर नंबर मिळवणाऱ्यांना 'Very good', 'Very creditable' असे, तर खाली गेलेल्यांना 'Bad', 'Very bad' असे शेरे दर महिन्याच्या प्रारंभीं प्रत्येक वर्गांत जाऊन देणें वगैरे कामें हे हेडमास्तर करीत असत. त्यामुळे विद्यार्थ्यांना घोकंपट्टीकडे जास्ती लक्ष पुरवावें लागे. वरचे मुख्य अध्यापकच या वृत्तीचे होते, म्हणून सर्व शिक्षकांचें वळण याच पद्धतीवर होतें. कोणत्याही विषयाबद्दल विशेष अभिरुची विद्यार्थ्यांत उत्पन्न करावी, ही कल्पनाच शिक्षकांमध्ये नव्हती. शिक्षण कसें असावें याबद्दलच्या अलीकडील विचारांची कल्पनादेखील त्या वेळीं शिक्षकांना नव्हती. एक भिडे या नावाचे शिक्षक सातारा हायस्कूलमधून आमच्या हायस्कूलमध्ये आले होते. ते संस्कृत शिकवीत असत. त्यांनी आमच्या हायस्कूलच्या शिक्षणपद्धतीला सोडून आम्हांला शाकुंतल नाटक शिकवण्यास आरंभ केला, आणि संस्कृताबद्दल व विशेषतः कालिदासाबद्दल अभिरुची उत्पन्न केली. त्यांची शिकवण्याची पद्धत मनोरंजक असून विषय सोपा करण्यांत ते बरेच प्रवीण होते. यामुळे मार्क, नंबर, वगैरेकडे त्यांचें दुर्लक्ष होत असे. डुगवर्कसाहेबांना ही गोष्ट समजल्याबरोबर त्यांनी भिडे यांना आपली पद्धत सोडण्याबद्दल कळवलें ! भिडे यांचें व हेडमास्तरांचें न पटल्यामुळे त्यांनी खटपट करून आपली पुन्हा बदली करून घेतली. या एका उदाहरणावरून हायस्कुलांत कशा प्रकारचें शिक्षण होत असेल याची कल्पना होईलच. तथापि माझ्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांत कांही मेहनती व हुषार विद्यार्थी होतेच. हायस्कुलांतील शिक्षणपद्धती सदोष होती तरी त्यांची तयारी बऱ्यापैकी असे.

असे थोडे अपवाद खेरीज करून बाकी विद्यार्थी एका माळेचे मणीच होते. त्यांपैकीच मी एक होतों. वार्षिक परीक्षेंत मी पास झालों काय किंवा न झालों काय, गावांतील एका प्रतिष्ठित गृहस्थाचा मुलगा म्हणून वरील वर्गात माझी बढती करणें हा संप्रदायच होऊन बसला होता. त्यामुळे माझे बहुतेक सर्व विषय कच्चेच राहात गेले.

## हायस्कूलमधील माझे स्नेही

मी हायस्कुलांत गेल्यावेळीं श्री. दत्तात्रय व्यंकटेश वेळवी हे सातव्या इयत्तेंत होते, व त्यांची हुशार विद्यार्थ्यांत गणना होती. माझ्या बरोबरीच्या मंडळींतील कै. कृष्णाजी रघुनाथ नातू, गोपाळ लक्ष्मण गजेंद्रगडकर, जनार्दन बाळकृष्ण गद्रे, शिवराम गोविंद भडभडे, सोराबजी भरूचा हे माझे बाळमित्र होते. यांपैकी नातू हे बी. ए., एल्‌एल्. बी. होऊन सरकारी न्यायखात्यांत गेले व बेळगावासच फर्स्टक्लास सबजज्ज असतांनाच वारले. बी. ए. झाल्यानंतर गजेंद्रगडकरांनी मुलकी खात्यांत नोकरी धरली व डेप्युटी कलेक्टरच्या जागेवर असतांना ते सेवानिवृत्त झाले. हल्ली ते बेळगावासच असतात. गद्र्यांची बी. ए.ची परीक्षा झाल्यानंतर तेही मुलकी खात्यांत गेले व मामलेदाराच्या हुद्द्यापर्यंत जाऊन त्यांनी पेनशन घेतली. हल्ली ते रत्नागिरी जिल्ह्याचे रहिवासी झाले आहेत. भडभडे हे डॉक्टर झाले. त्यांनी कांही दिवस बेळगावांत डॉक्टरीचा धंदा केला व पुढे मिरजेस नोकरी धरली. तेथे असतांना आपल्या धंद्यांत त्यांनी बराच लौकिक मिळवला.

सोराबजी भरूचा यांचा वर्गात नंबर बहुतेक शेवटचा असावयाचा. हे स्वभावाने फारच द्वाड असत आणि वर्गांत बरोबरीच्या विद्यार्थ्यांची व प्रसंगोपात्त शिक्षकांची थट्टामस्करी करण्यांत पटाईत असत. सहाव्या इयत्तेपर्यंत यांचा अभ्यास झाला असावा. त्यांनी शाळा सोडली व कांही दिवसांनी 'सिंगर' कंपनींत नोकरी धरली. हल्ली ते त्याच कंपनींत नोकर असून त्यांचा पगार व भत्ता वगैरे मिळून त्यांना दरमहा दोन हजार रुपयांपर्यंत पडतो. विद्यार्थी असतेवेळीं अभ्यासांत जरी त्यांनी फारशी दक्षता दाखविली नाही तरी पुढे आपल्या धंद्यांत त्यांनी बरीच कर्तबगारी दाखवली.

## शिस्तीचा अनिष्ट परिणाम

घरीं वडिलांची शिस्त फारच कडक होती, असा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. याचा परिणाम माझ्यावर फारच अनिष्ट झाला. घरीं अगदी भिऊन असावयाचें; त्यामुळे स्वभावांत एक प्रकारचा लाजाळूपणा आला. माझ्यापेक्षा जास्ती वयाच्या लोकांबरोबर वागतांना मला तितका मोकळेपणा वाटत नसे. माझी आजी तर मला याबद्दल फारच चिडवीत असे. मला 'मुखहीन' म्हणून तिने मला किती तरी वेळां टोचलें असेल. हायस्कूलमध्ये असतांना सहाव्या व सातव्या इयत्तेंत कोणत्या तरी प्रथम ठरवलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी बोलावें म्हणून दुगवर्कसाहेबांनी

आठवड्यांतून एक तास राखून ठेवला होता आणि त्याला दुगवर्क हे स्वतः हजर असत. माझ्यावर ज्या वेळीं पाळी येई त्या वेळीं तीनचार वाक्यांपेक्षा मी केव्हांही जास्ती बोललों नाही. बोलण्याला उठून उभें राहिल्याबरोबर अंगाला घाम सुटावयाचा व डोळ्यांना अंधेरी आल्याप्रमाणे व्हावयाचें हें ठरल्यासारखें होतें. बहुतेक शेवटीं मी बोलत असें व कोणत्याही पूर्वीच्या वक्त्याच्या भाषणांत न आलेले मुद्दे मांडण्याचा मी प्रयत्न करीत असें. त्यामुळे दुगवर्कसाहेब माझ्यावर खूष असत; पण माझ्या लाजाळूपणाबद्दल पुष्कळ वेळां मला ते उपदेश करीत. आपल्या शेवटच्या भाषणांत मीं मांडलेल्या मुद्द्याबद्दल गौरवपूर्वक उल्लेख करून मला उत्तेजन देत. पण माझ्यावर त्याचा परिणाम होत नसे. माझ्यामध्ये हा दोष अद्यापि आहे. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत किती तरी लहानमोठ्या सभांतून मला बोलावें लागलें आहे. पण बोलण्याचें टाळण्याकडेच माझी प्रवृत्ती कायम आहे. भाषण सुरू केल्यानंतर कांही मिनिटें तर माझी भीती मला सोडीतच नाही आणि शाळेंत बोलतेवेळीं जे अनुभव येत त्यांचीच पुनरावृत्ती थोड्या प्रमाणांत तरी अद्यापि होते. एखाद्या सभेंत अगर परिषदेंत बोलणाऱ्यांच्या नावांची यादी करण्याची पद्धत आहे. त्या यादींत माझं नाव नसलें म्हणजे मला बरें वाटतें. मला बोलण्याची संधी मिळाली नाही म्हणून मला वाईट वाटलें असा प्रसंग आल्याचें मला अद्यापपर्यंत आठवत नाही. तथापि माझ्या कार्यक्षेत्रांत कोणत्या तरी एखाद्या मताचा अथवा धोरणाचा प्रसार करण्याची आवश्यकता असून दुसऱ्याकडून हें काम योग्य प्रकारें होत नाही असें मला वाटल्यास मला एक प्रकारचें स्फुरण चढतें, व त्या भरांत माझ्यावर बोलण्याचे अनेक प्रसंग आले आहेत. अशा स्थितींतच माझीं भाषणें थोडींफार परिणामकारक होत असावींत. निदान माझें कर्तव्य तरी मीं बजावलें अशा समाधानाचा मला अनुभव येतो.

### *माझा 'मुखहीन'पणा*

मी इंग्रजी पाचवींत अगर सहावींत गेल्यापासून माझ्या वडिलांनी माझे बाबतींत आपलें धोरण बदललें. 'पुत्रे मित्रवदाचरेत्' या धोरणाचा स्वीकार करण्यास त्यांनी प्रारंभ केला. तेव्हा माझ्यामध्ये 'मुखहीन'पणाचा अनपेक्षित दोष आल्याचें त्यांना समजून आलें व तो दोष घालवण्याच्या प्रयत्नाला ते लागले. आपल्या धंद्याचे कामाकरिता त्यांना बाहेरगावीं जावें लागत असे. त्या वेळीं ते मला बरोबर घेऊन जात. कोर्टांत बॅरिस्टर वगैरे एखाद्या खटल्यांत आल्यास कोर्टांत मला घेऊन जात व चांगली जागा पाहून मला बसवीत. कोर्टाचें कामकाज मला समजत होतें असा प्रकार असण्याचा संभवच नव्हता; पण खटला ऐकण्याकरिता म्हणून गावांतील पुष्कळ मंडळीची गर्दी कोर्टांत होई व एक प्रकारची करमणूक होत असे. माझ्या लहानपणीं मी बॅरिस्टरांपैकी फेरोजशहा मेथा, बॅनसन, तेलंग, कॅंपबेल व हायकोर्ट वकिलांपैकी महादेव चिमणाजी आपटे, शामराव विठ्ठल, घनश्याम नीलकंठ नाडकर्णी, सर चौबळ, गणपतराव किर्लोस्कर, माणिकशहा, जहांगीरशहा यांना पाहिलें होतें.

यांच्यापैकी आपटे यांना आमच्याच घरच्या एका दिवाणी खटल्यांत आमच्या वडिलांनी आणवलें होतें.

## मीं मुंबई पाहिली !

मी शाळेंत असतांना माझ्या वडिलांनी मला एकदा मुंबईस नेलें होतें. त्या वेळीं पुण्यापासून बेळगावापर्यंत आगगाडी नव्हती. म्हणून आम्ही वेंगुर्ल्यापर्यंत पंचाहत्तर मैल बैलगाडीनें गेलों व वेंगुर्ल्याहून आगबोटीनें मुंबईस गेलों. बेळगावाहून वेंगुर्ल्यापर्यंत टपाच्या सारवटगाड्या होत्या. सरासरी पंचवीस-सव्वीस तास या प्रवासाला लागत. त्या वेळीं सह्याद्री व समुद्र पाहून मला फारच मौज वाटली. वेंगुर्ल्याच्या धक्क्यापासून आगबोटीपर्यंत पडावानें जावें लागतें. पडावांत बसल्यानंतर त्या लाटा व पाणी पाहून भीती वाटली. त्यांतून ती रात्रीची वेळ असल्यामुळे भीतींत जास्त भर पडली. बोटींत गेल्यानंतर स्वस्थ निजलों. मुंबईला पोचावयाला जवळजवळ चाळीस-बेचाळीस तास लागले. भाऊच्या धक्क्यावर बोट लागली. मुंबई शहराचें तें प्रथम दर्शन. शहरांत बेळगावापेक्षा मोठें शहर यापूर्वी पाहिलेंच नव्हतें. त्यामुळे मुंबई पाहून आश्चर्यानें चकित झालों. बंदराहून निघाल्यानंतर कारनॅक पुलावर आलों तोंच आगगाडीची शिटी ऐकली. इतक्यांत आगगाडी निघूनही गेली. तेव्हांच आगगाडींतून प्रवास करण्याची प्रबळ इच्छा झाली. त्या वेळीं मुंबईत आमचा मुक्काम महादेव चिमणाजी आपटे यांच्या घरीं गिरगावांत होता. ज्या कामाकरितां आमचे वडील मुंबईला आले होते त्या कामांत आपटे हेच वकील होते. आपटे यांना माहिती वगैरे देण्यांत सातआठ दिवस गेले. या अवधींत मीं मुंबई शहरांतील बहुतेक प्रेक्षणीय स्थळें पाहून घेतलीं. आमच्याबरोबर बेळगावाहून रामकृष्णपंत हेरलेकर हेही मुंबईला आले होते. हे गृहस्थ आम्हांला पोचवण्याकरिता म्हणून बेळगावच्या हद्दीपर्यंत आले असतां आमच्या वडिलांनी त्यांना वेंगुर्ल्यापर्यंत येण्याचा आग्रह केला. वेंगुर्ल्याहून मुंबईपर्यंतही ते आले. आपल्या पूर्ववयांतील कांही वर्षें त्यांनी मुंबईस काढलीं होतीं. त्यांचा व नानासाहेब देशमुख यांचा चांगला स्नेह होता. ते अगदी हौशी असे गृहस्थ होते. त्यांच्या घराच्या शेजारींच आम्ही राहतों; व आम्ही राहात होतों तें घरही त्यांच्या चुलत्याच्याच मालकीचें होतें. त्यांच्या घरांतून आमच्या घरांत येण्याला एका दालनांत दरवाजा होता. तो नेहमी उघडा ठेवण्याची वहिवाट असे. त्यामुळे आमचें व त्यांचें बरेंच दळणवळण असे व घरोबाही असे. रामकृष्णपंतांना मुंबईची माहिती चांगली असल्याकारणानें मुंबई पाहण्यास मला त्यांची मदत चांगली झाली. एक दिवस आपट्यांनी मला आपल्या घोड्याच्या गाडींतून हायकोर्टाला नेलें व एका कोर्टांत बसविलें. त्या कोर्टाचें काम सर चार्लस सार्जंट (सरन्यायाधीश) व एक हिंदी जज्ज हे चालवीत होते. हिंदी जज्जांचें नाव लक्षांत नाही. पण ते बहुत-करून नानाभाई हरिदास असावेत. आपट्यांचें पहिलें काम लागलें होतें. त्याचे

विरुद्ध शांताराम नारायण हे होते. आपट्यांचा आवाज, बोलण्याची शैली, त्यांचा चेहरा याची मला आठवण अद्यापि आहे. शांताराम हे वकिलींत नामांकित होते. पण माझ्या-सारख्या वकिलीसंबंधानें पूर्ण अज्ञान असणाऱ्यांना त्यांचें कौशल्य कळणें शक्य नव्हतें. खटल्याचें काम चालू असतांना आपट्यांच्या वतीनें निकाल लागावा असें मनांतून वाटे. त्यांच्याच घरीं आम्ही पाहुणे होतों म्हणून असो किंवा त्यांनी मला प्रेमानें आपल्या-बरोबर कोर्टांत नेलें होतें म्हणून असो किंवा त्यांच्या ठसकेबाज भाषणाच्या शैलीला भुलून असो, त्यांना यश यावें असें वाटत होतें हें खास. या अपिलाचें काम चालू असतांनाच मी कोर्टांत फिरण्याकरिता गेलों. संध्याकाळीं आपटे घरीं परत आल्यानंतर कामाचा निकाल कसा झाला म्हणून त्यांना मीं विचारलें. आपल्या वतीनें ठराव झाला असें त्यांनी हसतहसत मला सांगितलें. त्या वेळीं मलाही बरें वाटून, आपल्यासारखा निकाल लागणार असें मलाही वाटलें होतें असें मी बोलून निघून गेलों.

## पुण्याचें पहिलें दर्शन

आमच्या वडिलांचें काम आटोपल्यानंतर परत कोणत्या मार्गें जावें याबद्दल ते आपल्या अशिलाशीं विचार करीत होते. मला आगगाडींत बसण्याची हौस होती व पुणेंही जातांजातां पाहावें असें वाटत होतें. ही गोष्ट मीं वडिलांना कळवली. त्यांनी ती मान्य केली. आपट्यांच्या घरीं त्या वेळीं एक गृहस्थ काच तयार करण्याच्या कामांत गुंतले होते, असें मला आठवतें. त्यांचें नाव पक्कें लक्षांत नाही; पण राजवाडे असावें.

मुंबईपासून पुण्यापर्यंतचा प्रवास दिवसाच केला. प्रथमच आगगाडींत बसण्याचा प्रसंग. त्यांतून घाटांतील मनोरम देखावा. गाडी बोगद्यांतून जातेवेळीं गाडींतील लोकांनी 'पुंडलीक वरदे हरि विठ्ठल'ची केलेली गर्जना मला अद्यापि पूर्णपणें स्मरते. तेव्हा या प्रवासाला सहा तासांपेक्षा कमी तास लागत नसत. पुण्यास आमचा मुक्काम डोलकर-आळींत सुपेकर यांच्या घरीं होता. हे सुपेकर बेळगावास हायस्कूलमध्ये शेतकी शिकवीत असत. आमच्या वडिलांना शेतकीचा नाद विशेष असल्यानें त्यांचा सुपेकरांशीं स्नेह होता. त्यांचे वडील पुण्यास होते. त्या ओळखीनें आम्ही त्यांचे घरीं उतरलों होतों. आमच्या वडिलांना बेळगावास जाण्याची गडबड होती, त्यामुळे एकच दिवस पुण्यांत राहावयाला मिळालें. गावांत इकडेतिकडे फिरलों, याशिवाय विशेष पाहावयाला सवड मिळाली नाही. तथापि शनिवारवाडा, बुधवारवाड्याची आग वगैरे पाहिल्याचें लक्षांत आहे. प्रेक्षणीय स्थळांच्या दृष्टीनें मुंबईनंतर पुणें पाहण्यांत विशेष वाटलें नाही. ऐतिहासिक दृष्ट्या पुण्याकडे पाहण्याची माझी योग्यता नव्हती. तथापि शनिवारवाड्याची आंतली स्थिती पाहून मन उद्विग्न झालें. 'मंडई' हा शब्द प्रथमच कानीं आला व मंडईतून शिष्ट लोक झोळींतून भाजी आणतांना पाहून आश्चर्य वाटलें. हा प्रकार आमच्या प्रांतीं नाही. त्याचप्रमाणे पगड्या, पागोटीं यांची रेलचेल दिसली. लहान-

महान घरांनादेखील वाडा म्हणण्याच्या पद्धतीचा अनुभव प्रथमच आला. मुंबईप्रमाणे लोकांच्या पोषाखांत वगैरे बदल झालेला दिसला नाही. कोट, टोप्या यांचें प्रमाण बरेंच कमी होतें. मुलें मात्र टोप्या घालून शाळेंत जातांना दिसत असत. आमच्या तिकडे स्त्रिया पायांत जोडे घालीत नसत. अद्यापिही ही चाल रूढ झालेली नाही. पण त्या वेळीं स्त्रिया रस्त्याने जोडा घालून जातांना प्रथमच पाहिल्या. नदीकाठीं असलेल्या गावांत, घाटावर वगैरे स्नानें करण्याची पद्धत जशी पाहिली होती तशीच हौदावर स्नानाकरिता झालेली गर्दी पाहिली.

## वैद्य बापूसाहेब मेहेंदळे

माझ्या डोळ्यांच्या पापण्यांना कांही विकार झाला होता. त्याबद्दल बेळगावास पुष्कळ उपचार केले होते, पण गुण आला नव्हता. तेव्हा मुंबईस एखाद्या चांगल्या डॉक्टरांना दाखवावें असा विचार होता. पण परत पुण्यावरून जावयाचें असें ठरल्यानंतर पुण्यांतील त्या वेळचे नामांकित वैद्य बापूसाहेब मेहेंदळे यांना दाखवून त्यांचे उपचार करणें बरें असें वाटलें. बेळगावास सर्व डॉक्टरी उपाय करून पाहिल्यामुळे त्यापासून फारसा उपयोग होणार नाही असें वडिलांना वाटलें असावें. त्यांतून दक्षिण भाग कमिशनरच्या कचेरींत रामभाऊ मेहेंदळे—बापू मेहेंदळे यांचे चिरंजीव—होते. त्यांचा व वडिलांचा चांगला स्नेह होता. त्यांच्यामार्फत वैद्यबुवांची गाठ घेतल्यास जास्ती काळजीने चिकित्सा होऊन उपचार होतील, अशीही आमच्या वडिलांची समजूत होती. बापूसाहेब मेहेंदळे स्पष्टवक्ते असून एक प्रकारचा विक्षिप्तपणाही त्यांच्यामध्ये आहे असें आमच्या कानावर आलें होतें. म्हणून वशिल्याने त्यांची भेट घेणें बरें असें वाटून रामभाऊंची आम्हीं भेट घेऊन त्यांना विचार कळवला. पण चिरंजीव व वडील एका घरांत राहात नसून त्यांच्यामध्ये मनोमनीं बरें नसल्याचें आढळून आलें. बापूसाहेबांकडून अवश्य औषध घ्यावें, पण आपली ओळख असल्याचें आपल्या वडिलांना सांगूं नये असा सल्ला रामभाऊंनी दिला. त्याप्रमाणे बापूसाहेबांना डोळे दाखवले. त्यांनी ते तपासून व डोक्यावर हात ठेवून, तेथील उष्णता वगैरे अजमावून, आमच्या वडिलांना "तुमच्याच प्रतापाचें हें फळ असावें!" असा टोमणा देऊन कांही गोळ्या दिल्या व त्या बदामाच्या खिरींतून चाळीस दिवस घेण्यास सांगितलें. त्या गोळ्यांमुळे मला गुण आला व त्या व्याधीपासून मी कायमचा मुक्त झालों.

पुण्यापासून बेळगावापर्यंत त्या वेळीं आगगाडी नव्हती. त्यामुळे लवकर जावयाचें तर टपालटांग्यांतूनच जाणें जरूर होतें. म्हणून मी व वडील टपालाच्या टांग्याने सायंकाळीं चार वाजतां निघालों. आणखी एकदोन उतारू आमच्याबरोबर होते. टांग्यांत सामानही पुष्कळ होतें. त्यामुळे सबंध प्रवास बसूनच करावा लागला. पुण्याच्या बाहेर आल्याबरोबर पर्वतीचें देवालय दिसलें. या देवालयाची ऐकून माहिती होती. पण तें पाहण्याची संधी मिळाली नाही म्हणून वाईट वाटलें, व ती टेकडी दिसेपर्यंत माझी दृष्टी तिकडेच होती.

सातारा शहरही रात्रींच गेलें. त्यामुळे तेंही दुरूनदेखील पाहण्याचा योग आला नाही. दुसरे दिवशीं अजमासें दोन प्रहरीं बाराच्या सुमाराला कोल्हापूरच्या पोस्ट ऑफिसाला आलों. मला भूक लागली होती. म्हणून पोस्टांतील एका कारकुनाच्या घरीं माझ्या जेवणाची सोय करण्यांत आली. माझे वडील जेवले नाहीत. ओळखपाळख नसतांना, वरच्या सर्वांचीं जेवणें होऊन गेल्यानंतर, माझें वय लक्षांत घेऊन गृहस्थाश्रमाला जागावें असें एका गृहस्थाला वाटावें, ही हल्लीच्या काळांत साधारणपणें कौतुक करण्यासारखीच गोष्ट आहे, म्हणून तिचा उल्लेख केला आहे. टपालाच्या टांग्याचा इतर गाडीवानांना एक प्रकारचा वचक वाटत असे. त्या वेळीं रस्त्याने गाड्यांची रहदारी मोठी असे. ५०-७५ गाड्या मिळून जातयेत असत. टपालटांगा हाकणाऱ्याजवळ एक बिगुल असे. दूर गाड्या पाहिल्या म्हणजे त्याने बिगुल फुंकावयाचा. गाडीवाल्यांची त्रेधा उडावयाची. कांही गाड्या डावीकडे व कांही उजवीकडे व कांही मध्येच अशी धांदल उडावयाची. त्यामध्येच टांगेवाल्याकडून शिव्यांचा वर्षाव व्हावयाचा व केव्हाकेव्हा बिचाऱ्या बैलगाडीवाल्यांना चाबकाचा प्रसादही मिळावयाचा. कोल्हापूरहून बेळगावच्या रस्त्याने जातांना दुरून पन्हाळा किल्ला व जुन्या राजवाड्याचे कळस वगैरे दिसले. पण कोल्हापूर पाहण्याची हौस त्या वेळीं भागली नाही.

रात्रीं नऊ-दहाच्या सुमाराला बेळगावला पोंचलों. जवळजवळ तीसबत्तीस तासांचा हा प्रवास झाला. सर्व आंग खुळखुळून गेलें होतें. तथापि प्रवासाची गंमत वाटल्यामुळे श्रमाचा मोबदला चांगला मिळाला.

प्रकरण तिसरें

# तरुण वयांतील संस्कार

### *विवाहसमारंभांतील 'धूम'*

मुंबईच्या प्रवासाच्या पूर्वी चारसहा महिने माझा विवाहही उरकण्यांत आला होता. त्या वेळीं माझें वय त्या मानाने अगदीच लहान होतें. माझी बहीण चि. ताराबाई ही माझ्यापेक्षा दोन वर्षांनी लहान. माझ्या लग्नापूर्वी अजमासें एक महिना तिचें लग्न बेळगावास झालें होतें. हिला बेळगावांतील करगुप्पीकर या नावाने प्रसिद्ध असलेल्या घराण्यांतील विठ्ठलराव ऊर्फ बंडोपंत म्हणून एका जवळजवळ माझ्याच वयाच्या मुलाला दिली होती. लग्न बेळगावांतच झालें. पुष्कळ दिवसांनी आमच्या कुटुंबांत हा समारंभ होत असल्याकारणाने तो बराच थाटानें करण्यांत आला. बंडोपंतांचे आईबाप त्यांच्या लहानपणींच निवर्तले होते. त्यांचें पालनपोषण त्यांचे चुलते गोविंदराव हे करीत होते. मुंबईस लोहारचाळींत करगुप्पीकर या नावाची एक पेढी होती. त्या पेढीचे गोविंदराव हे वहिवाटदार होते, व त्यांचीही कांही तरी भागीदारी असावी. पण मुख्य भागीदार आप्पासाहेब करगुप्पीकर हे होते. पेढीची व्यवस्था करण्याकरिता गोविंदराव हे बंडोपंत व त्यांचे वडील बंधू चिंतामणराव यांच्यासह मुंबईसच राहात असत. आणि या मुलांचा विद्याभ्यास मुंबईसच झाला होता. बेळगावास आल्यानंतर गोविंदरावांनी आपल्याला राहाण्याकरिता बेळगावासच घर बांधलें व तेथेंच तें पुतण्यासहित राहूं लागले. त्यानंतर मुंबईच्या पेढीची मालकी आप्पासाहेब यांजकडेच गेली. त्या वेळीं बेळगावांत आप्पासाहेबांचा मोठा लौकिक होता, आणि मनुष्य मोठा हुषार व कर्तबगार म्हणून प्रसिद्धी होती. पण पुढे त्यांच्या हयातींतच त्यांची स्थिती फारच खालावली. बंडोपंत हा मुलगा हुषार व तरतरीत असे. शिवाय घरची स्थितीही खाऊनपिऊन बऱ्यापैकी. चांगला हुंडा देऊन आमच्या वडिलांनी लग्न मोठ्या थाटाने केलें. ते भाटे यांच्या शाळेंत पाचव्या इयत्तेंत त्या वेळीं असावेत. या लग्नाकरिता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक .................... नों. दि. ..............

आमच्या घरीं खूप सामानसुमान तयार करण्यांत आलें होतें. आमच्या घरीं आप्तइष्ट मंडळी जवळजवळ दोनशेपर्यंत जमली असावी. पण वरपक्षाकडे घराच्या जिव्हाळ्याचें कोणी नसल्याने तिकडून फारशी हौस दिसली नाही. लग्नांतील रुसवा वगैरे प्रकार त्या वेळच्या पद्धतीला अनुसरून सर्व कांही झाले. पण त्यांत प्रेमाचा ओलावा नव्हता.

कर्नाटकांत देशस्थांत लग्नसमारंभाच्या वेळीं 'भूम' म्हणून एक जेवणाचा प्रकार होत असतो. ऐपतीप्रमाणे हा भूम एकपासून चार दिवसपर्यंत चालतो. वराकडील बायकांची पंगत बसते व तींतच नववधूवरें एकाच ताटांत जेवावयाला बसतात. नाव घेणें, घास घालणें वगैरे सार्वत्रिक रूढ असलेल्या चाली असतातच; पण या भूमाचा विशेष हा आहे कीं, वधूकडील स्वयंपाकाची नासाडी करावयाची. भीड, शिष्टाचार सोडून आपल्या पानावर खूप वाढून घ्यावयाचें व तें तसेंच पानावर टाकून उठावयाचें, किंवा पक्कान्नाचीं ताटें वगैरे वाढण्याकरिता आलीं म्हणजे त्यांत आपल्या पानांतील खरकटें टाकून तीं ताटेंच्या ताटें आपल्या पानासमोर तशींच न वाढतां ठेवून घ्यावयाचीं. हा प्रकार विहिणीपासून इतरेजनांपर्यंत करण्यांत येतो. अशा रीतीने अन्नाची नासाडी करून वधूपक्षाकडील मंडळींची फजिती उडवावयाची व ती तशी उडाली म्हणजे आपल्याला धन्य मानावयाचें! याशिवाय जेवावयाला बसल्या जागेच्या भिंतींवर तूप ओतून भिंती घाण करावयाच्या, व वधूपक्षाला नाना प्रकारच्या अश्लील शब्दांनी हिणवावयाचें. या भूमाच्या समारंभांत वधूवर व दोन्ही पक्षांकडून गाणीं चाललेलीं असतात. या गाण्यांतूनही एकमेकांची एकमेकांनी मनसोक्त निंदा करण्याचा प्रघात आहे. भूमांत हीं गाणीं म्हणण्याकरिता हा धंदा करणाऱ्या बाया मुद्दाम बिदागी देऊन आणण्यांत येतात. हा भूम-समारंभ निदान तीन तास तरी चालतो. ज्या लग्नांत भूम नाही तें लग्न अगदी कनिष्ठ दर्जाचें समजलें जातें. अगदी गरिबांच्या लग्नांतदेखील हा प्रकार लहान प्रमाणावर तरी झालाच पाहिजे, अशी पद्धत आहे. अलीकडे या प्रकारांत बरीच सुधारणा झाली आहे. याचें कारण खालावलेली सांपत्तिक स्थिती हें एक आहे. शिवाय वर व वधू प्रौढ वयाचीं असल्याकारणाने त्यांनाही —निदान वराला तरी—हा प्रकार नको असें वाटत असलें पाहिजे. तथापि भूमाचा 'शास्त्रोक्त' विधी म्हणून अजूनही चालतोच. त्यांतून आमच्याकडे वैष्णव-माध्वसांप्रदायी लोकांत हा प्रघात फारसा कमी झाला आहे, असें म्हणतां येणार नाही. भूमाचें जेवण आटपल्यानंतर वधूवरांनी विड्या तोडणें, अंगावर लपविलेली सुपारी शोधून काढणें, अत्तर-गुलाब लावणें वगैरे सर्व प्रकार नेहमीच्या पद्धतीला धरून चालत असत. या चाली केवळ कर्नाटकांतच नव्हे तर महाराष्ट्रांतदेखील चालत असत. कदाचित महाराष्ट्रांतूनच त्या कर्नाटकांत गेल्या असतील. मी कॉलेजांत असतेवेळीं पुण्यांत माझ्या एका स्नेह्याचें लग्न झालें. हे माझे स्नेही कॉलेजांतच होते व त्यांचें घराणें अस्सल सुधारकांपैकी होतें. या लग्नांत मी हजर होतो. पण विडी तोडणें, घास घालणें वगैरे प्रकार अगदी मागासलेल्या कर्नाटक प्रांतांतील अगदी जुन्या पद्धतीच्या घराण्यांतील चालीपेक्षा किती तरी पटीने जास्त असल्याचें मला आढळून आलें. माझ्या मित्राचे

नों. दि.

सुधारक वडील, मातोश्री, बहिणीभाऊ, इतर सुधारक आप्त या प्रकाराचें मोठें कौतुक करीत असल्याचें पाहून मला आश्चर्य वाटलें. असो.

### माझा विवाह

माझ्या बहिणीच्या लग्नाच्या वेळीं माझें लग्न व्हावें अशी माझ्या वडिलांची इच्छा नव्हती. पण पुढे लवकरच, त्याच करगुप्पीकर घराण्यांतील एक शाखा बेळगावजवळ सांगली संस्थानांत काकती म्हणून एका गावीं राहात असे, त्या घराण्यांतील अजमासें दहाअकरा वर्षे वयाची एक मुलगी मला सांगून आली. ती माझ्या बहिणीच्या सासरकडील घराण्यांतील असल्याने तिकडील मंडळींचा आग्रह थोडा नेटाचा झाला. शिवाय माझे मेहुणे बंडोपंत यांना आईबाप नसल्याने हें जुळल्यास माझ्या बहिणीला सासर जास्ती सुखकर होईल अशीही एक कल्पना आमच्या वडील माणसांना आली. यापूर्वीही बऱ्याच मुली सांगून आल्या होत्या; पण इतक्यांत लग्न करावयाचें नाही असें आमच्या वडिलांनी स्पष्ट उत्तर दिलें होतें. पण या वेळेला वरील विचार पटला. आमच्या आजीबाईच्या मनांत तर हा सोहळा उरकून घ्यावा असें पक्केपणीं ठरलें होतें. त्यांतून आमच्या वडिलांनी मागितला तितका हुंडा देण्याला ती मंडळीं तयार झाली. माझे सासरे निवर्तले होते. घरांत माझ्या सासूबाईचा कारभार असे. त्यांचे मुलगे लहान होते, पण सावत्र मुलगा हा कर्तासवरता होता. सासूबाईचा आग्रह पाहून त्यांनी आमच्या पक्षाकडील सर्व अटी मान्य केल्या. नाव, नक्षत्र हीं सर्व जुळलीं. घराणें संभावित. मुलगी रूपाने साधारण बरी. घरांत बहिणीच्या लग्नाचे वेळचें बरेंच सामान शिल्लक होतें. इतकी सर्व अनुकूलता असल्यानंतर माझें लग्न झालें नसतें तरच आश्चर्य! माझें वय लहान असल्याकारणाने माझी संमती वगैरे घेण्याची आवश्यकताच नव्हती. शिवाय लग्न ठरवणें वगैरे कामें त्या वेळीं वडील माणसांचींच असत. मुलाला मुलगी दाखविण्याचा योगही क्वचितच यावयाचा. माझी संमती विचारली नाही ही गोष्ट वेगळी पण विचारली असती तर मीं नापसंती दाखविली असती हें तरी कशावरून? माझ्या बरोबरीच्या मुलांचीं लग्नें होत असतच. प्रौढ-विवाह ही कल्पना त्या वेळीं नव्हती म्हटलें तरी चालेल. मुलींचीं वयें नऊ-दहा वर्षांपेक्षा जास्ती बहुशः नसत. त्याचप्रमाणे मुलांचें लग्नाचें वय तेरा-चौदापेक्षा जास्ती नसे. वयाच्या मर्यादा ओलांडल्यास मुलांत किंवा मुलींत कांही तरी व्यंग असावें असा तर्क लोक करीत. निदान श्रीमंत किंवा मध्यम स्थितींतील घराण्यांत हीच चाल असे. आठ वर्षांची मुलगी झाली म्हणजे घरच्या मंडळींना एक हृद्रोग लागल्याप्रमाणे होई. मला निश्चित झालेली मुलगी मला दाखवण्यांत आली होती, ही सुधारणा कांही कमी नव्हती. मुलाची उंची व मुलीची उंची सुताने मोजून अंतर पाहण्याची रीत असे. माझ्या बाबतींत हा प्रयोग तर झालाच होता; पण मुलगी मला दाखवण्यास आणल्या वेळीं आम्हां दोघांनाही जोडीने उभें करून 'जोडा' कसा शोभतो, हें पाहण्याचाही प्रयोग झाला.

## *माझ्या लग्नांत मी रुसून बसलों*

माझ्या बहिणीच्या लग्नाप्रमाणे माझ्या लग्नांत थाटमाट विशेष नव्हता. मानपानाबद्दल खंडणीची नक्त रक्कमच ठरवण्यांत आली होती. त्यामुळे रासन्हाणें, पायघड्या, वगैरे विहिणीचे मानपान कांही झाले नाहीत. माझ्या आईचा मी एकुलता एक मुलगा; आणि या मुलाचें लग्न जुन्या पद्धतीप्रमाणे थाटांत व्हावें अशी माझ्या आईची इच्छा असावी. पण तिची हौस भागली नाही; त्यामुळे तिचा हिरमोड झाला असावा. वरपक्षाकडील पुरोहिताचा मान म्हणून हुंड्याच्या रकमेंतून शेकडा पाच टक्क्यांप्रमाणे वधूपक्षाने देण्याची चाल होती. पण या बाबतींतही जोशी, पुरोहित, उपाध्याय यांचे मानपान ज्यांचे त्यांनी पाहून घ्यावे अशा प्रकारचें लग्नाच्या यादींत एक कलम होतें. म्हणून त्या बिचाऱ्यांचीही निराशा झाली. शिष्टसंभावना म्हणून त्यांचा मान इतर भिक्षुकांपेक्षा जास्ती झाला. पण शेकडा पाच टक्क्यांच्या हिशेबाने तो कमीच पडला. यादींत नमूद केलेल्या अटींच्या बाहेर मांडवपरतण्याच्या दिवशीं कंठीकरिता मी रुसून बसलों व वधूच्या घरीं जेवावयाला मी वेळेवर गेलों नाही. कराराच्या बाहेर ही गोष्ट होत आहे याची जाणीव मला होत होती. म्हणून माझ्या मनांत हें रुसणें गैर आहे असें वाटत होतें. तथापि करार कांही असले तरी ते शेवटच्या दिवशीं खुद्द नवऱ्या मुलाला लागू नसतात, असा 'शास्त्रार्थ' मला सांगण्यांत आला. कित्येक मंडळींनी तर बायकोच्या घरचा आतापासूनच लळा लागत चालला अशी माझी थट्टाही केली. या सर्व गोष्टींना मला बळी पडावें लागलें. तिकडे तर भिक्षुक ब्राह्मण, इतर गृहस्थ, पानांवर आमची मार्गप्रतीक्षा करीत बसले होते. दुपारीं बारापासून सायंकाळीं चारपर्यंत कंठीबद्दल रुसवा चालला होता. शेवटीं एक आंगठी देऊं म्हणून निरोप आला. पण तेवढ्याने आमचा रुसवा जाईना. म्हणून नाइलाजाने मला सोडून पंगत जेवावयाला बसली व भोजनाला प्रारंभ झाल्याची सूचक 'हरहर महादेव'ची गर्जना आमच्या घरांतील मंडळींच्या कानांवर आली. त्यामुळे या करगुप्पीकरांना जावयाचीदेखील पर्वा नाही, यांच्या बरोबर शरीरसंबंध करणेंच गैर वगैरे अर्थाच्या टीका सुरू झाल्या. बाहेरच्या मंडळींचें जेवण आटपलें तरी घरची मंडळी जेवली नव्हती. घरच्या मंडळींनी मी जेवावयाला आल्याखेरीज जेवावयाचें नाही असा निश्चय केला होता. यामुळे आणि मला व आमच्या मंडळींना जेवावयाला बोलावण्याकरिता खुद्द माझे मेहुणे, भगिनीचे भ्रतार, यांनाच पाठवण्यांत आलें. त्यांनी आमच्या घरीं येऊन तळच दिला. या अस्त्रापुढे आमचे कांही चाललें नाही. तेव्हा मला जावें लागलें. तेथे गेल्यानंतर मला आंगठी देण्याची तयारी झाली; पण ती मीं घेतली नाही. या गोष्टीसंबंधाने सासुरवाडीबद्दल माझ्या मनांत पक्षपात उत्पन्न झाला अशी माझ्यावर टीका झालीच.

## वराचा पोशाख व अहेर

त्या वेळीं पुरुषांना अहेर वगैरे द्यावयाचें झाल्यास शेला व पागोटें हीं वस्त्रें जरुरीचीं समजलीं जात असत. हीं देऊन यांच्याबरोबर धोतरजोडे, उपरणीं, रुमाल, पटके इत्यादि द्यावयाचीं असा परिपाठ असे. इतर वस्त्रांच्या मानाने शेलापागोट्याची किंमत कमी असे. पण शेलापागोटें हें शिष्टाचारांत आवश्यक असे. त्याचप्रमाणे वराचा पोशाख जुन्या चालीचा असे. बारावंदी बंडी, त्यावर आंगरखा, पागोटें, शेला, पायांत जोडा, नेसावयाला नवीन काठाचा धोतरजोडा याप्रमाणे वराचा पोशाख असे. शर्ट, कोट यांचा प्रचार जरी सुरू होता तरी लग्नासारख्या मंगल प्रसंगीं त्यांचा प्रवेश नव्हता. लग्नाच्या वेळीं बोहल्यावर जातांना धोतराशिवाय अंगावरील कपडे उतरून ठेवावे लागतात. प्रथम आंगरखा, नंतर बंडी याप्रमाणे काढून झाल्यानंतर डोकीवरील पागोटें काढण्यास सांगत. डोकीवरील पागोटें प्रथम काढणें अशुभ समजत. पैरण किंवा शर्ट घालण्याची पद्धती नसण्याला हें एक कारण होतें. कारण शर्ट किंवा पैरण असल्यास डोकीवर पागोटें असतांना तीं काढणें शक्य नसतें; आणि पागोटें तर आधी काढावयाचें नाही. म्हणून बारावंदीची योजना करण्यांत येत असे. अलीकडे वराच्या या पोषाखांत बराच बदल झाला आहे. कोट, फेटा, रुमाल, उपरणें हीं सर्रास चालतात. अद्यापि पाटलोणींत झालेलें लग्न माझ्या पाहण्यांत नाही. पण रजिस्टर्ड लग्नें हॅट-बूट-पाटलोणींत होत असतीलच.

लग्नसंस्काराचे सर्व मंत्र संस्कृतांतच असल्याने त्याचें ज्ञान वधूला आणि वराला प्रायः नसतेंच. निदान आमच्या लग्नाच्या वेळीं तरी त्या मंत्रांत काय होतें याची कल्पना नव्हती. पुरोहिताच्या आज्ञेप्रमाणे उठा, बसा, नमस्कार करा, पाणी सोडा, आचमन करा इत्यादि समजणाऱ्या शब्दांवर हुकूमकवायत करण्यापलीकडे समजून कांहीच केलें जात नसे. अक्षता टाकण्याचे वेळीं मात्र वधूवरांवर आलेल्या मंडळींकडून अक्षतांचा मारा होत असतो. तो सहन करावा लागतो. वधूने वराच्या डोकीवर व वराने वधूच्या डोकीवर अक्षता टाकण्याची पद्धत आहे. वधूच्या अक्षता वराच्या डोकीवर प्रथम पडल्यास पुढे आयुष्यांत वधूचाच वरचष्मा राहतो, म्हणून प्रथमपासूनच वधूवर अक्षता टाकण्याची मला सूचना देण्यांत आली असावी. पण माझ्या डोक्यावर आधी वधूच्या अक्षता पडल्या. तथापि पुढे केव्हाही माझ्यावर माझ्या कुटुंबाचा वरचष्मा, तसें व्हावें अशी माझी इच्छा कांही कालपर्यंत असूनही, झाला नाही.

पहिल्या वर्षी आषाढपाटी, श्रावणपाटी वगैरे समारंभ यथासांग झाले.

दिवाळसणाला मी सासुरवाडीला गेलों नाही. पण माझ्या मेहुण्यांना मात्र आमच्या घरीं आणलें होतें. माझे मेहुणे वयाने जवळजवळ माझ्या बरोबरीचे. आमचें शिक्षणही जवळजवळ सारखेंच. माझ्या बहिणीचें लग्न झाल्यापासूनच त्यांचा व माझा स्नेह जुळत चालला होता. त्यांच्या वडील भावाचें व त्यांचें फारसें जुळत नसे; आणि त्यांच्या घरीं

त्यांच्या प्रेमाचें दुसरें कोणी नसल्याने माझ्याबरोबरच त्यांचा स्नेह विशेष असे. दिवाळसणांत त्यांचें राहणें आमच्या घरीं चारपाच दिवस झालें. या अवधींत त्यांचें व माझें बरेंच बोलणेंचालणें झालें व जास्ती निकट संबंध आला. स्वभावाने ते फारच प्रेमळ व सरळ असल्याकारणाने व माझ्यापेक्षा बुद्धीने ते जास्ती असल्याने त्यांची माझ्यावर बरीच छाप बसली. त्यांचा व आमचा आप्तपणा नसता आणि माझा व त्यांचा संबंध आला असता तरी त्यांचा व माझा जिव्हाळ्याचा स्नेह जमला असता असें वाटतें. माझ्या स्वभावांत सरळपणा किंवा प्रेमळपणा जो कांही असेल त्याबद्दलचें बरेंच श्रेय माझ्या मेहुण्यांच्या वागणुकीला दिलें पाहिजे. माझ्या व माझ्या बहिणीच्या दुर्दैवानें त्यांना अकालीं मृत्यू आला. हा एक माझ्या आयुष्यांतील पहिला जबरदस्त धक्का मला बसला. याबद्दलची हकीकत प्रसंगानुसार येईलच.

### *सामाजिक रूढी व नैतिक बंधनें*

लग्नाच्या वेळीं माझें वय जरी लहान होतें तरी लग्नांतील मुख्य हेतूबद्दल मला अज्ञान होतें अशांतला प्रकार नव्हता. बेळगावच्या शिष्ट अशा मानलेल्या समाजांतदेखील ज्यांना नैतिक बंधनें असें समजण्यांत येतें तीं कशा प्रकारचीं होतीं, याचें वर्णन वर थोडक्यांत आलेंच आहे. अशा वातावरणांत वाढलेल्या तरुण मुलांवर कांही परिणाम होणें अपरिहार्य आहे. तथापि आताच्याप्रमाणे त्या वेळीं नाटकें, कादंबऱ्या वाचणें वगैरे प्रकार मुलांमध्ये प्रचलित नव्हते. हल्लीप्रमाणे सिनेमा वगैरे तर नव्हतेच. नैतिक बंधनांत पुरुषासंबंधाने शिथिलता होती तरी नैतिक बंधन हें गृहशिक्षणांत बरेंच महत्त्वाचें समजलें जात होतें. हल्लीच्याप्रमाणे First love, Companion marriage, विवाहोत्तर प्रेम, प्रेमोत्तर विवाह, संततिनियमन इत्यादि शब्द कोणाच्या स्वप्नांतदेखील नव्हते. या शब्दांनी सूचित होणाऱ्या गोष्टींबद्दल निषेध प्रदर्शित करण्याचा माझा हेतू नाही. या बाबतींत कोणत्या प्रकारची स्थिती होती याचा उल्लेख करण्याचाच माझा हेतू आहे. शाळेंत माझ्या बरोबरीच्या बहुतेक मुलांचीं लग्नें झालीं असल्याने माझ्या लग्नाबद्दल माझ्या मित्रांना विशेष कांही वाटण्याचें कारणच नव्हतें.

### *जुन्या पद्धतीचें कुटुंब*

मुलीचें लग्न झाल्यानंतर तिला सासरीं आणण्याची वहिवाट आहेच. त्याप्रमाणे माझ्या बायकोलाही आमच्या घरीं आणण्यांत आलें. आमचें घर अगदी जुन्या पद्धतीचें. आमचा प्रांत कर्नाटकही मागासलेला. त्यामुळे पुण्यामुंबईकडील चालीरीतींपेक्षा आमच्याकडील चालीरीती अगदी जुन्या वळणावरच्या. माझे वडील १९१२ सालीं वारले तोपर्यंत माझे वडील व मातोश्री बोलत बसलेलीं माझ्या पाहण्यांतच आलीं नव्हतीं. घरच्या स्वयंपाकाच्या व्यवस्थेखेरीज इतर प्रपंचाच्या कामांत माझ्या आईने वडिलांच्या हयातींत कधीच भाग घेतला नाही. घरांत कांही पाहिजे

झाल्यास कारकुनांना किंवा गड्यांना किंवा माझ्या बहिणीला सांगावयाचें आणि मग ही गोष्ट वडिलांच्या कानावर जावयाची व त्याबद्दलची व्यवस्था व्हावयाची, अशी पद्धत असे. माझे आजोबा वडिलांच्या लहानपणींच वारल्यामुळे सर्व जबाबदारी आजीबाईवरच पडली. त्यामुळे त्या बऱ्याच स्वतंत्र रीतीने वागत असत. वडील वकिलीचा धंदा करूं लागल्यानंतरदेखील हुद्‌लीकडील जमीनजुमल्याची सर्व व्यवस्था त्या कारकुनांच्या मार्फत स्वतःच करीत. जमिनींची लागण करणें, वसूल करणें हीं कामें त्या स्वतः आपल्या देखरेखीखाली करवीत असत. वसुलीपैकी बहुतेक भाग त्यांच्याचकडे असे. वडिलांना पैशाची जरुरी लागल्यास आजीबाईकडून वसुलीच्या रकमेंतून कांही मिळत असे; पण त्याबद्दल वडिलांना फार श्रम करावे लागत असत. वडिलांच्या वकिलींतील मिळकतीवर आजीबाईची नजर असे. अशा स्वतंत्र वृत्तीने त्या वागत असल्याने वडिलांचें त्यांच्यापुढे फारसें चालत नसे. यावरून माझ्या आईबरोबर त्यांची वागणूक कशी होती याची कल्पना सहजच होईल. माझ्या मातोश्री या १९२९ मध्ये वारल्या. तोपर्यंत, म्हणजे वडील-आजीबाईच्या पश्चातदेखील, घरांत मोठ्याने त्या बोलल्या असे प्रसंग क्वचितच आले असतील. या सर्वांचा परिणाम माझ्या कुटुंबावर व माझ्यावर होणें अगदी स्वाभाविक होतें. अशा प्रकारची वडील माणसांची मर्यादा राखणें हें पवित्र कर्तव्य अशी आमच्या मनाची समजूत झाली होती. माझे वडील, आई, आजीबाई हीं माझ्या बायकोवर फारच प्रेम करीत असत. वडील तर तिला 'बुद्धिवंती' म्हणून लहानपणीं हाक मारीत असत. इतके लाड जरी होत होते तरी तिने माझ्या मातोश्रींचेंच अनुकरण केलें आणि १९१४ सालापर्यंत म्हणजे मरेपर्यंत तिने हें व्रत कायम ठेवलें होतें. त्याचे परिणाम माझ्यावर पुढे बरेच अनिष्ट झाले. याबद्दलची हकीकत पुढे येईलच.

माझ्या बहिणीचें सासर आमच्या घराजवळच असल्याकारणाने ती सासरीं राहावयाला गेल्यानंतरदेखील वरचेवर आमच्या घरीं येत असे. माझ्या मेहुण्याचा आमच्याकडे ओढा जास्ती होऊं लागल्यामुळे तिच्या येण्याजाण्याला फारशी अडचण येत नसे. शिवाय तिच्या सासरचीं माणसें मुंबईस बरेच दिवस असल्याने त्यांच्या घरीं बरीच स्वतंत्रताही असे. गर्भाधानविधी होईपर्यंत आमच्या घरीं अशीच स्थिती होती. तोपर्यंत लग्नाच्या पूर्वीच्या माझ्या स्थितींत व नंतरच्या स्थितींत फारसा बदल झालेला नव्हता. फक्त माझें लग्न झाल्याची मात्र जाणीव होती इतकेंच.

### *मीं पाहिलेली पहिली कॉंग्रेस*

१८८८ सालीं मी मॅट्रिक परीक्षेला बसलों. अभ्यास सर्वसाधारणच झाला होता. परीक्षेंत नापास होणार हें भविष्य ठरल्याप्रमाणेच होतें. तथापि नापास होणार याची मला लाज मात्र फार वाटत होती. परीक्षेचा निकाल जाहीर रीतीने लागण्यापूर्वीच कांही खटपटी करून युनिव्हर्सिटी रजिस्ट्रार पितळे यांचे-मार्फत माझ्या बाबतींत माहिती आणवली होती. अर्थात ती माहिती माझ्या अटकळीला

अनुसरूनच होती. खटपटीने परीक्षेंत माझें पास होणें शक्य असतें तर माझ्या वडिलांनी तशी खटपट केली असती असें मला त्यांच्या एकंदर हालचालींवरून दिसलें. परीक्षेंत यश येत नाही म्हणून माझ्या मनाला फार लागलें असें त्यांना आढळून आल्यानंतर माझें लक्ष दुसरीकडे लागावें म्हणून आपल्याबरोबर अलाहाबाद कॉंग्रेसला मला नेण्याचें त्यांनी ठरवलें. हें मला समजल्यानंतर माझें दुःख हलकें झालें व अलाहाबादला जाण्याच्या विचाराने मला समाधान वाटूं लागलें. माझ्या नापास होण्याने वडिलांना कांही विशेष विषाद झाला नाही हें पाहूनही मला बरें वाटलें.

कॉंग्रेसबद्दल यापूर्वी मला माहिती नव्हती. पहिल्या दोन कॉंग्रेसना बेळगावाहून कोणी गेल्याचें मला स्मरत नाही. गेले असतील तर भाऊसाहेब भाटे एकटेच गेले असतील. याच संधीला बेळगावास वकिली करण्याकरिता एलएल. बी. पास झालेले दोन गृहस्थ आले होते. ते म्हणजे विष्णू रघुनाथ नातू व केशव रघुनाथ आजरेकर. त्यांपैकी नातू हे बेळगावच्या हायस्कुलांतील संस्कृतचे शिक्षक रामभाऊ नातू यांचे धाकटे बंधू. नातूंचें घराणें कोकणांतील असून मुळांत अगदी गरिबीचें होतें. रामभाऊ नातू विद्यार्थी असतांना त्यांची हुषारी पाहून तेथील सरकारी वकील महेश्वरपंत गाडगीळ यांनी आपली मुलगी त्यांना दिली होती. मुलाच्या सांपत्तिक स्थितीकडे न पाहतां फक्त त्याच्या हुषारीकडे पाहून श्रीमंत मनुष्याने आपली मुलगी दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण त्या वेळीं होतें. त्यामुळे सर्वांच्या तोंडीं हा एक विषयच होऊन बसला होता; आणि कोकणस्थ लोक मोठे धाडसी, त्यांना आपल्या मुलांबाळांबद्दल दयामाया असावी तितकी नसते, वगैरे गोष्टी आम्हां देशस्थांच्या घरांत चालत. विष्णुपंत नातू यांचा अभ्यासही बेळगावासच झाला होता. ते विद्यार्थी असतांनाच आमच्या वडिलांना इंग्रजी शिकवीत असत, असें मला ऐकून माहीत होतें. माझ्या वडिलांचा व नातूंचा स्नेह बराच होता. वकिलींतही नातूंनी बराच लौकिक मिळवला. मराठी भाषेवर त्यांचें प्रेम असे. 'रशिया', 'महादजी शिंदे यांचें चरित्र' हीं पुस्तकें त्यांनी मराठींत लिहिलीं आहेत. जुन्या कायदेकौन्सिलचे ते दक्षिणभागातर्फे सभासदही होते. लो. टिळकांची त्यांना माहिती असून ते लोकमान्यांचे अभिमानी असत. साधारणपणें बेळगावास सार्वजनिक कामाला त्यांच्यापासूनच प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाही.

आजरेकर हे फार हुषार म्हणून प्रसिद्ध होते. ते आपल्या एलफिन्स्टन कॉलेजांतील सर्व परीक्षा पहिल्या वर्गात पास झाल्याचें आम्ही ऐकत होतों. ते एलफिन्स्टन कॉलेज-मध्ये फेलो असून कांही दिवस सुपरिंटेंडेंटही होते. गणित विषयांत ते चांगले प्रवीण आहेत. त्यांनी उत्तम प्रकारें आपली वकिली केली व गाडगिळांनंतर तेच सरकारी वकील पुष्कळ दिवसपर्यंत होते. सार्वजनिक कामाचा बोजा त्यांनी फारसा आपल्या अंगावर घेतला नाही. तरी द्रव्यद्वारा ते प्रत्येक उपयोगी कामाला सढळपणें मदत करीत. हल्ली ते वकिलीच्या कामापासून निवृत्त झाले असून वेदांतासारख्या विषयाच्या अभ्यासांत काळ घालवीत असतात. त्यांना स्वतःला मूलबाळ कांही नाही. तथापि

आपल्या आप्त-इष्टांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था त्यांनी फार उत्तम रीतीने केली. त्यांचे एक बंधू विजापुरास प्रसिद्ध आहेत. एक पुतणे प्रो. श्रीपाद आजरेकर हे आहेत. दुसरे बार्शी-लाइट रेल्वेवर मोठ्या अधिकाराच्या जागेवर आहेत. तिसरे एक डॉक्टर आहेत.

### घरीं चालत असलेली चर्चा

या नवीन मंडळींच्या मनांतून कॉंग्रेसला जावयाचें आलें. त्यांच्याबरोबर बऱ्याच जुन्या मंडळींनी जाण्याचें ठरविलें. आमच्या बेळगावांत 'बेळगाव-समाचार' या नावाचें एक मराठी साप्ताहिक हल्ली आहे. त्या वेळींही तें हल्लीच्याच स्थितींत होतें. स्थानिक बातम्या, हवामान, सरकारी अंमलदारांच्या बदल्या, ते फिरतीवर असले म्हणजे त्यांचे मुक्काम व कांही वर्तमानसार वगैरे देण्यापेक्षा जास्ती भानगडींत हें पत्र पडत नसे. वर्तमानपत्राच्या वर्गणीपेक्षा जाहिराती, नवराबायकोंच्या नोटिसा वगैरे उत्पन्नावरच या पत्राचें जीवित अवलंबून असावें. बेळगाव-समाचार हाच छापखाना त्या वेळीं प्रसिद्ध होता. रामतत्त्वप्रकाश छापखाना त्या वेळीं भरभराटींत नव्हता. 'इंदुप्रकाश' पुष्कळ दिवस येत असे. तो केव्हाकेव्हा मी वाचीत असें. त्यामुळे सार्वजनिक गोष्टींबद्दल कांही तुरळक माहिती मला असे. पुण्याच्या सार्वजनिक सभेतर्फे गोपाळराव देशपांडे इंदापूरकर म्हणून एक गृहस्थ माझ्या लहानपणीं व्याख्यानें देण्याकरिता आले होते. त्यांचीं व्याख्यानें मारुतीच्या देवालयांत झालीं होतीं. व्याख्यानाचे वेळीं ते भगवा पोशाख करीत असत. त्यांच्या शरिराचा बांधा उंच असून ते भव्य दिसत असत. बोलण्याची शैलीही बरी होती. स्वदेशीवर त्यांचीं एकदोन भाषणें मीं ऐकलीं होतीं. कोल्हापूरचे दिवाण रा. ब. माधवराव बर्वे यांनी पुण्याच्या कांही देशाभिमानी गृहस्थांवर फौजदारी खटले केले आहेत, या गोष्टीची चर्चा आमच्या घरीं होत असे. संकेश्वरचे आमचे एक आप्त आमच्या घरीं येत असत. ते माधवराव बर्व्यांच्या चिरंजिवांचे सहाध्यायी होते. ते बोलण्यांत बर्व्यांची बाजू घेत. आमचे वडील पुणेकर देशभक्तांची बाजू घेत. हे देशभक्त म्हणजे लोकमान्य टिळक व आगरकर हें सांगण्याची आवश्यकता नाही. हा वादविवाद मी लक्षपूर्वक ऐकत असें व कोल्हापूरकर महाराजांच्या वतीने इंग्रज सरकाराविरुद्ध हे पुणेकर लढत आहेत, इतकी कल्पना मला होती.

सातारा-पुण्याकडे प्रसिद्धीस आलेले वासुदेव बळवंत फडके हे 'कमीसरीएट' खात्यांत कांही दिवस नोकर होते. कांही लोकांना त्यांची माहिती होती. स्वातंत्र्याच्या लालसेने अत्यंत धाडस करून कांही शस्त्रें वगैरे त्यांनी जमवलीं होतीं व हरी रामोशी याच्या मदतीने इंग्रजांबरोबर त्यांनी लढण्याची तयारी केली होती. या गोष्टीही माझ्या कानावर आल्या होत्या. या गोष्टींत अतिशयोक्तीचा भाग बराच होता, असें पुढे मोठेपणीं समजून आलें. पण त्यांच्या धाडसाबद्दल व स्वातंत्र्याच्या तळमळीबद्दल लहानपणा-पासूनच मला आनंद वाटत असे.

## नरगुंदकर भावे व कित्तूर चिन्नम्मा

१८५७ सालीं स्वातंत्र्याबद्दल जो प्रयत्न झाला त्याबद्दलच्या गोष्टीही वडील माणसें सांगत असत. त्या ऐकण्याची हौस वाटे. कर्नाटकांत नरगुंदकर भावे हे एक संस्थानिक होते. या घराण्यांतील शेवटचे गृहस्थ बाबासाहेब यांनी बंडांत कांही धामधूम केली होती. कर्नल मॅनसन नावाच्या एका लष्करी अमलदाराला मारून त्याचें मुंडकें नरगुंदच्या वेशीवर त्यांनी टांगलें होतें असें ऐकलें होतें. त्याबद्दल इंग्रजांनी त्यांच्याबरोबर लढाई करून, त्यांना जिवंत पकडून, बेळगावास 'तांबड्या माळा'वर तोफेच्या तोंडीं देऊन किंवा फाशी देऊन त्यांना प्रायश्चित्त दिलें आणि त्यांचें संस्थान खालसा करण्यांत आलें. त्यांना पाहिलेलीं माणसें होतीं. त्यांच्या तोंडून बंडाच्या गोष्टी आम्ही ऐकत होतों. बाबासाहेब नरगुंदकरांवर कानडी भाषेंत लावण्या, पोवाडे वगैरे आहेत व तिकडील गोंधळी ते त्या वेळीं म्हणत असत. त्यांत, बाबासाहेब फार शूर होते व त्यांनी इंग्रजाबरोबर मोठ्या निकराने लढाई केली, पण त्यांच्या पदरच्या कांही लोकांनी फितुरी केल्यामुळे त्यांना हार खावी लागली, त्यांना पकडल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांनी इंग्रजांच्या हातांत सापडूं नये म्हणून जीव दिला व तेथीलच एका पदरच्या माणसाने त्यांच्या प्रेतांचें गुप्तपणें दहन केलें, वगैरे गोष्टींचें मोठें रसभरित वर्णन असे आणि म्हणणारे गोंधळी वगैरे अगदी मोठ्या आवेशाने म्हणत असत. माझ्या लहानपणीं गोंधळ्यांकडून ही लावणी मी मुद्दाम म्हणवून घेत असें व त्याबद्दल गोंधळ्यांना आणा-अर्धा-आणा देत असें. ज्या तांबड्या माळावर नरगुंदकरांना फाशी दिलें त्याच माळावर आम्ही हायस्कुलांत असतेवेळीं आट्यापाट्या खेळावयाला जात होतों. त्या वेळीं या गोष्टीची आठवण होऊन त्या माळाबद्दल एक प्रकारचा मला पवित्रपणा वाटत होता. हल्ली त्या माळावर सरकारी गवताच्या गंजी आहेत. आमच्या गावीं जत्रा वगैरे झाल्यास किंवा शिमग्यासारख्या सणांत लावण्या म्हणणाऱ्या लोकांना आणवण्याची पद्धती आहे. त्या प्रसंगीं नरगुंदकरांवरील लावण्या त्यांच्याकडून ऐकण्याची मला हौस असे. त्याचप्रमाणे बेळगाव जिल्ह्यांत कित्तूर गावचे देसाई पुंड म्हणून प्रसिद्ध होते. दत्तकाबद्दलची अडचण त्यांच्या घराण्यांतही उत्पन्न झाल्यामुळे त्या घराण्यापैकी चिन्नम्मा नावाच्या एका शूर बाईने इंग्रजांविरुद्ध शस्त्र उचललें होतें. या बाईवर केलेल्या लावण्याही आमच्या प्रांतांत प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. त्या ऐकण्याचीही मला आवड असे. अलीकडे दहा वर्षांत या कित्तूर गावीं व्याख्यानें वगैरे देण्याकरिता मला जाण्याचे अनेक प्रसंग आले. ज्या ज्या वेळीं मी त्या गावीं जातों त्या त्या वेळीं चिन्नम्माचें स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. या चिन्नम्माच्या चरित्राला अनुलक्षून कानडींत एक नाटकही प्रसिद्ध आहे व तें फारच लोकप्रिय झालें होतें. गेल्या १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळींत कित्तूर गावच्या लोकांनी प्रामुख्याने भाग घेतला होता, आणि साधारणपणें कित्तूर गावच्या आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतील लिंगायत लोकांमध्ये राष्ट्रीय

जागृतीचें बी बरेंच रुजत चाललें होतें, याला हें नाटक कारण असावें, असा सरकारला संशय येऊन त्याचे प्रयोग बंद करण्यांत आले आहेत. माझ्या लहानपणीं या बाईवरचीं गाणीं बरींच म्हटलीं जात असत.

## *संगोळी रायण्णा*

त्याचप्रमाणे बेळगाव जिल्ह्यांतील संपगाव तालुक्यापैकी संगोळी या गावचा एक सनदी नोकर रायण्णा या नावाचा होता. सनदी नोकराचें काम गावच्या पाटील-कुलकर्ण्याच्या हाताखाली गावासंबंधाने नोकरी करणें हें आहे. या नोकरीबद्दल त्यांना जमिनी इनाम आहेत. संगोळी गावच्या कुलकर्ण्याने रायण्णाला एक दिवस आपला जोडा पुसण्याला सांगितलें. त्याने स्वाभिमानाने हें काम करण्याचें नाकारलें. त्यामुळे त्याची व कुलकर्ण्याची बोलाचाली होऊन त्याने कुलकर्ण्याला तरवारीने ठार मारलें. या अपराधाबद्दल अर्थात सरकारकडून त्याला पकडण्याकरिता वारंट सुटलें. तेव्हा तो फरारी झाला व सरकारी अधिकाऱ्यांना त्रास देऊन त्याने पुंडाई चालवली. संपगाव हा तालुक्याचा गाव असल्याने तेथे मामलेदार कचेरी होती. ती कचेरी रायण्णाने भर दिवसा जाळली व तेथील खजिना लुटला असें सांगतात. त्याला पकडण्याकरिता पुष्कळ प्रयत्न केले, पण तो लवकर हातीं लागेना. हें पाहून सरकारने फंदफितुरीचे प्रयत्न चालविले. या प्रयत्नांत त्याच तालुक्यांतील नेगनहाळ गावच्या पाटलांनी फार मदत केली व त्याला पकडून दिलें म्हणून त्यांना तो गाव इनाम देण्यांत आला आहे. हल्लीदेखील तो गाव पाटलांच्या घराण्याकडे इनाम नात्याने चालत आहे. रायण्णाला त्याच्या अपराधाबद्दल प्राणाला मुकावें लागलें. तथापि त्या तालुक्यांत त्याच्याबद्दल बराच आदर अजूनही आहे. त्याच्यावरही कानडींत लावण्या आहेत. त्या अद्यापि म्हणण्यांत येतात. त्याही ऐकण्याची मला हौस होती.

या सनदी नोकरांच्या नोकऱ्या कमी करून त्यांच्या जमिनी खालसा कराव्या व त्या लिलावाने विकाव्या म्हणून दोनतीन वर्षांपूर्वी सरकारकडून प्रयत्न करण्यांत आला होता. त्या वेळीं त्याचा प्रतिकार करण्याची सनदी लोकांनी बरीच खटपट केली. मोठमोठ्या सभा भरत असत. या सभेच्या प्रसंगीं आमच्या जिल्ह्यांत रायण्णावरच्या गाण्यांनी आरंभ होत असे. मीही या सभांतून भाषणें करीत असें. त्या वेळीं रायण्णा, चिन्नम्मा वगैरे शूर माणसांचा उल्लेख मी करीत असें. या गाण्यांनी व भाषणांनी सनदी लोकांत खूप उत्साह उत्पन्न होत असे. सरकारला आपल्या धोरणाचा अन्यायीपणा दिसून आल्यामुळे म्हणा किंवा लोकांचा दृढ निश्चय व त्यांच्याबद्दल इतर लोकांना वाटत असलेली सहानुभूती पाहून म्हणा, सरकारने हा प्रयत्न सोडून दिला. जमिनी पूर्वीप्रमाणे ज्यांच्या त्यांच्याकडे राहिल्या व हें प्रकरण त्या वेळीं मिटलें. जर सरकारने या प्रयत्नाची कड पोचवली असती तर जमिनी लिलावांत घेणारे मिळाले असते किंवा नाही याबद्दल बरीच शंका आहे; आणि कोणी जरी लिलावांत घेणारे सरकारी दडपणामुळे अगर लोभामुळे

पुढे आले असते तरी सुरळीतपणें या जमिनींचा भोगवटा त्यांना मिळाला असता असें वाटत नाही. असो.

### पेशवाई बुडाल्याबद्दलचें सुतक !

माझ्या लहानपणीं आणखी एक गोष्ट माझ्या कानावर आली होती. ती म्हणजे पेशवाई बुडाल्यानंतर सुतकांत असल्याप्रमाणे पुष्कळ लोक गंध लावीत नसत व डोकीला पागोटें घालीत नसत. पेशवाईनंतर पुण्यापासून बेळगावावरून बंगळूरपर्यंत सडक बांधण्यांत आली. निपाणीकडच्या बाजूला एक गृहस्थ होते. त्यांनी या सडकेवरून कधी प्रवास केला नाही असें सांगत असत. ते गृहस्थ सडकेच्या बाजूने घोड्यावरून जात असत व सडक ओलांडून एखाद्या ठिकाणीं जाण्याचा प्रसंग आल्यास एखाद्या पुलापर्यंत जाऊन पुलाखालून त्याच्या दुसऱ्या बाजूला जावयाचें असा त्यांचा प्रघात होता असें ऐकलें होतें. ही हकीकत खरी असो किंवा नसो, ती ऐकून त्या गृहस्थांबद्दल कौतुक वाटत असे. मद्रास काँग्रेसच्या वेळीं या अशा गोष्टी व दंतकथा, शाळेंतील इतिहासावरून साधारण माहिती, आणि 'इंदुप्रकाश', 'बेळगाव-समाचार' यांसारख्या पत्रांतील बातम्या यावरूनच देशाबद्दलचें माझें ज्ञान होतें असें म्हणावयाला हरकत नाही. काँग्रेसला जाण्याचें ठरल्यानंतर काँग्रेस म्हणजे काय याबद्दल माहिती घेतली. त्या वेळीं ह्यूमसाहेब म्हणून कोणी एक मोठे सरकारी अधिकारी होते व त्यांनी आमच्या लोकांचीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानावर घालण्याकरिता ही एक वार्षिक सभा भरवण्याचा उपक्रम केला आहे इतकीच माहिती मिळाली. 'केसरी' पत्राचा फारसा प्रसार आमच्या प्रांतीं त्या वेळीं नव्हता. निदान मला तरी त्या पत्राचा परिचय नव्हता. मद्रासला जाण्याकरिता निघण्याचा दिवस कधी उजाडतो याकडे माझें सारें लक्ष लागलें होतें. काँग्रेसला डेलिगेट म्हणून पंचवीस-तीस लोकांची यादी करण्यांत आली होती. बहुतेक वकील व कांही सुखवस्तू गृहस्थ होते. चारपाच मुसलमानही त्यांत होते. आमच्या वडिलांचा स्नेह मुसलमानांबरोबर त्या वेळीं बराच होता व त्यांचे मुसल्मान पक्षकारही होते. म्हणून त्यांच्या खटपटीने चारपाच मुसलमान मद्रासला डेलिगेट म्हणून यावयाला तयार झाले. त्या काँग्रेसचे अध्यक्ष कै. बद्रुद्दिन तय्यबजी हे असल्यामुळे त्यांनाही काँग्रेस ही आपलीच आहे असें वाटणें साहजिक होतें. मला 'delegate' हा शब्द त्याच वेळीं प्रथम कळून आला. मी कांही दिवस 'delegate' असें न म्हणतां 'dedicate' असें म्हणत होतों. देशकार्याला ज्यांनी आपल्याला वाहून घेतलें ते 'dedicate' असा अर्थ मी करीत होतों ! पण लवकरच ही चूक माझ्या ध्यानांत आली.

### सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचें वक्तृत्व

मद्रासला निघण्याचा दिवस आला. मीं एक टाइमटेबल विकत घेतलें. बल्लारी-गुंटकल मार्गाने जाण्याचा बेत ठरला होता. त्याप्रमाणे

पहिला आमचा मुक्काम होसपेठला झाला. येथून जवळच असलेलें हंपी अथवा विजयनगर पाहण्याकरिता आम्ही गेलों होतों. विष्णुपंत नातूंना इतिहासाचा व्यासंग होता. हंपी येथील विरूपाक्षाचें भव्य देवालय, गोपूर, विजयविठ्ठलचें सुंदर मंदिर व इतर जुन्या इमारती पाहून त्यांनी विजयनगरचा इतिहास थोडक्यांत सांगितला. त्यामुळे तीं प्राचीन हिंदू वैभवाचीं अवशिष्ट चिन्हें पाहून एक प्रकारचा अभिमान वाटला. त्याचप्रमाणे तालीकोटच्या लढाईनंतर मुसलमानांनी या राजधानींत प्रवेश केल्यानंतर देवालयें व त्यांतील मूर्ती वगैरे फोडून जो उच्छेद केला व ज्याचीं चिन्हें स्पष्ट आतादेखील दिसतात तीं पाहून एक प्रकारचा त्वेषही आला. 'गंगास्नान व तुंगापान' अशा प्रकारचें एक वर्णन ऐकण्यांत होतें म्हणून विजयनगरजवळ वाहात असलेल्या तुंगा (तुंगभद्रा) नदीच्या तीरावर बसून यथेच्छ फराळ केला. श्रीरामायणांत वर्णिलेलीं ऋष्यमूक पर्वत, अंजनी पर्वत, मारुतीचें जन्मस्थान, पंपा सरोवर वगैरे पौराणिक स्थळेंही पाहिलीं. तीं सर्व स्थळें पाहून त्या स्थानांबद्दल पूज्यभाव उत्पन्न झाला व पुन्हा एकदा सवडीने हीं स्थळें पाहण्याकरिता यावें असें माझ्या मनाने घेतलें. त्या वेळीं मोटारी नव्हत्याच. पण होसपेठपासून टांगेही नव्हते. त्यामुळे आम्हांला बैलांच्या व रेड्यांच्या गाड्यांतून होसपेटपासून हंपीपर्यंत जावें लागलें. लोकांची भाषा कानडीच असल्यामुळे गाडीवाल्यांनीही आम्हांला प्रेक्षणीय स्थळांची माहिती दिली. तुंगभद्रेच्या पात्राच्या सपाटीपेक्षा विरूपाक्षेश्वराच्या देवालयाची सपाटी (level) किती तरी उंचीवर आहे. तथापि नदीचा एक कालवा देवालयाच्या आवारांतून जातो. हें पाहून पाणी कसें चढवलें असावें याबद्दल मला आश्चर्य वाटलें. देवालयाच्यापेक्षा जास्ती उंचीच्या सपाटीवरून लांबून हा कालवा आणला आहे असें मला सांगण्यांत आलें. पण मला तें बरोबर समजेना. म्हणून कालवा काढलेल्या ठिकाणीं जाऊन यावें असें वाटलें. पण वेळेच्या अभावीं तिकडे जाणें झालें नाही. होसपेठला जातांना हैदराबादच्या सालरजंगाच्या जहागिरींतील कांही भाग लागतो. त्या भागालाच कोप्पळ हा गाव आहे. कोप्पळ स्टेशन आहे. तेथून कोप्पळचा प्रसिद्ध बहाद्दर बंडा किल्ला एका टेकडीवर दिसतो. धारवाड जिल्ह्यापैकी मुंडरगी येथील भीमराव नावाच्या एका गृहस्थाने १८५७ सालीं बंड करून हा किल्ला लढविला होता असें सांगतात. बल्लारीपर्यंत कानडी भाषा प्रचारांत आहे. पण पुढे तेलगू भाषेचा प्रचार आहे.

मद्रासला सकाळीं पोचलों. समुद्रांत कांही वादळ वगैरे झाल्यामुळे बंगालचे कांही लोक येऊन पोचले नव्हते. बाकी प्रांतांतील लोक आले होते. कॉंग्रेससंबंधाने विशेष स्मरण राहिलें नसलें तरी स्वागतकमिटीचे अध्यक्ष राजा सर टी. माधवराव, अध्यक्ष बद्रुद्दिन तय्यबजी, बॅरिस्टर नॉर्टन, सुरेंद्रनाथ बानर्जी, चंदावरकर यांचे चेहरे लक्षांत राहिले. सर टी. माधवरावांखेरीज वरील इतर मंडळींना पाहण्याचे प्रसंग पुढे अनेक आले. सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या वक्तृत्वाचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. हत्यारांच्या कायद्यावर त्यांचें भाषण फारच कळकळीचें झालें व तें

चंदावरकर यांच्या भाषणाला उत्तर होतें. एकंदर कॉंग्रेसची व्यवस्था पाहून व तेथें जमलेल्या मंडळींची देशाबद्दलची कळकळ पाहून बरीच स्फूर्ती मिळाल्याप्रमाणे वाटलें. आपला अभ्यास वगैरे पुरा झाल्यानंतर आपल्याकडून कांही तरी कामगिरी व्हावी अशी इच्छा झाली. बेळगाव हायस्कूलच्या इमारतीच्या समोर व आजूबाजूला कोर्टें व कचेऱ्या आहेत. कोर्टांना वकील लोक गाड्यांतून व घोड्यांवरून येत असत. हें पाहून हायस्कुलांत विद्यार्थीदशेंत वकील व्हावें असें वाटत होतें. सरकारी अंमलदारांना मान, प्रतिष्ठा वगैरे जास्ती मिळत असे; तरी त्यांना स्वतंत्रता नसते अशी कल्पना असल्यामुळे प्रथमपासूनच सरकारी नोकरींत शिरावें असें वाटत नव्हतें. मात्र वकील होण्याची हौस होती. पण कॉंग्रेस पाहिल्यानंतर तीही कमी झाली. तथापि वकिलीचा धंदा स्वतंत्र असल्याने तो करून सार्वजनिक कामें करतां येतात, आणि त्या वेळीं अशीं कामें करणारे बहुतेक वकीलच असत, हें पाहून वकिलीपर्यंतचा पल्ला लवकर गाठावा असें वाटू लागलें. नॉर्टन बॅरिस्टरांनी कॉंग्रेसच्या प्रतिनिधींना एक पार्टी दिली होती. वडिलांनी मलाही बरोबर नेलें होतें. पार्टीच्या वेळीं नॉर्टन हे मोठे बॅरिस्टर व स्वतः इंग्रज असून आमच्या मंडळीशीं इतक्या प्रेमभावाने वागतात हें पाहून कौतुक वाटलें. इंग्रजी व हिंदी या दोन्ही पद्धतींप्रमाणे खाण्यापिण्याची व्यवस्था होती. आमच्या मंडळींपैकी दोघांनी इंग्रजी पद्धतीच्या पेयाचा समाचार घेतला हें पाहून मला आश्चर्य वाटलें. त्या वेळीं अशा प्रकारच्या रूढीविरुद्ध आचरणाराचा समाजांत फारच तिटकारा असे. त्यामुळे या दोघांबद्दल माझ्या मनांत एक प्रकारची अढी बसली. ती जाण्याला पुढे बराच काळ जावा लागला.

मद्रास शहर पाहण्याकरिता एक दिवस आम्ही जास्ती राहिलों. पूर्वींच मुंबई मीं पाहिलेली असल्याने मला मोठ्या शहराची कल्पना आलेली होती. त्यामुळे मद्रास शहराचें विशेष वाटलें नाही. नवीन वाटलेल्या कांही जिनसा मीं खरेदी केल्या. नावाचे रबरस्टँप करणारा एक मनुष्य कॉंग्रेसकँपमध्ये येत असे. यापूर्वी मीं रबरस्टँप पाहिले नव्हते. त्यामुळे आपल्या नावाचा एक रबरस्टँप असावा असें मला वाटून तो करवून घेण्याची परवानगीही मिळविली. तो तयार होऊन आल्यानंतर एक कोरा कागद घेऊन तो कसा उठतो हें पाहण्यांत मोठ्या कौतुकाने एक तास मीं घालवल्याचें मला आठवतें.

परत येतेवेळीं वाटेंत कांची व व्यंकटगिरी हीं क्षेत्रें पाहिलीं. गोविंदराजपट्टण म्हणून एक गाव आहे. तेथून गिरीचा डोंगर चढून जावें लागतें. आमच्या मंडळीं-पैकी धरणेंद्रप्पा शेट्टी म्हणून जैन जातीचे एक वकील होते. त्यांच्याखेरीज इतर लोक डोलींतून वर गेले. शेट्टी हे इतरांपेक्षा अशक्त दिसत होते. पण डोलीवाल्याबरोबरच त्यांनी मजल मारली.

मद्रासहून बेळगावला परत आल्यानंतर घरांत व शाळेंत कॉंग्रेसचें वर्णन करण्यांत माझे पंधरा दिवस तरी गेले असतील. कॉंग्रेस व मोठ्या लोकांना पाहिलेले विद्यार्थी

त्या वेळीं कोणी नव्हते. त्यामुळे माझ्या वर्णनात्मक हकीकतींना मोठा रंग चढे. सुरेंद्रनाथांच्या वक्तृत्वाचें वर्णन मी रसभरित शब्दांनी करीत असें व इतर विद्यार्थ्यांपेक्षा मीं कांही तरी अधिक केलें आहे असें कित्येक दिवस मला वाटत होतें. मद्रासहून परत आल्यापासून वर्तमानपत्रें वाचण्याची हौस वाढली. मद्रासच्या काँग्रेसचा रिपोर्ट आमच्या वडिलांकडे होता. तो मीं डिक्शनरींतून शब्द वगैरे काढून लक्षपूर्वक वाचला. देशसेवेची इच्छा माझ्यांत जी थोडीबहुत आहे तिचा उगम या काँग्रेसपासून आहे असें मला वाटतें. कोणत्या प्रकारें देशसेवा करावी, ती आपल्या हातून घडेल किंवा नाही, आणि ती पात्रता येण्याकरिता आपण काय तयारी करावी, याबद्दलच्या कल्पना मुळींच नव्हत्या म्हटलें तरी चालेल. तथापि अभ्यास लवकर संपवावा, सरकारी नोकरींत न जातां वकिली करून सार्वजनिक कामें करावीं, असें वाटूं लागलें. चारचौघांत जाऊन मिसळणें किंवा बोलणें माझ्याने होत नव्हतें. ही माझी खोड जावी म्हणून माझे वडील मला आपल्याबरोबर नेत असत. तो त्यांचा प्रयत्न थोडासा सिद्धीला गेला असें म्हणतां येईल. तथापि सभाधीटपणा माझ्या अंगांत आला नाही तो नाहीच व अद्यापिही त्याची वाण मला भासते. याचा मीं प्रथमच उल्लेख केला आहे.

### अलाहाबादची काँग्रेस

१८८८ सालीं अलाहाबाद येथे काँग्रेस भरावयाची होती. मद्रासच्या काँग्रेसचा रिपोर्ट वाचल्यापासून पुन्हा काँग्रेसला जावें असें वाटूं लागलें. रिपोर्टांतील भाषणें वरचेवर वाचून त्यांतील मुद्द्यांबद्दल मनांत विचार घोळत असत. बरोबरीच्या विद्यार्थ्यांना मुख्य-मुख्य भाषणें वाचून दाखवण्याचा नाद मला लागला होता. त्या वेळच्या मोठ्या लोकांच्या चरित्रांची शक्य ती माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. अलाहाबादची काँग्रेस जसजशी जवळ येत चालली तसतशी माझी उत्कंठा वाढूं लागली. वडिलांच्या मनांतही कुटुंबयात्रा करण्याचें आलें. आमच्या आजीबाई पूर्वी एकदा काशीयात्रा करून आल्या होत्या. रामेश्वराच्या यात्रेला जातेवेळीं तेथून 'सेतू' (रामेश्वराजवळील वाळवंटाला श्रीरामचंद्रांनी लंकेला जाण्याकरिता बांधलेला 'सेतू' समजतात.) आणला होता. गंगेचें पाणी रामेश्वरावर व रामेश्वराचा 'सेतू' काशीविश्वेश्वरावर घालण्यांत पुण्य आहे असा समज आहे. आजीबाईंना सेतू आणून बरेच दिवस झाले होते व तो काशीला नेण्याचें अद्यापि झालें नव्हतें. त्यामुळे त्यांना फार काळजी वाटत होती. सेतू जोपर्यंत काशीला नेला नाही तोपर्यंत माझ्या छातीवर पेटलेली एक शेगडी आहे असें मी समजतें असें त्या वरचेवर म्हणत. काँग्रेसला गेल्यासारखें होऊन काशीयात्रेचें फळ सहज मिळाल्यासारखें होतें असें आमच्या वडिलांना वाटलें असावें. त्या वेळीं अशा प्रकारच्या विचाराने बरेच लोक काँग्रेसला जात असत. काँग्रेस ज्या ठिकाणीं भरते त्याच्या आजूबाजूचीं प्रेक्षणीय स्थळें पाहणें, जवळ असलेल्या क्षेत्राला जाणें इत्यादि प्रकार अद्यापिही होतात. हल्लीच्या दिवसांत केवळ काँग्रेसच्या कामाकरिता

जाणाऱ्यांची संख्या वाढत असली तरी जुना प्रकार अद्यापि अगदी बंद झाला आहे असें वाटत नाही. अलाहाबादच्या कॉंग्रेसच्या वेळी पं. अयोध्यानाथ यांना प्रथम पाहिल्याचें आठवतें. त्यांनी आपल्या भाषणांत राजा शिवप्रसाद व सर सयद अहमद यांचा उल्लेख केल्याचें स्मरतें. हे दोघे कोणी तरी प्रमुख गृहस्थ कॉंग्रेसच्या विरुद्ध असावेत असा माझा त्या वेळीं ग्रह झाला. याशिवाय मद्रासला पाहिलेल्या पुष्कळ पुढाऱ्यांचें पुन्हा दर्शन झालें व कॉंग्रेसबद्दल जास्ती आदर वाढला; त्याचप्रमाणे आपणही देशकार्यांत भाग घ्यावा ही इच्छा जास्ती बळावली.

### *कॉंग्रेसनंतर यात्रा*

कॉंग्रेसचें काम आटपल्यानंतर यात्रेला सुरवात झाली. माझ्या बायकोखेरीज कुटुंबांतील सर्व मंडळी म्हणजे वडील, मातुःश्री, वडिलांचे चुलते आप्पाराव, माझी आत्या व तिचे भ्रतार, आणि आमचे ऋणानुबंधी व आप्त वामनकाका संकेश्वर इतकी मंडळी होती. याशिवाय आमचे घरीं पूजेला येणारे भटजी सहकुटुंब व एक कारकून होते. रटफ इंग्रजी बोलणारा मीच होतों आणि माझा उपयोग स्टेशनावर व गाडींत होत असे. इकडेतिकडे फिरल्यामुळे थोडी धिटाईही आली होती. त्यामुळे आमच्या वडिलांना समाधान वाटत असे. या प्रवासांत माझ्याबरोबर पुष्कळ मोकळेपणाने ते बोलत असत. त्यामुळे त्यांचा मला जो फाजील वचक वाटत होता तो बराच कमी झाला. रीतीप्रमाणे प्रयाग, काशी, गया या तिन्ही यात्रा यथासांग झाल्या. यात्रेंतील प्रकार सर्वांच्या अनुभवाचे आहेतच. हीं क्षेत्रें पाहून त्यांच्याबद्दल माझ्या मनांत कोणत्याही प्रकारचा पूज्यभाव उत्पन्न झाला असें वाटत नाही. फक्त गंगेचें स्नान करण्यांत पवित्रपणा आहे असें वाटलें. विश्वेश्वराच्या जुन्या देवालयाची मशीद झालेली पाहून चीड आली. गयेंत 'तेरा पितर सोरग भयो'चा प्रकार पाहून किळस आला. काशीस असतेवेळीं आम्ही पुरुष मंडळी (आमचे चुलत आजोबा व भटजी यांचेखेरीज) थोडी-थोडी 'थंडाई' घेत होतों. ती थोडीच व फार 'जाज्वल्य' नसल्याने ती अंगावर येत नसे. काशीहून निघण्याचे दिवशीं आमच्यापैकी एकाने थंडाई तयार करून देणाऱ्या एका क्षेत्रस्थ ब्राह्मणाला "कसली तुमची थंडाई? येथे आल्यापासून आम्ही नित्य घेत असतों. पण आम्ही अनभ्यस्त असूनही तिचा अंमल आमच्यावर कांहीच झाला नाही." वगैरे म्हणून त्याची थोडी नालस्ती केली. त्या ब्राह्मणाला राग आला, म्हणून त्या दिवशीं 'स्पेशल' थंडाई करून त्याने आम्हांला पाजली. मिष्टान्नही त्या दिवशीं आमच्या पोटांत बरेंच गेलें होतें. त्यावर ही थंडाई पडली. त्याच दिवशीं रात्रीच्या गाडीने काशी सोडण्याचा आमचा बेत होता. थंडाई देणाऱ्या ब्राह्मणाने दुसरे दिवशीं जाण्याबद्दल सूचना दिली. पण स्टेशनावर येईपर्यंत थंडाईचें कांही वाटलें नाही. स्टेशनावर आल्यानंतर अर्ध्या तासाने ती अंगावर आली. त्यांतून एका गृहस्थाने तर आरडाओरडा करण्याला प्रारंभ केला. आम्ही सर्व घाबरून गेलों. मग त्या रात्रीं न जातां जवळच्या एका धर्म-

शाळेंत मुक्काम केला. बायका तर सर्व घाबरून गेल्या होत्या. बरोबर आमच्या गयावळाचा मनुष्य होता. त्याला थंडाईचा उतारा माहीत होता. डोकीवर थंड पाण्याची धार धरून व दही खायला देऊन उपचार केले. तरी रात्र सर्व जागून काढावी लागली. दुसरे दिवसाच्या गाडीने आम्ही सर्व गयेला गेलों.

परत येतेवेळीं मथुरा, वृंदावन, पुष्कर या क्षेत्रांना गेलों. आग्र्याचा ताजमहाल व किल्ला हे पाहिले. दिल्लीला जावयाचें माझ्या मनांत होतें; पण साधलें नाही. मुंबई-बडोदा लाइनने परत प्रवास केला होता. वाटेंत एक दिवस बडोद्यास मुक्काम करून तेथील राजवाडा, सोन्यारुप्याच्या तोफा, जवाहीर वगैरे पाहिलीं. नंतर मुंबईस येऊन तेथे दोन-तीन दिवस मुक्काम केला. आमचे आप्त करगुप्पीकर यांची लोहारचाळींत पेढी होती. तेथेंच आमचा मुक्काम होता. पूर्वीं न पाहिलेलीं अशीं स्थळें मीं या खेपेला पाहिलीं. पुण्याहून बेळगावापर्यंत गाडी सुरू झाली होती. त्यामुळे आम्ही आगगाडीनेच हुदलीला गेलों व हा प्रवास संपविला.

### १८८९ सालची मुंबईची काँग्रेस

यानंतर १८८९ सालीं मुंबईची काँग्रेस झाली. या काँग्रेसला प्रसिद्ध चार्लस ब्रॅडलॉसाहेब येणार होते. हे पार्लमेंटमध्ये हिंदुस्थानच्या बतीने भांडणारे म्हणून यांचा इकडे बोलबाला बराच झाला होता. याशिवाय हे मोठे नास्तिक असून यांच्या नास्तिकपणाबद्दल यांना पार्लमेंटमध्ये बसूं दिलें नाही; तथापि त्यामुळे झालेल्या निवडणुकींत पुनःपुन्हा यांनाच त्यांच्या मतदारांनी निवडून दिलें, म्हणूनही त्यांची प्रसिद्धी झाली होती. मुंबईच्या काँग्रेसला असा प्रसिद्ध गृहस्थ येणार म्हणून या काँग्रेसच्या बैठकीला विशेष महत्त्व आलें होतें. पूर्वीं भरलेल्या काँग्रेसच्या बैठकीं-मुळे लोकांना काँग्रेसबद्दल माहिती होऊन काँग्रेसची प्रतिष्ठा वाढत चालली होती. मुंबईलाच ही काँग्रेस भरणार असल्यामुळे या प्रांतांत बरीच गडबड उडणें साहजिक होतें. शहरोशहरीं वर्गण्या जमा करण्याचें काम चालू होतें.

आमच्या बेळगावांतही वर्गणी जमवण्यांत आली. विष्णुपंत नातू यांनी या कामीं पुढाकार घेतला होता. विद्यार्थ्यांमध्ये वर्गणी जमवावी ही कल्पना माझ्या मनांत आली. नातू, आजरेकर या पुढारी मंडळींचा आम्हीं सल्ला घेतला. त्यांनीही आम्हांला उत्तेजन दिलें. म्हणून 'बेळगाव राष्ट्रहितैषिणी बालसभा' या बड्या नावाखाली आम्हीं एक संस्था काढली. या संस्थेचे अध्यक्ष वामनराव वेलणकर या नावाचे माझे एक तरुण मित्र होते. मी उपाध्यक्ष होतों. माझे मेहुणे बंडोपंत हे एक चिटणीस होते. आम्हां सर्वांत वेलणकर हे हुषार होते. इंग्रजींत व मराठींत ते चांगले बोलत असत. ते कोणत्याही काँग्रेसला गेले नव्हते, तरी देशांतील प्रमुख लोकांची त्यांनी बरीच माहिती करून घेतली होती. रानडे, आगरकर, टिळक, गोखले यांच्याबद्दल त्यांनी मला बऱ्याच गोष्टी सांगितल्या आणि या मंडळींबद्दल माझ्या मनांत वेलणकरांनीच आदर उत्पन्न केला. याशिवाय स्पेन्सरचे

Data of Ethics इत्यादि ग्रंथ त्यांनी वाचले होते. देशसेवेबद्दलची माझी उत्कंठा वेलणकरांच्या सहवासामुळे तीव्र झाली. वर सांगितलेल्या संस्थेमार्फत आम्हीं विद्यार्थ्यांच्या दोनतीन सभा भरवल्या. हस्तपत्रिका वेलणकरांच्या व माझ्या सह्यांनी काढल्या होत्या. वेलणकरांनी त्या लिहिल्या होत्या. त्यांत "हिंदुस्थानचे लोक सरकारचरणारविंदीं मिलिंदायमान" झाले आहेत अशा प्रकारच्या मोठमोठ्या शब्दांचा उपयोग करण्यांत आला होता. सभा भरवणें, त्याबद्दलची जागा व इतर तयारी करणें, अध्यक्ष मिळविणें वगैरे खटपटीचीं कामें मी करीत असें. सभा यशस्वी रीतीने व्हाव्या याबद्दल मी बरीच दक्षता घेत असें. खुर्च्या, टेबलें, बाकें, बिछाईत यांची जमवाजमव करणें, जाहिराती योग्य प्रकारें वाटवणें, विद्यार्थ्यांना जमवणें, पैशाची मदत करणें वगैरे गोष्टींकडे माझें पूर्ण लक्ष असे. सभेच्या पूर्वी दोनतीन दिवस मला दुसरें कांही सुचत नसे. तयारीसंबंधाने बारीकसारीक गोष्टींकडे माझें पूर्ण लक्ष असे. माझ्या आयुष्यांत माझ्या देखरेखीखाली मोठमोठ्या सभा भरवण्याचे, लो. टिळक, महात्मा गांधी यांच्यासारख्या पुढाऱ्यांचे स्वागतसमारंभ करण्याचे, त्याचप्रमाणे जिल्हा व प्रांतिक व राष्ट्रीय सभा भरवण्याचे प्रसंग आले आणि ते प्रसंग अत्यंत यशस्वी रीतीने पार पडले. त्यामुळे बेळगावची प्रसिद्धी बरीच झाली आहे. याचें श्रेय मला व माझ्याबरोबर काम करणाऱ्या माझ्या मित्रांना आहे हें नमूद करण्याला एक प्रकारचा अभिमान वाटतो. या सर्व कामगिरींत लक्षपूर्वक व काळजीने सार्वजनिक कामें करण्याची माझी हौस मला फारच उपयोगीं पडली. याचा प्रथम अनुभव मला राष्ट्रहितैषी बालसभेच्या विद्यमाने भरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सभेंत आला. अशा प्रकारच्या खटपटी करण्यांत मला जरी हौस वाटत होती तरी सभांतून भाषण करण्याचे प्रसंग मी टाळीत असें. सभाधीटपणा नव्हता हें एक कारण व दुसरें काय बोलावें याबद्दलचें अज्ञान. यामुळे विद्यार्थ्यांच्या सभांतून-देखील मी बोलत नसें. या सभांतून बोलण्याचें काम माझे मित्र वेलणकर करीत व त्यांच्या भाषणाची छाप विद्यार्थ्यांवर चांगली पडे. अशा प्रकारें सभा करून विद्यार्थ्यांमध्ये कॉंग्रेसबद्दलची माहिती करून देण्यांत आली व सरासरी दोनशे रुपयांपर्यंत वर्गणीही आम्हीं जमवली. पण ही रक्कम मला थोडी वाटली. म्हणून हुदली वगैरेकडे आमच्या जमिनी करणारे रयत लोक आहेत त्यांच्याकडून कांही रक्कम जमवावी म्हणून मी हुदली व आजूबाजूच्या खेड्यांत गेलों व रयतांकडून जवळजवळ शंभर रुपये जमवले. त्या लोकांना कॉंग्रेसबद्दल खासगी रीतीने माहिती मी सांगत होतों.

मुंबईच्या या कॉंग्रेसला वडील आले नव्हते. पण मला त्यांनी जाऊं दिलें. आम्हीं जमवलेले रुपये घेऊन मी मुंबईला गेलों. तेथे श्री. नातू यांचेमार्फत ती रक्कम कॉंग्रेसच्या सेक्रेटरीकडे मीं दिली. चंदावरकर एक सेक्रेटरी होते. मला स्वयंसेवकांत दाखल करून घ्यावें म्हणून मीं एक त्यांचे नावें पत्र पाठविलें होतें. पण त्यांचेकडून मला उत्तरदेखील आलें नाही. त्यामुळे माझी फार निराशा झाली व मोठे लोक तरुणांचा अशा प्रकारें निरुत्साह करतात याबद्दल वाईट वाटलें. मला स्वयंसेवकांत न

घेतल्याबद्दल झालेल्या निराशेपेक्षा पत्राला उत्तर मिळालें नाही याबद्दल वाईट वाटलें. अलीकडे दहापंधरा वर्षांत म. गांधींचा व माझा संबंध आल्यापासून ते आलेल्या पत्रांना उत्तरें देण्यांत किती दक्ष असतात याचा अनुभव मला थोडासा आहे. ही दक्षता महात्माजींच्या खेरीज इतर पुढाऱ्यांत किती असेल याबद्दल शंका आहे. सेक्रेटरीकडून उत्तर मिळालें नाही. म्हणून माझा कॉंग्रेसबद्दलचा आदर कमी झाला नाही, हें मीं वर्गणी वगैरे जमवण्यांत केलेल्या खटपटीवरून स्पष्ट होतच आहे. मुंबईस चंदावरकरांच्या हातींच नातूंच्यामार्फत वर्गणी दिली असावी. त्याबद्दल त्यांनी बेळगावच्या विद्यार्थ्यांचें अभिनंदन केल्याचें मला स्मरतें. ज्यांनी आपल्या पत्राला उत्तर दिलें नाही त्यांनीच आमचें अभिनंदन केलेलें पाहून बरें वाटलें.

या कॉंग्रेसमध्ये फेरोजशहा मेथा, दिनशा वाच्छा, टिळक, गोखले वगैरे मंडळींना पाहण्याचा लाभ मिळाला. सर वुइल्यम वेडरबर्न हे तर अध्यक्षच होते. न्यायाधिशाच्या बड्या हुद्द्यावर असलेले इंग्रज गृहस्थ कॉंग्रेसचे अध्यक्ष झालेले पाहून कॉंग्रेसच्या मोठे-पणाची कल्पना आली. कॉंग्रेसबद्दल इतकें प्रेम वाटत होतें तरी पुढे १८९५पर्यंत कॉंग्रेसला जाणें झालें नाही. आणि १८९५ नंतर १९०६ पर्यंत कॉंग्रेसला जाण्याचा योग-आला नाही. १९०७ पासून १९१५पर्यंतच्या काळांत कॉंग्रेस मॉडरेटांच्या हातीं गेल्या मुळे माझा संबंध आलाच नाही. त्यानंतर आतापर्यंत मात्र माझा कॉंग्रेसशीं निकट संबंध आला आहे. ही हकीकत पुढे येईलच.

दा. क्र. १०८८०

प्रकरण चवथें

# माझें कॉलेजजीवन

### *माझ्या कॉलेजशिक्षणास आरंभ*

पहिल्या खेपेला मी हायस्कूलमधून मॅट्रिक परीक्षेला बसलों होतों व त्या परीक्षेंत इंग्रजींत मी नापास झालों होतों. म्हणून दुसरे वर्षी इंग्रजीकडे जास्ती लक्ष देऊन मीं अभ्यासाला सुरुवात केली. भाटे यांनी काढलेली शाळा रखडत चाललीच होती. त्या शाळेंत इंग्रजी शिकवण्याकरिता डेविडसन या नावाच्या एका इंग्रज गृहस्थाची भाटे यांनी नेमणूक केली होती. म्हणून इंग्रज गृहस्थाजवळ इंग्रजी शिकल्याने त्या विषयांतील कच्चेपणा नाहीसा होईल या विचाराने मी पुनः भाट्यांच्या शाळेंत जाऊं लागलों. डेविडसन हे इंग्रजी, गणित वगैरे विषय चांगले शिकवीत असत. शिवाय दरमहा दहा रुपये देऊन कांही महिने मी त्यांचेकडे खासगीही शिकावयाला जात असें. माझा अभ्यासही साधारणपणें बरा झाला होता. त्यामुळे माझी परीक्षा पास झाली. ज्या भाट्यांच्या शाळेंत प्रथम इंग्रजी शिकण्याला प्रारंभ केला होता, त्याच शाळेंतून मी मॅट्रिक पास झालों म्हणून मलाही आनंद झाला. भाटे यांना बरें वाटून त्यांनी माझें मनापासून अभिनंदन केलें.

घरीं पुष्कळ वाटाघाट झाल्यानंतर पुढील अभ्यासाकरिता कॉलेजला जाण्याचें ठरलें. आमच्या प्रांतांतील बहुतेक विद्यार्थी पुण्याच्या डेक्कन कॉलेजलाच जात असत. मुंबईपेक्षा पुण्याची हवा चांगली. शिवाय जेवणाखाणाची व राहण्याची सोय मुंबईपेक्षा पुण्यासच जास्ती चांगली असल्याबद्दल त्या वेळीं प्रसिद्धी होती. डेक्कन कॉलेजला बोट क्लब होता. अशा सर्व दृष्टींनी मीं पुण्यासच जाण्याचें ठरवलें. फर्ग्युसन कॉलेजांत अभ्यास चांगला होत असला तरी 'कॉलेज लाइफ' तेथे असावें तितकें नाही अशी त्या वेळीं आमच्या प्रांतीं समजूत होती. डेक्कन कॉलेजांत आमच्याकडील जे विद्यार्थी अभ्यासाकरिता जात ते बहुतकरून फर्ग्युसन कॉलेजला टिनपॉट कॉलेज असें संबोधीत असत.

फर्ग्युसन कॉलेज हें गरीब विद्यार्थ्यांकरिता आहे अशीही त्या वेळीं समजूत होती. श्रीमंत व मध्यम स्थितींतील बहुतेक विद्यार्थी डेक्कन कॉलेजलाच जात. म्हणून मींही डेक्कन कॉलेजला जाण्याचें ठरवलें. तेथील हवा, पाणी, स्वतंत्रता, क्लबचें जेवण, डॉ. भांडारकर, सोची यांचेसारखे प्रोफेसर, टिळक, आगरकर, जिन्सीवाले इत्यादि नामांकित विद्यार्थ्यांची परंपरा—या सर्व कारणांमुळे डेक्कन कॉलेजचें चित्र फारच रम्य वाटलें. माझ्या वडिलांची मला अनुकूलता नसती तर माझें कॉलेजचें शिक्षण झालें नसतें. मॅट्रिक पास झाल्यानंतर मुनसफीच्या परीक्षेला घरीं अभ्यास करूनच जावें असा विचार निघाला होता. पण मला ही गोष्ट अगदी नापसंत असल्यामुळे हा विचार मागे पडला. मी कॉलेजमध्ये दाखल होण्यापूर्वीच गर्भाधान झालें असल्यामुळे माझ्या कुटुंबाकडूनही विरोध होणें साहजिक होतें. गर्भाधान झाल्यानंतर कुटुंबाची व माझी 'ओळख' जरी झाली होती तरी आसपासच्या परिस्थितीमुळे बायकोच्या सांगण्यावरून माझ्या मनांतील बेत मीं फिरवला हें म्हणून घेण्याला मी तयार नव्हतों. उलट बायकोचा विरोध हें एकच कारण मला जाण्याला पुरलें असतें.

याखेरीज माझ्या मेहुण्यांचीही मॅट्रिक परीक्षा पास होऊन त्यांनीही पुढील अभ्यासाकरिता डेक्कन कॉलेजलाच जाण्याचें ठरवलें होतें. त्यांचा व माझा बराच स्नेहसंबंध जुळलेला असल्यामुळे ते गेल्यानंतर माझ्याने मागे राहणें झालें नसतें. दोघांनी मिळून एकाच ठिकाणीं दिवसांतून चोवीस तास सतत राहण्याचा योग येणार याचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला होता. आम्ही दोघेही जवळजवळ एकाच वयाचे निकट आप्त व दोघेही जिवलग स्नेही एकाच ठिकाणीं सोबतीने राहणार म्हणून घरच्या मंडळींनी माझ्या जाण्याला रुकार दिला. पण मला एकट्याला इतकें लांबवर पाठवणें घरच्या मंडळींना बरें वाटलें नाही. म्हणून बरोबर एक कारकून व एक गडी देऊन माझी रवानगी करण्यांत आली. माझ्या आजीबाई व मातुःश्री यांनी माझ्या निघण्याचे दिवशीं रडून गोंधळ केला. वडिलांनाही वाईट वाटलें असावें. पण मी मात्र नवीन जगांत जाणार या भावनेने आनंदांत होतों. माझ्याबरोबर अंथरूण, पांघरूण, समई, कपडे, फराळाचे पदार्थ वगैरे सामान बरेंच होतें. कॉलेजांत येऊन राहिल्यानंतर तेथील सर्व व्यवस्था पाहून कारकून व गडी यांना घेऊन राहण्याची लाज वाटूं लागली. म्हणून त्यांना परत पाठवलें.

त्या वेळीं कानडी लोकांचा एक क्लब होता. त्या क्लबचा व्यंकाप्पा या नावाचा एक स्वयंपाकी होता. तो बरेच दिवस कॉलेजमध्ये बल्लवाचें काम करीत होता. त्यामुळे त्याला आगरकर-टिळकांची व आमच्या प्रांतांतील लोकांची बरीच माहिती होती आणि त्या सर्वांच्या गोष्टी तो मोठ्या प्रेमळपणाने सांगत असे. मराठी क्लब पाच होते. त्यांपैकी एका क्लबांत माझे स्नेही कृष्णराव नातू, गजेंद्रगडकर वगैरे मंडळी होती. बेळगाव हायस्कुलांतून कानडी विभागांतून पास होऊन आलेली मंडळी कानडी क्लबांतच होती. धारवाड-विजापूर जिल्ह्यांतील मंडळी याच क्लबांत होती. मी व माझे मेहुणे दोघेही

मराठी विभागांतून पास झालों होतों यामुळे व विशेष परिचयाचे स्नेही मराठी क्लबांतच असल्यामुळे त्याच क्लबांत जावें असें आम्हांला प्रथम वाटलें. पण व्यंकाप्पाच्या स्वयंपाकाचा लौकिक आमच्या कानांवर बराच आला होता व त्याप्रमाणे आम्हांला अनुभवही आला; म्हणून आम्हीं कानडी क्लबांतच आमची सोय लावून घेतली.

१८९० सालीं एकंदर जेवणाचे सहा क्लब होते, व मुख्य इमारतीखेरीज दोन औट हाउसेस राहण्याकरिता होतीं. आम्ही मुख्य इमारतींत एकाच खोलींत राहात होतों. आमच्या क्लबांत त्या वेळीं बेळगावचे प्रसिद्ध वकील बेळवी, नारायणराव शेषगीरराव दातार (बंधू), हणमंतराव सबनीस, सोलापूरकर, कृष्णराव आनीखिंडी, श्रीनिवासराव कौजलगी, विठ्ठल विश्वंभर गायतोंडे, गुरुराव व दादासाहेब नरगुंदकर वगैरे मंडळी होती. श्री. बेळवी यांची बी. ए.ची परीक्षा झाली होती व ते फेलो होते. कॉलेजमध्ये राहणारांची संख्या शंभरपेक्षा जास्ती नव्हती. गावांतूनही कांही विद्यार्थी येत असत. नगरचे बाळासाहेब देशपांडे, रा. ब. चितळे, तात्यासाहेब केळकर, कृष्णाजीपंत खाडील-कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, मो. के. दामले, नानल, द्रवीड, गोविंदराव ओक (पुढे बेळगावासच वकिलीकरिता आले), वि. का. राजवाडे, शंकरराव देव, श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी वगैरे महाराष्ट्रीय मंडळीं त्या वेळीं वरच्या वर्गांत होती. शिवरामपंत परांजपे हेही एक फेलो होते. वऱ्हाडकडील मंडळींत रामचंद्र विष्णु महाजनी, काशिनाथ श्रीराम जठार, मोरोपंत आगाशे वगैरे होते. बेळवी हे पी. ई. ला संस्कृत (भर्तृहरिकृत नीतिशतक) शिकवीत असत. संजाना म्हणून एक पार्शी गृहस्थ फेलो असून इंग्रजी (Rokeby) शिकवीत असत. दवे म्हणून एक गुजराती फेलो होते ते 'लॉजिक' शिकवीत असत. दस्तुर हे सायन्सचे लेक्चरर होते. शिवाय सोची, करकरे, भांडारकर वगैरे प्रोफेसर होते.

कोणताही क्लास मिळवावा किंवा स्कॉलरशिप मिळवावी ही महत्त्वाकांक्षा मला नव्हती. त्यामुळे अभ्यासाकडे माझें लक्ष फार नसे. टेनिस क्लबचा व बोट क्लबचा मी मेंबर झालों. त्या वेळीं टेनिस कोर्टें दोनच होतीं. बोटीही तीनचारच होत्या. आठवड्यांतून एक दिवस नदीवर पोहण्याला जाण्याची वहिवाट होती व नवीन मंडळींना पोहण्याला शिकवीतही असत. मला पोहायला येत नव्हतें. म्हणून शिकण्या-करिता मी एकदोन आठवडे गेलों असेन. एकदोन वर्षांपूर्वी बेळगावकडील एक विद्यार्थी पोहतांना बुडून मेला होता. ही हकीकत वडिलांना कळल्याबरोबर मी पोहण्याकरिता जाऊं नये म्हणून मला सक्त ताकिदीचें पत्र आलें. बोट क्लबचा मी मेंबर झालों होतों ही गोष्ट मीं वडिलांना कळवली नाही. त्यांना जर हें कळलें असतें तर त्याबद्दलही मनाई झाली असती. स्वभाव थोडा लाजाळू असल्यामुळे इतर मंडळींशीं पहिल्या टर्ममध्ये फारसा मिसळत नसें. संध्याकाळचें जेवण आटपल्यानंतर बरीच मंडळी 'रीडिंग रूम'मध्ये जमून वर्तमानपत्रें वाचीत असत. त्या सर्वांचें वाचन होऊन मंडळी आपापल्या खोलींत गेल्यानंतर, मी जात असें. दोनतीन मंडळीच त्या वेळीं असत. रात्रीं

बहुतकरून मी अभ्यास करीत नसें. जवळजवळ नऊ वाजेपर्यंत—हजेरीच्या वेळेपर्यंत—वर्तमानपत्रें वाचण्यांतच माझा वेळ जात असे. आमच्या क्लासपैकी याच वेळेंत कृष्णराव आनीखिंडीकर हेही येत असत. ते बेळगाव हायस्कुलांतूनच मॅट्रिक परीक्षा पास झाले होते, आणि सदर परीक्षेंत त्यांचा नंबर पहिल्या पाचांत आला असल्याकारणाने त्यांना स्कॉलरशिपही मिळाली होती. त्यांनाही मंडळींत बोलण्याचालण्याची फारशी आवड नव्हती. 'रीडिंग रूम'मध्ये आम्ही दोघेच बसल्याचे पुष्कळ प्रसंग येत. त्यामुळे वर्तमानपत्रांतील विषयांवर आम्ही चर्चा करीत असूं. त्या वेळीं लो. टिळकांचा 'केसरी', व कै. आगरकरांचा 'सुधारक' हीं मुख्य मराठी वर्तमानपत्रें होतीं. दोघांमधील वाद खूप भराला आला होता व आपापल्या पत्रांतून एकमेकांचें खंडन बऱ्याच जोरांत चालत असे. आनीखिंडीकरांना व मला सोमवार व मंगळवार हे दिवस फारच गमतीचे जात असत. माझ्या मेहुण्यांचा ओढा 'केसरी'कडे अधिक असे. माझा ओढा 'सुधारक'कडे असे. आनीखिंडीकरांचें व माझें बहुतेक सार्वजनिक बाबींत एकमत असे. पण मीं तीन राष्ट्रीय सभा पाहिल्या असल्यामुळे त्यासंबंधी माझें बोलणें अधिक असे.

### डॉ. शिरगावकरांच्या मताची छाप

बेळगावास डॉ. वि. ज. शिरगावकर या नावाचे एक प्रसिद्ध डॉक्टर होऊन गेले. त्यांचे एक चिरंजीव हल्ली बेळगावास वकिली करीत असतात. डॉक्टर शिरगावकर हे आमचे घरचे डॉक्टर; त्यामुळे आमचा व त्यांचा घरोबा विशेष होता. मी एकदा दोषी तापाने बराच आजारी होतों. त्यांचेंच औषध चालू होतें. एक दिवस ते बाहेरगावीं गेले होते. त्या दिवशीं कर्मधर्मसंयोगाने माझा ताप भडकला. माझे वडील अगदी घाबरून गेले. शिरगावकर बाहेरगावीं गेले असल्यामुळे त्यांची फारच धांदल उडाली व त्या गडबडींत त्यांनी डॉ. बॉईस म्हणून दुसरे एक डॉक्टर होते त्यांना बोलावून आणून माझी प्रकृती दाखवली. त्या वेळीं डॉ. बाईस हे डॉ. शिरगावकरांच्या औषधाच्या योजनेंत कांही चूक आहे असें बोलल्याचें मला आठवतें. दोन्ही डॉक्टरांची थोडी चुरस होती हें मला माहीत होतें. शिरगावकरांचा उणेपणा दाखविण्याचें कारण ही चुरसच असावी असें मला त्यावेळीं वाटलें. त्यांनी परीक्षा वगैरे करून आपल्या दवाखान्यांतून औषध पाठवलें. तें औषध घेण्याकरिता माझ्या वडिलांनी मला आग्रह केला. पण शिरगावकरांखेरीज इतर कोणाचेंही औषध घेणार नाही, असा मीं निर्धार केला होता. आपसांतील चुरशीमुळे बॉईस यांनी शिरगावकरांसंबंधाने कांही उद्गार काढले असें मला वाटल्यामुळे त्यांचें औषध घ्यावयाचेंच नाही असें मीं निश्चयपूर्वक ठरवलें. शिरगावकर रात्रीं मला पाहण्याकरिता आले. त्या वेळीं झालेली सर्व हकीकत त्यांच्या कानावर घातली. पुढे त्यांचेंच औषध चालू होऊन मी बरा झालों.

या व इतर कांही कारणांमुळे माझा व त्यांचा स्नेह वाढत चालला. मी जरी वयाने लहान होतों तरी त्यांचें माझ्यावर प्रेम जडलें. आमच्या घरीं ते पुष्कळ वेळां येत असत

व जेवणाकरिता केव्हाकेव्हा राहात असत. मीही त्यांच्याकडे जात असें. त्यांच्याविषयी आमच्या सर्व मंडळींना अत्यंत आदर वाटत होता, तरी त्यांना आमच्या घरीं जेवावयाला एकीकडे बसवीत असत. म्हणजे आमच्या पंक्तीला त्यांचें पान मांडलें जात नसे. ते गौड सारस्वत ब्राह्मण असल्यामुळे असा प्रकार होत असे. याबद्दल मला वाईट वाटूं लागलें. कांही दिवस हें मीं सहन केलें. पण त्यांच्या घरीं मी जेवत असें, मग आमच्या घरीं मीं त्यांच्या पंक्तीला न बसणें हें मला लाजिरवाणें वाटूं लागलें. घरच्या मंडळींना कांही वाटो, पण त्यांच्या पंक्तीलाच बसण्याचा मीं निश्चय केला व हा निश्चय अमलांत आणला. याबद्दल माझे वडील किंवा इतर मंडळी कांही बोलली नाही. त्यांच्या मनाला काय वाटलें असेल हें सांगणें कठीण आहे. माझ्यावर त्यांचें प्रेम असल्यामुळे व डॉ. शिरगावकरांबद्दल आदर असल्यामुळे हा प्रकार उघड रीतीने झालेला पाहून त्यांना विशेष कांही वाटलें असेल असें दिसले नाही. आमचीं दोघांचीं पानें मात्र गड्याकडून काढवलीं जात. हें काम करणारी बाई आमच्या पोटजातीची असल्याकारणाने आमचीं पानें काढण्याचें तिने नाकारलें व माझ्या आईनेही तिला आग्रह केला नाही. मॅट्रिक झाल्यानंतर एक वर्ष मला घरीं राहावें लागलें. या अवधींत माझा व शिरगावकरांचा बराच स्नेह वाढत चालला. त्यांचा व डॉ. भांडारकरांचा दूरचा आप्तसंबंध असे. त्यांचीं मतें सुधारक पक्षाकडचीं होतीं. तथापि त्यांच्या घरीं सर्व व्यवस्था जुन्या पद्धतीप्रमाणेच होती. ते स्वतः आपल्यापुरते सुधारकाप्रमाणे वागत. त्यांच्या व माझ्या भाषणांत अनेक प्रकारचे विषय येत. टिळकांच्याबद्दल त्यांचें मत प्रतिकूल असे. टिळक सुधारणेच्या विरुद्ध असत अशी त्यांची समजूत होती. आणि त्यांच्या मताची छाप माझ्यावर चांगली पडली. कॉंग्रेससंबंधानेही त्यांचें मत प्रतिकूल होतें. पण मला कॉंग्रेससंबंधाने आदर असल्यामुळे त्यांचें व माझें या बाबतींत एकमत होत नसे. इंग्रजांबद्दल त्यांच्या मनांत अतिशय आदर-बुद्धी असे, व त्यांची राज्यपद्धती उत्तम आहे असा त्यांचा अभिप्राय असे. या संबंधांतही माझा व त्यांचा पुष्कळ वेळां मतभेद होत असे. तथापि टिळकांनी चालवलेल्या पद्धती-बद्दल माझा अनुकूल ग्रह नव्हता. जरी त्या वेळीं जहाल व मवाळ हे पक्ष अस्तित्वांत नव्हते तरी एकंदरींत रानडे यांचें राजकारण मला पटत होतें.

### *टिळकांची एकदोन वळां भेट*

अशा प्रकारच्या पूर्वतयारीने माझा कॉलेजांत प्रवेश झाला. कृष्णराव आनीखिंडीकरांचीं मतें माझ्या मतांशीं बहुतेक जुळत होतीं. पहिल्या दोन्ही टर्ममध्ये मी माझ्या मेहुण्यांबरोबरच राहात होतों. दुसऱ्या टर्मच्या अखेरीस माझ्या मेहुण्यांची प्रकृती एकदम बिघडली. म्हणून त्यांना कॉलेज सोडून जावें लागलें. त्यांच्या घरीं त्यांची योग्य शुश्रूषा होणार नाही असें आमच्या वडिलांना वाटून त्यांनी माझ्या मेहुण्यांना आमच्याच घरीं ठेवून घेतलें. मी मग एकटाच पी. ई. च्या परीक्षेचा अभ्यास करीत असें. परीक्षेचे दिवस जवळ आले होते तरी

एकदोन तास गप्पा मारण्यांत माझा वेळ जाई. या गप्पा बहुतकरून 'केसरी' व 'सुधारक' यांमधील लेखांसंबंधाने असत. रामचंद्र विष्णु महाजनी यांची व आगरकरांची ओळख असे. त्यांचे वडील हे आगरकरांचे गुरू होते. त्यांच्या तोंडून आगरकरांच्या संबंधाने पुष्कळ गोष्टी त्यांनी ऐकल्या होत्या. त्या आम्हांला महाजनी हे सांगत व त्या ऐकण्यांत मला आनंद वाटे.

रानड्यांच्या बुद्धिमत्तेबद्दलची कीर्ती माझ्या कानावर येऊं लागली. तेव्हा या सर्व मंडळींना एकदा पाहावें असें माझ्या मनांत आलें. माझे बेळगावचे स्नेही वेलणकर हे पुण्यासच राहावयाला आले होते. रविवारीं अगर इतर सुट्टीच्या दिवशीं मी त्यांच्याकडे केव्हाकेव्हा जात असें. त्या वेळीं ते गोखले, आगरकर यांच्यासंबंधाने माझ्याजवळ बोलत. त्यांच्यामार्फत मी एकदोन वेळां गोखले-आगरकरांकडे गेलों होतों. त्यांच्याबरोबर मी कांही बोललों नाही; पण ते वेलणकरांशीं किंवा इतरांशीं जें बोलत असत तें ऐकून त्या दोघांबद्दलही माझा आदरभाव वाढला. त्याचप्रमाणे बेळगावच्याच एका गृहस्थाच्या मार्फत टिळकांकडेही एकदोनदा गेलों होतों. त्या वेळीं त्यांच्याबरोबर पुष्कळ मंडळी असत; व सुधारकांची टवाळी करण्यांत ही मंडळी गर्क असलेली मला दिसली. टिळक या भापणांत फारसा भाग घेत नसत. पण मंडळीमध्ये थट्टा, मस्करी, हशा इत्यादी प्रकार चालत. आगरकर-गोखल्यांचेकडे जसा एक प्रकारचा भारदस्तपणा व जशी कळकळ मला दिसली तशी टिळकांच्या बैठकींत दिसली नाही. त्याचा विपरीत परिणाम माझ्या मनावर झाला व तेव्हापासून मी सुधारक मंडळींचा पूर्ण अभिमानी झालों. टिळकांच्या बुद्धिमत्तेबद्दल त्यांच्याजवळ कॉलेजांत शिकलेल्या विद्यार्थ्यांकडून मला माहिती झाली होती, व त्याबद्दल त्यांच्याविषयी अत्यंत पूज्य बुद्धी वाटत होती. तथापि, या अलौकिक बुद्धीचा ते जाणूनबुजून दुरुपयोग करतात म्हणून त्यांच्याबद्दल मला अत्यंत चीड येत असे. त्यांच्या 'केसरीं'तील लेख मी लक्षपूर्वक वाचीत असें; पण त्यांची विचारसरणी पटत नसे. एकच विषयावर एकमेकांविरुद्ध लेख 'सुधारकां'त व 'केसरीं'त येत असत. दोन्ही बाजू आमच्यापुढे असत. त्यामुळे विषय समजण्याला व त्याबद्दल निश्चित मत करण्याला बरीच मदत होत असे.

प्रिलिमिनरी होऊन गेल्यानंतर युनिव्हर्सिटीच्या परीक्षेपर्यंत अभ्यासाची खूप गर्दी असते. त्यांतून माझ्यासारख्या ज्या विद्यार्थ्यांनी पहिली टर्म अभ्यासाशिवाय घालवलेली असते त्यांची तर फारच धांदल चालते. त्याप्रमाणे माझेंही झालें होतें. तरी संध्याकाळीं जेवल्यानंतर निजेपर्यंत वर्तमानपत्रें वाचणें व कोणाबरोबर तरी तास-दोन-तास गप्पागोष्टी करणें यांत खंड पडला नव्हता. जवळजवळ एक वर्ष कॉलेजमध्ये काढल्याने पुष्कळ बाहेरच्या गोष्टी माहीत झाल्या व बरोबरीच्या लोकांबरोबर दळणवळण वाढलें. यामुळे थोडी धिटाई आली व क्लबांत वादविवादांत भाग घेण्याची हौस वाटूं लागली. संध्याकाळीं जेवणाचा तास-सव्वातास म्हणजे वादविवाद करण्याचा वेळ असा प्रकार झाला होता. आमच्या कानडी क्लबांतील बहुतेक मंडळी बहुशः 'केसरी'

पक्षांतील असत. फक्त मी व आनीखिंडीकर मात्र सुधारक पक्षांतील. आनीखिंडीकरांना वाद करण्याची हौस नसल्यामुळे सुधारक पक्षाचें मंडन करण्याची जबाबदारी माझ्यावर पडे. त्यामुळे मलाही चांगला विचार करून जावें लागत असे. वाद भरांत आला म्हणजे मोठ्याने व आवेशाने बोलावें लागत असे; व तीच सवय अद्यापि आहे. सौम्य व गोड शब्दांत मला वादविवाद करण्याची कला साधली नाही. अलीकडे दहापंधरा वर्षें म. गांधींचा सबंध आल्यापासून त्यांची वादविवाद करण्याची पद्धत किती सौम्य व गोड असते याचा मला अनुभव आहे. आपल्या सौजन्यानेच ते आपल्या प्रतिपक्षाला निरुत्तर करतात; किंवा वादविवादांत जी तीव्रता उत्पन्न होते व जिच्यामुळे भावना दुखावतात तसें केव्हाही होत नाही;—हें मीं अनेक प्रसंगीं पाहिलें आहे. टिळकांमध्येदेखील हा गुण नव्हता. टोचून व आवेशाने ते बोलत असत. त्यांचें बोलणें तर्काला धरून असलें तरी त्यांची बोलण्याची पद्धतच अशी होती की, त्यामुळे प्रतिपक्षाचें मन दुखत असे. कॉलेजमध्ये माझें कांहीसें असेंच होत असे. तथापि त्याचा एक परिणाम माझ्यावर असा झाला की, मी माझ्या मताचा पूर्ण अभिमानी झालों व माझीं मतें दुसऱ्यांना पटवून देणें माझें कर्तव्य आहे असें मला वाटूं लागलें. त्यामुळे वादविवाद करतांना मला एक प्रकारचें स्फुरण येत असे. केवळ वेळ घालवण्याकरिता कांही तरी बोलावें असें मला वाटत नव्हतें. केव्हाकेव्हा वाद इतका जोरांत येत असे की, दुसऱ्या क्लबाची मंडळीं आपलें जेवणखाण आटपून काय भांडणें चाललीं आहेत हें पाहण्याकरिता आमच्या जेवणाच्या जागेच्या खिडकीशीं, दाराशीं येत असत. पण भाषणें कानडींतच चालत असत; त्यामुळे त्यांना ती भाषा समजत नसल्यामुळे निराश होऊन जावें लागत असे. हा प्रकार माझ्या पहिल्याच वर्षीं सुरू झाला होता.

आमचे मेहुणे आजारी होऊन घरीं गेल्यानंतर माझा व आनीखिंडीकरांचा बराच स्नेह जुळला. आम्ही दोघेही मिळून मुंबईला परीक्षेकरितां गेलों. दोघे मिळूनच मुंबईस स्वतंत्र बिऱ्हाड करून राहिलों. आमच्या दोघांकरिताच आम्हीं आमच्या क्लबच्या आचाऱ्याला नेला होता. परीक्षेच्या पूर्वीं व नंतर कांही दिवस आम्हां दोघांना एकत्र राहण्याची संधी आली. दोघांचें बहुतेक सर्व सार्वजनिक बाबतींत एकमत असल्यामुळे स्नेहांत भर पडली. आणि दुसऱ्या वर्षी कॉलेजांत दोघांनी मिळून एकाच खोलींत राहण्याचें मुंबईसच ठरवलें. परीक्षा संपल्यानंतर आम्ही घरीं गेलों. त्यांचा व माझा पत्रव्यवहारही होत असे. परीक्षेंत हटकून पास होईनच अशी खात्री वाटत नव्हती. म्हणून निकालाबद्दल मीं फारशी आतुरता दाखवली नाही. पास झाल्यास तार करण्याबद्दल आनीखिंडीकरांनी आपल्या एका मित्राला कळवलें होतें. निकाल लागल्यानंतर आनीखिंडीकरांना ते दुसऱ्या वर्गांत पास झाल्याची तार मिळाली. माझ्याबद्दल मला तारेने कांहीच कळलें नाही. त्यामुळे मी नापासच झालों असें मला वाटलें. पण पुढे दोन दिवसांनी माझें नाव पासांच्या यादींत आलेलें माझ्या वडिलांनी कोर्टांत

पाहिलें. लागलीच ते घरीं आले व त्यांनी मला मोठ्या आनंदानें "पहिला मुक्काम तरी गाठलास बाबा!" म्हणून सांगितलें. माझे मेहुणे बंडोपंत बरे असते तर तेही माझ्याबरोबर पास झाले असते. किंवा माझ्यापेक्षां त्यांची तयारी जास्ती चांगली असल्यामुळे ते वरच्या वर्गांतही आले असते. पण त्यांचा आजार क्षयावर गेला म्हणून त्यांना अभ्यास सोडावा लागला.

### सामाजिक सुधारणेचे संस्कार

कॉलेजच्या पहिल्या वर्षीं मी बेळगावीं येत असें त्या वेळीं येथील सोशल क्लबांत टेनिस खेळावयाला जात असें. तेव्हा क्लबांत येणाऱ्या वकील मंडळींची चांगली ओळख झाली होती. खेळ संपल्यानंतर क्लबांत येऊन वर्तमानपत्रें वाचीत असें. बहुतेक सर्व मंडळी गेल्यानंतर डॉ. शिरगावकर येत व आम्ही दोघेच पुष्कळ वेळ बोलत बसत असूं. त्या वेळीं बोलण्याचा विषय म्हणजे सामाजिक सुधारणा हा असे. त्यांचा बोलण्याचा सर्व रोख सामाजिक सुधारणा ही प्रथम झाली पाहिजे असा असे. आगरकरांच्या लेखांची छाप माझ्यावर असल्याने सामाजिक सुधारणा करीत असतां राजकीय सुधारणेबद्दल उदासीन असणें हें गैर आहे असें मला वाटत होतें. राजकीय सुधारणेबद्दल त्यांचीं मतें मला पटण्यासारखीं नव्हतीं. इंग्रजांच्या राज्यपद्धतीनेच आमचा उद्धार होईल असें त्यांचें निश्चित मत असे. त्यामुळे कॉंग्रेसच्या त्यावेळच्या चळवळींवर देखील त्यांचा विश्वास नव्हता.

याच सुमारास बेळगावचे एक वकील भास्करराव मणेरीकर यांची व माझी ओळख झाली. त्यांचा व माझ्या वडिलांचा चांगला स्नेह असे. यांचा लहानपणापासून विद्याभ्यास मुंबईस झाला होता. त्यामुळे मुंबईच्या प्रसिद्ध माणसांची यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष माहिती असे. प्रसिद्ध राजारामशास्त्री भागवत यांचा व मणेरीकरांचा बराच स्नेह असे. तेही आमच्याबरोबर (डॉ. शिरगावकर व मी) पुष्कळ बोलत बसत असत. त्यांच्या बोलण्यांत पुष्कळ विनोद असे. शिवाय त्यांची निरीक्षणदृष्टी चांगली असल्याने त्यांच्याबरोबर कोणत्याही विषयासंबंधानें बोलण्यांत आनंद वाटे. हेही गौड सारस्वत ब्राह्मण. तेही आमच्या घरीं जेवावयाला पुष्कळ वेळां येत असत. मीही त्यांच्याकडे जाई. पंक्तीच्या बाबतींत आमच्या घरीं शिरगावकरांसंबंधानें सुधारणा पूर्वींच झाली असल्याकारणानें मणेरीकरांच्याविषयी फारशी अडचण राहिली नव्हती. मणेरीकर अद्याप हयात आहेत. राजकीय बाबतींत माझीं व त्यांचीं मतें तात्त्विक दृष्ट्या जुळतात. पण तपशिलांत त्यांचा व माझा मतभेद आहे. शिरगावकरांप्रमाणेच इंग्रजांसंबंधानें त्यांच्या मनांत बराच आदरभाव आहे. इंग्रजांमध्ये गुण नाहीत असें कोणीच म्हणत नाही. तथापि त्यांची येथील राज्यपद्धती अगदी निःस्वार्थबुद्धीच्या पायावर रचली गेली आहे असें म्हणणेंही वस्तुस्थितीला धरून नाही. मतभेदाचा हाच मुख्य मुद्दा असे. शिरगावकर, मणेरीकर व मी या तिघांची मोठी गट्टी असे आणि जगांतील प्रचलित सर्व विषयांवर आम्ही बोलत

असूं. अशा प्रकारें मला या दोघांपासून पुष्कळ फायदा झाला. डॉ. शिरगावकर हे वारण्यापूर्वीच माझा व लो. टिळकांचा संबंध येऊन राजकारणांत माझीं मतें त्यांच्या बाजूला झुकलीं होतीं; आणि त्यांचें कार्य कर्नाटकांत जें चाललें होतें त्याची जबाबदारी ते माझ्यावर टाकीत. टिळकांबद्दलची माहिती या दोघांनाही थोड्याबहुत विकृत स्वरूपांत असल्याने माझा व टिळकांचा संबंध इतपत येणें यांना रुचलें नसावें; निदान शिरगावकरांना तरी तें पसंत पडलें नाही हें खास. मणेरीकरांची विचार करण्याची दृष्टी जास्ती व्यापक स्वरूपाची असल्याकारणाने त्यांच्या व माझ्या स्नेहांत अंतर पडलें नाही. अलीकडे पंधरावीस वर्षे मीं आपल्याला सर्वस्वी राजकारणालाच वाहून घेतल्यामुळे व माझें बेळगावास राहणेंही अनियमित झाल्यामुळे त्यांचें व माझें दळणवळण कमी झालें आहे. पण जेव्हाजेव्हा माझी व त्यांची गाठ पडते त्या त्या वेळीं त्यांच्याबरोबर बोलण्यांत मला आनंद होतो, व त्यांच्याबद्दल माझ्या मनांत असलेला आदर वाढतो.

कॉलेजांत सामाजिक सुधारणेला अनुकूल असलेल्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांशीं विशेष संबंध व सुट्टीच्या दिवसांत शिरगावकर-मणेरीकर यांच्याशीं विशेष परिचय यामुळे माझ्या विचारांची दिशा सुधारणेला अनुकूल होत गेली. किंबहुना सामाजिक सुधारणा झाल्याखेरीज राजकीय प्रगती होणें शक्यच नाही असें कांही काळपर्यंत मला वाटत होतें. आमच्या घरांतील राहणी जुन्या पद्धतीला धरून जरी बरीच होती तरी तिचा अंमल माझ्यावर फारसा होत नसे. आमचे वडील संध्या, देवपूजा वगैरे कांही करीत नसत. जेवतांना सोवळ्याओवळ्याचा फारसा गोंधळ नसे. बायकांत मात्र सोवळेंओवळें कडक असे. व्रतें वगैरेंचा खूप जोर असे. स्नान झाल्यानंतर "दोन आचमनें तरी कर" म्हणून माझ्या आजीचा माझ्यामागे ससेमिरा असे. आईचें तेंही नसे. त्यामुळे मला मनाप्रमाणे वागण्याला बरीच सवड मिळे. जातीचे वगैरे निर्बंध मी लहानपणापासून पाळीत नसें. त्यामुळे हल्लीच्या जातिमत्सराच्या काळांतदेखील माझ्या मनांत अमूक जात श्रेष्ठ किंवा अमूक जात कनिष्ठ ही कल्पना येत नाही. १८९० सालापासून जी परिस्थिती मला लाभली त्यामुळेच माझ्या मनावरचे परिमाण दृढ झाले आहेत.

प्रीव्हिअसची परीक्षा पास झाल्यानंतर १८९१ सालीं पुन्हा मी डेक्कन कॉलेजलाच आलों. पूर्वींच ठरल्याप्रमाणे आनीखिंडीकर व मी एकत्र राहूं लागलों. त्यामुळे विचारविनिमयाला बरीच सवड मिळाली. पुष्कळ बाबतींत माझें व त्यांचें जुळत असलें तरी मतभेद मुळींच होत नसे असें नाही. पण त्याचा परिणाम मात्र अनिष्ट होत नसे. टिळकांची बुद्धिमत्ता श्रेष्ठ कीं रानड्यांची बुद्धिमत्ता श्रेष्ठ, याबद्दल त्यांचा व माझा बराच खडाजंगीचा वाद झाला. टिळकांचीं बरींच मतें आम्हां दोघांनाही ग्राह्य नव्हतीं. पण टिळकांची बुद्धिमत्ता श्रेष्ठ दर्जाची असें माझें मत होतें. तथापि तिचा ते दुराग्रहाने किंवा प्रतिष्ठा मिळविण्याच्या हेतूने दुरुपयोग करतात असें मला मनापासून वाटत होतें. म्हणून आनीखिंडीकरांचें टिळकांच्या संबंधाचें जितकें प्रतिकूल मत असे त्यापेक्षा किती तरी पटीने माझें मत प्रतिकूल असे. जाणूनबुजून टिळक लोकप्रियता

मिळवण्याकरिता जुनीं मतें प्रतिपादन करीत असतात, असें मला वाटून त्यांच्याबद्दल मला अत्यंत चीड येत असे.

### संमती-वयाच्या वादाला तोंड

याच वेळीं संमती-वयाच्या बाबतींत वादाला तोंड लागलें; आणि पुण्यांत तर हा वाद बऱ्याच तीव्र स्वरूपांत झाला. डॉ. भांडारकर यांनीही वादांत प्रामुख्याने भाग घेतला होता. पुण्यांतील सर्व प्रमुख मंडळी कोणत्या तरी एका पक्षांत सामील झाली होती. पुण्यांतील वर्तमानपत्रांतील लेख याच विषयावर येत असत. अशा स्थितींत कॉलेजांतील विद्यार्थ्यांवरही परिणाम झाल्याशिवाय राहणें कठीण होतें. बहुतेक विद्यार्थी टिळकांचे अभिमानी होते व परकी सरकारच्या कायद्याने आमची सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा करून घेणें देशहिताच्या दृष्टीने गैर आहे असें प्रतिपादन करीत होते. आमच्या क्लबांतही या विषयावर सायंकाळीं खूप जोरांत वाद होत असे. मी सामाजिक सुधारणेचा अभिमानी असल्यामुळे या वादांत भाग घेत असें. गावांत शनिवारवाड्यापुढे टिळकपक्षाची मोठी सभा झाली. त्या सभेला मी गेलों होतों. टिळकांचें भाषण ऐकलें. त्या वेळीं सभेंत कांही तरी गोंधळ होऊन सभेचें काम बंद व्हावें असें मनांत वाटत होतें. पण सभेला आलेले बहुतेक सर्व लोक एकाच मताचे असल्याने सभेचें काम सुरळीतच झालें. सुधारकांची टर उडविणारीं भाषणें झालीं. पुण्यांतील सभा कशा असतात याबद्दलचा अनुभव प्रथमच आला. सभेंत झालेल्या भाषणांखेरीज सभेला आलेल्या अनेक लोकांच्या तोंडून सुधारकांबद्दल अश्लील शब्दांचा वर्षाव चालला होता. अत्यंत महत्त्वाच्या विषयाची शिष्ट म्हणविणाऱ्या लोकांकडून कुचेष्टा करण्यांत यावी याबद्दल वाईट वाटलें. या कुचेष्टेबद्दल टिळकांना जबाबदार धरणें मला गैर वाटत असे. पण आमच्यापैकी कित्येक जण या लोकांच्या अनिष्ट वर्तनाची जबाबदारी टिळकांवर टाकीत असत. तथापि, टिळकांना प्रत्यक्ष जबाबदार धरण्यापर्यंत जरी माझ्या मनाची धाव जात नव्हती, तरी टिळकांसारख्या विद्वान निःस्वार्थी गृहस्थाचा या लोकांना पाठिंबा आहे अशी सर्वसाधारणपणें माझीही समजूत होती. अशा प्रकारच्या प्रवृत्तीला टिळक प्रतिबंध करीत नाहीत, इतकेंच नव्हे तर तिकडे डोळेझाक करतात व प्रसंगविशेषीं समर्थनही करतात, असा माझा त्या वेळीं ग्रह झाला होता.

पुढे कांही दिवसांनी क्रीडाभुवनांत संमती-वयाला अनुकूल असलेल्या लोकांची एक सभा झाली. ही सभा होण्याच्यापूर्वी डॉ. भांडारकरांनी आमच्या वर्गांत एक दिवशीं बिलाला अनुकूल असलेल्या विद्यार्थ्यांनी उभें राहावें असें म्हटलें होतें. त्या वेळीं सातआठ विद्यार्थीच उभे राहिले. अर्थात बाकीचे तीसचाळीस अनुकूल नव्हते. कांही उदासीन असतील. पण बरेच प्रतिकूल होते. क्रीडाभुवनाच्या सभेला मी व आणखी दहाबारा विद्यार्थी मिळून गेलों होतों. क्रीडाभुवनाच्या सभोवार रस्त्यांतून प्रतिकूल असणाऱ्यांची खूप गर्दी जमली होती. अनुकूल असलेल्या लोकांनाच आंत सोडण्याची व्यवस्था

करण्यांत आलेली होती. सभा सुरळीतपणें होऊं द्यावयाची नाही असा प्रतिकूल असलेल्या मंडळींचा विचार ठरला होता. त्यामुळे बाहेर गोंगाट बराच चालला होता. टिळक, नामजोशी, वासूकाका जोशी वगैरे मंडळीही हजर होती. त्यामुळे दंगल माजविणाऱ्या मंडळींना एक प्रकारचें प्रोत्साहन मिळाल्याप्रमाणे झालें होतें. सभा कशीबशी झाली. भाषणें वगैरे कांही झालीं नाहीत. दंगल करणाऱ्या लोकांत विद्यार्थ्यांची संख्या बरीच मोठी होती. त्यांत डेक्कन कॉलेजचेही कांही विद्यार्थी होते. बाहेरून खडे, लहानलहान दगड यांचाही थोडाबहुत वर्षाव झाला. त्या वेळीं भांडारकरांवर गर्दी करणाऱ्यांचा विशेष रोख होता. भांडारकरांना दगड वगैरे कांही लागूं नये म्हणून मीं त्यांच्या डोकीवर कांही वेळपर्यंत छत्री धरली होती. पुढे क्रीडाभुवनांतून त्यांना कसें तरी बाहेर काढून पोलिसांनी त्यांची त्यांच्या घराकडे रवानगी केली. या दंगलीमुळे वासूकाका वगैरे मंडळींवर फौजदारी खटले पोलिसांनी भरले. पण त्यांतून ते दोषमुक्त झाले. सदर सभेंत हा जो अनिष्ट प्रकार घडला याबद्दल जबाबदार कोण या बाबतींत 'केसरी' व इतर वर्तमानपत्रांतून चर्चा सुरू झाली. आमच्या कॉलेजांतही विद्यार्थ्यांमध्ये वादविवाद होत असे.

## संस्कृत मृच्छकटिक नाटक

याच सुमारास डेक्कन कॉलेजचें 'ॲनिव्हर्सरी' संमेलन भरावयाचें होतें. तेथे संस्कृत मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग करून दाखविण्यांत आला होता. हा प्रयोग गावांत थिएटरमध्ये झाला. वसंतसेनेची भूमिका घेणारे आमच्या क्लासांतील कट्टी या नावाचे विद्यार्थी होते. हे धारवाड ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल व्यंकट रंगो कट्टी यांचे चिरंजीव. यांचा व माझा स्नेह होता. या प्रयोगांत त्यांनी भाग घ्यावा असें माझें मत होतें व त्याप्रमाणे मीं त्यांना तसा सल्ला दिला होता. त्यांनी आपलें काम उत्तम प्रकारें केलें. चारुदत्ताचें काम कोल्हापूरच्या मल्हारपंत गर्दे यांनी केलें होतें. त्यांचा आवाज चांगला होता. त्यामुळे श्लोक चांगल्या चालीवर म्हटले जात. पण त्यांचा अभिनय साधारणच होता. कट्टींना गातां येत नसे व त्यांच्या कामांत गाणेंही नसे. पण अभिनय चांगला असे. शकाराचें काम वऱ्हाडांतील मोरोपंत आगाशे यांनी चांगल्या प्रकारें केलें. बेळगावास पुढे वकिलीकरितां आलेले गोविंदराव ओक, व बेळगावचेच मंगेशराव तेलंग, नरसोपंत केळकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीही भाग घेतला होता. प्रयोग पाहण्याला पुष्कळ गर्दी झाली होती व प्रयोगही बराच चांगला झाला होता. कॉलेजमध्ये तालमी चालत असत, त्या वेळीं तालीम पाहण्याकरिता येण्याबद्दल डॉ. भांडारकरांना मीं व एकदोन मित्रांनी आमंत्रण दिलें. भांडारकर त्या वेळीं संमती-वयाच्या वादांत पूर्ण रंगले होते. "बाबांनो, माझेंच नाटक चाललें आहे. तेव्हा तुमचें नाटक पाहण्याला मला वेळ नाही." असें त्यांनी उत्तर देऊन आम्हांला परत पाठवलें.

## अखेर बी. ए. झालों

मंगेशराव तेलंग हे बेळगाव जिल्ह्यापैकी खानापूर या गावचे. त्यांचें शिक्षण बेळगावास झालें होतें तरी त्या वेळीं माझी व त्यांची फारशी ओळख नव्हती. मॅट्रिक्युलेशन पास झाल्यानंतर मुंबईस विल्सन कॉलेजमध्ये ते प्रीव्हिअस पास झाले होते. संस्कृत विषयाबद्दल त्यांना युनिव्हर्सिटींतून बक्षीसही मिळालें होतें. डेक्कन कॉलेजमध्ये ते आल्यानंतर माझा व त्यांचा परिचय झाला व पुढे तो वाढतही गेला. बी. ए. झाल्यानंतर आम्हीं दोघांनी मिळून बेळगावास वर्तमानपत्र वगैरे काढलें. याबद्दलची हकीकत पुढे यावयाची आहे. त्यांचीं मतें माझ्या मतांशीं बहुशः जुळण्यासारखींच होतीं. तथापि माझे मित्र आनीखिंडीकर यांचें व त्यांचें स्वभाववैचित्र्यामुळे विशेष पटत नसे. पण पुढे आनीखिंडीकर हे जमखंडीस गेले व तेथे त्यांनी शाळाखात्यांत नोकरी धरली. मी व तेलंग एल्‌एल्. बी. होऊन बेळगावास वकिली करूं लागलों. त्यामुळे माझा व त्यांचा संबंध जास्ती आला. आनी-खिंडीकर बेळगावास असते तर कदाचित माझा व तेलंगांचा इतका संबंध आला नसता.

या वर्षीं मी तापाने आजारी पडलों. मला बेळगावास घरीं पोचवावें लागलें. वाटेंत आळंदीजवळ रस्ता नादुरुस्त झाला होता. त्यामुळे अर्धा मैल चालत जाऊन दुसऱ्या गाडींत बसावें लागलें. त्यामुळे मला एका हेलकऱ्याच्या पाठीवर बसून जावें लागलें. मला पोचवण्याकरिता माझ्याबरोबर हणमंतराव सबनीस आले होते. रात्रीं जागरण व प्रवासाची दगदग यामुळे त्रास होऊन माझा ताप वाढला. म्हणून मिरजेस एक दिवस मुक्काम केला व दुसरे दिवशीं बेळगावास गेलों. ताप दोषी होता. त्यामुळे जवळजवळ सात-आठ आठवडे आंथरुणावर पडून राहावें लागलें. बरा होऊन चांगली शक्ती येण्यास जवळजवळ महिना गेला. मला कॉलेजला पुन्हा वडील पाठवणार नाहीत अशी भीती वाटत होती व त्याप्रमाणे घरांतील मंडळींनी बोलण्याला सुरुवातही केली. पण कॉलेजांत मला पाठवल्यास माझें मन चांगलें रमेल व लवकर बरा होईन, असें मीं वडिलांना कळवलें. डॉ. शिरगावकरांनीही माझ्या म्हणण्यास दुजोरा दिला. त्यामुळे मला कॉलेजला जाण्याला परवानगी मिळाली. पण कॉलेजच्या त्रासाखेरीज खाजगी अभ्यास करूं नये, असें मला बजावण्यांत आलें. कॉलेजांत खूप अभ्यास करावा अशी माझीही हौस नव्हती. कॉलेजांतील खेळ व इतर गोष्टी यांपासून जितका फायदा घेतां येईल तितका घ्यावा, हीच इच्छा जास्ती प्रबळ होती. म्हणून वडिलांनी घातलेली ही अट मीं कबूल केली. त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. मी प्रिलिमिनरींत पास होऊन मला फॉर्म मिळाला. पण मी युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत नापास झालों.

माझे मेहुणे बंडोपंत यांची प्रकृती बरीच बिघडली होती. म्हणून त्यांना मिरजेस औषधोपचाराकरिता ठेवले होते. तेथे पाचसहा महिन्यांनंतर त्यांची प्रकृती बरीच सुधारली. १८९२ सालीं त्यांच्या मनांतून पुन्हा कॉलेजला यावें असें होतें. पण वडिलांच्या

सांगण्यावरून त्यांनी बेळगावासच राहून निराळें बिऱ्हाड करावें व अभ्यास चांगला झाल्यास परीक्षेला बसावें असें ठरवलें. त्याप्रमाणे ते माझ्या बहिणीला घेऊन निराळे राहूं लागले. तथापि त्यांची प्रकृती पुन्हा बिघडली व पुढे एक वर्षाने ते आमच्याच घरीं वारले. त्यानंतर माझी बहीण आमच्याकडेच राहूं लागली. तिची मुलगी म्हणजे चि. सौ. अक्कूबाई हिला गदग येथे हुईलगोळकर यांच्या घरीं देऊन लग्न वगैरे आम्हींच केलें. हल्ली तिला पाच मुली व एक मुलगा आहे. तिचे पती डॉ. व्यंकटराव हुईलगोळ हे १९२० सालच्या असहकारितेच्या चळवळीपासून सार्वजनिक कामांत गदग येथे प्रामुख्याने भाग घेत असतात. त्यांना तीनदा तुरुंगवासही घडला आहे. हल्ली ते नाशिकच्या तुरुंगांत शिक्षा भोगीत आहेत.

१८९१ सालीं परीक्षेंत नापास झाल्यानंतर १८९२ सालीं पुन्हा कॉलेजांत आलों. आनीखिंडीकरांची परीक्षा पास झाली होती. त्यामुळे ते बी. ए. च्या वर्गांत गेले. तथापि मी व ते मिळूनच पूर्वीप्रमाणे एकाच खोलींत राहात होतों.

त्रिकोणमिती, 'मेकॅनिक्स', 'स्टॅटिक्स' हे विषय आमच्या परीक्षेला होते. गणिताकडे माझें पहिल्यापासून लक्ष कमी असल्यामुळे हे विषय कच्चे राहिले होते व पहिल्या वर्षीं याच विषयांत मी नापास झालों होतों. म्हणून या विषयांसंबंधाने मला विशेष तयारी करावी लागली. या वर्षीं श्री. वर्तक हे आमच्या कॉलेजांत फेलो होते व ते गणित हा विषय घेऊन एम्. ए. च्या परीक्षेची तयारी करीत होते. त्यांच्याकडे खासगी रीतीने मी गणिताचा अभ्यास करण्याकरिता जात असें. त्यांच्या मदतीने परीक्षेंत पास होण्या-इतपत माझी तयारी झाली; आणि त्याप्रमाणे मी पास होऊन बी. ए. च्या वर्गांत १८९३ सालीं आलों. बी. ए. ला गणित हा विषय ऐच्छिक असल्याकारणाने मला त्या विषयाच्या कटकटींतून एकदा सुटल्याप्रमाणे वाटलें. बी. ए. च्या परीक्षेकरिता भाषा हा विषय मीं ऐच्छिक म्हणून घेतला होता. या विषयांत माझी पारंगतता विशेष होती म्हणून हा विषय मीं घेतला असें नाही. इतर विषयांपेक्षा हा विषय परीक्षा पास होण्याकरिता मला सुलभ जाईल असें वाटलें. या एकाच कारणाकरिता भाषा हा विषय मीं घेतला होता. जेमतेम अभ्यास करून मी बी. ए. च्या परीक्षेंत पहिल्याच वर्षीं पास झालों.

## *कानडी–मराठी विरोध*

१८९२ किंवा १८९३ सालीं आमच्या कॉलेजांत एक त्रैमासिक काढण्याचें ठरलें. डेक्कन कॉलेजमध्ये त्या वेळीं अजमासें चाळीसएक कानडी विद्यार्थी होते. बाकी बहुतेक विद्यार्थी महाराष्ट्रीयच होते. कांही थोडे पार्शी व ख्रिश्चन होते. पण त्यांची संख्या दहापाचपेक्षा जास्ती नसावी. त्रैमासिक कोणत्या भाषांत काढावें, हा एक मोठा वादाचा मुद्दा कांही दिवस झाला होता. इंग्रजी भाषेबद्दल वाद नव्हताच. त्याचप्रमाणे मराठी बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने मराठीकरिता कांही पानें देण्याचें बहुतेक एकमताने ठरलेंच.

वाद निघाला तो कानडी भाषेकरिता. कानडी लेखांसाठी कांही भाग राखून ठेवलाच पाहिजे, असा आग्रह कानडी विद्यार्थ्यांनी धरला होता. या वेळीं कानडी लोकांच्या जेवणाचे दोन क्लब होते. दोन्ही क्लबांत या विषयासंबंधाने एकमत होतें. पण कित्येक मराठी विद्यार्थ्यांनी आम्हांला विरोध केला होता. त्यामुळे कानडी विरुद्ध मराठी असें या भांडणाला स्वरूप आलें होतें. कानडी विद्यार्थ्यांबद्दल मराठी मंडळीची थोडीशी तिरस्कारवृत्ती असे. पूर्वीं कांही (दोनचार) कानडी विद्यार्थ्यांकडून गैर वर्तन घडलें होतें, अशी एक परंपरागत हकीकत त्या वेळीं प्रचलित होती. ही गोष्ट खरी असल्या-बद्दल कांही विश्वसनीय पुरावा नाही. तथापि या कारणामुळे कांही मराठी विद्यार्थ्यांमध्ये कानडी मंडळींसंबंधाने गैरसमज झाला होता ही गोष्ट खरी आहे. शिवाय कानडी विद्यार्थी मराठी लोकांबरोबर मिळूनमिसळून वागत नाहीत, असा एक त्यांच्यावर आरोप असे. भाषेच्या वेगळेपणामुळे दळणवळणांत अडचणी येतात ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे कानडी लोक मराठी लोकांबरोबर कां मिळूनमिसळून वागत नाहीत याचा उलगडा होतो. पण हें कारण लक्षांत न घेतल्यामुळे महाराष्ट्रीय हे फार प्रांतिक अभिमानी व चढेल वृत्तीचे, असें कानडी लोकांना वाटे. उलट कानडी हे एकलकोंडे, अस्ताव्यस्त, अव्यवस्थित व एकंदरीने मागसलेले असें मराठी लोकांना वाटे. कोणत्या एका प्रसंगीं डॉ. भांडारकरांनी कानडी विद्यार्थ्यांना उद्देशून "Your language is the language of southern barbarians" अशा प्रकारचे उद्गार काढल्याची दंतकथाही प्रचलित होती. कानडी विद्यार्थ्यांना थोडेंबहुत तरी मराठी समजत होतें. पण मराठी लोकांना कानडीचें मुळींच ज्ञान नव्हतें. त्यामुळे कानडी लोक आपली भाषा बोलूं लागले म्हणजे मराठी लोकांना हसूं येत असे. तें पाहून कानडी लोकांना फारच चीड येत असे. कानडी क्लबांत कर्नाटकी पद्धतीप्रमाणे स्वयंपाक होत असे. त्यांत सकाळच्या जेवणाला 'सार' हा पदार्थ असावयाचाच व तो तयार करण्यांत आमचा स्वयंपाकी व्यंकाप्पा याचा हातखंडा असे. आमच्या क्लबांत केव्हा-केव्हा मराठे मंडळी पाहुणे म्हणून येत असे. त्या वेळीं सार हा आमच्या विशेष आवडीचा पदार्थ आहे असें त्यांना आढळून येई. तेव्हा ते आमच्या या पदार्थावरून आमची थट्टा करीत. याला तोड म्हणून मराठी लोकांना कढी फार आवडते म्हणून कानडी लोक मराठी लोकांना 'पळद्या' (म्हणजे कढी) या नावाने संबोधीत असत. असा विनोद चाले. पण कानडी-मराठी वादाला जेव्हा तोंड लागे तेव्हा या विनोदाच्या विषयांना गंभीर व हिडीस स्वरूप येई.

मला कानडी व मराठी या दोन्ही भाषांतून बोलतां येत असे. त्यामुळे दोन्ही भाषा बोलणाऱ्यांत माझे स्नेही होते. पण कांही मराठी बोलणाऱ्या लोकांचा व माझा विशेष परिचय असल्याकारणाने मराठी लोक मला महाराष्ट्रीयच समजत असत. सुधारक पक्षाचा अभिमान घेऊन आमच्या क्लबांत मी वाद करीत असें, म्हणून क्लबांतील कांही मंडळींचा माझ्यावर राग असे. त्यामुळे माझा मराठी पक्षाकडे जास्त

ओढा आहे अशी त्यांची कुरकूर असे. महाराष्ट्रांत रानडे, टिळक, आगरकर, गोखले, आपटे, यांच्यासारखे किती तरी लोक देशहिताच्या दृष्टीने स्वार्थत्यागपूर्वक काम करणारे आहेत, म्हणून महाराष्ट्रियांना त्यांचा व आपल्या प्रांताचा अभिमान असणें साहजिकच आहे असें माझें मत असे. उलट, आमच्या प्रांतांत तशा प्रकारचीं कामें करणारे लोक नसल्याने आमच्याबद्दल महाराष्ट्रियांना विशेष आदर न वाटणें हेंही साहजिक आहे, असें मी केव्हाकेव्हा म्हणत असें. या माझ्या मतामुळे मी कर्नाटकी असूनही मला महाराष्ट्राचाच अभिमान व पक्षपात जास्ती आहे, असा आरोप माझ्यावर होत असे., तथापि ही गोष्ट कबूल केली पाहिजे की, मराठी लोक कानडी लोकांना तुच्छतेने वागवीत. 'कानडीआप्पा' म्हणजे एक निंदाव्यंजक शब्दच झाला होता. कित्येक मराठी लोक मला "का हो, तुमच्यामध्ये विवाह, उपनयन वगैरे संस्कार होतात का हो?" किंवा "तुम्ही संध्या वगैरे नित्यकर्मांत किंवा तुमच्या संस्कारांत संस्कृतच भाषा वापरतां का?" असा प्रश्न करीत. एकदा तर एका गृहस्थाने "तुमच्या कानडी लोकांत ब्राह्मण असतात काय हो?" असा प्रश्न केला. प्रसिद्ध महाराष्ट्रीय वाङ्मय-सेवक श्री. कृ. कोल्हटकर यांनी आपल्या पुस्तकांत कानडी भाषेचें वर्णन करतांना एका लहान मडक्यांत खडे घालून ते हलवल्याने जो आवाज निघतो त्याप्रमाणे कानडी भाषा ऐकल्याने आपल्याला होतें, असें विनोदाने लिहिलें आहे. कानडी भाषेबद्दल मराठी लोकांचें मत किती विपर्यस्त आहे हें दाखवण्याकरिता कानडी लोक या वरील कोल्हट-करांच्या कोटीचा दाखला अद्यापि देत असतात. या अज्ञानाबद्दल आमच्या मंडळींना फार राग येत असे; आणि याला उत्तर म्हणून द्वैत, अद्वैत मतांचे संस्थापक आचार्य हे कर्नाटकीयच आहेत व ते होऊन गेले म्हणूनच वैदिक धर्माची व संस्कृतीची प्रतिष्ठा राहिली वगैरे मतें आमची मंडळी प्रतिपादन करीत असे.

याप्रमाणे स्थिती असतां त्रैमासिकांत कानडीला स्थान असावें की नाही याबद्दल वाद निघाला. वादाला तीव्र स्वरूप आलें होतें. पण माझ्या मध्यस्थीचा या वेळीं चांगला उपयोग झाला व कानडीला त्रैमासिकांत स्थान मिळालें. इतकेंच नव्हे, तर या त्रैमासिकाची व्यवस्था करण्याचें काम माझ्याकडे सोपवण्यांत आलें व कानडी लोकांच्या संबंधाने आपल्या मनांत कोणत्याही प्रकारचा अनादर नाही हें दाखवण्याकरिता माझें नाव व्यवस्थापक म्हणून त्रैमासिकाच्या मुखपृष्ठावर छापावें असें ठरलें. त्याप्रमाणे ती पद्धत अमलांतही आली.

## डेक्कन कॉलेजांतील चार वर्षें

त्रैमासिक आर्यभूषण छापखान्यांत छापलें जात असे. पत्रव्यवहार करणें, लेख जमवणें, छापवणें, अंक पाठवणें, वर्गणी व खर्च यांचा हिशेब ठेवणें वगैरे व्यवस्थेचीं सर्व कामें मीच करीत असें आणि त्यांत मला मोठी हौस वाटत असे. कानडी लेख त्रैमासिकांत येऊं लागले व मला व्यवस्थापकाचें काम

देण्यांत आलें, तरी आमच्या क्लबांतील कांहीं मंडळींचें समाधान झालें नाही तें नाहीच. 'जुना विद्यार्थी' या नात्याचा संबंध आला नाही, तथापि माझ्या आयुष्यांतील हीं चार वर्षें फारच महत्त्वाचीं गेलीं असल्यामुळे त्या संस्थेबद्दलचा आपलेपणाही गेला नाही. डेक्कन कॉलेजला एक टॉवर असे आणि तो पुण्याहून मुंबईस जाणाऱ्या गाडींतून थोडा वेळ दिसे. पुण्याहून मुंबईस जाण्याचे मला अनेक प्रसंग आले. त्या वेळीं हा टॉवर गाडींतून पाहण्याला मला मौज वाटे; व टॉवर पाहून कॉलेजांतील दिवसांच्या बऱ्याच आठवणी जागृत होत. अलीकडे तो टॉवर पाडून टाकण्यांत आला आहे. अर्थातच तो पाहण्याची माझी हौसही त्याबरोबरच गेली.

डेक्कन कॉलेजांत ऑक्सनहॅम, सेल्बी, बॅरेट हे इंग्रज प्रोफेसर आमच्या वेळीं होते. ऑक्सनहॅम फारच थोडे दिवस होते. शिकवण्यापेक्षा विनोदी कोट्या करण्यांतच त्यांचा वेळ जाई. त्यामुळे त्यांच्या वर्गांत पुष्कळ करमणूक होत असे. सेल्बी यांच्या स्वभावांत हा विनोदीपणा नव्हता असा विद्यार्थ्यांचा ग्रह होता.' आपला विषय ते उत्तम प्रकारें शिकवीत. पण नियमित पुस्तकांच्या बाहेर ते कांही सांगत नसत. टापटीप, व्यवस्था, नियमितपणा, शिस्त यांकडे त्यांचें लक्ष असे. बॅरेट हे एक साधारण शाळामास्तराप्रमाणे शिकवीत. मी बी. ए. मध्ये असतांना प्रो. बेन यांची इतिहास-व-अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली. हे विषय माझे नसल्याकारणाने त्यांच्या शिक्षणाच्या पद्धतीसंबंधाने मला माहिती नाही. तथापि त्यांची पद्धती फार चांगली होती असा त्यांचा लौकिक लवकरच झाला. त्यामुळे पाचसहा वेळां मी त्यांच्या वर्गांत गेलों होतों. नियमित पुस्तकें शिकवीत असतां त्याबाहेरची माहिती ते बरीच सांगत, आणि नियत पुस्तकांतील विषयांची साधकबाधक चर्चा करण्यांत त्यांचा हातखंडा असे. केवळ 'टेक्स्ट बुक' शिकवण्याचें त्यांचें धोरण नसे. विद्यार्थ्यांना विषय चांगला समजून द्यावा हें त्यांच्या शिक्षणाचें धोरण होतें. सेल्बींची पद्धती अगदी यांच्या उलट. 'टेक्स्ट' पुस्तकांच्या बाहेर ते फारसे जात नसत. बर्कचें 'Reflections on French Revolution', बेकनचें 'Advancement of Learning' या पुस्तकांवर त्यांनी टिपणेंही प्रसिद्ध केलीं होतीं. त्यांच्या शिक्षणामुळे परीक्षेंत फायदा होत असे. पण इतर फायदे होत होते असें मला तरी वाटत नाही. डॉ. भांडारकर, करकरे, काथवटे असे हिंदी प्रोफेसर होते. त्यांपैकी डॉ. भांडारकरांनी पेन्शन घेतल्यानंतर काथवट्यांची नेमणूक झाली होती. विद्वत्तेबद्दल भांडारकरांचा लौकिक विशेष होता. काव्यें, नाटकें वगैरे शिकवतांना त्यांना हौस वाटत नसावी, असा माझा ग्रह झाला होता. तर्कसंग्रह, शांकरभाष्य, काव्यप्रकाश वगैरे शास्त्रीय ग्रंथ शिकवण्यांत त्यांना हौस वाटत होती. डॉ. भांडारकर व सेल्बी यांचा दरारा वाटत असे. करकरे हे गणित विषयाचे प्रोफेसर होते. हे ब्राह्मण असून लहानपणींच इंग्लंडला गेले होते व तेथेच त्यांनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली होती. तथापि त्यांची ख्रिस्ती धर्मावर श्रद्धा होती असें दिसत नव्हतें. टकर म्हणून कोणी एक इंग्रज अधिकारी होते. त्यांच्या आश्रयाने ते इंग्लंडला गेले

होते. त्यांनी धर्मांतर जरी केलें होतें तरी आपलें पूर्वीचेंच नाव—गोविंद विठ्ठल करकरे—कायम ठेवलें होतें. त्यांचा पोषाख सर्व इंग्रजी पद्धतीचा असे. म्हणून त्यांना विनोदानें कांही विद्यार्थी 'गोविंदसाहेब' असें म्हणत. विद्यार्थ्यांशीं ते पुष्कळ मिळूनमिसळून वागत. यांच्या वर्गांत थट्टामस्करी, हशा वगैरेची रेलचेल असे; शिक्षण वेताबाताचेंच असे. त्यांची बॅरिस्टरीची परीक्षा झाली होती व नोकरी धरण्यापूर्वी कांही दिवस तो धंदाही ते करीत असत. तो किफायतशीर धंदा सोडून शिक्षणखात्यांत कां आलांत, असा मीं त्यांना एकदा प्रश्न केला होता. मला तो धंदा साधला नाही, असें त्यांनी प्रांजलपणें सांगितलें. वर्गाबाहेर व केव्हाकेव्हा वर्गांतही ते मराठींतच विद्यार्थ्यांशीं बोलत असत. त्यांच्या इंग्रजी बोलण्यांत कधीकधी व्याकरणाच्या चुका होत असत. बॅरेटसाहेब व ते बोलत बसले म्हणजे बॅरेटच्या मनांत 'Indian English Corrected' हें पुस्तक लिहावयाचें आहे, म्हणून ते या पुस्तकाची सामग्री जुळवण्याकरता प्रो. करकऱ्यांशीं संभाषणाचे प्रसंग आणतात, अशा प्रकारची थट्टा विद्यार्थ्यांमध्ये चाले. करकरे यांना चिडवण्याकरिता एकदोघांनी ही गोष्ट त्यांच्या कानावरही घातली. ते चिडत असत. पण त्यांचा राग फार वेळ टिकत नसे. त्यांच्या वर्गांत शांतपणा राहात नसे. प्रीव्हिअसमध्ये असतांना आम्हीं मुद्दाम बेत करून करकरे यांच्या तासांत कांही बोलावयाचें नाही, हसावयाचें नाही व शांतपणें बसून तास घालवावयाचा असें एकदा ठरवलें होतें. दहापंधरा मिनिटें झाल्यानंतर करकरे यांनाच तें कसेंसेंच वाटूं लागलें. एकदम "You fools, why do you not speak and laugh to-day ?" असें वर्गांत विचारलें व त्याबरोबर हशा पिकला.

ऑक्सफर्ड, केंब्रिज यांसारख्या युरोपियन देशांतील कॉलेजांतील प्रोफेसर व विद्यार्थी यांचें संघटन विशेष असतें व प्रोफेसरांची विद्यार्थ्यांवर बरीच छाप असते व तिचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यावर होत असतो असें म्हणतात. पण मला मात्र त्या अनुभवाचें भाग्य लाभलें नाहीं. इतरांचा अनुभव माझ्यापेक्षा निराळा असेल असें मला अद्यापि वाटत नाही. ही स्थिती डेक्कन कॉलेजलाच लागू आहे असें नाही. आणि अजूनही या बाबतींत विशेष सुधारणा झाली आहे असें म्हणतां येईल असें वाटत नाही.

कॉलेजांत बाहेरील विद्वान लोकांचीं व्याख्यानें करवण्याची पद्धत कांही दिवस चालू होती. न्या. रानडे, तेलंग, वामन आबाजी मोडक यांचीं व्याख्यानें झालीं होतीं. रानड्यांनी हिंदुस्थानच्या अर्थशास्त्रावर एक निबंध वाचला होता. रानडे यांची इतिहास व अर्थशास्त्र या विषयांत बरीच प्रसिद्धी आहे, याकरिता त्यांचें व्याख्यान ऐकण्याकरिता तुम्हीं जरूर हजर असावें असें प्रो. बेन यांना कांही विद्यार्थ्यांनी कळवलें होतें. ते हॉलच्या बाहेरूनच कांही वेळ ऐकत उभे होते. पण कांही वेळानंतर रानड्यांच्या विचारांत कांही तरी महत्त्वाचें, अपूर्वाईचें आहे असें त्यांना वाटून ते हॉलच्या आंतल्या बाजूला उभे राहून शेवटपर्यंत ऐकत होते. दुसरे दिवशीं वर्गांत त्यांनी रानड्यांबद्दल आदरयुक्त उद्गार काढले.

मराठी कवींच्या संबंधानें मोडक यांनी एक निबंध वाचला होता, असें मला आठवतें. मोडक हे मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कूलचे प्रिन्सिपॉल होते व नुकतेच पेन्शन घेऊन पुण्यास येऊन राहिले होते. त्यांची त्या वेळीं प्रतिष्ठित सुधारकांत गणना होती. रानडे, भांडारकर, चंदावरकर, यांच्याप्रमाणेच ते प्रार्थनासमाजाचे पुरस्कर्ते होते. त्यांची एक मुलगी न्या. रानडे यांचे बंधू डॉ. रानडे यांना दिली होती त्यामुळे त्यांचा व रानड्यांचा विशेष स्नेहसंबंध होता. मोडकांचे एक चिरंजीव गोविंदराव ऊर्फ बापू हे आमच्या कॉलेजांत प्रीव्हिअसच्या वर्गांत आले होते. गावांत त्यांचें घर असल्यामुळे ते कांही दिवस गावांत राहात असत. पण कांही दिवस कॉलेजमध्येही ते राहिले होते. ते माझ्या खालच्या वर्गांत होते तरी माझा व त्यांचा चांगला स्नेह जमला होता. याचें मुख्य कारण असें होतें की ते एका प्रसिद्ध सुधारक घराण्यांतील असल्यामुळे आणि त्यांच्या व बऱ्याच सुधारकांच्या प्रत्यक्ष ओळखी वगैरे असल्यामुळे आमचीं सामाजिक मतें जुळत होतीं. यांच्या स्नेहामुळे मला मोडकांच्या घरीं जाण्याची संधी पुष्कळ मिळाली, व सुधारकांत अग्रणी गणल्या जाणाऱ्या कुटुंबाची गृहस्थिती थोडीबहुत तरी समजली. आमच्याकडील गृहस्थितीपेक्षा या मंडळींची गृहस्थिती किती तरी पटीनें सुधारलेली आहे, असें मला वाटत होतें. कुटुंबांत पुरुषांनी व बायकांनी मिळूनमिसळून वागणें, नवराबायकोंनें मोकळेपणानें एकमेकाशीं बोलणें वगैरे गोष्टी माझ्या कल्पनेंतच होत्या. त्या प्रत्यक्ष पाहण्याचा व अनुभवण्याचा योग आला .नव्हता. मोडकांच्या कुटुंबांत त्या पाहण्याला मिळाल्या व मी मुलाचा स्नेही म्हणून मलाही मोकळेपणानें वागण्याची संधी मिळाली.

पहिल्यापहिल्यांदा त्यांच्या कुटुंबांतील स्त्रियांबरोबर मी आमच्या तिकडील पद्धती-प्रमाणेच वागत होतों. मोकळेपणानें वागण्यांत अतिशय संकोच वाटत असे व पुरुष मंडळींपैकी कोणी असल्याखेरीज मी एकटाच कुटुंबांतील कोणाही बायकांबरोबर बोलत नसें. फार झाल्यास प्रश्नाला उत्तर देण्याइतकेंच बोलत असें. पण कांही दिवसांनी हा भ्याडपणा किंवा लाजाळूपणा कमीकमी होत चालला. मोडकांच्या कुटुंबाच्या व मुलींच्या माझ्याबरोबर वागण्याच्या पद्धतीमुळेच माझ्यांत ही सुधारणा झाली. राजा राममोहन राय यांच्या पुण्यतिथीसंबंधानें पुणें येथील प्रार्थनासमाजांत वामनरावजींचें मुख्य भाषण होणार होतें, म्हणून मला त्यांच्या चिरंजिवांनी गावांत येण्याबद्दल मुद्दाम आमंत्रण दिलें होतें. मलाही मोठ्या लोकांचीं व्याख्यानें ऐकण्याची हौस होतीच. म्हणून कॉलेजला त्या दिवशीं रजा देऊन मी गावांत गेलों होतों. वामनरावांबरोबरच प्रार्थनासमाजाला गेलों होतों. त्यांचें भाषण अर्धेमुर्धें झालें असेल नसेल, इतक्यांत त्यांना अर्धांगवायूचा झटका येऊन ते बेशुद्ध होऊन पडले. रानडे, भांडारकर वगैरे मंडळींनी त्यांना सावरून धरलें. त्याच स्थितींत त्यांना घरीं आणलें. मीही त्या रात्रीं त्यांचे घरींच राहिलों. पुढे

दहापंधरा दिवसपर्यंत त्यांच्या शुश्रूषेकरिता त्यांच्या चिरंजिवाबरोबर कांही वेळ त्यांच्याकडेच राहात असें. मुंबईचे प्रसिद्ध समाजिस्ट व वामनरावजींचे स्नेही तखेंड हेही कांही दिवस येऊन राहिले होते. रानडे, भांडारकर वगैरे मंडळीं समाचाराकरिता वरचेवर येऊन जात असत. त्या प्रसंगाने रानड्यांची थोडी ओळख झाली होती. या माझ्या राहण्याने माझा व मोडक कुटुंबाचा बराच संबंध आला. आमच्या तिकडील राहणीपेक्षा पुण्याकडील अस्सल सुधारकांच्या राहणींत पुष्कळच सुधारणा दिसली.

आजच्या स्थितीशीं ताडून पाहतां त्याला कांही विशेष महत्त्व आहे असें नाही. त्या वेळीं माझ्या मनावर सुधारकांसंबंधाने व त्यांच्या कुटुंबव्यवस्थेसंबंधाने बरेच अनुकूल परिणाम झाले. पण वरवर दिसणारी राहणी सोडून सुधारकांच्या मनोभावनेसंबंधाने तितका अनुकूल ग्रह झाला नाही हेंही कबूल केलें पाहिजे. कौटुंबिक राहणीवरून सोवळेंओवळें किंवा जातिभेद मानण्याकडे प्रवृत्ती वरवर पाहणाऱ्यांना दिसत नसे ही गोष्ट खरी. पण या भावना पूर्णपणें मनापासून गेल्या आहेत असें मला वाटलें नाही. कदाचित ही माझी चूक असेल. पण मला जें वाटलें तें लिहिणें योग्य वाटलें म्हणून त्याचा उल्लेख मीं केला आहे.

### *तरुण स्त्रीबरोबर फिरण्याचा अनुभव*

वामनरावांच्या कुटुंबांत मी एक कर्नाटकांतील सुधारक घराण्यापैकींच आहे अशी कल्पना झाली होती. माझ्या बोलण्याचालण्यावरून तशी त्यांची कल्पना होणें हें योग्यच होतें. त्यांची कल्पना चुकीची आहे असें समजावून देण्याचा मीं एकदोन वेळां प्रयत्न केला. पण त्यांची ही कल्पना अजिबात गेली नसावी.

वामनरावांच्या धाकट्या मुलीला धारवाडास रामचंद्र बाळाजी करंदीकर यांना दिली होती. हें लग्न मुंबईस झालें होतें. त्या वेळीं हुंड्याच्या बाबतींत मोडक व करंदीकर यांच्यामध्ये वांधा उत्पन्न झाला होता असें मला समजलें. अस्सल सुधारक व सुशिक्षित कुटुंबांतदेखील हुंड्याची चाल अस्तित्वांत असावी व त्याबद्दल तंटेभांडणें उत्पन्न होऊन ठरलेलें लग्न मोडण्यापर्यंत पाळी यावी, हें समजून मला आश्चर्य वाटलें. मोडकांची व माझी ओळख झाल्यानंतर धारवाडास सासरीं जातांना ही मुलगी आमच्याकडे उतरून जात असे. त्यांच्या नजरेला आमचा मागासलेपणा पडूं नये म्हणून मी फारच जपत असें आणि ती येणार म्हणून पत्र आलें की, माझ्या बहिणीने व माझ्या बायकोने कसें वागावें याबद्दल मी आगाऊ सूचना देत असें. पण त्यांचा उपयोग आमच्या घरीं कांहीच झाला नाही. आमच्या घरीं अपरिचित विषयावर त्या बाई बोलणें काढीत. त्या वेळीं माझी बायको कांही न बोलतां स्वस्थ बसे. माझ्या बायकोपेक्षा माझ्या बहिणीला आमच्या घरीं जास्ती स्वातंत्र्य असे. आणि ती मराठी पाच इयत्तांपर्यंत शिकलेली असल्याने घरीं येणारीं वर्तमानपत्रें वगैरे केव्हा केव्हा वाचीत असे. त्यामुळे तिला पाहुण्यांचें भाषण ऐकून कांही तरी उत्तर देतां येत असे. पण सोवळ्याओवळ्याचे बाबतींतील

आमच्या घरचा कडकडीतपणा त्यांना बराच भोवत असे. माझ्या बायकोला बरोबर देऊन त्यांना गाव दाखवण्याचें मीं मनांत योजलें होतें. पण बरोबर मीं असावें असा त्या बाईंनी आग्रह धरला व मीही कबूल झालों. त्यामुळे माझा ठरवलेला बेत सर्व फिसकटला. माझें जाण्याचें ठरल्याबरोबर माझ्या बायकोनें आमच्या बरोबर येण्याचा बेत रहित केला व मला एकट्यालाच जावें लागलें. रस्त्याने फिरावयाला गाडींतून एका तरुण बाईबरोबर जाण्याचा हा माझा पहिलाच अनुभव असल्याने मलाही कसेंसेंच वाटलें. तथापि मोडकांचा व माझा बराच संबंध आला होता, त्यामुळे विशेष अडचण भासली नाही. पण रस्त्यांत माझ्या ओळखीच्या व अनोळखीच्या लोकांनादेखील हा देखावा पाहून आश्चर्य वाटलें असावें. कित्येकांनी दुसऱ्या दिवशीं या बाई कोण होत्या याबद्दल माझ्याजवळ पृच्छाही केली.

चाळीस वर्षांपूर्वी बेळगावांत ही स्थिती होती. अलीकडे विचारांत बराच बदल होत आहे. असा पाहुण्यांचा ग्रह होणें अगदी स्वाभाविक होतें व त्याप्रमाणे त्यांनी माझ्या-जवळ उद्गारही काढले. त्यामुळे मला मात्र अगदी शरमल्याप्रमाणे त्या वेळीं वाटलें. मोडकांच्या घरीं बोलण्यांत मी सुधारकी थाटानें बोलत असें. माझे विचारही तसेच होते. सोवळ्याओवळ्याचा विधिनिषेध न मानणें, जातिभेदाला धरून न वागणें, इत्यादि माझ्या स्वाधीनच्या गोष्टी मी अमलांतही आणण्याचा शक्य तो प्रयत्न करीत असें. पण ज्या गोष्टींत दुसऱ्या व्यक्तींचा संबंध येत असे त्या गोष्टी पराधीन पडल्यामुळे माझें कांही चालत नव्हतें.

माझीं मतें व आचार यांच्याशीं माझ्या घरची राहणी विसंगत होऊं नये म्हणून मी घरीं प्रयत्न करीत नसें असें नाही. पण, केवळ माझ्या बाबतींत माझ्या वागणुकीसंबंधाने घरची मंडळी—विशेषतः वडील मंडळी—कानाडोळा करीत. मी घरीं एकटाच लाडका असल्यामुळे त्यांचा नाइलाज होई. पण, त्या वेळीं तरी त्यांच्या आचरणावर फारसा परिणाम झाला नाही. अगदी अलीकडे माझें म्हणणें थोडेंथोडें माझ्या मातुःश्रीला पटत चाललें होतें, असें मला वाटूं लागलें होतें.

### *कुटुंबाला सुधारण्याचे प्रयत्न*

त्या वेळीं माझी सत्ता कांही तरी चालवण्याचें ठिकाण म्हणजे माझी बायको. पण तिची मनःस्थिति अशी होती कीं, मला या बाबतींत माझी आईच पुष्कळ समजूतदार वाटत होती. बायकोने लिहावयाला व वाचावयाला शिकावें म्हणून मीं प्रयत्न केला. पण यश आलें नाही. या कामीं यश येण्याकरिता घरीं मोकळेपणानें राहण्याची जितकी सोय आवश्यक असावी तितकीही मला मिळाली नाही. माझ्या बहिणीकडून थोडें तरी माझ्या बायकोने शिकावें अशी माझी इच्छा होती आणि त्याप्रमाणे मीं दोघींनाही सांगितलें होतें व बहिणीनें कबूलही केलें होतें. पण बायकोच्या मनाला ही व्यवस्थाही पटली नाही. असें कां व्हावें याचा तपास करण्याचें मीं ठरवून

याबद्दल कसून बायकोला एकदा विचारून पाहिलें. माझा आग्रह पाहून उत्तर मिळालें, पण त्यामुळे माझी तिला शिकवण्याची हौस गार झाली व पुन्हा मीं प्रयत्न केला नाही. बायकांनी लिहिण्याला व वाचण्याला शिकल्यास सरस्वतीदेवीचा शाप होतो, असें मला बायकोकडून स्पष्टीकरण मिळालें. यानंतर मीं हा नाद सोडून दिला.

पहिल्या बी. ए.च्या वर्गात आम्हांला भवभूतीचें उत्तररामचरित हें नाटक होतें व भांडारकर हें नाटक अगदी मनापासून शिकवीत. प्रेमासंबंधाचे व स्त्रीदाक्षिण्याचे अनेक प्रसंग त्या नाटकांत आहेतच. भांडारकर हे प्रसंग जेव्हा मनापासून शिकवीत, तेव्हा त्याचा परिणाम तरुण विद्यार्थ्यांवर होणें अगदी साहजिक होतें. निदान माझ्यावर तरी तसे परिणाम झाले व याचा अनुभव घरीं घ्यावा अशी इच्छाही झाली. पण घरीं वडील माणसें असतांना विचार अमलांत आणणें कठीण होतें. पण, कर्मधर्मसंयोगाने वडील माणसें बेळगावास नसतांना आम्हां दोघांनाच घरीं राहण्याचा योग एकदा आला. त्याचा पूर्ण फायदा घ्यावा असें माझ्या मनांत आलें व त्याप्रमाणे मीं प्रयत्नाला सुरुवातही केली. कॉलेजांत असतांना चहा, बिस्किटें, पाव वगैरे मी केव्हाकेव्हा खात असें. घरींही चहा, हंटले-पामरचीं बिस्किटें माझ्या पुरतीं चालत होतीं. पण पाव मात्र आणला नव्हता. घरीं आम्ही दोघेंच होतों त्या अवधींत एके दिवशीं मला पाव आणून टोस्ट करून चहाबरोबर खाण्याची हौस आली. बायकोलाही टोस्ट करण्याची विद्या शिकवावी, म्हणजे पुढेमागे पुनः लागल्यास आपल्याला तिच्या हातचा टोस्ट मिळेल, अशी मला आशा होती. म्हणून मीं माजघरांत बसून पावाचे तुकडे करून टोस्ट करण्याची तयारी केली व टोस्ट भाजण्याची क्रिया समजावून दिली. बायकोने हा सर्व प्रकार पावाला स्पर्श न करतां दुरूनच पाहिला. मला त्याचें कांही विशेष वाटलें नाही. पण माझें सर्व खाणेंपिणें संपवून मी बाहेर सोप्यांत आल्यानंतर माझ्या कुटुंबाने वस्त्रांतर करून माजघर सर्व सारवून काढलें व त्या जागेची शुद्धी केली. हें मला समजल्यानंतर माझें मनोराज्य बहुतेक ढासळलेंच. बाहेर वाटेल तें केलें तरी आपण लक्ष देणार नाही, पण हे प्रकार घरीं न झालेले बरे, असा मला सौम्य शब्दांत इशाराही मिळाला.

याचप्रमाणे एकदा आम्हां दोघांनाच आगगाडींतून जाण्याचा प्रसंग आला. स्टेशनावर गेल्यानंतर गाडींत दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत कोणी उतारू नव्हते. म्हणून दोघांनीच मिळून प्रवास करण्याची संधी दवडूं नये असें मला वाटलें आणि मीं दोघांकरिता दुसऱ्या वर्गाचीं टिकिटें काढलीं. कुटुंबाला तिसऱ्या वर्गाच्या बायकांच्या डब्यांतून इकडे येण्याबद्दल गड्याकडून निरोप पाठवला. त्यामुळे नाइलाज होऊन तिला यावें लागलें. पण दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत ती न बसतां उभीच राहिली. डब्याजवळच प्लॅटफॉर्मवर ओळखीच्या लोकांबरोबर मी बोलत उभा होतों म्हणून ही बसली नसेल व गाडी चालू झाल्यावर बसेल असें मला वाटलें. गाडी चालू झाल्यावर मी आंत जाऊन बसलों, तरी ती बसेना. म्हणून " बसत कां नाही ", असें मीं विचारलें. " हा डबा साहेबांचा आहे आणि त्या डब्यांत

बायका बसतील तर त्यांना विटाळ होईल" असें उत्तर मिळालें ! या व अशाच प्रकारच्या आणखी कांही गोष्टींवरून माझ्या गृहसौख्यांत बरीच अडचण उत्पन्न होणार अशी माझी कल्पना झाली, आणि ती कल्पना माझी बायको मरेपर्यंत खरी ठरली. याबद्दल पुष्कळ जबाबदारी माझ्यावरच आहे हें मी कबूल करतों. प्रतिकूल परिस्थितींतदेखील मला पुष्कळ इष्ट गोष्टी शांतपणाने व चिकाटीने घडवून आणतां आल्या असत्या. पण तितका शांतपणा व चिकाटी माझ्या स्वभावांत त्या वेळीं तरी नव्हती. त्यामुळे सर्व बेत फिसकटले व प्रपंचाच्या एका मुख्य भागाचें सौख्य मला लाभलें नाही.

या सर्व कारणांमुळे बालविवाहासंबंधाने माझे ग्रह पूर्वी जे प्रतिकूल होते ते जास्ती दृढ झाले. त्याचप्रमाणे घरच्या वडील माणसांनीच वाटेल तशीं लग्नें जुळवावयाचीं व ज्यांचीं लग्नें होऊन जन्माचे संबंध यावयाचे त्यांच्या इच्छेकडे बिलकूल पाहावयाचें नाही, किंबहुना त्या इच्छेला कोणत्याही प्रकारें वाव देखील देण्याची संधी मिळूं द्यावयाची नाही, याबद्दल मला आमच्या जुन्या पद्धतीसंबंधाने चीडही वारंवार येत असे. आज चाळीस वर्षांनंतर कांही आर्थिक अपरिहार्य अडचणींमुळे लग्नाची वयोमर्यादा सार्वत्रिक वाढलेली आहे. पण या बदललेल्या परिस्थितीच्या मुळाशीं विवाहपद्धतींत सुधारणा व्हावी हें कारण कितपत असेल याबद्दल खात्री होत नाही. बालविवाहाची रीत वाईट म्हणून अपवादात्मक कांही प्रौढ विवाह होत असतील. पण इतर बाबतींत विचाराची दिशा बदलली आहे असें म्हणवत नाही. कांही दिवसांपूर्वी पुणें येथील युवक संघामार्फत 'विवाहोत्तर प्रेम की प्रेमोत्तर विवाह' या विषयावर चर्चा करण्याकरिता एक सभा भरली होती. त्या वेळीं अशा गंभीर स्वरूपाच्या विषयासंबंधाने तरुण मंडळींनी दंगा करून चर्चा होऊं दिली नाही, यावरून माझ्या म्हणण्याला आधार मिळतो. पाश्चात्य शिक्षणाने ज्यांच्या विचारांत बदल व्हावयाला पाहिजे अशा तरुणांची ही स्थिती. जुन्या रूढीने बांधल्या गेलेल्या लोकांसंबंधाने तर बोलावयासच नको. नवीन पाश्चात्य वाङ्मय वाचून मनावर एका प्रकारचे परिणाम, तर घरची स्थिती व व्यवहार अगदी त्याच्या उलट, अशा कैचींत तरुण सापडले आहेत. जुन्यांतलें चांगलें व वाईट यांची निवड करून चांगलें ठेवण्याचा प्रयत्न करणेंही होत नाही आणि नवीन सर्वच चांगलें असें मनाने घेतलें तरी त्याप्रमाणे वागतां येत नाही. अशा कचाटींत आमचा सुशिक्षित म्हणवून घेणारा मध्यम वर्ग सापडला आहे. या स्थितीचे परिणाम अनिष्ट होणारच व त्याप्रमाणे माझ्यावरही झाले. यासंबंधाने माझी दुर्बलता माझ्या दोन मुलींच्या लग्नाच्या वेळीं दिसून आली. दोन्ही मुलींचीं लग्नें प्रौढपणीं माझ्या कल्पनेप्रमाणे व्हावींत, अशी माझी फार इच्छा होती. पण माझ्या वडिलांच्या इच्छेविरुद्ध मला जाण्याचें धैर्य झालें नाही. जी गोष्ट माझ्या बाबतींत करणें माझ्या अज्ञानामुळे मला शक्य झालें नाही, तीच गोष्ट मला समजूंउमजूं लागल्यानंतर देखील माझ्या मुलींच्या बाबतींत घडवून आणणें शक्य झालें नाही. असो.

## *कायद्याच्या अभ्यासाचा निश्चय*

१८९३ सालीं माझी बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर पुढील कायद्याच्या अभ्यासाकरिता—एल्‌एल्. बी. करिता—मुंबईला जावयाचें ठरलें. यापूर्वीच ओळखीच्या कोणातरी युरोपियन अधिकाऱ्याच्या मार्फत मुलकी खात्यांत वरिष्ठ दर्जाची म्हणजे मामलेदार किंवा तशीच एखादी हुद्द्याची जागा मला मिळवून द्यावी म्हणून माझ्या वडिलांनी प्रयत्न केले होते. वडिलांची व जे युरोपियन गृहस्थ त्या वेळीं गव्हर्नरसाहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते त्यांची ओळख होती. माझे आजे व पणजे यांनी सरकारी नोकरी एकनिष्ठपणें व राजनिष्ठपणें केली, म्हणून त्यांच्याजवळ कांही युरोपियन अधिकाऱ्यांचीं सर्टिफिकिटें होतीं. त्यांचाही उपयोग त्यांनी केला. सेल्बीसाहेबांची गाठ घेऊन त्यांचे स्नेही लीवॉर्नर यांचेमार्फत कांही साधतें का पाहावें असाही वडिलांचा विचार होता. आणि त्याप्रमाणे सेल्बीसाहेबांना ते भेटलेही होते. सेल्बीसाहेबांनी त्यांची निराशा केली नाही. मला एक दिवस त्यांनी आपल्या बंगल्यावर बोलावून घेऊन सरकारी नोकरींत जाण्याची माझी इच्छा आहे काय असा प्रश्न केला. मला पुढे कायद्याचा अभ्यास करावयाचा आहे असें मीं सांगितलें. वडिलांनाही त्याचप्रमाणे कळवलें. म्हणून त्यांनी तो नाद सोडला. एल्‌एल्. बी. होऊन नोकरी धरण्यांत अधिक फायदा आहे अशी त्यांची मीं समजूत केली व त्यांनाही तें खरें वाटलें असावें. नोकरीकडे माझा कल नव्हता व ही गोष्ट मीं वडिलांच्या कानांवर परोक्षअपरोक्षपणें घातली होती. माझ्या मनाविरुद्ध या बाबतींत जावें असें त्यांना वाटलें नसावें. म्हणून त्यांनी मला एल्‌एल्. बी. चा अभ्यास करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें मीं १८९४ सालीं जानेवारींत मुंबईला जाऊन टर्म भरण्याचें ठरवलें. पण त्या संधीलाच माझ्या मातुःश्रीची प्रकृती दोषी ज्वराने बिघडली. ती त्या दुखण्यांतून वाचेल असें आम्हांला वाटलें नव्हतें. शुश्रूषा करण्याची मुख्य कामगिरी माझ्याकडेच होती. अशा स्थितींत तिला सोडून जाणें माझ्या जिवावर आलें. डॉ. शिरगावकरांनीही न जाण्याचाच सल्ला दिला. त्यामुळे मला पहिली टर्म भरणें अशक्य झालें.

पूर्वी डेक्कन कॉलेजमध्ये Jurisprudence व Roman Law यांचा शिक्षण-क्रम असे, व बी. ए. होण्यापूर्वी या परीक्षेला बसतां येत असे. व्यंकटराव व रामचंद्र या नावाचे कर्नाटकी गृहस्थ पुण्यास सरकारी वकील होते. ते प्राध्यापक होते. या परीक्षेलाही टर्म भरावी लागत असे. मीही भरीत होतों. व्यंकटराव आपला विषय चांगला समजून देत असत. पण बहुतेक विद्यार्थी टर्म भरण्याकरिताच या वर्गात बसत. आठवड्यांतून दोन तास असत. पण या तासांना नियमितपणें येणारे विद्यार्थी थोडेच असत. तास संपल्यानंतर किंवा आरंभीं व्यंकटराव हजेरी घेत असत. कित्येक वेळां हजर असलेल्यांपैकी कित्येकांनी गैरहजर असलेल्यांची हजेरी दिलेली असे. व्यंकटराव अशा गोष्टींकडे फारसें लक्ष देत नसत. मी मात्र बहुतेक या वर्गात नियमाने जात

असें व लक्षपूर्वक त्यांचीं 'लेक्चर्स' ऐकत असें. शिवाय कांही नियमपुस्तकें माझ्या आवडीचीं होतीं. मी या कॉलेजच्या परीक्षेला बसलों होतों, व चांगल्या प्रकारें पासही झालों होतों. सगळ्या माझ्या परीक्षांत याच परीक्षेंत मला शेकडा ६० वर मार्क मिळाले होते. या कायद्याच्या अभ्यासांत माझी गती चांगली चालेल अशी मला उमेद आली. ही परीक्षा पास झालेल्या उमेदवारांना नवीन चालू झालेल्या पहिल्या एल्एल्. बी.च्या परीक्षेला न बसतां एकदम दुसऱ्या एल्एल्. बी.च्या परीक्षेला बसतां येत असे. याचा फायदा घेऊन एकदम शेवटच्या परीक्षेला बसावें असा माझा विचार होता. पण, आईच्या आजारामुळे मला मुंबईला दुसऱ्या एल्एल्. बी.ची टर्म भरतां आली नाही. त्यामुळे हा बेत फिसकटला. तथापि डेक्कन कॉलेजांत पहिल्या वर्षाच्या टर्म भरल्या होत्या. त्याचा फायदा घेऊन मीं पहिल्या एल्एल्. बी.ला बसण्याचें ठरवलें. आणि त्याप्रमाणे आईची प्रकृती सुधारल्या-नंतर, आनीखिंडीकर यांना डेक्कन कॉलेजांत फेलोशिप मिळाली म्हणून ते एम्. ए. च्या अभ्यासाकरिता कॉलेजांत राहिले तेव्हा घरीं चांगला अभ्यास होणार नाही म्हणून मीं परीक्षेपूर्वी कांही महिने डेक्कन कॉलेजमध्ये घालविले व परीक्षेला गेलों. त्याच वर्षी मी परीक्षा पास झालों.

## सबंध वर्ष खेळांत गेलें

१८९५ सालीं दुसऱ्या एल्एल्. बी.ची टर्म भरण्याकरिता मुंबईस जाऊन राहिलों. या वेळीं माझ्याबरोबर कृष्णाजी हरी केळकर, हायकोर्ट वकील, कृष्णराव गुंजीकर (माजी डेप्युटी कलेक्टर), वामन अच्युत देसाई (रा. ब. अच्युत भास्कर देसाई, असिस्टंट कमिशनर, दक्षिण भाग, ॲडमिनिस्ट्रेटर सांगली, यांचे चिरंजीव) अशी मंडळी होती. आम्ही सर्व गिरगावांत एक घर घेऊन राहिलों होतों. स्वयंपाक घरींच होत असे. या वेळीं माझा व देसाई यांचा विशेष स्नेह जुळला. पुढे तो बराच वाढला. या वेळीं मी, देसाई व गुंजीकर असे तिघे पी. वाय्. जिमखाना या नवीन निघालेल्या संस्थेचे मेंबर झालों. देसाई हे त्या वेळीं टेनिस चांगले खेळणाऱ्यांपैकी होते. गुंजीकरांना क्रिकेटचा विशेष नाद होता. मी टेनिस साधारण खेळत असें. पण स्वतः खेळण्यापेक्षा खेळ, मॅच, टूर्नामेंट वगैरे पाहण्याची मला फारच हौस असे. त्याच वेळीं कोल्हापूरचे गणपतराव मोडक हेही जिमखान्याचे मेंबर झाले. हेही डेक्कन कॉलेजमध्ये होते. तेव्हा माझा व त्यांचा स्नेह जमला होता. टेनिस व क्रिकेट या दोन्ही खेळांबद्दल त्यांची त्या वेळीं बरीच ख्याती होती. जिमखान्यांत निदान दोनतीन तास तरी मी घालवीत असें. हिंदू, पारशी व इस्लाम जिमखाने त्या सुमारासच अस्तित्वांत आले होते. त्यांत पार्शी जिमखाना जुना होता. लॉर्ड हॅरिस हे क्रिकेटपटू होते. यांनी या खेळाला या इलाख्यांत बरीच चालना दिली होती. त्यामुळे पुण्यामुंबईकडे क्रिकेटचे सामने बरेच होत असत. पुण्याच्या मंडळींत त्या वेळीं गणपतराव मोडक, बापट, हल्लीचे सांगली संस्थानांतील मुख्य पोलिस

अधिकारी भिडे, बाळकृष्णपंत सरदेसाई (माजी मिरजमळा संस्थानचे कारभारी) यांची बरीच प्रसिद्धी होती. मुंबईच्या खेळाडूंत, पार्शी मंडळींत पावरी, गम्राट, रायटर, बापासाला, मिस्त्री, वगैरे आणि हिंदूंत बंडा, कीर्तिकर, चाफेकर, विजयकर, वगैरे खेळाडू प्रसिद्ध असत. दादरकर, भांडारे, बाळू हे पुढे कांही दिवसांनी येऊन मिळाले. आमचे स्नेही गुंजीकर यांनाही मोठ्या सामन्यांत दोनचार वेळां घेण्यांत आलें होतें. सामने पाहणें व खेळाच्या गोष्टी यांतच माझा बहुतेक वेळ जात असे. हिंदू जिमखान्याच्या उत्कर्षाकडे विशेष लक्ष देणारे दक्षिणी गृहस्थांपैकी बंडोपंत भाजेकर हायकोर्ट वकील हे प्रमुख होते; त्याचप्रमाणे म्हैसूर प्रांतांतील सेटलूर या नावाचे एक गृहस्थ मुंबईस ॲडव्होकेट होते त्यांचेंही लक्ष क्रिकेटकडे असे. ते कर्नाटकी असल्याने माझा व त्यांचा चांगला परिचय या वर्षी झाला. भाजेकरांचीही ओळख चांगली झाली. यांच्याबरोबर कै. नानासाहेब देशमुख यांच्याकडे मी जात असें. नानासाहेबांचें त्या वेळीं दक्षिणी व गुजराथी दोन्ही समाजांत चांगलें वजन असे. याच सुमारास सर चुनीलाल मेथा हे मॅट्रिक पास होऊन कॉलेजांत गेले होते. तेही हिंदू जिमखान्याचे मेंबर होते. आमच्यापेक्षा हे वयाने लहान होते. पण टेनिस व क्रिकेट या दोन्ही खेळांत त्यांनी लवकर प्रगती करून प्रवीणता मिळविली. आणि पुढे यांना हिंदूंच्या क्रिकेट टीमचा म्होरकेपणा मिळाला. यांचा व देसाई यांचा बराच स्नेह जुळला, त्यामुळे माझी व त्यांची तेव्हा बरीच ओळख झाली होती.

देसाई यांच्या प्रयत्नाने मुंबईचे खेळाडू बेळगावाला युरोपियन खेळाडूंबरोबर सामन्याकरिता आले होते. त्या मंडळींत बाळूचा समावेश झाला होता. माझ्या ओळखीची बहुतेक मंडळी असल्याकारणाने त्यांना मीं घरीं मेजवानी केली होती. बाळू हे चांभार होते व इतर कांही ब्राह्मणेतर होते. सर्वांचीं पानें एकाच पंक्तींत मांडलीं होतीं. हें एक प्रकारचें सहभोजन झालें. बेळगावच्या कांही स्नेहीमंडळींना या भोजनाचा लाभ मिळाला.

### *राष्ट्रीय सभा व सामाजिक परिषद्*

१८९५ साल बहुतेक याप्रमाणे खेळांतच गेलें असें म्हणण्यास हरकत नाही. या वर्षाच्या डिसेंबरमध्ये पुण्यास राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरणार होतें व त्याचें अध्यक्षस्थान बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी मंडित करणार होते. राष्ट्रीय सभेबरोबर त्याच ठिकाणीं सामाजिक सभा भरवण्याची वहिवाट होती. सामाजिक सभेचें चालकत्व रावसाहेब रानडे यांच्याकडे असे. या निमित्ताने ते बहुतेक सर्व राष्ट्रीय सभांना हजर असत. आणि राष्ट्रीय सभा राजकीय असली तरी त्यांच्या सल्लामसलतीचा उपयोग होत असे अशी त्या वेळीं समजूत असे आणि ती खरी होती. डिसेंबरच्या पूर्वीपासूनच राष्ट्रीय सभेच्या मांडवांत सामाजिक परिषद भरूं द्यावयाची नाही, असा आग्रह टिळक आणि त्यांचे पक्षांतील लोकांनी धरला होता. पुण्याच्या वर्तमानपत्रांतून या प्रश्नावर खूप धडाक्याने वाद चालला होता. त्यामुळे माझें लक्षही

या वादाकडे बरेंच वेधलें होतें. हा वाद बालिशपणाचा असून टिळकांसारख्यांनी तो उचलून धरावा याबद्दल मला वाईट वाटत होतें, व एक प्रकारची मला चीडही आली होती असें म्हणतां येईल. यावेळीं पुण्यांतील विक्षिप्तपणाबद्दल प्रसिद्ध असलेली व्यक्ती—श्रीधर विठ्ठल दाते—यांची मदत टिळकपक्षाला होती. या गृहस्थांनी सार्वजनिक कामांत लक्ष घातल्याची माहिती नव्हती. ,ते कायदेबाज व मोठे खटपटी गृहस्थ आहेत अशी त्यांच्याबद्दल मला माहिती होती. आमच्या जिल्ह्यांत वेडकीहाळ म्हणून एक इनाम गाव सरकारने खालसा केला होता. तो परत मिळवून देण्याच्या बाबतींत त्यांनी खटपट केली व त्या मेहनतीबद्दल इनामदाराकडून एक लाखापेक्षा जास्ती फी घेतली असा त्यांचा लौकिक मीं बेळगावास ऐकला होता. बेळगावास त्यांनी सरकारावर दावा केला होता त्या वेळीं त्यांना पाहण्याकरिता मी एक दिवस कोर्टांत गेलों होतों. या गृहस्थांनी या वादांत भाग घेऊन, सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरली तर तो मंडप जाळून टाकूं अशी धमकी दिली होती, असें म्हणतात. यांत खरेपणा किती होता, हें मला माहीत नव्हतें. पण अशा बातम्या उठल्या होत्या ही गोष्ट खरी आहे. याशिवाय मुंबईचे पुढारी मेथा, वाच्छा यांचे व टिळकांचे राष्ट्रीय सभेच्या व्यवस्थेच्या बाबतींत बरेच खटके उडत होते, असेंही आम्हीं ऐकलें होतें.

या सर्व कारणांमुळे पुण्याची राष्ट्रीय सभा अपूर्व होणार असें मला वाटलें. म्हणून त्या सभेस हजर राहण्याचें मीं ठरवलें. डेक्कन कॉलेजांतील माझे स्नेही रामचंद्र विष्णु महाजनी हेही मुंबईस टर्म भरण्याकरितां होते. त्यांच्या मनांतही कॉंग्रेसला जाण्याचें आलें होतें व आम्हीं दोघांनी मिळून जावें असा बेत ठरला होता. पण पुण्याला जाण्यापूर्वी दोघांनी मिळून एक तरी कायद्याचें पुस्तक वाचून संपवावें असें ठरविलें होतें. त्याप्रमाणे ‘टेक्स्ट’चें पुस्तक मुदतीच्या आंत वाचून काढलें व पुण्याला गेलों. कॉंग्रेसला प्रतिनिधी या नात्याने मी हजर राहिलों नाही; फक्त प्रेक्षक होतों. सामाजिक परिषद वेगळ्या मंडपांत भरवण्याचें ठरवून रानड्यांनी हा वाद मिटवला होता. या परिषदेला मात्र मी प्रतिनिधी म्हणून हजर होतों. वादामुळे सामाजिक परिषदेलाही बरीच मंडळी हजर होती. वाद नसता तर इतकी मंडळी हजर असती किंवा नाही याची शंकाच आहे. सामाजिक प्रश्नांसंबंधांत या प्रांतांत पूर्वी कधीही जागृती झाली नव्हती इतकी जागृती या वादामुळे झाली असें पुष्कळांना वाटत होतें. पूर्वी मी तीन राष्ट्रीय सभांना गेलों होतों. पण या खेपेला मला सार्वजनिक कामाची माहिती जास्ती झाली असल्याकारणाने राष्ट्रीय सभेच्या कामकाजाकडे मीं लक्षपूर्वक अवलोकन केलें. शहरांतही रे मार्केटजवळच्या जागेंत प्रचंड सभा भरली होती व त्या सभेंत सुरेंद्रबाबूंचें अत्यंत उत्साहजनक भाषण झालें होतें. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी जें भाषण केलें तें छापून वाटण्यांत आलें होतें; पण भाषण करतेवेळीं त्यांनी तिकडे पाहिलेंदेखील नाही. जवळजवळ तीन तास त्यांचें भाषण झालें असावें. एवढें विस्तृत भाषण त्यांनी टिपणें वगैरेकडे न बघतां केल्याने त्यांचें वक्तृत्व व त्यांची स्मरणशक्ती याबद्दल आश्चर्य वाटलें.

सामाजिक परिषदेंत रानड्यांचें प्रास्ताविक भाषण झालें. वादाबद्दल उल्लेख करून रानडे हे टिळकपक्षीय मंडळीवर कांही तरी खरमरीत टीका करतील असें कित्येकांना वाटत होतें. पण रानड्यांनी तसें कांहीच न करतां, उलट अशा प्रकारचे वाद हे जागृतीचे दर्शक आहेत, अशा अर्थाचे उद्गार काढल्याचें मला स्मरतें. यामुळे रानड्यां-संबंधाची माझ्या मनांतील पूज्यबुद्धी वाढली.

### फर्ग्युसन कॉलेजांतील आरोप

१८९६ सालीं परीक्षेला बसावयाचें म्हणून प्रारंभापासून अभ्यासाला सुरुवात केली. आनीखिंडीकरांच्या फेलोशिपची मुदत संपल्यामुळे तेही मुंबईस आले, म्हणून ते व मी मिळून राहूं लागलों. आमचें जेवणही एकत्र होत असे. मंगेशराव तेलंग हेही मुंबईस होते. ते आमच्याकडे कांही दिवस जेवणाकरिता येत असत; पण त्यांचें राहणें वेगळें असे. या अवधींत माझा व त्यांचा स्नेह बराच वाढला होता. आम्ही अभ्यासांत जरी गुंतलों होतों तरी सभा वगैरेंना जाण्याची हौस असे. प्रार्थनासमाजांत दर रविवारीं जाण्याचा माझा परिपाठ असे. चंदावरकर, रानडे, भांडारकर इत्यादिकांनी चालवलेल्या उपासना व दिलेलीं प्रवचनें आम्ही ऐकत होतों. विधवाविवाहासंबंधाने एक सभा भरली होती. त्यांत रानड्यांचें भाषण होणार होतें असें ऐकलें होतें म्हणून त्या सभेला आम्ही गेलों होतों. त्या सभेंत एका तरुण गृहस्थाचें मोठें सडेतोड भाषण झालें. या गृहस्थाचें नाव गजाननराव वैद्य असें मला कळलें. आपल्या भाषणांत त्यांनी, रानड्यांनी विधवाविवाहाची संधी आली असतां ती घालविली म्हणून त्यांच्यावर खूप जोराची टीका केली. रानड्यांनी वैद्यांचें भाषण शांतपणें ऐकून घेतलें व आपण या बाबतींत अपराधी असल्याचें कबूल केलें. कोणत्याही प्रकारचे अनिष्ट प्रकार घडूं न देतां सभेचें काम शिष्टाचाराला धरून संपविण्यांत आलें.

१८९६ सालची दुसरी टर्म भरल्यानंतर अभ्यासाकरिता पुण्यास डेक्कन कॉलेजमध्ये येऊन राहावें असें वाटून जागेबद्दल खटपट केली. पण जागा सर्व भरल्या असल्या-कारणाने आमची सोय लागली नाही. म्हणून फर्ग्युसन कॉलेजमध्ये जागेबद्दल प्रयत्न केला. गोखले त्या वेळीं प्रिन्सिपॉल होते. त्यांनी कॉलेजच्या वसतिगृहांत आम्हांला एक खोली दिली. फर्ग्युसन कॉलेजमध्ये जेवणाकरिता एक कानडी क्लब असे व तेथेंच आम्ही जेवीत होतों. एक दिवस डेक्कन कॉलेजांतून एक विद्यार्थी पाहुणे म्हणून आले होते. जेवते-वेळीं त्यांनी फर्ग्युसन कॉलेजला उद्देशून 'टिनपॉट कॉलेज' असें म्हटलें, त्यावरून वादाला आरंभ झाला. फर्ग्युसन कॉलेजच्या मंडळींना राग येणें साहजिकच होतें. आम्ही जरी डेक्कन कॉलेजचे होतों, तरी फर्ग्युसन कॉलेजबद्दल आमचा अभिमान कमी नव्हता. म्हणून या वादांत आम्हींही भाग घेतला. मोठ्याने व आवेशाने बोलण्याची माझी सवय पूर्वीपासून आहे. यामुळे शेजारच्या मराठी क्लबाचीही कांही मंडळी जमली. वाद कानडी भाषेंतून चालला होता. डेक्कन कॉलेजपेक्षा कोणत्याही प्रकारें कमी प्रतीचें शिक्षण न



मराठी ग्रंथ संग्रहालय ... कॉलेज ...
अनुक्रम ..................... वि ...............

देतां, उच्च ध्येयाला धरून स्वार्थत्यागपूर्वक चालविलेल्या शिक्षणसंस्थेला 'टिनपॉट कॉलेज' म्हणणें योग्य नाही, असा माझा मुद्दा होता. मराठी क्लबांतून आलेल्या मंडळींला वाद कशाबद्दल तरी चालला आहे इतकेंच समजलें. फर्ग्युसन कॉलेजला 'टिनपॉट कॉलेज' म्हणण्याचा डेक्कन कॉलेजांतील कांही विद्यार्थ्यांचा रिवाज होता ही गोष्ट प्रसिद्ध होती. माझ्या तोंडून टिनपॉट कॉलेज, डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज असे शब्द वादांत निघत होते. एवढ्यावरून मराठी क्लबांतील एका गृहस्थाला मीच फर्ग्युसन कॉलेजची निंदा करतों आहें असें वाटलें आणि त्याने तडक जाऊन गोखल्यांना त्याप्रमाणें कळवलें. फर्ग्युसन कॉलेजशीं आमचा कोणत्याही प्रकारें संबंध नसतां केवळ आमच्या अभ्यासाच्या सोयी-करिता म्हणून आम्हांला जागेची वगैरे व्यवस्था गोखल्यांनी करून दिली व त्याचा मोबदला म्हणून आम्ही त्याच संस्थेची तेथील विद्यार्थ्यांमध्ये तेथे असतांना निंदा करतों, हा आरोप आमच्यावर केला गेला. गोखल्यांना ही गोष्ट खरी वाटली व संध्याकाळीं आम्हांला चोवीस तासांच्या आंत कॉलेज सोडून जाण्याबद्दल लेखी कळविण्यांत आलें.

आम्हांला आश्चर्य वाटलें. आमचें म्हणणें ऐकून न घेतां एकतर्फी हकीकतीवर विश्वास ठेवून गोखल्यांनी असें कां केलें याबद्दल आश्चर्य वाटलें. आम्हीं दुसरे दिवशीं जाण्याची तयारी केली. पण त्यापूर्वी गोखल्यांच्या कानावर खरी हकीकत घालावी असें ठरवून रात्रीं त्यांच्याकडे गेलों. माझे मित्र आनीखिंडीकर यांचें लक्ष शिक्षणाकडे विशेष असल्याने त्यांच्या मनांत एम्. ए. झाल्यानंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटीला येऊन मिळावें असें फार होतें. त्यामुळे हा आरोप घेऊन आपल्याला जावें लागणार याबद्दल त्यांना माझ्यापेक्षाही जास्त वाईट वाटलें होतें. गोखल्यांकडे गेल्यानंतर आमची हकीकत त्यांना खरी वाटली, व त्यांनी आम्हांला राहण्याबद्दल सांगितलें. त्या वेळीं गोखल्यांबरोबर बराच वेळपर्यंत आम्ही बोलत बसलों होतों. ही हकीकत क्लबमध्ये कळल्यानंतर ज्या गृहस्थाने चहाडी केली होती, त्याच्यामागे मंडळी लागली व त्यालाही फजीत झाल्याप्रमाणे वाटलें. गोखल्यांनीही परस्पर त्यांची कानउघाडणी केली असावी.

### *परीक्षेच्या मंडपाला आग लागली*

१८९६ सालीं आमची टर्म भरल्यानंतर मुंबईस मांडवीकडे प्लेगचा प्रादुर्भाव झाला. प्रथम उंदीर मरूं लागले. नंतर संसर्गाने माणसें मरूं लागलीं. हा रोग नवीनच असल्याकारणाने याचें निदान व यावरील उपाय यासंबंधाने आरंभीं अगदी अज्ञान होतें. हा रोग वाढूं लागला, म्हणून पुण्यास येऊन राहणें आम्हांला योग्य वाटलें. पुढे प्लेग जास्ती प्रमाणांत वाढूं लागला व युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचे दिवस जसजसे जवळ येत चालले तसतशी बाहेरगावाहून मुंबईला जाणाऱ्या उमेदवारांना भीती वाटूं लागली. पुण्याहून जाणाऱ्या उमेदवारांच्या मनांत कांही तरी प्रयत्न करावा व परीक्षेचे दिवस प्लेग कमी होईपर्यंत पुढे ढकलावेत असें आलें. याकरिता गावांत उमेदवारांची एक सभा भरली होती. आमचे गणपतराव

हेब्बाळ, चिकोडीचे वकील, हे या सभेचे अध्यक्ष होते असें मला स्मरतें. या सभेंत मींही प्रामुख्याने भाग घेतला होता. रीतीप्रमाणे भाषणें वगैरे झालीं व परीक्षांचा मोसम पुढे ढकलण्यासंबंधाने ठराव पास झाले. हे ठराव व त्यांना अनुसरून एक अर्ज युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांकडे पाठवण्यांत आला. पण त्याची दाद लागली नाही. ठराविक दिवशींच परीक्षा सुरू होण्याचें जाहीर करण्यांत आलें. उमेदवारांचें म्हणणें योग्य होतें, म्हणून युनिव्हर्सिटीच्या कांही अधिकाऱ्यांमार्फतही खटपट करण्यांत आली. पण उपयोग कांही झाला नाही. त्यामुळे पुण्यांतील विद्यार्थ्यांत असंतोष पसरला होता. युनिव्हर्सिटीच्या परीक्षांकरिता मरीनलाइन्सच्या स्टेशनजवळील समुद्रकिनाऱ्यावर मांडव घालीत असत व मांडवांतच बहुतेक परीक्षा होत असत. परीक्षांना सुरुवात होण्यापूर्वीच एक दिवस रात्रीं मंडपाला आग लागून मंडप जळून गेला.

यानंतर एकदोन दिवसांनी माझ्याकडे एक पत्र आलें. तुमचा प्रयत्न सिद्धीला गेला नाही, आम्हीं ही युक्ति काढली, अशा मजकुराचें हें पत्र व त्यासोबत जळलेल्याची राख व कोळसा वगैरेची पुडी पोस्टाने पाठवण्यांत आली होती. पत्र निनावी होतें. उमेदवारांच्या सभेंत प्रामुख्याने मीं भाग घेतला होता. त्यामुळे खरोखर ज्यांच्या हातून हें काम झालें असेल त्यांचेकडून हें पत्र आलें असावें किंवा त्याच कारणामुळे मुद्दाम ही युक्ती योजली असावी अशी शंका आली. ही हकीकत पोलिसांना कळवावी व निनावी पत्र लिहिणाराचा तपास करावा असें मला वाटलें. पण या भानगडींत आपण होऊन पडूं नये असें ठरवून या बाबतींत मीं कांही केलें नाही. पुढे प्लेगाच्या धामधुमींत रँडसाहेबांचा खून करणाऱ्या मंडळींकडूनच या मांडवाला आग लावली गेली होती असें समजलें. पण यांत खरेपणा किती हें सांगणें कठीण आहे. या वर्षी मी दुसऱ्या एल्‌एल्. बी. च्या परीक्षेला बसलों. पण तयारी जशी व्हावी तशी झाली नसल्याकारणाने परीक्षेंत नापास झालों. पुढे बेळगावास घरीं राहूनच अभ्यास करण्याचें ठरवलें.

देतां, उच्च ध्येयाला धरून स्वार्थत्यागपूर्वक चालविलेल्या शिक्षणसंस्थेला 'टिनपॉट कॉलेज' म्हणणें योग्य नाही, असा माझा मुद्दा होता. मराठी क्लबांतून आलेल्या मंडळीला वाद कशाबद्दल तरी चालला आहे इतकेंच समजलें. फर्ग्युसन कॉलेजला 'टिनपॉट कॉलेज' म्हणण्याचा डेक्कन कॉलेजांतील कांही विद्यार्थ्यांचा रिवाज होता ही गोष्ट प्रसिद्ध होती. माझ्या तोंडून टिनपॉट कॉलेज, डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज असे शब्द वादांत निघत होते. एवढ्यावरून मराठी क्लबांतील एका गृहस्थाला मीच फर्ग्युसन कॉलेजची निंदा करतों आहें असें वाटलें आणि त्याने तडक जाऊन गोखल्यांना त्याप्रमाणें कळवलें. फर्ग्युसन कॉलेजशीं आमचा कोणत्याही प्रकारें संबंध नसतां केवळ आमच्या अभ्यासाच्या सोयी-करिता म्हणून आम्हांला जागेची वगैरे व्यवस्था गोखल्यांनी करून दिली व त्याचा मोबदला म्हणून आम्ही त्याच संस्थेची तेथील विद्यार्थ्यांमध्ये तेथे असतांना निंदा करतों, हा आरोप आमच्यावर केला गेला. गोखल्यांना ही गोष्ट खरी वाटली व संध्याकाळीं आम्हांला चोवीस तासांच्या आंत कॉलेज सोडून जाण्याबद्दल लेखी कळविण्यांत आलें.

आम्हांला आश्चर्य वाटलें. आमचें म्हणणें ऐकून न घेतां एकतर्फी हकीकतीवर विश्वास ठेवून गोखल्यांनी असें कां केलें याबद्दल आश्चर्य वाटलें. आम्हीं दुसरे दिवशीं जाण्याची तयारी केली. पण त्यापूर्वी गोखल्यांच्या कानावर खरी हकीकत घालावी असें ठरवून रात्रीं त्यांच्याकडे गेलों. माझे मित्र आनीखिंडीकर यांचें लक्ष शिक्षणाकडे विशेष असल्याने त्यांच्या मनांत एम्. ए. झाल्यानंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटीला येऊन मिळावें असें फार होतें. त्यामुळे हा आरोप घेऊन आपल्याला जावें लागणार याबद्दल त्यांना माझ्यापेक्षाही जास्त वाईट वाटलें होतें. गोखल्यांकडे गेल्यानंतर आमची हकीकत त्यांना खरी वाटली, व त्यांनी आम्हांला राहण्याबद्दल सांगितलें. त्या वेळीं गोखल्यांबरोबर बराच वेळपर्यंत आम्ही बोलत बसलों होतों. ही हकीकत क्लबमध्ये कळल्यानंतर ज्या गृहस्थाने चहाडी केली होती, त्याच्यामागे मंडळी लागली व त्यालाही फजीत झाल्याप्रमाणे वाटलें. गोखल्यांनीही परस्पर त्यांची कानउघाडणी केली असावी.

### *परीक्षेच्या मंडपाला आग लागली*

१८९६ सालीं आमची टर्म भरल्यानंतर मुंबईस मांडवीकडे प्लेगचा प्रादुर्भाव झाला. प्रथम उंदीर मरूं लागले. नंतर संसर्गाने माणसें मरूं लागलीं. हा रोग नवीनच असल्याकारणाने याचें निदान व यावरील उपाय यासंबंधाने आरंभीं अगदी अज्ञान होतें. हा रोग वाढूं लागला, म्हणून पुण्यास येऊन राहणें आम्हांला योग्य वाटलें. पुढे प्लेग जास्ती प्रमाणांत वाढूं लागला व युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचे दिवस जसजसे जवळ येत चालले तसतशी बाहेरगावाहून मुंबईला जाणाऱ्या उमेदवारांना भीती वाटूं लागली. पुण्याहून जाणाऱ्या उमेदवारांच्या मनांत कांही तरी प्रयत्न करावा व परीक्षेचे दिवस प्लेग कमी होईपर्यंत पुढे ढकलावेत असें आलें. याकरिता गावांत उमेदवारांची एक सभा भरली होती. आमचे गणपतराव

हेब्बाळ, चिकोडीचे वकील, हे या सभेचे अध्यक्ष होते असें मला स्मरतें. या सभेंत मींही प्रामुख्याने भाग घेतला होता. रीतीप्रमाणे भाषणें वगैरे झालीं व परीक्षांचा मोसम पुढे ढकलण्यासंबंधाने ठराव पास झाले. हे ठराव व त्यांना अनुसरून एक अर्ज युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांकडे पाठवण्यांत आला. पण त्याची दाद लागली नाही. ठराविक दिवशींच परीक्षा सुरू होण्याचें जाहीर करण्यांत आलें. उमेदवारांचें म्हणणें योग्य होतें, म्हणून युनिव्हर्सिटीच्या कांही अधिकाऱ्यांमार्फतही खटपट करण्यांत आली. पण उपयोग कांही झाला नाही. त्यामुळे पुण्यांतील विद्यार्थ्यांत असंतोष पसरला होता. युनिव्हर्सिटीच्या परीक्षांकरिता मरीनलाइन्सच्या स्टेशनजवळील समुद्रकिनाऱ्यावर मांडव घालीत असत व मांडवांतच बहुतेक परीक्षा होत असत. परीक्षांना सुरुवात होण्यापूर्वीच एक दिवस रात्रीं मंडपाला आग लागून मंडप जळून गेला.

यानंतर एकदोन दिवसांनी माझ्याकडे एक पत्र आलें. तुमचा प्रयत्न सिद्धीला गेला नाही, आम्हीं ही युक्ति काढली, अशा मजकुराचें हें पत्र व त्यासोबत जळलेल्याची राख व कोळसा वगैरेची पुडी पोस्टाने पाठवण्यांत आली होती. पत्र निनावी होतें. उमेदवारांच्या सभेंत प्रामुख्याने मीं भाग घेतला होता. त्यामुळे खरोखर ज्यांच्या हातून हें काम झालें असेल त्यांचेकडून हें पत्र आलें असावें किंवा त्याच कारणामुळे मुद्दाम ही युक्ती योजली असावी अशी शंका आली. ही हकीकत पोलिसांना कळवावी व निनावी पत्र लिहिणाराचा तपास करावा असें मला वाटलें. पण या भानगडींत आपण होऊन पडूं नये असें ठरवून या बाबतींत मीं कांही केलें नाही. पुढे प्लेगाच्या धामधुमींत रँडसाहेबांचा खून करणाऱ्या मंडळींकडूनच या मांडवाला आग लावली गेली होती असें समजलें. पण यांत खरेपणा किती हें सांगणें कठीण आहे. या वर्षी मी दुसऱ्या एल्एल्. बी. च्या परीक्षेला बसलों. पण तयारी जशी व्हावी तशी झाली नसल्याकारणाने परीक्षेंत नापास झालों. पुढे बेळगावास घरीं राहूनच अभ्यास करण्याचें ठरवलें.

प्रकरण पांचवें

# माझा वकिलीचा व्यवसाय

### *कॉस्मॉपॉलिटन क्लबांतील प्रकार*

१८९५ व १८९६ या दोन सालांतील बहुतेक दिवस मुंबईसच गेल्यामुळे त्या गावाची बरीच माहिती झाली होती. कांही हाय-कोर्टांत वकिली करणाऱ्या वकिलांचा व माझा संबंध आला होता. गिरगावांत त्या वेळीं Cosmopolitan Club या नावाचा एक क्लब होता. त्या क्लबाच्या सभासदांमध्ये सर्व जातींचे हिंदू व मुसलमान असे होते. क्लबांत करमणुकीकरिता बिलिअर्ड व पत्ते खेळत असत. पण मुख्य भाग खाण्यापिण्याचा असे. माझ्या स्नेह्यांबरोबर मी क्लबांत मधून-मधून जात असें. तेथे चाललेलें प्रकार पाहून आमच्यांतील कांही प्रतिष्ठित मंडळींसंबंधाने माझ्या विपरीत कल्पना झाल्या. रात्रीं क्लब बंद होण्याच्या वेळेला कित्येकांना उचलून गाडींत घालून नेण्याचे प्रसंग आलेले मीं पाहिले होते. या क्लबाला लागूनच त्याच कंपाउंडमध्ये कांही भाड्याच्या खोल्या होत्या. त्या खोल्यांत आम्ही कांही दिवस राहात होतों. त्यामुळे हे प्रकार मला वारंवार पाहावयाला मिळत. माझी व या क्लबाला येणाऱ्या कांही मंडळींची चांगली ओळख होती, तरी त्यांच्याप्रमाणे मीं करावें असें मला वाटलें नाही, आणि त्यांनी कोणत्याही प्रकारें मीं त्यांच्याप्रमाणे करावें म्हणून प्रयत्न केला नाही.

धार्मिक दृष्ट्या हे प्रकार अनिष्ट आहेत असें मला वाटत नव्हतें. असें करणें हें पाप आहे असें मी मानीत नव्हतों. पण कांही कांही व्यसनांचे परिणाम सामाजिक दृष्ट्या अनिष्ट आहेत याचें मूर्तिमंत चित्र माझ्या डोळ्यांपुढे आल्याने, अपेयपान करणारे अनेक माझे निकट स्नेही होते, तरी या मोहाला मी बळी पडलों नाही. खाण्याच्या पदार्थां-संबंधाने मला विशेष वाटत नव्हतें. कॉलेजमध्ये असतांना १८९१ सालाच्या आजारानंतर मी egg mixture घेत असें, व कांही दिवस अर्धीकच्चीं शिजवलेलीं व पुरीं शिजवलेलीं अंडीं खात असें; त्यामुळे खाण्याच्या पदार्थांसंबंधाने विशेष विधिनिषेध पाळण्याचें

महत्त्व वाटेनासें झालें होतें. मुंबईतील अभ्यासाकरिता राहणारे आमच्या बरोबरीचे बरेच विद्यार्थी इराण्याच्या दुकानीं चहा, कॉफी, आइसक्रीम, पाव वगैरे खात असत. पण मी इराण्याच्या दुकानीं फारसा जात नसें. इराण्याच्या दुकानापेक्षा कोटींतील रेस्टॉरंटमध्ये जाणेंच मी जास्ती पसंत करीत असें. तेथे जाणें हें जास्ती खर्चाचें असे. तरी त्याची मीं विशेष पर्वा केली नाही. यामुळे युरोपियन लोकांची राहणी, त्यांचा पेहराव, त्यांच्या जेवण्याखाण्याच्या रीतीभाती आमच्यापेक्षा श्रेष्ठ, असें मला कांही दिवस वाटूं लागलें होतें. पोक्तपणें विचार करून हें मीं ठरवलें होतें अशांतील प्रकार नव्हता. त्यांत अनुकरण करण्याचीच इच्छा जास्ती होती. पाश्चात्य पद्धतीचे चांगले कपडे वापरण्याची माझ्यामध्ये आवड उत्पन्न होऊन त्याप्रमाणे मी कांही दिवस तसें करीतही होतों. पण ही स्थिती फार दिवस टिकली नाही.

### *'धुरीण' पत्राची कुळकथा*

मंगेशराव तेलंगांची एल्‌एल्. बी. १८९६ सालीं झाली नाही म्हणून तेही १८९७ साली बेळगावासच राहण्याकरिता आले. जरी आम्ही दोघेही त्या वर्षी एल्‌एल्. बी.चा अभ्यास करीत होतों, तरी आम्हांला तो अभ्यास अगदींच अपरिचित नसल्याने बोलण्याचालण्याला पुष्कळ सवड मिळत असे. दोघांचे विचारही बहुतेक बाबतींत जुळत असत. त्यामुळे एखादें वर्तमानपत्र काढून आमच्या मागासलेल्या प्रांतांत सुधारणेला उत्तेजन द्यावें अशी कल्पना आली. परीक्षा झाल्यानंतर सार्वजनिक कामांत पडावें असें मला वाटत होतें. सार्वजनिक कामाची मला तेलंगांपेक्षा कमी हौस होती, अशांतला प्रकार नव्हता. पण आमच्या वडिलांच्या मनांतून वकिलीचा धंदा सोडून हुदलीमध्ये एखाद्या मळ्यांत जाऊन अध्यात्म-विषयाचा अभ्यास करीत राहावें असें वाटत होतें. त्याच हेतूने मी बी. ए. झाल्या-बरोबर त्यांनी स्वतःसाठी संस्कृताच्या अभ्यासाला प्रारंभ केला. संस्कृत शिकवण्याकरिता एक शास्त्री ठेवून दोन वर्षांत साधारणपणें वेदांतावरील ग्रंथ समजण्याइतपत त्यांनी मजल गाठली. वकिलींतून मुक्त व्हावें अशी त्यांची इच्छा होती, व याप्रमाणे ते बोलून दाखवीत असत. त्यामुळे चांगली मेहनत घेऊन मी एल्‌एल्. बी. होण्याचा निश्चय करूनच बेळगावास आलों होतों. म्हणूनच वर्तमानपत्र काढण्याच्या विचाराला मीं एकदम संमती दिली नाही.

याशिवाय वर्तमानपत्र चालवण्याचें ज्ञानही मला नव्हतें. भाषेच्या संबंधानेही माझ्यामध्ये उणीव होतीच. अनुभव तर कांहीच नव्हता. चारचौघा स्नेह्यांमध्ये सार्वजनिक विषया-संबंधाने गप्पागोष्टी करण्याची हौस मात्र मस्त होती; व मी जें बोलत असें तें मात्र मनापासून बोलत असें. केवळ वेळ घालवण्याकरिता किंवा मनोरंजनाकरिता कांही बोलत नसें. आपल्या हातून कांही कार्य व्हावें अशी इच्छा मात्र तेलंगांपेक्षा माझ्यामध्ये जास्ती होती असें मला वाटत होतें. टिळक हे सुधारणेला मागे ओढणारे आहेत, पण समाजांत

त्यांचें वजन दिवसेंदिवस जास्ती वाढत होतें. त्यामुळे आमच्या प्रांतांतदेखील तीच प्रवृत्ती उत्पन्न होईल याचें मला भय वाटत होतें. म्हणून कांही तरी करण्याला लवकरच प्रारंभ करावा याबद्दलची मला तळमळ होती. वर्तमानपत्र काढण्याच्या तेलंगांच्या विचाराला मीं जरी संमती प्रथम दिली नव्हती, तरी तो विचार सोडून द्यावा असेंही मला वाटेना. माझ्या हातून होईल तितकी तेलंगांना मदत करण्याला मी तयार झालों व त्याप्रमाणे त्यांना कळवलें. इतकी माझी तयारी झाल्यानंतर दोघांचींही नावें संपादक म्हणून प्रसिद्ध करून पत्र सुरू करावें अशी त्यांनी सूचना केली. पण मला लेखनाची सवय मुळीच नसल्यामुळे ही गोष्ट मीं अमान्य केली. तेलंग चांगले होतकरू लेखक होते व लिहिण्याची त्यांना हौस असे. त्यांना मराठी, इंग्रजी वगैरे वाचनाचा व्यासंग होता. खेळांकडे वगैरे ते वेळ घालवीत नसत. क्लबांत असले तरी वर्तमानपत्रें वगैरे वाचण्याकरिताच बहुशः येत असत. त्यामुळे वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याचा भार त्यांच्यावरच जास्ती पडावयाचा होता. तथापि त्यांनी माझें नाव सहसंपादक म्हणून प्रसिद्ध करण्याचा कां आग्रह धरला हें कोडें मला अद्यापिही उलगडत नाही. या उद्योगांत आर्थिक दृष्ट्या कांही नुकसानी आली, तर मीही भागीदार होण्यास कबूल आहें असें त्यांना स्पष्टपणें कळवलें होतें. तरी आपल्या नावावर माझें नाव प्रसिद्ध करण्याचा त्यांनी आग्रह धरला व बऱ्याच वाटाघाटीनंतर मींही ती सूचना मान्य केली. या बाबतींत मीं वडिलांचा विचार घेतला नव्हता. पण त्यांना परस्पर ही गोष्ट कळली होती. तरी माझ्याजवळ यासंबंधाने त्यांनी कांही बोलणें केलें नाही. यारून त्यांचा विरोध नाही असें मीं अनुमान केलें.

सामाजिक बाबतींत जुन्याचा सर्वस्वी त्याग न करतां नव्यांत जें चांगलें असेल तें स्वीकारण्याचें धोरण ठेवण्याचें आम्हीं ठरवलें होतें. त्याला अनुसरूनच पत्राच्या मुखपृष्ठावर "पुराणमित्येव न साधु सर्वम्" हा श्लोक घातला होता. राजकीय बाबतींत प्रगतिपर धोरण ठेवावयाचें, पण टिळकांच्या धोरणाविरुद्ध राहावयाचें, असें ठरविण्यांत आलें होतें. हीं धोरणें मला त्या वेळीं पसंतच होतीं. मला लिहिण्याची सवय जरी नव्हती, तरी मतें ठाम बनलीं असल्याकारणाने व त्या मतांचा प्रसार व्हावा अशी इच्छा तीव्र असल्यामुळे भाषेची अडचण भासणार नाही, असा आम्हांला विश्वास वाटत होता.

पत्राचें नाव 'धुरीण' असें ठेवण्यांत आलें. बेळगावच्या कॅंपच्या हद्दींत 'धुंडिराज' छापखान्यांत पत्र छापावयाचें असें तेलंगांनी ठरवलें होतें. छापखान्याचे मालक दत्तोपंत तिळवे यांचा व तेलंगांचा स्नेह होता. दत्तोपंतांना आपल्या छापखान्यांत एखादें पत्र निघावें असें वाटत होतें. त्यामुळे ही योजना तेलंगांनी केली होती. संपादक या नात्याने तेलंगांनी किंवा मीं कांहीच न घेतां केवळ हौसेखातर काम करावें व छपाईचा वगैरे खर्च तिळव्यांनी करावा आणि नफा कांही राहिल्यास तो तिळव्यांनीच घ्यावा असें ठरलें होतें. त्याप्रमाणे 'धुरीण'चा पहिला अंक निघाला आणि संपादक या नात्याने आम्हां

दोघांचींही नावें प्रसिद्ध झालीं. पहिल्या महिन्यांत पुष्कळ प्रती नमुन्यादाखल पाठवण्यांत आल्या. बेळगावात 'बेळगाव-समाचार' व 'चिकित्सक' अशीं दोन पत्रें होतीं. त्या पत्रांतून भारदस्त विषयांवर लेख येत नसत. वर्तमानसार, इहवृत्त, सरकारी रिपोर्ट, फारच झाल्यास एखाद्या स्थानिक विषयासंबंधानें त्रोटक चर्चा, नोटिसा, जाहिराती वगैरे मजकुरांनी हीं पत्रें भरलेलीं असत. धारवाड वगैरेकडेही याच मासल्याचीं पत्रें होतीं. त्यामुळें नवीन धोरणावर चालवलेलें आमचें पत्र बरेंच लोकप्रिय झालें. महाराष्ट्र, मुंबई, वऱ्हाड, नागपूर इकडेही या मताच्या लोकांकडून मागणी येऊं लागली. वर्षाच्या अखेरीस जवळजवळ एक हजार तरी वर्गणीदार झाले असावेत. त्यामुळे जाहिराती वगैरेचें उत्पन्न वाढलें व तिळवे यांना नुकसान कांही न होतां कांही तरी नफाच झाला असावा. या बाबतींत विशेष लक्ष मी घालीत नसें.

### गोखल्यांची माफी

पुण्याला प्लेगची धामधूम चालली होती. घरांतून रोग्यांना बाहेर काढण्यांत किंवा घरें डिसइन्फेक्ट करण्यांत लष्करी लोकांचा उपयोग करण्यांत आला होता. या लोकांनी बराच धुमाकूळ मांडला होता व त्यांच्याकडून बरींच अत्याचाराचीं कृत्यें झाल्याचा बोभाटा झाला होता. पुण्यामुंबईकडील वर्तमानपत्रांतून या गोष्टीसंबंधाने पुष्कळ गडबड उडाली होती. यासंबंधाने आमच्या पत्रांतूनही खूप चर्चा व्हावी अशी माझी इच्छा होती. पुण्याला मुद्दाम एखादा मनुष्य पाठवून खरी हकीकत काय आहे याची चवकशी करावी, असें माझ्या मनांत येऊन त्याप्रमाणे मीं सूचना केली. पण ती तेलंगांना पसंत पडली नाही. या बाबतींत 'केसरी'ने स्वीकारलेलें धोरण तेलंगांना मान्य नव्हतें. प्लेग हटवण्याचे उपाय सरकार योजीत असतां त्यावर टीका करणें योग्य नाही असें त्यांना वाटे. लोकांच्या अज्ञानमूलक भीतीमुळे लोकांकडून कांही चुका होत असल्या, तरी प्लेगाचे उपाय सहानुभूतिपूर्वकच अमलांत आणावेत, केवळ लष्करी हडेलहप्पीच्या जोरावर काम नीट होत नाही, असें माझें मत होतें. या बाबतींत जरी माझा व त्यांचा थोडा मतभेद झाला तरी त्यांच्या व माझ्या स्नेहांत कोणत्याही प्रकारचें अंतर आलें नाही, किंवा पत्रावरही कांही परिणाम झाला नाही.

पुण्याच्या या प्लेगसंबंधाच्या धामधुमीच्या बातम्या गोखले इंग्लंडमध्ये असतां त्यांना त्यांच्या कांही स्नेह्यांकडून कळवल्या गेल्या, त्या आधारावर गोखल्यांनी इंग्लंडमध्ये सार्वजनिक रीत्या खरमरीत टीका केली. पण पुढे इकडे परत आल्यानंतर ज्या बातम्यांवर विश्वासून त्यांनी टीका केली होती त्या निराधार आहेत असें त्यांना समजून आल्यामुळे, आपण केलेली टीका चुकीची आहे असें प्रसिद्ध करून त्यांनी माफी मागितली. ही गोष्ट गोखले इंग्लंडहून परत आल्यादिवशींच किंवा नंतर एकदोन दिवसांतच घडली असावी. 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राचे त्या वेळचे एडिटर यांनी गोखल्यांची आगबोटीवरच गाठ

घेऊन, गोखल्यांना धमकी देऊन माफी लिहून घेतली, अशीही बातमी पसरली होती. गोखल्यांनी केलेल्या आरोपाबद्दल त्यांच्यावर सरकारतर्फे निकराचा हल्ला चालू झाला. गोखल्यांनी केलेल्या आरोपांत अतिशयोक्तीचा भाग असला तरी सरकारचें धोरण हें अन्यायी व जुलमी होतें. मुख्य आरोप शब्दशः जरी शाबीत करतां आला नाही, तरी सरकारच्या जुलमी धोरणाचा स्फोट करण्याइतपत पुरावा टिळकांनी तयार करून ठेवलेला होता; आणि त्याचा उपयोग गोखल्यांच्या बाबतींत करण्याला ते तयार होते. ही हकीकत गोखल्यांच्या स्नेह्यांना टिळकांनी कळवली होती म्हणतात; पण साधारणपणें गोखल्यांना जी हकीकत कळली व त्यांना ज्यांनी बातमी पुरवली त्यांनी सपशेल दगा दिल्यामुळे त्यावरून त्यांनी माफी मागण्याचें ठरवून, वर लिहिल्याप्रमाणें माफीही मागितली. रानड्यांचा सल्ला गोखल्यांनी घेतला होता असें आम्हीं ऐकलें होतें. या प्रकरणामुळे गोखल्यांवर जिकडून तिकडून टीकेचा भडिमार झाला. गोखल्यांनी भ्याडपणाने हें केलें असे त्यांच्यावर उघड किंवा प्रच्छन्न आरोप करण्यांत येऊं लागले. आमच्या पत्रांत आम्हीं गोखल्यांच्या समर्थनपर असा एक लेख लिहिला होता. तो लेख गोखल्यांच्या वाचण्यांत आला. गोखल्यांनी त्यासंबंधाने आमच्या दोघांच्या नावें एक पत्र लिहून आमचे आभार मानले व पत्रांत आमचा गौरवही केला होता. त्यामुळे मला एक प्रकारचें समाधान वाटलें व आपल्या प्रयत्नाचा एवढा तरी उपयोग झाला याबद्दल आनंद वाटला.

### तेलंगांशीं मतभेद

१८९७ सालीं आम्हां दोघांच्याही परीक्षा पास झाल्या व आम्हीं दोघांनीही वकिलीच्या सनदा काढल्या.

१८९७ सालच्या टिळकांवरील राजद्रोहाच्या पहिल्या खटल्यासंबंधाने सर्व देशभर बरीच खळबळ उडाली होती. या खटल्याच्या बाबतींत सरकार धडधडीत अन्याय करीत असून वड्याचें तेल वांग्यावर काढण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असें माझें मत होतें. पण तेलंगांना इतक्या तीव्रतेने माझें म्हणणें पटलें नाही. त्यांच्या व माझ्यामध्ये मतभेद होण्याचा हा दुसरा प्रसंग होता. टिळकांचें सार्वजनिक कामाचें धोरण किती जरी चुकीचें असलें, तरी परकी सरकारला वाटेल त्या प्रकारें, न्याय-अन्यायाकडे न पाहतां वागूं देणें हें गैर आहे, असें माझें स्पष्ट मत होतें. पुढे खटल्याच्या वेळीं ज्यूरीला उद्देशून न्यायाधिशाचें जें भाषण झालें व त्या भाषणांत 'राजद्रोह' शब्दाच्या व्याख्येची जी त्यांनी ओढाताण केली, त्यासंबंधाने मला फारच चीड आली. या बाबतींत आमच्या क्लबांत वादविवाद होत असे आणि त्या वादविवादांत भाग घेऊन टिळकांच्या बाजूने मी निकराने भांडत असें. माझ्या इतर कांही स्नेह्यांना माझें म्हणणें पटत नसे. त्या वेळीं माझ्या कित्येक गौड सारस्वत ब्राह्मण स्नेह्यांनी मी द्रावीड ब्राह्मण आहें व टिळकही त्याच पोटजातींतील आहेत म्हणून मी टिळकांची बाजू घेतों असा माझ्यावर आरोपही केला.

त्या कारणाने मला त्या वेळीं ब्राह्मणांच्या पोटजातींतच इतका विरोध व मत्सर असावा याची जाणीव होऊन आश्चर्य वाटलें. शहाणीं सुशिक्षित माणसेंदेखील विकारवश होऊन आपल्या स्नेह्यांसंबंधानेदेखील कशी हेतुपुरःसर अनुदारबुद्धी दाखवतात याचें चित्र मनावर बरोबर ठसलें. तथापि या बाबतींत कोणत्याही गोष्टी विकोपाला गेल्या नाहीत. टिळकांच्या बचावाकरिता कलकत्याहून बॅरिस्टर आले होते. खर्चही बराच झाला असावा. म्हणून फंडही काढण्यांत आला होता. माझे एक वकील स्नेही हा फंड जमवण्याच्या कामीं प्रयत्न करीत होते. मींही यथाशक्ती त्यांना मदत केली. दत्तोपंत तिळवे वारल्यामुळे किंवा इतर कोणत्या तरी कारणामुळे तेलंगांनी 'धुरीण' पत्र बंद केलें, व बेळगांव येथील 'चिकित्सक' पत्र चालवण्याचें ठरवलें. या कामींही त्यांनी माझ्या सहकार्याची अपेक्षा केली व मीं त्यांचें म्हणणें मान्य केलें. पण 'चिकित्सक' पत्राचे मालक आबाराव सावंत हे सरकारच्या विरुद्ध टीका करण्याला प्रतिकूल असत. त्यामुळे मी त्या पत्राकडे फारसें लक्ष देत नसें.

## *माझा वकिलीचा अनुभव*

माझी परीक्षा पास झाल्याची तार ज्या दिवशीं आली त्या दिवशीं आम्ही हुदलीस होतों. तारेंतील मजकूर आमच्या वडिलांना कळल्याबरोबर त्यांनी आपली वकिली बंद केल्याचें मला कळवलें. फक्त एक महत्त्वाचा खटला आधी त्यांनी चालविला होता तेवढा पुरा करून बेळगाव सोडून हुदलीला येऊन राहण्याचा निश्चय त्यांनी मला कळविला.

बेळगाव कोर्टांत वकिली करण्याची सनद मिळाल्यानंतर मीं वकिलीला आरंभ केला. वडिलांचें दप्तर मला मिळाल्याकारणाने वकिलीचा धंदा कसा चालेल याबद्दल माझ्यावर काळजीने दिवस काढण्याची पाळी आली नाही. वडिलांचे बहुतेक पक्षकार माझ्या चांगल्या ओळखीचे होते. कांही पक्षकारांचा तर अगदी घरोबा होता. या पक्षकारांनी मी नवीन म्हणून माझ्या हातून कामें योग्य प्रकारें चालवलीं जाणार नाहीत, असा माझ्या-संबंधाने अविश्वास दाखवला नाही. कांही महत्त्वाच्या कामांत माझे वडील मला सल्ला देत असत; आणि कांही कामांत माझ्यावरच अवलंबून न राहतां मणेरीकर, छत्रे, वगैरे जुन्या वकिलांचीं वकीलपत्रेंही दाखल करण्यांत आलीं होतीं. तथापि अशा कामांची कच्ची तयारी मलाच करावी लागे. जुन्या मंडळींबरोबर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांच्या अनुभवाचा मला फायदा थोडाबहुत मिळाला. पण सर्वस्वी त्यांच्यावर अवलंबून न राहतां मी स्वतंत्रपणेंही अनुभव घेत होतोंच. त्यामुळे माझा आत्मविश्वासही वाढला. माझ्या चुकीमुळे कांही कामें बिघडलीं असतीलच; तथापि दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची कित्येक नवीन धंदा करणारांची प्रवृत्ती मला पसंत नव्हती. आमच्या वडिलांना कामापुरतें इंग्रजी समजत होतें. पण कामें इंग्रजींतून चालवतां येत नसत. त्यामुळे डिस्ट्रिक्ट जज कोर्टांत अपिलाचीं कामें त्यांच्या दप्तरीं फार नव्हतीं. पण सबजज कोर्टांतील बरींच

कामें त्यांच्याकडे असत. त्यांत जमिनीच्या ताब्याचीं व इतर भानगडीचीं कामेंही होतीं. त्या वेळीं बेळगावास पुण्याचे रा. ब. लिमये (गंगाधर विष्णु लिमये) हे फर्स्ट क्लास सब-जज्ज होते. त्यांची न्यायबुद्धी व निःस्पृहपणा या गुणांबद्दल आमच्या जिल्ह्यांत बरीच ख्याती असे. आमच्या प्रांतांत भीड ऐकणाऱ्या व लाचलुचपत घेणाऱ्या अंमलदारांच्या बऱ्याच दंतकथा माझ्या लहानपणीं मी ऐकत होतों. पण तो मनू मीं वकिलीला प्रारंभ केला त्या वेळीं बराच बदललेला होता; तथापि जुनी परंपरा मुळीच लुप्त झाली होती असें म्हणवत नाही. त्यामुळे लिमयांच्या निःस्पृहतेच्या गोष्टींचें वर्णन विशेष कानावर येई. लिमये हे जरी निःस्पृह होते तरी काम चालवतेवेळीं वकिलांवर केव्हाकेव्हा तोंड टाकीत असत. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर वकिलांनी समर्पक उत्तरें दिलीं नाहीत म्हणजे ते चिडून बोलत असत. तयारी न करतां गेलेल्या वकिलांची त्यांच्यापुढे गाळण उडत असे. बेळगावास प्लेगचा प्रादुर्भाव त्याच सुमारास झाल्यामुळे आम्हीं आठ मंडळींनी मिळून एक कॅंप काढला होता व झोपड्या बांधून तेथे राहत होतों. त्यांत लिमये राहत असत. त्यांच्या झोपडीसमोरच मी राहत असें. घरीं लिमये हे सर्वांशीं अगदी मिळूनमिसळून वागत. पण कोर्टांत गेले की त्यांच्या अंगात निराळें वारें शिरल्याप्रमाणे होऊन ते फार निर्भीड व तुसडेपणाने वागत. त्यामुळे नवीन वकिलांना त्यांच्या कोर्टांत कामें चालवण्याला मोकळेपणा वाटत नव्हता. पण आम्ही एकाच ठिकाणीं राहात असल्यामुळे त्यांच्याबरोबर चहा वगैरे घेण्याचे प्रसंग येत आणि त्यामुळे कोर्टांत त्यांच्या स्वभावाचें दडपण माझ्यावर येत नसे. त्यांतून घरीं बोलतांना केव्हाकेव्हा मला उद्देशून ते उत्तेजनपर उद्गार काढीत. कामाची तयारी करण्यासंबंधाने व सावधगिरीसंबंधाने माझ्या वडिलांचें अनुकरण करण्याला मीं शिकावें असें त्यांनी मला बोलून दाखवलें होतें. तयारी न करतां काम चालवणाऱ्या वकिलांना ते विनोदाने "निशाणी नांगर वकील" म्हणत. याचा अर्थ मला प्रथम कळला नाही. त्यांना एक दिवस अर्थ विचारला त्या वेळी हसून त्यांनी अर्थ सांगितला. लिहितां न येणाऱ्या अशिक्षित शेतकऱ्याने 'निशाणी' करण्याची पद्धत त्या वेळीं होती. अलीकडे आंगठ्याचे ठसे घेण्याची पद्धत चालू झाली आहे. पण तेव्हा एखादी रेघ काढणें किंवा नांगरापुढे किंवा इतर कोणत्याही चिन्हापुढे अशा प्रकारं रेघ वगैरे काढणाऱ्याचें नाव लिहून, नाव लिहिणाऱ्याने आपलें 'दस्तुर' लिहिण्याचा प्रघात असे. निशाणी करणाऱ्यांना ज्या कागदावर निशाणी केली असेल अथवा करवून घेतली असेल त्यांतील मजकूर समर्पक रीतीने सांगणें कठीण जाई. तशीच स्थिति कित्येक वकिलांची होई. म्हणून त्यांना 'निशाणी नांगर वकील' अशी संज्ञा लिमये यांनी दिली होती. कधीकधी कोर्टांत वकिलांना उद्देशून "तुमच्या कारकून रावसाहेबांना विचारून मग उत्तर द्या" असें ते टाकून बोलत. अशा वकिलांत माझी गणना होऊं नये म्हणून वरचेवर मला ते सांगत.

त्या वेळीं बीमन हे डिस्ट्रिक्ट जज्ज होते. त्यांना चांगलें दिसत नव्हतें. म्हणून ते टाइपरायटरच्या मदतीने बहुतेक लिहिण्याचें काम करीत. त्यांच्या समोर मीं पहिल्याप्रथम

एक लहानसें अपील चालविलें. बेळवी हे विरुद्ध बाजूचे वकील होते. त्या वेळींदेखील ते प्रसिद्ध वकील म्हणून गणले जात असत. त्यांच्या विरुद्ध काम चालवण्याचा प्रसंग प्रथमच आला. युरोपियन जज्जासमोरचाही तो प्रसंग प्रथमचाच असल्यामुळे मी थोडासा घाबरल्यासारखा झालों होतों. तथापि पूर्वी चांगली तयारी केली असल्यामुळे कसें तरी रेटून काम चालवलें. पण निकाल विरुद्धच झाला. तथापि भीती बरीच कमी झाली. परक्या भाषेतून आपली विचारसरणी मांडण्यांत आपणांला मोकळेपणा वाटत नाही, याचा अनुभव मला प्रथमच आला.

## 'ठळकवाडी' नावाचें मूळ

प्लेगमुळे आम्ही बाहेर राहत होतों असें वर नमूद करण्यांत आलें आहे. त्या कँपला कांही तरी नाव द्यावें अशी आम्हांला कल्पना आली. टिळकांच्या राजद्रोहाच्या खटल्यापासून त्यांची प्रसिद्धी अतिशय झाली होती, आणि त्यांचें धैर्य व स्वार्थत्याग इत्यादि गुणांचा आमच्याकडे बराच बोलबाला झाला होता. त्यामुळे आमच्यापैकी एकाने आमच्या कँपला 'टिळकवाडी' हें नाव सुचवलें आणि तें मान्य झालें व रूढींतही आलें. आमच्या मंडळीपैकी चारपाच मंडळी खुद्द पुण्याचीच होती. दोघेतिघे महाराष्ट्रीय होते. मी व आणखी एक असे दोघेच कर्नाटकांतील होतों. टिळकांना प्रत्यक्ष पाहून त्यांच्याबद्दल आदर बाळगणारांचीच संख्या अधिक असल्या-कारणाने हें नाव सर्वांनाच पसंत पडलें. टिळकांच्याबद्दल माझा आदर इतका नसला तरी या खटल्यामुळे माझ्या मनांतदेखील त्यांच्यासंबंधाने बदल झाला होता. म्हणून मीं देखील या नावाला विरोध केला नाही. पण पुढे सरकारने स्वीकारलेल्या धोरणाचें उग्र स्वरूप दिसूं लागलें व दोन वकिलांखेरीज इतर सहा मंडळी सरकारी बड्या अधिकाराच्या जागांवर असल्यामुळे त्यांना कँपचें नाव बदलावें असें वाटूं लागलें. 'टिळकवाडी' हें नाव तर रूढ झालें होतें. तेव्हा दुसरें कोणतें नाव द्यावें याबद्दल विचार होऊन पूर्वीच्या नावाला धरूनच टिळकवाडीचें 'ठळकवाडीं'त रूपांतर झालें. त्या विस्तीर्ण जागेंत ठळक आठ लोकांनी झोपड्या बांधून कँप केला होता म्हणून 'ठळकवाडी' असें नाव देण्यांत आलें, अशी लोकांची समजूत होती. हेंच नाव अद्यापि या जागेला चालू आहे. याच जागेवर आता बेळगावचें एक्सटेन्शन झालें असून दीडदोनशे टुमदार बंगले झाले आहेत. आम्हीं ज्या ठिकाणीं झोपड्या बांधल्या होत्या त्याच ठिकाणीं १९२४ सालच्या एकोणचाळिसाव्या राष्ट्रीय सभेचा भव्य तंबू उभारला होता.

## नावाजलेले कांही वकील

मीं वकिलीला प्रारंभ केल्यावेळीं जुन्या नावाजलेल्या वकिलांपैकी हुच्चराव व त्रिमलराव यांनी वकिली सोडली होती. त्यांच्या-मागून आलेल्या वकिलांत छत्रे, खोत, नातू, बेळवी, नाडगौडा यांची बरीच प्रसिद्धी होती.

आमच्या वडिलांच्या वेळचे फक्त दोनच वकील, विठ्ठलराव कालकुंद्री व सदाशिवराव नरगुंदकर, हे अद्यापि काम करीत असत. त्यांना इंग्रजी येत नसे. नवीन मंडळींत ओक, अष्टेकर, मदगिरी वगैरे होतकरू मंडळी गणली जात असे. वेळवी व नाडगौडा हे नवेच होते, तरी त्यांनी धंद्यांत आपला जम लवकरच चांगल्या प्रकारें बसविला होता. या मंडळीशीं माझा स्नेह मी वकील होण्यापूर्वीपासूनच जुळला होता. त्यांत नाडगौडा, अष्टेकर यांचा विशेष परिचय होता. याशिवाय कृष्णराव जालीहाळ, वामनराव कुळकर्णी, कित्तूर, गुरुनाथराव नरगुंदकर, बाजीराव गुत्तीकर वगैरे मंडळी होती. या सर्व मंडळींनी पुढे मुनसफीच्या नोकऱ्या धरल्या. हल्ली यापैकी कोणीच जिवंत नाहीत. पूर्वीच्या प्रसिद्ध वकिलांतील खोत व वेळवी यांच्याखेरीज आतां कोणी हयात नाहीत. खोत यांनी पूर्वीं कांही दिवस शिक्षकाचें काम केलें होतें व आता पोलिसांत फौजदारी हुद्द्यावर ते होते. फौजदार असतांनाच त्यांची वकिलीची परीक्षा पास होऊन त्यांनी वकिलीस प्रारंभ केला. ते स्वतः फौजदार असल्यामुळे फौजदारी कामाची त्यांना चांगली माहिती असल्याचा लौकिक होऊन फौजदारी वकील म्हणून त्यांची वकिली चांगल्या प्रकारें चाले. ते वृद्ध झाले असले तरी अद्यापि ते फौजदारी कामें घेत असतात. बेळवींची वकिली अद्यापि चांगल्यापैकीच आहे. त्यांचे एक चिरंजीव बेळगावासच वकील आहेत व दुसरे मुंबईस हायकोर्टात वकिली करतात.

माझ्यामागून दोनचार वर्षांच्या अंतराने मोरोपंत मराठे, बाबासाहेब सोमण, भडकमकर, चौगुले वगैरे मंडळी आली. त्यांत पहिल्या तिघांचा व आमचा (तेलंग व मी) बराच स्नेह जुळला होता. यापैकी मोरोपंत हे बेळगावासच वकिली करीत असत. भडकमकर हे मुंबईस हायकोर्टात वकिली करीत असत.

१८९७ सालापासून १९०५ सालापर्यंत मी लक्षपूर्वक वकिली करीत होतों व या अवधींत होतकरू वकीलवर्गात माझी गणना होऊं लागली होती. वकिलीशिवाय इतर सार्वजनिक कामें करण्याची हौस जरी मला होती तरी तसे प्रसंगच फार कमी असत. 'धुरीण' व 'चिकित्सक' या दोन पत्रांत मी लेख लिहीत असें. पण या बाबतींतदेखील पुढेपुढे माझें दुर्लक्ष होऊं लागलें. वकिलीच्या कामामुळे फारशी फुरसतही मिळत नसे. फौजदारी कामाकरिता बाहेरगावींही मी जात असें. विशेषतः गोकाकच्या गिरणीला मला बरेंच जावें लागे. तेथील मॅनेजरांना मॅजिस्ट्रेटचा अधिकार होता व आठवड्यां-तून दोन दिवस त्यांचें कोर्ट असे. सीनिअर वकील कोणी फारसे जात नसत. त्यामुळे व माझ्या ओळखीदेखी त्या तालुक्यांत बऱ्याच असल्यामुळे मी वारंवार तेथे जात असें. प्रथमप्रथम या कोर्टांतील माझी दररोजची फी कमी असे. पण पुढेपुढे मींही माझा फीचा दर वाढविला होता! मॅनेजर-मॅजिस्ट्रेटना कायद्याचें ज्ञान यथातथाच असे. तथापि त्यांच्या कोर्टांत मला पुष्कळ कामें मिळाल्यामुळे बरीच माहिती झाली होती आणि केव्हा केव्हा मॅनेजरसाहेब हे मला वकील देण्याकरिता सुचवीत असत. त्यांच्या गिरणीच्या कामांतही मी केव्हा केव्हा कायद्याचा सल्ला देत असें. त्यामुळे त्यांच्या कोर्टांत माझी

प्रतिष्ठा वाढली होती. माझ्या ओळखीदेखील गोकाक तालुक्यांत पुष्कळ. गोकाकेस मुनसफ कोर्ट आल्यामुळे बेळगाव सोडून गोकाकेसच वकिली करण्याला जावें, असाही विचार माझ्या मनांत आला होता. पण बेळगावचे स्नेही व तेथील राहणी वगैरे गोष्टींचा मोह जास्ती झाला. त्यांतून बेळगावास वकिलीही बऱ्यापैकीच होती; त्यामुळे गोकाकला जाण्याचा विचार रहित केला.

वकिलींत चांगला लौकिक मिळवावा अशी प्रथम मला महत्त्वाकांक्षा होती. वडिलांनी मुनसफीकरिता प्रयत्न करण्याचा मनोदय दोनचार वेळां बोलून दाखवला होता. पण वकिली बरी चालली आहे, पुढेही चांगली वाढेल, तेव्हा नोकरी धरून उगीच परतंत्र कां व्हावें असे माझे विचार मी त्यांना कळवीत असें. माझ्या मनाच्या विरुद्ध जाऊं नये असें त्यांनी ठरविलें होतें. त्यामुळे नोकरीबद्दलचा माझ्यामागचा लकडा चुकला. वकिली चांगली चालावयाची तर त्याप्रमाणे थोडासा थाटमाट असावा असें मला वाटत होतें. आमचें घर अगदी जुन्या पद्धतीचें असून बऱ्याच गैरसोयीचें होतें. वकिलीच्या ऑफिसला, लायब्ररीला वगैरे त्यांत जागा मुळीच नव्हती. त्याचप्रमाणे कौटुंबिकपणांत-देखील या घराच्या गैरसोयीमुळे बऱ्याच अडचणी येत होत्या. कोणी पाहुणे वगैरे आल्यास त्यांना राहण्यास सोयीची जागा नव्हती. या सर्व अडचणी लक्षांत घेऊन जुनें घर मोडून नवीन बांधवावें अशी कल्पना मला आली, व माझ्या मिळकतींतून हें काम होणें शक्य नसल्याने मीं ही गोष्ट वडिलांपुढे काढली. त्यांनाही ही योजना पसंत पडली. म्हणून घराकरिता लाकडें वगैरे खरेदी करण्यांत आलीं. पण कांही कारणामुळे कामगिरीला प्रारंभ करण्याचें लवकर झालें नाही आणि पुढे मलाही घराबद्दलची जरुरी वाटेना. वकिलीवरील माझें लक्षही कमीकमी होऊं लागलें. माझे स्नेही वामनराव देसाई हे गोखल्यांच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद झाले होते. तेलंगांचें लक्ष वकिलीकडे फारसें पहिल्यापासूनच नसे. त्यामुळे आपणही कांही तरी सार्वजनिक कामें अंगावर घ्यावींत असें मला मधूनमधून वाटत असे. म्हणून घर बांधण्याची कल्पना मागेमागे पडत चालली.

वकिली करीत असतांना कोर्टाचें काम संपल्यानंतर रात्रीं आठनऊ वाजेपर्यंत मी क्लबांत घालवीत असें. टेनिस खेळणें, वर्तमानपत्रें वाचणें व कोणत्या तरी चालू गोष्टीबद्दल गप्पा मारणें हाच मुख्य कार्यक्रम क्लबांत असे. कोर्टांत वकिलांच्या खोलींत नाना प्रकार-च्या विषयांवर गप्पा चालत असत. कांहीकांही विषय तर अगदी किळस येण्यासारखे असत. सुशिक्षित लोकांचा वेळ अशा प्रकारें निरर्थक जातो याबद्दल मला वाईट वाटे. तेलंग तर कोर्टाला फारसे येत नसत. आले तरी वकिलांच्या खोलींत फार करून बसत नसत. आपला धंदा वाढविण्याकरिता कित्येक मंडळींना बऱ्याच लटपटी कराव्या लागत, हें माझ्या दृष्टोत्पत्तीला आलें. मला तसें करण्याची आवश्यकता भासण्यासारखी माझी सांपत्तिक स्थिती नसल्याकारणाने आणि मला स्वतःलाच या गोष्टी पसंत नसल्यामुळे या लटपटींचा मला तिटकारा वाटला व पुढे वकिलीकडे दुर्लक्षही होऊं लागलें.

प्रकरण सहावें

# सार्वजनिक जीवनांतलें पदार्पण

*म्युनिसिपालिटीचें आव्हान*

वकिलीला प्रारंभ केल्यानंतर थोड्याच वेळानें बेळगाव शहर म्युनिसिपालिटीची त्रैवार्षिक निवडणूक आली. वडील कांही वर्षें म्युनिसिपालिटींत निवडून येत असत. पण एकदोन वेळां निवडणुकींत त्यांना यशही आलें नाही. यामुळे निवडणुकीची धांदल काय असते याची कल्पना मला साधारणपणें होती. चढाओढीमध्ये जी एक प्रकारची ईर्ष्या उत्पन्न होते, तींत मला मौज वाटत होती. अलीकडे स्वतःच्या निवडणुकीचे प्रसंग जरी आले नाहीत तरी इष्टमित्रांच्या निवडणुकी-करिता अनेक वेळां खटपटी कराव्या लागल्या. त्या त्या प्रसंगींदेखील माझ्यामध्ये अगदी तारुण्यांतील जो हुरूप वाटत होता, तोच दिसून येत असे. अशा प्रकारचीं चढाओढीचीं कामें हातीं घेतल्यानंतर किंवा अंगावर येऊन पडल्यानंतर त्यांत अपयश येऊं नये असें मनापासून वाटतें आणि त्याकरिता वाटेल ती झीज सोसण्याकडे मनाची प्रवृत्ती होते. १८९७ सालच्या निवडणुकीसंबंधानें कोर्टांत वकिलांच्या खोलींत चर्चा चाले. कांही वकीलही उमेदवार म्हणून उभे होते. त्यामुळे या चर्चेला केव्हाकेव्हा जोर चढे. एक दिवस असाच वादविवादाला रंग आला असतां एका वकिलांनीं मीं आमच्या वाडीतर्फे निवडणुकीला उभें राहावें असे सहज उद्गार काढले. त्या वेळीं आमच्या वाडीतर्फे कै. विश्वंभरराव अष्टेकर वकील हे काम करीत होते; व तेच पुन्हा नवीन निवडणुकीकरिता उमेदवार होते. त्या वेळीं म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष स्वतः जिल्ह्याचे कलेक्टर असत. तेव्हा उपाध्यक्षाच्या जागेला महत्त्व असे. अष्टेकरांनी स्कूल कमिटीवर व मॅनेजिंग कमिटीवर अध्यक्ष नात्यानें यापूर्वी कामें केलीं होतीं. त्यामुळे त्यांच्या मनांत उपाध्यक्षाचें काम करावें असें आलें होतें. म्हणून ते निवडणुकीच्या भानगडींत पडले होते. मीं त्यांना विरोध करावा ही कल्पना मला बरी वाटली नाही. ते आमचे भाऊबंद

होते व माझ्यापेक्षा वडील होते. त्याचप्रमाणे उपाध्यक्ष होण्याची त्यांची इच्छाही गैर नव्हती. या शिवाय मीं वकिलीला नुकताच प्रारंभ केला होता. म्हणून नसत्या भानगडींत मीं पडावें असेंही वाटेना. पण मीं निवडणुकीला उभें राहावें म्हणून जी सूचना केली गेली तीवरच वाद सुरू झाला. कांहींनी माझा पक्ष घेऊन मी खास निवडून येईन असें भाकित केलें. मी नवीनच वकील असल्याकारणानें माझी माहिती लोकांना विशेष नाही, तेव्हा निवडणुकींत मला खात्रीने यश येणार नाही, असें कित्येकांनी प्रतिपादन केलें. वकिलांच्या खोलींत अशा प्रकारच्या गप्पा नेहमीच चालत, म्हणून तिकडे मीं विशेष लक्ष दिलें नाही. पण अष्टेकरांनीही या वादांत भाग घेतला; व त्यांच्या तोंडून "कोणी ब्रह्मदेव उभा राहिला तरी त्याला पाडून मीच निवडून येणार" असे उद्गार निघाले.

मला थोडी चीड आली ही गोष्ट खरी आहे. पण माझ्यातर्फे जी मंडळी बोलत होती त्यांना विशेष राग आला. माझा व त्यांचा विशेष स्नेहसंबंध नसल्यानें माझ्या बाबतींत त्यांना आपलेपणा वाटण्यासारखें कांही होतें असें नाही. अष्टेकरांना विरोध करावा हीच त्यांची इच्छा असावी. त्यांनी मला उभें राहण्याबद्दल भर देऊन मदत करण्याचेंही कबूल केलें. यांत वकिलांतील जुने व प्रतिष्ठित वकीलही कांही होते. मंगेशराव तेलगांना ही कल्पना पसंत पडली. सार्वजनिक कामांत पुढाकार घेण्याची संधी व्यर्थ घालवूं नये असें त्यांना वाटलें आणि सार्वजनिक कामें करण्याकरिता समाजांत एक दर्जा असावा लागतो म्हणून म्युनिसिपालिटीसारख्या संस्थांत शिरणें जरूर आहे असें त्यांचें मत पडलें. वडिलांना ही हकीकत कळली व त्यांनीही या गोष्टीला संमती दिली. माझे स्नेही डॉ. शिरगावकर यांचें मत अनकूल होतें. त्यांची प्रतिष्ठा चांगली असल्याकारणानें त्यांच्या मदतीचा उपयोगही चांगला होण्यासारखाच होता. या सर्व गोष्टी अनुकूल असल्यानें मीं निवडणुकीला उभें राहण्याचें ठरविलें व निवडणुकीच्या नवीन पद्धतीला अनुसरून माझ्या नावाचा मॅनिफेस्टो काढला. ही गोष्ट बेळगावांत प्रथमच घडून आली. मॅनिफेस्टोमध्ये माझ्या संबंधानें विशेष लिहिण्यासारखें कांही होतें अशांतील प्रकार नव्हता. मी बी. ए., एल्एल्. बी. असून लोकसेवा करण्याची माझी इच्छा तीव्र आहे वगैरे मामुली मजकूर त्यांत होताच. पण अष्टेकरांना सोडून मला निवडून मतदारांनी कां द्यावें, याबद्दल योग्य कारण मला दाखवितां आलें नाही. मी नवीन व अननुभवी आहें याचा फायदा अष्टेकर व त्यांचे मदतनीस घेणार, ही कल्पना येऊन त्याला तोड म्हणून म्युनिसिपालिटींत कांही जुन्या सभासदांनी आपली 'वतनदारी' प्रस्थापित केली आहे, तिला आळा घालून नवीन होतकरू मंडळींना सार्वजनिक कामें करण्याची सवड देणें हें मतदारांचें कर्तव्य आहे, असा एक विशेष मुद्दा माझ्यातर्फे मीं नमूद केला होता. मीं व तेलंगांनी मिळून मॅनिफेस्टोचा मसुदा तयार केला होता. त्यांतील मजकुराची आठवण होऊन आतां देखील एक प्रकारची मौज वाटते. उमेदवार होण्याची इच्छा याप्रमाणे मॅनिफेस्टोच्या द्वारा जाहीर करून मी स्वस्थ बसलों नाही. मी नवीन

असल्यामुळे माझें कांही चालणार नाहीं, म्हणून दोन तीन दिवस बेफिकीर राहिलों.

### अष्टेकरांचा दिलदारपणा

या अवधींत मीं व माझ्या स्नेह्यांनी बरीच खटपट केली. आमच्या वार्डांत सुशिक्षित ब्राह्मणवर्गाचा भरणा फार होता. त्यांनी दिलेलीं वचनें फिरवण्याचा संभव नव्हता. कांही भागांत अशिक्षित लोक होते. त्यांचीं मतें मिळवण्याचें काम कठीण होतें. सार्वजनिक कामें करण्याची पात्रता कोणत्या उमेदवारांत किती आहे हें विवेकबुद्धीने पाहण्याची सवय यापूर्वी कोणत्याच उमेदवारानें त्यांना लावली नव्हती. भीड व वजन खर्च करून व प्रसंगोपात्त अन्यमार्गानें म्हणजे लाचलुचपत देऊन किंवा धाकदपटशा देऊन त्यांचीं मतें मिळवण्याचा धोपटमार्गच रूढ झाला होता. अशा मतदारांखेरीज इतर मतदारांपैकी बहुतेकांनी मला मतें देण्याचें कबूल केलें होतें. प्रसंग आला असता तर मीं वर वर्णिलेल्या अशिक्षित लोकांचीं मतें मिळवण्याला कांही कमी केलें असतें असें मला वाटत नाहीं. पंधरावीस दिवस माझ्या डोळ्यांपुढे दुसरा विषय नव्हता. रात्रीं झोप देखील चांगली लागत नसे. सारखी काळजी वाटत होती. अशिक्षित लोकांचीं मतें मिळवणें अष्टेकरांना मुळीच कठीण गेलें नसतें. त्यांतून अशा प्रकारच्या निवडणुकींचा त्यांना अनुभव असल्याकारणाने त्यांनी तीं मतें सहज मिळविलीं असतीं. पण अशा लोकांच्या मतानें निवडून येणें त्यांना योग्य वाटलें नाही. व बऱ्याच शिक्षित मतदारांनी मला संधी द्यावी असा अष्टेकरांना सल्ला दिला. त्यामुळे व आपापल्यांत चढाओढ होणें अनिष्ट वाटल्यामुळे त्यांनी उमेदवारींतून आपलें नाव काढून घेतलें. इतकेंच नव्हे, तर दुसरा कोणी उमेदवार माझ्याविरुद्ध उभा राहिल्यास त्याला पाडण्याकरिता मला मदत करण्याचें वचन दिलें. या त्यांच्या दिलदारपणाचा माझ्यावर बराच परिणाम झाला आणि तेव्हापासून माझा व त्यांचा स्नेह जुळला. तो स्नेह ते मरेपर्यंत कायम होता. पुढे १९१२ पर्यंत म्युनिसिपालिटीच्या ज्या निवडणुकी झाल्या त्यांत मी उमेदवार राहत असें. तेव्हा प्रत्येक वेळीं अष्टेकर हे मला अथवा माझ्या स्नेही उमेदवारांना निरपेक्षपणें मदत करीत असत. त्यांचें घराणें श्रीमंती थाटाचें होतें व तेही श्रीमंतींत वाढले होते. पण त्यांच्या वडिलांनी बरेंच कर्ज वगैरे करून ठेविलें होतें म्हणून पितापुत्रांचें पटत नसे. म्हणून ते वडिलांपासून वेगळे राहिले होते, व स्वतंत्रपणें वकिली करून राहात असत. तें पुढे व्यसनासक्त झाल्यामुळे अकाली वारले. माझा व त्यांचा स्नेह जुळल्यानंतर त्यांना व्यसनापासून परावृत्त करण्याबद्दल मीं शिकस्तीचा प्रयत्न केला, पण यश आलें नाही. असो.

### 'बेळगावचे पाटील' भीमराव

माझ्याविरुद्ध उमेदवार कोणी न राहिल्यामुळे पहिल्या निवडणुकींत मी यशस्वी झालों. या निवडणुकींत बेळगावच्या मराठे जातींतील

एका प्रसिद्ध गृहस्थाचा माझा संबंध आला. हे गृहस्थ म्हणजे भीमराव पाटील. हे बेळगावच्या मराठे पाटील घराण्यांतील प्रमुख होते. यांच्या भाऊबंदकीच्या तंट्याभांडणांत यांनी बराच पुंडपणा केला होता अशी यांची प्रसिद्धी होती. या तंट्यासंबंधाने बेळगाव शहर फौजदाराला पाटलांच्या घराजवळ रस्त्यावरून जात असतांना बराच मार बसला होता. हें प्रकरण मॅजिस्ट्रेट कोर्टांत जाऊन भीमराव व त्यांचे साथीदार यांना दंड होऊन चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन वगैरे द्यावे लागले होते. सन १८९४ सालीं बेळगावास हिंदू-मुसलमानांची मोहरमांतील सोंगासंबंधाने मोठी मारामारी झाली होती. कांही मुसलमान सोंगें काढणाऱ्यांनी हिंदूंच्या विठोबासारख्या देवांचीं सोंगें काढून बीभत्स शब्दांचा उपयोग केला होता. हा प्रकार हिंदूंना सहन झाला नाही व त्याचें पर्यवसान मारामारींत झालें. या मारामारींत तीनचार मुसलमानांचे मुडदे पाडले गेले व बऱ्याच लोकांना जखमा झाल्या. याच वेळेला मुंबई, येवला इत्यादि ठिकाणीं हिंदू-मुसलमानांचे दंगे झाले होते. या बेळगावच्या दंग्याचा परिणाम म्हणून कांही हिंदु पुढाऱ्यांवर खुनाचे वगैरे आरोप ठेवण्यांत येऊन खटले भरण्यांत आले. त्यांत भीमराव पाटील (मराठे), नाना जठार (ब्राह्मण) वगैरे मंडळी होती. त्या वेळीं भीमराव आपल्या अगदी ऐन जवानींत होते. दंग्याच्या वेळीं दंगा झाल्या ठिकाणीं भीमराव प्रत्यक्ष हजर होते ही गोष्ट कांही खोटी नव्हती. पण आपण कोणाही मुसल्मानाला मारलें नाही, इतकेंच नव्हे तर पुष्कळ मुसलमानांचे प्राण वाचविले, असें ते मला माझा व त्यांचा स्नेह जुळल्यानंतर सांगत असत. त्यांचें सांगणें मला खोटें मानण्याला बिलकूल कारण नाही. "मी बेळगावचा पाटील आहें. बेळगावच्या केवळ हिंदूंचा पाटील नाही. सर्व जातींचे लोक माझेच आहेत" असें ते अभिमानाने म्हणत असत. त्यांचा डौल व एकंदर शरिराची ढब बरीच रुबाबदार असे. त्यामुळे ते दुसऱ्यावर छाप पाडीत असत. त्यांचें शिक्षण फारसें नव्हतें; पण प्रसंगावधान व समयसूचकता हे गुण त्यांच्यामध्ये असल्याने व बोलण्यांत एक प्रकारचा स्वाभिमान असल्यामुळे त्यांचें भाषण तेजस्वी असे. मराठे जातींत हे प्रमुख असल्यामुळे व दंग्याच्या जागीं हजर असल्यामुळे यांच्यावर खटला होणें साहजिक होतें. या खटल्याच्या योगाने बेळगावांत बरीच खळबळ उडाली होती. आरोपीतर्फे काम चालवण्यास लॉर्ड कॉलिन कॅंबेल हे बॅरिस्टर आले होते. हे प्रसिद्ध ड्यूक ऑफ आर्गाइल यांचे चिरंजीव असून खुद्द व्हिक्टोरिया राणीसाहेबांचे जवळचे नातलग होते. वडिलांचें व त्यांचें जुळलें नाही म्हणून ते मुंबईस बॅरिस्टरीकरिता आले होते असें आम्हीं त्या वेळीं ऐकलें होतें. या खटल्यांतील सर्व आरोपी सुटले. तेव्हापासून बेळगावचे हिंदू मुसलमानांच्या मोहरमच्या उत्सवांत भाग घेईनासे झाले. तेव्हापासून भीमरावांची हिंदू जातींत बरीच प्रतिष्ठा वाढली होती. भीमरावांचा उपयोग मला माझ्या पुढील कार्यांत अनेक प्रसंगीं झाला. ती हकीकत पुढे यावयाची आहे, म्हणून तूर्त त्यांच्यासंबंधाने इतकेंच येथे नमूद करीत आहें.

हे भीमराव मराठे व ब्राह्मणेतर जातींत अष्टेकरांकरिता मदत करीत होते. ही हकीकत

मला समजली म्हणून त्यांनी आपले गुरू असे मानलेले पंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांना भेटून "अष्टेकरांना मदत भीमरावांनी करूं नये व मला मदत करावी" अशी त्यांच्याकडून भीड मीं घालवली. याचा परिणाम असा झाला की, त्यांनी अष्टेकरांना मदत करण्याचें सोडलें, पण मला करण्याला ते तयार झाले नाहीत. मीही तेवढ्याने संतुष्ट झालों व जास्ती भीड घालूं नये म्हणून पंतांना कळवलें. तेव्हापासून भीमरावांसंबंधाने माझ्या मनांत आपलेपणा वाढूं लागला. मी म्युनिसिपालिटींत गेल्यानंतर ज्या पक्षाशीं मला विरोध करावा लागला त्याच पक्षांत भीमराव हे प्रमुख होते व पुष्कळ अंशीं त्यांच्या विरोधामुळेच पुष्कळ वर्षेपर्यंत माझें बहुमत म्युनिसिपालिटींत झालें नाही. तथापि इतर सार्वजनिक बाबतींत ते मला मनापासून मदत करीत असत. ओघाने पुढे ही हकीकत येईलच.

### *म्युनिसिपालिटींतील 'वतनदारी'*

म्युनिसिपालिटींतील 'वतनदारी' मोडण्याकरिता म्हणून मीं माझा तेथें प्रवेश करून घेतला. पण उमेदवार म्हणून उभा राहिल्यावेळीं या वतनदारीचीं पाळेंमुळें किती खोल गेलीं होतीं व तीं उपटून काढणें किती कठीण होतें, याची मला कल्पना नव्हती. मी म्युनिसिपालिटींत जाण्याच्या पूर्वी जॅक्सन हे कलेक्टर होते व तेच म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते. लल्लुभाई गोवर्धनदास हुजूर डेप्युटी कलेक्टर व सिटी मॅजिस्ट्रेट हे उपाध्यक्ष होते. जॅक्सनसाहेबांचा पुढे १९०९ सालीं नाशिक येथे थिएटरमध्ये खून झाला. जॅक्सन यांची म्युनिसिपालिटींत वागणूक फारच सभ्यपणाची असे. कोणत्याही सभासदाचें नाव घ्यावयाचें झाल्यास त्या नावापुढे 'साहेब' हा मानार्थी शब्द ते लावीत असत. कमेटींत आल्याबरोबर सर्व सभासदांशीं शेकहँड करण्याची त्यांची पद्धत असे. त्यांना संस्कृताचें चांगलें ज्ञान होतें. व मराठीही बोलतां येत असे. म्युनिसिपालिटीचें काम मराठींतच चाले. जॅक्सन हे स्वतः चर्चेत भाग घेत असत. पण सर्व काम उपाध्यक्ष लल्लुभाई यांच्याच तंत्राने चाले. जॅक्सन फिरतीवर गेले किंवा सभेला हजर राहूं शकले नाहीत तर उपाध्यक्ष हेच अध्यक्षस्थान स्वीकारीत. लल्लुभाई हे हुषार होते. कामें वेळेवर टापटिपीनें आटोपण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्यांना इंग्रजी, मराठी, हिंदी या भाषा चांगल्या अवगत होत्या. संस्कृतही येत होतें. सभेच्या दिवशीं ज्या ठरावांची चर्चा व्हावयाची असे त्या ठरावांचे मसुदे ते स्वतः आगाऊच लिहून आणीत. आणि तेच ठराव बहुतकरून बहुमताने व पुष्कळ वेळां एकमताने मंजूर होत. त्यांचें वजनही सभासदांवर चांगलें असे. त्यामुळे म्युनिसिपालिटीचें काम बहुतेक एकतर्फी चाले. त्यांनी आपले कांही हस्तक करून ठेविले होते. त्यांच्याच हातांत सर्व सत्ता होती. निवडणुकी सर्व यांच हस्तकांच्या धोरणाने होत. सरकारतर्फेच्या नेमणुकी यांच पक्षाच्या सल्ल्याने होत. बेळगावांत बारापंधरापेक्षा जास्ती पारशी कुटुंबें नाहीत. यांचीं राहण्याचीं घरेंदेखील कँटोनमेंटच्या हद्दींत होतीं. तरी म्युनिसिपालिटींत चार पारशी गृहस्थ असत, आणि हे सर्व सरकारने नेमलेले असत.

या पक्षाचें वर्चस्व कमी करावें म्हणून कित्येक सुशिक्षित वकील मंडळींनी प्रयत्न केले होते, पण त्यांना यावें तितकें यश आलें नाही. या पक्षांतील बहुतेक मंडळी अधिकारलोलुप होती इतकेंच नव्हे तर पुष्कळ कामांत त्यांच्याकडून अन्याय व जुलूम होत असे. भीडमुर्वतीचे व केव्हाकेव्हा लाचलुचपतीचे प्रकारही घडत असत. माझी स्नेही मंडळी या पक्षाच्या विरुद्ध होती. माझ्याही मनांतून या पक्षाचें उच्चाटन करावें असें होतें. पण या मताचे आम्ही एकदोघेच प्रथम असल्यामुळे आमचें कांही चालत नसे. अधिकाराच्या कोणत्याही कमिटींत आम्हांला घेतलें नव्हतें. फक्त सर्वसाधारण त्रैमासिक सभा भरत त्याच वेळीं आम्हांला आमचे विचार मांडण्याची संधी मिळे. पण बहुमत आमच्या विरुद्ध असल्याकारणाने आमचें कांहीच चालत नसे. स्वतः अध्यक्षच हजर असले व आमचें म्हणणें सयुक्तिक आहे असें त्यांना पटलें म्हणजे ते आमच्या म्हणण्याचें समर्थन करीत. त्यांना नाराज करूं नये या इच्छेने आम्हांला बहुमताचा पाठिंबा केव्हा तरी मिळे. पण, असे प्रसंग फारच कमी येत असत. यामुळे म्युनिसिपालिटीचें काम चांगल्या प्रकारें चालेल असें घडवून आणण्याला या अधिकारारूढ पक्षाचा पाडाव करणें जरूर होतें. पुढील बरींच वर्षे माझीं याच खटपटींत गेलीं. आमच्या हातीं वर्तमान-पत्र असल्याकारणाने वर्तमानपत्रांतून म्युनिसिपालिटीच्या कारभारावर टीका येणें साहजिक होतें. ही गोष्ट लल्लुभाई यांच्या लक्षांत येऊन मला आपल्या पक्षाकडे ओढण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

लल्लुभाई यांना वेदांत विषयाची आवड असे. वेदांतावरील हिंदी, मराठी, गुजराती पुस्तकें त्यांनी चांगलीं वाचलीं होतीं. विषय समजावून देण्याची कला त्यांना चांगली साधली होती. त्यांच्या बंगल्यावर दर दिवशीं प्रातःकाळीं नियमाने ते वेदांतावर प्रवचनें देत असत. गावांतील पुष्कळ वेदांतप्रिय स्त्रीपुरुष मंडळी तें ऐकण्यास जात असत. आमच्या वडिलांना वेदांताचा नाद होता. मी वकिली करूं लागल्यापासून त्यांनी आपला धंदा सोडला व हुदलीस एका मळ्यांत एक लहानसें घर बांधून ते एकदोन शास्त्र्यांच्या मदतीने वेदांताचा विशेष अभ्यास करूं लागले. बेळगावाला ते जेव्हा येत तेव्हा लल्लुभाईकडे नियमाने जात. त्यामुळे त्या दोघांचा बराच परिचय जडला. १८९८ किंवा १८९९ सालीं लल्लुभाईंनी आपली सबंध नाताळची सुट्टी आमच्या मळ्यांतच घालविली. त्या वेळीं बेळगावांतील त्यांचा सर्व परिवार त्यांच्याबरोबर होता. मीही त्यांच्या व्यवस्थेकरिता त्यांच्याबरोबर होतों. सकाळीं नदींत स्नान करून सात वाजल्यापासून अकरा-बारा वाजेपर्यंत अष्टावक्र गीतेवर त्यांचीं प्रवचनें होत असत. याच मुक्कामांत आमच्या वडिलांच्या समक्ष म्युनिसिपालिटीच्या संबंधाने लल्लुभाईंनी गोष्टी काढल्या व धूर्तपणाच्या कांही सूचनाही मला दिल्या.

बंडोपंत उच्चगावकर या नावाचे एक प्रसिद्ध गृहस्थ बेळगावास होऊन गेले. हे लल्लुभाईंचे मुख्य हस्तक असत. हे ऑनररी मॅजिस्ट्रेट होते व त्यांना रावसाहेब ही पदवी मिळाली होती. हा मोठा महत्त्वाकांक्षी व खटपटी गृहस्थ असे. पण या

गृहस्थामुळे गावांतील पुष्कळ संभावित लोकांना उपद्रवही होत असे. म्युनिसिपालिटीच्या नोकराचाकरांना, शाळांतील मास्तर-मास्तरणींना यांचा जुलूम असह्य झाला होता. म्हणून या गृहस्थाचें वर्चस्व कमी झाल्याखेरीज म्युनिसिपालिटीचें काम सुधारणार नाही अशी माझी व माझ्या मित्रमंडळीची खात्री झाली होती आणि त्या दिशेने आम्ही प्रयत्न करीत होतों. लल्लुभाईंनी या गृहस्थाची माझ्याजवळ पुष्कळ शिफारस केली आणि माझा व त्यांचा स्नेह जमावा व आम्ही दोघांनी एकोप्याने काम करावें अशी इच्छा दर्शविली. पण मला त्यांचें बोलणें पटलें नाही. बंडोपंताच्या अन्यायी व जुलमी वर्तनाचीं उदाहरणें मी लल्लुभाईंपुढे मांडलीं, आणि त्यांचाच आश्रय बंडोपंताला असल्यामुळे त्याच्या हातून अशीं कृत्यें घडतात असा त्यांच्यावर आरोप असल्याचें मीं त्यांना स्पष्ट कळवलें. यानंतरही पुन्हा एकदोन वेळां त्यांनी प्रत्यक्षपणें व अप्रत्यक्षपणें प्रयत्न केला. म्युनिसिपालिटींत बहुमताच्या तंत्राने मी वागल्यास चेअरमनची किंवा उपाध्यक्षाची जागा मला मिळून सरकारदरबारीं माझी प्रतिष्ठा वाढण्याचा संभव आहे, अशा प्रकारचें आमिषही मला दाखवण्यांत आलें. पण त्याचा कांही उपयोग झाला नाही.

### *आमच्या प्रयत्नांना यश*

तथापि मलाही बरेच दिवस म्युनिसिपालिटींत बहुमत न मिळाल्यामुळे माझाही उपयोग म्युनिसिपालिटीच्या कामांत विशेष होत नसे. तरी प्रत्येक निवडणुकीच्या वेळीं उचगावकरांच्या पक्षाचा पाडाव व्हावा म्हणून मी कसून प्रयत्न करीत असें. एका खेपेला उचगावकर पक्षांतच दुफळी झाली. त्याचा फायदा आम्हीं घेतला व नातू यांना उपाध्यक्ष निवडून आणण्याचा आमचा प्रयत्न यशस्वी झाला. त्या वेळीं लल्लुभाई बेळगाव सोडून गेले होते. अर्देसर नौरोजी म्हणून एक पारशी गृहस्थ उपाध्यक्षाच्या जागेकरिता उमेदवार होते. बंडोपंतांचें व त्यांचें कांही बाबतींत वितुष्ट आल्यामुळें बंडोपंत व त्यांच्या पक्षाची कांही मंडळी आम्हांला मिळाली होती. उपाध्यक्षाच्या निवडणुकीच्या पूर्वी एक दिवस रात्रीच्या वेळीं आम्हीं कांही बिनभरवशाच्या मेंबर लोकांना नातूंच्या माडीवर ठेवलें होतें. दुसरे दिवशीं म्युनिसि-पालिटींत त्यांनी मतें दिल्यानंतरच त्यांना घरीं सोडलें. या मंडळींतील एक गृहस्थ पुढे रावबहादूर व ऑनररी मॅजिस्ट्रेट झाले.

बंडोपंत जरी आमच्या पक्षाला येऊन मिळाले तरी त्यांना अधिकाराची कोणतीही जागा द्यावयाची नाही असें मीं व नातूंनी ठरविलें होतें. त्यांच्या आवडीची जागा म्हणजे स्कूल कमिटीच्या अध्यक्षपणाची. पुष्कळ मास्तरांच्या व विशेषतः मास्तरणींच्या कागाळ्या आमच्या कानांवर आल्याकारणाने आम्हीं ही जागा त्यांना द्यावयाचीच नाही असा निश्चय केला होता. त्याप्रमाणे त्यांना ही जागा न देतां मी स्वतः स्कूल कमिटीचा अध्यक्ष झालों. ही जागा पतकरण्यांत माझा आणखी एक हेतू होता. यावेळीं स्वदेशीची व बहिष्काराची चळवळ जोरांत होती व तींत मी प्रामुख्याने भाग घेत

असे. त्याबद्दलची हकीकत पुढे येईल. तेव्हा म्युनिसिपालिटींत अधिकाराची एखादी जागा घेऊन तिचा उपयोग चळवळीकरिता करावा अशी माझी कल्पना होती. शाळा-कमिटीचा मुख्य अधिकारी झाल्याने शाळामास्तरांच्या द्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वदेशी चळवळीला उत्तेजन देतां येईल असें मला वाटे. शिक्षकांच्या दोनतीन सभा भरवून शिक्षणाच्या कामाबरोबर स्वदेशीसारख्या देशहिताच्या चळवळी मुलांवर बिंबवणें हें शिक्षकांच्या कार्यक्षेत्रांत येतें असें मी बोललों होतों. हें माझें म्हणणें पटून असो किंवा मला खूष करण्याकरिता असो, कांही शिक्षकांनी आपल्या वर्गांत या दिशेने कांही प्रयत्नही केले होते.

पण माझे हे प्रयत्न फार दिवस चालले नाहीत. स्कूल कमिटीच्या अध्यक्षाची जागा बंडोपंतांना न मिळाल्यामुळे ते आमच्या मंडळीवर नाराज झाले होते व अर्देसर यांच्या पक्षांत पुन्हा जाण्याची संधी पाहात होते. त्या वेळीं ड्यू या नावाचे एक दक्षिण भाग कमिशनर होते. त्यांचें व बंडोपंतांचें बरें होतें. मी स्वदेशीच्या व बहिष्काराच्या चळवळींत भाग घेत असून माझ्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असतों, अशी कागाळी त्यांच्या कानावर कोणीं तरी घातली. या संबंधांत मला व नातूंना त्यांनी बोलावणें पाठवलें व ही गोष्ट मीं करूं नये म्हणून आम्हांला कळवलें. मला थोडा राग आला व राजीनामा द्यावा असें मनांत आलें. पण नातूंनी तसें न करण्याबद्दल माझें मन वळवलें. नातू हे त्या वेळीं बेळगावचे पुढारी होते व त्यांची मदत मला इतर सार्वजनिक कामांत होत असे, म्हणून मीं त्यांचें बोलणें मान्य केलें. पण म्युनिसिपालिटीसारख्या संस्थांत देखील देशहिताच्या गोष्टी करण्याला स्वातंत्र्य नसतें ही गोष्ट मला कळून आली. १९०७ पासून १९०९-१९१० पर्यंत माझें राहणें बेळगावीं विशेष नसे. त्यामुळे म्युनिसिपालिटीच्या कामांत विशेष लक्ष घालण्याला सवड झाली नाही. तथापि बंडोपंताच्या पक्षाचा जोर कमी करण्यांत आम्हांला यश आलें होतें.

## ‘वतनदारी’ मोडली

१९०३-१९०४ सालापासूनच माझें व तेलंगांचें जुळेनासें झालें होतें. म्हणून त्यांच्याबरोबर सहकार्य करण्याचें मीं सोडून दिलें होतें. त्यांचा व मोरोपंत मराठे यांचा स्नेह विशेष जुळला होता. मोरोपंत व तेलंग मिळून ‘चिकित्सक’ पत्रांत लेख लिहीत असत. एकदा म्युनिसिपालिटींत निवडणुकीकरिता मोरोपंतांना तेलंग वगैरे मंडळींनी मिळून उभे केलें होतें. सार्वजनिक कामांत हे माझ्याविरुद्ध असल्याने म्युनिसिपालिटीमध्ये या मंडळींचें वर्चस्व असू नये असें मला व माझ्या मित्रमंडळींना वाटलें. म्हणून मोरोपंतांना विरोध करण्याकरिता आम्ही रंगोपंत नाईक यांना उभे केलें. या निवडणुकीस डॉ. शिरगावकर, मणेरीकर व खुद्द माझे वडील मोरोपंतांना मदत करीत होते. तथापि माझ्या वडिलांनी मला पूर्ण मोकळीक दिली होती. वडील एका बाजूला व मी दुसऱ्या बाजूला अशा प्रकारें

मराठी ग्रंथ सं[illegible] ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ....सार्वजनिक जीवनांतलें प्रकरण...
क्रमांक ........................ नों: दि: ..............

ही निवडणूक मोठ्या चुरशीची झाली. निवडणुकीच्या दिवशीं पोलिंग ऑफिसमध्यें आम्ही एकमेकाविरुद्ध काम करीत होतों. ही मौज पाहण्याकरिता गावांतील पुष्कळ मंडळी जमली होती. शेवटीं मोरोपंत पडले व आम्ही विजयी झालों. पुन्हा एका वेळेला मोरोपंतांच्या विरुद्ध बेळवी होते, व या निवडणुकींतही बेळवीच निवडून आले. १९१४ साल हें माझें म्युनिसिपालिटीच्या संबंधांत अखेरचें होतें. त्या सालीं आमच्या पक्षाचें बहुमत होतें. लोकनियुक्त अध्यक्ष नेमण्याचा अधिकार मिळाला होता. पण तीनचतुर्थांश मतांची जरुरी होती. तीनचतुर्थांश मतें मिळाल्याखेरीज बहुमत असूनही अध्यक्ष होतां येत नसे. मीं अध्यक्ष व्हावें असें बहुमत होतें; पण तीनचतुर्थांश मतें पडण्याचा संभव नव्हता. माझ्याविरुद्ध अर्देसर नौरोजी—दारूमक्तेदार—हे अध्यक्षपदा-करिता खटपट करीत होते. पण त्यांनाही यश येणें अशक्य होतें. दोघांपैकी एकालाही तीनचतुर्थांश मतें पडण्याचा संभव नव्हता. अशा स्थितींत सरकाराकडून अध्यक्ष नेमला जाण्याचा संभव होता, व तसा प्रसंग आला असता तर सरकाराकडून अर्देसर यांचीच नेमणूक झाली असती. कांही करून हें होऊं द्यायचें नाही असें आमचें ठरलें होतें. म्हणून मीं एक युक्ती सुचवली. त्या वर्षी सरकारतर्फे नेमणूक झालेल्या लोकांत मिलर या नावाचे एक इंग्रज गृहस्थ हायस्कूलचे हेडमास्तर हे होते. त्यांचें मत माझ्याविरुद्ध म्हणजे अर्देसरला पडलें असतें. तरी त्यांना भेटून मला त्यांनी आपलें मत कां द्यावें हें मी समजावून सांगत होतों. माझें म्हणणें त्यांना पटत असे; पण आपण सरकारी नोकर असल्यामुळे आपल्याला अर्देसरलाच मत द्यावें लागेल असें त्यांचें धोरण होतें. तीनचतुर्थांश मताला एकचतुर्थांश मत मला कमी पडत होतें. खूप खटपट करूनही हें साध्य होत नाही, असें जेव्हा स्पष्ट दिसलें त्या वेळीं दुसरा कोणी अध्यक्ष झाला तरी हरकत नाही, पण अर्देसरला होऊं द्यावयाचें नाही असें आमचें ठरलें. यानंतर मिलर यांना अध्यक्ष होण्याबद्दल मीं सुचविलें. म्युनिसिपालिटीमध्यें दुफळी आहे त्यामुळे काम योग्य प्रकारें होत नाही; ती मोडण्याकरिता कोणी तरी तिऱ्हाईत अध्यक्ष असणें बरें, असें त्यांना सांगण्यांत आलें. विचार करून काय तें सांगतों, असें त्यांनी आम्हांला उत्तर दिलें. त्यांच्या मनांत कलेक्टरचा सल्ला घ्यावयाचा होता असें दिसलें. एकदोन दिवसांनंतर आम्हांला अनुकूल असें त्यांचें उत्तर आलें. यामुळे अर्देसरची अडचण गेली. उपाध्यक्ष मीच निवडून आलों. मिलरला अध्यक्ष करण्याचें आम्हीं ठरवतांच अर्देसर, उचगावकर वगैरे आमच्या विरोधी मंडळींनी अध्यक्षाच्या निवडणुकीला विरोध केला नाही. त्यामुळे मिलर हे एकमताने निवडून आले. कमिटी वगैरे बहुमतानेच निवडावयाच्या होत्या व आमचेंच बहुमत असल्यामुळे आमचीच मंडळी निवडून आली. त्यामुळें जी पाळीं प्रथमारंभीं माझ्यावर आली होती तीच पाळी अर्देसर व बंडोपंत उचगावकर वगैरे तत्पक्षीय मंडळीवर आली व म्युनिसिपालिटींतील वतनदारी सर्वतोपरी मोडली गेली.

## म्युनिसिपालिटींतील कामगिरी

म्युनिसिपालिटीचा व माझा संबंध आल्या-पासून माझ्या हातून विशेष कामगिरी झाली नाही. याला कारण पुष्कळ दिवसपर्यंत मला बहुमताचा पाठिंबा मिळाला नाही हें एक; आणि दुसरें, जेव्हां माझ्याकडे बहुमत होऊं लागलें तेव्हा माझें लक्ष दुसऱ्या व व्यापक स्वरूपाच्या कामाकडे विशेष लागलें हें होतें. शेवटच्या सालीं मिलर जरी अध्यक्ष निवडून आले होते, तरी सर्व लहानमोठीं कामें माझ्याच धोरणानें चालत. चीफ ऑफिसर सर्व कामांत माझाच सल्ला घेत. प्रत्येक प्रकरण अभिप्रायाकरिता माझ्याकडे पाठवायचा परिपाठ मिलर यांनी प्रथमपासूनच ठेवला होता. सभेच्या बैठकींना ते बहुतकरून हजर राहत नसत. त्यामुळे सभांत मलाच अध्यक्ष या नात्यानें काम करावें लागे. त्यामुळे मला कांही तरी महत्त्वाचीं कामें करून घ्यावींत अशा प्रकारची इच्छा उत्पन्न झाली व त्याप्रमाणे मी कामालाही लागलों. पण थोड्याच दिवसांत माझ्यावर खुनाचा आरोप ठेवून मला पकडण्यांत आलें, व म्युनिसि-पालिटींतील माझ्या जागेचा मीं राजीनामा दिला. ही हकीकत पुढे येईल.

मिलरसाहेबांना अध्यक्ष करण्यांत एका सरकारी अधिकाऱ्याला व इंग्रजाला आपण मदत करून आपल्या तत्त्वाला बाध आणतों ही कल्पना मनांत येत नव्हती असें नाही. त्याबद्दल आमच्या विरोधी मंडळींनी माझ्यावर आरोपही केले. पण बंडोपंतांच्या पक्षाचा एकदा मोड करावा ही इच्छा प्रबळ झाल्यामुळे, व मिलर अध्यक्ष झाले तरी ते आमच्याच धोरणानें वागणार हे नक्की ठरल्यामुळे, खरी सर्व सत्ता आमच्याच हातीं येणार म्हणून आम्हीं आमच्यावर होत असलेल्या टीकेकडे दुर्लक्ष केलें आणि आमचा बेत तडीला नेला. तथापि आज हें लिहीत असतांना हें माझें करणें योग्य होतें किंवा नाही याबद्दल शंका येते व माझ्या हातून एक प्रकारची चूक घडली असेंही वाटतें. स्वतः अर्देसर हे होतांहोईतों न्यायाला अनुसरून वागणारे होते. पण त्यांना पुढे करणारे बंडोपंत हे पूर्वीं सांगितल्याप्रमाणे जुलमी, न्यायअन्याय न पाहणारे, असे स्वार्थी वृत्तीचे होते. म्हणूनच आमचाही अर्देसरांना विरोध होता. अर्देसरांना अध्यक्ष नेमून त्यांची सहानुभूती मिळवून सर्व कमिट्यांचा व उपाध्यक्षाचा अधिकार आम्हीं आपल्या हातीं ठेवणें आम्हांला शक्य झालें असतें; व तें करणेंच जास्ती श्रेयस्कर होतें. असो.

म्युनिसिपालिटीच्या कामांत माझ्याकडून विशेष कामगिरी कांही सिद्धीला जाऊं शकली नाही, हें वर मीं नमूद केलेंच आहे. तथापि स्कूल कमिटीचा अध्यक्ष असतेवेळीं बजेटांत जास्ती पैसा घेऊन खालच्या मास्तरलोकांचे पगार पाच-सहा रुपये होते ते वाढविले व शाळांची स्थिती सुधारण्याकडे विशेष लक्ष दिलें.

बेळगावची शहराची हद्द कँटोनमेंटच्या हद्दीला लागून आहे. कँटोनमेंटमध्ये युरोपियन लष्करी अधिकारी व दहाबारा पार्शी व पाचसात व्यापारी खेरीज-करून इतर अगदी गरीब लोकांचीच वस्ती जास्त आहे. त्यामुळे कँटोनमेंट कमिटीचा

खर्च निभावणें कठीण जात असे. बेळगाव शहरांतील व्यापाराला कँटोनमेंट हद्दींतील लोकवस्तीमुळे मदत होते, म्हणून शहरांत येणाऱ्या मालवरील जकातीच्या उत्पन्नांत दोन्ही हद्दींतील लोकसंख्येच्या मानानें वाटणी व्हावी अशी मागणी कँटोनमेंट कमिटीनें केली होती. ही मागणी मी म्युनिसिपालिटींत गेल्यानंतर थोड्याच दिवसांनी करण्यांत आली होती. माझें बहुमत नव्हतेंच. तथापि, या मागणीला मीं कसून विरोध केला व कँटोनमेंटचें हें उंटाचें पिलूं घरांत घेऊं नका, असें सर्वांना पटतील अशीं कारणें देऊन बजावलें. माझें म्हणणें बहुमताला मंजूर झालें. पुढे मी असेपर्यंत कँटोनमेंट कमिटी-कडून अनेकवार अशाच प्रकारचे प्रयत्न झाले. पण ते सर्व मीं हाणून पाडले. माझा संबंध तुटल्यानंतर पुन्हा या प्रश्नानें उचल खाल्ली; कँटोनमेंट कमिटीला म्युनिसिपालिटी-कडून कांही प्रमाणांत व कांही शर्तींवर दरसाल कांही रक्कम मिळूं लागली. हल्ली ही रक्कम दरसाल बरीच अधिक वाढलेली आहे, असें समजतें.

### *स्वतंत्र मतदारसंघास संमती*

बेळगाव शहरांत मुसलमानांची वस्ती एक-पंचमांशापेक्षा जास्ती नाहीं. तथापि लाचलुचपतीसारख्या अनिष्ट उपायांचा अवलंब करून वस्तीच्या प्रमाणापेक्षा जास्ती मुसलमान सभासद म्युनिसिपालिटींत निवडून येत असत. हें हिंदू सभासदांना पसंत नव्हतें. एकदा मुसलमानांनाही आपला स्वतंत्र मतदार संघ असावा असें वाटलें व त्याप्रमाणे त्यांनी मागणीही केली. ही त्यांची मागणी मान्य केल्यास मुसलमान प्रतिनिधींची संख्या त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत राहील. हिंदू-मुसलमानांत एकोपा जास्ती राहील असें त्या वेळीं मला वाटलें. म्हणून या योजनेला मीं संमती दिली, इतकेंच नव्हे तर माझ्या प्रयत्नानें ती योजना अमलांतही आली. या बाबतींतही मीं चूक केली असें मला आज वाटत आहे. पुढे सरकारनें ही योजना लादली असती याबद्दल वादच नाही. पण सरकारची सक्ती नसतांना आपण होऊन या घातुक कल्पनेला बळीं पडण्यांत मीं चूक केली यांत शंका नाही. जातिभेदाच्या तत्त्वावर सार्वजनिक कामाची उभारणी केल्यास कोणकोणते दुष्परिणाम भोगावे लागत आहेत, याचा अनुभव अलीकडे दहापंधरा वर्षांत आलेलाच आहे. त्याबद्दल विशेष ऊहापोह करण्याची आवश्यकता नाही. तथापि आजदेखील कॉंग्रेसच्या प्रतिष्ठित व पुढारी लोकांतही मुसलमानांच्या समजुतीकरिता व त्यांचा हिंदूसंबंधानें असलेला अविश्वास घालविण्याकरिता त्यांच्या मागणीप्रमाणे स्वतंत्र मतदारसंघाला इतर हिंदू वगैरे जातींच्या लोकांनी मान्यता देऊन हा लढा मिटवावा असें म्हणणारी मंडळी आहेत हें मला माहीत आहे. यावरून या परिस्थितींत माझी चूक क्षम्य होती असेंही मानण्याला फारशी हरकत असूं नये असें वाटतें.

पुण्याच्या म्युनिसिपालिटींत एक जनरल वॉर्ड असून त्यांत पदवीधर, वकील, इन्कम-टॅक्स वगैरे देणारे लोक यांचा समावेश होता. जनरल वॉर्डांतील मतदार बहुतेक सुशिक्षित

असल्यामुळे या वार्डातर्फे सुशिक्षितच प्रतिनिधी निवडून येत असत. त्यामुळे सुशिक्षित लोकांचें प्रमाण म्युनिसिपालिटीच्या सभासदांत जास्त राहात असे. म्हणून याच धर्तीवर बेळगाव शहरांत एक जनरल वॉर्ड उत्पन्न करून त्यातर्फे दोन प्रतिनिधी निवडण्याची योजना माझ्या प्रयत्नानें मंजूर झाली व ती कांही वर्षेपर्यंत चालली. म्युनिसिपालिटीचीं मुख्य कामें म्हणजे शहराची स्वच्छता, चांगले रस्ते, गटारें (drainage), दिवाबत्ती, पाण्याची सोय वगैरे होत. पण यापैकी एका बाबतींतही माझ्याकडून कांही झालें नाही. हा पक्ष, तो पक्ष या भांडणांतच वेळ व शक्ती खर्च होत होती व अनेक वेळां त्याचें पर्यवसान खासगी द्वेषांत होत असे. याचा परिणाम माझ्यावर खुनाचा खोटा आरोप होऊन सेशनकोर्टापर्यंत जावें लागलें यांत झाला. ही हकीकत बरीच मनोरंजक व बोधप्रद असल्यामुळे पुढे यथाक्रम येईलच.

लोकलबोर्डांत जाण्याचा मीं प्रयत्न कधी केलाच नाही. बेट्टिगिरी या नावाचे बेळगाव तालुक्याचे एक मामलेदार आमच्या वडिलांचे स्नेही होते. त्यांनी माझें नाव सरकारतर्फे म्हणून बेळगाव तालुका लोकलबोर्डाकरिता सुचवलें होतें, पण कलेक्टरांनी त्याला मान्यता दिली नाही. ही गोष्ट मला आगाऊ कळली असती, तर मामलेदारांनी माझें नाव सुचवूं नये अशी तजवीज मीं केली असती.

### *जपानच्या जयाची स्फूर्ती*

१९०४-०५ सालीं रूसोजपानी युद्ध होऊन रशियाचा पराजय झाला. त्यामुळे आशियांतील लोकांमध्ये एक प्रकारचा उत्साह आला होता. आधुनिक काळांत पाश्चात्य राष्ट्रांवर पौर्वात्यांचा हा पहिला विजय होता. संधी मिळाल्यास मागासलेलीं म्हणून मानण्यांत आलेलीं पौर्वात्य राष्ट्रेंदेखील सुधारलेलीं म्हणून समजल्या जाणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांवर युद्धांत जय मिळवूं शकतात याचा प्रथमच अनुभव आल्यामुळे हिंदुस्थानांतील लोकांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. या आत्मविश्वासाच्या भावनेने तेव्हापासून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला एक निराळें वळण लागलें असें मानतां येईल. याशिवाय इतर कारणांमुळेही पूर्वीची परिस्थिती बदलली होती; पण त्या कारणांत जपानचा विजय हें एक कारण होतें व त्याची चर्चा सर्व सुशिक्षित लोकांत कमीअधिक प्रमाणाने होत असे. आमच्या क्लबांत या विषयाबद्दल चर्चा चाले. जपानने मिळवलेल्या विजयाबद्दल जपानचें अभिनंदन करण्याकरिता एक जाहीर सभा भरवावी, अशी सूचना आमच्या एका स्नेह्याने केली. हे स्नेही एका मोठ्या सरकारी हुद्याच्या जागेवर होते व देशाबद्दल त्यांच्या मनांत खरी तळमळ होती. जपानच्या विजयामुळे जो आत्मविश्वास कांही सुशिक्षित लोकांत उत्पन्न झाला होता त्याचा प्रसार बहुजनसमाजांत व्हावा या हेतूने या स्नेह्यांनी ही सूचना केली होती. ही सूचना मान्य होऊन तेलंगांनी मुख्य भाषण करावें असें ठरलें.

१०१ १०८०

## तेलंगांशीं जाहीर मतभेद

हिंदुस्थानची राजकीय परिस्थिती व ती सुधारण्याचे उपाय यासंबंधाने माझा व तेलंगांचा मतभेद वाढत चालला होता. तथापि, तेलंगांचें व माझें अगदी फाटूं नये म्हणून शक्य ते प्रयत्न मी करीत असें. ज्यांच्याविषयी माझ्या मनांत आदरबुद्धी जागृत होती असे कांही गृहस्थ माझे व तेलंगांचे स्नेही असल्यामुळे आमच्या मतभेदाची परिस्फुटता झाली नव्हती. वर्तमानपत्राचा असलेला संबंध तोडून टाकल्यामुळे आमच्यांतील मतभेद लोकांना समजण्याला संधी आलीच नव्हती. जपानच्या अभिनंदनार्थ भरलेल्या सभेंत आपल्यांत कांही स्फूर्ती उत्पन्न करण्यासारखें तेलंगांचें भाषण होईल अशी सर्वांची अपेक्षा होती; व मलाही तसें वाटणें साहजिक होतें. सभा बेळगावच्या थिएटरांत भरली होती. विष्णुपंत नातू हे अध्यक्ष असावेत असें मला आठवतें. तेलंगांचें भाषण सुमारें एक तासपर्यंत झालें. जपानने थोड्या अवधींत आपली सुधारणा कशी केली व अपूर्व विजय कसा मिळवला या मुद्द्यावर विवेचन केल्यानंतर ते आमच्या स्थितीकडे वळले आणि आमच्या स्थितीचें त्यांनी इतकें निराशाजनक चित्र काढलें की, श्रोत्यांना स्फुरण येण्याऐवजी त्यांच्यावर हिंदी समाज अगदी पंगू, दीन व नादान आहे असा परिणाम झाला. तेलंगांच्या भाषणाचें "आम्ही हिंदी लोक इतके नादान आहोंत की, जपानचें अभिनंदन करण्यालादेखील नालायक आहोंत" हें वाक्य हें ध्रुवपद झालें. त्याचा उच्चार त्यांनी दहाबारा वेळां तरी केला; व टिळकांचें नाव न घेतां त्यांनी चालविलेल्या चळवळीबद्दल तिरस्कार उत्पन्न होईल असे उद्गार काढले. अशा प्रकारची सभा भरवावी म्हणून ज्या आमच्या स्नेह्यांनी सूचना केली होती त्यांना तेलंगांचें भाषण रुचलें नाही आणि आपण करावयास गेलों एक व झालें भलतेंच असें त्यांना वाटलें. त्यांच्या जवळच्याच खुर्चीवर मी बसलों होतों. मला तर तेलंगांचें भाषण ऐकून थोडा राग आला होता. अशा स्थितींत त्या स्नेह्यांनी तेलंगांचें भाषण संपल्यानंतर मला बोलण्याबद्दल सांगितलें.

जाहीर सभेंत बोलण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. लहानपणीं शाळेच्या सभांतून बोलण्याची मला कशी लाज वाटत होती व कधी प्रयत्न केला तर मी कसा घामाघूम होत होतों याची मला आठवण झाली आणि तेलंगांच्या भाषणाला उत्तर देऊन त्यांनी सभेंत जो बेरंग केला होता त्या ठिकाणीं उत्साह कसा उत्पन्न करावा हा प्रश्न होता. माझ्या स्नेह्याने जेव्हा मला सूचना केली तेव्हा "त्यांना अध्यक्ष आपल्या भाषणांत योग्य उत्तर देतील" असें मीं सांगितलें. पण तेवढ्याने त्यांचें समाधान झालें नाही. क्लबांत चर्चा चाले त्या वेळीं मी जपानची बाजू आवेशाने मांडीत असें व जपानच्या विजयापासून आपल्याला काय शिकतां येईल हेंही बोलत असें. हें माझ्या स्नेह्यांना माहीत असल्यामुळे मींच तेलंगांना उत्तर द्यावें असा त्यांनी आग्रह धरला. मलाही अखेर बोलण्याचा मोह आवरला नाही. नेहमी होत असलेल्या चर्चेचा विषय असल्यामुळे मला तो चांगल्या रीतीनें मांडतां येईल असें वाटलें.

मराठी ग्रं
अनुक्रम वि.
क्रमांक नों. दि.

पण तेलंगांचें निरुत्साह उत्पन्न करण्यासारखें जें भाषण झालें त्यामुळे मनांत जी एक तळमळ उत्पन्न झाली तीच मला बोलण्याला कारणीभूत झाली होती, आणि त्या भरांत मी स्टेजवर गेलों व बोलण्याबद्दल अध्यक्षांची परवानगी घेण्याचा जो शिष्टाचार असतो तिकडेही दुर्लक्ष करून बोलण्याला प्रारंभ केला. पहिल्या चारपाच वाक्यांतच तेलंगांनी आपल्या लोकांसंबंधाने जीं मतें प्रगट केलीं होतीं त्याबद्दल माझा मतभेद असल्याचें मी बोललों; त्यामुळे श्रोत्यांमध्ये एक प्रकारची चुळबूळ सुरू झाली. ज्या स्नेह्यांनी मला बोलण्याबद्दल उत्तेजन दिलें होतें त्यांच्याकडे मीं पाहिलें तेव्हा त्यांचा चेहरा मला प्रसन्न दिसला; व माझ्या एका वाक्याला त्यांनी टाळी दिली की, इतर लोक त्याचप्रमाणे करतात, त्यांत विशेष कांही नसतें हें मला पुढेपुढे कळूं लागलें. पण त्या दिवशीं मात्र लोकांना माझें म्हणणें पटत चाललें आहे असें वाटून माझ्या भाषणाचा परिणाम चांगला होणार असें दिसून आलें; व अर्थातच मोकळ्या मनाने मी बोलूं लागलों.

पंधराएक मिनिटें माझें भाषण झालें असेल. भाषणानंतर खूपच टाळ्या मिळाल्या. अध्यक्षांनी आपल्या भाषणांत माझीच बाजू उचलून धरली, दुसरे दिवशीं पुन्हा सभा भरवून माझेंच भाषण मुख्य वक्ता या नात्याने व्हावें अशी सूचना केली व लोकांना, येण्याबद्दल मला न विचारतांच, दुसरे दिवसाचा कार्यक्रम जाहीर केला. यांत त्यांनी कांही गैर केलें असें मला वाटलें नाही. माझें भाषण लोकांना आवडलें असें समजल्यानंतर जास्ती समर्पक कारणें देऊन विस्तृत भाषण करावें असें मलाही वाटलें व मीं अध्यक्षांच्या सूचनेला रुकार दिला. दुसऱ्या दिवसाच्या भाषणाची मी थोडी तयारी केली. डिग्बी व दादाभाई यांचीं नावें जोडीने घेतलीं जात, कारण दोघेही इंग्रजी राज्यांतील आर्थिक धोरणाचे प्रतिकूल टीकाकार होते. डिग्बी, दादाभाई यांच्या लेखांतील व भाषणांतील कांही उतारे काढून आमची ही हीन स्थिती होण्याला इंग्रजी राज्यपद्धतीच कशी कारणीभूत झाली आहे व ती सुधारल्या-खेरीज आमचा तरणोपाय कसा नाही यासंबंधाने विशेष विस्तृतपणें बोलण्याचें मीं ठरवलें. राजकीय सत्ता जपानी लोकांच्या हातीं नसती तर त्यांची प्रगती इतक्या लवकर होणें शक्य नव्हतें असाही एक माझा मुद्दा होता. त्याच्या समर्थनार्थही कांही कांही पुरावे मिळविले. ठरल्याप्रमाणे दुसरे दिवशी सभा भरली. सभेला पहिल्या दिवसापेक्षा जास्त गर्दी जमली होती. जागा मुळींच रिकामी नव्हती. माझें पहिल्या दिवसाचें भाषण लोकांना आवडल्यामुळे इतकी मोठी गर्दी जमली असें मला वाटलें. पण खरा प्रकार तसा नसावा, असें मागाहून मला कळून आलें. तेलंग व मी स्नेही, दोघे मिळून वर्तमानपत्र काढणारे, आम्ही दोघेही सुधारक पक्षाचे अभिमानी, अशी आमची बेळगावच्या सुशिक्षित लोकांत प्रसिद्धी झाली होती. अशी स्थिती असतां आमच्यामध्ये मतभेद होऊन सभेंत वादविवाद होणार अशी बातमी दुसऱ्या दिवसाच्या सभेसंबंधाने पसरली होती; म्हणून लोकांना आमच्यामधील सामना पाहण्याचें कुतूहल उत्पन्न होऊन गर्दी जमली होती. या सभेलाही नातूच अध्यक्ष होते. त्यामुळेही मला धीर वाटला. बेळगावांत सभा वगैरे होत नसत. झाल्या तरी लोक जमत नसत. त्या दृष्टीने ही सभा बऱ्याच महत्त्वाची झाली असें म्हणावयास हरकत नाही.

आवडता वक्ता असला तर तो बोलावयाला उठल्याबरोबर टाळ्या वाजवून त्याचा सत्कार करावयाची चाल अलीकडे बरीच रूढ झाली आहे. पण आमच्या बेळगावांत ती चाल विशेष प्रचारांत नव्हती. तथापि हा मान मला मिळाला. जे मुद्दे मांडावयाचे असें मीं ठरवलें होतें त्यांपैकी बरेच मुद्दे चांगल्या प्रकारें मांडले गेले असें मला वाटलें. मधून-मधून श्रोत्यांकडून माझा टाळ्यांनी गौरव होत असे. पण तेलंग त्या दिवशीं सभेला आले नाहीत; त्यामुळे मात्र लोकांची बरीच निराशा झाली. अध्यक्षांनी आपल्या समारोपांत माझ्याच म्हणण्याला दुजोरा देऊन तेलंगांच्या भाषणावर चांगलीच टीका केली व सभेचें काम संपलें. ही सभा किंवा माझें भाषण महत्त्वाचें होतें म्हणून या प्रसंगाचें मीं इतकें विस्तृत वर्णन दिलें असें नाही. तर माझ्या सार्वजनिक आयुष्यांत एक प्रकारचें परिवर्तन या प्रसंगामुळे झालें अशी माझी समजूत आहे.

### गोखले यांनीच टिळकांकडे पाठवलें

यानंतर बंगालच्या फाळणीच्या निमित्तानें बंगाल्यांत चळवळीला खूप जोर आला. बंगालनें फाळणीच्या प्रतिकारार्थ स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळीचा पुरस्कार केला. देशांतील इतर प्रांतांतही या चळवळीचा उपक्रम झाला. पण महाराष्ट्रांत ही चळवळ लो. टिळकांनी उचलून धरल्यामुळे तिला जितका जोर आला होता तितका इतर प्रांतांत नव्हता. लो. टिळकांची तेजस्वी लेखणी 'केसरीं'तून दर मंगळवारीं फडकूं लागली. यापूर्वी मीं 'केसरी'ला विरोध करावा, 'केसरी'ची कुचेष्टा करावी या हेतूने 'केसरी' वाचीत असें. पण स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळीसंबंधानें 'केसरीं'त जे लेख येऊं लागले त्यांच्या वाचनानें माझ्यामध्ये नवें चैतन्य व नवी स्फूर्ती येऊं लागली. "शाबास, वंगबंधूंनो, शाबास" या मथळ्याखालील 'केसरीं'तील लेख वाचून आपणही चळवळींत पडावें अशी मला प्रेरणा झाली. केवळ या चळवळीपुरतेंच आपलें कार्यक्षेत्र असावें की यापुढे आपलें सबंध आयुष्य सार्वजनिक कामाला द्यावें या संबंधानें माझ्या अंतःकरणांत जोरानें विचार येऊं लागले. या बाबतींत स्वतःच्या विचारानें कांही निश्चित न ठरविता आपल्याला पूज्य वाटत असलेल्या गोखल्यांसारख्यांचा सल्ला घ्यावा अशी कल्पना माझ्या मनांत आली. त्याप्रमाणे पुण्याला जाऊन गोखल्यांना भेटण्याचें मीं ठरवलें. स्वदेशी-बहिष्कारासंबंधाच्या 'केसरीं'तील लेखांमुळे मी जरी उतावीळ होऊं लागलों होतों तरी गोखल्यांच्याच सल्ल्यानें वागावें असें मला वाटत होतें. बंगालची फाळणी अन्यायाची व अनिष्ट आहे असें टिळकांप्रमाणे गोखल्यांनाही वाटत होतें. ती फाळणी रद्द व्हावी म्हणून जे प्रयत्न चालले होते त्यांबद्दल गोखल्यांचीही सहानुभूती होतीच. तथापि टिळकांच्या लेखांत तीव्रता जास्ती होती. तरी माझा ओढा गोखल्यांकडेच विशेष असल्यानें व टिळकांबद्दल साशंकवृत्ती असल्यानें गोखल्यांनाच भेटण्याचें मीं ठरविलें. टिळकांना भेटण्याची इच्छा माझ्या मनांत त्या वेळीं नव्हती.

पुण्याला येण्यापूर्वी गोखल्यांना त्यांचे नातलग व बेळगावचे एक व्यापारी दामूआण्णा

वैद्य यांचे मार्फत पत्र लिहून भेटण्याचा दिवस व वेळ वगैरे ठरवून घेतली होती. त्याप्रमाणे पुण्याला येऊन गोखल्यांची भेट घेतली. गोखल्यांना माझी माहिती होती व पूर्वीची थोडीशी ओळखही होती. माझ्याबरोबर माझे स्नेही सदाशिव लक्ष्मण ऊर्फ बाबासाहेब सोमण हेही होते. हे मूळ बेळगाव जिल्ह्यापैकी खानापूर या गावचे. तथापि यांचा विद्याभ्यास पुण्यालाच बहुतेक झाला होता. यांची एल्‌एल्. बी.ची परीक्षा पास झाल्यानंतर हे बेळगावासच वकिली करण्याकरिता आले. त्या वेळीं माझा व त्यांचा स्नेह जुळला. त्यांची व गोखल्यांची ओळख होती म्हणून त्यांनाही बरोबर घेतलें होतें. गोखल्यांनी वकिली कशी काय चालली आहे वगैरे प्रश्न विचारल्यानंतर मुद्दाम भेटीला येण्याचें कारण विचारलें. मनांतील विचार स्पष्टपणें मांडण्याची त्यांनी संधी दिली व ते मोकळ्या मनाने माझ्याशीं बोलत होतें. त्यामुळे मलाही त्यांच्याशीं बोलतांना संकोच वाटला नाही. माझी वकिली साधारणपणें बरी चालली आहे व पुढे जास्ती चांगली चालण्याचा संभव आहे, तरी माझें समाधान होत नाही आणि उदरनिर्वाहाचीं इतर साधनें असल्याकारणानेही वकिलीच करीत राहावें अशी स्थितीही नाही, याकरिता यापुढे सार्वजनिक कामांतच पडावें अशी मला इच्छा झाली असून सल्ला विचारण्याकरिता आपल्याकडे आलों आहें, असें मीं त्यांना कळवलें. हें ऐकून त्यांना बरें वाटलें असावें, असें त्यांच्या चेहऱ्यावरून मला दिसलें. होतकरू तरुणांत अशा प्रकारचें उदाहरण क्वचितच दृष्टीस पडतें, असेही त्यांनी गौरवपर उद्गार काढले. तथापि वकिली करून सार्वजनिक कामें यथाशक्ती करणें व वकिलींत जी किफायत होईल ती सार्वजनिक कामाकडे लावणें हेंही योग्य आहे असें ते म्हणाले. पण वकिली सोडूनच सर्व वेळ सार्वजनिक कामाकडे द्यावा असें मला वाटत असल्याचें मीं सांगितल्यानंतर त्यांनाही तें पसंत पडलें.

पुढे राजकीय परिस्थितीसंबंधाच्या गोष्टी निघाल्या. आपली स्थिती एकंदरींत किती बिकट आहे याचेंही वर्णन त्यांनी केलें. तथापि निराश होण्याचें कारण नाही असें मला बजाविलें. बोलण्याच्या ओघांत न्यूजंट म्हणून एक बडे सरकारी अधिकारी होते, त्यांच्यासंबंधाने गोष्टी निघाल्या. हे गृहस्थ आमच्या दक्षिण भागाचे रेव्हेन्यू कमिशनर होते व त्यांच्यासंबंधाने मला थोडीथोडी ऐकीव माहिती होती. न्यूजंट यांनी आपल्याला कांही माहिती सांगितली असें गोखल्यांच्या बोलण्यांत आलें. बोलण्यांत विषय कोणता होता व न्यूजंटांनी माहिती कशाबद्दल दिली हें मला आता पक्कें आठवत नाही. पण आपल्या लोकांच्या लायकीसंबंधाने कांही असावें असें वाटतें. तें ऐकून "न्यूजंटसारख्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती आपण खरी कां मानावी?" असें वाक्य माझ्या तोंडून गेलें. "न्यूजंटसारख्या जबाबदार मनुष्याने मला मुद्दाम खोटें कां सांगावें?" असा गोखल्यांनी मला उलट प्रश्न केला. न्यूजंट कोणत्याही प्रकारचा मनुष्य असला आणि त्याला सत्याची आवड व चाड आहे असें गृहीत धरलें, तरी राजकारणांत त्याच्यासारख्या अधिकाऱ्याला सरकारच्याच धोरणाप्रमाणे वागावें लागतें, म्हणून अशा मनुष्याकडून आलेल्या माहितीवर विश्वास ठेवण्यांत चूक होण्याचा संभव असतो, असें मीं उत्तर दिलें. माझें

उत्तर गोखल्यांना पसंत पडलें नाही. सार्वजनिक कामांपैकी राजकीय विषयाकडे माझें लक्ष अधिक कीं सामाजिक सुधारणेकडे माझा कल अधिक, असें त्यांनी मला विचारलें. सामाजिक सुधारणेला मी पूर्णपणें अनुकूल होतों, तरी आपण काम करावयाचें तें राजकीय क्षेत्रांतच काम करावें असें माझें मत यावेळीं झाल्याचें मीं त्यांना कळवलें. यानंतर त्यांनी मला राजकीय क्षेत्रांत काम करणाऱ्याचे मार्ग भिन्न आहेत असें सांगून "टिळकांची भेट घेतली काय?" असें विचारलें. मीं "नाही" असें सांगितल्यानंतर "त्यांना भेटून कोणत्या मार्गानें जावयाचें व काय करावयाचें याचा चांगला विचार करून काय तें ठरवा" असा त्यांचा सल्ला पडला. त्यानंतर त्यांचा निरोप घेऊन आम्ही निघालों.

दुसरे दिवशीं मीं टिळकांची भेट घेतली. त्यांनाही माझी थोडीबहुत माहिती होती; व बेळगावच्या पत्रांतून त्यांच्याविरुद्ध टीका करणाऱ्यांपैकी मी एक होतों हेंही त्यांना माहीत असावें. तथापि मी वकिली सोडून सार्वजनिक कामांत पडण्याचा विचार करीत आहें, हें सांगितल्यानंतर त्यांनी आनंद प्रदर्शित केला व हाच निश्चय कायम करण्यास सांगितलें. माझी हकीकत मीं थोडक्यांत त्यांना कळवली, व माझा कलही सामाजिक सुधारणेला अनुकूल असल्याचें सांगितलें. यानंतर इकडीलतिकडील गोष्टी झाल्यानंतर त्यांनीही मला गोखल्यांना भेटून त्यांचा विचार घेण्यास सांगितलें. तेव्हा मला थोडें आश्चर्य वाटलें. त्यांचाच सल्ला घेण्याकरिता आलेल्या माझ्यासारख्या तरुणाला ते गोखल्यांकडे पाठवतील असें मला वाटलें नव्हतें. कोणालाही आपल्याच मार्गानें जाण्याच्या भरीला न घालतां, कोणाचा नैसर्गिक कल जसा असेल त्याप्रमाणे त्यांनी काम करीत राहावें, हीच सदिच्छा दोघांच्या मनांत असल्यानें त्यांनी मला असा सल्ला दिला असावा. मी गोखल्यांकडे गेलों होतों असें टिळकांना सांगून तेथे घडलेली हकीकत कळवली. ती ऐकून ते हसले; व मला चांगला निश्चय करून कामाला लागण्याबद्दल उत्तेजनपूर्वक सांगितलें. त्यानंतर मीं त्यांचा निरोप घेतला व बेळगावला परत आलों. तेव्हापासून वकिलीकडे माझें दुर्लक्ष होऊं लागलें व सार्वजनिक कामालाच वाहून घेण्याचा निश्चय दृढ होऊं लागला.

## *राजकीय चळवळीला प्रारंभ*

स्वदेशी-बहिष्कारासंबंधी सभा जिकडेतिकडे भरूं लागल्या. वर्तमानपत्रांतून भपकेदार हकीकती येत असत. आमच्या क्लबांत व वकिलांच्या खोलींत या विषयासंबंधानें गोष्टी निघत. इतर ठिकाणांप्रमाणे बेळगावासही सभा वगैरे भरवून चळवळीला प्रारंभ करण्याबद्दल कांही मंडळींनी सुचविलें. दुसऱ्या कांही मंडळींनी या सूचनेला विरोध केला. अर्थशास्त्रदृष्ट्या हें धोरण चुकीचें आहे, असा आरोप या चळवळीवर कित्येकांनी केला. या प्रकारचा आरोप करणाऱ्यांमध्ये कित्येक प्रसिद्ध स्थानिक पुढारी होते. अशा स्थितींत सभा वगैरे भरवण्याची जबाबदारी घेण्याला कोणी पुढे येईना. माझ्या मनांत आमच्या प्रांतांत ही चळवळ

खूप जोराने चालवावी असें उत्कट रीतीने येई. पण सार्वजनिक कामें कशीं करावींत याचा अनुभव नसल्याने घोटाळ्यांत पडल्याप्रमाणे मला झालें. कोणीं तरी एखाद्या स्थानिक जबाबदार मनुष्याने मला हाताशीं घेऊन माझ्याकडून काम करून घ्यावें अशी माझी फार इच्छा होती. पण ती लवकर सिद्धीला जाण्याचीं चिन्हें दिसेनात. मी तर जास्ती जास्ती उतावीळ होत चाललों होतों. अशा मनःस्थितींत खूप धीर करून एक सभा भरवण्याचा निश्चय केला. सभेच्या जाहिराती वगैरे कोणाच्या सहीने काढावयाच्या हा प्रश्न माझ्या मनांत उपस्थित झाला. लोकांमध्ये इतकें औदासीन्य होतें की, मी व्याख्यान देण्याला जरी तयार झालों होतों तरी सभा बोलावण्याला कोणीही जबाबदार मनुष्य मला मिळाला नाही. तेव्हा जाहिरातीखाली कोणाचीही सही न करतां केवळ 'व्यवस्थापक' म्हणून लिहून जाहिराती काढाव्या असें मनांत आलें. पण मी जर व्याख्यान देणार तर माझ्याच सहीने सभा कां बोलावूं नये असें मला वाटलें व तोच निश्चय कायम करून पहिली सभा मारुतीच्या देवालयांत भरवली. सायंकाळीं देवालयाला देवदर्शनाकरिता बरेच लोक येतात. आणि कथा, कीर्तन, पुराण वगैरे चालत असलीं म्हणजे दर्शनाला येणाऱ्यांपैकी कित्येक ऐकण्याला बसतात त्याचप्रमाणे मीं बोलावलेल्या सभेला लोकांना येण्याला अडचण वाटणार नाही असें वाटून मारुतीचें देवालय ही जागा निश्चित केली, आणि सभेची वेळ सायंकाळची ठेवली.

मी वेळेवर सभेला गेलों. पुढारी किंवा पोक्त अशीं माणसें कोणीही सभेच्या ठिकाणीं नव्हतीं. पण इंग्रजी शाळेंतील प्रबुद्ध विद्यार्थ्यांची संख्या बरीच मोठी होती; व व्याख्यान ऐकण्याच्या इच्छेने म्हणून आलेले कांही तरुण होतकरू लोक मला दिसले. वडील माणसें आलीं नाहीत म्हणून मला एका परीने हिरमुसल्याप्रमाणें वाटलें. पण उलट, त्यांच्या गैरहजेरींत आपल्याला जास्ती मोकळेपणाने बोलतां येईल असें वाटून थोडें समाधानही झालें. व्याख्यानाची मीं तयारी चांगली केली होती. वंगभंग करण्यांत सरकारचा हेतू काय होता व तो बंगालच्या दृष्टीने कसा अनिष्ट होता याबद्दल सोपपत्तिक विवेचन करतां येईल इतकी मीं तयारी केली होती. सभेच्या आरंभीं सर्व मिळून शेदोनशे माणसांपेक्षा जास्ती श्रोते नव्हते. पण माझें भाषण सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाने जास्ती माणसें जमूं लागलीं. माझा आवाज मोठा असल्याकारणाने देवळाबाहेरील रस्त्याने जाणाऱ्यायेणाऱ्या माणसांचें लक्ष वेधून शेवटींशेवटीं हजारांवर समुदाय जमला. जवळजवळ दोन तासपर्यंत माझें भाषण झालें. माझ्या दृष्टीने माझें भाषण चांगलें झालें. निदान माझें तरी समाधान झालें. अध्यक्ष वगैरे कोणी नसल्याने समारोपाचें भाषण झालेंच नाही व सभेंत वादविवादही झाला नाही.

दुसरे दिवशीं माझ्या भाषणाबद्दल वकिलांच्या खोलींत चर्चा झाली. कित्येकांनी उत्तेजनपर उद्गार काढले व पुन्हा एक सभा भरवण्याबद्दल सूचना केली. सभेला आलेल्या विद्यार्थ्यांपैकी कित्येकांनी केवळ विद्यार्थ्यांकरिताच एक खास सभा भरवावी अशीही सूचना केली. याचा माझ्या मनावर परिणाम होऊन बेळगाव हें क्षेत्र कामाला

चांगलें आहे असें मला वाटूं लागलें. आणि पंधरावीस दिवसांच्या आंत तीनचार सभा भरवून या विषयाबद्दल जागृती केली. देशांतून ज्या ज्या ठिकाणीं या चळवळीसंबंधानें सभा भरत त्यासंबंधाची हकीकत 'केसरीं'तून त्यावेळीं नियमानें येत असे. त्याप्रमाणें बेळगावची हकीकत आली. चळवळीशीं माझा संबंध असल्याचें जाहीर झालें. घरीं वडील कांही म्हणतील की काय या बाबतींत मला थोडी धास्ती वाटत होती. पण या बाबतींत ते मला कांहीच बोलले नाहीत, इतकेंच नव्हे तर ते एका सभेला येऊन दुरून माझें भाषण ऐकल्यानंतर मला त्यांनी कांही सूचनाही केल्या. या सूचना करण्यांत त्यांचा हेतू मला मूलतः चळवळीपासून परावृत्त करण्याचा नव्हता. फक्त सरकारच्या संबंधानें टीका करतांना फार जहाल बोलूं नये, एवढाच त्यांचा सल्ला होता. याप्रमाणें माझ्या प्रयत्नानें बेळगावापुरती तरी चळवळ चांगली रंगाला येत चालली. प्रतिष्ठित लोकही सभांना येऊन सहानुभूती दाखवूं लागले. शहराच्या निरनिराळ्या भागांत सभा भरूं लागल्या व माझ्याबरोबर आणखी कांही बोलणारे मिळूं लागले.

### *गोविंदराव याळगींचा स्नेह*

माझीं भाषणें ऐकण्याला येणाऱ्यांत एक तरुण गृहस्थ मला बरेच उत्साही असे वाटले. सभांची व्यवस्था वगैरे पुढे तेच करूं लागले. यांचें नाव गोविंदराव याळगी होतें. या चळवळीमुळे माझा व त्यांचा संबंध आला व पुढे तो इतका निकट झाला की, त्यांच्या मदतीशिवाय कोणतेंही काम मी अंगावर घेत नसें. त्यांचें वय वीसबावीस वर्षांचें होतें. त्यांच्या घरीं आई व दोन भाऊ होते. घरच्या संसाराचा भार लहान वयांतच त्यांच्यावर पडला होता. वडील वारल्यानंतर शाळा सोडून व घरांतील कांही दागदागिने विकून एकदोन हजारांच्या भांडवलावर एका ओट्यावर सराफीचें दुकान लावून त्यांनी धंदा सुरू केला होता. दररोज सायंकाळीं दुकानांतील माल एका डब्यांत घालून घरीं आणावयाचा व दुसरे दिवशीं पुन्हा तो माल परत दुकानीं न्यावयाचा अशी त्यांची पद्धत असे. पण आपल्या कर्तब-गारीनें त्यांनी आपला व्यापार इतका वाढवला की, बेळगाव-शहापूरच्या पेठेंत प्रति-ष्ठित व्यापाऱ्यांत त्यांची गणना लवकरच होऊं लागली. या त्यांच्या दक्षतेबद्दल ते किती जरी स्तुतीला पात्र असले तरी त्यांनी बेळगावांत केलेली सार्वजनिक कामगिरी अगदी अमूल्य होती. यांचें शिक्षण फार झालें नव्हतें, तरी त्यांचें अंतःकरण इतकें उदार व भावना इतक्या तीव्र होत्या की, शिक्षणाची उणीव त्यांच्या सार्वजनिक आयुष्यांत कधीच भासली नाही. १९०५-६ सालापासून त्यांच्या मरणापर्यंत म्हणजे १९२३पर्यंत बेळ-गावांतील सर्व सार्वजनिक चळवळींचे ते प्राण होते. माझ्या तर सर्व प्रवृत्ती त्यांच्यावरच अवलंबून असत. त्यांची मदत मला नसती तर माझ्या हातून जी अल्पस्वल्प देशसेवा घडली आहे ती घडली असती असें मला वाटत नाही. सार्वजनिक कामें करीत असतां किंवा माझ्या खासगी संबंधांत माझ्यावर जे अनेक प्रसंग आले त्या सर्व प्रसंगीं गोविंद-

रावांचें मला अत्यंत साह्य झालें. गोविंदरावांचा व माझा संबंध कित्येक वर्षांचा असल्याने व त्यांचा उल्लेख पुढे अनेक ठिकाणीं येत असल्याने त्यांचा व माझा प्रथम परिचय कसा झाला हें सांगणें प्राप्त झालें. त्यांच्या पश्चातही त्यांच्या बंधूंनी त्यांचें व्रत चालवलें आहे. याळगींचें घर म्हणजे बेळगांवांतील एक सार्वजनिक संस्था म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. असो.

## स्वदेशी कापडाचें दुकान

बंगभंगाबद्दल चळवळ जोरांत चालली असतांनाच सन १९०४ सालीं मुंबईस सर हेनरी कॉटन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सभा भरली होती. माझ्या मनांत सार्वजनिक कामांत पडण्याचें घोळत असल्याने या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला हजर राहण्याचें आलें होतें. पण कांही अडचणीमुळे जाणें झालें नाही. या कॉंग्रेसच्या अधिवेशनाबरोबरच एक जंगी प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें आणि या प्रदर्शनांत देशी वस्तूंचाच बहुतेक समावेश करण्यांत आला होता. तथापि त्या वेळीं या देशांत परदेशी भांडवलाने व परदेशी लोकांच्या हुकमतीखाली चालणाऱ्या कारखान्यांना स्वदेशी कारखान्यांप्रमाणेच मानण्यांत येई. म्हणून अशा कारखान्यांतील मालावर या प्रदर्शनांत बहिष्कार घालण्यांत आला नसावा असें मला वाटतें. कॉंग्रेसचें अधिवेशन संपल्यानंतरदेखील हें प्रदर्शन चालू होतें. कॉंग्रेसला जरी हजर राहतां आलें नाही तरी प्रदर्शन पाहावें असें मला वाटलें. तें प्रदर्शन पाहण्याने माझ्या स्वदेशीच्या प्रसारार्थ मी करीत असलेल्या प्रयत्नाला मदत होईल असें वाटून मी प्रदर्शन पाहण्याला गेलों व चारपाच दिवस हें प्रदर्शन लक्षपूर्वक पाहिलें. प्रदर्शन पाहून मध्यम व गरीब स्थितींत प्रपंच करणाऱ्या लोकांच्या साधारण गरजा भागण्याइतपत स्वदेशी माल मिळूं शकतो असें मला वाटलें. कापडासंबंधाने तर शंकाच राहिली नाही. नुसत्या विलायती कापडावरचाच बहिष्कार यशस्वी करून दाखविल्यास दरसाल कोट्यवधी रुपयांची बचत होऊन इंग्रजांच्या खिशाला चांगलाच चट्टा बसून बंगभंगासारखीं वज्रलेप मानलेलीं कामें सहज आपल्या इच्छेप्रमाणें घडवून आणतां येतील अशी माझी खात्री झाली. यानंतर पुन्हा कांही दिवसांनी मुंबईस जाण्याचा प्रसंग आला त्यापूर्वी केवळ सभा भरवून व भाषणें करून चळवळ करण्यापेक्षा एखादें स्वदेशी मालाचें दुकान काढून चळवळीला जोर आणण्याचा प्रयत्न करावा ही कल्पना मला आली होती.

अशा प्रकारचें काम माझ्या एकट्याच्या हातून निभावण्यासारखें नव्हतें, म्हणून एकदोन स्नेह्यांजवळ मीं ही गोष्ट काढून त्यांचें साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला होता आणि माझे स्नेही वामनराव देसाई व भडकमकर यांनी सहानुभूती दाखविली होती. वामनराव देसाई हे रा. ब. अच्युतराव देसाई यांच्यासारख्या मोठ्या सरकारी पेन्शनरांचे चिरंजीव. शिवाय रा. ब. देसाई यांची इंग्रजांच्या निष्ठेबद्दल आमच्या प्रांतांत चांगली प्रसिद्धी होती. त्यामुळे त्यांना हा उद्योग पसंत होईल किंवा

नाही याबद्दल शंका होती. पण त्यांच्याजवळ वामनरावांनी या बाबतींत गोष्ट काढल्यानंतर त्यांनी आपली संमती दाखवली व पैशांची मदत करण्याचें आश्वासन दिलें. माझी राजकीय दृष्टी त्यांच्यामध्ये नसावी. देशी उद्योगाला व व्यापाराला मदत केल्याचें पुण्य लाभून आपल्या चिरंजिवांना एका स्वतंत्र धंद्यांत घातल्याप्रमाणे होतें एवढाच त्यांचा विचार असावा. मुंबईंत मी गेल्यानंतर माझा हा विचार पक्का ठरला. त्या वेळीं मी सरदारगृहांत उतरलों होतों. सरदारगृह त्या वेळीं सीताराम बिल्डिंगमध्ये होतें. मी मुंबईस असतांना लो. टिळक तेथे आले होते. तेही सरदारगृहांतच होते. त्यांचाही सल्ला या कामीं घ्यावा असें माझ्या मनांत येऊन त्यांची मीं भेट घेतली. त्यांनी सर्व हकीकत ऐकून घेतली व हें काम अवश्य तडीला न्यावें असें सांगितलें. पण या प्रयत्नांत आणखी कोणकोण आहेत म्हणून त्यांनी मला विचारलें. मी देसाई व भडकमकर वकील यांचीं नावें सांगितलीं. अशा प्रकारचीं कामें संघशक्तीने चांगलीं होतात हें खरें आहे, पण ज्यांचा संघ बनवावयाचा असतो त्यांतील सर्व माणसें एकविचाराचीं असणें जरूर आहे असें त्यांनी बजावलें. कदाचित रा. ब. देसाई यांचा लौकिक त्यांना ऐकून माहीत असल्यामुळे त्यांनी ही सूचना मला दिली असावी. त्या वेळीं तरी मला तसेंच वाटलें. पण त्याची वाच्यता मीं फारशी केली नाही.

भडकमकर हे मुंबईस अभ्यासाकरिता राहिले होते. त्यावेळीं त्यांचा मुंबईंतील कांही गिरण्यांचे मालकांशीं स्नेह जमला होता. त्यांत शेट नरोत्तम मुरारजी, गोवर्धनदास खटाव व त्यांचे बंधु मूलराज वगैरे प्रमुख होते. भडकमकरांच्यामार्फत त्यांच्या स्नेह्यांच्या गिरणीचा माल आम्हांला घाऊक व माफक दराने मिळेल व इतर सवलती मिळतील अशी आमची कल्पना होती. मुंबईंतील व्यापारी पद्धतीचा आम्हांस अनुभव नसल्याकारणाने या गिरणीमालकांच्या स्नेहाचा आपल्याला किती उपयोग होईल याबद्दल आम्हीं बरेंच मोठें मनोराज्य उभारलें होतें. प्रत्यक्ष अनुभवांतीं आमची पहिली अटकळ बरीच चुकली होती असें समजून आलें. मुंबईच्या प्रदर्शनाकरिता कलकत्त्यांत नवीन स्थापन झालेल्या इंडियन स्टोअर्स नावाच्या एका स्वदेशी वस्तूंचा व्यापार करणाऱ्या कंपनीमार्फत कांही माल आला होता. प्रदर्शनांत सर्व माल खपला नाही, म्हणून मुंबईला आणलेला माल परत कलकत्त्याला नेण्याऐवजी मुंबईसच एक दुकान काढावें व तो माल खपवावा अशी कल्पना येऊन त्यांनी एक दुकान काढलें होतें. त्यांचें दुकान सीताराम बिल्डिंगमध्येच तळमजल्यावर होतें. दुकानाचे चालक मुकर्जी या नावाचे गृहस्थ होते व ते सरदारगृहांतच राहात असत. त्यांची व माझी ओळख झाली. बंगाली लोकांनी चळवळ जोरांत चालवली होती त्यामुळे त्यांच्याबद्दल मला आदर वाटत होता. तिकडील चळवळीसंबंधीच्या गोष्टी ते सांगत असत व आपल्या इंडियन स्टोअर्स लि. संबंधाने रसभरित वर्णन करीत असत. इकडील देशाभिमानी सुशिक्षितांनी अशाच प्रकारचा उद्योग केल्यास चळवळीला फार मदत होईल असें ते म्हणत असत. बंगाल्यांत कापडाच्या गिरण्या नसल्यामुळे स्वदेशी कापडाचा पुरवठा मुंबईहूनच होत असे व चळवळीमुळे

मुंबईच्या कापडाला तेजी आली होती. हा व्यापार देशसेवेला प्रवृत्त झालेल्या सुशिक्षित लोकांनी घेतल्यास चळवळीला फार मदत होईल असा विचार त्यांनी माझ्यापुढे मांडला. माझ्या मनांत स्वदेशी दुकान काढावयाचें होतेंच. या विचाराला मुकर्जी यांच्या विचाराचा व कल्पनेचा दुजोरा मिळाला व माझा निश्चय कायम झाला. माझ्या स्नेह्यांची संमती मिळाली व आम्हीं तिघांनी मिळून भांडवल घालून उद्योगाला प्रारंभ करावयाचा असें ठरवलें.

## डेक्कन स्टोअर्सचा जन्म

देशी मालाची चवकशी करण्यांत सातआठ दिवस गेले. दररोज मुकर्जींबरोबर बोलणें होतच असे. मीं त्यांना आमचा विचार कळवला. त्यांनी आम्हांला बरेंच उत्तेजन दिलें; व बंगालप्रमाणेच मुंबई इलाख्यांत जोराची चळवळ होणार असें त्यांनी खात्रीपूर्वक सांगितलें. त्यांच्या दुकानांत देशी मालाचा खप कसा होत होता याबद्दल आम्हीं त्यांच्याजवळ चवकशी केली. त्या वेळीं मालाच्या खपावरूनच मुंबईत ही चळवळ जोरावणार असें आपल्यास वाटतें, असें त्यांनी आम्हांस सांगितलें. त्यामुळे आम्हांला बराच हुरूप आला. बंगालसारख्या परप्रांतीय मनुष्याला स्वदेशी मालाच्या दुकानांत इतकें यश येतें, तर आमच्यासारख्या स्थानिक लोकांच्या प्रयत्नाला जास्ती यश आलेंच पाहिजे, असे आमच्या मनांत विचार घोळूं लागले. मुकर्जींच्या दुकानांत खरोखर विक्री किती होते, याचा अंदाज आम्हांला एकदोन दिवस त्यांच्या दुकानांत बसून काढणें शक्य होतें. पण सुशिक्षित व देशाभिमानी बंगाली आपल्या दुकानांतील विक्री फुगवून सांगेल ही शंका आम्हांला आली नाही. बंगाली लोकांनी चालवलेल्या जोराच्या चळवळीमुळे त्यांच्याविषयीचा आमचा आदरभाव वाढला होता. त्या कारणानें त्यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन जास्ती चवकशी करण्याचे भानगडींत पडलों नाही. याप्रमाणें चारपाच दिवस गेल्यानंतर हें बंगाली लोकांनी चालवलेलें दुकान आम्हीं खरेदी करून तेंच आमच्या वतीने चालवल्यास आपल्याला नवीन दुकान मांडावयाची दगदग पडणार नाही आणि दुकानाची goodwill मिळून नफाही होईल अशी कल्पना मला आली. पण एवढें भरभराटीने चाललेलें दुकान खरेदी घेण्याची गोष्ट मुकर्जी यांच्याकडे काढावी कशी, याबद्दल आम्हांला विचार पडला. आम्हीं जेव्हा स्वदेशी दुकानें मुंबईस व नंतर इतर ठिकाणीं काढण्याच्या विचारांत आहोंत असें मुकर्जी यांना कळवलें, तेव्हा त्यांनी आमच्या प्रयत्नाला मदत करण्याचें आश्वासन दिलें आणि कलकत्त्याला मुंबईचें जें सुती कापड जावयाचें तें आमच्या-मार्फत जाईल अशी योजना करूं असेंही त्यांनी आम्हांला कळवलें. त्या कारणाने आम्हांला बरीच अनुकूल परिस्थिती दिसूं लागली.

नंतर एक दिवस इंडियन स्टोअर्स लि. चे दुकानांतील असलेला माल आम्हीं खरेदी केल्यास सर्व दुकानचें दुकान आमच्या स्वाधीन करण्यास ते तयार आहेत किंवा नाही याबद्दल त्यांना प्रत्यक्ष विचारूनच निकाल करून घ्यावा असें आमच्या मनांत

आलें व त्याप्रमाणे त्यांच्याकडे गोष्ट काढली. विचार करून व आपल्या कलकत्त्यांतील मुख्य ऑफिसला लिहून एकदोन दिवसांत उत्तर देण्याचें मुकर्जींनी सांगितलें. आमची इच्छा तर या दिशेने वाढत चालली. दोनचार दिवसांनंतर मुकर्जींनी आमचें म्हणणें मान्य केलें. त्यामुळे आम्हांला अतिशय आनंद झाला, व इंडियन स्टोअर्सच्या मालकांनी मुकर्जींच्या शिफारशीवरून आमचें म्हणणें मान्य केल्याबद्दल त्यांचें आम्हीं कौतुक केलें. पुढे दोनतीन दिवस मालाची मोजदाद व किंमती ठरविण्यांत गेले. ही मोजदाद करीत असतांना दुकान बंद ठेवण्यांत आलें होतें. त्यामुळे दुकानाच्या गिऱ्हाइकीची कल्पना आम्हांला आली नाही. दुकानांत रेशमी मालच बहुतेक होता. मुकर्जी सांगतील त्या दराने आम्हीं मालाची किंमत केली व ती देऊन त्यांच्याकडून पावती वगैरे रीतसर घेतली. दुकान आमच्या मालकीचें झालें. 'इंडियन स्टोअर्स लि., कलकत्ता (बॉंबे ब्रॅंच)' अशी दुकानावर पाटी होती ती बदलून आम्हीं दुकानाचें नाव 'डेक्कन स्टोअर्स' असें ठेवलें. भडकमकरांचे एक माहीतगार स्नेही होते त्यांची दुकानावर योजना केली. पण त्यांना कामावर येण्याला अवकाश होता म्हणून मींच दुकानावर बसण्याला आरंभ केला. वामनराव देसाई हे माझ्याबरोबर दुकानांत बसत असत. जुनेच एकदोन नोकर हाताखाली होते. पण रोजची विक्री रुपया दोन रुपयांपेक्षा जास्ती होत नाही असा अनुभव येऊं लागला. एखाद्या दिवशीं तर चारआठ आण्याचीच विक्री होत असे. दुकानचें नाव बदलल्यामुळे असें होत असेल असें प्रथम आम्हाला वाटलें. त्याचप्रमाणे दुकानांत निरनिराळ्या प्रकारच्या मालाची भरती असावी तशी नाही म्हणून विक्री जोरांत होत नाही, असें वाटून आम्ही मुंबईतच कांही स्वदेशी स्टेशनरी, सुवासिक तेलें, साबण, गिरणीचें कापड वगैरे माल खरेदी केला. यानंतर चळवळही जोरांत आली व विक्रीही वाढूं लागली. तरी एकंदरींत व्यापार आंतबट्ट्याचाच होता.

### आमचा 'व्यापार'!

मुंबईच्या गिरण्यांतून बंगाली वाणाचा माल पुष्कळ जाऊं लागला होता हें आम्हांला माहीत होतें. म्हणून आमच्या दुकानामार्फत हा व्यापार करावा असें आमच्या मनांत आलें. विशेषतः टाटांच्या गिरणींत तयार झालेलीं बंगाली नमुन्याचीं धोतरें तेव्हा फार खपत असत. याकरिता टाटांच्या मार्फत हा व्यापार करावा असें वाटून आम्ही टाटांचे काम पाहणारे सकलातवाला या नावाचे गृहस्थ होते त्यांच्या भेटीला त्यांच्या ऑफिसांत गेलों. एखादादुसरा गठ्ठा सवलतीच्या भावाने खरेदी करावा व तो कलकत्त्याला 'इंडियन स्टोअर्स'कडे पाठवावा, अगर स्वतः तेथपर्यंत जाऊन दुसऱ्या कोणत्या तरी देशी मालाचा व्यापार करणाऱ्याच्या नफ्यावर विकावा व हळूहळू हा व्यापार वाढवीत जावा, एवढीच आमची कल्पना. घाऊक व्यापार कसा चालवण्यांत येतो, किंवा गिरण्या व त्यांतील मालाची विक्री करणारे एजंट यांचा परस्पर काय संबंध असतो, याबद्दलची आम्हांला बिलकूल माहिती नव्हती. आमच्या जवळ मोठेंसें

भांडवल होतें अशांतीलही गोष्ट नव्हती. फक्त आम्ही सुशिक्षित असून आपला धंदा सोडून केवळ देशसेवा करावी या उच्च हेतूनें या उद्योगांत पडलों आहोंत या गोष्टीकडे लक्ष देऊन आम्हांला उत्तेजन व मदत मिळेल एवढीच आमची कल्पना! आणि याच मुद्द्यावर भर देऊन आम्ही सकलातवालांशीं बोलणें केलें. त्यांनी शांतपणें आमचें बोलणें ऐकून घेतलें. आमचा निरुत्साह करूं नये याच उद्देशानें त्यांनी आपला वेळ मोडून आमचें बोलणें ऐकून घेतलें असावें. आमचें बोलणें संपल्यानंतर आपला व्यापार कोणत्या पद्धतीने चालतो, याची थोडक्यांत त्यांनीं माहिती सांगितली; आणि त्या पद्धतीचा स्वीकार करण्यास आमची तयारी असेल तर आमच्याशीं व्यवहार करण्याची तयारी त्यांनी दाखवली. कांही ठराविक दरानें कांही ठराविक मुदतीपर्यंत त्यांच्या गिरणींत जितका माल तयार होईल तितका खरेदी करण्याची आमची तयारी असेल, तर बाकीच्या तपशिलाबद्दल विचार करूं, असा त्यांच्या म्हणण्याचा सारांश होता. अर्थात अशा प्रकारचा व्यापार करण्याचा आम्हांला अनुभव नव्हता व साधनेंही नव्हतीं. म्हणून या बाबतींत आमच्याकडून कांहीच झालें नाही, हें सांगावयाला नकोच. पण त्या वेळच्या चळवळीमुळे मुंबईतील गिरण्यांना व त्यांचा माल विकणाऱ्या दलालांना पुष्कळच नफा झाला यांत शंका नाही. स्वदेशी चळवळीची वाढ कशी होईल व ती कायम कशी टिकेल या गोष्टीचें महत्त्व लक्षांत न घेतां केवळ स्वार्थपरायण होऊनच हा व्यापार त्या वेळीं चालवण्यांत आला. कित्येक गिरणीवाल्यांनी तर परदेशी माल आणवून त्यावर 'हिंदुस्थानमां बनेलो माल' असे ठसे मारून फसवेगिरी करण्यालाही कमी केलें नाही.

### स्वदेशीच्या प्रचाराची झोड

आमचें दुकान वाढवल्याखेरीज वाढत्या चळवळीचा फायदा आम्हांला घेतां येणार नाही असें दिसूं लागलें. आमच्याजवळ भांडवल वेताबाताचेंच. त्यांतून मुंबईच्या दुकानची शाखा म्हणून बेळगावास 'स्वदेशी स्टोअर्स' या नावाचें दुकान आम्हीं उघडलें होतें. दोन्हीकडे लागणारें द्रव्यबळ व मनुष्य-बळ आमच्याकडे नव्हतें. मुंबईचे दुकानांत दोनतीन महिने बसल्यानंतर देसाई व भडकमकर यांच्याकडे तेथील व्यवस्था सोपवून मी बेळगावास आलों व तेथील दुकानची व्यवस्था पाहूं लागलों. पण सर्व वेळ दुकानाकडेच न घालवितां स्वदेशीचा प्रसार करण्याच्या उद्देशानें खुद्द बेळगावांत व जिल्ह्यांतील मुख्यमुख्य ठिकाणीं जाऊन व्याख्यानांची अगदी झोड उठवली. आठवड्यांतून बहुतेक दोन-तीन दिवस तरी व्याख्यानें होत असत. गोविंदराव याळगींची मदत मिळूं लागल्यापासून सभा भरविण्याच्या दगदगीपासून मी मुक्त झालों. हीं सर्व कामें तेच करीत असत. त्या वेळीं श्रीधर बळवंत नगरकर वकील हेही व्याख्यानें देत असत. माझ्या भाषणांसंबंधाने तेलंगांच्या लेखणींतून प्रतिकूल टीका प्रसिद्ध होऊं लागली. त्यामुळे मला जास्ती जोर येत चालला. मुंबईस व बेळगावास जीं दुकानें आम्हीं काढलीं होतीं त्यांची चांगली विक्री व्हावी म्हणूनच माझा हा खटाटोप

आहे, असाही आरोप कित्येकांनी माझ्यावर केला. पण यामुळे माझा उत्साह कमी झाला नाही; उलट जास्ती जोरच येत चालला. धारवाडासही माझीं एकदोन भाषणें झाली. बेळगाव शहरांत मराठे लोकांची वस्ती जास्ती आहे. या लोकांत स्वदेशीचा प्रसार करण्याकरिता मी भीमराव पाटील व बाळकृष्ण मल्हार लाड यांची मदत घेत असें. म्युनिसिपालिटीच्या कामांत हे दोघेही माझ्या विरुद्ध पक्षांतले होते, तरी स्वदेशी, दारूबंदी इत्यादि सार्वजनिक कामांत त्यांनी चांगली मदत केली. ते दोघेही मराठे असल्या-कारणाने मराठा समाजावर त्यांची चांगली छाप पडत असे. लाड यांना सभांत बोलण्याची सवय असल्यामुळे त्यांना बरोबर घेऊनही मी हिंडत असें. या सर्व कारणांमुळे बेळगाव जिल्ह्यांतील सार्वजनिक कार्यकर्त्यांमध्ये माझी गणना होऊं लागली.

### *मोहरमच्या धर्तीवर शिमगा*

बेळगावास हिंदूमुसलमानांचा १८९० सालच्या मोहरममध्ये दंगा झाल्यापासून हिंदू लोकांनी मुसलमानांच्या सणांत भाग घेण्याचें बंद केलें होतें व तेव्हापासून मुसलमानांच्या मोहरमच्या धर्तीवर शिमग्याच्या सणाला स्वरूप देण्यांत आलें होतें. फाल्गुन वद्य प्रतिपदेपासून (धुळवडीपासून) रंगपंचमीपर्यंत दररोज सोंगें घेणें, मिरवणुकी काढणें, वगैरे प्रकार होत असत. पाटील व लाड यांच्या मदतीने शिमग्याच्या सणाला निराळें वळण देण्याचा प्रयत्न केला. त्यांतील बीभत्सपणा काढून टाकावा, देश-स्थितीकडे जनतेचें लक्ष वेधावें हा माझा उद्देश होता. सोंगें वगैरे घेण्याचें अजीबात बंद करण्याला हिंदू बहुजनसमाज कबूल होईना. म्हणून त्या प्रयत्नांत न पडतां दररोज रात्रीं मेळे जमवावयाचे व त्या निमित्ताने लोक जमत त्यांच्यापुढे व्याख्यानें द्यावयाचीं असा कार्यक्रम चालविला. विष्णुपंत नातू, रावजी खोत यांच्यासारख्या पोक्त गृहस्थांना आम्ही आमंत्रणें देत असूं व तेही येत असत. विशेषतः नातूंची मदत आम्हांला जास्ती होत असे. त्यामुळे हा अशिक्षित लोकांचा कांही तरी पोरखेळ अथवा धिंगाणा आहे असें लोकांना वाटेनासें झालें. मागासलेल्या लोकांच्या आळींत जरी सभा भरवल्या तरी सुशिक्षित लोक व विद्यार्थी येऊं लागले. त्यामुळे बेळगावच्या चळवळीला बराच रंग येत चालला.

### *दुकानची भागिदारी सोडली*

याच सुमारास मुंबईच्या दुकानाला जास्ती भांडवल घालण्याची जरुरी भासूं लागली. आम्हां तिघांच्याही शक्तीपलीकडे हें काम होतें, म्हणून आणखी भागीदार घेण्याचा प्रसंग आला. भागींत कोणी तरी परके लोक न घेतां आपल्या माहितीचे व आपल्याच विचाराचे लोक घेणें जास्ती श्रेयस्कर, म्हणून वामनराव देसाई यांच्या कुटुंबाच्या माहेरच्या घराण्यापैकी कांही मंडळींना घेण्याचें ठरलें, आणि त्याप्रमाणे त्यांना घेण्यांतही आलें. याप्रमाणे दुकानचें भांडवल वाढवण्यांत आलें व खुद्द एक भागीदार श्रीयुत टाकूर हे स्वतः दुकान चालवूं लागले. या

व्यवस्थेमुळे दुकान बऱ्याच भरभराटीला आलें व पुन्हा जास्ती भांडवल घातल्यास दुकान चांगल्या ऊर्जितावस्थेला येण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. जास्ती भांडवल घालण्याबद्दल ठाकूर मंडळींनी अगदी निकड लावली. माझ्या मनांत कसेंही करून ठाकुरांच्या बरोबरीने भांडवल घालून दुकानाशीं संबंध ठेवावा असें होतें. पण आम्हां तिघांत याबद्दल एकमत होईना. आमच्या हिश्शाचें भांडवल परत घेऊन आम्हीं भागीदारी तोडल्यास ठाकूर हे स्वतःच दुकान चालवण्याला कबूल होते. त्यांची सूचनाच अशी होती की, सर्वांनी मिळून भांडवल वाढवून जास्ती विस्तृत प्रमाणावर व्यापार चालवावा अथवा आम्हीं आमचें भांडवल परत घेऊन दुकान त्यांच्या स्वाधीन करावें. यापैकी दुसरा मार्गच आम्हांला सोईचा वाटला. आमचा दुकान काढून नफा मिळवण्याचा हेतू प्रथमपासून नव्हता. आमच्या ध्येयाप्रमाणे वागून दुकान चांगल्या प्रकारें चालवणारे आमच्यापेक्षा माहीतगार व भांडवलवाले कोणी मिळाल्यास त्यांच्या स्वाधीन दुकान करून निवृत्त होण्याला आम्हाला कोणतीच हरकत नव्हती. ही योजना अमलांत आणावी, असा रा. ब. अच्युतरावजींचा विशेष कल दिसला. म्हणून मीही त्यांच्या आड गेलों नाही. दुकान आम्हीं स्थापन केल्यावेळीं रोजची विक्री सरासरीने पाच रुपयांपेक्षा जास्ती होत नसे. अपवाद म्हणून दोनच प्रसंग मला आठवतात. एकदा श्रीमंत छत्रपती शाहूमहाराज (कोल्हापूर) यांची स्वारी दुकानावर आली व अजमासें शंभर रुपयांचीं सुवासिक तेलें, साबण, वगैरे सामानांची खरेदी झाली. दुसरा प्रसंग म्हणजे म्हणजे ठाण्याचे जज्ज सी. सी. दत्त, आय. सी. एस. यांनी कापड वगैरे मिळून शेदीडशे रुपयांची खरेदी केली. या दत्तांचा व बंगाल्यांतील कांही जहाल आणि क्रांतिकारक मंडळींचा संबंध आहे असा त्यांच्याबद्दल सरकारला संशय आला व त्यामुळे ते सेवानिवृत्त झाले असें पुढे ऐकण्यांत आलें. दुकानांत खरेदी करण्याकरिता ते जवळजवळ एक तास होते. त्यांनी बऱ्याच उपयुक्त सूचना केल्या. त्यामुळे आम्हांला नवीन स्फूर्ती मिळाल्या-प्रमाणे वाटलें. दुकानच्या आरंभीं अशी स्थिती होती व आम्हीं दुकान सोडतेवेळीं रोजची हजार रुपयांवर विक्री होत होती. दुकान सोडल्याबद्दल मला कित्येक स्नेह्यांनी दोष दिला. पण मला त्यांत मीं काही गैर केलें असें मुळीच वाटलें नाही. उलट आपण केलेला उपक्रम चांगला वाढीला लागलेला पाहून अभिमानपूर्वक आनंदच वाटला.

पुढे थोड्याच दिवसांनी बेळगावचें दुकानही जोशी म्हणून एक बेळगावास गृहस्थ होते त्यांना आम्हीं दिलें व आम्ही मुक्त झालों. देसाई यांनी आपल्या घरीं कांही माग ठेवून रेशमी लुगडीं काढवून मुंबईस विक्रीकरिता पाठवण्याचा धंदा चालवला होता. पण त्यांत त्यांना नुकसान आल्यामुळे त्यांनी तो धंदा बंद केला. याप्रमाणे व्यापारांतील पहिला धडा मला मिळाला. डेक्कन स्टोअर्समध्येच मी चिकटून राहून व्यापारांतच कायम पडलों असतों तर माझी स्थिती काय झाली असती याची अटकळ करणें कठीण आहे. कांही झालें असतें तरी त्यानंतर चोवीसपंचवीस वर्षेपर्यंत माझ्या आयुष्याला जें वळण मिळालें आहे तें मिळालें नसतें हें खास. असो.

प्रकरण सातवें

# लोकमान्यांचें मार्गदर्शन

***गणपती-उत्सवाची मुहूर्तमेढ***

पुण्यांत १८९४ सालीं हिंदूमुसलमान समाजांत वितुष्ट येऊन हिंदूंनी गणपतीचा उत्सव सार्वजनिक रीतीने करण्याची पद्धत घातली. यांत टिळकांनी पुढाकार घेतला होता. प्रथम उत्सव पुण्यांत सुरू झाला त्या वेळीं मी तेथे होतों. दारूवाल्याच्या पुलानजीक जी मारामारी झाली त्या रात्रीं मी उत्सव पाहण्याकरिता व मेळ्यांचीं गाणीं ऐकण्याकरिता गायकवाडाच्या वाड्यांत गेलों होतों. दंगा होऊन खून झाले होते व खुनाबद्दल कांही हिंदू लोकांवर खटले भरण्यांत आले होते. त्यांत श्री. तात्यासाहेब नातू—आमचे स्नेही बाबासाहेब सोमण यांचे वडील बंधू, हे त्या वेळीं बी. ए.च्या वर्गांत शिकत होते—वगैरे मंडळी होती. या दंग्यामुळे व या खटल्यामुळे पुण्यांत बरींच खळबळ उडाली होती. खटला सेशन कमिट झाल्यानंतर डिस्ट्रिक्ट जजापुढे चालला होता. त्या वेळीं खटला ऐकण्याकरिता मी जात असें. खटल्याचा निकाल होऊन आरोपी निर्दोषी ठरले. त्या वेळेपासून गणपती-उत्सवाला पुण्यांत बराच जोर आला होता. पुण्याचें उदाहरण पाहून मुंबईस व महाराष्ट्रांतील इतर ठिकाणीं त्याच पद्धतीवर सार्वजनिक गणपती-उत्सवाला सुरुवात झाली. उत्सव धार्मिक आहे व तो परंपरागत चालत आहे, यांत नवीन कांही नाही, अशा प्रकारें या उत्सवाचें समर्थन करण्यांत येत असे. पण मला तें पटत नव्हतें. मुसलमानांच्या मोहरमच्या सणांतून लोकांना परावृत्त करून त्या उत्सवाच्या बदलीं हिंदूंना एखादा उत्सव असावा, याच हेतूने गणपती-उत्सवाला प्रारंभ झाला असावा, असें माझें मत त्या वेळीं झालें होतें आणि तेंच मत अद्यापि कायम आहे. यापूर्वी बेळगावास ज्याप्रमाणे बेळगावच्या हिंदूंनी शिमग्याच्या सणाला नवीन वळण देण्याचा उपक्रम केला होता, त्याचप्रमाणे हाही पुण्याच्या लोकांचा प्रयत्न होता. पण बेळगावास सार्वजनिक उत्सवांना देशाभिमानमूलक चळवळींची जोड देणारा कोणी

पुढारी न भेटल्यामुळे बेळगावच्या शिमग्याचें स्वरूप १९०४-५ पर्यंत उत्सवाचेंच राहिलें. पण पुढे बंगालच्या चळवळीमुळे शिमग्याच्या सणांतही व्याख्यानें वगैरे होऊं लागलीं. ही हकीकत यापूर्वीच आली आहे. गणपती-उत्सवांत मात्र पहिल्यापासून व्याख्यानें वगैरे करवण्याची पद्धत सुरू होती.

### *बेळगावांतही गणपती-उत्सव*

पुण्याच्या पद्धतीवर १९०६ सालीं गणपतीचा सार्वजनिक उत्सव करण्याची कल्पना बेळगावच्या रविवार पेठेंतील व्यापारी लोकांच्या डोक्यांत आली. पेठ चांगल्या स्थितींत असल्यामुळे उत्सवाकरिता दोनतीन हजार रुपये खर्च करणें त्यांना कठीण नव्हतें. त्यापैकी ज्या कित्येकांनी पुण्याचा उत्सव पाहिला होता त्यांची हौस विशेष होती. केवळ गाणेंबजावणें, कथाकीर्तनें, मांडवआरास, अन्नदान, इत्यादि जुन्या मामुली उत्सवाच्या प्रकारावरच भर न देतां नवीन पद्धतीचा म्हणजे व्याख्यानें, प्रवचनें वगैरे करवण्याचा मंडळीचा विचार ठरला. नवीन पद्धतीने बेळगावांत अशा प्रकारचा उत्सव साजरा करावयाचा म्हणजे माझा व माझ्याशीं सहकार्य करणाऱ्या मित्रांचा संबंध आलाच पाहिजे, इतकी बहुजनसमाजांत आमची प्रतिष्ठा वाढली होती. त्यामुळे ही व्यापारी मंडळीं गोविंदराव याळगींना घेऊन माझ्याकडे आली व त्यांनी आपला विचार मला कळवला. मुसलमानांचें अनुकरण करून त्यांच्या उत्सवाला कमीपणा आणण्याच्या उद्देशाने, टिळकांच्या प्रोत्साहनाने उत्सवाचा आरंभ झाला होता, असें माझें मत असल्याने या उत्सवाकडे बरेच दिवस मी तिरस्कारदृष्टीने पाहात असें. पण या वेळीं स्वदेशी चळवळीने मला पूर्णपणें भारलें असल्यामुळे व यापूर्वीच शिमग्याच्या उत्सवांत व्याख्यानें देण्याला मीं सुरुवात केल्यामुळे गणपती-उत्सवाला तात्त्विक विरोध मी करीत नसें. देशाच्या हल्लीच्या परिस्थितींत लोकांची प्रवृत्ती देशकार्याभिमुख करणें व त्याकरिता वाटेल त्या संधीचा फायदा घेणें यांत कांही गैर नाही असें मला वाटूं लागलें होतें. स्वदेशी चळवळीला सर्वस्वी मीं वाहून घेतलें नसतें तर माझ्यामध्ये कदाचित हा बदल झाला नसता. असो. रविवार पेठेंतील व्यापारी मंडळींनी उत्सव नवीन पद्धतीवर करावा असें माझें मत मीं दिलें व व्याख्यानें वगैरे करवण्याची तजवीज करण्याचें मीं पतकरलें. रविवार पेठेंतील मंडळींचा बेत पक्का ठरून त्यांनी वर्गणी गोळा करण्याला प्रारंभ केला. ही गोष्ट जाहीर झाल्याबरोबर शहरांत दहावीस ठिकाणीं उत्सवाची तयारी झाली व सर्वांनी माझें सहकार्य मागितलें. प्रत्येक ठिकाणीं एकदोन व्याख्यानें देण्याचें मी कबूल केलें. इतकी तयारी झाल्यानंतर रविवार पेठेंत अपेक्षेपेक्षा जास्ती वर्गणी जमूं लागली व शहरांतही उत्साह वाढतो आहे असें दिसूं लागल्यानंतर टिळकांना बेळगावास आमंत्रण द्यावें अशी कल्पना आली.

## *टिळकांना निमंत्रण*

टिळकांच्याबद्दल माझी पूर्वीची मनांतील तेढ कमी झालेली होती, तरी प्रथमप्रथम त्यांना आमंत्रण देण्याला माझें मन तयार होईना. माझ्या पंचवीस-तीस व्याख्यानांत कांही ठिकाणीं सामाजिक विषयावर बोलण्याचाही माझा विचार होता. टिळकांना आमंत्रण दिल्यानंतर त्यांनी येण्याचें कबूल केल्यास लोकांचें लक्ष त्यांच्याकडे व त्यांच्या व्याख्यानाकडे लागणें अगदी स्वाभाविक होतें. त्यांच्या भाषणांत राजकीय विषयच असणार हेंही ठरल्याप्रमाणेच होतें. या धामधुमींत सामाजिक विषयाला कमी महत्त्व येणार हें ओळखल्यामुळे टिळकांना आमंत्रण देण्याबद्दल माझें निश्चित मत होईना. पण गोविंदराव याळगींनी हा विचार उचलून धरला होता. त्यांचा व माझा इतका संबंध आला होता की, त्यांनी आपल्या कार्यतत्परतेमुळे माझें मन जवळजवळ पूर्णपणें आकर्षण करून घेतलें होतें. त्यांचा शब्द मोडण्याचें माझ्या हातून झालें नाही. माझ्या सार्वजनिक आयुष्यांत असे अनेक प्रकार घडले आहेत व माझ्या या जिवलग स्नेह्याच्या प्रोत्साहनाने मीं अनेक जबाबदारीचीं व जोखमीचीं कामें अंगावर घेतलीं आहेत. फक्त प्रोत्साहन देऊन आपण नामानिराळे राहणाऱ्यांपैकी ते नव्हते. माझ्यावर जे जे प्रसंग आले त्या त्या प्रसंगांत ते माझे सहभागी होते; इतकेंच नव्हे तर आपला पैसा, आपली सर्व शक्ती खर्ची घालून आपल्यावर संकटें ओढून घेण्यालादेखील त्यांनीं कमी केलें नाही. असो.

गोविंदरावांचा आग्रह पाहून टिळकांना आमंत्रण देण्याला मीं संमती दिली. पण एवढ्याने हें भागण्यासारखें नव्हतें. टिळकांचे दौरे वगैरे ठरले असल्याने पत्रोपत्रीं किंवा तारा वगैरे देऊन आमंत्रण देण्याने तें स्वीकारलें जाणार नाही अशी भीति वाटून प्रत्यक्ष चारपांच व्यापारी मंडळींनी पुण्यास आमंत्रणाकरिता जाण्याचा विचार केला. प्रत्यक्ष टिळकांची व माझी थोडी ओळख होतीच आणि 'केसरीं'तून चळवळीच्या हकीकतींत बेळगावच्या लोकांत माझ्याच नावाचा बराच पुकारा होत होता. त्यामुळे मला बरोबर घेऊन गेल्यास आमंत्रण स्वीकारलें जाईल असें मंडळींना वाटलें व त्याप्रमाणे त्यांनी मला कळवलें. माझ्यापेक्षा नातूंची व त्यांची ओळख जास्ती आहे आणि ते बेळगावचे पुढारी आहेत तेव्हा त्यांना घेऊन जा, असें मीं त्यांना विनविलें. पण त्यांना हा विचार पसंत पडला नाही व मलाच आपल्याबरोबर येण्याबद्दल त्यांनी आग्रह केला आणि शेवटीं मीही कबूल झालों. तेलंग व मंडळींनी या उत्सवासंबंधाने व टिळकांच्या येण्यासंबंधाने प्रतिकूल वातावरण करण्याचा उघड व प्रच्छन्न प्रयत्न चालवला होता. माझा या होणाऱ्या कार्यक्रमांशीं संबंध आहे असें कळतांच त्यांच्या प्रयत्नाची गती जास्ती जोरांत आली. मीही माझ्या परीने जास्ती सावधगिरीने काम करूं लागलों. टिळकांनी आमंत्रण स्वीकारून येण्याचें कबूल केल्यास उत्सव कोणत्याही प्रतिक्रियेला भीक न घालतां जोरांत पार पाडला पाहिजे असेंही माझ्या मनांत आलें. म्हणून सर्व

जबाबदारी माझ्यावरच असली तरी बेळगावांतील प्रतिष्ठित मानण्यांत येणाऱ्या सर्व लोकांची सहानुभूती मिळवण्याचा विचार मीं केला आणि प्रथम नातू व छत्रे वकील यांची भेट घेतली. छत्रे वकिलांनी हें काम अंगाबाहेर टाकल्याप्रमाणे केलें, पण त्यांचा विरोध होणार नाही अशी मीं खात्री करून घेतली. नंतर नातूंच्याकडे गोष्ट काढली. त्यांनी मला ताबडतोब संमती दिली. ही संमती मिळतांच मी एक "टिळक स्वागत मंडळ' स्थापून नातूंना अध्यक्ष होण्याबद्दल विनंती केली व त्यांनी ती मान्य केली. छत्रे हेही स्वागत मंडळाचे सभासद झाले. बेळवी वगैरे इतर आम्हांला विरुद्ध नसलेली मंडळी स्वागत मंडळांत दाखल झाली. त्यामुळे मला धीर आला व तेलंगांच्या विरोधाला जुमानण्याचें कारण नाही असें मला वाटलें. रविवार पेठेच्या मंडळीतर्फे टिळकांना "कांही जरुरीच्या कामाकरिता भेटावयाचें आहे तर जरूर आपला मुक्काम कोठे आहे हें कळवावें" अशा अर्थाची तार माझ्या सहीनें केली आणि तारेखाली "देशपांडे वकील" अशी सही केली.

टिळकांकडून दुसरेच दिवशीं येण्याबद्दल जबाब आला. मी व रविवार पेठेची तीन-चार मंडळी मिळून पुण्याला आलों. गावांत जात असतांनाच रास्त्यांच्या वाड्याजवळ लो. टिळक गाडींतून जात असतांना दिसले. तेव्हा आमची गाडी थांबवून मी उतरलों. त्यांची गाडीही थांबली आणि नमस्कार वगैरे झाल्यानंतर मी आता स्टेशनवर जात आहें, दोन प्रहरीं दोन-तीन वाजण्याच्या सुमारास तुमचे सर्व कागदपत्र घेऊन या, असें ते म्हणाले. मला त्यांचें बोलणें समजलें नाही. कोणत्या कागदपत्रांना उद्देशून ते बोलले याचा मला बोध झाला नाही. तथापि ते गडबडींत असल्यामुळे मी "बरें" म्हणून सांगून परत आलों. दोन प्रहरीं तीन वाजण्याच्या सुमारास आम्ही त्यांना भेटण्याकरिता गेलों. ते माडीवर आपल्या नेहमीच्या जागीं आराम-खुर्चीवर पडले होते. हातांत आडकित्ता असून सुपारी कातरण्याचें काम चालू होतें. आम्ही जाऊन बसल्यानंतर "काढा तुमचे कागद!" असें ते म्हणाले. "कागद कसले? आपल्याला गणपती-उत्सवाला आमंत्रण देण्याकरता आम्ही आलों आहोंत." असें मीं उत्तर दिलें. "तुम्ही वकील म्हणून तारेंत सही केली होती; यावरून कांही कायद्याचा सल्ला घेण्याकरिता येणार आहांत अशी माझी समजूत झाली." असें बोलून टिळकांनी बेळगावची हकीकत विचारली. उत्सवांत कार्यक्रम कोणते ठरले आहेत याचा तपास केल्यानंतर नाशिकाहून बेळगावला येण्याचें त्यांनी कबूल केलें. बेळगावचा मुक्काम तीन दिवसांचा ठरविण्यांत आल्यानंतर आम्ही निरोप घेऊन निघालों. मोकळ्या मनानें टिळक माझ्याबरोबर बोलले आणि आढेवेढे न घेतां त्यांनी आमंत्रण स्वीकारलें याबद्दल मला व बरोबरीच्या मंडळींना आनंद झाला. टिळकांना माझ्याबद्दल आपलेपणा वाटतो, असा माझ्या मित्रांचा ग्रह झाला. कोणत्याही देशकार्याला शक्य ती मदत करण्याचें व्रत टिळकांनी घेतलें आहे, म्हणून सवड आहे असें कळतांच त्यांनी आमंत्रण स्वीकारलें, माझा कांही संबंध नाही, असें मीं मंडळींना कळविलें. पण त्यांची समजूत झाली नाही

व त्यांनी आपलेंच म्हणणें आग्रहाने मांडलें. परत आल्यानंतर याच गोष्टीचा पुकार त्यांनी केला. त्यामुळें माझी मान्यता थोडी वाढली असें मला दिसून आलें.

बेळगावास आल्यानंतर मेळे वगैरे तयार करणें, मिरवणूक काढणें, व्याख्यानांच्या जागा वगैरे ठरवणें, हीं सर्व कामें मीं गोविंदराव याळगी यांच्यावर सोंपविलीं. बेळगावला टिळक येणार हें समजतांच जवळच असलेल्या शहापुरांतील सराफबाजारच्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर उत्सव करण्याचा बेत केला. कुरुंदवाड संस्थानांतील अनगोळ-वडगावच्या लोकांचीही तयारी झाली. आपल्या उत्सवाला टिळकांनी यावें अशी त्यांनी माझ्याकडे मागणी केली. शहापूर हा गाव व्यापाराचा असून तेथे सराफीचा व विणकऱ्यांचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. विणकर लोकांत व इतर व्यापाऱ्यांत स्वदेशीसंबंधाने मीं चळवळ केली होती व त्यांचीही मला चळवळीला सहानुभूती मिळत होती. म्हणून टिळकांच्या मुक्कामांत एक व्याख्यान शहापुरास होण्याचा कार्यक्रम ठरविण्यांत आला. अनगोळलाही पानसुपारीला जाऊन येण्याचें ठरवलें. हा उत्सव केवळ बेळगाव शहरापुरताच न होतां त्याची व्याप्ती वाढावी व जिल्ह्यांतील लोकांशीं दळणवळण वाढावें अशा इच्छेने मी स्वागत मंडळाचा चिटणीस या नात्याने टिळकांच्या स्वागताकरिता तालुक्याच्या गावांतील व इतर मोठ्या गावांतील प्रमुख लोकांना आमंत्रणें पाठवलीं आणि स्वतः कांही ठिकाणीं टिळकांच्या आगमनाचें महत्त्व समजावून दिलें. टिळकांचें महत्त्व आमच्या प्रांतांत वाढूं नये या उद्देशाने 'धुरीण' पत्र काढण्याच्या प्रयत्नांत सहकार्य करणाऱ्या मला टिळकांच्या स्वागताकरिता व त्यांच्या आगमनाचें महत्त्व पटवून देण्याकरितां धडपड करतांना पाहून कित्येकांना आश्चर्य वाटलें. प्रवाहपतितांत माझी गणना कित्येकांनी केली. कांही परिचित टिळक-अभिमानी मंडळी "आता कसा आमच्या मताला आलास!" असें म्हणूं लागली.

### *टिळकांचें बेळगावांत शुभागमन*

टिळकांचें १९०६ सालीं बेळगावला येणें ही बेळगावच्या व एकंदरींत आमच्या प्रांताच्या दृष्टीने एक अपूर्व गोष्ट घडली, असें म्हणण्यास हरकत नाही. आज 'कर्नाटक' शब्दाने या मुंबई इलाख्यांतील बेळगाव, धारवाड, विजापूर व कारवार हे चार जिल्हे, व मद्रास इलाख्यांतील मंगळूर, बळ्ळारीचा अर्धा भाग, म्हैसूरचें सबंध संस्थान, कुर्ग, आणि निजामशाहींतील गुलबुर्गा व रायचूर जिल्हे इतक्या व्यापक प्रदेशाचा बोध होतो. पण त्या वेळीं 'आमचा प्रांत' म्हणजे मुंबई इलाख्यांतील चार जिल्हे इतकीच आकुंचित कल्पना होती. बाकीच्या कर्नाटकाशीं या मुंबई कर्नाटकाचा संबंध नव्हता. मुंबई कर्नाटकांतदेखील कारवार जिल्ह्याचा रेल्वेशीं संबंध नसल्याने तो जिल्हाही तुटक असाच राहिला होता. धारवाड येथील कांही मंडळीच्या प्रयत्नाने कर्नाटक एकीकरणाची कल्पना येऊं लागली होती. १९२० सालीं नागपूर कॉंग्रेसमध्ये भाषावार प्रांत करण्याचें ठरून सबंध कर्नाटकाला कॉंग्रेसमध्ये स्वतंत्र

स्थान मिळालें. १९२४ साली कर्नाटकची कॉँग्रेस बेळगावला भरून एकीकरणाच्या कल्पनेला दृश्य स्वरूप दिसूं लागलें. १९३०-१९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीमुळे हें स्वरूप जास्ती व्यक्त होऊं लागलें. अशी स्थिती आज असली, तरी टिळकांच्या १९०६ च्या आगमनाच्या वेळीं असें स्वरूप नव्हतें. बेळगाव, धारवाड व विजापूर हे तीन जिल्हेच साधारणपणे सार्वजनिक कामांत पडणारे असें मानलें जाई. निदान मुंबई इलाख्यापुरतेंच बोलावयाचें तर वरील गोष्टच तंतोतंत लागू पडत होती. बेळगावचे नातू, छत्रे, भाटे या मंडळींना त्या काळच्या परिस्थितीला अनुरूप अशा सार्वजनिक कामाची हौस होती. यापैकी पहिले दोघे मुंबई कायदे कौन्सिलचे दक्षिण भागातर्फे सभासदही होते. भाटे यांनी प्रयत्न केला होता; पण त्यांना यश आलें नाही. विजापूरचे देसाई वकील हेही कायदे कौन्सिलचे सभासद होते. पण त्यांचा सार्वजनिक आयुष्यक्रम बेळगावच्या मंडळींच्या मानाने कमी दर्जाचा होता. धारवाडास मुदवेडकर, विठ्ठलराव जोशी, पित्रे वकील यांच्यासारखी कांही तरुण होतकरू मंडळी पुढे येऊं लागली होती. पण जुन्या मंडळींत नाव घेण्यासारखें कोणी नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. निदान राजकीय उलाढालीच्या बाबतींत धारवाड जिल्हा मागासलेला होता. विजापुरास नवीन मंडळीपैकी श्रीनिवासराव कौजलगी यांनी स्वदेशी चळवळींत पुढाकार घेतला होता. पण या सर्व प्रांतांतून सार्वजनिक कामाकरिता सुसंघटनात्मक अशी एखादी एकसूत्री शक्ती उत्पन्न झाली नव्हती. टिळक हे बेळगावला पुढे सन १९१६ मध्ये प्रांतिक परिषदेला आले होते व बेळगाव जिल्ह्यांतील संकेश्वरला गेले होते. धारवाड किंवा विजापूर जिल्ह्यांत ते गेले नसावेत. १९०६ पूर्वी बेळगाव जिल्ह्यांत दोन वेळा जरी ते आले होते, तरी त्या वेळीं त्यांची प्रसिद्धी इतकी नव्हती व त्यांची कर्तबगारी इकडील लोकांना माहीत नव्हती. १८९७ सालच्या खटल्यापासून त्यांची लोकप्रियता वाढीला लागली होती व त्यांची माहितीही आमच्या प्रांतांतील लोकांना होऊं लागली होती. भाटे, छत्रे, नातू वगैरे मंडळींचा व त्यांचा प्रत्यक्ष परिचय होता आणि बरेच लोक त्यांच्या कायद्याच्या वर्गांत शिक्षण घेऊन आले होते. तरी त्यांचा निकट संबंध येऊन त्यांच्या कार्यांत प्रत्यक्षपणें भाग घेणारे कोणी नव्हते असें म्हटलें तरी चालेल. तो योग १९०६ सालीं त्यांच्या बेळगावला येण्याने घडून आला.

तेव्हापासूनच त्यांचा अनुयायी म्हणून काम करण्याचें भाग्य मला लाभलें. तेव्हापासूनच त्यांच्या संबंधाने माझ्या मनांत जी पूर्वी तेढ होती ती नाहीशी झाली व माझी निष्ठा वाढली. १९०६ पासून १९२० पर्यंत मधला सहा वर्षांचा त्यांचा बंदिवासाचा काल सोडल्यास माझा व त्यांचा प्रत्यक्ष संबंध अनेकदा आला आणि वऱ्हाड-नागपूरपासून आमच्या प्रांतापर्यंत त्यांचे जे अनेक प्रमुख अनुयायी होते त्यांत माझी गणना होऊं लागली. माझ्या अंगीं जी कांही थोडीबहुत सार्वजनिक कामें करण्याची पात्रता आली आहे त्याचें सर्व श्रेय टिळकांनी मला प्रथम जें प्रोत्साहन दिलें त्यालाच दिलें पाहिजे. माझ्यासारखीं कमी दर्जाचीं व कामाची हौस असणारीं माणसें पुष्कळ

असतात. पण टिळकांसारख्या पुढाऱ्यांचा निकट संबंध येण्याचा योगायोग त्या सर्वांना लाभत नाही. एखाद्या माणसांत सार्वजनिक कामाला उपयोगी पडण्यासारखा एखादा जरी साधारण गुण उत्कर्षाने असलेला टिळकांना दिसला व तो त्यांच्या सान्निध्यांत आला म्हणजे टिळक त्या गुणाचा गौरव करून त्या माणसाचा संग्रह करीत. त्याला आपलेपणाने वागवीत. लोकसंग्रहाचें हें प्रमुख रहस्य समजून काम करणारे पुढारी त्या वेळीं टिळकांखेरीज कोणी नव्हते. टिळकांचे विरोधी याच त्यांच्या गुणाला "सवंग लोकप्रियतेला लाचावणें" असें निंदाव्यंजक नाव देत. माझाही समावेश या मंडळींत होत असे. पण १९०६ पासून प्रत्यक्ष अनुभवाने या त्यांच्यावर लादल्या जाणाऱ्या आरोपांत तथ्य मुळींच नाही असें मला आढळून आलें. आपल्या अनुयायींशीं अथवा आपल्याशीं सहकार्य करणाऱ्यांशींच ते आदराने वागत असें नसून राष्ट्रकार्याकरिता आपला स्वतःचा अभिमान विसरून ते आपल्या विरोधी माणसांशीं वागतांनाही आपल्याकडे कमीपणा घेत असत. कार्याकडे त्यांची दृष्टी असे व या कार्याकरिता ते वाटेल ती घस सोसून लोकांचा संग्रह करीत. प्रतिपक्षावर पुष्कळ प्रसंगीं त्यांनी तीव्र व मर्मभेदी टीका केली आहे; नाही असें नाही. पण ती टीकादेखील कार्याकडे दृष्टी ठेवूनच करण्यांत आली आहे; त्यांत प्रतिपक्षांतील माणसांचा पाणउतारा व्हावा व आपली स्वतःची प्रौढी वाढावी हा हेतू नसे. हें त्यांच्या आयुष्यांतील अनेक प्रसंगांवरून निःपक्षपातीपणाने पाहणाऱ्यांना दिसून येईल. असो.

### *टिळकांची व याळगींची भेट*

ठरल्याप्रमाणे टिळक बेळगावला उत्सवाकरिता नाशिकहून आले, नाशिकला उत्सवाकरिताच ते गेले होते. ते येण्यापूर्वी बेळगावास तीनचार दिवस सारखा पाऊस पडत होता. त्यामुळे आम्हांला निरुत्साह वाटत होता. पण कर्मधर्मसंयोगाने ते आल्या दिवसापासून पावसाने उघाडी दिली. गोविंदराव याळगींनी मिरवणुकीची तयारी जय्यत ठेवली होती. पुढाऱ्यांची मिरवणूक काढण्याचा हा बेळगावांत पहिलाच प्रसंग होता. या उत्सवाचा व टिळकांच्या येण्याचा गवगव बराच झाला होता; त्यामुळे बाहेरगावचे हजारो लोक आले होते आणि मिरवणूक बऱ्याच उत्साहाने पार पडली. अशा प्रकारचे कार्यक्रम करण्यांत काळाचा व शक्तीचा अपव्यय होतो असा अलीकडे केव्हाकेव्हा आक्षेप घेण्यांत येत असतो. मिरवणुकी काढणें ही एक मामुलीच बाब होऊन बसल्यामुळे या आरोपांत सत्यांशही नाही असें म्हणवत नाही. तथापि त्या वेळीं टिळकांसारख्या असामान्य पुढाऱ्याच्या मिरवणुकीमुळे लोकांत जागृती उत्पन्न करण्याला किती मदत होत असे, याची कल्पना आज होणें कठीण आहे. मिरवणूक संपल्यानंतर त्यांना त्यांच्या उतरण्याच्या ठिकाणीं—म्हणजे त्यांच्या कायद्याच्या वर्गांतील त्यांचे शिष्य दादासाहेब नरगुंदकर यांच्या घरीं—पोचवण्यांत आले. दहापंधरा मिनिटें विश्रांती घेतल्यानंतर मला टिळकांनी एकीकडे बोलाविलें, व "आजच्या मिरवणुकींत

प्रामुख्याने भाग घेणारा गिड्डा, गोरासा, मध्यम बांध्याचा तरुण कोण?" असा प्रश्न केला. माझे स्नेही गोविंदरावांना उद्देशूनच त्यांनी हा प्रश्न केला होता. मीं त्यांना तसें उत्तर दिलें. यानंतर मला त्यांनी बजावलें, "मी नाशिकहून येत आहें. तेथेही मला उत्साही, तरुण, होतकरू मंडळी भेटली. पण त्यांच्या डोक्यांत भलतेसलते विचार असल्याचें मला दिसून आलें. तुमच्या या गोविंदरावाचें तरुण मंडळीवर चांगलें वजन आहे असें दिसतें. तेव्हा त्यांना संभाळा व भलत्या गोष्टीकडे त्यांना जाऊं देऊं नका." वगैरे. माझा विशेष परिचय नसतां आपलेपणाने अशा प्रकारचे विचार मला सांगितल्या बद्दल मला आनंद झाला. गोविंदरावांना समक्ष बोलावून त्यांची व टिळकांची ओळख करून द्यावी व त्यांच्या तोंडूनच गोविंदरावांना सांगवावें, म्हणून गोविंदरावांचा तपास केला. पण त्यांच्या स्वभावाप्रमाणे एक काम संपल्याबरोबर उगीच पुढेपुढे करीत बसून वेळ न घालवितां दुसऱ्या कामाच्या तयारीकरिता निमूटपणें ते पूर्वीच निघून गेले होते. त्यांची भेट झाल्यानंतर टिळकांनी सांगितलेली गोष्ट मीं त्यांना कळवली व ते नको नको म्हणत असतांही टिळकांकडे नेऊन त्यांची ओळख करून दिली. ही ओळख पुढे वाढत गेली.

### *टिळकांच्या चर्येवरील तेज*

टिळकांच्या मुक्कामाच्या पहिल्या दिवशीं रविवार पेठेंतील गणपतीपुढे त्यांचें भाषण झालें. मांडव जरी मोठा होता, तरी टिळकांचें दर्शन घेण्याकरिता व भाषण ऐकण्याकरिता जो प्रचंड लोकसमुदाय जमला होता त्याचा समावेश मंडपामध्ये होणें अशक्य होतें. म्हणून मंडपाला लागून असलेल्या चव्हाट्यावर व्याख्यानाची सोय केली होती. व्यासपीठावर उभे राहून टिळकांच्या तोंडून दहापंधरा वाक्यें निघतात न निघतात तोंच झिमझिम पावसाला सुरवात झाली. सभेंत हजारों छत्र्या उघडल्या गेल्या. त्यामुळे सभेंतील शांती मोडूं लागली. व्याख्यानाच्या वेळीं या प्रकारें बेरंग होण्याचीं चिन्हें दिसतांच मी प्लॅटफॉर्मवर गेलों आणि माझ्या मोठ्या आवाजाने लोकांनी छत्र्या मिटाव्या व पावसाने चिंब भिजण्याचा प्रसंग आला तरी जागच्या जागीं बसून शांतपणें व्याख्यान ऐकावें अशी विनंती केली. त्याबरोबर एकदोन मिनिटांत सर्व छत्र्या एकदम मिटल्या गेल्या. फक्त अपवाद म्हणून तेलंगांनी मात्र आपली छत्री मिटली नाही व आपलें मनोधैर्य दाखवलें! फक्त टिळकांच्या डोकीवर छत्री धरण्यांत आली होती. पण आपल्या एकट्याच्याच डोक्यावर छत्री धरल्याचें टिळकांना समजतांच छत्री मिटण्याबद्दल टिळकांनी सांगितलें. त्याप्रमाणे तीही मिटली गेली. पण सुदैवाने दोनचार मिनिटांतच पाऊस थांबून स्वच्छ ऊन पडलें. तेव्हा तेलंगांनीही आपली छत्री मिटली. तेव्हा लोकांत हशा पिकला!

टिळकांचें भाषण जवळजवळ दोन-तासपर्यंत झालें. यापूर्वी संमती-वयाच्या कायद्याच्या चळवळींत आणि कॉंग्रेसमध्ये व बेळगावच्या प्रांतिक कॉन्फरन्समध्ये मीं त्यांचीं

भाषणें ऐकलीं होतीं. पण या भाषणाचा परिणाम फार दिवस माझ्या मनावर राहिला. अद्यापि त्यांच्या भाषणांतील मुख्य मुद्दे मला आठवतात. अंतःकरणाला भिनून जाणारे त्यांचे विचार आणि ते सोप्या, सरळ, सर्वांना समजण्यासारख्या शब्दांत मांडण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. देशाची हीन स्थिती होण्याला इंग्रजांची राज्यपद्धती कसकशी कारणीभूत झाली याची चिकित्सा करतांना त्यांना एक प्रकारचा त्वेष येई आणि त्या त्वेषाच्या आवेगांत त्यांच्या डोळ्यांत व चेहऱ्यावर एक प्रकारचें तेज चमकत असे, असें माझ्या अनुभवाला पुढे पुष्कळ वेळां आलें. पण या स्वरूपाचें प्रथम दर्शन मला याच सभेंत झालें. टिळकांचीं अनेक छायाचित्रें माझ्या पाहण्यांत आलीं आहेत; पण त्यांमध्ये या तेजाचें चित्र माझ्या पाहाण्यांत आलें नाही.

## *टिळकांची वक्तृत्वशैली*

हिंदुस्थानांतून चाळीसपन्नास कोटी रुपये दरसाल कापडाच्या पायीं परदेशांत जातात असें एक विधान त्यांनी आपल्या भाषणांत केलें. अर्थात सुशिक्षित व पांढरपेशे लोकांना यांत न समजण्यासारखें कांही नव्हतें व ही गोष्ट त्यांना नवीही नव्हती. पण, सभेंत कांबळीं घेऊन हजारों लोक खेड्यापाड्यांतून आले होते इकडे टिळकांचें लक्ष गेलें, आणि त्यांना आपलें हें विधान समजून देण्याकरिता त्यांना समजेल असें उदाहरण त्यांनी दिलें. त्यांनी "तुम्ही गोकाकची गिरणी पाहिली आहे ना?" असा लोकांना उद्देशून प्रश्न केला. "होय" असे बहुतेक सर्वतोमुखीं उद्गार निघाले. बेळगाव जिल्ह्यांत ही एकच गिरणी असल्यामुळे पुष्कळ लोकांना तिच्याबद्दलची कल्पना आहे. म्हणून या गिरणीचें उदाहरण घेऊन टिळकांनी आपल्या म्हणण्याचें स्पष्टीकरण केलें. तें असें: गोकाकची गिरणी सुमारें वीस लाख भांडवलावर उभारण्यांत आली आहे. एक कोटी रुपयांत असल्या पाच गिरण्या उभारतां येतील. पन्नास कोटी रुपयांत अडीचशे गिरण्या स्थापणें शक्य आहे. तेव्हा प्रत्येक वर्षी कापडाकरिता आमच्या देशांतून जो पैसा जातो त्यांतून दरवर्षी दोन-अडीचशे गिरण्या उभारल्या जातील. पूर्वी चाळीसपन्नास कोटी रुपये परदेशीं जातात या विधानामुळे सभेंत चुळबूळ झाली नाही. पण स्पष्टीकरण ऐकल्याबरोबर खेड्यांतील लोकांच्या तोंडावरदेखील आश्चर्यभरित मुद्रा दिसली आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. त्याचप्रमाणे स्वदेशीबरोबर बहिष्काराचें समर्थन उत्तम प्रकारें त्यांनी केलें. दुसरे दिवशीं शहापूर व अनगोळ येथे भाषणें झालीं व तींही हजारों लोकांनी ऐकलीं. शेवटच्या दिवशीं त्यांना थाटाची मेजवानी देण्यांत आली. त्या वेळीं गावांतील बहुतेक शिष्ट मंडळींना आमंत्रण देण्यांत आलें होतें. जेवण झाल्यानंतर आपल्याला नेमस्त असें समजणाऱ्या एका गृहस्थांनी त्यांना प्रश्न केला की, समजा, उद्या आमच्या लोकांच्या हातीं सत्ता आली, तर तुम्ही (टिळक) काय करणार? टिळकांनी थोडें हसून उत्तर दिलें, "माझें काम आताप्रमाणेच सत्ता चालवणाऱ्यांच्या कारभारांतील दोष दाखवून सुधारणा करण्याचें." त्या नेमस्त गृहस्थांचें तोंड बंद झालें.

शहापुरास प्रतिष्ठित व्यापारी वर्गांत सारस्वत ब्राह्मणांचा भरणा जास्ती आहे. १९०६च्या गणपती-उत्सवांत त्याच मंडळींनी प्रामुख्याने भाग घेतला होता. टिळक हे चित्पावन ब्राह्मण म्हणून त्यांच्या स्वागतांत सारस्वत ब्राह्मणांनी भाग घेणें योग्य नाही, अशा प्रकारची चळवळ बेळगावांतील एकदोन टिळकद्वेष्ट्या सारस्वत ब्राह्मणांनी केली होती. तींत तेलंगांचें अंग असावें असा पुष्कळांना संशय आला होता. पण या चळवळीचा परिणाम कांही झाला नाही. एका सारस्वत ब्राह्मणाने टिळकांना खासगी रीतीने प्रश्न केला की, "तुम्हांला आमच्या जातींत जेवणाला हरकत आहे की काय?" "अभक्ष्य पदार्थांखेरीज इतर कोणतेही पदार्थ तुमच्या घरीं खाण्यास मला कांहीच हरकत नाही इतकेंच नव्हे, पंचद्रविड ब्राह्मणांना हरकत असूं नये व अभक्ष्य पदार्थांचा त्याग केल्यास रोटीव्यवहार चालू होईल" असें त्यांनी उत्तर दिलें. शहापूरच्या जैन मंडळींनी त्यांना पानसुपारी केली त्या वेळीं जैन धर्म हा हिंदू धर्मातूनच निघाला असून त्यांतील व हिंदू धर्मातील सामान्य तत्त्वें कोणतीं व जैन धर्माचीं स्वतंत्र अशीं तत्त्वें कोणतीं याचें टिळकांनी विवेचन केलें. हिंदू वैदिक धर्मापेक्षा जैन धर्म पुरातन व स्वतंत्र आहे असें ज्या जैनांचें मत होतें त्यांना टिळकांचें म्हणणें पटलें नाही आणि त्यामुळे थोडा वादविवाद झाला.

याप्रमाणे तीन दिवसांचा कार्यक्रम आटपून टिळकांची स्वारी पुण्याला परत गेली. या तीन दिवसांच्या सान्निध्याने माझ्यामध्ये बरेंच परिवर्तन झालें. इतक्या थोड्या कालांत माझ्यामध्ये परिवर्तन घडण्यासारखें काय होतें असें कोणीं विचारल्यास त्याचें समाधान करणें मला अशक्य आहे. म्हणून मला कोणी उतावळ्या स्वभावाचा म्हणून किंवा भावनाप्रधान म्हणून दोष देतील. तसा दोष कित्येक देतात हेंही मला माहीत आहे. तथापि या टीकेकडे लक्ष न देतां माझ्या सार्वजनिक आयुष्यावर टिळकांच्या या भेटीचा काय परिणाम झाला व तो अखेरपर्यंत कसा टिकला याचें दिग्दर्शन करणें मला योग्य वाटतें. टिळकांच्या पश्चात हिंदी राजकारणाचीं मुख्य सूत्रें गांधींच्या हातीं गेलीं. त्या वेळीं व तेव्हापासून आजपर्यंत गांधींशीं यथाशक्ती मी सहकार्य करीत आलों. त्यामुळे टिळकांच्या मार्गाला मीं सोडलें असाही एक आरोप माझ्यावर करण्यांत येत असतो. पण माझ्या मतें १९०६ पासून आतापर्यंत जवळजवळ पंचवीस-सव्वीस वर्षांत टिळकांच्या सहवासामुळे ज्या ध्येयाची मीं माझ्या अंतःकरणांत स्थापना केली त्यापासून मी च्युत झालों आहें असें मला वाटत नाही. या संबंधाचें विवेचन पुढे १९२० सालच्या हकीकतींत येणारच आहे. असो.

टिळक गेल्यानंतर 'चिकित्सक' पत्रांतून टिळकांवर तेलंगांनी खूप हल्ला चढवला आणि छत्री प्रकरणाची हकीकत देऊन टिळकांची व माझी टवाळकी केली. तेव्हापासून पुढे कांही तरी सबब काढून किंवा माझ्या भाषणांचा विपर्यास करून माझ्यावर टीका करण्याचा तेलंगांनी चंग बांधला होता. त्या टीकेचा परिणाम असा झाला की लोकांत माझी प्रतिष्ठा वाढतच गेली. पण त्या वेळीं सरकारची माझ्यावर नजर न जातां मी

बचावलों गेलों याचें कारण माझीं भाषणें टिपून घेण्याकरिता पुण्याहून शॉर्टहँड रिपोर्टर्स येत असत. त्यामुळे 'चिकित्सकां'त येणारी माझ्या भाषणांची हकीकत व तीवरील टीका किती विपर्यस्त आहे हें अधिकाऱ्यांना सहजच दिसून आलें असलें पाहिजे.

## 'टिळकांचा खास जिल्हा'

गणपतीचा उत्सव संपल्यानंतर आम्ही स्वस्थ बसलों नाही. जिल्ह्यांत फिरतीवर जाऊन बरींच व्याख्यानें दिलीं. चिकोडीचे सखारामपंत कुलकर्णी वकील, अथणीचे व हल्ली बेळगावांत वकिली करीत असलेले नारायणराव जोशी यांचा परिचय झाला. त्यांच्या मदतीने चिकोडीस व अथणीस बरीच चळवळ झाली. त्याचप्रमाणे बहुतेक सर्व तालुक्याच्या गावांत जाऊन जागृती केली. कांही होतकरू मंडळींचा प्रत्यक्ष परिचय झाला व तो अद्यापपर्यंत कायम आहे. चार मंडळीं मिळून एकोप्याने कामाकडे दृष्टी ठेवून काम करण्याची सवय अद्यापि आम्हांला लागावयाची आहे. ही सवय लागत चालली आहे याबद्दल मतभेद नाही. पण चांगल्याचांगल्या कार्यकर्त्यांतदेखील मत्सर, व्यक्तिद्वेष इत्यादि दुर्गुण दिसतात व त्यामुळे कार्यहानी होते, असा अनुभव अद्यापिही ऐन आणीबाणीच्या प्रसंगींदेखील येतो. त्या वेळीं हा अनुभव मला थोडाबहुत आलाच. टिळकांच्या विशेष कृपेंतला मी आहें अशी साधारणपणें समजूत झाल्याने आणि माझ्या शक्तीप्रमाणे मी तनमनधनें-करून चळवळींत विशेष भाग घेत असल्याने जनतेंत माझ्यासंबंधाने थोडी आवड उत्पन्न होणें स्वाभाविक होतें. ही लोकप्रियता मिळविण्याकरिताच माझी धडपड आहे, असा आरोप माझ्यावरही झाला. हा अनुभव सर्व सार्वजनिक कामें करणाऱ्यांना थोडाबहुत असतोच. गांधींसारखा सत्यप्रिय, सरळ, अजातशत्रूदेखील अशा आरोपांतून सुटला नाही. मग इतरांची कथा काय? प्रथमप्रथम माझ्याबरोबर काम करणाऱ्यांपैकी दोघां-तिघांनी आम्हांला सोडलें. पण गोविंदराव याळगी, हणमंतराव देशपांडे, लाड, भीमराव पाटील वगैरे मंडळींचें सहकार्य मला पूर्णपणें मिळूं लागलें. पूर्वीच्या वडील व पुढारी मंडळींचा पाठिंबा आम्हांलाच मिळूं लागला. त्यामुळे बेळगाव जिल्हा म्हणजे टिळकांचा खास जिल्हा अशी आमच्या जिल्ह्याबद्दल प्रसिद्धी होऊं लागली. टिळकांनाही बेळगावाबद्दल विशेष आपलेपणा वाटत असे हें मला माहीत आहे. याबद्दल पुढे १९१६ सालीं टिळकपक्षाच्या वतीने जी प्रांतिक परिषद बेळगाव येथे भरली होती त्या संबंधाने हकीकत देतेवेळीं पुन्हा उल्लेख करावा लागेल. नातू हे हयात असेपर्यंत त्यांच्याकडे बेळगावच्या पुढारीपणाचा मान होता. त्यांच्या पश्चात बेळवींकडे तो गेला. आणि हे दोघेही टिळकांचे अभिमानी, म्हणून त्यांच्या हाताखाली त्यांच्या धोरणाने कामें करण्यास आम्ही पूर्ण तयारीने सिद्ध होतों. त्यामुळे टिळकांच्या राजकारणाचाच प्रभाव आमच्या जिल्ह्यावर जास्ती पडत चालला. टिळक हयात असेपर्यंत कर्नाटक, महाराष्ट्र, वऱ्हाड, नागपूर इत्यादि प्रांतांतून हीच स्थिती होती. पण टिळकांच्या पश्चात ही स्थिती

पुष्कळ ठिकाणीं टिकली नाही. पण आमच्या प्रांतांत व विशेषतः आमच्या बेळगाव जिल्ह्यांत तसें झालें नाही. व्यक्तिद्वेष, मत्सर, जातीजातींतील बेबनाव यामुळे सार्वजनिक कामांत बिघाड होतो. पण आमच्या जिल्ह्यांत हा दोषदेखील कमी प्रमाणांत आहे. याचें श्रेयदेखील १९०६ पासून बेळगावच्या नातू, छत्रे, भाटे, बेळवी वगैरे पुढाऱ्यांनी जें वळण घालून दिलें त्यालाच दिलें पाहिजे.

१९०६ सालच्या नवरात्राचा व दसऱ्याचा सणही आम्हीं सार्वजनिक रीतीने पाळला. अलीकडे कर्नाटकांत प्रांतीय चळवळीने जोर घेतल्यामुळे नवरात्र हा कर्नाटकचा 'राष्ट्रीय' सण असा मानण्यांत येऊं लागला आहे. पण गणपती-उत्सव मात्र पूर्वीच्या पद्धतीवरच चालू आहे.

### पंढरपुरांत टिळक

कार्तिक शु० ११ ला पंढरपुरास मोठी यात्रा भरत असते. त्या वेळीं टिळकांना आमंत्रण देऊन स्वदेशीसंबंधाने चळवळ करण्याचा तेथील मंडळींचा विचार ठरला. यापूर्वी १९०६ सालीं तेथे प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें आणि टिळक त्या प्रदर्शनाला गेले होते. एकादशीला टिळकांचें जावयाचें ठरलें. माझे स्नेही कोल्हापूरचे गणपतराव मोडक हे तेथे इंग्रजी शाळेवर हेडमास्तर होते. कोल्हापूरचेच बापू सरदेसाई म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर होते. त्यांच्या प्रोत्साहनाने टिळकांना यात्रेला आमंत्रण देण्याची कल्पना निघाली होती. १९०६ सालीं महाराष्ट्रांतही कित्येक ठिकाणीं माझीं व्याख्यानें झालीं होतीं. टिळकांचा व माझा संबंध आला आहे, असें थोड्याबहुत ओळखीच्या माणसांना समजलें होतें. यामुळे पंढरपुराहून मलाही आमंत्रण आलें. पंढरपूरला येण्याबद्दल टिळकांनीही मला पत्र लिहिलें. त्याप्रमाणे टिळक पुण्याहून निघणार होते त्याच दिवशीं मी पुण्यास पोंचलों व त्यांच्या-बरोबरच प्रवास केला. आमच्याबरोबर चिंतामणराव वैद्य, डॉ. नानासाहेब देशमुख, वासूकाका जोशी, काका पाटील वकील वगैरे मंडळी होती. या सर्व मंडळीची व माझी प्रथमच ओळख झाली. यांपैकी शेवटच्या दोघांचा व माझा संबंध विशेष आला. काका पाटील व डॉ. देशमुख हे हल्ली मयत आहेत. पंढरपूर येथे थिएटरमध्ये चिंतामणराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली परिषदवजा एक सभा भरली होती. चिंतामणरावजींचें नाव आम्हीं कॉलेजमध्ये पुष्कळ वेळां ऐकलें होतें. बहुतेक परीक्षांतून हे पहिल्या वर्गांत पास झाल्याबद्दल व युनिव्हर्सिटीचीं बक्षिसें, स्कॉलरशिपा वगैरे मिळवल्याबद्दल यांची ख्याती होती. ग्वाल्हेर येथे हे न्यायाधिशाच्या कामावर होते. तेथूनच पेन्शन घेऊन ते इकडे परत आले होते व इकडील राजकारणांत त्यांनी भाग घेण्याला प्रारंभ केला होता. राजकारणांत ते टिळकांच्याच सल्ल्याने वागत, असें माझ्या कानावर आलें होतें. अशा विद्वान व नावाजलेल्या गृहस्थांचें भाषण ऐकण्याची मला फार इच्छा होती. पण त्यांचें पंढरपूरचें भाषण मला फारसें आवडलें नाही. रात्रीं वाळवंटावर

हजारो वारकऱ्यांसमोर विष्णुबुवा जोग यांच्या अध्यक्षतेखाली टिळकांचीं भाषणें झालीं. देशांतील कोट्यावधी लोकांच्या गरिबीकडे पाहून ती दूर करण्याचा प्रयत्न न करतां नुसतें तोंडाने 'विठ्ठल, विठ्ठल' म्हणून टाळ कुटल्याने विठ्ठलाची प्राप्ती होत नसते, अशा अर्थाचें एक वाक्य टिळकांच्या तोंडून एका भाषणांत निघालें. त्यामुळे वारकरी लोकांत थोडी गडबड उडाली. विष्णुबुवांनी टिळकांच्या म्हणण्याचा अर्थ समजावून सांगितला. जोग स्वतः सांप्रदायी वारकरी असून त्या वर्गांत त्यांची प्रतिष्ठाही विशेष असे. त्यामुळे श्रोत्यांचें समाधान होऊन सभा शांतपणें 'पुंडलीकवरद हरि विठ्ठल'च्या गजरांत समाप्त झाली. थिएटरांत व वाळवंटावर माझींही भाषणें झालीं. टिळकांच्या समोर भाषण करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे मला मोकळ्या मनाने भाषण करतां आलें नाही. तथापि सभा संपल्यावर माझ्या भाषणाबद्दल टिळकांनी उत्तेजनपर उद्गार काढले. टिळकांच्या भाषणाचें टिपण घेण्याकरिता 'केसरी' ऑफिसांतील भावे या नावाचे एक गृहस्थ आले होते. त्यांनी माझ्या भाषणाचेंही टिपण घेतलें होतें. त्यांनी तें मला वाचून दाखवलें. भाषण करीत असतां माझ्या मनांत भीती वाटत होती तरी रिपोर्ट ऐकल्यानंतर भाषण अगदीच वाईट झालें नसावें असें मलाही वाटलें.

सभेचें काम वगैरे संपल्यानंतर आम्ही दहा-पंधरा मंडळी मिळून एकंदर देशस्थिती-संबंधाने चर्चा करीत होतों. अनुभवी व मोठ्या माणसांशीं मिळूनमिसळून वागण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्याने मला भीड वाटली. म्हणून चर्चेत भाग न घेतां मुकाट्याने ती ऐकण्याचेंच काम मीं केलें. पंढरपूरच्या या मुक्कामांत काका पाटलांची चांगली ओळख झाली. याच ओळखीने पुढे स्नेह वाढला व त्यांची मला अनेक प्रसंगीं मदत मिळाली. ती हकीकत पुढे येणारच आहे.

## *टिळकांचें मला मार्गदर्शन*

पंढरपूरचें काम आटोपून मी बेळगावास परत आलों. नंतर थोड्याच दिवसांनी गुर्लहोसूरचे गणपतराव किर्लोस्कर माझ्याकडे आले. गुर्लहोसूरच्या उत्सवाकरिता टिळकांना आमंत्रण देऊन आणवण्याचें तेथील मंडळींनी ठरवल्याचें सांगून माझ्याकडूनही एक पत्र त्यांनी मागितलें. पण अल्प परिचयाचा फायदा फार घेऊं नये असें वाटल्यावरून मीं पत्र दिलें नाही. तरी गणपतराव एकटेच पुण्याला आमंत्रण देण्याकरिता गेले. हे आण्णासाहेब किर्लोस्करांचे बंधू. चिदंबर दीक्षित म्हणून त्या प्रांतांत प्रसिद्ध सत्पुरुष होऊन गेले त्यांच्या नावाचें एक देवालय गुर्लहोसुरास आहे. दीक्षितांना हा गाव इनाम आहे. ते चिदंबरेश्वराचा उत्सव करीत असतात. उत्सवांत कथाकीर्तन, अन्नसंतर्पण वगैरे नियमित जुन्या पद्धतीप्रमाणेंच होत असे. पण बोटेस्वामी या नावाचे एक संन्यासी गुर्लहोसुरास जाऊन राहूं लागले होते. त्यांच्या प्रोत्साहनाने उत्सव मोठ्या प्रमाणावर होऊं लागला होता. १९०५ सालीं मी उत्सवाला गेलों होतों व स्वामींनी माझीं व्याख्यानें करवलीं होतीं. १९०६ सालींही माझा जाण्याचा बेत होताच.

गणपतरावांनी पुण्याला जाऊन टिळकांची भेट घेतली व गुर्लहोसूरला येण्याबद्दल अत्याग्रह केला असावा. गणपतराव गेल्यानंतर एकदोन दिवसांतच टिळकांची मला तार आली आणि त्यांनी गुर्लहोसूरचें आमंत्रण स्वीकारल्याचें मला कळवलें. ही गोष्ट जिकडेतिकडे प्रसिद्धही झाली. मी तिकडील तयारीकरिता म्हणून बेळगावच्या गोविंदराव याळगी वगैरे मित्रांसह चारपाच दिवस पूर्वींच गेलों होतों. आणि आजूबाजूस असलेल्या तालुक्याच्या संवदत्ती, बैलहोंगल वगैरे गावांत व्याख्यानें दिलीं होतीं. टिळक येणार म्हणून उत्सव मोठ्या प्रमाणांत होण्याचा संभव होता, हें जाणून स्वामींनीही तयारी चांगली केली होती. गुर्लहोसूर हा गाव बेळगाव जिल्ह्यांतील संवदत्ती तालुक्यांत असून बेळगावपासून सुमारे ५०-५५ मैल व धारवाडहून २५ मैल दूर आहे. त्या वेळीं मोटारीची वगैरे सोय नसल्याने घोड्यांच्या किंवा बैलांच्या गाडींतूनच प्रवास करावा लागत असे. बेळगावहून गुर्लहोसूरला जाण्यापेक्षा धारवाडहून जाणें जास्ती सोयीचें वाटल्यावरून तोच मार्ग निश्चित करण्यांत आला होता. टिळकांच्या बरोबर या दौऱ्यांत शिवरामपंत परांजपेही होते. धारवाडास एक दिवस टिळकांचा मुक्काम झाला व तेथे दोघांचीं भाषणें झालीं. धारवाडपासून गुर्लहोसूरला येतांना वाटेंत लागणाऱ्या प्रत्येक खेड्यांत हजारो लोकांपुढे त्यांचीं भाषणें झालीं. हा प्रांत अगदी कानडी बोलणाऱ्यांचा असल्यामुळे मुद्वेडकर हे कानडींत भाषणांचा सारांश सांगत. खेड्यांतील हजारो लोकांच्या समवेत टिळक गुर्लहोसूरला आले. तिकडील खेड्यांत देशभक्तीचें बीज प्रथम टिळकांनीच पेरलें. १९३० व १९३२ च्या चळवळींत तिकडील अगदी मागासलेल्या म्हणून समजलेल्या प्रांतांतील करेकट्टी, होसूर, हूली, मुरगोड वगैरे लहानलहान खेड्यांतील लोकांनी भाग घेतला व अद्यापि ते शिक्षा भोगत असून आपली देशसेवा अर्पण करीत आहेत.

गुर्लहोसुरास मलप्रभा नदी आहे. टिळक नदीवरच स्नानाला गेले. डोहांत ते तास-दीड-तास सारखे पोहत होते. पोहण्याचे निरनिराळे प्रकार त्यांनी करून दाखवले. टिळकांना इतक्या उत्तम प्रकारें पोहतां येतें हें पाहून हजारो लोकांना मौज वाटली. सायंकाळीं देवळासमोरील पटांगणांत टिळक व परांजपे यांचीं व्याख्यानें झालीं व मुद्वेडकरांनी कानडींत सारांश सांगितला. विऱ्हाडीं आल्यानंतर टिळकांनी मला "तुम्हांला कर्नाटकांत काम करावयाचें आहे की महाराष्ट्रांत काम करावयाचें आहे?" असा प्रश्न केला. "महाराष्ट्रांत कार्यकर्ते पुष्कळ आहेत; म्हणून मला कर्नाटकांतच काम करणें जास्ती आवश्यक वाटतें" असें मीं उत्तर दिलें. "असें असेल तर तुम्हांला कानडी बोलण्याची सवय केली पाहिजे. आणि कर्नाटकांतील प्रमुख वस्ती लिंगायत लोकांची आहे, याकरिता त्यांच्या धर्माचा अभ्यास करून माहिती करून घेतली पाहिजे" असें त्यांनी सांगितलें. "लिंगायत धर्माचा व लोकसेवेचा संबंध काय?" असें मीं त्यांना विचारलें. "ज्या लोकांत आपल्याला काम करावयाचें असतें त्यांचेबद्दल, त्यांच्या चालीरीतींबद्दल माहिती असणें जरूर आहे. हिंदुस्थानांत अनेक धर्मपंथ असले, तरी

त्यांतील तत्त्वें बहुतेक सारखींच असतात, म्हणून भिन्न पंथांच्या लोकांच्या धर्मांचा अभ्यास केल्यास त्यांच्याबद्दल आदर वाटून, धर्माधर्मांतील भेद नाहीसे झाले नाहीत तरी परस्परांबद्दल सहानुभूती वाटते. म्हणून लिंगायत लोकांच्या धर्मांचा कर्नाटकांत काम करणाऱ्यांनी अभ्यास करावा." असा खुलासा टिळकांनी केला. यावरून त्यांच्या बुद्धीचा व्यापकपणा किती होता व दूरदृष्टी कशी होती हें समजून येतें. महात्मा गांधीही हिंदुस्थानांतील हिंदू, मुसलमान, पार्शी, ज्यू, खिस्ती वगैरे निरनिराळ्या धर्मांच्या अनुयायांमध्ये सलोखा व्हावा म्हणून अशाच प्रकारचा उपदेश करीत असतात. परधर्मांच्या अभ्यासाने परस्परांत आदरबुद्धी उत्पन्न होऊन आपल्या धर्मांबद्दल तुलनात्मक प्रकाराने श्रद्धा जास्ती वाढते असा स्वानुभव ते सांगतात. महाराष्ट्रांतील टिळकांचे अनुयायी म्हणवून घेणारे कित्येक माझे मित्र गांधींच्या या मताची थट्टा करीत असतात, हें मला माहीत आहे. त्यांनी टिळकांनी मला जो उपदेश केला त्याचें रहस्य ध्यानांत आणावें.

### *भाषेबाबत राष्ट्रीय दृष्टी*

गुर्लहोसूरच्या भाषणांत प्रारंभींच टिळकांनी "भाषेच्या दृष्टीने आम्ही मराठी लोक बाडगे आहोंत" असा उल्लेख केला. महाराष्ट्रांत मराठी भाषा प्रचलित होण्यापूर्वी बऱ्याच भागांत कानडी भाषा चालत होती, पण अलीकडे ती अजीबात नाहीशी झाल्याप्रमाणे आहे, असें ते म्हणाले, आणि या बाडगेपणाबद्दल कानडी लोकांनी आपणांला मराठींत भाषण करावें लागतें याबद्दल क्षमा करावी अशी विनंती केली. त्यामुळे श्रोत्यांत अभिमानसूचक अशा टाळ्यांचा कडकडाट झाला. या भाषेच्या बाबतींतदेखील महात्मा गांधींचें मत महत्त्वाचें आहे, म्हणून त्याचा उल्लेख येथे करणें जरूर आहे. हिंदुस्थानांत भिन्न धर्मांप्रमाणे भिन्न भाषाही आहेत, व भाषेला अनुरूप देशाचे स्वाभाविक प्रांत पडतात. (१९२० सालापासून कॉंग्रेसच्या कारभारांत भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य करून प्रांतांची वाटणी केली आहे. लो. टिळकांनीदेखील Decentralisation कमिटीपुढे हाच भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा मांडला होता.) यासाठीं हिंदुस्थानांतील कार्यकर्त्यांना सार्वत्रिक भाषा म्हणून हिंदुस्थानी, आपली प्रांतीय भाषा व इतर प्रांतांच्या भाषा आणि हें शक्य नसल्यास आपल्या प्रांताच्या शेजारीं असलेल्या प्रांतांच्या भाषा कामापुरत्या तरी अवगत असल्या पाहिजेत, असें त्यांचें सांगणें आहे. भाषाभिमानामुळे प्रांताभिमान उत्पन्न होतो ,व त्यामुळे एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला धक्का बसतो, हें अलीकडे अनुभवाला येऊं लागलें आहे. त्याचेवर गांधी सांगतात हा उत्तम उपाय आहे, हें आम्हीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

हल्ली येरवड्याच्या तुरुंगांत आम्हांला या गोष्टीकडे लक्ष देऊन एकांतवासाचा उपयोग या कामीं करण्यास गांधींनी बजावून सांगितलें आहे. त्याप्रमाणे आमच्या 'बी' वर्गांतील सहा मंडळीपैकी दोघांनी उर्दूच्या व तिघांनी गुजरातीच्या अभ्यासाला प्रारंभ केला आहे. कानडी-मराठी भाषेसंबंधाने टिळकांनी गुर्लहोसूरच्या भाषणांत केलेल्या या विधानाला

कर्नाटकांत बरेंच महत्त्व दिलें जातें व त्याचा उपयोग कानडी-मराठी वादांत केला जातो. केव्हांकेव्हां वादाच्या भरांत या विधानाचा दुरुपयोगही केला जातो.

### *टिळकांच्या आग्रहानें कानडी भाषा*

पेशवाईच्या अखेरींतील रणधुरंधर बापू गोखले हे चिदंबर दीक्षितांना गुरुस्थानीं मानीत व गुर्लहोसुरास त्यांचें त्या वेळीं येणेंजाणें असे. गुर्लहोसुरास आल्यावेळीं आपल्याला राहण्याला सोयीचें व्हावें म्हणून त्यांनी एक वाडाही बांधला आहे. त्याचप्रमाणे कर्नाटकांतील महाराष्ट्रीय सरदारांपैकी रामदुर्गकर भावे यांनी दीक्षितांच्या घराण्याला इनाम जमिनी दिल्या आहेत. दीक्षितांच्यापैकी एक शाखा ग्वाल्हेरीस आहे. शिंदे सरकाराकडून कांही इनाम गावें त्या घराण्याकडे चालत आहेत. गोखल्यांचा वाडा टिळकांनी पाहिला. गोखल्यांचीं कांही पत्रें दीक्षितांकडे आहेत किंवा काय याचा तपास टिळकांनी केला. तेव्हा गुर्लहोसूरपासून दोन मैलांवर असलेल्या बडली गावीं दीक्षितांच्या घराण्याची एक शाखा असून त्यांच्या संग्रहीं जुने कागदपत्र असल्याचें समजलें. बडलीकर दीक्षितांचाही आपल्या गावीं येऊन जाण्याबद्दल आग्रह होता. म्हणून टिळकांनी बडलीला जाण्याचें कबूल करून तेथील दीक्षितांना गोखल्यांचा पत्रव्यवहार असल्यास पाहण्याकरिता तयार ठेवण्यास सांगितलें. गुर्लहोसूरहून धमणी गाडींतून त्यांनी प्रवास केला. टिळक, परांजपे व मी असे तिघे एकाच गाडींत होतों. त्यामुळे बेळगावला जाईपर्यंत पुष्कळ विषयांवर बोलण्याची संधी मला मिळाली. वाटेंत बडली या गावीं बापू गोखल्यांचीं पत्रें पाहण्याकरिता दोन तास घालविले. त्या दिवशीं बैलहोंगलला मुक्काम केला.

बैलहोंगल हा गाव बेळगाव जिल्ह्यांत कापसाच्या व्यापारासंबंधाने प्रसिद्ध आहे. येथे लिंगायत लोकांची वस्ती मोठी असून त्यांच्याच हातीं त्या वेळीं सर्व व्यापार होता. लिंगायतांमध्ये व ब्राह्मणांमध्ये कोणत्याही प्रकारचे भेदभाव त्या वेळीं नव्हते. आम्ही तेथील एका श्रीमंत लिंगायत व्यापाऱ्याच्या वाड्यांतच उतरलों होतों. रात्रीं सभा झाली. टिळक, परांजपे यांना मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं. पूर्वीं एकट्या टिळकांनाच मानपत्र देण्याचें तेथील मंडळींनी ठरवलें होतें. हें टिळकांना समजतांच परांजपे यांना सोडून आपणा एकट्यालाच मानपत्र देणें शिष्टाचाराला सोडून होतें, असें टिळकांनी मला कळवलें. म्हणून परांजपे यांनाही मानपत्र देण्यांत आलें. यावरून बरोबरीच्या माणसाबद्दल टिळक किती सूक्ष्म रीतीने पाहात असत याचा मला धडा मिळाला. रात्रीं सभेंत टिळक व परांजपे यांनी लहानच भाषणें केलीं. समाज कानडी जाणणाऱ्यांचाच होता व भाषांतर करून सांगणारे कोणी मिळाले नाहीत; यामुळे खेड्यापाड्यांतून आलेल्या हजारो लोकांची निराशा झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. हें पाहून टिळकांनी मला कानडींत भाषण करण्यास सांगितलें. मराठींत भाषणें करून मला सभाधीटपणा थोडासा आला होता; पण कानडींत भाषण करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता; म्हणून भाषण करण्याचें धैर्य मला होईना. पण टिळकांनी आग्रहच केला व "मन मोकळें करून वाटेल तें बोला पण कानडींत भाषण

झालेंच पाहिजे" असें निक्षून सांगितलें. त्यामुळे माझा नाइलाज झाला व माझ्या अशुद्ध कानडीचें प्रदर्शन करण्याचा माझ्यावर प्रसंग आला. तथापि जमलेल्या खेड्यांतील लोकांची भाषा व माझी भाषा यांत बरेंच साम्य असल्यामुळे माझें भाषण त्यांच्यावर परिणाम करण्यासारखें झालें. माझ्या भाषणांत टिळकांच्या भाषणाचा सारांश सांगण्याचा प्रयत्न करीत असतां त्यांत माझ्या पदरचें तिखटमीठ, मसाला वगैरे बरेंच मिसळलें गेलें. तेव्हा-पासून खेड्यापाड्यांतून जेथे मराठी समजत नसे तेथे कानडींतून मी भाषणें करूं लागलों.

## *वीरनवालीवरील अत्याचार*

बैलहोंगलच्या मुक्कामांत टिळकांना 'केसरी'चा ताजा अंक मिळाला. त्यामध्ये पंजाबमध्ये वीरनवाली नावाच्या एका हिंदू स्त्रीवर मूर नावाच्या एका ॲंग्लोइंडियनाने बलात्कार केल्याची हकीकत आली होती. ती वाचून टिळकांना अतिशय असमाधान वाटून रात्रीं झोप चांगली लागली नाही. पहाटेला ते जागत बसलेले पाहून "झोपत कां नाही?" असें मीं त्यांना विचारलें. तेव्हा "केसरी वाचलात काय?" म्हणून मला त्यांनी प्रश्न केला. मीं 'होय' असें उत्तर दिलें. तेव्हा "वीरनवालीची हकीकत वाचून आपल्याला एक प्रकारची चीड आली व त्यामुळे निवांत झोप लागेना" असें त्यांनी सांगितलें. कोठली व कोण वीरनवाली आणि कोठे व कोण टिळक! पण हिंदुस्थानांतील एखाद्या असहाय्य स्त्रीवर उन्मत्तपणाने बलात्कार केला जातो याचा संताप होऊन अतिशय थकलेल्या स्थितींतदेखील टिळकांना झोप आली नाही. या एका लहानशा उदाहरणावरूनदेखील टिळकांच्या देशाभिमानाची कल्पना किती जाज्वल्य व तीव्र होती याचें स्पष्ट चित्र मला पाहावयाला मिळालें. एका दीन गरीब स्त्रीला एवढ्या आत्मीय भावनेने पाहणारे पुढारी संबंध हिंदुस्थानांत किती असतील, असा विचारही माझ्या मनांत आला. हिंदुस्थानांतील लोकांच्या अब्रूबद्दल, त्यांच्या गरिबीबद्दल, त्यांच्या सर्व प्रकारच्या हीनदीन स्थितीबद्दल पुढाऱ्यांमध्ये एकात्मता उत्पन्न झाल्याखेरीज राष्ट्राचें काम त्यांच्या हातून यशस्वी रीतीने होणार नाही, ही कल्पना आज माझ्यामध्ये अनुभवाने दृढमूल झाली आहे. पण तिचा उगम बैलहोंगलास टिळकांच्या त्या दिवसाच्या वृत्तीमुळे झाला. दुसरे दिवशींदेखील त्यांनी परांजप्यांशीं भाषण करतांना दोनचार वेळां वीरनवालीसंबंधाने उल्लेख करून आपल्या लोकांच्या दैन्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें.

बैलहोंगलहून आम्ही मुरगोडास तेथील नाईक यांच्या आग्रहावरून गेलों. मुरगोड हा गाव पूर्वी रंगाबद्दल प्रसिद्ध असून तेथे चिटें, जाजमें वगैरे उत्तम प्रकारचीं होत असत. तो धंदा आता बुडाला आहे. परदेशी रंगाचाच जिकडे तिकडे प्रवेश झाला आहे. जुन्या पद्धतीने रंग तयार करणारे कोणी तेथे आहेत किंवा नाहीत याचा तपास टिळकांनी केला. एकदोन म्हातारे माहीतगार त्या वेळीं त्यांना मिळाले. त्यांनी आपली पूर्वीची रंग करण्याची पद्धत सांगितली. सभेचें काम आटोपल्यानंतर बेळगाव जिल्ह्याच्या कलेक्टरचा मुक्काम त्या वेळीं तेथेच होता असें आम्हांला समजलें. माझी व त्यांची

ओळख थोडीशी होती. हें टिळकांना समजल्यानंतर "आपण भेटीला येतों" असें पत्र लिहून कळवण्याबद्दल त्यांनी मला सांगितलें. त्याप्रमाणे मीं पत्र लिहिलें. कलेक्टरचें नाव वी. ए. ब्रँडन असें होतें. माझ्या पत्राला त्यांचें उत्तर आलें व तीनचारच्या दरम्यान टिळक आले तर आपल्याला अतिशय आनंद होईल असें त्यांनी कळवलें. टिळक, परांजपे व मी असे आम्ही तिघेही तंबूवर गेलों. साहेब वाट पाहातच बसले होते. त्यांच्या टेबलावर टिळकांचीं 'ओरायन' व 'आर्क्टिक होम ऑफ द वेदाज' हीं पुस्तकें होतीं. रीतीप्रमाणे मीं, टिळक व परांजपे यांची ओळख करून दिली. ब्रँडन हे न्यायप्रिय होते, पण फार उद्दाम असावेत, असा माझा ग्रह झाला होता. पण टिळकांशीं बोलतांना त्यांनी फारच नम्रता व अदबी दाखवली. राजकारणासंबंधाने एक अक्षरही न काढतां टिळकांच्या पुस्तकांबद्दल त्यांनी बरेच प्रश्न विचारले. विषय शास्त्रीय असून गहन आहे, असें कलेक्टर म्हणाले, तेव्हा कित्येक वर्षांच्या अभ्यासाने व विचाराने हीं विधानें मीं केलीं आहेत असें टिळकांनी सांगून साधारणपणें एक तासपर्यंत अगदी सोप्या भाषेंत त्यांनी विषय समजावून दिला व त्यांचा निरोप घेतला. वाटेंत टिळक म्हणाले, "वस्ताद दिसतो. राजकारणासंबंधाने एक शब्द न काढतां, मतभेद होण्यासारखा विषय त्याने टाळला. आणि मला जो प्रिय विषय व ज्यासंबंधाने वादविवाद होण्यासारखा नव्हता, अशा विषयावर बोलणें करून शिष्टाचार सांभाळला."

मुरगोडहून बेळगावला गेलों व तेथेही सभा होऊन "राष्ट्रीय शिक्षण" या विषयावर भाषणें वगैरे झालीं.

गुर्लहोसूरच्या मुक्कामापासून त्यांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा होताच. रा. हणमंत रामकृष्ण पागे (पुढे हे रा. ब. झाले) यांची योजना झाली होती.

गुर्लहोसूरच्या मुक्कामांत किर्लोस्कर यांचे एक आप्त श्रीधर हरी खेर यांची व माझी ओळख झाली होती. यांची व टिळकांची ओळख होती. टिळक गुर्लहोसूरला येणार म्हणून त्यांच्या व्यवस्थेकरिता हे गृहस्थ मुद्दाम आले होते. माझा व टिळकांचा ऋणानुबंध बराच आहे, असें त्यांना या वेळीं वाटलें असावें. म्हणूनच त्यांनी आपल्या विलक्षण धाडसाने व युक्तीने कोल्हापूर प्रकरणीं निरपेक्षपणाने माझा बचाव करण्याचा प्रयत्न केला. ही हकीकत पुढे येणार आहे.

### *बेळगावांत शिवाजी-उत्सव*

टिळक बेळगावहून गेल्यानंतर इंग्रजी सहाव्या व सालच्या वर्गांतील प्रबुद्ध मुलांकरिता मीं एक वर्ग काढला होता. त्या वर्गात मॅझिनीचें चरित्र व त्याच्या लेखांतील उतारे मी शिकवीत असें. हायस्कूल व मिशन स्कूल मिळून ७५-१०० विद्यार्थी येत असत. मुलांच्या शिक्षणापेक्षा त्यांच्याशीं आपला संबंध यावा व आपले विचार त्यांना कळावेत हाच हेतू हा वर्ग काढण्यांत होता. कांही विद्यार्थी आमच्या अगदी नादीं लागले होते. सभांत, मिरवणुकींत व इतर सार्वजनिक

कामांत त्यांचा उपयोग होत असे. स्वयंसेवकांची म्हणून त्या वेळीं कायमची एखादी संस्था नव्हती, म्हणून अशा होतकरू विद्यार्थ्यांचा उपयोग करून घ्यावा लागत असे.

महाराष्ट्रप्रमाणे शिवाजी-उत्सव बेळगावास करावा अशी कल्पना मनांत आली. पण तो उत्सव सार्वजनिकपणें करण्याइतकें धैर्य व साधनें आमच्याजवळ नव्हतीं. म्हणून तो आम्ही गोविंदराव याळगी यांच्या घरच्या अंगणांत मांडव घालून करीत असूं. पुढे या उत्सवाला मोठें स्वरूप येऊन मारुतीच्या देवालयांत तो सार्वजनिकपणें होऊं लागला. व अद्यापिही होत असतो.

### कलकत्त्याची कॉंग्रेस व टिळक

१९०६ च्या कलकत्ता कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान टिळकांना द्यावें, असा कांही बंगाली गृहस्थांचा विचार होता. वंगभंगाच्या चळवळीला टिळकांनी पूर्ण पाठिंबा दिल्यामुळे नागपूरपासून दक्षिणेंत थेट गदग-विजापूरपर्यंत चळवळ जोरांत आली होती. त्या वेळीं स्वदेशी व बहिष्कार चळवळीला बंगालच्याबाहेर टिळकांइतका कोणीही पुरस्कार करणारा मिळाला नव्हता. त्यामुळे बंगाल्यांत टिळकांची लोकप्रियता बरीच वाढली होती. म्हणून टिळकांना अध्यक्षस्थान देण्याची कल्पना निघून वर्तमानपत्रांतून या बाबतींत जोराचे लेख येऊं लागले. पण टिळक हे जहालांचे अध्वर्यू व त्यांच्या हातीं कॉंग्रेसची सत्ता गेल्यास कॉंग्रेसचें धोरण जहाल होणार, असें नेमस्त पुढाऱ्यांना वाटूं लागलें. ही आपत्ती टाळण्याकरिता त्या नेमस्त मंडळीकडून दादाभाई नौरोजींचें नाव अध्यक्षपदाकरिता सुचविण्यांत आलें. दादाभाईबद्दल सार्वत्रिक पूज्यभाव होता व त्यांच्या नावाला कोणाकडून विरोध येणार नाही अशी खात्री होती, म्हणून त्यांचें नाव सुचविण्यांत आलें. इतर कोणत्याही पुढाऱ्याचें नाव सुचविलें गेलें असतें, तर टिळकांनाच बहुमत मिळालें असतें, असें वाटल्यावरूनच फेरोजशहा वगैरे मंडळींनी ही युक्ती काढली. दादाभाईंचें नाव पुढे आल्याबरोबर सर्वत्र मान्यता मिळाली. दादाभाई त्या वेळीं इंग्लंडांत होते व बरेच वृद्ध झाले होते. तरी हिंदुस्थानावर आणीबाणीचा प्रसंग होता हें जाणून त्यांनी अध्यक्ष होण्याचें मान्य केलें. बंगालच्या फाळणीमुळे खुद्द बंगाल्यांत तर चळवळीला जोर आलाच होता; पण इतर प्रांतांतूनही या चळवळीचे धक्के कमीअधिक प्रमाणावर बसत होतेच. त्यामुळे कलकत्त्याच्या कॉंग्रेसला बरेंच महत्त्व आलें होतें. महाराष्ट्रांत व बंगाल्यांत स्वदेशी चळवळीबरोबर राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ चालू झाली होती. बहिष्कार या शब्दाची व्याप्ती केवळ विलायती मालापुरतीच न राहतां इतर ब्रिटिश मालापर्यंत जाऊन पोहोचूं लागली होती. १९०५ सालीं काशी येथे गोखले यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रीय सभेंत बंगालच्या चळवळीला पाठिंबा देण्याचा ठराव जरी मंजूर झाला होता, तरी 'बहिष्कार' हा ब्रिटिश मालापुरताच असावा, त्या शब्दाचा अर्थ यापेक्षा जास्ती व्यापक असूं नये, असा नेमस्त मंडळींचा कटाक्ष होता. बंगाल्यांत अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, अश्विनीकुमार दत्त वगैरे

मंडळींनी वंगभंगाच्या चळवळीचे निमित्ताने उत्पन्न झालेल्या जागृतीला व्यापक स्वरूप देऊन राष्ट्राचें स्वातंत्र्यच राष्ट्राच्या जिवंतपणाचें खरें लक्षण आहे या मुद्द्यावर जोर देण्याला प्रारंभ केला होता. त्यामुळे देशांत एक नवें चैतन्य आलें होतें: पुष्कळ तरुण या नवीन कल्पनेने भारून गेले होते. कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये कामाच्या मामुली पद्धतीला फाटा मिळून नवीन दिशा लागणार, अशीं चिन्हें दिसत होतीं.

कलकत्ता काँग्रेसला येण्याबद्दल मला टिळकांनी पत्र लिहून कळवलें. माझ्या मनांत जाण्याचें होतेंच. टिळकांचें पत्र येतांच निश्चय ठाम झालें व मी कांहीं माझ्या मित्रांसमवेत कलकत्त्याला निघालों. कर्नाटकांतील इतर जिल्ह्यांपेक्षा बेळगाव जिल्ह्यांतून या काँग्रेसला जास्ती प्रतिनिधी गेले होते असें मला आठवतें. कलकत्त्यास महाराष्ट्राचे व कर्नाटकाचे प्रतिनिधी एकाच जागेंत उतरले होते. टिळक, दास यांच्या घरीं होते. आम्ही उतरलेल्या ठिकाणीं जहाल व मवाळ या दोन्ही पक्षांचे प्रतिनिधी होते. त्यामुळे दररोज कडाक्याचे वादविवाद होत असत. टिळक पक्षाची मंडळीच जास्ती होती. इतर प्रांतांतील पुढारी आम्ही उतरलेल्या ठिकाणीं येऊन भाषणें करीत असत.

एक दिवस मद्रासचे कृष्णस्वामी आयर आले होते. ते नेमस्त पुढाऱ्यांत मोडत होते. त्यांनी एक तडफदार भाषण करून महाराष्ट्रीय प्रतिनिधींवर बरीच छाप पाडली अशी समज झाली. आमच्या बाजूने भाषण करणारा कोणी जाडा पुढारी आला नव्हता, त्यामुळे प्रतिनिधींत थोडी चलबिचल झाल्याप्रमाणे मला वाटलें. माझ्याने राहवेना म्हणून मी तडक टिळकांकडे गेलों. टिळक बंगालच्या पुढाऱ्यांबरोबर आपल्या पक्षातर्फे जे ठराव मांडावयाचे होते त्याचा मसुदा तयार करण्यांत गुतले होते. दहापंधरा मिनिटें वाट पाहिल्यानंतर मी त्यांच्याजवळ गेलों व हळूच "कांही सांगावयाचें आहे" असें बोललों. त्याबरोबर थोडे बाजूला येऊन "काय सांगावयाचें आहे?" असें त्यांनी मला विचारलें. मीं झालेली हकीकत कळविली व "महाराष्ट्रांतील प्रतिनिधींत थोडा बुद्धिभेद झाल्याप्रमाणे मला दिसतो. याकरिता आपल्या बाजूच्या कोणा तरी मोठ्या पुढाऱ्याला पाठवा अथवा आपणच थोडा वेळ येऊन जा," असें मीं सांगितलें. टिळक थोडे हसले व "तुम्ही जा. मी येणार आहें असें तेथे सर्वांना कळवा. माझीं माणसें मला माहीत आहेत. कांही काळजी करूं नका." असें बोलले. मी तेथून आमच्या बिऱ्हाडीं आलों व टिळक भाषण करण्याकरिता येणार आहेत असें प्रसिद्ध केलें. त्यामुळे सर्व मंडळी आतुरतेने वाट पाहात बसली. इतक्यांत टिळक आले व त्यांनी जमलेल्या मंडळीपुढे अर्धाएक तास भाषण करून आपल्यातर्फे येणाऱ्या ठरावांची माहिती करून दिली. टिळकांच्या भाषणाचा परिणाम त्यांच्या अपेक्षेप्रमाणे झाला व मंडळींत खूप उत्साह आला. नेमस्त मंडळी थोडी हिरमुसल्यासारखी झाली. टिळकांनी निघतांना माझ्याकडे पाहात हसतहसत "झालें तुमचें काम?" असें म्हटलें व पुन्हा दासांच्या बंगल्याकडे ते गेले. पण जातां जातां "पुन्हा कांही गडबड झाल्यास मला कळवा" असें म्हणाले.

या वेळीं माझी व नाशिकचे बाबासाहेब खरे यांची ओळख झाली. त्यांचें नाव मीं

पूर्वी ऐकलें होतें. पण त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचा प्रसंग आला नव्हता. त्यांची कळकळ व उत्साह पाहून मला आनंद वाटला व त्यांची जास्ती ओळख व्हावी अशी इच्छा झाली.

काँग्रेसचीं सर्व सूत्रें आपल्याच धोरणाने चालवींत एवढ्याच हेतूने टिळकांना मागे सारून दादाभाईंना अध्यक्षस्थान देण्याचा नेमस्तांनी घाट घातला होता. तरी दादाभाई हे निःपक्षपातीपणाने व सनदशीर मार्गाने चालणारे असल्याने फिरोजशहा मेथांची दंडेली फारशी चालली नाही. बहुमताला अनुसरून जे ठराव पास व्हावयाचे होते ते पास झाले. टिळकांच्या व बंगालच्या पुढाऱ्यांच्या वाटाघाटींत जो मसुदा तयार झाला होता त्याचप्रमाणे ठराव मंजूर झाले. याच ठरावांना पुढे राष्ट्रीय पक्षाची चतुःसूत्री असें नाव देऊन लोकजागृती एक वर्षपर्यंत जहाल पक्षाने अखंड चालवली. ही चतुःसूत्री म्हणजे स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण. यांत महत्त्वाच्या विषयासंबंधाचा ठराव स्वराज्यावरचा होता. पण तो स्वतः दादाभाईंनीच आपल्या भाषणांत उचलून धरल्यामुळे तो बिनआयासाने मंजूर झाला. बाकी ठरावांसंबंधाने बरीच चर्चा झाली आणि फिरोजशहा व त्यांचे कट्टर अनुयायी यांच्या मनाविरुद्ध ते पास झाले. त्यामुळे फेरोजशहा वगैरे मंडळींनी दादाभाईंना अध्यक्ष नेमण्याची जी युक्ती योजली होती ती त्यांच्याच अंगावर आली.

यापूर्वी मी चारपाच काँग्रेसना हजर होतों. पण केवळ प्रेक्षक या नात्यानेच तटस्थ वृत्तीने पाहात असें. या १९०६ सालच्या काँग्रेसमध्ये खासगी चर्चेत मीं बराच भाग घेतला होता व आपल्या पक्षाकडे बहुमत करण्याची खटपट केली होती.

याच वर्षी टिळकांचें 'नव्या पक्षाचीं तत्त्वें' (Tenets of the New Party) या विषयावर एक फारच मुद्देसूद व ओजस्वी भाषण झालें होतें. टिळकांच्या पश्चात् व गांधींच्या हातीं काँग्रेसचीं सूत्रें गेल्यापासून गांधींच्या असहकार (non-co-operation) व (civil disobedience) सविनय कायदेभंग या चळवळींच्या तत्त्वावर वेळींअवेळीं हल्ला चढवणारे कित्येक टिळकांचे अनुयायी आहेत हें प्रसिद्धच आहे. टिळक ह्यात असते तर त्यांनी गांधींच्या या चळवळीला हाणून पाडलें असतें, अशा प्रकारचीं निश्चयात्मक विधानें त्यांच्या तोंडून वारंवार ऐकूं येतात. गांधींच्या चळवळीच्या बुडाशीं असलेल्या तात्विक विचारांची टिळकांनी त्या वेळीं जरी गांधींच्या पद्धतीने चर्चा केली नसली, तरी नवीन पक्षाच्या तत्त्वांचें स्वरूप कोणत्या प्रकाराचें होतें व खरी परिणामकारक चळवळ करावयाची झाल्यास कोणत्या मार्गाचें अवलंबन करणें जरूर आहे या गोष्टींची त्यांची रूपरेखा ध्यानांत आल्यावाचून राहात नाही. टिळक ह्यात असते तर त्यांनी कोणतें धोरण स्वीकारलें असतें, या वादाचा निःपक्षपातीपणाने पाहिल्यास कसा निकाल लागला असता, हेंही स्पष्ट दिसण्यासारखें आहे. हें भाषण मीं अनेक वेळां काळजीपूर्वक वाचलें आहे. माझ्या संबंधाने बोलावयाचें म्हणजे १९२० सालीं गांधींनी पुरस्कारलेल्या नव्या चळवळींत भाग घेण्याला जीं अनेक कारणें झालीं त्यांत टिळकांचें हें भाषण हें एक प्रमुख कारण होतें.

## टिळकांची व माझ्या वडिलांची भेट

यांप्रमाणें १९०६ साल हें माझ्या आयुष्यांत बऱ्याच धामधुमीचें गेलें व त्यामुळे मला एक नवीन वळण मिळालें. माझ्या धंद्याकडे माझें दुर्लक्ष होणें स्वाभाविक होतें. महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांतून माझें नाव वरचेवर येऊं लागलें. पोलिसांच्या रिपोर्टांवरून माझ्याबद्दल स्थानिक अधिकाऱ्यांच्या मनांत साशंकबुद्धी उत्पन्न झाली. या सर्व गोष्टी वडिलांना समजल्या. आरंभींआरंभीं त्यांनी माझ्या या सर्व गोष्टींची उपेक्षा केली. चार लोकांच्या तोंडून माझ्या संबंधाच्या गैर व युक्त गोष्टी ऐकून त्यांना बरेंही वाटलें असावें. पण पुढेपुढे जसें माझें सर्वच लक्ष सार्वजनिक कामाकडे लागत चाललें आहे असें दिसलें व त्याचा परिणाम काय होईल याची कल्पना येऊं लागली, तेव्हा मला दोन गोष्टी सांगून मला परावृत्त करण्याचें त्यांच्या मनांत आलें. मला लागतील त्याप्रमाणे पैशाचा पुरवठा करून व माझे सर्व लाड पुरवून एल्‌एल्. बी.पर्यंत शिक्षण देण्यांत त्यांचा मला कोणती तरी सरकारी मोठ्या हुद्द्याची व पगाराची जागा मिळावी हा मुख्य हेतू होता. पण तें मला पटत नाही असें जेव्हा त्यांना कळून आलें, तेव्हा निदान मन लावून मीं वकिली करून चार पैसे व लौकिक मिळवून घरींच राहावें, ही कल्पना त्यांच्या मनांत आली. पण वकिली सुरू केल्यानंतर थोड्याच काळांत तिकडेही मी दुर्लक्ष करूं लागलों, इतकेंच नव्हे तर ज्या कामांत धोका आहे त्या कामाकडेच विशेष लक्ष घालूं लागलों, म्हणून एक प्रकारें त्यांची माझ्याबद्दल थोडी निराशा झाली आणि माझ्यावर सरकारची इतराजी होऊन कांही तरी अनिष्ट प्रसंग ओढवेल असें त्यांना वाटूं लागलें. या स्थितींत त्यांनी या बाबतींत माझ्याजवळ गोष्ट काढली. पण त्यांच्या बोलण्यांत रागापेक्षा भीतीचाच अंश जास्ती प्रमाणांत होता आणि मला नाखूष करावयाचें नाही हेंही त्यांनी आपल्या मनाशीं ठरवलें होतें. सरकारच्या दडपशाहीचें स्वरूप अलीकडे ज्याप्रमाणे तीव्र झालें आहे त्याप्रमाणे तेव्हा नव्हतें. तथापि राजद्रोहाचे कांही खटले मधून-मधून होत असत. त्यामुळे त्यांना माझ्याबद्दल काळजी वाटणें साहजिक होतें. मीं त्यांचें बोलणें संथपणें व नम्रभावाने ऐकून घेतलें; व मी करीत होतों त्यांत गैर कांही नव्हतें, व भाषणें वगैरे जास्ती सावधगिरीने करीत जाईन, असें सांगून त्यांचें समाधान करण्याचा मीं प्रयत्न केला. पण त्यांचें समाधान झालें नाही. तेव्हा "मी टिळकांना जाऊन भेटतों व माझी सर्व हकीकत कळवून त्यांचा सल्ला घेतों. नंतर त्यांच्या सांगण्याप्रमाणे तरी तूं वागशील की नाही?" अशा अर्थाचा प्रश्न करून मला त्या वेळीं वडिलांनी निरुत्तर केलें. थोडा वेळ विचार करून टिळक व आपण मिळून जें ठरवाल त्याप्रमाणे मी वागेन असें मीं कळवलें.

त्यानंतर कांही कामाकरिता वडिलांना मुंबईस जावयाचें होतें. येतेवेळीं पुण्यास उतरून त्यांनी टिळकांची भेट घेतली. आपल्या तर्फेची सर्व हकीकत ऐकून टिळक मला सार्वजनिक कामांतून परावृत्त करून वकिली करतां करतां शक्य तितकी फावल्या वेळीं देशसेवा मीं करीत राहावें असा सल्ला देतील, अशी वडिलांची खात्री

होती. पण टिळकांनी माझें स्वतःचें मत काय आहे हें माझ्या वडिलांकडून विचारून घेतल्यानंतर माझी स्थिती सर्व प्रकारें अनुकूल असल्यामुळे मीं सार्वजनिक कामाला पूर्णपणें वाहून घेणेंच योग्य आहे असा सल्ला दिला. "वकिली करून फावल्या वेळीं सार्वजनिक कामें करण्याची वेळ निघून गेली असून सर्वस्वी त्या कामालाच वाहून घेणाऱ्या लोकांची आता आवश्यकता आहे" असें त्यांनी आमच्या वडिलांना पटवून दिलें. त्यामुळे वडिलांचा नाइलाज झाला. वेळगावला परत आल्यानंतर त्यांनी पुण्याची सर्व हकीकत मला सांगितली व शेवटीं माझ्या इच्छेवर सर्व सोपविलें. पुढे कांही दिवसांनी माझा विचार काय ठरला असें जेव्हा त्यांनी विचारलें, तेव्हा मीं टिळकांच्या मार्गानें राजकारणांत भाग घेण्याचें ठरवल्याचें त्यांना कळवलें. "तुझ्या मर्जीप्रमाणे कर. पण काम जोखमीचें आहे. टिळकांसारख्या मोठ्या मनुष्याचा जास्ती संबंध येण्याचा संभव आहे. याकरिता कामाला धक्का न लावतां व टिळकांसारख्याला कमीपणा येईल असें वर्तन न करतां तुला जें करावयाचें तें कर" असें सांगून एक ग्राम्य पण अर्थपूर्ण म्हण म्हणून दाखवली. ती अशी : 'बिकट काम करना नहीं. करे सो डरना नहीं. जान गया तो × × गया.' माझें व वडिलांचें एकमत झाल्याबद्दल मला समाधान वाटून कामाला जास्ती उत्साह आला.

पुढे सहासात वर्षें ते हयात होते. त्या अवधींत माझ्यावर कोल्हापूर प्रकरणासारखें भयंकर प्रकरण आलें तरी त्यांनी न डगमगतां वेळोवेळीं योग्य सल्ला देऊन मदत केली. स्वतंत्र रीतीनें पैसा मिळविण्याचें माझें साधन बहुतेक खुंटल्याप्रमाणे झालें होतें. तरी माझ्या कामाला त्यांनी प्रसंगविशेषीं पैशांचाही पुरवठा केला. यानंतर पुढे मरणापर्यंत माझ्या कामाबद्दल गैरपसंती दाखवून मला कधीच त्यांनी निरुत्साही केलें नाही. माझ्याशीं अगदी बरोबरीच्या नात्यानें वागून माझ्या तोंडून सार्वजनिक कामाची माहिती मोठ्या आतुरतेनें ते ऐकून घेत व मलाही योग्य सल्ला देत. आमची सांपत्तिक स्थिती साधारण मध्यमवर्गाचीच होती. घरचें कुटुंब मोठें नव्हतें. त्यामुळे प्रपंचाचा भार विशेष होता असें नाही. तरी प्रपंचाच्या दगदगीपासून निर्धास्तपणें राहतां येईल अशीही स्थिती होती असें नाही. वडिलांनी बराच पैसा जमिनी मिळवण्यांत व दुरुस्त वगैरे करण्यांत घातला होता. दुसरा व्यापारउद्योग कांही नव्हता. जमिनीचें उत्पन्न थोडेंबहुत निश्चित असलें तरी व्यापाराप्रमाणे अधिक फायद्याचें नसतें. मीं वकिली करून प्रपंचाचा भार अंगावर घेतला असता तर वडिलांना बरीच मदत झाली असती. अशा स्थितींतदेखील वडिलांनी केव्हाही माझ्यामागे प्रपंचाची दगदग लावली नाही. १९०६ नंतर तर प्रपंचाची मला विवंचना राहूं नये म्हणून त्यांनी जास्ती दक्षता घेतली. माझ्या पाहण्यांत माझ्या ओळखीचे बरेच स्नेही असे आहेत की, त्यांच्या मनांतून सार्वजनिक कामें करण्याची हौस असूनसुद्धा सांपत्तिक अननुकूलतेमुळे किंवा घरच्या माणसांच्या विरोधामुळे त्यांना कांही करतां येत नाही. माझी स्थिती या दोन्ही बाबतींत मला अनुकूल अशीच होती व तिचा मीं यथाशक्ती फायदा घेतला.

प्रकरण आठवें

# चळवळीचें वाढतें उग्र क्षेत्र

### *सामान्य जनतेशीं संपर्क*

आतापर्यंत साधारणपणें हायस्कुलांत व मिशन स्कुलांत अभ्यास करणाऱ्या पांढरपेशा वर्गांतील प्रबुद्ध विद्यार्थ्यांशीं आमचा संबंध आला होता. पण यानंतर गोविंदराव याळगी यांनी मराठे, शिपी, वगैरे मागासलेल्या म्हणून समजल्या जाणाऱ्या जातींतील तरुण मंडळींत आपला प्रवेश करून घेऊन त्यांचा संग्रह करण्याची सुरुवात केली. शिवाजी-उत्सव, गणपती-उत्सव, इत्यादि सार्वजनिक उत्सवांतून त्यांना योग्य स्थान देऊन त्यांच्यामध्ये या उत्सवांच्या बाबतींत आपलेपणा उत्पन्न केला. तालमींना प्रोत्साहन देणें, कुस्त्या करवणें इत्यादिही कामें त्यांनी सुरू केलीं. या सर्व कामांकरिता त्यांना त्यांच्या पदरचा पैसा खर्च करावा लागत असे आणि त्या वेळच्या त्यांच्या उत्पन्नाच्या मानाने त्यांच्या शक्तीबाहेरच खर्च करावा लागे. तथापि ही सर्व जोखीम मोठ्या उत्साहाने त्यांनी आपल्या अंगावर घेतली होती. त्यांची काम करण्याची शक्ती व आत्मविश्वास वाढीला लागला होता. लोकप्रियताही वाढूं लागली होती. फक्त सार्वजनिक कामाचीच त्यांना हौस होती असें नाही, तर यथाशक्ती ते लोकांच्या खासगी कामांतही उपयोगी पडत असत. त्यामुळे मला त्यांचा उपयोग अतिशय होऊं लागला. फक्त सल्ला देणें, सभांतून भाषणें करणें, शिकलेल्या लोकांशीं निकट संबंध आणून त्यांचें साहाय्य मिळवणें अशांसारखींच कामें मला करावीं लागत असत. बाकी इतर सर्व कामांचा भर गोविंदराव याळगींवरच विशेष असे. ते दररोज सायंकाळीं माझ्याकडे येत असत. बरोबर दोनचार मंडळींना घेऊन येत. आम्ही सर्व मिळून खुल्या मनाने प्रचलित विषयांवर चर्चा करीत असूं व आमच्या कार्याचे बेत ठरवीत असूं. ही सार्वजनिक कामाची हौस मला लागण्यापूर्वी मी नित्य नियमाने क्लबांत दोनतीन तास तरी घालवीत असें. १९०६ नंतर माझा क्लबाचा नाद बहुतेक सुटल्याप्रमाणेच झाला. वायफळ गप्पा मारण्याचा कंटाळा

येऊं लागला. घरीं रोज मोठ्या महत्त्वाच्या गोष्टीवर गहन विचार करीत होतों असें नाही. पण या गप्पांतूनदेखील एक प्रकारची गोडी उत्पन्न होऊन नवीन नवीन लोकांचा संबंध येऊन आमच्या कार्याचें क्षेत्र वाढत चाललें. जुन्या व शिष्ट मानलेल्या मंडळींशीं तुसड्याप्रमाणे न वागतां शक्य तितकें त्याचें साहाय्य घ्यावयाचें, पण विशेष भिस्त होतकरू तरुणांवर ठेऊन कामें करण्याची पद्धत आम्हीं स्वीकारली होती. गोविंदरावांचें मन इतकें रंगलें होतें की, दोनचार दिवसांत एखादा तरी नवीन कार्यक्रम ते माझ्याकडे घेऊन येत व त्यांत भाग घेण्याला मला माझ्या मनांत नसलें तरी लावीत. त्यांच्या आस्थेपुढे व प्रेमळ स्वभावापुढे माझें कांही चालत नसे. वकिलीकडे माझें लक्ष कमी झालें होतें तरी वकिली अद्यापि पुरी सोडली नव्हती. मधूनमधून केव्हाकेव्हा कामें घेत असें. वकिली कायमची सोडून सार्वजनिक कामालाच वाहून घ्यावें, अशी माझी इच्छा पूर्वीपासून होतीच. पण वकिलीच्या पैशांतून आपल्याला सार्वजनिक कामाला मदतही करतां येण्यासारखी असेल तितकी करावी, हा मोहही कधीच गेला नव्हता. पण गोविंदरावांच्या प्रेरणेने या मोहांतूनही मुक्त झालों. पैशाच्या जबाबदारींतून त्यांनी मला बऱ्याच अंशीं मुक्त केलें. त्यामुळे मला वकिली करण्याची आवश्यकताही भासू दिली नाही. जरूर पडल्यास वडील मदत करतील अशी मला खात्री होती व त्याप्रमाणे ते करीतही असत.

### *मद्यपानप्रतिबंधक चळवळीस प्रारंभ*

१९०७ सालीं मद्यपानप्रतिबंधाच्या चळवळीला महाराष्ट्रांत जोर आला होता. टिळकांच्या प्रोत्साहनाने पुण्यांत दारूदुकानावर पिकेटिंग करण्याचा कार्यक्रम चालू झाला होता. बेळगावास हाच कार्यक्रम हातीं घेण्याचें आम्हीं ठरवलें व त्याप्रमाणे स्वयंसेवक तयार करून कामाला प्रारंभ केला. दारूच्या दुकानांतून बहुतेक सायंकाळीं पाचपासून रात्रीं नऊपर्यंत गर्दी असते. म्हणून हीच वेळ आम्हीं पिकेटिंगकरिता ठरवली. शहरांत व लष्करांत मिळून तेव्हा सहा दुकानें होतीं. या सर्व दुकानांवर पिकेटिंग चालू केलें. गोविंदराव याळगी, मी, हणमंतराव देशपांडे, लाड, वगैरे दहाबारा मंडळींनी स्वयंसेवकांवर देखरेख ठेवण्याचें काम पत्करलें होतें. पिकेटिंगवरच सर्वस्वीं अवलंबून न राहतां आळीआळींतून पंचांच्यामार्फत सभा भरवीत होतों आणि लोकांकडून दारू न पिण्याच्या प्रतिज्ञा व शपथ घेत होतों. या कामीं भीमराव पाटील व लाड यांचें आम्हांला फार साहाय्य झालें. हे दोघेही या व्यसनांत गुरफटलेले होते. पण ही चळवळ निघाल्यानंतर त्यांनी व्यसन सोडलें व आम्हांला मनापासून मदत केली. हें पाहून लोकांनाही आश्चर्य वाटलें. मराठे लोकांत पाटलांचें वजन असल्यामुळे व जातीच्या पंचायतींत वगैरे त्यांनाच विशेष महत्त्व असल्यामुळे आमच्या कार्याला बरेंच यश येऊं लागलें. शेतकरी लोकांच्या हातीं रोकड पैसा नेहमी नसतो. त्यामुळे दारूचें व्यसन त्यांच्यामध्ये कमी

प्रमाणांत असतें. पण गवंडी, सुतार, लोहार, विणकरी वगैरे रोजमजुरीने धंदा करणाऱ्यांच्या हातांत पैसा खेळत असल्याने अशा लोकांत हें व्यसन जास्ती असतें. हें आम्हाला आढळून आल्यानंतर याच लोकांत आम्हीं जास्ती जोरांत कामाला सुरुवात केली. अशा लोकांची वस्ती बेळगावच्या कामतगल्लींत जास्ती आहे व तेथे राहणारे लोकही जास्ती व्यसनाधीन होते. म्हणून हीच आळी आम्हीं प्रथम घेतली. खासगी चर्चा करून, व्याख्यानें देऊन, इतर रीतीने मन वळवून या आळींतील अट्टल दारूबाजांची दारू आम्हीं सोडवली. या कामांत आम्हांला त्यांच्या घरच्या बायकांचेंही साहाय्य मिळत असे. या आळींतील लोकांनी दारू सोडली अशी प्रसिद्धी झाली व त्यांतील प्रमुखच आमच्याबरोबर कामाला येऊं लागले, त्यामुळे बाकीच्या आळींतील काम सुसाध्य झालें आणि पूर्वी सुरुवातीला हा फक्त पोरखेळ चालला आहे अशी जी कांहींची समजूत होती ती जाऊन या कामाला चांगलें स्वरूप आलें. दारू-मक्तेदारांनी अधिकाऱ्यांपाशी तक्रारी करण्यास सुरुवात केली. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट नी गोविंदराव याळगी यांना बोलावणें पाठवलें व त्यांची तरतरी वगैरे पाहून त्यांना धमकी वगैरे कांही न देतां तुमचें वय लहान आहे, दारूबाज लोक दंगेखोर असतात, कदाचित तुम्हांला मारतील, म्हणून तुम्ही या फंदांत पडूं नका, कामकरी लोक श्रमाने थकून जातात त्यांना कांही तरी उत्तेजक पेयाची जरुरी भासते म्हणून ते पितात, व सरकारने दारू महाग करून ती गरिबांच्या शक्तीबाहेर केल्यामुळे लोक फार पीत नाहीत, म्हणून या चळवळीची आवश्यकता नाही, वगैरे सामोपचाराच्या गोष्टी सांगून त्यांना परत पाठवलें. आपल्या सुरक्षिततेबद्दल सरकारी अधिकाऱ्यांना काळजी करण्याचें कारण नाही, कोणावर जुलूम न करतां सामोपचाराने मन वळवण्यांत दंगाधोपा होण्याचा संभव नाही, असें सांगून गोविंदरावही निघून आले. खरोखर आमचा अनुभवही असाच होता. आमच्या विनवणीला धिक्कारून दारूच्या दुकानांत गेल्याचें उदाहरण क्वचितच घडलें असेल.

पुण्यास पिकेटिंग करणाऱ्यांवर खटले होऊं लागले. लोकांना दंडाच्या शिक्षा झाल्या. बेळगावासही तोच प्रकार होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. मला व माझ्याबरोबर काम करणाऱ्या पांचसहा लोकांना डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटाने नोटिसा काढून कचेरीला बोलावलें व ही चळवळ अशीच चालू ठेवल्यास सक्त उपायांची योजना करण्यांत येईल, अशी धमकी देण्यांत आली आणि पुढे लवकरच क्रि. प्रो. कोडच्या १४४ कलमाप्रमाणें दारूच्या दुकानाच्या आसपास ५० यार्डांपर्यंत पिकेटिंग करूं नये अशा अर्थाच्या नोटिसा लावण्यांत आल्या. अर्थात या नोटिसा मोडण्यांत आल्या. बऱ्याच स्वयंसेवकांवर खटले भरण्यांत आले व दंडाच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. पुण्यास दंडाच्या शिक्षा देण्यांत येत असत, व दंडही भरला जात असे. ही दंडाची रक्कम स्वतः टिळकांना भरावी लागत असे आणि त्या पायीं त्यांना चार हजार रुपयांवर खर्च आला असें आम्हीं ऐकलें होतें. बेळगावास जेव्हा दंडाची सुरुवात झाली त्या वेळीं दंड भरावा किंवा नाही याबद्दल आम्हीं वाटाघाट केली. पहिल्याच दिवसाच्या खटल्यांतील दंडाची रक्कम पांचशेंवर जात होती. कांही

व्यापारी लोकांनी स्वयंस्फूर्तीने ही रक्कम देण्याचें कबूल करून माझ्याकडे त्यापैकी बरीच रक्कम जमाही केली. पण दंड न भरतां दंडाच्या बदलीं दिलेली कैदेची शिक्षा भोगणें जास्ती श्रेयस्कर असें आम्हांला वाटलें. परंतु खुद्द ज्यांना दंड झाला होता त्यांचा विचार घेतला नसल्यामुळें आम्हीं नक्की कांही ठरवलें नाही. त्यांना विचारून काय तें ठरवावें असें ठरल्यामुळे मी आरोपींना भेटण्याकरिता कोर्टात गेलों. सर्वांनी संतोषाने दंड न भरतां शिक्षा भोगण्याचें कबूल केलें. त्या दिवशीं गावांत मोठी गडबड उडाली. पुढे दररोज खटले भरण्यांत येऊं लागले व स्वयंसेवक तुरुंगांतही जाऊं लागले. दुसरे किंवा तिसरे दिवशीं खुद्द गोविंदरावांवर ही पाळी आली व त्यांनाही दंडाची शिक्षा झाली. त्यांनी दंड भरला नाही. त्यांच्या दुकानीं जाऊन दंडाची रक्कम सहज वसूल करितां आली असती. पण लोकांना दहशत बसवण्याकरिता पोलिसांनी तसें न करितां गोविंदरावांना तुरुंगांतच पाठवलें. कोर्टापासून तुरुंगापर्यंत हातकड्या घालून त्यांना चालतच नेण्यांत आलें. त्यामुळे लोकांना चीड आली व पिकेटिंगला जास्ती जोर आला. पुढे मॅजिस्ट्रेटनी फक्त दंडाचीच शिक्षा देण्याला सुरुवात केली व दंडाची रक्कमही कमी कमी होऊं लागली. त्यामुळे पिकेटिंगच्या बाबतींत आम्हीं स्वीकारलेल्या मार्गाचा जय होत आहे अशी आम्हांलाही आशा वाटूं लागली. पण कांही उच्छृंखल वृत्तीच्या तरुणांनी दुकानांत शिरून दारूचीं पिंपें फोडलीं व कित्येकांनी दारूच्या दुकानांत जाणाऱ्या लोकांना एकीकडे नेऊन मार देण्यास सुरुवात केली. एका तरुणाने तर एका दुकानाला आग लावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या चळवळींचा व्यवस्थितपणा मोडूं लागला व चळवळीचीं सूत्रें आमच्या हातून जाऊं लागलीं. दोनचार लोकांना कडक शिक्षा झाल्या. त्यामुळे ही चळवळ मागे पडली. पण या वेळीं शिक्षा झालेल्या कांही लोकांनी १९२१ सालच्या असहकारितेच्या चळवळींत व सन १९३०-१९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेऊन बंदिवास पत्करला.

बेळगावच्या पिकेटिंगमध्ये दंड झालेल्या लोकांनी दंड न भरतां तुरुंगवास पत्करला, ही गोष्ट टिळकांना कळल्यानंतर त्यांनी मला एक पत्र लिहिलें व बेळगावकरांचें अभिनंदन केलें. त्या वेळच्या 'केसरीं'तही एक अभिनंदनपर स्फुट आलें असावें असें मला आठवतें.

या स्वयंसेवकांत महाराष्ट्रांत वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे प्रचारक म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले महादेवशास्त्री दिवेकर हेही एक होते व त्यांनाही दंड झाला होता. दंडाच्या बदलीं शिक्षा त्यांना झालेली नसल्यामुळे तुरुंगवासाचा लाभ त्यांना लाभला नाही. याच सुमारास माझी व त्यांची ओळख झाली आणि ती पुढे वाढत जाऊन तिचें पर्यवसान स्नेहांत झालें. लोकांची दारू सोडण्याच्या कामीं पुढाकार घेतांना ज्या कांही व्यक्तींनी स्वतः दारू पिण्याचें सोडलें होतें त्यांपैकी कित्येक प्रमुख लोकांनी वर्ष-सहा महिन्यांतच पुन्हा पिण्यास सुरुवात केली. दारू पिणें हा आमच्या गुरुमार्गांतील एक आवश्यक विधी आहे, अशी सबबही कित्येकांनी सांगून आपल्या वर्तनाचें समर्थन करण्याला आरंभ

केला. त्यामुळे बंधन तुटल्याप्रमाणे होऊन चळवळीचा पाय मोडल्याप्रमाणे झाला. तथापि कित्येक प्रसिद्ध अट्टल दारूबाजांनी त्यावेळीं जी दारू सोडली ती कायमचीच सोडली अशीं उदाहरणेंही अनेक आहेत. त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारून ते हल्ली चांगल्या सुखांत आहेत. एवढा तरी फायदा आमच्या पदरांत या वेळच्या चळवळीपासून पडला.

### *स्वदेशी चळवळीचा आढावा*

त्याचप्रमाणे विलायती कापडावरचा बहिष्कार बराच यशस्वी झाला. पुण्यास ही चळवळ कांही नवीन नव्हती. पुण्यामध्ये सार्वजनिक काकांच्या वेळेपासून स्वदेशीला प्रारंभ झाला होता, त्याला बंगालच्या फाळणीमुळे जोर आला, इतकेंच. पण आमच्याकडे १९०५-१९०६ पूर्वी स्वदेशीबद्दल अनास्था होती असें म्हटलें तरी चालेल. पण बंगालच्या चळवळीमुळे स्वदेशीचें बीज पेरलें गेलें व तेव्हापासून कमीअधिक जोराने ही चळवळ चालूच आहे. १९२० सालापासून खादीच्या चळवळीला प्रारंभ झाला. त्या चळवळींतही खादीची उत्पत्ती व खप या दृष्टीने बेळगाव जिल्ह्याची कामगिरी कमी नाही.

१९०७ सालीं सुरतेच्या कॉंग्रेसपूर्वी पांचसात वेळां मी पुण्याला गेलों असेन. पुण्यांत जाण्याचा मुख्य हेतू टिळकांना भेटावें, त्यांच्याशीं बोलावें व त्यांचा परिचय वाढावा हाच होता आणि तो बराच सिद्धीला गेला. खुद्द बेळगावास व बेळगाव जिल्ह्यांत चालू असलेल्या कामाबद्दल टिळकांना समाधान होत असल्याचें त्यांच्या बोलण्यावरून मला वाटलें. याच वेळीं चित्रशाळेचे वासूकाका, कृष्णाजीपंत खाडीलकर, तात्यासाहेब केळकर या मंडळींचाही जास्ती परिचय झाला. शिवरामपंतांच्याकडेही वासूकाकांबरोबर मी दोन तीन वेळां गेलों असेन.

### *कॉंग्रेस नागपूरहून सुरतेला कां नेली ?*

१९०६ सालीं कलकत्याच्या कॉंग्रेसच्या वेळीं १९०७ सालची कॉंग्रेस नागपूर येथे भरवण्याचा ठराव पास झाला होता. पण नागपुरास आणि मध्यप्रांताचा मराठी भाग व वऱ्हाड यांत टिळकांचें व राष्ट्रीय पक्षाच्या मंडळींचें वजन जास्ती असल्यामुळे कलकत्ता कॉंग्रेसपुढे नागपूरच्या कॉंग्रेसचें पाऊल पडेल अशी फेरोजशहा मेथा वगैरे नेमस्त पुढाऱ्यांना शंका येऊं लागली. तेव्हा स्वागत कमिटी आपल्याच लोकांच्या हातीं राहावी असें त्या पक्षाच्या मंडळींना वाटूं लागलें. त्याप्रमाणे त्यांनी प्रयत्नही चालवला. उलट बाजूने डॉ. मुंजे, अच्युतराव कोल्हटकर, अळेकर, अभ्यंकर वगैरे मंडळींनी नेमस्त लोकांना विरोध करून कॉंग्रेसची सर्व व्यवस्था आपल्या पक्षाच्या मंडळींच्या हातांत ठेवण्याची तयारी केली. त्यामुळे स्वागत मंडळाच्या सभा शांतपणें होईनात. बहुमत आपल्या बाजूचें होत नाही अशी खात्री झाल्यानंतर, कलकत्ता कॉंग्रेसने मंजूर केलेले ठराव फिरवून पुन्हा कॉंग्रेसची गाडी जुन्या नेमस्त पद्धतीच्या

रुळावर आणण्याचा बेत फिसकटणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागतांच नेमस्त पुढाऱ्यांनी नागपूरला कॉंग्रेस न भरवतां सुरतेस कॉंग्रेस भरवण्याचा घाट घातला. राजकीय दृष्ट्या गुजरात प्रांत त्या वेळीं अगदी सुप्त स्थितींत होता असें म्हणण्यास कांही हरकत नाही. गोकुळदास पारेखसारखे कांही गुजराती लोक राजकारणांत भाग घेत असत. पण ते मुंबईसच राहणारे असल्यामुळे प्रत्यक्ष गुजरातेंत चळवळ नव्हतीच म्हटलें तरी चालेल. शिवाय मुंबईची गुजराती मंडळीदेखील फेरोजशहांच्याच तंत्राने चालत असत. म्हणून नागपुराहून सुरतेस कॉंग्रेस नेण्याचा विचार ठरला. अशी जागा बदलल्याबद्दल पुष्कळ वादविवाद व चर्चा चालत होती. कलकत्त्यास दादाभाईंना अध्यक्षस्थान देऊन टिळकांचा काटा काढण्याची युक्ती सफल झाली. पण, नागपुरास असें होणें शक्य नव्हतें. स्वागत मंडळींत टिळक पक्षाच्या लोकांचेंच बहुमत झालें असतें आणि नागपूरच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान टिळकांनाच मिळाला असता. हें नेमस्त पुढाऱ्यांना सहन कसें होणार? म्हणूनही मुंबई इलाख्यांत आपल्याच वजनाखाली असलेल्या सुरत शहरांत कॉंग्रेस भरवण्याचा घाट घालण्यांत आला. ज्या इलाख्यांत कॉंग्रेस भरते त्या इलाख्यांतील मनुष्याला अध्यक्ष निवडावयाचा नाही, असा कॉंग्रेसचा प्रघात आहे. म्हणून सुरतेस कॉंग्रेस भरवल्यास आपोआप टिळकांचा अध्यक्ष होण्याचा प्रश्न मागें पडतो, हें जाणून फेरोजशहा वगैरे मंडळींनी हें कारस्थान रचलें असावें. निदान आमची समजूत तरी अशी झाली. पण सुरतेच्या कॉंग्रेसच्या पूर्वी लाला लजपतराय यांची सुटका झाल्यामुळे त्यांना सुरतेच्या कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान द्यावें, अशी सूचना राष्ट्रीय पक्षाकडून होऊं लागली. लालाजींचा स्वार्थत्याग, त्यांची कामगिरी, व त्यांची तुरुंगवासांतून नुकतीच झालेली मुक्तता यामुळे त्यांना बाजूला सारून दुसऱ्या पुढाऱ्याचें नाव पुढे झाल्यास लोकांना रुचणार नाही असें नेमस्तांना वाटूं लागलें. त्यांच्या तर्फे कलकत्त्याचे सुप्रसिद्ध वकील डॉ. रासबिहारी घोष यांचें नाव पुढे आलें होतें. टिळकांनी 'केसरी'त या अध्यक्षपदाच्या वादावर जोराचे लेख लिहिले. ठिकठिकाणीं सभा भरून लालाजींनाच अध्यक्ष निवडण्याबद्दलच्या सूचना तारांनी जाऊं लागल्या आणि लालाजींकरिता रासबिहारींनीही आपलें नाव मागे घ्यावें अशी त्यांनाही विनंती करण्यांत आली. बेळगाव शहरांत व जिल्ह्यांत आम्हीं सभा भरवल्या. पण गोखल्यांच्या सांगण्यावरून आयत्या वेळीं लालाजींनी आपण अध्यक्ष होण्याला तयार नाही असें जाहीर केलें. लालाजींकडे टिळकांचा निरोप गेला होता, पण या सर्व भानगडीमुळे सुरतेच्या कॉंग्रेसला बरेंच महत्त्व आलें होतें. दोन्ही पक्षांच्या सामर्थ्याची कसोटी पाहण्याचा हा प्रसंग होता. म्हणून दोघांहीकडून आपापलें बहुमत करण्याच्या बाबतींत खूप तयारी चालली होती. प्रत्येक जिल्ह्याचे किती प्रतिनिधी असावेत यासंबंधाने कांही नियम त्या वेळीं नव्हते. फक्त जाहीर सभा भरवावयाच्या व त्यामध्ये प्रतिनिधींच्या निवडणुकी करावयाच्या अशी पद्धत असे. टिळकांनी मला एक पत्र लिहून सुरतेला होतां होईल तितके जास्ती प्रतिनिधी बेळगावहून घेऊन येण्याबद्दल कळवलें होतें. त्याप्रमाणे आम्हीं

बऱ्याच तरुण मंडळींनी जाण्याची तयारी केली. कॉंग्रेसला पूर्वीपासून जाणारी वृद्ध मंडळीही तयार झाली. ही मंडळी जरी जुनी होती तरी त्यांचा ओढा टिळकांकडेच होता. 'जहाल-मवाळ' हा वाद सुरू झाल्यापासून बेळगावला कांही विशेष कार्य होत होतें असें नाही. पण 'मवाळांचें' प्रस्थ तेथे केव्हाच नव्हते. १९०६पासून कांही मंडळींनी प्रयत्न केला पण त्यांना कधीच यश आलें नाही आणि बेळगाव जिल्ह्याची 'जहाल' जिल्ह्यांतच गणना होऊं लागली.

## सुरतेची इतिहासप्रसिद्ध कॉंग्रेस

सुरतेस राष्ट्रीय पक्षांतील लोकांना उतरण्याकरिता गावांत निराळी जागा केली होती. तेथेच्च सर्व तरुण मंडळीनिशी मी उतरलों. जुनी मंडळी कॉंग्रेस-कॅंपकडे उतरण्याकरिता गेली. टिळकही गावांतच होते. त्यामुळे त्यांच्याकडे जाण्यायेण्याला आम्हांला सोयीचें होतें आणि त्यांच्या बिऱ्हाडीं काय गोष्टी चालतात हेंही समजत असे. त्यांच्या बिऱ्हाडावर जाण्याला किंवा त्यांना भेटण्याला मला मज्जाव नव्हता. टिळकांच्या मंडळींत मी एक कार्यकर्ता आहें अशी बहुतेक महाराष्ट्रांत माहिती झाली होती. टिळकांच्या बिऱ्हाडीं नानासाहेब देशमुख, बाबासाहेब पेंडसे, दादासाहेब खापर्डे, वगैरे प्रमुख मंडळी होती. बाबासाहेब पेंडसे हे बऱ्या सरकारी अधिकाराच्या नोकरींतून मुक्त होऊन पेन्शनींत गेले होते. तरी ते सुरतेसारख्या आणीबाणीच्या कॉंग्रेसकरता येऊन उघडपणें टिळकांच्या बरोबर राहात होते, हें पाहून मला आश्चर्य वाटून त्यांच्याबद्दल आदर वाढला.

कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्ये राष्ट्रीय पक्षाच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चार विषयांवरील ठरावांत बदल करण्याचा नेमस्त पुढाऱ्यांचा बेत होता. हे ठराव जशाचे तसेच पास करवून घेण्याची हमी नेमस्त पुढाऱ्यांनी न दिल्यास कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या सुरुवातीसच स्वागत मंडळाच्या अध्यक्षाचें भाषण झाल्यानंतर व अध्यक्षाच्या निवडणुकीचा ठराव मांडण्यापूर्वी राष्ट्रीय पक्षातर्फे एक ठराव मांडण्याचा विचार राष्ट्रीय पक्षाने निश्चित केलेला होता. राष्ट्रीय पक्षाच्या सभा दररोज भरत असत व टिळकांचीं भाषणें होत असत. समेट करण्याबद्दल टिळकांनी आटोकाट प्रयत्न केला; पण त्यांच्या प्रयत्नाला यश आलें नाही. राष्ट्रीय सभेच्या आदल्या दिवशीं राष्ट्रीय पक्षाला अनुकूल किती प्रतिनिधी आहेत याचा आकडा नक्की करण्याबद्दल टिळकांनी सांगितल्यावरून मी व आणखी दोनचार मंडळींनी मिळून यादी तयार केली. तीवरून आमच्या पक्षांत आठशेपेक्षा तरी कमी प्रतिनिधी नव्हते असें दिसून आलें. आमच्या पक्षाचें हटकून बहुमत झालेंच असतें असें जरी निश्चित सांगतां आलें नसतें तरी ही संख्या कांही कमी नव्हती. एवढें प्रचंड मत आपल्या बाजूला आहे असें टिळकांना समजल्यानंतर त्यांनी पूर्वी ठरल्याप्रमाणे अध्यक्षाची सूचना होण्यापूर्वी मांडण्यांत येणारा ठराव आपणच मांडण्याचें निश्चित केलें. सुरतेच्या

स्थानिक नेमस्त मंडळींनी गुंड आणून ठेवले होते आणि टिळकांनी किंवा त्यांच्या पक्षातर्फे कोणीं कांही ठराव वगैरे मांडल्यास तसें करूं न देतां वेळ आल्यास दंडेली करून राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष वगैरे निवडण्याचें काम जबरदस्तीनें पार पाडावयाचें, असा बेत त्यांनी केल्याच्या बातम्या होत्या. तेव्हा राष्ट्रीय पक्षातर्फे जो ठराव मांडावयाचा तो स्वतः टिळकांनी न मांडतां आमच्या पक्षांतील माझ्यासारख्या कोणीं तरी एकानें मांडल्यास बरें होईल, अशी सूचना मीं टिळकांना खासगी रीतीनें केली. मनांत हेतू हा होता की, टिळक स्वतःच जर ठराव मांडण्यास प्लॅटफॉर्मवर गेले व गुंडांकडून कांही अत्याचार झाला तर टिळकांच्या प्रतिष्ठेला कमीपणा येण्याचा संभव होता तो येऊं नये.

पण टिळकांनी ही गोष्ट मान्य केली नाही. आपला ठराव मांडण्याचा प्रसंग आल्यास तो आपल्याशिवाय दुसऱ्यानें मांडणें योग्य नाही, त्याचा परिणाम कांही होवो, त्याबद्दलची सर्व जबाबदारी माझ्यावरच मीं घेतली पाहिजे, अशा अर्थाचें उत्तर त्यांनी दिलें. टिळकांच्या मनांत राष्ट्रीय सभा मोडावयाची होती, म्हणून त्यांनी कांही तरी भांडणाला निमित्त काढलें, असा त्यांच्यावर आरोप करण्यांत येतो. पण त्या वेळीं ज्या गोष्टी मीं पाहिल्या व टिळकांच्या वर्तनाचें मी जें निरीक्षण करीत होतों त्यावरून, राष्ट्रीय सभेपासून फटकून राहण्यांत आपल्या पक्षाचा कांहीच फायदा न होतां राष्ट्रीय सभेंतील फुटीमुळे आपल्या पक्षाचें व देशाचें एकंदरींत नुकसान होण्याचाच संभव अधिक असें टिळकांचें मत असावें, असें मला वाटतें. त्यांनी समेटाबद्दल केलेल्या प्रयत्नांची कोणत्याही प्रकारें नेमस्तांनी डाळ शिजूं दिली नाही व त्यांच्याशीं अगदी बेपर्वाईचें वर्तन केलें, त्यामुळे त्यांचा नाइलाज झाला. बंगाल्यांत जो नवीन राष्ट्रीय पक्ष होता त्या पक्षाचें धोरण मात्र प्रथमपासूनच राष्ट्रीय सभेंत फूट पडली तरी हरकत नाही, पण ती आपल्याच तंत्रांत असली पाहिजे असें होतें. आमच्यापैकी कित्येक तरुणांना असेंच वाटत होतें व यापैकीच मीही एक होतों. आम्हांला त्या वेळीं टिळक हे नेमस्तांपेक्षा जास्ती जहाल आहेत असें वाटत नव्हतें. लोकांचें बळ अजमावून पुढे पाऊल टाकावयाचें, पण लोकांचें पाऊल पुढे पडावें म्हणून आपण कांही तरी करून दाखवावयाचें, असें मानणाऱ्यांपैकी टिळक नाहीत, असें आम्हांपैकी कित्येकांना त्या वेळीं वाटलें. अर्थात ही आमची चूक होती. पण चळवळीचा क्षोभ त्या वेळीं इतका जोरांत होता की, तरुणांना त्या वेळीं टिळक हे देशाला मागे खेचतात असें वाटूं लागलें. नेमस्तांनी त्या वेळीं थोडे मागे घेतलें असतें अथवा टिळकांबरोबर सभ्यपणानें वागण्याची वृत्ती किंचित् जरी दाखवली असती तर टिळकानी सुरतेस घडलेला प्रसंग येऊं दिला नसता, असें मला अद्यापि वाटतें.

### अधिवेशनाचा पहिलाच दिवस

कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशीं काय प्रकार घडला हें प्रसिद्धच आहे. मंडपांत पोलिसांनी येऊन शांतता स्थापित केली व मंडप ताब्यांत घेतला. कांही मंडळींना पोलीस ठाण्यावर नेण्यांत आलें, त्यांत आमच्या

प्रांताचे श्रीनिवासराव कौजलगी हे होते. कांही वेळ टाण्यांत बसवून नंतर सर्वांना सोडण्यांत आलें. टिळकांना कांही मार वगैरे बसला नव्हता हें एका परीनें बरें झालें. जर त्यांना चुकून जरी थोडासा मार बसला असता तर मोठा दंगा झाला असता. मंडपांतील बखेडा शांत झाल्यानंतर टिळक बिऱ्हाडीं परत आले. त्यांच्याबरोबर शंभरदोनशे मंडळी होती; त्याच दिवशीं किंवा दुसरे दिवशीं लाला लजपतराय टिळकांना भेटावयाला आले होते. त्या वेळीं "तुम्ही गडबड करून मी अध्यक्ष होत नाही असें जाहीर केलें नसतें तर हा प्रसंग ओढवला नसता. तुम्हांला रीतसर कोणीं विचारलें असतें तर नाही होय म्हणणें हें योग्य होतें. पण तुम्हांला अध्यक्ष निवडण्याची सूचना परस्पर वर्तमानपत्रांतून होत असतां तुम्हाला मध्ये पडून मी अध्यक्ष होण्याला कबूल नाही असें जाहीर करण्याची आवश्यकता नव्हती." वगैरे आशयाचे उद्गार टिळकांच्या तोंडून निघाले. त्या वेळीं लालाजींनी आपल्या लक्षांत सर्व गोष्टी आल्या नाहीत असें मान्य केलें. पण उपयोग काय ?

## बॅ. बॅप्टिस्टा आणि टिळक

राष्ट्रीय सभेंत बखेडा झाल्याबरोबर आपल्यावर सरकार कांही तरी किटाळ आणल्याशिवाय राहणार नाही असें टिळकांना वाटलें आणि त्याप्रमाणे त्यांनी बोलूनही दाखवलें. सुरतेची राष्ट्रीय सभा मोडण्याबद्दल कोणाला जबाबदार धरावें, यासंबंधाने जोरांत वाद सुरू झाला व दोन्ही पक्षांच्या वर्तमानपत्रांतून चर्चा सुरू झाली. मुंबईचे बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांचा कोणत्याही पक्षाशीं संबंध नव्हता. यापूर्वी टिळकांची व त्यांची ओळखही नव्हती. तरी त्यांनी साधकबाधक प्रमाणें देऊन टिळकांचें वर्तन अगदी कायदेशीर होतें, असें एका लेखांत प्रसिद्ध केलें. तेव्हापासून टिळकांचा व त्यांचा संबंध आला आणि तो टिळकांच्या मरणापर्यंत टिकून राहिला. माझी व बॅप्टिस्टांची ओळख टिळकांवरील सन १९०८ सालच्या खटल्यापासून झाली. पुढे माझा व त्यांचा बराच ऋणानुबंध वाढत गेला आणि तो त्यांच्या मरणापर्यंत म्हणजे १९३० सालपर्यंत टिकला. १९२१ सालीं गांधींच्या हातीं राष्ट्रीय सभेच्या राजकारणाचीं सूत्रें आलीं. बॅप्टिस्टा हे तेव्हापासून राष्ट्रीय सभेंत नव्हते. त्यांना गांधींचें धोरण मान्य नव्हतें. आणि तें मला मान्य होऊन त्यांत मी प्रामुख्याने भागही घेऊं लागलों तरी आमच्या स्नेहांत अंतर आलें नाही. मुंबईला मला त्यानंतर जाण्याचे अनेक प्रसंग येत. प्रत्येक वेळीं मी त्यांना भेटावयाला जात असें व भेटल्या वेळीं चारचार तासपर्यंत आमचा वादविवाद होत असे. टिळकांच्या हयातींत टिळकांचे अनुयायी म्हणवून घेणाऱ्या व त्यांच्या धोरणानें काम करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी बहुतेकांनी बॅप्टिस्टाला सोडल्याप्रमाणे केलें होतें. आणि 'केसरी'सारख्या पत्रांतून 'एकांडा शिलेदार' म्हणून त्यांच्यावर टीकाही आली होती. टिळकांच्या अनुयायांनी आपल्याला एकीकडे टाकल्याबद्दल त्यांना वाईटही वाटत असे.

## ‘राष्ट्रमत’ पत्राचा जन्म

सुरतेहून परत आल्यानंतर कांहीं दिवस वादांतच गेले. इतक्यांत बिहारच्या मुझफरपूर शहरीं बाँब उडून दोन इंग्रज बायांचे खून झाले. यानंतर ‘केसरीं’त बाँबसंबंधाने लेख आले. त्यावरून टिळकांवर राजद्रोहाबद्दल खटला भरण्यांत येऊन त्यांना अटक करण्यांत आली. त्या वेळीं मुंबईस टिळकांच्या प्रोत्साहनाने एक मराठी दैनिक पत्र काढण्याचें ठरून त्याची सर्व तयारी झाली होती. टिळकांना अटक झाल्यानंतर दैनिक पत्र सुरू झालें. त्याचें नाव ‘राष्ट्रमत’ होतें.

टिळकांचा खटला हायकोर्टपुढे निघण्याच्यापूर्वी कांही दिवस मी मुंबईस खटल्याकरिता व त्यांना भेटण्याकरिता गेलों होतों. खटल्याचा निकाल होईपर्यंत तेथेच होतों. दोनतीन वेळां त्यांना तुरुंगांत व हायकोर्टांत भेटलों. एका भेटींत त्यांनी नवीन निघालेल्या ‘राष्ट्रमता’कडे लक्ष देण्याबद्दल मला सांगितलें. आणि यामुळेच माझा व ‘राष्ट्रमता’चा संबंध आला.

या मुक्कामांत ‘राष्ट्रमत’ निघत होतें त्याच इमारतींत एका मजल्यावर कोल्हापूरचे गणपतराव मोडक राहात असत त्यांच्या घरीं मी उतरलों होतों. गणपतराव मोडक हे ‘राष्ट्रमत’ पत्राच्या संपादक वर्गांतील होते.

## टिळकांवरील खटला

हायकोर्टांत खटल्याला प्रारंभ झाल्या दिवसापासून दररोज मी खटला ऐकण्याकरिता जात असें. त्या वेळीं टिळकांचें धैर्य व त्यांची बुद्धिमत्ता यांची छाप माझ्यावर बरीच दृढमूल झाली. आणि अशा थोर मनुष्याच्या सहवासांत काम करण्याचें भाग्य मला लाधलें याबद्दल धन्यता वाटली. खटल्याच्या निकालाच्या वेळीं जज्ज दावर यांनी टिळकांना उद्देशून अंतःकरणाला झोंबण्यासारखे जे उद्गार काढले त्याबद्दल मला चीड आली. आज मी ज्या स्थितींत आहें तिजहून त्या वेळची माझी स्थिती व भावना भिन्न असल्यामुळे दावरला कोणीं चांगलें प्रायश्चित्त दिल्यास तें यथायोग्य होईल असें मला वाटलें. टिळकांना ज्यूरीने दोषी ठरवल्यानंतर “In spite of the verdict of the jury, I maintain that I am innocent. There are higher powers to govern the destiny of man and the cause I represent may prosper more by my suffering than by my remaining free.” हे टिळकांच्या तोंडचे शब्द ऐकून व त्या वेळचा त्यांचा आविर्भाव पाहून टिळक हे त्या वेळीं योगारूढ स्थितींत आहेत असें माझ्याप्रमाणे पुष्कळांना वाटलें असावें. सुरतेच्या काँग्रेसमध्ये आपली सूचना मांडण्याकरिता टिळक प्लॅटफार्मवर गेल्यानंतर “मला उचलून नेल्याखेरीज मी येथून हालणार नाही” असें म्हणून ते आपल्या उजव्या हाताने डावा बाहू व डाव्या हाताने उजवा बाहू घट्ट धरून उभे राहिले होते. त्या वेळचें त्यांच्या तोंडावरील तेज व

हायकोर्टातील वरील शब्द उच्चारतांना त्यांच्या चेहऱ्यावर झळकलेलें तेज हीं माझ्या मनांतून केव्हाही जाणार नाहीत. माझ्यावरही तुरुंगांत जाण्याचे जेव्हा जेव्हा प्रसंग आले तेव्हा तेव्हा, किंवा इतर संकटांचे वेळीं, मला टिळकांची आठवण होते आणि या दोन्ही प्रसंगांच्या वेळचा टिळकांचा चेहरा माझ्यासमोर उभा राहतो.

रात्रीं टिळकांना शिक्षा झाल्यानंतर कोर्टांत हजर असलेल्या टिळकांच्या सर्व स्नेह्यांना अतिशय वाईट वाटलें. माझ्या डोळ्यांतून दहा मिनिटेंपर्यंत पाणी जात होतें. माझ्या-प्रमाणेच अनेकांची स्थिती झाली. खटला संपल्यानंतर पंधरावीस दिवसपर्यंत मी मुंबईसच होतों. काका पाटील व बॅप्टिस्टा यांच्याबरोबर दररोज पुढील कार्याबद्दल चर्चा करीत होतों. पण टिळकांना शिक्षा झाल्यापासून तो टिळक परत येईपर्यंत, मधल्या सहा वर्षांच्या काळांत राष्ट्रीय पक्षाची विसकटलेली घडी पुन्हा बसली नाही. सुरतेला बखेडा झाल्यापासून १९१६ सालीं बेळगावच्या प्रांतिक परिषदेंत निर्णय घेईपर्यंत राष्ट्रीय पक्षाच्या मंडळींचा कॉंग्रेसमध्ये प्रवेश झाला नव्हता. सुरतेची कॉंग्रेस मोडल्यानंतर पुन्हा नागपुरास १९०८ सालीं कॉंग्रेस भरवण्याचा प्रयत्न झाला. पण सरकारच्या दडपशाहीच्या धोरणामुळे तो सिद्धीला गेला नाही.

### जहालांची निष्क्रियता

१९१३ सालीं वेळवी यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यास प्रांतिक सभा भरली होती. त्या सभेला मुंबई इलाख्यांतील राष्ट्रीय पक्षाची मंडळी जमली होती. पण संघटनात्मक व विधायक स्वरूपाचें कोणतेंही कार्य झालें नाही. या सहा वर्षांत मामुली सभा किंवा गणपती-उत्सवासारखे उत्सव याशिवाय राष्ट्रीय पक्षाकडून विशेष कामगिरी झाली नाही. राष्ट्रीय पक्षाचा कांटा जरी नेमस्तांनी राष्ट्रीय सभेंतून काढून टाकला होता तरी नेमस्तांच्या हातूनही कांही महत्त्वाचें कार्य झालें नाही. बहुजनसमाजाचा त्यांना पाठिंबा नसल्यामुळे त्यांच्याकडून भरवण्यांत आलेल्या राष्ट्रीय सभांच्या अधिवेशनांत कांहीच राम राहिला नव्हता. त्यामुळे राष्ट्रीय सभेबद्दल जिकडे-तिकडे उदासीनता दिसत होती. बंगाल्यांतही सरकारचें धोरण उग्र दडपशाहीचें झाल्यामुळे तिकडील तरुण पक्षांतील बहुतेक कार्यकर्ते तुरुंगांत डांबले गेले. जुन्या पुढाऱ्यांपैकी बरेच पुढारी स्वस्थ बसले व कित्येकांनी कॉंग्रेसमध्ये आपला प्रवेश करून घेतला. तेथे क्रांतिकारक पक्षाची मात्र त्या वेळीं स्थापना झाली आणि सरकारने त्यांचीं पाळेंमुळें खणण्याची शिकस्त केली; तरी त्या कामीं त्यांना यश आलें नाही.

टिळकांना अटक झाली त्याच वेळीं 'राष्ट्रमत' पत्राची स्थापना झाली. स्वतः टिळकांनी या कामीं पुढाकार घेतला होता हें मागें सांगितलेंच आहे. प्रथम या पत्राचे मुख्य संपादक सीतारामपंत दामले हे होते, आणि त्यांचेंच नाव संपादक म्हणून नोंदलें गेलें होतें. गणपतराव मोडक हे संपादकवर्गापैकी होते. हे दोघेही पंढरपुरास होते. त्यांचें तेथे म्युनिसिपालिटीशीं पटलें नाही म्हणून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला होता. 'राष्ट्रमत'

पत्राची किंमत पाव आणा ठेवण्यांत आली होती. राष्ट्रीय पक्षाचें मराठी दैनिक हेंच प्रथमचें. शिवाय टिळकांच्या खटल्यामुळे व शिक्षेमुळे लोकांमध्ये एक प्रकारचा तीव्र असंतोष उत्पन्न झाला होता व राष्ट्रीय पक्षाचीं मतें समजून घेण्याची जनतेला तीव्र इच्छा झाली होती. या कारणाने हें पत्र फार लवकर लोकप्रिय झालें होतें व खपही बराच वाढला होता. पण हाताने चालवण्याचेंच छापावयाचें मशीन असल्यामुळे मागणीइतक्या प्रती वेळेवर निघत नसत. खप जरी वाढला होता तरी किंमत अगदीच कमी असल्यामुळे जमेपेक्षा खर्चच प्रथमपासून जास्ती होता. हें पत्र 'नॅशनल पब्लिशिंग कं. लि.' या मंडळीच्या मालकीचें होतें व अजमासें पंधरा हजार रुपये भागीदारांकडून जमले होते. रा. ब. चिंतामणराव वैद्य, अण्णासाहेब नेने वगैरे मंडळी डायरेक्टर्समध्ये होती. माझा या कंपनीशीं किंवा पत्राशीं मूळपासून कांहीच संबंध नव्हता. फक्त टिळकांच्या खटल्याच्या वेळीं 'राष्ट्रमत' कचेरीच्या एका भागांत गणपतराव मोडक हे राहात असत व त्यांच्याकडेच त्या वेळीं मी उतरलों होतों, त्यामुळे मला त्या पत्रासंबंधाने थोडीथोडी माहिती झाली. मुख्य संपादक दामले, मोडक व सरदेसाई यांचें विशेष जुळत होतें असें मला दिसून आलें नाही. त्याचप्रमाणें खर्चासंबंधाने जितकी काटकसर असावी तितकी नव्हती, असेंही मला दिसून आलें; तथापि माझा कोणताच संबंध नसल्याने मला विशेष भानगडींत पडण्याचें कारण नव्हतें. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर महिना-दोन-महिने मुंबईस राहून मी परत वेळगावला आलों.

मुंबईस असतेवेळीं टिळकांना शिक्षा देणाऱ्या दावर जजाचा खून करण्याचे प्रयत्न चालू होते, असें माझ्या कानावर आलें होतें. हे प्रयत्न अनिष्टकारक आहेत असें मला त्या वेळीं वाटलें नाही. बंगाल्याप्रमाणे इकडेही क्रांतिकारक पक्ष स्थापन होऊन त्यामार्फत कांही अत्याचार झाल्यास सरकारच्या दडपशाहीला आळा बसेल, हीच कल्पना त्या वेळीं वातावरणांत होती. त्यामुळे दावरच्या रक्षणाकरितां सरकारने विशेष बंदोबस्त केला आहे अशाही कानावर बातम्या येत होत्या. सरकारच्या दडपशाही धोरणामुळे व राष्ट्रीय पक्षाची घडी बिघडून तरुणांपुढे विधायक कार्यक्रम नसल्यामुळे देशांतील तरुणांच्या मनांत अत्याचाराच्या कल्पना फैलावूं लागल्या होत्या. त्यांत महाराष्ट्रांत नाशिक, पुणें व कोल्हापूर येथे त्या दिशेने प्रयत्न चालू आहेत असें मीं ऐकलें होतें. बेळगावच्या कांही तरुणांत ही कल्पना उद्भवली होती; पण तिला मूर्त स्वरूप आलें नव्हतें. अशा स्थितींत पुढे काय करावें या विचारांत मी पडलों. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर त्यांच्या प्रमुख अनुयायांनी मिळून एकत्र विचार करून कांही न ठरवल्यामुळे, सगळीकडेच शिथिलता आली होती. काम करणारा मुख्य पुढारी आपल्यांतून नाहीसा झाला म्हणजे मागे राहणाऱ्यांची कशी दिङ्मूढ अवस्था होते याचा प्रत्यय मला त्या वेळीं आला. माझ्यापेक्षा जास्ती दिवस टिळकांबरोबर काम केलेल्या कांही गृहस्थांच्या भेटी घेऊन पुढे काय करावयाचें याच्याबद्दल मीं विचार केला. पण उत्तेजनकारक अशी स्थिती दिसली नाही. उलट, टिळक परत येईपर्यंत आपल्याला दबा धरूनच बसलें पाहिजे,

असेंच निराशेचे उद्गार ऐकण्याचा प्रसंग आला. टिळकांची सहा वर्षांच्या आंत सुटका व्हावी असें वाटत असल्यास, आपण कांहीच न करतां स्वस्थ बसून सर्व उद्योग सोडले आहेत असेंच सरकारला भासवलें पाहिजे, अशा अर्थाची भाषाही निघूं लागली. त्यामुळे वाईट वाटलें. पण, स्वतःच्या जबाबदारीवर कांही कार्यक्रम आखून त्याबद्दल खटपट करण्याची शक्ती किंवा आत्मविश्वास व अनुभव मला नसल्याने तडफडत बसावें लागलें. तथापि स्वस्थ बसणें शक्य नव्हतें; निदान स्वदेशीची चळवळ तरी शक्य तितक्या जोरांत चालावी अशा इच्छेने त्या दिशेने मी यथाशक्ती प्रयत्न करीत होतों.

प्रकरण नववें

# राष्ट्रमताचा 'राष्ट्रमठ'

### जे. आबासाहेब रामचंद्र

याच सुमारास जे. आबासाहेब रामचंद्र म्हणून नाव घेतलेल्या मनुष्याची व आमची गाठ पडली. आपण जातीने मराठा असून धार-देवास येथील राजघराण्याशीं आपला संबंध आहे आणि इंग्रजांविरुद्ध सशस्त्र बंड करण्याची खटपट आपण चालवली आहे, पण ही गोष्ट लवकर साध्य होण्याकरिता द्रव्यबल व मनुष्यबल आपल्याला मिळविलें पाहिजे, याकरिता देशी उद्योगधंदे काढून हीं साधनें साध्य करून घेतलीं पाहिजेत, वगैरे गोष्टी हा गृहस्थ सांगत असे. हा गृहस्थ उंच व सडपातळ असून याचे डोळे पाणीदार होते व बोलण्याचालण्यांत मोठा कुशल असे. शिवाजी-महाराजांचें प्रसिद्ध चित्र आहे त्यांत दाखवल्याप्रमाणे पोषाख वगैरे करून त्यांची ऐट आणण्याचा हा प्रयत्न करी. गोमांतकांत मडगावाजवळ एक जागा घेऊन तेथे झोपड्या बांधून हा गृहस्थ राहात असे. त्याच्याजवळ महाराष्ट्रांतील व कर्नाटकांतील तर कांही मद्रासकडील मिळून पन्नाससाठ तरुण मंडळी होती. आपल्या संस्थेंत कलाहुन्नर वगैरे अल्पकालांत शिकवले जातात, व थोड्या भांडवलावर किफायतशीर धंदे काढतां येतील अशा प्रकारचें शिक्षण दिलें जातें, अशी त्याने आपली प्रसिद्धी केली होती. मद्रासच्या 'हिंदू' पत्रांतून त्याच्यासंबंधाने कांही मजकूर प्रसिद्ध झाला होता. त्यांत त्याचा गौरवपर उल्लेख आला होता. तो अंक त्याने मला दाखवला. त्यामुळे त्याच्याविषयी माझ्या व आमच्या मंडळींच्या मनांत अनुकूल ग्रह उत्पन्न झाला. याशिवाय मोंगलाईत असलेल्या बीड गावामध्ये एक वंजारी जातीचा पाटील असून त्याच्या व त्याच्या इतर साथीदारांच्या मदतीने आपण एक बंड उभारलें होतें, पण त्यांत यश आलें नाही, आपण मोठ्या युक्तीने त्यांतून बचावलों, वगैरे मोठ्या गोष्टी रसभरित वर्णनें करून तो सांगत असे.

एकदा एखाद्या मनुष्यासंबंधाने अनुकूल ग्रह झाला व त्याच्याबद्दल पूज्यबुद्धी उत्पन्न

झाली म्हणजे त्या मनुष्याच्या सर्व सांगण्याबोलण्यावर विश्वास ठेवावा असें वाटणें हें साहजिक आहे. त्यांतून आम्ही मंडळी सर्व अननुभवी असून प्रत्येकाला आपल्या हातून कांही तरी देशसेवा घडावी अशी आतुर इच्छा होती. त्यामुळे आमच्यावर व त्यापैकी विशेष भावनाप्रधान असलेल्या गोविंदराव याळगींवर त्याची बरीच छाप पडली. आपल्याजवळ असलेल्या दोन तरुणांना त्याने बेळगावासच ठेवलें. ते दोघेही आम्हांला दररोज भेटत असत आणि मडगावची हकीकत कळवीत असत. ते तरुणही आबासाहेबांच्या तालमींत तयार झालेले असावेत; किंवा आमच्यावर जशी त्यांची छाप पडली होती तशीच त्यांच्यावर पडून तो सांगेल त्याप्रमाणे करणें व वागणें यांतच आपलें देशकार्य आहे असें प्रामाणिकपणें त्यांना वाटत असावें. आबासाहेबांच्या धैर्याची, त्यांच्या कळकळीची, मुत्सद्देगिरीची त्यांनी आमच्याजवळ मुक्त कंठाने स्तुती करण्याचा क्रम सारखा चालवला. त्याचा परिणाम आमच्यावर होऊन त्याला साहाय्य करावें असें आमच्या मनांत आलें. त्याच्याबद्दल आम्हीं मडगावच्या कांही ओळखीच्या गृहस्थांना पत्रें लिहून चवकशी केली. मडगावास आबासाहेबाने असें उत्तम बस्तान बसवलें होतें की त्याच्याविषयी जो तो अनुकूलच अभिप्राय देई. गोमांतकांत येणाऱ्या ब्रिटिश कापडावर जकात असल्याने तो माल महाग विकला जाई. सुतावर जकात नव्हती. तेव्हा ब्रिटिश मुलखांतून सूत आणवून व मडगावास माग घालून कापड तयार करण्याचा व त्याचा स्वस्त दराने गोमांतकांतील लोकांस पुरवठा करण्याचा आपला प्रयत्न असून गोवा सरकारने आपल्या प्रयत्नाकडे सहानुभूतीने पाहावें अशीही खटपट त्याने केली होती. आपल्या प्रांतांत उद्योगधंदे कमी असल्याने लोकांची स्थिती बरीच खालावलेली आहे आणि ती सुधारण्याचा हा मनुष्य उद्योग करीत आहे, अशी मडगावांतील कित्येक स्थानिक अधिकाऱ्यांची त्याने समजूत करून दिली होती. मडगावास एक वजनदार ख्रिस्ती वकील होता. त्याला इसाऱ्यादाखल कांही पैसे देऊन त्याचें मत आपल्याविषयीं त्याने अनुकूल करून घेतलें होतें. त्याच्यामार्फत तो सरकारांत आपलें वळण बांधी. इंग्रज सरकाराइतपत पोर्तुगीज सरकार धूर्त नसल्यामुळे त्याचें प्रस्थ मडगावास बरेंच वाढलें होतें. त्याचा पत्र-व्यवहार इतका वाढला होता की, दररोज निदान तीसचाळीस पत्रें येत असत व तितकींच बाहेर जात असत. बाहेर जाणाऱ्या पत्रांत मोटमोठ्या लोकांच्या नावाचे पत्ते असत. हें सर्व पाहून जाणाऱ्याला असें वाटे की, हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व मोठ्या लोकांशीं त्याचा संबंध असावा, आणि अशी लोकांची समजूत व्हावी या इच्छेने तोही आपल्या बोलण्यांत या लोकांचा उल्लेख करून त्यांचा व आपला निकट स्नेह असून परस्पराशीं पत्रव्यवहारही चालू आहे असें भासवीत असे.

मोटमोठ्या लोकांशीं याचा स्नेह असावा असें आम्हांलाही वाटलें. तेव्हा एकदा टिळकांची व त्याची ओळख आहे की काय याबद्दल त्याच्याजवळच आम्हीं प्रश्न काढला. टिळकांची ओळख आहे व त्यांच्या प्रभावळींतील कांही मंडळींचा तर चांगलाच स्नेह असल्याचें त्यांनी सांगितलें. पण टिळक व त्यांची मंडळी यांची त्याने

आमच्यापुढे यथेष्ट निंदा करून हे सर्व लोक देशभक्तीचा विनाकारण डौल मिरवणारे आहेत व आयत्या वेळीं दगा देणारे आहेत, असा त्या मंडळींवर त्याने आरोप केला. रावसाहेब या नावाचा आपला एक स्नेही होता, त्याने इंग्रजांविरुद्ध पुष्कळ तयारी केली होती; पण त्याची सर्व भिस्त पुण्याच्या टिळक वगैरे मंडळींवर होती व शेवटीं या मंडळींनी आपलें वचन पाळलें नाही, त्या कारणाने सर्व डाव अंगावर येऊन तो बिचारा प्राणाला मात्र मुकला;—असा त्याने पूर्वेतिहास सांगितला. माझा व टिळकांचा संबंध आला होता व त्यांच्या मंडळींपैकी बऱ्याच लोकांचा माझा स्नेह होता, ही गोष्ट त्याला ऐकून माहीत झाली होती. माझा व या लोकांचा स्नेहसंबंध माहीत असूनही त्यांच्याबद्दल असा कांगावा याने कां करावा याबद्दल मला त्या वेळीं थोडें चमत्कारिक वाटलें; पण त्याच वेळीं या गोष्टीचा खुलासा करून घेण्याची मला बुद्धी झाली नाही. त्याच्या बोलण्यावर आमचा इतका विश्वास होता की, कदाचित तो म्हणत असे त्याप्रमाणे टिळकांच्या मंडळींकडून वर्तन घडलेंही असावें असें आम्हांला वाटलें. अशा प्रकारें त्याचा व आमचा स्नेह वाढत चालला आणि आम्ही पूर्णपणें त्याच्या जाळ्यांत गेलों, असें त्याला दिसतांच, आपला हा सर्व कारभार चालवण्याला पैशाची टंचाई पडते असें तो सांगू लागला. आमचा त्याच्यावर इतका विश्वास वाढला होता की, मोठमोठ्या पुढाऱ्यांची व सरदार-जहागीरदार यांची इतकी ओळख असूनही याला खर्चाची अडचण कां असावी, अशी शंकादेखील आम्हांला आली नाही. आपल्यावर हैदराबाद व इंग्रज पोलिसांची करडी नजर असल्यामुळे हे लोक पैशाने हल्लीच्या स्थितींत मदत करण्याला भितात, पण प्रसंगाच्या वेळीं ते उघड आपल्याला मिळतील, असें तो केव्हाकेव्हा सांगत असे. या गोष्टीवर माझा विश्वास बसला नाही. म्हणून आम्हीं कांही पैशाची मदत त्याला केली नाही.

### जे. आबासाहेबाची मडगावची संस्था

आपला डाव असा फसला असें वाटून त्याने आम्हांला एकदा मडगावला येऊन जाण्याबद्दल आग्रहाचें आमंत्रण दिलें. आमच्या मनांतही त्याची संस्था पाहण्याचें फार दिवसांपासून होतें. म्हणून मी व गोविंदराव याळगी त्याच्याकडे एकदा गेलों. मडगावापासून मैल-दीड-मैल लांब अशा एका माळावर त्याची छावणी होती. पाचसहा झोपड्या होत्या. एका झोपडींत तो व त्याच्या 'बाईसाहेब' राहात असत. त्या मराठा मोळा पाळीत असत. त्या एका कुलीन सरदार घराण्यांतील असून आपल्या नवऱ्याबरोबर हालअपेष्टा सोसून त्याला त्याच्या देशोद्धाराच्या कामांत अहर्निश मदत करीत असतात, असेंही आम्हांला सांगण्यांत आलें. पन्नासपाऊणशे तरुण मंडळी तेथे होती. त्या सर्वांवर 'आबासाहेबांचें' वजन असून सर्व मंडळी मोठ्या भक्तीने व पुढील कार्याच्या आशेने खाण्याजेवणाचे अत्यंत हाल सोसून तेथे राहात होती असें आम्हांला दिसलें. आम्हां दोघांकरिता खुद्द 'महाराजांच्या' झोपडींतून दररोज सकाळीं चहा येत असे.

पण सर्वांबरोबरच आम्ही जेवत होतों. जेवणाला फक्त तांबड्या तांदळाचा भात व त्याबरोबर चिंचेचें पाणी आणि मीठ इतकेच पदार्थ असत. सर्व मंडळी हेच पदार्थ खाऊन आनंदांत होती. एखाद्या लष्करी छावणींत जसा सावधपणाचा बंदोबस्त राखण्यांत येतो त्याप्रमाणे सर्व व्यवस्था होती. रात्रीं व दिवसा पाहारा, त्यांच्या हद्दींत यावयाचें झाल्यास 'परवल'च्या शब्दाची ओळख देऊन येणें वगैरे गोष्टी चालत. कांही मुलें आगकाड्या करण्याचें व साधारण कांबळ्यापासून चांगलीं बुरणुसें करण्याचें काम शिकत होतीं. कांही काच करण्याचें शिकण्याकरिता आलीं होतीं, व कांही लष्करी शिक्षण किंवा दारूगोळा वगैरे तयार करण्याचें शिक्षण घेण्याकरिता आलीं होतीं असें आम्हांला समजलें.

आम्ही गेल्यानंतर दुसरे दिवशीं सकाळीं एक लहानशी भट्टी पेटवून आम्हांला काच करून दाखवण्यांत आली. आगकाड्या वगैरे तर एका तासाच्या आंत तयार करून कशा पेटतात यासंबंधाचे सर्व प्रयोग करून दाखवण्यांत आले. त्यामुळे हा हुन्नरी मनुष्य आहे असें आम्हांला वाटलें. त्याचा स्वदेशी धंद्याकरिता उपयोग करून घ्यावा असें आमच्या मनांत आलें. त्याला आम्हीं पैशाची मदत करण्याला प्रारंभ केला. पण मडगावासारख्या गोव्याच्या हद्दींतील गावांत राहण्यापेक्षा बेळगावाला त्याने आपल्या सर्व मंडळींसहित येऊन राहावें, म्हणजे त्याचा उपयोग जास्ती होईल, असें आम्हांला वाटून त्याप्रमाणे त्याला पत्रद्वारें मीं कळवलें होतें. हीं सर्व पत्रें त्याने राखून ठेवलीं होतीं व तीं तो दुसऱ्या लोकांना दाखवीत असे. आम्ही त्याला पैसे पाठवीत होतों हेंही तो लोकांना सांगत असे.

अशा प्रकारें चारसहा महिने गेल्यानंतर पुन्हा आम्ही मडगावला गेलों. त्या वेळीं बोलतांबोलतां आपल्याला जुनी अस्त्रविद्या अवगत आहे; पण ती सिद्ध करण्याला बऱ्याच मोठ्या रकमेची जरूर आहे असें तो सांगूं लागला. या गोष्टीवर आमचा भरवसा बसला नाही व या मनुष्याचा पक्का तपास करावा असें आमच्या मनांत आलें. पुण्यांतील आबासाहेबांच्या एका स्नेह्याजवळ आम्हीं ही गोष्ट काढली. या गृहस्थाचा व माझाही चांगला परिचय झाला होता. आबासाहेब रामचंद्र हें नाव त्यांच्या परिचयांतील नव्हतें. पण बीडची हकीकत व 'रावसाहेबा'चा इतिहास वगैरे गोष्टी आम्हीं सांगितल्यानंतर हा गृहस्थ 'आबासाहेब' नसून 'रावसाहेब'च असावा असा त्या गृहस्थाला संशय आला आणि या गृहस्थाच्या नादीं न लागण्याबद्दल आम्हांला त्याने सूचना दिली. बाकीच्या सर्व गोष्टी खोट्या असल्या तरी त्याला अनेक धंद्यांच्या कला अवगत आहेत याकरिता त्याचा उपयोग करून घेण्यास हरकत नसावी अशा प्रकारचा वाद आम्हीं आमच्या स्नेह्याजवळ केला. पण त्याचें हें सर्व थोतांड आहे, केवळ पैसे उपटण्याकरिता तो अशा प्रकारच्या थापा मारतो, वगैरे या गृहस्थाने आम्हांला कळवलें. पण आबासाहेबाने या गृहस्थासंबंधाने आमचें मन आधीच कलुषित केलें होतें; त्यामुळे खासगी द्वेषाने किंवा इतर चुकीच्या पूर्वग्रहाने हा आमचा स्नेही आबासाहेबांच्या विरुद्ध सांगत नसेल कशावरून, असें आम्हांला वाटलें; आणि या गोष्टीचा पुरा

शोध करण्याचें आम्हीं ठरवलें. तपास करतां करतां 'रावसाहेब'च्या ओळखीचा एक गृहस्थ आम्हांला भेटला. त्याला घेऊन आम्ही मडगावला गेलों.

आमच्याबरोबर गेलेल्या गृहस्थाला पाहतांच आबासाहेबाचें तोंड उतरलें. पण चलाखी करून त्याची व आपली मुळींच ओळख नसल्याची बतावणी करण्याला त्याने प्रारंभ केला. आमच्याबरोबर आलेल्या गृहस्थाने हा आबासाहेब 'रावसाहेब'च आहे असें आम्हांला एकीकडे नेऊन कळवलें. पुन्हा सायंकाळीं आम्ही तिघे व आबासाहेब असे चौघे बोलत बसलों. त्या वेळीं दिव्याचा प्रकाश आपल्या तोंडावर स्पष्ट पडूं नये अशा व्यवस्थेने दिवा ठेवण्यांत आला होता. पण आमच्याबरोबर आलेल्या गृहस्थाने दिवा उचलून आबासाहेबाच्या तोंडावर स्पष्ट उजेड पडेल अशा तऱ्हेने तो ठेवला. अगदी खाणाखुणा पटतील अशा गोष्टी बोलण्याला त्याने सुरवात केली. तरी आबासाहेबाने 'रावसाहेब' आपण नसून तो आपला जिवलग स्नेही होता हीच गोष्ट जोराजोराने मांडली. पण आमच्या गृहस्थानेही त्याचा पिच्छा पुरवला व "दोन दिवस तुम्ही येथेच थांबा. आणखी एकदोन मंडळींना मी घेऊन येतों व ते यांना पक्के ओळखतील" असें सांगितलें. त्याबरोबर "रावसाहेबाच्या व माझ्या चेहऱ्यांत, आवाजांत, बरेंच साम्य असल्यामुळे त्याचा व माझा निकट संबंध होता, त्याच्या सर्व गोष्टी मला माहीत होत्या, त्यामुळे त्याला पाहिलेल्या लोकांची मला पाहून चूक होण्याचा संभव आहे," असें सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न त्याने केला. त्यामुळे आमचा संशय पक्का झाला व आम्ही परत बेळगावला आलों. पुढे तुम्हांला कांही धंदा काढावयाचा असल्यास किंवा धंदेशिक्षणाची शाळा वगैरे काढावयाची झाल्यास तुम्हीं बेळगावास येऊन काढावी, अशीं पत्रें त्याला लिहून आम्हीं त्याचा नाद सोडला. तथापि तो मनुष्य हुशार असून पुष्कळ धंद्यांची त्याला चांगली माहिती आहे ही आमची समजूत गेली नाही.

### आबासाहेबाला अटक व शिक्षा

पुढे कांही दिवसांनी ब्रिटिश पोलिसांचें लक्ष त्याच्याकडे गेलें. निरनिराळ्या प्रांतांतून बरीच तरुण मंडळी त्याच्याकडे जाऊं-येऊं लागली आणि आम्हीही बेळगावाहून तीनचार वेळां गेलों होतों यामुळे याच्यासंबंधाने बराच गवगवा झाला. पुढे इंग्रज सरकारच्या सांगण्यावरून गोवें सरकारने आबासाहेबावर हद्दपारीचा हुकूम फर्माविला व त्याला कैद केलें. बाकीचीं सर्व मुलें पळून गेलीं. एकादोघां तरुण मुलांनी आबासाहेबांच्या बाईसाहेबांना मडगावहून काढून पायरस्त्याने सावंतवाडीला आणलें. आमच्याकडे येऊन सर्व हकीकत सांगितली आणि "बाईसाहेबांना उत्तर हिंदुस्थानांत पोचवावयाचें आहे, जवळ एक पैसा नाही," अशी दीन व केविलवाणी स्थिती निवेदन केली. गोविंदरावांनी त्यांना कांही पैसे देऊन पाठवलें. आम्ही आबासाहेबाच्या नादांत फसलों गेलों हें माहीत असूनही केवळ भूतदयेने प्रेरित होऊन गोविंदरावांनी या वेळीं मदत केली. गोविंदरावांच्या अशा प्रकारच्या किती तरी गोष्टी मला माहीत आहेत.

गोवें सरकारने आबासाहेबाला एक दिवस अटकेंत ठेवून त्याची जागा ताब्यांत घेतली व कागदपत्र वगैरे ब्रिटिश पोलिसांच्या ताब्यांत दिले. या प्रकरणाची चवकशी करण्याचें काम पूर्वी बेळगाव तालुक्यांत फौजदारीच्या कामावर असलेले व या वेळीं पुण्यास क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन खात्यांत इन्स्पेक्टर असलेले गुडी यांच्यावर सोपवण्यांत आलें होतें. आबासाहेबाला गोव्याच्या अधिकाऱ्यांनी मडगावहून काढून आपल्या हद्दीच्या बाहेर ब्रिटिश हद्दींत म्हणजे कॅसलरॉक स्टेशनवर आणलें. तेथें ब्रिटिश पोलिसांनी त्याला अटक करून पुण्याला नेलें व चौकशीच्या कामाला सुरुवात झाली. मडगावास सापडलेल्या कागदपत्रांतून कांही निष्पन्न होतें की काय हें प्रथम पोलिसांनी पाहिलें. त्या कागदपत्रांत मीं लिहिलेलीं पत्रेंही होतीं. तीं पत्रें बेळगावला आणून माझ्या हस्ताक्षराबद्दल तपास चालू झाला. माझें अक्षर ओळखणारे बेळगावास पुष्कळ लोक असल्यामुळे पत्रें शाबीत करणें पोलिसांना कठीण गेलें नसतें. आबासाहेबाच्या प्रकरणांत पोलीस माझ्यासंबंधाने तपास करीत आहेत असें मला समजतांच मी वडिलांना विचारून मुंबईला गेलों आणि तेथे काका पाटील व बॅप्टिस्टा यांना भेटून सर्व हकीकत कळवली. पोलिसांच्या चवकशीचा परिणाम काय होतो तो पाहावा व पुढे प्रसंग येईल त्याप्रमाणे करतां येईल, असें ठरलें. पोलिसांच्या तपासांत विशेष कांही निष्पन्न झालें नाही. 'आबासाहेब' हा एक लबाड मनुष्य असून आपल्याला अनेक धंदे येतात असें सांगून लोकांना फसवतो व पैसे उकळतो आणि देशभक्तीच्या बढाया मारून तरुणांना नादीं लावतो, यापलीकडे त्यांतून कांही निघालें नाही.

पण तो काळ अगदी दडपशाहीचा असल्याकारणानें व आबासाहेबाचीं कारस्थानें काय असतील-नसतील याची मला खात्री नसल्याने माझ्यावर कांही तरी प्रसंग येणार असें मला वाटत होतें. माझ्यावर या वेळीं पोलिसांची सारखी टेहळणीही असे. मी कोठेही घर सोडून बाहेर गेलों तरी पोलीस मागोमाग असे. माझ्या घरावरही पोलिसांची नजर होती. माझ्या हालचालींसंबंधाने रिपोर्ट वगैरे होऊं लागले असें मला समजलें. अशा प्रकारचा प्रसंग नवीनच असल्यामुळे त्या वेळीं मला कसेंकसेंच वाटत असे, व केव्हाकेव्हा 'चोराच्या मनांत चांदणें' या म्हणीचा अनुभव येई. एखादे वेळीं खरोखर कोणी पोलीस नसला तरी मागे वळून पाहिल्यावर जर कोणी मनुष्य दिसला तर तो पोलीसच असावा असें वाटे. कोठे जावयाचें झाल्यास त्याला चुकवितां कसें येईल याचा विचार मनांत चाले. पाच मिनिटें चालत गेल्यास जातां येईल इतक्याच अंतरावर असलेल्या एखाद्या घराला जावयाचें झाल्यास अर्धाअर्धा तास चालून, कोणीकडे तरी फेरी मारून, नजर चुकवून जाण्याचा प्रयत्न मीं केल्याचे किती तरी प्रसंग मला आठवतात. आज ते सर्व प्रकार आठवून हसू येतें. तेव्हापासून आतापर्यंत अशा प्रकारें पोलिसांच्या नजरेखाली राहण्याचे अनेक प्रसंग आले व अद्यापिही चालू आहेत. त्यामुळे एक प्रकारें हें सर्व अंगवळणीं पडल्याप्रमाणे झालें आहे, त्याचें आता कांहीच वाटत नाही. १९२० पासून माझ्या सार्वजनिक आयुष्याला जें निराळें वळण मिळालें त्यामुळे अशा प्रकारचे

पोलिसांचे चाळे हास्यास्पद वाटतात. १९२० पासून जें करावयाचें तें सर्व उघडपणें करावयाचें व जें केलें असेल तें बिनधोक कबूल करावयाचें, असें मनानें मीं ठरवल्यामुळे आता गुप्तपणा कांहीच राहिला नाही. तथापि सरकारच्या संशयी वृत्तींत अद्यापि पालट झालेला नाही. यावरून आपण कितीही उघड रीतीनें कामें करीत असलों, तरी आपल्या प्रतिपक्षाला खात्री होत नाही व ती खात्री करून देण्याचें आपलें कर्तव्य आहे, असें पुष्कळ वेळां वाटतें. कार्यकर्त्यांबद्दल अशी खात्री झाल्याखेरीज आमच्या हल्लीच्या अहिंसायुक्त चळवळीचा सरकारवर परिणाम होणार नाही, व ही खात्री करण्याकरिता कायावाचामनें करूनच, गांधी म्हणतात त्याप्रमाणे, अहिंसेचे उपासक आम्हांला बनलें पाहिजे. ज्यांचा या मार्गावर विश्वास नाही त्यांची गोष्ट निराळी. पण माझ्यासारख्या सरकारच्या दृष्टीनें डागळलेल्या लोकांना तर दुसरा मार्ग नाही. माझ्यासारख्यांना अहिंसेचें तत्त्व पटल्यानंतर या बाबतींत गांधीजी म्हणतात त्याचप्रमाणे वागलें पाहिजे.

पोलिसांचा सर्व तपास संपल्यानंतर चांगल्या वर्तणुकीचा जामीन देण्याबद्दलचा क्रि. प्रो. कोड १०८ कलम प्रमाणे आबासाहेबावर खटला भरण्यांत आला. खटला पुण्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपुढे चालला होता. सरकारतर्फे सर्व पुरावा झाल्यानंतर आरोपीनें आपलीं साक्षीदारांचीं नावें दिलीं. त्यांत माझेंही नाव होतें. माझी साक्ष झाल्यास साक्षीच्या वेळीं मीं लिहिलेलीं पत्रें मला दाखविण्यांत येतील; त्यांपैकी कित्येक पत्रांतून आबासाहेबाचें मडगावास राहणें मला पसंत नाही, म्हणून त्यांनी बेळगावास येऊन एखादा धंदा काढावा, वगैरे मजकूर होता; माझ्या पत्रांप्रमाणे आबासाहेब बेळगावला आला नाही, म्हणून त्याच्यासंबंधानें मला संशय आला, ही गोष्ट ओघानेंच माझ्या तोंडून निघाली असती; म्हणून माझ्या साक्षीनें कांही फायदा होणार नाही; असें मीं आबासाहेबाचे वकील लक्ष्मणराव ऊर्फ अण्णासाहेब आपटे यांना कळवलें. तथापि खुद्द आबासाहेबाचा आग्रह माझी साक्ष व्हावी असाच होता. तरी मीं साक्षीचें समन्स लागू करून घेतलें नाही. तें चुकवण्याकरिता गावोगाव मी हिंडत असें. एकदा हें समन्स चुकवण्याच्या हेतूनें मी मुंबईस गेलों होतों. तेथे एका मुसलमान गृहस्थाचें शांतारामाच्या चाळींत व्याख्यान होतें. त्याचें वक्तृत्व प्रसिद्ध असल्यामुळे तें ऐकण्याची मला इच्छा झाली. सभेला गेलों असतांना पोलीस माझी चवकशी करीत आहेत असें समजलें. तेव्हा मागचा हा ससेमिरा चुकत नाही व चुकविण्यांतही अर्थ नाही असें वाटल्यावरून पोलिसाकडे जाऊन समन्स घेतलें व तारखेच्या दिवशीं आमच्या वडिलांना घेऊन पुण्याला गेलों. श्री. आपटे यांची व प्रो. भानू यांची चांगली ओळख असल्याचें मला माहीत होतें. प्रो. भानूंचा व माझ्या वडिलांचा स्नेह होता. तेव्हा वडिलांच्याकडून भानूंना सांगवावें व त्यांच्यामार्फत आपट्यांना माझ्या साक्षीचा परिणाम त्यांच्या पक्षाच्या विरुद्ध कसा होईल हें पटवून द्यावें, असा माझा हेतू होता. तो सफल झाला आणि कोर्टांत गेल्यावर माझी साक्ष कमी करण्यांत आल्याचें मला सांगण्यांत आलें. त्या वेळीं आबासाहेबाला मीही कचेरींत भेटलों होतों व माझी साक्ष कमी करण्याबद्दल त्याला कळवलें होतें. साक्षीदाराला पोटगी भत्ता द्यावा लागतो, म्हणून मला

मॅजिस्ट्रेटपुढे नेलें. पण समन्स मुद्दाम चुकवीत होतों या कारणावरून मला भत्ता देण्यांत येऊं नये, असे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने फर्माविलें. मींही त्याची पर्वा केली नाही. आबासाहेब हा लबाड आहे, तरी माझ्या तोंडून त्याच्या तर्फे साक्षीच्या वेळीं कांही निघूं नये, अशी माझी इच्छा होती. हा जरी मुख्य हेतू होता तरी माझ्या अंगावर कांही लचांड येण्यासारख्या गोष्टी बाहेर येतील की काय, ही भीती नव्हती असेंही नाही. गुर्डीची व आमच्या वडिलांची चांगली ओळख होती. या प्रकरणांत आरोपीतर्फे मीं साक्षीला येऊं नये अशी त्यांचीही ते फिर्यादी असल्यामुळे इच्छा होती, असें वडिलांकडून मला पुष्कळ दिवसांनी कळलें.

या खटल्याचा निकाल आरोपीच्या विरुद्ध लागला व आबासाहेबाच्या वर्तणुकीबद्दल जामीन कोणी न राहिल्यामुळे त्याला तुरुंगांत जावें लागलें. त्याच्या 'बाईसाहेब' या त्याचें कुटुंब नसून एका चांगल्या कुलीन गृहस्थाची बायको त्याने पळवून आणली होती, म्हणून तो तिला नेहमी गोषांत ठेवीत असे, असें मागाहून मला कळलें. तुरुंगांत असतांना त्याच्या जामिनकीची व्यवस्था करण्याबद्दल त्याचेकडून मला एक पत्र आलें. पण, या भुताचा मला कोणत्याही प्रकारें संबंध ठेवावयाचा नसल्याने मी त्या भानगडींत पडलों नाहीं. सरकारला या तपासांत कांही मिळेल असें वाटलें होतें. पण मुळांतच कांही नसल्यामुळे डोंगर पोखरून उंदीर काढल्याप्रमाणे झालें. या प्रकरणापासून पोलिसांच्या काम करण्याच्या पद्धतीचा व त्यांना प्रसंगीं झुलवावयाचें झाल्यास कसें झुलवावें या गोष्टीचा मलाही थोडा अनुभव आला. हें प्रकरण मिटल्यानंतर आबासाहेब मुंबईस मला एकदा भेटला होता. त्यावेळचे मुंबईचे पोलीस कमिशनर व्हिन्सेंट यांच्याकडे त्याचें येणेंजाणें असे, असें मला समजलें होतें आणि पुढे आबासाहेबांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रांतील प्रसिद्ध देशभक्त पांडुरंग महादेव बापट हे बरेच दिवस पोलिसांची नजर चुकवून राहात होते, त्यांचा पोलिसांना सुगावा लागूं शकला, पण बापटांवर खटला वगैरे कांही न भरतां त्यांना सोडून देण्यांत आलें, ही आपलीच कामगिरी असें मला त्याने त्या वेळीं सांगितलें. पण त्याच्या बोलण्यावर माझा भरवसा बसला नाही. पुढे तो मेला असेंही मला कळले. पण खरोखर मेला किंवा दुसऱ्या कोणत्या तरी नावाने आणखी कांही तरी फंदांत पडला, हें मला निश्चयात्मक सांगतां येत नाही. अलीकडे बऱ्याच वर्षांत त्याच्यासंबंधाने कांही कानावर आलें नाही एवढी गोष्ट खरी!

### *'राष्ट्रमता'ची सांपत्तिक स्थिती*

हें प्रकरण संपतें न संपतें तोच मला मुंबईहून गणपतराव मोडकांकडून "राष्ट्रमत, पैशाच्या अडचणीमुळे बंद पडण्याच्या स्थितींत आहे. याकरिता ताबडतोब निघून येण्या"बद्दल तार आली. या बाबतींत मीं वडिलांचा व गोविंदराव याळगींचा विचार घेतला. मी स्वस्थ न बसतां आबासाहेबाच्या सारख्या कांही

तरी प्रकरणांत पुन्हा गुंतून राहीन, अशी काळजी वडिलांना वाटत होती. म्हणून कोणत्या तरी उद्योगांत मीं राहावें, असें त्यांना वाटून त्यांनी मला जावयाला परवानगी दिली आणि कांही रकमेची त्यांनी मला मदतही केली. गोविंदरावांना 'राष्ट्रमता'च्या बाबतींत टिळकांची इच्छा काय होती हें माहीत असल्यामुळे त्यांनी मुंबईस जाण्याचा मला सल्ला दिला. मीं मुंबईस येऊन 'राष्ट्रमता'ची स्थिती पाहिली. संपादक दामले हे सोडून गेले होते. त्यांचें व मोडक-सरदेसाई वगैरे मंडळींचें जुळत नव्हतें, हें वर सांगितलेंच आहे. दामले सोडून गेल्यानंतर सरदेसाई हेच स्वतः संपादक झाले. राष्ट्रमत छापखाना व कचेरी पूर्वी भटवाडींत होती. ती जागा सोडून गिरगावच्या मुख्य रस्त्यावर छापखाना आणावा असें वाटत होतें. प्रार्थनासमाजाजवळ, गिरगाव बॅकरोडच्या नाक्यावर डॉ. भाऊ दाजी लाड यांचें घर सोयीचें होईल असें आम्हांला वाटलें. घर मोठें असल्यामुळे छापखाना, कचेरी यांचा समावेश होऊन राहण्याकरिताही यांत जागा पुरेशी होती. हें घर त्या वेळीं मनमोहनदास रामजी यांच्या मालकीचें होतें. मनमोहनदासांचा व टिळकांचा स्नेह होता. टिळकांनी यांच्या मदतीनेच स्वदेशी स्टोअर्सची स्थापना केली होती. टिळकांचा व 'राष्ट्रमता'चा काय संबंध होता ही गोष्ट प्रसिद्ध होतीच. आणि टिळक नसल्यामुळे 'राष्ट्रमता'वर कोणती आपत्ती आली आहे याबद्दलची सर्व माहिती मनमोहनदास यांना कळविल्यास कांही सवलतीने घर मिळेल असें आम्हांला वाटून आम्हीं शेटजींची गाठ घेतली. या घराला फार दिवस कोणी भाडेकरी मिळाला नसल्याने घर पुष्कळ दिवस रिकामेंच होतें. आम्हीं शेटजींना सर्व हकीकत सांगितली व राष्ट्रमताची सांपत्तिक स्थिती समाधानकारक नसल्यामुळे कांही तरी प्रयत्न करून ती सुधारावी म्हणून मी मुद्दाम बेळगावहून आलों आहें असें मी त्यांना कळवलें. शेटजींनी सर्व हकीकत ऐकून घेतली व आमच्यावर मेहरबानी म्हणून दरमहा तीनशें रुपये भाड्याचा करार करून तें घर आम्हांला दिलें. हें भाडें 'राष्ट्रमता'च्या शक्तीबाहेरचें होतें. तथापि एंजिन वगैरे बसवण्याला जागा प्रशस्त आहे असें आम्हांला वाटून तितकें भाडें देण्याचें आम्हीं कबूल केलें. पण एवढ्या भाड्याचें घर घेतल्यानंतर तें कांही निश्चित कालपर्यंत तरी आमच्या ताब्यांत असावें, असें आम्हांला वाटून तीन वर्षांचा करार शेटजींनी आमच्याबरोबर करावा, अशी आम्हीं विनंती केली. पण ती अट त्यांनी मान्य केली नाही. तरी अशा अनिश्चित स्थितींत काय होइल तें होवो, पुढे पाहतां येईल या विचाराने घर भाड्यानें घेतलें आणि सामानसुमान नव्या घरीं आणलें. एक ऑईल एंजिन खरेदी करून त्याच्या साहाय्याने छापखान्याला सुरुवात केली. कागद, शाई व इतर छपाईचें सामान वगैरे खरेदी केल्याबद्दलची लोकांची बाकी द्यावयाची होती ती सर्व मीं आणलेल्या रकमेंतून भागवण्यांत आली. मोडक याच घराच्या एका भागांत राहात असत. मीही दुसऱ्या भागांत राहूं लागलों व खाली ऑफिसमध्ये व्यवस्थापक म्हणून काम पाहूं लागलों. कंपनीच्या डायरेक्टर्सची सभा भरून छापखाना व पत्र माझ्या स्वाधीन करण्याचा ठराव पास झाला. कांही प्रसिद्ध व्यक्तींनी या व्यवस्थेंत खो घालण्याचा प्रयत्न केला. माझी

पैशाची मदत तर घ्यावयाची, पण व्यवस्था मात्र माझ्याकडे सोपवावयाची नाही, असा या व्यक्तींचा डाव होता; पण तो साधला नाही. याप्रमाणे माझें मुंबईस राहण्याचें नक्की ठरलें. पहिल्यापासूनच उधारीने कागद वगैरे आणावयाचा नाही असें मीं ठरवलें व बराच व्यवहार रोखीने सुरू केला. त्यामुळे बेळगावाहून कोणी तरी श्रीमंत व टिळकांचा अनुयायी व्यवस्था लावण्याकरिता मुंबईस भांडवल घेऊन बसला आहे, अशी कागदाच्या व्यापाऱ्यांत वगैरे प्रसिद्धी झाली. किंवा छापखान्यांतील कांही मंडळींनी मुद्दाम तशी प्रसिद्धी केली असावी. रोखीने सर्व व्यवहार करण्याला सुरुवात केल्यामुळे या बातमींत खरेपणा आहे, असें कागदवाल्यांना वगैरे वाटणें साहजिक होतें. कागदाचा व्यापार करणारे मोठमोठ्या व्यापाऱ्यांचे दलाल व मुनीम मला येऊन भेटूं लागले व चढाओढींत कागदाच्या दरांत सवलतही मिळूं लागली. तथापि लेखक कमी होते. त्यामुळे पत्रांतील लेखांच्या बाबतींत सुधारणा करण्याची आवश्यकता भासूं लागली. बॅप्टिस्टा हे मधूनमधून इंग्रजींत लेख लिहून देत असत. 'केसरी'पैकी केळकर किंवा खाडीलकर यांपैकी कोणी तरी मिळतील तर बरें, असें आम्हांला वाटत होतें. पण प्रत्यक्ष त्यांच्यापुढे आम्हीं गोष्ट काढली नाही. शिवरामपंतांच्या 'काळ' पत्राचे संपादक माझे स्नेही बाबासाहेब सोमण हे होते. आपला अंक निघाल्यानंतर एक दोन दिवस ते मुंबईला येऊन राहून लेख वगैरे लिहून आम्हांला मदत करीत असत. बाबासाहेब हे बेळगावला वकिली करीत असतां 'काळ' पत्राचे संपादक कसे झाले याबद्दलच्या हकीकतीचा माझ्याशीं संबंध असल्याने ती येथे देत आहें.

### बाबासाहेब सोमण यांचा संबंध

बाबासाहेब हे वकिली करीत असतां सांगली संस्थानांत मुनसफीच्या जागेकरिता त्यांनी अर्ज केला होता. त्या वेळीं सांगली-संस्थानिक हे अल्पवयी असल्याकारणाने संस्थानाचा कारभार कर्नल बर्कसाहेबांकडे होता. त्यांनी खुद्द सांगलीच्या मुनसफीच्या जागेवर सोमणांची नेमणूक केली आणि त्याप्रमाणे ते कामावर हजर झाले. कांही दिवसांनंतर मला कामाकरिता सांगलीस जाण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं सोमण हे माझे स्नेही असल्यामुळे सोमणांना भेटण्याकरिता मी गेलों. त्यांनी मला घरीं भोजनाचें आमंत्रण दिलें, म्हणून त्यांच्याकडे जेवायलाही गेलों. ही गोष्ट मिरजेचे आप्पासाहेब पटवर्धन या नावाच्या गृहस्थांना मीं सांगितली. हे गृहस्थ नाशिकच्या बाबासाहेब खऱ्यांचे श्वशुर. त्यामुळे माझी व त्यांची ओळख झाली होती. घरची श्रीमंती नाटक वगैरेच्या फंदांत या गृहस्थांनी उडवली होती. त्यामुळे हा मनुष्य लफंगा आहे असें मला माहीत होतें. तरी सोमणांना भेटण्याला मी गेलों होतों ही गोष्ट सांगण्यांत मी मोठी चूक करीत आहें असें मला वाटलें नाही. त्यांना पैशाची अडचण आहे व ते माझ्याकडे येत असतात हें पाहून, आमच्या हालचालीची बातमी मिळवण्याकरिता बेळगावाच्या पोलिसांनी त्यांची योजना केली होती. माझ्याकडून ही बातमी समजतांच

पटवर्धनांनी ती बेळगावाच्या पोलिसांना कळवली. मी एक चळवळ्या मनुष्य आहें आणि टिळकांचा व माझा संबंध आला आहे, ही गोष्ट प्रसिद्ध असल्यामुळे माझ्यावर पोलिसांची नजर होतीच. मी सोमणांच्या घरीं गेलों होतों ही बातमी पोलिसांच्या मार्फत बेळगावाच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कानावर गेली. ते विशेष संशयी वृत्तीचे गृहस्थ असल्यामुळे त्यांना या बातमीचें विशेष महत्त्व वाटून कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटाकडे त्यांनी रिपोर्ट केला व त्यांचेकडून सर्व प्रकरण बर्कसाहेबांकडे चवकशीकरिता आलें. रीतीप्रमाणे बर्कसाहेबांनी सोमणांना बोलावणें पाठवून खुलासा विचारला. मी त्यांना भेटावयाला आल्याची गोष्ट सोमणांनी कबूल केली. सोमणांनी त्या वेळीं आपला व माझा विशेष परिचय नव्हता, बेळगावास वकिली करीत असतां एकाच कोर्टाचे वकील या नात्याने साधारण ओळख होती, एवढीच गोष्ट सांगितली असती तर बर्कसाहेबांनी कांही केलें नसतें. पण आपला व माझा चांगला स्नेह असल्याचें स्पष्टपणें सोमणांनी सांगितलें. त्यामुळे बर्कच्या सांगण्यावरून सोमणांना राजीनामा द्यावा लागला. शिवरामपंतांना १९०८ सालीं राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा झाल्यानंतर त्यांच्या 'काळ' पत्राचें संपादकत्व खरे यांच्याकडे गेलें. पुढे त्यांच्यावरही खटला झाला व त्यांनाही शिक्षा झाली. त्यानंतर सोमण हे संपादक झाले. सोमण हे 'काळ' पत्राचे संपादक असतांनाच माझा व 'राष्ट्रमताचा' संबंध आला. म्हणूनच ते आमच्या मदतीकरिता पुण्यास 'काळ'चें काम आटोपून आठवड्यांतून दोनतीन दिवस मुंबईस येऊन राहात होते.

### *वीर वामनराव जोशी आणि राष्ट्रमत*

याच सुमारास वऱ्हाडांतील यवतमाळ व उमरावती येथील राष्ट्रीय शाळा सरकारने बंद केल्या होत्या. त्यामुळे तिकडील या शाळांतून काम करणारी मंडळी रिकामी झाली होती. त्यांपैकी उमरावतीचे वामनराव जोशी (वीर वामनराव) हे मुंबईस आले होते. 'राष्ट्रमता'कडे महाराष्ट्रांतील व वऱ्हाडांतील राष्ट्रीय पक्षांतील मंडळी आत्मीयत्वाच्या भावनेनें पाहात असल्यामुळे वामनराव हे माझ्याकडे येऊं लागले. त्यांची व माझी यापूर्वी ओळख नव्हती. पण ऐकून एकमेकांची माहिती होती. त्यांना लेखनाचा नाद असे. त्यामुळे तेही केव्हाकेव्हा 'राष्ट्रमतां'त लेख लिहूं लागले. नवीन मंडळी जास्ती आल्यास खर्च भागणार नाही, याकरिता वामनरावांना लिहिण्याची तसदी देऊं नये, अशी मला पूर्वीपासून काम करीत असलेल्या मंडळीकडून सूचनाही करण्यांत आली आणि ही गोष्ट वामनरावांच्या कानावरही त्यांनी घातली. पण वामनरावांनी आपलें म्हणणें स्पष्टपणें त्या मंडळीपुढे मांडलें: "आपण हौसेने लेख लिहीत असल्याने कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची आपल्याला इच्छा नाही. जे लेख संपादकांना पसंत असतील तेवढेच प्रसिद्ध करावेत; सर्व गोष्टी संपादकांच्या मर्जीवरच आहेत." याप्रमाणे त्यांनी खुलासा केल्यानंतर या मंडळीचें बोलणेंच खुंटलें व वामनराव नियमाने लिहूं लागले. माझा व त्यांचा स्नेह वाढत चालला आणि प्रचलित

राजकारणासंबंधाने दोघांचें बरेंच एकमत होऊं लागलें. स्वार्थत्याग करून 'राष्ट्रमता'ची सेवा करणारी वामनरावांसारखी आणखी मंडळी आपल्यास मिळाल्यास खर्चाचें ओझें कमी होऊन 'राष्ट्रमत' हें राष्ट्रीय पक्षाचें मुंबईतील एक केंद्र होईल, अशी कल्पना माझ्या मनांत येऊं लागली. टिळक मंडालेला गेल्यानंतर राष्ट्रीय पक्षांतील तरुण मंडळींना एकत्रित आणण्याला 'राष्ट्रमत' संस्था उपयोगी पडेल असें मला वाटूं लागलें. मी व वामनराव याबद्दल विचार करीत होतों. त्यांनाही ही कल्पना पटल्यामुळे त्यांनी यवतमाळच्या राष्ट्रीय शाळेंतील मंडळीबद्दलची मला माहिती दिली. ती मंडळी रिकामी असून, त्यांना ही कल्पना पसंत असेल तर 'राष्ट्रमतां'त या मंडळींना घेण्यास मला कांहीच अडचण नाही, असें मीं वामनरावांना कळवलें. त्यांनी डॉ. बाबासाहेब परांजपे यांना ही हकीकत कळवली. त्यांना ही कल्पना पसंत पडली व त्यांनी आपटे, पटवर्धन, शूरपाल, हरिभाऊ फाटक या मंडळींना मुंबईला पाठवलें. त्यांपैकी आपटे व शूरपाल हे आमच्या प्रांतांतील होते. आपटे हे हल्ली पुण्यास आनंदाश्रमाचे व्यवस्थापक व प्रसिद्ध इतिहाससंशोधक आहेत. शूरपाल हे रामदुर्गास असतात. हरिभाऊ फाटक हे पुण्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांपैकी एक आहेत. 'राष्ट्रमत' पत्र बंद झाल्यानंतर पटवर्धन हे नारायणराव सरदेसाई व त्यांचे बंधू गणपतराव यांनी काढलेल्या मेणबत्तीच्या कारखान्यांत काम करीत होते. पण हल्ली काय काम करीत असतात याची मला माहिती नाही.

ही मंडळी आल्यानंतर आपटे यांच्या नावाने डिक्लेरेशन करून त्यांच्या संपादकत्वाखाली 'राष्ट्रमत' चालू झालें. त्यानंतर कांही दिवसांनी गोपाळराव ओगले हेही आम्हांला येऊन मिळाले. हल्ली हे नागपूरच्या प्रसिद्ध 'महाराष्ट्र' या पत्राचे संपादक व मालक आहेत. ही मंडळी आल्यानंतर मी व हे सर्व मिळूनच छापखान्याच्या एका भागांत राहूं लागलों. शूरपाल यांच्याकडे हिशोबाचें काम देण्यांत आलें. हरिभाऊ फाटक हे सरदेसाई यांना छापखान्याच्या कामांत मदत करीत असत. या मंडळीपैकी पगार असा कोणीच घेत नसत. खानावळींत जेवल्याने खर्च जास्ती होतो व जेवणही चांगलें मिळत नाही, म्हणून आचारी ठेवून स्वयंपाकाची व्यवस्था करण्याचें ठरलें आणि त्याप्रमाणे सुरुवातही झाली. जागा मुबलक असल्यामुळे बाहेरगावाहून राष्ट्रीय पक्षाची कोणी प्रमुख मंडळी आल्यास त्यांच्या जेवणाखाण्याची सोय लावण्याचा माझा विचार होता व त्याप्रमाणे सुरवातही केली. रावबहादुर गणेश व्यंकटेश जोशी, कृष्णाजीपंत खाडीलकर, नरसोपंत केळकर, वासूकाका जोशी, डॉ. बाबासाहेब परांजपे, काका पाटील, माधवरावजी अणे यांच्यासारखी मंडळी आमच्याकडे येत व उतरत. त्यामुळे राष्ट्रीय पक्षाचें 'राष्ट्रमत' हें मुंबईतील केंद्र व्हावें अशी माझी कल्पना होती तिला मूर्त स्वरूप येऊं लागलें. लिहिण्याचें काम झाल्यानंतर सायंकाळीं आम्ही सर्व एकत्र जमून प्रचलित विषयावर चर्चा करीत असूं. 'राष्ट्रमता'चें धोरण सामाजिक विषयासंबंधाने प्रगतिपर ठेवण्याचें आमचें ठरल्यामुळे 'अंत्यजोद्धार' या मथळ्याखाली एक लेखमाला आम्हीं सुरू केली होती. राजकीय क्षेत्रांत 'राष्ट्रमता'चें धोरण बंगालच्या 'वंदेमातरम्' पत्राप्रमाणे असावें, असें आम्हीं ठरविलें

होतें. केवळ सरकारच्या कृत्यावर टीका करून आपलें काम भागणार नाही, स्वातंत्र्याच्या मूलभूत विचाराच्या पायावर आपल्या चळवळीची उभारणी केल्यास ती टिकाऊ होईल, असें आम्हांस वाटत होतें; आणि त्याच धोरणाने लेख येऊं लागले.

### काकासाहेब कालकरांची ओळख

याच वेळीं स्वामी आनंद व काकासाहेब कालेलकर यांचा व माझा संबंध आला. स्वामी आनंद व वऱ्हाडांतील मंडळी यांचा पूर्वीचा संबंध होता. त्यामुळे ते आमच्यामध्ये येऊन राहूं लागले. त्यांना गुजराती व मराठी या दोन्ही भाषा चांगल्या येतात. त्यामुळे 'राष्ट्रमत' पत्राची एक गुजराती एडिशन काढावी अशी कल्पना निघाली व ती बाबासाहेब परांजपे यांच्या प्रोत्साहनाने तडीला गेली. तथापि त्या वेळीं गुजराती लोकांत राजकारणासंबंधाने विशेष जागृती नव्हती, म्हणून आमच्या गुजराती 'राष्ट्रमता'चा खप विशेष होत नव्हता. गुजरातींत 'राष्ट्रमत' काढण्याचें ठरल्यानंतर गुजराती टाईप, कागद वगैरेकरिता जास्ती भांडवल घालण्याची जरुरी भासली. पण माझ्याजवळचे सर्व पैसे संपले होते. मग एका टिळकांच्या स्नेह्याकडून प्रॉमिसरी नोट लिहून देवून चारशें रुपये आणले व गरज भागवली. ही स्थिती लक्षांत आणून वऱ्हाडांतून कांही रक्कम आणतां असें सांगून डॉ. परांजपे हे गेले. पुढे दहापंधरा दिवसांनी ते अजमासें दोन हजार रुपये घेऊन आले. आमची समजूत होती कीं, वऱ्हाडांतील राष्ट्रीय पक्षांतील पुढाऱ्यांकडून मदत म्हणून ही रक्कम परांजपे यांनी उभी केली असावी. पण पुढे कांही दिवसांनंतर परांजपे यांनी आपली एक जमीन विकून ही रक्कम आणली असें कळलें. पण खुद्द परांजपे यांनी याबद्दल आमच्याकडे एक अक्षरही काढलें नाही. त्यामुळे त्यांच्या देशभक्तीबद्दल व मनाच्या मोठेपणाबद्दल मला कौतुक वाटलें. १९२०-१९२१ सालापासून राजकारणांत माझीं व त्यांचीं मतें भिन्न झालीं आहेत. गांधींसंबंधाने त्यांच्या तोंडून निघालेले कित्येक उद्गार माझ्या अंतःकरणाला झोंबतात. तरी त्यांच्या संबंधाचा माझा आदर कमी झाला नाही. असो.

अशा प्रकारें आम्ही आमची शिकस्त करून 'राष्ट्रमता'ला वाचविण्याचा प्रयत्न करीत होतों. जेवणाखाण्यासंबंधानेदेखील अत्यंत काटकसरीने खर्च केला जात होता. गोविंदराव याळगी यांचे बंधू कृष्णराव व आणखी तीनचार मंडळी मीं बेळगावहून बोलावून घेतली. वामनराव जोशी यांच्यामार्फत वऱ्हाडांतून तीनचार मंडळी आली. या तरुण मंडळींना छापखान्यांतील कामें दिलीं व कांही पगारी माणसें कमी केलीं. एवढ्या सर्व मंडळीकरिता धोतरें धुणें, भांडीं घासणें, झाडलोट करणें इत्यादि कामाकरिता एकच 'बाल्या' ठेवला होता. मला स्वतःलादेखील त्या वेळीं असलीं कामें करावीं लागत. सर्व मंडळी आपापल्या कामांत गुंतलेली असल्यामुळे व मलाच जास्ती फुरसत असल्यामुळे साफसुफीचीं कामें करण्याला मला वेळ मिळे. फराचे

शौचकूप होते; पण त्यांतून पाणी वेळेवर व मुबलक येत नसे. म्हणून वरून पाणी घालून ते दिवसांतून तीन-चार वेळां तरी स्वच्छ करावे लागत. हें काम मी आनंदाने करीत असें. अलीकडे महात्मा गांधींनी आश्रम स्थापन करून देशसेवकांचें जीवित कसें असावें याबद्दल एक आदर्श देशापुढे ठेवला आहे. आश्रम-जीवनांत अशा प्रकारचीं स्वावलंबनाचीं कामें करावीं लागतात. हें पाहून ठिकठिकाणीं स्थापन करण्यांत आलेल्या आश्रमवजा संस्थांतून हीं कामें स्वतःच करण्याचा प्रघात पडत चालला आहे. पण त्या वेळीं याप्रमाणे सेवावृत्तीची कल्पना नसताही केवळ जरुरीमुळे व आम्हां सर्वांत एक प्रकारची कौटुंबिक भावना उत्पन्न झाली होती त्यामुळे, कोणतेंही काम—मग तें कितीही कमी दर्जाचें असो—करण्यांत आम्हांपैकी कोणालाच कमीपणा वाटत नव्हता. माझ्या आयुष्यांत अत्यंत आनंदाचे म्हणून जे प्रसंग गेले असतील त्यांत या 'राष्ट्रमताच्या' संबंधाचा प्रसंग मी बराच श्रेष्ठ दर्जाचा समजतों. राष्ट्रीय पक्षाला टिळकांच्या शिक्षेमुळे जो पडता काळ आला होता, त्या अवधींत माझ्याकडून हें व इतर कांही कामें झालीं. त्यामुळे माझ्या आयुष्याला पक्कें वळण लागलें. पुष्कळ स्नेह्यांचा संग्रह झाला. दृष्टीला व्यापकता बरीच आली. अंग मोडून काम करण्याची सवय लागली. दुसऱ्यांना संभाळून घेऊन काम करण्यांत किती फायदा आहे हें पक्कें समजलें. एकाच कार्यांत लहान-मोठीं, शिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत अशा सर्व प्रकारच्या व निरनिराळ्या स्वभावाच्या माणसांचा समावेश होत असला तर त्या सर्वांशीं, ज्याच्यावर मुख्य जबाबदारी असते त्या माणसाने मिळूनमिसळून प्रेमाने व एकभावाने वागलें म्हणजे काम किती सुरळीत व आस्थेने चालतें याचाही मला अनुभव आला. 'राष्ट्रमता'शीं माझा संबंध असेपर्यंत एखाद्या पगारी नोकरालादेखील कठोर शब्दाने बोलल्याचें मला आठवत नाही. याबद्दल आमच्या मंडळीपैकीच कांही मंडळींनी मला अगदी mild (मऊ) म्हणून दोषही दिला. पण माझी वागणूकच योग्य होती असें मला त्या वेळीं वाटलें व अद्यापिही तसेंच वाटतें.

वर सांगितलेल्या मंडळीखेरीज काकासाहेब कालेलकरांचा व माझा संबंध याच वेळीं आला. यांची बी. ए.ची परीक्षा पास होऊन हे एल्‌. एल्‌. बी.ची टर्म भरीत होते. नाशिकचे डॉ. विष्णुपंत भट—हल्ली हे येवल्यास डॉक्टरीचा धंदा करीत असतात—यांची व काकांची माहिती होती. डॉ. भट हे माझ्याकडे येत-जात असत. राष्ट्रीय पक्षाचें 'राष्ट्रमत' हें मुंबईतील मुख्य ठाणें झाल्यामुळे माझ्याकडे निरनिराळ्या विचारांची तरुण मंडळी पुष्कळ येत असत. आमच्या बिऱ्हाडाला 'राष्ट्रमठ' असें नांव मिळालें होतें. सरकारच्या दडपशाही धोरणामुळे व इतर मार्ग कांही दिसत नसल्यामुळे, आणि कोणी दाखविणारा नसल्यामुळे, बऱ्याच तरुणांच्या मनांत क्रांतीच्या, अत्याचाराच्या कल्पना घोळत असत. त्यांत बंगाल्यांत होत असलेल्या गोष्टींमुळे भर पडली. या प्रक्षुब्ध वातावरणांतून सर्वस्वी मुक्त अशीं, देशाभिमानाने भरलेलीं, तरुण माणसें कमीच असणार. डॉ. भटांच्या ओळखीने काकांचा परिचय झाला. काका हे बेळगावजवळील शहापूर गावचेच होते. त्यांचें कुटुंबही शहापूरचेंच. त्यामुळे त्यांच्याविषयी आपलेपणा लवकरच

वाढूं लागला. त्यांच्या बोलण्याचालण्यावरून काका हे बुद्धिमान असून निश्चयी स्वभावाचे आहेत असें मला वाटलें. असल्या होतकरू तरुणांनी सरकारी नोकरींत किंवा वकिली-सारख्या धंद्यांत जन्म घालवून देशसेवेला मुकावें, असें मला तेव्हापासूनच वाटत नव्हतें. म्हणून थोडा जास्ती परिचय झाल्यानंतर व आमचीं मतें जुळतात असें दिसून आल्या-नंतर काकांनी कायद्याचा अभ्यास सोडावा व आम्हांला येऊन मिळावें अशी मीं त्यांना सूचना केली. काकांनी विशेष विचार न करतां आपलें बिऱ्हाड आमच्या मठींत आणून ठेवलें व आपल्या कायद्याच्या अभ्यासाला रामराम ठोकला. बाकीच्या मंडळींत ते चांगले मिळूनमिसळून वागूं लागले व त्यांनी 'राष्ट्रमतां'त लेखही लिहिण्याला प्रारंभ केला. आम्हांला पैशाची अतिशय टंचाई होती; तरी अडचण व घस सोसून पत्र चालवण्याचा आमच्या मंडळींचा निश्चय दिवसेंदिवस वाढत चालला. लेखही भावनांना उद्दीपन करणारे असे येऊं लागले. कांही प्रमुख गिरणी कामगारांचा व आमचा संबंध येऊन त्यांच्या गाऱ्हाण्यांनाही आमच्या पत्रांत प्रसिद्धी मिळूं लागली. याप्रमाणे पत्राची लोकप्रियता वाढूं लागली. पोलिसांची नजर आमच्यावर होतीच. समोरच्या घराच्या ओसरींतून सकाळपासून रात्रीं दहाअकरा वाजेपर्यंत आमच्यावर सारखी टेहळणी असे. मधूनमधून पेटिगारा हे स्वतः येत असत व आमच्यापैकी कोणाबरोबर तरी तासअर्धातासपर्यंत इकडीलतिकडील गप्पागोष्टी करीत असत. आम्ही पैशाच्या अडचणींत आहोंत ही गोष्ट त्यांना माहीत होती. पैशाच्या अडचणीमुळे आमचें पत्र बंद होईल असें सरकारास वाटलें नसेल असें नाही; पण, मी आल्यानंतर नवीन स्वार्थत्यागी व चिकाटीची मंडळी मिळूं लागली व आमचा निश्चयही बाहेर जाहीर होऊं लागला. मुंबईतील दक्षिणी लोकांमध्ये 'राष्ट्रमता'बद्दल अभिमान उत्पन्न होऊं लागला. मी व वामनराव जोशी मुंबईच्या गणपती-उत्सवांतून भाषणें करूं लागलों. या सर्व कारणांमुळे आमच्या-बद्दल सहानुभूती वाढत चालली होती आणि पैशाच्या अडचणींतून आम्ही लवकर मुक्त होऊन पत्र स्वावलंबी होण्याच्या मार्गांत होतें.

### *'राष्ट्रमत' बंद करावें लागलें !*

अशी स्थिती येते न येते तोच छापखान्याच्या कायद्यान्वयें दोन हजार रुपये जमानत ठेवण्याबद्दलचा हुकूम आमच्यावर बजावण्यांत आला. पैसे भरण्याची एक महिन्याची मुदत देण्यांत आली. आम्हीं सर्वांनी मिळून विचार केला. दोन हजार रुपये खटपट केली असती तर उभारणें अशक्य होतें असें नाही. पण आम्हीं आखलेल्या धोरणाने पत्र यापुढे चालवणें धोक्याचें होतें. धोरण बदलणें आम्हांला पसंत नव्हतें. धोरण बदलून टिळक येईपर्यंत पत्र चालू ठेवावें असें म्हणणारे कांही लोक आमच्यामध्ये होते. पण मला व नवीन आलेल्यांपैकी बहुतेक सर्वांना हें मान्य नव्हतें. म्हणून पत्र बंद करून 'नॅशनल पब्लिशिंग कंपनी' निकालांत काढावी असें ठरलें. त्याप्रमाणे निरवानिरव करण्याच्या कामाला मी लागलों. यंत्रें, टाईप

व इतर सामान वगैरे विकून लोकांचें सर्व देणें फेडलें. भागीदारांचे किंवा माझे व डॉ. परांजपे यांचे पैसे अर्थात परत मिळाले नाहीत. पण बाहेरच्या लोकांचें मात्र देणें कांही ठेवलें नाही.

घर तीन वर्षांच्या मुदतीच्या करारानें भाड्यानें मनमोहन दासांनी देण्याचें नाकारलें होतें, ही गोष्ट आम्हांला या वेळीं इष्टच झाली. नाही तर हा बोजा माझ्यावर पडला असता. रीतीप्रमाणे मनमोहनदासांना एक महिन्याची नोटीस देऊन आम्ही घर रिकामें करण्याच्या मार्गाला लागलों. पण मनमोहनदास कसले वस्ताद! त्यांनी आमची नोटीस पोंचल्यानंतर आम्हांला उत्तर देऊन कळवलें की, "घराच्या भाड्याचा करार तीन वर्षांचा असल्यानें ती मुदत पुरी होईपर्यंतचें भाडें आमच्यावर पडेल व घराचा ताबाही आमच्याकडेच तोपर्यंत राहील." टिळकांचे स्नेही म्हणवून घेणारे व धनाढ्य शेटजी आमच्या आपत्कालीं असें वर्तन करतील ही कल्पना, आम्हांला नव्हती. वास्तविक आम्हीं घर भाड्यानें घेतलें त्या वेळीं त्यांनी ही गोष्ट नाकबूल केली होती. आमचें बस्तान बरें बसलें असतें तर घरांतून बाहेर काढून टाकण्याची धमकी देऊन, आमच्याकडून जास्ती भाडें उकळण्याचा त्यांचा बेत असावा. पण नुकसान होऊन अथवा इतर कारणानें पत्र बंद होण्याची पाळी आल्यास, तीन वर्षांचा करार आम्हीं केला होता या सबबीवर आमच्यावर उलटावें, असा त्यांचा बेत असला पाहिजे असें स्पष्ट दिसतें. तथापि त्यांनी दिलेल्या धमकीला मीं भीक घातली नाही. अमूक तारखे दिवशीं आम्ही घर रिकामें करून जाऊं, घराची कांही नासधूस झाल्यास आम्ही जबाबदार नाही, तीन वर्षांचा करार मीं किंवा माझ्यामार्फत कोणींही केला नव्हता, अशा अर्थाचें पुन्हा त्यांना पत्र लिहिलें व त्यांना समक्ष भेटून हें प्रकरण सामोपचारानें मिटवावें म्हणून मीं खटपट केली. पण शेटजींनी आमची भेट घेण्याचें टाळलें. त्यांच्या एका कारकुनानें येऊन पुन्हा पहिलीच तीन वर्षांच्या कराराची गोष्ट सांगितली आणि आम्हीं जर ही गोष्ट मान्य केली नाही तर प्रकरण कोर्टांत जाईल अशी धमकी दिली. या बाबतींत पुढे आम्हीं कांही प्रयत्न केला नाही आणि ठरलेल्या तारखेच्या दिवशीं आम्ही घर रिकामें करून निघून गेलों. आम्हीं घर सोडल्यानंतर शेटजींचा कोणी तरी मनुष्य येऊन दारांना कुलपें वगैरे लावून बंदोबस्त करील असें आम्हांला वाटलें होतें; पण तीनचार दिवसपर्यंत तसें कांही झालें नाही. घर तसेंच उघडें होतें. चार दिवसांनंतर घराला कुलपें लावण्यांत येऊन बाहेर 'To Let'ची पाटी लावण्यांत आली.

पैसेवाल्या व्यवहारदक्ष लोकांशीं आमच्यासारख्यांनी वागतांना फार सावधगिरी ठेवली पाहिजे, केवळ देशभक्तीची भावना उपयोगी पडत नाही, असा पुन्हा एकवार मला धडा मिळाला. पूर्वी डेक्कन स्टोअर्स काढतेवेळीं थोडासा असाच अनुभव आला होता. ही दुसऱ्यांदा ठेच लागली. तथापि असा शहाणपणा मिळूनही तिसऱ्यांदा अशाच एका भानगडींत पडण्याचा प्रसंग आला. ती हकीकत पुढे येईल. न विकलेल्या सामानापैकी अजमासें सोळाशें रुपये किमतीचें एक ट्रेडल व हजारबाराशें रुपये किमतीचीं पुस्तकें

एका स्नेह्याजवळ ठेवलीं होतीं. हे स्नेही परदेशीं जाऊन कांही धंद्याचें शिक्षण घेऊन आले होते व देशसेवेच्या गोष्टी आमच्याबरोबर बोलून त्यांनी आमचा विश्वास संपादन केला होता. पुढे कांही दिवसांनी हा माल परत मागितला असतां, "मला अडचण आली म्हणून मला तें सर्व सामान विकावें लागलें" असें उत्तर मिळालें! खरोखर अडचण असती व ती त्यांनी मला कळवली असती, तर ती दूर करण्याचा कांही तरी मार्ग मीं काढला असता. किंवा हें सामान विकल्याशिवाय भागण्यासारखेंच नाही असा प्रसंग दिसला असता तर तें विक्री करण्यालाच मीं सांगितलें असतें. मला पुढे असें कळलें कीं, त्या ट्रेडलचा ते उपयोग करीत होते व बुकें वगैरे सर्व सामान त्यांच्याजवळच होतें!

या प्रमाणें 'राष्ट्रमत' पत्र व 'नॅशनल पब्लिशिंग कं. लि.' या संस्थांचा शेवट झाला. कांहीही करून धोरण बदलूनदेखील संस्था टिकवून ठेवावयाची होती असें कित्येकांना वाटलें. पण आपल्या ध्येयाप्रमाणे जर एखाद्या संस्थेमार्फत काम करतां येण्याजोगें नसेल तर ती संस्था टिकवून कांही उपयोग होत नाही. इतकेंच नव्हे, तर अशा निर्जीव संस्थाच प्रगतीच्या आड येतात हा अनुभव अलीकडे दहापंधरा वर्षांत बऱ्याच ठिकाणीं आला आहे. अशा स्थितींत संस्था बुडवणें हेंच कर्तव्य होऊन बसतें. अंगांत धमक असेल व एखाद्या संस्थेची आवश्यकता असेल तर संस्था उभारण्याला फारसा त्रास पडत नाही. म्हणून निर्जीव झालेल्या संस्थेला टिकाऊ करण्यांत बुद्धीचा, पैशाचा, कालाचा अपव्यय करणें योग्य नाही, हें जाणून मीं व माझ्या मित्रांनी ही लोकमान्यांच्या प्रोत्साहनाने निघालेली व महाराष्ट्राला प्रिय होत चाललेली संस्था बंद केली. कार्याकरिता संस्था आहे, संस्थेकरिता कार्य नाही, हें तत्त्व माझ्यामध्ये पूर्णपणें बाणलें होतें म्हणून मनाला अत्यंत वाईट वाटत असूनही 'राष्ट्रमत' बुडविण्याचें काम मला करावें लागलें. पुन्हा १९२१ सालीं नागपूरच्या कॉंग्रेसमध्ये असहकारितेचा ठराव गांधींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसमध्ये संमत झाल्यानंतर मराठी दैनिकाची जरुरी वाटली. त्या वेळीं नवीन दैनिकाची पुन्हा जुळवाजुळव करण्यांत माझेंही अंग होतें आणि त्या कामांत यश येऊन 'लोकमान्य' दैनिक पत्राची स्थापना झाली. ही हकीकत पुढे येईलच.

या अवधींत दुसऱ्या कित्येक महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्यांचा व माझा संबंध आल्याने त्या गोष्टींचा येथे उल्लेख करणें जरूर आहे.

प्रकरण दहावें

# क्रांतिकारकांशीं संबंध

### *नाशिक येथील क्रांतिकारकांची भेट*

डॉ. वि. म. भटांच्या मार्फत गोपाळराव पाटणकर, अण्णा कर्वे, कृ. गो. खरे यांचीही ओळख झाली होती. भट व खरे यांच्याशीं काका कालेलकरांचा बराच स्नेहसंबंध होता. काका हे फर्ग्युसन कॉलेजमध्ये असतांना त्यांचा व बॅरिस्टर सावरकरांचा परिचय झाला होता. डॉ. भट हे सावरकरांचे नातलग असून त्यांचा चांगला स्नेहही असे. नाशकास कांही तरुण मंडळीची एक संस्था असून स्वातंत्र्याकरिता तिचे प्रयत्न चालू आहेत, ही गोष्ट मला ऐकून माहीत होती. १९०६ मध्ये टिळक बेळगावास आले होते त्या वेळीं त्यांनी मला नाशिकच्या मंडळीसंबंधाने थोडी हकीकत सांगून बेळगावच्या तरुण मंडळींविषयीं जपण्याबद्दल कळवलें होतें, हें मागे सांगितलेंच आहे. विनायकराव सावरकरांनी मॅझिनीचें चरित्र मराठींत लिहिलें होतें. तें मीं वाचलें होतें व त्यांतील कांही भाग मी मुलांना शिकवीत होतों. त्यामुळे नाशिक येथील मंडळीच्या मार्गासंबंधाने थोडीथोडी कल्पना मला होती; तथापि त्यांच्या कार्याची माहिती मला नव्हती. भट वगैरे मंडळींचा परिचय झाल्यानंतरदेखील त्यांनी मला सर्वस्वी आपल्या विश्वासांत घेतलें होतें असें नाही. स्वातंत्र्य हें ध्येय व तें मिळवण्याचें साधन सशस्त्र युद्ध, असें मत नाशिकच्या मंडळीचें होतें, यापलीकडे मला माहिती नव्हती. जेव्हा आम्ही या गोष्टीबद्दल चर्चा करीत होतों त्या वेळीं सशस्त्र प्रतिकाराला साधनें आमच्याजवळ नाहीत, त्यामुळे हा मार्ग कठीण आहे, असें मी प्रतिपादन करीत होतों. जुन्या पद्धतीच्या बंदुका व तलवारी वगैरे कोठेकोठे मिळत असल्या तरी त्यांचा उपयोग आधुनिक कालांत कांहीच नाही असें मला वाटे. शिवाय केव्हा तरी एखाद्या गोऱ्या अधिकाऱ्यावर अत्याचार केल्यास आपलें कार्य सिद्धीला जाईल असेंही वाटत नव्हतें. इंग्रज लोक अत्यंत स्वार्थी असून आपला स्वार्थ साध्य करून घेण्याकरिता

न्याय-अन्याय, नीती-अनीती इत्यादींकडे न पाहतां वाटेल तीं दुष्कृत्यें करण्यास तयार होतात असें माझें मत होतें. पण ते भ्याड नाहीत अशी माझी खात्री होती. शिवाय हिंदुस्थानावर त्यांचें सर्व सुख अवलंबून असल्यामुळे हिंदुस्थान आपल्या हातून गमाविण्यापूर्वी ते आपली शिकस्त करतील अशी माझी पूर्ण खात्री होती. म्हणून सशस्त्र प्रतिकार खेरीज दुसरा मार्ग जरी दिसत नव्हता तरी साधनांच्या अभावीं हा मार्ग मला जवळजवळ अशक्य कोटींतला वाटत होता. तथापि, त्या मार्गाने प्रयत्न करणाऱ्यांना परावृत्त करणें हें माझें कर्तव्य आहे, असें मला त्या वेळीं वाटत नव्हतें; पण त्या प्रयत्नांत स्वतः कांही भाग घ्यावा असेंही वाटत नव्हतें.

अशा स्थितींत मीं असतांना वर सांगितलेल्या मंडळीचा व माझा परिचय झाला होता. एकदा नाशिकला जाऊन तेथील मंडळीची भेट घ्यावी असें माझ्या मनांत आलें. डॉ. भटांना हें मी कळवलें. त्यांनी आमचा जाण्याचा दिवस वगैरे ठरवला. व त्यांचेबरोबर मी काका पाटील असे नाशिकाला गेलों. तेथे बाबासाहेब खरे यांचे घरीं उतरलों होतों. रात्रीं कांही मंडळीची व आमची भेट झाली. मंडळींत दादासाहेब गद्रे, अकूत, वगैरे मंडळी होती. सर्वसाधारणपणें बोलणें झालें. नाशिकास एक गुप्त मंडळी असल्याचें समजलें. दुसरे दिवशीं तेथील गोविंद कवीच्या कविता आम्हांला ऐकवण्यांत आल्या. त्या अत्यंत स्फूर्तिदायक वाटल्या. स्वातंत्र्याप्रीत्यर्थ तनमनधनेंकरून प्रयत्न करण्याच्या प्रतिज्ञा आमच्याकडून बाबासाहेब खरे यांनी घेतल्या; अशा प्रकारच्या प्रतिज्ञा घेतलेले महाराष्ट्रांत पुष्कळ लोक आहेत असें आम्हांला सांगण्यांत आलें. अशा प्रकारची प्रतिज्ञा घेतल्याने आमचा नाशिकच्या मंडळींत जरी समावेश झाल्याप्रमाणे झालें होतें तरी अंतःस्थ आणखी कांही मंडळी असावी असें आम्हांला वाटलें. पण त्यांत काय चाललें होतें व त्यांचा कार्यक्रम काय होता हें आम्हांला कळवण्यांत आलें नाही व आम्हींही त्याबद्दल चौकशी केली नाही. देशाच्या स्वातंत्र्याकरिता ठिकठिकाणीं लोकांना प्रोत्साहन देऊन त्यांना कामाला लावणें हाच एक सर्वसाधारण हेतू आमच्यापुढे मांडण्यांत आला. याप्रमाणे माणसें तयार करण्याचें काम संपल्यानंतर कोणत्या उपायांचा अवलंब करावयाचा हें ठरावयाचें होतें. बॅ. सावरकर यांचे वडील बंधू बाबासाहेब सावरकर यांची याच वेळीं ओळख झाली असें मला आठवतें.

नाशिकाचें काम संपल्यानंतर बाबासाहेब खरे यांचेबरोबर आम्ही नगरला गेलों. नगर येथे बाळासाहेब देशपांडे यांचे घरीं उतरलों होतों व नगरला जाण्यांत बाळासाहेबांनाच भेटण्याचा मुख्य हेतू होता. बाळासाहेब देशपांडे हेही स्वदेशीच्या व बहिष्काराच्या चळवळींत प्रामुख्याने भाग घेत असत. त्यांचा व खरे यांचा विशेष स्नेह होता. त्यांना मी साधारणपणें ओळखीत होतों. बाबासाहेबांना त्यांनी थोडक्यांत सर्व हकीकत कळवली व स्वातंत्र्याखेरीज देशाचें हित होणार नाही याकरिता तें मिळवण्याचा प्रयत्न करण्याबद्दलची प्रतिज्ञा करण्याबद्दल बाळासाहेबांना आग्रह केला. बाळासाहेब बराच वेळ विचार करीत होते. त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांच्यावर हा बाबासाहेबांचा एक अचानक

हल्ला झाला असें त्यांना वाटत असावें असें दिसत होतें. पण बाबासाहेबांनी आपलें बोलणें सारखें चालूच ठेवलें होतें व शेवटीं पहाटे साडेपाचच्या सुमारास बाळासाहेबांनीं प्रतिज्ञा केली. बाबासाहेब त्यांना कडकडून भेटले व आपला पंथ नगर जिल्ह्यांत वाढवण्याबद्दल खटपट करण्यास सांगून आम्हीं त्यांचा निरोप घेतला. बाबासाहेब नाशिकाला गेले व आम्ही मुंबईला परत आलों.

### *वासुदेवराव कुलकर्णी यांची थाप*

पुण्याच्या मंडळीपैकी बेळगाव जिल्ह्यापैकी सौंदलग्याचे वासुदेवराव कुलकर्णी व ब्रह्मगिरीबुवा हे मला भेटले होते. वासुदेवराव कुलकर्णी हे एल्एल्. बी. झाले होते. एल्एल्. बी. झाल्यानंतर त्यांच्या मनांत बेळगावाला वकिली करावयाची होती. पुण्यास असतांना त्यांची व टिळकांची ओळख झाली होती. माझ्याकडे टिळकांकडून ओळखीकरिता म्हणून त्यांनी एक पत्र आणलें होतें. बेळगावास हे गृहस्थ वकिली करण्याकरिता येत आहेत, त्यांना शक्य ती मदत करावी, असा मजकूर या पत्रांत होता. मीं पत्र वाचल्यानंतर टिळकांची व यांची कितपत ओळख आहे याबद्दल त्यांना थोडे प्रश्न विचारले. पण टिळकांची व त्यांची फारशी ओळख नसल्याचें मला दिसून आलें. त्यांना तालमीचा नाद असून ते शरिराने धिप्पाड होते. पुण्यांत असतेवेळीं ते तालमींत जात असत व गणपती-उत्सवांत वगैरे त्यांचा सल्ला घेत असत. अशा एखाद्या तालमीच्या मार्फत कुलकर्णी यांनी हें पत्र टिळकांकडून मिळवलें असावें. पत्र वाचून पाहिल्यानंतर मीं "शक्य ती मदत करीन" असें त्यांना सांगून पाठवलें. यापेक्षा, यांची ओळख जास्ती नव्हती. पुढे 'राष्ट्रमत' ऑफिसमध्ये ते एकदा आले होते. 'राष्ट्रमता'ला यांनी पैशाच्या दृष्टीने कांही मदत केली होती असें मला समजलें. पुण्यांत सार्वजनिक कामाला त्यांची नेहमी मदत असते असेंही मला कुलकर्णी यांनी सांगितलें. इकडच्यातिकडच्या गोष्टी चालल्या असतां टिळकांच्या शिक्षेचा विषय निघाला. त्या वेळीं टिळकांच्यावर खटला भरण्यांत व इतकी जबर शिक्षा देवविण्यांत गोखल्यांचें अंग होतें व त्यांच्याच सांगण्यावरून हा प्रसंग आला असें ते मला सांगू लागले. ही गोष्ट मला खोटी वाटली. माझ्या खात्रीकरिता त्यांनी एक हकीकत सांगितली. ती अशी.

टिळकांवर खटला होण्यापूर्वी मुंबईचे गव्हर्नर सिडेनहॅम क्लार्क यांची एक तार स्टेट सेक्रेटरींना 'कोड' मध्ये गेली होती. त्या तारेंत 'टिळकांवर खटला करून त्यांना जबर शिक्षा दिल्याखेरीज हिंदुस्थानांत शांतता होणार नाही, असें गोखल्यांचें म्हणणें आहे, याकरिता खटला करण्याकरिता संमती द्या' असा मजकूर होता असें ते म्हणाले. अर्थात ही तार मिळाली कशी व ती 'कोड' मध्ये असल्याने तिचा उलगडा झाला कसा, वगैरे प्रश्न साहजिकच मीं उपस्थित केले. मुंबईच्या तारऑफिसमध्ये एक महाराष्ट्रीय गृहस्थ असून ते टिळकांचे भक्त आहेत, त्यांच्यामार्फत ही बातमी आपल्याला लागली,

असें त्यांनी सांगितलें. त्या गृहस्थाचें नाव मीं विचारलें; पण त्यांनी तें सांगितलें नाही. त्या गृहस्थाची व माझी भेट करण्याबद्दल मीं त्यांना पुष्कळ सांगून पाहिलें; पण त्याचा उपयोगही झाला नाही. टिळकांचें व गोखल्यांचें बरें नव्हतें ही गोष्ट प्रसिद्धच होती. पण तेवढ्याकरिता गोखल्यांच्याकडून अशा प्रकारचें कृत्य घडलें असेल, ही कल्पना माझ्या मनाला खरी वाटली नाही. आणि ज्या आधारावर ही बातमी उभारली होती तो आधार तर मला मुळींच खरा वाटला नाही. पण पुण्यांत व मुंबईत या बातमीचा प्रसार होऊं लागला होता, असें मला पुढे आढळून आलें. कुलकर्णी यांना ही बातमी देऊन कोणी तरी फसवीत असावें किंवा हे स्वतःच आपल्या अकलेने ही बातमी उठवीत असावेत असें मला वाटलें. यानंतर पुन्हा कुलकर्णी यांची भेट झाली. त्या वेळीं ही बातमी खरी असल्याबद्दल आपण खात्री करून घेतली आहे असें सांगून याबद्दल गोखल्यांना ठार मारण्याचें ठरवलें आहे असें ते म्हणाले. मी अगदी चपापलों व त्यांनी किंवा त्यांच्या माहीतगारांपैकी कोणीं तसा प्रयत्न करूं नये असें मीं निक्षून सांगितलें. तेव्हापासून कुलकर्णीसंबंधाने माझें मत कलुषित झालें व हा गृहस्थ एक थापाड्या आहे अशी माझी समजूत झाली.

## गोखल्यांची फिर्याद

पुण्यास गोखल्यांच्या विरुद्ध लोकमत बरेंच प्रक्षुब्ध झालें होतें. त्या वर्षाच्या गणपती-उत्सवांत टिळकांवर बरींच पदें म्हटलीं जात असत. त्याचप्रमाणे गोखल्यांसंबंधाने निंदाव्यंजक पदें रचण्यांत आलीं होतीं व तीं बरीच लोकप्रिय झालीं होतीं. 'सन्मित्रसमाज' या नावाचा एक मेळा त्या वेळीं प्रसिद्ध होता. त्या मेळ्यातर्फे हीं पदें म्हटलीं जात व त्याच्यातर्फेच या पदांचें एक लहानसें पुस्तकही छापून प्रसिद्ध झालें होतें. कांही पदांतून गोखल्यांवर अत्याचार करण्याला चिथावणी करण्याचा अर्थ निघत होता व पुष्कळ पदांतून गोखल्यांची निर्भर्त्सना होती. या कारणावरून गोखल्यांनी पुण्याच्या मॅजिस्ट्रेट कोर्टात पुस्तकप्रकाशकांवर फौजदारी फिर्याद लावली. पुण्याचे भिडे नावाचे वकील हे या पुस्तकाचे प्रकाशक होते. पदें करणारे कोण होते हें मला माहीत नाही. बहुतेक तेच असावेत असा आम्हीं तर्क केला होता. नुसती अब्रूनुकसानीची फिर्याद असती तर गोष्ट निराळी होती. पण याबरोबरच खुनाला उत्तेजक अशीं पदें होतीं असें फिर्यादीवरून दिसत होतें. म्हणून खटल्याला भयंकर स्वरूप येण्याचा संभव होता. याकरिता पुण्यांतील कांही मंडळी मुंबईला आली व बॅ. बॅप्टिस्टा यांच्याकडे भिडे यांच्या बचावाचें काम सोपवण्याचें ठरल्याचें त्यांनी मला सांगितलें. बॅप्टिस्टांचा आणि काका पाटलांचा व माझा बराच स्नेह जमला होता. म्हणून आम्ही बॅप्टिस्टांकडे गेलों व त्यांना सर्व हकीकत कळवून त्यांनी हें काम चालवावें असें ठरविलें. आम्हीं देऊं ती फी घ्यावी असा करार केला होता. बॅप्टिस्टानी आमचें म्हणणें मान्य केलें व मुदतीच्या दिवशीं ते पुण्याला गेले. कांही कारणाने दुसरी मुदत पडली.

पण त्यापूर्वीच भिडे यांनी कोर्टाला माफी मागून हें प्रकरण मिटवण्याचें ठरवलें होतें. मात्र ही गोष्ट त्यांनी किंवा त्यांच्या स्नेह्यांनी आम्हांला किंवा बॅप्टिस्टांना कळवली नव्हती. त्यामुळे बॅप्टिस्टांना आम्हीं दुसऱ्या मुदतीच्या दिवशीं पुण्याला पाठवलें. पण खटला निघाल्याबरोबर माफी दाखल झाली, गोखल्यांनी ती मान्य केली व फिर्याद काढून घेण्याची परवानगी मागितली. कोर्टाने परवानगी दिली व हें प्रकरण मिटलें. सरकारच्या दडपशाहीमुळे लोकांमध्ये इतकी भीती उत्पन्न झाली होती की, अशा प्रकारच्या खटल्यांत वकीलपत्र घेण्याला वकील लोक भीत असत. पण बॅप्टिस्टा हे नेहमी धैर्याने पुढे येऊन कामें करीत असत. फी वगैरेचीदेखील ते विशेष पर्वा करीत नसत. वस्तुतः पाहतां त्यांचा व आमचा फारसा संबंध होता अशांतील गोष्ट नव्हती. आमच्या राजकारणांत ते होते असेंही नाही. केवळ सुरतेच्या बखेड्यासंबंधाने टिळकांच्या तर्फे एक लेख लिहिल्यामुळे टिळकांची व त्यांची ओळख; पण तेवढ्यावरून टिळकांनी त्यांचा स्नेह संपादन केला होता. सुरतेनंतर त्यांच्या वरील खटल्याला फारसा वेळ गेला होता असें नाही. तथापि हा मनुष्य संग्रहाला योग्य आहे असें टिळकांना वाटलें व त्यांनी आपला संबंध कायम ठेवला. टिळकांच्या खटल्याच्या वेळीं ते आपला सल्ला देत. पुढे नाशिक, कोल्हापूर, कुरुंदवाडपैकी वडगाव येथे कटाचे वगैरे पुष्कळ खटले झाले. त्या वेळीं बॅप्टिस्टांनी कामें चालवून बरीच मदत केली. टिळक कैदेंतून सुटून आल्यानंतर पाचसहा वर्षें त्यांचा व टिळकांचा बराच स्नेह वाढला व राष्ट्रीय पक्षाच्या राजकारणांत त्यांनी प्रमुख भाग घेतला होता. ही हकीकत पुढे येईलच. टिळकांच्या नंतर महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाच्या मंडळींनी त्यांचा स्नेहसंबंध टिकवला नाही, इतकेंच नव्हे तर ते कौन्सिलच्या निवडणुकीकरिता उभे राहिले असतां त्यांना मदत केली नाही, यामुळे त्यांना फार वाईट वाटत असे. अखेरीस त्यांनी राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें.

## जॅकसनसाहेबाचा खून

नाशिकच्या मंडळीपैकी अण्णा कर्वेही आमच्याकडे येत असत असें वर आलेंच आहे. पुष्कळ मंडळीशीं आमचा वादविवाद होत असे. पण कर्वे हे अगदी मितभाषी होते व आपलें अंतःकरण सहसा परक्यापुढे खुलें करीत नसत. निदान माझा त्यांच्याविषयी असा ग्रह झाला होता. १९०९ सालच्या अखेरीस ते एकदा माझ्याकडे आले, व "आता माझ्याने राहवत नाही, मी कांही तरी करणार" अशा अर्थाचे शब्द त्यांनी मोठ्या गंभीरपणाने उच्चारले. त्यांच्या बोलण्यांत निश्चितपणा स्पष्ट दिसत होता. कधीही आपल्या मनांतील गोष्टी न बोलणारे याच प्रसंगीं इतक्या निश्चितपणाने बोलूं लागले, त्यामुळे त्यांचा कांही तरी बेत ठरला असावा, असें मला वाटून तो बेत जाणण्याची मला इच्छा झाली. मी त्यांना खोदून-खोदून विचारूं लागलों. पण त्यांनी कांही न सांगतां, "काय होणार आहे तें लवकरच दिसेल" असा जबाब दिला व थोड्या वेळाने निघून गेले.

पुढे थोड्याच दिवसांनी नाशिकास थिएटरमध्ये रात्रीं जॅकसनसाहेब कलेक्टर यांचा पिस्तुलानें खून झाल्याची बातमी आली. दोनचार दिवसांनंतर कर्वे वगैरे मंडळींना पकडल्याचें समजलें. हें कृत्य अत्यंत वाईट झालें असें मला वाटलें. जॅकसन बेळगावास कलेक्टर होते, त्या वेळीं म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष म्हणून मला त्यांची माहिती होती. शिवाय त्यांच्या कोर्टांत मीं वकील या नात्यानें कामही केलें होतें. त्यामुळे ते अत्यंत सभ्य होते, इतकेंच नाही तर ते न्यायप्रिय होते, असा माझा त्यांच्याबद्दल ग्रह झाला होता. आमच्या भागांत त्यांचा लौकिकही तसाच होता. नाशिकासही ते लोकप्रिय होते. अशा माणसाचा खून हें गौडबंगाल काय आहे याचा मला उलगडा होईना. कर्व्यांचा संबंध या खुनाशीं आहे असें समजल्यानंतर जास्तीच वाईट वाटलें. ही गोष्ट कर्व्यांनी मला कळवली असती तर नाना प्रकारच्या प्रयत्नांनी त्यांचें मन वळवून मीं त्यांना या कृत्यापासून परावृत्त केलें असतें असें मला वाटूं लागलें. खुनासारखे अत्याचार करणें चांगलें किंवा वाईट हा तात्त्विक प्रश्न एकीकडे ठेवला, तरी जॅकसनसारख्या सभ्य व न्यायप्रिय माणसाचा खून करणें हें अगदी वाईट, असेंच मला वाटून व्यक्तींचे खून करण्यांत कशा चुका घडतात याचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर आलें, आणि हा मार्ग चुकीचा आहे असें जें माझें पहिल्यापासून मत होतें तेंच दृढ झालें. उघड युद्ध करण्याचा केव्हा तरी प्रसंग येणार, त्याशिवाय गत्यंतर नाही, म्हणून त्याबद्दलची तयारी करण्यास हरकत नाही. पण अशा प्रकारच्या अत्याचारापासून फायदा न होतां नुकसानच आहे, असें मला निश्चयपूर्वक वाटूं लागलें.

## पकडापकडी आणि कबुलीजबाब

पुढें पकडापकडीला सुरुवात झाली. कबुलीजबाब आरोपी लोक देऊं लागले आहेत अशाही बातम्या येऊं लागल्या. विलायतेहून सावरकरांच्या मार्फत कांही रिव्हॉल्व्हरें आलीं होतीं व त्यांपैकीच एका रिव्हॉल्व्हराचा उपयोग होऊन जॅकसनसाहेबाचा खून झाला असें समजलें. अर्थात सर्व रिव्हॉल्व्हरांचा पत्ता लावल्याखेरीज पोलिसांना गत्यंतर नव्हतें. म्हणून ज्यांचा ज्यांचा संबंध या प्रकरणाशीं आला त्यांना पकडण्यांत आलें. माझ्या ओळखीपैकी भट, खरे, पाटणकर यांनाही पकडलें. खरे यांना पकडण्यापूर्वी दोनतीन तास ते 'राष्ट्रमत' ऑफिसांत नेहमीप्रमाणे आले होते. त्यांना पकडलें असें कळल्यानंतर, कशाकरिता पकडलें व त्यांना कोठे नेण्यांत आलें याबद्दलची चौकशी करण्याकरिता काका कालेलकर हे एस्प्लेनेड पोलीस कचेरीकडे गेले. खरे यांची चौकशी करण्याकरिता आलेल्या मनुष्याचा नाशिक प्रकरणाशीं कांही तरी संबंध असावा असा पोलिसांना संशय आला; व काकांना त्यांनी तीनचार तासांपर्यंत पोलीस कचेरींत बसवून ठेवलें. त्यानंतर त्यांचें नाव, गाव, पत्ता वगैरे सर्व टिपून घेऊन त्यांना सोडण्यांत आलें. ते बिऱ्हाडीं आले. त्यांच्यावर कांही दिवस टेहळणी होती. पकडलेल्यांपैकी बहुतेकांनी कबुलीजबाब दिल्यामुळें रिव्हॉल्व्हरें कोठून व कशीं आलीं,

तीं कोठे कोठे आहेत, कोणत्या कोणत्या माणसांचा कितपत संबंध आहे, या सर्व गोष्टी खुलासेवार बाहेर आल्या. 'राष्ट्रमत' ऑफिसावर टेहळणी असल्यामुळे व पकडलेल्या मंडळींतील कांहींचा माझ्याशीं चांगला परिचय असल्यामुळे या प्रकरणाचा संबंध माझ्यापर्यंत येऊन पोचतो कीं काय, अशी शंका आली होती. वास्तविक नाशिकच्या मंडळीच्या अंतःस्थ कारभारांत माझा कोणताच संबंध नव्हता, तेव्हा माझ्यापर्यंत हा संबंध येऊन पोचण्याचें कांही कारण नव्हतें; पण (conspiracy) कटाचा एक मोठा खटला करून महाराष्ट्रांतील संशयित लोकांना अडकवून टाकण्याला मिळालेली ही संधी पोलीस दवडणार नाहीत असें मला वाटत होतें व तशा प्रकारच्या बातम्याही कानावर येत होत्या. याच सुमारास पुण्यास ब्रह्मगिरीबुवा वगैरे मंडळींना पकडण्यांत येऊन कांही रिव्हॉल्व्हरें सापडल्याचें समजलें. त्याच वेळीं कुरुंदवाड येथे मुनसफीच्या कामावर असलेले वासुदेवराव कुलकर्णी—ज्यांच्या संबंधाने पूर्वी उल्लेख आलेला आहे—त्यांनाही पकडल्याची बातमी लागली. क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन खात्याचे मुख्य अधिकारी गायडर यांनी चौकशीचें काम चालविलें होतें. त्यांच्या हाताखाली त्यांच्या मदतीकरिता बाबासाहेब देशपांडे, सदावर्ते, कामठे, कोगजे वगैरे अधिकारी होते. पकडलेल्या लोकांना नाशिकास पेशव्यांच्या वाड्यांत ठेवूनच चौकशीचें काम चाललें होतें.

### *गायडरने केलेली चौकशी*

एके दिवशीं 'राष्ट्रमत' कचेरींत सदावर्ते हे आले व त्यांनी माझ्यावर पुण्यास गायडर यांचेसमोर हजर राहण्याबद्दलचें समन्स बजाविलें. त्या दिवशीं 'राष्ट्रमत' कचेरीवर व विशेषतः माझ्या हालचालींवर नजर ठेवण्यांत आली होती. काका पाटील व बॅप्टिस्टा यांना मी भेटलों व पुण्यास जर मला अटक झाली तर काय तजविजी योजावयाच्या या बाबतींत ठरविलें. मी कोणत्या गाडीने निघणार याची चवकशी सदावर्ते यांनी केली व त्याच गाडीने माझ्याबरोबरच आपण येणार असें कळवलें. या सर्वांचा अर्थ माझी अर्धीकची अटकच असा मीं केला आणि रात्रीच्या गाडीने पुण्याला गेलों. माझ्या नेहमीच्या उतरण्याच्या जागीं म्हणजे बाळासाहेब जोग यांच्या बिऱ्हाडीं गेलों. बरोबर हरिभाऊ फाटक होते. जोगांच्या घरावर पहारा ठेवण्यांत आला. घराकडे वडिलांना पत्र लिहून, झालेली सर्व हकीकत कळवून मला अटक झाल्यास काका पाटलांना व बॅप्टिस्टांना भेटण्यास सांगितलें. बिऱ्हाडीं स्नान करून चहा घेत होतों, इतक्यांत गाडी घेऊन सदावर्ते मला गायडरकडे घेऊन जाण्याकरिता आले. त्यांच्या बरोबर त्यांनी आणलेल्या टांग्यांतूनच मी निघालों. वाटेंत सदावर्ते हे "गायडरसाहेब फार न्यायी व दयाळू आहेत. खरी हकीकत सांगितल्यास तुमच्या केसालादेखील धक्का लागणार नाही. इतकेंच नव्हे तर तुमच्याकडून हकीकत समजली या गोष्टीची परिस्फुटता देखील होणार नाही" वगैरे गोष्टी सांगत होते. मुकाट्याने ऐकून घेतल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. जॅकसनच्या खुनाशीं माझा कांहीच संबंध नसल्याने माझ्यावर ही संक्रांत कां, याच विचारांत मी होतों.

अशा स्थितींत गायडरच्या बंगल्यांत मला नेण्यांत आलें. मला बसवून सदावर्ते साहेबाच्या खोलींत गेले. मी बसलेल्या ठिकाणापासून दहापंधरा पावलांवर पोलीस होतेच. सदावर्ते व गायडर यांचें बोलणें होऊन ते दोघेही बाहेर आले. गायडरनी हसून "तुम्हांला तसदी दिल्याबद्दल वाईट वाटतें" असें म्हणून बोलण्याला प्रारंभ केला. माझी व वासुदेवराव कुलकर्णी यांची ओळख आहे काय, असा पहिला प्रश्न त्यांनी विचारला. मीं "होय, आहे." असें उत्तर दिलें. प्रश्नाला उत्तर देण्यापलीकडे अघळपघळ कांही बोलून गायडरला चकवण्याचा प्रयत्न करावयाचा नाही, असें मीं मनाने ठरवलें होतें. अघळपघळ विनाकारण न विचारलेल्या गोष्टी सांगण्यांतच कांही तरी चुका होतात, व त्यामुळे दुसऱ्यांना चकवण्याचें एकीकडे राहतें व स्वतःवरच कांही तरी प्रसंग ओढवला जातो, हें मला दुसऱ्या कित्येकांच्या अनुभवावरून माहीत होतें. म्हणून प्रश्नाला उत्तर देण्यापुरतेंच बोलणें श्रेयस्कर, असें मीं ठरवलें होतें. हा पहिला प्रश्न व जबाब झाल्याबरोबर सदावर्ते यांना गायडरनीं कुलकर्णी यांना शेजारच्या खोलींत आणून बसवण्याबद्दल सांगितलें. त्याप्रमाणे करण्याकरिता सदावर्ते बाहेर गेले. सदावर्ते गेल्यानंतर वासुदेवरावांना आणलें असावें व त्यांनी सांगितलेल्या हकीकतींत व मीं सांगणाऱ्या हकीकतींत कांही तफावत आल्यास प्रत्यक्ष त्यांना माझ्यासमोर आणून, उभें करून, पडताळा घ्यावा असा त्यांचा विचार असावा असें मला वाटलें. खरोखर वासुदेवरावांना बंगल्यांत आणलें होतें की हें नाटक होतें, हें मला अद्यापिही माहीत नाही. दोन्ही गोष्टी संभवनीय आहेत. वासुदेवरावांच्या कबुलीजबाबावरून पुण्यास कांही धरपकडी झाल्या होत्या हेंही बाहेर आलें होतें. गायडरनी वासुदेवरावांच्या सरळपणाची माझ्यापुढे स्तुती केली व माझी आणि त्यांची ओळख प्रथम कशी झाली असें विचारलें. वासुदेवराव बेळगावास वकिली करण्याच्या उद्देशाने आले असतां माझी व त्यांची ओळख झाली, असें मीं सांगितलें. यानंतर गायडरनीं थोडें हसल्यासारखें करून "ओळखीकरिता कोणाचें तरी शिफारसपत्र आणलें होतें काय" असें विचारलें. माझ्या लक्षांत सर्व प्रकार आला आणि वासुदेवराव आमच्याच जिल्ह्यांतील रहिवासी असल्याने शिफारसपत्र आणण्याची जरुरी नव्हती व तसें आणल्याचें आठवत नाही, असें मीं उत्तर दिलें. आणलें असेल तर असेल, ध्यानांत ठेवण्यासारखें कांही नाही, असेंही मी म्हणालों. 'राष्ट्रमत' कचेरींत वासुदेवराव तुम्हांला भेटले होते किंवा नाही, असा तिसरा प्रश्न त्यांनी केला. दुसऱ्या कोणालाही न गुंतवितां स्वतःपुरतें काय होईल हें पाहण्याचा मीं विचार केला होता. म्हणून "भेटले होते" असें उत्तर दिलें. यानंतर 'राष्ट्रमत' कचेरींत आणखी कोणकोण मंडळी येत होती, असा प्रश्न केला. त्याला मीं मोघमच उत्तर दिलें व राष्ट्रीय पक्षाची पुष्कळच लहानमोठी मंडळी येत असत, माझ्याचकडे येत असत असें नाही, सर्वांचीं नावें सांगतां येणार नाहीत, वगैरे गोष्टी सांगितल्या. तथापि मुद्दयाचें बोलणें अद्यापि कांहीच निघालें नव्हतें.

अशाच इकडच्यातिकडच्या गोष्टी निघाल्यानंतर व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांच्यावर

बॉंब टाकण्याचा प्रयत्न झाला होता, या गोष्टीकडे गायडर वळले, आणि "असें कृत्य बरें काय?" असा प्रश्न मला केला. "अर्थात् नाही" असें मीं त्याचें उत्तर दिलें. "तुमचें मत तसें असलें, तरी हें कृत्य कोणीं केलें हें तुम्हांला माहीत आहे, असें तुमचे स्नेही वासुदेवराव यांच्या सांगण्यावरून आम्हांला समजलें आहे. तर कोणीं बॉंब फेकला हें तुम्हीं आम्हांला सांगितल्यास तुमचे आमच्यावर फार उपकार होतील" असें ते बोलले. यावरून गाडी दुसऱ्या रुळावर चालली असें मला वाटलें. मनांतील धुगधुग कमी झाली. या त्यांच्या प्रश्नांत खरेपणाचा कांहींच अंश नसल्याने मला जास्ती धैर्याने उत्तर देतां आलें. इतकेंच नव्हे, तर "आपले स्नेही वासुदेवराव येथेच आहेत असें तुमच्या बोलण्यावरून मला वाटलें; याकरिता ते असतील तर त्यांना बोलवा व त्यांना ही माहिती कशी व केव्हा लागली याचा पत्ता आपण काढूं" असें मी बोललों. हें माझें बोलणें ऐकून व माझ्या बोलण्यांतील स्पष्टपणा लक्षांत आणून गायडरनी आपला मोर्चा फिरवला व "तुम्हांला हें माहीतच असेल असें माझें म्हणणें नाही; पण तुम्ही मुंबईसारख्या मध्यवर्ती शहरांत असल्यामुळे व टिळकांचा व तुमचा विशेष संबंध होता त्यामुळे अशीं कृत्यें करण्याकडे ज्यांचा कल आहे असे अनेक लोक तुम्हांला येऊन भेटतात. त्यामुळे तुम्हांला हें कृत्य कोणीं केलें असावें हें माहीत असण्याचा संभव आहे. तसा संशय जर कोणाविषयी तुम्हांला येत असेल तर तसें सांगा" अशा अर्थाचे शब्द त्यांच्या तोंडून निघाले. "हा सर्व तर्क निराधार आहे व याबद्दलची मला कांहीच माहिती नाही" असें निश्चयात्मक स्वराने मीं उत्तर दिल्यावर गायडरनी मला निरोप दिला व जरूर पडल्यास पुन्हा बोलावणें पाठवूं असें सांगितलें. गायडर व सदावर्ते यांचें आणखी कांही बोलणें झाल्यानंतर सदावर्ते यांची पुन्हा गाठ पडली. सकाळीं घडलेल्या प्रकाराबद्दलचें सर्व श्रेय त्यांनी आपल्या वाट्याला घेण्याचा प्रयत्न केला व पुन्हा बोलावणें येण्याचा संभव नाही असेंही आश्वासन त्यांनी मला दिलें. पुण्यास एक दिवस जास्ती राहून मी परत मुंबईस आलों.

## बॅ. विनायकराव सावरकर

पुढे नाशिकच्या प्रकरणाबद्दल खुनाबाबतचा खटला चालून कर्वे, कान्हेरे, देशपांडे या मंडळींस फाशीची शिक्षा झाली. कटाचा दुसरा खटला चालू झाला. सावरकरांना कोणत्या स्थितींत व कोणत्या प्रकारें पकडलें ही हकीकत प्रसिद्धच आहे. मला त्यांच्या धैर्याबद्दल व शिताफीबद्दल अत्यंत आदर वाटूं लागला. 'राष्ट्रमतां'त सागराला उद्देशून त्यांनी केलेली एक कविता प्रसिद्ध झाली होती. कोल्हापूरकडील एका शास्त्रयांनी या कवितेला उत्तर म्हणून एक कविता प्रसिद्ध केली होती. त्यांचें मॅझिनी यांचें चरित्रही मीं वाचलें होतें. त्याचप्रमाणे त्यांचें १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या हकीकतीचें पुस्तक मला वाचावयाला मिळालें होतें. पुण्यांत फर्ग्युसन कॉलेजांत असतांना व विलायतेला गेल्यानंतर त्यांनी केलेली कामगिरी त्यांच्या मित्राकडून मला समजली होती. या सर्व कारणांमुळे त्यांच्याविषयी पूज्यभाव माझ्या मनांत उत्पन्न झाला

व अद्यापि बोटींतून निसटून जाण्यांत त्यांनी जें साहस केलें त्याबद्दल मला अभिमान वाटतो. पण कांही कारणामुळे पूर्वींचा पूज्यभाव तितकासा राहिला नाही, ही गोष्टही नाकबूल करवत नाही. पण या गोष्टी अप्रस्तुत असल्यामुळे त्याबद्दल अधिक विस्तार न करणें हेंच बरें.

### *नाशिकचा खटला व बॅ. बॅप्टिस्टा*

नाशिकच्या खटल्यांतील आरोपींच्या बचावा-संबंधाने कांही खटपट करावी असें माझ्या मित्रांच्या मनांत येऊन बॅप्टिस्टांजवळ मीं गोष्ट काढली. त्यांनी तत्काळ मान्यता दिली. त्यांच्या मेहनतीबद्दल फूल नाही फुलाची पाकळी तरी द्यावी, असें आमच्या मनांत आलें आणि उघड रीतीने फंडाची मागणी करावी असें ठरलें. व्यक्तिशः आम्हीं मागण्या करण्यापेक्षा एखाद्या वृत्तपत्रद्वारें मागणी केल्यास जास्ती पैसे मिळतील, असें आम्हांस वाटून एका पत्राकडे आम्हीं ही सूचना केली. पण वृत्तपत्रांतून जाहीर रीतीने फंड जमा करण्याचें काम केल्यास पत्राला धोका येण्याचा संभव आहे, असें त्या पत्राचें मत असल्याचें समजल्यावरून आमच्या पत्रांतूनच आम्हीं जाहीर रीतीने मागणी केली. फार पैसे जमले नाहीत; पण जितके जमले तितके बॅप्टिस्टांना देण्यांत आले. त्यांनी सर्व कामें आनंदाने चालवलीं. निकाल ठरल्याप्रमाणेच झाला व तो प्रसिद्धच आहे.

हा खटला चालल्या वेळीं मी एकदा हायकोर्टांत गेलों होतों. त्या वेळीं सदावर्ते हे मला भेटले. "तुमचे स्नेही वासुदेवराव कुलकर्णी आमच्या खिशांत आहेत. तुम्हांला भेटावयाचें आहे काय?" असें मला उद्देशून ते बोलले. याचा अर्थ मी समजलों. त्यांना माफी देऊन आरोपीच्या विरुद्ध साक्षीदार म्हणून उभे करण्याची तयारी झाली होती, ही गोष्ट मला माहीत होती. सदावर्ते यांच्या बोलण्यांत ती खोच होती.

पुढे कांही वर्षांनंतर गायडरच्या मध्यस्थीने वासुदेवरावांना बेळगावास वकिली करण्याची परवानगी मिळाली. ते वकिलीकरिता बेळगावास येऊन राहिले होते. माझी व त्यांची गाठ केव्हाकेव्हा पडत असे. पण मागील गोष्टीबद्दल आम्ही कांहीच बोललों नाही. कोर्टांत ते बहुतकरून येत नसत. आले तरी वकिलांच्या खोलींत बसत नसत. वकिलीचीं जीं कांही थोडींफार कामें असतील तीं आपल्याबरोबर कोणा तरी दुसऱ्या वकिलांना घेऊनच ते चालवीत. समाजामध्येही त्यांना कोणी मानीत नव्हतें. अशा रीतीने एक प्रकारच्या अज्ञातवासांत दिवस काढीत दोनतीन वर्षांपूर्वी ते वारले.

नाशिक प्रकरणांतील शिक्षा झालेल्या आरोपींपैकी डॉ. भट, खरे, बाबासाहेब सावरकर, डॉ. नारायणराव सावरकर यांच्या भेटी होतात. याच प्रकरणांतील एक आरोपी बाबासाहेब मराठे यांची व माझी त्या वेळीं ओळख नव्हती. पण आता येरवड्याच्या तुरुंगांत तेही आहेत व मीही आहें त्यामुळे गेल्या जुलईपासून त्यांचा सहवास आहे.

कर्वे तर फाशी दिले गेले. गोपाळराव पाटणकर वारल्याचें समजतें. बाबासाहेब खरे

यांना नाशिकच्या खटल्यांत गोवण्यांत आलें नव्हतें. ते कांही दिवस भ्रमिष्टासारखे झाले होते. धारवाडच्या वेड्याच्या इस्पितळांत कांही दिवस त्यांना ठेवण्यांत आलें होतें. पुढे त्यांची स्थिती पहिल्यासारखी झाली नाही व त्यांतच त्यांचा अंत झाला.

### श्री. बाबुराव गोखले

वर निर्दिष्ट केलेल्या मंडळींखेरीज आणखी एका गृहस्थांचा व माझा परिचय झाला. हे गृहस्थ म्हणजे दामोदर विश्वनाथ ऊर्फ बाबुराव गोखले. हे हल्ली 'केसरी'च्या संपादकवर्गांत आहेत हें प्रसिद्धच आहे. बाबुराव गोखले हे मूळचे कोल्हापूरचे. 'राष्ट्रमता'शीं कोल्हापूरच्या दोन गृहस्थांचा म्हणजे गणपतराव मोडक व बापूसाहेब सरदेसाई यांचा संबंध होता, हें पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. त्यांच्याकडे केव्हाकेव्हा बाबुराव येत असत. हे त्या वेळीं मुंबईत एल्एल्. बी.चा अभ्यास करीत असत. बाबुराव त्या वेळीं मोठे मितभाषी असत व माझ्याशीं नवीन परिचयामुळे विशेष सलगीनें वागत नसत. पण पुढेपुढे आमचा परिचय वाढत जाऊन त्याचें पर्यवसान दाट स्नेहांत झालें. गेल्या बारातेरा वर्षांत देशांत अनेक घडामोडी व स्थित्यंतरें झालीं. पूर्वींचे स्नेही पक्षभेदाच्या व मतभेदाच्या वावटळींत सापडून आपल्या स्नेहभावाला विसरले. पूर्वींच्या टिळकपक्षांतील प्रमुख मंडळींपैकी शिवरामपंत परांजपे, वासुकाका जोशी व कृष्णाजीपंत खाडीलकर यांचेखेरीज इतर सर्व प्रमुख मंडळी १९२१ सालापासून गांधींच्या चळवळीपासून फुटून गेली व महाराष्ट्रांत दोन तट पडले. पूर्वींच्या स्नेहसंबंधालादेखील फाटा मिळाला. पण माझ्या बाबतींत सुदैवानें तसें घडलें नाही. गांधीच्या चळवळींत प्रामुख्यानें मी राहूनदेखील माझे पूर्वींचे स्नेहसंबंध तुटले नाहीत. विशेषतः माझा व बाबुराव गोखल्यांचा घरोबा या काळांत वाढतच गेला व तो अद्यापिही कायम आहे.

माझा 'राष्ट्रमता'शीं संबंध असतांनाच कोल्हापुरास एक प्रकरण उद्भवलें. तें शांत होण्याला दोनतीन वर्षांचा काल गेला. नाशिक प्रकरणाची झळ मला थोडीशी लागली व त्यासंबंधाची हकीकत वर देण्यांत आलीच आहे. पण हें कोल्हापूर प्रकरण मला बरेंच भोवलें. यांतून बचाव करून घेण्याकरिता मला व गोविंदराव याळगी व इतर माझे स्नेही यांना बराच त्रास पडला, आणि पैसाही बराच खर्च करावा लागला. आम्ही या प्रकरणांतून कसे बचावलों हा इतिहास मनोरंजक आहे.

### कोल्हापुरचा शिवाजी क्लब

कोल्हापुरास 'शिवाजी क्लब' या नावाची एक संस्था होती. या संस्थेंत तालीम, दांडपट्टा, व इतर व्यायाम यांचें शिक्षण दिलें जात असे. संस्थेंत सर्व जातींचे तरुण शारीरिक शिक्षणाकरिता जात असत. ही संस्था कोल्हापुरास अत्यंत लोकप्रिय झाली होती. यापैकी कित्येक तरुणांच्या डोक्यांत स्वातंत्र्याच्या वगैरे

कल्पना होत्या, व त्या सिद्धीला नेण्याकरिता हत्यारांचा संग्रह करणें इत्यादि कामें चालूं होतीं असें म्हणतात. या बाबतींत संस्थेचे एक प्रमुख सभासद नेपाळांत गेले होते व तिकडेच ते वारले असें म्हणतात. या संस्थेच्या मार्फत शिवाजीउत्सव, मर्दानी खेळांचे प्रयोग वगैरे सार्वजनिक रीत्या होत असत. या संस्थेसंबंधाने मला इतकीच माहिती आहे. माझा या संस्थेशीं कोणत्याही प्रकारें कधीच संबंध नव्हता. ही वर दिलेली सर्व माहिती ऐकीव आहे.

## *जगन्नाथ महाराजांचें दत्तविधान*

लो. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर महाराष्ट्रांत जिकडेतिकडे वातावरण प्रक्षुब्ध झालें होतें. पुष्कळ ठिकाणीं पुष्कळ तरुणांच्या मनांत सरकाराबद्दल त्वेष आला होता व बंगालप्रमाणे महाराष्ट्रांतही कांही तरी करून दाखवावें असें आलें होतें, ही गोष्ट कांही खोटी नाही. सरकारची वृत्तीही साशंक झाल्याने खरें व खोटें यांची सरमिसळ होऊन सुक्याबरोबर ओलेंही जळण्याचे प्रसंग आले होते त्यांतीलच कोल्हापूरचें प्रकरण हा एक भाग आहे व त्यांत कोल्हापूरचे माजी महाराज शाहू छत्रपती ही व्यक्ती मुख्य केंद्र आहे. कोल्हापूरकर शाहू महाराज व टिळक यांच्यामध्ये श्री. जगन्नाथ महाराज यांच्या दत्तकासंबंधाने वितुष्ट आलें होतें, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. मयत श्री. बाबा महाराजांचे कायदेशीर दत्तक बाळा महाराज की जगन्नाथ महाराज हा वादाचा प्रश्न होता. बाळा महाराजांचा पक्ष शाहू महाराजांनी घेतला होता, असें म्हणण्यापेक्षा शाहू महाराजांनीच बाळा महाराजांच्या दत्तकाचा प्रश्न उपस्थित केला होता असें म्हणण्यास हरकत नाही. उलट बाबा महाराजांच्या मृत्युपत्रान्वयें टिळक यांनी बाबा महाराजांचे ट्रस्टी या नात्याने जगन्नाथ महाराजाचें दत्तविधान घडवून आणलें होतें. त्यामुळे हा वाद उत्पन्न होऊन जगन्नाथ महाराजांचें दत्तविधान शाबीत करून घेण्याकरिता टिळकांना प्रिव्ही कौन्सिलापर्यंत भांडावें लागलें. वादाला अनेक फाटे फुटून टिळकांवर फौजदारी फिर्याद होऊन मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात शिक्षाही झाली व ती फिरवून घेण्याकरिता हायकोर्टापर्यंत टिळकांना जावें लागलें. केवळ बाबा महाराजां-सारख्या मित्राला दिलेलें वचन पाळण्याकरितां म्हणून टिळकांना किती त्रास सोसावा लागला याची आठवण झाली म्हणजे टिळकांच्या मित्रवात्सल्याबद्दल, घस सोसण्याच्या त्यांच्या स्वभावाबद्दल कौतुक वाटल्यावाचून राहात नाही. या प्रकरणांत कोल्हापूरकरांनी काय काय हिकमती लढवल्या याचें आविष्करण टिळकांना करावें लागलें. त्यामुळे कोल्हापूरकरांना टिळक हे अप्रिय होते. या दत्तक प्रकरणासंबंधाने शाहू महाराजांना इतकी ईर्षा होती की, जगन्नाथ महाराजांचा दत्तक प्रिव्ही कौन्सिलमध्ये शाबीत झाला तरी कोल्हापूर संस्थानांत असलेलें बाबा महाराजांचें उत्पन्न अद्यापि जगन्नाथ महाराजांना मिळालेलें नाही. इतकेंच नव्हे, तर ज्या बाळा महाराजांचा दत्तक बेकायदेशीर म्हणून ठरविण्यांत आलें त्याच बाळा महाराजांकडे तें चालत आहे!

*वेदोक्त प्रकरण हा काय वाद आहे ?*

याशिवाय कोल्हापुरास 'वेदोक्त' म्हणून एक प्रकरण उपस्थित झालें होतें. कोल्हापूरच्या घराण्यांतील सर्व धार्मिक संस्कार वेदोक्त व्हावेत, असा आग्रह शाहू महाराजांनी धरला होता. या घराण्यांत वेदोक्त संस्काराचा लोप होऊन बरींच वर्षें झालीं असल्याने वेदोक्त संस्कार होऊं नयेत असें कोल्हापूरच्या कांही ब्राह्मणांचें म्हणणें होतें. यामुळे हा वाद अतिशय वाढला. आणि या प्रकरणीं ब्राह्मण राजोपाध्ये वगैरे मंडळींचीं पिढीजाद उत्पन्नें महाराजांनी खालसा केलीं व तेव्हापासून ब्राह्मण व ब्राह्मणेतर या वादाला प्रारंभ झाला. या वादाच्या बुडाशीं खुद्द महाराजच असल्याने याचा विस्तार सर्व महाराष्ट्रभर झाला होता. कोल्हापूरकर महाराज हे क्षत्रिय असल्यामुळे त्यांच्या घराण्यांत वेदोक्त संस्कारांचा जरी लोप झाला असला, तरी ते पुन्हां चालू करण्यास हरकत नसावी, असें म्हणणारा ब्राह्मणांतदेखील एक पक्ष होता आणि टिळक या मताचे असावेत असें मला वाटतें. तथापि अज्ञानामुळे किंवा रूढीच्या प्रभावामुळे कित्येक ब्राह्मणांनी वेदोक्त संस्काराला हरकत घेतली, म्हणून त्यांचीं पिढीजाद इनामें खालसा करण्यांत महाराज अन्याय करीत आहेत, असेंच सर्वसाधारणपणें ब्राह्मण-वर्गाचें मत होतें. यामुळे सर्व ब्राह्मणांसंबंधाने शाहू महाराजांच्या मनांत पक्की अढी बसली होती. शाहू महाराज हे अत्यंत ईर्षाबाज, विलक्षण महत्त्वाकांक्षी व दीर्घद्वेषी असल्याने त्यांच्या मनांतील तेढ काढून टाकण्याचें सामर्थ्य कोणांतही नव्हतें. याशिवाय युक्त्याप्रयुक्त्या लढविण्यांत ते मोठे तरबेज होते. पैशाचें व सत्तेचेंही त्यांना वाटेल तितकें साहाय्य होतें आणि या सर्वांचा उपयोग वाटेल त्या वेळीं व वाटेल त्या प्रकारानें करण्याइतपत त्यांना बुद्धीही होती. टिळक हे ब्राह्मण असून महाराष्ट्रांतील त्या वर्गाचें पुढारीपण त्यांच्याकडे आहे, ही गोष्ट महाराजांना माहीत होती. म्हणून ब्राह्मणांच्या हातून कांही गैर झालें, तरी तें टिळकांच्या माथीं लादण्याचा प्रकार चालू होता. अशा कांही कारणांमुळे टिळकांचें व महाराजांचें जुळत नव्हतें हें खरें.

कोल्हापूरचा किंवा कोल्हापूरकरांचा व माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. तरी या वेदोक्त प्रकरणासंबधाने माझें स्वतःचें मत वेदोक्त संस्कार करावेत या पक्षाकडे होतें. संकेश्वर व कोल्हापूर मठांचे शंकराचार्य हे कोल्हापूर राजघराण्याचे व महाराष्ट्रांतील मराठ्यांचे धर्मगुरू असे मानले जात असत. हा वाद निघाला त्या वेळीं या पीठावर जे गुरु स्वामी होते त्यांनी महाराजांच्या विरुद्ध निकाल दिला होता. म्हणून कोल्हापूर संस्थानां-तील या पीठाचें उत्पन्न महाराजांनी जप्त केलें होतें. पुढे कांही दिवसांनी या स्वामींनी ब्रह्म-नाळचे काशिनाथबुवा यांना शिष्य करून घेऊन आपले सर्व अधिकार ब्रह्मनाळकरांना सोपविले होते. ब्रह्मनाळकरांची कीर्तनासंबंधाने फार ख्याती होती. ते कीर्तनाकरिता बेळगावास येत असत. त्यामुळे आमच्या वडिलांचा व त्यांचा चांगला स्नेह जुळला होता. ब्रह्मनाळकर हे स्वामी झाल्यानंतर वेदोक्ताचा वाद त्यांच्याकडे गेला. त्या वेळीं आपलें

जुने स्नेही या नात्यानें आमच्या वडिलांचा सल्ला घ्यावा म्हणून त्यांनी वडिलांना बोलावून घेतलें. आमच्या वडिलांनी वेदोक्त करण्याला हरकत नाही, असा सल्ला स्वामींना (ब्रह्मनाळकरांना) दिला. त्या वेळीं आमच्या वडिलांची व महाराजांची भेट स्वामींनी करून दिली होती. त्यामुळे गुरुस्वामींचा आमच्यावर रोष झाला होता. पुण्याकडील कांही मंडळींचा ब्रह्मनाळकरांनी सल्ला घेतला होता व तेथील कांही पुढारी मंडळी वेदोक्ताला अनुकूल होती. त्या मंडळींत टिळकही होते असें स्वामींच्या मंडळींकडून मला समजलें होतें. यांत खरेपणा किती होता हें मला सांगतां येत नाही. ब्रह्मनाळकर स्वामींनी वेदोक्ताचा अधिकार महाराजांना आहे, असा या प्रकरणाचा निकाल दिला हें गुरुस्वामींना पसंत पडलें नाही. म्हणून त्यांनी ब्रह्मनाळकरांवर बहिष्कार घातला. या बाबतींत ब्राह्मणांतदेखील दुफळी होऊं लागली. हा वाद चालू असतां गुरुस्वामी हे बेळगावास आले होते. गावांतील बऱ्याच ब्राह्मण शिष्य मंडळीकडे भिक्षा, पाद्यपूजा वगैरे झाल्या. पण मीं त्यांना बोलाविलें नाही व पाटील वगैरे मराठ्यांनीही कांही मान केला नाही. तेव्हा गुरुस्वामींनी मला बहिष्काराची धमकी दिली. शंकराचार्यांच्या पीठाबद्दलच माझ्यामध्ये आदरभाव नव्हता. यामुळे व या प्रकरणांत माझें मत वेदोक्ताला अनुकूल होतें यामुळे मीं स्वामींच्या धमकीला दाद दिली नाही. या स्वामींचा मुक्काम बेळगावनजीक शहापुरास असतांना काशीचे प्रसिद्ध विद्वान स्वामी कृष्णानंद सरस्वती हे बेळगावास आले होते. हे वेदोक्ताला अनुकूल असल्याने कोल्हापूरकर महाराजांच्या आमंत्रणामुळे इकडे आले होते. या स्वामींचें वेदोक्ताला अनुकूल असें भाषण मारुतीच्या देवालयांत होऊन वेदोक्ताचें त्यांनी मंडन केलें. ही सभा भरविण्यांत मींच पुढाकार घेतला होता व प्रास्ताविक भाषण करून स्वामींची ओळख करून दिली होती. या विषयावर वादविवाद करण्याची कृष्णानंद स्वामींची इच्छा होती. पण उलट पक्षाकडून वादाला कोणी न आल्यामुळे स्वामी तसेच परत गेले.

### तडजोडीचे माझे प्रयत्न

हें प्रकरण बरेंच विकोपाला जाऊन महाराष्ट्रांत बराच बखेडा झाला होता. तो मोडावा अशी माझी इच्छा होती. लहान तोंडीं मोठा घास घेण्यांतलाच हा एक प्रकार होता. पण गुरुस्वामी व शिष्य ब्रह्मनाळकरस्वामी यांचें जुळल्यास हा वाद मिटेल असें मला वाटलें. म्हणून त्या प्रयत्नाला मी लागलों. गुरुस्वामींचे मुख्य सल्लागार बाळशास्त्री तेलंग या नावाचे एक गृहस्थ होते. त्यांना भेटून हा वाद मिटवण्याचें माझे मनांत आलें. सांगलीजवळ हरिपूर म्हणून एक गाव आहे. त्या गावीं बाळशास्त्री राहात असत. त्यांच्याकडे मी गेलों व हल्लीच्या परिस्थितीकडे पाहून वाद मिटवा असें त्यांना नाना प्रकारें सांगितलें. शास्त्रीय आधार पाहिजे असल्यास कृष्णानंद सरस्वतींकडून आणवून देतों असेंही मीं त्यांना कळवलें. यानंतर आधार वगैरे सर्व मला माहीत आहेत व हा वाद वाढावा अशी माझीही इच्छा नाही असें ते म्हणाले. म्हणून मला

घेत आला. पण यापुढे लागलीच त्यांनी आपल्या मेहनतीबद्दल चार हजार रुपयांची मागणी केली. (तीन हजार की चार हजार हें माझ्या पक्कें लक्षांत नाही.) "ही लाच घेतल्याप्रमाणे होऊन तुमची नाचक्की होईल" असें मीं त्यांना म्हटलें. तेव्हा मोठी दक्षिणा देण्याचें करून शिवाजीमहाराजांनी गागाभट्टांना किंवा शाहूमहाराजांनी कृष्णानंदस्वामींना काशीहून आणल्याचा त्यांनी दाखला दिला आणि आपण दक्षिणा घेतली ही गोष्ट बाहेर प्रसिद्ध करण्यासही आपली हरकत नाही असें मला कळवलें. शास्त्रीबुवांच्या धाष्टर्याचें मला कौतुक वाटलें. मीं ही गोष्ट कबूल करून दुसरे दिवशीं त्यांना त्यांच्या मागणी-प्रमाणे रक्कम दिली. पण पुढे काम त्यांचेकडून झालें नाही. त्यांनी प्रयत्न केला नाही असेंच मला कळलें. ही गोष्ट शाहूमहाराजांना माहीत झाली होती व माझा संबंधही त्यांना कळवण्यांत आला होता.

गुरुस्वामींच्या वेळीं जप्त केलेलें उत्पन्न ब्रह्मनाळकरस्वामींकडे चालवण्याचा हुकूम महाराजांनी काढला. महाराजांचें व स्वामींचें (ब्रह्मनाळकरांचें) बरेच दिवस सूत जमलें होतें. ब्राह्मण मंडळींचीं जप्त झालेलीं उत्पन्नें स्वामींनी सोडवण्याची खटपट करावी, अशी सूचना मी एकदोन वेळां त्यांना केली होती. त्यांच्याही मनांत खटपट करण्याचें आलें होतें. इतर लोकांकडूनही तशा सूचना जात होत्या. त्यामुळे स्वामींनी महाराजांजवळ ही गोष्ट काढून जप्ती उठवण्याचें वचन घेतलें होतें असें मला समजलें. पण जप्त्या खरोखर उठल्या नाहीत. स्वामींनी तगादा चालविला. पण, त्याप्रमाणे त्यांना यश आलें नाही. त्यामुळे स्वामींचें व महाराजांचें बिघडलें. माझें व स्वामींचें बरें असल्यामुळे या प्रकरणाच्या मुळाशीं मी आहें अशी महाराजांची समजूत झाली असावी आणि त्या कारणाने स्वामींवर जसा रोष झाला तसा त्यांचा माझ्यावरही झाला असेल. या वेदोक्त प्रकरणासंबंधाने जेव्हाजेव्हा गोष्टी निघत असत तेव्हातेव्हा ब्राह्मणांचीं उत्पन्नें जप्त करण्यांत महाराजांनी अन्याय केला आहे असें मी प्रतिपादन करीत असें, व या गोष्टी महाराजांच्या कानावर जात असत.

महाराष्ट्रांतील ब्राह्मणांचे पुढारी टिळक यांच्यावर कांही तरी कुभांड रचून टिळकांचा व त्यांच्या अनुयायांचा चांगला बंदोबस्त केला पाहिजे, अशी कल्पना कोल्हापुरास निघाली. टिळकांना जरी शिक्षा झाली होती तरी तेवढ्याने महाराजांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. कोल्हापूर व पुणें इत्यादि ठिकाणीं मोठा गुप्त कट असल्याची बातमी मुंबई सरकारला कोल्हापूरहूनच मिळाली असें म्हणतात. कोल्हापूर दरबारने चिरोलसाहेबांना टिळकांबद्दल माहिती देऊन टिळकांच्या विरुद्ध चिरोलच्या मनांत कसे प्रतिकूल ग्रह उत्पन्न केले हें प्रसिद्धच आहे.

### *टिळक आणि कोल्हापूरदरबार*

टिळकांनी चिरोलवर केलेल्या खटल्यांत चिरोलतर्फे ज्या साक्षी झाल्या त्यांत कोल्हापूरकरांच्या पदरीं मोठ्या हुद्द्यावर असलेले डोंगरे

व भास्करराव जाधव यांच्याही साक्षी आहेत. त्यांनी या खटल्यांत अन्य रीतीनेही चिरोलसाहेबांना मदत केली. चिरोलच्या इंग्रजी पुस्तकाचें मराठी भाषांतर डोंगरे यांनी जाधव व लठ्ठे यांच्या मदतीने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केलें. कोल्हापूरच्या दरबारने व त्यांच्या हाताखालच्या संस्थानिकांनी मदत केल्यामुळे पुस्तकप्रकाशनाचा खर्च निघाला होता. डोंगरे व जाधव हे चिरोल यांना खटल्यांत मदत करण्याचें काम करीत होते, तरी त्यांचा पगार करवीर दरबारकडून मिळत होता. जाधव हे कोल्हापूर दरबारचे दिवाण सबनीस यांच्या सांगण्यावरून चिरोल यांना मदत करीत होते. या सर्व गोष्टींवरून चिरोलकडून 'लंडन टाइम्स'ला टिळकांच्या विरुद्ध बातमीपत्रें पाठवण्याच्या कारस्थानाच्या बुडाशीं कोल्हापूरची मंडळीं प्रथमपासून होती असें अनुमान लोकांनी काढलें. याच बातमीपत्राच्या आधारें पुढे चिरोलनी आपला ग्रंथ प्रसिद्ध केला. त्याचें मराठी भाषांतर तीनचार महिन्यांतच होऊन छापून प्रसिद्ध झालें. चिरोल खटल्याचें काम सुरू झाल्यानंतर टिळकांवर अत्याचाराच्या गुन्ह्याचे शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न चिरोलच्या वतीने करण्यांत आला. टिळकांना एक लेखी सवालपट्टी दिली होती. तींत टिळकांचा व कोल्हापूरच्या शिवाजी क्लबाचा संबंध होता हें शाबीत करण्याच्या उद्देशाने प्रश्न विचारण्यांत आले होते. त्याचप्रमाणे कोल्हापूरचे प्रसादे, पाध्ये, विजापूरकर व गणपतराव मोडक या सर्व मंडळींना कोल्हापुरास शिक्षा झाल्या होत्या. गणपतराव मोडकांना कर्नल फेरीस यांचा खून करवण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून शिक्षा झाली होती. त्याचप्रमाणे प्रसादे व पाध्ये यांनाही घरफोडीच्या आरोपावरून शिक्षा झाल्या होत्या. गणपतराव मोडक हे टिळकांच्या परिचयाचे होते. विजापूरकर यांचा व टिळकांचा विशेष स्नेह असून राष्ट्रीय शिक्षणाच्या बाबतींत समर्थ विद्यालयाची स्थापना टिळकांच्या प्रोत्साहनाने झाली होती. पण प्रसादे व पाध्ये यांची व टिळकांची ओळखदेखील असण्याचा संभव नव्हता. प्रसादे व पाध्ये हे शिवाजी क्लबाचे सभासद होते. १९०६ सालीं टिळक ताईमहाराजांच्या खटल्याकरिता कोल्हापुरास गेले असतांना एका स्नेह्याच्या घरीं पानसुपारीस गेले होते. तेथे जमलेल्या मंडळींचा फोटो घेण्यांत आला होता. त्या फोटोंत प्रसादे व पाध्ये यांचेही फोटो होते. म्हणून शिवाजी क्लबाचा व टिळकांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न चिरोलकडून करण्यांत आला होता. आणि शिवाजी क्लबाचे सभासद प्रसादे व पाध्ये यांना घरफोडीच्या आरोपावरून शिक्षा झाली; म्हणून घरफोडी, दरोडे वगैरे-सारखे गुन्हे करण्याचा शिवाजी क्लबाचा उद्देश होता आणि प्रसादे व पाध्ये यांच्याबरोबर टिळकांचा फोटो ग्रुपमध्ये होता म्हणून घरफोडी करणाऱ्यांना टिळकांची सहानुभूती होती असें सिद्ध करण्याकरिता हा फोटो चिरोल खटल्यांत दाखल करण्यांत आला होता.

१९०९ सालीं कांही लोकांवर जाहिराती चिकटवून लोकांस बॉंबची कृती शिकवली या आरोपावर खटला चालवला होता. त्या वेळीं एका आरोपीच्या घरीं टिळकांचा फोटो सापडला व त्यांत एक पत्रक सांपडलें. त्यांत "दावर यांनी टिळकांना शिक्षा दिली म्हणून दावरचा खून करून त्याला नाहीसा करा" असें लिहिलें होतें. याप्रमाणे कोठून तरी

कसा तरी बादरायणसंबंध जुळवण्याची खटपट चिरोलसाहेबांनी कोल्हापूरच्या मंडळींच्या मदतीने किंवा चिथावणीने केली ही गोष्ट स्पष्ट आहे. हे सर्व खटले १९०७ पासून १९११ पर्यंतचे आहेत. या अवधींत टिळकांना व टिळकांच्या कांही अनुयायांना एखाद्या गुप्त कटाच्या व अत्याचाराच्या खटल्यांत अडकवण्याचा प्रयत्न कोल्हापूर येथे सारखा चालू होता.

कोल्हापूर येथे या वेळीं प्रजेवर अनेक जुलमांचे व अन्यायाचे प्रकार चालू होते, असा पुष्कळ बोभाटा चालला होता. यांत अतिशयोक्ती असण्याचा संभव होता. पण कांही कांही गोष्टी खऱ्याही असाव्यात. मुंबई सरकारच्या कानावरही यापैकी कांही गोष्टी गेल्या असाव्यात. मुंबई सरकारकडून या बाबतींत चौकशी वगैरे होण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून सरकाराविरुद्ध चाललेल्या कटाचा वगैरे शोध लावून दिल्याचें श्रेय घेण्याच्या हेतूनेदेखील हे प्रयत्न चालले असावेत असें लोकांना त्या वेळीं वाटत होतें.

'राष्ट्रमत' पत्रांत कोल्हापूर दरबारच्या विरुद्ध कांही हकीकती प्रसिद्ध होत असत. माझा व लोकमान्य टिळकांचा संबंध आणि त्याचप्रमाणे माझा व 'राष्ट्रमत' पत्राचा संबंध या योगाने मलाही कशांत तरी गोवण्याचा प्रयत्न कोल्हापुरास चालू झाला. ती हकीकत अशी :

दामू जोशी या नावाचा एक तरुण कोल्हापुरांत होता. तो शिवाजी क्लबाचा सभासद होता. त्यालाही प्रसादे वगैरे लोकांबरोबर शिक्षा झाली होती. त्यानंतर रासायनिक द्रव्यें चोरल्याबद्दल व क्रांतिकारक जाहिराती चिकटवल्याबद्दल जे खटले झाले त्यांतही दामू जोशी हा होता. कांही लोकांना शिक्षा झाल्या पण दामू जोशी याजवर आरोप शाबीत झाला नाही. (ब्रिटिश हद्दींतील एक सिव्हिलियन व डिस्ट्रिक्ट जज्ज) किंकेड यांच्या पुढे हा खटला चालला होता. यापैकी कांही आरोपींच्या तर्फे काका पाटील व बॅप्टिस्टा काम चालवीत होते. दामू जोशी याजवर किंकेड यांच्या कोर्टात जरी आरोप शाबीत झाला नाही, तरी त्याला मुक्त करण्यांत आलें नाही. खटल्याचे पूर्वी व नंतर बरेच दिवस तो कोल्हापूर पोलिसांच्या ताब्यांत होता. त्या वेळीं त्याने अनेक जबान्या दिल्या आहेत व त्यांत लोकमान्य टिळकांसहित प्रसिद्ध अशा शेदीडशे व्यक्तींचीं नावें गोवण्यांत आलीं आहेत. त्यांत बेळगावपैकी गोविंदराव याळगी, हणमंतराव देशपांडे, शामराव काळकुंद्री व मी अशा पाचसात लोकांचा उल्लेख आहे. "दामू जोशी याने पुण्याहून एक बॉंब तयार करून आणला होता. तो बॉंब आक्कासाहेबमहाराज यांच्या लग्नाच्या वेळीं पोलिटिकल एजंट कर्नल फेरीस याजवर टाकण्याचा त्याचा बेत होता. पण तो बेत फसला. त्यानंतर तो बॉंब एका पितळेच्या फिरकीच्या तांब्यांत घालून बेळगावाजवळील मजगाव गावी हणमंतराव देशपांडे यांचे घरीं ठेवण्यांत आला. त्याबरोबर कांही पिस्तुलें व रिव्हॉल्व्हरेंही ठेवण्यांत आलीं" असा कांही संबंध जुळवण्याचा कोल्हापूरच्या पोलिसांचा प्रयत्न होता. हणमंतराव देशपांडे हे माझ्याबरोबर काम करणारे होते. अर्थात तो संबंध माझ्यापर्यंत पोचवण्याचाही पोलिसांचा हेतू होता. दामू

जोशीच्या जबाबांत कोल्हापूरबाहेरील पन्नास लोकांचीं नावें जरी होतीं तरी प्रत्यक्ष प्रयोग आम्हांवरच करण्यांत आला.

### *पाध्ये व पागे मला अपरिचित*

मी बेळगावास असतांना एक दिवस माझ्याकडे दोन गृहस्थ एकाएकी आले. माझ्याजवळ कांही एकांतांत बोलावयाचें आहे, असें म्हणूं लागले. माझ्याकडे सार्वजनिक कामाकरिता पुष्कळ लोक येतजात असत. त्या संबंधाने यांना कांही सांगावयाचें असेल असें समजून मी त्यांना एका खोलींत घेऊन गेलों. त्यांना कोण, कोठले वगैरे रीतीप्रमाणे प्रश्न केले. त्या वेळीं दोघांपैकी एकाने आपलें नाव पाध्ये असें असून आपण कोल्हापूरचे आहोंत व दामू जोशी हा आपला स्नेही आहे असें मला सांगितलें. दामू जोशी याच्यावर कांही तरी खटला कोल्हापुरास चालला आहे, ही बातमी वर्तमानपत्रांवरून मला माहीत होती. यावरून या खटल्या-संबंधी कांही तरी कायदेशीर सल्ला विचारण्याकरिता हा गृहस्थ आला असावा, अशी माझी समजूत झाली. पण पुढे तो "दामू जोशी याने आपल्याजवळ एक तांब्या व कांही हत्यारें ठेवलीं आहेत तीं मला द्या" असें सांगूं लागला. "हे सर्व जिन्नस एका पेटींत घालून पेटीला कुलूप घालून द्या म्हणजे तुमच्यावर कांही येणार नाही" असें तो म्हणाला. मला हें सर्वच चमत्कारिक वाटलें. "तुम्ही चुकून माझ्याकडे आलां आहांत, मला यांतील कांही माहिती नाही" असें मीं उत्तर दिलें. त्यानंतर त्यांनी "आपण कोल्हापूरचे मुख्य स्पेशल पोलीस फर्नांडिस यांचेकडून आलों आहोंत, व ते स्टेशनावरील वेटिंग रूममध्ये उतरले आहेत, ते फार दयाळू व सत्यप्रिय आहेत, त्यांचेकडे तुम्ही या म्हणजे तुमचा बचाव होऊन आमचें कार्य होईल" वगैरे बोलण्याला प्रारंभ केला. त्या वेळीं हें कांही तरी गौडबंगाल आहे असें मला वाटलें. पाध्ये हा शिकवल्याप्रमाणे बोलत होता व बोलतांना घाबरटपणा त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. पण दुसरा मनुष्य जास्ती आतुर व कावेबाज दिसत होता. "मी स्टेशनावर येत नाही, वाटल्यास फर्नांडिसने माझ्याकडे यावें" असें सांगून त्यांना खोलीबाहेर घेऊन आलों. ते लागलेच गेले. त्यानंतर त्यांचे पाठोपाठ एका मनुष्याला स्टेशनावर कोल्हापूर पोलीसपैकी कोणी आला आहे की काय हें तपास करण्याला पाठवलें. फर्नांडिस कांही गुप्ततपासाकरिता आल्याची हकीकत समजली. त्यावरून संशय पक्का झाला. संध्याकाळीं ही मंडळी परत गेली. त्यांच्या-वरही आम्हीं पाळत ठेवली होती. गोविंदराव याळगी, हणमंतराव देशपांडे यांचीं घरें पाहण्याकरितां पाध्ये वगैरे गेले होते. ही गोष्ट वर्तमानपत्रांत त्या वेळीं प्रसिद्ध झाली होती. घरफोडीबद्दल ज्या पाध्याला शिक्षा झाली होती व टिळकांशीं ज्यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न चिरोल केसमध्ये करण्यांत आला होता तोच हा पाध्ये होता आणि त्याच्या बरोबरचा मनुष्य एक पोलीस अधिकारी होता असें मागाहून कळलें. मला स्टेशनावर फर्नांडिसकडे नेऊन, तेथे त्यांच्या जवळ असलेलीं हत्यारें वगैरे मीं पाध्ये यांच्या सांगण्यावरून आणून

दिलीं असा बनावट पुरावा तयार करून, मालमुद्द्यानिशीं मला स्टेशनावर पकडण्याचा त्या मंडळींचा बेत होता, असेंही कळलें. याप्रमाणे हा पहिला प्रयत्न फसला.

### *बेळगावांतील झडत्यांची तयारी*

यानंतर कांही दिवसांनी एक दिवस मी बेळगावाहून मुंबईस जात असतां मिरजेच्या स्टेशनवर रात्रीं पागे व त्यांच्या हाताखालचे कांही पोलीस अंमलदार मला दिसले. त्यांच्याबरोबर बुरख्यामध्ये असलेली एक व्यक्ती होती आणि तिच्या भोवती पोलिसांचा बंदोबस्त होता. कोल्हापुरास पागे जातयेत असतात, व कोल्हापुरास चाललेल्या खटल्यांसंबंधानेच ही कांही तरी गडबड असावी, असा मला संशय आला. गुर्लहोसूरला १९०७ सालीं टिळक आले होते त्या वेळीं पागेही आले होते. तेव्हा माझी व त्यांची ओळख झाली होती. म्हणून हें प्रकरण काय आहे व ते कोणीकडे चालले आहेत, वगैरे तपास करावा असें माझ्या मनांत एकदा आलें. पण पोलीसतपासांत विनाकारण ढवळाढवळ कां करावी असें वाटून मी त्यांच्याशीं कांही बोललों नाही. दुसरे दिवशीं मुंबईला आल्यानंतर वर्तमानपत्रांतून गोविंदराव याळगी, शामराव काळकुंद्री, हणमंतराव देशपांडे यांच्या व माझ्या घराची झडती घेण्यांत आल्याचें समजलें. पागे वगैरे मंडळी मिरज स्टेशनावरून बेळगावलाच गेली असावी असें मी समजलों. बेळगावच्या घरांच्या झडतींत मुद्द्याचें कांही मिळालें नाही. यापूर्वी पाध्ये, फर्नांडिस वगैरे मंडळी आली होती त्या वेळचें एक टिपण मीं करून ठेवलें होतें, तें आमच्या घरीं पोलिसांनी जप्त केलें. त्याशिवाय गणपतराव मोडकांनी बटाट्याचें बियाणें माझ्याकडे मागितलें होतें त्याबद्दलचें त्यांचें एक कार्ड मिळालें, आणि मुंबई हायकोर्टाचे वकील सदाशिवराव बखले यांनी आवळे पाठवण्याबद्दल लिहिलेलें एक कार्ड व प्रो. भानूंनी आमच्या वडिलांच्या नावें लिहिलेलें एक पत्र अशीं पत्रें मिळालीं होतीं. आवळे व बटाटे यांवर पोलिसांची भिस्त होती. विशेषतः गणपतराव मोडकांच्या बटाट्यांचा कांही तरी सांकेतिक अर्थ असावा असें त्यांना वाटलें असावें. पण ज्या दिवशीं गणपतरावांचें बटाटे पाठवण्याबद्दल पत्र आलें होतें त्याच दिवशीं किंवा दुसरे दिवशीं त्यांच्या मागणीप्रमाणे सरकारी फार्मकडून परस्पर बटाटे पाठवल्याचा दाखलाही पोलिसांना मिळाला. बखल्यांसंबंधाने संशय घेण्याला कांही जागा नसल्याने तो बारही फुकट गेला. प्रो. भानूंच्या पत्रांत वेदांतासंबंधाने कांही मजकूर होता असें मीं ऐकलें. याप्रमाणे आमच्या चारीही घरांच्या झडतींत कांही सांपडलें नाही. या सर्व झडत्या मी बेळगावहून मुंबईला निघालों त्याच्या दुसरे दिवशीं सकाळीं एकाच वेळीं एकदम झाल्या. पण मी ज्या रात्रीं मिरजेस पागे वगैरे मंडळींना पाहिलें त्याच रात्रीं ते बेळगाव स्टेशनाहून परस्पर मजगावला गेले. त्या वेळीं बेळगावास प्लेग असल्यामुळे हणमंतराव देशपांडे हे मजगावास राहत असत. रात्रीं एकदोन वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घराला पागे वगैरे मंडळींनी गराडा घातला व घराची झडती घेतली. पागे वगैरे

मंडळीबरोबर बुरख्यामध्ये एक व्यक्ती होती असें वर आलें आहे. ती व्यक्ती म्हणजे खुद्द दामू जोशीच असें मागाहून समजलें. घराच्या झडतींत एक पितळेचा फिरकीचा तांब्या मिळाला व तो जप्त करण्यांत येऊन हणमंतराव देशपांडे यांना पकडण्यांत आलें. मजगाव हा गाव कुरुंदवाड संस्थानांतील वडगाव तालुक्यापैकी आहे. तथापि मजगावच्या रात्रीं घातलेल्या छाप्यासंबंधाने किंवा हणमंतरावांना कशाकरिता पकडलें यासंबंधाने वडगावच्या पोलिसांना माहिती नव्हती. हणमंतरावांना पकडल्यानंतर मारहाण करून माझें नाव त्यांच्या तोंडून काढण्याचा प्रयत्न झाला. पण तो यशस्वी झाला नाही.

### काका पाटील आणि बॅ. बॅप्टिस्टा

हणमंतरावांना पकडून सर्व मंडळी त्यांना घेऊन कोल्हापूरला गेली. पण ही बातमी अगदी गुप्त ठेवण्यांत आली. हणमंतरावांच्या वडिलांनी वडगावचे मॅजिस्ट्रेट व पोलिस यांच्याकडे तपास केला. पण त्यांना कांही माहिती मिळाली नाही. कुरुंदवाड संस्थानचें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांच्याकडूनही कांही माहिती मिळेना. ही हकीकत मला समजल्यानंतर मी मुंबईहून काका पाटील व बॅप्टिस्टा यांना कोल्हापुरास पोलिटिकल एजंटाकडे पाठविलें. तेथेही दाद लागली नसती तर हेबियस कॉर्पस कायद्याप्रमाणे दाद मागण्याचा विचार होता. ही सर्व गडबड चालली असतां गोविंदराव याळगींनी आपले गुप्त बातमीदार कुरुंदवाड व कोल्हापूर येथे पाठविले होते, त्यांच्या-मार्फत कोल्हापुरास हणमंतराव अटकेंत असल्याचें समजलें. म्हणून काका पाटील व बॅप्टिस्टा हे कोल्हापूरला पोलिटिकल एजंटाच्या कानावर या गोष्टी घालून दाद मागावी म्हणून तिकडे गेले. कोल्हापूरच्या गडबडीचा ब्रिटिश इंडियांतील लोकांशीं संबंध येत असल्यामुळे कांही ब्रिटिश पोलीस अधिकारी कोल्हापूरकरांच्या मदतीला देण्यांत आले होते. त्यांतच पागे हे एक होते. त्यांच्याशिवाय वॉलिंजर या नावाचे एक युरोपियन अधिकारी नेमण्यांत आले होते. ते कोल्हापूरकरांच्या आहारीं सर्वस्वी पडले नव्हते व स्वतंत्रपणें काम करीत होते असें म्हणतात. कोल्हापुरास ज्या वेळीं हे प्रथम वॉलिंजर यांना भेटण्या-करिता त्यांच्या बंगल्यावर गेले होते त्याच वेळी कर्मधर्मसंयोगाने पोलिसांनी हणमंतरावांना त्यांच्यापुढे कांही जबाब करवावा म्हणून आणलें होतें. ही बातमी हणमंतरावांचे वडील तेथे होते त्यांना माहीत होती व ती त्यांनी काकांना सांगितली. काका व बॅप्टिस्टा हे वॉलिंजरशीं बोलत असतां हणमंतरावांच्या वडिलांनी बंगल्याच्या एका औट हाऊसच्या दारावर लाथ मारून दार उघडलें. आंत हणमंतराव त्यांना दिसले. ही हकीकत काकांना वगैरे कळवण्यांत आली. तेव्हा पोलिसांचा नाइलाज झाला व कुरुंदवाडला चौकशीकरिता पाठविण्यासाठी त्यांना इकडे आणल्याचें त्यांनीं सांगितलें. समक्षासमक्ष या सर्व गोष्टी झाल्यामुळे हणमंतरावांना कुरुंदवाड अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करावें लागलें व हत्याराच्या कायद्याच्या (१९फ) कलमाच्या अन्वयें खटला करण्यांत आला. हा गुन्हा जामिनाचा असल्याकारणाने कुरुंदवाडच्या मॅजिस्ट्रेटनी हणमंतरावांना जामिनावर सोडलें.

### हणमंतराव देशपांड्यांवरील खटला

हणमंतरावांच्या मजगाव येथील एका रयता-कडून कांही पिस्तुलें हजर करवून घेऊन तीं हणमंतरावांच्या नागेश नावाच्या नोकराने आपल्याजवळ ठेवण्यांत आल्याचा त्याचेकडून जबाब करविला होता. त्या नागेशला पकडून बेळगावास ठेवलें होतें व त्याची साक्ष हणमंतरावांविरुद्ध व्हावयाची होती. बेळगाव लष्करच्या पोलिसांच्या ताब्यांत त्याला देण्यांत आलें होतें व त्याला प्रत्यक्ष अटक अशी नव्हती तरी त्याच्यावर नजर असे. पण, तो एके दिवशीं नजर चुकवून पोलिसांच्या ताब्यांतून निसटून गेला. त्यामुळे त्याची साक्ष होणें अशक्य झालें. पितळी फिरकीच्या तांब्यांत बॉंब होता असा दामूचा जबाब होता. पण हणमंतरावांच्या घरीं जो तांब्या सापडला त्यांत कांहीच नव्हतें. तथापि तो केमिकल अनलाइझरकडे पाठवण्यांत आला होता, व त्याच्यावर कांही ॲसिडचे डाग होते असें एक सर्टिफिकेट पोलिसांनी मिळवलें होतें ! खरोखर त्या तांब्यांत बॉंब होता आणि तो जर नाहीसा करण्यांत आला होता, तर तांब्यावर डाग राहण्याइतपत हलगर्जीपणा कोणीं केला असता काय ? आणि ही गोष्ट कोल्हापुरास आमच्याविरुद्ध कांही तरी चाललें आहे असें समजल्यानंतर !! याप्रमाणे मुद्देमाल हणमंतरावांकडे कांहीच मिळाला नाही; पोलिसांनी सर्व मार्गांचा अवलंब केला होता तरी हणमंतरावांचा कबुलीजबाब मिळाला नाही; नागेशची साखळीही तोच फरारी झाल्यामुळे एकाएकी तुटली. यामुळे खटल्यांत कांही राम राहिला नाही. या सर्व नाटकाचें मुख्य पात्र म्हणजे दामू जोशी. तेथूनच सर्व उगम. तेव्हा त्याची साक्ष होईल असें वाटलें होतें. पण आश्चर्य हें की, पोलिसांनी त्याला साक्षीला आणलें नाही. हा खटला चालवण्याचें काम बॅप्टिस्टा व काका यांनीच केलें. पुराव्यावरून हणमंत-रावांवर आरोप शाबीत होण्यासारखा नव्हता, तरी पागेसारख्या ब्रिटिश पोलीस-अंमल-दारांनी हा खटला उभा केला होता म्हणून असो किंवा इतर कांही कारणांनी असो, हणमंतरावाला दोषी ठरवून दोनशे रुपये दंडाची शिक्षा कुरुंदवाडच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी दिली. यावर श्रीमंतांकडे अपील झालें. पण अपिलांत शिक्षा कायम झाली. तथापि इतका सर्व उपद्व्याप करून डोंगर पोखरून उंदीर काढल्याप्रमाणेच झालें. राज्यक्रांतीचा मोठा कट होता व त्यांत महाराष्ट्रांतील मोटमोठ्या लोकांचा संबंध असून त्याचें बेळगावचें सर्व सूत्र माझ्या हातीं होतें इत्यादि दाखवावयाचे चमत्कार जागच्या जागीं जिरले.

### आमचीं वतनें खालसा

तथापि, हणमंतराव देशपांडे यांचें व माझें देशपांडेगिरीचें उत्पन्न खालसा करून त्यावर भर आकार घेण्यांत येऊं लागला. आमचे दोघांचेही वडील त्या वेळीं हयात होते व त्यांचा कांहीच संबंध येत नव्हता; म्हणून वडिलार्जित देशपांडेगिरी वतनांत आमचा अर्धा हिस्सा आहे असें मानून वडिलांच्या

ह्यातींत तेवढेच हिस्से खालसा करण्यांत आले. दोघांच्या वडिलांच्या पश्चात आमच्या सबंध देशपांडेगिरीच्या वतनी जमिनीवर भर आकार बसवण्यांत येऊन त्याप्रमाणे अद्यापिही अमल चालू आहे. यामुळे आमच्या प्रांतांतील वतनदार लोकांना एक जरब बसली व राजकारणांत पडणें हें धोक्याचें आहे असें वाटूं लागलें.

इंग्रज सरकारचा अंमल झाल्यानंतर पूर्वीची वतनें, इनामें याबद्दल चवकशी करण्याकरिता एक कमिशन बसवण्यांत आलें होतें. आपल्या वतनावर महसूल घेऊं नये असें वतनदारांचें म्हणणें होतें. कमिशनचें काम बरेच दिवस रेंगाळत चाललें होतें म्हणून इनामदार-वतनदार लोकांबरोबर एक तडजोड करून आकाराप्रमाणे जमीनमहसूल वसूल न करतां त्यांना कांही सूट द्यावी असें दोघांत ठरलें होतें. याला गार्डन सेटलमेंट म्हणतात. त्याला अनुसरून सेटलमेंटचा कायदा करण्यांत आला. त्या कायद्याअन्वयें इनामदार-वतनदारांना सनदा देण्यांत आल्या. सेटलमेंटच्या कायद्यांत वतनदार-इनामदारांनी राजनिष्ठ राहावें अशी शर्त असावी असें कोठेच नमूद नाही. पण सनदा देतेवेळीं त्यांत ब्रिटिश सरकारशीं राजनिष्ठ राहण्याची एक शर्त दडपून घालण्यांत आली! त्यावेळीं सगळाच मनू नवीन असल्याकारणाने आणि आपलीं इनामें व वतनें राहतील किंवा नाही याचीच धास्ती असल्यामुळे या अटीकडे किंवा तिच्या व्यापकतेकडे कोणाचें लक्ष गेलें नाही. तो काळ गेला व देशांत राजकीय चळवळ सुरू होऊन स्वराज्य देणें हेंच आमचें ध्येय आहे असे खुद्द बादशहाच्या तोंडूनदेखील उद्गार निघूं लागले. इतकेंच नव्हे, तर पूर्ण स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्राचा हक्क असून तें उद्दिष्टदेखील कायदेशीर आहे असें मानण्यापर्यंत राजनैतिकशास्त्राची प्रगती झाली. अशा स्थितींतदेखील वतनदार-इनामदारांनी अत्यंत शांततेने व तडजोडीच्या मार्गाने प्रयत्न केल्यास त्यांना त्यांच्या इनामांना व वतनांना मुकण्याचा प्रसंग यावा हा कोठचा न्याय? ही १९१० सालची गोष्ट. यानंतर १९३० सालीं माझ्यासंबंधाने पुन्हा प्रश्न उपस्थित करण्यांत आला होता. ती हकीकत पुढे येईल. तूर्त कोल्हापूर प्रकरणाकडे वळूं.

हणमंतराव देशपांडे यांच्यावरील खटल्यांत दामू जोशाला साक्षीला आणलें असतें म्हणजे कोल्हापुरास काय व्यूह चालले आहेत हें बाहेर पडलें असतें. म्हणूनच तो जरी पोलिसांच्या ताब्यांत होता तरी त्याला साक्षीला आणण्याचें धैर्य पोलिसांना झालें नाही. हा खटला चालू असतां हणमंतरावांचे वकील काका पाटील यांचे नावें टपालांतून एक पत्र आलें. तें दामूने कोल्हापूरच्या तुरुंगांतून पाठवलें होतें. त्या पत्राचा मीं फोटो काढून ठेवला आहे. प्रसंग पडल्यास त्याचा उपयोग मीं केला असता. टिळक मंडालेहून परत आल्यानंतर कोल्हापुरास त्यांच्या गैरहजेरींत काय काय कारस्थानें चाललीं होतीं हें त्यांना समजावें म्हणून त्यांचेकडे या पत्राचा फोटो दिला होता. हें पत्र केळकरकृत 'लो. टिळकांचें चरित्र', खंड ३, भाग ४ यांत ९२ पानावर दिलें आहे. त्यांतील मजकूर असा आहे :—

## दामू जोशी याचें गुप्त पत्र

कोल्हापूर ता. २७ जून १९०९

"मी आज ११ महिने तुरुंगांत आहे. त्याहूनही अलीकडे तीनचार महिने पोलिसचे अटकेंत मॅजिस्ट्रेटचे हुकमावाचून आहे. मला अटकेंत कां ठेविलें आहे समजत नाही. माझेवर कज्जा असलेला तो चालवितां येत नाही. येथील मॅजिस्ट्रेट लोक अगर दुसरे ऑफीसर दाद घेत नाहीत. मला ब्रिटिश पोलिसचे ताब्यांत ठेविलें आहे व त्यांचा सारखा त्रास सोसावा लागत आहे. हें जें पत्र धाडीत आहें त्याचें कारण एवढेंच की, मला पोलिसचे ताब्यांतून काढायची आपलेकडून कांही व्यवस्था करावी. मला असें समजविण्यांत आलें आहे की, 'तूं (म्हणजे मी) लोकमान्य टिळक, गंगाधरराव देशपांडे, गणपतराव मोडक, कृष्णराव खाडिलकर, हणमंतराव देशपांडे अशा बड्या लोकांवर (विरुद्ध) साक्षी आम्ही सांगूं त्याप्रमाणें दे. खोटी साक्ष देण्यास तयार जाहलें पाहिजे. नाही तर आतांपर्यंत हाल केले ते कांहीच नाहीत. यापुढे तुला हालहाल करून ठार मारूं व जाळून अगर पुरून टाकूं व पळून गेलास म्हणून हूल उठवूं व घरची इस्टेट फरारी झालास म्हणून जप्त करून बायकापोरांना भिकेस लावूं. तुला जो आजपर्यंत अटकेंत ठेवला आहे त्याचें कारण तूं जरी कज्जांतून सुटला आहेस, तरी तुझे विरुद्ध अपील केलें आहे त्यांत पुष्कळ शिक्षा द्यायला लावूं. तुझेवर गुन्हा शाबीत नाही झाला तरी महाराजांना सांगूं, म्हणजे महाराज कोठपर्यंत तसे करीत नाहीत पाहूं व शिक्षा दिल्यावर तुरुंगांत विष घालून मारून टाकणेची व्यवस्था करूं. डॉक्टर लोक आमचेच आहेत. ते आमचे बाहेर जाणार नाहीत, कांही तरी रोगानें मेलास असा त्यांचा अभिप्राय घेऊं. अगर निकाल न करितां असेंच कुचंबून कुचंबून मारूं. नाही तर खोटी साक्ष देणेस तयार हो.' असे सारखे माझे पाठीस लागले आहेत. त्यांचा त्रास चुकविणेसाठी साक्ष देतों असें बोललों आहें. तेव्हा मला लवकर पोलिसचे ताब्यांतून काढविण्याची व्यवस्था जाहलेस मजवरचा तो प्रसंग चुकणार आहे. मी खोटी साक्ष देत नाहीच. मग मरण येवो, तुरुंगांत जावो अगर कांही होवो. आता जास्त लिहीत नाही. भेटीअंतीं समक्ष जास्त खुलासा करीन. मी वरतीं लोकांचीं नावें लिहिलीं आहेत. त्यांचेवर व इतरही लोकांवर खोटे खटले करणार आहेत. दहशत बसवावी हाच हेतू आहे. माझ्याखेरीज इतरही कांही लोकांस खोटी साक्ष देवविण्याची खटपट चालू आहे. म्हणून आगाऊ कळविलें आहे."

## दामूची जबानी म्हणजे कादंबरी !

लो. टिळकांसंबंधाने व इतर पुढाऱ्यांसंबंधाने दामूने आपल्या जबानींत जीं विधानें केलीं होतीं, त्यामध्ये सत्याचा अंश थोडा जरी असता तरी इंग्रज सरकार स्वस्थ बसलें असतें असें केव्हाही मानतां येणार नाही.

त्याची जबानी म्हणजे एक कल्पित कादंबरीप्रमाणे वाटते. ब्रिटिश पोलिसपैकी वॉलिंजर, गायडर वगैरेसारख्या कसलेल्या अंमलदारांनी या कोल्हापूर प्रकरणाचा कसून तपास केला होता. त्यांच्या तपासांत त्यांनी आपलें काय मत दिलें हें जरी कळण्याला मार्ग नाही तरी दामूच्या सांगण्याप्रमाणे जर कांही तथ्यांश असता तर ब्रिटिश सरकारकडून त्या जबानींत ज्यांचीं नावें गोवलीं गेलीं आहेत त्यांचीं पाळेंमुळें खणून निघालीं असतीं. आणि तो काळ अत्यंत दडपशाहीचा होता. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे दामूच्या जबानीवर ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्यांनी मुळीच विश्वास ठेवला नाही हें सिद्ध होतें. साधारणपणें prima facie खरा मानण्यासारखा पुरावा जरी असता, तरी तो कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटापुढे मांडून ब्रिटिश हद्दींत असणाऱ्या माझ्यासारख्यावर extraditionचें वॉरंट मिळवण्यासाठीं, इतका उपद्याप करण्यास कोल्हापूरच्या पोलिसांनी कमी केलें नसतें. पागे यांच्यासारख्या ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्यांची कोल्हापूर पोलिसांना पूर्ण मदत असूनही त्यांच्या खटपटीला यश आलें नाही, यावरून मीं वर केलेलें विधान सहजच सिद्ध होतें. दामू जोशाची जबानी खरी असती तर त्याला हणमंतरावांच्या खटल्यांत साक्षीला आणण्याला कांहीच हरकत नव्हती. उलट ब्रिटिश पोलीस अंमलदार त्याच्या जबानीला Cock and Bull Story असें म्हणत असत. त्याच्यावर फेरीससाहेबाचा खून करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करून एक खटला भरण्यांत आला. त्या वेळीं ही जबानी त्याच्याविरुद्ध दाखल करण्यांत आली. हा खटला चालवण्याकरिता ब्रिटिश हद्दींतील डिस्ट्रिक्ट जज्ज किंकेड यांची नेमणूक कोल्हापूर दरबारने केली होती. या जबानींत अनेक खऱ्याखोट्या गोष्टी मिसळल्या गेल्या आहेत व दामू हा कांही तरी थापा देणारा मनुष्य आहे असें मत किंकेडसाहेबांनी प्रदर्शित केलें होतें. तथापि त्याच्याविरुद्ध त्या जबानीचा उपयोग करून त्याला सात वर्षांची शिक्षा दिली.

याप्रमाणे कोल्हापूरच्या हद्दींत धरलेल्या सर्व तरुणांवर खटले करून शिक्षा देण्यांत आल्या. विजापूरकर, वामन मल्हार जोशी व जोशीराव यांच्यावर, 'विश्ववृत्तां'तील पं. सातवळेकर यांनी लिहिलेल्या 'वैदिक मंत्रांचें सामर्थ्य' या लेखाबद्दल खटले भरून त्यांनाही शिक्षा झाल्या होत्या. अशा प्रकारे अनेक लोकांच्या आहुती घेऊन कोल्हापूर दरबारची क्षुधा शांत झाली असेल असें कोणाला वाटेल. पण तसें घडलें नाही.

### गणपतराव मोडकांची फसगत

दामू जोशाच्या कादंबरींत, कोल्हापूरच्या पण कोल्हापूरहद्दीच्या बाहेर राहणाऱ्यांचा समाचार घेण्याचा विचार ठरला. त्यांना extradition warrant प्रमाणे कोल्हापुरास चवकशीला आणण्याइतपत पुरावा नव्हता, याची जाणीव कोल्हापूर पोलिसांना होती. कोल्हापूरच्या पण हद्दीबाहेर राहणाऱ्यांत गणपतराव मोडक, नाना नागपूरकर व के. डी. कुलकर्णी असे तीन गृहस्थ प्रमुख होते. त्यांपैकी कुलकर्णी हे त्या वेळीं सापडले नाहीत. नागपूरकरांना पकडून सोडण्यांत आलें.

गणपतराव मोडक मुंबईस 'राष्ट्रमतां'त होते. त्यांची व शाहूमहाराजांची बरीच ओळख होती. त्यांचे वडील प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक यांच्याबद्दल महाराजांच्या मनांत बरीच पूज्य बुद्धी वसत होती, असें त्यांच्या बोलण्यावरून वाटत होतें. गणपतराव मुंबईस असते वेळीं कोल्हापूरकरांच्या बंगल्यावर एक दिवस बोलावण्यावरून ते गेले होते. त्या वेळीं खुद्द महाराजांची व त्यांच्या पदरच्या कांही मंडळींची भेट झाली. भेटींत महाराजांनी गणपतरावांसंबंधाने बऱ्याच प्रेमाच्या गोष्टी केल्या. त्याचा परिणाम असा झाला की, गणपतरावांच्या मनांत कोल्हापूरला जाऊन येण्याची बुद्धी झाली. कोल्हापुरास कोणत्या प्रकारची बेबंदशाही चालली होती याची माहिती गणपतरावांना असून व आपल्यावरही कोल्हापूर पोलिसांचा डोळा होता हें माहीत असून व तो चुकवण्याकरिता ब्रिटिश हद्दींतच राहण्याचें ठरवलें असून त्यांना त्या वेळीं कोल्हापूरला जाण्याची बुद्धी व्हावी हा चमत्कारच. पण सत्ता व बुद्धी असणाऱ्या मनुष्याला साधारणपणें अशक्य वाटणाऱ्या गोष्टीदेखील शक्य करून घेतां येतात. गणपतरावांच्या स्नेह्यांनी त्यांना कोल्हापूरला न जाण्याबद्दल अनेक प्रकारें सांगितलें. पण त्यांचें न ऐकतां ते कोल्हापुरास गेले. तेथे गेल्यानंतर ते मोकळेपणाने कांही दिवस हिंडत-फिरत होते. त्यामुळे त्यांच्या स्नेह्यांना जी भीती वाटत होती ती निराधार होती असें त्यांनाही वाटूं लागलें. तथापि त्यांच्या सर्व हालचालींवर नजर होती. कोल्हापूरच्या पोलिसांना चुकवून कोल्हापूरच्या हद्दीबाहेर जाणें त्यांना अशक्य होतें असें नाही. पण विश्वासामुळे ते इतके भारून गेले होते की, त्यांना कसलाही संशय आला नाही. गोविंदराव याळगी यांनी कोल्हापूरच्या बातम्या काढण्याकरिता कांही गुप्त व्यवस्था केली होती. त्यांच्या माहितीप्रमाणे गणपतरावांवर कांही तरी किटाळ येणार असें त्यांना समजलें होतें. गणपतरावांच्या कानावरही या गोष्टी जात असत. पण त्यांवर त्यांचा विश्वास बसला नाही. कोल्हापूरचें त्यांचें काम संपल्यानंतर ते मुंबईला जाण्याकरिता कोल्हापूरच्या स्टेशनावर एक दिवस आले. त्यांचेवर पाळत होतीच. स्टेशनावर त्यांना पकडण्यांत आलें. वास्तविक कोल्हापूर स्टेशन हें ब्रिटिश हद्दींत होतें. तेथे कोल्हापूरच्या पोलिसांना पकडापकडी करण्याचा अधिकार नव्हता. तरी कोण दाद घेणार? त्यांना पकडून अटकेंत ठेवण्यांत आलें व त्यांच्यावर फेरिस-साहेबाचा खून करण्याचा कट केल्याबद्दलचा आरोप ठेवून खटला भरण्यांत आला. आधी चाललेल्या खटल्यांत पुराव्याची सर्व तयारी होती. म्हणून गणपतरावांवरील खटला त्यांना अटक झाल्यानंतर ताबडतोब चालवयाला पाहिजे होता. पण गणपत-रावांवरच खटला चालवून किंवा त्यांना शिक्षा देववून काम भागण्यासारखें नव्हतें. त्यांना मला व माझ्या इतर स्नेह्यांना या खटल्यांत गोवावयाचें होतें. दोनतीन प्रयत्न पूर्वी झाले होते. पण ते निष्फळ झाले. ब्रिटिश पोलीसही ही गोष्ट मनावर घेईनात. म्हणून पुन्हा एकवार निकडीचा प्रयत्न करण्याचें कोल्हापुरास ठरलें. त्यांच्या मदतीला पागे डेप्युटी सुपरिंटेंडेंट हे होतेच. बेळगावास खुद्द त्यांना पूर्वी कोणाची मदत मिळाली नाही. माझे स्नेही भीमराव पाटील व त्यांचेच एक आप्त दादा सावंत यांची व कोल्हापूरच्या एकदोन

अंमलदारांची बरीच ओळख झाली होती. या ओळखीचा फायदा घेऊन त्यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न झाला. पण या दोघांनीही अशा खोट्या कामीं मदत देण्याचें कबूल केलें नाही. कोल्हापूर संस्थानांत आमचे कांही आप्तइष्ट होते. त्यांच्या मध्यस्थीने मला कोल्हापूरच्या हद्दींत बोलावून घेण्याचाही प्रयत्न अनेक वेळां करण्यांत आला. पण त्यांतही यश आलें नाही. या सर्व गडबडींत कोल्हापूरचे पोलीस आमच्या हालचालीवर अगदी बारकाईने नजर ठेवीत आणि आम्हीही आमच्या परीने त्यांच्या हालचालींवर नजर ठेवून बातमी मिळवीत होतों व पुष्कळ वेळां आम्हांला खरी बातमी मिळतही असे. त्यामुळे त्यांच्या पेचाला तोंड देण्याचें काम सुलभ होई. याचें सर्व श्रेय माझे मित्र गोविंदराव याळगी यांना आहे.

### *पोलिसांचे नवे मदतनीस*

अशी स्थिती असतां बेळगावास अचानक एक गृहस्थ कोल्हापूरकर व पागे यांच्या मदतीला आले. या गृहस्थांचें नाव विष्णुपंत गाडगीळ. हे बेळगाव येथे पूर्वी सरकारी वकील असलेले महेश्वरपंत गाडगीळ यांचे चिरंजीव. महेश्वरपंतांचा व आमच्या वडिलांचा पुष्कळ स्नेह होता, व आमचे वडील महेश्वरपंतांना त्यांच्या संकटकाळीं उपयोगी पडले होते, ही गोष्ट बेळगावास प्रसिद्ध आहे. विष्णुपंतांचे वडील बंधू हे माझ्याबरोबरचे लंगोटीयार. त्यामुळे आमचा व गाडगिळांचा बराच संबंध असे. महेश्वरपंतांनी आपल्या वडील मुलाला म्हणजे माझ्या लहानपणच्या स्नेह्याला दत्तक दिल्यामुळे ते आपल्या दत्तक घरीं गेले. महेश्वरपंत वारल्यानंतर वारसा नात्याने त्यांची सर्व इस्टेट विष्णुपंतांना मिळाली. इस्टेट सर्व-साधारणपणें बरी असल्यामुळे विष्णुपंत खाऊनपिऊन सुखी होते. ते फारसे शिकलेले नव्हते, तरी इंग्रजी साधारण लिहितांवाचतां व बोलतां येत होतें. घरीं कुटुंब व एक मुलगी होती. तरी कुटुंबसुख त्यांना नव्हतें. १९०६ सालीं टिळक बेळगावला येऊन गेल्यानंतर त्यांच्या मनांत कांही तरी सार्वजनिक काम करावें असें येऊन त्यांनी त्याप्रमाणे टिळकांना एक पत्र लिहिलें. तें पत्र टिळकांनी माझ्याकडे पाठवून "या मनुष्याचा उपयोग होण्यासारखा असेल तर करून घ्या" असें मला कळवलें. पण त्यांनी टाळाटाळी केली व बेळगावास स्वदेशीची व बहिष्काराची चळवळ जोरांत आल्यावेळीं पोलिसांकडे येण्याजाण्याचा परिपाठ ठेवला. सार्वजनिक कामें करण्याची जोखीम अंगा-वर घेण्यापेक्षा पुढे येण्याला हा मार्ग त्यांना बरा वाटू लागला. मनुष्य हुषार व चलाख होता. घरीं खाण्यापिण्याची ददात नव्हती. कोणा पाहिजे त्याच्याकडे जाण्याची मुभा होती. त्यामुळे चळवळीसंबंधाने बातम्या त्यांना सहज मिळत. त्यांत तिखटमीठ घालून, त्या चवदार करून, पोलिसांच्या कानावर घालून कांही प्रतिष्ठा मिळवावी, अशी महत्त्वाकांक्षा त्यांना झाली व त्याप्रमाणे त्यांनी क्रम ठेवला. प्रथमप्रथम पोलीस फौजदार, इन्स्पेक्टर यांच्यापर्यंतच त्यांचें कार्यक्षेत्र होतें. पुढे वाढतवाढत डिस्ट्रिक्ट पोलीस सुपरिंटेंडेंट

व शेवटीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपर्यंत तें गेलें. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट न्यायी होते तरी साशंक वृत्तीचे असल्यामुळे त्यांना लोकांच्या तोंडून चळवळीच्या बातम्या ऐकण्याची सवय होती. विष्णुपंत हे धूर्त असल्यामुळे त्यांनी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या या सवयीचा चांगला फायदा घेतला व अनेक खऱ्याखोट्या गोष्टी आमच्याविरुद्ध सांगण्याचा सपाटा चालविला. विष्णुपंतांवर त्यांचा इतका विश्वास होता कीं, दोघांमध्ये पत्रव्यवहारही सुरू झाला. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी लिहिलेलीं पत्रें त्यांनी आपल्याजवळ राखून ठेवलीं होतीं व आपण त्यांना लिहिलेल्या पत्रांच्या नकलाही ठेवल्या होत्या. त्यांतून माझ्याविरुद्ध बऱ्याच गोष्टींचा उल्लेख होता. पण डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला किंवा पोलीसलां त्यांच्या आर्बितीचा पुरावा मिळत नसे; त्यामुळे माझ्यावर कांही खटले वगैरे झाले नाहीत. असें जरी होतें तरी विष्णुपंतांच्या उद्योगाला अधिकाऱ्यांकडून उत्तेजनच मिळत होतें.

कोल्हापुरास माझ्याविरुद्ध खटाटोप चालला आहे ही बातमी विष्णुपंतांना होतीच; व याची माहितीही कोल्हापूरच्या पोलिसांना व पागे यांना लागली. तेव्हा त्यांचा उपयोग करून घेण्याचें कोल्हापूरच्या मंडळींच्या मनांत आलें.

मी म्युनिसिपालिटींत असते वेळीं बंडोपंत उचगावकर या नावाच्या गृहस्थाचा व माझा कशा तऱ्हेचा संबंध होता व त्यांचें म्युनिसिपालिटींतील वजन कमी करण्यांत मीं कसा पुढाकार घेतला होता याबद्दलची हकीकत पूर्वी दिलीच आहे. म्युनिसिपालिटींतील हा द्वेष त्यांनी माझ्याविरुद्ध आपल्या हयातींत कायम ठेवला होता. प्रसंग येईल त्या वेळीं सूड घेण्याचा त्यांचा विचार नेहमी ठरलेलाच असे. त्यामुळे गाडगिळांचा व बंडोपंतांचा स्नेह जुळला होता. माझ्या बाबतींत दोघेही समानशील होते. बंडोपंतांना रावसाहेब पदवी मिळाली होती व ते ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. त्यामुळे त्यांचेंही युरोपियन अधिकाऱ्यांकडे येणेंजाणें असे. या सवलतीचा फायदा घेऊन त्यांनी माझ्याविरुद्ध त्याचा उपयोग करण्याला कमी केलें नाही. पण बेळगावास आम्ही जी चळवळ करीत होतों ती सर्व उघड स्वरूपाची असल्याने व तींत कांही गुप्त क्रांतिकारक कटाचा संशय नसल्याने त्यांच्या कारवाईचा परिणाम कांही झाला नाही. ते देत असत त्या माहितीला व माझ्या करण्याला मेळ बसेना आणि कांही तरी खोटेंनाटें रचून माझ्यावर भलतेंसलतें प्रकरण उत्पन्न करण्याचा त्या वेळच्या अधिकाऱ्यांचा विचार नव्हता. अशा स्थितींत या पंतजोडीचें (बंडोपंत व विष्णुपंत) लक्ष कोल्हापूरकडे वळलें आणि त्यांनी पागे व फर्नांडीस यांचा स्नेह संपादन केला. बेळगावास त्यांनाही कोणी मदतनीस पाहिजेच होते. तेव्हा ही आयती आलेली संधी त्यांनी का गमवावी? पागे व फर्नांडीस बेळगावला येऊंजाऊं लागले. बेळगावास त्यांचें ठाणें बंडोपंतांच्याच घरीं असे व त्यांच्यामार्फत पुरावा मिळवण्याचें काम सुरू झालें. विष्णुपंतांचा व कोल्हापूरच्या मंडळींचा पत्रव्यवहार सुरू झाला. त्यापैकी कांही पत्रव्यवहार आमच्या हातीं लागला. त्यावरून व दामू जोशाच्या तुरुंगांतून लिहिलेल्या पत्रावरून आमच्यावर कांही तरी किटाळ येणार असें स्पष्ट दिसूं लागलें.

## श्रीधर हरी खेर यांचें धाडस

टिळक गुर्लहोसूरला गेल्यावेळीं श्रीधर हरी खेर या नावाच्या गृहस्थांची व माझी ओळख झाली होती व त्यांनी या कोल्हापूर-प्रकर्णी मला साहाय्य केलें अशी हकीकत दिली आहे. खेर हे त्या वेळीं वेळगावास अनपेक्षित रीतीने आले होते. वर्तमानपत्रांत लेख वगैरे लिहिण्याचा त्यांना नाद असे. अलीकडे मुंबईस त्यांनी एक मराठी दैनिक पत्रही चालविलें होतें. हे गृहस्थ धाडसी असून धूर्तही आहेत असें त्यांच्या पुढील वर्तनावरून दिसून येईल. माझी व त्यांची पूर्वीची ओळख असल्याने माझ्याकडे व गोविंदरावांकडे त्यांचें येणेंजाणें विशेष असे. जेवणखाण ते खानावळींत करीत असत. सरकारी युरोपियन किंवा हिंदी अधिकाऱ्यांकडे जाऊन, त्यांना कांही तरी घरगुती अडचणी सांगून ते कांही पैसे जमवीत व आपला खर्च भागवीत. कोल्हापूरच्या शिवाजी क्लबाचा व त्यांचा कांही संबंध होता व ते कोल्हापुरास राहात असत त्या वेळीं त्या क्लबांतील कांही मंडळींची व त्यांची ओळखही झाली होती. कोल्हापुरांतील कांही मोटमोठ्या मंडळींचीं कुलंगडींही त्यांना माहीत होतीं. आमच्या घरीं ते येतजात असत, त्यामुळे कोल्हापुरास आमच्याविरुद्ध चाललेल्या हकीकतींची त्यांना थोडीथोडी माहिती झाली. वेळगावास कोल्हापूरच्या कारस्थानाला मदत करणारे मुख्य गृहस्थ विष्णुपंत गाडगीळ आहेत हेंही त्यांना माहीत झालें. फर्नांडीस वगैरे मंडळी खऱ्या-खोट्याकडे न पाहणारी उलट्या काळजाची आहेत, हें त्यांना माहीत असल्यामुळे, या प्रकरणांत कांही तरी कर्तबगारी करून दाखवावी व आमच्या विरुद्ध रचविण्यांत आलेला व्यूह उलथून पाडावा अशी कल्पना त्यांच्या मनांत आली. त्यांनी ती आमच्या जवळ बोलूनही दाखवली. त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न आम्हीं केला. पण तो सिद्धीला गेला नाही.

आपल्या या उद्योगाला ते लागल्यानंतर आमच्या घराकडे येण्याचें त्यांनी बंद केलें. गुप्त रीतीने कोठे तरी ठरलेल्या ठिकाणीं भेटूं लागले. कोल्हापूरच्या प्रकरणाशीं आमचा संबंध असलेल्या गोष्टी ते विष्णुपंतांच्या कानावर जातील या धोरणाने बोलूं लागले. विष्णुपंतांनाही अशा एखाद्या माणसाची जरुरी वाटत होतीच. त्यामुळे या दोघांचा संबंध आला व तो जास्ती निकट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. दामू जोशी, प्रसादे, पाध्ये यांच्यासंबंधाने कांही ऐकीव गोष्टींत आपल्या पदरचें कांही घालून त्यांनी त्या विष्णुपंतांना सांगितल्या आणि आमचा व या मंडळींचा संबंध असल्याचें आपल्याला माहीत असल्याचें कळवलें. अर्थात विष्णुपंताला या गृहस्थाचा मोह सुटला. खेर हे आमच्या मंडळींची त्यांच्याजवळ निंदाही करूं लागले. त्यामुळे कोल्हापूर प्रकरणांत या गृहस्थाला साक्षीदार करण्याचा विचार विष्णुपंतांच्या मनांत येऊन त्याप्रमाणे त्यांनी खेर यांना सुचविलें. खेर यांनी ही गोष्ट मान्य केली. त्यामुळे विष्णुपंतांचा त्यांच्यावर विश्वास बसला. खेरांचें बिऱ्हाड अर्थात मग विष्णुपंतांच्या घरीं गेलें, व जेवणखाण त्यांचेकडेच

होऊं लागलें. विष्णुपंताच्या हालचालींच्या बातम्या आम्हांला त्यांच्यामुळे नियमितपणें व व्यवस्थेशीरपणें कळूं लागल्या. कोल्हापुराहून कांही पिस्तुलें वगैरे आणवून तीं खेरांच्या मार्फत आमच्या घरीं ठेवण्याचा बेतही चालला होता. खेर हे गाडगीळ यांच्या घरीं असतां गाडगीळ हे आपला पत्रव्यवहार कोठे व कसा ठेवतात याचें निरीक्षण करीत होते. त्यांच्या घराच्या माडीवर एका फडताळांत एका पेटींत विष्णुपंत आपला पत्रव्यवहार जपून ठेवीत असत. पेटीला व फडताळाला कुलुपें असत. खेर याच माडीवर बसत-निजत असत. विष्णुपंत बाहेर कोठेही गेले तरी खेरांना तेथे राहण्याला सवलत होती. हें पाहून खेरांच्या मनांत हा पत्रव्यवहार लांबवावा असें आलें. तथापि विष्णुपंत बेळगावास असल्यास हें साध्य होणें कठीण आहे असें त्यांना वाटलें. म्हणून त्यांनी विष्णुपंतांना एक दिवस असा सल्ला दिला कीं, हें प्रकरण फार दिवस भिजत पडलें. याचा कांही तरी एकदा लवकर निकाल लागला पाहिजे, याकरिता पत्रोपत्रीं कामें लांबणीवर पडतात म्हणून त्यांनी स्वतः कोल्हापुरास जाऊन सर्व व्यवस्था समक्ष करून यावें, व येतेवेळीं आमच्या घरीं ठेवण्याकरिता तेथून कांही पिस्तुलें वगैरे मिळाल्यास तींही घेऊन येण्याचें करावें. हा सल्ला विष्णुपंताला पटला व त्यांनी कोल्हापुराला जाण्याचा बेत ठरविला. ही गोष्ट आम्हांला खेर यांनी कळवली व "एकदोन दिवसांत विष्णुपंत व कोल्हापूरचे पोलीस यांच्या तंगड्या त्यांच्याच गळ्यांत अडकवितों" असें त्यांनी सांगितलें. खेर यांची आम्हांला विशेष माहिती नव्हती. त्यांचा व्यूह धोक्याचा आहे असें आम्हांला वाटूं लागलें. त्यांच्या बोलण्यावर विश्वासही बसेना. त्यांच्याबद्दलही जास्ती सावधगिरीने राहावें असें वाटून आम्ही बंदोबस्ताने राहिलों.

ठरल्याप्रमाणे विष्णुपंत कोल्हापूरला एका सकाळच्या गाडीने गेले. स्वतः खेर हे स्टेशनावर त्यांना गाडींत बसवून परत कोणत्या गाडीने बेळगावला यावयाचें वगैरे सर्व ठरवून आले. विष्णुपंत गेल्यानंतर मधूनच परत यावयाचें त्यांनी ठरवलें, तरी त्यांना पाचसहा तासांपर्यंत येतां आलें नसतें, हें गाडीच्या वेळा वगैरे पाहून खेरांनी ठरवलें होतें. घरीं परत आल्याबरोबर त्यांनी आपल्या कामाला प्रारंभ केला. फडताळाच्या कोंडीचे स्क्रू काढून फडताळ उघडलें, व आंतील पेटीचें कुलूप उघडून तींत असलेले सर्व कागदपत्र घेऊन आमच्या घरीं आले. तें कागदपत्र आम्हीं पाहिले. त्यावरून आमचा 'क्रांतिकारक कट' किंवा फेरिसचा खून करण्याचा कट उघडकीला येण्याऐवजी विष्णु-पंतांचा व कोल्हापूर पोलिसांचा आमच्यावर कांही तरी संकट आणण्याचा कट उघडकीस येण्याची खात्री वाटली. बेळगावच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचीं कांही पत्रें त्यांत होतीं. तींही त्यांच्या न्यायबुद्धीच्या इभ्रतीला धक्का आणण्यासारखीं होतीं. अशा प्रकारें साधनें आम्हांला साध्य झालीं खरीं. पण त्यांचा उपयोग तावडतोब कसा करावयाचा याच्या विचारांत आम्ही पडलों. पण खेर यांनी आगाऊच सर्व युक्ती योजून ठेवली होती. पत्रें हातीं लागल्यानंतर फोडलेली पेटी व फडताळ जसेंच्या तसेंच फोडलेल्या स्थितींतच ठेवून माडीला कुलूप लावून खेर हे आले होते. असें करण्यांत त्यांचा हेतू होता; नाही तर

त्यांना फडताळ व पेटी जशाचें तसें पूर्वीप्रमाणे करतां आलें असतें. हा पत्रव्यवहार घेऊन, मॅजिस्ट्रेटकडे जाऊन व त्यांना सर्व घडलेली हकीकत कळवून घरफोडी व चोरी केल्याचा गुन्हा आपण केला आहे, असा अर्ज करण्याचें त्यांनी ठरवलें होतें. माझ्यावर व माझ्या स्नेह्यांवर कुभांड रचण्याच्या उद्देशाने काय काय प्रयत्न होत आहेत हें उघडकीला आणण्याच्या उद्देशाने आपण हा गुन्हा केल्याचें कबूल करण्याचें त्यांनी अर्जांत लिहिलें होतें. हें धाडस व ही कल्पकता पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. विशेष वेळ न घालवितां ते तडक मॅजिस्ट्रेटकडे गेले व ठरल्याप्रमाणे सर्व त्यांनी केलें. पत्रव्यवहार पाहून मॅजिस्ट्रेट बुचकळ्यांत पडले, तथापि पोलिसांना घरची स्थिती पाहून पंचनामा वगैरे रीतीप्रमाणे करण्यास त्यांनी सांगितलें. पोलिसांनी सर्व स्थिती पाहिली. पण खेरांवर खटला केल्यास भलत्याच गोष्टी बाहेर येतील म्हणून त्यांच्यावर खटला केला गेला नाही. इतकें करून खेर स्वस्थ बसले नाहीत. विष्णुपंतांना कोल्हापूरहून पिस्तुलें आणण्या-करिता त्यांनी सांगून ठेवलें होतें. त्याप्रमाणे तीं त्यांच्याबरोबर येण्याचा संभव होता. ही गोष्टही त्यांनी पोलिसांना कळवून ठेवली होती. यामुळे पोलिसांना गाडगीळ कोल्हा-पूरहून येत असतां त्यांची झडती घ्यावी असें वाटून त्याप्रमाणे त्यांनी वाटेंतच त्यांची झडती घेतलीही. पण गाडगिळांजवळ कांही सापडलें नाही, म्हणून ते बचावले. गाडगीळ घरीं येऊन पाहतात तो सर्व स्थिती त्यांनी पाहिली व खेरांनी आपल्याला दगा दिला असें त्यांना समजलें. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे दाद मागण्याला ते गेले. पण या प्रकरणांत काय करावयाचें हें मॅजिस्ट्रेटचें पूर्वीच ठरलें असल्यामुळे विष्णुपंतांना मुकाट्याने यावें लागलें. पण तेव्हापासून डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे त्यांचें वजन कमी होऊन जाणें-येणें बंद झालें. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांची ओळख होण्यापूर्वी ते पोलिसांकडे विशेष जात असत. पण डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटची ओळख झाल्यानंतर पोलीस त्यांना कमी वाटूं लागले, व पोलीस आमच्यावर चांगली नजर ठेवीत नाहीत असा त्यांच्या विरुद्धही ते डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे कांगावा करीत. त्यामुळे पोलिसांनाही ही ब्याद कशी मिटेल असें वाटत होतें. आयती ही संधी येऊन विष्णुपंतांचा खोटेपणा उघडकीला आला यामुळे त्यांनाही बरें वाटलें. ही हकीकत कोल्हापुरास कळली. यामुळे तिकडील सर्व निवळेल असें आम्हांला वाटलें. पण तसें झालें नाही. खोटेपणाचें पूर्ण माप कोल्हापूरकरांच्या पदरांत अजूनही पडावयाचें होतें. ती हकीकत देण्यापूर्वी खेरांची आणखी एक कर्तबगारी सांगावयाची राहिली आहे ती सांगतों.

### कोल्हापूरचा 'कावळ्याचा बंगला'

वेळगावांतील ही कामगिरी संपवल्यानंतर खेरांच्या मनांत कोल्हापूरला जाण्याचें आलें. बेळगावास त्यांनी कोल्हापूर पोलिसांच्या विरुद्ध काय काय केलें होतें ही सर्व हकीकत विष्णुपंतांच्या मार्फत कोल्हापुरास पोचली होती. हें समजून उमजून कोल्हापूरला जाण्याचा त्यांचा विचार आम्हांला अत्यंत

धोक्याचा वाटला. कोल्हापुरास कावळ्याच्या बंगल्याचा दरारा या वेळीं विशेष होता. राजकीय कटांतील आरोपी म्हणून कोणालाही पकडावें, चौकशीशिवाय महिनेच्या महिने त्या बंगल्यावर अटकेंत ठेवावें व अतोनात छळ करून त्याच्या तोंडून आपल्याला वाटेल त्याप्रमाणे वदवावें, हा क्रम कोल्हापूरच्या पोलिसांचा सर्रास चालला होता. अशा वेळीं कोल्हापूर पोलिसांच्या विरुद्ध बेळगावास इतकें काम करून तेथे गेल्यास पोलीस खेरांना कावळ्याचा बंगला दाखविल्याशिवाय कसे राहतील, ही शंका आमच्या मनांत आली. पण खेरांच्या मनांत कोल्हापूरला जाऊन हा प्रसिद्ध कावळ्याचा बंगला पोलिसांच्या मार्फत पाहून तेथे चाललेला सर्व कारभार चव्हाट्यावर आणावयाचें होतें! हा हेतू मनांत धरून स्वारी कोल्हापूरला गेली. अपेक्षेप्रमाणे त्यांना अटक झाली. पोलिसांच्या तपासणीला (?) प्रारंभ झाला. पण त्यांनी अटकेंत असतां अशी वागणूक ठेवली की, पोलिसांची त्यांना हात लावण्याची छाती झाली नाही. आपल्याला पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या आहेत व त्या खुद्द महाराजांनाच आपण सांगणार आहों असें त्यांनी पोलिसांना सांगितलें. शेवटीं महाराजांची व त्यांची गाठ घालण्यांत आली. महाराजांना त्यांनी कांही गुप्त गोष्टी सांगितल्या व आपल्यावर खटला केल्यास आपण बॅरिस्टर-वकिलांमार्फत बचावाची सर्व तजवीज केली आहे व उघड कोर्टांत या सर्व गोष्टींचा पाढा वाचावा लागेल, मग आपलें काय होईल तें होवो, असें त्यांना बजावलें. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांना अटकेंतून सोडण्यांत येऊन कोल्हापूर सोडून हा गृहस्थ कधी जाईल असें कोल्हापूरच्या पोलिसांना झालें.

खेरांचें वर्तन नीतिदृष्ट्या योग्य होतें किंवा अयोग्य होतें हें ठरविणें त्या शास्त्रांतील तज्ज्ञांवरच सोपविणें बरें. आपला जीव धोक्यांत घालण्यांत त्यांचा हेतू स्वार्थी नव्हता हें मात्र येथे स्पष्ट नमूद करणें जरूर आहे. आम्ही कांही तरी सार्वजनिक कामें करीत होतों व आमच्यावर येणारें संकट निवारण्याकरिता आपल्या बुद्धीप्रमाणे कांही तरी उपयोगी पडावें हाच त्यांचा हेतू होता. याशिवाय टिळकांसंबंधाने त्यांची अतिशय पूज्यबुद्धी होती; आणि टिळकांची माझ्यावर कृपादृष्टी होती अशी त्यांची समजूत झाल्याने ते या कामाला प्रवृत्त झाले होते. त्यांची सांपत्तिक स्थिती गरिबीची होती व ते आपल्या निर्वाहाकरिता कोणत्या रीतीने पैसा मिळवीत हेंही वरील एका गोष्टीवरून ध्यानांत येण्या-सारखें आहे. तथापि त्यांनी कोणालाही लुबाडल्याचें किंवा बुडविल्याचें उदाहरण मला माहीत नाही. युरोपियन अगर हिंदी सरकारी नोकराकडून प्रसंगीं कांही तरी सांगून पाचपंचवीस रुपये मिळविले तर त्यांत आपण गैर करीत आहों, असें त्यांना वाटत नसावें. असलें कृत्यदेखील अगदी निकडीच्या वेळीं त्यांचेकडून होत असावें. नेहमीचाच तो त्यांचा परिपाठ असावा असें वाटत नाही. या कोल्हापूरच्या प्रकरणांत आम्ही पैसा खर्च करीत नव्हतों असेंही नाही. बातम्या काढण्याकरिता, पोलिसांवर व विशेषतः कोल्हापूर पोलिसांवर नजर ठेवण्याकरिता आम्ही बराच खर्च करीत होतों. आमच्याकरिता खेर यांनी इतकें काम केल्यानंतर त्यांनी आमच्याकडे कांही पैशाची मागणी केली असती

तरी ती आम्हीं नाकारली असती अशांतीलही प्रकार नव्हता. पण त्यांनी एक पैचीही मागणी केली नाही, इतकेंच नव्हे तर त्यांनी आमच्याकरिता केलेल्या श्रमांचा मोबदला म्हणून आम्हीं चांगली रक्कम देऊं केली असतां त्यांनी ती घेण्याचें नाकारलें. या गोष्टीला आज वीसपंचवीस वर्षें होऊन गेलीं. त्यांची प्रसंगोपात्त भेट होते. पण केव्हाही त्यांच्या बोलण्यांत-वागण्यांत माझ्याकडून कांही मदतीची अपेक्षा त्यांनी केली आहे असें दिसून आलें नाही. नैतिक दृष्ट्या त्यांच्या कामाचें निरीक्षण करतेवेळीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

### थोडीशी तात्त्विक चर्चा

आमच्यावर होत असलेला हल्ला परतवण्याकरिता आम्हांलाही अनेक उपाय योजावे लागले व त्याकरिता मनुष्यबळ मिळवावें लागलें. हें मिळवितांना पैशाचाही उपयोग करावा लागला. हें आमचें करणें योग्य होतें किंवा नाही, हें ठरवणें तज्ज्ञांवरच सोंपवतों. आणि हें ठरवितांना कोल्हापूर प्रकरणाशीं आमचा कांही तरी संबंध होता किंवा सर्वच प्रकरण असत्यावर उभारण्यांत आलें होतें असे दोन्ही पक्ष गृहीत धरून विचार करावा असेंही सुचवितों. कोल्हापूरशीं कांही तरी संबंध होता असें मानून विचार करतेवेळीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही की, आजपर्यंत कोणतेंही सार्वजनिक काम मीं स्वार्थबुद्धीने केलें नाही. ही एक गोष्ट झाली. कोल्हापूरचा व आमचा संबंध कांही नसून, केवळ गणपतराव मोडकांसारख्या कांही गृहस्थांचा स्नेह होता, म्हणून त्यांच्याबरोबर आम्हांला गुंतवून महाराष्ट्रांत राज्यक्रांतीकरिता अत्याचार करण्याचा एक कट आहे, व त्यांत टिळकांसहित शेंदीडशें कार्यकर्ते सामील आहेत असें सरकारला भासवून तो उघडकीस आणण्याचें श्रेय आपल्या पदरीं घेऊन आपलीं कृष्णकृत्यें किंवा स्वराज्यद्रोहाचीं कृत्यें झाकण्याचा प्रयत्न कोल्हापूर महाराजांचा चालला होता व त्याचे प्रयोग आमच्यावर होत असतां ते निष्फळ करण्याकरिता आम्हीं केलेली ही खटपट होय, अशा प्रकारें विचार करून या प्रश्नाचा निकाल देणें जरूर आहे. म्हणून हे दोन्ही पक्ष लक्षांत घेऊन निरनिराळ्या तऱ्हेने विचार करून निकाल दिला पाहिजे.

### शाहू महाराजांचा स्वभाव

यानंतर आम्हांला स्वस्थता मिळेल असें वाटलें होतें; पण त्याप्रमाणे घडून आलें नाही. कोल्हापूरच्या मंडळींचें व पागे यांचें बेळगावला येणें-जाणें चाललेंच होतें. मला कांही तरी युक्तीने कोल्हापूरच्या हद्दींत नेण्याबद्दल खटपट चालली होती. पण आम्हीही सावध होतों. विष्णुपंत गाडगिळांचें कारस्थान चव्हाट्यावर आल्यापासून बेळगाव पोलीस मात्र स्वस्थ होते. कोल्हापूर प्रकरणासंबंधाने त्यांना पूर्वी कांही संशय आला असला, तरी तो खेरांच्या प्रयत्नाने बराच

दूर झाला असावा. ब्रिटिश क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन खात्याचे मुख्य अधिकाऱ्यांना दामू जोशाच्या जबानीवर रचलेल्या डोलाऱ्याचें डळमळीत स्वरूप स्पष्टपणें आधीच कळून चुकलें होतें. म्हणून त्यांनीही या प्रकरणांत उचल घेण्याचें बहुतेक बंद केलें होतें. कोल्हापूरकरांनी मदत मागितल्यास सरळपणाने कितपत देतां येईल तितकी ते देत असत. आपलीकडे पागे यांच्याखेरीज कोणी लक्ष घालीत नसत. अशा स्थितींत पुढील कार्याचा सर्व भार कोल्हापूरकरांवरच पडला. शाहू महाराजांच्या स्वभावाचा लौकिक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें पुष्कळांना अनुभवून व ऐकून माहीत आहे. ते महत्त्वाकांक्षी, दीर्घद्वेषी असल्यामुळे हातीं धरलेलें काम शेवटाला पोंचवल्याखेरीज स्वस्थ राहणारे नव्हते. माझ्या बाबतींत दोनतीन वेळां केलेले प्रयोग फसले, त्यामुळे कोल्हापूर पोलिसांची थोडी नाचक्की झाली होती व तिचा परिणाम थोडाबहुत तरी लोकांच्या दृष्टीने स्वतः महाराजांवर झाल्याशिवाय राहिला नाही. बेळगावकरांनी कोल्हापूर पोलिसांना दाद लागूं दिली नाहीं, उलट त्यांचेच दात त्यांच्या घशांत कोंबले गेले, अशा अर्थाची भाषा कोल्हापुरांत निघूं लागली. कोल्हापुरांत हा जो आमच्याविरुद्ध प्रकार चालला होता त्याला लोकमत प्रतिकूल होतें. तथापि, तेथील बिकट परिस्थितीमुळे पुष्कळांना तोंड दाबून बुक्क्यांचा मारा खावा लागत असे. आपल्याकडून चाललेल्या धुडगुसाला प्रतिकार करण्याची शक्ति नसली तरी "परस्पर ब्रिटिश हद्दींत चांगलें चाललें आहे" असें वाटून समाधान व्यक्त होत असे. हें महाराजांना समजून आल्यानंतर त्यांना त्यांच्या स्वभावानुसार चीड येणें स्वाभाविक होतें. म्हणून सटरफटर अधिकाऱ्यांवर या गोष्टी अवलंबून न ठेवतां स्वतःच्या हातांत त्यांनी शेवटचा रामबाण उपाय म्हणून सर्व सूत्रें घेतलीं.

गणपतराव मोडकांना अटकेंत ठेवून बरेच दिवस झाले होते. त्यांच्यावर कर्नल फेरिसचा खून करवण्याचा आरोप होता. त्यांच्याबरोबर दुसरे एक के. डी. कुलकर्णी (यांना केडबा म्हणत असत) या नावाचे एक गृहस्थ आरोपी होते. पण ते फरारी होते. त्यांचें कुटुंब कोल्हापूर हद्दींतच राहात असून त्यांची अविभक्त कुटुंबांतील मिळकतही तेथेच होती. कुलकर्णी हे फरारी आहेत म्हणून त्यांच्या अविभक्त कुटुंबांतील सर्व मिळकत जप्त करण्यांत आली होती. यानंतर तरी मोडकांच्या खटल्याला सुरुवात होऊन हें प्रकरण लवकर निकालांत लागेल अशी अपेक्षा होती. पण मला गणपतरावांबरोबर अडकवल्याखेरीज कार्यभाग यथासांग होणार नाही असें वाटून माझ्या बाबतींत आणखी एक प्रयत्न करण्याचें ठरविण्यांत आलें. ही बातमी आम्हांला लागली. आता खुद्द खाशा स्वारीशीं प्रसंग येणार म्हणून आम्हांलाही जास्ती काळजी वाटूं लागली. पूर्वीच्या हकीकतींत खुद्द महाराजांचा कितपत संबंध होता हें नक्की सांगण्याचीं साधनें नाहीत. पण यापुढे ज्या प्रसंगाचें वर्णन येणार आहे त्यांत खुद्द महाराज सरकारांचा हात असल्याबद्दलचा पुरावा आहे. तो प्रसंग खालीलप्रमाणे आहे.

## मला अडकवण्याचा कट

कोल्हापुरास शालिग्राम या नावाचा एक तरुण गृहस्थ राहात असे. त्याने जपानला जाऊन रसायनशास्त्राचा अभ्यास केला होता. जपानहून परत आल्यानंतर कोल्हापूरच्या जंगलांत रॉकेलसारखीं तेलें व इतर रासायनिक द्रव्यें काढण्याचा कारखाना स्थापावयाच्या खटपटींत तो होता. त्याची व माझी ओळख नव्हती; पण कोल्हापुरास रसायनशास्त्र शिकून आलेला एक मनुष्य आहे इतकी माहिती होती. या गृहस्थाला हातीं धरून त्याच्या मार्फत आम्हांला गोत्यांत आणण्याचा विचार कोल्हापुरांत झाला. त्याचें घरदार कोल्हापुरासच असल्यामुळे व आपल्या उद्योगधंद्याला कोल्हापुराकडून मदत मिळेल ही आशा असल्याने शालिग्राम हा महाराजांच्या हातांतील बाहुलें होण्याला तयार झाला. स्फोटक बाँब, डायनामाइट यांसारखे पदार्थ तयार करण्याची माहिती देणारें एक पुस्तक त्याला देण्यांत आलें. आणि हें पुस्तक मोडकांना अटक होण्यापूर्वी त्यांनी माझ्याकडे देण्याबद्दल सांगितलें आहे असें मला सांगून माझ्याजवळ तें पुस्तक ठेवावयाचें व नंतर त्याबद्दलची माहिती बेळगावच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला देऊन माझ्या घराची झडती करवून पुस्तकासहित मला पकडून कोल्हापूरला न्यावयाचें असा बेत ठरला.

पण सुदैवाने हा बेत त्रिकर्णी होऊन याची बातमी आम्हांला लागली. ही बातमी देणारे गृहस्थ कोल्हापूरच्या हालचालींची चांगली माहिती असणाऱ्यांपैकी होते. ते हल्ली मयत आहेत. ते महाराज सरकारच्या विश्वासांतले होते. याच संधीला ते बेळगावास आले होते व याच व्यसनीं असलेल्या एका माझ्या स्नेह्याच्या घरीं उतरले होते. आमच्या स्नेह्याला कोल्हापूर येथे चाललेल्या घडामोडींची माहिती होती व त्यांचा सल्ला मी केव्हाकेव्हा घेत असें. माझ्या स्नेह्यांनी थोडा सावधपणा राखून ऐन खाण्यापिण्याच्या रंगांत कोल्हापूरच्या गोष्टी काढल्या व त्यांतच मोडकांच्या खटल्याची माहिती विचारली. त्या गृहस्थाने अर्धवट अशी माहिती देऊन माझ्या घरीं कांही जिन्नस ठेवण्याचा प्रयत्न शालिग्रामच्या मार्फत होणार आहे असें अर्धवट हुषारींत व अर्धवट नशेंत असतांना सांगितलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझ्या स्नेह्यांनी ही बातमी मला कळविली. तथापि ज्या स्थितींत ही माहिती माझ्या स्नेह्याला मिळाली ती लक्षांत घेतां माझा तिजवर एकदम विश्वास बसला नाही. बातमी खरी असल्याबद्दल माझ्या मित्रांनी माझी खात्री केली. पुढे दोनतीन तासांच्या आंतच शालिग्राम व दोन पोलीस अंमलदार कोल्हापूरहून बेळगावला आल्याची बातमी समजली, व बरोबर येतांना एक पुस्तक आणल्याचेंही कळलें. हेंच पुस्तक माझ्याकडे ठेवण्याकरिता संध्याकाळीं तो येणार इतकी हकीकतही कळली. या प्रकारें माझ्या स्नेह्याच्या बातमीला दुजोरा मिळाला. बेळगावजवळच्या शहापूर या गावीं गावडे या नावाचे एक व्यापारी राहतात. त्यांनी कोल्हापूरच्या जंगलांतील हिरडा वगैरे खरेदी केला होता. त्या ओळखीने शालिग्राम हा त्यांच्या घरीं उतरण्याला

गेला व त्याचेबरोबर आलेले पोलीस मी गावांत आहे किंवा नाही या तपासाकरिता व माझ्यावर नजर ठेवण्याकरिता बेळगावीं आले. यापैकी एक पोलीस पूर्वी बेळगावास होता. त्याची ओळख आम्हांला होती. तो आमच्या घराभोवती घिरट्या घालीत होता असें दिसून आल्याबरोबर आमचा संशय पक्का झाला. आम्हींही गावड्यांच्या घरावर पाळत ठेवण्याची व्यवस्था केली. ही बातमी पक्की आहे अशी खात्री झाल्यावर पुढे काय करावें हा विचार आम्ही करूं लागलों. बेळगाव पोलिसांना बातमी देऊन त्यापैकी एखाद्या अधिकाऱ्याला आमच्या घरीं लपवून बसवावें, व शाळिग्राम येऊन माझ्याबरोबर बोलणें सुरू करील त्या वेळीं बुकासहित पकडावें, असा विचार प्रथम ठरला. पण न जाणो, कदाचित शाळिग्राम आला नाही, किंवा आला तरी येतेवेळीं पुस्तक आणलें नाही, असें झाल्यास विनाकारण बभ्रा होईल असें आम्हांला वाटलें. शिवाय बेळगावच्या पोलिसांवर तरी कितपत भरवसा ठेवावा असाही विचार आला. त्या कारणाने पोलीसला त्या दिवशीं वर्दी न देतां शाळिग्राम आल्यानंतर काय काय होतें हें पाहून पुढे काय तें ठरवितां येईल, या विचाराने त्याची वाट पाहात बसलों.

संध्याकाळीं गावडे व शाळिग्राम हे दोघे आले. गावड्यांची व माझी ओळख असल्याने गावड्यांनी शाळिग्रामची व व माझी रीतीप्रमाणे ओळख करून दिली. इकडच्या-तिकडच्या गोष्टी झाल्यावर जपानला जाऊन विद्या संपादन करून आल्याबद्दल त्याची मीं बरीच स्तुती केली. एकंदरांत मी त्याच्यावर विश्वास ठेवीत आहें असा भाव त्याच्या मनांत उत्पन्न व्हावा अशा धोरणाने मी त्याच्याशीं बोलत होतों. त्यामुळे त्यालाही धैर्य आलें व त्याने पुस्तकाची गोष्ट काढली. आपण अत्यंत प्रयासाने तें पुस्तक मिळवून मोठ्या शिताफीने हिंदुस्थानांत आणलें आहे असें त्याने सांगितलें. मोडकांचा व आपला स्नेह असल्याने त्यांच्याजवळ पुस्तक राहिल्याने सुरक्षित राहील असें वाटून तें त्यांच्याजवळ ठेवलें. पण कोल्हापुरास जेव्हा गडबड सुरू झाली त्या वेळीं त्यांनी तें परत दिलें व प्रसंग पडल्यास तें माझ्याकडे ठेवण्यास सांगितलें आहे, अशी हकीकत त्याने मला कळवली. पुस्तक बरोबर आणलें नव्हतें. मी ठेवून घेण्यास कबूल झाल्यास ताबडतोब घेऊन येतों, असें तो म्हणाला. मी ठेवून घेण्यास कबूल आहें, पण तें दुसरे दिवशीं संध्याकाळीं आणा, असें त्याला सांगून पाठवलें. पुढे काय करावें या विचारांत रात्र घालवली. काय होईल तें होवो, या सर्व गोष्टींची वर्दी पोलीसला देऊन गावड्यांच्या घराची झडती घ्यावी असा विचार नक्की ठरविला.

### शाळिग्रामचा डाव उलटविला

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पोलीसच्या डेप्युटी सुपरिंटेंडंटला ही हकीकत कळवून कोल्हापूरकरांचा काय बेत होता याची कल्पना दिली. कोल्हापूर पोलिसांचा वरचेवर उपद्रव होत असे, त्यामुळे बेळगावचे पोलीसही कंटाळले होते. आपल्या हद्दींत कांही नसतांना विनाकारण कोल्हापूरचे पोलीस कांही तरी धांदल

करतात असेंही त्यांना वाटत होतें. निदान डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडंटला असें वाटत होतें ही गोष्ट मला माहीत होती. म्हणून त्यांचे जवळ ही गोष्ट मीं सांगितली. माझ्याकडून हकीकत ऐकून घेतल्याबरोबर डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडंट हे पोलीस सुपरिंटेंडंटकडे गेले व त्या दोघांनी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कानावर ही गोष्ट घातली. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी माझा जबाब लेखी घेण्यास हुकूम दिला व ही बातमी खोटी ठरल्यास खोटी बातमी दिल्याच्या आरोपावर माझ्यावर खटला होईल अशी सूचना मला देण्यास डेप्युटी सुपरिंटेंडंटला कळवलें. डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडंटनी माझी हकीकत लिहून घेऊन त्यावर माझी सही घेतली. तो जबाब घेऊन डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे ते गेले. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी जबाब वाचून पाहिला व गावड्यांच्या घराची झडती घेण्याबद्दल व गावडे व शाळिग्राम यांना अटक करण्याबद्दल हुकूम दिला. पण शहापूर हा गाव सांगली संस्थानच्या हद्दींत असल्याने तेथील पोलिसाची व मॅजिस्ट्रेटची मदत घेणें जरूर होतें. म्हणून त्या खटपटीला डेप्युटी सुपरिंटेंडंट हे लागले. पण इतक्यांत ज्या गृहस्थाला आम्हीं गावड्यांच्या घरीं राहून शाळिग्रामवर पाळत ठेवण्याला सांगितलें होतें त्याचा व गावड्यांचा स्नेह असल्यामुळे गावडे यांजवर कांही तरी संकट येईल असा संशय येऊन गावड्यांचा बचाव व्हावा म्हणून शाळिग्रामवर नजर ठेवण्याकरिता आपली योजना झाली आहे अशी बातमी त्याने गावड्यांना सांगितली. ही बातमी ताबडतोब गावड्यांनी शाळिग्रामला कळवली. शाळिग्राम सावध झाला व त्याने ताबडतोब तें पुस्तक बुकपोस्टाने कोल्हापुरास महाराजांच्या नावें पाठवलें. ही हकीकतही आम्हांला उडतउडत कळली व ती मीं पोलिसांना कळविली. रीतीप्रमाणे गावड्यांच्या घराची झडती झाली; पण मुद्देमाल कांहीं मिळाला नाही. त्यामुळे आमची थोडी निराशा झाली.

तथापि गावडे व शाळिग्राम यांना बेळगाव पोलिसांनी अटक करून बेळगाव डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे हजर केलें. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी दोघांच्या जबान्या घेतल्या. शाळिग्रामने कोल्हापूरपासूनची सर्व हकीकत कळवली व गावडे यांनी आमच्या घरीं आल्यापासूनची हकीकत कळवली. पुस्तक बुकपोस्टाने कोल्हापूरला पाठवल्याचें कळल्यानंतर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी कोल्हापूर पोस्टमास्तरला तार करून बुकपोस्ट अडवून ठेवण्यास कळवलें. शाळिग्रामबरोबर आलेले पोलीस परत कोणाला न समजतां निघून गेले. बुकपोस्टाची डिलिव्हरी घेण्याचा प्रयत्न कोल्हापुरास झाला; पण डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडून तार गेली असल्यामुळे पुस्तक पोस्टमास्तराच्या ताब्यांतच राहिलें. कोल्हापूर महाराजांसारख्यांचें नाव व संबंध शाळिग्रामच्या हकीकतींत निघाल्यामुळे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी वरिष्ठांकडे रिपोर्ट केला. शाळिग्रामला व गावड्यांना अटकेंत तसेंच ठेवलें. त्यांच्यावर खटला चालला असता तर त्यांच्या बचावाकरिता मुंबईहून माधवराव बोडस येणार होते, अशी बातमी समजली होती. ही खरी असल्यास बोडसांचा व कोल्हापूरकरांचा धागादोरा कोठे व कसा जुळला हें समजणें मला त्या वेळीं तरी अशक्य होतें. दोन दिवसांत पुण्याहून पोलीस डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल गायडर हे बेळगावला

आले व मला त्यांचेकडून बोलावणें आलें. मी त्यांना हॉटेलमध्ये भेटलों. तेथे शाळिग्रामही होता. मला पाहिल्याबरोबर त्याला रडूं आलें व "यांचाच गळा मी कापणार होतों!" असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले. गायडरनी माझ्या तोंडून सर्व हकीकत ऐकून घेतली. कोल्हापूरच्या उलाढालींची सर्व हकीकत त्यांना पूर्वीपासून माहीत होती. म्हणून सर्व गोष्टी लक्षांत येण्याला त्यांना वेळ लागला नाही. त्याच दिवशीं शाळिग्रामला घेऊन ते पुण्याला आले, व गावडे यांना मुक्त करण्यांत आलें. शाळिग्रामला पुण्यांत कोणापुढे हजर केलें, व कोल्हापूरकरांनी काय काय खटपटी केल्या हें मला कळलें नाही. पण शाळिग्रामला सोडून देण्यांत आलें व त्यानंतर तो बरेच दिवस गायडर यांच्या आश्रयाने पुण्यास होता.

## *दामू जोशाची जबानी*

या प्रकरणाचें पुढे कांही झालें नाही. मोठ्यांचें सर्वच मोठें! इंग्रज सरकारच्याच हिताकरिता इतक्या उलाढाली कोल्हापुरास चालल्या होत्या, तेव्हा त्याचा परिणाम काय होणार हें आम्हांला दिसतच होतें. तथापि, बेळगावचे पोलीस माझ्याकडे जास्ती लक्ष पुरवून कोल्हापूरचे पोलीस बेळगावास येत त्यांच्यावर पाळत ठेवूं लागले. त्यामुळे त्यांचें येणें बंद झालें व पुष्कळ दिवस भिजत पडलेल्या मोडकांच्या खटल्याला ताबडतोब माझ्याशिवाय सुरुवात झाली. खटला अखेर निकाला-करिता ब्रिटिश हद्दींतील सेशन जज्ज क्लेमेंट्स यांच्यापुढे चालून मोडकांना पांच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. क्लेमेंट्स हे अशा कामीं न्याय देण्याच्या बाबतींत प्रसिद्धच होते. हेच साहेब पुण्यास मॅजिस्ट्रेट असतांना यांचेपुढे टिळकांवरील ताईमहाराज प्रकरणांतील फौजदारी खटला चालून त्यांना शिक्षा ठोठावण्यांत आली होती. कोल्हापूर-करांचा व ताईमहाराजांच्या खटल्याचा काय संबंध होता हें या प्रकरणाच्या आरंभीं सांगितलेंच आहे. क्लेमेंट्ससाहेबांनी मोडकांच्या खटल्याच्या निकालांत "दामू जोशाने बेळगाव येथे देशपांडे यांचेकडे बॉंब, पिस्तुलें वगैरे नेऊन ठेवलीं होतीं" असें विधान ठोकून दिलें आहे! देशपांडे म्हणजे मी की हणमंतराव देशपांडे त्यांच्या मनांत होते हें सांगतां येण्यासारखें नाही. मोडकांच्या खटल्याचा निकाल झाल्यानंतर या प्रकरणावर पडदा पडल्याप्रमाणे झालें व मीही दुसऱ्या उद्योगाला लागलों. के. डी. कुलकर्णी हेही पुढे कांही दिवसांनी हजर झाले व त्यांनाही शिक्षा झाली. दामू जोशी याला दोन्हीही खटल्यांत साक्षीला आणलें नाही! तो शिक्षा भोगीत असतां तुरुंगांतून एक दिवस पळाला. त्याचा तपास लावून पकडून देणाऱ्याला कोल्हापूरदरबारकडून वीस हजार रुपयांचें बक्षीस लावण्यांत आलें. कोल्हापूरच्या न्यायपद्धतीवर लोकांचा इतका विश्वास होता की "तुरुंगांत होता की मारलें" अशी लोकवार्ता उठली होती. आमच्याच आश्रयाने तो कोठे तरी असेल अशी कल्पना करून त्यांनी शोध लावण्याचा प्रयत्न केल्याची बतावणी केली. पुढे सुमारें चौदापंधरा वर्षांनी १९२७ सालीं दामूला वऱ्हाडांत पकडण्यांत

आलें. आपण तुरुंगांतून कसे निसटलों याबद्दलची जी हकीकत त्याने सांगितली तिजवरून कोल्हापूर हें काय गौडबंगाल आहे याची कल्पना येईल. त्याला पकडल्यानंतर कोल्हापूरला त्याच्यावर खटला झाला. त्या जबानींत त्याने असें सांगितलें की, पागे व फर्नांडीस या पोलीस अधिकाऱ्यांच्या साहाय्याने प्रत्यक्ष शाहूमहाराजांनी आपल्यास पळून जाण्याची संधी दिली, व ही संधी देण्यांत हा हेतू होता की, कर्नल वुडहाऊस—पोलिटिकल एजंट—हा महाराजांच्या विरुद्ध सरकाराकडे बातमी देत होता म्हणून त्याचा खून करावयाचा ! ही गोष्ट मान्य केल्यानंतर आपल्याला पळून जाण्याची संधी देण्यांत आली व ती आपण घेतली.

केळकरांच्या टिळकचरित्रांत केळकरांनी दामूची जबानी दिली आहे, ती अशी : १९२७ च्या नव्या खटल्यामध्ये दामू जबानी देतांना म्हणतो :

"रात्रीं एका लहानशा कोठडींत मला कोंडून ठेविलें. व दोन शिपाई व फासेपारधी माझ्या पहाऱ्यावर ठेविले. सकाळीं उजाडल्यानंतर ७ वाजतां, कुरणाजवळ एक शेड बांधली आहे तेथे मला नेलें. ९ वाजण्याच्या सुमारास पागे एकटे आले व शिपायास काढून टाकलें. माझ्यावर खोटेनाटे आरोप घतले होते त्याबद्दल कळकळीचें भाषण त्यांनी केलें. 'झाली ती गोष्ट झाली. आता सुटण्याची संधी आली आहे. आता जर महाराजांचें काम करशील, तर तुला मी सोडण्याची तजवीज करतों' असें ते म्हणाले. मी म्हणालों, 'माझ्याकडून होण्यासारखें असल्यास सांगा, तें मी करीन.' ते म्हणाले, 'कर्नल वुडहाऊससाहेब महाराजांविरुद्ध वर लिहीत असतात, व आम्ही जें करूं त्याला व्यत्यय आणतात. तर त्यांचा काटा काढावयाचा आहे. ज्याप्रमाणे जाधवराव वगैरे लोकांना हाकून लावतां येतें त्याप्रमाणे या लोकांना हाकून लावतां येत नाही. कारण हे ब्रिटिश गव्हर्नमेंटचे लोक आहेत. म्हणून त्याचा कायमचा काटा काढावयाचा आहे. तर तूं हें काम कर.' म्हणून त्यांनी मला सांगितलें. त्या वेळीं मीं पुष्कळ आढेवेढे घेतले. त्यांना मीं सांगितलें की, 'पोरकटपणा करून व खोटेनाटे आरोप ठेवून २० वर्षांची शिक्षा दिली आणि जर मीं खून केला तर फाशी द्या म्हणजे झालें.' त्या वेळीं त्यांनी फर्नांडिसचें उदाहरण देऊन मला सांगितलें कीं, 'कर्नल रेसाहेब पोलिटिकल यांना फर्नांडिसनी वीप घातलें होतें, त्या बाबतींत त्यांना आरोपी करून त्यांच्यावर केसही चालली होती. परंतु त्यांना महाराज सरकारचा पाठिंबा असल्याकारणाने त्यांना सोडून देऊन हल्ली पोलिस सुपरिंटेंडंट बनविलें आहे. हें पाहा, ज्या बाजूला महाराज व आम्ही आहों त्या बाजूला तुला भिण्याचें कांही कारण नाही. याउपर तूं जर न ऐकशील तर हें मराठी राज्य आहे व ज्याप्रमाणें अबूबकर व काकामास्तर यांचीं दोघांचीं प्रेतें बाहेर काढलीं त्याप्रमाणे तुझेंही प्रेत बाहेर काढूं हें ध्यानांत ठेव. संस्थानामध्ये आम्हीं कांहीही केलें तरी आमचें कोण काय करणार?' त्यानंतर 'मला सोडा, मी ही गोष्ट करीन' असें त्यांना कबूल केलें. त्या वेळेस ते म्हणाले, 'असें जर तुला सोडलें तर महाराज सरकारवर दोष येईल. तर असे आम्ही तुला सोडत नाही. तुला पळून जाण्याची तजवीज करून देऊं."

पुढे तो पळून गेला.

## अण्णासाहेब लठ्ठे

या खटल्यांत दामूला पुन्हा शिक्षा झाली. पण गेल्या वर्षी त्याला शिक्षेची मुदत पुरी होण्यापूर्वी सोडून देण्यांत आलें. मोडकांना शिक्षा झाल्यानंतर कांही दिवसांनी कोल्हापूरच्या टाउन हॉलच्या बागेंत असणाऱ्या पंचम जॉर्ज बादशहाच्या पुतळ्याला कांही काळें फासण्यांत आलें. तेव्हां पुन्हा कांही तरी गडबड उडणार असें आम्हांला वाटूं लागलें. पण या प्रकरणाचा वारा निराळ्या बाजूने गेला. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत लठ्ठे हे प्रोफेसर होते. लठ्ठयांनी चिरोल-साहेबांच्या प्रसिद्ध ग्रंथाचें भाषांतर करण्यांत डोंगरे व जाधव यांना मदत केली होती. त्यामुळे त्या वेळीं लठ्ठे यांचेवर महाराजांची मर्जी होती. पण या वेळीं इतराजी होऊन पुतळ्यावर डांबर फासण्याच्या बाबतींत लठ्ठे यांचें अंग आहे असा संशय येऊन त्यांना पकडण्याचा बेत ठरला होता. ही बातमी लठ्ठे यांना लागतांच ते अचानक कोल्हापूरची हद्द सोडून बेळगावला आले व तेथे एल्‌एल्‌. बी.चा अभ्यास करून पास झाल्यानंतर वकिली करूं लागले. त्या वेळीं त्यांची व माझी ओळख झाली. भेटींत पुष्कळ वेळां कोल्हापुरी कारस्थानाच्या गोष्टी निघत. पण शाहूमहाराज निवर्तल्यानंतर त्यांचें चरित्र लिहिण्याकरिता हल्लीच्या महाराजांनी लठ्ठे यांची नेमणूक केली व या मेहनतीबद्दल त्यांना बरीच मोठी रक्कम मिळाली. हा ग्रंथ वाचणारांना शाहूमहाराजांचें चरित्र अत्यंत उज्ज्वल होतें हें सिद्ध करण्याकरिता लठ्ठे यांनी अत्यंत कौशल्य दाखवलें असें दिसतें. लठ्ठे हे इतिहास लिहीत नव्हते, तर मेहनताना घेऊन शाहूमहाराजांबद्दल दरबारची बाजू मांडीत होते. मोडकांच्या खटल्याची वगैरे हकीकत देतांना क्लेमंट्सच्या ठरावांतील उतारा त्यांनी दिला आहे. पण आपण एकदम कोल्हापूर सोडून बेळगावला येण्याचें काय कारण घडलें तें मात्र दिलें नाही. त्यांना पुढे दिवाणगिरीवर नेमण्यांत आलें व हें काम करून हल्ली पुन्हा ते पूर्वस्थळावर म्हणजे बेळगावला आले आहेत. यावरून "...... पुरुषस्य भाग्यं। देवो न जानाति कुतो मनुष्यः" या सुभाषिताची आठवण होते.

## झुंजणारीं दरबारी कोंबडीं

शाहूमहाराजांना कोंबडीं झुंजवायची हौस होती, त्याचप्रमाणे आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांत भांडणें असलेलीं पाहूनही त्यांना समाधान होत असे. त्यामुळे कोल्हापूरच्या अधिकाऱ्यांत दोन पक्ष झाले होते. एका पक्षाचे म्होरके भास्करराव जाधव व दुसऱ्याचे पुढारी बाळासाहेब गायकवाड. बाळासाहेब हे कांही दिवस कोल्हापूरचे दिवाणही होते. या दोघांमध्ये इतकें वैर वाढलें होतें की, एकमेकांचा खून करविण्यापर्यंत मजल गेली होती, अशा बातम्या होत्या. मल्या या नावाच्या एका मनुष्याला कांही आरोपावरून अटक करून बेळगावच्या तुरुंगांत आणून ठेवलें होतें. त्याने एका जबानींत आपल्याला जाधव यांचा खून करण्याला बाळासाहेबांनी सांगितलें

होतें, असें म्हटलें होतें. ही जबानी बाहेर येऊन गायकवाडावर कांही तरी प्रकरण उपस्थित व्हावें, अशी दुसऱ्या पक्षाला इच्छा होणें स्वाभाविक आहे. अशा स्थितींत एकाएकी मल्या हा बेळगावच्या तुरुंगांतून पळून गेला. या प्रकरणाची चवकशी करण्याकरितां क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन खात्याचे डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडंट बाबासाहेब देशपांडे हे बेळगांवला बरेच दिवस येऊन राहिले. त्यांनी चौकशी करून बाळासाहेब गायकवाड यांनी बेळगावच्या दोन गृहस्थांच्या साहाय्याने मल्याला तुरुंगांतून पळविलें असा पुरावा मिळविला होता आणि खटल्याची सर्व तयारी होऊन बेळगावच्या दोन गृहस्थांना पकडण्यांतही आलें होतें व बाळासाहेबांना बेळगावास आणण्याची तयारीही झाली होती. पण बाळासाहेब म्हणजे शाहूमहाराजांच्या मर्जीतले. कानडींत एक म्हण आहे की, उंदराला मारावयास गेल्यास गणपतीला मार बसण्याचा संभव असतो. अशांतीलच हा प्रकार होऊन यक्षिणीची कांडी फिरून अत्यंत मेहनतीने तयार झालेला खटला आयत्या वेळीं काढून घेण्याबद्दल मुंबई सरकारचा हुकूम आला. खटला चालला असता तर बऱ्याच गोष्टी बाहेर आल्या असत्या. हुकूम आल्यानंतर बाबासाहेबांना कागद्पत्र सर्व गुंडाळून घेऊन पुण्याला परत यावें लागलें!!

पागे व गायकवाड यांचा अतिशय स्नेह होता व त्यांच्याच कारस्थानामुळे लठ्ठे यांच्यावर कुलंगडें येणार होतें अशा बातम्या होत्या. पागे व लठ्ठे हे एकमेकांवर अनेक प्रकारचे आरोप करीत होते, हें मला माहीत आहे. शाहूमहाराजांच्या पश्चात लठ्ठे दिवाण झाले हें वर सांगितलेंच आहे; त्यांच्या कारकीर्दींतच बाळासाहेबांना कोल्हापूरची हद्द सोडून बडोद्यास गायकवाडाचा आश्रय करून राहावें लागलें व पागे यांचा कोल्हापूरचा संबंध तुटला. या दोघांवरही एक प्रकरण उपस्थित होऊन त्यांना extradition प्रमाणे अटक करण्याचें वॉरंट मिळावें म्हणून खटपट झाली! पण त्यांत यश आलें नाही. तथापि बाळासाहेब फरारी आरोपी म्हणून त्यांचा वाडा, त्यांची इनामी जमीन वगैरे सर्व जप्त करण्यांत आलीं आहेत. असो. या हकीकतीशीं माझा कांही संबंध नाही. पण कोल्हापूर संस्थानच्या कारभारांत काय काय घडामोडी होतात हें यावरून स्पष्ट होतें व आमच्या प्रकरणावरही थोडासा प्रकाश पडतो म्हणून याचा उल्लेख केला आहे.

### *एक धाडसी व हुषार राजा*

शाहूमहाराज १९२२ सालीं वारले. त्या वेळीं मी येरवड्याच्या तुरुंगांत शिक्षा भोगीत होतों. आमच्या वॉर्डवर त्या वेळीं एक महार जातीचा हवालदार होता. त्याने एका सकाळीं येऊन "तुम्हांला एक आनंदाची बातमी सांगतों" असें मला म्हटलें. चळवळींसंबंधाने कांही तरी सांगावयाचें असेल असें मला वाटून मी उत्सुक झालों. पण त्याने कोल्हापूरचे शाहूमहाराज एकाएकीं वारल्याची बातमी सांगितली. कोल्हापूर प्रकरणांत मला काय त्रास भोगावा लागला याची त्याला माहिती होती, त्यामुळे ही बातमी ऐकून मला संतोष होईल असें त्याला वाटलें होतें.

पण त्याचा अंदाज चुकला. एक हुषार, धाडसी, असा राजा गेल्याबद्दल मला थोडेंसें वाईटच वाटलें. आपल्या नैसर्गिक बुद्धीचा व आपल्या सत्तेचा उपयोग चांगल्या कामाला या महाराजांनी केला असता, तर त्यांचें नाव पुष्कळ दिवस टिकलें असतें. पण तसा योग नव्हता. नसतीं कुलंगडीं व कारस्थानें उभारण्यांत त्यांची शक्ती बरीच खर्च झाली. इंग्रज सरकारला खूष करण्याकरिता असे प्रकार त्यांना करावे लागले असें म्हटलें तरी तो हेतू कितपत सिद्धीला गेला असेल याची वानवाच आहे. शाहूमहाराजांनी मागसलेल्या वर्गाकरिता बऱ्याच गोष्टी केल्या आहेत हें खरें आहे. शिवाय अनेक राजेरजवाड्यांप्रमाणे युरोपच्या सफरी करून चैनींत त्यांनी प्रजेचा पैसा उधळला नाही हेंही खरें आहे. तथापि त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा उपयोग अनाठायीं बराच झाला असें निःपक्षपातानें पाहणाऱ्याला म्हणावें लागेल.

## सर्व उत्पन्न खालसा झालें

या प्रकरणाच्या पायीं आम्हांला बराच त्रास सोसावा लागला व पैसाही बराच खर्च झाला. सुदैवानें आम्हांला सहानुभूतीही पुष्कळ मिळाली. खेर वगैरे मंडळींनी निःस्वार्थीपणाने साहाय्य केलें हें त्यांच्या संबंधाने दिलेल्या हकीकतीवरून दिसेलच. जगांत अकारण वैरी जसे मिळतात तसेच मित्रही मिळतात याचा अनुभव आला. गोविंदराव याळगी व हणमंतराव देशपांडे यांनी आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली. हणमंतराव तर पोलिसांच्या अटकेंतच होते. मला गुंतवण्याकरिता त्यांच्यावर नाना प्रकारचे प्रयोग करण्यांत आले, पण त्यांनी धैर्याने ते सर्व सहन केले व पोलिसांची डाळ शिजूं दिली नाही. त्यांच्यावर खटला झाल्यावेळीं वकील, बॅरिस्टर यासंबंधी त्यांना बराच खर्च आला. तो त्यांनी एकट्यांनी आनंदाने सोसला. वास्तविक पाहतां माझ्या स्नेहामुळेच त्यांना हें सर्व सोसावें लागलें. याच कारणामुळे पुढे दोनतीन वर्षांतच मला त्यांच्या उपयोगीं पडण्याची वेळ आली व त्यांतच माझ्यावर एका खुनी खटल्याचा प्रसंग आला. ती हकीकत एका स्वतंत्र प्रकरणांत येईल.

हें सर्व प्रकरण संपून वातावरण शांत झालें. बेळगावच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटांची माताऱ्यास बदली झाली. आमचें देशपांडेगिरीचें वतन त्यांच्या रिपोर्टावरून खालसा करण्यांत आलें होतें. आपलेकडून घाईत चूक झाली असें त्यांना वाटत असावें. म्हणून बेळगाव सोडून जाण्याचे पूर्वीं त्यांनी मला व माझ्या वडिलांना आपल्या बंगल्यावर भेटावयाला बोलाविलें. माझ्या वडिलांच्या समक्ष मला दोन उपदेशाच्या गोष्टी त्यांनी सांगितल्या व आमचें उत्पन्न खुलें करण्याबद्दल लिहिल्याचें सांगितलें. ते गेल्यानंतर त्यांनी सांगितल्याप्रमाणे माझें अर्धें उत्पन्न खुलें करण्याचा हुकूमही आला. इतक्यांत १९१२ सालीं आमचे वडील वारले. त्यामुळे हें सर्वच प्रकरण पुन्हा उपस्थित झालें. नवीन आलेल्या कलेक्टरांनी मला बोलावून "यापुढे कोणत्याही

राजकारणांत मी भाग घेणार नाही असें तुम्हांला मान्य असेल तरच वतन पूर्वीप्रमाणे चालवलें जाईल" असें कळविलें. अर्थात "अशा प्रकारची अट मला मान्य नाही व ही अट माझ्यावर घालणें अन्यायाचें आहे व ती मीं मान्य करणें म्हणजे मीं आत्महत्या करण्यासारखें आहे" असें मीं कळवलें. "सनदशीर व शांततेच्या मार्गाने व कॉंग्रेसच्या धोरणाने मी काम करीत राहीन" असें मीं सांगितलें. "सरकारला रिपोर्ट करण्याचें माझें काम आहे" एवढेंच ते बोलले. पण सरकारकडून या बाबतींत पहिला हुकूम बदलण्याचें काम झालें नाही. वडिलांच्या हयातींत माझ्या हिश्शाचें अर्धें उत्पन्न खालसा झालें होतें, पण वडिलांच्या पश्चात सर्वच उत्पन्न खालसा झालें व आता रयताच्या जमिनीप्रमाणे भर आकार द्यावा लागत आहे.

प्रकरण अकरावें

# एक अव्यापारेषु व्यापार

*उद्योगधंद्याचे बेत*

कोल्हापूर प्रकरणाचा जोर ओसरत चालला असतांनाच पुढील कार्याबद्दल माझ्या मनांत विचार घोळूं लागले. राजकारणाच्या क्षेत्रांत काम करण्याला मुळीच वाव नव्हता असें म्हटलें तरी चालेल. जे ते टिळकांच्या सुटकेची वाट पाहात स्वस्थ बसले होते. टिळकांच्या सुटकेच्या बातम्या पुष्कळ उठत असत व त्या जिरून जात. १९११ सालीं पंचम जॉर्ज बादशाहांचा राज्यारोहण उत्सव झाला. त्या वेळीं हमखास टिळकांची मुक्तता होईल अशी आशा वाटत होती. पण मुंबईचे गव्हरनर सिडेनहॅम त्या वेळीं आडवे आले म्हणून सुटका झाली नाही. राष्ट्रीय सभा नेमस्तांच्या हातीं गेली होती. राष्ट्रीय पक्षाजवळ काम करण्याला दुसरी कोणतीही संस्था नव्हती. नवीन एखादी संस्था काढण्याचें सामर्थ्यही कोणामध्ये नव्हतें. जहाल-मवाळांच्या वादांत व्यक्तिविषयक भांडणें इकडे इतकीं विकोपाला गेलीं होतीं की, मिळून काम करणें जवळजवळ अशक्य होतें. टिळक सुटून आल्यानंतर त्यांनी दोन्ही पक्षांत समेट घडवून आणावा अशी इच्छा प्रदर्शित करून त्याप्रमाणे खटपटही केली. तरी यश येण्याला दोन वर्षें लागलीं. आणि या सर्व घोटाळ्याच्या बुडाशीं मुंबई व पुणें येथील नेमस्तांचीच अढी. टिळकांनी इतका प्रयत्न केल्यावेळची ही स्थिती, मग टिळक नसतांना काय झालें असेल याची कल्पनाच करावी. याप्रमाणे राजकीय क्षेत्रांत काम करण्याची हौस असूनही वाव मिळाला नाही. म्हणून दुसरें कांही तरी काम काढण्याचें मनांत आलें.

मुंबईस डेक्कन स्टोअर्स व राष्ट्रमत या निमित्ताने बरेच दिवस राहण्याचा योग मला आला होता. गुजराती, कच्छी, मारवाडी, खोजे, मेमन, पार्शी इत्यादि लोकांपेक्षा दक्षिणी लोक बुद्धीने कमी नसून व्यापारांत त्यांना कोठेही स्थान नव्हतें. त्या वेळीं मुंबईत काय,

इतरत्र काय, बहुतेक सुशिक्षित दक्षिणी लोक कारकुनी पेशांतच राहून उदरनिर्वाह करणारे होते. अद्यापिही ही स्थिती बदलली आहे असें म्हणतां येणार नाही. पण अलीकडे विचारांची दिशा बदलत चालली आहे. थोड्याशा भांडवलावर उद्योग केला असतां व्यापारांत फायदा कसा होतो याचा अनुभव गोविंदराव याळगीसारख्यांच्या लहानांतल्या लहान उदाहरणावरून आला होता. बेळगावास वकिली, डॉक्टरी, जमीनदारी वगैरे करून पैसे मिळविणारे लोक होतेच. पण सार्वजनिक कामाला पैशांच्या दृष्टीने त्यांचा उपयोग गोविंदरावांइतपत होत नव्हता आणि आज वीसबावीस वर्षांनंतर देखील हाच अनुभव आहे. ज्या लोकांना राजकारण करावयाचें असतें त्यांना द्रव्यबळाची मनुष्यबळा-इतकीच आवश्यकता आहे; म्हणून असा कांही तरी एखादा उद्योग मोठ्या प्रमाणावर काढण्याचा प्रयत्न करावा असें माझ्या मनांत आलें. अशा विचाराला गोविंदरावांकडून उत्तेजन मिळावयाचें हें ठरल्याप्रमाणेच होतें. स्वतः गोविंदरावांनीच मुंबईस राहून आपला उद्योग वाढवावा, त्यांत सुशिक्षित होतकरू तरुणांचा शक्य तितका समावेश करावा, असे बेत आम्ही करीत होतों.

कर्मधर्मसंयोगाने डॉ. वामनराव कुलकर्णी यांची गाठ पडली. वामनराव मिठाचा उपयोग खाण्यामध्ये जास्ती झाला पाहिजे या मताचे पुरस्कर्ते होते. त्यांना 'डॉ. सॉल्ट' किंवा 'डॉ. मीठ' असें म्हणत असत. पुढे त्यांनी संन्यास घेतला व आपलें नाव 'लवणानंद' असें ठेवून घेतलें हें प्रसिद्धच आहे. त्यांच्या मनांतही कांही व्यापार करावा असें आलें होतें. मुंबईस पुरुषोत्तम विश्राम मावजी या नावाचे एक व्यापारी गृहस्थ होते. व्यापारी वृत्तीपेक्षा इतिहाससंशोधन, ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह करणें, इत्यादि विषयांकडे त्यांचा कल होता व त्यामुळेच ते महाराष्ट्रांत प्रसिद्ध होते. त्यांच्या मनांत मुंबईस एक बँक उघडावी असें येऊन त्यांनी शेअर-होल्डर्स मिळवण्याचें काम सुरू केलें होतें. महाराष्ट्रांतील सांगलीकर संस्थानिक, पारसनीस वगैरे सारख्यांचा त्यांचा स्नेह असल्यामुळे बँकेच्या योजनेला महाराष्ट्रांतूनही मदत मिळवण्याची ते खटपट करीत होते. सांगलीकरांनी, मिरजेच्या शिराळकरांनी आणि महाराष्ट्रांतील इतर लोकांनी शेअर घेण्याचीं आश्वासनें दिलीं होतीं. या कामांत डॉ. सॉल्ट हेही कांही खटपट करीत होते. त्याकरिता ते बेळगावास आल्यावेळीं माझी व त्यांची भेट झाली. आमच्या मनांत हे विचार आले असतांच अकस्मात त्यांची भेट झाली व पुरुषोत्तमशेठच्या कल्पनेबद्दल त्यांनी मला माहिती दिली. पुरुषोत्तम मावजींनी या कामाकरिता मुंबईस एक ऑफिस उघडलें असून त्यांत माझ्या ओळखीचे बाबुराव गोखले काम करीत असतात असें समजलें.

### बँकांचें पीक

ही संधी बरी आहे असें वाटून मी व गोविंदराव याळगी मिळून मुंबईस गेलों. तेथे या बाबतींत जास्ती चवकशी केली. बाबुरावांनी आपल्याला असलेली माहिती सांगितली. ऑफिसमध्ये त्यांचे वरिष्ठ एक

गुजराती गृहस्थ होते त्यांना भेटण्याचें आम्हीं ठरविलें. पुरुषोत्तम विश्रामबद्दल आम्हीं माहिती काढण्याचा प्रयत्न केला. मनुष्य सुसंस्कृत असून सालस असल्याचें आम्हांला समजलें. अशी माहिती त्यांच्यासंबंधानें लागल्यामुळे आम्हांला जास्ती स्फुरण आलें. केवळ व्यापारी वृत्तीनें राहणाऱ्या मनमोहनदासचा अनुभव मला 'राष्ट्रमता'च्या घराच्या बाबतींत आला होता. त्याजबद्दलची हकीकत पूर्वीं आलेलीच आहे. म्हणून तशा प्रकारच्या मनुष्यांशीं व्यवहार करण्यापेक्षा सात्त्विक मनुष्याशीं संबंध ठेवणें मला बरें वाटलें. हा सर्व विचार करून ऑफिसांतील त्यांच्या मॅनेजराची गाठ घेऊन पुरुषोत्तमशेठनाही बंगल्यावर भेटलों. बोलण्याचालण्यांत मनुष्य फार सालस दिसला. त्यांच्या बंगल्याच्या दिवाणखान्यांत ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह होता तो पाहून आनंद झाला. त्यांच्या बँकेचे नुसते शेअर घेऊन शेअरवरील नफा मिळावा या दृष्टीनें आमचा येण्याचा उद्देश नसून त्यांच्याप्रमाणे व्यवस्थेंत आमचा संबंध असण्याची आवश्यकता आम्हीं त्यांना सांगितली. दक्षिणी सुशिक्षित लोकांचा प्रवेश व्यापारधंद्यांत होण्याकरिता मी या उद्योगांत पडत आहें, व बँकेच्या व्यवस्थेशीं आमचा संबंध असल्याखेरीज हें जुळणें शक्य होणार नाही, हेंही मीं त्यांना कळवलें. त्यांना माझें बोलणें पटलें. यानंतर किती शेअर खपवण्याची आम्हीं हमी घ्यावी, व्यवस्थेंत आमचा संबंध कितपत असावा, आमचे हक्क, अधिकार काय असावेत, वगैरे तपशिलासंबंधानें आमच्यांत वाटाघाट चालली. स्वतः शेटजींपेक्षा त्यांचे मॅनेजरच आमच्याशीं जास्ती बोलत असत. पुरुषोत्तम विश्राम हे जरी प्रसिद्ध व्यापारी घराण्यांत जन्मले होते व वाढले होते तरी व्यापारासंबंधानें त्यांना आपल्या एजंट, मॅनेजर यांच्यावरच अवलंबून राहावें लागत असावें, असा आमचा ग्रह झाला. तथापि ही गोष्ट आमच्या विचाराला इष्टच आहे असें मला वाटलें.

या वाटाघाटींत पंधरावीस दिवस लोटल्यानंतर लक्ष्मण हरी छत्रे या नावाचे एक गृहस्थ मला भेटले. हे मूळचे बेळगावकडचेच होते. यांचे वडील बेळगावास वैदिक म्हणून प्रसिद्ध होते. वडिलांच्या पश्चात ते व त्यांचे बंधू मुंबईस आले व त्यांनी एक खासगी इंग्रजी शाळा काढली. पण ती पुढे फार दिवस चालली नाही. म्हणून हे खासगी शिकवण्या करून मुंबईस उदरनिर्वाह करीत असत. त्यामुळे पार्शी, गुजराती वगैरे लोकांत त्यांच्या ओळखीदेखी होत्या. याच वेळेला म्हणजे पुरुषोत्तम विश्राम बँक काढण्याच्या खटपटींत असतांनाच नवीन बँका स्थापण्याचें पीक मुंबईस पुष्कळ होतें. पायोनिअर बँक, मर्चंट्स बँक वगैरे नवीन बँका निघाल्या होत्या. स्पीसी बँकेचा लौकिक तर होताच. स्पीसी बँकेचे मुख्य उत्पादक व चालक प्रसिद्ध चुनीलाल सरय्या यांनी स्पीसी बँकेची एक शाखा लंडनमध्ये काढली होती व तिजवर आपल्याच आप्तांपैकी छोटालाल पारेख या नावाच्या गृहस्थाची नेमणूक केली होती. पण चुनीलालचें व त्यांचें न जुळल्यामुळे विलायतेहून हे गृहस्थ परत मुंबईला आले व मुंबईस एक स्वतंत्र बँक काढण्याच्या उद्योगाला लागले. त्यांना लक्ष्मण हरी छत्रे हे दक्षिणी लोकांत शेअर वगैरे मिळवून देण्याची खटपट करीत होते.

आम्ही पुरुषोत्तम विश्रामकडे बँक काढण्याच्या बाबतींत जात-येत असतां ही बातमी छोटालाल याला लागली. तोही त्याच उद्योगांत असल्यामुळे आमचा संबंध आपल्याशीं यावा असें त्याला वाटलें. छत्रे यांनीही आमच्याबद्दल त्याला माहिती सांगितली व आमचें जुळल्यास महाराष्ट्र-कर्नाटकांतून त्याला पुष्कळ मदत मिळेल, असा त्यांचा ग्रह करून दिला. त्यामुळें हे दोघेही मला येऊन भेटले व पुरुषोत्तम विश्रामपेक्षा जास्ती सवलती आम्हांला देण्याचें बोलणें सुरू त्यांनी केलें. तथापि पुरुषोत्तम मावजीकडे आमचें बोलणें चाललें असल्यामुळे त्याचा निकाल लागल्याखेरीज आपल्याला दुसरें कांही करतां येत नाही, असें मीं त्यांना कळवलें. मावजीचें व आमचें जुळल्यास आपल्याला महाराष्ट्र-कर्नाटकांतून मदत मिळणार नाही असें वाटून त्याने मावजींनाच आपल्याकडे ओढण्याचा घाट घातला. मनुष्य धूर्त असल्यामुळे मावजींना त्याने पक्कें घेरलें. मावजींनीही आमचा नाद सोडला. छत्रे यांचा विजापूरचे श्रीनिवासराव कौजलगी यांच्याशीं पूर्वीपासून स्नेह होता. त्यांना बोलावून घेऊन पारेख यांच्या बँकेंत येऊन मिळण्याबद्दल त्यांचें मन वळवलें. कौजलगींनी मला पारेख यांच्याच बँकेंत येण्याबद्दल कळवलें. कौजलगी व मी कॉलेजांत एकाच वेळीं असल्यामुळे माझी व त्यांची चांगली ओळख होती. त्यांचीं व माझीं मतें त्या वेळीं भिन्न होतीं. अलीकडे मीही राष्ट्रीय पक्षांतच काम करीत असल्यामुळे त्यांचा व माझा मतभेद होण्याला फारसें कारण उरलें नव्हतें. म्हणून त्यांच्याबरोबर काम करण्याला मीही तयार झालों व दोघांनी मिळून पारेखबरोबर वाटाघाटी करण्याला प्रारंभ केला.

## *आमच्या बँकेचा जन्म*

वाटाघाटींत खालीं नमूद केलेल्या अटी ठरल्या :

[१] आम्ही तीन लाखांचे शेअर्स महाराष्ट्रांत व कर्नाटकांत संपविण्याची खटपट करावी. (प्रत्येक शेअर २५ रु. चा असून शेअरच्या अर्जाबरोबर ५ रु. भरावयाचे.)

[२] डायरेक्टरांमध्ये आमच्या वतीने एक डायरेक्टर नेमावयाचा.

[३] 'सी. जे. पारेख अँड कं.' असें मॅनेजिंग एजन्सीचें नाव ठेवावयाचें व त्यांत भागीदार या नात्याने काम करावयाचें. एजन्सीला जो मेहनताना मिळेल त्यांत आमचा ठराविक हिस्सा असावयाचा.

[४] बँकेच्या शाखा महाराष्ट्रांत आमच्या वतीने काढावयाच्या.

[५] बँकेच्या कामांत दक्षिणी लोकांना शिक्षण द्यावयाचें व त्यांचें शिक्षण झाल्या-नंतर त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना कामें द्यावयाचीं.

[६] पहिल्या अटीच्या हमीकरिता आम्हीं वीस हजार रु. डिपॉझिट ठेवावयाचें.

—आणखी कांही किरकोळ शर्ती होत्या.

आमच्यामध्ये मी, श्रीनिवासराव कौजलगी, शामराव कालकुंद्री व काका पाटील असे चौघे पोटभागीदार होतों. वऱ्हाडकडे कांही शेअर खपवण्याला सवड मिळावी

म्हणून वामनराव जोशी, डॉ. बाबासाहेब परांजपे यांचेमार्फत तिकडील एखादा वजनदार स्नेही आमच्याबरोबर भागींत असावा म्हणून आम्हीं खटपट केली; व त्याप्रमाणे खापर्डे यांचेमार्फत कांही रक्कम बँकेंत डिपॉझिट म्हणूनही ठेवली गेली. पण वरील कराराने बांधून घेण्यास ते तयार नसल्यामुळे त्यांची डिपॉझिटची रक्कम त्यांना परत करण्यांत आली.

या बँकेचें नाव 'नॅशनल फिनॅन्सिंग अँड बँकिंग कॉर्पोरेशन लि.' असें होतें, व बँकेचें मुख्य ऑफिस कोटांत स्पीसी बँकेच्या समोरील इमारतींत होतें. आमच्याप्रमाणेच पुरुषोत्तम मावजींनी पारेखबरोबर निराळा करार केला व तेही मॅनेजिंग एजन्सींत सामील झाले. त्यांनाही एजन्सीच्या नफ्यांत भागीदारी देण्यांत आली. त्यांनीही तीन लाखांचे शेअर (नक्की आकडा लक्षांत नाही) खपवण्याची हमी घेऊन आपल्याच नावाने तितके शेअर आरंभींच घेतले. बँकेचें काम सुरू होऊन तिची ऊर्जित स्थिती आली म्हणजे नफ्यावर शेअर विकावयाचे असा त्यांचा बेत होता. शेअरमागे पाच रुपये भरावयाचे तेही त्यांचेजवळ नसल्याने याच बँकेंतून तितक्या रकमेचें कर्ज देण्यांत आलें होतें, व बँकेच्या पुस्तकांत खर्च लिहून त्यांच्या नावावर शेअर खातीं जमा करण्यांत आले होते. ही गडबड मला योग्य वाटली नाहीं; व याबद्दल मीं शंका काढली असतां मुंबईस सर्व मोठा व्यापार अशाच पद्धतीने होतो असें मला सांगण्यांत आलें. मला तें खरें वाटलें.

आमच्या मंडळीमध्ये मीच रिकामा असल्यामुळे मुंबईत राहून प्रतिनिधी म्हणून काम करण्याची पाळी माझ्यावरच आली. या निमित्ताने मी मुंबईत राहून ऑफिसमध्ये काम पाहूं लागलों. आम्हीं प्रत्येकीं आमच्या नावावर पाच-पाच हजारांची रक्कम डिपॉझिट ठेवली होती. छत्रे यांच्या खटपटीने हें सर्व जुळून आलें, म्हणून त्यांना बँकेंत एक जागा दिली. शिवाय बाबासाहेब सोमण व यू. एस्. देसाई (एम्. ए.) आमचे स्नेही होते त्यांना काम शिकण्याकरितां म्हणून बँकेंत घेण्यांत आलें. आमच्या वतीने बँकेंत डायरेक्टरांमध्ये एक असावा अशी शर्त घातली होती. तो कोण नेमावा म्हणून आम्हीं विचार करून बॅप्टिस्टांचें नाव सर्वांच्या मताने ठरवलें. डायरेक्टर होण्याकरिता दोन हजार रुपयांचे शेअर घेणें कंपनीच्या आर्टिकल्सप्रमाणे जरूर होतें. हे रुपये आम्हीं म्हणजे कौजलगी, शामराव, काका पाटील, व मी यांनी भरावे असें आमच्यामध्ये ठरलें होतें. त्याप्रमाणे एक हजार रुपये दोनशें शेअरच्या अर्जाबरोबर मीं एकट्याने भरले, व आमच्या वतीने बॅप्टिस्टा डायरेक्टरांच्या बोर्डांत सामील झाले. पुरुषोत्तम विश्रामही एक डायरेक्टर होते.

### छोटालालने दिलेला दगा

याप्रमाणे सर्व जुळवाजुळव. होऊन कामाला जोरांत सुरुवात झाली. शामराव व कौजलगी यांच्या सूचनेप्रमाणे अनुक्रमें बेळगाव व विजापूर येथे बँकेच्या शाखा उघडण्यांत आल्या व त्या दोघांना या शाखांच

व्यवस्थापक नेमण्यांत आलें. आम्हीं शेअर खपविण्याला प्रारंभ करून कांही शेअर खपवले. आमच्या वाटणीचे शेअर बरेच असून ते खपवण्याला वेळ लागला असता. तथापि आम्हीं इतके शेअर घेतले आहेत अशी प्रसिद्धी पारेख यांनी केली. आम्हीं घेतले नसतां अशी प्रसिद्धी कां केली असें मीं विचारलें असतां, "कराराप्रमाणे इतके शेअर खपवण्याचा तुम्ही प्रयत्न करणारच आहांत; म्हणून त्याचा अर्थ तसाच होतो," असें सांगून त्यांनी माझें समाधान केलें.

कांही दिवस असें चालल्यानंतर, कोऱ्या शेअर फॉर्मवर आमच्या सह्या असल्या म्हणजे इतके शेअर खपले असें सांगण्याला बरें होतें, असें पारेख आम्हांला सांगूं लागला. तथापि हें करण्याचें धैर्य आम्हांला होईना. म्हणून आम्हीं पुरुषोत्तम मावजींना सल्ला विचारला. त्यांनीही या बँकेच्या व्यवहारांत असें केल्याशिवाय चालत नाही असें आम्हांला सांगितलें. तरी आमचें धैर्य होईना. म्हणून या फॉर्मचा उपयोग आमच्या परवानगीशिवाय करूं नये अशा अर्थाचें एक पत्र पारेखकडून मीं घेतलें व आम्हीं चौघांनी चार कोऱ्या फॉर्मवर सह्या करून हे फॉर्म पारेखच्या हवालीं केले. कंपनीच्या कायद्याप्रमाणे फॉर्मवर सही करून देणें म्हणजे शेअर घेण्याला संमती दिल्याप्रमाणे होतें, व पारेखची चिठी जरी आमच्याजवळ होती तरी कायद्याप्रमाणे आम्ही तितक्या शेअरला जबाबदार होतों, ही गोष्ट आमच्या लक्षांत आली नाही. मी, कौजलगी, काका, व बॅप्टिस्टा असे आम्ही चौवेही कायदे जाणणारे होतों आणि तरीही एखाद्याच्या हातांत सही करून फॉर्म दिल्यास तो भरण्यास त्याला पूर्ण मुखत्यारी दिल्याप्रमाणे होतें व कंपनीच्या कायद्याप्रमाणे फॉर्ममध्ये जितके शेअर म्हणून भरले असतील तितक्याबद्दल आम्ही जबाबदार होतों, ही गोष्ट आमच्या लक्षांत आली नाही. मोठें कांही तरी कार्य आम्ही करीत आहों, या भ्रमांतच पारेखवर विश्वास ठेवून आम्हीं सह्या करून फॉर्म त्यांचे हातांत दिले. रघुनंदन कोठारे (नातू, होर्मसजी आणि कं.) आमचे सॉलिसिटर होते. त्यांनी सावधगिरीने वागण्याबद्दल आम्हांला सूचना दिली होती. पण पारेखच्या बोलण्याने आम्ही इतके भारून गेलों होतों की, त्याचा व आमचा संबंध आला हा एक दैवी योगच असें आम्हांला वाटूं लागलें होतें. त्यामुळे रघुनंदन यांच्या सूचनेकडे आम्हीं दुर्लक्ष केलें.

आम्हीं फॉर्मवर सह्या करून दिल्यानंतर सर्व काम सुरळीतपणे चाललें. बेळगाव-विजापूर शाखांना मुंबईहून मुख्य ऑफिसांतून वक्तशीर पैशांची मदत होऊं लागली. त्यामुळे या शाखांचाही लौकिक वाढला. माझा या शाखांशीं कांही हितसंबंध नव्हता. तथापि आमच्याच मंडळींनी त्या स्थापन केल्या असल्यामुळे त्या चांगल्या चालाव्यात अशी माझी इच्छा होती, व मुख्य कचेरींतच मी असल्यामुळे त्यांना उपयुक्त अशीं कामें पारेखकडून मी करवून घेत होतों. त्यामुळे मलाही ज्या हेतूने मी या उद्योगांत पडलों होतों तो हेतू सफल होतो आहे, असें वाटूं लागलें. इतक्यांत कांही कामाकरिता मी बेळगावास आलों. तेथे असतांनाच आमच्या वडिलांची प्रकृती बिघडली व त्यांतच

त्यांना देवाज्ञा झाली. त्यामुळे मला घरगुतीच्या व्यवस्थेकरिता राहावें लागलें. या अवधींत पारेखकडून मला व इतर माझ्या स्नेह्यांना नोटिसा रजिस्टर होऊन आल्या. "त्यांत तुम्हीं आमच्या बँकेचे शेअर घेतले आहेत व त्याबद्दल फॉर्महीं सही करून दिला आहे. म्हणून फॉर्मच्या शर्तीप्रमाणे दर फॉर्मच्या मागे पाच रुपये प्रमाणे पंधरा दिवसांच्या आंत भरावे" अशा अर्थाचा मजकूर होता. या नोटिशीला मीं ताबडतोब उत्तर देऊन, "आमच्या परवानगीशिवाय फॉर्मचा उपयोग करावयाचा नाही असें ठरलें असतां, तसें न वागतां फॉर्मचा उपयोग करण्यांत आला आहे; याकरिता जबाबदारी माझ्यावर येत नाही" असें कळवलें. कौजलगी, कोका यांनीही याचप्रमाणे कळवलें. मी कांही दिवसांनी हा काय गोंधळ चालला आहे याबद्दलची माहिती समक्ष घ्यावी म्हणून मुंबईस गेलों. पारेखला भेटून विचारलें असतां 'माझी नजरचूक झाली, काळजी करूं नका' असा जबाब मिळाला. विश्वासाने मीं तो मानला. परत बेळगावास आलों तो पुन्हा सॉलिसिटरच्या सहीची नोटीस मागील नोटिशीप्रमाणेच आली. तेव्हा पूर्वीप्रमाणेच जबाब देऊन, प्रत्यक्ष भेटींत पारेखने नजरचुकीने असें झालें आहे म्हणून सांगितलें होतें त्या गोष्टीचाही उल्लेख केला.

यानंतर आठपंधरा दिवस कांही झालें नाही. तथापि गैरसावध राहिल्यास मोठ्या रकमेची जबाबदारी येण्याचा संभव आहे असें वाटून मी पुन्हा मुंबईस गेलों. या वेळीं पारेखची गाठ घेतली तेव्हा त्याच्या बोलण्यांत मेळ दिसेना. इतके दिवस मीं वाट पाहिली हीच मेहरबानी समजा, रीतीप्रमाणे तुम्हीं रक्कम भरलीच पाहिजे, तूर्त रक्कम नसली तर दोनचार महिन्यांचें सवडपत्र लिहून मागा म्हणजे तीं मिळेल, किंवा बँकेंतून तितक्या रकमेचें कर्ज काढा म्हणजे सर्वांचें काम होईल, अथवा तुमच्या नावाच्या डिपॉझिट रकमा आहेत त्या शेअर खातीं जमा करा, असें तो बोलूं लागला. तेव्हा यांत कांही तरी दगा आहे असा मला पक्का संशय आला.

### आमचे डोळे उघडले

शामराव व कौजलगी यांना मीं बोलावून घेतलें व सर्व हकीकत कळवली. सर्वांच्या मतें कायदेशीर इलाज आपणच प्रथम करावा असें ठरलें. सर्व हकीकत रघुनंदन सॉलिसिटरच्या मार्फत इनव्हऱ्यारिटी बॅरिस्टर यांना कळवून त्यांचें मत घ्यावें असें ठरलें. त्याप्रमाणे हकीकत कागदपत्रांच्या नकलांसहित तयार करून इनव्हऱ्यारिटीकडे पाठवले. पण ते त्याच आठवड्यांत विलायतेला जाण्याच्या तयारींत होते. तुमचे कागद बरोबर घेऊन एडनहून आम्ही केलेल्या प्रश्नांना उत्तरें देईन, असें त्यांनी कळवलें. आम्हीं ती गोष्ट मान्य केली.

ठरल्याप्रमाणे त्यांचें मत आलें. पण आम्हांला तें फारसें अनुकूल नव्हतें. त्यामुळे आम्हांला भीति वाटली. कचाट्यांतून सुटण्यासाठी कांही तरी तडजोड करण्याचा प्रयत्न केला. पण पारेख मला भीक घालीना. मग काय होईल तें होवो, आपणच सर्व खऱ्या

हकीकतींवर भिस्त ठेवून कोर्टात इलाज करावा असें मीं ठरवलें. पण शामराव व श्रीनिवासराव यांचे आपापल्या शाखांत हितसंबंध विशेष गुंतल्यामुळे त्यांची संमती मिळवण्याला मला थोडे श्रम पडले. शेवटीं एकमताने हायकोर्टात चार दावे चौघांच्या वतीने करावयाचें ठरून रघुनंदन यांच्या मार्फत दावे तयार केले. प्रत्येकाला दहा हजारांपेक्षा जास्ती खर्च करावा लागेल असें सॉलिसिटरनीं सांगितलें. तेव्हा आमचे डोळे उघडले. इतकें करून कोर्टात हरल्यास प्रतिवादीचा खर्च देऊन शेअरचे रुपये भरण्याची पाळी यावयाची ! म्हणजे घरादारावर तुळशीपत्र ठेवण्याचीच पाळी माझ्यावर होती. तथापि धैर्याने तोंड देऊन, प्रयत्न करून पाहावयाचें हें मीं मनाने ठरवलें.

दाव्यांतील फिर्यादअर्ज बॅरिस्टर स्ट्रॅंगमन यांना दाखविले. मीही सॉलिसिटरबरोबर त्यांचेकडे गेलों होतों. बॅरिस्टरनी अर्ज वाचून पाहून कांही शाब्दिक दुरुस्त्या केल्या. पण तुम्ही शिकलेले, कायदा जाणणारे असे वेड्याप्रमाणे कसे वागलांत, म्हणून त्यांनी मला विचारलें. विश्वासाने या सर्व गोष्टी घडल्या, हें एकच उत्तर माझ्याजवळ होतें. तुमच्या शब्दावर कोर्ट विश्वास ठेवील की नाही याची शंका आहे आणि कोर्टाने तुमच्यावर विश्वास ठेवला तरी स्वतः पारेखने तुम्हांला फसवलें असें होईल, पण त्यामुळे कंपनी बांधली जाणार नाही असें ते म्हणाले. आणखी एखाद्या बॅरिस्टरचा सल्ला घ्यावा म्हणून सेटलवाड यांचेकडे गेलों. त्यांचें मतही जवळजवळ स्ट्रॅंगमनप्रमाणेच पडलें. इनव्हर्‍यारिटी, स्ट्रॅंगमन व सेटलवाड या तीन नामांकित बॅरिस्टरांचें एकमत झाल्यामुळे यशाचीं चिन्हें कमी झालीं. तथापि निकराला लावून सोडावयाचें असें ठरवून दावे दाखल झाले. चारसहा महिने प्राथमिक पवित्र्यांत गेले. शेवटीं मुद्द्या-करिता दावर जजापुढे हे दावे आले होते. हा एक योगायोगच असें मला वाटलें.

## बाळाजी आबाजी यांची मदत

ही सर्व हकीकत माझे स्नेही रा. ब. बाळाजी आबाजी भागवत यांना कळवली. आमच्या प्रांतांतील गदग या गावीं एक कापडाची गिरणी तेथील वकील आठवले यांच्या प्रयत्नाने निघाली होती व तिचे भागवत हे एक डायरेक्टर होते. ती गिरणी लिक्विडेशनमध्ये गेली व त्या भानगडींत भागवतांवरही असाच प्रसंग आला होता. तेव्हा त्यांनी एजलो गुलाबचंद व वाडिया या सॉलिसिटरच्या फर्मपैकी त्यांचे स्नेही गुलाबचंद यांचा सल्ला घेतला होता. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे ते वागले म्हणून त्यांच्यावर फारशी बाजू आली नाही. ही गोष्ट मला सांगून मला ते गुलाबचंदकडे घेऊन गेले. त्यांना मी सर्व हकीकत सांगण्यापूर्वी, छोटालाल पारेख यांचें नाव ऐकल्याबरोबर, तो मनुष्य अत्यंत लबाड असून त्याच्या गोत्यांत सापडल्याबद्दल माझा त्यांनी प्रथम चांगला समाचार घेतला. गुलाबचंद हे वृद्ध होते व त्यांना गुजराती व्यापाऱ्यांची पुष्कळ माहिती होती व नवीन बँकांचें मुंबईत जें पीक येऊं लागलें होतें त्याची वित्तंबातमी त्यांना होती. मीं थोडीशी हकीकत सांगितल्याबरोबर त्यांनी काय

काय गोष्टी घडल्या असतील तें सर्व ताडलें व दावरच्या कोर्टापुढे काम येणार आहे हें समजून समाधान व्यक्त केलें. दावर यांना मुंबईतील लोकांची माहिती असल्याने लबाड लोकांच्या लुच्चेगिऱ्या उघडकीस आणण्याच्या कामांत ते पटाईत आहेत असें त्यांचें मत होतें. कसेंही करून त्यांच्यापुढे काम चालवण्याची खटपट केली पाहिजे, असें त्यांनी मत व्यक्त केलें. त्यांची हुषारी व धोरण हीं पाहून माझ्या मनावर त्यांच्याबद्दल अनुकूल ग्रह झाला. सर्व बोलणें आटोपल्यावर "मी एक युक्ती करून पाहतों, उद्या ऑफिसमध्ये या" असें सांगून त्यांनी निरोप दिला. ठरल्याप्रमाणे दुसरे दिवशीं गुलाबचंदकडे जाण्यापूर्वी मींही आदले दिवशीं झालेली गोष्ट आमचे सॉलिसिटर रघुनंदन यांना कळवली. गुलाबचंद अनुभवी आणि युक्तिबाज मनुष्य आहे, त्याची मदत अवश्य घ्या, असें त्यांनीही सांगितलें. मी गुलाबचंदकडे गेलों. पण मीं स्वतः वकिली कांही दिवस तरी केली असल्यामुळे व दुसऱ्यांची वकिली करण्याची पद्धत मला माहीत असल्यामुळे मीं त्यांना त्यांच्या फीबद्दल भीतभीत विचारलें. ते हसले आणि 'मुंबईच्या सॉलिसिटरच्या धंद्याचा व कोर्टखर्चाचा अनुभव तुम्हांला नाही, म्हणून ही गोष्ट तुम्हीं काढलीत; एका सॉलिसिटरच्या चरकांतून तुम्ही सलामत निघालांत म्हणजे तुम्हीं मिळवलीत' असें बोलून मुंबईस प्रचारांत असलेली एक म्हण त्यांनी मला सांगितली. ती अशी : जीते सो हऱ्या व हऱ्या सो मऱ्या. म्हणजे मुंबईच्या हायकोर्टांत जिंकणारा पक्षकार हरल्याप्रमाणे समजावा व हरलेला मेल्याप्रमाणे समजावा. भागवत माझे स्नेही आहेत व त्यांच्यामार्फत तुम्ही आलांत म्हणून मी हें काम स्नेहाखातर करीन असें त्यांनी सांगितलें. हें ऐकून मला आश्चर्य वाटलें. मुंबईच्या सॉलिसिटरच्या धंद्याचा दुर्लौकिक माझ्या कानावर पुष्कळ आला होता. म्हणून आश्चर्य वाटण्याला विशेष कारण झालें.

### *गुलाबचंदांची युक्ती*

गुलाबचंदांनी काय बेत केला होता व ते काय युक्ती योजणार होते याची कल्पना मला अगोदर नव्हती. ते मला घेऊन बँकेचे सॉलिसिटर अयमितराम मट्टुभाई या फर्मचे मट्टुभाई सॉलिसिटर यांच्याकडे गेले. मट्टुभाई हे बँकेचे सॉलिसिटर होते इतकेंच नाही तर तेही एक डायरेक्टर होते. गुलाबचंद मट्टुभाईच्या ऑफिसांत माझ्याबरोबर आल्याचें पाहून मट्टुभाईनादेखील कसेंसेंच वाटलें असावें असें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसलें. इकडच्यातिकडच्या पाचचार गोष्टी झाल्याबरोबर गुलाबचंदांनी मोठ्या गंभीर स्वरांत खालील आशयाचें भाषण केलें : "देशपांडे हे माझ्या अगदी जिवलग स्नेह्याचे मित्र आहेत. त्यांची सर्व हकीकत मीं ऐकून घेतली आहे. त्यांचें काम आता आमच्याकडे आलें आहे. छोटालालचा आगापिच्छा मला सर्व माहीत आहे. या बँकेच्या डायरेक्टरांमध्ये कोण कोण डायरेक्टर आहेत व ते कसे झाले आहेत हें मला पक्कें माहीत आहे व त्याबद्दलचा भरपूर पुरावा माझ्याजवळ आहे. (या डायरेक्टरांपैकी एकावर पुढे फौजदारी खटला होऊन ठकबाजी वगैरे गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली

असें मीं ऐकलें.) ही बँक नवी आहे. इतक्यांत या सर्व गोष्टी चवाठ्यावर आल्यास बँकेच्या कामाला धक्का येण्याचा संभव आहे. दावर यांच्या कोर्टांत काम आहे. दावर यांना मुंबईची चांगली माहिती आहे. ही दक्षिणी मंडळी अननुभवी आहेत. त्यांना विश्वासांत घेऊन छोटालालने या भानगडी करावयाला नको होत्या. याकरिता आपसांत तडजोड करावी हें बरें. नाही तर रीतीप्रमाणे काय होईल तें खरें." वगैरे. या भाषणाचा परिणाम मट्टुभाईवर झाल्याचें त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. मट्टुभाई हे कंपनीचे केवळ सॉलिसिटरच असते तर गोष्ट निराळी. पण ते स्वतःच एक डायरेक्टर असल्यामुळे, छोटालालसंबंधाने केलेल्या आरोपांचा शिंतोडा थोडा तरी त्यांच्यावर उडत असला पाहिजे, असें मला त्यांच्या चेहऱ्यावरून वाटलें. प्रथम मट्टुभाईंनी बराच आव आणला; पण अखेर एकदोन दिवसांत तडजोडीबद्दल काय तें कळवतों असें सांगितलें आणि आम्ही गुलाबचंदच्या ऑफिसांत आलों. "मीं दिलेल्या मात्रेचा उपयोग होईल असें वाटतें. तडजोडीचें बोलणें झाल्यास तुमचे पैसे व खर्चाची रक्कम मिळाल्यास जास्ती ओढून धरूं नका" असा मला त्यांनी सल्ला दिला. त्यानंतर दुसरे दिवशीं छोटालाल माझ्याकडे आला व तडजोडीचें बोलणें सुरू झालें. गुलाबचंदांकडे जाऊन त्यांच्या मार्फत संपवूं असें मीं म्हटलें. गुलाबचंद नको व मट्टुभाईही नको, सॉलिसिटरच्या मध्यस्थी-शिवाय आम्हीच संपवूं, असें तो म्हणूं लागला. मी बरें म्हणून कौजलगी, शामराव यांना बोलावणें पाठवलें. काका पाटील मुंबईस होते. दोनतीन दिवस वाटाघाट होऊन प्रतिवादींनी आमचे पैसे व्याजासहित परत द्यावे व आमचा खर्चही द्यावा आणि आम्हीं एजन्सीवरील आमचा हक्क सोडावा, आणि आम्हीं सही करून दिलेले फॉर्म रद्दबातल आहेत असें समजावें, अशा शर्तींवर हुकूमनामा करून घेण्याचें ठरलें. गुलाबचंदांनी या गोष्टीला संमती दिली व पैसे ताबडतोब वसूल करण्याबद्दल बजाविलें. त्याप्रमाणे हुकूमनामा होऊन आम्हीं बजावणीही केली. बेळगाव व विजापूर शाखांचा व्यवहार शामराव व श्रीनिवासराव यांनी संपवून घेतला व त्यांत त्यांना कांही फायदाच झाला. अशा रीतीने हें प्रकरण मिटलें. कोणत्याही गोष्टी व्यवहार म्हणून करावयाच्या झाल्यास त्या व्यवहाराच्याच दृष्टीने केल्या पाहिजेत, केवळ दुसऱ्याच्या शब्दावर विश्वास ठेवून करूं नयेत असा धडा मी शिकलों. गुलाबचंदांची व माझी भेट झाली नसती, आणि त्यांनी निःस्वार्थबुद्धीने आपल्या अंगावर घेऊन हें काम केलें नसतें व दावरच्या कोर्टांत हें काम नसतें तर सर्व बाजू अंगावर येण्याचा बराच संभव होता व गुलाबचंदांनी सांगितलेल्या म्हणीचा पूर्ण अनुभव येण्याचा प्रसंग होता.

### *भोगावा लागलेला भूर्दंड*

छोटालाल हा आपल्याच किंवा बँकेच्या स्वार्थाकडे पाहणारा मनुष्य होता. त्याने आमच्यावर केलेला प्रयोग पुरुषोत्तम यांच्या-वरही केला, व त्यांत त्यांना बरीच खोट आली. सांगलीकरांचेही बरेच पैसे

बुडाले असें मीं ऐकलें. पुढे बँक लवकरच लिक्विडेशनमध्ये गेली व बहुतेक सर्व भागीदार बुडाले. डिपॉझिटरांचें किती नुकसान झालें, मला माहीत नाही. मोर्वीच्या ठाकूरसाहेबांनी ही बँक घेऊन 'मोर्वी बँक लि.' या नावाने दुसरी बँक चालू केली. त्यांतही कांही दिवस हा छोटालाल होता. पण पुढे त्याचें आसन तेथेही टिकलें नाही व ती बँकही बुडाली. गुलाबचंदांनी हुकूमनामा झाल्याबरोबर पैसे घ्या असें मला बजाविलें होतें याचें मर्म बँक बुडाल्यानंतर माझ्या लक्षांत आलें. या बँकेप्रमाणेंच पायोनियर बँक लि. म्हणून दुसरी एक नवी बँक निघाली होती. ती बँक काढणारे व छोटालाल हे स्नेही होते. या बँकेच्या भानगडींत आमचे स्नेही सरदारगृहाचे मालक कै. साळवेकर हे आमच्याप्रमाणेच पडले होते व त्याबद्दल त्यांना हजारो रुपयांचा भूर्दंड भरावा लागला.

एका परीने पाहतां या भानगडींत पडण्यांत मी चांगल्या हेतूनेच प्रेरित झालों होतों ही गोष्ट खरी होती. पण या कामांत स्वतःला फायदा मिळवण्याची मुळीच दृष्टी नव्हती असें म्हणतां येणार नाही. स्वार्थ व परमार्थ दोन्हीही साधण्याचा हा प्रयत्न होता ही गोष्ट कबूल केली पाहिजे. हा प्रयत्न यशस्वी झाला नाही, तथापि मनुष्य-स्वभावाचा अनुभव बराच आला.

सोमण व देसाई हे दोघे आमच्या वतीने बँकेंत काम करीत होते, असें वर सांगितलेंच आहे. आमचा व छोटालालचा बेबनाव झाल्याबरोबर सोमण हे बाहेर पडले. देसाई मात्र आमचा संबंध तुटल्यानंतरदेखील बँकेंत एक्सपोर्ट-इंपोर्ट खात्यांत काम करीत होते. ते जात्या हुषार असल्यामुळे या धंद्याची त्यांना चांगली माहिती झाली आणि बँक बुडाल्यानंतर हाच धंदा करून ते मुंबईस राहिले. यांनी पुढे एका कुलीन पार्शी घराण्यांतील एका सुशिक्षित कुमारिकेशीं लग्न लावलें. हें जोडपें सुखांत सांताक्रूझ येथे अद्यापि आहे.

सोमण माझ्याबरोबरच बेळगावला आले.

### गोविंदराव याळगींचें साहाय्य

अशा प्रकारें हें मुख्य प्रकरण संपलें तरी याचें शेपूट राहिलेंच होतें. बॅप्टिस्टांना आमच्या वतीने डायरेक्टर करण्यांत आलें होतें असें वर सांगितलेंच आहे. त्याकरितां त्यांना पाच हजार रुपयांचे शेअर्स भरावे लागले. अर्जाबरोबरचे एक हजार रुपये मीं स्वतः भरले होते हेंही वर नमूद केलें आहे. केवळ आमच्याकरिताच म्हणून बॅप्टिस्टा या भानगडींत पडले होते. त्यांच्यासंबंधाने येईल तो बोजा आम्हीं चौघांनी घ्यावयाचा असें पूर्वीच ठरलें होतें. छोटालालशीं तडजोड चालली असतां ही गोष्ट पुन्हा मीं स्पष्ट करून घेतली होती. बॅप्टिस्टांची बाब संपवल्याखेरीज छोटालालशीं दुसऱ्या बाबतींत तडजोड करावयाची नाही, असा मीं आग्रह धरला होता. पण कौजलगी व शामराव ही मोठी बाब संपवण्याला उतावीळ झाले होते म्हणून

त्यांनी बॅप्टिस्टांची जोखीम मोठी नाही, ती जर आलीच तर सर्व सहन करूं असें सांगून तें मोठें प्रकरण संपवलें. पुढें कांही दिवसांनी बॅप्टिस्टांवर रीतीप्रमाणे दावा झाला. बॅप्टिस्टांचें मन वळवण्यांत मीं पुढाकार घेतला होता, व माझ्यावर विश्वास ठेवून त्यांनी पाच हजारांचा फॉर्म भरून दिला होता. म्हणून मला त्यांनी पत्र लिहिलें. या दाव्यांत आम्हांला तक्रारीला कांही जागाच नव्हती म्हणून आपसांत तडजोड करण्याबद्दल मीं बॅप्टिस्टांना लिहिलें. खर्च व व्याज सहित सहासात हजार रुपयांचा हुकूमनामा झाला. वास्तविक ही जबाबदारी आम्हां चौघांवर होती. म्हणून मीं कौजलगी व शामराव यांना याबद्दल विचारलें. कौजलगी यांनी प्रथमपासूनच उडवा-उडवीचीं उत्तरें दिलीं. शामराव यांनी १५०० रु. दिले. पण ते हिशेबांत माझे नावें लिहून दिले. काका पाटलांची सांपत्तिक स्थिती बरीच खालावली होती. परांजपे आठले कंपनीचे मालक भाऊसाहेब आठले यांना हे बऱ्याच मोठ्या रकमेला जामीन झाले होते. भाऊसाहेबांनी आपलें दुकान बंद करून एकाएकी मुंबई सोडून आपलें ठाणें गोमांतक प्रांतीं नेलें. त्यामुळे काकांवर मोठा प्रसंग आला. काकांप्रमाणेच डॉ. नानासाहेब देशमुख वगैरे मंडळींना भाऊसाहेबांमुळे बरेंच नुकसान सोसावें लागलें असें मीं ऐकलें. काकांची ही स्थिती झाल्यामुळे व त्यांचा-माझा स्नेह विशेष असल्याने त्यांची जबाबदारी मीं माझ्यावर घेतली. शेवटीं शामरावांनी दिलेले १५०० रु. माझ्याकडून त्यांनी वसूल करून घेतले. याप्रमाणे सर्व रक्कम भरण्याचा बोजा माझ्यावरच पडला. स्वतः माझ्याजवळ या वेळीं पैसे नव्हते. म्हणून मुंबईस कोणाकडून तरी कर्ज काढून या भानगडींतून मोकळें व्हावें या हेतूने मीं छत्रे यांना प्रयत्न करण्याबद्दल पत्रें लिहिलीं. याच वेळीं मी नुकताच दुसऱ्या जिवावरच्या प्रसंगांतून बाहेर पडलों होतों. (ही हकीकत पुढे येणार आहे.) म्हणून कर्ज काढल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. छत्रे मास्तर यांनी मुंबईस कांही प्रयत्न केला नाही. इतकेंच नव्हे तर माझीं सर्व पत्रे लो. टिळकांकडे पाठवलीं. (टिळक या वेळीं सुटून आले होते.) टिळकांनी ताबडतोब मला पत्र लिहून अडचण भागली नसेल तर ताबडतोब पुण्यास येण्याबद्दल मला कळवलें. माझ्यासंबंधाने टिळकांनी दाखवलेल्या या आपलेपणाबद्दल मला अत्यंत कौतुक वाटलें. आपला म्हणून टिळकांनी ज्याला म्हटलें त्याचा सर्वतोपरी परामर्श घेणें हें आपलें कर्तव्य असें ते समजत. मी प्रयत्न करीत आहें, न साधल्यास आपल्याकडे येईन, असें मीं टिळकांना कळवलें. शेवटीं गोविंदराव याळगींनीच माझी गरज भागवली, व या बँक प्रकरणांतून मी कायमचा मुक्त झालों. या लहानशा गोष्टीवरूनही मला बराच बोध मिळाला. पण, त्यापायीं बराच पैसा खर्च करावा लागला व बरीच खस्त खावी लागली. स्नेह्यांच्या संबंधांत व एका कामांत पडलेल्या मंडळीसंबंधाने जास्ती लिहिणें बरें नाही म्हणून लिहीत नाही.

या सातआठ वर्षांच्या अवधींतील घरगुती गोष्टींसंबंधानें मीं कांहीच लिहिलें नाही. वकिली बहुतेक सोडल्याप्रमाणेच होती. घरच्या कामाकाजांतही मी लक्ष घालीत नसें. वडील हयात असेपर्यंत तेच घरचें सर्व काम पाहात असत. त्यांना मी कशांतही, कोणत्याही तऱ्हेनें मदत केली नाही; उलट माझ्याच उपयोगीं ते अनेक दृष्टींनी पडले. सल्लामसलत देणें, प्रसंगीं मला पैशाची मदत करणें हें सर्व ते आनंदानें करीत असत. या सर्व भानगडींत त्यांनी एका शब्दानें मला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला नाही. माझ्याशीं ते अगदी बरोबरीच्या नात्यानें व फारच मोकळ्या मनानें कोणत्याही गोष्टीबद्दल चर्चा करीत असत. माझे स्नेही वगैरे कोणी आल्यास त्यांची व्यवस्था स्वतः ठेवीत असत. माझ्याकडे येणाऱ्या पुष्कळ लोकांना माझे वडील हे कोणी तरी माझे वृद्ध स्नेही आहेत असा भास होई. मीं बेळगावला वकिलीला प्रारंभ केल्याबरोबर ते हुदलीस जाऊन राहूं लागले, असें मीं पूर्वी नमूद केलें आहे. हुदलीस ते बहुतेक गावांतील घरांत राहात नसत. हुदली गावापासून मैल-दीड-मैल अंतरावर 'कुमरी' या नावाची आमच्या मालकीची जमीन आहे, तींत एक घर बांधून तेथे ते राहात असत. गावांत प्लेग वगैरे झाल्यास घरची मंडळीही तेथेच राहण्याकरिता जात असत. मीही बेळगावाहून हुदलीस गेल्यास तेथेच राहात असें. कुमरी ही जमीन दक्षिण बाजूनें डोंगराला लागून आहे व तिच्या उत्तरेला एक ओढा आहे. ही जमीन सपाट नाही; उंचसखल अशी आहे. तथापि, सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें रम्य आहे. ही जमीन अजमासें दीडशें एकर असून आमच्या वडिलांना स्वस्तांत मिळाली होती. वडिलांनी तिच्यावर तीस-पस्तीस हजार रुपये खर्च करून तिला ऊर्जित दशा आणली होती. त्यांना अशा प्रकारचा फार नाद असे. अशा कामांत ते आपल्या शक्तीबाहेर खर्च करीत असत व शारीरिक श्रमही पुष्कळ घेत.

मी सार्वजनिक कामांत पडूं लागल्यानंतर गृहस्थितीसंबंधानें देखील माझी थोडी उदासीन वृत्ती झाली. म्हणून मीं वडिलांना एकदा म्हटलें की, "तुम्ही इतके श्रम करतां व इतका पैसा खर्च करतां; पण हें सर्व उपभोगण्यांत मला हौस वाटत नाही. कदाचित माझ्या कृतीनें सरकारच्या अवकृपेनें किंवा इतर कारणानें तुरुंगांत जाण्याचा प्रसंगही येईल. तेव्हा ही मेहनत अनाठायीं आहे." त्याला त्यांनी थोडक्यांत उत्तर दिलें. ते म्हणाले, "तुला याची आवड नाही हें मला माहीत आहे व कदाचित तूं म्हणतोस त्याचप्रमाणे माझ्या पश्चात होण्याचा संभवही आहे. तथापि, तुझ्याकरिता हें मी करीत नसून माझ्याच हौसेकरिता मी करीत असतों." मी निरुत्तर झालों व पुन्हा गोष्ट काढली नाही. माझ्या दोन मुलींचीं व बहिणीच्या मुलीचें लग्न त्यांनीच केलें. वर शोधणें, लग्नें ठरवणें, खर्च करणें हा सर्व भार त्यांनी आपल्यावरच घेतला. मी बाहेरच्या मनुष्याप्रमाणेच या सर्व समारंभांत असें. कोठे कांही

चुकलें असें वाटलें म्हणजे मनांतल्या मनांत चडफडत असें. प्रपंचाचा भार अंगावर घेऊन वडिलांना त्यांच्या वृद्धावस्थेंत विश्रांती देणें माझें कर्तव्य आहे असें मला वाटत नव्हतें असें नाही. मी माझें कर्तव्य करीत नाही याबद्दल माझी मलाच लाज वाटत असे व पुष्कळ लोक मला दूषणही देत. पण वडिलांचा स्वभाव इतका दिलदार व अभिमानी होता की, ते या बाबतींत माझ्याशीं एक शब्ददेखील काढीत नसत. ते जुन्या पिढींतील होते व जुन्या पिढींतील माणसांप्रमाणे त्यांच्यामध्ये कांही दोषही मला दिसत असत. पण त्यांच्या कांही गुणांमुळे त्यांच्या दोषांचें मला कांही वाटत नसे. त्यांना मधुमेहाचा विकार होता; पण कडक पथ्याने राहून त्यांनी बरेच दिवस काढले. त्यांच्या शेवटच्या दिवसांत मुंबईच्या बँकेशीं माझा संबंध आला होता व मोठमोठ्या मनोराज्याच्या गोष्टी मी बोलत होतों. त्यामुळे माझें लक्ष आता पैशाकडे लागूं लागलें आहे असें त्यांना वाटूं लागलें होतें. कदाचित प्रापंचिक दृष्टीने त्यांना थोडें समाधानही वाटलें असावें. त्यांच्या शेवटच्या दुखण्यांत त्यांच्या शुश्रूषेला मी होतों. तथापि मला त्रास होईल म्हणून माझ्याकडून ते सेवा घेत नसत. त्यांची वृत्ती शांत होती. त्यांना वेदांताचा नाद होता व अखेरपर्यंत कांही तरी वेदांतावरील ग्रंथ ते वाचीत असत. वाचण्याची शक्ती संपुष्टांत आल्यानंतर दुसऱ्याकडून वाचून घेत असत. वडिलांचा वियोग होणार असें मला वाटून मी केव्हाकेव्हा चिंताग्रस्त असा असें. त्या वेळीं वेदांताच्या आधारें ते माझें समाधान करीत. एकदा, त्यांची कांही तरी इच्छा आहे काय असें मीं त्यांना विचारलें. तेव्हा त्यांचा व्याप मोठा असल्याने ते मला कांही तरी प्रपंचासंबंधाने सांगतील असें वाटलें होतें. पण "कांही सांगावयाचें नाही" इतकेंच बोलून स्वस्थ न बसतां मला उद्देशून "तूं माझ्यापेक्षा जास्ती जाणता व कर्तृत्ववान झाला आहेस. माझ्या हयातींत तूं माझा मुलगा म्हणून ओळखला जात नाहीस, उलट लोकांत तुझा मी बाप म्हणून माझी प्रतिष्ठा आहे. तेव्हा तूं काय करशील तें सर्व योग्यच करशील," असें उत्तर त्यांनी दिलें. माझ्यासंबंधाने त्यांना इतका आदर वाटत आहे हें तेव्हा प्रथमच मला समजलें, व मलाही बरें वाटलें. टिळक परत येऊन त्यांनी कार्याला प्रारंभ करावा व त्यांत मीं प्रामुख्याने भाग घेतल्याचें त्यांनी पाहावें, अशी एक स्वाभिमानाची लहर त्या वेळीं मला आली. पण विधिघटनेप्रमाणे तें घडून आलें नाही व १९१२ च्या ऑक्टोबर महिन्यांत (आश्विन वद्य १२ शके १८३४ दिवशीं) त्यांना देवाज्ञा झाली. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे माझ्या वृद्ध आजीबाई (त्यांच्या मातोश्री) तेव्हा हयात होत्या. त्यांना म्हातारपणामुळे दिसत नव्हतें. एकुलत्या एक मुलाला लहानाचें थोर करून वाढवलें, त्याचा मृत्यू पाहण्याचा प्रसंग त्यांच्यावर आल्याने त्यांना काय दुःख झालें असेल याची कल्पना करणेंच बरें. महिन्या-पंधरा-दिवसांतच त्या कांही वेळ शुद्धीवर असत व कांही वेळ नसत, अशी स्थिती झाली. त्या १९१७ सालीं वारल्या. आजीबाईशिवाय घरीं माझ्या मातोश्री व वहीण, वडिलांची वहीण, व माझें कुटुंब इतकी मंडळी होती. कुटुंब फार मोठें नव्हतें. पण घरचा सर्व बोजा एकदम माझ्यावर पडला. घरचें उत्पन्न होतें. पण खर्च

पुष्कळ असल्यामुळे तें पुरत नव्हतें. शिवाय नव्या जमिनी घेण्याकरिता व असलेल्या दुरुस्त करण्याकरिता वडिलांनी लोकांचें देणेंही केलें होतें. त्यामुळे मला कांही महिने हुदलीसच राहून सर्व माहिती करून घ्यावी लागली होती.

प्रकरण बारावें

# माझ्यावरील खुनाचा खटला

### शंकर कालकुंद्रीकरांचा 'खून'

बेळगावास हरी(नाना) गोविंद कालकुंद्रीकर या नावाचे एक गृहस्थ आहेत. यांचें घराणें श्रीमंतांत मोडलें जातें. कापडाचें दुकान, जमीनजुमला, देवघेवीचा व्यवहार इत्यादिकांमुळे या घराण्याचा लौकिक बऱ्यापैकी आहे. हरीनानांचे वडील व वडील बंधू वारल्यामुळे सर्व इस्टेट त्यांच्या ताब्यांत आली. त्यांची आई आमच्याच गावची असून आमच्या एका भाऊबंदाच्या घराण्यापैकी आहे. त्यांचें कुटुंब कमलाबाई या माझे स्नेही हणमंतराव देशपांडे यांच्या लहान भगिनी. हणमंतराव देशपांडे हे आमच्या सर्व कामांत सहकारी मित्र असून कोल्हापूर प्रकरणांत त्यांच्यावर केवढा प्रसंग आला होता ती हकीकत त्या प्रकरणांत दिली आहे. हणमंतरावांचा व माझा असा निकट परिचय असल्यामुळे हरीनानांचा व माझा साधारण स्नेह होता. खुनाच्या आरोपावरून हरीनानांवर पोलिसांनी एक खटला भरला होता, त्यांत मी कसा गोवला गेलों, ही हकीकत यापुढे येणार आहे. ती बरोबर समजण्याकरिता माझा व हरीनानांचा काय संबंध होता हें वरील माहितीवरून ध्यानांत येईल.

हरीनाना यांचे वडील बंधू वारल्यावेळीं त्यांचें वय २३-२४ वर्षांचें असावें. त्यांना एक मुलगी होती. भर तारुण्यांतच हातांत मोठी इस्टेट आली. त्यांच्या घरामध्ये वडिलांच्या वेळेपासूनचा शंकर देशपांडे या नावाचा एक कारकून होता. हरीनानांना भलत्या मार्गाला लावून घरची सर्व व्यवस्था शंकरने आपल्या हातीं घेतली. हरीनानांना अनुभव कांहीच नसल्यामुळे त्यांनी सर्व विश्वास शंकरवर टाकला. जमिनीची व्यवस्था, येणें व देणें वगैरे सर्व व्यवहार तोच पाहूं लागला आणि हरीनाना हें गाणेंबजावणें, नाटकें, नाचरंग वगैरे तारुण्याच्या ख्यालीखुशालींत दंग झाले. त्यामुळे शंकरला जास्ती सवलत मिळूं लागली. तोही व्यसनाधीन झाला व हरीनानांच्या पैशावर चैन करूं लागला. ही गोष्ट

घरांत आईला पसंत पडली नाही. तिने मुलाची कानउघडणी करण्याची खटपट केली; पण तिला यश आलें नाही. आईच्या मनांत घरची व्यवस्था आपल्या भावाच्या हातीं द्यावी असें होतें. त्या भावाचें नाव अमृत. अमृताच्या घरची गरिबी असल्यामुळे हरीनानांच्या म्हणजे भाच्याच्या घरचा कारभार आपल्या हातीं असावा, असें त्याला वाटणें साहजिक आहे; आणि त्याप्रमाणे तो खटपटही करूं लागला. त्यामुळे त्याच्या व शंकरच्या-मध्ये स्पर्धा सुरू झाली व ते एकमेकांचा द्वेष करूं लागले. अमृत याची जमीन वगैरे हुदलीस म्हणजे आमच्या गावीं विशेष नसल्याने तो बाळेकुंद्रीस तेथील इनामदारांची एक जमीन कौलाने करीत होता आणि त्या जमिनीची लागवड वगैरे हुदलीहून तीन बेरडांना नेऊन तो त्यांच्याकडून करवीत असे.

अशी स्थिती असतां शंकर हा एकाएकी नाहीसा झाला. हरीनानांनी व त्याच्या घरच्या मंडळींनी त्याच्याबद्दल बराच शोध केला. पण बरेच दिवस त्याचा पत्ता लागला नाही. शंकरच्या घरीं त्याची बायको, चुलतभाऊ, पुतण्या वगैरे मंडळी होती. पुतण्या बेळगावास शाळेंत शिकत असे. तो व शंकरची बायको हरीनानांच्याच घरीं राहात असत. बरेच दिवस शंकरचा पत्ता लागत नाही असें दिसल्यानंतर शंकरच्या चुलत-भावाला संशय येऊन त्याने पोलिसांत शंकरचा खून झाला असावा, म्हणून विनंतीअर्ज करण्याला सुरुवात केली आणि हरीनानांकडून पैसे काढण्याकरिता त्यांना तो धमक्या देऊं लागला. पण हरीनानांनी त्याला कांही दिलें नाही व निनावी अर्जांचाही कांही परिणाम झाला नाही. हरीनाना स्वभावाने भोळसर आहेत म्हणून त्यांच्याकडून खुनासारखें कृत्य होणार नाही, अशी बेळगावच्या पोलिसांना खात्री होती. कांही पोलीसअधिकाऱ्यांचें त्यांच्या घरीं येणेंजाणें असे. बेळगावच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटची व त्यांची ओळख होती. ते त्यांच्या घरीं याच संधीला येऊन गेले होते. या सर्व कारणांमुळे शंकरच्या चुलत-भावाची डाळ शिजेना. तेव्हा त्याने उघडपणें पोलिसाला वर्दी दिली आणि शंकरचा खून बाळेकुंद्री येथे अमृतने (हरीनानांच्या मामाने) केला अशी बातमी दिली व खून करण्यांत हेतू शंकरचा व हरीनानांच्या कुटुंबाचा वाईट संबंध होता असेंही कळवलें. बाळेकुंद्री हा गाव सांगली संस्थानाच्या हद्दींत असल्याने सांगली पोलिसांनी गुप्तपणें चौकशी चालवली. पण बरेच दिवसपर्यंत त्यांनाही कांही थांग लागेना. आपल्या हद्दींत अशा प्रकारचें कांही घडलें नाही म्हणून त्यांनी रिपोर्ट वगैरेही केले होते. तथापि त्यांचा तपास चालूच होता. हरीनाना हे श्रीमंत असल्यामुळे त्यांच्याकडून असल्या भानगडी उपस्थित करून आपला हात साधून घ्यावा अशी इच्छा करणारे कांही उपद्यापी लोक होतेच.

### पोलिसांचें चक्र सुरू

याच वेळीं आमच्या गावच्या आजूबाजूस बेरड लोकांचा बराच उपद्रव चालू होता. दहापाच वर्षांनी केव्हा तरी अशा प्रकारची बंडाळी हे लोक करीत असतात, असें गेल्या पन्नाससाठ वर्षांच्या माहितीवरून दिसतें.

हा भाग डोंगराळ असल्याने गुन्हे करून माल छपवण्याला किंवा स्वतः फरारी होण्याला तो सोयीचा आहे. कोल्हापूर, कुरुंदवाड व ब्रिटिश या सरकारच्या हद्दी कांही भागांत अगदी संलग्न आहेत. त्यामुळे एका हद्दींत गुन्हे करून दुसऱ्या हद्दींत जाऊन राहणें कठीण नसतें. या बेरड लोकांत शिव्या या नावाचा एक प्रसिद्ध लुटारू होता. तो पन्नाससाठ लोकांच्या जमावाने राहात असे. त्याला व त्याच्या साथीदारांना पकडण्या-करिता एक पोलीसइन्स्पेक्टर, दोनतीन फौजदार, शंभरदीडशें शिपाई असे मुद्दाम नेमण्यांत आले होते. या सरकारी लोकांनी त्या प्रांतांत धुमाकूळ मांडला होता, बेरड लोकांना अगदी त्रस्त करून सोडलें होतें. सांगलीच्या हद्दींतील कांही गावांत बेरडांची वस्ती असल्यामुळे ब्रिटिश पोलीस व सांगलीचे पोलीस मिळून काम करीत असत. त्यामुळे दोन्ही पोलिसांचें बरेंच जुळलें होतें. शंकरच्या बाबतींत सांगली पोलिसांचा तपास चालूच होता. ही बातमी ब्रिटिश पोलीसइन्स्पेक्टरला कळली. तेव्हा त्याला हें एक चांगलें घबाड मिळालें असें वाटून त्याने या प्रकरणांत लक्ष घालण्याला सुरुवात केली.

हा इन्स्पेक्टर मुसलमान जातीचा होता. त्याचें नाव जाफर इमाम होतें. त्याच्यावर त्या वेळचे बेळगावचे पोलीस-सुपरिटेंडेंट प्रीस्टले यांची मर्जी होती. शेकडो बेरड लोकांवर खरे, अर्धवट खरे, सपशेल खोटे असे खटले भरून त्यांना शिक्षा देवविल्या होत्या, अशी जाफर इमामची ख्याती होती. शंकरच्या चुलतभावाने या पोलीस अधिकाऱ्याशीं संधान बांधून, सांगलीचे पोलीस मन लावून चौकशी करीत नाहीत म्हणून त्याच्याजवळ सांगलीच्या पोलिसांविरुद्ध गिल्ला केला. ही संधी साधून जाफर इमामने आपल्या हातांत तपासाचें काम घेतलें. सांगलीचे पोलीस त्याला मदत करीत होते. आमच्या हुदली गावापासून दोन मैलांवर गुजनाळ म्हणून एक गाव आहे, तेथे जाफर इमामचा तळ होता आणि प्रथम तेथूनच या प्रकरणाचीं सूत्रें हालत होतीं. त्यांनी प्रथम बाळेकुंद्री येथील अमृतच्या जमिनींत काम करणाऱ्या तीन बेरडांना सांगली पोलिसांच्या मदतीने पकडलें. ही बातमी त्या बेरडांच्या घरच्या लोकांना कळली, तेव्हा पकडून त्यांना कोठे नेलें याबाबतचा त्यांच्या मंडळींनी तपास सुरू केला. पण पोलिसांनी दाद लागूं दिली नाही. म्हणून त्यांनी सांगलीचे संस्थानिक, पोलिटिकल एजंट, बेळगावचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व मुंबई सरकार यांच्याकडे तारा केल्या, व वकिलामार्फत काम चालवलें. या तिघाही बेरडांना पकडल्यानंतर पंधरा दिवसपर्यंत कोणत्याही मॅजिस्ट्रेटपुढे त्यांना हजर न करतां पोलिसांनी गुजनाळ येथे आपल्या ताब्यांत ठेवून घेऊन त्यांचे हाल करून त्यांच्यापैकीं दोघांकडून "अमृत, आपण तिघे व तेथीलच बाळू मोहिते अशा पाच जणांनी मिळून शंकरचा खून केला आणि त्याचें प्रेत जाळलें व राहिलेलीं हाडें पुरलीं" वगैरे कबुलीजबाब मॅजिस्ट्रेटपुढे करवले. या जबाबांत हरीनानांचा कोणत्याही प्रकारचा उल्लेख आला नव्हता. जबाब झाल्यानंतर त्यांनी पुरून ठेवलेलीं हाडें त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी दाखवलेल्या जागेंतून उकरून काढण्यांत आलीं व त्याबद्दल

पंचनामा रीतीप्रमाणे होऊन त्यांच्यावर पुरावा करण्याच्या कामाला सुरुवात झाली. अमृतलाही पकडण्याचा त्यांचा विचार होता. पण तो पोलिसांच्या हातीं लागला नाही.

### हरीनानांना पकडलें

येथपर्यंत हरीनानांच्या संबंधाने पोलिसांना संशय आला नाही. तथापि खुनाला कांही तरी हेतू पाहिजे आणि तो हेतू शंकरचा चुलत-भाऊ सांगत होता त्याप्रमाणे म्हणजे शंकरचा व हरीनानांच्या कुटुंबाचा संबंध होता या गोष्टींत होता; म्हणून त्या दिशेने तपासाला सुरुवात झाली व हरीनानांवर टेहळणी ठेवण्यांत आली. पोलिसांचे बेत काय चालले आहेत याची माहिती गोविंदराव याळगींना लागली. मी, हणमंतराव, गोविंदराव असे स्नेही असल्यामुळे आणि हणमंतरावांच्या प्रत्यक्ष बहिणीच्या अब्रूवरच घाला असून त्यांच्या मेहुण्यावर खुनासारख्या भयंकर गुन्ह्याच्या आरोपाचें संकट येण्याचा संभव असल्याने, त्यांनी मला हुदलीहून बोलावून घेतलें व चाललेली सर्व हकीकत मला कळवली. मीं ताबडतोब हरीनानांना बोलावून त्यांची पुष्कळ प्रकारें तपासणी केली व खरी हकीकत समजून घेण्याचा प्रयत्न केला. माझ्या माहितीप्रमाणे हरीनाना पूर्ण निरपराधी आहेत अशी माझी खात्री झाली. पोलिसांच्या डावपेचांत काय निघेल व काय नाही याचा नियम नाही म्हणून सावधगिरीने राहण्यास मीं त्यांना सांगितलें आणि गोविंदरावांना पोलिसांच्या हालचालीवर नजर ठेवण्यास कळवलें. या प्रकरणांतही गोविंदरावांचें धाडस, धूर्तपणा, व स्नेह्यासाठीं निःस्वार्थबुद्धीने आपल्या स्वतःला संकटांत घालून घेऊनदेखील काम करण्याची शैली, हे गुण दिसून आले. मीही बेळगावास राहून सल्लामसलत देत होतों. हरीनानांवर पुरावा करण्याची खटपट चालू झाली असें जेव्हा आम्हांला समजलें तेव्हा मीं काका पाटलांना तार करून बोलावलें. त्याप्रमाणे ते आले. त्यांच्या सल्ल्याने आम्हीही बचावाची तयारी करूं लागलों. बेरडांनी शंकरचें प्रेत जाळून पुरलेलीं हाडें काढून दिलीं म्हणून वर सांगितलें आहे. त्या बाबतींत तपास करतां, हाडें दुसरीकडून आणून तीं बेरडांनी काढून दिलीं असा बनावट पंचनामा पोलिसांनी केला होता, अशीही बातमी आम्हांला लागली होती. पण ती विश्वसनीय असली तरी ती कोर्टांत शाबीत करणें कठीण होतें, याची जाणीव आम्हांला होती. पोलिसांतर्फे साक्षी देण्याकरिता गावांतील कांही लबाड लोक असतातच.—आपल्याला अनुकूल असे त्यांचे जबाब पोलिसांनी घेण्याला प्रारंभ केला आणि पुढे हे लोक फितून जबाब फिरवतील म्हणून त्यांचे जबाब मॅजिस्ट्रेटपुढेही करवण्याचा क्रम चालविला. यापैकी कांही गोविंदरावांकडे ताबडतोब येऊन झालेली सर्व हकीकत त्यांच्या कानावर घालीत असत, व भीतीमुळे किंवा पोलिसांच्या जाचामुळे आपण असें केलें असेंही सांगत असत. या सर्व लोकांचीं मॅजिस्ट्रेट-समोर शपथेवर ॲफिडेविटें करून ठेवण्याचा क्रम आम्हींही चालविला. या गोष्टीही पोलिसांच्या कानावर जाऊं लागल्या म्हणून त्यांनी हरीनानांना अटक केली. सायंकाळीं अटक केल्यामुळे रात्रीं त्यांना तुरुंगांत पाठवणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांना पोलिसांनी

आपल्या लॉकअपमध्ये ठेवलें. रात्रीं त्यांना गांही त्रास वगैरे देतील म्हणून आम्हांही लॉकअपच्या बाहेर दहाबारा लोकांना जागत ठेवलें; आणि डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे अर्ज देऊन लॉकअपमध्यें पोलिसांची व त्यांची गाठ पडूं देऊं नये अशी तजवीज केली. दुसऱ्या दिवशीं त्यांना सिटी मॅजिस्ट्रेटपुढे पोलिसांनी हजर केले व चवकशीकरिता पंधरा दिवसांची मुदत मागितली. त्या वेळीं मीं व काका पाटलांनी हरीनानांतर्फे वकीलपत्रें दाखल केलीं व तपासाचें काम दोनतीन महिने चाललें आहे म्हणून मुदत देऊं नये अशी तक्रार केली. तथापि मॅजिस्ट्रेटनी रिमांड देऊन हरीनानांना तुरुंगांत ठेवलें. ज्या तीन वेरडांचे कबुलीजबाब झाले होते त्यांना सांगली हद्दींत गुन्हा घडला म्हणून सांगली पोलिसांच्या ताब्यांत देण्यांत आलें होतें व ते शहापूरच्या तुरुंगांत होते. हरीनाना एकटेच बेळगावच्या तुरुंगांत होते.

## *माझ्यावरील आरोप व अटक*

तीन वेरड आमच्या गावचे म्हणजे हुदलीचे असल्याकारणाने पोलिसांना तिकडील पुरावा कांही मुद्यावर पाहिजे होता. पण त्यांना लवकर पुरावा मिळेना. पुराव्याची जोडणी पोलिसांना पाहिजे होती त्याप्रमाणे होण्याला माझ्यामुळे अडथळे येतात असें पोलिसांना वाटूं लागलें आणि या समजुतीला बंडोपंत उचगावकर व विष्णुपंत गाडगीळ (यांच्याबद्दल कोल्हापूर प्रकरणांत उल्लेख आलेलाच आहे) यांनी भर दिली. शेवटीं मलाही या खटल्यांत गोवण्याची कल्पना पोलिसांच्या डोक्यांत आली. माझ्या विरुद्ध पुरावा जमविण्याचा प्रयत्न सुरू झाला. हरीनानांचा वकील म्हणून या खटल्याशीं माझा असलेला संबंध सुटून त्यांच्याबरोबर आरोपी म्हणून उभा राहण्याचा प्रसंग माझ्यावर येणार, असें मला निश्चित वाटूं लागलें. मीं या खटल्यांतून माझें अंग काढून घेतल्यास मला कांही उपसर्ग लागणार नाही, अशा सूचनाही पोलिसांच्या मार्फत मला आल्या. त्याचा परिणाम माझ्यावर मुळींच झाला नाही; इतकेंच नव्हे, तर उलट मलाही त्वेष आला आणि मी व माझे स्नेही गोविंदराव याळगी जास्ती जोराने खटपट करूं लागलों. केवळ वकील या नात्याचा माझा या खटल्यांतील संबंध सुटत चालला. आरोपीच्या हितसंबंधाची जबाबदारी त्याचा जवळचा आप्त व मित्र या नात्याने माझ्यावर आहे, अशी माझ्यामध्ये भावना उत्पन्न झाली आणि ती तीव्र होऊन वाटेल ती खटपट करून हरीनानांचा बचाव करण्याकडे माझें लक्ष पूर्णपणें वेधलें गेलें. बातम्या मिळवणें, पोलिसांच्या डावपेचांना उलट डावपेचांची तजवीज करणें यासारख्या गोष्टी वकिलीच्या धंद्यांत कदाचित पडणार नाहीत; पण मला त्या कराव्या लागल्या, ही गोष्ट प्रांजलपणें मी कबूल करतों. माझी बुद्धी, माझें वजन यांचा जितका उपयोग करणें मला शक्य होतें तितका सर्व मी करीत होतों. एका निरपराधी मनुष्याला मदत करणें हें माझें कर्तव्य आहे, या एकाच भावनेने मी उद्युक्त झालों होतों असें नाही. तर हणमंतरावामुळे या प्रकरणाशीं माझा संबंध वकिलीहूनही

निराळ्या तऱ्हेचा आला होता. कायद्याचा सल्ला देण्याला काका पाटील व बेळगावचे आजरेकर वकील हे होतेच. म्हणून प्रथमपासूनच पोलिसांचा व्यूह ढासळून पाडण्याची आम्हीं तयारी चालवली होती.

त्यामुळे माझा काटा काढून टाकण्याची पोलिसांना आवश्यकता भासूं लागली. त्यांनी माझ्या विरुद्ध तीन साक्षीदार तयार केले. यापैकी एक आमच्या गावाजवळ अंकलगी म्हणून एक गाव आहे, तेथील मुसलमान देसाई. दुसरा एक बेळगावचा जुगारी व तिसरा हरीनानांच्या घरचा एक नोकर. याप्रमाणे तिघांना पोलिसांनी तयार करून मला खुनाच्या आरोपावरून ३०२ व १०९ इं. पि. को. प्रमाणे अटक केली व बेळगावच्या तुरुंगांत ठेवलें. दुसऱ्या दिवशीं मुंबईचे गव्हर्नर हे बेळगावला यावयाचे होते. मी त्या वेळीं म्युनिसिपालिटीचा उपाध्यक्ष होतों व अध्यक्ष मिलर हे सरकारी अधिकारी असल्यामुळे सर्व व्यवस्था करण्याचें काम त्यांनी माझ्यावरच सोपवलें होतें. त्या गडबडींत मी मला अटक होण्यापूर्वी सातआठ दिवस गुंतलों होतों. म्युनिसिपालिटीच्या तर्फे मानपत्र मींच वाचण्याचें ठरलें होतें. पण मानपत्र वाचणें ही मोठ्या महत्त्वाची व मानाची बाब आहे, असें उचगावकरांना वाटत असल्यामुळे, तो मान मला मिळूं नये म्हणून गव्हर्नरसाहेब बेळगावला येण्यापूर्वी मला अटक झाली पाहिजे अशा प्रकारचा तगादा त्यांनी पोलिसांच्या मागे लावला होता. त्यांत त्यांना यश आलें व गव्हर्नर येण्याच्या आदल्या दिवशीं सायंकाळीं मला पकडण्यांत आलें. पुरावा जमवण्याच्या कामीं माझ्याकडून अडथळा होतो, म्हणून माझ्यावरच खटला करण्याची पोलिसांनी युक्ती काढली असें वर आलेंच आहे. पण त्यांचा हा हेतू सिद्धीला गेला नाही. हरीनानाच जोपर्यंत आरोपी होते, तोपर्यंत या खटल्याला एका श्रीमंत तरुणावरील खळबळजनक (sensational) खटला यापेक्षा जास्ती महत्त्व नव्हतें. त्यांच्या आप्तइष्टांचीच काय ती हालचाल होती. पण मला पकडल्याबरोबर खटल्याला सार्वजनिक स्वरूप आलें व पोलिसांनी खोट्यावर सर्व उभारणी केली अशी सर्वसाधारणपणें लोकांची समजूत होऊन आम्हांला सर्वांकडून सहानुभूती मिळूं लागली. पोलिसांचें काम पूर्वीपेक्षा कठीण झालें. मला पकडल्यानंतर काका पाटलांनी ठाण्याकडील सर्व कामें सोडलीं व बेळगावासच मुक्काम केला. गोविंदरावांनी आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली व आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर त्यांनी खर्च करण्यालाही प्रारंभ केला.

### गोविंदरावांचे धाडसी बेत

वर माझ्या विरुद्ध तीन साक्षीदार केले होते असें सांगितलें आहे. त्यांपैकी एक मुसलमान देसाई याच्या घराण्याचें व आमच्या घराण्याचें पिढीजाद वैर होतें. त्या खटल्याचे वेळीं देखील माझ्यामध्ये व त्यांच्यामध्ये दिवाणी कोर्टात व मुलकी कोर्टात वतनासंबंधी कामें चालू होतीं. मी व हरीनाना मिळून शंकराचा खून करण्याची मसलत करीत हरीनानांच्या घरीं बसलों असतां हा

देसाई तेथे आला व 'मला काय बोलत बसलां आहांत' असा त्याने प्रश्न केला, त्याच्या प्रश्नाला 'हरीनानांचा कारकून फार दगाबाज आहे. त्याचा खून करण्याचा बेत करीत बसलों आहोंत' असें मीं उत्तर दिलें, अशा मुद्द्याची त्याची साक्ष होती. माझ्यामध्ये व त्याच्यामध्ये वाद चालू होते ही गोष्ट त्याला नाकबूल करणें शक्य नव्हतें, आणि त्याने नाकबूल केल्यासही ती गोष्ट कोर्टांतील दाखल्यावरूनच शाबीत झाली असती. अशा मनुष्याने मला सहज केलेल्या प्रश्नाला मी खुनासारख्या भयंकर गुन्ह्याची माहिती सहजासहजीं सांगेन ही गोष्ट कोर्टांत कितपत टिकली असती या गोष्टीकडेदेखील पोलिसांचें लक्ष गेलें नाही! दुसरा जुगारी जो होता त्याच्याकडून 'मी, हुदलीचे तिघे बेरड व अमृत असे मिळून एका घरांत एके दिवशीं सायंकाळीं रस्त्यावरून दिसूं असे बसून बोलत बसलों होतों' असा जबाब करविला होता. तिसऱ्या म्हणजे हरीनानांच्या नोकराकडून 'अशाच प्रकारें खुनाचा बेत आम्हीं चालवला होता' या मुद्द्यावर साक्ष करवली होती. यांपैकी पहिल्या दोन साक्षीदारांचें महत्त्व कोणालाही वाटण्यासारखें नव्हतें. पण तिसरा हा घरांतीलच मनुष्य असल्यामुळे साक्षीदार या नात्याने या तिघांत त्यालाच जास्त महत्त्व होतें. उलटतपासणींत तो कितपत टिकला असता वगैरे गोष्टी होत्याच. पण गोविंदरावाच्या मनांत या मनुष्याला कोठे तरी लपवून ठेवावा अशी कल्पना आली. मी तर तुरुंगांतच होतों. त्यामुळे मला हें कांही कळलें नाही. काकांनी असें करण्याचें कांही कारण नाही असें गोविंदरावांना पुष्कळ सांगितलें; पण त्यांच्या डोक्यांत हें वेड पूर्णपणें भरलें होतें. एकदा कोणतीही गोष्ट करावयाची असें त्यांच्या मनाने घेतलें म्हणजे त्यांना दुसरें कांहीं सुचत नसे असा त्यांचा स्वभाव होता. त्याला अनुसरून गोविंदरावानी हरप्रयत्न करून या नोकर साक्षीदाराला आपल्या ताब्यांत घेतला. मॅजिस्ट्रेटपुढे खटला चालू होण्याला बराच अवधी लागला. कांही तरी निमित्त काढून मुदत घ्यावयाची असा पोलिसांनी क्रम चालविला. त्यांच्या मनांत हेतू हा होता की, या नोकर साक्षीदाराचा तपास लावून त्याची साक्ष प्रथम करवावयाची. नाही तर माझ्यावरील आरोप काढून घ्यावयाची पाळी यावयाची, हें त्यांना माहीत होतें. अशा स्थितींत मध्यंतरीं पाचसहा दिवस मला जामिनावर सोडण्यांत आलें होतें व पुन्हा अटक करण्यांत आली होती. त्या वेळीं देशपांडे या नावाचे मॅजिस्ट्रेट होते. ते माझ्या वेळीं डेक्कन कॉलेजमध्ये होते. हेच जेलचे सुपरिंटेंडेंट होते व ते जेलला येत असत. त्या वेळीं "माझा नाइलाज आहे, मी काय करूं?" अशा प्रकारची मानभावीपणाची भाषा ते बोलत असत. मीं त्यांना एक दिवस भीड सोडून "खटला चालू करून मेहरबानी करून सेशनकडे कमिट करा, म्हणजे माझ्यावर उपकार होतील" असें कळवलें. तेव्हापासून त्यांचें माझ्याशीं लघळपणाचें बोलणें बंद झालें. याप्रमाणे कांही दिवस गेल्यानंतर पोलिसांनी त्या नोकराचा तपास लावला व त्याला आपल्या ताब्यांत घेतलें. त्याला बेळगावास न ठेवतां गुंजनाळास, जेथे पोलिसांचा मोठा तळ होता म्हणून वर उल्लेख आहे तेथे नेऊन मोठ्या बंदोबस्तांत ठेवलें. गोविंदरावांना आपला डाव फसला असें

वाटलें. तथापि पुन्हा प्रयत्न करून पाहण्याचा त्यांनी निश्चय करून त्या तयारीला ते लागले. साक्षीकरिता गुंजनाळहून बेळगावला त्याला आणल्याशिवाय गत्यंतर नाही, ही गोष्ट स्पष्ट होती. त्या वेळीं कांही तरी साधतें काय हें पाहण्याचा गोविंदरावांनीं बेत ठरवला.

### साक्षीदाराला लांबविलें !

नोकर साक्षीदार आपल्या ताब्यांत आल्याबरोबर माझ्यावरील व हरीनानावरील खटल्याला मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात सुरुवात झाली. आमच्यातर्फे काका पाटील, आजरेकर काम चालवीत होते. पहिली साक्ष तपास करणारा पोलीस-इन्स्पेक्टर जाफर इमाम याची झाली. सेशनला कमिट होणाऱ्या खटल्यांत बहुतकरून फिर्यादीतर्फेच्या साक्षीदारांची आरोपीतर्फे उलटतपासणी करण्याची पद्धत नसते. जाफर इमामची सरतपासणी झाल्याबरोबर सरकारी वकिलांनी खटला कमिट करण्याबद्दल कोर्टाला कळवलें. पण लगेच काकांनी उठून आपल्याला उलटतपासणी करावयाची आहे असें सांगून प्रारंभ केला. चार दिवस जाफर इमामची कसून तपासणी केली; व ती इतक्या कुशलपणें झाली की, त्या आधारावर खटला सेशन कमिट करणें हास्यास्पद झालें असतें. म्हणून मॅजिस्ट्रेटला जास्ती पुरावा मागावा लागला. जुगारी साक्षीदाराची साक्ष झाली. त्याचीही उलटतपासणी झाली. त्यांत माझी व त्याची ओळख नव्हती, मला त्याने कधीही पाहिलें नव्हतें वगैरे गोष्टी त्याच्या जबानींत निघाल्या. त्यामुळे आणखी पुरावा घेण्याची जरूरी वाटली व हरीनानांच्या नोकराला साक्षीला आणण्याचें पोलिसांनी ठरवलें.

ही बातमी गोविंदरावांना समजतांच कोणत्या गाडीने केव्हा त्याला पोलीस आणणार होते याची बित्तंबातमी त्यांनी मिळवली. रात्रीं दहा वाजतां एक गाडी बेळगावला येत होती, त्या गाडीने त्याला आणणार, असें त्यांना समजलें. म्हणून स्टेशनावर उतरतांच कांही तरी युक्ती करून साधल्यास त्याला पळवावें, असा गोविंदरावांनी बेत केला आणि दहापाच खात्रीचे लोक घेऊन ते स्टेशनावर गेले. स्टेशनाच्या बाहेर एक पडदे सोडलेली धमणी गाडी उभी करून तिचे भोवती आपल्या पाचसहा लोकांना ठेवण्यांत आलें. पाहणाऱ्याला गाडींत कांही तरी असून त्याच्या रक्षणाकरिता हे लोक आहेत असा देखावा दिसण्यासारखा होता. स्टेशनाच्या आगाशीला लागून एक टांगा उभा केला होता. रेल्वे गाडींत चारपांच पोलिसांच्या मध्ये साक्षीदाराला बसवून ठेवलें होतें. स्टेशनवर गाडी येतांच साक्षीदाराबरोबरचे पोलीस सामानसुमान घेऊन उतरण्याच्या गडबडींत होते. ही संधी साधून गोविंदरावाच्या बरोबरच्या लोकांनी त्या साक्षीदाराला बाहेर नेऊन टांग्यांत घातलें व ठरल्या ठिकाणीं जाण्याकरिता टांगा हाकला. साक्षीदार हा पोलिसांच्या ताब्यांतच होता त्यामुळे त्याचा नाइलाज झाला होता. वस्तुतः त्याच्या मनांत साक्ष देण्याचें नव्हतें व संधी मिळाल्यास तोही पोलिसांच्या ताब्यांतून निसटण्याच्या विचारांत होता. त्यामुळे स्टेशनाबाहेर जाऊन टांग्यांत बसण्याकरिता त्यानेही गडबड केली. गोविंदरावांना

मराठी ग्रंथ सं... ठाणे. स्थळप्रत.



अनुक्रम ........ वि. ........

क्रमांक .................... नों: दि: ........

पाहतांच पोलिसांचें लक्ष साक्षीदाराकडे गेलें, पण तो दिसला नाही. तेव्हा गडबडीने स्टेशनाच्या बाहेर गाड्या उभ्या राहतात त्या ठिकाणीं पोलिस आले. त्यांच्या नजरेला वर सांगितलेली बंदोबस्तांत असलेली गाडी दिसली. पडदे सोडलेली व बाहेरून बंदोबस्तांत ठेवण्यांत आलेली गाडी दिसतांच पोलिसांना त्याच गाडींत साक्षीदार असावा असा संशय आला. गाडीवाल्याला पडदे वर बांधण्याला पोलिसांनी सांगितलें. तेव्हा गोविंदराव पुढे आले आणि त्यांनी गाडी आपली आहे व पडदे वर बांधीत नाही अशी तक्रार केली. पोलिसांची व त्यांची बरीच बोलाचाली झाली व त्यांतच पंधरावीस मिनिटें गेलीं. गोविंदराव गाडीचे पडदे वर करूं देत नाहीत व तक्रार करतात यावरून त्याच गाडींत साक्षीदार असल्याचा पोलिसांना पक्का संशय आला. म्हणून त्यांनी या अवधींत दुसरीकडे तपास केला नाही. ठरलेल्या ठिकाणावर जाण्याइतपत टांग्याला वेळ मिळाला असें वाटल्यानंतर गोविंदरावांनी पडदे वर करण्याला तक्रार केली. पडदे वर केल्यानंतर आंत पाहतात तो पोलिसांना कांही दिसलें नाही. त्यामुळे आपल्याला फसवण्यांत आलें असें त्यांना वाटून ते खजील होऊन गोविंदरावांवर दातओठ खात आपल्या ठाण्यावर गेले. पोलीस आपल्यावर कांही तरी तोहमत आणतील म्हणून गोविंदराव हे स्टेशनाच्या प्लॅटफॉर्मवर असतांना स्टेशनमास्तर व टिकीटकलेक्टर यांच्याशीं गप्पागोष्टी करीत होते. जरूर पडली असती तर गोविंदरावांच्या वतीने त्यांनी साक्षी दिल्या असत्या.

ही सर्व हकीकत मला दुसरे दिवशीं कोर्टांत कळली, तेव्हा गोविंदरावाच्या संबंधाने मला काय वाटलें असावें हें कल्पनेवरच सोपवलेलें बरें. गोविंदरावांकडे पाहून माझा कंठ भरून येत होता. पोलिसांचा प्रथमपासूनच त्यांच्यावर राग होता व माझ्याप्रमाणेच त्यांनाही अडकवण्याचा त्यांचा विचार होता असें आमच्या कानावर आलें होतें. त्यांत या गोष्टीची भर पडली. म्हणून गोविंदरावांनी ही जोखीम अंगावर घेऊं नये म्हणून त्यांचें मन वळवण्याचा मीं प्रयत्न केला. पण त्याचा उपयोग झाला नाही. शेवटीं त्याच्यावर कांही तोहमत आणून पोलिसांनी त्यांना अडकवल्यास बाहेर माझ्याकरिता खटपट करणारा कोणी नाही, याकरिता तरी त्यांनी या संकटांत पडूं नये, या मुद्द्यावर जोर देऊन त्यांचें मन वळवण्याचा मीं प्रयत्न केला. पण तोही व्यर्थ गेला. त्यांना एक प्रकारची ईर्षा आल्याप्रमाणे होऊन कष्टाने व साहसाने साध्य झालेली गोष्ट व्यर्थ न दवडण्याचा त्यांचा निश्चय झाला होता. असो. पोलिसांच्या हातची शिकार याप्रमाणे गेल्यानंतर त्यांनी पुष्कळ तपास केला. आमचे आप्तइष्ट, धागेदोरे या सर्वांवर नजर ठेवून कसून तपास केला. शेवटीं त्या साक्षीदाराच्या आईकडून त्यांनी आपल्या मुलाचा गोविंदराव वगैरेंनी खून केला असावा असा संशय येतो म्हणून अर्ज करविला. पण पुराव्याच्या अभावीं या अर्जाचें कांहीच झालें नाही. बरेच दिवस पोलिसांच्या सांगण्यावरून खटला तहकूब करून अखेरीस नाइलाज म्हणून आम्हांला सेशन कमिट करण्यांत आलें.

## सांगलीकरांशीं पोलिसांचें संगनमत

खटला सेशन कोर्टांत गेल्यावरोबर आम्हाला जामिनावर सोडण्याकरिता सेशन जजाकडे अर्ज करण्यास आला. माझ्यावर कांहीच पुरावा नव्हता; त्यामुळे माझ्यासंबंधाने अडचण नव्हती. पण हरीनानांवर थोडासा पुरावा होता. म्हणून जामिनावर ते सुटतील किंवा नाही याबद्दल शंका होती. जामिनावर सुटून जाण्याची त्यांची फार इच्छा होती. याकरिता जामिनाच्या अर्जाच्या कामीं मुंबईहून जॉर्डिन बॅरिस्टर यांना आणविलें होतें. जॉर्डिन यांची तक्रार ऐकून जजांनी मला जामिनावर सोडण्याचा हुकूम केला, व हरीनानांच्या बाबतींत अर्ज नामंजूर झाला. याप्रमाणे तीनचार महिने अटकेंत राहून मी जामिनावर मुक्त झालों. मी अटकेंतून सुटलों ही गोष्ट पोलिसांना रुचली नाही. मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत त्यांचें जसें चालत होतें तसें सेशन जज्जाकडे चालणार नाही असें त्यांना वाटूं लागलें. त्या वेळीं क्रंप हे जज्ज होते. पुढे हे हायकोर्टांत न्यायाधीश झाले. त्यांची हुशारी व कायद्याचें ज्ञान बेताबाताचेंच होतें. पण जाणूनबुजून अन्याय करण्याकडे त्यांची प्रवृत्ती नव्हती. त्यामुळे पोलिसांना खात्री वाटेना. सांगली संस्थानांत गुन्हा घडला आहे या सबबीवर हा खटला सांगलीस चालावा अशी मागणी पोलिटिकल एजंटकडे सांगलीच्या संस्थानिकांनी केली. याच्या बुडाशीं ब्रिटिश पोलीस होते. सांगली संस्थानांत खटला गेला तर आपल्याला तेथे खात्रीने यश येईल असें त्यांना वाटत होतें. शिवाय बेळगावास हा खटला ज्यूरींपुढे चालला असता आणि सांगलीस तोही त्रास चुकला असता असें त्यांना वाटलें. पण पोलिटिकल एजंटांनी सांगलीकरांची मागणी अमान्य केली. यामुळे बेळगावासच खटला चालण्याचें ठरलें.

क्रिमिनल प्रोसीजरप्रमाणे फौजदारी खटल्यांत साक्षीदारांचीं पोलिसांनी घेतलेलीं टिपणें आरोपीला दाखवावयाचीं नाहीत असा नियम आहे. त्यामुळे पोलिसांनी घेतलेल्या टिपणांत व कोर्टापुढे झालेल्या जबाबांत कांही फेरफार झाल्यास तो कोर्टाच्या नजरेस आणण्याचें काम आरोपीला कठीण होतें, आणि पोलिसांना साक्षीपुराव्यांत वाटेल तसा फेरफार करण्याला सवलत मिळते. आमच्या खटल्यांत अशा प्रकारचा फेरफार करून पुराव्यांत सुधारणा करण्याचा बेत पोलिसांचा चालला होता. आम्हाला ही गोष्ट कळली. त्यामुळे पोलिसांचीं टिपणें आगाऊ पाहण्याची जरुरी आम्हांला भासूं लागली. या बाबतींत मी व काका पाटील विचार करीत बसलों असतां गोविंदरावांच्या कानावर ही गोष्ट गेली. झालें, दोनचार दिवसांच्या आंत एका रात्रीं पोलिसांच्या टिपणांचें दप्तर आमच्यापुढे त्यांनी टाकलें! आम्हांला आश्चर्य वाटलें. जाफर इमाम या टिपणांना फार जपत असे, हें आम्हांला माहीत होतें. त्यामुळे गोविंदरावांनी केलेल्या कामगिरीबद्दल जास्तीच आश्चर्य वाटलें. टिपणें मोडींत होतीं. रात्रीच्या रात्रीं पांचसहा लोकांना बसवून गोविंदरावांनी त्यांच्या नकला काढवल्या व पहाटे दप्तर जिकडच्या तिकडे रवाना झालें. हीं

टिपणें व मॅजिस्ट्रेटच्या कोर्टातील जबान्या ताडून पाहतां पुराव्यांत किती तरी विसंगतपणा दिसत होता! सर्व कागदपत्रांच्या नकला व त्यांचीं इंग्रजी भाषांतरें करवून घेऊन बॅरिस्टरची व्यवस्था करण्याकरिता मी व काका मुंबईस गेलों. हा खटला सांगलीस वर्ग होत नाही असें कळून चुकल्यानंतर सांगली पोलिसांच्या ताब्यांत असलेल्या तीन बेरडांवरील खटला आमच्या खटल्यांत सामील करण्याचा बेत पोलिसांनी केला व त्याला सांगलीकरांनी संमती दिली! सांगली संस्थानाच्या हद्दींत गुन्हा घडला अशी पोलिसांची फिर्याद व सांगली संस्थानाच्या हद्दींतच आरोपी राहात असून तेथेच त्यांना पकडण्यांत आलें होतें. तरी सांगलीकरांनी त्यांच्या वरील खटला बेळगाव पोलिसांच्या मागणीवरून बेळगावास चालवण्याला संमती दिली, यावरून या खटल्यापुरतें सांगली सरकार हें बेळगावचे पोलीस सांगतील त्याप्रमाणे वागत असे हें स्पष्ट होतें. या बेरडां-पैकी दोघांनी कबुलीजबाब दिले होते. त्यांचा उपयोग आमच्याविरुद्ध करण्याकरिता आमच्यावरील खटला तिकडे जात नाही असें झाल्यानंतर तिकडील खटला इकडे मागवण्याचा उपद्व्याप पोलिसांना करावा लागला. त्यामुळे खटला कमिट झाल्यानंतरदेखील पुष्कळ दिवसपर्यंत हें प्रकरण भिजत ठेवावें लागलें. खटला अशा प्रकारें लांबवण्यांत पोलिसांचे अनेक हेतू होते. क्रॅंप हे रजेवर जाणार होते व त्याची ते वाट पाहात होते. क्रॅंपपुढे खटला चालूं नये अशी त्यांची इच्छा होती हा एक हेतू; दुसरा, नोकर साक्षीदार हा त्यांच्या हातीं लागला नव्हता; व तिसरा, आम्हीं आमच्या वतीने मुंबईचे बॅरिस्टर इनव्हॅरॅरिटी यांना देण्याचें ठरवलें होतें, व तेही विलायतेला जाणार होते, म्हणून ते आम्हांला मिळूं नयेत. या तीन हेतूंपैकी त्यांचा तिसरा हेतू साध्य झाला.

### *बॅरिस्टर मिळवण्याची खटपट*

मुंबईस बॅरिस्टर ठरवण्याकरिता मी व काका पाटील गेलों होतों, असें वर सांगितलेंच आहे. खालच्या कोर्टातच खटला इतका खुळखुळा झाला होता की, सेशन कोर्टात आम्हांला फार श्रम पडणार नाहीत असें वाटत होतें. बॅरिस्टरची खरोखर मला जरुरी वाटत नव्हती. आणि द्यावयाचाच तर बॅप्टिस्टासारख्या काळजीपूर्वक व आपलेपणाने काम करणाऱ्याला द्यावें असें माझें मत होतें. पण हरीनानांचे एक आप्त मुंबईस हायकोर्टात वकिली करीत होते, त्यांचा सल्ला प्रसिद्ध युरोपियन बॅरिस्टर दिला पाहिजे असा पडला. म्हणून इनव्हॅरॅरिटीकडे कागदपत्र दिले व त्यांनी विलायतला जाण्याच्या पूर्वी खटला निघाल्यासच चालवण्याचें कबूल केलें. ही अट आम्हांला मान्य करावी लागली. इनव्हॅरॅरिटीकरिता माहितीचें टिपण व कागदपत्र वगैरे सर्व मीं व काकांनी मिळून तयार केले होते. ते घेतेवेळीं "ते बरोबर असल्याची खात्री करून घ्या व नंतर माझ्याकडे द्या; एकदा कांही गोष्टींवर अवलंबून मीं बचावाची दिशा ठरवली म्हणजे तींत फेरफार करणें मला पसंत नाही" अशा प्रकारें त्यांनी आम्हांला बजाविलें होतें. पण, सर्व बिनचूक असल्याबद्दल आमची

खात्री असल्याने त्यांचेकडे 'ब्रीफ' दिलें. आठ दिवसांनंतर आम्हांला येण्यास त्यांनी कळवलें. आठ दिवसांनंतर त्यांच्याकडे गेलों तेव्हां त्यांनी खटल्याची रूपरेषा बिनचूक सांगितली व काम फार झालें तर आठदहा दिवसांत संपेल असें सांगून खटल्यांत कांही अर्थ नाही असेंही आश्वासन दिलें. पन्नाससाठ साक्षीदारांच्या जबान्या व इतर कागदपत्र यामुळे ब्रीफ बरेंच मोठें झालें होतें. तथापि त्यांनी आपल्याकरिता कांही टिप्पण केलें नव्हतें किंवा कागदावर निळ्यातांबड्या पेन्सिलीच्या खुणादेखील केल्या नव्हत्या. त्यावरून त्यांच्या बुद्धीची व धारणाशक्तीची कल्पना मला आली, व त्यांचा लौकिक इतका कां होता हेंही समजलें. पोलिसांनी खटला लांबणीवर टाकण्याची खटपट केली व इनव्हॅररिटी आमचें ब्रीफ परत देऊन विलायतेला निघून गेले. हरीनानांच्या मंडळींना मुंबईस दुसरा नामांकित बॅरिस्टर नव्हता म्हणून बाहेरून कोणास तरी आणावें असें वाटलें. त्याकरिता त्यांचे आप्त हायकोर्ट वकील कलकत्त्याला गेले. तेथे त्यांची व तेथील हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश—जे पूर्वी मुंबईच्या हायकोर्टात होते—यांची भेट झाली. ज्यूरीपुढे खटला असल्यास नॉर्टन यांना बॅरिस्टर करण्याबद्दल त्यांनी सल्ला दिला व त्याप्रमाणे नॉर्टनला ठरवण्यांत आलें.

काका पाटलांची पोलिसांना इतकी दहशत बसली होती की, ते ठाण्याच्या कोर्टाचे वकील असल्यामुळे बेळगावच्या कोर्टात त्यांना काम चालवण्याला परवानगी देण्यांत येऊं नये, म्हणून पोलिसांच्या तर्फे सेशन जज्जांना कळवण्यांत आलें होतें. पण नॉर्टनसारखा बॅरिस्टरच येत असल्यामुळे हें प्रकरण तेथेच थांबलें. आरोपीच्या विश्वासांतले वकीलदेखील मिळूं नयेत अशी पोलिसांची इच्छा या खटल्यांत होती, यावरून किती ईर्षेने हा खटला त्यांनी उभारला होता याची कल्पना येईल.

इनव्हॅररिटीसारखे बॅरिस्टर जरी आम्हांला लाभले नाहीत तरी माझ्या मुंबईच्या मुक्कामांत एक अकल्पित असा दुसरा फायदा झाला. याच्या योगाने या खटल्याचा पायाच ढासळला, व सर्व खटला बनावट असल्याबद्दल ज्यूरीची व जज्जाची खात्री होऊन सर्व आरोपी निर्दोषी ठरले. वेरडांवरील खटला सांगलीस चालला असता, तर त्यांना शिक्षा होण्याचा संभव होता, व खटल्यांत कांही तरी तथ्यांश असेल असें मानण्याला जागा राहिली असती. पण तेंही पोलिसांच्या नशिबीं नव्हतें! तो प्रकार असा होता.

### बाबासाहेब परांजपे आणि हाडें

'राष्ट्रमता'शीं माझा संबंध असल्यावेळीं वऱ्हाडांतील यवतमाळचे प्रसिद्ध देशभक्त डॉ. बाबासाहेब परांजपे (तपस्वी डॉ. परांजपे) यांची व माझी ओळख झाली होती व त्यांनीही 'राष्ट्रमता'ला मदत केली होती, ही हकीकत यापूर्वी आली आहे. बाबा सहज मुंबईला आले होते. त्या वेळीं मी मुंबईस होतों हें त्यांना समजलें. माझ्यावरील खटल्याची हकीकत त्यांना वर्तमानपत्रावरून त्रोटकपणें माहीत

होती. म्हणून ते मला भेटण्याकरिता आले. भेटींत मीं साद्यंत हकीकत सांगितली त्यामध्ये प्रेत जाळून उरलेलीं हाडें पुराव्यांत हजर झालीं आहेत हीही गोष्ट सांगितली, व त्याबद्दल आम्हांला संशय येतो असेंही त्यांना कळवलें. हें ऐकतांच बाबांच्या मनांत बेळगावला येऊन तीं हाडें प्रत्यक्ष पाहण्याचें आलें. त्याप्रमाणे ते माझ्याबरोबर बेळगावला आले. तज्ज्ञाकडून हाडें तपासावयाचीं आहेत, म्हणून परवानगी द्यावी, असा कोर्टांत अर्ज दिला. फिर्यादीतर्फे सरकारी वकील व पोलीस इन्स्पेक्टर यांच्या समक्ष कोर्टांत हाडें तपासण्यास परवानगी मिळाली. त्याप्रमाणे सर्वांच्या समक्ष बाबांनी सर्व हाडें बारीक रीतीने तपासून पाहिलीं व जेथे त्यांना संशय आले त्याचीं सर्व टिपणें त्यांनी केलीं. पुष्कळ गोवऱ्या पेटवून तीनचार तासपर्यंत प्रेत जळत होतें असा खटल्यांत पुरावा होता. इतक्या विस्तवांत इतका वेळपर्यंत प्रेत जळल्यानंतर ज्या स्थितींत हाडें होतीं त्या स्थितींत तीं राहणेंच शक्य नाही, असा बाबांचा अभिप्राय होता. कोणत्या तरी प्रेताचीं हाडें उकरून काढून मग तीं थोड्याशा आगींत टाकून होरपळवून आणलेलीं आहेत, असें बाबांचें स्पष्ट मत होतें. पण तें गुप्त ठेवून आयत्या वेळीं त्याचा उपयोग करण्यांत जास्ती फायदा होता; म्हणून आम्ही हाडें हीं मनुष्याचीं नसून जनावरांचीं आहेत, असें आमच्या तज्ज्ञांचें मत आहे, असा पुकारा केला. सिव्हिल सर्जनने हाडें तपासून तीं मनुष्याचींच आहेत, असें सर्टिफिकेट दिलें होतें. या सर्टिफिकेटापुढे आमच्या बाबांचें काय चालणार, अशा घमेंडींत पोलीस होते. वास्तविक सर्टिफिकेटावरून पोलिसांचें काम भागलें असतें. पण आपल्या मुद्द्याला बळकटी आणण्याकरिता खुद्द सिव्हिल सर्जनना साक्षीला बोलावून त्यांच्याकडून शाबिती करून घेण्याचा त्यांचा बेत ठरला. स्वतः सिव्हिल सर्जन साक्षीला आल्यास तज्ज्ञ या नात्याने आमच्या तर्फे ज्या गोष्टी आम्हांला शाबीत करून घ्यावयाच्या होत्या त्याबद्दल त्यांना उलटतपासणींत प्रश्न विचारण्याची आम्हांला संधी मिळणार म्हणून आम्हांलाही समाधान वाटलें. बाबांची कल्पना खरी असल्यास व सिव्हिल सर्जनसारख्या बड्या युरोपियन अधिकाऱ्याकडून त्याची शाबिती झाल्यास सोन्यापेक्षा पिवळें होईल असें आम्हांला वाटलें.

क्रंपसाहेबापुढेच खटला चालण्याचें निश्चित झाल्यामुळे पोलिसांची थोडीशी नाउमेद झालीच होती. मॅजिस्ट्रेट कोर्टांत पोलिसांतर्फे असिस्टंट सरकारी वकील ओक हे काम चालवीत असत. सेशनांत खटला आल्यानंतर हें काम मुख्य सरकारी वकील मणेरीकर यांचेकडे गेलें. पण मणेरीकरांचा व माझा स्नेह होता ही गोष्ट प्रसिद्ध होती आणि ते स्वभावाने सरळ व निःपक्षपातीपणाने काम करणारे म्हणून त्यांची ख्याती होती. सरकारी वकिलाचें काम म्हणजे आरोपींना कांहीही करून शिक्षा देवविण्याची खटपट करणें हें नसून कोर्टाला न्याय देण्याचे कामीं निःपक्षपातीपणाने मदत करणें हें होय, हें तत्त्व ते अमलांत आणीत असत. त्यामुळे ते पोलिसांना अप्रिय झाले होते. म्हणून त्यांनी मुद्दाम ओक यांनी मणेरीकरांबरोबर काम चालवावें अशी तजवीज करून घेतली होती. तथापि आमच्यातर्फे बॅरिस्टर येणार हें निश्चितपणें समजल्यानंतर सरकारतर्फेही बॅरिस्टर

आणण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला, व त्यांत त्यांना यश येऊन मुंबईचे बॅरिस्टर ब्रिनिंग यांची नेमणूक झाली. हें एका परीने आमच्या पथ्यावरच पडलें. पोलिसांची भीडमुर्वत न राखतां सरळपणें हे काम करतील अशी आमची अटकळ होती व ती खरी ठरली.

### बॅरिस्टर नॉर्टन यांचें कौशल्य

आमचे बॅरिस्टर नॉर्टन यांना काँग्रेसमध्ये मीं पाहिलें होतें. पूर्वीच्या काँग्रेसमध्ये हे हजर असत व प्रामुख्याने भाग घेत असत. त्या वेळच्या राजकारणी लोकांत् त्यांची प्रतिष्ठा बरीच मोठी होती. त्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि वक्तृत्व हीं प्रसिद्ध होतीं. हे पूर्वी मद्रासमध्ये धंदा करीत असत व तेथून पुढे कलकत्त्याला धंद्याकरिता गेले. मद्रासच्या तिसऱ्या काँग्रेसच्या वेळीं त्यांनी आपल्या स्वतःच्या खर्चाने सर्व प्रतिनिधींना एक मोठी पार्टी दिली होती. आमच्या वडिलांबरोबर मीही गेलों होतों. आमच्या बेळगावच्या प्रतिनिधींपैकी एकदोघांनी या पार्टीच्या वेळीं कांही निषिद्ध पेयांचा चांगला समाचार घेतला होता. ही गोष्ट मला अपूर्व वाटली, म्हणून त्या पार्टीचें स्मरण मला अद्यापि आहे.

कलकत्त्यांत अत्याचाराबद्दल व राजद्रोहाबद्दल कांही खटले झाले होते. त्यांत नॉर्टन हे सरकारतर्फे काम चालवीत असत. आरोपींतर्फे कांही खटल्यांत कै. दास हे बॅरिस्टर होते. या खटल्याची जी हकीकत प्रसिद्ध होत असे तिजवरून नॉर्टन व दास यांचे वारंवार खटके उडत असत, असें मला माहीत होतें. बाहेरून बॅरिस्टर आणावयाचा तर दास यांनाच आणावें असें माझ्या मनांत होतें. पण युरोपियन बॅरिस्टरचें ज्याप्रमाणे वजन जज्जावर पडतें त्याप्रमाणे हिंदी बॅरिस्टरचें पडणार नाही, असें हरीनानांच्या मंडळींना वाटलें! त्या वेळीं युरोपियन लोकांसंबंधाने 'युरोपियन' म्हणूनच जो मोह जनतेंत होता तो गेला नव्हता. आज पंधरासोळा वर्षांत ही परिस्थिती बदलली आहे.

नॉर्टनसाहेबांकडे कागदपत्र त्यांच्या सांगण्याप्रमाणे आगाऊच पाठविण्यांत आले होते. बेळगावला ते आल्यानंतर दुसरे दिवशीं काम चालणार म्हणून मी व काका पाटील त्यांना भेटून त्यांनी कशी काय तयारी केली आहे हें पाहण्याकरिता गेलों. पण त्यांनी आमचें ब्रीफ आमच्यासमोर प्रथमच उघडलें असें आम्हांला दिसून आलें. त्यांनी ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली. मग आम्हीं सर्व इत्थंभूत हकीकत त्यांना समजावून सांगितली. त्यांनी शांतपणें ती सर्व ऐकून घेऊन टिपणें वगैरे केलीं. मोठे नामांकित बॅरिस्टर तुसड्या स्वभावाचे असतात, असा त्यांच्यासंबंधाने लौकिक असे. पण नॉर्टन यांची गणना नामांकित बॅरिस्टरांत होत होती तरी ते स्वभावाने शांत व मोठे गोड होते, असा त्यांच्याविषयी आम्हांला अनुभव आला. फौजदारी कामांत त्यांचें प्रावीण्य फार मोठें आहे असें आम्हीं ऐकलें होतें. पण आम्हांला मात्र तसा अनुभव आला नाही. तथापि तयार करून दिलेल्या मुद्द्याची मांडणावळ करणें व उठावणी करणें इत्यादि कामांत त्यांचा हातखंडा असे. उलट बाजूच्या बॅरिस्टरांना व जज्जांनादेखील ते इतके

टाकून बोलत की, त्यामुळे कोर्टांत अनेक वेळां प्रकरण विकोपाला जाई. बिचारे बिनिंग तर उलट बोलतच नसत. जजदेखील पाचसहा दिवसांत कंटाळून नॉर्टनबरोबर वाद करण्याचें टाळीत असत. एकदा ते बिनिंग यांना ऐकूं जाईल इतक्या स्वरांत मला म्हणाले, "Do you know why Mr. Binning is engaged by Government?" मीं "मला माहीत नाही" असें उत्तर दिलें. त्याबरोबर बिनिंगकडे स्मित मुद्रेने पाहात "Because Mr. Binning has a beautiful wife." असे शब्द त्यांच्या तोंडून आले. बिनिंगसाहेबांनी किंचित स्मित केलें व कामाला सुरुवात झाली. नॉर्टन हे तुसडे नसून तुसडेपणाचा कोर्टांत आव आणीत. पण ज्यूरीला मात्र खूष ठेवण्याचा प्रथमपासून कसून प्रयत्न करीत. त्यांच्या बोलण्यांत विनोद व satire असत; त्यामुळे ज्यूरीवर परिणाम होई असें आम्हांला वाटे. जज्जांना मात्र हे प्रकार आवडत नसत, पण करणार काय? आपल्या या अशा प्रकारच्या वागणुकीने जज्जावर विपरीत ग्रह होण्याचा संभव आहे, असें मीं एकदा त्यांना कांही अंशीं विनोदाने व कांही अंशीं असें न करण्याबद्दल त्यांना सूचना द्यावी या इच्छेनें म्हटलें. त्याबरोबर ते म्हणाले की, "तुम्ही चुकतां. मीं पुष्कळ सिव्हिलियन जज्जांपुढे कामें केलीं आहेत. हे लोक घमेंडखोर असतात. त्यांच्यापैकी पुष्कळांना कायद्याचें ज्ञान बेताबाताचें असतें. माझाही लौकिक मोठा आहे. त्याचा फायदा घेऊन जज्जापेक्षा मला अधिक समजतें अशा कुर्ऱ्याने प्रथमपासून वागल्यास ते नरम पडतात व वळवावें तसे वळतात, असें पुष्कळ वेळां माझ्या अनुभवाला आलें आहे. तुमचे जज त्यापैकीच आहेत. तेव्हा हाच प्रयोग त्यांच्यावर योग्य आहे." वगैरे. हजरजबाब हा गुण त्यांच्यामध्ये विशेष होता. उलटतपासणींत साक्षीदाराला गोंधळवण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष असे. साक्षीदार बनावट गोष्टी सांगणारा असला म्हणजे गोंधळतोच. असाच प्रकार या खटल्यांत अनेकदा झाला. याच्या उलट बिनिंगची वागणूक होती. पण त्याबरोबर सर्वच बेताबाताचें. खटल्यांतही विशेष अर्थ नव्हता हें प्रथमपासूनच त्यांना दिसून आलें होतें. मुंबईहून निघण्यापूर्वीच त्यांनी कागदपत्र वाचून या खटल्यांत कांही होणार नाही असें ठरविलें होतें व त्याप्रमाणे एका हायकोर्ट वकिलाजवळ ते बोलले होते.

### *लोकमान्यांच्या सुटकेची तार*

माझे वडील नुकतेच वारले होते. घरीं माझ्याशिवाय कोणी पुरुष नाही. मातुःश्री, आजी, बायको व बहीण वगैरे आप्त मंडळी अतिशय काळजींत होती. मी त्यांना पुष्कळ धीर देत होतों; पण त्यांचें समाधान कसें होणार? ज्या दिवशीं सेशन कोर्टांत खटला चालावयाचा त्या दिवशीं ही सर्व मंडळी अत्यंत खिन्न झाली होती. कांही जास्तीकमी झाल्यास जिवावरचा प्रसंग हें ते जाणून होते. आदल्या रात्रीं मी नॉर्टन यांच्या बंगल्यांतच निजलों होतों. पहाटे लवकर घरीं येऊन स्नान करून आईबरोबर बोलत बसलों होतों. इतक्यांत तारेचा शिपाई तार घेऊन हसतहसत आला

व मला त्याने मोठ्याने हाक मारली. मीं बाहेर येऊन तार त्याच्याकडून घेण्याकरिता हात पुढे केला. तो तार देईना व हसत हसतच बक्षिस मागूं लागला. मला कांही समजेना. आजच माझ्यावर भयंकर तोहमतीचा खटला चालावयाचा होता; व त्या काळजींत घरची मंडळी असतांना तारशिपाई असें कां करतो असें मला वाटलें. चांगली बातमी असेल तर चांगलें बक्षीस देईन, असें मीं सांगितलें. त्याने तार माझ्या हातीं दिली. मीं ती फोडून वाचली. तार लोकमान्य टिळकांची! पुण्याहून सकाळींच केलेली! आणि तींत रात्रीं आपल्याला सोडल्याबद्दलचा मजकूर! सर्वच अनपेक्षित व आनंदाचें वर्तमान! त्यामुळे थोडा वेळ मी माझ्यावरील संकट विसरून गेलों. मला आनंद झाला. डोळ्यांत एकदम पाणी आलें. तसाच आंत जाऊन पाच रुपयांची नोट तारशिपायाच्या हातीं दिली आणि आईला आनंदांत पुरणपोळी करण्याला सांगितलें. आईला आश्चर्य वाटलें. मग मीं तारेंतील बातमी सांगितली. तिला व घरच्या मंडळींना हा शुभशकुन वाटला. मलाही क्षणभर तसेंच वाटून त्यांच्या आनंदांत मी भागीदार झालों. गावांत लागलीच दवंडी पिटवून बातमी कळवली. आमच्या घराकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. मला भेटल्यासारखें झालें व बातमीच्या खरेपणाची खात्रीही पटली, असें दुहेरी काम करून मंडळी परत गेली. मीं तारेचें उत्तर देऊन टिळकांचें विनयपूर्वक स्वागत केलें. माझ्यावरील खटल्याची तारीख त्याच दिवशीं होती ही हकीकत मीं कळवली नव्हती. पण मी कोर्टाकडे जाण्याच्या तयारींत होतों इतक्यांत दुसरी तार येऊन थडकली. त्या तारेंत खटल्यांत यश चिंतन केलें होतें! हा आशीर्वाद आहे अशी माझी भावना झाली व मी कोर्टांत गेलों.

### निर्दोषी म्हणून माझी सुटका

कोर्टांत व बाहेर कंपाउंडमध्ये खूप गर्दी होती. लोकमान्य सुटल्यामुळे लोकांची वृत्ती आनंदी होती; पण त्याबरोबरच मला पाहिल्यावर लोकांच्या चेहऱ्यावर काळजीची छटा दिसे. अशा स्थितींत मी इष्टमित्रांना भेटून आरोपीकरिता असलेल्या पिंजऱ्यांत दोन खुर्च्या ठेवल्या होत्या त्यांपैकी एकीवर जाऊन बसलों. हरीनाना दुसरीवर बसले. पण बेरड आरोपींनी मला पिंजऱ्यांत पाहिलें व ते बाहेरच थबकून राहिले! माझ्या बरोबरीने कसें बसावें असें त्यांना वाटलें असावें. मीं त्यांना आंत बोलाविलें व खाली बसण्यास सांगितलें. बिचाऱ्यांनी खाली मान घातली व बसले. बॅरिस्टर, वकील, सर्व मंडळी आपापल्या जागेवर बसली. अशा प्रकारचा देखावा मला कांही नवीन नव्हता. असले प्रकार मीं किती तरी वेळां पाहिले असतील. पण त्या वेळीं मला तो प्रकार कसासाच वाटला! जज्ज आपल्या आसनावर येऊन बसतात न बसतात तोंच बिनिंग हे बोलण्याकरिता उठून उभे राहिले. वस्तुतः कामाला सुरुवात होण्यापूर्वी ज्यूरीची निवडणूक व्हावयाची असते. पण त्यापूर्वीच बिनिंगनी बोलण्याला सुरुवात केली. हें थोडें मला चमत्कारिक वाटलें. बिनिंगनी दहापाच वाक्यांत मी निर्दोषी

असल्याने मला सोडून द्यावें अशी कोर्टाला विनंती केली व जज्जांनी त्याप्रमाणे मला निर्दोषी म्हणून ठरवून मला मुक्त करण्याचा हुकूम केला! लोकांनीं टाळ्यांचा गजर केला, मी पिंजऱ्याबाहेर आलों व नॉर्टनच्या शेजारीं त्यांनी माहिती देण्याकरिता म्हणून लागलीच येऊन बसलों. टिळकांना तार केली व झालेली हकीकत कळवली. सेशनमध्ये खटला कमिट झाल्यानंतर दादासाहेब करंदीकरांनी मला तार करून आपण काम चालवण्याकरिता येतों असें मुद्दाम कळवलें होतें. आमची सर्व तयारी झाली असल्याकारणाने मीं त्यांचे आभार मानून जरूर पडल्यास कळवीन असें त्यांना उत्तर दिलें होतें. त्यांनाही माझ्याबद्दल तारेने कळवलें. 'टाइम्स आफ इंडिया'चा बातमीदार मुंबईहून आला होता. त्यानेही आपल्या पत्राला कळवलें. याप्रमाणे माझ्यावरील फार दिवस गाजत असलेल्या खटल्याचा निकाल लागला. डोंगर पोखरून उंदीर काढल्याप्रमाणे पोलिसांना झालें असेल. मीं नॉर्टनजवळ बसून माहिती देऊं नये व कोर्टांतही बसूं नये अशी त्यांची इच्छा होती, पण हें चालणार कसें?

रीतीप्रमाणे बाकीच्या आरोपींवर काम चालू झालें. ज्यूरीची याद पाहून स्वतः जज्जांनी नावें दिलीं होतीं. त्याप्रमाणे दोन खिस्ती, एक पार्शी व दोन ब्राह्मण असे ज्यूरीमध्ये होते. त्याच दिवशीं दोन प्रहरीं बऱ्याच ठिकाणाहून मला अभिनंदनपर तारा आल्या होत्या. लो. टिळकांची पहिली तार होती. पुढे दोनतीन तासांनीं केसरी स्टाफकडून तार आली! कोण हा आपलेपणा! लोकमान्य मंडालेहून परत आल्याबरोबर वातावरण बदलत चाललें! असो. सविस्तर पत्र लिहून हा खटला संपताच भेटीला येतों, भेटीची उत्कट इच्छा आहे वगैरे मीं लोकमान्यांना कळवलें. खटला संपवूनच येण्याबद्दल त्यांचें उत्तर उलट टपालीं आलें.

खालच्या कोर्टांत मुख्य मुख्य साक्षीदारांची उलटतपासणी करून खटल्याला पुष्कळ शिथिलता आली होती, तरी पोलिसांच्या टिपणांच्या नकला आम्हांला तेव्हा मिळाल्या नव्हत्या. म्हणून त्यांचा उपयोग करून नॉर्टनसाहेबांनी उलटतपासणी चालवली. प्रथम उलटतपासणी सुरू करण्याच्यापूर्वी पोलिसांचीं टिपणें दाखवण्याकरिता रीतीप्रमाणे कोर्टाला विनंती केली. पण ती नाकारण्यांत आली. तेव्हा आमच्याजवळ असलेल्या नकलांचा धडधडीत उघडपणें नॉर्टन उपयोग करूं लागले व त्यांतील उतारे घेऊन उलटतपासणींत प्रश्नांची उभारणी करूं लागले. पोलीस चपापले. जज्जांना संशय आला व "तुम्हांला ही माहिती कोणीं दिली" असा नॉर्टनला त्यांनी प्रश्न केला. नॉर्टननी उत्तर देण्याला एक सेकंददेखील लावला नाही. "It is no business of the court to inquire how I got my instructions. It only shows that my instructions are perfect."

हा जबाब ऐकून जज्ज स्वस्थ बसले व पोलीसटिपणांचें दप्तर त्यांनी मुकाट्याने नॉर्टनच्या स्वाधीन केलें! पोलीस किती खजील झाले असतील याची कल्पनाच करावी!

नॉर्टनसाहेबांनी डिस्ट्रिक्ट पोलीस सुपरिंटेंडंटची उलटतपासणी करून केली.–

पुष्कळ ठिकाणीं त्यांनी खोटा जबाब दिल्याचें स्पष्ट दिसत होतें. तें पाहून नॉर्टन जजाकडे पाहून त्यांना ऐकूं जाईल अशा आवाजांत उद्गारले, "I am ashamed to see our countryman telling lies in the witness box."

हें ऐकून पोलीस साहेबांच्या चेहऱ्यावर लाली आली. पण करणार काय ?

अशा प्रकारें गमती करीत करीत नॉर्टनसाहेब काम चालवीत होते. या सर्व गोष्टी नमूद न करतां महत्त्वाच्या एकदोन गोष्टी देऊन हें प्रकरण पुरें करतों.

### *हाडांच्या पुराव्याला सुरुंग*

नॉर्टन बेळगावला आल्यानंतर एकदोन दिवसांतच त्यांची व मुंबईचे बॅरिस्टर ब्रॅन्सन यांचे चिरंजीव यांची ओळख झाली. ते मिलिटरींत कॅप्टनच्या हुद्दयावर होते. त्यांच्या ओळखीने नॉर्टन हे युरोपियन क्लबचे मेंबर झाले होते व दररोज सायंकाळीं क्लबांत जात असत. क्लबांत एका लष्करी मेडिकल ऑफिसरांची व त्यांची ओळख झाली आणि खटल्यासंबंधी त्यांच्या बरोबर ते बोलत असत. बाबासाहेब परांजपे यांनी हाडांसंबंधाने आपल्या मनांतील सर्व शंका नॉर्टन यांना कळवल्या होत्या व त्यांची योग्य समजूत घालण्याकरिता एक लेखी टिपणही करून दिलें होतें. बाबांनी जी माहिती दिली होती तिच्याबद्दल खात्री करून घेण्याकरिता नॉर्टननी आपल्या क्लबांतील स्नेही मेडिकल ऑफिसर यांचा सल्ला घेतला होता. त्या वेळीं सदरहू गृहस्थांनी स्वतः हाडें तपासून नक्की सल्ला देऊं असें कळवलें होतें. म्हणून या ऑफिसरना हाडें दाखविण्याची परवानगी कोर्टाकडून मिळविली. ती मिळाल्यानंतर बाबांच्या टिपणाप्रमाणे त्यांनी सर्व हाडें कोर्टासमक्ष तपासून पाहिलीं. बाबांनी केलेली परीक्षा व त्यांनी दाखवून दिलेल्या सर्व शंका त्यांना पटल्या व बाबांच्या सूक्ष्म निरीक्षणाबद्दल त्यांनी त्यांची शिफारस केली. बाबांनी केलेल्या शोधाखेरीज त्यांनी एक नवीन शोध लावला. एका जांघेचें हाड त्या हजर झालेल्या हाडांत होतें. त्या हाडाचे रचनेवरून व स्थितीवरून ज्या मनुष्याचीं तीं हाडें होतीं त्याचें वय पंधरासोळा वर्षांपेक्षा जास्ती नसावें असा त्यांचा अभिप्राय पडला; आणि पुराव्यावरून शंकर (म्हणजे ज्याचा खून झाला होता असें फिर्यादीचें म्हणणें होतें त्याचें) वय ४० च्या वर होतें असें सिद्ध होत होतें. या नवीन शोधामुळे हाडांच्या पुराव्यावर रचलेला सर्व व्यूह ढासळणार अशी आमची खात्री झाली. आरोपीच्या सुदैवाने मेडिकल ऑफिसर त्यांच्यातर्फे साक्ष देण्यास तयार झाले. त्यामुळे आम्हांला बराच धीर आला. त्यांनीही बाबांच्या प्रमाणे नॉर्टन-साहेबांना माहितीचें टिपण करून दिलें. सिव्हिल सर्जन यांची साक्ष व्हावयाची होती हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या साक्षीच्या वेळीं आपण कोर्टात हजर राहतों व सिव्हिल सर्जन कशीं काय उत्तरें देतात तें पाहतों, असें मेडिकल ऑफिसरनीं नॉर्टनला कळवलें होतें. या ऑफिसरकडून आम्हीं हाडें तपासून घेतलीं होती व तीं संशयास्पद आहेत असें त्यांचें मत होतें या गोष्टीचा गवगवा क्लबांत झाला होता. तेव्हा सिव्हिल सर्जन

काय साक्ष देतात याबद्दल कवांत कुतूहल उत्पन्न झालें होतें. म्हणून सिव्हिल सर्जनच्या साक्षीच्या दिवशीं पाच सहा युरोपियन पुरुष व दोन तीन बाया कोर्टाला आल्या होत्या. सिव्हिल सर्जनची निःपक्षपातीपणाबद्दल व सत्यप्रियतेबद्दल प्रसिद्धी होती. सरतपासणींत हाडें मनुष्याचीं आहेत, जनावरांचीं नव्हेत, इतकीच माहिती फिर्यादीतर्फे काढून घेण्यांत आली. आपला मुद्दा शाबीत झाला असें वाटून पोलिसांना आनंद झाला असेल. पण आमचा मुद्दा तो नव्हताच. नॉर्टनसाहेबांजवळच ते लष्करी ऑफिसर बसले होते. त्यांच्या व बाबांच्या सूचनेवरून त्यांनी आपल्या उलटतपासणीची रचना केली होती. उलटतपासणींत ज्या गोष्टी आम्हांला पाहिजे होत्या त्या सर्व सिव्हिल सर्जननी सांगितल्या. पोलिसांचीं तोंडें उतरलीं. सिव्हिल सर्जनच्या साक्षीवरून हाडांसंबंधी पुरावा बनावट आहे असें माप पूर्णपणें फिर्यादी पक्षाच्या पदरांत पडलें. आम्हांला या मुद्द्यावर दुसरा पुरावा देण्याची जरूरी पडली नाही. सिव्हिल सर्जनची साक्ष होईपर्यंत जज्जांचा कल साधारणपणें आरोपीच्या विरुद्ध असावा असें त्यांच्या वर्तनावरून वाटत होतें. पण त्यानंतर त्यांचा कल स्पष्टपणें आरोपीला अनुकूल असा दिसूं लागला. मग नॉर्टनच्या विनोदाला व इतर चेष्टांना ऊत आला.

### *हरीनानांच्या कुटुंबाची साक्ष*

फिर्यादी पक्षातर्फेच्या पुराव्याचा याप्रमाणे मोड झाल्यानंतर आरोपीतर्फे पुरावा देण्याची आवश्यकता नव्हती. पण नॉर्टननीं माझी व हरीनानांच्या कुटुंबाची साक्ष करवण्याबद्दलचा सल्ला दिला. मला आरोपीच करण्यांत आलें होतें आणि जरी मला पुराव्याच्या अभावीं दोषमुक्त ठरविण्यांत आलें होतें तरी माझ्या तोंडून मी निरपराधी आहें असें म्हणवून उलटतपासणीला फिर्यादीला संधी द्यावी हा हेतू होता. माझ्या उलटतपासणींत फिर्यादीला कांही मिळणार नाही व त्यामुळे खटल्याचा जोर कमी होऊन आमचा सरळपणा जास्ती पटण्याचा संभव होता. हरीनानांच्या कुटुंबासंबधाने याच प्रकारची विचारसरणी होती. त्यांच्या वर्तणुकीवरच सर्व खटल्याची रचना होती. भर कोर्टांत त्यांची अब्रू चव्हाट्यावर आणण्यासारखा पुरावा आला होता. तेव्हा त्यांनीही आपल्या बचावाचें काम उघडपणें करावें, म्हणजे सर्वच खटल्याचा पाया निःसंशयपणें ढासळेल असें नार्टन यांना वाटून त्यांनी हा सल्ला दिला होता. माझ्या साक्षीसंबंधाने विशेष अडचण नव्हती. पण एका श्रीमंत घराण्यांतील तरुण, अननुभवी व अशिक्षित बायकोवर अत्यंत नाजूक अशा मुद्द्यावर साक्ष देण्याचा प्रसंग अत्यंत जोखमीचा वाटणें साहजिक आहे. म्हणून स्वतः त्या बाईचें मत घेऊन काय तें ठरवावें असा विचार केला. त्यांची तयारी असल्याचें समजलें, म्हणून त्यांची साक्ष करवण्याचें ठरवलें. ही गोष्ट बाहेर प्रसिद्ध झाल्यामुळे कोर्टांत त्या दिवशीं अतोनात गर्दी झाली होती. आरोपीविषयीं सहानुभूतीने प्रेरित झालेले किती लोक असतील व केवळ हरीनानांची बायको साक्षींत कशी काय टिकते हें पाहण्याकरिता किती लोक आले होते हें सांगणें

कठीण होतें. पण माझ्या समजुतीने दुसऱ्या वर्गांत मोडणाऱ्यांचीच संख्या जास्ती असावी. बऱ्याच लोकांच्या छचोर वृत्तीवरून या गोष्टींत त्यांना मौज वाटत होती असें दिसत होतें. तथापि बऱ्याच लोकांना हा प्रसंग कठीण वाटून त्यांचे चेहरे गंभीर दिसत होते व कित्येक तर या साक्षीच्या वेळीं कोर्टांतून उठूनही गेले. याप्रमाणे निरनिराळ्या स्वभावाच्या लोकांवर निरनिराळे परिणाम झालेले दिसत होते. जज्जांची मुद्रा अतिशय गंभीर होती. जमलेल्या लोकांच्या निरनिराळ्या वृत्ती त्यांना दिसल्या असाव्या. म्हणून त्यांनी होऊन आपल्या चेंबरमध्ये ही साक्ष होण्यास आपली हरकत नाही असें सुचविलें. पण नॉर्टनला ही सूचना पसंत पडली नाही. बाईवर उघडपणें घाणेरडे आरोप करण्यांत आले आहेत, म्हणून उघडपणेंच त्यांचें क्षालन झालें पाहिजे, असें त्यांनी कोर्टाला कळवलें. हें धैर्य आमच्याकडून झालें नसतें, असे उद्गार पुष्कळ वकिलांच्या तोंडून निघाले.

बाईची सरतपासणी झाली. उलटतपासणी बिनिंग यांनी फारच सभ्यतेने केली. जरूरीचे आणि मुद्द्याचे प्रश्न त्यांनी केले. बाईंना फसवून किंवा भिववून त्यांच्या तोंडून उत्तरें काढण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. एकंदरींत त्यांच्या साक्षीचा परिणाम जज्जावर, ज्यूरीवर व लोकांवरही चांगला झाला.

## माझी उलटतपासणी

माझी उलटतपासणी बिनिंग यांनी सभ्यपणानेच केली. ज्या दिवशीं मी व हरीनाना खुनाचा बेत करीत होतों असें फिर्यादी पक्षाचें म्हणणें होतें त्या दिवशीं, त्यापूर्वी व नंतर कांही महिने मी बेळगावीं नव्हतों व मुंबईस होतों असें पोलिसांच्या पुराव्यावरून सिद्ध होण्यासारखें होतें. मी चळवळ्या मनुष्य म्हणून माझ्यावर पोलिसांची नजर असे. मी बेळगाव सोडल्यापासून माझ्याबरोबर पोलीस येत होते, व ज्या गावीं मी जाईन त्या गावच्या पोलिसांनी माझ्यावर व माझ्या हालचालीवर नजर ठेवावी अशी व्यवस्था असे. त्याचप्रमाणे तो गाव सोडून मी परत बेळगावला येण्याकरिता निघालों म्हणजे माझ्याबरोबर त्या गावचा पोलीस येऊन बेळगावच्या पोलिसांच्याकडे पुढील कामगिरी सोपवून जात असे. या पद्धतीमुळे मीं बेळगाव सोडल्याची, मुंबईतील मुक्कामाची व परत बेळगावला आलेल्या वेळची या सर्व दिवसांची नोंद पोलिसांकडेच होती. ती सर्व आम्हीं मागवली होती. त्यामुळे माझ्या साक्षीला महत्त्व आलें व पोलिसांच्या अंगावर बाजू पूर्णपणें उलटली.

याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट माझ्या साक्षींत उघडकीला आली. हरीनानांवर खटला भरल्यास त्यांच्यातर्फे मला वकील नेमण्याचें ठरल्यानंतर खटल्यांतील मुख्य मुद्द्यांसंबंधाने मीं त्यांचेकडून माहिती घेतली होती, व तिचें टिपण करून ठेवलें होतें. मला अटक करण्यापूर्वी माझ्या घराची झडती घेण्यांत आली होती त्या वेळीं हा टिपणाचा कागद सापडला. तो पोलीस वाचूं लागले. त्या वेळीं पक्षकाराने वकिलाला दिलेल्या माहितीचें हें टिपण असल्यामुळे मी तें वाचूं देणार नाही

अशी तक्रार केली. म्हणून तो कागद पोलिसांनी न वाचतां मोहरबंद करून ठेवला होता. तें टिपण वाचण्याला मीं हरकत घेतली म्हणून त्यांत कांही तरी आपल्याला अनुकूल मजकूर असावा असा पुरा संशय पोलिसांना आला होता. म्हणून माझ्या साक्षीच्या वेळीं तो मोहरबंद कागद पाहून त्याचा उपयोग करण्याची परवानगी पोलिसांनी मागितली. पक्षकार व वकील यांच्या दरम्यान झालेला व्यवहार म्हणून मला हरकत घेतां आली असती. पण ती माहिती फिर्यादीच्या सर्वस्वी विरुद्ध असल्यामुळे मीं हरकत घेतली नाही. मोहर फोडून तो कागद मोठ्याने वाचण्यांत आला. ज्या कागदाबद्दल पोलिसांनी इतका अट्टाहास केला तो त्यांच्या विरुद्ध आहे असें समजतांच पोलिसांखेरीज (जज्ज व ज्यूरीसहित) इतर सर्व लोकांत हशा पिकला. उलटतपासणी संपल्यानंतर मी बिनिंगसाहेबांच्या माऱ्यांतून सुरक्षितपणें जिवंतपणें आल्याबद्दल बिनिंगला ऐकूं जाईल अशा स्वरांत माझें अभिनंदन नॉर्टनसाहेबांनी केलें, व त्याची थोडी टर उडवली.

याप्रमाणे साक्षीपुराव्याचें काम झाल्यानंतर नॉर्टनचें पाच तासपर्यंत अस्खलित विनोद व कोट्यांनी भरलेलें आणि वक्तृत्वपूर्ण असें भाषण झालें. पूर्वी पुष्कळ बॅरिस्टर बेळगावला आले होते, पण या प्रकारचें भाषण कोणाला ऐकावयाला मिळालें असेल असें वाटत नाही. एका दिवसांत भाषण संपवून त्याच दिवशीं नॉर्टन गेले. दुसरे दिवशीं बिनिंगचें भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणांत आरोपींच्या वतीने मांडलेल्या बऱ्याच गोष्टी सरळपणाने मान्य केल्या. जज्जांनी आपल्या भाषणांत आम्हांला अनुकूल असे अभिप्राय बऱ्याच मुद्द्यांचें विवेचन करतेवेळीं दिले. ज्यूरीने एकमताने सर्व आरोपी निर्दोषी असें आपलें मत दिलें. जज्जांनी त्यांचें मत मान्य करून आरोपींना दोषमुक्त करून सोडून दिलें. माझा या खटल्याशीं वकील, आरोपी, आरोपीच्या बॅरिस्टरला माहिती देणारा व शेवटीं साक्षीदार म्हणून चार प्रकारचा संबंध आला. अशा प्रकारें या खटल्याचा निकाल लागला. आठदहा दिवसांत खटला संपण्यासारखा आहे, असें इनव्हॅरॅरिटीचें मत होतें; पण जवळजवळ एक महिना हा खटला चालला होता. साठसत्तर हजार रुपयांवर खर्च आला. पुरावा खोटा असें ठरलें तरी याबद्दलची जबाबदारी सरकारवर कांहीच नाही! हा हिंदुस्थानांतील न्यायपद्धतीचा एक नमुना आहे.

या निकालावर पोलिसांनी हायकोर्टांत अपील करण्याची खटपट केली; पण सरकारच्या लीगल रिमेंब्रंसरनें मंजुरी दिली नाही.

या निकालानंतर कांही दिवसांनी हरीनानाचा मामा अमृत हा हजर झाला. त्याच्यावरील खटला सेशन कमिट होऊन मि. मॉंटगोमेरी यांच्यापुढे आला. (हे मॉंटगोमेरी लो. टिळकांच्या विरुद्ध चिरोल यांना सरकारतर्फे मदत करीत होते.) त्यांनी सरकारी वकिलांना आरोप काढून घेण्याचा सल्ला दिला. तो त्यांनी मान्य केला व अमृत हाही सुटला.

## लोकमान्यांची भेट व आशीर्वाद

याप्रमाणे या प्रकरणाचा अखेर निकाल झाल्यानंतर मी लोकमान्यांना पुण्यास भेटलों. त्यांनी माझें मोठ्या प्रेमाने अभिनंदन केलें. आपण निजत असत त्या माडीवर मला घेऊन गेले व सर्व हकीकत विचारली. मीं त्यांना कोल्हापूरची सर्व हकीकत कळवली, व हा हल्ला परतवण्याकरिता काय काय करावें लागलें याबद्दलची माहिती दिली. खुनाच्या खटल्यासंबंधानेही काय प्रयत्न करावे लागले तेही सांगितले. तें शांतपणाने ऐकून घेऊन "पुढे काय करणार" असा त्यांनी मला प्रश्न केला. "आपण नव्हतां तोपर्यंत कांही तरी धडपड करीत होतों; आता आपण आलां आहांत, आपण सांगाल तें करीत राहावयाचें हें ठरलेंच आहे" असें मीं उत्तर दिलें. माझ्या पाठीवरून त्यांनी हात फिरवला व हसले. गोविंदरावांची आठवण ठेवून त्यांना बरोबर कां आणलें नाही असें त्यांनी विचारलें. गोविंदरावांची व त्यांची ओळख फारशी नव्हती तरी ते एक कर्तबगार गृहस्थ आहेत असें त्यांना वाटलें होतें म्हणून त्यांच्यासंबंधाने त्यांनी विचारपूस केली. पाच चार दिवस पुण्यास राहून मी परत बेळगावला गेलों. या मुक्कामांत लोकमान्यांबरोबर बरेच वेळां बोलण्याचे प्रसंग आले. त्याचप्रमाणे कृष्णाजीपंत खाडीलकर व वासूकाका जोशी यांच्याशीं जास्ती संबंध आला.

## जाफर इमामचा खून

बेळगावला आल्यानंतर कांही दिवसांनी एक विचित्र प्रसंग घडला. आमच्या गावांत व आजूबाजूला बेरड लोकांची वस्ती आहे. त्यापैकी शिव्या बेरड व त्याचे साथीदार चोऱ्या-दरोडे वगैरे करीत होते व ते फरारीही होते, असें वर सांगितलें आहे. त्यांनी व इतर बेरडांनी केलेल्या गुन्ह्यांचा तपास लावण्याकरिता व बेरड लोकांवर दहशत बसवण्याकरिता स्पेशल पोलीस पार्टी व स्पेशल मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आले होते, व त्यांचा तळ गुंजनाळ येथे पडला होता. हा गाव आमच्या गावापासून अजमासें दीड मैल अंतरावर आहे व सुळधाळ स्टेशनपासून अर्धा मैल आहे. आमच्यावरील खुनाच्या खटल्यांत या पोलीस पार्टीचे मुख्य अधिकारी इन्स्पेक्टर जाफर इमाम हे बरेच गुंतल्यामुळे बेरडांच्या चौकशीचें काम रेंगाळत चाललें होतें. पण आमच्या खटल्यांतून मोकळे झाल्याबरोबर पुन्हा त्या कामाला जोरांत सुरुवात झाली. फरारी बेरडांचा तपास बरेच दिवस लागला नव्हता; त्यामुळे वरिष्ठांकडून वारंवार त्यांना तंबी मिळाली होती. म्हणून त्यांच्या तपासासाठी त्यांच्या घरच्या बायकांना व आप्तइष्टांना पकडून त्यांच्यावर नानाप्रकारचे जुलूम करण्यांत येत असत, अशा बातम्या पसरल्या होत्या. त्यांत कांही अतिशयोक्तीचा भाग असला, तरी बेरड लोकांना त्या वेळीं बराच जुलूम सोसावा लागला यांत कांही संशय नाही. विशेषतः बायकांचा छळ विशेष होत होता, असा बोभाटा झाला होता. त्यामुळे जाफर इमाम इन्स्पेक्टर त्या लोकांत अत्यंत अप्रिय

झाला होता; आणि तोही आपल्या जीवाला फार जपत असे. तो बाहेर निघाला म्हणजे त्यांच्या संरक्षणार्थ पंधरावीस शिपाई असत व आत्मरक्षणाकरिता रिव्हॉल्व्हर वगैरे तो आपल्याजवळ बाळगीत असे.

एक दिवस तो बेळगावहून सायंकाळच्या गाडीने सुळधाळ स्टेशनवर आला, आणि तेथून गुंजनाळला जाण्याला एक जवळची पायवाट होती, त्या वाटेने एकामागून एक असे ते सर्व जात होते. पायवाटेच्या दोन्ही बाजूंला जोंधळ्याचें पीक होतें. धाटें बरींच उंच होतीं. स्टेशनापासून पाव एक मैल गेल्याबरोबर जाफर इमाम इन्स्पेक्टरवर एकदम गोळीबार करण्यांत आला. त्याच्या छातींत गोळी गेली आणि तो जमिनीवर पडला. हा अत्याचार करणारा जोंधळ्याच्या पिकांत छपून पाळतीवर राहिला होता. पुढे सातआठ शिपाई व मागे पांचसहा शिपाई व मध्ये आपण अशा बंदोबस्ताने इन्स्पेक्टर चालला होता. आकस्मिक रीतीने मुख्य अधिकाऱ्यावरच गोळीबार झाल्याने इतरांना हा बेरडांचा हल्ला आहे असें वाटलें आणि जाफर इमामला तसाच टाकून इतर लोक आपल्या बचावाकरिता वाट सापडेल तिकडे पळत सुटले. नंतर बऱ्याच वेळाने इन्स्पेक्टरचें प्रेत गावांत नेण्यांत आलें. शिव्या बेरड व त्याचा एक साथीदार असे दोघे आले होते व त्यापैकी शिव्याने गोळी घातली असें म्हणतात. त्यांच्या जवळ आणखी भरलेले बार होते. म्हणून शिव्याच्या साथीदाराने त्या गोळ्यांचाही उपयोग इतरांवर करण्याची सूचना केली; पण "वाघाची शिकार केली व ती साधली. आता कोल्ह्याकुत्र्यांना कोण विचारतो?" असें शिव्याने उत्तर दिलें व दोघेही निसटून गेले अशी अफवा पसरली होती. शिव्या पोलिसांचे हातीं जिवंत लागलाच नाही. पुढे बऱ्याच दिवसांनंतर तो आपल्या एका रखेलीच्या घरांत निजला असतां रात्रींच्या वेळीं त्या घरावर छापा घालून त्याच्यावर गोळी घालण्यांत आली व त्यांत तो मेला.

जाफर इमामचा खून झाला ही बातमी मला बेळगावास समजली. काळकुंद्रीकराच्या खुनाच्या खटल्यामुळे गुंजनाळच्या पोलीस पार्टीचा माझ्यावर राग होताच. त्या खटल्याचें काम संपल्यानंतर थोड्याच दिवसांनी हा खून करण्यांत आला आणि तोही आमच्या गावाजवळ! या सर्व योगायोगाने माझ्यावर पुन्हा एकदा प्रसंग येतो की काय असें वाटलें. माझ्या कांही स्नेह्यांना काळजीही वाटू लागली. कांही बेरड पोलिसांच्या ताब्यांत असून त्यांना अनुकूलही होते. त्यांच्या मार्फत एकाददुसरा कबुलीजबाब करवून त्याच्या पुष्टीकरिता दोनचार साक्षी करवणें ही गोष्ट पोलिसांना अशक्य नव्हती. माझ्या माहितीप्रमाणे जाफर इमामच्या हाताखालच्या फौजदाराने व इतर अंमलदारांनी तशा प्रकारच्या प्रयत्नाला सुरुवातही केली. एका कामांत चांगली ठोकर बसली होती त्याच-प्रमाणे दुसऱ्यांत होऊं नये असें वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटल्यामुळे या खुनाची चौकशी करण्याचें काम क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन खात्याकडे देण्यांत आलें व त्यांच्या तपासणींत माझ्यावर येऊं घातलेलें हें संकट टळलें.

या खुनामुळे असो किंवा इतर कोणत्याही दुसऱ्या कारणामुळे असो, त्यानंतर लवकरच

गुंजनाळची पोलीस-पार्टी उठवण्यांत आली, आणि हें 'बेरडसत्र' आटोपतें घेण्यांत आलें. तेव्हापासून आतापर्यंत बेरड लोकांचा उपद्रव समूळ जरी बंद झाला नाही, तरी अद्यापि त्या प्रकारें स्पेशल पोलीस पार्टी नेमून त्यांचा बंदोबस्त करण्याची तरतूद झाली नाही हें खरें.

## ऑपरेशन होऊन पत्नीचा मृत्यु

माझ्या पोटीं पुत्रसंतान नव्हतें. फक्त दोन मुलीच होत्या. ही गोष्ट आमच्या घरांतील (आजीबाई, आई, बहीण वगैरे) मंडळींना सलत होती. वडिलांच्या मनांत ही गोष्ट येत असे किंवा नाही हें सांगवत नाही. या बाबतींत माझ्याजवळ अगर दुसऱ्याजवळ कधीही त्यांनी एक शब्दही काढला नव्हता. पण आमच्या आजीबाई मात्र फार काळजींत असत, व माझें दुसरें लग्न करावें अशा प्रकारची सूचना माझ्या इष्टमित्रांजवळ त्या करीत असत. पण माझ्याजवळ या बाबतींत त्या कधी बोलल्या नाहीत. आई, बहीणही उघड बोलत नसत. पण स्वतः माझ्या बायकोला मुलगा नसल्यामुळे जें दुःख होत होतें त्याची कल्पना मला चांगली आहे. पांचसहा वर्षें तिला तोच ध्यास लागला होता. जुन्या चालीप्रमाणे व्रतें, आराधना, नवस, वगैरे करणें हें तर सारखें चालूच होतें. माझ्याशिवाय कांही व्रतें करण्यासारखीं नव्हतीं; अशा प्रकारचीं व्रतें दोघांनी मिळून करावीं म्हणून तिचा सारखा आग्रह असे. पण मीं कधीही संमती दिली नाही. त्यामुळे तिची बरीच निराशा होई. आपल्यामुळे मला मुलगा होत नाही असें तिला वाटून ती अगदी खिन्न असे. आपण अशिक्षित असून जुन्या पद्धतीने चालणारी असल्यामुळे माझ्या मनाप्रमाणे मला कौटुंबिक सुख नव्हतें याची जाणीव तिला होती. म्हणून तिच्या दुःखांत जास्ती भर पडली होती. याचा परिणाम तिच्यावर असा झाला की, तिने आपण होऊन मीं दुसरें लग्न करावें असें मला सुचविलें. वैतागाने ती असें करीत असेल असें मला प्रथमप्रथम वाटलें. तिची अनेक प्रकारें मीं समजूत करण्याचा प्रयत्न केला. पण तिचा निर्धार वाढतच चालला. वैतागून नव्हे तर मनापासून मीं दुसरें लग्न करावें असें तिला वाटत होतें यांत शंका नाही. मला सुखांत नांदतांना पाहण्याची तिची उत्कट इच्छा होती. खरोखरच मुलाकरिता किंवा स्वतः-करिता मीं दुसरें लग्न केलें असतें, तर ती आनंदाने राहिली असती असें मला वाटतें. पण या बाबतींत माझा निश्चय पक्का आहे असें समजल्यानंतर तिने हा नाद सोडला. आपल्यापासून व्हावें तितकें कौटुंबिक सुख मला होत नसलें तरी जें होतें तें आपल्या-वरच अवलंबून आहे असें तिला वाटूं लागलें व ती माझ्याबरोबर जास्ती मोकळेपणाने वागूं लागली. प्रपंचाच्या व्यवस्थेच्या बाबतींत तिच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा कमीपणा नव्हता; आणि एवढ्याच दृष्टीने पाहिलें तर आमचा संबंध सुखाचाच होता असें मानलें पाहिजे. पण विवाहविषयक माझ्या कल्पना निराळ्या असल्यामुळे व त्यांचा संस्कार त्या वेळीं जुन्या घराण्यांत नसल्यामुळे आमच्यामध्ये एक प्रकारचा विसंगतपणा आला होता.

त्यांत तिचा दोष कांही नव्हता हें मलाही पटूं लागलें व तिच्याबद्दल दयामूलक आपलेपणा जास्ती वाटूं लागला. अशा प्रकारें तिच्या आयुष्यांतील शेवटचीं वर्षें पहिल्यापेक्षा जास्ती सुखाची गेलीं. तरी आपल्याला मुलगा होत नाही ही गोष्ट तिच्या मनांतून गेलीच नाही. आपल्या प्रकृतीस कांही बिघाड झाला असावा असें तिला वाटूं लागलें; आणि ती दिवसेंदिवस अशक्त होत चालली होती हेंही खरें होतें. तेव्हा कांही औषधोपचार करून पाहावा असें तिच्या मनांत आलें. आमचे नेहमीचे डॉक्टर शिरगाव-कर यांचा तिने विचार घेतला. त्यांनी कोल्हापुरास डॉ. कृष्णाबाई केळोकर यांच्याकडून परीक्षा करून घेण्यास सांगितलें. मला कोल्हापूरला जाणें धोक्याचें होतें, म्हणून बरोबर आपल्या भावाला घेऊन ती गेली. डॉ. कृष्णाबाईंना प्रकृती दाखवली. त्यांच्या सल्ल्याने असो किंवा आपल्या स्वतःच्याच मनाने असो, कोल्हापूरहून मिरजेला जाऊन डॉ. वॉनलेसच्या दवाखान्यांत डॉ. व्हेल म्हणून प्रसिद्ध डॉक्टर होते त्यांना प्रकृती दाखवली. त्यांनी ऑपरेशन करणें जरूर आहे असें मत दिलें, व ती ऑपरेशन करून घेण्याला तयार झाली. तिने अगर तिच्या भावाने मला कळवलें नाही. ऑपरेशनची जरुरी आहे असें मला कळतें तर मी तिला मुंबईस घेऊन गेलों असतों. कारण मिरजेंत ऑपरेशननंतर रोग्याची जितकी काळजी घ्यावी तितकी घेतली जात नाही, असें मीं ऐकलें होतें. पण मला न कळवितांच ऑपरेशन करण्यांत आलें व नंतर दोनतीन दिवसांतच ती दवाखान्यांत मृत्यू पावली. माझ्या मेहुण्याच्या तारेवरून ही बातमी मला कळली. त्या वेळीं मला अत्यंत दुःख झालें. तेव्हापासून तिची योग्यता मला कळूं लागली व तिच्याकडे दोष नसतां माझ्या हातून तिला वागवण्यांत ज्या चुका घडल्या त्यांची आठवण होऊन पश्चात्ताप होतो.

प्रकरण तेरावें

# लोकमान्यांचें 'पुनश्च हरिः ॐ'

*लोकमान्य पुन्हा घडी बसवूं लागले*

लो. टिळक सुटून आल्यापासून त्यांच्या मरणापर्यंत त्यांच्याच धोरणाने मी सार्वजनिक कामांत वागत गेलों. त्यांना शिक्षा झाल्यापासून ते परत येईपर्यंत सर्व राष्ट्रांत एक प्रकारचें शैथिल्य आलें होतें. सरकारच्या दडपशाहीमुळे कांही अत्याचारी लोकांखेरीज सर्वत्र उदासीनता होती. लोकमान्यांनी पंचवीस-तीस वर्षें सतत परिश्रम करून महाराष्ट्रांत जी घडी बसवली होती ती बरीच विस्कळीत झाली होती. त्यांच्या गैरहजेरींत काय करावें हें बहुतेकांना समजत नव्हतें, आणि कोणाला समजत असलें तरी तें अंमलांत आणण्याची धडाडी कोणामध्ये नव्हती. माझ्यासारख्यांच्या अनुभवापेक्षा जास्ती ज्यांचा अनुभव व ज्यांनी लोकमान्यांबरोबर बरींच वर्षें कामें केलीं होतीं त्यांची ही स्थिती, मग इतरांची काय झाली असेल, हें सहज समजण्यासारखें आहे. लोकमान्य परत आल्यानंतर त्यांना हा सर्व देखावा पाहून वाईटच वाटलें असेल. तथापि त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते निराशेने खचून जाणारे नव्हते. म्हणून ते आपली विस्कटलेली घडी पुन्हा पूर्ववत बसवण्याच्या प्रयत्नाला लागले.

ते मंडालेहून आल्यानंतर त्यांच्या बाबतींत सरकारने एक जाहीरनामा काढून टिळक हे सरकारचे शत्रू आहेत, म्हणून त्यांच्याशीं कोणींही राजनिष्ठांनी संबंध ठेवूं नये, असें प्रसिद्ध केलें आणि त्यांच्या वाड्याजवळ पाहारा बसवून त्यांना भेटण्याला कोणकोण जातात त्यांची नोंद ठेवण्यांत येऊं लागली. बेळगावहून बेळवी भेटीला गेले होते. याबद्दलचा रिपोर्ट डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे गेला, तेव्हा त्यांनी बेळवींना बोलावून त्या बाबतींत विचारपूस केली. बेळवींनी त्यांना सणसणीत उत्तर दिलें, ही गोष्ट निराळी. पण सरकारची नजर कशी होती हें यावरून दिसतें. अशा परिस्थितींत कामाचा जम कसा बसवावा याबद्दल लोकमान्यांना कोडें पडलें असल्यास आश्चर्य नाही.

त्या वेळीं महायुद्धाला प्रारंभ झाला होता. त्यामुळे सरकारची दृष्टी अधिकच साशंक झाली होती. या आपल्याला प्रतिकूल परिस्थितीचा फायदा घेऊन चळवळे लोक देशांत कांही तरी धांदल उत्पन्न करतील की काय, अशी शंका सरकारला वाटली असेल. "Tenets of New Party" म्हणून टिळकांचें जें भाषण झालें होतें त्यांत व इतरत्र त्यांनी जीं मतें प्रदर्शित केलीं होतीं ती अडवणुकीच्या मार्गाचीं (Passive Resistance) होतीं. महायुद्धामुळे इंग्लंड जेरीला आलें होतें. हिंदुस्थानच्या मनुष्यबळावर अवलंबून राहण्यासारखा तो प्रसंग होता. महायुद्धाच्या आरंभींच्या काळांत हिंदुस्थानांतील मनुष्यबळाची वेळेवर मदत मिळाली नसती तर परिणाम विपरीत झाला असता, असें पुष्कळांचें मत आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व लष्कर त्या वेळीं लढाईवर नेण्यांत आलें होतें. हिंदुस्थानांत त्या वेळीं पंचवीस हजारापेक्षा जास्ती लष्कर नव्हतें व तेंही मोडकेंतुटकेंच होतें. लष्करी सामुग्रीही यथातथाच होती. अशा वेळीं हिंदुस्थानांत कांही गडबड झाल्यास इंग्लंडला मोठा पेच पडला असता अशी स्थिती होती.

या स्थितीचा फायदा लोकमान्य घेतील असा पुष्कळांचा अंदाज होता आणि त्या लोकांत मीही होतों. देशाची स्थिती माहीत नसल्यामुळे असें माझ्याप्रमाणे पुष्कळांना वाटत होतें. लोकमान्य हे जशास तसें या तत्त्वाचे पुरस्कर्ते असल्यामुळे इंग्लंडच्या अडचणीच्या प्रसंगीं कांही तरी काढतील अशी लोकांची अपेक्षा होती. पण त्यांनी अशा प्रकारच्या अपेक्षांना निराधार ठरवण्यासारखें सरकारासंबंधीं आपलीं मतें, आपलें राजकीय धोरण व महायुद्धासारख्या प्रसंगीं आपलें कर्तव्य, वगैरे प्रदर्शित करणारें एक जाहीर पत्रक छापून प्रसिद्ध केलें. साम्राज्यांतील इतर स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या घटकांप्रमाणे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवणें हें ध्येय असून तें सनदशीर व शांततेच्या मार्गानें मिळवावयाचें आहे, व महायुद्धांत सरकारला मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे, वगैरे मजकूर त्या पत्रकांत होता. हें पत्रक काढून आज अठरा वर्षें होऊन गेलीं व या अवधींत अनेक घडामोडी झाल्या. तरी हिंदुस्थानच्या ध्येयाबाबत व तें साध्य करून घेण्याच्या मार्गाबाबत फारसा मतभेद आहे असें नाही. तथापि त्या जाहीर पत्रकांतील कांही विधानें लोकमान्यांनी करावयाला नको होतीं, असें मला त्या वेळीं वाटलें. मला तसें वाटणें योग्य होतें किंवा त्याला फार महत्त्व होतें म्हणून मी या गोष्टीचा उल्लेख करीत नाही. तर माझ्या आठवणींतील गोष्टी लिहीत असल्यामुळे या महत्त्वाच्या प्रसंगीं मला काय वाटत होतें हें लिहून ठेवावें असें वाटतें, म्हणूनच या गोष्टीचा उल्लेख येथे केला आहे.

### *काँग्रेसला कार्यक्षम करण्याचा हेतू*

१९०६ सालीं कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये स्वराज्याच्या कल्पनेचा उदय झाला होता. सुरतेच्या बखेड्यानंतर काँग्रेस नेमस्तांच्या हातीं गेली होती. या अवधींत स्वराज्यासंबंधानें कोणताही कार्यक्रम काँग्रेसनें आखला

नव्हता. १९०६ पूर्वी काँग्रेसचें काम ज्या धोरणानें चालत असे तें धोरण नेमस्तांनी कायम ठेवलें होतें. काँग्रेसला कार्यक्षम करण्याचा प्रयत्न त्यांचेकडून होत नव्हता. म्हणून काँग्रेसमध्ये सामील होऊन स्वराज्याचें (Home Rule चें) काम नेटानें चालवावें, असा टिळकांचा विचार ठरला होता. पण काँग्रेसमध्ये जाण्याला नेमस्तांनी बऱ्याच अटी घातल्या होत्या. टिळकांसारख्या तेजस्वी माणसाला काँग्रेसमध्ये प्रवेश मिळूं नये याच उद्देशानें या अटी रचण्यांत आल्या होत्या. त्यामध्ये कांही फेरफार करून काँग्रेसमध्ये जाण्याला राष्ट्रीय पक्षांतील लोकांना वाव मिळावा म्हणून टिळकांनी प्रयत्न चालवला होता. त्यांच्या प्रयत्नाला बिझंटबाईचीही मदत होती. पण गोखले व इतर कांही नेमस्तांना टिळक जर काँग्रेसमध्ये आले तर ती आपल्या हातांतून त्यांच्या हातीं जाईल अशी भीती वाटून त्यांनी टिळकांच्या प्रयत्नांत अडथळे उत्पन्न केले. या बाबतींत गोखले व टिळक यांच्यामध्ये झालेला वाद बराच कटु होता.

## पुण्यांत भरलेली परिषद्

हिंदुस्थानांत लोकमत स्वराज्याला अनुकूल आहे किंवा नाही हें पाहण्याकरिता टिळकांनी तात्यासाहेब केळकरांना निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांना भेटून त्यांचीं मतें अजमावण्याकरिता पाठवलें होतें, असें मला आठवतें. लोकमत बरेंच अनुकूल आहे असें दिसून आल्यानंतर यासंबंधानें काँग्रेसमध्ये प्रवेश मिळेपर्यंत स्वस्थ न बसतां आपल्या पक्षातर्फे कांही तरी उद्योगाला प्रारंभ करावा असें टिळकांना वाटलें आणि त्यांनी १९१५ सालीं प्रांतिक परिषद् भरवण्याचें ठरवलें. टिळक सुटून आल्यानंतर ही पहिलीच प्रांतिक परिषद् असल्यानें तिला विशेष महत्त्व होतें. म्हणून ही परिषद् आपल्या खात्रीच्या जागीं भरवावी असें त्यांना वाटून त्यांनी मला पुण्यास बोलावलें व बेळगावांत कॉन्फरन्स भरवणें शक्य आहे किंवा नाही असें विचारलें. बेळगावास शक्य नसल्यास ती पुण्यासच भरवावयाची असें त्यांचें ठरलें होतें. बेळगावास भरवणें कांही कठीण नव्हतें व त्याप्रमाणे ठरून आम्हीही उद्योगाला लागलों होतों. पण बेळगावास त्याच वेळीं प्लेग सुरू झाल्यानें हा बेत सोडावा लागला, व पुण्यास परिषद् भरण्याचें ठरलें. यासंबंधानें बेळगावाबद्दल लोकमान्यांना इतका आपलेपणा वाटतो ही गोष्ट मला कळून आली व एक प्रकारचें समाधान वाटलें.

१९१५ सालीं मे महिन्यांत पुण्यास किर्लोस्कर थिएटरांत ही परिषद् बॅ. बॅप्टिस्टा यांच्या अध्यक्षतेखाली भरली. अध्यक्षांनी आपल्या भाषणांत होमरूल लीगची कल्पना मांडली व तिला मूर्तस्वरूप देण्याकरिता म्हणून एक ठरावही पास झाला. पण प्रत्यक्ष संघ स्थापन करण्याचें काम त्या वेळीं झालें नाही. या परिषदेपूर्वी तीन चार महिने गोखले निवर्तले होते. परिषदेंत त्यांच्या मृत्यूबद्दलचा दुखवट्याचा ठराव टिळकांनी मांडला होता. त्यांच्या भाषणावरून गोखल्यांच्या व त्यांच्या दरम्यान अनेक वाद होते, तरी गोखल्यांबद्दल त्यांची पूज्यबुद्धी किती होती हेंही दिसून आलें.

त्या वेळीं काँग्रेसमध्ये काय किंवा कॉन्फरन्समध्ये काय पहिला ठराव हा राजनिष्ठाप्रदर्शक असावयाचा, ही पद्धत पडून गेली होती. या ठरावावर भाषणें वगैरे न करतां अध्यक्षांनीच तो मांडावयाचा व सर्वांनी उठून उभे राहून तो मंजूर करावयाचा अशी पद्धत होती. त्याप्रमाणे विषयनियामक कमिटींत हा मामुली ठराव वाचून दाखविण्यांत आला. त्याला मीं हरकत घेतली. लोकांनी राजनिष्ठ नसावें असें माझें मत होतें म्हणून मीं हरकत घेतली असें नाही. तर वेळींअवेळीं या भावनेचें प्रदर्शन करण्यांत विशेष अर्थ आहे असें मला वाटलें नाहीं, म्हणून ही चाल बंद पाडावी असें मला वाटत होतें व तसें मीं बोलूनही दाखवलें. त्यामुळे आमच्या वेळगावचे पुढारी बेळवी हे रागावले; आणि हा ठराव परिषदेपुढे रीतीप्रमाणे आलाच पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. ठराव मताकरिता मांडला असता तर माझें म्हणणें मान्य होऊन ठराव गाळला गेला असता. पण या परिषदेंत टिळकांना कोणत्याही प्रकारचा बखेडा नको होता. ही गोष्ट त्यांनी मला एकीकडे बोलावून सांगितली. त्यामुळे मीं माझें म्हणणें धसाला लावलें नाही. पुढील सालची कॉन्फरन्स कोठे भरवावी याबद्दल खासगी चर्चा करीत असतां विजापूरच्या कांही मंडळींनी ती विजापुरास भरवावी असें सुचविलें. पण टिळकांनी ती वेळगावास भरविणें जरूर आहे असें आपलें मत दिल्यावरून त्याप्रमाणे ठरलें. स्वराज्य संघाची स्थापना करणें व काँग्रेसला मिळणें या दोन गोष्टींचा विचार १९१६ सालच्या कॉन्फरन्समध्ये व्हावयाचा होता. म्हणून अशी महत्त्वाची कॉन्फरन्स आपल्याला पूर्णपणें अनुकूल अशा ठिकाणींच व्हावी, अशी टिळकांची इच्छा होती. तीच मान्य झाली. वेळवींनी वेळगावकरांतर्फे आमंत्रण दिलें, मीं दुजोरा दिला व आमचें आमंत्रण स्वीकारलें गेलें.

१९१५, १९१६ या दोन सालांत स्वराज्य संघाची स्थापना व काँग्रेसप्रवेश हे प्रश्न हिंदुस्थानांत प्रामुख्याने पुढे आले होते. टिळक व बिझंटबाई यांच्यासारख्या कर्तृत्ववान व चिकाटीच्या पुढाऱ्यांनी हे प्रश्न हातीं घेतले असल्यामुळे त्यांना अनुकूल अशाच तऱ्हेने यांचा निकाल लागेल असें देशांत वाटत होतें. टिळक हे काँग्रेसमध्ये नव्हतेच, पण बिझंटबाई होत्या. त्यांनी १९१५ च्या काँग्रेसमध्ये स्वराज्याचा प्रश्न काँग्रेसने हातीं घेऊन खटपट करावी असा प्रयत्न केला. पण काँग्रेसच्या त्या वेळच्या सत्ताधारी नेमस्तांना हें पटलें नाही. म्हणून काँग्रेसची वाट न पाहतां बाईंनी आपला स्वराज्य संघ काढला. देशांतील प्रत्येक प्रांताच्या प्रमुख ठिकाणीं त्याच्या शाखा स्थापिल्या गेल्या. मुंबईस जीना, शंकरलाल बँकर, जमनादास द्वारकादास, उमर सोभानी वगैरे पुष्कळ मंडळी त्या शाखेचे सभासद झाले. बाई या थिऑसॉफिस्ट लोकांच्या प्रमुख असल्याने त्या पंथांतील बरेच लोक त्यांच्या संघाचे सभासद झाले. तरी कामाच्या सोयीच्या दृष्टीने आपला राष्ट्रीय पक्षाचा एक निराळा स्वराज्य संघ असावा असें टिळकांना वाटत होतें. बाईंच्या संघाला प्रतिस्पर्धी म्हणून टिळकांना निराळा संघ काढावयाचा नव्हता. त्यांची दृष्टी कामाच्या सोयीकडेच होती. त्या बाबतींत बाईंचें व त्यांचें एकमत होतें. पुण्यासारख्या शहरींदेखील

बाईंच्या स्वराज्य संघाची शाखा स्थापन झाली होती. टिळकांचे कांही अनुयायी त्या शाखेचे सभासद झाले होते. यावरून त्यांच्यामध्ये स्पर्धा नव्हती हें स्पष्ट होतें.

### *बेळगावची प्रांतिक परिषद्*

१९१६ सालच्या जानेवारी महिन्यापासून आम्हीं कॉन्फरन्सच्या कामाला सुरवात केली. बेळवींना स्वागतसमितीचे अध्यक्ष व मला चिटणीस निवडण्यांत आलें. परिषदेंत येणाऱ्या विषयांचें महत्त्व लक्षांत घेतां पुष्कळ मंडळी जमणार असा आमचा कयास होता. म्हणून ही परिषद मोठ्या व्यवस्थितपणें व थाटांत व्हावी अशी माझी इच्छा होती. म्हणून स्वागतमंडळाचे सभासद व फंड मिळवण्याकरिता बेळगाव जिल्ह्यांत मला बरेंच फिरावें लागलें व बरींच व्याख्यानें द्यावीं लागलीं. बेळवीही मधूनमधून फुरसतीच्या वेळीं फिरतीवर जात असत. माझ्या भाषणांत मी स्वराज्यासंबंधाने (Home Rule) माहिती देऊन तें लवकर मिळवण्याकरिता संघाची स्थापना होणें जरूर आहे व ही गोष्ट बेळगावच्या परिषदेंत घडवून आणावयाची आहे असें प्रतिपादन करीत असें. त्यामुळे लोकांना बेळगावची परिषद मोठ्या महत्त्वाची वाटूं लागली व लोकांमध्ये सहानुभूती उत्पन्न होऊन चांगली मदतही मिळूं लागली.

वर्तमानपत्रांतून आम्हीं परिषदेसंबंधाने बरीच प्रसिद्धी केली. हें काम महादेवशास्त्री दिवेकर करीत होते. त्यांच्याकडून हें काम चांगल्या रीतीने झालें. त्यामुळे महाराष्ट्रांत व कर्नाटकांत परिषदेबद्दल उत्सुकता बरीच वाढली होती. टिळक सुटल्यानंतर पहिल्यांदाच आमच्या प्रांतांत येणार म्हणून त्यांचें स्वागत करण्याच्या इच्छेमुळे लोकांच्या उत्सुकतेंत जास्ती भर पडली होती. या परिषदेला योग्य अध्यक्ष मिळविणें हा एक महत्त्वाचा विषय होता. तें काम आम्हीं टिळकांकडेच सोपविलें होतें. विठ्ठलभाई पटेल यांनी अध्यक्षस्थान स्वीकारावें म्हणून त्यांनी खटपट केली. पण विठ्ठलभाईंना त्या वेळीं टिळकांचा किंवा जहालांचा संसर्ग नको होता यामुळें त्यांनी अध्यक्ष होण्याचें नाकारलें. शेवटीं दादासाहेब खापर्डे यांना अध्यक्ष होण्याबद्दल विचारावें असें ठरलें. दादासाहेबांचा व टिळकांचा अतिशय स्नेह होता. तथापि त्यांचा जहालपणा त्या वेळीं टिळकांच्यापेक्षा जास्ती तीव्र होता. टिळकांच्या मनांत नेमस्तांशीं जुळवून घेऊन कॉंग्रेसमध्ये सामील व्हावयाचें होतें; पण वऱ्हाड-नागपूरकडच्या मंडळींना तसें करणें मानहानिकारक वाटत होतें. त्या मंडळींत खापर्डे हे प्रमुख होते. आपल्या पक्षांत दुफळी होऊं नये असें टिळकांना वाटत असल्यामुळे खापर्डे यांनाच बेळगावच्या परिषदेचें अध्यक्षस्थान देऊन समेटाचा ठराव मंजूर करून घ्यावा असें त्यांना वाटत असावें. म्हणून त्यांनी खापर्डे यांना विनंती केली व त्यांनी ती मान्य केली.

बेळगाव परिषद मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यांत भरवावयाची ठरलें होतें. त्यापूर्वीं आपल्या पक्षांतील प्रमुख मंडळीबरोबर समेटाच्या बाबतींत खासगी चर्चा करून

त्यांचें मत या बाबतींत काय आहे हें अजमावून पाहावें म्हणून टिळकांनी कांही मंडळींना पुण्याला बोलाविलें होतें. मलाही आमंत्रण होतें. मीही गेलों होतों. जमलेल्या मंडळींत एकमत होईना. काथ्याकूट बराच चालला होता. आपल्या सर्व अटी मान्य केल्याखेरीज समेट करूं नये असें म्हणणाऱ्यांचें बहुमत होतें. स्वतः टिळकांनी चर्चेंत फारसा भाग घेतला नाही. कांही वेळ ते मंडळींबरोबर थोडा वादविवाद करीत व आपल्या बसण्याच्या माडीवर निघून जात. मला कंटाळा आला. परिषद बेळगावांत भरावयाची होती व तिची व्यवस्था करण्याची जोखीम माझ्यावर व माझ्या सहकारी मित्रांवर असल्याकारणाने कोणत्याही प्रकारचा बखेडा न होतां ती पार पडावी अशी माझी इच्छा होती. माझें स्वतःचें मत समेटाला अनुकूल नव्हतें. तथापि टिळकांच्याविरुद्ध जावयाचें नाही असें मी ठरवलें होतें. म्हणून ही चर्चा बाहेरच्या माडीवर चालली असतां मीं टिळकांकडे गेलों व त्यांना बाहेर चाललेल्या वादांत कांही अर्थ नाही, आपली इच्छा काय आहे, असें विचारलें. त्याच वेळीं त्यांना असेंही मीं कळविलें की, अशा नाजूक प्रसंगीं महत्त्वाच्या प्रश्नासंबंधाने जेव्हा मतभेद उत्पन्न होतो त्या वेळीं प्रत्येकाला आपलें मत सांगण्याचा हक्क असला, तरी अखेरीस टिळकांसारख्या पुढाऱ्याच्या मताला महत्त्व देऊन त्याप्रमाणे वागण्यांतच राष्ट्रहिताच्या दृष्टीने शहाणपणा आहे. सर्वांना हें तत्त्व पटत नाही, म्हणून चर्चा व्हावी हें बरें, असें म्हणून त्यांनी आपल्या मनांत समेट करण्याचें आहे, असें मला सांगितलें. बेळगाव जिल्ह्यांतील प्रतिनिधींचें मत त्यांच्या बाजूने पडेल अशी तजवीज मी करतों, असें सांगून मी त्याच दिवशीं पुण्याहून बेळगावला आलों. पुन्हा बेळगाव जिल्ह्यांत मुख्यमुख्य ठिकाणीं जाऊन व्याख्यानें दिलीं व समेटाला अनुकूल वातावरण उत्पन्न केलें. टिळकांच्याबद्दल आमच्या जिल्ह्यांत पुरी पूज्यबुद्धी असल्याने हें काम सहजच झालें.

आमच्या अपेक्षेबाहेर पैशाची मदत आम्हांला मिळाली. तथापि मंडपांत पैसा खर्च न करतां एखादा तंबू परिषदेकरिता खरेदी करावा म्हणजे चारपाच वर्षे तरी तो उपयोगी पडून इतर ठिकाणचा खर्चही वाचेल अशी कल्पना आली. त्याप्रमाणे देवल सर्कसचे व्यवस्थापक रामभाऊ पटवर्धन यांचेमार्फत एक भव्य तंबू तयार करविण्याचें आम्हीं ठरविलें. आमच्या कल्पनेप्रमाणे तंबू तयार झाला नाही. तथापि मांडव घालण्यास वेळ नव्हता म्हणून तंबूवरच काम भागवून घ्यावें लागलें. बेळगावची उन्हाळ्याची हवा थंड असते व पावसाचीही भीती असते; यामुळे तंबूंत कसें काय काम निभावतें अशी आम्हांला काळजी होती.

परिषदेला जवळजवळ बावीसशें प्रतिनिधी आले होते. याशिवाय हजारो प्रेक्षक होते. परिषदेच्या आदले दिवशींच टिळक, खापर्डे, बॅप्टिस्टा, मुंजे, शिवरामपंत परांजपे, खाडीलकर, केळकर, डॉ. साठे, डॉ. वेलणकर, दादासाहेब करंदीकर, वगैरे प्रमुख मंडळी आली होती. टिळक, खापर्डे यांची जंगी मिरवणूक काढण्यांत आली होती. सर्व शहर गजबजून गेलें होतें. तंबू आंबराईत दिला होता व मंडळीची उतरण्याची सोय गावांत

कँपमध्ये करण्यांत आली होती. आदले दिवशीं सायंकाळीं टिळक स्वतः तंबूंत बसण्याची व्यवस्था कशी काय आहे हें पाहण्याकरिता आले. तंबूंत आम्हीं खुर्च्या मांडल्या होत्या. पण प्रतिनिधी व प्रेक्षक यांची संख्या आमच्या अजमासाबाहेर गेल्याने कशी व्यवस्था करावी या विचारांत मी होतों. इतक्यांत टिळकांना ही हकीकत कळली. त्यांनी लगेच खुर्च्या जरुरीपुरत्या तेवढ्या ठेवून बाकीच्या जागीं बिछायत घालण्याबद्दल सूचना केली. त्याप्रमाणे ती आम्हीं रात्रीच्या रात्रीं अमलांत आणली. त्यामुळे जागेची अडचण बरीच दूर झाली. पाच रुपयांच्या प्रेक्षकांच्या तिकिटांचा भाव पन्नास रुपयांपर्यंत वाढला. पण जागेच्या अभावीं पुष्कळांची निराशा झाली! तथापि टिळकांचीं सार्वजनिक रीत्या व्याख्यानें करवण्याचें आश्वासन देऊन लोकांचें आम्हीं समाधान केलें. वस्तुतः पाहिलें तर बहुजनसमाजाला परिषदेपेक्षा टिळकांना डोळे भरून पाहावें व त्यांच्या तोंडचे शब्द ऐकावेत हीच इच्छा जास्ती महत्त्वाची होती. ती इच्छा तृप्त होण्याची संधी मिळणार होती म्हणून लोकांचें कसेंबसें समाधान झालें.

### *गांधीजींची परिषदेंत उपस्थिती*

या परिषदेच्या संबंधाने आणखी एक महत्त्वाचा योग जुळून आला. तो म्हणजे महात्मा गांधींचें आगमन व त्यांचा-माझा संबंध. 'राष्ट्रमत' बंद पडल्यानंतर काका कालेलकर माझ्याबरोबरच बेळगावला आले होते. बेळगावास गणेश विद्यालय या नावची एक खासगी शाळा कांही होतकरू मंडळींनी काढली होती. त्या शाळेंत माझ्या सांगण्यावरून कांही दिवस काकांनी काम केलें होतें. पुढे ती शाळा बंद झाली. तेव्हा काकांना मीं बडोद्यास केशवराव देशपांडे यांच्याकडे पाठविलें. केशवराव त्या वेळीं बडोदे संस्थानांत सुभेच्या हुद्द्यावर होते. त्यांनी गुजरातेंत नर्मदेच्या तीरीं 'गंगनाथ विद्यालय' या नावाची एक राष्ट्रीय शाळा चालवली होती. काकांची योजना त्यांनी त्या शाळेवर केली. पुढे बडोद्यास बरीच धांदल होऊन केशवरावांनी राजीनामा दिला, व 'गंगनाथ विद्यालय'ही बंद पडलें. त्यामुळे काकांनी काय करावें हा प्रश्न आला. काका कांही दिवस उत्तर हिंदुस्थानांत हिमालयाच्या यात्रेकरिता गेले होते. तेथून कांही दिवस रवींद्रनाथांच्या बोलपूर येथील शांतिनिकेतन या संस्थेंत होते. इतक्यांत महात्मा गांधी हे आफ्रिकेहून हिंदुस्थानांत परत आले होते. त्यांच्या तेथील कामगिरीसंबंधाने इकडे बरीच प्रसिद्धी झाली होती. ज्याप्रमाणे आफ्रिकेंत ते राहात असत, त्याच पद्धतीने कांही कार्यकर्त्यांना घेऊन इकडे राहावें असा त्यांच्या मनांत विचार येऊन त्यांनी आपल्याला राहण्याकरिता अहमदाबाद हें स्थान पसंत केलें होतें, व तेथे ते राहूंही लागले. केशवरावांची व गांधीजींची इंग्लंडमध्ये ओळख झाली होती. त्यांच्या तत्त्वाची व काम करण्याच्या पद्धतीची त्यांना माहिती होती. म्हणून काकांना गांधीजींजवळ ठेवण्याचें त्यांच्या व माझ्या विचारें ठरलें. त्याप्रमाणे काका अहमदाबादला राहण्याकरिता गेले. गांधीजींच्याबद्दल मला त्या वेळीं प्रत्यक्ष कांही

माहिती नव्हती. (त्यांना मीं एकदा कांग्रेसमध्ये पाहिल्याचें आठवतें. त्या वेळचा त्यांचा पोषाख इंग्रजी पद्धतीचा असून डोकीवर मात्र गुजराथी पद्धतीची पगडीवजा टोपी होती.) तथापि त्यांचें नाव व दक्षिण आफ्रिकेंतील त्यांची कामगिरी मला वर्तमानपत्रावरून माहीत झाली होती. काका त्यांच्याबरोबर राहण्याला गेल्यानंतर त्यांच्या द्वारा गांधीजींबद्दल मला माहिती मिळूं लागली. त्याचप्रमाणे माझ्यासंबंधाने गांधीजींनाही काकांनी कांही कांही माहिती करून दिली. माझ्या बाबतींत गांधीजींना माहिती देण्यासारखें कितीसें असणार ? तथापि माझें नाव त्यांना माहीत झालें होतें. येवढ्याच ओळखीवर बेळगावच्या परिषदेसंबंधाने त्यांना थोडक्यांत माहिती देऊन परिषदेला हजर राहण्याबद्दल मीं विनंती केली होती व काकांनाही पत्र लिहून माझें आमंत्रण ते स्वीकारतील अशी तजवीज करण्यास कळविलें होतें. गोखल्यांचा व गांधीजींचा राजकीय बाबतींत गुरुशिष्य-संबंध होता हें मला माहीत होतें. बेळगावची परिषद ही प्रांतीय म्हणून जरी म्हणवली जात होती व परिषदेला प्रतिनिधी होण्याला कोणत्याही मताच्या मनुष्याला हरकत नव्हती, तरी ती टिळकपक्षीय लोकांची म्हणजे एकतर्फी होती असेंच म्हणणें योग्य होईल. आणि याच कारणाकरिता विठ्ठलभाई पटेल यांनी अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें नाकारलें होतें. गोखल्यांच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीला म. गांधी हे मिळणार होते. त्या मंडळीपैकी गुरुबंधू या नात्याने बऱ्याच मंडळींचा त्यांच्याशीं संबंध जडला होता आणि ती मंडळी आमच्या परिषदेच्या व पक्षाच्या विरुद्ध होती. म्हणून गांधीजी आमचें आमंत्रण स्वीकारतील किंवा नाही याची मला खात्री नव्हती. पण माझ्या मनांतून मात्र त्यांनी परिषदेला यावें अशी उत्कट इच्छा होती. त्यांच्या मतांची मला त्या वेळीं फारशी माहिती नव्हती; व ती माहिती त्यांच्या येण्याने मला सहज होईल असें वाटलें होतें. पण त्यापेक्षाही त्यांच्या येण्याने परिषदेला जास्ती महत्त्व येईल व समेटाच्या कामाला त्यांचा उपयोग जास्ती होईल, असें मला वाटलें होतें. त्यांना आमंत्रण दिल्यानंतर कांही दिवसांनी तें स्वीकारल्याचें मला उत्तर आलें व काकांचेंही त्याचप्रमाणे पत्र आलें. मला अर्थात आनंद झाला. ते येणार म्हणून पुष्कळ प्रसिद्धी करण्यांत आली. त्यानंतर कांही दिवसांनी नेमस्तांपैकी कांही मंडळी, त्यांनी बेळगावच्या परिषदेला हजर राहूं नये म्हणून प्रयत्न करीत होती, अशी गोष्ट माझ्या कानावर आली. ही गोष्ट खरी की खोटी हें मला माहीत नाही. पण अशी बातमी त्या वेळीं उठली होती ही गोष्ट खरी आहे. म्हणून मीं पुन्हा गांधीजींना पत्र लिहून येण्याचें नक्की करावें अशी विनंती केली. त्यांचें मला उत्तर एका कार्डावर आलें व तें अगदी नमुनेदार होतें. कार्डांतील मजकूर हा होताः "Nothing but death can prevent me from going to Belgaum and attending conference." हें कार्ड वाचून माझा आनंद तर दुणावलाच. पण त्यांनी आमंत्रण एकदा स्वीकारल्यानंतर ते आपल्या स्नेह्यांपैकी कोणाच्या तरी तोंडून टिळकांबद्दल किंवा राष्ट्रीय पक्षाबद्दल कांही तरी गोष्टी ऐकून आपला बेत बदलतील अशी शंका येऊन त्यांच्या स्वभावाविषयीं

अज्ञान दाखवल्याबद्दल मला वाईट वाटलें. त्याच वेळीं हा मनुष्य विलक्षण असून याच्याशीं वागणें कठीण आहे, असें माझ्या मनानें घेतलें. तथापि त्यांच्याबद्दल पूज्यबुद्धीचें बीज मात्र माझ्यामध्ये या गोष्टीमुळे पेरलें गेलें. पुढे त्याचा परिणाम काय झाला हें माझ्या आयुष्यांतील पुढील गोष्टींवरून कळून येईलच.

गांधीजींच्यासंबंधाने त्या वेळीं बहुजनसमाजास विशेष माहिती नव्हती, त्यामुळे त्यांचें स्वागत टिळकांच्या स्वागताच्या मानानें कमी प्रतीचें झालें. येतांजातांचा प्रवास त्यांनी तिसऱ्या वर्गानेच केला. त्यांचेबरोबर त्यांचे चिरंजीव रामदास व काका हे होते. त्यांची राहण्याची व्यवस्था आम्हीं स्वतंत्रच केली होती. हिंदुस्थानच्या राजकारणाचें ते बारीक रीतीने त्या वेळीं निरीक्षण करीत होते. अद्यापि प्रामुख्याने भाग घेण्याला त्यांनी सुरवात केली नव्हती.

परिषदेंत मुख्य ठराव दोन होते. एक समेटाबद्दलचा व दुसरा स्वराज्याबद्दलचा. पहिल्या ठरावावर विषयनियामक कमिटींत बरीच चर्चा झाली. शेवटपर्यंत कांही लोक समेटाच्या विरुद्धच राहिले. टिळकांचें भाषण उत्तम प्रकारचें होऊन त्यांनी समेट कां केला पाहिजे हें चांगलें पटवून दिलें. ठराव पास झाला. डॉ. मुंजे यांनी केवळ टिळकांकरिता मान्यता दर्शविली होती.

गांधीजींचें कांही तरी भाषण व्हावें अशी लोकांची इच्छा होती. त्याप्रमाणे मीं त्यांना कळविलें व त्यांनी बोलण्याचें कबूल केलें. समेटासंबंधी त्यांनी आपल्या भाषणांत आपले विचार प्रदर्शित केले. नेमस्त व राष्ट्रीय यांच्यामध्ये समेट झाल्यास देशाचें हित आहे असें प्रामाणिकपणें वाटत असल्यास व समेटाची इच्छा मनापासून असल्यास समेट करावा, व तसें नसल्यास समेट न करतां प्रत्येक पक्षाने आपापल्या मताला अनुसरून काम करीत राहावें, त्यांतच देशाचें हित आहे, असें त्यांचें मत होतें. त्यांच्या भाषणांत कोणत्याही प्रकारचा आवेश नव्हता. लोकांनी भाषण शांतपणें ऐकलें; पण त्यांच्या भाषणाचा खरा आशय फार थोड्या लोकांना समजला असावा.

### *टिळकांची व गांधीजींची भेट*

टिळकांची व गांधीजींची भेट एकांतीं होऊन दोघांचें बोलणेंचालणें व्हावें अशी माझी इच्छा होती व त्याप्रमाणे मीं दोघांनाही माझ्या मनांतील विचार कळविला होता. दोघांनाही तो पटला. गांधी टिळकांकडे जावयाला तयार होते; पण टिळकांच्या बरोबर बंगल्यांत पुष्कळ मंडळींचा घोळका असे, म्हणून तेथे भेट झाल्यास मोकळ्या मनाने बोलणें होणार नाही असें मला वाटलें. हीच गोष्ट टिळकांच्याही मनांत आली असेल म्हणून त्यांनी आपण होऊनच गांधींकडे जाण्याचें ठरविलें व त्याप्रमाणे गांधींना विचारून वेळ वगैरे ठरवून घेतली. माझ्या मनांत टिळक व गांधी या दोघांचीच भेट व्हावी असें होतें. पण खापर्डे हे अध्यक्ष व टिळकांचे स्नेही यामुळे त्यांना बरोबर न घेणें हें शिष्टाचाराला धरून होणार नाही, असें टिळकांना

वाटलें असावें; म्हणून गांधीजींकडे जातांना दोघेही बरोबर निघाले. खापर्डे टिळकांचे स्नेही होते व वऱ्हाडनागपूरकडे राष्ट्रीय पक्षाचें पुढारीपण त्यांच्याकडे होतें ही गोष्ट जरी खरी होती तरी गांधीजींच्या मुलाखतींत ते टिळकांबरोबर नसते तर बरें झालें असतें, असें मला वाटलें. काय असेल तें असो, खापर्ड्यांचा विनोद व दुसऱ्यांची निंदा करण्याची सवय हीं मला पसंत नव्हतीं. आमच्या पक्षांतील बरीच मंडळी खापर्ड्यांच्या या गुणा(?)मुळे त्यांच्यावर खूष असत. पण माझ्या मनावर मात्र विपरीत परिणाम झाला व तो अद्यापि कायम आहे. असो. टिळक, खापर्डे व गांधीजी अजमास एक तास बोलत बसले होते. मी त्या वेळीं हजर नव्हतों. बाहेर पाहारा करण्याचें काम मीं स्वतः माझ्याकडे घेतलें होतें. बोलणें संपवून आम्ही परत बंगल्याकडे निघालों. त्या वेळीं गाडींत टिळक या भेटीसंबंधाने कांही बोलले नाहीत. पण खापर्ड्यांनी आपल्या नेहमीच्या स्वभावाला अनुसरून तिरस्कारयुक्त हास्यमुद्रेने "हा आमचा नव्हे" असें म्हटलें. या शब्दाचा अर्थ मला त्यावेळीं चांगला समजला नाही. तथापि गांधी हे 'जहाल' पक्षाचे नसून नेमस्त आहेत असा खापर्ड्यांच्या म्हणण्याचा अर्थ असावा असें मला वाटलें. टिळकांच्या मृत्यूनंतर खापर्डे यांचें खरें स्वरूप लोकांना चांगलें समजलें व त्यांनी गांधीजींसंबंधाने काढलेले उद्गार त्यांच्या दृष्टीने अगदी बरोबर होते. गांधी व खापर्डे यांना एका पंक्तींत बसवणारा हिंदुस्थानांत एक तरी मनुष्य असेल असें मला वाटत नाही. तेव्हां त्यांनी 'हा आमचा नव्हे' असें म्हटलें यांत मला आश्चर्य वाटत नाही. टिळकांच्या मृत्यूनंतर टिळकांच्या आठवणी अनेक लोकांकडून अत्यंत परिश्रमाने मिळवून सदाशिवराव बापटांनी दोन भाग प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या प्रेमाच्या अत्याग्रहाने मींही माझ्या कांही आठवणी दिल्या आहेत. त्यांत ही वरील आठवण दिली आहे. खापर्डे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. प्रस्तावना लिहितांना माझी वरील आठवण त्यांच्या पाहण्यांत आली व प्रस्तावनेंत "हा आमचा नव्हे" ह्या गांधीजीं-संबंधाने त्यांनी दिलेल्या सर्टिफिकेटाचा उल्लेख करून आपण वर्तवलेलें भविष्य कसें खरें झालें हें दाखवण्याचा प्रयत्न केला आहे! टिळकांच्याबद्दल लिहितांना किंवा बोलतांना गांधींवर तोंडसुख घेतल्याशिवाय कित्येक गांधीद्वेष्ट्यांना राहवतच नाही! जणू काय त्यांच्या मतें गांधींची निंदा केल्याशिवाय टिळकांमध्ये उत्कट असलेले गुण दिसलेच नसते! अत्यंत श्रमाने तयार केलेल्या शालजोडीला बापटांनी हें ठिगळ लावून कां घेतलें हें समजणें कठीणच आहे.

### ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद

या परिषदेच्या वेळीं बेळगावांत धुमसत असलेल्या एका वादाला तोंड फुटलें. तो वाद म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद. बेळगावास रुद्र गौडा अर्नाळ या नावाचे एक डेप्युटी कलेक्टर होते. ते जातीने लिंगायत होते. आपल्या जातीचा अभिमान त्यांना होताच. पण त्यापेक्षाही ब्राह्मण

जातीचा द्वेष त्यांच्यामध्ये विशेष होता. त्यांच्या पूर्वी त्याच जातीचे गुरसिद्दाप्पा गिलगंची म्हणून एक डेप्युटी कलेक्टर होऊन गेले होते. त्यांनाही आपल्या जातीचा अभिमान होता व त्यांनी आपल्या जातीच्या उन्नतीकरिता प्रयत्नही केले होते. पण त्यांच्यामध्ये ब्राह्मणद्वेष नव्हता. रुद्रगौडांमध्ये हा ब्राह्मणद्वेष विशेष असल्यामुळे त्यांच्या मनांत आपला एक पक्ष असावा अशी कल्पना आली. त्याप्रमाणे आपल्या अधिकाराचा उपयोग करून बेळगाव जिल्ह्यांत ब्राह्मण व लिंगायत या जातींमध्ये अनेक प्रकारचे वाद त्यांनी निर्माण केले होते; व लिंगायतांनी कोणत्याही राजकीय चळवळींत भाग न घेतां सरकारनिष्ठच राहावें, म्हणजे त्यांचें कल्याण होईल, अशी भावना त्यांनी उत्पन्न केली होती. कोल्हापुरास अशाच प्रकारचा प्रयत्न शाहू महाराजांच्या आश्रयाखाली मराठा जातीसंबंधाने चालला होता, आणि त्याचें क्षेत्र वाढत जाऊन सर्व ब्राह्मणेतर जातींनी ब्राह्मणांविरुद्ध व्हावें असें स्वरूप या प्रयत्नाला येत चाललें होतें. लठ्ठे यांनी कोल्हापुरास प्रोफेसर असतांना जाधव, डोंगरे वगैरे मंडळींबरोबर या चळवळींत पुढाकार घेतला होता. शाहू महाराजांच्या अवकृपेमुळे त्यांना जरी कोल्हापूर सोडून बेळगावला यावें लागलें, तरी येते वेळीं त्यांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचें बीं आणलें होतें. रुद्रगौडांनी तयार केलेली जमीन त्यांना अनुकूल वाटून तें बीं बेळगाव जिल्ह्यांत रुजविण्याचा तेही प्रयत्न करीत होते. अशा वेळीं राष्ट्रीय म्हणजे त्यांच्या दृष्टीने जहाल व सरकारविरुद्ध भांडणाऱ्या पक्षाशीं विरोध दाखवल्याने आपलें बस्तान बरें बसेल असें त्या मंडळींना वाटून ब्राह्मणेतर कोणत्याही जातींनी परिषदेला सामील होऊं नये म्हणून त्यांनी खटपट केली होती. त्यांच्या खटपटीला फारसें यश आलें नाही. तथापि या भांडणाचें बीजारोपण त्या वेळीं उघडकीला आलें.

### *ब्राह्मणेतरांचें गांधीजींना निमंत्रण*

गांधी हे ब्राह्मणेतर आहेत म्हणून आपलें म्हणणें त्यांच्यापुढे मांडून ब्राह्मणांबद्दल त्यांचें मन कलुषित करण्याचा घाट त्यांनी घातला व एका जागेंत ब्राह्मणेतरांची म्हणून एक सभा भरवून गांधींना आमंत्रण दिलें. आमंत्रण स्वीकारण्याच्या पूर्वी गांधींनी माझा सल्ला विचारला होता. त्या सभेला जाण्यास हरकत नाही असें माझें मत मीं दिलें होतें. कोणाच्या तरी कांही तरी सांगण्यावरून एकतर्फी मत कोणाच्याही विरुद्ध करून घेण्याइतपत हलक्या कानाचे गांधीजी नाहीत, असेंच मला त्या वेळीं वाटलें. इतकेंच नव्हे, तर उलट त्यांनाच चार समजुतीच्या गोष्टी ते सांगतील असा माझा अजमास होता, व तोच खरा ठरला. गांधींच्या पुढे सभेंत ब्राह्मणांच्या विरुद्ध खऱ्या व निराधार अशा सर्व कागाळ्यांचा पाढा वाचण्यांत आला. गांधीजींनी मी अटकळ केल्याप्रमाणे सर्व शांतपणें ऐकून घेऊन, आकुंचित दृष्टि न ठेवतां व्यापक दृष्टीने विचार करावा व देशहिताकडे लक्ष देऊन वागावें असा उपदेश करून त्यांची कानउघाडणी केली. आपण टाकलेला शब्द आपल्याच अंगावर परतला हें पाहून खापर्डे

यांच्याप्रमाणेच ब्राह्मणेतरांनाही गांधी "हा आपला नव्हे" असेंच वाटलें असावें. ब्राह्मणब्राह्मणेतरवादाचा अनुभव आणखी एका गोष्टीवरून मला त्या वेळीं आला. बेळगावास जैन विद्यार्थ्यांकरिता माणिकबाग या नावाची एक मोठी जागा आहे. त्या जागेंत एक बंगला असून आजूबाजूला बरीच विस्तृत जागा आहे. परिषदेकरिता तेथे मांडव घालून राहण्याची व जेवणाची वगैरे सोय तेथेंच करावी, असें माझ्या मनांत होतें. म्हणून त्या जागेच्या व्यवस्थापकांपैकी एक प्रमुख व माझे स्नेही चौगुले वकील यांना ती जागा देण्याबद्दल विनंती केली. सुट्टीचे दिवस असल्यामुळे ती रिकामीच होती. चौगुले वकिलांनी माझी विनंती मान्य केली व त्या भरवशावर मी बरेच दिवस होतों. पण जेव्हा ही गोष्ट लठ्ठे यांना कळली तेव्हा ते आडवे आले व जागा देतां येत नाही असें चौगुल्यांनी मला कळवलें. मला आयत्या वेळीं दुसरी जागा पाहावी लागली! टिळक वगैरे मंडळींचा मुक्काम बेळगावास असतांच गांधी हे परत अहमदाबादला जाण्याकरिता निघाले.

### लोकमान्यांनी दिलेली अमूल्य भेट

परिषदेच्याच वेळीं स्वराज्य संघाची स्थापना करण्यांत आली. बॅप्टिस्टा यांना अध्यक्ष व केळकर यांना चिटणीस निवडण्यांत आलें. उपाध्यक्षांच्या पंक्तींत मलाही जागा मिळाली होती. स्वराज्य संघ स्थापन झाल्या दिवशींच टिळकांचें जाहीर व्याख्यान झालें. स्वराज्य म्हणजे काय याची उत्तम प्रकारें फोड करून संघाचे सभासद होण्याबद्दल त्यांनी कळकळीचा उपदेश केला. त्याचा परिणाम होऊन तेव्हापासून संघाचे सभासद नोंदविण्याला सुरुवात झाली. माझ्या माहितीप्रमाणे स्वराज्य संघाचे सभासद बेळगाव जिल्ह्यांतच इतर ठिकाणांपेक्षा जास्ती होते. पुढे राजद्रोहात्मक भाषणें केल्याबद्दल टिळकांवर जामिनकीचें प्रकरण आलें, त्यांत बेळगावच्या या भाषणाचा व नगर येथील या विषयावर त्यांनी केलेल्या दोन भाषणांचा आधार घेण्यांत आला होता.

ही परिषद आमच्या अपेक्षेपेक्षा जास्ती यशस्वी झाली. इतका लोकसमूह यापूर्वी कोणत्याही सार्वजनिक कार्याकरिता बेळगावला जमला नव्हता, व इतका उत्साहही दिसून आला नव्हता. टिळकांना आमची सर्व व्यवस्था पाहून संतोष वाटला. टिळक बेळगाव सोडून जातेवेळीं आम्ही रीतीप्रमाणे स्टेशनावर पोचवावयाला गेलों होतों. सर्व प्रतिष्ठित पाहुण्यांच्या गळ्यांत हार घालण्यांत मी गुंतलों असतां टिळक आपल्या हातांत एक हार घेऊन मी होतों त्या ठिकाणीं आले व चटकन माझ्या गळ्यांत त्यांनी एक हार घातला. आणि "तुमच्या श्रमांबद्दल तुम्हांला ही माझी भेट" असें म्हणाले. माझ्यासहित आमच्या सर्व जवळच्या मंडळींना धन्यता वाटली. तो हार कित्येक दिवस मीं जपून ठेवला होता. कित्येकांना यांत माझा हा स्वभाव बालिशपणाचा वाटेल. तथापि, मी स्वतः टिळकांविषयींचा आदर व विनययुक्त असा अभिमानच या माझ्या कृतीने अनुभवीत होतों.

### गोविंदरावांची इच्छा

या परिषदेपासून अशा प्रकारचीं सार्वजनिक कामें कशीं करावीं याचा एक आम्हांला धडाच मिळाल्याप्रमाणे झाला. बहुतेक अशा प्रसंगीं कार्यकर्त्यांमध्ये नाना प्रकारचे मतभेद उत्पन्न होतात व ते पुष्कळ दिवसपर्यंत टिकतातही. पण बेळगावास तशी गोष्ट घडली नाही. बेळवी हे स्वागतमंडळाचे अध्यक्ष या नात्याने मुख्य होते. त्यांना विचारल्याशिवाय मी कोणतीही महत्त्वाची गोष्ट करीत नसें. आणि त्यांचें सौजन्य इतकें होतें की, तेही माझ्या इच्छेविरुद्ध कांही करीत नसत. आमच्यामध्ये असलेल्या या सलोख्यामुळे सर्व सुरळीतपणें पार पडलें. आज या गोष्टीला सोळा वर्षें होऊन गेलीं. या अवधींत पुष्कळ गोष्टी घडल्या. मतभेदाचेही प्रसंग आले. पण हातीं घेतलेलें काम बिघडूं न देतां उत्तम प्रकारें व एकोप्याने करण्याची सवय बेळगावच्या कार्यकर्त्यांना लागली यांत शंका नाही. माझ्या हाताखाली मुख्य काम करणारे गोविंदरावच होते. माझ्या हाताखाली म्हणण्यापेक्षा सर्वच भार त्यांच्यावर होता. कोठे कांही बिघडलें अथवा माझ्या मनाजोगें झालें नाही, तर मी गोविंदरावांनाच जबाबदार धरून त्यांच्यावर सर्व राग काढीत असें. आणि ते बिचारे तो सर्व सहन करीत असत. या परिषदेच्या बाबतींत सातआठ वेळां तरी त्यांच्या डोळ्यांतून पाणी येण्यापर्यंत माझ्या कठोर शब्दांचा त्यांच्यावर मारा व परिणाम झाला असेल! पण आमचीं अंतःकरणें एकमेकांना माहीत असल्यामुळे हा परिणाम अर्ध्या तासापेक्षा जास्ती केव्हाही राहात नसे. इतक्या व्यवस्थित रीतीने या परिषदेचें काम केल्यानंतर गोविंदरावांच्या मनांत बेळगावांत एकदा कॉंग्रेस भरवावी अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. त्यामुळें पुढे जेव्हा जेव्हा ते कॉंग्रेसला जात त्या त्या वेळीं कॉंग्रेसचा मंडप, राहण्याची व जेवणाची सोय, इत्यादि व्यवस्था कशा केल्या जात या गोष्टींकडे त्यांचें लक्ष असे. या संबंधांत त्यांनी बरींच टिपणें केलीं होतीं व नकाशे (plans) वगैरे तयार करून ठेवलेले होते. पण बेळगावला कॉंग्रेस भरवण्याचा योग १९२४ पर्यंत आला नाही. विधीची घटना विचित्र आहे! गोविंदराव १९२३ सालींच कालवश झाले होते! तथापि बेळगावास कॉंग्रेस भरविण्याची त्यांची इच्छा आम्हाला माहीत होती. तिच्याच प्रेरणेने १९२४ सालची कॉंग्रेस भरवण्याची व तीही व्यवस्थितपणें पार पाडण्याची आम्हीं हिंमत धरली होती व त्याप्रमाणे घडूनही आलें. त्यांच्या मागे त्यांचे दोन बंधू कृष्णराव व जीवनराव यांनी सर्व प्रकारची जबाबदारी त्यांच्याप्रमाणेच आपल्यावर घेतली आहे व कॉंग्रेसच्या वेळीं त्यांच्या मदतीचा उपयोग आम्हांला पुष्कळच झाला.

### पुंडलीकजींचा व माझा संबंध

बेळगाव परिषदेच्या पूर्वी कांही दिवस एका तरुण विद्यार्थ्याचा व माझा संबंध आला. त्याचें नाव नारायण तंमाजी कातगडे. हा

पुंडलीकजी या नावाने प्रसिद्ध आहे. यांचें गाव मिरज. त्यांच्या लहानपणींच त्यांचे वडील व मातोश्री वारलीं. वडिलांच्या वेळीं त्यांची स्थिती चांगली होती. पण वडील भावांनी वडिलांच्या मागे चैन करण्याला प्रारंभ केला. हें पुंडलीकजींना आवडलें नाही; म्हणून ते कंटाळले होते. लहानपणापासून त्यांना तालमीचा नाद असून बरोबरीच्या तरुणांत ते बरेच प्रिय होते. त्या वेळच्या स्थितीप्रमाणे यांच्या डोक्यांतही 'कांही तरी करावें' अशी इच्छा उत्पन्न झाली; पण या गोष्टीची तयारी होण्याकरिता 'कांही' साधनें लागतात, या गोष्टीची जाणीव त्यांना झाल्यामुळे ही तयारी करण्याचें शिक्षण घेण्याकरिता कोणाजवळ तरी जाऊन राहावें असें त्यांना वाटलें.

त्याच वेळीं प्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. दत्तोपंत पटवर्धनबुवा यांचीं कीर्तनें मिरजेस चालू होतीं. त्यांनीही आपण स्वतः डॉक्टर असून, राष्ट्रसेवेच्या हेतूने कीर्तनें करण्याच्या क्षेत्रामध्ये, लोकमान्यांच्या प्रेरणेने नुकतेंच पदार्पण केलें होतें. त्या वेळीं पुंडलीकजी व पटवर्धनबुवा यांची भेट झाली. त्यांच्या भेटीमध्ये बोलतांना "आपल्याला बॉंब करण्याची कला शिकावयाची आहे. त्या दृष्टीने माझी कोठे तरी सोय लावून द्याल का?" असें पुंडलीकजींनी त्यांना विचारलें. श्री. दा. वि. ऊर्फ बाबूराव गोखले यांचें पत्र देऊन पटवर्धनबुवांनी पुंडलीकजींना माझ्याकडे आणून सोडलें. मुलगा लहान असून होतकरू व हुशार दिसतो; पण 'भलत्या मार्गाला' लागण्याचा दाट संभव आहे हें मनांत आणून, पटवर्धनबुवांनी त्यांच्याविषयींची सर्व हकीकत मला निवेदन केली. मीं तें सर्व ऐकून त्यांना माझ्या घरींच ठेवून घेतलें. माझे स्नेही कै. श्री. सदाशिव लक्ष्मण ऊर्फ बाबासाहेब सोमण यांना पुंडलीकजींच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास मीं सांगितलें. बाबासाहेब त्यांना इंग्रजी व संस्कृत नियमानें शिकवीत असत. बरेच दिवस झाले तरी बॉंब करण्यासंबंधाने मीं त्यांना कांहीच माहिती देत नाही, हें पाहून त्यांनी मला एकदा एकांतांत त्यासंबंधाने स्पष्टच विचारलें. मी त्यांना निश्चित असें कांहीच मत न देतां केवळ त्या नादांत व आशेंत ठेविलें होतें.

तरुण मुलांचा संग्रह करण्याची मला हौस असल्यामुळे मी पुंडलीकजींना ठेवून घेण्याला तयार झालों व ते माझ्याजवळ राहण्यास खुष होते. तेव्हापासून ते आतापर्यंत माझ्याकडेच असतात व अनेक राष्ट्रीय चळवळींमध्ये त्यांनी माझे सहकारी म्हणून काम करीत राहण्यांत आपलें जीवनसाफल्य मानलें आहे. आमच्या घरांतील जवळच्या माणसाप्रमाणेच त्यांचा व माझ्या संबंध आहे. माझ्याजवळ येऊन राहिल्यानंतर मी त्याच्याशीं बऱ्याच मोकळेपणाने वागूं लागलों. त्यांना त्या वेळीं निरुत्साह न करितां "आणखी कांही दिवस गेल्यानंतर पाहतां येईल" असें मीं सांगितलें व हळूहळू त्या मार्गापासून त्यांना मीं परावृत्त करण्याची खटपट केली. गांधीजींचा व माझा संबंध आल्यानंतर ज्याप्रमाणे मला अहिंसेमध्ये सामर्थ्य आहे असें पटलें, त्याप्रमाणे त्यांची स्थिती त्या वेळीं नव्हती. अत्याचाराचा मार्ग मूर्खपणाचा व अशक्य कोटींतला आहे असें मला वाटत होतें व तीच गोष्ट मीं त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न बरेच दिवस केला. अहिंसेचें तत्त्व मला

अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नोंदी ........

पटल्यानंतर त्या दिशेने मी माझें जीवन आखूं लागलों. त्यांना गांधीजींच्या व काकासाहेब कालेलकरांच्या सान्निध्यांत बरेच दिवस ठेविलें. त्यामुळे त्यांच्या बुद्धीलाही हें तत्त्व पटलें व त्यांनी मिरज संस्थानांत सारावाढीविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ करून यशही संपादन करून दाखविलें.

वेळगावच्या परिषदेच्या वेळीं पुंडलीकजींची हुषारी पाहून टिळकांच्या खास व्यवस्थेकरिता मीं त्यांची योजना केली होती व त्यांनी ती कामगिरी उत्तम प्रकारें बजावली होती. हें पाहून मी पुढे त्यांना जास्ती महत्त्वाचीं कामें देऊं लागलों व तीं ते मनोभावाने करीत आले.

कांही दिवसांनंतर पुंडलीकजी "काशीला जातों" म्हणून निघाले. ओळखीदेखी कांही नसतांना आणि हातामध्ये एक कपर्दिकही न घेतां काशीला जाण्याचा त्यांच्या त्या लहान वयांतील निर्धार पाहून मला आश्चर्य वाटलें. पण मीं त्यांना प्रतिबंध केला नाहीं. त्यानंतर काशीला जाऊन त्यांनी तेथे संस्कृत भाषेचें व वेदांताचें शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला. पण मनांतील 'मूळ उर्मी' तशीच असल्यामुळे ते पुन्हा माझ्याकडे आले. या अवकाशांत बॉंब करण्याचें त्यांचें व्यवधान थोडें कमी झालें असावें असें मला वाटलें. मींही त्यांना त्या गोष्टीमध्ये उत्तेजन दिलें नाही. गेलीं पंचेचाळीस वर्षें ते माझ्या घरीं माझ्याजवळच राहात आहेत. माझ्याकडे राहात असतांना त्यांनी माझी सेवा सातत्याने केली आणि माझ्याबरोबर सर्व सार्वजनिक चळवळींमध्ये व राष्ट्रीय आंदोलनांमध्ये माझा सहकारी म्हणून ते भाग घेत आले आहेत; आणि त्यांत त्यांनी माझ्याबरोबर अनेक वेळां सश्रम कारावासही आनंदाने सहन केला आहे. सार्वजनिक चळवळी आणि जाहीर भाषणें करण्याची हौस विद्यार्थीदशेपासूनच त्यांना असल्यामुळे, ते त्याप्रमाणे करीत आले आहेत व त्या बाबतींत मीं त्यांना कधी अडथळा आणलेला नाही.

## *स्वराज्यांतही सरकारला विरोधच*

माझ्यासंबंधाने टिळकांनी याच वेळीं आणखी एका बाबतींत आपलेपणा दाखवला. यापूर्वीही टिळक वेळगावला आले होते; पण आमचें घर जुन्या पद्धतीचें व लहान असल्यामुळे मी त्यांची उतरण्याची सोय दुसरीकडे करीत असें. या वेळींही टिळक-खापर्डे यांच्याकरिता एका बंगल्यांत उतरण्याची व्यवस्था केली होती. परिषद संपल्यानंतर दुसरे दिवशीं टिळकांनी आमच्या घरीं येण्याची इच्छा दर्शविली व "या खेपेला तुमच्या घरीं आल्याखेरीज बेळगाव सोडणार नाही" असें बजाविलें. मीं घरीं त्यांना जेवणाचेंच आमंत्रण दिलें व गावांतील शंभरसवाशे मंडळींना पंक्तीचा लाभ घेण्याला बोलाविलें. भोजनाच्या वेळीं माझ्या एका स्नेह्याने थोड्या विनोदांत "हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्यानंतर आपण काय करणार?" असा प्रश्न टिळकांना केला. त्यांनी ताबडतोब उत्तर दिलें की, स्वराज्य जरी मिळालें तरी त्याची घडी चांगली बसेपर्यंत मला त्या वेळीं प्रचलित असलेल्या सरकारला विरोधच करावा लागणार व त्याबद्दलदेखील आपल्याला कारागृहवास भोगावा लागेल.

प्रकरण चौदावें

# टिळक-विजय

### *लोकमान्यांचा साठीचा सत्कार*

यानंतर जुलै महिन्यांत टिळकांना साठ वर्षे भरण्याचा योग आला. हा समारंभ कोणत्या रीतीने साजरा करावा याबद्दल पुण्यांत कांही मंडळींत खल होऊन केवळ धार्मिक विधि व मामुली कांही प्रकार न करतां या समारंभाच्या निमित्ताने टिळकांना जाहीर रीत्या एक लाख रुपयांची देणगी द्यावी असें ठरलें. मी त्या वेळीं मुंबईस होतों. डॉ. बाबा परांजपे पुण्याहून माझ्याकडे आले व त्यांनी ही कल्पना माझ्यापुढे मांडली. समारंभाला दिवस थोडे राहिले होते, तेव्हा ही कल्पना यशस्वी होईल किंवा नाही याबद्दल मला संशय वाटला. पण पुण्यास याबद्दल वाटाघाट होऊन कांही वर्गणीचे आकडेही पडल्याचें त्यांनी मला सांगितलें. म्हणून मलाही हुरूप आला व प्रयत्न करण्याचें मीं ठरविलें. त्या वेळीं नानासाहेब देशमुख, नेने, केळकर इत्यादि मंडळींच्या सहीने जाहीर पत्रक काढून वर्गणीची मागणी केली होती. माझीही जाहीर पत्रकावर सही होती. केवळ सही करून स्वस्थ बसण्यासारखा माझा स्वभाव नाही. म्हणून मी बेळगावला गेलों व तेथे मंडळींना भेटून वर्गणी जमवण्याला प्रारंभ केला. बेळगाव जिल्ह्याचा आकडा बेळगावच्या टिळकभक्तीला साजेसाच होता. धारवाड-विजापूरकडे पत्रें लिहून तेथेही फंड गोळा करण्याची खटपट केली व परत मुंबईला आलों. सर्व महाराष्ट्र (वऱ्हाड-नागपूरसहित) व कर्नाटक मिळून एक लाख रुपयांची भरती होईल असें वाटूं लागलें. सगळीकडे जोराने काम चालू झालें. टिळकांना सार्वजनिक कामांत बराच खर्च येई व तो नेहमी त्यांच्यावरच पडत होता. त्या ऋणांतून मुक्त व्हावें अशी जनतेला इच्छा होणें साहजिक होतें. त्याशिवाय सरकारने ज्याला शत्रू म्हणून लेखून अनेकदा तुरुंगांत घातलें त्याच्यावर जनतेचें किती प्रेम व आदर आहे हें उघड दाखवण्याचें हें एक उत्तम गमक आहे असें लोकांना वाटलें. त्यामुळे वेळ

जरी थोडा होता तरी उत्साहाने मंडळी कामाला लागली. बाबा परांजपे यांच्या मनांत आणखी एक कल्पना आली. टिळकांच्या राजकारणाबद्दल सरकारचे व कांही अंशीं लोकांचेही विपरीत ग्रह झाले होते. म्हणून त्यांच्या राजकीय धोरणाचें वस्तुस्थितीला धरून एखादें चित्र काढवून त्याच्या प्रती ज्युबिली फंडाकरिता वर्गणीदारांत वाटाव्या असा त्यांनी विचार काढला होता व तो विचार त्यांनी मला सांगितला. तेव्हा मुंबईस माझ्या ओळखीचे कोल्हापूरचे अनंतराव माळी म्हणून एक चित्रकार होते त्यांची व बाबांची मीं गाठ घालून दिली, व अनंतरावांनी हें काम करून देण्याचें आनंदाने कबूल केलें. टिळकांच्या एका बाजूला इंग्लंड व दुसऱ्या बाजूला हिंदुस्थान अशा दोन देशांच्या मूर्ती उभ्या करून टिळक हे दोन्ही मूर्तींचे हात एकमेकांच्या हातांत घालीत आहेत अशा प्रकारच्या चित्राची कल्पना बाबांनी पसंत केली व त्याप्रमाणे अनंतरावांनी चित्र काढून दिलें. बाबांनी त्याच्या हजारों प्रती काढून वाटल्या. अद्यापि तें चित्र कित्येकांच्या घरांत पाहावयाला मिळतें.

हा समारंभ पुण्यास गायकवाडवाड्यांतच व्हावयाचा होता. समारंभाच्या दिवशीं सर्व ठिकाणचे टिळकांचे स्नेही व चाहते आले होते. लाख रुपयांची संकल्पाप्रमाणे भरती होत आली होती. समारंभाच्या दिवशीं तर वर्गणीची गर्दी होऊन रोख वसुली रक्कम लाखावर गेली. त्यामुळे सर्वत्र आनंद व उत्साह दिसत होता. पण जणू काय सरकारला हा प्रकार पाहून टिळकांसंबंधाने एक प्रकारचा मत्सर वाटून त्यांनी त्या समारंभाच्याच दिवशीं बेळगावच्या व अहमदनगरच्या भाषणाबद्दल त्यांच्याकडून वीस हजार रुपयांचा जामीन कां घेऊं नये याबद्दल कारणें दाखवण्याची नोटीस त्यांच्यावर बजावली. आधीच लोकांचा उत्साह वाढला होता व त्यांतच या नोटिशीने अधिक भर पडली. कित्येकांना सरकारच्या या कृत्यासंबंधाने चीडही आली.

सायंकाळीं गायकवाडवाड्याच्या पटांगणांत सभा भरली. अध्यक्षस्थानीं अण्णासाहेब पटवर्धन होते. पटांगण सर्व लोकांनी फुलून गेलें होतें व वाड्याच्या छपरावरदेखील बसण्याला जागा राहिली नव्हती. इंग्रजी मानपत्र वेळवी यांनी वाचलें. त्याचें मराठींतील भाषांतर बाबा परांजपे यांनी वाचून दाखवलें.

### *टिळकभक्तांच्या वतीने माझें भाषण*

माझे मित्र बाबूराव गोखले हे केसरी-मराठा ऑफिसांत या वेळीं दाखल झाले होते. त्यांनी या समारंभाच्या दिवशीं सकाळींच मला भाषण करण्याबद्दल कळवलें होतें. पण मीं त्यांची सूचना मान्य केली नाही. स्वतः टिळकांच्या संबंधाने तो समारंभ! त्यांत लोकांचा अपूर्व उत्साह! हें पाहून माझा कंठ किती वेळां तरी त्या दिवशीं भरून आला असेल व आनंदाचे अश्रू माझ्या डोळ्यांतून किती वेळां तरी वाहून गेले असतील! अशा स्थितींत तशा अफाट समुदायापुढे भाषण करणें मला जड वाटलें म्हणून बाबूरावांना मीं 'नाही' म्हणून सांगितलें होतें.

तथापि बाबूरावांनीं माझें नाव बोलणाऱ्यांच्या यादींत घातलें होतें. त्या सभेंत दाजीसाहेब खरे व दादासाहेब करंदीकर यांचीं भाषणें झालीं. ते दोघेही टिळकांचे स्नेही व बरोबरीचे म्हणून त्यांचीं भाषणें त्यांच्या त्या नात्याला अनुरूप अशींच झालीं. पण सभेंत टिळकांचे चाहते व भक्त असे हजारों तरुण होते. त्यांच्यातर्फे कोणीं तरी बोललें पाहिजे असें मला वाटूं लागलें होतें, इतक्यांत अध्यक्षांनी माझें नाव पुकारलें. मी भीत-भीतच बोलण्याला प्रारंभ केला. पण टिळकभक्तीचें माझ्या अंगांत वारें इतकें शिरलें होतें की माझी भीती एकदम नाहीशी झाली. "दाजीसाहेब व दादासाहेब हे टिळकांचे स्नेही या नात्याने बोलले; पण मी येथे जमलेल्या व देशांत बाहेर असलेल्या लाखो टिळकभक्तांच्या वतीने बोलण्याकरिता उभा राहिलों आहें" अशा अर्थाचें माझें पहिलें वाक्य होतें. त्याक्षणींच लोकांनी टाळ्यांचा प्रचंड गजर केला. दाजीसाहेब व दादासाहेब यांच्या आवाजापेक्षा माझा आवाज मोठा असल्याने सर्वांना माझें भाषण चांगलें ऐकूं जाऊं लागलें. त्यामुळे मला जास्ती हुरूप येऊन उत्तेजनच मिळालें. माझ्या समजुतीने पूर्ण भावनेने भरलेलें असें माझें भाषण झालें. अशा प्रसंगीं भावनात्मक प्रेमळ भाषणाचा परिणाम होत असतो त्याप्रमाणे तो झाला असावा असें मला वाटलें. माझ्या भाषणांत टिळक अमर नसले तरी 'टिळकतत्त्व' अबाधित व अमर राहणार, असें प्रतिपादन करून टिळकतत्त्व म्हणजे हातीं घेतलेलें काम धैर्याने व निःस्वार्थ व निरहंकार बुद्धीने तडीला नेण्याचा प्रयत्न करणें अशी व्याख्या मीं केली होती व शेवटीं टिळकांची आतापर्यंतची कामगिरी उज्ज्वल असून त्यांनी देशाला इतकें ऋणी करून ठेवलें आहे की, वृद्धापकाळांत हा व्याप त्यांनी सोडावा अशा अर्थाची मीं प्रेमळपणाची विनंती केली होती. माझीं बरींवाईट अशीं आजपर्यंत पुष्कळ भाषणें झालीं आहेत. पण त्या दिवशींचें माझें भाषण उत्तम भाषणांपैकी एक होतें असें मला आजही वाटतें. टिळकांनी थोडक्यांत भाषण करून त्यांना अर्पण केलेली लाख रुपयांची नजर, तींत आपलें तुळशीपत्र घालून, ती परत लोक-सेवेकरिता देण्याचें जाहीर केलें व सभेचें काम आटोपलें. हा समारंभ सर्व दृष्टींनी अपूर्व असा झाला. एवढी मोठी रक्कम गोरगरीब व मध्यम स्थितींतील लोकांकडून जमा होऊन ती एखाद्या पुढाऱ्याला त्याने केलेल्या उपकारांतून अंशतः तरी उतराई व्हावें या भावनेने दिलेली, असें हें पहिलेंच उदाहरण. टिळकांच्या पश्चात गांधीजींकडे राष्ट्राचें धुरीणत्व गेल्यानंतर टिळकांचें स्मारक म्हणून त्यांच्या प्रोत्साहनाने लाख रुपयांच्या या रकमेपेक्षा शतपट अधिक मोठा फंड जमला हें खरें आहे. पण १९१६ साल व टिळक स्वराज्य फंड जमविलेला काळ, यांत बरेंच अंतर पडलें होतें, आणि परिस्थितींतही बराच फेरबदल झाला होता ही गोष्टही विसरतां येणार नाही.

### *टिळक व गांधी यांची मिरवणूक*

हा समारंभ जुलै महिन्यांत झाल्यानंतर अहमदाबादची प्रांतिक कॉन्फरन्स ऑक्टोबर महिन्यांत भरणार होती. ही कॉन्फरन्स नेमस्त

पक्षांतील लोकांतर्फे भरवण्यांत येणार असून तिचें अध्यक्षस्थान बॅ. जीना यांना देण्याचें ठरलें होतें. बेळगावच्या परिषदेमध्ये कॉंग्रेसचें क्रीड मान्य करून कॉंग्रेसमध्ये प्रवेश करण्याचें ठरलें असल्याने, आमच्या पक्षांतील मंडळींनी अहमदाबादच्या कॉन्फरन्सला जाण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें महाराष्ट्रांतून व कर्नाटकांतून बरीच मंडळी अहमदाबादला गेली. मीही या मंडळींत होतों व पुण्याहून टिळकांबरोबरच मीं प्रवास केला. अहमदाबादच्या स्वागतमंडळांत बहुतेक नेमस्तांचाच भरणा विशेष होता. त्यामुळे त्यांच्यातर्फे स्टेशनावर टिळकांच्या स्वागताची तयारी विशेष नव्हती. तथापि गांधीजींनी आपल्या स्वतःच्या सहीने जाहीर पत्रकें काढून टिळकांचें सार्वजनिक रीत्या स्वागत करावें अशी लोकांना विनंती केली होती. त्यामुळे हजारो लोक स्टेशनावर आले होते व टिळकांची अहमदाबाद शहरांतून मोठ्या थाटाची मिरवणूक काढण्यांत आली होती. मिरवणुकींत गांधी व टिळक एका गाडींत बसलेले पाहून मला समाधान वाटलें व किती वेळां तरी डोळे भरून मी त्यांच्याकडे पाहात राहिलों होतों. या दोन व्यक्तींमध्ये काम करण्याच्या संबंधाने मतभेद असला, तरी त्या दोन्ही व्यक्ती असामान्य असून देशाचा उद्धार जवळ येत चालला आहे, असें मला त्या दृश्यावरून वाटलें. "हा आमचा नव्हे" असें खापर्ड्यांचें सर्टिफिकेट कोणीकडे व टिळकांची योग्यता व स्वराज्याबद्दलची तळमळ ओळखून आपण राहात असलेल्या गावांत त्यांच्या सन्मानांत कोणत्याही प्रकारची न्यूनता पडूं नये म्हणून चाललेली गांधींची धडपड कोणीकडे! टिळकांना राहण्याकरिता केलेल्या घरापर्यंत गांधीजी त्यांच्याबरोबर होते. १९०७ सालीं ज्या गुजरातच्या सुरत शहरांत टिळक व त्यांचे महाराष्ट्रीय अनुयायी यांच्यासंबंधाने 'शिवाजीप्रमाणे लुटालूट करून, हे महाराष्ट्रीय, लोकांचे कान व नाकें कापून घेऊन जाणार आहेत' या अर्थाचीं हस्तपत्रकें वाटण्यांत आलीं होतीं, त्याच गुजरातच्या राजधानीच्या शहरांत १९१६ सालीं खुद्द गुजरातच्याच नव्हे तर सर्व हिंदुस्थानच्या भावी अग्रणी मनुष्याच्या प्रोत्साहनाने राजालादेखील मान मिळणार नाही असा मान टिळकांना मिळतो! यावरून माझी दृष्टी केवळ भावनात्मक नव्हती असें दिसून येईल. १९२० सालीं हिंदुस्थानांत नवें चैतन्य आलें, व तेव्हाच लोकमान्यांवर काळाची झडप पडली, हा आमच्या दैवाचा दुर्विलास आहे! नाही तर माझ्या समजुतीप्रमाणे या दोन व्यक्तींच्या पराक्रमाने आमच्या उद्धाराचा काळ जास्ती समीप आला असता, असें मला अद्यापिही वाटतें.

### *अखिल-भारतीय पुढारी टिळक*

या कॉन्फरन्समध्ये टिळकांचें भाषण झालें व लोकांनी आतुरतेने तें ऐकून घेतलें. १९०६ नंतर नेमस्त व व राष्ट्रीय या दोन्ही पक्षांतील लोकांच्या परिषदेंत झालेलें टिळकांचें हें पहिलेंच भाषण होतें.

या अहमदाबादच्या मुक्कामांत मी गांधींना भेटण्याकरिता त्यांच्या आश्रमांत गेलों होतों. त्यांचा त्या वेळचा आश्रम व आजचा त्यांचा आश्रम यांत किती तरी अंतर आहे

साबरमतीचा एलिस पूल ओलांडून गेल्यानंतर डाव्या हाताकडे जो रस्ता जातो त्या रस्त्यानें थोडें गेल्यानंतर एक बंगला लागतो. त्या बंगल्यांत त्या वेळीं गांधीजी आपल्या कांही सहकारी मित्रांसह राहात असत. ती संस्था त्या वेळीं अगदी बाल्यावस्थेंत होती. काका कालेलकर तेव्हा तेथेंच राहात असत. मी गांधीजींना भेटावयास गेल्यावेळीं ते आंत एका खोलींत जात्यावर दळीत बसले होते! मी गेल्यानंतर थोड्या वेळानें बाहेर येऊन पंधरा-एक मिनिटें ते माझ्याशीं बोलले व पुन्हा आंत त्या कामावर गेले. त्यांच्या भाषणांतील प्रेमळ-पणाची छाप माझ्यावर पडली व त्यांच्याबद्दलचा आदरभावही वाढला. घरीं परत आल्यानंतर ही हकीकत मीं टिळकांना कळविली. टिळक कांही बोलले नाहीत.

अहमदाबादच्या कॉन्फरन्समध्ये अध्यक्ष या नात्यानें जिनांनी एक भावी सुधारणांची योजना मांडली. ती त्यांचीच असावी असा भास झाला. पण पुढे कांही दिवसांनी ती योजना गोखल्यांनी तयार केली होती असें बाहेर आलें! गोखल्यांनी तयार केलेली योजना जिनांना पाहावयाला मिळाली व त्यांच्या मृत्यूनंतर जिनांनी ती आपलीच म्हणून भासवण्याचा प्रयत्न केला!

याच कॉन्फरन्समध्ये मीं विठ्ठलभाई पटेल यांना प्रथम पाहिलें. ते त्या वेळीं मुंबई कायदेकौन्सिलचे मेंबर होते. त्या वेळीं त्यांचा पोशाख युरोपियन थाटाचा होता.

अहमदाबाद कॉन्फरन्सनंतर लखनौची कॉंग्रेस भरली. राष्ट्रीय पक्षाला दहा वर्षांनंतर कॉंग्रेसला हजर राहण्याचा योग आला. त्यामुळे राष्ट्रीय पक्षाची बरीच मंडळी लखनौला हजर राहिली. महाराष्ट्र-कर्नाटकांतील राष्ट्रीय पक्षाची मंडळी टिळकांबरोबरच निघाली. मुंबईचे डॉ. साठे व डॉ. वेलकर यांनी खटपट करून मुंबईहून लखनौपर्यंत एक स्पेशल ट्रेन काढली. इकडचे बहुतेक राष्ट्रीय पक्षाचे लोक याच गाडीनें लखनौला गेले. वाटेंत ज्या ज्या स्टेशनावर गाडी उभी राही त्या त्या स्टेशनावर हजारों लोकांनी टिळकांचें स्वागत केलें. यावरून परप्रांतांतदेखील टिळकांची लोकमान्यता किती होती हें दिसून आलें. मला वाटतें की, सबंध हिंदुस्थानांत इतकी लोकप्रियता संपादन करणारा पहिला पुढारी टिळकच. टिळकांच्या प्रतिपक्षीयांनी (त्याच वर्गात कांही दिवस माझाही समावेश होता) टिळक हे 'सवंग लोकप्रियते'साठी हापापले होते म्हणून त्यांच्यावर कितीही टीका केली, तरी अशा प्रसंगीं लोकांनी दाखवलेली भक्ती पाहून त्यांच्यावरचा आरोप किती निराधार होता, याबद्दल कोणालाही खात्री झाल्यावाचून राहणार नाही. १९०६ पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत मला त्यांच्याबरोबर असण्याचें भाग्य अनेक वेळां लाभल्यानें त्यांच्या बाबतींत लोकांची प्रीती 'सवंग' नव्हती असा अनुभव मला आला. ही प्रीती उत्पन्न करण्याकरिता किती किंमत द्यावी लागते याचा अनुभव ज्यांना नाही त्यांना ती 'सवंग' वाटणें साहजिक आहे. पण 'जावें त्यांच्या वंशा तेव्हा कळे.'

लखनौस टिळकांचें स्वागत व मिरवणूक वगैरे प्रकार थाटाचे झाले. तथापि व्यवस्था व टापटीप या बाबतींत तिकडील लोक मागासलेले असावेत असा ग्रह झाला. आम्हांला उतरण्याची जागा पुरेशी व चांगली नव्हती. जेवणाखाण्याची सोय यथातथाच.

त्या वेळीं कॉंग्रेसची विषयनियामक कमिटी प्रांतानिहाय त्या त्या प्रांतांतील प्रतिनिधींतर्फे निवडली जात असे. यापूर्वीच्या सर्व कॉंग्रेसमधून प्रायः फिरोजशहा मेथांसारख्या नेमस्त पुढाऱ्याच्या सल्ल्यानेच य निवडणुकी होत असत. पण लखनौला हा प्रकार बदलण्याचा प्रघात सुरू झाला व प्रतिनिधींच्या इच्छेवर या निवडणुका होऊं लागल्या. कॉंग्रेसपुढे येणाऱ्या विषयांची चर्चा विषयनियामक कमिटींतच होत असते. ज्या पक्षाचें बहुमत विषयनियामक कमिटींत असेल त्याच पक्षाच्या धोरणाने ठराव कॉंग्रेसपुढे येत असत, व प्रायः जसेचे तसेच मंजूर होत असत. कॉंग्रेसच्या अधिवेशनाचीं सूत्रें नेमस्त पुढाऱ्यांच्या हातीं असल्याकारणाने कांही अपवाद खेरीज करून त्यांच्याच धोरणाला अनुकूल असलेल्यांची निवडणूक विषयनियामक कमिटीमध्ये होत असे. लखनौला मुंबई प्रांताच्या प्रतिनिधींत राष्ट्रीय पक्षाचें बहुमत होतें. आणि त्याच पक्षांतील सर्व मंडळी निवडून येण्याची खात्री होती. असें झालें असतें तर नेमस्त पुढारी निवडणुकींत कोणीही आला नसता. ही आपत्ती टळावी म्हणून गांधीजी टिळकांकडे शिष्टाई करून या बाबतींत समेट करण्याकरिता आले व वाटाघाटींत कांही नेमस्त पुढाऱ्यांना निवडण्याचें टिळकांनी कबूल केलें. पण या बाबतींत नेमस्त पुढाऱ्यांना विचारल्याखेरीज आपल्याला नक्की कांही सांगतां येत नाही, त्यांना विचारून दुसरे दिवशीं कळवितों, असें सांगून गांधीजी गेले. पण फिरून ते परत आले नाहीत. म्हणून आमच्या पक्षांतील मंडळींचीं नावें घालून एक यादी तयार करण्यांत आली व त्या यादीप्रमाणे आमच्या मंडळींनी मतें द्यावीं असें ठरलें. विषयनियामक कमिटीचे सभासद निवडण्याकरिता मुंबई प्रांतांतील प्रतिनिधींची सभा भरली. सभेचें अध्यक्षस्थान टिळकांना देण्यांत आलें व यादींतील नांवांबद्दल सूचना मांडण्यांत आल्या. त्याविरुद्ध नेमस्तांतर्फे त्यांच्या मंडळींचीं नावें आलीं. पण आमच्या यादीप्रमाणेच बहुमताने नांवें मंजूर झालीं. तथापि एक अपवादात्मक गोष्ट घडली. आमच्या यादींत गांधीजींचें नांव नव्हतें. तें नेमस्तांच्या बाजूने सुचविण्यांत आलें. त्यावर मतें घेतलीं, व माझ्या आठवणीप्रमाणे मला वाटतें की, जरी गांधीजींच्याबद्दल आमच्या मंडळींत आदर होता, तरी आम्ही सर्व शिस्तीने वागत असल्यामुळे ती सूचना मंजूर झाली नाही. तथापि टिळकांनी ती सूचना मंजूर झाली असा अभिप्राय सभेचे अध्यक्ष या नात्यानें दिला! तेव्हा मंडळींत हशा पिकला! गांधीजींच्या संबंधाची सूचना फेटाळली जाऊं नये, असें टिळकांना वाटून त्यांनी तसा अभिप्राय दिला असें आमच्यापैकी पुष्कळांना वाटलें. मग खरा प्रकार काय असेल तो असो. त्या वेळीं कॉंग्रेसच्या अध्यक्षांना आपल्यातर्फे कमिटींत कांहींना नेमण्याचा अधिकार होता. अध्यक्षांनी त्या अधिकाराचा उपयोग करून कांही नेमस्त पुढाऱ्यांना विषयनियामक कमिटींत घेतलें. याप्रमाणे राष्ट्रीय पक्षाचा कॉंग्रेसमध्ये समावेश झालेल्या वर्षींच कॉंग्रेस त्या पक्षाच्या हातीं जाण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं, व त्याप्रमाणे

पुढील सालची म्हणजे १९१७ ची कलकत्त्याची कॉंग्रेस पूर्णपणें राष्ट्रीय पक्षाची झाली.

## लखनौ करार

लखनौच्या कॉंग्रेसमध्ये हिंदू-मुसलमानांमध्ये सलोखा घडवून आणण्याचें मुख्य काम होतें. लखनौचा तह (Lucknow Pact) म्हणून प्रसिद्ध असलेली घटना याच कॉंग्रेसमध्ये पास झाली. टिळकांची लोकप्रियता या वेळीं वाढत्या प्रमाणांत असल्यामुळे व टिळकांची गणना हिंदूंच्या प्रमुख लोकांत होत असल्यामुळे ते कोणतें धोरण स्वीकारतात याकडे सर्वांचें लक्ष होतें. आणि हिंदू-मुसलमानांच्या सलोख्याला टिळकांनी थोडा जरी विरोध केला असता, तरी Pact झाला नसता आणि पुढे स्वराज्याची एकमुखी मागणीही झाली नसती. या सर्व गोष्टी लक्षांत आणून व हिंदू-मुसलमानांच्या एकींतच हिंदुस्थानचें हित अवलंबून आहे हें जाणून टिळक हे समेटाला तयार झाले आणि Pact मध्ये असलेल्या कांही गोष्टी एकराष्ट्रीयत्वाच्या विरुद्ध असल्या तरी त्यांनी त्या मान्य केल्या. पण पुढे त्यांच्या पश्चात टिळकांची ही दूरदृष्टी त्यांच्या पक्षांतील बऱ्याच मंडळींत राहिली नाही व त्यांनी बसविलेली घडी पुन्हा फिसकटवली गेली ती अद्यापि बसत नाही व त्याचे परिणाम अद्यापि भोगावे लागत आहेत ! टिळकांचा मुत्सद्दीपणा व दूरदर्शीपणा आमच्यांत नाही व गांधीजींची प्रेममूलक समदृष्टीही नाही, त्यामुळे या प्रश्नाचा हल्लीचा विचका झाला आहे.

लखनौच्या विषयनियामक कमिटींत मी निवडून आलों. यापूर्वी मी या प्रकारें निवडून आलों नव्हतों. यानंतर १९२० पर्यंतच्या प्रत्येक कॉंग्रेसच्या विषयनियामक कमिटीचा मी सभासद होतों. १९२० सालीं कॉंग्रेसची घटना बदलण्यांत आली, व तेव्हापासून All India Congress Committee ही विषयनियामक कमिटी झाली, व ती निवडण्याचे नियम वगैरे वेगळे झाले. तेव्हापासून मी A. I. C. C. चा सभासद आहें.

कॉंग्रेसचा इतिहास लिहिण्याच्या इराद्यानें मी या आठवणी लिहीत नसल्यानें कॉंग्रेसमध्ये कोणते ठराव पास झाले वगैरेबद्दल माहिती देण्याची आवश्यकता नाही. म्हणून ती मी येथें देत नाही.

बेळगावच्या परिषदेनंतर या घडामोडी झाल्या व यांत माझाही थोडाबहुत संबंध येऊं लागला. बेळगावास स्वराज्य संघाची स्थापना झाल्यानंतर मी महाराष्ट्रांत व कर्नाटकांत अनेक ठिकाणीं गेलों व स्वराज्याबद्दल जागृती करण्याची खटपट केली. स्वराज्य संघाच्या सभासदांची संख्या बेळगाव जिल्ह्यांत वाढविण्याचा मीं करून प्रयत्न केला.

स्वराज्य संघ ही संस्था कॉंग्रेसची प्रतिस्पर्धी आहे असा कांही नेमस्तांनी त्या वेळीं आरोप केला होता. पण हा आरोप निराधार होता. कॉंग्रेसचें पाऊल मंदगतीनें पडत असल्यामुळे स्वराज्याच्या कल्पनेला कॉंग्रेसकडून मान्यता मिळवावयाची व तिच्या मार्फत स्वराज्याची योजना तयार करून ती कॉंग्रेसची मागणी म्हणून मांडावयाची, असा स्वराज्य संघ स्थापण्यांत हेतू होता. बेझंटबाईंनी आपला स्वराज्य संघ स्थापला तोही याच हेतूनें.

बेझंटबाई व टिळक यांच्या प्रयत्नाने व चिकाटीने या कल्पनेला मूर्त स्वरूप आलें. अखेर कॅाँग्रेसने स्वराज्याच्या मागणीला मान्यता दिली व योजनाही तयार केली. या योजनेला मुस्लीम लीग या नावाच्या मुसलमानांच्या मुख्य संस्थेने संमती दिली. हीच योजना Congress-League Scheme या नावाने प्रसिद्ध झाली.

### बेझंटबाईच्या अटकेचा परिणाम

१९१७ सालीं बेझंटबाईंना अटक करून उटकमंड येथे नजरकैदेंत ठेवण्यांत आलें. त्यामुळे स्वराज्याच्या चळवळीला बराच जोर आला. मुंबईत स्वराज्य संघाच्या शाखेंत शंकरलाल बँकर, जमनादास द्वारकादास, उमर सोभानी वगैरे मंडळींनी खूप जोरांत चळवळ केली. ही मंडळी तरुण व तडफदार असल्यामुळे व पैशाची अनुकूलता असल्याने त्यांनी मुंबईत आपली छाप चांगली बसविली. जुन्या नेमस्तांच्या हातांतलीं राजकारणाचीं सूत्रें हळूहळू नवीन मंडळींच्या हातीं आलीं. 'Young India' या नावाचें इंग्रजी साप्ताहिक जमनादास द्वारकादास हे चालवीत होते. शिवाय 'मुंबई क्रॉनिकल' हें इंग्रजी दैनिक फेरोजशहा मेथा वगैरे नेमस्तांच्या आश्रयाने जरी स्थापण्यांत आलें होतें तरी या सुमारास या पत्राचें चालकत्व याच मंडळीकडे गेलें. हॉर्निमन हे या पत्राचे संपादक होते. त्यांनी आपल्या तेजस्वी लेखणीने स्वराज्याच्या चळवळीला खूप उचलून धरलें. मुंबईस शांतारामाच्या चाळींतील खुल्या जागेंत मोठमोठ्या सभा भरत असत. अशा सभांत भाषणें करण्याकरिता मला मुद्दाम आमंत्रणें येत असत व मीही जात असें. या सभांतून त्या वेळीं महाराष्ट्रीय लोकांचाच भरणा जास्ती असे. गुजराती लोक असत, पण महाराष्ट्रियांच्या मानाने त्यांची संख्या कमी असे. म्हणून गुजराती भाषणाबरोबरच मराठी भाषणाची जरुरी भासत असे. त्यामुळे मला आमंत्रणें येत असत. राष्ट्रीय पक्षाचा म्हणजे आमचा स्वराज्य संघ व बेझंटबाईचा स्वराज्य संघ असे दोन्ही संघ मिळून कामें करीत असत. १९१६ च्या बेळगावच्या कॉन्फरन्समध्ये पुढील म्हणजे १९१७ सालची कॉन्फरन्स नाशिक येथे भरविण्याचें ठरवलें होतें. अहमदाबाद येथे नेमस्तांनी भरवलेल्या कॉन्फरन्समध्ये १९१७ची त्यांची कॉन्फरन्स नाशिक येथेच भरविण्याचें ठरविलें. त्यामुळे दोन्ही पक्षांची एकच संयुक्त कॉन्फरन्स नाशिक येथेच भरली. श्रीनिवास शास्त्री अध्यक्ष होते. अध्यक्ष जरी नेमस्त पक्षाचे होते, तरी राष्ट्रीय पक्षाच्या लोकांची संख्या जास्ती होती आणि या पक्षाच्याच धोरणाने कॉन्फरन्सचें काम चाललें. तथापि दोन्ही पक्षांचा समेट झाला असल्याकारणाने सलोख्यानेच सर्व काम झालें. कॉन्फरन्सच्या दिवसांत दररोज रात्रीं नदीवरील यशवंतराव महाराजांच्या भव्य पटांगणांत मोठ्या सभा भरत असत. त्यांत टिळकांचीं भाषणें होत असत. माझींही एकदोन भाषणें झालीं व तीं लोकांना आवडलीं. कॉन्फरन्समध्येही माझीं भाषणें झालीं.

या सालीं महायुद्धाला बराच जोर आला होता व इंग्लंडला हिंदुस्थानांतील लोकांचें पाठबळ पाहिजे होतें. पण हिंदुस्थानांत स्वराज्याची चळवळ जोराने चालू असल्यामुळे हिंदुस्थानच्या लोकांना स्वराज्याची कांही आशा दाखवण्याखेरीज त्यांच्याकडून मिळावी तितकी मदत मिळणार नाही, असें इंग्रजांना वाटल्यावरून पार्लमेंटमध्ये याबद्दल मॅांटेग्यू यांचें भाषण झालें. हिंदुस्थानची प्रचलित राज्यपद्धती जुनी झाली असल्यामुळे ती निरुपयोगी होत चालली आहे; म्हणून जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना करण्याची वेळ आली आहे, असें त्यांनी त्यांत प्रतिपादन केलें. त्यामुळे इकडे लोकांना बरीच आशा वाटूं लागली. बेझंटबाईंचीही मुक्तता झाली. मॅांटेग्यू हे हिंदुस्थानचे सेक्रेटरी या नात्याने स्वराज्याच्या प्रश्नाबाबत इकडील लोकमत काय आहे हें अजमावण्याकरिता हिंदुस्थानांत आले. दोन्ही स्वराज्यसंघांतर्फे शिष्टमंडळ त्यांच्याकडे पाठवण्याचें ठरलें. आमच्या संघाच्या शिष्टमंडळांत टिळक, खापर्डे, करंदीकर, केळकर, बेळवी, साठे, मुंजे वगैरे मंडळी होती. माझाही यांत समावेश झाला होता. मॅांटेग्यू व लॅार्ड चेम्सफर्ड (व्हाइसरॅाय) असे दोघे मिळून शिष्टमंडळाची भेट घेत असत. कॅांग्रेसतर्फे व स्वराज्य संघातर्फे शिष्टमंडळांच्या भेटी दिल्ली येथे होण्याचें ठरलें होतें. त्याप्रमाणे आम्ही दिल्लीला गेलों. टिळकांचें दिल्ली येथे थाटाचें स्वागत झालें. दोन्ही संघांच्या शिष्टमंडळींनीं मिळून मॅांटेग्यूची भेट घेतली व दोन्ही संघांच्यातर्फे एकत्र कैफियत सादर करण्यांत आली. ही कैफियत बेझंटबाईंनी वाचली व त्यांच्याकडेच पुढारीपण देण्यांत आलें होतें. रीतीप्रमाणे डेप्युटेशनमधील सर्व मंडळींची व मॅांटेग्यू व व्हाइसरॅाय साहेबांची त्यांनीच ओळख करून दिली व हा समारंभ आटोपला. या निमित्ताने माझ्या बाबतींत एक गमतीची गोष्ट झाली. आमच्या संघाच्या शिष्टमंडळींतील एका मित्राने मला चांगला बूट घेण्याबद्दलची सूचना केली. ते माहितगार असल्याने त्यांची सूचना अशा प्रकारच्या समारंभाला अनुसरूनच असली पाहिजे असें मला वाटून मीं २४ रुपयांचा एक अस्सल इंग्रजी बूट खरेदी केला व व्हाइसरॅायच्या बंगल्यावर जाण्याच्या वेळीं तो पायांत घातला. माझी समजूत सर्वच लोक अशा प्रकारचेंच पादत्राण घालून येतील अशी होती ! पण तेथें गेल्यानंतर पाहिलें तर सर्वच विलक्षण ! टिळक आपला पुणेरी जोडाच घालून आले होते. कॅांग्रेसतर्फे आलेल्या डेप्युटेशनमध्ये गांधीजी होते. ते तर अनवाणीच आले होते. त्यामुळे माझ्या पायांकडे पाहून मला लाज वाटली व बिऱ्हाडाला परत आल्याबरोबर बूट काढून ठेवला व तो पुन्हा मीं घातला नाही. मुंबईस परत आल्यानंतर इंग्रजी पद्धतीने राहणारे माझे एक मित्र होते त्यांना तो मीं दिला !

डेप्युटेशनची भेट होण्यापूर्वी सर्व मंडळी एका तंबूत बसली होती. तेव्हा पंडित मदनमोहन मालवीयही तेथे होते. त्यांचें व टिळकांचें बोलणें चाललें असतांना पंडितजींनी टिळकांना उद्देशून असे उद्गार काढले: "Tilak, you are very bitter in your

speeches and writings." टिळकांनी ताबडतोब पुढीलप्रमाणे उत्तर दिलें: "Yes, some of you have too much butter." मालवीयजींनी स्मित केलें व दुसरा विषय काढला.

## बेळगाव जिल्ह्यांत टिळकांचा दौरा

सन १९१७ सालींच बेळगाव जिल्हा सभा चिकोडी येथे भरविण्यांत आली होती. या सभेचा पुढाकार तेथील वकील सखारामपंत कुलकर्णी यांनी घेतला होता. दादासाहेब करंदीकर हे अध्यक्ष होते. स्वागत-मंडळाच्या तर्फे टिळक, परांजपे, केळकर वगैरे मंडळींना आमंत्रणें गेलीं होतीं. मींही टिळकांना एक खासगी पत्र लिहिलें होतें. त्याप्रमाणे टिळक वगैरे मंडळी चिकोडीला आली. टिळकांचीं चिकोडीला दोनतीन भाषणें झालीं व निरनिराळ्या संस्थांतर्फे त्यांना मानपत्रें देण्यांत आलीं. १९१६ पासून ब्राह्मणेतर चळवळीला आमच्या जिल्ह्यांत प्रारंभ झाला होता, तरी चिकोडीला ब्राह्मणेतरांतर्फे टिळकांना पानसुपारी झाली व त्यांचें भाषणही झालें. निपाणीच्या आमंत्रणावरून सर्व मंडळी चिकोडीहून निपाणीला गेली. ते दिवस गुऱ्हाळाचे होते. त्यामुळे चिकोडीपासून निपाणी-पर्यंत वाटेंतील खेड्यांच्या लोकांनी टिळकांना उतरून घेऊन पानसुपारी करावी व खेड्यांतील रीतींना अनुसरून रस, ताजा गूळ, व गुळावरील साय सर्व मंडळींना वाटण्यांत यावी. खेड्यांतील साध्या पाहुणचाराचा स्वीकार टिळक मोठ्या प्रेमाने घेत असत. टिळक, गांधीजी, लजपतराय, शौकतअल्ली वगैरेंच्याबरोबर फिरण्याचा मला अनुभव आहे. या सर्वांत लोकांनी केलेल्या स्वागताचा स्वीकार करण्यांत टिळक जितका त्रास सहन करीत असत तितका इतर करीत नसत. शौकतअल्लींना अशा स्वागताची हौस असे. पण त्यांत कृत्रिमपणा दिसत असे. टिळकांच्या बाबतींत लोकांचें जितकें प्रेम स्वाभाविक व मनापासून असे तितकेंच टिळकांचेंही असे. टिळकांच्या या स्वभावामुळे त्यांना पुष्कळ त्रास होई. जागरणें होत असत, वेळेवर जेवणखाण होत नसे, व सर्व कार्यक्रमांत अनियमितपणा येत असे. पण भक्तिभावाने त्यांना पाहण्याकरिता येणाऱ्या हजारों स्त्रीपुरुषांचें समाधान होऊन प्रचाराचें कामही सहजासहजीं होत असे. गांधीजींची दिनचर्या अगदी नियमित ठेवण्यांत येत असे. त्यांचा व्याप टिळकांच्याही पेक्षा जास्ती असल्यामुळे त्यांच्या बाबतींत तसा नियमितपणा ठेवणें जरूरही आहे. पण पुष्कळ वेळां हजारों लोकांना निराशही व्हावें लागे.

निपाणीचा कार्यक्रम सायंकाळचा ठरविला होता. पण या खेड्यांच्या पानसुपाऱ्यांचा व स्वागतसमारंभांचा स्वीकार करून निपाणीला पोचण्याला दहा वाजून गेले व निपाणीला दिवाबत्ती वगैरे लावून शृंगारलेल्या रस्त्यांनी बिऱ्हाडीं पोचण्याला मध्यरात्र उलटून गेली! त्यामुळे सर्व कार्यक्रम दुसरे दिवसावर टाकणें भाग पडलें. दुसरे दिवशीं सभा होऊन टिळक, खाडीलकर, वगैरेंचीं भाषणें झालीं.

## 'क्यारप्पा लोकमान्य'

या त्यांच्या लहानशा दौऱ्यांत मी व वेळवी दोघेही त्यांच्याबरोबर होतों. प्रत्येक भाषणांत टिळक हे स्वराज्याच्या प्रश्नासंबंधाने ऊहापोह करीत व आपल्या हिंदुस्थानांतील प्रत्येक हालअपेष्टेला स्वराज्याचा अभाव हें कारण सांगून स्वराज्य हाच सर्वकल्याणाचा मुख्य उपाय आहे असें सांगत.

आमच्या प्रांतांत एका खेड्यांत एक मनुष्य होता. तो प्रत्येक रोगावर उपाय म्हणून रोग्याच्या अंगावर विब्ब्याच्या फुल्या काढीत असे. कानडींत बिब्ब्याला 'क्यार' म्हणतात. ज्या त्या रोगावर हा 'वैद्य' क्यारचा उपयोग करीत असे, म्हणून याला लोकांनी 'क्यारप्पा' असें नाव ठेवलें होतें. या वैद्याप्रमाणेच राष्ट्राच्या सर्व आधीव्याधींना स्वराज्य हा एकच उपाय आहे असें टिळक सांगत. म्हणून वेळवींना व मला क्यारप्पाची आठवण झाली व एका मुक्कामांत आम्हीं विनोदाने टिळकांचें नाव क्यारप्पा असें ठेवलें. ही गोष्ट आम्हीं टिळकांना सांगितली. त्यांनाही मौज वाटली, व सर्व मंडळींबरोबर तेही मोठमोठ्याने हसूं लागले.

## वऱ्हाड-नागपूरकडे दौरा

टिळक या दौऱ्यानंतर वऱ्हाड-नागपूरकडे मोठ्या दौऱ्यावर गेले. त्याच वेळीं मध्यप्रांतांतील चांदा येथे त्या जिल्ह्याची परिषद भरविण्याचें ठरविलें होतें व त्यांच्या इच्छेप्रमाणे परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें मीं कबूल केलें होतें. टिळक या प्रांतांत दौऱ्यावर असतांनाच मी त्यांना त्यांच्या वर्ध्याच्या मुक्कामांत भेटलों. १९२१ नंतर वर्ध्याचा व माझा बराच संबंध आला. पण या वेळीं पहिल्यांदाच मी या गावीं गेलों. रात्रीं वर्ध्याच्या बाजारपेठेंत सभा झाली. टिळकांचें भाषण झालें व त्यानंतर मीही बोललों. वऱ्हाड-मध्यप्रांतांतून टिळकांना बराच पैसा लोकांनी दिला व त्याचा उपयोग चळवळींकडे झाला. वर्ध्याहून आम्ही सर्व चांद्याला गेलों. टिळकांची जंगी मिरवणूक निघाली. मी जिल्हा सभेचा अध्यक्ष असल्याने मलाही टिळकांबरोबर मिरवणुकींत गाडींत बसण्याचा मान मिळाला. पण टिळकांबरोबर बसून माळा घालून घेण्याचा प्रसंग येई त्या वेळीं मला किती वेळां तरी लाजेने मान खाली घालावी लागत असे! गेल्या दिवशींच चांद्याच्या बाजारपेठेंत जंगी जाहीर सभा भरून थैली अर्पण करण्याचा समारंभ झाला. या सभेचें अध्यक्षस्थान मलाच देण्यांत आलें होतें. दुसरे दिवशीं जिल्हा-सभेला प्रारंभ झाला. जिल्हा-सभेंतही टिळकांचें भाषण झालें. या वेळीं चांद्याचे बळवंतराव देशमुख, डॉ. श्रीधरपंत केतकर वगैरे मंडळींची ओळख झाली. जिल्हा-सभेचें काम संपल्यानंतर टिळक आपल्या दौऱ्यावर हिंगणघाट, नागपूर वगैरेकडे गेले आणि मी व वीर वामनराव जोशी उमरावतीला आलों. उमरावतीस दोन दिवस राहून मी परत बेळगावास आलों.

## बेझंटबाई आणि कलकत्त्याची काँग्रेस

बेझंटबाईच्या सुटकेसंबंधानें देशांत बरीच मोठी चळवळ झाली होती व त्याही बऱ्याच लोकप्रिय झाल्या होत्या. त्यांनी स्वराज्याच्या चळवळींत पुढाकार घेतला असल्यामुळे त्यांच्या किंवा त्यांच्या थिऑसफीच्या पंथाविरुद्ध जे आक्षेप घेण्यांत येत होते ते बरेच कमी झाले होते.

म्हणून कलकत्त्याच्या त्या वर्षीच्या काँग्रेसचें अध्यक्षस्थान त्यांनाच देण्यांत यावें असें लोकमत होतें आणि त्याप्रमाणे १९१७ सालच्या काँग्रेसच्या अध्यक्ष बाईच झाल्या. कलकत्त्याच्या काँग्रेसला जाण्याकरिता डॉ. साठे यांनी स्पेशल गाडीची व्यवस्था केली होती व त्याच गाडीने टिळकांबरोबर आम्ही सर्व मंडळी कलकत्त्याला गेलों. कलकत्ता काँग्रेसची व्यवस्था राष्ट्रीय पक्षाच्या व बाईच्या पक्षाच्या हातांत होती. त्यामुळे टिळक, बेझंटबाई व दास वगैरे मंडळींच्या धोरणाने काँग्रेसचें सर्व काम चाललें. या काँग्रेसला गांधीजीही आले होते. पण त्यांनी काँग्रेसच्या कामांत विशेष भाग घेतला नाही.

कलकत्त्याच्या १९१७ सालच्या काँग्रेससंबंधाने एक गोष्ट विशेष महत्त्वाची माझ्या नजरेस आली. महायुद्धाकरिता हिंदुस्थानची मदत घेण्याची आवश्यकता उत्पन्न झाल्या-नंतर इंग्लंडमध्ये हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कांही सुधारणा करण्याच्या कल्पना निघूं लागल्या व कित्येकांनी त्या बाबतींत सूचनाही करण्याला प्रारंभ केला. तिकडे Round Table या नावाची एक संस्था असून तिच्यामार्फत कर्टिस या नावाचे एक गृहस्थ हिंदुस्थानांत येऊन येथील कांही सरकारी अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने त्यांनी एक योजना तयार केली होती व तिला इकडील कांही पुढाऱ्यांची संमती मिळविण्याची खटपट चालविली होती. ही सर्व खटपट गुप्तपणें चालली होती. पण तिचा स्फोट होऊन ती योजना प्रसिद्धही करण्यांत आली. यामुळे हें गुप्त कारस्थान चव्हाट्यावर आलें. त्या योजनेंत मध्यवर्ती राज्यकारभारांत कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ न करतां तो जशाच्या तसाच निरंकुश ठेवून प्रांतिक कारभारांत मात्र स्वायत्ततेचे हक्क लोकांना द्यावेत, असा एक मुद्दा होता. खरोखरच ही योजना अंमलांत आणतांना प्रांतिक सत्तादेखील किती मर्यादित केली गेली असती हें हल्लीं चालू असलेल्या इंग्रजांच्या धूर्तपणावरून स्पष्ट दिसतच आहे. तथापि या योजनेला राष्ट्रांतील पुढाऱ्यांची गुप्तपणें संमती मिळविण्याचा डाव कर्टिस व त्यांच्याशीं सहकार्य करणारे अधिकारी यांनी टाकला होता व त्याला इकडील कांही लोक बळीही पडले होते. त्यांत बंगालचे देशबंधू दास हे होते, ही गोष्ट आश्चर्याची ! बंगाल प्रांत इतर सर्व प्रांतांपेक्षा पुढारलेला आहे व बंगालला प्रांतिक स्वायत्तता मिळाली म्हणजे आमच्या प्रांताची तरी प्रगती झपाट्याने होईल असें त्यांना वाटलें असावें ! पण कर्टिस मंडळीचा हा कावा टिळकांच्या लक्षांत आला व मध्यवर्ती राज्यकारभाराचीं सूत्रें लोकांच्या हातीं दिल्याखेरीज खरी सत्ता लोकांच्या हातीं येणार नाही, असें प्रतिपादन करण्याला त्यांनी सुरुवात केली. कलकत्त्यास दासबाबू व टिळक यांच्यामध्ये या विषयाबद्दल चर्चा

झाली. दासबाबूंना टिळकांचें म्हणणें पूर्णपणें पटलें नसावें. तथापि त्यांनी टिळकांच्याकरिता म्हणून ती गोष्ट मान्य केली. आजदेखील हाच प्रश्न राष्ट्रापुढे प्रामुख्याने आला आहे आणि आज हिंदी पुढाऱ्यांचें मत टिळकांच्या त्या वेळच्या मताप्रमाणेच आहे व त्या बाबतींत रण माजून राहिलें आहे. हें पाहिलें म्हणजे टिळकांच्या दूरदर्शित्वाबद्दल आदर वाटतो.

## *गांधीजी चंपारण्यांत गेले*

या कॉंग्रेसच्या वेळीं चंपारण्य येथील मळेवाल्यांच्या जुलमाबद्दलचीं गाऱ्हाणीं गांधीजींच्या कानावर घालण्यांत आलीं असावींत. त्यामुळे गांधीजी बिहारमध्ये तिकडील स्थिती स्वतः पाहण्याकरिता गेले. त्यांनी तिकडील स्थिती पाहून मळेवाल्यांनी तेथील गरीब शेतकऱ्यांवर चालवलेल्या जुलमाबद्दल खात्री करून घेतली व त्याचा प्रतिकार करण्याबद्दल प्रयत्न करण्याचें टरविलें. गांधीजी चंपारण्यामध्ये असतांना तो जिल्हा सोडून जाण्याबद्दल मळेवाल्यांच्या खटपटीने गांधीजींना नोटीस मिळाली, पण ती त्यांनी मानली नाही, व त्यामुळे त्यांच्यावर खटला भरण्यांत आला व त्यांत त्यांना सोडून देण्यांत आलें, वगैरे गोष्टी प्रसिद्धच आहेत. मळेवाल्यांनी रयतेला आपल्या जुलमाने अगदी जर्जर करून सोडलें होतें. याबद्दलची चवकशी करून रिपोर्ट करण्याबद्दल सरकारने एक कमिशन नेमलें व त्यांत गांधीजींचाही समावेश करण्यांत आला. कमिशनच्या रिपोर्टांत जुलमाचे बरेच प्रकार उघडकीस आले व त्यांचा प्रतिकार करण्याचे मार्गही सुचवण्यांत आले. याप्रमाणे गांधीजींच्या पदरांत बरेंच यश पडलें. तथापि एवढ्याने त्यांचें समाधान झालें नाही. चंपारण्यांतील रयतेची इतकी विपन्न स्थिती झाली होती की, त्यांच्यामध्ये मनुष्यपणादेखील राहिला नव्हता. त्यांच्या स्थितीकडे कोणाचेंही यापूर्वी लक्ष गेलें नव्हतें. गांधीजींनी त्यांची हीन स्थिती प्रत्यक्ष पाहिल्यानंतर त्यांच्या प्रेमळ अंतःकरणांत त्या लोकांची स्थिती सुधारण्याचे उपाय योजण्याची इच्छा उत्पन्न झाली. बाबू राजेंद्रप्रसाद, ब्रिजकिशोर बाबू, गोरख बाबू यांसारख्या बिहार प्रांतांत मान्यता असलेल्या पुढाऱ्यांची त्यांना सहानुभूती मिळाली.

## *बाबासाहेब सोमण चंपारण्यांत*

गांधीजींनी या कामाला मनुष्यबळ पाहिजे म्हणून मागणी केली. काका कालेलकरांनीही या बाबतींत मला पत्र लिहून माझ्याजवळ या कामाला उपयोगी पडण्यासारखे कोणी असतील तर त्यांना पाठवण्याबद्दल सूचना केली. माझे स्नेही बाबासाहेब सोमण माझ्याबरोबर काम करीत होतेच. त्यांना मीं विचारलें व त्यांनी जाण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणे ते चंपारण्यांत गेले. एका खेडेगावांत (भीतिहारवा येथे) त्यांची योजना करण्यांत आली. त्यांच्याशिवाय सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे डॉ. देव, सौ. अवंतिकाबाई गोखले व त्यांचे भ्रतार बबन गोखले

हेही तिकडे गेले. बाबासाहेबांच्या मदतीला कांही दिवस गांधीजींनी आपल्या पत्नी सौ. कस्तुरबा यांनाही पाठवलें होतें. भीतिहारवा येथे बाबासाहेबांनी एक शाळा काढली होती. ती एका गवताच्या झोपडींत होती. एके दिवशीं रात्रीं त्या झोपडीला आग लागली. बहुतेक मळेवाल्यांच्या चिथावणीने हें काम झालें असावें, असा तेथील लोकांचा संशय होता. झोपडी जळल्यानंतर बाबासाहेबांनी स्वतः आपल्या हातांनी पक्की इमारत बांधण्याला सुरुवात केली. त्यामुळे त्या खेड्यांतील लोकांची त्यांना मदत मिळाली व इमारत लवकर तयार झाली. त्याच इमारतींत शाळा चालू झाली. बाबासाहेबांच्या कामाबद्दल तिकडील मंडळीचें मत उत्तम प्रकारचें झालें. त्याचप्रमाणे त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीसंबंधाने गांधीजींनाही समाधान झालें. बाबासाहेबांनी तिकडे कांही महिने काम केल्यानंतर ते परत आले. त्यांच्या जागीं आमच्याकडे कोणी जाण्याजोगा असल्यास पाठवावें, अशी मला गांधीजींकडून सूचना आली.

### *पुंडलीकजींच्या 'भलत्या कल्पना'*

बाबासाहेबांच्या जागेवर पुंडलीकजी चंपारण्यांत गल्या वेळीं ते अगदी तरुण होते व त्यांच्या डोकींत त्या वेळी 'भलत्या कल्पना' होत्याच. त्यामुळे गांधीजींची काम करण्याची पद्धत त्यांना पूर्णपणें पटत नव्हती. अहिंसेचीं तत्त्वें कांही मर्यादेपर्यंत ते मानण्याला तयार होते. पण तीं त्यांना सर्वांशीं पटलीं नव्हतीं व जगाचा अनुभवही त्यांना त्या वेळीं फारसा नव्हता. गांधींसारख्या तत्त्वनिष्ठ मनुष्याच्या वतीने काम करावयाचें म्हणजे तें त्यांच्याच पद्धतीने केलें पाहिजे ही साधी गोष्टदेखील त्या वेळीं त्यांना समजली नव्हती. गांधीजींच्या कामांत त्यांचे प्रतिनिधी म्हणून पडावयाचें व त्यांच्या मार्गाचा व पद्धतीचा स्वीकार न करतां विपरीत कांही तरी करीत राहावयाचें ही प्रवृत्ति अद्यापि देखील पुष्कळ कार्यकर्त्यांत दिसून येते. त्यावेळीं गांधीजींच्या कार्याला नुकता प्रारंभ झाला झाला होता त्यामुळें पुंडलीकजींनी एक वर्षपर्यंत तेथे राहून पुष्कळ नेटाने व धैर्याने काम केलें. अर्थात सरकारांत त्यांच्याबद्दल मळेवाल्यांनी बऱ्याच कागाळ्या केल्या. त्यामुळे बिहार प्रांत सोडण्याबद्दल डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टाप्रमाणे त्यांना हुकूम देण्यांत आला व सरकारने त्यांना मुंबईस आणून सोडलें. बिहार प्रांतिक परिषद भरल्यावेळीं पुंडलीकजींच्या कामाचा गौरवपूर्वक उल्लेख करून त्यांना सरकारने बिहार सोडण्याबद्दलचा हुकूम दिल्याबद्दल सरकारचा निषेध करण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला. पुंडलीकजींनी तिकडील लोकांचें प्रेम संपादन केलें.

श्री. बाबासाहेब सोमण व श्री. पुंडलीकजी या दोघांनीही चंपारण्यामध्ये चांगलें काम केल्याचें मला गांधीजींनी स्वतः कळविलें. चंपारण्यांतून पुंडलीकजी साबरमतीस गांधीजींच्या आश्रमांत गेले. साबरमती आश्रमांत एक वर्षपर्यंत राहून, आश्रमांतील संस्कार घेऊन व शिक्षणक्रम पूर्ण करून ते माझ्याकडे पुन्हा आले. असहकार-युगांतील साधकाश्रमामध्ये पुंडलीकजींनी आश्रम-व्यवस्थापकाचें कामही यशस्वी रीतीने पार पाडून

दाखविलें. बेळगावचा स्वराज्याश्रम, बेळगावची राष्ट्रीय शाळा, मिरजेची सारावंदीची चळवळ व सामुदायिक सत्याग्रह, इत्यादि कामें आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर पुंडलीकजींनी प्रामुख्यानें भाग घेऊन यशस्वी करून दाखविलीं आहेत.

### शंकर दत्तात्रेय देव यांचा संबंध

याच वेळीं माझा व शंकर दत्तात्रेय देव यांचा संबंध आला होता. मुंबईस माझी व त्यांची प्रथम भेट झाली. त्या वेळीं ते बी. ए. झाले होते. गरिबीमुळे त्यांना मुंबईस शिकवण्या वगैरे धरून अभ्यास करण्याचा प्रसंग होता. छत्रे मास्तर यांना मुंबईची या बाबतींत माहिती असल्यामुळे बरेच लोक त्यांच्याकडे येऊन शिकवण्यांबद्दल तपास करीत असत. अशाच उद्देशाने देवही त्यांच्याकडे येत असावेत. त्यांच्या घरीं मीही राहात असें. त्यामुळे त्यांच्या मार्फत माझी व देवांची ओळख झाली. ओळख झाल्यानंतर माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी त्यांच्याशीं सार्वजनिक गोष्टी बोलूं लागलों. त्यांच्यासारख्यांनी सार्वजनिक कामांतच पडणें इष्ट आहे, असें मी माझ्या बोलण्यांत प्रतिपादन करीत असें. त्यांचीही इच्छा तशी असेलच. माझ्याशीं विचारविनिमय केल्यामुळे त्यांच्या इच्छेला मूर्तस्वरूप येऊन त्यांनी माझ्याबरोबर बेळगावला येण्याचा विचार केला व मीं त्यांना माझ्या बरोबर बेळगावला नेलेंही. बेळगावास व माझ्या गावीं म्हणजे हुदलीस ते माझ्याबरोबर कांही दिवस राहिले. त्यांच्या बोलण्याचालण्यावरून व त्यांच्या कळकळीवरून सार्वजनिक कामाला त्यांचा उपयोग चांगला होईल असें मला वाटलें व त्यांना मीं बरेंच उत्तेजन दिलें. या स्थितींत पुंडलीकजींच्या जागेवर चंपारण्यांत कोणाला तरी पाठवण्याची संधी आली. मीं देवांना विचारलें व त्यांनी संमती दिली. त्याप्रमाणें त्यांना मीं चंपारण्यांत भीतिहारवा येथे पाठविलें. त्यांनीही तिकडे उत्तम काम केलें व तेव्हापासून त्यांच्या सार्वजनिक आयुष्याला प्रारंभ झाला. आतापर्यंत त्यांनी तें काम चिकाटीने व निःस्वार्थबुद्धीने चालविल्याचें महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे.

शंकरराव देव परत आल्यानंतर माझ्यामार्फत तिकडे चंपारण्यांत कोणी गेलें नाही. तिकडील स्थानिक कार्यकर्ते कामालाही मिळूं लागले व काम सुरळीत चालू झालें. त्यामुळे इकडून कोणाला पाठवण्याची आवश्यकताही उरली नाही. मी स्वतः जाऊन वर्ष-सहा-महिने तिकडे काम करून अनुभव घेऊन येण्याचें माझ्या मनांत आलें होतें. पण हा योग आला नाही.

### रिक्रूटभरती, टिळक आणि गांधी

तथापि गांधीजींचा व माझा जास्ती जास्ती संबंध येत चालला होता. काका कालेलकर हे आम्हांला जोडणाऱ्या दुव्याप्रमाणे होते. गांधीजींच्या विचारांची माहिती मला त्यांच्यातर्फे बरीच होत गेली. कांही कांही दिवस

त्यांची अहिंसा हें त्यांनी घेतलेलें एक पांघरूण आहे असें मला वाटत होतें. गांधीजीं-सारख्या सात्त्विक मनुष्यालादेखील ढोंगाने जीवित कंठावें लागतें, असें मी खासगी रीतीने बोलत असें. महायुद्धासारख्या हिंसाकांडांत त्यांनी इंग्रज सरकारला मनापासून मदत करण्याचें काम चालविलें होतें, हें त्यांचें वर्तन मला त्यांच्या अहिंसा-तत्त्वाच्या विरुद्ध वाटत होतें. रिक्रूटिंगच्या बाबतींत प्रथम अनुकूल मत प्रदर्शित करून पुढे पुढे ते स्वराज्याच्या मागणीचें घोडें हळूहळू दामटीत चालले होते. म्हणजे त्यांच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ मला असाच दिसत होता की, जर इंग्रजांनी आमची स्वराज्याची मागणी मान्य केली तरच आम्हीं त्यांना मदत करावी, नाही तर करूं नये. सैन्यांत शिरल्याने आपल्या लोकांना लष्करी शिक्षणाचा फायदा मिळाला असता, ही गोष्ट ते वारंवार नमूद करीत असत. पण त्यापेक्षा इंग्लंडला हिंदुस्थानच्या मदतीची अपेक्षा असल्याने याच वेळीं स्वराज्यदानाचें पाणी इंग्रजांच्या हाताने सुटण्याचा जास्ती संभव आहे, म्हणून स्वराज्याची मागणी एकमुखाने व निकराने याच वेळीं करावी असें टिळकांचें धोरण होतें, अशी माझी समजूत आहे. आणि याच धोरणाने मी माझीं त्या वेळचीं भाषणें करीत असें. काकासाहेब खाडीलकरही त्याच धोरणाचा पुरस्कार करीत असत. या संधीला ते बेळगावास आले होते. त्यांचें एक जाहीर व्याख्यान करण्याचें मीं ठरविलें होतें, व त्याप्रमाणे हस्तपत्रकें गावांत वाटलीं होतीं. पण हें धोरण सरकारला मान्य नव्हतें. सरकारला हिंदुस्थानाकडून बिनशर्त मदत पाहिजे होती व हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्यांत येणार असल्याबद्दल इंग्लंडच्या मुत्सद्द्यांच्या तोंडून जीं आश्वासनें देण्यांत येत होतीं त्यांवर आम्हीं विश्वासून असावें असें सरकारला वाटत होतें. पण टिळकांना हें पसंत नव्हतें, हें वर सांगितलेंच आहे. खाडीलकर टिळकांच्या धोरणाने बोलणार याची जाणीव बेळगावच्या अधिकाऱ्यांना असल्यामुळे त्यांनी त्यांच्यावर मनाईचा हुकूम काढून भाषण करण्याची बंदी केली. तथापि, ठरल्याप्रमाणे आम्हीं सभा भरविली. खाडीलकर सभेंत हजर होते. पण माझेंच भाषण झालें, व मी माझ्या भाषणांत खाडीलकर जे मुद्दे मांडणार होते तेच मांडले.

उलट पक्षीं, गांधीजी हे इंग्लंडला संकटाच्या वेळीं हिंदुस्थानने बिनशर्त मदत करावी, या मताचे प्रमुख पुरस्कर्ते होते. महायुद्ध सुरू झालें त्या वेळीं ते इंग्लंडमध्ये होते व तेथे जखमी, आजारी वगैरे लष्करी लोकांची शुश्रूषा करण्याचें काम त्यांनी आपल्या अंगावर घेतलें होतें. १९१७-१९१८ सालीं त्यांनी इकडे रिक्रूट मिळवून देण्याबद्दल अत्यंत परिश्रम केले. गुजरातमध्ये ते खेडोपाडीं हिंडून रिक्रूटभरतीचें काम करीत असत व त्यामुळे त्यांना पुढे संग्रहणी होऊन ते अत्यवस्थ झाले. गांधीजींचें हें धोरण त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वाविरुद्ध आहे, असें मला वाटत असे. या बाबतींत त्यांचे लेख व भाषणें मीं वाचलीं. पण त्यांनी माझें समाधान झालें नाही. खुद्द इंग्लंड व इतर युध्यमान राष्ट्रांतील शांततावादी (Pacifist) लोकांनीदेखील आपल्या ध्येयाचा त्याग केला नाही. आपापल्या लोकांत लढाईच्या विरुद्ध लोकमत उत्पन्न करण्याचा

प्रयत्न ते करीत होते व त्याबद्दल अनेकांना कारागृह, देशत्याग, मानहानीसारख्या आपत्ती भोगाव्या लागल्या. गांधीजींचें अहिंसातत्त्व तर त्यांच्या शांततावाद्यांपेक्षा (Pacifist) किती तरी उच्च दर्जाचें असें असून रिक्रूटभरतीसारखें काम हे कां करीत असत याबद्दल मला शंका येत असे: आणि पुष्कळ वेळां अहिंसेचें पांघरूण घेतल्याखेरीज सद्यःस्थितींत कोणतीही चळवळ जोरांत होणें शक्य नाही, म्हणून गांधीजी हा डाव खेळत असतील, असें मानून मी माझें समाधान करून घेत असें !

राजकारणाच्या दृष्टीने देखील त्यांचें हें करणें मला चुकीचें वाटत होतें. बोलून-चालून इंग्लंडने आपला स्वार्थ साधावा म्हणूनच हिंदुस्थानांत चालू राज्यपद्धती स्थापिली आहे. त्यामुळे त्यांचें हित तें आमचें अहित असणें ही गोष्ट अगदी साहजिक आहे. अशा प्रकारचा आमचा व त्यांचा संबंध असतां बिनमोबदल्याने हिंदुस्थानने आपला पैसा व रक्त निरर्थक खर्चीं टाकावीं हें खऱ्या मुत्सद्दीपणाच्या विरुद्ध आहे असें मला वाटे. या दोन्ही दृष्टींनीं गांधीजींचें वर्तन मला पटत नव्हतें. मलाच असें नव्हे, तर टिळकपक्षांतील बहुतेकांचें मत अशाच प्रकारचें होतें. कित्येक उघड बोलत असत व कित्येक बोलत नसत, एवढाच फरक.

### *विजापुरांत मुंबई प्रांतिक परिषद्*

अशा स्थितींत मुंबईची वार्षिक प्रांतिक परिषद् भरविण्याची वेळ आली व ती विजापूर येथे विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरली. महायुद्धांत इंग्लंडला हिंदुस्थानने कां व कशा प्रकारें मदत करावी, हा विषय चर्चेकरिता परिषदेपुढे यावयाचा होता. वर सांगितल्याप्रमाणे गांधी व टिळक यांच्या धोरणांत विरोध होता. आणि दोघेही परिषदेंत हजर राहून आपापली बाजू मांडणार आहेत अशी लोकांची अपेक्षा होती आणि दोन मोठ्या पुढाऱ्यांतील हा वाद ऐकण्याची लोकांची इच्छा होती ! गांधीजी विजापूरला ठरल्याप्रमाणे आले. पण टिळक येऊं शकले नाहीत. त्यामुळे लोकांची निराशा झाली व गांधीजींच्या "बिनशर्त मदत द्यावी" अशा सूचनेला विरोध करण्याचें काम माझ्यावर सोपवण्यांत आलें. या बाबतींत मीं कर्नाटकांत बरींच भाषणें केलीं होतीं व लोकमत जागृत केलें होतें. आणि कर्नाटकांतच परिषद् भरत असल्याकारणाने साहजिकपणें गांधीजींना विरोध करण्याचें काम माझ्याकडे देण्यांत आलें असावें. गांधीजींच्याबद्दल माझ्या मनांत आदर असल्यामुळे त्यांना विरोध करणें मला सोपें नव्हतें. तथापि टिळकांच्या गैरहजेरींत त्यांची बाजू मांडणें मला माझें कर्तव्य वाटलें व माझें मतही टिळकांच्या सारखेंच होतें, म्हणून हें काम करण्याचें मीं कबूल केलें. पण गांधीजींनी टिळकांच्या गैरहजेरींत आपली सूचना मांडण्याचा बेत रहित केला, त्यामुळे माझ्यावर सोपविलेल्या विरोधाचें कामही उरलें नाही.

या परिषदेच्या वेळीं आणखी एक गोष्ट घडली. महाराष्ट्रांत हल्लीं सेनापती बापट या नावानें प्रसिद्ध असणारे पां. म. बापट हे परिषदेला आले होते. त्या वेळीं हे टिळकांच्या 'मराठा' पत्राचे संपादक होते. पण मराठा पत्राचें सामान्य धोरण व बापटांचें धोरण हीं पुष्कळ अंशीं निरनिराळीं होतीं. बापटांचा पूर्वेतिहास मला माहीत असल्यानें, त्यांची व माझी प्रत्यक्ष ओळख जरी फारशी नव्हती तरी, त्यांच्या-बद्दल मला आदर वाटत होता. विजापुरास त्यांची व माझी ओळख विशेष झाली. त्या वेळीं देशांत जिकडेतिकडे रिक्रूटभरतीचें काम जोरांत चाललें होतें व रिक्रूट मिळवण्याकरिता लोकांवर जुलूम सक्ती करण्यांत येत होती असा बराच बोभाटा झाला होता आणि तो अगदींच निराधार होता असें नाहीं. विजापुरासही भरतीचें काम चाललें होतें. परिषदेच्या मंडपापासून बिऱ्हाडाला जाण्याच्या रस्त्यावर एका इमारतींत रिक्रूट ठेवण्याची व्यवस्था केली होती. एक दिवस त्या इमारतीज़वळून बापट वगैरे मंडळी जात असतां एका तरुण मनुष्याला कांहीं लोक त्या इमारतींत ओढून घेऊन जात होते व त्यांच्यामागें एक म्हातारी बाई आरडाओरडा करीत चालली होती असें दृश्य दिसलें. तो तरुण मनुष्यही मागें पाही व आपले डोळे पुशी. हें पाहून आम्ही थांबलों व हें काय प्रकरण आहे याची चवकशी केली. तेव्हां हा सर्व प्रकार रिक्रूटभरतीचा असून, ज्या तरुणाला नेत होते तो एका खेडेगावचा असून आपल्या म्हाताऱ्या विधवा आईचा एकुलता एक मुलगा आहे व त्याच्यावर जुलूम होत आहे असें समजून आलें. हा सर्व हृदयद्रावक देखावा पाहून सर्वांना वाईट वाटलें, व कित्येकांनीं जास्ती चवकशी करण्याला प्रारंभ केला. पण अधिकाऱ्यांनीं दाद लागूं दिली नाहीं. हें पाहतांच बापटांचें डोकें भडकलें व त्यांच्या दुःखाचा वेग इतका अनिवार्य झाला कीं, ते मोठमोठे हुंदके देऊन रडूं लागले. कांहीं वेळ ते देहभानावर नव्हते, असें जवळच्या मंडळींना वाटलें. त्याच स्थितींत त्यांना बिऱ्हाडीं नेण्यांत आलें. अंदमान बेटांतील व इकडील तुरुंगांत खितपत पडलेल्या मित्रांची त्यांना आठवण होऊन, आपल्या हातून कांहीं काम होत नाहीं म्हणून त्यांना अतिशय वाईट वाटूं लागलें. त्यांची समजूत करण्याचा मीं पुष्कळ प्रयत्न केला व शेवटीं गोविंदराव याळगींना त्यांच्याजवळ ठेवून मी कांहीं जरुरीच्या कामाकरिता गेलों. परत आल्यावेळीं बापट हे बरेच शांत झाले होते व आमच्याबरोबर बेळगावला येऊन कांहीं दिवस राहण्याचा त्यांचा विचार ठरला होता. त्याप्रमाणें परिषदेचें काम आटपल्या-नंतर त्यांना घेऊन आम्ही बेळगावास गेलों. या उदाहरणावरून बापटांचें अंतःकरण किती कोमल व त्यांच्या भावना किती तीव्र आहेत याचा अनुभव मला आला. बापट माझ्याबरोबर बेळगावला गेले आहेत असें टिळकांना जेव्हां कळलें, तेव्हां त्यांनीं मुद्दाम मला पत्र लिहून त्यांना कांहीं दिवस विश्रांतीकरता माझ्याजवळच ठेवून घ्यावें असें लिहिलें. माझ्या सहवासांत बापटांच्या कांहीं वृत्ती सौम्य होतील असें कदाचित टिळकांना वाटून

त्यांनी मला असें लिहिलें असावें. त्यांच्या सहवासांत त्यांच्याशीं बोलण्याचे अनेक प्रसंग आले. पण माझ्यासारख्याच्या बोलण्याने किंवा विचाराने त्यांच्या मनावर काय परिणाम होणार? कांही दिवस ते बेळगावला राहून परत पुण्यास गेले. पुढे त्यांचा व मराठा पत्राचा संबंधही सुटला व टिळकांची त्यांच्या बाबतींत कांही अंशीं निराशाही झाली असावी.

## *टिळक-गांधीजींची चर्चा*

महायुद्धांत मदत मिळवण्याकरिता कॉन्फरन्सेस निरनिराळ्या ठिकाणीं सरकारी अधिकारी भरवीत असत. त्याप्रमाणे मुंबईसही एक कॉन्फरन्स त्या वेळचे गव्हर्नर लार्ड वुइलिंग्डन यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आली. या कॉन्फरन्सला टिळकांनाही आमंत्रण होतें. मी त्या वेळीं मुंबईसच होतों व टिळकांच्या बरोबर सरदारगृहांतच उतरलों होतों. टिळकांनी आपल्या धोरणाला अनुसरून कॉन्फरन्समध्ये बोलण्याचें ठरविलें होतें. त्यांनी आपल्या भाषणाचें एक टाचणही लिहून तयार केलें होतें. तें त्यांनी तेथे असलेल्या मंडळींना वाचून दाखवून त्यांची संमती घेतली होती. सदरहू कॉन्फरन्समध्ये गांधीजींचें भाषण होण्याचें प्रसिद्ध झालें होतें. गांधीजींनीही आपल्या भाषणांत आपल्याच धोरणाने बोलावें, असें टिळकांना वाटत होतें. म्हणून गांधीजींची भेट घेऊन त्यांच्याशीं चर्चा करावी, असें टिळकांनी ठरविलें होतें. त्याप्रमाणे टिळकांची व गांधीजींची सरदारगृहांत भेट झाली. मी या भेटीच्या वेळीं हजर होतों. टिळकांनी आपली बाजू गांधीजींच्या पुढे मांडली. पण स्वराज्यासंबंधाने या वेळीं आपण कांही बोलूं नये, असेंच गांधीजींचें मत पडलें आणि म्हणून टिळकांच्या धोरणाचें कॉन्फरन्समध्ये समर्थन करण्याला ते तयार होईनात. तथापि, टिळकांच्या बोलण्याचा त्यांच्या मनावर इतका परिणाम झाला की, त्यांनी कॉन्फरन्समध्ये कांहीच न बोलण्याचें ठरवलें. ही गोष्टदेखील कांही कमी महत्त्वाची होती असें नाही. गांधीजींसारखा बिनशर्त मदत करावी म्हणणारा मनुष्य, त्याचें भाषण होणार हें प्रसिद्ध होऊनही आयत्या वेळीं बोलण्याचें कां टाळतो, याबद्दल लोकांना अचंबा वाटणें साहजिकच होतें. गांधीजींनी बोलण्याचें टाळण्यांत त्यांचा कांही तरी हेतू असावा, असेंच लोकांना वाटलें आणि त्यांचें मौनच जास्ती परिणामकारक झालें. त्यामुळे टिळकांचें समाधान झालें. ही भेट संपतेवेळीं टिळक गांधीजींना पोचवण्याकरिता उभे राहिले, व त्यांच्या पाठीवर हात फिरवून खालील आशयाचे उद्गार त्यांनी काढले, "तुम्हांला अद्यापि या सरकारचा पुरा अनुभव आला नाही. माझ्या आयुष्याचीं चाळीस वर्षे यांच्याशीं झगडण्यांत गेलीं आहेत व माझीं बोटें भाजून निघालीं आहेत (My fingers have been burnt). माझ्याप्रमाणेच तुम्हांलाही लवकरच अनुभव येईल, त्या वेळीं, माझी खात्री आहे की, तुम्ही माझ्यापुढे धाव घ्याल." गांधीजी थोडे हसले व निघाले. इतक्या वर्षांनंतर ही गोष्ट व टिळकांच्या तोंडचे कांही शब्द माझ्या ध्यानांत कसे राहिले, असें वाटण्याचा संभव आहे. पण बेळगावच्या कॉन्फरन्सच्या वेळींच टिळकांचा व गांधीजींचा संबंध यावा असें मला

वाटत होतें, वहें मीं वर वेळगाव कॉन्फरन्सची हकीकत लिहीत असतां नदमूही केलें आहे. तेव्हापासून टिळकांचें गांधीजींसंबंधानें काय मत आहे हें मी लक्षपूर्वक पाहात असें. आणि पुढे १९२० सालीं कलकत्त्याच्या स्पेशल कॉंग्रेसपुढे जेव्हा महात्माजींनी असहकारितेचा ठराव मांडला त्या वेळीं टिळकांचें भविष्य खरें झालें असें मला वाटलें. त्यानंतर राष्ट्रीय पक्षानें कोणतें धोरण स्वीकारावें याबद्दल टिळकांच्या अनुयायांत जेव्हा चर्चा झाली त्यावेळीं मला लोकमान्यांच्या या उद्गारांची पक्की आठवण झाली व मीं माझें पुढील धोरण ठरविलें. टिळक हयात असते तर १९२० सालानंतर टिळकांनी काय धोरण स्वीकारलें असतें हा एक मोठा वादाचा मुद्दा आहे आणि त्याचा निकाल अद्यापि लागला नाही. पण माझ्या मतें टिळकांनी गांधीजींशीं मिळतेंच घेऊन दोघांनी मिळून काम केलें असतें. असें माझें मत होण्याला मुंबईच्या वॉर कॉन्फरन्सच्या वेळीं टिळकांची व गांधीजींची जी भेट झाली व गांधीजींचें व आपलें एकमत व्हावें म्हणून टिळकांनी जी आतुरता दाखवली व जे वरील उद्गार काढले तें एक कारण होतें. (याबद्दल आणखी एकदोन कारणें मी पुढे देणार आहें.) म्हणून लोकमान्यांचे हे शब्द माझ्या ध्यानांत राहिले, व त्यांचा उल्लेख मी वारंवार माझ्या मित्रांशीं बोलतांना केला आहे.

### *प्रत्यक्ष कॉन्फरन्समध्ये काय घडलें?*

कॉन्फरन्सला टिळक गेले व तेथे त्यांनी ठरवल्याप्रमाणे बोलण्याला प्रारंभ केला. पण अध्यक्ष गव्हर्नर व कोल्हापूरचे शाहूमहाराज यांसारख्या मंडळींना त्यांचें बोलणें खपलें नाही आणि मध्येच अध्यक्षांनी टिळकांना बोलूं दिलें नाही. सभेंत गडबड उडाली. टिळक, करंदीकर, हॉर्निमन, जमनादास द्वारकादास, जीना वगैरे मंडळी कॉन्फरन्स सोडून उठून बाहेर आली. पुढे कॉन्फरन्स-मध्ये सर चंदावरकर वगैरे मंडळींचीं भाषणें झालीं. त्यांत चंदावरकरांचें भाषण बऱ्याच मंडळींना रुचलें नाही. कॉन्फरन्स सोडून मंडळी पुन्हा सरदारगृहांत जमली व आपल्या-तर्फेचें एक स्टेटमेंट त्यांनी तयार केलें व तें दुसऱ्या दिवशीं प्रसिद्ध केलें. कॉन्फरन्समध्ये गांधींनी भाषण केलें नाही. कार्यक्रमपत्रिकेंत बोलणाऱ्यांचे यादींत त्यांचें नाव होतें. पण न बोलण्याचें ठरवल्यानंतर त्यांनी त्याप्रमाणे व्यवस्थापकाला कळविलें होतें. म्हणून त्यांच्या नावावर तांबड्या शाईचा काट देण्यांत आला होता असें मीं ऐकलें. त्यामुळे साहजिकच लोकांचें तिकडे लक्ष जाऊन गांधींनी बोलण्याचें कां नाकबूल केलें असावें, याबद्दल तर्ककुतर्क लोकांत चालले. कॉन्फरन्सचें काम संपल्यानंतर गांधीजी टिळकांना सरदारगृहांत येऊन भेटून गेले व दुसरे दिवशीं चंदावरकरांच्या भाषणावर त्यांनी टीका करून एक पत्र प्रसिद्ध केलें असें मला आठवतें. गांधीजींनी कॉन्फरन्समध्ये टिळकांच्या धोरणाच्या समर्थनार्थ बोलून आपलें मत बदललें असें दाखविण्यापेक्षा बोलण्याचें कबूल करून बोलण्याचें टाळलें या कृतीनेच सरकारच्या धोरणाचा त्यांनी जास्ती निषेध दाखविल्यासारखें केलें असें सर्व मंडळींना वाटलें.

## *टिळकांची मनधरणीची खटपट*

१९१८ सालीं मुंबईला स्पेशल कॉँग्रेस भरली. तिचें अध्यक्षस्थान पाटण्याचे प्रसिद्ध बॅरिस्टर हसन इमाम हे होते. हे नुकतेच मरण पावले. या कॉँग्रेसला पुष्कळ नेमस्त पुढाऱ्यांनी हजर राहण्याचें टाळलें होतें. बेझंटबाई व टिळक यांच्या हातीं कॉँग्रेसची सत्ता पूर्णपणें गेली असें वाटून मुंबईचे नेमस्त पुढारी मुंबईत हजर असून कॉँग्रेसला आले नाहीत. टिळकांनी वाच्छा, सेटलवाड, वगैरे पुढाऱ्यांची पुष्कळ मनधरणी करून त्यांनी कॉँग्रेसला हजर असावें अशाबद्दल खटपट केली. वाच्छांसारख्यांनी त्यांना तुसड उत्तरें देऊन एकप्रकारें त्यांची मानहानीच केली. पण टिळकांनी तें मुळीच मनावर घेतलें नाही. टिळकांप्रमाणेच नेमस्तांना जवळ असलेले पं. मालवीय यांनीही खटपट करून पाहिली. त्यांच्या सूचनेवरून कॉँग्रेसची बैठक एक दिवस लांबणीवर टाकण्यांत आली. तथापि मुंबईच्या नेमस्तांची समजूत निघाली नाही व ते गैरहजरच राहिले. गांधीजींनी कॉँग्रेसला यावें अशी टिळकांची अतिशय इच्छा होती. माझा गांधीजींशीं संबंध जास्ती आला होता ही गोष्ट त्यांना माहीत होती. त्यांना निरोप पाठवून त्यांना बोलावणें पाठवावें, असें टिळकांनी ठरवलें आणि एखाद्या त्यांच्या माहितीच्या जबाबदारी ओळखणाऱ्या मनुष्याला त्यांच्याकडे पाठवण्याच्या विचाराने, कोणाला पाठवावा याबद्दल त्यांनी मला विचारलें. मीं त्यांना बाबासाहेब सोमणांचें नाव सुचवलें. तें त्यांना पसंत पडून त्यांना पत्र देऊन गांधीजींकडे रवाना केलें. पण गांधीजींची प्रकृति आमांशाने अत्यंत अस्वस्थ असल्यामुळे ते येऊं शकले नाहीत. मुंबईचे इरसाल नेमस्त जरी कॉँग्रेसला हजर राहिले नाहीत तरी लल्लुभाई सामळदास, सर दिनशा पेटीट, यांच्यासारखी कांही मंडळीं हजर राहिली व त्यांनी कॉँग्रेसच्या कामांत भागही घेतला. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रश्न त्या वेळीं महत्त्वाचा होता. स्टेट सेक्रेटरी मॉंटेग्यू इकडे येऊन स्वतः सर्व परिस्थिती पाहून गेले होते. इंग्लंडला हिंदुस्थानची मदत पाहिजे होती आणि ती हिंदुस्थानांतील लोकांना पसंत पडेल अशी योजना केल्याखेरीज मिळणार नाही असें इंग्लंडांतील मुत्सद्यांना वाटत होतें. इतकी अनुकूल परिस्थिती असल्यावेळीं हिंदुस्थानांतील सर्व पक्षांनी एक होऊन एकमुखी मागणी करणें किती जरुरीचें होतें, हें कोणालाही सहज कळण्यासारखें आहे. पण इतकी साधी गोष्टदेखील आमच्या नेमस्तांपैकी कांही पुढाऱ्यांना कळूं नये अथवा कळत असूनही त्यांचें वर्तन अशा प्रकारें व्हावें ही आश्चर्याची गोष्ट आहे. तेव्हापासून अनेकदा राजकीय घडामोडींत असे प्रसंग आले. पण नेमस्तांनी आपल्या वृत्तींत फेरफार केल्याचीं उदाहरणें फारच थोडीं सापडतील.

## *टिळकांची तारतम्यबुद्धी*

या कॉँग्रेसच्या वेळीं डॉ. बाबासाहेब परांजपे यांना एक कल्पना सुचली. ती ही की, कॉँग्रेसच्या सर्व प्रतिनिधींनी स्वदेशी

पोषाखांतच आलें पाहिजे असा नियम अंमलांत आणावा. ही कल्पना अंमलांत आणण्याकरिता ते खटपट करीत होते व त्याप्रमाणे लोकमत तयार करण्याचें काम त्यांनी चालविलें होतें. कोणतीही गोष्ट त्यांनी मनावर घेतली म्हणजे ते किती एक-निष्ठेने (किंवा एककल्लीपणाने) काम करतात हें प्रसिद्धच आहे. इतकी खटपट करून जर कांही प्रतिनिधी परदेशी पोषाखांतच मंडपांत आले तर त्यांचा जाहीर निषेध व्हावा अशीही त्यांची इच्छा होती. ही गोष्ट टिळकांना कळली. तेव्हा त्यांनी बाबांना या प्रयत्नापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. दोघांचाही कडाक्याचा वाद झाला. दोघेही आपापल्या मताचे अभिमानी व दोघांनाही मोठ्याने बोलण्याची सवय. तेव्हा वाद कोणत्या सप्तकांत व किती जोरांत चालला असेल याची कल्पना येईलच. शेवटीं, तुमचें म्हणणें मला पटत नाही; पण आज्ञा म्हणून मी पाळण्याला तयार आहें, असें बाबांनी निक्षून सांगितलें. टिळकांनी तितक्याच जोरांत "हो हो, माझी आज्ञा म्हणूनच तुम्हीं पाळली पाहिजे." असें सांगितलें व हें प्रकरण मिटलें. टिळकांना स्वदेशीचा अभिमान नव्हता असें कोणी म्हणणार नाही. पण कोणत्या प्रसंगीं कोणतें धोरण ठेवावें हें टिळकांना कळत होतें. कॉंग्रेस यशस्वी होऊन मुख्य ठराव एकमताने मंजूर व्हावेत अशी त्यांची इच्छा होती व त्याकरिताच त्यांनी बाबांना उत्तेजन दिलें नाही. यांतच टिळकांची तारतम्यबुद्धी दिसून येते. ही तारतम्यबुद्धी पुढाऱ्यांत नसली तर लहानशा गोष्टीमुळेदेखील महत्त्वाचीं कामें बिघडतात.

विषयनियामक कमिटींत नवीन राज्यकारभाराच्या घटनेंत गव्हर्नर व व्हाइसरॉय यांना किती अधिकार असावेत याबद्दल टिळक व मद्रासचे शर्मा यांच्यामध्ये वाद-विवाद झाला. (हे शर्मा पुढें व्हाइसरॉयसाहेबांच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे सभासद झाले.) त्या वेळीं कॉंग्रेसमध्ये असें धोरण स्वीकारलें जातें असें जर आम्हांला कळलें असतें तर आम्ही कॉंग्रेसला आलोंच नसतों अशा अर्थाचे उद्गार शर्मांच्या तोंडून बाहेर पडले. हें ऐकून टिळकांनी आपल्या भाषणांत 'बालानां रोदनं बलम्' या सुभाषिताचा उपयोग करून उत्तर दिलें. त्यावरोवर "आम्हांला बाल म्हणून टिळक आम्हांला अज्ञान पोरांत काढतात व अशा प्रकारची थट्टा ही शिष्टाचाराला सोडून आहे" अशी तक्रार शर्मा यांनी अध्यक्षांकडे केली. अध्यक्षांनी हसतमुखाने "टिळकांसारख्या देशभक्तांनी मला पोर म्हटल्यास मला आनंद होऊन मी तें भूषण मानीन" असें म्हणून ही बाब विनोदांत घालवली व सर्व वातावरण शांत होऊन पुढील कामाला सुरवात झाली.

याच कॉंग्रेसच्या वेळीं मीं राजगोपाळाचार्य यांना प्रथम पाहिलें. त्याचप्रमाणे नेहरू पितापुत्र हे आले होते. जवाहरलालही नखशिखांत परदेशी व पाश्चात्य पद्धतीच्या पोशाखांत होते.

प्रकरण पंधरावें

# टिळकांच्या गैरहजेरींत

### *चिरोल खटल्याकरिता प्रस्थान*

मुंबईच्या स्पेशल कॉंग्रेसनंतर कांही दिवसांनी टिळक चिरोल खटल्याकरितां विलायतेला जावयाला निघाले. त्याच वेळीं स्वराज्य-संघातर्फे व कॉंग्रेसतर्फे पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्षी होणार होत्या. स्वराज्य-संघातर्फे टिळकांची योजना झाली होती. टिळक मुंबईहून कोलंबो मार्गाने इंग्लंडला जावयाचे होते. त्यांना पोचवण्याकरिता पुष्कळ मंडळी आली होती. त्यांत मीही होतों. टिळकांना मुंबईस अनेक संघांतर्फे पानसुपाऱ्या झाल्या व कांही ठिकाणीं थैल्या नजर करण्यांत आल्या. अनेक ठिकाणांहून त्यांच्यावर अभीष्टचिंतनपर तारांचा वर्षाव होत होता. त्यांना निरोप देण्याकरिता फ्रेंच पुलाजवळील एका खुल्या जागेंत जंगी जाहीर सभा भरली होती. त्या सभेंत माझेंही भाषण झालें.

पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्ष देण्याकरिता व चिरोल खटल्याकरिता अशा दोन उद्देशाने ते निघाले होते. हे दोन्ही उद्देश मला मनापासून मान्य नव्हते. चिरोल खटल्याला राजकीय स्वरूप देण्यांत येऊन मुंबई सरकाराने चिरोलला मदत दिली होती. डिस्ट्रिक्ट जज्जाच्या दर्जाच्या एका स्वतंत्र अधिकाऱ्याची सरकारतर्फे नेमणूक करण्यांत आली होती. त्याशिवाय सरकारी दप्तरांतील कागदपत्रांचा पुरवठा करणें व अवांतर पुरावा मिळवून देणें हीं कामेंही सरकारतर्फे चाललींच होतीं. कोल्हापूरकर महाराजांचें पूर्ण पाठबळ होतें. या गोष्टी अनपेक्षित घडल्या असेंही मानतां येणार नाही. टिळकांनी चिरोलवर दावा करण्याचें ठरविल्याबरोबरच मुंबई सरकारनें चिरोलला मदत करण्याचें ठरविलें असलें पाहिजे. मुंबई सरकार हें हिंदुस्थान सरकार व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या सल्ल्यावाचून या भानगडींत पडण्याचाही संभव नव्हता. या गोष्टी असंभवनीय आहेत असें मानण्यालाही कारण नव्हतें. हिंदी राजकारणांत असलेलें

टिळकांचें स्थान आणि त्यांचा व सरकारचा परस्पर पूर्वप्रारसंबंध लक्षांत घेतां सरकार या खटल्यांत तटस्थ राहून न्यायबुद्धीनेच वागेल असें कोणालाही वाटण्यासारखें नव्हतें. त्यांतून अटकळीपेक्षा किती तरी पटीनें जास्ती खर्च झाला होता व पुढेही व्हावयाचा होता. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे चिरोलवर फिर्याद लावण्यांत टिळकांनी चूक केली असें कोणालाही वाटेल. टिळकांना इतका अनुभव आला असूनही राजकीय बाबतींत इंग्रजांच्या न्यायदानपद्धतीवर त्यांचा विश्वास असावा व त्यांनी इतका खटाटोप करावा हें चमत्कारिक वाटण्यासारखें आहे. सर्व मनुष्यांमध्ये 'माणुसकी' (यालाच ईश्वरी अंश असें म्हणतां येईल) आहे. या दृष्टीनें इंग्रजांवर विश्वास ठेवून गांधीजी आपलें राजकारणाचें धोरण ठरवीत असतात. पण अशा प्रकारचें तत्त्वज्ञान राजकारणांत चालत नाही, म्हणून गांधीजींना राजकारण कळत नाही, असें म्हणणारे टिळकांचे अनुयायी म्हणवून घेणारे अनेक आहेत, हें मला माहीत आहे. त्यापैकी पुष्कळांना मीं हें चिरोल खटल्याचें कोडें मला समजून देण्याबद्दल विनंती केली. पण अद्यापि कोणीं समाधान-कारक उत्तर दिलें नाही. चिरोलनें केलेले सर्व आरोप कोर्टांत उघडकीला आणून ते किती निराधार आहेत याची जगाला खात्री पटवून दिली, तरी इंग्रजांची न्यायबुद्धी पक्षपाती आहे, असें जाहीर रीतीनें सिद्ध करण्याचाच टिळकांचा हेतू होता, असें कित्येक म्हणतात ! पण या खटल्यांत आपल्याला खात्रीनें यश येणार असें टिळकांना वाटत होतें हें माहीत असणाऱ्या माझ्यासारख्याला वरील कोटिक्रम कसा पटणार ?

त्याचप्रमाणे पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्षी देऊन आमच्या पदरांत कांही भरीव दान पडेल असेंही मला वाटत नव्हतें. हिंदी लोकांनी अशी अद्यापि कोणतीच जोराची चळवळ केली नव्हती की जिच्या वजनानें इंग्रजांवर दडपण येऊन त्यांनी आमच्या मागणीची पर्वा करावी. वंगभंगाच्या चळवळीच्या वेळीं बहिष्काराला जोर आला होता. पण तोही वंगभंग रद्द झाल्यानंतर ओसरत चालला होता. इंग्लंड अडचणींत आहे म्हणून कांही तरी करील एवढीच आम्हांला आशा होती. पण अशाच नादांत व आशेंत आम्हांला ठेवून वेळ मारून न्यावयाची व आपलें काम मात्र साधा-वयाचें हा खेळ इंग्लंड आमच्याबरोबर खेळत होतें असें मला वाटत होतें. अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत घोळत असल्यामुळे टिळकांनी साक्षीला जाऊं नये असें माझें मत होतें. मात्र हें टिळकांना सांगण्याची माझी योग्यता नव्हती व मला तितकें धैर्यही नव्हतें. पण फ्रेन्च पुलाजवळील भरलेल्या सभेंत बोलण्याचा जेव्हा प्रसंग आला त्या वेळीं माझ्या मनांतील विचारांना वाचा फुटली. टिळकांच्या जाण्यानें भ्रमाचा भोपळाच फुटेल असे उद्गार माझ्या तोंडून एकदम बाहेर पडले. वास्तविक अशा प्रकारचे विचार त्या प्रसंगीं प्रदर्शित करणें अप्रस्तुत होतें. मीं त्या सभेंत बोलण्याचें टाळावयालाच पाहिजे होतें. माझें भाषण सर्वांनी शांतपणें ऐकून घेतलें, इतकेंच नाही तर बऱ्याच लोकांना तें पटलें असावें असें मला वाटतें. सभा संपल्यानंतर सरदारगृहाकडे जातांना वाटेंत टिळकांनी मीं अशा प्रकारचें भाषण करावयाला नको होतें, असें मला सांगितलें.

टिळकांच्या बरोबर वासूकाका, तात्यासाहेब केळकर, दादासाहेब खापर्डे अशी मंडळी निघाली होती. बॅप्टिस्टा पूर्वींच गेले होते. इंग्लंडला जाण्याची मलाही संधी मिळेल असें माझ्या पुष्कळ मित्रांना वाटत होतें आणि मीं तशी इच्छा दर्शविली असती तर माझीही वर्णी लागली असती.

### *टिळकांनी सांगितलेलीं दोन कामें*

टिळकांनी जातेवेळीं मला एकदोन कामें सांगितलीं होतीं त्यांचा उल्लेख करणें येथे जरूर आहे. त्यांपैकी एक काम हें होतें की, ताईमहाराजांचे दत्तकपुत्र जगन्नाथमहाराज यांना प्रसंगविशेषीं सल्ला देऊन मीं टिळक करीत होते तें काम त्यांच्या गैरहजेरींत करावें. जगन्नाथमहाराजांची व माझी ओळख करून देऊन त्यांच्या समक्ष हें काम त्यांनी मला सांगितलें. आणि दुसरें काम म्हणजे मीं पुण्यास टिळकांच्या गायकवाडवाड्यांत राहून 'केसरी'कडे व इतर सार्वजनिक कामांकडे लक्ष द्यावें. माझा स्वभाव थोडा भिडस्त असल्यामुळे मी त्यांच्याकडे जेवण वगैरे करण्याला संकोच करीन असें वाटून आपले भाचे धोंडोपंत विद्वांस यांना वाड्यांत स्वतंत्र जागा देऊन माझी व्यवस्था करण्यास त्यांनी सांगितलें. हीं दोन्ही कामें मी करीन असें त्यांना मीं कळवलें. पहिलें काम माझ्या आटोक्यांतील होतें. ताईमहाराज प्रकरणांतील सर्व जोखमीचीं कामें आटोपलीं होतीं. तेव्हा सर्वसाधारण कामांत जगन्नाथमहाराजांना जेव्हा जरुरी वाटेल तेव्हा योग्य सल्ला देण्यास माझी हरकत नव्हती. त्याशिवाय महाराजांचे कारभारी व टिळकांच्या विश्वासांतील यशवंतराव कुलकर्णी हें काम पाहात होतेच. त्यामुळे ही कामगिरी पत्करण्याला मला अडचण वाटली नाही.

पण दुसरी बाब तशी नव्हती. पुणें हें महाराष्ट्राच्या संस्कृतीचें, विद्वत्तेचें केंद्र समजलें जातें. पुण्याची परंपराही उज्ज्वल आहे. गेल्या पन्नासपंचाहत्तर वर्षांत देशांत ज्या अनेक घडामोडी झाल्या त्यांचें अग्रेसरत्व पुण्याकडेच आहे. विशेषतः राजकारणांत पुण्याचा लौकिक फारच मोठा होता. अशा महत्त्वाच्या शहरांत टिळकांनी चालविलेलें काम चालू ठेवणें हें माझ्या शक्तीबाहेरचें होतें. पण टिळकांचीच तशी इच्छा होती, म्हणून मीं रुकार दिला होता. तथापि पुण्यांत येऊन राहण्याचा योग आला नाही.

### *आम्ही कोलंबोपर्यंत गेलों*

मुंबईहून निघतेवेळीं इंग्लंडला जाणाऱ्यांना पोचवण्याकरिता डॉ. साठ्ये, डॉ. वेलकर, बाबासाहेब खापर्डे, मी व बाबुराव गोखले अशा पाचसहा मंडळींनी कोलंबोपर्यंत जाण्याचें ठरविलें. आमचा पहिला मुक्काम मद्रासचा झाला. मुंबईपासून मद्रासपर्यंत वाटेंत प्रत्येक मोठ्या स्टेशनावर हजारों लोक टिळकांच्या दर्शनाला येत. मद्रासमध्ये आमचा मुक्काम बेझंटबाईंच्या अड्यारमध्ये होता व तेथील कार्यक्रम वगैरे सर्व गोष्टी बाईंनीच ठरविल्या होत्या. मद्रास शहरांत टिळकांना अनेक

संस्थांकडून मानपत्रें देण्यांत आलीं. टिळकांचीं भाषणेंही समयोचित झालीं. अड्यार-मध्ये एका भव्य वटवृक्षाखाली एक दिवस सायंकाळीं बाईंनी एक मेजवानीचा समारंभ घडवून आणला. टिळक, खापर्डे, बिपिनचंद्र पाल, केळकर, करंदीकर यांचीं भाषणें झालीं. बाईंची टापटीप, नियमितपणा, कामाची हौस वगैरे पाहून मला आश्चर्य वाटलें.

मद्रासहून बोटमेलने सर्व मंडळी निघाली. कोलंबोपर्यंत मध्ये मुक्काम कोठेच झाला नाही. तथापि तंजावर, मदुरा, रामेश्वर इत्यादि सर्व ठिकाणच्या स्टेशनांवर पानसुपाऱ्या होतच होत्या व लोकांचे थवेच्या थवे जमत असत. संध्याकाळीं बोटमेल (आगगाडी) सोडली व रात्रीं नऊ वाजण्याच्या सुमाराला सीलोनच्या 'तळे या मनार' धक्क्यावर पोचलों. दुसरे दिवशीं सकाळीं कोलंबोला गेलों. तेथे कोलंबोच्या मंडळींनी एक स्वागतमंडळ नेमून त्याच्यामार्फत सर्व मंडळींची व्यवस्था केली होती. टिळकांचीं व पालबाबूंचीं व्याख्यानें झालीं. बुद्धधर्म आणि हिंदुधर्म यांचा तुलनात्मक विचार टिळकांनी आपल्या भाषणांत केला. कोलंबो येथील पुष्कळ विद्वान व पुढारी मंडळी व्याख्यानाला आली होती.

कोलंबोच्या स्वागतमंडळींत पोवार या नावाचे एक मराठा गृहस्थ प्रमुख होते. ते कोलंबो म्युनिसिपालिटींत एका मोठ्या हुद्द्याच्या जागेवर होते. त्यांचें कुटुंब व सूनबाई यांनी जेवणाखाण्याची व्यवस्था उत्तम ठेवली होती. पोवारांच्या सूनबाई या बेळगावच्या. त्यांचे वडील गणपतराव माने व माझा विशेष परिचय होता. ते नुकतेच वारले. कोलंबो येथील हिंदी लोकांनी (चट्टी, सिंधी, वगैरे) टिळकांचें स्वागत उत्तम प्रकारें केलें. परदेशांत गेलें म्हणजे जातिभेद, वर्णभेद, प्रांतभेद, भाषाभेद कसे कमी होतात याचा मासला सिलोनच्या मुक्कामांत पाहण्याला मिळाला.

कोलंबोहून ज्या बोटीने टिळक वगैरे मंडळी निघणार होती ती बोट बंदरांत येऊन दाखल झाली. जाणाऱ्या मंडळींनी आपलें सामानसुमान बंदरावर पाठवलें. मंडळी निघणार इतक्यांत इंग्लंडचे पासपोर्ट रद्द करण्यांत आले अशी बातमी आली. कोलंबो येथील सेक्रेटरिएटमध्ये जाऊन तपास केला. बातमी खरी ठरली. टिळकांनी तारा वगैरे केल्या. पण त्यांचा उपयोग कांही झाला नाही. टिळकांनी व विलायतेला जाणाऱ्या मंडळींनी कांही दिवस कोलंबोसच मुक्काम केला. पण मी तेथे राहिलों नाही. परत येतेवेळीं सिलोनची पुरातन राजधानी अनुराधापुर येथील जुनीं देवालयें व ऐतिहासिक स्थळें पाहिलीं. कँडीला जाऊन आलों. सिलोनच्या लोकांना आपल्या बेटाच्या नैसर्गिक सौंदर्याबद्दल मोठा अभिमान वाटतो व तसा अभिमान वाटणें योग्य आहे असें सिलोन पाहणाऱ्या कोणत्याही मनुष्याला वाटेल,

वाटेंत रामेश्वर, मदुरा हीं प्रेक्षणीय क्षेत्रें पाहिलीं. रामेश्वरास आडवेळीं गेल्याकारणाने दर्शनाची अडचण झाली. पण टिळकांच्या मंडळींपैकी मी असून कोलंबोहून परत येत आहें असें समजल्यानंतर दर्शनाची अडचण दूर झाली. बाबासाहेब खापर्डे, डॉ. वेलकर व मी असे तिघे परत फिरलों होतों. मदुरेहून खापर्डे मद्रासला गेले, मी बेंगळूरवरून

बेळगावला उतरलों व केळकर पुढे मुंबईला गेले. कोलंबोला मागे राहिलेली मंडळी कांही दिवसांनी परत आली. अर्थात मला पुण्याला जाऊन राहण्याचें कारणच पडलें नाही. पुढे टिळक विलायतेला गेल्यानंतर केळकर मागे राहिले. त्यामुळेही मला पुण्यास राहण्याचा प्रसंग आला नाही. तथापि, टिळक गेल्यानंतर मी दोनचार वेळां पुण्याला गेलों होतों. केळकर, विद्वांस वगैरे मंडळींना भेटलों. पण भेटींत माझ्या पुण्यास येण्यासंबंधानें त्यांनी गोष्ट काढली नाही व मीही कांही बोललों नाही. त्यामुळे टिळकांनी केलेली या बाबतींतील व्यवस्था तशीच राहिली. जगन्नाथमहाराजांना व त्यांचे कारभारी यशवंतराव यांना मी भेटत असें व त्यांचा माझा पत्रव्यवहारही होता. पण या बाबतींतही विशेष महत्त्वाची गोष्ट कांही घडली नाही.

### *भारतीय मराठा राजकीय परिषद*

याच सालच्या आणखी एक दोन महत्त्वाच्या गोष्टी नमूद करावयाच्या आहेत. १९१६ सालापासून रुद्रगौडा अर्ताळ व लठ्ठे वगैरे मंडळींच्या प्रोत्साहनानें ब्राह्मणेतर चळवळीला प्रारंभ झाला होता याची हकीकत पूर्वी आलीच आहे. मॉंटेग्यूसाहेब येथे असतेवेळीं या चळवळीला विशेष जोर आला होता. तथापि या चळवळींत बेळगावचे मराठे लोक प्रथम सामील झाले नव्हते. त्यांनी बेळगावास अखिल भारतीय मराठा राजकीय परिषद बोलावण्याचा बेत करून कॉंग्रेसच्या प्रगतिपर धोरणाला पाठिंबा देण्याचा विचार केला होता. परिषदेच्या व्यवस्थेंत माझे स्नेही भीमराव पाटील, बाळकृष्णराव लाड, रामतत्त्वप्रकाश छापखान्याचे मालक आबाराव सावंत वगैरे मंडळी प्रमुख होती. नवीन मंडळींपैकी नुकतेच वकील होऊन आलेले भुजंगराव दळवी यांनी पुढाकार घेतला होता. (हल्ली त्यांचीं मतें बदललीं. ते ब्राह्मणेतर पक्षाचे एक प्रमुख सभासद आहेत.)

मद्रासकडील एका मराठा जातीच्या गृहस्थांची अध्यक्षस्थानीं योजना केली होती. पण, आयत्या वेळीं त्या गृहस्थांनी आपल्याला येणें होत नाही असें कळविलें. त्यामुळे परिषदेच्या व्यवस्थापकांनी एखादा योग्य अध्यक्ष मिळवून देण्याबद्दल मला कळविलें. त्यावेळीं वीर वामनराव जोशी हे माझ्याकडे आले होते. त्यांच्या सूचनेवरून अमरावतीचे तरुण बॅरिस्टर रामराव देशमुख यांचें नाव मीं सुचविलें व त्यांना तें पसंत पडलें. परिषदेला अवधी थोडा राहिला असल्यामुळे रामराव हे कदाचित स्वागतमंडळाचें आमंत्रण स्वीकारणार नाहीत असें वाटल्यावरून वामनरावांकडून त्यांना एक अगत्याचें पत्र पाठविण्यांत आलें. रामरावांनी आमंत्रण स्वीकारलें व त्याप्रमाणे ते बेळगावला आले. त्यांची मिरवणूक काढण्यांत आली होती. आम्हीं सर्व कॉंग्रेसच्या मंडळींनी मिरवणुकींत व त्यांच्या स्वागतांत भाग घेतला होता. त्यांचीं मतें राष्ट्रीय पक्षाला अनुकूल असल्यामुळे त्यांचें भाषण त्याच धोरणावर झालें. ठरावही त्यांच्या भाषणाला अनुसरून झाले. परिषदेला आमच्याकडील मंडळींखेरीज बाबासाहेब देशमुख, विठ्ठलराव शिंदे वगैरे मंडळी

आली होती. परिषद चांगल्या प्रकारें झाली. बेळगावची मराठे मंडळी ब्राह्मणेतर पक्षाला मिळत नाहीत असें त्या पक्षांतील मंडळींना वाटूं लागलें. त्यांनी पुढे कोल्हापूरकर महाराजांच्या मदतीने प्रयत्न केला व बेळगावच्या मराठा मंडळींत फूट पाडली.

### अथणीची 'बेळगाव जिल्हा परिषद'

बेळगावच्या मराठा परिषदेनंतर अथणीस बेळगावची जिल्हा परिषद भरवण्याचें आम्हीं ठरविलें होतें. जिल्हा परिषदेचे नियोजित अध्यक्ष कृष्णाजीपंत खाडीलकर होते व या परिषदेला टिळकांनी हजर राहण्याचें कबूल केलें होतें. अथणीच्या लोकांनी जंगी तयारी केली होती. त्याच वेळीं अथणीसच ब्राह्मणेतर पक्षाची परिषद भरविण्याचें त्या मंडळींनी ठरविलें होतें. अथणीस लिंगायत व ब्राह्मण यांच्यामध्ये कांही स्थानिक बाबतींत (याबद्दलची हकीकत पुढे येईल) पुष्कळ दिवसांपासूनचा वाद होता. त्यामुळे स्थानिक बहुतेक लिंगायत ब्राह्मणेतर परिषदेला अनुकूल होते. पण अथणीचे लिंगायत ज्ञातींतील एक प्रमुख नुरेंदपा शेट्टी यांना जिल्हा परिषदेच्या स्वागतमंडळाचे अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें व तेच या परिषदेचे आधार-स्तंभ होते. म्युनिसिपालिटीचे जवळजवळ वीस वर्षें सतत अध्यक्ष असून लोकोपयोगी सर्व कामांत निःस्वार्थ बुद्धीने ते पुढाकार घेत असत. त्यामुळे त्यांच्या लिंगायत जातींत व इतर जातींत त्यांना मान्यता मोठी होती. त्यांनी स्वागताध्यक्षाचें काम करूं नये म्हणून त्यांच्यावर अनेक प्रकारचें दडपण आणण्यांत आलें, पण त्या गृहस्थांनी दाद दिली नाही. त्यामुळे अथणीच्या इतर लिंगायत लोकांना चीड येऊन त्यांनीही आपल्या परिषदेची जंगी तयारी केली. या चुरशीमुळे व टिळक हजर राहणार म्हणून जिल्हा परिषदेला प्रांतिक परिषदेचें स्वरूप आलें होतें. अथणीच्या स्वागतसमितींतील मंडळींनी आठनऊ हजार रुपये वर्गणी जमविली होती. त्यापैकी बरीच रक्कम खर्चही झाली. या परिषदेकरिता मराठा राजकीय परिषदेचे अध्यक्ष रामराव देशमुख, विठ्ठलराव शिंदे, बाबासाहेब देशमुख वगैरे मंडळी मुद्दाम बेळगावहून आली होती. त्याचप्रमाणे धारवाड-विजापूरचेही बरेच लोक आले होते.

अध्यक्ष खाडीलकर आणि टिळक यांची मिरवणूक काढण्यांत आली होती. मिरवणुकीच्या वेळीं कांही विघ्न उत्पन्न करावें किंवा मिरवणुकीचा उत्साहभंग होण्यासारखें कांही करावें असा ब्राह्मणेतर परिषदेच्या मंडळींचा हेतू होता. पण स्वागताध्यक्ष नुरेंदपा व त्यांचे सहकारी यांच्या खटपटीने व सावधगिरीने तो हेतू साध्य झाला नाही. टिळकांची मिरवणूक निर्विघ्नपणे व उत्साहांत पार पडल्यानंतर त्याच दिवशीं दोनप्रहरीं ब्राह्मणेतर परिषदेच्या लोकांनी बादशहाची तसबीर एका पालखींत ठेवून तिची मिरवणूक काढून आपली हौस भागवून घेतली!

परिषदेचें काम दोन दिवस चाललें होतें. विठ्ठलराव शिंदे यांच्या सांगण्यावरून अस्पृश्यतानिवारण करण्याचा ठराव घेण्यांत आला होता व तो मीं मांडावा अशी त्यांची

इच्छा होती. मला तो ठराव मान्य असल्यामुळे तो मीं मांडला व एकमताने तो पास झाला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्येही या ठरावाला मान्यता मिळाली आहे. पण आपल्याला टिळकांचे अनुयायी म्हणवून घेणारे कांही लोक राजकीय विषयाकरिताच भरविण्यांत येणाऱ्या सभांतून सामाजिक विषय घेऊं नयेत असें म्हणत असतात, व अस्पृश्यतानिवारणाचें आपलें तट्टू गांधींनी काँग्रेसमध्ये घुसडून दिलें म्हणून त्यांचेवर आक्षेप घेत असतात: तेव्हा त्यांनी खुद्द टिळकांच्याच तालमींत तयार झालेले व 'केसरी'चे चालक असलेले खाडीलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेंत आणि टिळक स्वतः हज़र असतांना अस्पृश्यतानिवारणाचा ठराव मंजूर झाला या गोष्टीकडे लक्ष द्यावें.

अथणीहून टिळक गणेशवाडी या नावाचा कुरुंदवाडकरांचा एक गाव आहे तेथे जाऊन पुण्याला गेले. रामराव देशमुख वगैरे पाहुणे मंडळी त्यांच्याबरोबरच पुण्याला गेली.

## *कानडी-मराठी वादाचीं पाळेंमुळें*

अथणीच्या स्वागत मंडळाने खाडीलकरांना अध्यक्ष निवडलें व पुष्कळ महाराष्ट्रीय मंडळींना आमंत्रण देऊन त्यांचा गौरव केला म्हणून कांही कर्नाटक-अभिमानी मंडळींना वाईट वाटलें. कित्येकांनी टिळक-खाडील-करांची ज्याप्रमाणे मिरवणूक काढली त्याप्रमाणे कर्नाटकाच्या पुढाऱ्यांची काढली नाही म्हणून अथणीच्या स्वागत मंडळीचा निषेध केला! धारवाडास कानडी-मराठी वाद थोडा धुमसत होता हें मला साधारणपणें ऐकून माहीत होतें. कांही स्थानिक बाबतींत मतभेद होऊन हा वाद उत्पन्न झाला असावा, अशी माझी कल्पना होती. पण या भांडणाचीं पाळेंमुळें इतकीं खोल गेलीं असतील अशी माझी कल्पना नव्हती.

टिळक, खापर्डे, करंदीकर, वासुकाका वगैरे मंडळी १९१८ सालीं विलायतला गेली. टिळकांना १९१८ सालच्या दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें; पण ते येथे नसल्यामुळे पंडित मालवीयजींची त्या जागेवर योजना झाली. दिल्ली काँग्रेसमध्ये काँग्रेसतर्फे पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्षी वगैरे देण्याकरिता कांही गृहस्थांची निवड करण्यांत आली. त्यांत टिळकांचें नाव होतें, पण बाईंना वगळण्यांत आलें. ही गोष्ट बाईंच्या मनाला लागली असावी. टिळक हिंदुस्थानांत असते तर त्यांनी ही चूक करूं दिली नसती.

## *स्वदेशीची उच्च नैतिक पातळी*

टिळक विलायतेंत असतांनाच गांधींनी स्वदेशी चळवळ चालवली होती व रौलट कमिटीला विरोध करण्याचें काम चालवलें होतें. स्वदेशीला उत्तेजन देण्याकरिता मुंबईस सभा भरत असत व बाहेरच्या मंडळींचीं

व्याख्यानें होत असत. मलाही एक व्याख्यान देण्याबद्दल आमंत्रण आलें होतें व त्या-प्रमाणे व्याख्यानाच्या दिवशीं मी मुंबईला गेलों. तेथे माझ्या व्याख्यानाला गांधीजींची अध्यक्ष म्हणून योजना झाली आहे असें मला कळलें. तेव्हां मला थोडा विचार पडला. दक्षिण आफ्रिकेंतील गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळीचा इतिहास मला थोडा थोडा माहीत झाला होता. त्यालाच आम्ही त्या वेळीं अडवणुकीचा मार्ग म्हणत होतों. १९२१ नंतर गांधीजींनी आपल्या मार्गाचें जें स्पष्टीकरण केलें त्याची जाणीव मला त्या वेळीं नव्हती. त्याचप्रमाणे एका उदात्त व त्रिकालाबाधित तत्त्वावर त्या मार्गाची उभारणी आहे त्याची कल्पनाही मला नव्हती. राजकारणांत ज्याला Direct action (प्रत्यक्ष प्रतिक्रिया) म्हणतात त्याच मार्गाचे गांधी पुरस्कर्ते आहेत अशी माझी समजूत होती. गांधीजींच्या मार्गांत Direct action तर आहेच, पण त्याच्या मुळाशीं क्रिती उच्च नैतिक व दैवी कल्पना आहेत याची जाणीव मला त्या वेळीं नव्हती.

स्वदेशीची चळवळ गांधींनी हातीं घेतली होती खरी. पण आमच्या स्वदेशीच्या कल्पनेंत ब्रिटिश मालाचा बहिष्कार येत होता. वंगभंगाच्या चळवळीपासून स्वदेशी व बहिष्कार हीं दोन्ही जुळ्यांप्रमाणे समजलीं जात होतीं. पण गांधीजींना ब्रिटिश मालावरचा बहिष्कार नको होता. त्यांत त्यांना ब्रिटिश लोकांचा द्वेष दिसत होता. त्यांचा मार्ग तर ब्रिटिश लोकांसंबंधाने प्रेम ठेवून त्यांनी येथे चालू केलेल्या राज्ययंत्राचा विरोध करणें हा होता. मला हा मार्ग एखाद्या कोड्याप्रमाणे वाटत असे. असंतोष, चीड, व कांहीं अंशीं द्वेष या भावना राजकारणांतून काढून टाकणें अशक्य आहे, असें मला वाटत होतें. गांधी मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध गोष्टी राजकारणांत आणूं पाहतात असें माझें मत होतें. शिवाय त्यांचीं मतें प्रामाणिक नसून राजकारणाचे जे अनेक डाव असतात त्यांतीलच हा एक प्रकारचा डाव ते धूर्तपणाने टाकीत आहेत असें मला वाटे. टिळकांपेक्षा हा मोठा वस्ताद मनुष्य आहे व सत्य, अहिंसा इत्यादि उच्च तत्त्वांच्या पांघरुणाखाली इंग्रजाबरोबर जशास तसें याच पद्धतीने तो वागतो आहे असें माझ्या मनाने घेतलें होतें. स्वदेशीवर बोलावयाचें व बहिष्कार त्याज्य म्हणावयाचें ही गोष्ट मला पटत नव्हती. व गांधीजींचें तर हें चळवळीचें सूत्र होतें. तेव्हा ते अध्यक्ष असतांना मीं काय बोलावें याबद्दल मला विचार पडला. बहिष्काराबद्दल कांहीच न बोलतां नुसत्या स्वदेशीबद्दल बोलावें असें मनांत आलें. पण असें केल्याने भ्याडपणा पदरांत पडतो असेंही वाटूं लागलें. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षांतील प्रमुख कार्यकर्त्यांपैकी मी एक आहें अशी माझ्यासंबंधाने थोडीफार प्रसिद्धीही झाली होती. म्हणून गांधींच्या भिडेखातर आमच्या पक्षाचीं स्वदेशीबद्दल मतें स्पष्टपणें न बोलतां राहणें हें कमीपणाचें वाटलें. शेवटीं गांधींना कांहीही वाटो, आपण नेहमीप्रमाणे बहिष्कारावरच जोर देऊन बोलावें असें मीं ठरविलें. काकासाहेब कालेलकरांकडून गांधीजींच्यासंबंधाने मला जी माहिती मिळाली होती तिजवरून मला वाटतें तें स्पष्ट बोलण्याने गांधीजींना राग येणार नाही, असेंही वाटत होतें. काय होईल तें होवो, बहिष्कारावर बोलावें असें ठरवून मी सभेला गेलों.

मराठी ग्रंथ ... ठाणें. स्थळप्रत.

सभेंत दक्षिणी मंडळीच विशेष होती. गुजराती थोडे होते. माझ्या भाषणांत मीं इंग्रजांच्या राज्यनीतीवर टीका केली व प्रतिकारार्थ बहिष्काराचाच उपयोग केला पाहिजे असें प्रतिपादन केलें. महाराष्ट्रीय श्रोत्यांना माझें म्हणणें पटलें व मधूनमधून टाळ्या वगैरे देऊन ते मला उत्तेजन देत होते. गांधी अध्यक्षाच्या खुर्चीवर स्वस्थ बसून स्मित करीत होते. त्यांच्या चर्येवरून आपल्या समारोपाच्या भाषणांत मला उत्तर देऊन माझा खरपूस समाचार ते घेतील अशी माझी कल्पना होती. लोकांचीही अपेक्षा तशीच असावी. माझें भाषण तास सव्वातास झाल्यानंतर गांधीजींनी दोनचार वाक्यांतच आपलें भाषण संपविलें. तेवढ्यांत त्यांनी माझ्याशी मतभेद असल्याचें मात्र सांगितलें. पण जास्ती कांही बोलले नाहीत! मला आश्चर्य वाटलें. सभा संपल्यानंतर जाते वेळीं मात्र दुसरे दिवशीं आपल्या बिऱ्हाडीं मला येण्यास सांगून ते गेले.

मी दुसरे दिवशीं त्यांच्याकडे गेलों. त्या वेळीं सिंधचे स्वामी गोविंदानंद तेथें होते. त्यांची व माझी ओळख नव्हती. मी जाऊन बसल्यानंतर आदल्या दिवसाच्या व्याख्यानाची त्यांनी गोष्ट काढली व बहिष्कार द्वेषमूलक कसा आहे याची त्यांनी चांगली फोड केली. परदेशी मालावर बहिष्कार घालण्यासंबंधाने त्यांची मान्यता होती. पण केवळ ब्रिटिश मालावर बहिष्कार घालणें यांत ब्रिटिश लोकांचा द्वेष केल्याप्रमाणे होऊन त्यांना एक प्रकारें शिक्षा केल्याप्रमाणे होतें आणि हें अहिंसेच्या तत्त्वाला बाधक आहे, असा त्यांच्या म्हणण्यांतील आशय होता. उलट मी असें होत असलें तरी यांत गैर कांही नाही, असें प्रतिपादन करीत होतों. स्वामी गोविदानंदांनी माझी बाजू घेतली होती व आपल्या भाषणांत माझ्यापुढेही ते जात असत. गांधीजी शांतपणें आमचें बोलणें ऐकत व नेहमीप्रमाणें थोडेथोडे हसत असत. या मुक्कामांत मी पाचसात दिवस मुंबईस होतों व दररोज गांधीजींकडे जात असें. त्यांना सवड होईल त्या वेळीं माझी समजूत घालण्याचा ते प्रयत्न करीत असत. पण मला त्यांचें म्हणणें पटत नव्हतें. तथापि या चर्चेपासून माझ्यावर एक परिणाम मात्र झाला. तो हा कीं गांधीजींच्यासंबंधानें माझें जें मत होतें (व जें मीं वर नमूद केलें आहे) त्यांत परिवर्तन झालें आणि हा मनुष्य खरोखरच सत्य व अहिंसेचा पूर्ण भक्त आहे अशी खात्री झाली. हिंदुस्थानच्या राजकारणाला हा नवीन वळण लावणार असेंही वाटूं लागलें. राजकारणांत सत्य व अहिंसा या तत्त्वांना स्थान नाही म्हणून तीं घुसडण्याचा प्रयत्न करणाऱ्या गांधीजींसंबंधाने माझ्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला नाही व त्याबद्दल त्यांची थट्टा उडवण्याचीही प्रवृत्ती झाली नाही. उलट ह प्रयोग गांधीजी कसा यशस्वी करून दाखवतात हें पाहण्याची प्रामाणिक जिज्ञासा उत्पन्न झाली आणि त्यांच्याबद्दल आदर वाटून आपल्याकडून होईल तितकें साहाय्य त्यांना करावें असें मनांत आलें. १९१६ पासून माझी व त्यांची प्रथम ओळख झाली तरी या प्रसंगा-मुळे मी त्यांच्या जास्ती निकट संबंधांत आलों. तेव्हापासून आतापर्यंत हा संबंध कायम राहिला, इतकेंच नव्हे तर त्यांत जास्ती जास्ती भर पडून त्यांनी राजकारणांत घालून

दिलेल्या तत्त्वावरच आपला प्रयत्न चालविला पाहिजे व तसें झाल्यासच हिंदुस्थानचें कल्याण आहे अशी माझी खात्री झाली.

### *माझे नवे सहकारी*

महाराष्ट्रांत सातारा जिल्हा सभा पाटण येथे झाली व ठाणा जिल्हा सभा कल्याण येथे झाली. या दोन्ही सभांचें अध्यक्ष-स्थान माझ्याकडे आलें होतें. या दोनतीन वर्षांत महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रांतांत मी बऱ्याच ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. बेळगावास तर प्रत्येक सार्वजनिक कामांत माझा कांही ना कांही संबंध असे. त्यामुळे मला माझ्या कामाकरिता जुन्या पुढाऱ्यांवर अवलंबून राहण्याची जरुरी राहिली नाही. नवीन मंडळींपैकी कृष्णराव करगुप्पीकर व दत्तोपंत मजली यांची मला फार मदत मिळूं लागली. हे दोघेही बेळगावास वकिली करीत असत. कृष्णराव करगुप्पीकर हे बेळगावाजवळील कणबर्गी या गावचे. हे समतोल बुद्धीचे असून स्वभावाने फार गोड होते. लहानपणापासून सार्वजनिक कामें करण्याकडे यांचें लक्ष असे. गोविंदराव याळगींचा व त्यांचा बराच स्नेह होता. त्यामुळे माझा व त्यांचाही संबंध आला व मला त्यांची फार मदत झाली. ते कानडीचे अभिमानी असत; पण ते इतर प्रांतांचा द्वेष करीत नसत. त्यांनी वकिलीला प्रारंभ करून फार दिवस झाले नव्हते, तरी ते ती सोडून सार्वजनिक कामाला सर्वस्वी वाहून घेण्याला तयार झाले होते. एक कानडी मासिक स्वतःच्या जबाबदारीवर काढण्याला त्यांनी प्रारंभ केला होता. १९२० सालच्या कॉंग्रेसमध्ये असहकारितेचा ठराव पास झाल्याबरोबर त्यांनी वकिली सोडली व बेळगाव जिल्ह्यांत पायीं प्रवास करून खेड्यापाड्यांतून जागृती करण्याचें काम उत्तम प्रकारें केलें. कर्नाटकाच्या व विशेषतः बेळगावच्या दुर्दैवाने ते लहान वयांतच १९२२ सालीं प्लेगने वारले. त्यामुळे माझा आधार गेल्याप्रमाणे झालें.

दत्तोपंत मजली हे बेळगाव जिल्ह्यांतील मजली या गावचे. यांची बी. ए.ची परीक्षा झाल्यानंतर यांनी कांही दिवस मुंबईस सेक्रेटरिएटमध्ये नोकरी केली. त्यानंतर कांही दिवस गोखल्यांच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीमध्ये उमेदवार म्हणून होते. पण तेथे राहणें बरें न वाटल्यामुळे हायकोर्ट वकिलीच्या परीक्षेची तयारी त्यांनी केली व ती परीक्षा पास झाल्यानंतर बेळगावला वकिली करण्याकरिता आले. हे बुद्धिवान असून यांचें वक्तृत्व उच्च दर्जाचें आहे. पण हे भावनाप्रधान आहेत. त्यामुळे केव्हा केव्हा यांना आपला तोल सांभाळणें कठीण होतें. सन १९१७-१८ सालापासून १९२२-२३ सालापर्यंत यांनी बेळगावास पुष्कळ कामगिरी केली. १९२० सालीं यांनीही वकिली सोडली व आपला सर्व वेळ सार्वजनिक कामाकडे दिला.

करगुप्पीकर व मजली या दोघां तरुण कार्यकर्त्यांवर आमची फार भिस्त होती. पण वर सांगितल्याप्रमाणे करगुप्पीकर अकालींच वारले. मजली यांना १९२० सालच्या चळवळींत एक वर्षाची शिक्षा झाली होती. त्यानंतर पुन्हा १९२१ सालीं नऊ महिन्यांची

शिक्षा झाली. पहिली शिक्षा त्यांनी येरवड्याच्या तुरुंगामध्ये काढली. दुसऱ्या शिक्षेच्या वेळीं विजापूरच्या तुरुंगांत त्यांना ठेवण्यांत आलें होतें. तेथे त्यांची प्रकृती बिघडली. म्हणून त्यांना त्यांच्या शिक्षेची मुदत भरण्यापूर्वीच सोडून देण्यांत आलें. तथापि त्यांनी सार्वजनिक कामांत मन घालण्याचें सोडून ते पुन्हा वकिली करूं लागले. त्यांची वकिली आता चांगली चालली आहे. गांधीजींचा मार्ग त्यांना आता पसंत पडत नाही. पण दुसऱ्या कोणत्याही मार्गाचा अवलंब करून ते काम करीत नाहीत. आजपर्यंत माझा पुष्कळांशीं स्नेहसंबंध जुळला व त्यापैकी कांही स्नेह्यांशीं सार्वजनिक कामाच्या बाबतींत मतभेदही झाला. पण त्यांच्या व माझ्या खाजगी स्नेहांत अंतर आलें नाही. पण मजलींच्या बाबतींत मात्र मला उलटा अनुभव आला. विजापूरच्या तुरुंगांतून सुटून आल्यानंतर कांही दिवसांनी माझ्याबद्दल त्यांचें मन दूषित झालें व माझ्यावर त्यांनी भलतेभलते आरोप करण्याला प्रारंभ केला. तुरुंगांत असतांना त्यांची स्थिती भ्रमिष्टासारखी झाली होती असें विजापूरच्या सिव्हिल सर्जनचें मत झालें होतें. ते स्वतःच जेलचे सुपरिंटेंडेंट असल्यामुळे त्यांनी त्याप्रमाणे रिपोर्ट करून सरकारने त्यांना बंधमुक्त करण्याबद्दल कळविलें होतें. ही हकीकत मला मी वेंगुर्ला येथे व्याख्यानाकरितां गेल्यावेळीं तारेने कळविण्यांत आली. त्याबरोबर वेंगुर्ल्याहून मी मोटारीने विजापुराला ताबडतोब गेलों व मजलींची मुक्तता होईपर्यंत तेथे होतों. त्यांना घेऊन बेळगावास आलों. बेळगावला आल्यानंतर कांही दिवसानी मी, बाबासाहेब सोमण, याळगी, वगैरे मंडळींनी मिळून त्यांच्या विरुद्ध कट करून, त्यांना भ्रम झाला असें ठरविलें, असें त्यांना वाटूं लागलें. आणि आम्हां सर्वांवर व विशेषतः माझ्यावर त्यांनी शस्त्र उचललें. माझा व त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आला होता व त्यांच्या कामामुळे त्यांची लोकप्रियताही बरीच वाढली होती; म्हणून त्यांनी माझ्यावर जे आरोप केले ते खरे असावेत असेंदेखील कांही लोकांना वाटलें असावें. गांधीजींनाही त्यांनी एकदोन लांबलचक पत्रें लिहून ते कसे चुकत आहेत हें दाखवण्याचा प्रयत्न केला. पत्रांतील असंबद्ध मजकूर पाहून गांधीजींनी त्यांच्या प्रकृतीबद्दल माझ्याजवळ चवकशी केली. अलीकडे पांचसहा वर्षें माझा व त्यांचा संबंध अगदी तुटल्यासारखा झाला आहे. ते कोणत्याही कामांत पडत नसल्याकारणाने वकिलीशिवाय लोकांचा व त्यांचा संबंधही येत नाही. अरविंद घोष यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल ते चर्चा करीत असतात असें समजतें. अशा प्रकारें प्रत्यक्ष कामांतून त्यांनी अंग काढून घेतल्यामुळे आमच्या जिल्ह्यांतील कार्याची हानी बरीच झाली आहे. पुन्हा ते पूर्वीप्रमाणे पुढाकार घेऊन कामाला लागण्याचा सुयोग येईल अशी मला आशा आहे. असो.

या स्नेह्यांशिवाय माझे आणखी एक स्नेही आहेत. त्यांचें नांव भीमराव पोतदार. यांना भाषणें वगैरे करण्याची आवड नाही. तथापि वेळप्रसंगीं यांचा सल्ला फारच उपयोगी पडतो. हे बेळगावचेच राहणारे आहेत व यांचें घराणें प्रतिष्ठितांत गणलें जातें. यांची एलएल. बी. ची परीक्षा झाल्यानंतर १९१४ सालीं हे बेळगावास वकिली

करूं लागले. हे कॉलेजमध्ये विद्यार्थी असतांनाच माझा व त्यांचा संबंध आला होता. पुढे यांचा सार्वजनिक कामांत उपयोग चांगला होईल असें मला वाटल्यावरून त्यांचा व माझा संबंध दृढ होत चालला आणि माझ्या अटकळीप्रमाणे घडूनही आलें. देशांत ज्या अनेक चळवळी चालल्या आहेत त्या सर्वांबद्दल त्यांना सहानुभूती आहे; पण स्थानिक स्वराज्याच्या (म्युनिसिपालिटी, लोकलबोर्ड वगैरे) व सहकारी कामांत (co-operative) त्यांना विशेष आवड व हौस आहे. या सर्व संस्थांतून ते उत्तम प्रकारें काम करीत असतात. माझ्या विश्वासांतील ते एक माझे मित्र आहेत.

याप्रमाणे माझा याळगी, मजली, पोतदार व करगुप्पीकर यांच्याशीं अति निकट संबंध येऊन आमच्यामध्ये सार्वजनिक कामें स्वतंत्र रीतीने करण्याची शक्ती आली व तिचा अनुभवही लोकांना येऊं लागला.

याळगींबद्दल बरीच माहिती मागे आली आहे. १९२१ सालीं त्यांच्यावर फौजदारी खटला झाला होता. त्याची हकीकत अशी आहे :

### *गोविंदराव याळगींवरील फौजदारी*

त्यांच्या खडेबाजारांतील दुकानापुढे प्रत्येक शनिवारीं बाजारच्या दिवशीं खेड्यापाड्याचे स्त्री-पुरुष तांदूळ, भाज्या वगैरे विकावयाला बसतात. दुकान चव्हाट्यावर असल्यामुळे तेथे गर्दी होऊं नये म्हणून बंदोबस्ताकरिता पोलिस ठेवलेले असतात. एका शनिवारीं एका पोलिसाने तांदुळाच्या पाट्या लाथाडल्या व लोकांना मारण्याला सुरुवात केली. हें गोविंदराव व त्यांचे बंधू कृष्णराव यांनी आपल्या दुकानावरून पाहिलें. असा धडधडीत जुलूम आपल्यादेखत होत असल्याचें पाहून गोविंदराव स्वस्थ बसतील असा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांनी त्या शिपायाला दोन सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या; पण त्याने त्या जुमानल्या नाहीत. उलट गोविंद-रावांच्या एका नोकराच्या मुस्कटांत दिली. त्याबरोबर गोविंदरावांना चीड येऊन त्यांनी त्या शिपायाला धरला व त्याला पोलीस चौकीकडे नेण्याकरिता ओढलें. या ओढा-ताणींत शिपायाला चांगला मार बसला. त्यामुळे शिपायाने सातआठ लोकांवर फिर्याद केली. मी त्या वेळीं मुंबईस होतों. मला काका पाटलांना घेऊन येण्याबद्दल पत्र आलें. त्याप्रमाणे मी काकांना घेऊन गेलों. प्रथम हा खटला बेंच मॅजिस्ट्रेटपुढे चालला होता; पण पुढे त्यांनी गुन्हा आपल्या अधिकाराबाहेरचा आहे असें ठरवून पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट वेब म्हणून एक होते त्यांच्या कोर्टाकडे खटला पाठवला.

मीं सर्व हकीकत समजून घेतली. शिपायाला गोविंदरावांच्या मंडळींनी मारलें होतें ही गोष्ट खरी आहे, अशी माझी खात्री झाली. चीड येण्यासारखें शिपायाचें वर्तन घडलें होतें ही गोष्टही कांही खोटी नव्हती. पण त्याबद्दल त्याला मारणें हा कांही योग्य उपाय नव्हे असें मला वाटलें. या संधीला गांधीजींच्या शिकवणीचा माझ्यावर प्रभाव पडत चालला होता. त्यामुळे हें प्रकरण मिटवावें असें माझ्या मनांत आलें.

गोविंद्रावांनी झालेली चूक कबूल केल्यास या प्रकरणाचा निकाल लागतो कीं काय पाहावें असें मीं ठरविलें. त्याप्रमाणे गोविंद्रावांना विचारलें. गोविंद्रावांचा स्वभाव मला माहीत असल्यामुळे केवळ शिक्षेच्या भीतीने ही गोष्ट ते कबूल करणार नाहीत असें मला माहीत होतें. गोविंद्रावांनी ही गोष्ट प्रथम नाकबूल केली. पण रागाच्या भरांत अशी चूक घडली असल्यास ती कबूल करण्यांत कोणत्याही प्रकारचा कमीपणा नाही, इतकेंच नव्हे तर तसें करणेंच इष्ट आहे, असें मीं त्यांना सांगितलें. पुढे गांधींचें युग आल्यास आपल्याला असेंच करावें लागेल अशीही मीं सूचना दिली व गांधींच्या मार्गाची थोडी माहिती सांगितली. त्याचा परिणाम त्यांच्यावर झाला व माझें म्हणणें त्यांनी मान्य केलें. नंतर एका स्नेह्याच्या मार्फत ही गोष्ट पोलीस सुपरिंटेंडेंटच्या कानावर घातली. गोविंद्रावांनी चूक कबूल केल्यास त्यांच्यावरील फिर्याद काढून घेण्यांत येईल असें त्यांनी कळविलें, व गोविंद्रावांनी कोर्टांत जाऊन चूक कबूल करण्याची आवश्यकता नाही, फक्त त्यांनी आपल्याजवळ येऊन कबूल केलें तरी पुरे आहे असें सांगितलें. त्यामुळे मीं जो सल्ला दिला होता तोच बरोबर आहे अशी गोविंद्रावांची खात्री पटली. ठरलेल्या वेळीं गोविंद्रावांना सुपरिंटेंडेंटच्या बंगल्यावर पाठविलें व गोविंद्रावांनी आपली चूक कबूल केली. ज्या शिपायाला मार बसला होता त्याचीही चूक होती असें सुपरिंटेंडेंटला कळून आलें होतें. त्यामुळे त्यांनी त्या शिपायाकडून चूक कबूल करवली. तावडतोब सुपरिंटेंडेंट डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे गेले व फिर्याद काढून घेण्याबद्दल सरकारी वकिलांनी मॅजिस्ट्रेटची परवानगी मागितली. कोर्टाने तशी परवानगी दिली व फिर्याद काढून टाकतेवेळीं गोविंद्रावांनी दाखवलेल्या सौजन्या-बद्दल व धैर्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें. हा अनपेक्षित प्रकार पाहून माझ्यावर व गोविंद्रावांवर कांही निराळाच परिणाम झाला.

### *चिरोल केस फंड व गांधीजी*

१९१९ सालीं चिरोल खटला टिळकांच्या विरुद्ध होऊन उलट टिळकांनी चिरोलचा सर्व खर्च द्यावा असा निकाल लागला! स्वतःच्या खर्चाइतके देखील टिळकांच्या जवळ पैसे नव्हते. तेव्हा चिरोलच्या खर्चाबाबत मोठी रक्कम द्यावी लागणार, ती आणावयाची कोठून, हा प्रश्न त्यांच्या स्नेह्यांमध्ये उत्पन्न झाला. टिळक हे केवळ आपल्या अब्रूच्या बचावाकरिता लढले नसून राष्ट्रीय पक्षाकरिता त्यांना इतका त्रास व पैशाची हानी सोसावी लागली; म्हणून त्यांची भरपाई करण्याकरिता वर्गणी जमविण्याचा विचार ठरला, व त्याप्रमाणे दहाबारा लोकांच्या सहीने एक जाहीर विनंती काढली. त्यांत माझीही सही होती व वर्गणी जमविण्याच्या कामांत मींही यथाशक्ति भाग घेतला. वऱ्हाड, नागपूर, महाराष्ट्र, व कर्नाटक याच प्रांतांवर हा बोजा विशेष पडावयाचा अशी आमची अटकळ होती. त्याप्रमाणे या प्रांतांनी आपल्यावरील जबाबदारी ओळखली. इतर प्रांतांतूनही थोडीफार मदत मिळाली. पण मुख्य बोजा

या प्रांतांनीच उचलला. मुंबईस वर्गणीबद्दल एक जाहीर सभा भरविण्यांत आली होती. मुंबईस गुजराती लोक श्रीमंत आहेत व महात्मा गांधी या सभेचे अध्यक्ष झाल्यास त्या लोकांकडून चांगलें साहाय्य मिळेल असें टिळकांच्या मुंबईच्या स्नेह्यांना वाटलें. त्यांनी गांधींना अध्यक्ष होण्याबद्दल विनंती केली. पण टिळक हे महाराष्ट्रीय आणि टिळकांचें व गांधींचें फारसें जुळत नसल्यामुळे गांधी या सभेचे अध्यक्ष होण्याचें कबूल करतील किंवा नाही, अशी शंका टिळकांच्या कित्येक मित्रांना आली! तेव्हापासूनच गांधींसंबंधाने कित्येक महाराष्ट्रियांचें मन साशंक होतें. टिळकांची योग्यता गांधी जाणून होते व टिळक कोणत्या हेतूने चिरोलशीं खटला लढत होते हेंही त्यांना माहीत होतें. म्हणून टिळकांशीं कितीही व कसलाही मतभेद असला, तरी टिळकांना पैशाची अडचण असतांना ती दूर होऊं नये असें गांधींना कदापि वाटणार नाही ही साधी गोष्टदेखील कित्येकांच्या लक्षांत आली नाही. मुंबईच्या सभेंत अध्यक्ष या नात्याने भाषण करतांना इंग्रजांच्या न्यायदानपद्धतींत ज्याची पैशाची थैली अधिक लांब त्याच्याकडेच न्यायाचें पारडें झुकत असतें ही गोष्ट टिळकांसारख्यांना कळली नाही याबद्दल त्यांनी आश्चर्य प्रदर्शित केलें व लोकांना मदत करण्याला विनंती केली. टिळक विलायतेहून परत येण्याचे आंत तीन लाख रुपयांची रक्कम जमली व टिळकांच्या मागचा हा त्रास चुकला.

### पालथ्या घागरीवर पाणी

चिरोल खटल्याचें काम संपल्यानंतर लो. टिळक इंग्लंडमध्ये कांही दिवस राहिले होते. जॉइंट पार्लमेंटरी कमिटीपुढे त्यांची साक्षही झाली. शिवाय हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीसंबंधाने त्यांचीं अनेक भाषणें झालीं. पार्लमेंटरी कमिटीपुढे त्यांची साक्ष होऊं देऊं नये म्हणून कांही सभासदांनी प्रयत्नही केला. त्यांत मुंबईचे माजी गव्हर्नर लॉर्ड सिडेनहॅम—ज्यांच्या कारकीर्दीतच टिळकांना शिक्षा झाली होती—हे प्रमुख होते. तथापि मॉंटेग्यू यांच्या प्रयत्नाने टिळकांना साक्षीला बोलावण्यांत आलें. पण त्यांची उलटतपासणी केली गेली नाही व साक्षीच्या वेळीं लॉर्ड सिडेनहॅम हे उठूनही गेले होते! इकडे म्हणजे भारतांत जोराची चळवळ करून आपलें सामर्थ्य दाखविल्याखेरीज केवळ युक्तिवादाने इंग्रज लोकांचें मन वळवणें ही गोष्ट अशक्यकोटींतील आहे असें कित्येकांना वाटतें त्याची प्रचीती या वेळीं चांगली आली. टिळकांना निरोप देण्याकरिता फ्रेंच पुलाजवळील खुल्या जागेंत भरलेल्या जाहीर सभेच्या प्रसंगीं भाषण करतांना, साक्षीकरिता किंवा डेप्युटेशन वगैरे घेऊन इंग्लंडला या परिस्थितींत जाण्यांत कांही अर्थ नाही असें मी बोललों होतों त्याची मला आठवण झाली आणि परदेशांत जाऊन तेथील लोकांच्या मतांत परिवर्तन करण्याचा प्रयत्न करणें (Foreign Propaganda) हें त्या स्थितींत पालथ्या घागरीवर पाणी घालण्यासारखें आहे असें मला त्या वेळीं वाटत होतें तें माझें मत कायम झालें. त्यानंतर आज दहाबारा वर्षांत जे अनुभव आले त्यांवरूनही माझें वरील मत ठाम झालें.

१९१९ सालीं अहमदनगरास प्रांतिक परिषद भरली होती. कॉंग्रेसमध्ये एकी झाली होती तरी या परिषदेला नेमस्त पक्षाचे पुढारी आले नव्हते. त्या पक्षाचे स्थानिक पुढारी रा. ब. चितळे हे स्वागताध्यक्ष होते. बॅप्टिस्टा या परिषदेचे अध्यक्ष होते. स्वदेशी व बहिष्काराचा ठराव मीं परिषदेपुढे मांडला होता. परिषदेच्या दिवसांत रात्रीं जाहीर व्याख्यानें होत असत. तेव्हा माझींही भाषणें झालीं.

## रौलट बिल आणि गांधीजी

गांधींच्या नेतृत्वाखाली रौलट बिलाविरुद्ध जोराची चळवळ चालली होती व तिचें केंद्र मुंबई शहर होतें. नेहमीच्या मामुली चळवळीच्या मार्गावर अवलंबून न राहतां गांधीजींनी आपल्या सत्याग्रहाच्या पद्धतीचा स्वीकार करण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणे मुंबईस त्यांना अनुकूलताही मिळाली. हा मार्ग जरी नवीन होता तरी गांधींनी दक्षिण आफ्रिकेंत याचा उपयोग करून यश संपादन केलें होतें; त्यामुळे गांधींवर लोकांचा विश्वास बसला. प्रथम ३१ मार्च १९१९ ही हिंदुस्थानांत सार्वत्रिक हरताळाची तारीख ठरविली होती. पण कांही कारणामुळे ती पुढे ढकलण्यांत आली, व पहिल्या एप्रिलपासून एक आठवडा राष्ट्रीय आठवडा म्हणून पाळण्यांत यावा व रौलट बिलाबद्दल सर्वत्र चळवळ करण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें. पण पंजाबमध्ये ३१ मार्चपासूनच चळवळीला सुरुवात झाली व अमृतसर येथे दंग्याधोप्याला प्रारंभ झाला. जालियनवाला बागेंत शेकडों निरपराधी लोकांना गोळ्या घालून ठार मारण्यांत आलें. तेथील अधिकाऱ्यांनी लोकांवर अनेक प्रकारचे जुलमाचे व अत्याचाराचे प्रयोग केले. या गोष्टी प्रसिद्धच आहेत. तो सर्व इतिहास येथे देत नाही. यामुळे हिंदुस्थानांत बरीच मोठी चळवळ झाली, व तींत मीं भाग घेऊन कर्नाटकांत बऱ्याच ठिकाणीं जाऊन जागृती केली. या चळवळीमुळे गांधी-जींचा व माझा जास्ती संबंध आला व त्यांच्या कार्यक्रमाप्रमाणे काम करण्याची जबाबदारी मीं बरीच माझ्या अंगावर घेतली.

गांधीजींनी रौलट बिलाविरुद्ध चळवळ चालवली होती, तरी इंग्रजांच्याबद्दल त्यांच्या मनांत असलेला आदर अद्यापि फारसा कमी झाला नव्हता. अमृतसर येथे घडलेल्या प्रकारामुळे त्यांना बराच धक्का बसला असावा. पुढे कॉंग्रेसने गांधी, मालवीय, दास, जयकर वगैरे मंडळींची एक कमिटी नेमून अमृतसर येथील अत्याचारांबद्दल चवकशी केली, तींत ज्या गोष्टी उघडकीला आल्या त्यामुळे मात्र गांधीजींचा इंग्रजांच्या राज्य-पद्धतीवरील असलेला विश्वास पुरा उडाला व त्यांनी असहकारितेच्या चळवळीला प्रारंभ केला. ही हकीकत पुढे येईल.

प्रकरण सोळावें

# टिळक-युगाचा उपसंहार

### *टिळक इंग्लंडहून परत आले*

१९१९ सालीं अमृतसर येथेच काँग्रेस भरण्याचें ठरलें व त्यापूर्वी टिळक इंग्लंडहून परत आले. त्यांच्या स्वागताकरिता मी बेळगावहून मुद्दाम गेलों होतों. ते मुंबईस आल्या दिवशींच सायंकाळीं शांतारामाच्या चाळींत जंगी जाहीर सभा भरून त्यांना मानपत्र देण्यांत आलें व तें वाचण्याचें काम माझ्याकडे सोपविलें होतें. मानपत्राला टिळकांनी उत्तर देऊन इंग्लंडच्या मजूर पक्षाची आपल्याला सहानुभूती असल्याचें सांगितलें. मॉंटेग्यूसाहेबांच्या बिलामुळे जें थोडेंबहुत मिळेल तें पदरांत घेऊन जास्ती मिळविण्याचा प्रयत्न करीत राहाणें हेंच शहाणपणाचें आहे असें धोरण त्यांनी जाहीर केलें. भाषणाच्या आरंभीं इकडील स्थितीसंबंधाने बोलतांना विनोदाने गांधींनी "आपल्या गैरहजेरींत इकडे सत्याग्रहाला सुरुवात केली म्हणून त्यांच्याविरुद्ध माझी फिर्याद आहे" असें म्हटलें. याचा अर्थ असा होता की, आपल्या गैरहजेरींत गांधींनी सत्याग्रहाची चळवळ केल्यामुळे आपल्याला तींत भाग घेण्याची सुसंधी मिळाली नाही. या त्यांच्या उद्गारावरून त्यांना सत्याग्रहाचा मार्ग पसंत पडला नसता, असें म्हणणाऱ्यांचें मत किती निराधार आहे हें दिसून येईल. तें भाषण ऐकून टिळकांना गांधींचा मार्ग नापसंत नाही असा माझा तरी ग्रह झाला. विलायतेहून परत आल्यानंतर टिळक मद्रासला गेले होते. त्या वेळीं मी त्यांचेबरोबर गेलों होतों. वाटेंत त्यांनी विलायतेंतील बऱ्याच गोष्टी सांगितल्या आणि आपल्याबरोबर असलेल्या कित्येक मंडळींच्या वागणुकीने आपल्याला कसा त्रास झाला वगैरे हकीकती ऐकविल्या. मद्रासेस या वेळीं कामत म्हणून एक मंगळूरचे गृहस्थ होते. त्यांच्या घरीं टिळकांचा मुक्काम होता. बेझंटबाई मद्रासेस नव्हत्या. टिळकांचीं व्याख्यानें झालीं व लोकांकडून स्वागतही उत्तम प्रकारें झालें. बेझंटबाईंचे पट्टशिष्य सर सुब्रह्मण्यम् अय्यर यांच्या

भेटीला टिळक गेले होते. त्या वेळीं मिळणार होत्या त्या सुधारणा कितीही अपुऱ्या असल्या तरी त्याप्रमाणे काम करणें हेंच शहाणपणाचें आहे असें आपलें मत असल्याचें त्यांनी सर सुब्रह्मण्यम् यांना सांगितलें. दोघांचें या बाबतींत एकमत होतें.

मद्रासच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये टिळकांचें एक व्याख्यान त्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता झालें होतें. कॉलेजचे प्रिन्सिपाल अध्यक्ष होते. 'हिंदु' पत्राचे मालक कस्तुरी रंग अयंगार यांनी आपल्या घरीं टिळकांना एक मेजवानी दिली. त्या वेळीं राजगोपाळाचार्य व इतर बरीच मंडळी हजर होती. जेवणानंतर राजकारणावर बरीच चर्चा झाली. तीनचार दिवस मद्रासला मुक्काम करून टिळक परत आले.

त्या वेळीं मद्रास इलाख्यांत आंध्र व तामीळ यांमध्ये भांडण असल्याचें दिसून आलें.

मद्रासेंत महाराष्ट्रीय लोकांची वस्ती आहे. त्यांच्या वतीने टिळकांचा गौरव करण्यांत आला होता.

## 'प्रतियोगी सहकारिते'चा जन्म

अमृतसरच्या कॉंग्रेसला टिळक स्पेशल गाडीने निघाले. बरोबर त्यांच्या पक्षाची बहुतेक सर्व मंडळी होती. अमृतसर जालियनवाला बागेंतील कत्तलीमुळे व अधिकाऱ्यांच्या जुलमामुळे बरेंच प्रसिद्धीला आलें होतें. त्यामुळे तेथे भरणाऱ्या कॉंग्रेसच्या अधिवेशनालाही महत्त्व आलें होतें. याशिवाय हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत मॉंटेग्यू-चेम्सफर्ड यांच्या सुधारणांअन्वयें फेरफार होणार होता व त्याबद्दलचें सरकारी बिल पार्लमेंटमध्यें मंजूर झालें होतें. त्या बिलावर अभिप्राय देण्याचें महत्त्वाचें काम त्या कॉंग्रेसमध्ये होणार होतें. त्यामुळेही या कॉंग्रेसला विशेष महत्त्व आलें होतें. (बी. बी. सी. आय. च्या गंगापूर स्टेशनच्या अलीकडे) राजेसाहेबांनी बिलाला मंजुरी देऊन एक जाहीरनामा काढला होता व त्यांत एकमेकांनी मागील सर्व गोष्टी विसरून पुढे एकमेकांच्या सहकार्याने नवीन कायद्याप्रमाणे राज्यघटना अंमलांत आणावी असें म्हटलें होतें आणि त्याप्रमाणे आपण वागण्याला सुरुवात केली हें दाखवण्याकरिता राजकीय कैद्यांना सोडण्याचा हुकूम केला होता. त्याप्रमाणे अमृतसरचे डॉ. किचलू, डॉ. सत्यपाल, रामभुजदत्त चौधरी वगैरे मंडळींना सोडल्याची बातमी आम्हांला गाडींतच लागली आणि अलीबंधू व इतर कैदी लवकरच सुटतील असें वाटलें. हिंदुस्थानच्या लोकांना उद्देशून काढलेल्या या जाहीरनाम्याला आमच्या होमरूल लीगच्या वतीने कांही तरी प्रसंगाला शोभेल असें उत्तर द्यावें असें टिळक, बॅप्टिस्टा वगैरे पुढाऱ्यांच्या मनांत आलें. या गोष्टीचा विचार करण्याकरिता प्रमुख मंडळी टिळकांच्या डब्यांत जमली. मीही त्या मंडळींत होतों. उत्तर मुळीच देऊं नये असें म्हणणारे कांही होते. अमृतसरला पोचल्यानंतर काय करावयाचें तें ठरवावें असें म्हणणारे कित्येक होते. तर तावडतोब उत्तर द्यावें असें कित्येकांचें मत होतें. शेवटीं वाटाघाट होऊन उत्तर तावडतोब देण्याचें ठरलें व बॅप्टिस्टांनी उत्तराचा मसुदा तयार केला. त्यांत रीतीप्रमाणे राजे-

साहेबांचे आभार मानून राष्ट्रीय पक्ष हा केव्हाही प्रतियोगी सहकारिता करावयाला तयार आहे असेंही नमूद करण्यांत आलें. Responsive co-operation या शब्दांना, असहकारितेच्या (Non-cooperation) १९२१ च्या चळवळीपासून फार महत्त्व आलें. त्या नावाने पुढे महाराष्ट्रांत एक पक्षही निघाला. हा शब्दप्रयोग प्रथम टिळकांनी केला असें मानण्यांत येतें. पण याचें जनकत्व बॅप्टिस्टा यांचेकडे आहे. उत्तराचा मसुदा याप्रमाणे तयार झाल्यानंतर त्याप्रमाणे तार एका स्टेशनावरून पाठविण्यांत आली. अमृतसरला जाऊन पोहोचेपर्यंत ही तार इकडील वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली होती. त्याबद्दल तेथे चर्चाही चालू झाली होती. बऱ्याच मंडळींना टिळकांनी अशा प्रकारची तार करणें हें पसंत पडलें नव्हतें असें मला आढळलें. या तारेबद्दल इकडे देखील बराच वाद माजला होता. मुंबईस त्या वेळीं अच्युतराव कोल्हटकर हे आपलें 'संदेश' दैनिक चालवीत असत. त्यांनी या तारेसंबंधाने टिळकांवर खूप टीका केली. कोल्हटकरांच्या चटकदार लिहिण्याच्या पद्धतीमुळे त्यांचें पत्र वाचणाऱ्यांची संख्या बरीच मोठी होती. त्यामुळे कोल्हटकरांच्या लेखाची छाप बहुजनसमाजावर बरीच पडली होती व टिळकांनी उत्तर देण्यांत घाई केली असें मत इकडे होऊं लागलें होतें. अमृतसरहून परत आल्यानंतर कांही दिवसांनी टिळकांना आपलें जाहीर समर्थन करावें लागलें.

अमृतसरच्या कॉंग्रेसला नेमस्त पुढारी हजर नव्हते. याच वेळीं त्यांची कलकत्त्यास परिषद होती. फक्त श्रीनिवास शास्त्री एक दिवसच हजर होते. नवीन सुधारणांसंबंधाने कॉंग्रेसने काय मत द्यावें हा महत्त्वाचा प्रश्न होता. राष्ट्रीय पक्षाचें मत या सुधारणा निराशाजनक, असमाधानकारक व त्याज्य (disappointing, unsatisfactory and unacceptable) अशा स्वरूपाच्या आहेत असें होतें. नेमस्तांना या सुधारणा बऱ्याच भरीव वाटत होत्या; त्यामुळे disappointing वगैरे विशेषणें अस्थानीं आहेत असें त्यांचें मत होतें. हा दोन पक्षांमध्ये एक मुख्य फरक होता. नवीन सुधारणांना कोणत्याही प्रकारें दूषण देऊं नये असें नेमस्तांना वाटत होतें. आपलें म्हणणें कॉंग्रेसमध्ये मान्य होणार नाही असें त्यांना वाटून त्यांनी कलकत्त्यास आपली परिषद भरविण्याचें ठरविलें होतें. श्रीनिवास शास्त्र्यांनी विषयनियामक कमिटींत एक भाषण करून आपल्या धोरणाचें समर्थन केलें व ते कलकत्त्याला निघून गेले. अमृतसरच्या कॉंग्रेसपासून नेमस्त कॉंग्रेसमधून फुटून निघाले. तीच स्थिती आजपर्यंत कायम आहे. १९१९ सालीं गांधींनी रौलट कायद्यासंबंधाने व अमृतसर, दिल्ली वगैरे ठिकाणीं घडलेल्या गोष्टींसंबंधाने बरीच चळवळ केली होती. त्यामुळे त्यांची लोकांना बरीच माहिती झाली होती. अमृतसरच्या कॉंग्रेस-मध्ये त्यांनी सुधारणांसंबंधाने त्या तीन शब्दांना विरोध केला. Disappointing, unsatisfactory and unacceptable असें सुधारणांचें वर्णन करावयाचें आणि त्यांचा स्वीकार करून काम करावयाचें हें धोरण त्यांना विसंगत वाटत होतें. तथापि हे शब्दप्रयोग कॉंग्रेसमध्ये मंजूर झाले.

### शौकतअलींचा मी 'गुरू'!

अलीबंधूंची सुटका होऊन ते अमृतसरला आले होते. त्यांचें स्वागत फारच थाटाचें झालें. मी त्यांना खासगी रीतीनें भेटावयाला गेलों होतों. टिळकांचा व माझा बराच संबंध आहे असें त्यांना माझ्याबरोबर असलेल्या मंडळीकडून समजल्यानंतर दोघाही भावांनी मला कडकडून मिठी मारली. टिळक हे राजकारणांतील आपले गुरू आहेत असें ते म्हणाले. तेव्हापासून ते माझ्याबरोबर प्रेमाने वागूं लागले. शौकतअली मला तेव्हापासून 'गुरू' म्हणून हाक मारूं लागले. गुरुबंधूची कल्पना त्यांना आली असावी, पण गुरुबंधू म्हणण्याऐवजी त्याचें संक्षिप्तरूप त्यांनी केलें असावें. १९२७च्या मद्रास कॉंग्रेसपर्यंत त्यांच्याबरोबर काम करण्याचे मला अनेक प्रसंग आले. पण त्यानंतर त्यांची दिशा निराळी झाली. त्यामुळे त्यांचा व माझा संबंध तुटला. तथापि त्यांच्या वर्तनाबद्दल इतरांप्रमाणे मला त्यांच्या संबंधाने राग येत नाही. मला त्याबद्दल वाईट वाटतें व पुन्हा त्यांच्याशी सहकार्य करण्याचा योग येईल अशी आशाही अद्यापि गेली नाही.

### नेमस्तांचे विरोधाचे उपद्व्याप

अमृतसर कॉंग्रेसनंतर इकडे तीन महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्या म्हणजे (१) जुन्नर येथे पुणें जिल्ह्याची परिषद, (२) कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना, (३) सोलापूरची प्रांतिक परिषद. अमृतसरच्या कॉंग्रेसमध्ये कौन्सिलमध्ये जाऊन काम करण्याचें ठरलें म्हणून कॉंग्रेसच्या धोरणाने लोकमत तयार करण्याचें काम टिळकांनी आपल्या अंगावर घेतलें. त्याकरिताच पुणें जिल्हा परिषद जुन्नर येथें भरविण्याचें त्यांनी ठरविलें. जुन्नरच्या स्वागतमंडळाने माझी अध्यक्षस्थानीं निवड केली. कौन्सिलमध्ये बहुमत कोणाच्या पक्षाचें व्हावें हा प्रश्न तेव्हा महत्त्वाचा होता. म्हणून नेमस्त लोकही त्या वेळीं खूप खटपट करीत होते. जुन्नरच्या परिषदेमध्ये येऊन आपल्या तर्फेचें बहुमत करून घ्यावें असा घाट त्यांनी घातला होता आणि दोन्ही पक्षांची पहिली चकमक तेथे उडावयाची असा रंग दिसत होता. परिषदेच्या आधी एक दिवस मी पुण्याला आलों होतों. परिषदेच्या कार्यक्रमाबाबत टिळकांबरोबर मीं चर्चा केली. दुसरे दिवशीं सकाळीं टिळकांबरोबरच जुन्नरला जाण्याकरिता निघालों. वाटेंत ठिकठिकाणीं टिळकांचें स्वागत होत होतें. टिळक भावी निवडणुकींचें महत्त्व लोकांना सांगत होते. आमच्या पूर्वीं पुण्याचे कामत, कानिटकर, परांजपे वगैरे नेमस्त मंडळींनी जुन्नरास आपला तळ दिला होता. जातां जातां वाटेंत त्यांनीही व्याख्यानें देऊन आपल्या पक्षाबद्दल सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला होता. पण टिळकांच्या भाषणामुळे त्यांनी अगोदर केलेला सर्व खटाटोप व्यर्थ गेल्यासारखा झाला.

जुन्नर येथे टिळकांचे खत्री या नावाचे एक जुने स्नेही होते. जुन्नरास परिषदेकरिता टिळक येणार हें कळतांच टिळकांनीं आपल्या घरीं उतरावें अशी त्यांना इच्छा होऊन

टिळकांकडून त्याप्रमाणे त्यांनी वचन घेऊन ठेवलें होतें. जुन्नरचा स्वागतसमारंभ आटोपल्यानंतर टिळकांनी कोठे उतरावें याबद्दल वाद निघाला. स्वागतमंडळातर्फे जोशी वकील यांनी आपल्या घरीं उतरून घेण्याची सोय केली होती. बहुतेक स्थानिक पुढाऱ्यांनी टिळकांनी तेथेंच उतरावें असा आग्रह धरला होता. पण टिळक आपल्या जुन्या स्नेह-संबंधांना विसरणारे नव्हते. त्यांतून खत्री यांना त्यांनी वचन दिलें होतें. या घासाघाशींत टिळकांनी एक युक्ती काढली. ते म्हणाले, "परिषदेचें काम महत्त्वाचें आहे, पाहुण्याचें आतिथ्य हें गौण आहे; तेव्हा परिषदेच्या अध्यक्षांचा मान या प्रसंगी माझ्यापेक्षा जास्ती आहे, याकरिता अध्यक्ष जोश्यांकडे राहतील व खत्री यांच्याकडे मी जाईन." तेव्हा मंडळींत हशा पिकला. पण जोश्यांना अध्यक्षांपेक्षा टिळकांची जरुरीच जास्ती वाटत असल्याने त्यांचें व त्यांच्या स्नेह्यांचें समाधान या युक्तीने कसें होणार? म्हणून त्यांनी पुन्हा आग्रह करण्याला प्रारंभ केला. शेवटीं आपलें जेवणखाण खत्री यांचेकडे करावयाचें व निजावयाला-बसावयाला जोश्यांच्याकडे यावयाचें असें ठरवून टिळकांनी सर्वांचें समाधान केलें. खत्री हे वृद्ध गृहस्थ असून फारसे शिकलेले नसावेत. पण पूर्वी सार्वजनिक कामांत टिळकांचा व त्यांचा संबंध येऊन खत्री यांच्याबद्दल टिळकांना आपलेपणा वाटत असे. असे संबंध टिळक कधी विसरत नसत.

परिषदेमध्ये जबरदस्तीने घुसून तिच्या कार्यक्रमांत अडथळा उत्पन्न करावयाचा असा बेत कानिटकर वगैरे नेमस्तांनी ठरविला होता आणि आपला बेत सिद्धीला नेण्याकरिता कांही गुंड लोकही त्यांनी अनुकूल करून घेतले होते. परिषदेमध्ये टिळकांचें भाषण होऊं द्यावयाचें नाही असा त्यांनी पक्का विचार ठरविला होता. ही बातमी स्वागतमंडळाला कळली होती. म्हणून त्यांनीही चांगला बंदोबस्त ठेविला होता. या सर्व गडबडीमुळे माझ्यावर मोठी जोखीम पडल्यासारखें मला वाटूं लागलें. नेमस्तांनी रीतसर प्रतिनिधी म्हणून परिषदेंत भाग घेऊन आपलें बहुमत करण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांनी गैर केलें असें कोणींही म्हटलें नसतें व मलाही अध्यक्ष या नात्याने कसलाही पक्षपात करतां आला नसता. पण आपलें बहुमत होणार नाही याची त्यांना जाणीव होती. म्हणून कसेंही करून आंत शिरून दंगा करण्याचा त्यांचा बेत होता.

### टिळकांनी केलेला माझा गौरव

अध्यक्षाची सूचना करतांना टिळकांनी आपल्या भाषणांत माझ्यासंबंधाने अत्यंत गौरवयुक्त उद्गार काढले. त्या वेळीं माझ्या मनांत मिश्र भावना उत्पन्न झाल्या. त्यांच्या तोंडून माझी स्तुती ऐकून एक प्रकारची लाज वाटली, व मी खाली मान घालून ऐकूं लागलों. पण त्याबरोबरच माझी अल्प कामगिरी टिळकांना पसंत पडली व ती त्यांनी प्रेमळपणाने जाहीर केली, म्हणून कांहीसें समाधानही वाटलें. कामाला प्रारंभ करण्याच्या वेळीं, टिळकांसारख्यांशीं संबंध आला आहे, तेव्हा त्यांच्या इभ्रतीला कमीपणा येण्यासारखें माझ्या हातून कांही घडूं नये, अशी इच्छा

वडिलांनी प्रदर्शित केली होती त्या गोष्टीची मला आठवण झाली. तेव्हापर्यंतच्या वर्तनाने तरी वडिलांच्या इच्छेविरुद्ध माझ्याकडून कांही घडलें नाही असें वाटून समाधान झालें. रीतीप्रमाणे अध्यक्षस्थानीं मी बसल्यानंतर बी. एस. कामत यांच्या सहीने माझ्याकडे एक चिठी आली व त्यांत शेतकरी लोकांना आंत घेण्याबद्दल सुचविलें होतें. परिषदेकरिता पुष्कळ शेतकरी आले होते व त्यांची व्यवस्था स्वागतमंडळाने केली होती. म्हणून शेतकऱ्यांच्या नावाखाली वाटेल त्यांना आंत येऊं देणें योग्य नाही असें उत्तर मीं दिलें. त्यामुळे आंत गुंड घुसडण्याचा प्रयत्न फसला. तथापि बाहेर शंभर-दीडशें लोकांच्या जमावानिशीं नेमस्त आरडाओरडा करीत उभे होतेच. दिवस शिमग्याचे होते. आंत प्रवेश होत नाही असें समजतांच कानिटकरांसारख्या नेमस्त, सुशिक्षित व जबाबदार पुढाऱ्यांच्या उत्तेजनाने शिमग्यांतील गुंड लोकांना प्रिय असलेल्या वाद्याला प्रारंभ झाला. पण हा प्रकार टिकणार किती वेळ? आणि भाडोत्री लोक नेट तरी कितीसा दाखविणार? पाचदहा मिनिटें बाहेर अशी गडबड करून नेमस्त पुढारी गाव सोडून निघून गेले. परिषदेचें काम सुरळीतपणें सांग झालें. टिळकांना भररस्त्यांत जंगी जाहीर सभेंत जुन्नर म्युनिसिपालिटीतर्फे मानपत्र देण्याचा समारंभ झाला. तो पाहण्याला नेमस्त कोणी असल्याचें दिसलें नाही! राष्ट्रीय पक्षांतील लोकांना शिष्टाचार कळत नाहीत, ते गुंड असतात, असा कांही नेमस्तांचा आरोप जहालांवर असतो. पण जुन्नरचा प्रकार पाहून तेथे शिष्टाचारांची व नेमस्तांची कशी फारकत झाली होती हें कोणालाही दिसून येण्यासारखें होतें.

जुन्नर येथे असतांना मी शिवनेरी किल्ला पाहण्याकरिता गेलों होतों. शिवाजीमहाराजांचें जन्मस्थान पाहण्याची किती दिवसांची तरी इच्छा होती. ती सफल झाल्यामुळे आनंद झाला. शिवाजी जन्मलेली जागा म्हणून तेथे एक पाटी लावलेली आहे. याशिवाय कांही चिन्हें नाहीत. जवळच एक मशीद आहे, ती मात्र जन्मस्थानापेक्षा किती तरी चांगल्या स्थितींत आहे! जुन्नरच्या गावांतून किल्ला दिसतो, मशीदही दिसते. पण जन्मस्थान! आमच्या या हयगयीबद्दल वाईट वाटतें. शिवनेरीवर कांही स्मारक करून उत्सव वगैरे करण्याबद्दलची चळवळ कांही लोकांनी चालविली होती. हें मला समजल्यानंतर मीं सदर कामाकरिता म्हणून शंभर रुपये वर्गणी दिली. पण पुढे मंडळींत मतभेद होऊन तें काम तसेंच पडून राहिलें आहे असें समजलें! आमच्या मागचा मतभेद, भांडणें वगैरेंचा ससेमिरा कधी सुटेल तो सुदिन!

शिवाजीमहाराज मुसलमानी धर्माचे शत्रू होते असें कांही लोक समजतात. पण त्यांच्या जन्मस्थानाजवळची मशीद शाबूत राहिलेली पाहून हा समज चुकीचा आहे असें मानावें लागतें. मशीद पुरातनच आहे, ती मराठ्यांच्या कारकीर्दीनंतर बांधली असें मानण्याला पुरावा नाही. शिवाजीमहाराजांच्या वेळीं ती होती असें मानण्यालाही पुरावा नाही. शिवाजीमहाराजांच्या वेळीं ती होती असें मानलें तर ती महाराजांनी राहूं दिली यावरून त्यांची परधर्मसहिष्णुता दिसून येते. इतिहाससंशोधकांनी या गोष्टीचा तपास केला असेल; पण मला त्याची माहिती नाही.

## संकेश्वरची बेळगाव जिल्हा परिषद

जुन्नरची परिषद संपवून टिळकांबरोबरच मी पुण्यास आलों. दुसरे दिवशींच बेळगाव जिल्हा सभा संकेश्वर येथे माधवरावजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली भरावयाची होती. अणे पुण्याला आले होते. टिळकांनी संकेश्वरचें आमंत्रण स्वीकारलें होतें. जुन्नरहून निघतेवेळीं त्याच दिवशीं रात्रीच्या गाडीने संकेश्वरला जाण्याकरिता निघण्याचें ठरलें होतें. पण पुण्यास आल्याबरोबर मागासलेल्या जातींसाठी कांही जागा निवडणुकींत राखून ठेवाव्या किंवा कसें याबद्दलची चर्चा कौन्सिल हॉलमध्ये व्हावयाची होती असें टिळकांना कळलें. जातवार प्रतिनिधित्वाच्या तत्त्वांना टिळकांचा विरोध होता तो विरोध सरकारापुढे मांडून, हें तत्त्व एकराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने कसें घातुक आहे हें दाखविण्याची संधी याचेमुळे आली होती. (टिळकांना या चर्चेंत भाग घेण्याकरिता आमंत्रण आलें होतें असें मला वाटतें; पण खात्री नाही.) ती संधी फुकट घालवूं नये असें टिळकांना वाटलें व संकेश्वरला जाण्याचा बेत त्यांनी रहित केल्याचें मला त्यांनी कळवलें. माझी निराशा झाली. त्याप्रमाणें संकेश्वरला तार केली. पण तिकडून तारांवर तारा आल्या व कसेंही करून टिळकांना एक दिवसाकरिता तरी घेऊन येण्याबद्दल मला कळविण्यांत आलें. मीं टिळकांना तारा दाखवल्या व लहान तोंड करून स्वस्थ बसलों. टिळकांचें मन वळवण्याचा प्रयत्न माझ्या शक्तीप्रमाणे करीत होतों, पण यश येण्याचें चिन्ह दिसेना. इतक्यांत तात्यासाहेब केळकर आले. त्यांना सर्व हकीकत समजतांच त्यांनी आपण एकदोन दिवसपर्यंत इकडील सर्व पाहून घेतों असें सांगून टिळकांना संकेश्वरला जाण्याचा सल्ला दिला. या प्रकारें मला दुजोरा मिळाल्याने माझें काम झालें व रात्रीच्या गाडीने टिळक, अणे, चिंतामणराव वैद्य, शिवरामपंत परांजपे व मी असे संकेश्वरला जाण्याकरिता निघालों. १९२० पर्यंत बेळगावच्या तीन जिल्हा सभा भरल्या होत्या व तिन्ही सभांना टिळक हजर होते. १९१९ सालीं टिळक इंग्लंड-मध्ये होते. त्यामुळे जिल्हा सभा आम्हीं भरविली नाही.

जुन्नरप्रमाणेच संकेश्वरच्या परिषदेंत गोंधळ घालण्याचें पुण्याच्या नेमस्तांनी ठरवून त्याप्रमाणे बेळगावला कळविण्यांत आलें होतें. बेळगावच्या जुन्या पुढाऱ्यांपैकी कोणींही हें काम करण्याचें मान्य केलें नाही. तेव्हा लट्ठे, चौगुले, चिकोडी वगैरे ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या मदतीने मोरोपंत मराठे वकील यांनी आम्हांला विरोध करण्याचें पत्करलें होतें. पण जुन्नरच्याप्रमाणे धिंगाणा न घालता रीतीप्रमाणे परिषदेंत येऊन आपलें म्हणणें मांडावयाचें एवढेंच त्यांनी ठरविलें होतें. या गोष्टीला कोणाचीच हरकत नव्हती. कौन्सिलसंबंधीचा मुख्य ठराव मींच मांडला होता. त्याला मराठे यांनी उपसूचना आणली व मराठे यांना चौगुले यांनी दुजोरा दिला. रीतीप्रमाणे दोन्ही पक्षांतर्फे भाषणें झालीं व प्रचंड बहुमताने आमचा ठराव मंजूर झाला. सभेचें काम शांतपणें झालें.

## ब्राह्मणेतरांनी केलेला विपर्यास

रात्रीं संकेश्वर नागरिकांच्या वतीने टिळकांना मानपत्र अर्पण करण्याचा समारंभ झाला. त्या वेळीं ब्राह्मणेतर लोक कांही तरी हुल्लड करतील असें वाटलें होतें; पण त्यांचें कांही चाललें नाही. फक्त एका गृहस्थाने मात्र आपण मानपत्राच्या विरुद्ध आहोंत असें उठून सांगितलें. आणखी कोणी विरुद्ध असल्यास त्यांनी तसें कळवावें, असें अध्यक्षांनी (मी किंवा वेळवी) सांगितलें. पण कोणी पुढे आलें नाही. टिळकांनी आपल्या भाषणांत ज्या एका गृहस्थांनी विरोध केला होता त्यांचें अभिनंदन करून जातवार निवडणुकीचें तत्त्व कसें अनिष्ट आहे याची फार सोप्या भाषेंत फोड केली. जातवार निवडणुकी करून जातीचें किंवा त्या त्या जातींतील धंद्यांचें कौन्सिलमध्ये प्रदर्शन करावयाचें नाही असें ते म्हणाले आणि उदाहरणादाखल तेली, तांबोळी, शिंपी, कुंभार, गवंडी व ब्राह्मण इत्यादि जातींचा उल्लेख करून त्यांच्या धंद्यांचींही त्यांनी नावें घेतलीं. पण याचा विपर्यास करून ब्राह्मणेतर जातींची व त्यांच्या धंद्यांची टिळकांनी थट्टा केली, असा त्यांच्यावर आरोप करण्यांत येऊन ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी आमच्या प्रांतांत बरीच चळवळ केली. टिळकांनी जातींचीं नावें घेतांना ब्राह्मण जातीचेंही नाव घेऊन, त्यांच्या पळीपंचपात्री-दर्भ-समिधा वगैरे घेऊन संध्यावंदन इत्यादि नित्तनैमित्तिक कामांचाही उल्लेख केला होता. पण ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना टिळकांवर व पर्यायाने ब्राह्मण जातीवर कांही तरी आरोप करावयाचा होता म्हणून त्यांनी टिळकांचें अर्धवटच वाक्य घेऊन त्यावर टीकेची झोड उठविली. आम्हींही त्यांच्या या प्रयत्नांचा तितक्याच जोराने प्रतिकार केला. त्यामुळे आमच्या प्रांतांत कांही दिवसपर्यंत हाच विषय चर्चेचा झाला होता व मीच आमच्या पक्षांत रिकामा असल्यामुळे ही सर्व जबाबदारी माझ्यावर पडली होती.

## नेमस्त-ब्राह्मणेतरांची युती

याच संधीला सोलापूर येथे मुंबईची प्रांतिक परिषद भरणार होती. जुन्नर व संकेश्वर येथील परिषदांत नेमस्तांची डाळ शिजली नाही हें पाहून त्यांनी सोलापूरला आपली सर्व शक्ती एकवटण्याचा घाट घातला. ब्राह्मणेतर पक्षाचे महाराष्ट्र व कर्नाटकांतील सर्व पुढारी या वेळीं नेमस्तांना मिळाले. सोलापूर जिल्ह्याचे माहितगार, ब्राह्मणेतर पक्षाचे तरुण व तडफदार पुढारी, वालचंद कोठारी यांनी पुढाकार घेतला होता. सोलापूर शहरांत लिंगायत लोकांची वस्ती बरीच मोठी असून त्या जातींतील लोक श्रीमंत व वजनदार आहेत. कर्नाटकांतील ब्राह्मणेतर पक्षांत सामील झालेल्या लिंगायत लोकांच्या मदतीने सोलापूरचे लिंगायत आपल्याला वश होतील, अशी नेमस्तांनी आशा केली होती. पण तेथील पुढारी डॉ. देशमुख व जास्कर वगैरे मंडळींच्या खटपटीने तें साध्य झालें नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.

शिवाय सोलापूरचे श्रीमान गृहस्थ काडादी व बिरद यांच्या इस्टेटीचे वहिवाटदार पाटील यांना टिळकांबद्दल सहानुभूती होती. ब्राह्मणेतर पक्षाप्रमाणेच नेमस्तांनी बेझंटबाईंची सहानुभूती मिळवली होती. होमरूलच्या चळवळीच्या वेळीं बेझंटबाईंचें व राष्ट्रीय पक्षाचें बरेंच जुळलें होतें. ही हकीकत पूर्वी आलीच आहे. तथापि बाईंना काँग्रेसतर्फे साक्ष देण्याकरिता दिल्ली काँग्रेसमध्ये निवडण्यांत आलें नाही म्हणून किंवा इतर कांही असल्याच कारणांमुळे बाईंची मर्जी खप्पा झाली व त्यांनी नेमस्तांशीं एकमत करून आमच्या पक्षाशीं विरोध मांडला होता. याचा फायदा नेमस्तांनी घेतला. बाईंनी स्वतः हजर राहून आपल्या अनुयायांनिशी नेमस्तांना मदत करण्याचें ठरवलें होतें त्याप्रमाणे त्या सोलापूरला येऊन दाखलही झाल्या. आमच्या पक्षातर्फेही आम्ही जय्यत तयारी केली. आमच्या जिल्ह्यांतील आम्हांला अनुकूल असणारे ब्राह्मणेतर जातीचे पुढारी आमच्या बरोबर आले होते. सोलापुरास परिषदेच्या दिवसांत रोज रात्रीं जाहीर सभा भरून आमच्या पक्षांतील मंडळींचीं व्याख्यानें होत असत. व्याख्यात्यांमध्ये माझेंही नाव होतें व दोनतीन भाषणें मीं केलीं होतीं. खुद्द टिळकांचींही भाषणें झालीं होतीं. त्यामुळे लोकांत जागृती होऊन आम्हांला जय मिळणार असें खात्रीने वाटूं लागलें. खुद्द टिळकांच्या महाराष्ट्रांत सोलापूरसारख्या व्यापाराच्या केंद्रस्थानीं टिळकांचा पराभव झाल्यास टिळक पुन्हा कौन्सिलच्या बाबतींत डोकें वर काढणार नाहीत व निवडणुकी आपल्याच वतीने सहज होतील, अशी उमेद नेमस्तांना होती. पण परिषदेंत काय होईल याचा अजमास त्यांना लागला म्हणून त्यांनी परिषदेच्या मंडपांत गुंडगिरी करण्याचा घाट घातला व त्याप्रमाणे तयारी केली. परिषदेचे अध्यक्ष तात्यासाहेब केळकर होते. त्यांनी आपलें इंग्रजी भाषण वाचून दाखविलें व त्याचें मराठी भाषांतर त्यांच्या सांगण्यावरून मीं वाचलें.

सुधारणांसंबंधाने अमृतसरच्या काँग्रेसमध्ये जो ठराव मंजूर झाला होता तोच ठराव जुन्नर, संकेश्वर व सोलापूर येथे मंजूर करून घेणें हेंच आमचें मुख्य काम होतें. त्याविरुद्ध कलकत्त्याच्या नेमस्त परिषदेने मंजूर केलेला ठराव मान्य करून घेण्याचें इतरांचें काम होतें. त्यामुळे ही चढाओढ चालली होती. ठरावावर दोन्ही पक्षांतील मुख्य मुख्य वक्त्यांचीं भाषणें होण्याचें ठरलें होतें; प्रत्येक पक्षांतील पाच (किंवा दहा) लोकांना निवडण्यांत आलें होतें. नेमस्तांच्या पक्षांत डॉ. परांजपे, बेझंटबाई, चंदावरकर वगैरे प्रमुख होते. आमच्या पक्षातर्फे टिळक, परांजपे, डॉ. सावरकर, करंदीकर, मी वगैरे होतों. ठरल्याप्रमाणे सर्वांचीं भाषणें झालीं व ठराव मताकरिता अध्यक्षांनी पुढे मांडला. त्या वेळीं प्रचंड बहुमताने ठराव आमच्या वतीने मंजूर झाला. पण कोणाकडे किती मतें पडलीं हें निश्चित झालें नव्हतें. तेव्हा नेमस्तांनी त्याबद्दलची मागणी केली. पण नियमामध्ये अशी मागणी करतां येत नाही म्हणून टिळकांनी तक्रार केली. तेव्हा अध्यक्षांनी आपला अंदाज सांगावा व त्यांचा अंदाज आम्ही मान्य करूं, असें नेमस्तांचे पुढारी म्हणाले. त्याबरोबर केळकरांनी दोनतृतीयांश विरुद्ध एकतृतीयांश असा निकाल दिला. एकतृतीयांश मतें तरी आपल्याला मिळालीं याबद्दल नेमस्तांना आनंद झाला

व त्यांनी खूप टाळ्या पिटल्या! टिळकांच्या हरकतीला न जुमानतां केळकरांनी हा निकाल दिला हें टिळकांना रुचलें नाही. मी त्यांच्या जवळच बसलों होतों. त्यांनी त्याप्रमाणे बोलूनही दाखविलें.

सोलापूरच्या परिषदेंत आपल्याला हार खावी लागणार, असें समजतांच गुंडगिरी करण्याचा घाट कांही नेमस्त व त्यांच्या ब्राह्मणेतर साथीदारांनी घातला होता, असें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणे पुढे घडूनही आलें व परिषदेंत थोडी चकमकही उडाली. पोलीस आले व त्यांनी शांतता केली. त्या वेळीं गुडी हे डेप्युटी सुपरिंटेंडंट ऑफ पोलीस होते. त्यांनी सर्व चवकशी करून या दंगलीची जबाबदारी राष्ट्रीय पक्षावर नसल्याचा रिपोर्ट केला असें समजतें. वस्तुस्थितीही तशीच होती. सोलापूरच्या परिषदेच्या वेळीं मीं वल्लभभाई पटेल यांना प्रथम पाहिलें. टिळकांच्या धोरणाने काम करण्याचें त्यांनी त्या वेळीं टिळकांजवळ कबूल केलें होतें, असें मला आठवतें.

## *टिळकांच्या मृत्यूचें भविष्य*

सोलापूरला जाण्याकरिता बेळगावहून ज्या गाडीने मी, बेळवी व इतर प्रतिनिधी निघालों त्याच गाडीने बेळगावचे मुनसफ काशीनाथराव कुलकर्णी हे मुंबईला निघाले होते. चिकोडी स्टेशनावर गाडी सायंकाळीं अजमासें सात वाजतां पोचली. स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर मी इकडेतिकडे सहज फिरत होतों. त्या वेळीं कुलकर्णी यांचें लक्ष माझ्याकडे जाऊन त्यांनी मला आपल्या डब्यांत बोलाविलें. मी जाऊन बसलों व गाडी चालू झाली. त्यांचें व माझें बोलणें चालू झालें. त्यांत मीं कॉन्फरन्सकरिता सोलापूरला निघालों आहें असें सांगितलें. त्याबरोबर सोलापूरला टिळक येणार आहेत काय?' असा त्यांनी मला प्रश्न केला. मी 'होय' असें उत्तर दिलें. तेव्हा त्यांनी थोडा विचार केल्यासारखें करून टिळकांचें आयुष्य संपत आलें आहे, तेव्हा त्यांना 'कांही करावयाचें असल्यास करून घ्या' म्हणून सांगा, असें सांगितलें आणि त्यांच्या मरणाची तारीख १ ऑगस्ट मध्यरात्रींच्या सुमारास आहे असेंही मला ते बोलले. फलज्योतिषावर माझा भरवसा नसल्यामुळे व काशीनाथरावांच्या त्या वेळच्या बोलण्याचालण्यावरून त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवू नये असेंच मला वाटलें. त्यांच्या भविष्याबद्दल मीं त्यांची थोडीशी थट्टा केली व माझ्या डब्यांत जाऊन बसलों. ही गोष्ट पुढे माझ्या लक्षांतही राहिली नाही. त्यांनी तारीख, महिना माझ्या डायरींत टिपून ठेवण्याकरिता कळविलें होतें; पण तसें करण्याची मला आवश्यकता भासली नाही. पण टिळकांच्या शेवटच्या अजारांत मी त्यांच्याजवळ असल्याने शेवटच्या दोनतीन दिवसांत कुलकर्ण्यांच्या भविष्याची आठवण होऊन भीती वाटली. भविष्य तंतोतंत बरोबर आलें. माझा अद्यापि फलज्योतिषावर विश्वास नाही. स्वतः कुलकर्ण्यांचीं आपल्याचसंबंधीचीं व दुसरीं कित्येक भविष्यें चुकलीं आहेत असें मला अलीकडे समजलें. पण टिळकांच्या मृत्यूचें त्यांचें भविष्य मात्र बरोबर आलें ही गोष्ट खरी.

आमच्या पक्षानें कौन्सिलमध्ये शिरून काम करण्याचें ठरलें त्यामुळे हेंच उद्दिष्ट साध्य करण्याकरिता एक पक्ष स्थापून त्यामार्फत प्रत्येक जिल्ह्यांत निवडणुकी लढवावयाच्या असें टिळक-बॅप्टिस्टा वगैरे मंडळींनी ठरविलें. त्या पक्षाला 'कॅाँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी' असें नाव देऊन या पक्षाचे हेतू व कार्यक्रम वगैरे जाहीर पत्राच्या द्वारें प्रसिद्ध केले. हा पक्ष स्थापन करतेवेळीं मी पुण्यास हजर होतों व यासंबंधाने विचार चालल्या वेळींही मी होतों. मला स्वतःला अशा प्रकारचा पक्ष स्थापणें व कौन्सिलांत तिच्यामार्फत जाणें हें त्या वेळीं पसंत नव्हतें. याला दोनतीन कारणें होतीं. पहिलें कारण हें होतें की, कौन्सिलांत जे अधिकार मिळाले होते त्यांची योग्य बजावणी होईल व पक्षाच्या जाहीर पत्रकांत नमूद केलेले उद्देश तडीला नेतां येतील असें मला वाटत नव्हतें. दुसरें, कॅाँग्रेस पक्षाच्या लोकांनी कौन्सिलांत जाण्याचा प्रयत्न केल्यास नवीन जन्माला आलेल्या ब्राह्मणेतर पक्षाला जोर येईल व ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद बळावेल आणि त्याचा परिणाम कॅाँग्रेसवर होईल अशी भीती मला वाटत होती. त्या वेळीं कॅाँग्रेसची घटना व्यवस्थित नव्हती व कॅाँग्रेसची प्रतिष्ठा फारशी नव्हती. महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांपुरतें पाहूं गेल्यास कॅाँग्रेसमध्ये ब्राह्मण मंडळींच जास्ती होती. त्यामुळे स्वाभाविकपणें उमेदवारांच्या संख्येंत ब्राह्मणांचेंच आधिक्य दिसून आल्याशिवाय राहणार नाही, त्याचा परिणाम ब्राह्मणेतरांवर अनिष्ट होईल व कॅाँग्रेसची उपयुक्तता कमी होईल असें मला वाटत होतें. या दहाबारा वर्षांत कॅाँग्रेसची प्रतिष्ठा वाढली असून बऱ्याच ब्राह्मणेतर लोकांनी या दोन्ही प्रांतांत कॅाँग्रेसच्या कार्यक्रमांत भाग घेऊन तुरुंगवासासारखे कष्टही सहन केले आहेत. तरी ब्राह्मणब्राह्मणेतर वाद मिटला आहे असें कोणीही म्हणणार नाही. त्यांतून निवडणुकी आल्या म्हणजे अद्यापिदेखील या वादाला तीव्र स्वरूप येतें, असा या दोन्ही प्रांतांत सार्वत्रिक अनुभव आहे. यावरून त्या वेळीं काय स्थिती असावी याची कल्पना येईल. म्हणून कॅाँग्रेसच्या लोकांनी असा संघटित प्रयत्न करून कौन्सिलांत जाण्याने फायद्यापेक्षा हानीच जास्ती होईल, असें मला वाटत होतें. तिसरें आणि या सर्वांहून महत्त्वाचें कारण असें होतें की, अमृतसर व इतर ठिकाणीं सरकारी अधिकाऱ्यांनी जें वर्तन केलें होतें त्याचें निराकरण सरकाराकडून कोणत्याही प्रकारें झालें नव्हतें. अडचणीची वेळ होती म्हणून हिंदुस्थानच्या लोकांच्या तोंडावरून त्यांना हात फिरवावयाचा होता; म्हणून स्वराज्य, जबाबदार राज्यपद्धती इत्यादी गोड गोड शब्दांचा प्रयोग करण्यांत आला. पण अडचण संपल्यानंतर प्रत्यक्ष माप पदरांत टाकतेवेळीं भ्रमाचा भोपळा फुटल्याचें दिसून आलें. यावरून सरकारची मनोवृत्ति स्पष्ट दिसत होती. कांही तरी गूळखोबरें हातांत दिल्यासारखें करून, त्या फासांत लोकांना अडकवून, इतर चळवळी थांबवण्याचा इंग्रज मुत्सद्दी डाव खेळत होते असें माझें मत होतें.

त्याशिवाय अमृतसरच्या प्रकरणामुळे इंग्रज सरकारचे पूर्ण अभिमानी गांधीजी यांचाही त्यांच्यावरील विश्वास उडत चालला होता व आपल्या दक्षिण आफ्रिकेंतील पद्धतीला अनुसरून ते कांही तरी चळवळ करतील अशी बातमी माझ्या कानावर उडतउडत येत होती. याचा परिणाम काय होतो हें पाहण्याकडे माझा कल होता. कौन्सिलांत जाऊन इंग्रज मुत्सद्द्यांच्या डावांत सापडण्यापेक्षा स्वतंत्र चळवळ करण्यांत राष्ट्राचें हित आहे असें तेव्हापासूनच मला वाटूं लागलें होतें. तथापि हें बोलून दाखवून टिळकांना उघड विरोध करण्याचें माझ्यामध्ये धैर्य नव्हतेंच. टिळकांच्याबद्दल एक प्रकारची श्रद्धा—व तिला अंधश्रद्धा असें कोणीं म्हटल्यास त्याबद्दल मला वाईटही वाटणार नाही—असल्यामुळे मी कांही बोललों नाही. याशिवाय मी शिपाई दर्जाचा मनुष्य आहें असें स्वतःला मानीत असल्यामुळे, मीं जास्ती ढवळाढवळ केली नाही. आमच्या पक्षांतील बरीच मंडळी—बहुतेक सर्वच—या कार्यक्रमाला अनुकूल होती व चर्चेंत कोणत्या जिल्ह्यांत कोणीं उभें राहावें याबद्दलही भाषा झाली होती.

### *असहकारिता आणि टिळक*

१९२० च्या कलकत्ता व नागपूर काँग्रेसनंतर जी असहकारितेची चळवळ सुरू झाली तींत टिळकांनी भाग घेतला असता की नसता हा एक वादाचा विषय आहे. या वादाचा निश्चयात्मक निकाल लागणें कठीण आहे. ज्या पुढाऱ्यांनी कलकत्त्याच्या काँग्रेसमध्ये असहकारितेच्या ठरावाला कसून विरोध केला होता त्यांपैकी पुष्कळांनी नागपुरास आपला विरोध मागे घेतला; इतकेंच नव्हे तर त्यांनी चळवळींत पुढाकार घेतला. दास, लजपतराय हीं अशा तऱ्हेचीं ठळक उदाहरणें आहेत. टिळकांनी काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्ष कौन्सिलच्या कार्याकरितां स्थापला ही गोष्ट खरी आहे. टिळकांनी असहकारितेचा अव्हेर करून कौन्सिलच्या मार्गच स्वीकारला असता हें सिद्ध करण्याकरिता त्यांनी निवडणुकीच्यापूर्वी हा पक्ष स्थापला व जिल्हानिहाय उमेदवारसुद्धा नियोजित केले या गोष्टी भक्कम पुराव्याच्या म्हणून पुढे करण्यांत येतात. पण काँग्रेसमध्ये एकदा नव्हे पण दोनदा असहकारितेचा ठराव पास झाल्यानंतर टिळकांनी काय केलें असतें हा प्रश्न आहे. त्यापूर्वी टिळकांचीं मतें काय होतीं किंवा त्यांनी काय केलें हे प्रश्न गौण आहेत, व पुराव्याच्या दृष्टीने ते कमी महत्त्वाचे ठरतात. काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाच्या जाहीर पत्रकाचाच पुरावा घ्यावयाचा तर त्या पत्रकांत त्या पक्षाने काँग्रेसनिष्ठ राहावयाचें हें पहिलेंच व मुख्य कलम आहे. याची वाट मग कशी लावावयाची ? कोणत्याही परिस्थितींत असहकार किंवा तज्जन्य कायदेभंगासारखी प्रत्येक प्रत्यक्ष कृतीची (direct action) चळवळ टिळकांना (काँग्रेसची अशा चळवळीला मान्यता मिळण्याच्यापूर्वी) मान्य नव्हती असें गृहीत धरलें, तरी काँग्रेसशीं निष्ठापूर्वक वागावयाचें हें जें त्यांनी नवीन पक्षाच्या उद्देशांत मुख्य सूत्र घातलें होतें त्याचा अर्थ कसा लावावयाचा हा मुख्य प्रश्न आहे. (या मुद्द्याचा विचार पुन्हा पुढे करावयाचा आहे.)

या वरील गोष्टीशिवाय माझ्याजवळ एक प्रत्यक्ष पुरावा आहे. तोही माझ्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. नॉनकोऑपरेशनच्या कल्पना हिंदुस्थानच्या वातावरणांत उद्भवल्या असतांना, कुलाबा जिल्हा सभेची बैठक उरण येथे भरण्याची वेळ आली. या सभेच्या अध्यक्षस्थानीं माझी निवड करण्यांत आली होती. माझा कल असहकारितेकडे झुकूं लागला असल्यामुळे त्यासंबंधी कांही तरी माझ्या भाषणांत उल्लेख व्हावा असें मला वाटत होतें. पण या बाबतींत टिळकांचा सल्ला घेतल्याशिवाय कांही करावयाचें नाही असें मीं ठरविलें होतें. म्हणून उरणला जाण्यापूर्वी टिळकांची समक्ष भेट घेऊन त्यांचें मत या बाबतींत काय आहे हें समजून घेण्याकरिता मीं एक दिवस पुण्यास मुक्काम केला. टिळकांची भेट घेऊन त्यांना मीं या बाबतींत विचारलें. टिळकांनी थोडा वेळ विचार केला; आणि आपलें मत निश्चयात्मक कांही ठरल्याचें जरी मला सांगितलें नाही तरी त्यांनी माझ्या भाषणांत या चळवळींचा उल्लेख करून तिचें समर्थन करण्यास कांहीच हरकत नाही असें बोलून दाखविलें. त्यांच्या एकंदर बोलण्यावरून लोकमत अजमावून पाहण्याचा त्यांचा विचार होता, आणि तें पाहून आपलें धोरण व निश्चित मत त्यांना बनवावयाचें होतें, असें मला वाटतें. त्यांचें धोरण एक प्रकारचें व माझें धोरण त्यांच्या विरुद्ध असें होऊं नये या हेतूने मीं त्यांचा सल्ला घेतला होता व ही गोष्टही त्यांना मीं माझ्या बोलण्यांत स्पष्टपणें कळविली होती. असें असूनही असहकारितेच्या चळवळीला अनुकूल असे माझे विचार मीं प्रदर्शित करूं नयेत असें मला त्यांनी सांगितलें नाही. त्यांचा व माझा संबंध पाहातां त्यांनी मला आपलें खरें मत (जरी तें माझ्या मताच्या विरुद्ध असलें तरी) कळविलें नसतें असें नाही. तें कळविण्याला त्यांना संकोच वाटला असेल असें मानण्याला कांही कारण नाही.

### *हिंदी मुसलमान समाजाची जागृती*

हें माझें बोलणें झाल्यानंतर मी उरणला मुंबईहून गेलों. स्वागताध्यक्ष एक मुसलमान गृहस्थ होते. तुर्कस्तानचा प्रश्न त्या वेळीं इंग्रज लोकांपुढे होता. हिंदी मुसलमानांचें लक्ष त्या प्रश्नाकडे लागलें होतें. उरण कॉन्फरन्सच्या पूर्वी एखादा दिवस किंवा त्याच दिवशीं तुर्कस्तानच्या बाबतींत इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉइड जार्ज यांनी आपलें धोरण प्रसिद्ध केलें होतें. तुर्कस्तानच्या विरुद्ध हिंदी मुसलमानांनी आपल्याला महायुद्धांत मदत करावी म्हणून जीं वचनें मुख्य प्रधानांनी व इतर ब्रिटिश मुत्सद्द्यांनी दिलीं होतीं त्याविरुद्ध हें जाहीर केलेलें धोरण होतें. त्याने आपला धडधडीत विश्वासघात झाला असें मुसलमानांना वाटलें. या धोरणाचा प्रतिकार करण्याच्या तयारींत मुसल्मान लोक होते. अशा संधीला उरणची परिषद भरावयाची होती. परिषदेंत मुंबईचे बरेच मुसल्मान हजर होते. या सर्व गोष्टींचा माझ्या मनावर परिणाम होऊन मीं माझ्या भाषणांत या प्रश्नाचा विशेष ऊहापोह केला. स्वराज्याच्या किंवा भावी कौन्सिलांच्या कामाला मीं गौणस्थान दिलें. जर असहकारितेची चळवळ

हिंदुस्थानांत या प्रश्नासंबंधाने सुरू झाली तर हिंदूंनी या चळवळीला मनोभावाने मिळावें असें माझें मत मीं तेथें जाहीर केलें. तेथे असलेल्या मुसलमानांना माझें भाषण आवडलें इतकेंच नाही तर त्या ठिकाणीं जे महाराष्ट्रीय होते व जे पुढे असहकारितेच्या विरुद्ध गेले त्यांनादेखील माझे विचार पसंत पडले.

उरणची कॉन्फरन्स संपल्यानंतर मी मुंबईला परत गेलों. माझ्याबरोबर मुंबईहून आलेली मुसलमान मंडळीही होती. त्याच दिवशीं मी मुंबईहून निघणार होतों. मुंबईस शौकत अली आले होते. त्यांना उरणच्या परिषदेची हकीकत कळली व मी त्याच दिवशीं मेलने पुण्यास जाणार होतों हेंही समजलें. म्हणून मला भेटण्याकरिता मुद्दाम दहावीस मंडळी बरोबर घेऊन ते बोरीबंदराच्या स्टेशनावर आले. मला कडकडून भेटून माझ्या भाषणाबद्दल त्यांनी माझें अभिनंदन केलें. मी पुण्यास उतरलों व झालेली हकीकत टिळकांना कळविली.

टिळकांनी नागपूर कॉंग्रेसनंतर काय केलें असतें हा विषय महाराष्ट्रांत महत्त्वाचा वाटून त्यावर सार्वजनिक सभांतून व खासगी भाषणांतून बरीच चर्चा होत असे. पण मला हा वाद गौण स्वरूपाचा वाटत असल्यामुळे मीं कधीही त्यांत भाग घेतला नाही. म्हणून वरील गोष्टीची परिस्फुटता करण्याचा प्रसंग आला नाही. तथापि खाजगी भाषणांतून मीं पुष्कळ लोकांजवळ ही गोष्ट सांगितली आहे.

### *काशीमध्ये ऑल इंडिया कॉंग्रेस*

यानंतर बनारस येथे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी भरली. त्या सभेंत अमृतसरसंबंधाने कॉंग्रेसने नेमलेल्या कमिटीचा विचार होणार होता. 'केसरी' पत्रांतून ॲनी बेझंटबाईवर कडक टीका आली होती म्हणून बाईनी टिळकांच्या विरुद्ध तक्रार केली होती, या गोष्टीचाही विचार होणार होता. टिळक, खापर्डे, केळकर, खाडिलकर, चिंतामणराव वैद्य, उधोजी वगैरे सर्व मिळून आम्ही काशीला गेलों. काशींत खापर्डे यांचे आप्त काळे म्हणून सावकार आहेत त्यांच्या बागेंत आम्ही उतरलों होतों. ऑल इंडिया कमिटींत अमृतसर रिपोर्ट मंजूर करण्यांत आला. पण बेझंटबाईच्या तक्रारीसंबंधाने अध्यक्ष मोतीलाल यांच्या मध्यस्थीने तें प्रकरण मिटविण्यांत आलें.

काशीच्या मुक्कामांत टिळकांचीं घाटावर वगैरे व्याख्यानें झालीं. बाबू मोतीलाल घोष—'अमृत बझार पत्रिके'चे संपादक—हे आजारी असल्यामुळे काशीला येऊन राहिले होते. त्यांना भेटण्याकरिता टिळक गेले होते. टिळकांचा व त्यांचा जिव्हाळा असल्याचें त्या भेटीच्या वेळीं दिसून आलें. असहकारितेच्या चळवळीसंबंधाने त्यांचें व मोतीलालबाबूंचें थोडेसें बोलणें झालें. त्या वेळीं त्यांच्या बोलण्यावरून टिळक फारसे अनुकूल होते असें मला वाटलें नाही. तेथे जितेंद्रलाल बानर्जी होते. त्यांनीही टिळकांची भेट घेतली. बंगालचें लोकमत असहकारितेसंबंधाने कसें आहे हें वारंवार कळविण्यासंबंधाने टिळकांनी त्यांना सांगितलें.

टिळक आपल्या तरुणपणीं पोहत गंगापार जाऊन परत आले होते. या वेळीं एक दिवस स्नानाला गेल्यावेळीं टिळक पोहण्याकरिता गंगेंत उतरले; पण वीसपंचवीस हात गेले असतील नसतील तोंच त्यांना थकवा आला व ते परत फिरले.

काशीची ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक संपल्यानंतर अलाहाबाद येथे पुढाऱ्यांची एक बैठक झाली. तींत खिलाफतच्या प्रश्नाचा विचार होऊन त्याकरिता असहकारितेची चळवळ सुरू करावी किंवा नाही याबद्दल वाटाघाट झाली. टिळकांना अलाहाबादचें आमंत्रण होतें. पण ते गेले नाहीत. टिळक निश्चितपणें असहकारितेच्या अनुकूल किंवा प्रतिकूल असते तर ते अलाहाबादला जाऊन आपलें मत प्रदर्शित केल्याशिवाय राहिले नसते. पण त्यांना लोकमत अजमावून पाहावयाचें होतें.

सप्रू, बेझंट, वगैरे पुढारी असहकारितेच्या विरुद्ध होते. पण गांधी व अली बंधू अनुकूल होते. ही बैठक संपल्यानंतर आम्ही काशीहून निघालों. वाटेंत चौकी स्टेशनवर जमनादास द्वारकादास भेटले. त्यांना टिळकांनी आमच्या डब्यांत घेतलें. अलाहाबादची सर्व हकीकत त्यांनी टिळकांना सांगितली. जमनादास बेझंटबाईंचे पट्टशिष्य असल्यामुळे त्यांचें मत बाईंच्या मताप्रमाणेच होतें. खापर्डे व जमनादास यांनी गांधी व अली बंधूंची खूप थट्टा उडविली. टिळक फारसें बोलत नव्हते; पण मला मात्र त्यांचा चटोरपणा ऐकून वाईट वाटलें.

वाटेंत जबलपूरच्या मंडळींच्या आग्रहावरून टिळक उतरले व मी मुंबईकडे गेलों. जबलपूर स्टेशनावर उतरल्यानंतर टिळकांनी मला एकीकडे नेऊन बरोबर कांही खर्चाकरिता पाहिजे की काय असें विचारलें. माझ्याजवळ भरपूर पैसे असल्यामुळे मीं नको असें सांगितलें. पण या गोष्टीवरून टिळक आपल्या मंडळींची किती काळजी घेत हें मला समजलें. शिवाय माझ्या स्थितींतील लोकदेखील टिळकांच्या पैशावर प्रवास वगैरे करीत असतील, म्हणूनच टिळकांना मला विचारावें असें वाटलें असावें, असें कळून थोडेंसें आश्चर्य वाटलें.

### *केळकरांच्यावर निराधार आरोप*

चिरोलच्या खटल्याच्या खर्चाकरिता फंड जमविला होता ही हकीकत मागें आलीच आहे. या फंडाला वर्गणी जमविण्याकरिता आम्ही कांही मंडळी हिंडत होतों. तात्यासाहेब केळकर नागपूरकडे गेले होते. त्या वेळीं अच्युतराव कोल्हटकरांची व त्यांची भेट झाली. अच्युतरावही आपल्याकरिता कांही मदत मिळण्याकरिता त्याच वेळी तिकडे होते. तेव्हा केळकरांनी अच्युतरावांना चिरोल केस फंडांतून कांही शिल्लक राहिल्यास पाच हजार रुपये देण्याचें वचन दिलें होतें, असें अच्युतरावांचें म्हणणें होतें. पण त्याप्रमाणे त्यांना पाच हजार रुपये मिळाले नाहीत व असें घडण्याला कारण केळकर आहेत, अशी अच्युतरावांची समजूत होऊन ते आपल्या पत्रांतून केळकर व फंडाचे खजिनदार नेने यांच्यावर कडक लेख लिहून कांही

कांही प्रच्छन्न आरोपही करीत असत. मला वाटतें की 'फंडगुंड' हा शब्द प्रथम कोल्हटकरांनी मराठींत आणला. चटकदार लिहिण्यांत अच्युतराव हे लेखणीबहाद्दर असल्यामुळे लोकांच्या तोंडीं हाच विषय झाला होता. अच्युतरावांना पाच हजार रुपये देण्याचें वचन आपण दिलें नव्हतें असें केळकरांचें म्हणणें होतें. अच्युतरावांपेक्षा केळकरांवरच महाराष्ट्रांतील लोकांचा अधिक विश्वास होता ही गोष्ट खरी. तथापि कित्येकांचा बुद्धिभेद होऊन कांही तरी भानगड आहे असें त्यांना वाटत असावें. उघड व सार्वजनिकपणें अशा प्रकारचे आरोप करण्यांत आल्यानंतर कांही तरी उघड उत्तर देण्याची आवश्यकता भासली. केळकरांचा कोणत्याही फंडाशीं संबंध नव्हता; पण नेने हे पैसाफंड, टिळक ज्युबिली फंड, चिरोल फंड इत्यादिकांचे खजिनदार असल्यामुळे त्यांच्या वतीनें खुलासा करण्याची आवश्यकता होती. नेने हे पैशाला फार जपत असत. पैसा कसा खर्च करूं नये इकडेच त्यांचें लक्ष असे. त्यामुळे सार्वजनिक कामाला कित्येक वेळां अडचणी येत असत असा त्यांचा लौकिक होता. अशा मनुष्यासंबंधानें भलभलते आरोप झालेले पाहून कोल्हटकरांना उत्तर स्वतः द्यावें असें टिळकांच्या मनांत आलें.

### *टिळकांनी निवडणुकीला उभें राहावें*

गायकवाडवाड्याच्या पटांगणांत कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी स्थापन केली, हें जाहीर करण्याकरिता व चिरोल फंडाचा हिशेब प्रसिद्ध करण्याकरिता वगैरे जाहीर सभा भरली होती. त्या वेळीं उमरावतीचे वामनराव जोशी वगैरे मंडळींनी भाषणें करून कोल्हटकरांना उत्तरें दिलीं. माझेंही भाषण झालें. मी अच्युतरावांच्या प्रकरणासंबंधानें कांही बोललों नाही. पण कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी स्थापून तिच्यामार्फत निवडणुकी लढवण्याच्या कार्यक्रमांत टिळकांनी मुख्य भाग घेतला होता, तेव्हा त्यांनी स्वतः निवडणुकीला उभें राहावें व कौन्सिलांत या पार्टीतर्फे निवडून आलेल्या पक्षाचें नेतृत्व आपल्याकडे घ्यावें, म्हणजेच कांही कार्य झाल्यास होईल, असें मी बोललों. कौन्सिलवर त्या वेळच्या परिस्थितीमुळे माझा विश्वास नव्हता, हें मीं पूर्वीच सांगितलें आहे. डेमोक्रॅटिक पक्षातर्फे कांही उमेदवार निवडून आले, तरी कौन्सिलमध्ये गेल्यानंतर त्यांना एका सूत्रांत ठेवणें हें आवळ्यांची मोट बांधण्यासारखें कठीण आहे, असें मला वाटत होतें. तेव्हा अशा स्थितींत टिळकांसारख्या सर्वांवर वजन असणाऱ्या व पार्टीला जन्म देणाऱ्या पुढाऱ्यांनी बाहेर न राहतां कौन्सिलमध्ये गेल्यासच कांही-ना-कांही काम होईल असें समजून जाहीर रीतीनें माझ्या भाषणांत मीं वरील सूचना केली.

पण टिळकांनी आपलें म्हातारपण झालें असल्यामुळे कौन्सिलांतील दगदग आपल्याला झेपणार नाही या सबबीवर कौन्सिलकरिता उभें न राहण्याचें व माझी सूचना पसंत नसल्याचें स्पष्टपणें सांगितलें. याशिवाय कोल्हटकरांच्या सर्व आरोपांना त्यांनी खरमरीत उत्तर

दिलें. त्यामुळे जनतेचें कांही अंशाने समाधान झालें असेल हें खरें. पण स्वतः अच्युतरावांचें समाधान झालें नाही व ते दबलेही नाहीत. उलट त्यांनी आपल्या पत्रांत टिळकांवरदेखील हल्ला चढवण्याला सुरुवात केली. माझ्यावरही कांही बाबतींत थोडे शिंतोडे उडाले. पण त्यांत पैशाचा किंवा हिशेबाचा कांही संबंध नव्हता.

### *उमेदवारांत माझें नाव*

ही सभा संपल्यानंतर कांही दिवसांनी जिल्हा-निहाय उमेदवारांचीं नावें ' केसरी 'त प्रसिद्ध झालीं. त्यांत मुंबई कौन्सिलकरिता माझें नाव बेळगाव जिल्ह्यातर्फे प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. पण या बाबतींत माझा विचार घेण्यांत आला नव्हता. दक्षिण भागातर्फे असेंब्लीच्या निवडणुकीला बेळवींचें नाव प्रसिद्ध झालें होतें. पण त्यांची संमती घेऊन तें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. माझा स्वतःचा कौन्सिलकडे कल नसतांही मला न विचारतां माझें नाव प्रसिद्ध झालेलें पाहून मला आश्चर्य वाटलें व याबद्दल मीं चौकशी केली. त्या वेळीं माझी खात्री असल्यामुळे व नाव प्रसिद्ध केल्यानंतर मी मागे घेणार नाही असें वाटल्यामुळे तसें करण्यांत आलें, असें मला कळलें. टिळकांना कळूनसवरून या गोष्टी झाल्यामुळे मी स्वस्थ बसलों व निवडणुकीच्या खटपटीला लागलों.

बेळगाव जिल्ह्यातर्फे दोन जागा कौन्सिलांत होत्या. एका जागेकरिता मला व दुसऱ्या जागेकरिता आमच्या पक्षातर्फे नुरेंदप्पा शेट्टी यांना उमेदवार निवडण्यांत आलें. आमच्या विरुद्ध ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी चिकोडी व चौगुले हे उभे राहिले. बेळवींच्या विरुद्ध लठ्ठे हे उभे होते. आम्ही तिघे मिळून आमच्या जिल्ह्यांत हिंडत होतों, व कॉंग्रेसतर्फे उभे राहिलेल्या लोकांनाच मतें दिलीं पाहिजेत अशा प्रकारचीं भाषणें खेड्यापाड्यांत करीत होतों. चिकोडीमध्ये लिंगायत मतदारांची संख्या बेळगाव जिल्ह्यांत मोठी असल्यामुळे एक जागा चिकोडीला मिळण्याचा संभव होता. नुरेंदप्पा हेही लिंगायतच. पण कॉंग्रेसमध्ये लिंगायत फारसे सामील झाले नव्हते; त्यामुळे नुरेंदप्पांची खात्री नव्हती. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादालाही जोर आला होता. अशा परिस्थितींत नुरेंदप्पांना ब्राह्मणांनी मदत दिल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. त्या दृष्टीने प्रयत्न केल्याबरोबर कांही ब्राह्मण पुढाऱ्यांनी तसें करण्याचें साफ नाकारलें व आपलीं दोन्ही मतें मलाच देण्याचा आग्रह धरला. आणि त्याप्रमाणे जातिवादाच्या तत्त्वावर खटपट करण्याला ब्राह्मणांनी प्रारंभ केला. नुरेंदप्पांच्या लिंगायत स्नेह्यांनी लिंगायत मतदारांचीं सर्व मतें त्यांनाच मिळवून देण्याच्या प्रयत्नाला प्रारंभ केला. आम्ही दोघेही एकाच पक्षाचे असूनही आमच्यामध्येदेखील जातिविशिष्ट तत्त्वावर खटपट होण्याला प्रारंभ झाला. वास्तविक ही एक आपत्तीच होती. हें होणार असें मला पूर्वीपासून वाटत होतें. शिवाय ब्राह्मणांचें वजन खेड्यापाड्यांत कांही कमी नसतें. त्यांनी कांही ब्राह्मणेतर जातींच्या लोकांचीं मतें मिळवून दिलीं असतीं. असें होऊन मी निवडून येऊन नुरेंदप्पा जर

पडले असते तर जास्तीं विचका होऊन ब्राह्मण व लिंगायत यांच्यामधील वितुष्ट वाढण्याचा संभव होता. तसा प्रसंगच पुढे आला नाही ही गोष्ट निराळी.

### *माझ्यावरील पेच*

याखेरीज माझ्यावर या बाबतींत आणखी एक संकट या वेळीं आलें होतें. आमच्या विरुद्ध चौगुले हे एक उमेदवार होते असें वर सांगितलेंच आहे. चिकोडींची बहुतेक खात्री असल्यामुळे चौगुल्यांना पाडणें हेंच मुख्य काम झालें. त्यांना पाडल्याखेरीज मी किंवा नुरेंदप्पा यांच्यापैकी एकदेखील निवडून येणें कठीण होतें. म्हणून आमचा मारा चौगुल्यांच्यावर जास्ती करण्याचा प्रसंग आला. त्यांचा व माझा ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रकरणामुळे मतभेद झाला होता, तरी खासगी स्नेहसंबंध बराच होता. शिवाय खुनी खटल्यांत आम्हांला त्यांची मदत बरीच झाली होती व त्यांनी एका महत्त्वाच्या मुद्द्यावर आमच्यातर्फे साक्षही दिली होती. त्यामुळे माझा व त्यांचा स्नेह जास्त दृढ झाला होता. या निवडणुकी जरी सार्वजनिक स्वरूपाच्या होत्या, तरी खासगी संबंधांवर त्यांचा परिणाम झाल्याशिवाय राहणें कठीण होतें. या प्रकारें सर्व बाजूंनी मी पेचांत पडल्याप्रमाणे झालों होतों. तथापि एखादें काम अंगावर घेतल्यानंतर तें तडीला नेल्याशिवाय राहावयाचें नाही हा माझा स्वभाव असल्यामुळे या निवडणुकीच्या धामधुमींत मी पूर्णपणें पडलों व मोठ्या ईर्षेने व अभिनिवेशाने कामाला लागलों. असल्या कामाला मोटारीशिवाय चालत नाही असा अनुभव लवकरच आला. वेळवींची शक्ती असून ते कांही मोटार घेईनात व मला किंवा नुरेंदप्पांना तितकें सामर्थ्य नसल्यामुळे आम्ही ती घेणें कठीण होतें. ही स्थिती कांही दिवस पाहून माझे मित्र गोविंदराव याळगी यांना राहवलें नाही. त्यांनी या कामाकरिता एक मोटार खरेदी केली व तिचा उपयोग आम्ही करूं लागलों.

### *निवडणुकींतील अनुभव*

या निवडणुकीच्या धामधुमींत कांही गमतीचे अनुभव आले. आमच्या जिल्ह्यांतील बैलहोंगल तालुक्यांत चळवळही म्हणण्यासारखी पूर्वीं झाली नव्हती. म्हणून आम्ही बैलहोंगललाच एकदा गेलों. गावाची वस्ती आठदहा हजार असावी. त्यांत ब्राह्मणांचीं घरें पंधरावीसपेक्षा जास्ती नव्हतीं. तेथील मारुतीच्या देवळांत सभा भरवून आमचीं व्याख्यानें करवण्याचें तेथील काँग्रेस कमिटीच्या मंडळींनी ठरवून त्याप्रमाणे जाहिरातीही वाटल्या. ही बातमी चिकोडी, चौगुले वगैरे ब्राह्मणेतर मंडळींना कळतांच त्यांनीही त्याच दिवशीं त्याच वेळेला आपली एक सभा भरवण्याचें ठरवलें व आमच्या सभेच्या वेळेच्या पूर्वीं तीनचार तास मारुतीच्या देवळाचा ताबा घेतला. आमच्या मंडळींनी गावांत दुसरी सार्वजनिक जागा पाहण्याचा प्रयत्न केला. पण लिंगायत मंडळी जास्ती असल्याकारणाने आम्हांला गावांत त्यांनी सभेकरिता जागा

मिळूं दिली नाही. आमच्या मंडळींनी जास्ती नेटाने प्रयत्न केला असता तर मारामारी होण्याचा प्रसंग होता. मारामाऱ्या, दंगाधोपा करण्यांत बैलहोंगल तालुका प्रसिद्ध आहे. तेव्हा हा प्रसंग टाळण्याकरिता आमचे स्नेही तेथील प्रसिद्ध व्यापारी वामन नाईक यांनी आपल्या जिनिंगच्या कारखान्यांतील खुली जागा सभेकरिता दिली. पंचवीस-तीस ब्राह्मण व इतर पन्नास-साठ लोक इतकीच मंडळी आमच्या सभेला जमली. विरुद्ध मंडळींनी पिकेटिंग करून आमच्या सभेला लोकांना येऊं दिलें नाही. तेव्हा नाइकांनी आपल्या कारखान्याला सुट्टी देऊन दोनतीनशे लोक जमवले व आमच्या सभेला सुरुवात झाली. मारुतीच्या देवळांत त्यांचीही सभा भरली. त्या सभेंत येण्याबद्दल आम्हांला आमंत्रणें आलीं ! माझ्या मनांत जावयाचें होतें. पण आम्ही तिकडे गेल्यास दंगा होण्याचा संभव आहे असें मंडळींनी सांगितलें व तिकडे जाण्याचा आमचा बेत रहित झाला. त्यांच्या सभेंत ब्राह्मण जातीविरुद्ध भलतेभलते आरोप करण्यांत आले असें नंतर आम्हांला समजलें.

पुढे आठदहा दिवसांनी त्याच तालुक्यांतील दुसऱ्या एका गावीं आम्ही गेलों होतों. त्या गावाचें नाव कित्तूर. (या गावासंबंधाने पूर्वी थोडी माहिती आली आहे.) या गावांत लिंगायत लोकांची वस्ती मोठी आहे, तरी ब्राह्मणांचेंही वजन आहे. त्यामुळे सार्वजनिक रस्त्यावर सभा होऊं शकली. पण आम्ही मोटारींतून गावांत जात असतां आमच्यावर दगडांचा वर्षाव झाला. लठ्ठे, चिकोडी वगैरे मंडळी तेथेही आली होती. आमची सभा चालू असतां त्याच रस्त्याने बादशहाच्या तसबिरीची मिरवणूक त्यांनी वाजतगाजत नेली व सभेच्या कामाला दहापंधरा मिनिटें व्यत्यय आणला. याच कित्तूर गावांत १९३० सालीं मी गेलों असतां माझी मिरवणूक काढून मला मोठ्या समारंभाने एका सभेच्या ठिकाणीं नेण्यांत आलें होतें व त्या सालच्या चळवळींत या गावाने भाग घेऊन चांगली कामगिरी केली. कालाचा महिमा !

आणखी एका गावाला गेल्यावेळीं आम्हांला समारंभाने नेण्याकरिता गावाबाहेर कांही मंडळी येऊन बसली होती. या गावांत आमच्या पक्षाचें वजन बरेंच होतें. याच गावांत आमच्या विरुद्ध पक्षाच्या मंडळींचीं व्याख्यानें पूर्वी झालीं होतीं. आमच्यावर त्यांनी खूप टीका केली होती. आम्ही गेलों त्या वेळीं ही टीका ताजी होती. तेव्हा एक म्हातारा माझ्याकडे आला व मला म्हणाला की, "चार दिवसांपूर्वी दुसरी मंडळी आली होती व कांही चांगल्या गोष्टी सांगतील त्या ऐकूं या इच्छेने आम्ही गेलों होतों. पण तुम्हांला त्यांनी शिव्या दिल्या. याखेरीज त्यांच्या भाषणांत कांही नव्हतें. तुम्ही गावांत येऊन हेंच करणार असाल तर तुम्ही न येणें बरें." हें ऐकून मला मौज वाटली व मीं त्याला तसा प्रकार आमच्याकडून होणार नाही असें आश्वासन दिलें. सभेला तो म्हातारा आला होता व माझ्या समोरच चांगल्या ठिकाणीं बसला होता. मीं किंवा आमच्या इतर मित्रांनी कोणावर टीका न करतां, मताधिकार म्हणजे काय, त्याचा उपयोग योग्य प्रकारें करण्याची जबाबदारी मतदारांवर कशी

आहे, इत्यादि तात्त्विक गोष्टींचें विवेचन केलें. आमचा मित्र म्हातारा खूश होऊन आमचीं भाषणें चालतांना मान डोलवत बसला होता. सभेचें काम संपल्यानंतर त्याने आपलें मत मला देण्याचें वचन दिलें.

सौदत्ती तालुक्यांतील एका खेड्याला आम्ही गेलों होतों. हा गाव धारवाड जिल्ह्याच्या हद्दीला लागून आहे. गावांत रड्डी लोकांचीच बहुतेक वस्ती असून लोक सधन आहेत. गावची जमीन उत्तम काळी असून चांगली पिकाऊ आहे. पण गावाला जाण्याला चांगला रस्ता नाही. काळी मऊ जमीन असल्यामुळे एकदोन पाऊस झाले की, गाड्या वगैरे जात नाहीत. पाऊस नसल्यामुळे आम्हीं आमची मोटार कशीबशी नेली. आम्ही गेल्यानंतर रीतीप्रमाणे आमचीं भाषणें वगैरे झालीं. एकदोघे शेतकरी आम्हांला मार्मिक प्रश्न करीत होते. त्यांचीं उत्तरें देणें मला कठीण गेलें. आमच्या हातीं आता सत्ता आली आहे, तिचा उपयोग करून लोकांचें हित होईल व सरकारची सत्ता कमी होईल, अशा अर्थाचें एक वाक्य आमच्यापैकी एकाचे तोंडून निघालें. त्याबरोबर एक शेतकरी उठला व त्याने असा प्रश्न केला की, आपली सत्ता कमी करून घेण्यासारखी गोष्ट आपण स्वतः होऊन करण्याला सरकार कधीपासून इतकें खुळें झालें आहे ?

या गावाला कधी कोणी कार्यकर्ते गेले नव्हते. सरकारी अंमलदारदेखील क्वचितच जातात. त्यामुळे आम्हांला—दहापंधरा पांढरपेशा मंडळींला—पाहून त्या गावच्या लोकांना मौज वाटली. पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं, तेव्हा आम्ही निघण्याची गडबड करूं लागलों. एक म्हातारा म्हणूं लागला की, “गडबडीने जाऊं नका. पाऊस पडूं द्या. म्हणजे आमच्या गावचे हाल कसे आहेत हें तुम्हांला दिसेल तरी. आजपर्यंत देशभक्त म्हणवून घेणारे आमच्या गावाला कोणी आले नाहीत. या निमित्ताने तरी आलांत. ‘संकट बंदाग वेंकटरमण’ (संकटाचे वेळीं वेंकटरमणाची आठवण !)”

असे गमतीचे अनुभव किती तरी आले. माझ्या अजमासाप्रमाणे ब्राह्मण व इतर हिंदू जातींत द्वेष वाढत चालला. नुरंदप्पा शेट्टी हे लिंगायत आमच्या पक्षातर्फे उमेदवार होते. तथापि लिंगायतांमध्ये फूट पाडून त्यांचीं मतें फोडण्यापुरताच त्यांचा उपयोग करण्याची युक्ती ब्राह्मणांनी काढली आहे असा आरोप त्यांच्यावर आलाच !

## *लोकमान्यांचें देहावसान*

शहापूर मुनसफ कोर्टांत माझ्या स्नेह्यांवर एक दिवाणी दावा चालला होता. माझ्यावर त्यांचा विश्वास असल्याकारणाने त्यांच्यातर्फे मी काम चालवीत होतों. एक दिवस एका साक्षीदाराची उलटतपासणी करीत असतांच माझ्या हातीं एक तार आली. ती मुंबईहून बाबुराव गोखले यांनी केली होती. टिळकांची प्रकृती अत्यंत बिघडली असल्याने मला तावडतोब निघून येण्याबद्दल त्यांनी कळवलें होतें. इतक्यांत गोविंदराव याळगींची दुसरी तार त्याच मजकुराची आली. या दोन्ही तारा मीं माझ्या स्नेह्याला दाखवल्या. टिळकांबद्दल त्यांची भक्ती होती, म्हणून त्यांनी

मला जावयाला परवानगी दिली. मी कोर्टातून तसाच स्टेशनावर गेलों. पण गाडी मिळाली नाही. दुसरे दिवशीं सकाळच्या गाडीने निघालों. मिरज स्टेशनावर प्रकृती जास्तीच बिघडल्याचें समजलें. सायंकाळीं चारपाचचे सुमारास बाबुरावांची दुसरी तार आली व प्रकृतींत सुधारणा असल्याचें कळलें. पुण्याच्या स्टेशनवर रँ. परांजपे भेटले. त्यांनी प्रकृती चिंताजनक असल्याचें कळविलें. त्यामुळे हुरहूर वाटूं लागली. सकाळीं मुंबईला पोचलों. थेट सरदारगृहांतच गेलों. खाडीलकर, केळकर, दादासाहेब करंदीकर, बाबुराव गोखले, डॉ. भट, वासूकाका वगैरे मंडळी तिथे भेटली. त्यांच्या बोलण्यावरून काळजी करण्यासारखी स्थिती असल्याचें समजलें. नंतर टिळकांना भेटण्याकरितां गेलों. मला पाहिल्याबरोबर त्यांनीं नमस्कार केला व कांहीसें बोलले. पण बोलणें स्पष्ट नव्हतें. शुद्धी-बेशुद्धी असा प्रकार होता. "सभेला जावयाचें आहे. उशीर झाला. लोक वाट पाहात आहेत." अशा प्रकारचें कांही वेळ बेशुद्धींत बोलत होते. मला लक्षण कांही बरें दिसलें नाही. डॉ. भडकमकर सरदारगृहांतच राहिले होते व ते सदोदित टिळकांजवळ असत. डॉ. देशमुख यांचे उपचार चालू होते. डॉ. नानासाहेब देशमुखही येत असत. मी गेल्यानंतर एकदोन दिवसांनी खापर्डे आले. टिळकांचे बहुतेक स्नेही, आप्त आले होते. मुंबईतील बहुतेक पुढारी चवकशी करून जात असत. सरदारगृहांतील टेलिफोनवर एक कायमचा मनुष्य बसवून ठेवावा लागला व त्या मनुष्याच्यामागे प्रकृतीसंबंधाने माहिती पुरविण्याचें काम सारखें लागलें होतें. अखेरच्या दिवशीं गांधी व शौकतअल्ली मुंबईला आले व दोवेही टिळकांना भेटण्याकरिता आले. गांधींना पाहून टिळकांनी नमस्कार केला व केव्हा आलां असें विचारलें. ते जास्त कांही बोलले नाहीत. त्या दिवशीं मात्र मला कुलकर्णी मुनसफांच्या भविष्याची आठवण झाली व भीती वाटूं लागली. संध्याकाळपासून सर्व मंडळी टिळक निजले होते त्याच्या आसपासच काळजींत बसली होती. टिळकांना शेवटचा श्वास लागला. पाठीच्या कण्यांत टोचून कांही औषध डॉक्टरांनी घातलें. घरघर थोडी थांबल्यासारखी वाटली. पण डॉ. देशमुख, डॉ. साठे, डॉ. वेलकर, डॉ. भडकमकर वगैरे मंडळी टिळक निजले होते त्या खोलीच्या बाहेर आली आणि "सर्व संपत आलें—आंत जा." असें देशमुखांनी मला सांगितलें. आम्ही सर्व आंत जातों तोच बारा वाजून चाळीस मिनिटांनी टिळकांचें प्राणोत्क्रमण झालें ! सर्वांच्या डोळ्यांतून पाणी जाऊं लागलें. जवळच एक आरामखुर्ची होती, तिच्यावर शव आणून ठेवलें. पंधरा मिनिटांच्या आंत मुंबई शहरांत बातमी गेली. नाटकें, तमाशे वगैरे एकदम बंद झाले व लोकांचे थवेच्या थवे सरदारगृहाकडे येऊं लागले. पुण्यालाही बातमी गेली.

रात्रीं पुन्हा गांधी प्रेताचें दर्शन घेऊन गेले.

सकाळीं प्रेत खुर्चीवर होतें तसेंच खाली तिसऱ्या मजल्यावर आणण्यांत आलें व रस्त्यावरून हजारो लोकांनी दर्शन घेतलें.

प्रेताचें दहन पुण्याला करावें असें कित्येकांचें म्हणणें होतें. पण अखेर मुंबईसच दहन करण्याचें ठरून स्मशानयात्रेची वेळ बाराची ठरवली. ता. १ ऑगस्ट हा दिवस

खिलाफतच्या चळवळीचा प्रारंभ होता. त्या निमित्ताने देशांत सर्व ठिकाणीं हरताळ पाळावा, असें गांधींनी जाहीर केलें होतें. त्या कारणामुळे आणि टिळकांच्या मृत्यूमुळे मुंबईचे सर्व व्यवहार बंद होते. स्मशानयात्रेला भयंकर गर्दी लोटली होती. गांधी, शौकतअल्ली वगैरे पुढारी मंडळींनी सरदारगृहांतून प्रेत बाहेर काढतांना खांदा दिला होता. पाऊस मुसळधार पडत होता, तरी लक्षावधी लोकसमुदाय जमला होता. स्मशान-यात्रेच्या रस्त्याने, दुतर्फा घरांतून, माडीवर, गच्चीवर लोक खेचून भरले होते. मुंबईच्या कांही लोकांच्या खटपटीने चौपाटीच्या समुद्रकिनाऱ्यावर उघड्या जागेंत दहन करण्याची परवानगी कांही शर्तींवर मिळाली होती. सायंकाळीं सहा वाजल्यानंतर दहनाला सुरुवात झाली. त्यापूर्वी थोडा वेळ लाहोरहून लजपतराय टिळकांना भेटण्याकरिता म्हणून आले होते. पण त्यांना प्रेताचें दर्शन झालें ! त्यांच्या तोंडावर काळजीची छटा दिसत होती.

अग्निसंस्कार झाल्यानंतर मंडळींची पांगापांग झाली.

कोल्हापूरच्या महाराजांचा व टिळकांचा काय संबंध होता हें प्रसिद्धच आहे. तथापि महाराजांकडून दुखवट्याची पहिली तार आली होती व त्यांच्यातर्फे त्यांच्या संस्थानचे इंजिनिअर हे प्रेतयात्रेला हजर होते.

### गोविंदराव याळगींची प्रतिज्ञा

गोविंदराव याळगी हे त्या वेळीं मुंबईसच होते व टिळकांचें प्राणोत्क्रमण झालें तेव्हा ते आमच्याबरोबरच सरदारगृहांत होते. त्या वेळीं ते सोन्याचा कांही तेजीमंदीचा व्यापार करीत होते. मीं त्यांना अशा प्रकारचा धंदा सोडण्याबद्दल कळविलें होतें. पंधरावीस हजारांची तूट त्यांना आली होती असें मला परस्पर समजलें होतें. टिळकांच्या आजारीपणांत त्यांच्या मागे मी सारखा लागून त्यांचें मन वळवीत होतों. झालेली नुकसानी भरून काढून तशा प्रकारचा धंदा करावयाचा नाही, असें त्यांनी ठरविलें होतें. पण टिळकांच्या मृत्यूच्याच रात्रीं त्यांच्या प्रेताजवळ त्यांनी पुन्हा तो धंदा करावयाचा नाही असें ठरविलें. इतकेंच नाही तर त्यानंतर दुकान भावांवर सोपवून आपण सार्वजनिक कामाकरिताच सर्व वेळ व शक्ती खर्च करावयाची अशी त्यांनी शपथ घेतली. त्याप्रमाणे टिळकांच्या मरणानंतर मुंबईचा धंदा सोडून ते बेळगावला आले. बेळगावच्या दुकानांतही मरेपर्यंत त्यांनी कांही काम केलें नाही. ठरविल्याप्रमाणे राहिलेलें सर्व आयुष्य त्यांनी सार्वजनिक कामींच खर्च केलें.

प्रकरण सतरावें

# असहकार-युगाचा उपक्रम

### *दहा पुढाऱ्यांची समिति*

टिळकांच्या मरणाच्या दिवशींच गांधींनी खिलाफत चळवळ हातीं घेतली, हा एक विलक्षण योगायोग असें लोकांना वाटलें. टिळक असते तर त्यांनी काय केलें असतें, असा प्रश्न तेव्हाच निघाला.

टिळकांच्या मृत्यूपर्यंत आमचा राष्ट्रीय पक्ष सुसंघटित असून एका सूत्राने बांधला गेला होता. तो विस्कळीत होऊं नये असें त्या पक्षांतील प्रमुख मंडळींना वाटणें साहजिक होतें. टिळकांच्या आजारानिमित्त त्यांची सर्व प्रमुख मंडळी एकत्र झाली होतीच. तेव्हा गांधींनी हातीं घेतलेल्या चळवळींसंबंधाने आम्हीं कोणतें धोरण ठरवावें यासंबंधाने विचार करण्याकरिता आम्ही दहापंधरा मंडळी सरदारगृहांत जमलों होतों. असहकारितेची चळवळ करून मुसलमानांना साहाय्य करावयाचें असें गांधीजींनी ठरविलें होतें. या बाबतींत टिळकांचें निश्चित मत झालें नव्हतें, म्हणून आमच्यापुढे हा विचार आला होता. वाटाघाटींत टिळक पक्षांतील दहा लोकांची एक कमिटी नेमण्यांत आली व त्या कमिटीच्या धोरणाने आमच्या पक्षाने चालावें इतकेंच त्या वेळीं ठरलें. या कमिटींत मी एक होतोंच. त्याशिवाय खापर्डे, मुंजे, केळकर, करंदीकर, बॅप्टिस्टा, वगैरे मंडळी होती. (सर्व नावें मला आठवत नाहीत.)

### *गांधींना विरोध केला असता ?*

टिळकांनी आपलें धोरण निश्चित ठरविलें नव्हतें असें वर सांगितलेंच आहे. उरण कॉन्फरन्सच्या वेळीं माझें व त्यांचें जें बोलणें झालें होतें तें पूर्वीं दिलें आहे. त्यावरून त्यांनी गांधींना विरोधच केला असता असें म्हणतां येणार नाही. त्याशिवाय या बाबतींत आणखी दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून

आल्या. त्यांचा उल्लेख करणें जरूर आहे. त्यावरूनही या प्रश्नावर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे.

अलाहाबाद येथे असहकारितेच्या चळवळीसंबंधाने विचार करण्याकरिता प्रमुख हिंदू-मुसलमानांची एक सभा भरली होती हें मागे सांगितलेंच आहे. त्या सभेला टिळक गेले नव्हते. त्यामुळे त्यांचें मत गांधी व शौकतअल्ली यांना समजलें नव्हतें. म्हणून या दोघांनी मुंबईस त्यांची भेट घेतली. त्या वेळीं खिलाफत चळवळींत हिंदी मुसलमान जी चळवळ हातीं घेतील त्या चळवळींत आपण भाग घेऊं व ते जितके जातील तितके आपण त्यांचेबरोबर जाण्यास तयार असल्याचें टिळकांनी सांगितल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ही गोष्ट निराधार आहे असें कोणीही म्हणत नाही. खिलाफत हा मुख्यतः मुसलमानांचाच प्रश्न असल्याने तिजबद्दल चालू होणाऱ्या चळवळींत मुसलमानांनीच पुढाकार घेणें स्वाभाविक आहे. शेजारधर्माला अनुसरून हिंदूंनी मुसलमानांना मदत करणें हेंच त्यांचें कर्तव्य होतें. अशा स्थितींत टिळकांनी जें धोरण स्वीकारण्याचें ठरविलें होतें तेंच योग्य होतें.

याच बाबतींत टिळकांचें व माझ्या एका स्नेह्याचें बोलणें झालें होतें. (स्नेह्याचें नाव प्रसिद्ध आहे; पण त्यांच्या परवानगीशिवाय तें बाहेर फोडावयाचें नाही म्हणून नाव देत नाही.) त्यांना टिळकांनी असें सांगितलें होतें की, महायुद्धांत इंग्लंडला जय मिळाल्यामुळे इंग्रजांना मुसलमानांची भीती राहिली नाही. तुर्कस्थानची बाकी राहिलेली सत्ता नष्ट करून हिंदुस्थानच्या शेजारीं असलेल्या मुसलमानी राष्ट्रांना आपल्या ताब्यांत ठेवण्याचा इंग्रज डाव खेळत आहेत. अशा वेळीं मुसलमानी सत्ता टिकली तरच हिंदुस्थानचें हित होण्याचा संभव आहे. या प्रसंगीं मुसलमानांना मदत करण्याची कल्पना शहाणपणाची आहे व गांधींनी हें काम हातीं घेतलेलेंच आहे. गांधी नव्या जोमाने पुढे येत आहेत. त्यांच्याबरोबरच मला काम करावें लागणार. मग इंग्रजींतून त्यांचे तोंडून एक वाक्य निघालें : 'But I shall have to play a second fiddle to him and I shall do it.' म्हणजे गांधींच्या हाताखाली देखील काम करण्याची टिळकांची तयारी होती. पण आपण हिंदुस्थानांत राहून गांधींबरोबर काम करावयास सुरुवात केल्याबरोबर गांधींच्या अगोदर पुन्हा तुरुंगवास आपल्याला भोगावा लागणार याची कल्पनाही टिळकांना त्या वेळीं होती. ही हकीकत टिळकांच्या मरणानंतर तीनचार दिवसांतच मला या स्नेह्यांनी सांगितली होती. त्या वेळीं कोणत्याही प्रकारचा वाद नव्हता, म्हणून कांही तरी रचवून सांगण्याचें त्यांना कारणही नव्हतें. टिळकांचें धोरण ओळखण्याइतपत त्यांचा व टिळकांचा संबंध होता. आपल्या आयुष्याचीं वीस-बावीस वर्षें त्यांनी टिळकांबरोबर काम करण्यांत घालवलीं होतीं. टिळकांचें धोरण न जाणण्याइतके ते टिळकांना परकी नव्हते. गांधींच्यासंबंधाने त्यांच्यामध्ये जितका आदर त्यापेक्षा टिळकांसंबंधाने त्यांची भक्ती जास्ती. असें असूनही गांधींची चळवळ टिळकांनी उचलून धरली असती असें त्यांना वाटून त्यांनी तींत भाग घेतला.

उलट टिळकांचे दुसरे कित्येक मित्र टिळकांनी गांधींना विरोध केला असता असें म्हणणारे आहेत ही गोष्ट प्रसिद्धच आहे. टिळकांनी आपल्या सबंध सार्वजनिक आयुष्यांत कायद्याची कैंची संभाळूनच सर्व चळवळ केली या गोष्टीचा ते आपल्यातर्फे पुरावा म्हणून मांडतात हेंही खरें आहे. दोन्ही बाजू माझ्या डोळ्यासमोर होत्या. कलकत्याच्या स्पेशल कॉंग्रेसनंतर मी गांधीजींच्याच धोरणाने वागूं लागलों. त्या वेळीं या दोन्ही बाजूंचा मीं पुष्कळ विचार केला. टिळकांनी गांधींना विरोध केला नसता, इतकेंच नाही तर त्यांनी मनापासून मदत केली असती, व त्याचा परिणाम त्यांना—त्यांनी स्वतः अटकळ केल्याप्रमाणे—गांधींच्या अगोदर भोगावा लागला असता, असें खात्रीपूर्वक मला वाटलें. याबद्दल पुढे मी पुन्हा उल्लेख करीन.

सरदारगृहांत जमलेल्या मंडळींत वर लिहिल्याप्रमाणे ठरल्यानंतर मंडळींची पांगापांग झाली. पुण्याला टिळकांच्या अस्थी नेल्या व त्यांची मिरवणूक वगैरे निघाली. मी बेळगावला परत गेलों.

पुढे सप्टेंबर महिन्यांतच स्पेशल कॉंग्रेस कलकत्यास भरावयाची होती आणि त्या कॉंग्रेसमध्ये खिलाफत व अमृतसर या दोन प्रकरणांच्या बाबतींत काय करावयाचें हें ठरवावयाचें होतें. गांधीजी व अल्ली बंधू यांनी कायदेभंगाची चळवळ करावयाची हें ठरविलें होतें व या चळवळीचा तपशीलही त्यांनी आखला होता.

पूर्वीप्रमाणेच आमच्या इकडील सर्व मंडळी कॉंग्रेसला हजर राहण्यास बरोबरच निघाली. मुंबई-पुण्याकडची आमच्या पक्षाची मंडळीही आम्हाला मुंबईस मिळाली. आम्हीं सर्वांनी मिळूनच प्रवास केला. वाटेंत वऱ्हाड-नागपूरची मंडळी आली. आगगाडींत बरीच चर्चा चाले. आमच्या पक्षांतील बहुतेक सर्व प्रमुख मंडळी गांधींच्या विरुद्ध होती. कांही तरुण लोक गांधींच्या तर्फे बोलत होते. माझें स्वतःचें मन हेलकावे खात होतें. तथापि सरदारगृहांत ठरल्याप्रमाणे वागावयाचें हें निश्चित ठरलें होतें. कलकत्यास मी, केळकर, दादासाहेब करंदीकर वगैरे पाचसहा मंडळी, केळकरांचे स्नेही फगसळकर—त्या वेळीं दगडी कोळशाचा व्यापार ते कलकत्यास करीत असत—यांच्या घरीं उतरलों होतों.

## कलकत्ता कॉंग्रेसमधील बलाबल

कॉंग्रेसचे अध्यक्ष लाला लजपतराय हे होते. त्यांनी आपल्या आरंभीच्या भाषणांत नॉन-कोऑपरेशनसंबंधाने निश्चित मत सांगितलें नाही. पण तें विरुद्ध होतें ही गोष्ट प्रसिद्ध झाली होती. दास, बिपिनचंद्र पाल वगैरे बंगालची प्रमुख मंडळी विरुद्धच होती. मद्रासचे विजयराघवाचार्य, बेझंटबाई, कस्तुरीरंग आयंगार हे विरोध करण्यांत तिकडील प्रांतांचे प्रमुख होते. त्याचप्रमाणे जिनांचा व मालवीयजींचाही विरोधच होता. प्रमुख पुढाऱ्यांपैकी कायदेभंगाच्या बाजूने पंडित मोतीलालांशिवाय कोणीही नव्हतें म्हटलें तरी चालेल.

दोन्ही पक्षांची जय्यत तयारी होती. कायदेभंगाच्या बाजूने शौकतअल्ली मतें मिळविण्याची जोरांत खटपट करीत होते. आपल्यातर्फे मताधिक्य व्हावें म्हणून त्यांनी पुष्कळ प्रतिनिधींची आयत्या वेळीं भरती केली. त्याचप्रमाणे विरुद्ध बाजूने दास वगैरे मंडळींनी त्याच मार्गाचा अवलंब केला. कलकत्त्यास धंद्याच्या निमित्ताने असलेले मद्रासी लोक आयत्या वेळीं प्रतिनिधी करण्यांत आले व त्याकरता दास यांना बराच खर्च आला असें मला समजलें. उलट बाजूला कांही मारवाडी मंडळींनी पैसा खर्च करून प्रतिनिधी केल्याचें कळलें होतें. स्वतः गांधी मात्र या सर्व भानगडींपासून अगदी अलिप्त होते. त्यांना काय चाललें होतें याची माहितीदेखील नव्हती. त्यांना थोडा जरी संशय आला असता तरी अशा गोष्टींचा प्रतिकार केल्याशिवाय ते राहिले नसते. त्यांनी आपल्याजवळच्या लोकांनादेखील अमूक बाजूने मत द्या असें कळविलें नव्हतें, हें मला माहीत आहे. मी त्यांना दोनतीन वेळां त्यांच्या बिऱ्हाडीं भेटावयाला गेलों होतों. पण मताच्या बाबतींत त्यांनी मला कांहीच सांगितलें नाही.

विषयनियामक कमिटींत जोराची चर्चा झाली. दास, पाल, बेझंटबाई, विजयराघवाचार्य, मालवीयजी, जीना, बॅप्टिस्टा इत्यादि सर्व मोटमोठ्या मंडळींनी गांधींना कसून विरोध केला. लालाजींनीही आपलें मत प्रदर्शित केलें. कांही मंडळींनी खिलाफतच्या प्रश्नाबरोबर स्वराज्याचा प्रश्नही जोडला जावा अशी सूचना केली. कांही वादविवादानंतर ती सूचना गांधीजींनी मान्य केली. बहुमताने कायदेभंगाचा ठराव विषयनियामक कमिटींत मंजूर झाला. नंतर कॉंग्रेसमध्येही मंजूर झाला. खुद्द बंगालच्या मुख्य शहरांत कॉंग्रेस असल्यामुळे आपल्या पक्षाला मताधिक्य मिळेल अशी दास वगैरे मंडळींना खात्री होती. पण मतांची मोजदाद घेण्यांत आली त्या वेळीं कायदेभंगाच्या वतीने आठशें मतें अधिक पडून ठराव मंजूर झाला. मी स्वतः आमच्या मंडळीबरोबरच म्हणजे ठरावाच्या विरुद्ध मत दिलें. त्या वेळीं गांधींना दिसण्यासारखा मी त्यांच्या जवळच समोर बसलों होतों. उलट मत देतांना मला त्यांनी पाहिलें व माझ्या एका स्नेह्याजवळ "गंगाधररावांनी माझ्या विरुद्ध हात वर केला; पण त्यांचें मन माझ्याकडेच होतें" अशा प्रकारचे उद्गार काढले. कलकत्त्यास जरी आपला पराभव झाला तरी डिसेंबरमध्ये भरणाऱ्या नागपूरच्या कॉंग्रेसमध्ये याचें उट्टें काढूं असें विरोधी मंडळी म्हणूं लागली.

### *कॉंग्रेसला विरोध करावयाचा नाही*

यानंतर आम्हीं काय करावें याबद्दल आम्हीं चर्चा केली व एकमताने कॉंग्रेसच्या धोरणाप्रमाणे वागण्याचें ठरलें. मी कांही प्रमुख मंडळींना हडसूनखडसून विचारलें. तेव्हा कॉंग्रेसला विरोध करावयाचा नाही, हा आमच्या पक्षाच्या घटनेंत मुख्य नियम असल्यामुळे त्याप्रमाणेच वागावयाचें, असें त्यांनी मला सांगितलें. बहुतेक सर्व पुढारी कायदेभंगाच्या विरुद्ध होते व त्याचप्रमाणे आमच्या

डेमोक्रॅटिक पक्षांतील प्रमुख मंडळी विरुद्ध होती. म्हणून माझ्याही मनांत कायदेभंगाबद्दल संशय होता व शिस्त म्हणून मीं विरुद्ध मतही दिलें. पण प्रचंड बहुमताने व अत्यंत उत्साहांत जेव्हा ठराव पास झाला तेव्हा माझें मन तिकडे झुकूं लागलें. एवढ्यावरच मी अवलंबून राहून माझें मत निश्चित केलें असें नाही. तर साधकबाधक सर्व बाजूंचा मीं विचार केला. स्वतः टिळकांनी काय केलें असतें हा प्रश्न माझ्यापुढे आलाच. कौन्सिलबहिष्कारासंबंधानेच मुख्य वाद होता आणि कौन्सिलांत जाऊन आपल्या धोरणाने काम करावयाचें ही गोष्ट टिळकांनी ठरविली होती, हें मला माहीत होतेंच. तथापि टिळकांना असहयोग किंवा त्यापासून निघणारा सत्याग्रह अमान्य होता असें नाही. या प्रकारच्या चळवळींना ते 'अडवणुकीचा मार्ग' असें म्हणत असत व प्रसंगविशेषीं स्वराज्याच्या लढ्यांत याचा उपयोग करण्याची पाळी येते असें त्यांना वाटत होतें. ही गोष्ट पुराव्यानिशीं सिद्ध करून देतां येईल. 'Tenets of the New Party' या विषयावरील त्यांच्या भाषणावरून हेंच अनुमान निघतें. त्या वेळीं गांधींचा हिंदुस्थानांतील कोणत्याही चळवळींशीं संबंध नव्हता. पण असला हा प्रत्यक्ष पुरावा जरी सोडला तरी त्यांनी इंग्लंडला जाण्याच्या पूर्वीं सौ. अवंतिकाबाई गोखले यांनी लिहिलेल्या गांधींच्या चरित्राला प्रस्तावना लिहिली आहे ती वाचली असतां त्यांना हा 'अडवणुकीचा मार्ग' किंवा 'Passive Resistance' तत्त्वतः मान्य होता असेंच म्हणावें लागेल. त्याचप्रमाणे इंग्लंडहून परत आल्यानंतर 'रौलट कायद्याबद्दल गांधींनी माझ्या गैरहजेरींत सत्याग्रहाची चळवळ केली व तींत भाग घेण्याची संधी मला मिळूं दिली नाही, म्हणून त्यांच्या विरुद्ध माझी फिर्याद आहे' अशा अर्थाचें जें भाषण केलें त्यावरूनही तसेंच अनुमान निघतें.

### *मुसलमानांचेही डोळे उघडले*

त्या परिस्थितींत 'अडवणुकीच्या मार्गा'-शिवाय दुसरा कोणता मार्ग परिणामकारक झाला असता? टिळक मंडालेच्या तुरुंगांतून परत आल्यानंतर लवकरच महायुद्धाला प्रारंभ झाला. त्या वेळीं टिळकांनी सरकारला मदत करणें हेंच या प्रसंगीं हिंदुस्थानचें कर्तव्य आहे, असें आपल्या सहीने जाहीर पत्रक काढून प्रसिद्ध केलें; सैन्यभरतीमध्ये लोकांनी जावें अशीं भाषणें केलीं; व आपल्या दोन तरुण मुलांना सैन्यांत पाठवण्याची तयारी दाखवली. 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य संघ' स्थापून तसें जाहीर केलें तरी पुन्हा त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला; स्वराज्य संघातर्फे शिष्टाई करण्याकरता इंग्लंडला जावयाची तयारी केली, व सरकारने त्यांना परवानगीही दिली; पण टिळक कोलंबोपर्यंत गेल्यानंतर परवानगी रद्द करण्यांत आली! जणू काय टिळक जर्मनीला मदत करण्याकरिताच निघाले होते! ही झाली टिळकांची गोष्ट. गांधींनी तर टिळकांपेक्षा जास्ती पुढे जाऊन लढाईच्या वेळीं स्वराज्याच्या गोष्टी न काढतां बिनशर्त सर्व प्रकारें मदत करा असाच उपदेश करण्याचा सपाटा चाल-

विला होता. वस्तुतः आपला जीव धोक्यांत घालून सैन्यभरती करण्याकरिता ते पायीं रानोमाळ हिंडत होते ! मुसलमान हे धर्मवेडे लोक आहेत असें समजलें जातें. पण हिंदुस्थानांतील मुसलमानांनी इंग्लंडच्या वचनावर विश्वास ठेवून आपल्या धर्माच्या मुख्य पीठावर हल्ला चढविला व इंग्रजांना त्यांच्या संकटकालीं मदत केली ! लढाईच्या संकटांतून मुक्त झाल्याबरोबर दिलेलीं सर्व वचनें धाब्यावर बसवून मुसलमानी सत्ता समूळ नाहीशी करण्याच्या प्रयत्नाला इंग्रजांनी प्रारंभ केला, हेंच बक्षीस हिंदी मुसलमानांनी दाखविलेल्या राजनिष्ठेबद्दल त्यांना मिळालें ! रौलट कमिशन बसवून पराचा कावळा करून कमिशन-मार्फत हिंदी लोकांच्या राजकीय न्याय्य आकांक्षा मारून टाकण्याचा प्रयत्न झाला व त्याला कायद्याचें स्वरूप देण्यांत आलें. या कायद्याच्या विरुद्ध असलेल्या लोकमताची पायमल्ली करण्यांत आली. तेव्हा निरुपाय होऊन लोकांनी गांधींसारख्या शांतिब्रह्म पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली चळवळ सुरू केली. एका धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने अमृत-सर येथे जमलेल्या शेकडो असहाय स्थितींतल्या स्त्रीपुरुषांचे व अर्भकांचे नाहक गोळ्या घालून प्राण घेण्यांत आले ! अन्य तऱ्हेनेही त्या शहरांतील लोकांना त्रास देऊन त्यांची मानहानी केली व लष्करी कायद्याच्या अंमलाखाली निर्दोषी पुढाऱ्यांना जन्मठेपीच्या शिक्षा ठोठावल्या. या सर्व प्रकरणाच्या चवकशीचा फार्स करून ज्या शूर सरदाराने—जनरल डायरने—हे सर्व अनन्वित प्रकार केले, त्याच्या समजुतींत फक्त चूक झाली, असा निकाल मिळाला !

### *टिळकांनी गांधींना सोडलें नसतें*

या सर्व प्रकारामुळे गांधींसारख्यांची अस्सल राजनिष्ठा डळमळली. इंग्रज राज्यपद्धतीचा त्यांना तिटकारा आला आणि ती सुधारणें शक्य नसल्यास ती नष्टच केली पाहिजे, अशा प्रकारचे निर्वाणीचे उद्गार त्यांच्या तोंडून निघूं लागले. टिळकांनी आपल्या वयाचीं तीसचाळीस वर्षें खर्ची घालून अत्यंत बिकट स्थितींत अतिशय चिकाटीने, स्वार्थत्यागाने व क्लेश सहन करून ज्या राज्यपद्धतीसंबंधाने देशांत असंतोष उत्पन्न केला, त्याच टिळकांनी अशा आणीबाणीच्या प्रसंगीं गांधींसारखा साथीदार पुढे आला असताना त्याचा अव्हेर करून त्याला विरोध केला असता, हें म्हणणें हास्यास्पद आहे. सत्याग्रहाचें तत्त्व कबूल केल्यानंतर तपशिलाकरिता टिळकांनी गांधींना सोडलें नसतें व तपशिलाबाबत गांधीही टिळकांशी फटकून वागले नसते. तत्त्वाकरिता मतभेद झाल्यास नाइलाज होतो; पण तपशिलाचे मतभेद विकोपाला नेणें शहाणपणाचें नसतें, ही गोष्ट टिळक व गांधी या दोघांनाही समजत होती. दोघांमध्ये तपशिलाच्या बाबतींत तडजोड करण्याची वृत्ती सारखी दिसून येते. केवळ तत्त्व कबूल व तपशील नाकबूल म्हणून टिळकांनी तत्त्वावर घाव घातला नसता. आणि जर गांधींचा तपशिलासंबंधीचा कार्यक्रम त्यांना पसंत पडला नसता, तर त्यांत त्यांनी सुधारणा केली असती किंवा निराळा कार्यक्रम त्यांच्यापुढे मांडला असता. दोघांच्या तडजोडीने कांही

तरी निश्चयात्मक कार्यक्रम ठरला असता. अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत कलकत्यास असतांनाच आले. तथापि आपल्या पक्षाच्या शिस्तीविरुद्ध जाऊं नये, ही माझ्यामध्ये इच्छा जाग्रत होती. म्हणून कॉंग्रेसनंतर पुढे कसें वागावयाचें यासंबंधाने आमच्या पक्षांतील प्रमुख मंडळींत मीं चर्चा केली. जेव्हा कॉंग्रेसच्या धोरणाप्रमाणे वागावयाचें असें एकमताने ठरलें तेव्हा कलकत्यास असतांनाच माझी कौन्सिलची उमेदवारी काढून घेतल्याचें व वकिली सोडून दिल्याचें मीं वर्तमानपत्रांतून जाहीर केलें. आमच्या पक्षांतील इतर मंडळींनीही आपापल्या उमेदवाऱ्या मागे घेतल्या.

कलकत्याहून परत येतांना वाटेंत तीनचार ठिकाणीं उतरून मीं व्याख्यानें दिलीं व वर जे विचार मीं प्रदर्शित केले आहेत तेच माझ्या भाषणांत मांडले. खासगी भाषणांत किंवा सार्वजनिक सभेंत मला जबाबदार माणसांनी विरोध केला नाही. त्यावरून कलकत्याच्या ठरावाला लोकमत अनुकूल आहे असें मला वाटलें.

### *पुण्यांतील एक दिवसाचा मुक्काम*

पुण्यालाही एक दिवस मी राहिलों होतों. त्याच दिवशीं 'कलकत्ता कॉंग्रेस' सभा होती. त्या सभेला पुण्यांतील राष्ट्रीय पक्षांतील मंडळी हजर होती. आण्णासाहेब भोपटकर अध्यक्षस्थानीं होते असें मला आठवतें. मीही या सभेला गेलों होतों. मला त्याच दिवशीं पुढे जावयाचें असल्याने माझेंच भाषण प्रथम झालें. माझे विचार मीं मांडले व स्टेशनाकडे गेलों. पुढे कोणाचीं व कशीं भाषणें झालीं हें मला कळलें नाही. पण तेव्हा पुण्यास 'लोकसंग्रह' या नावाचें एक दैनिक पत्र निघत असे. त्या पत्राचें चालकत्व आण्णासाहेब भोपटकरांकडे होतें. बेळगावला गेल्यानंतर दोनतीन दिवसांत त्या पत्रांत कॉंग्रेसवर एक लेख आला होता. त्यांत कॉंग्रेसच्या ठरावासंबंधाने टीकात्मक विचार प्रदर्शित केले होते. वडिलोपार्जित 'गडगंज' इस्टेटीवर अवलंबून राहणारे कित्येक लोक दुसऱ्यांना स्वार्थत्यागाच्या गोष्टी सांगतात, अशा अर्थाचें त्यांत एक वाक्य होतें. (सर्वच शब्द ध्यानांत नाहीत; पण आशय ध्यानांत आहे व 'गडगंज' शब्दही आठवतो.) कलकत्ता कॉंग्रेसनंतर नॉन-कोऑपरेशनच्या ठरावाचें सर्वतोपरी समर्थन करणारें पहिलें भाषण माझेंच असावें व त्या भाषणानंतर लगेच ही टीका आल्याने त्या लेखांत माझा नावाने निर्देश नव्हता तरी तें विशिष्ट वाक्य मला उद्देशून असावें असें मला वाटलें. पण खात्री नसल्याने मीं विशेष चिकित्सा केली नाही.

याच सुमारास कर्नाटकांतील एका तरुणाशीं संबंध आला. त्यांचें नाव रामचंद्र व्यंकटेश वडवी असें आहे. देशसेवा व सार्वजनिक काम यांची ऊर्मी त्यांच्यामध्ये अगदी प्रथमपासूनच होती. ते विद्यार्थीदशेंत असतांना मला कानडीमध्येच भाषण करावयास लावण्यासाठीं, धारवाड शहरांत एका जाहीर सभेंत त्यांनी आमच्या सभेवर दगडफेक केली होती. देशसेवेमध्ये आपलें आयुष्य खर्च करावें या भावनेने ते घर सोडून गांधीजींच्या साबरमती आश्रमाकडे पळून गेले होते. तेथे गुजरात विद्यापीठामध्ये कांही काल त्यांनी

शिक्षणही घेतलेलें आहे. महात्माजींच्या आश्रमांतील सर्व शिक्षणक्रमांतून त्यांनी अनुभव व संस्कार मिळविलेले आहेत. 'नवजीवन' (गुजराती) व 'यंग इंडिया' (इंग्रजी) या वर्तमानपत्रांची छपाई करण्याच्या कामीं नवजीवन प्रेसमध्ये महात्माजीनी त्यांना पाठविलें होतें. तेथे त्यांनी आपल्या कामाने सर्वांचीं मनें आकर्षित करून घेतलीं होतीं. साबरमती आश्रमानेच त्यांना माझ्याकडे पाठविलें होतें. सन १९२२ मध्ये ते माझ्याकडे आले. तेव्हापासून स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये आणि विधायक कार्यांच्या अनेक आंदोलनांमध्ये, माझे सहकारी म्हणून, पुंडलीकजी कातगडे यांच्याप्रमाणेच, आजपर्यंत ते काम करीत आले आहेत. कर्नाटक चरखा संघाचे चिटणीस म्हणूनही त्यांनी पाचसात वर्षें काम केलेलें आहे. कानडीमध्ये साक्षरताप्रसाराची एक नवीन पद्धती बसवून, छोटीं छोटीं पुस्तकेंही त्यांनी लिहिलीं आहेत. माझ्याकडे आमच्या घरीं, घरच्या एका कुटुंबिया-प्रमाणेच पंचवीसतीस वर्षें राहून, माझा एक सहकारी म्हणून, त्यांनी आजपर्यंत काम केलेलें आहे.

तसें पाहूं गेलें तर आमच्याकडे आमच्या घरीं राहून देशकार्य करण्याच्या हेतूने किती तरी तरुण येऊन गेले. कारण मलाही तो एक नादच होता. त्यांतही गांधींच्या नेतृत्वा-खालील विधायक चळवळीमध्ये मी माझ्या मळ्यामध्ये एक आश्रमच सुरू केल्यानंतर कर्नाटकांतून व अन्य प्रांतांतून कित्येक तरुण कार्यकर्ते व विद्यार्थी तेथे येऊं लागले. त्यांत कारवार जिल्ह्याचे निष्ठावंत भूदानयज्ञ कार्यकर्ते व नेते श्री. निम्माप्पा नायक हेही होते. त्यांनी माझें खेडें 'हुदली'मध्ये लोकांची सेवा करून, एक प्रकारचें सौजन्याचें व देशसेवेचें वातावरण उत्पन्न केलें आणि आश्रमाकडून होणाऱ्या सेवेचें गांभीर्य वृद्धिंगत केलें यांत शंका नाही. आमच्या 'हुदली' आश्रमांतून प्रेरणा घेऊन ते कारवार जिल्ह्यामध्ये गेले आणि स्वाभाविकतया त्या जिल्ह्याचें नेतृत्व व मार्गदर्शन त्यांनाच करावें लागलें. गांधी-जींच्या तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून त्यांनी गांधीजींच्या निकटवर्ती अनुयायांमध्ये आपली प्रतिष्ठा संपादन केली. गांधीजींनी 'हरिजन' पत्रांत त्यांच्याविषयी एक अग्र-लेख लिहून, कारवारांतील त्यांच्या सेवेचा उल्लेख 'एक मौल्यवान प्रयोग' म्हणूनच केला होता. त्याचेंही माझ्या मनाला फारच समाधान झालें.

### *कानडी-मराठी वादाचें दर्शन*

बेळगावास तीनचार व्याख्यानें असहकाराच्या प्रचारार्थ एकामागून एक अशीं सातआठ दिवसांत दिलीं. माझे स्नेही दत्तोपंत मजली हे त्या वेळीं माझ्या मदतीला होते. त्यांनी कानडींत भाषणें करून नॉनकोऑपरेशनचें समर्थन करण्याचा सपाटा चालविला. त्यांनीही आपली वकिली सोडली. बेळगाव जिल्ह्यांतही आम्हीं दोघांनी दौरा काढला, व मुख्य मुख्य ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. पुढे दोनतीन महिन्यांतच नागपूर येथे कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन भरणार होतें; व त्या वेळीं कदाचित हा ठराव बदलून घेण्याचा प्रयत्न होईल म्हणून लोकमत ठरावाला अनुकूल करून

घेण्याचा प्रयत्न करण्याचें आम्हीं ठरविलें होतें. कलकत्त्याहून परत आल्यापासून नागपूरला जाईपर्यंत आम्ही वेळ न घालवितां एकसारखा हाच प्रयत्न करीत होतों. आमच्या जिल्ह्यांतील काम संपविल्यानंतर आम्ही धारवाडला गेलों. तेथे एक अनपेक्षित गोष्ट घडून आली. धारवाडच्या कांही मंडळींच्या मनांत कानडी भाषेसंबंधाने एक प्रकारचा अभिनिवेश आला होता. कर्नाटकच्या कांही भागांत मराठीचें वर्चस्व अधिक असल्यामुळे कानडी भाषेला वाव मिळत नाही, अशी त्यांची समजूत झाली होती. कर्नाटकांत कानडी लोकांना मराठी बोलूं द्यावयाचें नाही असें त्यांनी ठरवलें होतें. याचा पहिला प्रयोग माझ्यावरच करण्याचा त्यांनी बेत केला होता. त्यांच्यापैकी कांही प्रमुख मंडळी मला बिन्हाडीं भेटली होती. त्यांचें व माझें नेहमीप्रमाणें बोलणेंचालणें झालें होतें; पण त्यांनी मला कांही पत्ता लागूं दिला नाही. यापूर्वी धारवाडास माझीं भाषणें मराठींत झालीं होतीं व त्याबद्दल कोणींही हरकत घेतली नव्हती. म्हणून अशा प्रकारचा बेत झाला आहे असा संशय येण्याला कांही कारण नव्हतें. त्यांतून हा विषय नवीन असल्यामुळे तो कानडींत मांडण्याला मला कठीण गेलें असतें. शिवाय कानडी बोलणारे माझे मित्र मजली माझ्याबरोबर होतेच. तेव्हा दोन्ही भाषांत विषयाचें प्रतिपादन होणें यांत वावगें कांही नव्हतें. मला प्रथम सूचना मिळाली असती तर मी कानडींतूनच बोललों असतों. बेळगावची स्थिती निराळी आहे. सभेला येणाऱ्या लोकांत कानडी न समजणारे पुष्कळ लोक येतात. त्यामुळे तेथे मराठी भाषेची जरुरी भासते. तशी धारवाडची गोष्ट नाही. तेथे कानडी न समजणारे लोक प्रायः नाहीत म्हटलें तरी चालेल. म्हणून धारवाडास कानडी बोलणेंच जास्ती श्रेयस्कर, हें मला कबूल होतें. पण मराठीवर अशा प्रकारचा बहिष्कार घालण्याचा बेत ठरवल्याचें मला माहीत नसल्याने मीं माझ्या भाषणाला मराठींतच सुरुवात केली. एकदोन वाक्यें माझ्या तोंडांतून निघाली असतील नसतील इतक्यांत चोहोकडून कल्ला सुरू झाला. सभेंत गडबड उडाली. लोक उठूं लागले. प्रथम मला कारण समजलें नाही. पण पुढे कारण समजलें. ही गडबड करणाऱ्यांमध्ये मला भेटून गेलेले माझे कांही स्नेही होते, हें पाहून मला आश्चर्य वाटलें. माझ्याप्रमाणेच मजलींनाही सर्व प्रकार चमत्कारिक वाटून त्यांचा व कांही मंडळींचा वाद झाला व आरडाओरडा वाढत चालला. त्यामुळे मला वाईट वाटलें, व त्या सभेंत बोलावें अशी माझी प्रवृत्ती झाली नाही. मी खाली बसलो. माझ्याचप्रमाणे मजलींनाही वाटलें व त्यांनीही बोलण्याचें नाकारलें. या सभेला व्यवस्थापकांनी तिकिटें लावलीं होतीं. तेव्हा पैसे देऊन आलेले लोक पैसे परत मागूं लागले. त्यामुळे गोंधळांत आणखी भर पडली. पैसे लावून व्याख्यानें करण्याचें ठरविलें आहे हें आम्हांला प्रथम कळवलें असतें तर तसें आम्हीं होऊं दिलें नसतें.

कानडीचा अभिमान असणारे दुसरे बरेच लोक होते. त्यांना हा सर्व प्रकार पाहून वाईट वाटलें. आम्ही बिन्हाडीं परत गेल्यानंतर ती मंडळी आमच्याकडे आली व त्याच रात्रीं उघड्या जागेवर आम्हीं बोलावें असा त्यांनी आम्हाला आग्रह केला. पण इतक्या

अटीतटीने भाषणें करावीं असें आम्हांला वाटेना. तथापि हातीं घेतलेलें काम टाकून तसेंच जाणें हेंही मनाला पटेना. म्हणून व्याख्यान देण्याचें आम्हीं कबूल केलें. ठरल्याप्रमाणे देशपांड्यांच्या आळींत आमचीं व्याख्यानें झालीं. संध्याकाळच्या गडबडीमुळे गावांत बरीच चर्चा झाली. त्यामुळे आणि विषय महत्त्वाचा आणि नवीन असल्यामुळे व्याख्यानाला खूप गर्दी झाली होती. सभेचें काम जवळजवळ तीन तास चाललें होतें. माझें भाषण मराठींतच झालें व लोकांनी शांतपणें ऐकून घेतलें.

त्यानंतर कर्नाटकांत आम्ही इतर ठिकाणींही हिंडलों. त्याचा परिणाम उत्तम झाला व त्याचा प्रत्यय आम्हांला नागपूरला आला.

## *गांधी टोपीचा स्वीकार*

कलकत्त्याच्या काँग्रेसनंतर स्वतः गांधींनी सर्व देशभर दौरा काढला होता. त्यांचेबरोबर शौकतअल्लीही होते. त्यांचीं भाषणें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असत. तीं मी मनःपूर्वक वाचीत असें. त्यांच्या लेखांचाही अभ्यास करीत असें. त्यांचें तत्त्वज्ञान मला त्या वेळीं चांगल्या प्रकारें समजलें नाही. द्वेषरहित प्रेममूलक अहिंसेच्या व निखालस सत्याच्या पायावर रचलेला त्यांचा कार्यक्रम माझ्यासारख्याला आकलन होणें कठीण झालें. पूर्वीचे सर्व संस्कार व ही नवीन शिकवण यांचा मेळ घालावा कसा, हा प्रश्न माझ्यापुढे आला आणि तो सोडवण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. हें तत्त्वज्ञान जरी मला समजलें नाही तरी तें समजून घेण्याची इच्छा तीव्र होऊं लागली आणि ती इच्छा तृप्त करून घेण्याचा मीं मनापासून प्रयत्न केला. तथापि अशा स्थितींतदेखील मला महात्माजी हे राजकारणी पुरुष आहेत असें वाटूं लागलें. कलकत्ता व नागपूर या दोन काँग्रेसच्या मधल्या काळांत त्यांनी आखलेल्या कार्यक्रमांत राजकारण नसून तो कार्यक्रम अव्यवहार्य आहे अशी त्यांच्यावर टीका होऊं लागली, पण त्या टीकेंत मला कांही अर्थ दिसेना.

या वेळीं मी स्वदेशी कपडे घालीत होतों. पण आता खादी वापरण्याला सुरुवात केली. तरी नेसावयाचें धोतर व डोकीवरील फेटा खादीचा नसे. खादीवर बोलण्याचे जसजसे प्रसंग येऊं लागले तसतसें सर्व अंगावर खादीच घालणें योग्य वाटूं लागलें. पण धोतरें मात्र खादीचीं मिळत नव्हतीं, म्हणून धोतराखेरीज सर्व पोषाख खादीचाच करण्याचा निश्चय केला. प्रथम खादीची टोपी घालतांना लाज वाटली. म्हणून प्रथम घरीं टोपी घालूं लागलों. पण बाहेर जातांना स्वदेशी फेटाच बांधीत होतों. मारुतीच्या देवळांत एक दिवस माझें व्याख्यान व्हावयाचें होतें. त्या दिवशीं गांधी टोपी घालूनच बोलावयाचें असा मीं निश्चय केला होता. पण रस्त्याने देवळापर्यंत गांधी टोपी घालून जाण्याला लाज वाटली; म्हणून टोपी खिशांत घालून बोडक्यानेच देवळापर्यंत गेलों. व्याख्यानाची वेळ रात्रीची असल्यामुळे रस्त्यांत कोणाचें लक्ष गेलें नसावें. व्याख्यानाच्या वेळेलाच देवळांत पोचलों. देऊळ लोकांनी चिक्कार भरलें होतें व लोक माझीच वाट

पाहात होते. इकडेतिकडे न पाहतां तडक टोपी घालून व्याख्यानाच्या जागीं गेलों व व्याख्यानाला सुरुवात केली. माझ्या डोकीवर गांधी टोपी पाहतांच लोकांनी टाळ्या दिल्या. त्या दिवशींचें माझें व्याख्यानही चांगलें जुळलें असें मला वाटलें. दुसरे दिवसापासून गांधी टोप्या कांही तरुणांच्या डोकीवर दिसूं लागल्या. खादीची टोपी घालण्यासारखी क्षुल्लक गोष्ट. पण ती अंमलांत आणण्याला देखील किती प्रयत्न करावा लागला! माझ्याप्रमाणेच पुष्कळांना झालें असेल. फार दिवसांच्या सवयी सोडण्यास मन तयार होत नाही, ही गोष्टच खादीप्रसाराच्या आड येते, असें मला पुढे अनुभवांतीं कळलें. खादी ही परदेशी किंवा गिरणीच्या स्वदेशी मालापेक्षा महाग असते, ही सबब गरिबांच्या बाबतींत खरी असेल. पण श्रीमंत किंवा मध्यम स्थितींतील लोकांना खादी न घालण्याला त्यांना जडलेल्या सवयी लवकर सोडवत नाहीत हेंच खरें कारण आहे.

## *गांधीजींचा दौरा*

कलकत्त्याच्या कॅाँग्रेसनंतर व कॅाँग्रेसच्या ठरावाप्रमाणे चालण्याचें आमच्या मंडळीमध्ये ठरल्यानंतर मी गांधीजींना भेटलों आणि त्यांच्या चळवळींत भाग घेणार असें कळवलें व त्याप्रमाणे कामालाही प्रारंभ केला. महात्माजींनी दौरा काढून नागपूरच्या कॅाँग्रेसकरिता लोकमत अनुकूल बनवण्याचें काम सुरू केलें होतें. कर्नाटकांतही कांही ठिकाणीं जाण्याचें महात्माजींनी ठरवलें व मला पत्र लिहून नक्की कार्यक्रम ठरविण्याचें माझ्यावर सोपविलें. त्याप्रमाणे मीं कार्यक्रम ठरविला व पुन्हा मुख्य मुख्य ठिकाणीं कर्नाटकांत जाऊन महात्माजींच्या स्वागताची तयारी केली. या दौऱ्यांत महात्माजी फंडही गोळा करीत असत. म्हणून त्याबद्दलचीही तयारी केली. महाराष्ट्रांतील दौरा संपवून ते आमच्या प्रांतांत येणार होते. त्यांचा पहिला मुक्काम निपाणी येथे ठरविला होता. मी ते यावयाच्या पूर्वीं निपाणीला गेलों होतों. ते कऱ्हाडहून निपाणीला आले. निपाणीहून चिकोडी, हुकेरी, संकेश्वर, हीं गावें करून बेळगावला आलों. बेळगावची सर्व व्यवस्था गोविंदराव याळगींकडे सोपवली होती. किल्ल्याच्या मैदानावर सभेची व्यवस्था केली होती. निदान पंधरा हजार तरी लोक सभेला आले होते. इतकी मोठी सभा बेळगावास पूर्वीं कधीही भरली नव्हती. सभेची व्यवस्था उत्तम ठेवण्यांत आली होती. शौकतअली व गांधीजी यांना रुप्याच्या करंड्यांतून मानपत्रें दिलीं. महात्माजींना दिलेल्या करंड्यापेक्षा शौकतअलीचा करंडा थोडा लहान होता. ही चूक गांधींच्या लक्षांत आली, व त्यांनी आपल्या भाषणांत उल्लेख करून आम्हांला दोष दिला. त्यांच्या स्वभावाची पारख अशा अनेक प्रसंगांनी मला होऊं लागली. बेळवी हे अध्यक्ष होते. त्यांनी वकिली सोडली नव्हती व अंगावर खादीही घातली नव्हती. म्हणून कांही लोकांनी तक्रारी केल्या. पण आम्हीं त्यांचें कसेंबसें समाधान केलें व सभेचें काम शांतपणें निभावलें. सभेंत टोप्या फिरवून वर्गणी जमविली. ती जवळजवळ एक हजार रुपयांपर्यंत जमली. त्याचप्रमाणे

व्यापाऱ्यांची सभा झाली आणि त्या सभेंत जवळजवळ दोन हजार रुपये किंमतीचे दागिने व रोकड मिळाली. शहापुरास सभा होऊन तेथील लोकांनी थैली दिली. यानंतर खानापूर, नंदगड, अळणावर, हल्याळ वरून धारवाडास गेलों. तेथे कर्नाटकांतील प्रमुख ब्राह्मणेतर मंडळींनी गांधीजींची खासगी भेट घेतली. या भेटींत ब्राह्मण कोणी नव्हते. नेहमीप्रमाणे त्यांनी ब्राह्मणांसंबंधाने गिल्ला केला, पण गांधीजींनी त्यांना योग्य उपदेश केला, एवढेंच आम्हांला कळलें. यानंतर धारवाडच्या विद्यार्थ्यांच्या सभेंत दगड फेकण्यांत आले. हें काम ब्राह्मणेतरांपैकीच कित्येकांचें असावें असें वाटलें. पण दगड जरी आले तरी विद्यार्थ्यांनी सभेंत गोंधळ केला नाही, व भिऊन ते सभा सोडून गेले नाहीत. त्यामुळे गांधींना बरेंच समाधान वाटलें व त्यांनी त्याप्रमाणे बोलूनही दाखविलें. 'यंग इंडिया'-मध्ये ही हकीकत प्रसिद्ध झाली असावी. धारवाडहून हुबळी व गदग येथे गेलों. दोन्ही गावें कर्नाटकांत व्यापाराचीं मुख्य केंद्रें आहेत, व दोन्ही ठिकाणीं गुजराती व्यापाऱ्यांचा भरणा विशेष आहे. त्यामुळे दोन्ही ठिकाणीं स्वागतसमारंभ होऊन बारा हजार रुपये पर्यंत स्वागत फंड मिळाला. गदगहून बागलकोट व विजापूरकडे जावयाचा कार्यक्रम होता. पण गदगास सांगलीहून रामभाऊ पटवर्धन—देवल सर्कसचे माजी व्यवस्थापक—भेटले. त्यांनी सांगलीच्या मंडळींनी लो. टिळकांचे स्मारकाकरिता अजमासें एक लाख रुपयाचा फंड जमविला असून, टिळक स्मारक मंदिराच्या पायाचा दगड गांधीजींच्या हस्तें बसविण्याचें ठरविलें आहे असें कळविलें, व विजापूरकडील दौरा रहित करून सांगलीस गांधींनी यावें असा आग्रह केला. विजापूर-बागलकोटची मंडळी आली होती. त्यांच्या संमतीने कर्नाटकचा दौरा तहकूब केला व गदगहून सांगलीला जाण्याला आम्ही निघालों. बोलूनचालून टिळकांचें स्मारक व त्याकरिता एवढा मोठा फंड, इतका मोह सोडणें शक्य नव्हतें. म्हणून गांधींनी कार्यक्रम बदलण्याला संमती दिली.

### *लाख रुपयांची खोटी गोष्ट*

दोनप्रहरीं बाराच्या सुमारास मिरजेला पोचलों. रामभाऊंनी मिरजेच्या स्टेशनावर उतरून थेट सांगलीस जावयाचें व तेथील कार्यक्रम आटोपून रात्रीं व्याख्यानाकरिता मिरजेस येऊन तेथून मुंबईकडे जावयाचें, असें ठरविलें होतें. त्याप्रमाणे मीं गांधींना कळविलें. पण मिरज स्टेशनावर व स्टेशनाबाहेर हजारों लोक जमले होते. गाडींतून उतरून स्टेशनाबाहेर जाणें कठीण झालें. व्यवस्था, शिस्त बिलकूल नव्हती. आरडाओरडा तर बेसुमार होता व जमलेल्या लोकांनी प्रथम मिरजेला येऊन नंतर सांगलीला जावें असा आग्रह धरला. पण गांधींनी कार्यक्रम बदलण्याचें साफ नाकारलें, व ते मोटारींत जाऊन बसले. लोक मोटार जाऊं देईनात. लोकांना समजाविण्याचा प्रयत्न अनेकांनी केला, परंतु कोणासच त्यांत यश आलें नाही. तेव्हा गांधी चटदिशीं खाली उतरून मला सांगलीचा रस्ता दाखवा म्हणून सांगून पायीं अनवाणी त्या रस्त्याने जाऊं लागले! तेथील पुढाऱ्यांना रात्रीं येण्याचें वचन देऊन

सांगलीला जाऊं द्या, असें परोपरीनें त्यांनी सांगितलें. मींही माझी पराकाष्ठा केली. पण लोक ऐकेनात. तेव्हा "मी कोणाच्याही जबरदस्तीला भीक घालणार नाही. मग काय होईल तें होवो" असें म्हणून रस्ता सोडून एका शेतवाडींतून गांधीजी जाऊं लागले! तेव्हा लोकांचा नाइलाज झाला व लोक मागे फिरले!

सांगलीस व्याख्यान झालें, व सभेंत अजमासें आठशें रुपये मिळाले. एक लाख रुपये जमवल्याचा अनुभव आला नाही. मिळालेले आठशें रुपये सांगलींतच राहिले. तें गांधींकडे अद्यापि गेले नाहीत. ती रक्कम एका पेढीवर ठेव म्हणून व्याजानें ठेवण्यांत आली आहे असें समजतें. पण त्याचा उपयोग गांधींना झाला नाही, ही गोष्ट खरी. याप्रमाणे सांगलीचा मुक्काम संपवून मिरजेला गेलों व तेथे दर्ग्यापुढे त्यांचें व्याख्यान झालें. तेथून मुंबईला आलों. मिरजेच्या दर्ग्यांतही झालेली सभा फारच मोठी होती व लोकहि अत्यंत शिस्तीनें वागले. त्यामुळें गांधींना आनंद झाला. सांगलीला गेल्यावर विजापूरचा कार्यक्रम बदलण्यांत चूक केली असें वाटलें! पण उपयोग काय?

या दौऱ्यांत मी, मजली व गोविंदराव याळगी असे तिघे गांधींच्या बरोबर होतों. गांधीजींच्या बरोबर बोलण्याला पुष्कळ वेळ मिळाला. आमच्या बऱ्याच शंका आम्हीं दूर करून घेतल्या. एकंदर अजमासें बावीसहजार रुपये या दौऱ्यांत जमा झाले. त्यापैकी गांधींनी कांही रक्कम शौकतअल्लींना खिलाफतकरिता दिली आणि बाकीची रक्कम खादी व राष्ट्रीय शिक्षण यांच्याकरिता खर्च करण्यासाठी माझ्याकडे ठेवण्यांत आली. बहुतेक ज्या ज्या गावांकडून ज्या ज्या रकमा आल्या होत्या त्या त्या गावांकडे वरील उद्देशाकरिता त्या देण्यांत आल्या. निपाणी, बेळगाव, धारवाड, हुबळी, गदग येथे दोनतीन राष्ट्रीय शाळा स्थापण्यांत आल्या व खादीचीं दुकानेंही निघालीं.

या दौऱ्यांत माझ्या गिरणीच्या धोतराकडे गांधींचें लक्ष गेलें व त्यांनी प्रेमळपणानें पण तितक्याच सक्तीनें खादीचें धोतर वापरण्यास सांगितलें. मुंबईस पोचल्याबरोबर मीं खादीचीं धोतरें घेतलीं व तेव्हापासून माझा सर्व पोषाख खादीचा झाला.

### *बॅ. दासांशीं विचारविनिमय*

नागपूर कॉंग्रेसच्या पूर्वी कांही दिवस दास हे नागपूरला येणार होते. त्यांनी केळकरांना नागपूर कॉंग्रेससंबंधानें विचार करण्याकरिता बोलाविलें होतें. केळकरांनी आपल्याबरोबर बॅप्टिस्टांना व मला घेतलें होतें. आम्ही तिघेही नागपूरला दासांना भेटलों. दास हे बॅ. गौरच्या घरीं उतरले होते. आम्ही डॉ. परांजपे यांच्या घरीं होतों. नागपूरच्या कॉंग्रेसमध्ये असहकारितेचा ठराव बदलून घेण्याचें दासांच्या मनांत होतें. बॅप्टिस्टा, केळकर, मुंजे, अणे वगैरे मंडळींची मदत त्यांना पाहिजे होती. असहकाराची तयारी नाही याकरिता देशांत जागृती करून मग ही चळवळ हातीं घ्यावी, अशी कल्पना दास यांनी मांडली. आणि त्यांच्या अजमासाप्रमाणे

तयारीला पाच वर्षें तरी निदान पाहिजे होतीं. मला हा मार्ग पसंत पडला नाही. इतरांना कॉंग्रेसमध्ये असें घडून आल्यास नको होतें असें नाही. दास यांचें सार्वजनिक सभेंत याच धोरणावर भाषण झालें. सभेंत पुष्कळ लोक इंग्रजी न जाणणारे होते. त्यांना दास यांचें भाषण समजलें नाही. म्हणून मला बोलण्याचा प्रसंग आला व मीं माझेच विचार मांडले. असहकाराचें तत्त्व आम्हां सर्वांना मान्य होतें. मतभेद फक्त कलकत्त्याचा ठराव तेव्हाच अमलांत आणावयाचा की कांही वर्षांनंतर, एवढ्याचपुरता होता. कलकत्ता कॉंग्रेसनंतर गांधींनी जो दौरा काढला त्यावरून लोकमत त्यांना बरेंच अनुकूल होतें असें दिसून आलें होतें. आमच्या प्रांतांत व महाराष्ट्रांत मला जें वातावरण दिसून आलें त्यावरूनही मला तसाच अनुभव आला होता. म्हणून तयारीकरिता चळ-वळ पुढे ढकलणें मला योग्य दिसत नव्हतें. शिवाय खिलाफतीच्या व पंजाबच्या प्रश्नांची वाट काय? या प्रश्नांसंबंधी सरकारने जें धोरण स्वीकारलें होतें त्याचा प्रतिकार कसा करावयाचा? ही गोष्ट पाच वर्षांच्या मुदतीवर टाकणें शहाणपणाचें व मुत्सद्दीपणाचें झालें नसतें. केळकरांना या अडचणी दिसत नव्हत्या असें मला वाटलें नाही. माझ्या व त्यांच्या बोलण्यांत त्यांनी मला आपलें निश्चित धोरण कळविलें नाही. बॅ. बॅप्टिस्टा मात्र असहकाराच्या विरुद्ध होते; तथापि कॉंग्रेसच्या विरुद्ध वागूं नये असें त्यांनी ठरविलें होतें.

### *कॉंग्रेसची भाषावार प्रांतरचना*

कॉंग्रेसची घटना नवीन परिस्थितीला अनुरूप नव्हती. म्हणून ती नवीन बनविण्याचें एक महत्त्वाचें काम नागपूरच्या कॉंग्रेसमध्ये व्हावयाचें होतें. याखेरीज भाषावार प्रांतरचना करण्याचा विचारही गांधींच्या मनांत होता. राज्यव्यवस्थेंतदेखील भाषावर प्रांतरचना होणें जरूर आहे, असें गांधींचें मत आहे. टिळकांचेंही मत तसेंच होतें. या तत्त्वाला अनुसरून राज्यव्यवस्था बदलण्याला अवधी होता. कॉंग्रेसचा कारभार आमचा स्वतंत्र असल्याकारणानें त्यांत हा इष्ट फेरफार करणें आमच्या हातीं होतें. भाषावार प्रांतरचना करून प्रांतभाषांच्या द्वारें कॉंग्रेसचें काम झाल्यास बहुजनसमाजाचा पाठिंबा कॉंग्रेसला मिळेल, एरवीं मिळणार नाही, ही गोष्ट स्पष्ट होती. गांधींना असहकारितेची चळवळ कांही थोड्या शिक्षित लोकांपुरतीच मर्यादित करावयाची नव्हती. थोड्या शिक्षित लोकांची चळवळ परिणामकारक होत नाही, असा कॉंग्रेसला अनुभव आला होता. मोठ्या चळवळी मोठ्या प्रमाणावर झाल्या तरच त्या परिणामकारक होतात. प्रांतीय भाषांतून अशा चळवळीचा प्रसार करणें हें अत्यंत जरुरीचें आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन गांधींनी नागपूरच्या कॉंग्रेसमध्ये भाषावार प्रांतरचना बदलण्याचें ठरविलें होतें.

आमचा कर्नाटक प्रांत वेगळा असावा ही कल्पना उत्पन्न झाली होती. कांही लोक या कल्पनेला मूर्तस्वरूप आणण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळे नागपूरच्या कॉंग्रेस-मध्ये तशी आपल्या प्रांतापुरती व्यवस्था वेगळी करून घेण्याची इच्छा तीव्र झाली होती.

असहकारितेच्या चळवळीसंबंधानेही लोकांना सहानुभूती वाटत होती. 'ब्राह्मणेतर' म्हणवून घेणारे कॉंग्रेसमध्ये जरी सामील होत नव्हते तरी गांधींसंबंधाने त्यांना आदर वाटत होता. या सर्व कारणांमुळे नागपूरच्या कॉंग्रेससंबंधाने पूर्ण उत्साह उत्पन्न झाला होता. कर्नाटकांतून जवळजवळ आठशें लोक प्रतिनिधी होऊन जाण्याला तयार झाले. गोविंदराव याळगींनी खटपट करून हुबळीपासून पुण्यापर्यंत एक स्पेशल ट्रेन काढविली. भाषावार प्रांतरचनेच्या ठरावावर अनुकूल मत देणारे सर्वच होते. असहकारितेच्या ठरावाला विरुद्ध अशी चारपांच वकील मंडळी होती. त्यांत बेळवी हे प्रमुख होते.

## *असहकारितेचा निर्णय*

महाराष्ट्रांतून व इतर प्रांतांतूनही नागपूरला पुष्कळ मंडळी आली होती. नागपुरास प्रत्येक प्रांताच्या प्रतिनिधींमध्ये वाटाघाट जोरांत चालत असे. प्रांतनिहाय सभा कॉंग्रेसनगरमध्ये भरत असत. बंगाल प्रांताच्या प्रतिनिधींमध्ये मतभेद इतका तीव्र झाला होता की, प्रसंग हातघाईवर येऊन कांहींना जखमा झाल्या. दासबाबूंनी आपली पराकाष्ठा केली, पण बंगालचें मत सर्वस्वी त्यांना अनुकूल होईना. कर्नाटक व महाराष्ट्र या दोन प्रांतांतील प्रतिनिधींची मिळून एक सभा झाली. नाशिकचे पाटणकर वकील यांना या सभेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें. असहकाराला अनुकूल असें माझें भाषण प्रथम झालें. बेळवींनी विरुद्ध भाषण केलें. काका कालेलकर, दिवेकरशास्त्री वगैरे मंडळींचीं भाषणें अनुकूल झालीं. स्वतः अध्यक्ष विरुद्ध बोलूं लागले. त्यांनी आपल्या भाषणांत थोडे कडक शब्द वापरले. त्यामुळे सभेंत गोंधळ झाला. अध्यक्ष सभा सोडून गेले व सभेंत निश्चयात्मक कांहीच ठरलें नाही. तरी बहुमत ठरावाला अनुकूलच होतें, असें स्पष्ट दिसत होतें.

महाराष्ट्रांतील कॉंग्रेसचे पुढारी गांधींना विरोध करणारे होते असा पुकारा झाला होता. म्हणून ठरावाला अनुकूल असलेल्या महाराष्ट्रांतील कांही पुढाऱ्यांनी आपल्या सहीनिशी एक पत्रक काढून महाराष्ट्रांत असहकाराला अनुकूल पुष्कळ लोक आहेत, असें जाहीर केलें होतें. यावरून महाराष्ट्रांत मतभेदाचें वारें वाहूं लागलें होतें असें दिसलें. पण त्याची गती बरीच मंद होती.

आमच्या प्रांतांत बहुतेक एकमत होतें. बेळवी मात्र विरुद्ध होते. पण त्यांना अनुयायी कोणी नव्हते म्हटलें तरी चालेल. पण त्यांनीसुद्धा विरुद्ध खटपट कांही केली नाही. कॉंग्रेसचें काम पुरें होण्यापूर्वीच ते बेळगावला परत निघून गेले.

दासबाबूंनी सर्व परिस्थिति पाहिली. प्रचंड बहुमताने ठराव पास होणार असें समजतांच त्यांनी विरोध सोडून देण्याचें ठरविलें. लाला लजपतरायांनी व इतर पुढाऱ्यांनी तेंच धोरण पत्करलें. फक्त जीना तेवढे शेवटपर्यंत विरुद्ध राहिले. त्यांनी भर कॉंग्रेसमध्ये आपले विचार मोठ्या धैर्याने मांडले. लोकांकडून त्यांना बोलतांना अडथळा झाला; पण त्यांनी दाद न देतां आपले विचार निर्भीडपणाने व मुद्देसूद रीतीने मांडले. दास

लजपतराय, कस्तुरी रंगा आयंगार यांचीं भाषणें झालीं आणि या सर्वांनी ठराव अमलांत आणण्याचा प्रयत्न करण्याचें जाहीर केलें. प्रचंड बहुमताने ठराव पास झाला.

ठरावाबरहुकूम जे वकील वकिली सोडतील त्यांच्यापैकी ज्यांना जरुरी असेल त्यांना मदत देण्याकरिता जमनालाल बजाज यांनी एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली. या बाबतींत आमच्या प्रांतांत व्यवस्था करण्याचें काम माझ्याकडे देण्यांत आलें.

भाषावार प्रांतरचना करण्याचा ठरावही पास झाला. मद्रास इलाख्यांतील मंगळूर व बळ्ळारी व मुंबई इलाख्यांतील बेळगाव, धारवाड, विजापूर व कारवार व संस्थानें मिळून एक कर्नाटक प्रांत करण्यांत आला. त्यामुळे आमच्या प्रांतांतील प्रतिनिधींचें समाधान झालें. त्याचप्रमाणे इतर प्रांतांची व्यवस्था झाली.

बळ्ळारी जिल्ह्यासंबंधाने आंध्र लोकांनी पुढे तक्रार केली. म्हणून हें प्रकरण केळकर यांच्याकडे सोपविण्यांत आलें. केळकरांनी बळ्ळारींत जाऊन चवकशी करून बळ्ळारी शहरासहित चार तालुके कर्नाटक प्रांतांत व चार तालुके आंध्र प्रांतांत वाटून दिले. नवीन घटना मंजूर करण्यांत आली. प्रायः तीच आतापर्यंत चालू आहे. सोईच्या दृष्टीने कांही फेरफार झाले आहेत; पण मुख्य तत्त्वें जशींच्या तशींच आहेत. कॉंग्रेसच्या 'क्रीड'मध्ये बदल करून शांतीच्या व न्याय्य मार्गाने आपलें स्वराज्याचें ध्येय प्राप्त करून घ्यावयाचें हें तत्त्व गोवून भावी सर्व चळवळींची दिशा अहिंसा व सत्य या तत्त्वांच्या पायावर उभारली गेली.

अहिंसा व सत्य हीं तत्त्वें गांधींनी कांही नवीन शोधून काढलीं नाहीत. पूर्वी अनेक महापुरुषांनी या सिद्धांतांचा पुरस्कार केला आहे. पण राजकारणासारख्या व्यापक विषयासाठी या तत्त्वांवर बहुजनसमाजाची चळवळ करूं पाहणारे गांधी हे पहिलेच होत, हें कोणीही कबूल करील. राजकारणांत हिंसा ही हिंसा होत नाही व असत्य हें असत्य नाही, म्हणजे हे दोन्ही प्रकार जरी आचरणांत आणले तरी त्यांत दोष नाही, असें मानण्याचा परिपाठ आहे. त्याला गांधींनी हरताळ लावला. जगांतील आतापर्यंतच्या अनुभवाविरुद्ध हा नवीन प्रयोग करून पाहण्याला सुरुवात केली. गांधींच्या संबंधाने कोणाचें कांही मत असो; पण मानवजातीची उन्नती करण्याकरिता जगांतील विचारी महात्म्यांनी जे प्रयत्न चालवले आहेत त्यांत सत्य व अहिंसा या अबाधित व सनातन तत्त्वांचा राजकारणासारख्या अत्यंत भानगडीचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं प्रत्यक्ष अंमल करण्यासाठी गांधींनी हिंदुस्थानांत चालवलेल्या प्रयोगाने भर पडली, ही गोष्ट आज सर्वांना मान्य झाली आहे. त्यामुळे त्यांची आज जगांतील श्रेष्ठ पुरुषांत गणना होऊं लागली आहे. त्यांच्या मार्गाचें अनुकरण करण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढूं लागली आहे.

### *मराठी दैनिक 'लोकमान्य'*

नागपूर कॉंग्रेसच्या वेळीं मुंबईस एक मराठी दैनिक सुरू करून त्यामार्फत कॉंग्रेसच्या कार्याचा प्रचार करावा ही कल्पना कांही महा-

राष्ट्रीय मंडळींच्या मनांत आली. 'राष्ट्रमत' बंद पडल्यापासून मराठींत दैनिकाची उणीव भासूं लागली होती. असहकारितेची चळवळ जोरांत चालू होण्याला मराठी दैनिकाची आवश्यकता होती. या सर्व गोष्टी लक्षांत आणून एक लिमिटेड कंपनी स्थापन करून एक छापखाना काढावा व त्यांतच एक नवें दैनिक सुरू करावें असें कांही मंडळींमध्ये ठरलें. मीही त्यामध्ये होतो. डॉ. भडकमकर यांनी या कामीं जास्ती पुढाकार घेतला होता. आमच्या सहीने एक हस्तपत्रक काढून तें वाटण्यांत आलें. डायरेक्टर्समध्ये माझें नाव दाखल करण्यास मीं मान्यता दिली. काकासाहेब खाडिलकरांची संपादकाच्या जागेवर योजना करण्याचें ठरलें. टिळकांच्या मृत्यूनंतर 'केसरी' पत्रासंबंधानें केळकरांनी जी व्यवस्था केली ती खाडिलकरांना पसंत न पडल्यामुळे त्यांनी 'केसरी'चा संबंध सोडला होता. त्यांनी नवीन पत्राचे संपादक होण्याचें कबूल केलें, व त्यांनीही डायरेक्टर होण्यास संमती दिली. डॉ. भडकमकर हे या कल्पनेच्या बुडाशीं असल्यामुळे व त्यांनीच या कल्पनेला मूर्तस्वरूप आणण्याच्या कामीं मदत केल्यामुळे त्यांनाच मॅनेजिंग डायरेक्टर नेमण्यांत आलें. याशिवाय तात्यासाहेब केळकर, डॉ. नानासाहेब देशमुख, अण्णासाहेब नेने वगैरे मंडळी डायरेक्टरच्या बोर्डांत सामील झाली. यानंतर लवकरच मुंबईस 'लोकमान्य' या नावाच्या छापखान्यांत खाडिलकरांच्या संपादकत्वाखाली 'लोकमान्य' दैनिक सुरू झालें व त्याच्या मार्फत कॉंग्रेसचें कार्य महाराष्ट्रांत जोराने चालू झालें.

### *कॉंग्रेससंघटनेच्या नवीन कमिट्या*

कर्नाटक प्रांत वेगळा झाल्याकारणाने व माझें राहणें त्याच प्रांतीं असल्याने माझा व महाराष्ट्राचा संबंध कमी होऊं लागला. तथापि महाराष्ट्राबद्दलचा माझा आदर कमी झाला नाही व महाराष्ट्रानेही माझ्यासंबंधी आपलेपणा कमी केला नाही. या कारणाने कर्नाटकांत माझ्या संबंधाने कांही मंडळींनी गैरसमज पसरविण्याला पुढे प्रारंभ केला. याबद्दल पूर्वी उल्लेख आलाच आहे.

नागपूर कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणे व नवीन कॉंग्रेसच्या घटनेप्रमाणे कर्नाटकची प्रांतिक कॉंग्रेस कमिटी व जिल्हा कमिट्या वगैरे स्थापण्याचें काम होतें, म्हणून मी बेळगावकडे गेलों.

बेळगाव जिल्ह्यांत मराठी भाषा चालते. आणि कांही भागांत मराठी व कानडी या दोन्ही भाषा चालतात. बेळगाव जिल्ह्याला लागून कोल्हापूर, सावंतवाडी, वगैरे महाराष्ट्रांतील संस्थानांच्या हद्दी आहेत. गोव्याची हद्दही बेळगाव जिल्ह्याला भिडली आहे. जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं—बेळगाव शहरीं—कानडी व मराठी या दोन्ही भाषा प्रचारांत आहेत, तरी मराठीचें प्राबल्य विशेष आहे. यामुळे बेळगाव जिल्ह्याचा कांही भाग महाराष्ट्राला जोडण्यांत यावा, असा विचार कांही महाराष्ट्राभिमानी मंडळींच्या मनांत होता. पण बेळगाव जिल्ह्यांत मराठीपेक्षा कानडी भागच जास्ती असल्याकारणाने जिल्ह्याचे मराठी व कानडी भाग निरनिराळे करणें हें योग्य नाही असें माझें मत होतें. दोन भाग करावेत असें म्हणणारी मंडळी चिकोडी, निपाणी, खानापूर,

शहापूर वगैरे ठिकाणीं होती. मी स्वतः त्या त्या ठिकाणीं जाऊन या मंडळींशी खासगी चर्चा करून त्यांची समजूत घातली व हा वाद वाढूं दिला नाही. कॉंग्रेसच्या घटनेप्रमाणे कानडी ही कर्नाटकाची प्रांतीय भाषा म्हणून ठरविण्यांत आली होती व तें योग्यही होतें. तथापि बेळगाव जिल्ह्याची विशिष्ट परिस्थिती लक्षांत घेतां कॉंग्रेसमार्फत भरणाऱ्या सार्वजनिक सभांतून कानडी व मराठी दोन्ही भाषांना वाव देण्यांत आला होता. ही व्यवस्था पूर्वीपासून चालत आलेल्या पद्धतीला धरूनच होती.

कॉंग्रेसच्या घटनेंत गदग हें शहर कर्नाटकचें मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे तेथेंच प्रांतिक कचेरीचें मुख्य ठाणें नियोजित करण्यांत आलें होतें.

नवीन घटनेप्रमाणे जिल्हानिहाय जिल्हाकमिट्या स्थापण्यांत आल्या व त्यांच्यातर्फे प्रांतिक कमिट्यांचे सभासद निवडण्यांत आले. त्यानंतर प्रांतिक कमिट्यांतर्फे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद निवडण्याचें व प्रांतिक कमिटीचें अधिकारी मंडळ निवडण्याचें काम गदग येथे प्रांतिक कमिटीची सभा भरून करण्यांत आलें. सर्व कर्नाटकांतील—म्हणजे बेळगाव, धारवाड, कारवार, विजापूर, बळ्ळारी, कुर्ग, मंगळूर, म्हैसूर संस्थानांतील सहा जिल्हे, व हैदराबाद संस्थानांतील दोन जिल्हे, 'दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें' या नावाने संबोधल्या जाणाऱ्या संस्थानांपैकी मुधोळ, जमखंडी, सांगली व मिरज या संस्थानांचा कांही भाग—बरीच मंडळी या सभेकरिता गदगला जमली होती. अखिल कर्नाटकांत राजकारणांत भाग घेणारी मंडळी कर्नाटकांत एकत्र झाल्याचा हा पहिलाच प्रसंग होता. प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षस्थानीं माझी एकमताने निवडणूक झाली. पुढे १९२४ अखेरपर्यंत मलाच अध्यक्ष निवडण्यांत येत असे. बेळगाव कॉंग्रेसनंतर मीं हें काम सोडलें.

प्रांतनिहाय प्रांतिक कमिट्या स्थापण्याचें व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद निवडण्याचें काम झाल्यानंतर मुंबईस ऑल इंडिया कमिटीची सभा झाली. त्या सभेंत कांही कार्यक्रम आखण्यांत आला. या वेळपर्यंत कॉंग्रेसच्या बैठकी भरवून, कांही ठराव पास करून, सरकारला कांही सूचना करावयाच्या, यापलीकडे प्रायः कांही काम नसे. पण नागपूर कॉंग्रेसनंतर सरकारशीं असहकारिता करावयाची असें ठरविल्यानंतर, पूर्वीसारखे ठराव करण्याची आवश्यकता राहिली नाही. शिवाय कॉंग्रेसने देशांत जारी करण्याचा कांही महत्त्वाचा कार्यक्रम हातीं घेतल्यामुळे कॉंग्रेसचें कार्य सदोदित चालू ठेवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. हें काम करण्याकरिता घटनेंत एक वर्किंग कमिटी (कार्यकारी मंडळी) नेमण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. तिला अनुसरून मुंबईच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभेंत पहिली वर्किंग कमिटी निवडण्यांत आली. सर्वांचें एकमत असल्याकारणाने या निवडणुकींत विशेष चढाओढ नव्हती. तथापि जरुरीच्या संख्येपेक्षा तीनचार नांवें जास्ती सुचविण्यांत आलीं होतीं. माझेंही नाव यादींत होतें. पण पाचसहा मतें मला कमी पडून माझी निवडणूक झाली नाही. तथापि मला कोऑप्ट करण्यांत आलें.

या पहिल्या वर्किंग कमिटींत तात्यासाहेब केळकर होते आणि कांही महत्त्वाचें काम आमच्या प्रांतांत निघाल्यास त्यांचे मार्फत वर्किंग कमिटीकडून तें करून घेतां येईल असें आम्हांला वाटलें.

## कॉलेजांवर बहिष्कार

ऑल इंडिया वर्किंग कमिटीचें काम संपल्यानंतर शांतारामाच्या चाळींत एक प्रचंड सभा झाली. सभेला विद्यार्थी पुष्कळ आले होते. गांधींचें भाषण होऊन त्यांनी काँग्रेसचा कार्यक्रम समजावून सांगितला. विशेषतः विद्यार्थ्यांनी सरकारी शिक्षणसंस्था सोडून स्वराज्याच्या लढ्यांत सामील व्हावें या मुद्द्यावर त्यांनी जोर दिला. गांधींच्या मागून शौकतअल्लींचें भाषण त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने झालें व आपल्या भाषणाच्या शेवटीं किती विद्यार्थी सरकारी कॉलेजें सोडण्याला तयार आहेत त्यांनी हात वर करावेत असें ते बोलले. पण आश्चर्याची गोष्ट ही की एकही हात वर झाला नाही. आपलें उर्दूतील भाषण विद्यार्थ्यांना समजलें नसेल असें त्यांना वाटून त्यांनी मला मराठींत भाषण करण्याला सांगितलें. मीं माझें भाषण विद्यार्थ्यांनाच उद्देशून केलें. गांधीजी व शौकतअल्ली यांचीं भाषणें मराठींत झालीं नव्हतीं, त्याकारणाने कदाचित लोकांना समजलीं नसतील. माझें भाषण मराठींत झाल्यामुळे तें लोकांना समजलें असावें. मला लोकांनी टाळ्या वगैरे वाजवून उत्तेजन दिलें, हें पाहून माझें भाषण परिणामकारक झालें असें वाटून शौकतअल्लींनी आपण केलेला प्रयोग करण्यास मला सांगितलें. मी त्यांच्या सांगण्याप्रमाणें कॉलेज सोडण्याला कोणी विद्यार्थी तयार असल्यास त्यांनी हात वर करावे असें सांगितलें. पण शौकतअल्लींना जो अनुभव आला तोच मलाही आला! कर्नाटकांतील कांही विद्यार्थी माझ्यासमोर बसले होते. त्यांना उद्देशून मी पुन्हा पाचचार मिनिटें बोललों व पहिल्याप्रमाणें कानडी विद्यार्थ्यांपैकी कॉलेज सोडण्यास तयार असलेल्यांना हात वर करण्यास सांगितलें. समोरच्या कानडी विद्यार्थ्यांनी मी त्यांचेकडे पाहूं लागल्याबरोबर माना खाली घातल्या. मी थोडा निराश झालों. पण इतक्यांत लांब कोपऱ्यांत बसलेला एक विद्यार्थी उठला व मोठ्याने आपण कॉलेज सोडण्याचा निश्चय केल्याचें सांगितलें. त्याचें नावगाव मीं विचारलें. त्यानेही आपलें नाव ओरडून सांगितलें. त्याचें नाव पुरोहित होतें व तो बागलकोटचा होता. एक तरी विद्यार्थी मला मिळाला व तोही कर्नाटकचा म्हणून मला थोडें बरें वाटलें! हा विद्यार्थी एल्‌एल्. बी.चा अभ्यास करीत होता. दुसरे दिवसापासूनच त्याने कॉलेज सोडलें व आपल्या गावीं जाऊन काँग्रेसच्या कामाला लागला. तो अद्यापपर्यंत याच कामांत आहे. हल्ली चरखा संघांत (कर्नाटकशाखा) तो काम करीत असतो.

### मुंबईमधील विद्यार्थ्यांमध्ये काम

ही सभा झाल्यानंतर एकदोन दिवसांत गांधीजी व शौकतअली दौऱ्यावर गेले. जातांना त्यांनी मला मुंबईस कांही दिवस राहून विद्यार्थ्यांमध्ये काम करण्यास सांगितलें. त्याप्रमाणे मी राहिलों व शंकरलाल बँकर व उमर सोबानी यांच्या मदतीने मारवाडी विद्यालयाच्या दिवाणखान्यांत विद्यार्थ्यांकरिता सभा भरवण्याला प्रारंभ केला. पुष्कळ विद्यार्थी सभेला येऊं लागले. प्रथम प्रथम मी व बँकर असे दोघेच भाषणें करीत होतों. हळूहळू इतर लोकही व्याख्यानें देण्याकरिता येऊं लागले. दिवसेंदिवस कॉलेजें सोडणाऱ्यांची संख्या वाढूं लागली. त्यामुळे जास्ती प्रयत्न करण्याला आम्हांलाही हौस आली. गिडवानी, पुणतांबेकर, स्वामी नारायण वगैरे शिक्षणखात्यांत काम केलेल्या मंडळींचीं व्याख्यानें झालीं. विठ्ठलभाई पटेलही आम्हांला मदत करूं लागले. मारवाडी विद्यालयाची दिवाणखान्याची लहान जागा आम्हाला बदलावी लागली. कॉलेजनिहायही आम्हीं व्याख्यानें दिलीं. कॉलेजें सोडलेल्या विद्यार्थ्यांनी आपआपल्या कॉलेजांवर पिकेटिंग करून बरोबरीच्या विद्यार्थ्यांचीं मनें वळवण्याचा प्रयत्न जारीने चालू केला. अशा रीतीने आम्ही प्रयत्न करीत असतां तात्यासाहेब केळकरांनी माझ्याबरोबर हें काम करण्याकरिता बाबूराव गोखल्यांना मुंबईस पाठविलें. त्यामुळे मलाही जोर आला. महाराष्ट्रांतील कांही पुढारी असहकारितेच्या चळवळीला अनुकूल नाहीत व विशेषतः सरकारी शिक्षणसंस्थांचा बहिष्कार त्यांना पसंत नाही, असा संशय येऊं लागला होता. पण तात्यासाहेबांनी वर्किंग कमिटींत काम करण्याचें पत्करून व माझ्या मदतीला बाबूराव गोखल्यांना मुंबईस पाठवून या संशयाची निवृत्ती केली. 'केसरीं'तूनही त्या वेळीं अनुकूल लेख येत होते.

### 'साधकाश्रमा'ची स्थापना

कॉलेजांतल्या वसतीगृहांतून कांही विद्यार्थी बाहेर पडले होते. त्यांची राहण्याची व जेवणाची गैरसोय होऊं लागली. म्हणून त्यांच्याकरिता एका गुजराती महाजनवाडींत सोय करण्यांत आली. या विद्यार्थ्यांना थोडें शिक्षण व माहिती देऊन खेड्यापाड्यांत प्रचारकार्याकरिता पाठविण्याचा विचार होता. प्रचाराच्या कामाची माहिती देण्याचें काम विठ्ठलभाई पटेल यांनी आपल्याकडे घेतलें व माहितीचा एक आराखडा तयार करून त्यांनी नियमितपणें वर्ग घेण्याला सुरुवात केली. याप्रमाणे पंधरावीस दिवस झाल्यानंतर बऱ्याच विद्यार्थ्यांना त्या त्या ठिकाणीं खर्चाला देऊन पाठवण्यांत आलें. तथापि बरेच विद्यार्थी मुंबईसच राहिले. या विद्यार्थ्यांच्या संबंधाने कायमची कांही तरी सोय लावावी असें वाटून आश्रमाच्या धर्तीवर मुंबईच्या उपनगरांत एखादी संस्था काढण्याचा विचार ठरला. त्याप्रमाणे जागा

वगैरे पाहण्यांत चारपाच दिवस गेले. शेवटीं अंधेरीस पोतदार या नावाच्या एका श्रीमंत मारवाडी व्यापाऱ्याचा बंगला व वाडी आम्हांला मिळाली. जागा मिळाल्याबरोबर भांडींकुंडीं, धान्यें, इतर सामानसुमान यांची जोडणी दोनतीन दिवसांत झाली. या कामीं शंकरलाल बँकर व उमर सोबानी यांनी फार मेहनत घेतली व मदत केली. जागेची सोय झाली; पण संस्थेंत राहून ती चालवण्याकरिता कोणी योग्य मनुष्य पाहिजे होता. बँकर यांनी दोन नावें सुचवली. तीं म्हणजे पुंडलीकजी कातगडे, व बडोद्यास बॅरिस्टरचा धंदा करीत असलेले केशवराव देशपांडे. पुंडलीकजी साबरमतीस सत्याग्रह आश्रमामध्ये असतांना शंकरलालनी त्यांना पाहिलें होतें. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचीही त्यांना थोडीफार माहिती होती. ते माझ्याचकडे असल्याने त्यांना मुंबईला तावडतोब आणण्यांत आलें. त्या वेळीं ते बेळगावचा स्वराज्य आश्रम चालवीत होते.

बॅ. केशवरावांना अशा संस्था चालविण्याची हौस फार आहे. स्वतः त्यांनी भडोच-जवळील गंगनाथ येथे नर्मदातटाकावर 'गंगनाथ विद्यालय' या नावाची एक राष्ट्रीय शाळा चालवली होती. शिवाय इंग्लंडमध्ये अभ्यासाकरिता असतांनाच त्यांची व गांधीजींची ओळख झाली होती. हिंदुस्थानला परत गेल्यावर अशा प्रकारच्या उद्योगांत दोघांनीही काम करावें, असें त्यांचें बोलणें झालें होतें. पण तें घडून आलें नाही. बडोद्यास नोकरीवर असतांच राष्ट्रीय शिक्षणाकडे त्यांचें लक्ष होतें व आपल्या पगारापैकी बरीच रक्कम ते या कामीं खर्च करीत असत. या सर्व कारणांमुळे ते अंधेरीची संस्था चालवण्यास योग्य आहेत असें आम्हांला वाटलें. त्यांना मुंबईस बोलावून त्यांच्याजवळ ही गोष्ट काढली. एकदोन दिवसांच्या वाटाघाटीनंतर त्यांनी अंधेरीस राहण्याचें कबूल केलें. त्याबरोबर मुंबईस जी विद्यार्थी मंडळी राहणार होती ती सर्व अंधेरीला गेली. तेथे आश्रमाची स्थापना करण्यांत आली व त्याला 'साधकाश्रम' असें नाव देण्यांत आलें. आश्रमाच्या आचार्यस्थानीं केशवरावांची योजना केली, व त्यांच्या हाताखाली पुंडलीक-जींना आश्रमाचे व्यवस्थापक म्हणून दिलें. पोतदारशेठजींच्या वाडींत विहिरी होत्या व जमीनही चांगली होती. म्हणून खादीशिक्षणाबरोबर शेतीचीही जोड देण्यांत आली होती. बौद्धिक शिक्षणाचें काम खुद्द केशवरावांनी आपल्याकडे घेतलें होतें. उमर सोबानी यांनी आपल्या लायब्ररीपैकी चांगलींचांगलीं बरींच पुस्तकें या संस्थेला दिलीं होतीं. माझा मुक्काम मुंबईस असेपर्यंत मी मधूनमधून साधकाश्रमांत जात असे. गांधीजींनीही या आश्रमाला भेट दिली होती.

हा आश्रम पुढे बरेच दिवस चालला होता. पण गांधींना व बँकर यांना १९२२ सालीं शिक्षा झाल्यानंतर त्याच्याकडे कोणी लक्ष देईना. मीही १९२१ सालापासून तुरुंगांतच होतों. तथापि बॅ. केशवराव देशपांडे यांनी तो आपल्याच हिमतीवर कांही दिवस चालवला. शेवटीं त्याचें स्वरूप अगदी आकुंचित झालें व त्याचें रूपांतर डेरींत झालें. कांही मंडळी डेरींतही काम करीत होती. पण डेरीदेखील नुकसानीवरच चालविण्याचा प्रसंग आल्यामुळे तीही बंद करावी लागली. देशपांडे यांना या कामीं बरीच

झीज सोसावी लागली. आजचे मुंबईतील कांही प्रमुख कार्यकर्ते—काकासाहेब तांबे, डॉ. नरवणे, श्रीपाद शंकर नवरे—या साधकाश्रमामध्ये होते.

या शिक्षणसंस्थांच्या चळवळीसंबंधाने मला केवळ मुंबईतच काम करावें लागलें असें नाही. पुणें, सांगली, धारवाड या ठिकाणींही मी गेलों आणि विद्यार्थ्यांच्या सभांत व्याख्यानें देऊन व खासगी चर्चा करून त्यांचीं मनें वळवण्याचा मीं प्रयत्न केला. तो कांहीं अंशीं सिद्धीलाही गेला.

### महाराष्ट्रांत बहिष्कार मंदावला

मुंबईस काम करीत असतां एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. तिचाही उल्लेख करणें जरूर आहे. दुसऱ्या एल्‌एल्‌. बी.चा अभ्यास करणाऱ्या कांही विद्यार्थ्यांनी एक दिवशीं खासगी चर्चेच्या वेळीं मला असें कळविलें की, कांही विद्यार्थ्यांचें म्हणणें होतें की, जर तात्यासाहेब केळकरांना हा कार्यक्रम पसंत असेल व त्यांनी जर आपल्याला सल्ला दिला, तर आपण पुढला अभ्यास सोडून काँग्रेसच्या कामाला वाहून घेण्याला तयार आहोंत. मी त्यांना त्याच आठवड्यांतील 'केसरी'चा लेख दाखवला. पण तेवढ्याने आपलें समाधान होत नाही, असें त्यांनी सांगितलें. पण मला तात्यासाहेबांची खात्री असल्याने त्यांना मी पुण्याला जाऊन भेटून येण्यास कळविलें. त्याप्रमाणे ते गेले. पुण्याहून परत आल्यानंतर मला ते भेटले व हातीं घेतलेला अभ्यासक्रम पुरा करण्याबद्दलचा त्यांनी सल्ला दिली असें ते सांगूं लागले! मला आश्चर्य वाटलें व ही गोष्ट अगदी असंभवनीय वाटली. म्हणून मीं स्वतः केळकरांजवळ ही गोष्ट काढली नाही. यानंतर मुंबईस त्यांचें एक बहिष्काराला अनुकूल असें व्याख्यानही झालें असें मला आठवतें. तथापि जे विद्यार्थी त्यांना पुण्यास भेटून आले होते, त्यांनी तात्यासाहेबांचें खाजगी मत बहिष्काराच्या विरुद्ध असल्याबद्दलचा विद्यार्थ्यांमध्ये पुकारा केला. त्यामुळे कांही विद्यार्थ्यांना सांगण्याला एक निमित्त मिळालें व महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांमध्ये ही बहिष्काराची चळवळ थोडी मंदावली.

### चोहोंकडे राष्ट्रीय शाळांची स्थापना

पुण्याचें 'न्यू पूना कॉलेज' ही संस्था राष्ट्रीय करण्याबद्दल केळकरांनी खटपट चालवली होती. तीन लाख रुपये मिळवून देण्याची हमी घेतल्यास ती संस्था राष्ट्रीय करूं असें चालकांनी केळकरांना आश्वासन दिलें होतें. थोड्या अवधींत एवढी मोठी रक्कम महाराष्ट्रांत उभारणें शक्य नव्हतें. (म्हणूनच कदाचित या संस्थेच्या चालकांनी ही अट घातली असावी.) केळकरांनी मला बोलावून या कामीं गांधी कांही करूं शकतात किंवा काय, हें पाहण्यास सांगितलें. त्याच संधीला गांधी मुंबईस आले होते. त्याच दिवशीं काशीला जाण्याकरिता ते निघणार होते. त्यांच्याकडे मी गेलों. पण मंडळींची इतकी गर्दी होती की, मला त्यांच्याशीं एकीकडे

बोलण्याला वेळ मिळाला नाही. म्हणून त्यांच्याबरोबर काशीपर्यंत प्रवास करावा, असा विचार मीं केला. गाडींतच प्रवासांत असतांना मीं ही गोष्ट काढली व केळकरांच्या सांगण्यावरून मी त्यांच्याशीं बोलत आहें असें सांगितलें. त्याबरोबर त्यांनी कॉलेजमध्ये कोण कोण मंडळी आहेत व विद्यार्थी किती आहेत याची माहिती विचारली. मला जितकी माहिती होती तितकी मीं सांगितली. अशा प्रकारें व पुण्यासारख्या महत्त्वाच्या ठिकाणीं चालवलेलें कॉलेज राष्ट्रीय होण्याचा संभव आहे असें दिसतांच गांधींनी फार वेळ विचार न करतां आपण तीन लाख रुपये देण्यास कबूल आहोंत, अशी तार केळकरांना करण्यास मला सांगितलें. आमचा मुक्काम त्या दिवशीं झांशीस झाला असें मला आठवतें. तेथूनच मीं केळकरांना गांधींच्या सांगण्याप्रमाणे तार केली. मी काशीहून परत आलों. पण मुंबईस आल्यानंतर केळकरांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही, असें मला समजलें.

कलकत्त्यास स्पेशल कॉंग्रेसमध्ये ठराव पास झाल्याबरोबर निरनिराळ्या ठिकाणीं राष्ट्रीय शाळा स्थापन करण्याच्या उद्योगाला सुरुवात झाली होती. आमच्या प्रांतांत निपाणी, बेळगाव, धारवाड, हुबळी, गदग, विजापूर, शिर्शी, कुमठा, मंगळूर वगैरे ठिकाणीं राष्ट्रीय शाळा स्थापण्यांत आल्या. बेळगावच्या शाळेवर माझे स्नेही बाबासाहेब सोमण यांना मुख्याध्यापक म्हणून नेमण्यांत आलें. धारवाडास दिवाकर, हुकेरीकर, दातार, हळदीपूरकर इत्यादि मंडळींनीं एक कॉलेज काढलें होतें व मुंबई युनिव्हर्सिटीने या कॉलेजला मंजुरीही दिली होती. त्यांनी तें कॉलेजही राष्ट्रीय केलें व युनिव्हर्सिटीशीं संबंध तोडला.

महाराष्ट्रांत वेंगुर्ला, सातारा, अहमदनगर, येवला, अकोला, खामगाव वगैरे ठिकाणीं राष्ट्रीय शाळा निघाल्या. पुण्यास तर टिळकांच्या नावावर 'टिळक विद्यालय' स्थापण्यांत आलें. मुंबईसही एक आर्ट कॉलेज, एक मेडिकल कॉलेज व शाळा स्थापण्यांत आल्या. गुजरातेंत 'गुजरात विद्यापीठा'ची स्थापना झाली. याचप्रमाणे सर्व राष्ट्रभर १९२१ सालीं राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीला जोर आला. या सर्व संस्था कांही दिवस चांगल्या स्थितींत चालल्या. त्यापैकी बऱ्याच द्रव्यसाहाय्याच्या अभावीं किंवा विद्यार्थी नाहीत म्हणून बंद झल्या. पण अद्यापि कांही चालल्या आहेत. ज्या चालल्या आहेत त्या चालकांच्या अत्यंत स्वार्थत्यागाच्या व चिकाटीच्या जोरावरच चालल्या आहेत. हल्लीच्या चालू चळवळींत सरकारने या सर्व संस्था गैरकायदेशीर ठरवल्यामुळे त्या बंद पडल्या आहेत आणि या राष्ट्रीय शिक्षणसंस्थांशीं संबंध असलेले बहुतेक चालक, अध्यापक व बरेच विद्यार्थी सरकारचा पाहुणचार घेत आहेत. ह्याच त्यांच्या उपयुक्ततेचा पुरावा आहे. गेल्या दहाअकरा वर्षांचा काळ हिंदुस्थानांत बऱ्याच धामधुमीचा व क्रांतीचा गेला. त्यामुळे हिंदुस्थानची प्रगती झाली की हिंदुस्थानचें पाऊल मागें पडलें, या प्रश्नाची चिकित्सा करण्याचें हें स्थळ नव्हे. हिंदुस्थानांत या अवधींत गेल्या शंभरदीडशें वर्षांत झाली नव्हती तेवढी जागृती झाली व देशाकरिता कष्ट सहन करणें, स्वार्थत्याग करणें अत्यंत

आवश्यक आहे या गोष्टी लोकांना कळूं लागल्या, हें कोणालाही नाकबूल करितां येण्यासारखें नाही. ही स्थिती प्राप्त करून देण्याला या राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचा अत्यंत उपयोग झाला. अशा प्रकारचा उपयोग व्हावा, म्हणूनच या संस्था मुख्यतः स्थापन करण्यांत आल्या होत्या.

### *'राष्ट्रीय' शिक्षणांतील नुकसान*

या चळवळींत कॉलेजमधून निघालेल्या विद्यार्थ्यांपैकी बरेच पुन्हा परत कॉलेजला गेले आणि आपापला अभ्यासक्रम पुरा करून डॉक्टर, वकिली, सरकारी किंवा खासगी नोकऱ्या व कांही स्वतंत्र धंदा करून आपला संसार चालवीत आहेत. पण कित्येकांनी तेव्हापासून आपल्याला कॉंग्रेसच्या कामाकरिता वाहून घेतलें व कित्येक इतर सार्वजनिक कामें करीत आहेत. कित्येकांची 'इदं च नास्ति परं न लभ्यते' असें होऊन नुकसानही झालें असेल. पण जे कामांत आहेत त्यांच्यासंबंधाने बोलवयाचें तर त्यापैकी पुष्कळांनी उत्तम प्रकारची कामगिरी करून दाखविली असेंच कबूल करावें लागेल. त्यापैकी बऱ्याच लोकांशीं माझा संबंध येतो; पण आपण आपला अभ्यासक्रम सोडून या कामांत पडल्याबद्दल पश्चात्ताप करीत असलेले त्यांमध्ये कोणीच नाहीत, हें माझ्या अनुभवावरून मी सांगतों. उलट पुष्कळांना आपण कृतार्थ झालों असें वाटत असून, आपलें राहिलेलें आयुष्य देशाच्या सेवेंतच खर्ची पडावें असें वाटतें. पण हातीं कांही काम न घेतां व कोणत्याही राष्ट्रीय कामांत न पडतां ज्यांचें नुकसान झालें व ज्यांना पश्चात्ताप वाटतो त्यांची वाट काय?—हा एक प्रश्न राहतो. माझ्या मतें अशा लोकांनी आपला अभ्यासक्रम सोडावयाला नको होता. केवळ भावनेला वश होऊन कोणीं चळवळींत पडूं नये, असें आम्ही आमच्या भाषणांत वारंवार बजावीत होतों. म्हणून नैतिक दृष्ट्या अशा लोकांच्या नुकसानीची जबाबदारी पुढाऱ्यांवर येत नाही. शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालणाऱ्यांनी विचार करूनच तसें करावयाला पाहिजे होतें. असो. अशा प्रकारच्या मोठ्या राष्ट्रीय चळवळींत या गोष्टी घडावयाच्याच. त्याला नाइलाज आहे. कांही लोकांचें नुकसान होणारच. म्हणून इतर दृष्टींनी अशा चळवळी इष्ट व देशहिताच्या असल्यास त्या अंमलांत आणण्याला पुढाऱ्यांनी कचरूं नये, असें मला वाटतें. इतकी जबाबदारी पुढाऱ्यांनी घेतल्याखेरीज कोणतीही मोठी चळवळ यशस्वी होणार नाही.

### *वकिलीवर बहिष्कार व खादीप्रचार*

विद्यार्थ्यांच्या चळवळीबरोबरच वकिलांनी वकिली सोडावी म्हणून आमच्या प्रांतांत आम्हीं प्रयत्न केला. वर्षापुरती म्हणून बेळगाव जिल्ह्यांतील बऱ्याच वकिलांनी वकिली सोडली. पण वकिलांच्या बाबतींत चांगला अनुभव आला नाही. एक वर्षपर्यंत वकिली सोडण्याचें ज्यांनी कबूल केलें

होतें त्यांपैकी बऱ्याच लोकांनी धूर्तपणा दाखवून आपलें फारसें नुकसान होऊं दिलें नाही. एक वर्षपर्यंत वकिली सोडावयाची याचा अर्थ त्या मुदतींत नवीं कामें घ्यावयाचीं नाहीत असा करण्यांत आला. पण हळूहळू हा अर्थही आपल्या सोईला पडेल त्याप्रमाणे लावण्याचा कित्येकांनी धूर्तपणा लढविला. प्रामाणिकपणाने वकिली सोडणारे कांही होते. पण ज्यांना कामें पुष्कळ होतीं अशांपैकी वकिली सोडणारे अपवादात्मकच होते. पूर्वीच्या राजकारणांत वकिलांना बरीच प्रतिष्ठा होती, व त्यांच्या द्वारेंच सर्व कामें चालत असत. त्यामुळे त्यांचीच गणना पुढाऱ्यांमध्ये होत असे. प्रत्यक्ष स्वार्थत्यागाची त्यांच्यावर पाळी येतांच जनतेच्या अपेक्षेप्रमाणे ते पुढे आले नाहीत. त्यामुळे समाजांत त्यांची पूर्वीची प्रतिष्ठा कमी झाली. त्यामुळे कित्येक वकिलांना वाईट वाटूं लागलें. या चळवळींवर केव्हा उघडपणें व केव्हा प्रच्छन्नपणें त्यांनी हल्ले चढविण्याला प्रारंभ केला. १९२० सालापासूनच्या राष्ट्रांतील अनेक घडामोडी, व वकीलवर्गाचा त्यांच्याशीं असलेला संबंध, हा इतिहास बराच बोधप्रद आहे.

प्रकरण अठरावें

# माझा तुरुंगवास

***कर्नाटकांत खादीप्रचार सोपा***

या दोन चळवळींखेरीज खादीप्रसार, दारूबंदी, परदेशी कापडावरील बहिष्कार, पिकेटिंग वगैरे चळवळी देशांत चालू होत्या. कर्नाटकांत चरखा अगदींच लुप्त झाला नव्हता. बेळगाव, विजापूर जिल्ह्यांत कांहीं खेड्यांत हातसुताचें, कापड वापरणारे लोक 'लिंगायत धर्मात हातसुताचें हातमागावरील, लिंगायत विणकऱ्यांनीच विणलेलें कापड (म्हणजे शुद्ध खादी) त्या धर्माची दीक्षा घेतलेल्यांनी वापरली पाहिजे' असा नियम असल्याचें सांगतात. त्यामुळे चरख्याला एक प्रकारची धार्मिक पवित्रता आली होती. म्हणून तो अगदींच नाहीसा झाला नव्हता. महाराष्ट्रांत मराठे लोकांत रहाट फिरवणें हा कमी प्रतीचा धंदा समजला होता. "आमच्या घराण्यांत रहाट अन पाट नाही" असें अभिमानाने सांगणारीं बरींच घराणीं प्रथमप्रथम महाराष्ट्रांत मला आढळलीं. पुढे ती स्थिती पालटली. ती स्थिती कर्नाटकांत नव्हती. त्यामुळे खादीच्या चळवळीला कर्नाटकांत बराच जोर आला. आतापर्यंत ती चळवळ टिकून आहे. महाराष्ट्रांत खादीची पैदास होते, पण ती करणारे बहुतेक लोक चांदा जिल्ह्यांतील व त्याला लागून असलेल्या मोंगलाईतील भागापैकी तेलगू लोक आहेत. खास मराठे लोक हें काम करणारे फार नाहीत. कर्नाटकाचा कापूस लांब धाग्याचा आहे व जमीन बरीच सुपीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बायकांना पुष्कळ सवड असते. त्यांचेकडून पंधरा-वीस नंबरपर्यंतचें सूत सहज कातलें जातें. खेडोपाडीं विणकर लोकांची संख्याही पुष्कळ आहे. त्याकारणाने खादीच्या पैदाशीला हा प्रांत बराच अनुकूल आहे. त्या कामीं मीं स्वतः पुढे १९२४ सालपासून बराच प्रयत्न केला आणि मला यशही त्या मानाने पुष्कळच मिळालें.

## धारवाडांतील गोळीबार

दारूगुत्त्यापुढे पिकेटिंग करण्याचें काम सार्वत्रिक चालू होतें. त्याप्रमाणे धारवाडास एका दुकानापुढे नेहमीप्रमाणे पिकेटिंग चालू असतां तेथे एका पोलीस अंमलदाराची व पिकेटिंग करणाऱ्या कांही इसमांची बोलाचाली होऊन गोळीबारापर्यंत प्रसंग आला आणि गोळ्यांनी तीन माणसें मृत्युमुखीं पडलीं. मी त्या वेळीं बेळगावास होतों. प्रांतिक काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष मी असल्याने मला घडलेल्या हकीकतीची तार आली. तार मिळतांच मी मोटारीने धारवाडास गेलों. गोळीबारामुळे लोकांत बराच क्षोभ पसरला होता. मेलेले तिघेही मुसलमान होते. त्यांची स्मशानयात्रा मोठ्या प्रमाणावर निघाली. मीही बरोबर होतों. त्यांचा दफनविधी झाल्यानंतर या बाबतींत पुढे काय करावें याचा विचार करण्याकरिता धारवाडची पुढारी मंडळी एकत्र जमली. बेळगावहून बेळवी हेही आले होते. धारवाडला त्या वेळीं पेंटर हे कलेक्टर होते. ते बेफिकीर वृत्तीने व अरेरावीने वागणारे अंमलदार होते. पण कामांत जाणूनबुजून अन्याय करण्याकडे त्यांची प्रवृत्ती नव्हती. त्यांच्या तुसड्या स्वभावामुळे ते अप्रिय झाले होते. त्यामुळे या गोळीबाराचा प्रसंग त्यांच्याच प्रोत्साहनाने घडून आला, अशी धारवाडच्या मंडळींची समजूत होती. त्याचप्रमाणे या बाबतींत चळवळींत सामील असणाऱ्या पुष्कळ प्रमुख लोकांवर खोटे खटले भरण्याचा त्यांचा विचार आहे, अशीही समजूत झाली होती. या दोन्ही कल्पनांना फारसा आधार होता असें नाही. तथापि धारवाडच्या बहुतेक मंडळींची तशी खात्री होती ही गोष्ट खरी. त्या वेळीं धारवाड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विनायकराव जोशी (रिटायर्ड एज्युकेशनल इन्स्पेक्टर) हे होते. यांनी आपल्या रावबहादुरीच्या पदवीचा त्याग केला होता. त्यांच्या सहीने मुंबईच्या गव्हर्नरांकडे एक तार पाठवण्यांत आली. धारवाडच्या कलेक्टरांच्या व पोलिसांच्या संगनमताने गोळीबाराचा प्रसंग घडला व पुढे खोटे खटले भरण्याचा त्यांचा विचार आहे वगैरे अर्थाचा मजकूर त्या तारेंत होता. तशाच प्रकारच्या तारा 'मुंबई क्रॉनिकल' पत्राला पाठविल्या. 'क्रॉनिकल' पत्राने आपला एक बातमीदार मुद्दाम धारवाडास पाठविला. या बातमीदारानेही जोशांच्या तारेला अनुकूल अशीच बातमी पाठविली. इकडे धारवाडास बऱ्याच काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यांत आली व त्यांच्यावर जाळपोळ करणें, गर्दी व मारामारी करणें वगैरे आरोपांवर खटले भरण्यांत आले. लिंगायतांत व ब्राह्मणांत द्वेष असल्यामुळे व आरोपींमध्ये बरेच प्रमुख ब्राह्मण कार्यकर्ते असल्यामुळे पुरावा तयार करण्याचें काम सोपें झालें. गोपाळराव देशपांडे, हणमंतराव देसाई, दिवाकर, मुदवेडकर कृष्णराव व व्यंकटराव, गुत्तल वगैरे प्रतिष्ठित ब्राह्मण मंडळी व कांही मुसलमान पुढारी यांच्यावर काम चाललें. ज्या पोलीस अंमलदाराच्या हुकमाने गोळीबार झाला त्याच्याकडेच मुख्यतः पुराव्याचें काम देण्यांत आलें. गोळीबार करणें न्यायाचें होतें असें गृहीत धरूनच सर्व चौकशीची उभारणी करण्यांत आली.

दक्षिण भागाचे कमिशनर व मुंबई सरकारचे होम मेंबर हेवर्ड हे धारवाडास येऊन चवकशी करून गेले. पण त्यांनी धारवाडच्या स्थानिक अधिकाऱ्यांचीच बाजू घेतली असावी. कारण धारवाडास चाललेल्या गोंधळाला कोणत्याही प्रकारचा आळा बसला नाही. रीतीप्रमाणे मॅजिस्ट्रेटपुढे चवकशी होऊन सेशन कोर्टांत खटला कमिट करण्यांत आला. आरोपींनी खटल्यांत भाग घेण्याचें नाकारलें. फक्त आपले जबाब त्यांनी दिले, यापेक्षा कांही केलें नाही.

### कॉंग्रेसतर्फे चौकशी

हा खटला चालू असतां मुंबईस ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी भरली होती. त्या वेळीं धारवाडच्या गोळीबाराचा प्रश्न मीं कमिटीपुढे आणला होता व कॉंग्रेसतर्फे कमिटी नेमण्यांत येऊन या प्रकरणाची चवकशी व्हावी अशी सूचना आपली. ती मान्य होऊन एक चवकशी कमिटी नेमण्यांत आली. अब्बास तय्यबजी वगैरे मंडळी त्या कमिटींत होती. पुढाऱ्यांपैकी कोणी तरी धारवाडास जाऊन अटकेंत असलेल्या आरोपींना भेटून आल्यास त्यांना बरें वाटेल, असें मी गांधीजींना सांगितलें. त्यांनी माझें म्हणणें मान्य करून लाला लजपतराय व शौकतअली यांना धारवाडास पाठविलें. त्यांच्याबरोबर मीही होतों. बेळगावास एक मुक्काम करून दोघांचींही भाषणें झालीं. धारवाडासही व्याख्यानें झालीं. तुरुंगांत सर्व आरोपींच्या भेटी घेतल्या. लालाजी व शौकतअली यांनी आरोपींबरोबर बोलूं नये, या अटीवर भेटीची परवानगी मिळाली होती. त्याप्रमाणे ते आरोपींबरोबर बोलले नाहीत. पण मीं त्यांच्या येण्याचा उद्देश व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीने नेमलेल्या चवकशी कमिटीची माहिती त्यांना सांगितली. त्यामुळे सर्व आरोपींना बरें वाटलें.

सेशन कोर्टांत खटल्याचा निकाल होऊन दिवाकर, गोपाळराव देशपांडे, हणमंतराव देसाई दोषमुक्त होऊन सुटले. कृष्णराव मुदवेडकर हे दंग्याच्या वेळीं धारवाडहून २१ मैल अंतरावर असलेल्या हल्याळ गावीं व्याख्यान देण्यांत गुंतले होते, असा पोलिसांच्या दप्तरीं दाखला मिळाल्यामुळे त्यांच्यावरील खटला पोलिसांनी काढून घेतला! बाकीच्या सर्वांना एका वर्षापासून तीन वर्षांपर्यंत सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. विनायक जोशांची पेनशन बंद करण्यांत आली. मुंबई क्रॉनिकलवर पेंटर यांनी व पोलीस अंमलदारांनी मुंबई हायकोर्टांत अब्रूनुकसानीचा दावा मांडला आणि या प्रकरणीं बरीच मोठी रक्कम क्रॉनिकलला भूर्दंड म्हणून द्यावी लागली. कॉंग्रेस कमिटीने साक्षीपुरावा घेऊन गोळीबार करण्याला कांही कारण नव्हतें, असा रिपोर्ट केला. पेंटरविरुद्ध तक्रार केली नसती तर या प्रकरणाला निराळें स्वरूप आलें असतें असें म्हणतात.

हें प्रकरण चालू असतां फिर्यादीतर्फे एका पोलीस अंमलदाराची साक्ष व्हावयाची होती. हे नुकतेच नोकरीवर लागले असल्यामुळे अद्यापि खात्यांत चांगले मुरले नव्हते. त्यांच्यावर आपल्या साक्षींत बऱ्याच निराधार व सत्याला सोडून अशा कांही गोष्टी

स्थळप्रत.
अनुक्रम

सांगण्याचा प्रसंग आला होता. त्या वेळीं या खटल्यासंबंधानें मीं धारवाडला गेलों होतों. विजापूरचे श्रीनिवासराव कौजलगीही आले होते. आम्हांकडे हे गृहस्थ एके दिवशीं आले व आपल्याकडून दिवाकरांसारख्या सत्यप्रिय व सत्त्वशील मनुष्याविरुद्ध खोटें सांगण्याचा प्रसंग आला आहे व तसें मीं केल्यास माझ्याकडून पाप घडणार आहे, असें सांगून या अडचणीच्या प्रसंगीं काय करावें, असें विचारूं लागले. खरी हकीकत सांगून येईल त्या प्रसंगाला तयार राहण्याचा सल्ला आम्हीं दिला. नोकरीला राजीनामा देण्याचा निश्चय केल्याचें त्यांनी आम्हांला कळविलें; पण पुनः बुद्धि फिरली व रीतीप्रमाणें त्यांची साक्ष झालीच ! दिवाकरांना जज्जांनीच दोषमुक्त करून सोडलें हा प्रश्न स्वतंत्र आहे.

### अपुरा दौरा पूर्ण

१९२० सालीं महात्माजींचा कर्नाटकचा दौरा पुरा झाला नव्हता. गदगहून त्यांना सांगलीला जावें लागलें त्यामुळे विजापूर जिल्ह्याचा दौरा तहकूब करण्यांत आला होता. तो तहकूब केलेला दौरा १९२१ सालीं पुरा करण्यांत आला. त्या वेळीं मी महात्माजींबरोबर होतों. प्रथम गांधीजी बागलकोटला आले व तेथे सभा वगैरे झाल्या. तेथून आम्ही विजापूरला गेलों. बागलकोट ते विजापूरचा प्रवास मोटारीने केला. वाटेंत रस्त्यावर भर उन्हांत बायका खडी फोडण्याचें काम करीत होत्या. तें पाहून त्यांना वाईट वाटलें. खादीच्या प्रचाराने अशा प्रकारच्ीं कामें करण्याचा प्रसंग बायकांवर येणार नाही असें तें म्हणाले. विजापूरचा कार्यक्रम आटपून ते सोलापूर-कडे गेले व मी परत वेळगावला आलों.

### बेझवाडा येथील कॉंग्रेस

कॉंग्रेसमध्ये ठराव पास करून स्वस्थ बसण्याचे दिवस नागपूर कॉंग्रेसपासून गेले होते. पास झालेले ठराव अंमलांत आणण्याचें काम वर्किंग कमिटी व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीकडे होतें. याकरिता झालेल्या कामाचा आढावा काढून पुढील कामाची व्यवस्था करण्याकरिता बेझवाडा येथे ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी बोलावण्यांत आली होती. तात्यासाहेब केळकर व मी मिळूनच बेझ-वाड्याला गेलों होतों व दोघांची उतरण्याची सोय एका वकिलाकडे केली होती. आंध्र प्रांतांत असहकाराच्या चळवळीमुळे बरीच जागृति झाली होती. त्यामुळे बेझवाड्याला सर्व आंध्र प्रांतांतून हजारों लोक जमले होते. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत लो. टिळकांचें स्मारक म्हणून 'टिळक स्वराज्य फंड' काढण्यांत यावा व तो एक कोटी रुपयांपर्यंत जमवावा, हा एक महत्त्वाचा ठराव मंजूर करण्यांत आला. त्याचप्रमाणे पन्नास हजार चरखे व पन्नास लाख कॉंग्रेसचे सभासद कॉंग्रेसने मिळविणें हीं कामें करण्याचें ठरलें. म. गांधींना वेळेचें महत्त्व फार वाटत असल्यामुळे हा सर्व कार्यक्रम पुरा कर-ण्याची मुदत ही निश्चित ठरवण्यांत आली. अशा प्रकारें ही महत्त्वाची सभा झाल्यानंतर

प्रत्येक प्रांतांत हा कार्यक्रम पुरा करण्याकरिता मुख्य मुख्य कार्यकर्ते कामाला लागले. आमच्या प्रांतांत मीं एक मोठा दौरा काढला व प्रत्येक जिल्ह्यांतील मुख्य मुख्य ठिकाणीं हिंडलों. टिळक स्वराज्य फंडाची रक्कम आमच्या प्रांतांत ४४००० रुपये जमली. चरख्याचा प्रसारही पुष्कळच झाला. कॅांग्रेस सभासदांची संख्या कांही लाखांवर झाली. हा काळ या कार्यक्रमामुळे अत्यंत धामधुमीचा असा गेला. आता मला व्यवहारापुरतें कानडी बोलतां येऊं लागलें असल्यामुळे माझीं सर्व भाषणें कानडींतच झालीं. टिळक स्वराज्य फंडापैकी ११००० रुपये ऑल इंडिया कॅांग्रेस कमिटीकडे पाठविण्यांत आले.

### *असहकारितेचा प्रचार*

जून महिन्यांत गोकाक येथे 'बेळगाव जिल्हा सभा' विजापूरचे श्रीनिवासराव कौजलगी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्याच वेळीं तेथेच बेळगाव जिल्ह्याची खिलाफत परिषदही भरविण्यांत आली होती. या दोन्ही परिषदांकरिता अलीबंधू व डॉ. किच्लू आले होते. खिलाफत कॉन्फरन्सकरिता सिमल्याचे कोणी मौलवी आले होते. जिल्हा सभेंत कॅांग्रेसच्या ठरावांना अनुसरूनच ठराव पास करण्यांत आले. खिलाफत कॉन्फरन्समध्ये एक महत्त्वाचा ठराव पास करण्यांत आला. तो म्हणजे इंडियन रिपब्लिक संबंधाचा. स्वतः महमदअलींनी हा ठराव मांडला होता. पुढे कराचीला जी खिलाफत कॉन्फरन्स झाली त्या वेळींही हाच ठराव पास करण्यांत आला आणि त्याबद्दल अलीबंधू, शंकराचार्य द्वारकापीठ, किच्लू वगैरे मंडळीवर खटले होऊन शिक्षा झाल्या. गोकाकहून अलीबंधू बेळगावला आले. आणि बेळगावास म्युनिसिपालिटीने त्यांना मानपत्रें दिलीं. बेळगाव म्युनिसिपालिटीने राष्ट्रीय पुढाऱ्यांना मानपत्रें देण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. माझे स्नेही पोतदार यांनी हीं मानपत्रें वाचलीं होतीं.

रत्नागिरी जिल्हा परिषद चिपळूण येथे १९२१ च्या एप्रिल महिन्यांत माझ्या अध्यक्षतेखाली भरली होती. या परिषदेला काका कालेलकर माझ्याबरोबर आले होते. त्याचप्रमाणे पुण्याहून कांही मंडळी आली होती. त्यांत तात्यासाहेब करंदीकर (केसरीचे संपादक) हेही होते. एकमताने नागपूरचा ठराव या परिषदेंत मंजूर झाला.

धारवाड जिल्हा परिषद माझ्याच अध्यक्षतेखाली नवलगुंद येथे भरली होती. ध्येयाकरिता वाद करीत बसण्यापेक्षा ध्येय साध्य करून घेण्याच्या साधनाकडे विशेष लक्ष देणें जरूर आहे, असें मीं प्रतिपादन करून अहिंसात्मक असहकार हाच उत्तम उपाय आहे असें तेथें म्हटलें होतें. त्याचप्रमाणे या साधनाने आमचें ध्येय साध्य न झाल्यास करबंदीची चळवळ हातीं घेण्याचा प्रसंग येईल, असें भाषणाच्या ओघांत मी बोलून गेलों होतों. धारवाडच्या गोळीबाराच्या प्रकरणाचा उल्लेख करून पेंटर कलेक्टरवर खूप टीका केली होती. पेंटर त्या वेळीं खूप चिडले होते. अर्थात माझ्या भाषणामुळे त्यांना जास्ती राग आला असावा. म्हणून त्यांनी माझ्यावर राजद्रोहाचा खटला

भरण्याकरिता (१२४ अ कलमाखाली) सरकारची मंजुरी मागितली. याच सुमारास कराचीची खिलाफत परिषद भरून त्यांत हिंदुस्थानाच्या सैन्यांतील लोकांनी व पोलिसांनी आपल्या नोकऱ्या सोडाव्या, अशी त्यांना विनंती करण्यांत आली होती. वर लिहिल्याप्रमाणे इंडियन रिपब्लिकचा ठरावही पास करण्यांत आला होता. त्याबद्दल अल्लीबंधू वगैरेंवर खटले भरण्यांत येऊन त्यांना अटक करण्यांत आली होती. गांधीजी त्या वेळीं मद्रास इलाख्यांत दौऱ्यावर होते असें आठवतें. ते मुंबईस आले व त्यांनी कांही प्रमुख कार्यकर्त्यांना मुंबईस बोलाविलें. मलाही आमंत्रण होतें, व त्याप्रमाणे मी मुंबईस गेलों होतों. लाला लजपतराय, जयकर वगैरे मंडळी खासगी सभेला हजर होती. त्या वेळीं ज्या कराची परिषदेच्या ठरावासंबंधाने अल्लीबंधूंवर खटले झाले होते त्या ठरावाबद्दल चर्चा झाली, आणि लष्करी व पोलीस लोकांनी नोकऱ्या सोडण्याबाबतचा तो ठराव मान्य असल्याबद्दल जाहीरनामा काढावा व त्या प्रकारचे ठराव देशभर सार्वजनिक सभा भरवून पास करण्यांत यावेत असें ठरलें. जाहीरपत्रकाचा मसुदा तयार होऊन त्याच्यावर हजर असलेल्या सुमारें चाळीस गृहस्थांच्या सह्या झाल्या. त्यांत बॅरिस्टर जयकर हेही होते. या जाहीर पत्रकांत विनंती केल्याप्रमाणे देशांतील मुख्य मुख्य ठिकाणीं मोठ्या सभा भरून ठराव जसेच्या तसेच पास करण्यांत आले. सरकारने जाहीर पत्रक काढणाऱ्यांवर किंवा इतर कोणावर खटले भरले नाहीत. या मुंबईच्या सभेला गांधीजी टोपी, पैरण घालण्याचें टाकून हल्लीप्रमाणे एक लहानसा पंचा नेसून आले होते. मद्रास इलाख्यांत दौऱ्यावर असतां तिकडील लोकांची कंगाल स्थिती पाहून त्यांच्या मनावर परिणाम झाला व त्यानी हा हल्लीचा पेहराव पत्करला. तेव्हापासून आतापर्यंत तो कायम आहे.

### माझ्यावर १२४अ प्रमाणे खटला

या खासगी सभेकरिता मी मुंबईस असतांच माझ्यावर इंडियन पिनल कोडच्या १२४ अ कलमाप्रमाणे खटला भरण्यास मंजुरी मिळाली, अशी बातमी समजली. धारवाड जिल्हा सभेंत अध्यक्ष या नात्याने नवलगुंद येथे केलेल्या भाषणासंबंधाने हा खटला होता, हेंही मला कळलें होतें. गांधीजींना मीं ही हकीकत कळवली. त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरविला, व उत्तेजनपर दोन शब्द सांगितले. मुंबईहून मी पुण्यास आलों. गोविंदराव याळगींना बोलावून घेतलें. पुण्यास कांही खासगी कामानिमित्त मला चार दिवस राहण्याची आवश्यकता होती. गोविंदराव आले व त्यांनी वॉरंट बेळगावच्या पोलीस सुपरिंटेंडेंटकडे आल्याची नक्की हकीकत मला कळविली. त्यामुळे संशय तर राहिलाच नाही. पण पुण्यांतील काम आटोपण्यापूर्वी अटक झाल्यास काम तसेंच पडून राहील, म्हणून काय करावें, या विचारांत मी होतों. त्या वेळीं तात्यासाहेब केळकरांकडे मी उतरलों होतों. त्यांना ही हकीफत समजली व त्यांनी एक युक्ती काढली. "मला अटक करण्याबद्दलचें वॉरंट धारवाड मॅजिस्ट्रेट

कडून आल्याचें समजलें; पण कांही जरुरीच्या खासगी कामाकरिता पुण्यास चार दिवस राहण्याची जरुरी आहे. तोपर्यंत वाट पाहावी" अशी बेळगावच्या सुपरिंटेंडेंटच्या नावें बेधडक तार करून काय होतें तें पाहावें असें त्यांनी सुचविलें. त्याप्रमाणे मीं तार केली व गोविंदरावांना या बाबतींत समक्ष सुपरिंटेंडंटला भेटून ते काय करतात हें समजून घेऊन तार करण्याकरिता पाठवून दिलें. दुसरे दिवशीं गोविंदराव स्टेशनहून परस्पर पोलीससाहेबाकडे जाऊन भेटले. त्यांनी चार दिवस वाट पाहण्याचें ठरविल्याचें सांगितलें व गोविंदरावांची तशी तार मला आली. मीं पुण्यास राहून काम संपविलें. मी पुण्यास आहें ही हकीकत बेळगावच्या पोलिसांस कळतांच त्यांनी माझ्यावर नजर ठेवण्याची व्यवस्था पुण्याच्या पोलिसांकडून करविली होती. त्यामुळे केळकरांच्या घरासमोर सकाळ-पासून संध्याकाळपर्यंत पोलिसांपैकी कोणी ना कोणी बसून असे. माझ्या या पुण्याच्या मुक्कामांतच मुंबईस जो जाहीरनामा आमच्या सहीने निघाला होता त्याबद्दलची सभा होती. सभेला मी गेलों होतों व माझें भाषणही झालें.

### *बेळगावला गुप्त रीतीने आलों*

चार दिवसांची मुदत दुसऱ्या दिवशीं संपत होती. माझ्यावर खटला होणार ही हकीकत माझ्या मातुःश्रीला, बहिणीला, घरच्या मंडळीला कळून सर्व आप्तइष्ट बेळगावला आले होते. मला अटक होण्यापूर्वी मला भेटण्याची त्यांची इच्छा होती व मलाही त्यांना भेटावें असें वाटत होतें. पण रेल्वेने बेळगावास गेल्यास कदाचित स्टेशनावरच अटक झाल्यास त्यांची भेट होणार नाही, असें वाटून पुण्याहून बेळगावपर्यंतचा प्रवास गुप्तपणें मोटारीने करावा असें ठरविलें. ही गोष्ट गुप्त ठेवण्याचा हेतू इतकाच की, वाटेंत कोठेही अटक होऊं नये. पुण्याच्याच मोटारींतून गेल्यास कदाचित पुण्याच्या पोलिसांना पत्ता लागेल, म्हणून मुद्दाम साताऱ्याहून एक मोटार अगाऊ आणवून ठेवली होती. दुसऱ्या दिवशीं पहाटे पुण्याहून निघालों. बरोबर बाबूराव (श्री. दा. वि. गोखले), अंतूकाका फडणीस व पुंडलीकजी होते. साताऱ्यास दादासाहेब करंदीकर, भाऊसाहेब सोमण, डॉ. आठल्ये यांना मी त्याच दिवशीं जाणार होतों हें माहीत होतें. म्हणून गांवाबाहेर बेळगावच्या रस्त्याजवळ दादा-साहेबांचें एक घर आहे तेथे वाट पाहात ते सर्व बसले होते. अंदाजें ९ वाजतां या ठिकाणीं आम्ही पोंचलों. दादासाहेबांनी जेवणाची व्यवस्था केली होती. सणाचा दिवस असल्यामुळे पक्वान्नाचें जेवण होतें. जेवण करून तेथून निघालों. वाटेंत कराडजवळ श्री. पांडुअण्णा शिराळकर व कांही स्नेही भेटले.

आम्ही दोनप्रहरीं कोल्हापुरास पोहोचलों. १९१० सालापासून कोल्हापूरच्या हद्दींत तर मीं पायसुद्धा टाकला नव्हता, व या वेळींही कोल्हापुरास जाणें मला धोक्याचें होतें. तीच भीती बाबूरावांना होती. कोल्हापूर-बेळगाव रस्ता कोल्हापूरच्या हद्दींतून जातो, पण शहरांतून जात नाही. त्यामुळे आम्हांला काळजी करण्यासारखे कांही वाटलें नाही;

पण मोटार चालविणाऱ्याला रस्ता ठीक माहीत नसल्यामुळे बेळगावचा रस्ता सोडून कोल्हापूर शहराकडे जाणाऱ्या रस्त्याने त्याने मोटार नेली. बाबूराव कोल्हापूरचे राहणारे; पण त्यांच्याही ध्यानांत ही गोष्ट आली नाही. कोल्हापुरास सीमोल्लंघनाचा समारंभ मोठा होत असल्याकारणाने आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतील लोक दसऱ्याची स्वारी पाहण्याकरिता बायकामुलें घेऊन जात होते. त्यांना पाहून रस्ता चुकला असें वाटून, आम्हीं चवकशी केली, आणि पुन्हा मोटार फिरवून बेळगावच्या रस्त्यावर आणली. यांत आता कांही विशेष वाटत नाही. पण त्या वेळीं आम्हांला कोणी सरकारी लोक पाहतील व महाराजांना कळवतील तर आम्ही बेळगावच्या हद्दीपर्यंत जाणार नाही अशी भीती वाटली होती. महाराजांचा स्वभाव आम्हांला माहीत असल्यामुळे ही भीती अगदीच निराधार होती असें म्हणतां येणार नाही. बेळगावास गेल्यानंतर तरी तुरुंगाचाच रस्ता धरावयाचा होता; पण कोल्हापूरकरांच्या तावडींत सापडण्यापेक्षा इंग्रजांच्या कोर्टांत शिक्षा होणें हें आम्हांला जास्ती पसंत होतें.

कोल्हापूर सोडल्यानंतर कागल गाव लागतो. हा गावही कोल्हापूरच्या हद्दीपैकीच आहे. व रस्ता तर अगदी गावामधून जातो. हा रस्ता टाळणें शक्य नव्हतें. या रस्त्यावरूनच दसऱ्याची स्वारी निघाली होती. त्यामुळे भर रस्त्यावर आम्हांला मोटार थांबवावी लागली. माझ्यावर खटला होऊन वॉरंट निघाल्याची बातमी वर्तमानपत्रांतून जाहीर झाली होती. कागलास आमची मोटार थांबली त्या वेळीं बरेच लोक मोटारजवळ जमले. त्यांत कांही विद्यार्थी होते. त्यामुळे माझी ओळख धरून आपआपसांत ते कुजबुजूं लागले. कदाचित वॉरंट चुकविण्याकरिता आम्ही कोठे तरी जात आहोंत अशी त्यांची कल्पना झाली असल्यास नवल नाही. ते जवळ येऊन जास्ती निरखून पाहूं लागले, तेव्हा आम्हांला संशय आला, आणि केव्हा एकदा गावाबाहेर पडूं असें झालें. कागल-पासून आठदहा मैलांवर बेळगाव जिल्ह्याची हद्द लागते. तेथे पोचल्यानंतर आमची एक काळजी दूर झाल्याप्रमाणे आम्हांला वाटलें.

### *मला प्रत्यक्ष अटक झाली*

गांधीजींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या चळ-वळींत भाग घेण्याचे प्रसंग या दहाबारा वर्षांत अनेक वेळां आले. पण या पहिल्या प्रसंगीं ज्या मुख्य व मूलभूत तत्त्वावर गांधींनी चळवळ उभारली होती, तें बरोबर पटलें नव्हतें. त्यामुळे संकटें टाळतां आलीं तर टाळावींत, ही स्वाभाविक वृत्ती नाहीशी झाली नव्हती. म्हणूनच कोल्हापूरच्या हद्दीतून बाहेर पडल्यानंतर मनाला समाधान वाटलें. ही माझी झालेली मानसिक स्थिती स्पष्टपणें समजावी म्हणून वरील गोष्टी दिसण्यांत जरी क्षुल्लक असल्या तरी त्यांचा उल्लेख करण्याची आवश्यकता वाटली. असो. संकेश्वरजवळ गोविंदराव व आणखी दोनतीन स्नेही भेटले व त्यांनी पुढील बेत सर्व कळविले. त्याप्रमाणे फराळ वगैरे सर्व आटपून रात्रीं ८च्या सुमारास

बेळगावास पोचलों. घरीं जाऊन सगळ्यांच्या भेटी घेतल्या. त्या दिवशीं आईने स्वतः स्वयंपाक केला होता. जेवणखाण झाल्यानंतर बेळगाव शहर फौजदाराकडे मी आल्याची वर्दी देण्याकरिता गोविंदरावांना पाठविलें. दुसरे दिवशीं सकाळीं ९ वाजतां तयारींत असण्याबद्दल त्यांचा निरोप आला. दुसरे दिवशीं स्नान, जेवण वगैरे लवकरच आटपून पोलिसांची वाट पाहात बसलों होतों. इतक्यांत फौजदार आले व त्यांनी पोलीस सुपरिंटेंडंटच्या बंगल्यावर मला नेलें. तेथे धारवाडचे असिस्टंट पोलीस सुपरिंटेंडंट आपली मोटार घेऊन आले होते. बंगल्यावर मला वॉरंट दाखवण्यांत आलें व रीतीप्रमाणे धारवाडच्या असिस्टंट सुपरिंटेंडंटच्या ताब्यांत दिलें. लगेच मी व असिस्टंट पोलीस सुपरिंटेंडंट त्यांच्या मोटारींतून निघालों. मागोमाग बाबुराव गोखले, अंतूकाका फडणीस, गोविंदराव वगैरे मंडळी दुसऱ्या मोटारींतून निघाली. दोन प्रहरीं बारा-साडेबारा वाजण्याच्या सुमारास धारवाडास पोचलों. मला पोलीस सुपरिंटेंडंटच्या बंगल्यावर प्रथम नेण्यांत आलें व त्यांच्या हुकमाने माझी तुरुंगांत रवानगी झाली. धारवाड गोळीबाराच्या खटल्यांतील आरोपींना भेटण्याकरिता दोनतीन वेळां धारवाडच्या तुरुंगांत जाण्याचा प्रसंग मला आला होता. त्यामुळे तुरुंग ही अनोळखीची जागा वाटली नाही. रीड या नावाचे एक इंग्रज गृहस्थ जेल सुपरिंटेंडंट होते. विकूहॅम (हे हल्ली ठाण्यास जेल सुपरिंटेंडंट आहेत) हे जेलर होते. मला एका प्रशस्त कोठडीमध्ये ठेवण्यांत आलें. बाहेर कंपाउंडही चांगलें होतें. मी एवढ्या मोठ्या जागेंत एकटाच असल्याने रात्रीं व दिवसा एक पहारेकरी शिपाई माझ्यावर ठेवण्यांत आला होता. दुसरे दिवशीं पहिला वर्ग मॅजिस्ट्रेटपुढे खटल्याला सुरुवात झाली. कांही साक्षी झाल्यानंतर खटला सेशन कोर्टाला कमिट करण्यांत आला. उलटतपासणी करण्याचें काम मीं केलें नाही. फक्त एक लहानसा जबाब मात्र दिला. सेशनमध्ये मुदत थोडी लांबची पडली, म्हणून बाबुराव गोखले वगैरे मंडळी परत पुण्यास गेली. सेशन कोर्टांत खटला सुरू होण्याच्या पूर्वी पुष्कळ मंडळी मला भेटावयाला आली होती. जेलच्या अधिकाऱ्यांनी सर्व सवलती दिल्या होत्या. नवलगुंदच्या भाषणांतील कोणकोणत्या वाक्यांवर फिर्यादीची उभारणी करण्यांत आली होती याची माहिती मॅजिस्ट्रेट कोर्टांत मिळाल्यामुळे एक तपशीलवार जबाब देऊन, ज्या गोष्टी मला कबूल होत्या त्याबद्दल स्पष्टीकरण करून, त्या राजद्रोहाच्या व्याख्येंत येत नाहीत हें दाखवावें आणि ज्या नाकबूल आहेत त्या नाकबूल आहेत असें स्पष्ट म्हणावें, असा विचार माझ्या मनांत आला. वकील देऊन अथवा स्वतः खटला चालवून बचावाचा प्रयत्न करावा हा विचार मनांत आला नाही. स्वतः सेशन जजांनी आपल्या शिरस्तेदाराच्या मार्फत धारवाडास माझे जामात राहात होते त्यांना बोलावलें होते, आणि वकील देऊन खटला चालवण्याची सूचना केली. माझ्या कित्येक स्नेह्यांनीही असेंच सुचविलें होतें. पण या बाबतींत माझा निश्चय पूर्वींच झाला होता.

कराचीच्या खटल्यांत अलीबंधूंवर १२४ अ कलमाखाली खटला भरण्यांत आला होता; पण पुढे सरकारी वकिलांनी हा आरोप काढून घेतला, अशी हकीकत मला तुरुंगांत समजली होती. त्यांचें भाषण माझ्या भाषणापेक्षा कडकच झालें असलें पाहिजे अशी माझी समजूत होती. कारण हिंदुस्थानांत Republic स्थापण्याच्या ठरावावरचें तें भाषण होतें. महमदअलींचें याच ठरावावरील त्यांनी गोकाक येथील खिलाफत परिषदेपुढे केलेलें भाषण मीं ऐकलें होतें. मी कडक भाषणें पुष्कळ केलीं होतीं. पण नवलगुंदचें भाषण त्या मानानें अगदीच पिचपिचीत होतें. पेंटरसाहेबांवर मीं टीका केली नसती तर माझ्यावर या भाषणाकरिता खटलाही झाला नसता. माझ्या भाषणांतील ज्या वाक्यांवर खटला करण्यांत आला होता त्यापेक्षा अली-बंधूंचीं भाषणें जास्ती कडक होतीं, तरी सरकारनें खटला काढून घेतला हें कोर्टाच्या नजरेस आणण्याच्या उद्देशानें मीं त्यांच्या भाषणाच्या नकला मागितल्या आणि त्याबद्दल मुंबई सरकाराकडे तार केली. या नकला मिळाल्या असत्या तर त्यांचा उपयोग मीं केलाच असता असें नाही, व करूनही त्यापासून मला फायदा मिळाला नसता अशी माझी खात्री होती. तथापि सरकारचें धोरण कसें अन्यायी असतें हें दाखविण्याला त्याचा उपयोग झाला असता असें मला वाटलें म्हणून मीं तार केली होती. त्याच दिवशीं बेळगावच्या तार ऑफिसांतून ही बातमी गोविंदरावांना कळली. लागलीच ते मला येऊन भेटले, व डिफेन्सची मी तयारी करतों की काय याबद्दल त्यांनी चवकशी केली. मीं त्यांना माझा काय हेतू होता हें सांगितलें. पण त्यांनी इतकेंदेखील मीं करूं नये असें मला बजावून व आग्रहानें सांगितलें. त्याचा परिणाम माझ्यावर झाला व माझ्या निश्चयांत जास्ती भर पडली. फिर्यादींत जीं वाक्यें नमूद करण्यांत आलीं होतीं तीं जशींच्या तशीं खरीं मानलीं तरी त्यांच्या आधारावर १२४ अ कलमाखाली खटला शाबीत झाला नसता, असें मला वाटत होतें. म्हणून मीं एक विस्तृत जबाब तयार केला होता. करबंदीची चळवळ पुढेमागे हिंदुस्थानांत होईल असें मीं म्हटलें होतें, ही गोष्ट खरी आहे. याच माझ्या विधानावर फिर्यादीची विशेष भिस्त होती. पण अशा प्रकारें भविष्यकालांतील एखादी गोष्ट सांगणें हा कांही गुन्हा होत नाही. स्वतः नामदार गोखल्यांनी आपल्या एका भाषणांत करबंदीची चळवळ ही सनदशीर आहे असें प्रति-पादन केलें होतें. माझ्या जबाबाची एक नक्कल पुण्यास मीं तात्यासाहेबांकडे पाठवली होती. त्यांनी ती पाहून कांही दुरुस्त्या सुचविल्या होत्या. त्या वेळीं हल्लीप्रमाणे तुरुंगांत जाणें हें सर्रास झालें नव्हतें. त्यामुळे अशा खटल्यांना महत्त्व येत असे. आरोपीचे जबाब म्हणजे लहानशीं व्याख्यानेंच अशा स्वरूपाचे असत. चळवळीचा प्रसार करण्याचें तें एक साधनच असें समजण्यांत येई. या समजुतीला अनुसरून मीं जबाब लिहिला होता. त्याचा उपयोग होऊन मी सुटल्यास मला तें नको होतें असें मात्र नव्हतें.

फायदा मिळाल्यास घ्यावा असेंच वाटत होतें. त्याच धोरणाने जबाब लिहिला होता. त्या जबाबाचें मला आज आठवण होऊन हसूं येतें.

## उलटतपासणीचा अनावर मोह

वॉटरफील्ड या नावाचे सेशनजज्ज होते. मला त्यांनी कोर्टांत सभ्यपणाने वागविलें. पाच-चार साक्षी झाल्या. त्यांच्या साक्ष देण्याच्या पद्धतीवरून त्यांना पढवून तयार करून आणल्याचें कोणालाही समजून आलें असतें. मीं स्वत: जरी त्यांची थोडीशी उलटतपासणी केली असती, तरी त्यांच्या साक्षीच्या बनावटपणाचें माप त्यांच्या पदरांत सहज घातलें असतें. एका साक्षीदाराची सरतपासणी झाल्यानंतर मला मोह आवरला नाही व एकदम उठून उलटतपासणीला सुरुवात केली. हा सवयीचा परिणाम असावा किंवा अशा क्षुल्लक व शुष्क पुराव्यावर रचलेल्या खटल्याची कंबर मोडून सुटण्याचा फायदा मिळाल्यास तो कां घेऊं नये असेंही वाटलें असेल. आता माझी त्या वेळीं काय मनोवृत्ती झाली होती हें नक्की सांगवत नाही. तथापि वर नमूद केलेली कल्पना माझ्या मनांत आलीच नसेल, असें मला वाटत नाही. खटल्याचें काम चालल्यावेळीं बाबुराव गोखले व गोविंदराव याळगी दोघेही माझ्यासमोर जवळच बसले होते. त्यांच्याकडे माझी नजर गेली. त्यांच्या चेहऱ्यावरून मी करतों हें गैर आहे असें त्यांना वाटत असावें असें मला वाटून मीं उलटतपासणी एकदम बंद केली व खाली बसलों. जज्जांनादेखील आश्चर्य वाटलें असावें. साक्षीपुराव्याचें काम संपल्यानंतर माझा जबाब मीं वाचून दाखविला. एक प्रत सही करून कोर्टांत दाखल केली. सरकारी वकील डेक्कन कॉलेजांतील माझे सहाध्यायी कट्टी हे होते. माझ्या जबाबांतील मुद्द्यांवर त्यांनी उत्तर दिलें नाही. फक्त कोर्टासमोरील पुरावा विश्वसनीय आहे व त्या योगाने आरोप शाबीत होतो, इतकेंच सांगून ते आपल्या जागेवर बसले. दोन असेसरांच्या मदतीने हा खटला चालला होता. दोघांनीही मी निर्दोषी आहें म्हणून आपलें मत दिलें. जज्ज थोड्याशा गोंधळांत पडल्याप्रमाणे दिसले. परंतु निकाल सांगण्याची मुदत एक आठवड्यावर ढकलली. आठवड्यानंतर निकाल दिला व माझें वय लक्षांत घेऊन सहा महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा फर्मावली. त्याच दिवशीं डॉ. हर्डीकर अमेरिकेहून परत आले होते. त्यांच्याबरोबर व इतर मित्रमंडळीबरोबर बोलण्याची मीं परवानगी घेतली व सर्वांचा निरोप घेतला.

## विजापूरच्या तुरुंगांतील वास्तव्य

धारवाडच्या तुरुंगांत आठदहा दिवस राहावें लागलें. खटला चालू असतां घरून जेवण येत होतें. पण शिक्षा लागल्यानंतर तें बंद झालें. जेलची भाकरी व भाजी खाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. ती पहिल्या दिवशीं खाववली नाही. पण दुसरे दिवशीं जेलचे डॉक्टर व सुपरिटेंडेंट हे दोघेही आले व त्यांनी ब्रेड, दूध,

साखर, केळीं, भात देण्याचें ठरवलें. धारवाडचा जेल हा फक्त मुलांकरिता असल्यामुळे माझी बदली विजापूरला करण्यांत आली. ही बातमी बाहेर फुटली होती. त्यामुळे धारवाडपासून विजापुरापर्यंत प्रत्येक स्टेशनावर मंडळी भेटत असत. त्यांत हुबळी, गदग, बागलकोट व विजापूर या स्टेशनांवर बरीच गर्दी होती.

विजापूरच्या बादशहाच्या काळांत एक मोठी सराई होती. ती त्या वेळच्या पद्धती-प्रमाणे अतिशय मजबूत बांधलेली इमारत आहे. तींतच कांही कमजास्ती करून तिचा तुरुंग बनविण्यांत आला आहे. धारवाडच्या तुरुंगांतील मोकळी जागा व मोठी खोली यांचा विजापूर जेलमध्ये पूर्ण अभाव दिसून आला. मला एकीकडे एका लहानशा कोठडीमध्ये ठेवण्यांत आलें. आजूबाजूला कोणी कैदी नव्हते. रात्रीं फक्त एक कैदी वॉर्डर माझ्या खोलीबाहेर निजत असे. दिवसा सकाळीं एक तास व सायंकाळीं एक तास कुलूप लावलेल्या खोलींतून मला बाहेर काढीत असत. तेवढ्यांत सर्व नित्य कर्मे आटोपून व्यायामही संपविण्याची ताकीद होती. पंधरावीस पावलें होतील इतकीच जागा खोलीबाहेर होती. तेवढ्यांतच फिरण्याला परवानगी होती. खोलींत ढेकणांची रांग, बारीक मुंग्यांच्या रांगेसारखी सर्व रात्रभर लागत असे. ही गोष्ट जेलर कूपर यांच्या नजरेला मीं आणली. त्यांनी ताबडतोब स्टोव्ह आणवून कोनेकोपरे सर्व जाळून काढून व्हाइट-वॉश करविला. त्यामुळे ढेकूण कमी झाले. तरी रात्रीं बाराएक वाजेपर्यंत झोप लागत नसे. धारवाडास जें जेवण मिळत असे तेंच विजापूर येथे चालू करण्यांत आलें. त्यामुळे विजापुरास जेवणाची गैरसोय झाली नाही.

जेलचे इन्स्पेक्टर-जनरल जॅकसन हे मी तेथे असतांना एकदा आले होते. दैनिक 'टाइम्स ऑफ इंडिया' व कांही पुस्तकें आणि रात्रीं दिवा अशीं कांही वाचायचीं साधनें मीं त्यांच्याजवळ मागितलीं. त्यांनी तीं मंजूर केलीं. त्याचप्रमाणे दिवसा खोलीचें दार कुलूप लावून बंद करूं नये असें त्यांना कळविलें. पण ही विनंती मान्य झाली नाही. तथापि पुस्तकें व वर्तमानपत्रें मिळूं लागल्यानंतर वेळ बराच चांगल्या प्रकारें जाऊं लागला.

याच जेलमध्ये त्या वेळीं दामोदर गणेश ऊर्फ बाबासाहेब सावरकर होते. त्यांच्या खोलीच्या व माझ्या खोलीच्या मध्ये एका भिंतीचें अंतर होतें असें मला कळलें. पण ती भिंत चांगली चार हात रुंद होती व त्यांच्या खोलीला जाण्याचा मार्ग चक्रव्यूहा-प्रमाणे होता, असें मीं ऐकलें होतें. सर्वांत वाईट जागा म्हणजे बाबांची खोली होती. मला दुसरे कैदी तरी दृष्टीला पडत असत. पण बाबांच्या नशिबीं तेंही नव्हतें. ही सर्व हकीकत मला समजली व त्यांच्याबद्दल वाईट वाटलें. पण इलाज काय? त्यांत त्यांची प्रकृती बिघडली होती असें समजून फारच वाईट वाटलें.

### *विजापूर जेलमधून येरवड्यास*

अजमासें एक महिना विजापूरच्या तुरुंगांत काढला व त्यांतल्या त्यांत बस्तान ठीक बसलें असें वाटूं लागलें. इतक्यांत नाताळच्या

अगोदर तीनचार दिवस मी माझ्या कोठडीमध्ये रात्रीं निजलों असतांना मला एकाएकी उठवण्यांत आलें व वॉर्डरनी माझ्या सामानाची बांधाबांधी सुरू केली. याच सुमारास गांधीजी व सरकार यांच्या दरम्यान कांही वाटाघाटी चालू असून सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता होणार असल्याची बातमी होती. माझें सामानसुमान बांधून झाल्यानंतर ऑफिस-मध्ये साहेब बोलावतात असें मला सांगण्यांत आलें. तेव्हा सरकारने राजबंदींना सोडण्याचें ठरविलें असावें असें मला वाटलें. ऑफिसमध्ये गेल्यानंतर जेलरनीं माझी बदली झाल्याचें कळविलें. पण कोठे हें कळविलें नाही. स्टेशनावर पुण्याचीं तिकिटें काढल्याचें मला समजलें. त्यावरून येरवड्यास बदली झाली असावी असें वाटलें. होटगी स्टेशनावर मद्रासकडून गाडी यावयाची होती तोपर्यंत वाट पाहात बसावें लागलें. सुमारें आठ वाजतां सकाळीं मद्रासची गाडी आली. त्या गाडींत अहमदाबादच्या कॉंग्रेसला जाणारे बरेच प्रतिनिधी होते. माझा पोषाख खादीचा होता व डोकीवर खादी टोपी होती. बरोबर पोलीसपार्टी होती. हें पाहून कॉंग्रेसला जाणाऱ्या मंडळींनी चवकशी केली. त्यांना माझें नाव ऐकून माहीत असावें. कारण त्यांपैकी बरेच लोक मला भेटावयाला आले व अहमदाबादच्या कॉंग्रेसच्या पूर्वी सर्वांची सुटका होण्याचा संभव आहे असें त्यांनी मला सांगितलें. पुण्यापर्यंत माझा पोटगीभत्ता चार आणे देण्यांत आला होता. पण मद्रास-कडील कॉंग्रेसभक्तांनी मला पुष्कळ फराळाचें दिलें. माझ्याबरोबर फौजदाराच्या दर्जाचे एक अंमलदार असल्याने मला गाडींतूनच येरवड्याच्या तुरुंगापर्यंत येण्याला मिळालें.

तुरुंग बंद झाल्यानंतर आम्ही दारांत येऊन पोचलों. त्यामुळे अर्धा तासपर्यंत बाहेर तिष्ठत बसावें लागलें. त्यानंतर मला आंत घेतलें, व 'अंधेरी' यार्डमध्ये एका खोलींत मला ठेवण्यांत आलें. एक नेसण्याचें धोतर व अंगांत एक सदरा एवढ्याच कपड्यांनिशी मला अंधेरींत नेलें. रात्र थंडीची होती. आंथरण्याला व पांघरण्याला कांही नसल्यामुळे गार फरशीवर सगळी रात्र बसून काढावी लागेल असें मला वाटलें. पण एका वॉर्डरला माझी दया आली व त्याने आपलें कांबळें व एक तरट मला आणून दिलें. प्रवासामुळे थकवा आला होता आणि डास, ढेकूण कांही नव्हते त्यामुळे चांगली झोप लागली. दुसरा दिवस रविवारचा असल्यामुळे जेलर किंवा सुपरिंटेंडंट कोणी येणार नाहीत व ते आल्या-खेरीज मला माझे कपडे वगैरे कांही मिळणार नाहीत असें समजलें. तथापि जेलचीं दोन कांबळीं व काथ्याचें तरट, एक थाळी, एक ताट इतकें सामान मला मिळालें. खोलीच्या बाहेर जावयाचें नाही अशी ताकीद मिळाली. स्नानाकरिता मला दुसऱ्या अंधेरीच्या यार्डमध्ये नेलें. तेथे मुंबईचे सीतारामपंत ळळीत भेटले. त्यांची प्रकृती अतिशय अशक्त झाली होती. त्यांनी थोडक्यांत तुरुंगांच्या अधिकाऱ्याच्या स्वभावाची ओळख करून दिली. माझ्या बुकांमध्ये (history ticket) मला दूध, ब्रेड (पाव), साखर देत असल्याचें नमूद होतें. त्यावरून येरवड्यासही तेंच जेवण चालू राहील अशी अटकळ होती. पण ती चुकीची ठरली, व जेलचेंच नेहमीचें जेवण मला मिळालें. त्या वेळीं माझें वय पन्नाशीच्या बेतांत होतें तरी अशक्तपणा नव्हता. म्हणून मिळेल तें जेवण

पचवितां येईल असें वाटलें. दोन भाकऱ्या जरी मिळत असत, तरी एकापेक्षा जास्ती मला खाववली नाही. विजापूरच्या तुरुंगापेक्षा राहण्याची कोठडी जास्ती हवाशीर व स्वच्छ असल्यामुळे थोडें बरें वाटलें. पण शौच, लघुशंका वगैरे सर्व विधी कोठडीमध्येंच 'कुंडा' ठेवलेला असे त्यांतच करण्याचा प्रसंग आला. इतर कैद्यांना शौचकुपांत जाण्याची परवानगी असे. पण राजबंदींच्या बाबतींत ही देखील सवलत ठेवण्यांत आली नव्हती. सातआठ दिवस यामुळे मोठ्या कष्टांत गेले. एक आठवड्यानंतर मला माझ्या कोठडीच्या-समोर फिरण्याची परवानगी मिळाली. अगदी जरुरीचे तेवढेच माझे कपडे मला देण्यांत आले. आंथरूणपांघरूण मिळालें नाही. बेळगावकडील कांही कैदी वॉर्डर झाले होते. त्यांना माझी माहिती होती. त्यांना केव्हा केव्हा दुरून पाहून किंवा त्यांच्याशीं चोरून एखादा शब्द बोलावयास मिळाल्यास तितकेंच बरें वाटत असे. येरवड्यास मला आणून ठेवल्या-नंतर महमदअलींना विजापुरास आणलें असें मला कळलें. तेवढ्याचकरिता विजापूरहून माझी बदली झाली असें कळलें. अहमदाबादच्या कॉंग्रेसचे नियोजित अध्यक्ष दास यांना न सोडल्यामुळे हकीम अजमलखान यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेस भरली व गांधीजींना सर्वाधिकारी नेमल्याची बातमी कळली. त्यामुळे वाटाघाट कोठे तरी फिसकटली असावी असें मला वाटलें. अंधेरीच्या दुसऱ्या नंबरच्या यार्डमध्ये—म्हणजे जेथे आम्हांला स्नानाकरितां नेत असत तेथे (ज्या ठिकाणीं १९३२ सालीं महात्मा गांधींना त्यांनी सात दिवसांचा उपवास केला त्या वेळीं ठेवलें होतें)—त्या वेळीं काठेवाडकडील एक ठाकोर कैदी होते. त्यांच्याकरिता स्वयंपाक निराळा करण्याची व्यवस्था होती. त्यांची व माझी ओळख झाली. त्याच्या मार्फत सदरहू ठाकूर यांनी मला कांही पदार्थ खाण्याकरिता एकदा पाठविले. पण त्यांचा स्वीकार मीं केला नाही व पुन्हा असें करूं नका असा निरोप पाठविला. येरवड्यास मी गेल्यानंतर कांही दिवसांनी माझा 'टाइम्स' बंद करण्यांत आला व रात्रीं दिवाही मिळेनासा झाला. या बाबतींत स्वतः आय. जी. पी. चा हुकूम होता तरी येरवड्याच्या सुपरिंटेंडटनी तो धाब्यावर बसविला. पुढे कर्नाटकांतील सातआठ मंडळी आली. या सर्वांवर क्रि. प्रो. कोड कलम १०८ प्रमाणे खटले झाले होते, व त्यांनी जामीन न दिल्यामुळे त्या सर्वांना एकएक वर्षाच्या सजा झाल्या होत्या. त्यांत बेळगावपैकी दत्तोपंत मजली व केशवराव गोखले हे होते. धारवाड जिल्ह्यांतील कृष्णराव मुद्वडेकर, दिवाकर, जोशी वकील, विजापूरचे हणमंतराव कौजलगी वगैरे मंडळी होती. यांपैकी केशवरावांना सक्तमजुरीची शिक्षा होती. त्यांना प्रथम फारच भीती वाटली होती, व ते जामीन देऊन जाण्याच्या बेतांत होते. स्नानाच्या वेळीं त्यांची भेट होत असे, तेव्हा माझें व त्यांचें बोलणें होई. त्यामुळे त्यांना धीर आला, व पुढे ते धैर्यानें राहिले. कामांत चुकारपणा ते करीत नसत. सुपरिंटेंडटला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटली व त्यांना दूध, लोणी वगैरे मिळूं लागलें. कर्नाटकची ही मंडळी आल्यानंतर आम्हांला 'सेपरेट' मध्ये नेण्यांत आलें. तेथे अंधेरीपेक्षा पाण्याची सोय जास्ती होती, व जागाही बरीच विस्तृत होती. त्यामुळे जास्ती मोकळेपणा वाटला. पूर्वी आम्हांला एकाच बराकींत

निरनिराळ्या सेलमध्ये ठेवण्यांत आलें होतें. त्यामुळे एकत्र जमून बोलण्याचालण्याची संधी मिळत असे. पण पुढे कांही दिवसांनंतर आमची बराक 'फोडली' व आम्हांला निरनिराळे ठेवण्यांत आलें. त्यामुळे एकमेकाबरोबर बोलणें कठीण झालें.

## सुटकेपूर्वींचे तुरुंगांतील दिवस

अहमदाबादेच्या कॉंग्रेसची हकीकत थोडी थोडी मला समजली होती. माझ्या मातोश्री व बहीण वगैरे घरची मंडळी अहमदाबादच्या कॉंग्रेसला गेली होती. मला वर्किंग कमिटीचे मेंबर निवडण्यांत आल्याचें व माझ्या गैरहजरींत माझ्या बदली विजापूरचे श्रीनिवासराव कौजलगी यांची नेमणूक झाल्याचें मला समजलें. त्याचप्रमाणे बारडोलीस गांधीजी मोठी चळवळ करणार होते हेंही समजलें. पण कांही दिवसांनी त्यांनी तो वेत फिरवला हेंही कळलें. (जेलमध्ये बातम्या कशा पसरतात हें एक कोडेंच आहे.) ही बातमी खोटी आहे असें आम्हांला सर्वांना वाटलें.

मार्च किंवा एप्रिल महिन्यांत गांधी व बॅंकर यांना शिक्षा झाल्याची हकीकत समजली. एक दिवस दोन प्रहरीं लवकरच तुरुंग बंद करून आम्हांला आमच्या कोठडीमध्ये कोंडण्यांत आलें. प्रथम कारण समजलें नाही. पण पुढे एका तासाच्या आंत गांधी व बॅंकर यांना तुरुंगांत आणल्याचें कळलें. गांधींना 'बाहेरच्या सेपरेट'मध्ये ठेवलें होतें.

माझी प्रकृती बरीच अशक्त झाली होती. वजन पंधरावीस पौंड कमी झालें म्हणून मला गव्हाची भाकरी देण्याचा हुकूम झाला. बाजरी-जोंधळ्याच्या भाकरीपेक्षा गव्हाची भाकरी कची असे. त्यामुळे अपचन होऊं लागलें व माझें यकृत (Liver) बिघडलें. मीं सुपरिंटेंडंटकडे कांही मागावयाचें नाही असा निश्चयच केला होता. प्रथम येरवड्याला आल्यावेळीं विजापुरांत ज्या सवलती मला दिल्या होत्या त्या येरवड्यास मिळाव्यात असें सुपरिंटेंडंटजवळ मी बोललों होतों. पण तुरुंग हा 'ताजमहाल हॉटेल' नाही असें मला उत्तर मिळालें होतें. तेव्हापासून सुपरिंटेंडंटजवळ कशाचीही तक्रार करावयाची नाही व कांही मागावयाचें नाही असें मीं ठरविलें होतें. पण दिवसेंदिवस प्रकृती खालावत चालली व माझ्या सुटकेचे दिवस जवळ येत चालले हें पाहून मला दूधभात व पाव मिळूं लागला. एक दिवसाआड सकाळीं दवाखान्यांत नेऊन एमॅटिनचें इंजेक्शन मला देऊं लागले. दवाखान्याला जाण्याच्या वाटेवरच गांधीजींची 'बराक' होती व ते बहुशः सकाळीं बाहेर फिरत असंत. त्यामुळे माझी व त्यांची दृष्टादृष्ट होई. मी नमस्कार करून पुढे जात असें. ते नमस्कार घेत असत.

एक दिवस गांधीजी, बॅंकर सहित आम्हां सर्व राजकीय कैद्यांना सुपरिंटेंडंटच्या ऑफिसवर नेलें होतें. सुपरिंटेंडंट कांही दुसऱ्या कामांत होते, म्हणून ऑफिसच्या बाहेर लहानशी खुली जागा आहे तेथें बसविलें होतें. आमच्याबरोबरच गांधींनाही खाली बसावें लागलें. मी त्यांच्या जवळच बसलों व बार्डोलीसंबंधाची हकीकत विचारली. चौरीचौऱ्याला अत्याचार झाल्यामुळे बार्डोलीची चळवळ मागे घ्यावी लागली, असें त्यांनी सांगितलें

आणि विधायक कार्याकडे देशाने जास्ती लक्ष दिलें पाहिजे असें ते म्हणाले. पण अशा परिस्थितींत बोलणें कितीसें होणार? कांही वेळानंतर आम्हांला ऑफिसांत नेऊन सुपरिंटेंडंटपुढे उभे केलें. प्रत्येकाला शिक्षा किती आहे असा त्यांनी प्रश्न केला. त्याचीं उत्तरें आम्हीं दिलीं व आम्हांला परत आमच्या ठिकाणीं नेलें.

मला भेटण्याकरिता तात्यासाहेब केळकर, बाबुराव गोखले एकदा आले होते. पण त्यांची भेट ते दरवाजाबाहेर व मी आत अशा रीतीनेच झाली. अशा स्थितींत भेट घेतली नसती तर बरें असें मला वाटलें. त्यांनी माझ्याकरिता कांही पुस्तकें आणिलीं होतीं; पण तीं मला देण्यांत आलीं नाहीत. जेल लायब्ररीच्या पुस्तकांवरच निर्वाह करावा लागला. पाच महिन्यांत लायब्ररींतील बरींच पुस्तकें मीं वाचलीं.

माझ्या सुटकेची मुदत मे महिन्यांत होती. मला पुण्यासच सोडतील असें वाटलें होतें. पुण्यांतील माझ्या मित्रमंडळींची अशीच अपेक्षा होती. पण मला सोडण्याच्या तारखेच्या पूर्वीं एक दिवस मला बेळगावास नेलें. पुण्यास ही बातमी समजली. त्यामुळे वाठार, सातारा रोड, कराड, मिरज, वगैरे ठिकाणीं माझी फराळाची वगैरे व्यवस्था लागली. बरीच स्नेही मंडळी भेटली. दुसरे दिवशीं बेळगावच्या तुरुंगांतून रात्रीं दोन वाजतां आमच्या घरीं मला पोचविण्यांत आलें. सोडण्याची वेळ अगदी गुप्त ठेवण्याचा प्रयत्न झाला होता. पण गावांत ही बातमी फुटली होती. त्यामुळे मला भेटण्याला पुष्कळ मंडळी आमच्या घरीं जमली होती. आई, बहीण वगैरे घरची मंडळी त्याच दिवशीं आली होती. मला शिक्षा झाल्यापासून आई सारखी यात्रा करीत हिंडत होती व सुटण्यापूर्वी एकदोन दिवसच बेळगावला आली होती.

प्रकरण एकोणिसावें

# फेर-नाफेरपक्षांतील ओढाताण

### *सुटकेनंतरचा माझ्यापुढील प्रश्न*

मी घरीं गेल्यानंतर सर्वांना भेटून बाहेरच्या मंडळींना निरोप दिला. गोविंदराव याळगी, बाबासाहेब सोमण, श्रीनिवासराव कौजलगी (हे मुद्दाम विजापूरहून आले होते) यांना सहा महिन्यांतील हकीकत मीं विचारली. महाराष्ट्र, वऱ्हाड, नागपूरकडील कांही प्रमुख मंडळींनी असहकारितेविरुद्ध चळवळ चालविल्याचें त्यांनी मला सांगितलें. दुसरे दिवशीं 'केसरी'तील कांही लेख मला वाचावयाला मिळाले. सार्वजनिक प्रश्नाच्या बाबतींत मतभेद होतातच. त्यांत अस्वाभाविक कांही नाही. पण कांही लेखांत व्यक्तिविशिष्ट टीका व तीही निराधार वाचून वाईट वाटलें. माझ्यापुढे कोणतें धोरण मीं स्वीकारावें हा प्रश्न उभा राहिला. बेळगावच्या लोकांचें काय मत आहे याबद्दल मीं चवकशी केली. तेव्हा बहुतेक सर्व कार्यकर्ती मंडळी माझी वाट पाहात असून माझ्या धोरणाप्रमाणे चालावयाचें असें साधारणपणें ठरवून स्वस्थ होती. टिळकांच्या प्रमुख अनुयायांपैकी एक खाडीलकरांना सोडून बाकी सर्व मंडळी असहकारितेच्या विरुद्ध होती असें समजलें. विरुद्ध असलेल्या मंडळींपैकीं केळकर, गोखले वगैरेंचा व माझा बराच स्नेहसंबंध होता. त्यामुळे मी कोणतें धोरण स्वीकारीन याची अटकळ माझ्या कर्नाटकांतील मंडळींना करतां आली नाही.

श्री शंकराचार्य (कुर्तकोटि) त्या दिवशीं बेळगावास होते. त्यांच्याच अध्यक्षते-खाली सभा भरवून माझें अभिनंदन करण्याचें मंडळींनी ठरविलें होतें. मी त्यांच्या दर्शनाला गेलों तेव्हा ते नुकतेच पुण्याहून आले होते. पुण्याची मंडळी माझी वाट पाहात आहेत असें त्यांनी मला कळविलें. त्यांच्या बोलण्यावरून पुण्याच्या मंडळींना मी त्यांना मिळेन असें वाटत असावें असें मला दिसलें. इतक्यांत मला केळकरांकडून पुण्यास ताबडतोब निघून येण्याबद्दल तार आली. माधवरावजी अणे व डॉ. मुंजे हेही तेथेच

असल्याचा मजकूर तारेंत होता. गांधींनी बारडोलीची चळवळ मागे घेतली व सर्व भार विधायक चळवळीवरच टाकला असें जेव्हा ऐकलें तेव्हा त्यांनी अवसानघातकीपणा केला असें मला वाटलें. तुरुंगांत असलेल्या मंडळींना बाहेर खूप जोरांत चळवळ चालू असावी असें वाटत असतें. पण जेव्हा चळवळ थंड पडून लोक तुरुंगांत यावयाचे कमी होतात त्या वेळीं आंतील लोकांना निरुत्साह वाटत असतो, ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. गांधींनी चळवळ सुरू करून एकदम ती कां मागे घेतली याबद्दलचें कोडें तुरुंगांत कोणालाच सुटलें नव्हतें. तुरुंगांत गांधींबरोबर याबद्दल दहापंधरा मिनिटें जरी बोलणें झालें होतें तरी माझ्या मनाचें समाधान झालें नव्हतें. सुटलेल्या दिवशीं 'केसरी', 'यंग इंडिया' यांतील लेख वाचले. गांधींनी केलें हें बरोबर होतें असें मला थोडें थोडें वाटूं लागलें. पण पुण्याला जाऊन मंडळींना भेटल्याखेरीज निश्चित धोरण ठरवूं नये असें मीं ठरविलें.

संध्याकाळच्या सभेंत श्रीशंकराचार्य, श्रीनिवासराव कौजलगी, बेळगाव खिलाफत कमेटीचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांचीं भाषणें झालीं. उत्तरादाखल केलेल्या भाषणांत असहकारितेची चळवळ परिणामकारक असून ती सनदशीर आहे असें म्हणून चालू परिस्थितीसंबंधानें मी कांही बोललों नाही. कर्नाटकांतील बहुतेक कार्यकर्त्यांचा कल केसरी पक्षाच्या विरुद्ध होता असें मला समजलें.

### सहकाऱ्यांशीं विचारविनिमय

दुसरे दिवशीं मीं बेळगाव सोडलें. पुण्याच्या स्टेशनहून गावांत जातांना वाटेंत माधवरावजी अणे भेटले. त्यांना यवतमाळास कांही जरुरीचें काम आलें म्हणून त्यांना राहणें शक्य नव्हतें. पाचदहा मिनिटें त्यांच्याबरोबर बोलणें झालें. तेवढ्यांत त्यांनी जुन्या राष्ट्रीय पक्षांत दुही होण्याचा संभव असल्यामुळे मीं सर्व गोष्टींचा चांगला विचार करून माझें धोरण ठरवावें असा मला इशारा दिला. मी तात्यासाहेबांकडेच उतरलों होतों. बाबुराव गोखले, केळकर वगैरे मंडळी भेटली. केळकरांनी मला स्पष्ट असें कांहीच कळवलें नाही. संध्याकाळीं माझ्या अभिनंदनार्थ जाहीर सभा केळकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. माझ्या भाषणांत मीं माझें स्पष्ट धोरण जाहीर केलें नाही. दुसरे दिवशीं मुंबईला येण्याबद्दल मला डॉ. भडकमकर यांचेकडून तार आली. त्यावेळीं भडकमकर हे मुळशी सत्याग्रहासंबंधानें काम करीत होते. सेनापति बापटही मुंबईसच होते. मुळशी सत्याग्रह मंडळातर्फे स्टेशनावर माझें स्वागत करण्यांत आलें. दुसरे दिवशीं माझ्या अभिनंदनार्थ मारवाडी विद्यालयाच्या पटांगणांत कृष्णाजीपंत खाडीलकरांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली. सभेला बरीच गर्दी होती. महाराष्ट्रांतील परिस्थितीची मला साधारणपणें कल्पना आली होती. टिळकांच्या आश्रयाखाली ज्या स्नेह्यांबरोबर आजपर्यंत मी सहकार्य करीत आलों होतों त्यांच्याशीं अलग होण्याचा प्रसंग आला असें मला वाटूं लागलें. खाडीलकरांनी 'लोकमान्य' पत्राच्या द्वारें कॉंग्रेसच्या

कार्यक्रमाला पाठिंबा दिला होता. तर उलट पक्षीं 'केसरी'तून विरुद्ध लेख आले होते. दोघांनीही टिळकांच्या सान्निध्यांत आपल्या आयुष्याचीं पंचवीसएक वर्षें घालविलीं होतीं. पण दोघांच्या धोरणांत बरेंच अंतर पडलेलें दिसलें. दोघांच्याबद्दल माझी सारखीच आदरबुद्धि. माझ्या स्थावर मिळकतीपैकी कांही भागाचा मीं ट्रस्ट केला होता, व त्यांतील एक ट्रस्टी केळकर होते. टिळक पर्स फंड, टिळक ज्युबिली फंड या ट्रस्टमध्ये मीही एक ट्रस्टी होतों. 'लोकमान्य' पत्राच्या डायरेक्टर बोर्डांत केळकर-खाडीलकरां-बरोबर मीही डायरेक्टर होतों. टिळकांचा व माझा संबंध आल्यापासून या दोघांचा व माझा संबंध निकटचा झाला होता. याशिवाय वासूकाका, परांजपे, यांचाही स्नेह होता. 'केसरी' ऑफिसपैकी बाबुराव गोखले यांचा व माझा विशेष स्नेह. अशा स्थितींत एक निश्चित धोरण ठरविण्याने एका बाजूच्या मित्रमंडळीशीं थोडीशी तरी ताटातूट होण्याचा संभव. एक बाजू घेतल्यानंतर दुसऱ्या बाजूवर टीका व प्रसंगविशेषीं कडक टीका करण्याचा प्रसंग यावयाचा हें मला माहीत होतें. प्रतिपक्षावर टीका करण्याची वेळ आली म्हणजे एकमेकावर कशा प्रकारचे वाक्प्रहार करण्यांत येतात व त्यामुळे खासगी स्नेहांतदेखील कसें अंतर पडतें याची मला जाणीव होती. या सर्व मंडळीपैकी कोणाच्याहि खासगी स्नेहांत अंतर येऊं नये अशी माझी तीव्र इच्छा. या सर्व कारणांमुळे मी थोडासा अडचणींत पडलों.

पण शेवटीं विचार करून कॉंग्रेसचें धोरण स्वीकारण्याचें मीं ठरविलें व त्याप्रमाणे मुंबईच्या भाषणांत बोलूनही दाखविलें. खाडीलकरांची व माझी भेट झाल्यानंतर त्यांच्या बोलण्याने माझ्यावर असा परिणाम झाला, असा उलट बाजूपैकी कित्येकांचा समज झाला आहे. पण खरा प्रकार तसा नाही. टिळक हयात असतांनाच गांधींच्या असहकारितेचा कार्यक्रम मला पसंत पडत चालला होता हें मीं पूर्वी दिलेल्या हकीकतीवरून दिसून येईल. टिळकांनी या प्रसंगीं कोणतें धोरण स्वीकारलें असतें, या बाबतींत खाडीलकरांचें व माझें बोलणें झालें ही गोष्ट खरी आहे. त्यांच्या बोलण्यावरून व त्यांनी दिलेल्या दोनतीन दाखल्यांवरून टिळकांनी अशा प्रसंगीं कॉंग्रेसला सोडून निराळें धोरण स्वीकारलें असतें असें मला वाटलें नाही. याशिवाय अहमदाबादच्या कॉंग्रेसमध्ये गांधींना एकमताने सर्वाधिकारी निवडल्यानंतर ते तुरुंगांत असेपर्यंत त्यांच्या धोरणांत मूलतः फेरबदल करून त्यांच्यावर एक प्रकारचा अविश्वास दाखवणें हें तर मला मुळींच पटलें नाही. चळवळीच्या जोरावर त्यांना सोडविल्यानंतर त्यांच्याशीं वाटाघाट करून एकमताने कांही बदल घडवून आणण्याचा यत्न करावा आणि तें साधत नसल्यास मग त्यांच्याशीं आपला मतभेद स्पष्टपणें उघड करण्याला कांहीच हरकत नव्हती. सरकारने आपल्या धोरणांत बिलकूल फेरफार केला नव्हता. त्याची दडपशाही जोरांत चालू होती. गांधींशिवाय नेहरू, दास वगैरे मोठे-लहान सर्व कार्यकर्ते तुरुंगांत होते. अशा वेळीं त्यांनी ठरविलेल्या कार्यक्रमावर सरकार देखील करणार नाही अशा प्रकारची प्रखर टीका करून देशांत दुही माजविणें हें शिस्तीच्या दृष्टीने व स्वाभिमानाच्या दृष्टीने मला मान्य झालें नाही. गांधी—सर्वाधिकारी गांधी—

त्यांच्या संबंधानें निराधार व्यक्तिविषयक टीका करण्याचा प्रकार तर मला बिलकूल पसंत पडला नाही. या सर्व कारणांमुळे माझें धोरण मीं निश्चित केलें व काँग्रेसचेंच काम चालू ठेवण्याचें ठरविलें. या गोष्टीला आज बारा वर्षें होत आलीं. वादविवादांत भाग घेण्याचे अनेक प्रसंग आले; माझ्यामध्ये व माझ्या कांही मित्रांमध्ये असलेला व आम्हांला स्नेहानें जोडणारा नाजूक धागा तुटण्याची भीती अनेक वेळां आली. पण माझ्या स्नेह्यांच्या दक्षतेमुळेच तसा प्रसंग आला नाही हें पाहून मला आजदेखील संतोष होतो. या बाबतींत गांधींचें उदाहरण व त्यांची शिकवण मला बरीच उपयोगी पडली.

महाराष्ट्रांत या मतभेदामुळें कसे तट पडले, व त्यांचा परिणाम खासगी संबंधांवर होऊन माझ्या दृष्टीने महाराष्ट्राचें किती नुकसान झालें याची चिकित्सा मी करीत नाही. रानडे, तेलंग, टिळक, आगरकर, गोखले वगैरे मंडळींच्या कर्तबगारीने जागृतीच्या बाबतींत महाराष्ट्राचा दर्जा इतर प्रांतांच्या मानाने किती तरी उच्च आहे. तथापि, तीव्र मतभेद व त्याचे दुष्परिणाम यांमुळे प्रत्यक्ष महाराष्ट्राची व पर्यायाने राष्ट्राची भयंकर हानी झाली आहे, असें मला म्हटल्यावाचून राहवत नाही.

### *मुळशी सत्याग्रहासाठी परिषद*

या सुमारास सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली मुळशीच्या सत्याग्रहाची चळवळ जोरांत चालू होती. त्यासंबंधानें स्वयंसेवक मिळवणें व फंड जमवणें हीं कामें चाललीं होतीं. या बाबतींत मुंबईस एक परिषद भरवण्याचें ठरलें होतें व भडकमकर, बापट वगैरे मंडळींनी मला या परिषदेचें अध्यक्ष होण्याबद्दल आग्रह केला. पण मुळशी प्रकरणाची मला माहिती नव्हती. पुण्यास असतांना या बाबतींत कांही मतभेद असल्याचा संशय आला होता. शिवाय या चळवळीचे मुख्य सेनापती बापट यांची सत्याग्रहाची कल्पना मला पटण्यासारखी नव्हती. त्यांनी सत्याग्रहाची केलेली चर्चा व त्यांच्या मतें शुद्ध सत्याग्रहाच्या स्वरूपाची व्याख्या माझ्या पाहण्यांत आली होती. तात्त्विक दृष्ट्या विचार करणाऱ्याचें मत यासंबंधी काय असेल तें असो. पण गांधींच्या सत्याग्रहाच्या कल्पनेशीं बापटांची कल्पना विसंगत आहे असें मला वाटल्याने अध्यक्ष होण्याचें धैर्य मला झालें नाही. सेनापती बापटांचा स्वभाव थोडाबहुत मला माहीत असल्याने त्यांचीं मतें बदलणें माझ्या शक्तीच्या बाहेर होतें. म्हणून त्या चळवळींत मी पडलों नाहीं.

मी अध्यक्ष होत नाही असें ठरल्यानंतर डॉ. मुंजे यांना अध्यक्षस्थान देण्याचें मंडळींनी ठरविलें. डॉ. मुंजे यांनी मान्यता दिली. त्यांच्या अध्यक्षतेखाली परिषद भरली. मी हजर होतों. डॉ. मुंजे यांचें अध्यक्ष या नात्याने फारच जोराचें व निकराचें भाषण झालें. त्यांच्या भाषणाला अनुसरून ठराव मंजूर झाले. पुढे चळवळ चालली. महाराष्ट्रांतून बरेच लोक तुरुंगांत गेले. कर्नाटकांतील कांही स्वयंसेवक या चळवळींत सामील झाले होते व त्यांनाही तुरुंगांत जावें लागलें. कर्नाटकांतून पैशाचीही मदत

झाली. पण पुढे महाराष्ट्रांतील प्रमुख मंडळींनी या चळवळींतून ,आपलें अंग काढून घेतलें. डॉ. मुंजे यांनी अध्यक्षपदावरून जें भाषण केलें त्यापेक्षा अधिक प्रत्यक्ष कांही कामगिरी केली असें वाटत नाही. अध्यक्ष झाल्यानंतर मंजूर झालेले ठराव अंमलांत आणण्याची जबाबदारी अध्यक्षावर असते हें तत्त्व गांधींनी कॉंग्रेसच्या कामांत अंमलांत आणलें होतें. अशी जबाबदारी माझ्या हातून पार पडणार नाही हेंही एक मी अध्यक्ष न होण्याचें कारण होतें.

### *लखनौची वर्किंग कमिटीची बैठक*

१९२२ च्या मे महिन्यांत पंडित मोतीलालजी सुटणार होतें. त्या वेळीं लखनौ येथे परिस्थितीचा विचार करण्याकरिता वर्किंग कमिटीची व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा भरणार होती. कॉंग्रेसने स्वीकारलेल्या धोरणाशीं विरोध न करण्याचें मीं ठरविल्याने त्या मताच्या मंडळींशीं माझा संबंध येत चालला. लखनौच्या सभेला जाण्याकरिता मी मुंबईला आलों. तेथे जमनालाल बजाज व राजगोपाळाचार्य यांची भेट झाली. तेही वर्किंग कमिटीचे सभासद होते. जमनालालजींची नागपूर कॉंग्रेसच्या वेळीं थोडी ओळख झाली होती. पण राजगोपाळाचार्य यांची प्रत्यक्ष ओळख होण्याचा हाच पहिला प्रसंग. ते जमनालाल यांच्या बिऱ्हाडीं उतरले होते. जमनालालजींच्या आग्रहावरून माझें बिऱ्हाड मीं तेथेच नेलें. दोनतीन दिवस राजगोपाळाचार्य यांचेबरोबर विचारविनिमय करण्याची संधी मिळाली. त्यांच्या कुशाग्रबुद्धीची छाप माझ्यावर पडली व तेव्हापासून माझा व त्यांचा स्नेहसंबंध चांगला वाढीला लागला. जमनालालजी एक श्रीमंत गृहस्थ आहेत व आपल्या श्रीमंतीचा उपयोग राष्ट्रकार्यांत करून पैशाची मदत करणारे एक गृहस्थ आहेत, इतकीच त्यांच्याबद्दल माझी त्या वेळीं कल्पना होती. नागपूरच्या कांही मंडळीकडून जमनालाल महाराष्ट्रियांचा द्वेष करतात असेंही माझ्या कानावर आलें होतें. शिवाय मारवाडी व्यापाऱ्याला राजकारण काय समजणार, असें त्यांच्याबद्दल मला वाटत होतें. पण त्यांच्याशीं थोडा सहवास झाल्यानंतर माझ्या या कल्पना बदलल्या व त्यांची खरी योग्यता मला कळून आली.

लखनौला या दोघांबरोबरच मी गेलों होतों व त्यांच्याबरोबरच राहिलों होतों. आम्ही लखनौला जाऊन पोचल्यानंतर दुसरे दिवशीं मोतीलाल बंधमुक्त होऊन तेथे येणार होते. ते आल्यानंतर ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत काय ठराव आणावयाचे तें त्यांच्याशीं वाटाघाट करून निश्चित करण्याचें ठरलें. लखनौच्या स्टेशनावर त्यांचें थाटाचें स्वागत झालें. दोनप्रहरीं त्यांच्या बिऱ्हाडीं आम्ही सर्व जमलों. सर्वांच्या विचारें एक कमिटी नेमावी आणि त्या कमिटीने सर्व प्रांतांत दौरा काढावा व देश कायदेभंगाच्या चळवळीला कितपत तयार आहे याबद्दल रिपोर्ट करावा, असा विचार असल्याचें त्यांना कळविलें. त्यांना ही कल्पना पसंत पडली. कमिटीच्या सभेंत हा ठराव मंजूर होऊन व हकीम अजमलखान (अध्यक्ष), डॉ. अनसारी, शेरवानी, मोतीलाल, विठ्ठलभाई पटेल, राजगोपाळाचार्य,

कस्तुरीरंग अय्यर इतक्यांची कमिटी नेमण्यांत आली. काँग्रेसच्या कार्यक्रमांत फेर व्हावा म्हणणारे व फेर होऊं नये म्हणणारे या दोन्ही पक्षांनी मिळून हा ठराव पास केला. पण दोघांचे उद्देश निरनिराळे होते हें मात्र येथे नमूद केलें पाहिजे. फेरवाल्यांच्या मनांत देश कायदेभंगाला तयार नाही असा रिपोर्ट करून काँग्रेसचा कार्यक्रम बदलून कौन्सिल-बहिष्कार उठवावा असा हेतू होता. नाफेरवाल्यांना गांधींच्या शिक्षेनंतर देशांतील चळवळीला थोडीशी शिथिलता आली होती, ती या कमिटीच्या दौऱ्यामुळे जाईल असें वाटलें होतें. (फेरवाले व नाफेरवाले हे शब्द या वेळीं प्रचारांत आले. पुढे फेरवाल्यांना कौन्सिलवाले व नाफेरांना कट्टर अशीं विशेषणें मिळालीं.)

### फेर-नाफेरपक्षांतील ओढाताण

या कमिटीच्या स्थापनेपासून फेर व नाफेर पक्षांत ओढाताण सुरू झाली. ती बेळगाव काँग्रेसपर्यंत टिकली. वास्तविक पाहतां देशांत पाहणी करून ठरविण्याचें कांही कारण नव्हतें. प्रत्येक प्रांतांतील प्रमुख कार्यकर्ते हजर होते व त्यांच्यामार्फत माहिती मिळाली असती, ती घेऊन काय ठरवावयाचें तें ठरविणें अशक्य होतें असें नाही. पण दोन्ही पक्षांना आपापले हेतू साधावयाचे होते, त्यामुळे ही कमिटी नेमली गेली. या मंडळींत विठ्ठलभाई पटेल यांच्या मनांत कौन्सिलांत जाण्याचा कार्यक्रम मंजूर करून घेण्याचा विचार होता. त्यांचें व महाराष्ट्रांतील फेरवाल्यांचें एकमत होतें. राजगोपाळाचार्य हे पक्के नाफेरवाले होते. इतरांचें धोरण निश्चयात्मक कळलें नव्हतें. दक्षिणेंत या कमिटीचा पहिला मुक्काम पुणें येथे झाला. त्या वेळीं मी पुण्यास होतों. सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत कामाला सुरुवात झाली. फेरवाल्यांतर्फे केळकर-भोपटकर वगैरे मंडळी साक्षीला हजर होती. नाफेरवाल्यांतर्फे चिंतामणराव वैद्य प्रमुख होते. साक्षीदारांना उलटतपासणींत जे प्रश्न विचारले जात असत त्यावरून पटेलांखेरीज इतर मंडळी नाफेर पक्षाच्या धोरणाचें समर्थन करण्याची खटपट करीत असत असा माझा ग्रह झाला. कमिटीचा मुक्काम पुण्यास असतांनाच मी विजापूरला गेलों. कर्नाटकांतील साक्षीदारांची तपासणी विजापूरला व्हावयाची होती. म्हणून मी कमिटीच्या पूर्वी तेथे गेलों होतों. बेळगावहून मी व बेळवी असे दोघे गेलों होतों. बेळवी हे बेळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी होते. मी प्रांतिक काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष होतों. श्रीनिवासराव कौजलगी हे प्रांतिक काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष होते. बेळवींनी फेरवाल्यांतर्फे साक्ष दिली. कौजलगी यांचाही कल त्याच बाजूला होता. बाकी सर्व कर्नाटकची मंडळी नाफेर पक्षाला अनुकूल होती.

माझ्या जबाबांत कर्नाटकांत कारवार जिल्ह्याची परिस्थिती करबंदीच्या चळवळीला अनुकूल आहे असें मीं सांगितलें होतें. कारण त्या जिल्ह्यांतील लोक जात्या शांत वृत्तीचे व चिकाटीचे असावेत, अशी माझी त्यांच्यासंबंधाने अटकळ होती. त्याचप्रमाणे तेथ ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद फारसा नव्हता व गांधींवर बहुजनसमाजाची निष्ठा होती.

लोक भाविक असून त्यागाला तयार झाले होते. अशा प्रकारची अनुकूलता इतर कोणत्याही जिल्ह्यांत नव्हती. त्याचप्रमाणे कॉलेजांतून या जिल्ह्यांतील जे विद्यार्थी बाहेर पडले होते, त्यांनी खेड्यापाड्यांतून हिंडून लोकजागृतीचें काम उत्तम प्रकारें केलें होतें. मीं स्वतः या जिल्ह्यांत दोनतीन वेळां दौरा काढला होता व सर्व स्थिती स्वतः पाहिली होती. त्यावरून मीं माझें मत बनविलें होतें. पण माझ्या उलटतपासणींत पटेल यांनी कारवार जिल्ह्यांत चरखे किती आहेत, हातमाग किती चालतात, शेकडा किती प्रमाणांत खादी घालणारे लोक आहेत, किती प्रमाणांत अस्पृश्यतानिवारण झालें आहे, राष्ट्रीय शाळा किती आहेत, सरकारी शाळा किती बंद पडल्या, वगैरेसारखे प्रश्न विचारून या जिल्ह्यांसंबंधाने मीं केलेलें विधान चुकीचें आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. पण माझ्या जबाबांत हा जिल्हा पूर्णपणें तयार आहे असें विधान मीं केलेंच नव्हतें. तयार करण्याला या जिल्ह्याची परिस्थिती अनुकूल आहे एवढेंच माझें म्हणणें होतें. ही गोष्ट राजगोपाळाचार्य यांनी आपल्या तपासणींत स्पष्ट करून घेतली. १९३० सालच्या चळवळींत या जिल्ह्यांतील अंकोला तालुक्यांतील कांही खेड्यांत करबंदीची चळवळ झाली. बाहेरच्या पुढाऱ्यांच्या किंवा बाहेरच्या मदतीशिवाय त्याच खेड्यांच्या रयत लोकांनी ती चालविली होती. त्यांच्या मदतीला प्रांतिक कॉंग्रेस कमिटीतर्फे धारवाडचे करमरकर हे कांही दिवस होते. त्यांनी तेथे बरीच खटपट केली. तथापि चळवळीचें श्रेय बहुतेक अंशीं स्थानिक लोकांनाच आहे. अंकोला तालुक्यांत नाडवर या जातीचे लोक आहेत व त्यांची वस्ती जास्ती असलेलीं कांही गावें आहेत; त्या बहुतेक सर्व गावांतून पूर्वी करबंदीची चळवळ झाली होती. गांधी-आयर्विन तहनामा होईपर्यंत ती टिकून राहिली होती. त्याचप्रमाणे १९३२ च्या चळवळींत याच खेड्यांनी व शिद्दापूर तालुक्यांतील लोकांनी करबंदीची चळवळ हातीं घेतली व ती अद्यापि चालू आहे. यावरून माझें म्हणणें बरोबर होतें असें अनुभवाला आलें. याबद्दलची हकीकत पुन्हा १९२९ व १९३२ सालच्या हकीकतींत येईल.

सोलापूरला जगन्नाथराव सामंत या नावाचे एक वकील होते व ते तेथील नाफेर पक्षाचे पुढारी होते. त्यांना पुण्यास साक्षीला जातां आलें नाही. म्हणून विजापुरास आपली साक्ष व्हावी असें त्यांनी कमिटीचे अध्यक्ष हकीम अजमलखान यांना लिहिलें होतें. तेव्हां हकीमसाहेबांनी मला सामंत कोणत्या मताचे आहेत असें विचारलें व नाफेर पक्षातर्फे त्यांची साक्ष होण्यासारखी असेल तर त्यांना बोलवा, तसें नसेल तर त्यांची साक्ष घेतां येत नाही असें कळवा, असें माझ्याजवळ ते बोलले. त्यावरून मीं तार करून त्यांना बोलाविलें व त्यांची साक्ष नाफेर पक्षातर्फे झाली. ही गोष्ट नमूद करण्याचें कारण इतकेंच कीं, हकीमसाहेब हे नाफेर पक्षाचेच होते व त्या धोरणानेच काम चालवीत असत. विजापुरास बहुतेक पुढाऱ्यांचीं भाषणें झालीं. मोतीलालजी पुण्याहूनच आपल्या मुलेची तब्येत बिघडल्याचें कळल्यावरून अलाहाबादला परत गेले होते. त्यामुळे ते विजापूरला आले नव्हते. विजापूरचें काम संपल्यानंतर कमिटीचा गदग येथे पाचसहा

तास मुक्काम झाला आणि तेथे व्याख्यानें होऊन कमिटीची मंडळी बल्लारी मार्गानें मद्रासकडे गेली व मी बेळगावला परत आलों.

कमिटीचें दौऱ्याचें काम संपेपर्यंत विठ्ठलभाई पटेल यांच्याखेरीज इतर मंडळींचीं मतें नाफेर पक्षाकडेच होतीं. पण अखेर रिपोर्टावर सह्या होण्याच्या वेळीं कमिटीच्या सभासदांत मतभेद झाला व मोतीलालजी, पटेल आणि हकीम अजमलखान यांनी फेर पक्षातर्फे आपले मत दिलें; व बाकीच्या चौघांनी नाफेर पक्षातर्फे आपलीं मतें नमूद केलीं. पटेलांसंबंधाने कोणाला कांही वाटलें नाही. पण बाकीच्या दोघांनी आयत्या वेळीं आपलीं मतें बदललीं याचें सर्वांना आश्चर्य वाटलें.

## *ब्राह्मण–लिंगायत तंट्याचें मूळ*

याच संधीला विजापूरचे श्रीनिवासराव कौजलगी यांचेवर क्रि. प्रो. कोड कलम १०८ प्रमाणे काम चालून त्यांना एक वर्षाची साधी कैद झाली. मी त्या वेळीं विजापूरला गेलों होतों. त्यांना शिक्षा झाली त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्याकरिता व सरकारच्या निषेध करण्याकरिता तेथील अंगडी वकील यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. त्यांत माझें भाषण झालें. अंगडी हे लिंगायत असून त्या वेळीं बरेच उत्साही व होतकरू कार्यकर्ते होते. पण हल्ली त्यांच्या मतांत परिवर्तन होऊन ते कॉंग्रेसच्या कामांत भाग घेत नसतात. कौजलगी यांच्याकरिता भरलेल्या सभेत अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या भाषणाबद्दल त्यांची सरकारकडून कांही कानउघाडणी झाली असें म्हणतात.

कौजलगी यांचा खटला चालू असतांना बेळगाव जिल्ह्यांतील अथणी येथे लिंगायत व ब्राह्मण या दोन जातींमधील तंटा विकोपाला गेला होता व त्याचा परिणाम कर्नाटकांतील बहुतेक ठिकाणच्या लिंगायत व ब्राह्मणांवर थोडाबहुत होत होता. एका क्षुल्लक बाबीवरून तंटा तीसचाळीस वर्षे चालला होता व वारंवार दोन्ही जातींमध्ये मारामाऱ्यांचे देखील प्रसंग येत असत. दिवाणी फौजदारी खटल्यांच्या पायीं लाखों रुपयांची नुकसानी झाली होती. तंट्याचें कारण असें होतें की, शिवदेवतेचें महत्त्व अधिक की विष्णूचें महत्त्व अधिक असा प्रश्न व्यासांच्या पुढे कोणीं एकाने मांडला आणि त्याचें उत्तर देतांना व्यासांनी आपला उजवा हात उंच करून विष्णु दैवत श्रेष्ठ असें मत दिलें. हें शिवाचा भक्त नंदी याला सहन न होऊन त्याने व्यासांनी उंच केलेला हात तोडला. तेव्हा व्यासांनी नंदीची प्रार्थना केली व शिव मोठा हें कबूल केलें, व आपल्या या बदललेल्या मताचें निदर्शक म्हणून रुद्रपुराण लिहून शिवाची श्रेष्ठता स्थापन केली. त्यामुळे नंदीच्या प्रसादाने पुन्हा व्यासाला हाताची प्राप्ती झाली. लिंगायत हे कट्टे शिवभक्त असल्याने व त्यांच्या धर्माचे संस्थापक किंवा उद्धारक बसवण्णा हे नंदीचे अवतार असें मानण्याचा संप्रदाय असल्यामुळे आपल्या देवतेचें वर्चस्व दाखवण्याकरिता या कथेच्या आधारावर फडक्याचा एक हात करून तो एका उंच काठीला बांधून त्याची मिरवणूक

काढण्याची चाल कांही कांही ठिकाणीं कर्नाटकांत चालू झाली. पण कर्नाटकांतील माध्व हे कट्टे विष्णुभक्त असल्याने त्यांना हें सहन झालें नाही. जेथे जेथे या दोन जातींचें वर्चस्व होतें त्या त्या ठिकाणीं या मिरवणुकीबद्दल वाद चालू झाले. या मिरवणुकीला कानडींत 'व्यासन तोळा'ची मिरवणूक म्हणतात. (व्यासन म्हणजे 'व्यासाची' व 'तोळ म्हणजे हात). या काळांतदेखील शहाणे म्हणविणारे लोक अशा दंतकथांवर विश्वास ठेवतात व अभिमानाला पेटून दुही माजवितात हें पाहून आमच्या समाजाची कीव येते.

## असहकारितेचा उपाय

असहकारितेच्या ऐन भराच्या काळीं अथणीस हा वाद विकोपाला गेला होता. मुंबई सरकारने ही मिरवणूक बंद ठेवण्याचा निकाल दिला होता. लिंगायत लोकांनी दिवाणी कोर्टांत दावा केला होता. याच वेळीं कोल्हापूरच्या प्रोत्साहनाने सत्यशोधक चळवळीला महाराष्ट्रांत जोर आला होता व त्याची लाट आमच्या जिल्ह्यांतही पसरत चालली होती. अथणीच्या लिंगायत लोकांनी सत्यशोधकांच्या मदतीने त्यांचे जलसे खेड्यापाड्यांतून चालू केले. त्यामुळे अथणीच्या कांही ब्राह्मण प्रमुख वकील व प्रतिष्ठित लोकांवर फौजदारी खटले झाले होते व कांही ब्राह्मणांनी लिंगायतांवर खटले केले होते आणि हीं सर्व प्रकरणें चालू होतीं.

असहकारितेच्या चळवळीचा प्रसार करण्याकरिता आम्ही जेथे जेथे जात होतों तेथे तेथे हें अथणी प्रकरण आमच्या आड येत असे. तेव्हा कसेंही करून हें प्रकरण आपसांत मिटवावें असें माझ्या व कौजलगी यांच्या मनांत आलें आणि त्याप्रमाणे आम्ही दोघेही मिळून विजापूरहून अथणीला गेलों. एक दिवस व एक रात्र खटपट करून दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांना देशस्थितीकडे लक्ष देऊन हा तंटा मिटविण्याचा आम्हीं आग्रह केला. मुंबई सरकारचा निकाल ब्राह्मणांच्या बतीने झाला होता, त्यामुळे ब्राह्मण जोरांत होते. पण त्यांपैकी बरेच कॅांग्रेसचे अनुयायी असल्यामुळे आमचें बोलणें त्यांना पटलें आणि आम्ही सांगू ती तडजोड मान्य करण्याला ते प्रथम तयार झाले. त्याचप्रमाणे कांही लिंगायत कॉंग्रेसभक्तांच्या प्रयत्नाने लिंगायत लोकांचीं मनेंही वळविण्यांत आलीं. वर्षांतून दोनतीन प्रसंगीं ज्या भागांत ब्राह्मण लोकांची वस्ती नाही अशा भागांतून 'व्यासन तोळ'ची मिरवणूक काढावी आणि चालू सर्व दिवाणी फौजदारी खटले परत घेण्यांत यावेत असें ठरवून, ठरावावर दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांच्या सह्या घेतल्या. अथणीस दोन्ही समाजांना पूज्य असलेल्या एका विरक्त स्वामींची समाधी आहे. त्या समाधीजवळ दोन्ही पक्षांच्या लोकांनी आपली दिलजमाई झाली अशी मान्यता दिली व हें प्रकरण मिटलें. नंतर मी व कौजलगी दोघेही विजापूरला आलों. पुढे एकदोन दिवसांतच कौजलगी यांना शिक्षा झाली.

## देशांतील वाढते मतभेद

सिव्हिल डिस्ओबीडिअन्स कमिटीचा रिपोर्ट झाल्यानंतर त्याचा विचार करण्याकरिता कलकत्त्यास ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी बोलावण्यांत आली होती. या रिपोर्टमुळे देशांत बरीच धांदल उडाली होती. कांही प्रांत खेरीज करून प्रत्येक प्रांतांत मतभेदाची व वादाचीच लाट उसळली होती. दासबाबूंचीही सुटका झाली होती व त्यांचें मतही फेरपक्षाकडे झालें होतें. मोतीलालजी व दास हे दोघेही असहकारितेच्या चळवळीचे पुरस्कर्ते होते. व दोघांनी आपली वकिली सोडून स्वार्थत्यागाचें उच्च उदाहरण घालून दिलें होतें. दोघांनाही तुरुंगवास भोगावा लागला होता. त्यामुळे १९२१ च्या चळवळीला बरेंच महत्त्व आलें होतें. पण या दोघांही पुढाऱ्यांचें एकमत होऊन असहकारितेच्या कार्यक्रमांत फेरबदल करण्याचें व कौन्सिल-बहिष्कार उठविण्याचें कार्य त्यांनी हातीं घेतलें. कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींत बाहेर दिसेल अशी दुही झाली नव्हती. राजगोपाळाचार्य, वल्लभभाई पटेल, कोंडा वेंकटाप्पया, राजेंद्रप्रसाद व मी अशा पाच जणांची तर अगदी कट्टरांत गणना केली जात असे. आमच्या म्हणजे तामीळनाड, आंध्र, गुजरात, बिहार व कर्नाटक या प्रांतांत या प्रश्नांवर म्हणण्यासारखा मतभेद नव्हता. महाराष्ट्रांत वाद बराच भराला आला होता. महाराष्ट्रापुरती कांही तरी तडजोड करण्याकरिता एक कमिटी नेमण्यांत आली होती, आणि तींत डॉ. मुंजे, अणे, केळकर, खाडीलकर, वैद्य, परांजपे व मी असे मेंबर होतों. आमची एक सभा मुंबईस सरदारगृहांत झाली. पुष्कळ वाटाघाट झाली. पण कौन्सिल-बहिष्काराच्या प्रश्नावर एकमत होईना. त्यामुळें समेटाचा प्रश्न मागे पडला.

## कोऱ्या कागदाची कहाणी

याच बाबतींत केळकर एकदा बोलता बोलता असें म्हणून गेले होते कीं, "मी कोऱ्या कागदावर सही करून तो गंगाधररावांकडे देतों. त्यांनी त्यांना पसंत असेल तो निकाल द्यावा. तो मान्य करण्यास मी तयार आहें." ते याप्रमाणे बोलले ही गोष्ट खरी आहे. पण हें त्यांचें बोलणें केवळ गौरवार्थ असावें असें मला वाटलें. जसें एखादा पाहुणा आपल्या घरीं आला म्हणजे त्याचा पाहुणचार करण्याकरिता त्याला आपण "घर आपलं आहे, भीडभाड करूं नये" असें म्हणतों, त्याच नमुन्याचें केळकरांचें बोलणें असावें असा माझा ग्रह झाला. "घर आपलें आहे" असें पाहुण्याला उद्देशून बोलल्याबरोबर तोच पुरावा असें समजून त्याच्या आधारावर कोणीही पाहुणा आपलें आदरातिथ्य करणाऱ्याच्या घरावर आपला हक्क शाबीत करण्याच्या खटपटींत पडत नाही व एखाद्याने ती केली तरी ती मानली जाणार नाही. तीच स्थिती माझी झाली व मी केळकरांकडे कोऱ्या कागदावर सही मागितली नाही. केळकरांसारखे कर्तृत्ववान अनुभवशीर पुढारी माझ्यासारख्या अननुभवी मनुष्याच्या

बुद्धीवर विश्वास टाकून आपल्याला प्रामाणिकपणें महत्त्वाचीं वाटणारीं मतें टाकतील ही कल्पना मला कशीशीच वाटली. पण केळकरांनी 'केसरी'त 'कोऱ्या कागदाची कहाणी' या मथळ्याखाली एक अग्रलेख लिहिला व महाराष्ट्रांतील वादाचें खापर माझ्या डोकीवर फोडण्याचा प्रयत्न केला. पण खरोखरच मी केळकरांकडे कोऱ्या कागदावर सही मागावयाला गेलों असतों तर त्यांनी माझी वेडयांतच गणना केली असती, असें कोणालाही वाटेल. सही करून त्यांनी असा एखादा कागद दिला असता असें मानलें तरी त्या-प्रमाणे ते चाललेच असते किंवा नाही ही एक शंकाच आहे. त्यानंतर केळकरांचीं अनेक बाबतींत स्थित्यंतरें झालेलीं आहेत, ही सर्वांच्या अनुभवाची गोष्ट आहे. त्यांचा उल्लेख मी करीत नाही. त्यांना तसें करण्याचा हक्क नव्हता व त्यांना प्रामाणिकपणाने जें योग्य वाटलें तें करण्यांत त्यांनी चूक केली, असेंही मी म्हणत नाही. पण कोऱ्या कागदाच्या कहाणीला 'केसरी'त अग्रस्थान देऊन महाराष्ट्रांतील वादाची जबाब-दारी दुसऱ्यावर टाकण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला तो बरोबर नव्हता एवढेंच माझें म्हणणें आहे.

### कंटाळवाणा वादविवाद

सिव्हिल डिसओबीडियन्स कमिटीच्या रिपोर्टाचा विचार करण्याकरिता कलकत्यास ऑ. इं. कॉं. कमिटीची सभा भरविण्यांत आली होती. दोन्ही पक्षांकडून बरेच लोक या सभेला हजर होते. दासबाबूंची अध्यक्षस्थानीं योजना झाली होती. त्यांच्याच बंगल्याच्या आवारांत सभेकरता मांडव घालण्यांत आला होता. फेरपक्षातर्फे मोतीलालजींनी पुढाकार घेतला होता. नाफेरपक्षातर्फे वल्लभभाई पटेल, राजगोपाळाचार्य हे प्रमुख होते. पाचसहा दिवसपर्यंत वादविवाद चालला. ठराविक मुद्दयांवर ठराविक भाषणें होऊं लागलीं. एकाने बोलावें तेंच दुसऱ्याने पण निराळ्या शब्दांनी बोलावें अशी स्थिती आली. बहुतेक मंडळींना वादविवादाचा कंटाळा आला. तथापि दासबाबूंनी ठराव मताकरिता मांडला नाही. फेरपक्षातर्फे अलाहाबादचे शामलाल नेहरू हे मताधिक्य मिळवण्याकरिता खूप खटपट करीत होते. तरी फेरपक्षाला बहुमत मिळण्याचा संभव दिसला नाही. तेव्हा पुढे लवकरच गयेला कॅंग्रेस भरावयाची होती तोपर्यंत रिपोर्टाचा विचार तहकूब करावा अशी सूचना आली. वर्किंग कमिटींत या सूचनेचा विचार झाला. त्या वेळीं मला स्वतःला ही सूचना पसंत नव्हती. ही सूचना मान्य करून रिपोर्टाबद्दल मत देण्याचें लांबणीवर टाकल्याने आम्हीं होऊनच आमच्या कार्यक्रमाबद्दल संशय उत्पन्न केल्यासारखें होतें असें मला वाटत होतें. पण वाटाघाट होऊन ही सूचना मान्य करण्याचें ठरलें. वर्किंग कमिटींतील दास, नेहरू, हकीमसाहेबखेरीज इतर मंडळींतही थोडी चलबिचल झाली होती. त्यामुळे या प्रश्नाचा निकाल लांबणीवर टाकण्याचा ठराव मंजूर झाला.

## निवडणुकीच्या तक्रारींची चौकशी

महाराष्ट्र व मराठी मध्यप्रांत यांतील प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांच्या व ऑ. इं. कॉंग्रेस कमिटीच्या निवडणुकी कायदेशीर झाल्या नाहीत अशा तक्रारी वर्किंग कमिटीपुढे आल्या होत्या. त्यांची चवकशी करण्याकरिता मी व सेनगुप्त यांची वर्किंग कमिटीने नेमणूक केली. सेनगुप्त हे फेरपक्षातर्फे होते. प्रथम महाराष्ट्राच्या तक्रारींची चवकशी करण्याचें आम्हीं ठरविलें. जमनादास मेथा हे त्या वेळीं महाराष्ट्र प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष होते. ते फेरपक्षाचे होते. प्रांतिक कॉंग्रेस कमिटींत व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत त्यांच पक्षाचें बहुमत होतें. या प्रकरणाची चवकशी आम्हीं मुंबईस केली. बऱ्याच लोकांच्या साक्षी घेण्यांत आल्या. कोर्टांत मोठ्या ईर्षेने जसा एखादा खटला लढला जातो त्याप्रमाणे या चवकशीला स्वरूप आलें. तेव्हा माझ्या मनांत कांही तडजोड निघाल्यास कॉंग्रेसचें काम सुरळीत चालेल असें वाटलें. वास्तविक ज्या लोकांना कॉंग्रेसचा कार्यक्रम मान्य नव्हता त्यांनी कॉंग्रेसच्या पोटकमिट्यांवरील अधिकाराच्या जागा (executive posts) आपल्याकडे घेणें गैर होतें. कॉंग्रेसचे ठराव बदलून घेण्याचा अधिकार प्रत्येक कॉंग्रेसच्या अनुयायाला आहे, पण कॉंग्रेसच्या ठरावांत फेरबदल करूं इच्छिणाऱ्यांनी कॉंग्रेसचे ठराव अंमलांत आणण्याकरिता ज्या कमिट्या नेमलेल्या असतात त्या आपल्या ताब्यांत ठेवणें योग्य नाही. महाराष्ट्र, वऱ्हाड, व मराठी मध्यप्रांत यांतील कॉंग्रेस कमिट्यांची स्थिती अशी होती कीं, कमिट्यांतील सर्व अधिकारी कॉंग्रेसच्या धोरणाविरुद्ध होते ! त्यामुळे कॉंग्रेसचे ठराव अमलांत आणणें त्या प्रांतांत कठीण होऊं लागलें. म्हणून महाराष्ट्रांत कॉंग्रेसच्या अनुयायांनी दुसरी एक संस्था काढावयाचें व तिच्यामार्फत कॉंग्रेस कामचें चालविण्याचें ठरविलें होतें. ही आपत्ती टाळण्याकरिता एक तोड सुचविण्यांत आली. ती ही होती कीं, ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधी दोन्ही पक्षांतर्फे निम्मे-निम्मे असावेत व प्रांतिक कॉंग्रेस कमिटी तशीच चालू ठेवावी. पुढे गया कॉंग्रेसनंतर वर्किंग कमिटीपुढे हा प्रश्न मीं काढला. मध्य प्रांतांतील सर्व निवडणुकी रद्द केल्या व नव्या निवडणुकी कराव्यात असा ठराव झाला. तथापि या निवडणुकी लवकर होऊं न देण्याच्या हेतूने शक्य तितके अडथळे उत्पन्न करण्यांत आले. महाराष्ट्र प्रांतिक कमिटीच्या अध्यक्षांनीदेखील तडजोडीप्रमाणे वागण्याचें किती दिवस तरी लांबणीवर टाकलें !

## राजगोपाळाचार्य यांची कुशाग्रबुद्धी

गयेच्या कॉंग्रेसमध्ये दोन्ही पक्षांची जय्यत तयारी होती. बिहार प्रांत नाफेरपक्षाचा होता आणि त्याच प्रांतांत कॉंग्रेस असल्यामुळे वातावरण नाफेरपक्षाला जास्ती अनुकूल होतें. कर्नाटक, आंध्र, तामीळ, गुजरात या प्रांतांत बहुतेक एकमत होतें, व त्यांनी आपल्या भाषणांत त्याच मताचें समर्थन केलें

होतें. विषयनियामक कमिटींत खूप खडाजंगीचा वाद या प्रश्नावर होत होता. दास, मोतीलाल यांच्या तोलाचा पुढारी नाफेरपक्षांत कोणी नव्हता. नाफेरपक्षाचें नेतृत्व राजगोपाळाचार्य यांचेकडे देण्यांत आलें होतें. राजगोपाळाचार्य हे तामीळ प्रांतांत एक प्रमुख कार्यकर्ते आहेत, एवढीच त्यांच्याबद्दल लोकांना माहिती होती. आणि, प्रसंग तर मोतीलाल, दास, विठ्ठलभाई यांसारख्या कसलेल्या व प्रख्यात पुढाऱ्यांशीं सामना करण्याचा. असहकारितेच्या चळवळीचे हे आधारस्तंभ होते आणि मोतीलाल व दास यांनी अत्यंत स्वार्थत्याग केला होता तेव्हा त्यांची प्रतिष्ठा सर्व बाजूंनी श्रेष्ठ होती. वादविवाद करण्यांत व युक्तिप्रयुक्ती लढवण्यांत ही मंडळीं अगदी तरबेज होती. मोतीलालजी प्रतिनिधींच्या निवासस्थानीं जाऊन आपल्या मताच्या समर्थनार्थ रात्रीं भाषणें करीत असत व त्याचा परिणाम लोकांवर होत असे. तेव्हां अशा स्थितींत आमच्या पक्षाचा निभाव कसा लागणार अशी काळजी आम्हाला वाटत होती. तथापि राजगोपाळाचार्य यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीची कमाल केली आणि वादांत ज्यांचा ठराव नापास होईल त्या पक्षाने राजीनामा द्यावा व दुसऱ्या पक्षाने कमिट्या चालवाव्या ही तोड दोन्ही पक्षांना मान्य झाली आणि तंटा तेवढ्यापुरता तरी मिटला.

### चौकशी कमिटीच काम व अनुभव

यानंतर मध्य प्रांताच्या चवकशीकरिता मी व सेनगुप्ता वर्ध्यास गेलों. वर्ध्यास जमनालालजींच्या वाड्यांत आम्ही उतरलों होतों. तेथेही दोन्ही पक्षांत बरीच चुरस दिसून आली. फेरपक्षातर्फे डॉ. मुंजे, अभ्यंकर वगैरे मंडळी होती आणि नाफेर पक्षातर्फे बाबासाहेब देशमुख, घटवाई, पुनमचंद, भगवानदीन वगैरे मंडळी होती. मुंजे प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांच्याच कर्तबगारीने सर्व निवडणुकी फेरपक्षातर्फे झाल्या होत्या, आणि त्या नियमांना सोडून इतक्या प्रमाणांत झाल्या होत्या की, नव्या निवडणुकीच करणें योग्य होतें, असें माझें मत होतें. पण सेनगुप्तांना माझें मत पसंत पडलें नाही. येथेही महाराष्ट्राप्रमाणे कांही तरी तडजोड व्हावी अशी माझी इच्छा होती. पण तें जुळलें नाही. सेनगुप्तांनी आपला अभिप्राय लिहिल्यानंतर मीं माझा अभिप्राय द्यावा असें आमच्यामध्ये ठरलें. पण त्यांनी गयेच्या काँग्रेसपर्यंत आपला अभिप्राय दिला नाही. पण गयेस मध्यप्रांतांतील सर्व निवडणुकी कायदेशीर आहेत असा रिपोर्ट नियोजित अध्यक्ष दास यांच्याकडे पाठवला. मला तो रिपोर्ट पाहण्यालादेखील त्यांनी दिला नव्हता. मीं दासांना गयेला जाऊन भेटलों व तक्रार केली. पण काँग्रेसच्या धांदलींत त्यांनी ती मनावर घेतली नाहीं. त्यामुळे गयेच्या काँग्रेसमध्ये मराठी मध्यप्रांतातर्फे एकही नाफेर पक्षाचा प्रतिनिधी नव्हता. महाराष्ट्रांतील तडजोडीमुळे व त्या प्रांतांतील निवडणुकीच्या विशिष्ट पद्धतीमुळे दोन्ही पक्षांचे लोक प्रतिनिधींत होते. काँग्रेसमध्ये फेरपक्षाचें मताधिक्य व्हावें याबद्दल मुंजे वगैरे मंडळीं अत्यंत आतुर होती. त्यामुळे तडजोड करावयाची नाही असा त्यानी आग्रह धरला व फेरपक्षाचे अध्वर्यु दासबाबू हे अनुकूल झाल्यामुळे

हार गेले नाहीत. त्यांना हिंदी येत नसल्याकारणानें त्यांचीं भाषणें सर्वांना समजण्यासारखीं नव्हतीं. तरी इंग्रजी जाणणाऱ्या लोकांवर त्यांनी आपली छाप उत्तमप्रकारें पाडली. चर्चेनंतर ऑल इंडिया कमिटींत मतें घेण्यांत आलीं आणि बहुमत नाफेरपक्षातर्फे झालें. पुढे कॉंग्रेसच्या मोठ्या बैठकींतही प्रचंड बहुमतानें नाफेर ठरावच मंजूर झाला. गयेच्या कॉंग्रेसच्या वेळीं राजगोपाळाचार्य यांनी जी कामगिरी केली तीमुळे अखिल भारतीय पुढाऱ्यांमध्ये त्यांची गणना झाली.

### *स्वराज्यपक्षाची स्थापना*

अशा प्रकारें फेरपक्षाचा डाव जरी कॉंग्रेसमध्ये फसला तरी त्यामुळे स्वस्थ बसण्यासारखे ते नव्हते. त्यांनी त्याच वेळीं मोतीलाल व दास यांच्या नेतृत्वाखाली एक निराळा पक्ष स्थापन केला व त्याचें नाव स्वराज्य पक्ष असें ठेवलें. दासबाबूंचा हात स्वराज्यपक्ष स्थापन करण्यांत असल्यामुळे व त्या पक्षाचा उद्देश कॉंग्रेसने ठरवलेल्या कार्यक्रमांत फेरबदल घडवून आणण्याचा असल्यामुळे त्यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. ही गोष्ट त्यांनी केली ती सरळच होती. वास्तविक आम्हीं (वर्किंग कमिटीने) तो राजीनामा मंजूर करून त्यांचे जागीं दुसऱ्याची नेमणूक करून काम चालू करणें हें आमचें कर्तव्य होतें. पण आम्हीं तसें केलें नाही आणि दास यांनीच अध्यक्ष राहावें असा त्यांना आग्रह करून त्यांना राजीनामा परत घेण्याला विनंती केली. त्यांनी ती मान्य केली. नवीन वर्किंग कमिटींत सर्वच एकमताचे नव्हते. मतभेदांची खिचडी करण्यांत आली. त्यामुळे एकसूत्रानें काम चालेना. वर्किंग कमिटीच्या कांही सभासदांनी कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणे काम करावें व कांहीनी या ठरावाच्या विरुद्ध मतप्रसाराचें काम करावें असा घोटाळा व विसंगतपणा उत्पन्न झाला आणि लोकांत बुद्धिभेद होण्याला प्रारंभ झाला. या प्रतिकूल परिस्थितींतदेखील १९२१ सालीं निघालेल्या राष्ट्रीय शिक्षणासारख्या संस्था टिकून राहिल्या, खादीचा प्रसार वाढला, व टिळक स्वराज्य फंडांत बरीच मोठी भर पडली. वर्किंग कमिटी एकदिलाची व एकसूत्रीच निवडली जाणें शक्य होतें. पण उलट बाजूच्या मोतीलाल व दास या सारख्या पुढाऱ्यांच्या महत्त्वाचा व त्यांच्या मोठेपणाचा त्याग करून, स्वतःच्या पायावर उभे राहण्याची हिंमत आम्हांला झाली नाही. सर्व मिळून काम करणें शक्य आहे असें आम्हांला वाटलें आणि मतभेद असले तरी वर्किंग कमिटींत आमचें माताधिक्य असल्याने आमच्याच धोरणाने शेवटीं काम चालेल असा आम्हांला भ्रम झाला. त्यामुळे कॉंग्रेसची अमलबजावणी करणारी मुख्य मध्यवर्ती संस्था कमजोर झाली; व याच भांडणाला महत्त्व येऊन मुख्य चळवळ मागे पडत चालली. शिवाय असहकारितेच्या कार्यक्रमापेक्षा कौन्सिलांत जाऊन सरकारला विरोध करण्याचा कार्यक्रम बराच सोपा असल्यामुळे लोकांना—निदान सुशिक्षित लोकांना तो पटूं लागला. या स्थितींतदेखील, वर जे प्रांत नमूद केले आहेत त्यांमध्ये स्वराज्य पक्षाचें पाऊल फारसें जोरांत पुढें पडलें नाही.

कर्नाटकांत तर स्वराज्य पक्ष स्थापण्यांत आलाच नाही. कॉंग्रेस हीच मुख्य संस्था व तिच्याच धोरणाने चालवयाचें, याच मताचें वर्चस्व कर्नाटकांत राहिलें. कर्नाटकाचा व महाराष्ट्राचा बराच जवळचा संबंध; आणि टिळकांबद्दल कर्नाटकांत आदर असल्यामुळे 'केसरी'चा प्रसार पुष्कळ होता तरी या प्रसंगीं कर्नाटकाच्या धोरणांत अंतर पडलें नाही. हें धोरण कायम राहावें म्हणून मीं कर्नाटक प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचा अध्यक्ष म्हणून आणि वर्किंग कमिटीचा सभासद या नात्याने बरेच परिश्रम केले व कर्नाटकानेही मला पूर्ण पाठिंबा दिला.

### *गोविंदराव याळगींचें अकालीं निधन*

याच संधीला माझ्यावर एक आपत्ती आली. ती म्हणजे ज्यांच्या आधारावर मी अनेक संकटांतून निभावलों होतों ते माझे स्नेही गोविंदराव याळगी यांचा आजार. कलकत्त्याच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीला ते हजर होते. तिकडून परत येतांना ते व मी मिळून काका कालेलकरांच्या भेटीला अहमदाबादला गेलों होतों. तेथे त्यांना एक करट झालें. तें तेथेंच कापविण्यांत आलें. पण रक्त फार गेलें व थोडा तापही आला. दोनतीन दिवसांनंतर त्यांना बरें वाटूं लागलें व आम्ही बेळगावला आलों. त्यानंतर त्यांना पुन्हा ताप येऊं लागला, व त्यांतच त्यांना क्षयाचा विकार जडला. चारपाच महिने त्यांनीं बेळगावांत काढले व त्यानंतर गदगची हवा चांगली व कोरडी म्हणून त्यांना तेथे नेलें. तेथे माझ्या बहिणीचे जावई डॉ. व्यंकटराव हुईलगोळ व डॉ. उमचगी यांनी बरीच मेहनत घेतली. मुंबईचे डॉ. वेलणकर यांना बेळगावांत व डॉ. भडकमकर यांना गदग येथे त्यांची प्रकृती दाखवली होती. पण त्यांचें दुखणें अनावर होऊन ते ता. २७-९-३० रोजीं गदग येथेच वारले. त्यामुळे मला किती धक्का बसला हें शब्दांनी सांगतां येणें शक्य नाही. या गोष्टीला आज दहा वर्षें होत आलीं. तरी त्यांचें स्मरण झाल्याखेरीज माझा एकही दिवस जात असेल असें मला वाटत नाही. त्यांच्या इतपत कळकळ असणाऱ्या, निःस्वार्थी, व कर्तबगार मनुष्याची मदत मला अद्यापि मिळाली नाही. त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन धाकट्या बंधूंनी व कुटुंबां-तील इतर लहानमोठ्यांनी माझ्याशीं तोच घरोब्याचा संबंध कायम ठेवला आहे, व सार्वजनिक कामाला कायावाचामनेंकरून शक्य ती मदत ते करीत असतात.

१९२४ सालीं बेळगावच्या कॉंग्रेसमध्ये याळगी घराण्याचीच मदत मला सर्वांत जास्ती झाली. १९३० सालच्या चळवळींत गोविंदरावांचे सर्वांत धाकटे बंधू जीवनराव व त्यांचे (गोविंदरावांचे) दोघे मुलगे व एक पुतण्या यांनी भाग घेतला होता, व त्यांना शिक्षाही झाल्या होत्या. १९३२ सालच्या चळवळींत जीवनराव हे बेळगाव जिल्हा सभेचे सर्वाधिकारी झाले. त्यांच्यावर हजेरीची नोटीस मोडल्याबद्दल खटला होऊन त्यांना अठरा महिन्यांची सक्तमजुरीची कैद व पाचशें रु. दंड झाला. ते नुकतेच कैदेंतून सुटले आहेत. राष्ट्रकार्याला वाहून घेणारीं कर्नाटकांत कांही घराणीं आहेत. त्यांत याळगींच्या

घराण्याला प्रमुख स्थान दिलें पाहिजे इतकें त्यांचेकडून कार्य होत आलें आहे व आजही होत असतें.

गोविंदरावांच्या लांबलेल्या आजारांत मला त्यांच्याजवळच शुश्रूषेकरिता राहावें लागत असे; व त्याच वेळीं कामाची निकड जास्ती होती. दोन्ही गोष्टी संभाळणें मला कठीण गेलें. त्यामुळे मानसिक त्रास झाला व मला बराच ताण पडला.

### *कॉंग्रेसमधील स्थित्यंतरें*

दासांच्या हातीं वर्किंग कमिटीचें मुख्य सूत्र असल्यामुळे गयेच्या कॉंग्रेसनंतर पुन्हा अलाहाबादेस ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी या प्रश्नाचा विचार करण्याकरिता बोलावली. आम्ही मोतीलालजींच्या आनंदभवनांत (हल्लीच्या स्वराज्य भवनांत) उतरलों होतों. या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींतही आपल्याला यश येणार नाही असें वाटून पुन्हा दोन महिन्यांनंतर या गोष्टीचा विचार करावा व त्या अवधींत दोन्ही पक्षांना आपापल्या मतप्रसाराची मुभा असावी, अशा प्रकारचा ठराव तडजोडीने मंजूर करण्यांत आला. त्यामुळे पुन्हा आमची कुवत व शक्ती कमी झाली.

पुढे मुंबईस पुन्हा ऑ. इं. कॉं. कमिटी दास यांनी भरविली. भवति न भवति होऊन कॉंग्रेसला कौन्सिलांत काम करणें हें मान्य नसलें तरी ज्यांना जावयाचें असेल त्यांना हरकत नसावी अशा प्रकारचा ठराव बहुमताने मंजूर झाला. हा ठराव मंजूर झाल्यानंतर आम्हीं (राजगोपाळाचार्य, वल्लभभाई, कोंडा व्यंकटप्पया, राजेंद्रप्रसाद, वगैरे) वर्किंग कमिटीचे राजीनामे दिले. नवी वर्किंग कमिटी निवडण्यांत आली. कौन्सिलप्रवेशाला अनुकूल असणारे कांही सभासद नव्या वर्किंग कमिटींत राहिले. त्याच दिवशीं हा ठराव कॉंग्रेसच्या ठरावाच्या धडधडीत विरुद्ध असल्यामुळे त्याविरुद्ध चळवळ करावी असें माझ्या मनांत आलें. या कामीं राजगोपाळाचार्य वगैरे मंडळीशीं मीं वाटाघाट केली. ज्या प्रांतिक कमिटींत चांगल्या बहुमताने या ठरावाविरुद्ध गया कॉंग्रेसच्या ठरावाला अनुकूल असा ठराव पास होण्याचा संभव असेल त्या प्रांतांत तसें करावें असें ठरलें. त्याबरोबर मीं धारवाडला कर्नाटक प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची सभा बोलाविली व राजगोपाळाचार्य यांना घेऊन धारवाडास गेलों. वाटेंत बेळगावास एक दिवस मुक्काम केला होता. राजगोपाळाचार्य यांचें भाषण जाहीर सभेंत माझ्या अध्यक्षतेखाली झालें. आम्ही दोघांनीही मुंबईच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या ठरावाच्या निषेधपर भाषणें केलीं व तसा ठराव मींच मांडला. असा ठराव मंजूर केल्यास कॉंग्रेसची शिस्त मोडल्यासारखी होईल अशी शंका कित्येक सभासदांना आली; व त्यांचीं मनें वळविणें हें मला व राजगोपाळाचार्य यांना बरेंच कठीण गेलें. मूळ ठरावांत कांही शाब्दिक फेरफार केल्यानंतर सर्वानुमतें तो पास झाला. ही हकीकत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. त्यानंतर आणखी कांही प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांतून अशाच स्वरूपाचे ठराव पास झाले. (कोणत्या कोणत्या प्रांतिक कमिट्यांनी हे ठराव पास केले तें बरोबर आठवत नाही.)

त्यानंतर या ठरावाचा विचार करण्याकरिता पुन्हा ऑ. इं. कॉं. कमिटी नागपूर येथे भरविण्यांत आली. त्या कमिटींत कर्नाटक व इतर प्रांतांविरुद्ध निंदाव्यंजक ठराव मांडण्यांत आला. त्याची चर्चा रात्रीं दोन वाजेपर्यंत होऊन तो ठराव बहुमताने नामंजूर झाला. त्याबरोबर पुन्हा कौन्सिलप्रवेशाला अनुकूल असलेल्या वर्किंग कमिटीच्या सभासदांनी (अध्यक्षांसहित) राजीनामे दिले व आमची पुन्हा निवडणूक झाली. कोंडा व्यंकटप्पया व मी अशीं दोघांचीं नावें अध्यक्षाच्या जागेकरिता सुचवण्यांत आलीं होतीं पण माझ्यापेक्षा कोंडा व्यंकटप्पयांना जास्ती मतें मिळालीं व त्यांची योजना झाली. पुन्हा वाद जोरांत आला. मुंबईच्या ऑ. इं. कॉं. कमिटीचा ठराव अद्यापि रद्द झाला नव्हता. या सर्व प्रकरणाचा निकाल एक स्पेशल कॉंग्रेस भरवून करून घेणें बरें असें आम्हांला वाटलें. ती मुंबईस भरविल्याने सर्वांना सोयीचें होईल, म्हणून मुंबईस ती भरविणें शक्य आहे किंवा नाही याचा विचार केला. सर्व प्रांतिक कमिट्यांपेक्षा मुंबईच्या प्रांतिक कॉंग्रेस कमिटीलाच सर्व गोष्टींची अनुकूलता असल्याने आम्हीं तेथेच ती भरवावी असें ठरविलें. या गोष्टीला ऑ. इं. कॉं. कमिटीची मंजुरी मिळवावी म्हणून कोंडा व्यंकटप्पयांनी आपल्या प्रांतांत विझगापट्टण येथे तिची सभा बोलाविली. या सभेस बरीच मंडळी जमली होती. पण दास वगैरे स्वराज्य पक्षाची प्रमुख मंडळी आली नाहीत. विजगापट्टणच्या सभेंत मुंबईस कॉंग्रेस भरवण्याचा ठराव पास झाला. पण स्वराज्य पक्षाला मुंबईस कॉंग्रेस नको होती. कारण मुंबईस गुजरात, कर्नाटक, आंध्र, तामीळ, वगैरे सर्वस्वी कौन्सिलबहिष्काराला अनुकूल असलेले प्रांत जवळ असून खुद्द मुंबईसदेखील आपल्या पक्षाला प्रतिकूल वातावरण आहे असें त्यांना वाटलें. त्यांनी मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्ष व वर्किंग कमिटीच्या एक प्रमुख सभासद सरोजिनीबाई यांचें मत आपल्याकडे वळवून घेतलें. विजगापट्टणास हा ठराव मंजूर होतांच बाईंनी मुंबईस स्पेशल कॉंग्रेस भरणें शक्य नाही असें ठासून सांगितलें. त्याचप्रमाणे सेक्रेटरीच्या जाग्यावर नेमले गेलेले दुग्गाल गोपाळ कृष्णया (आंध्र) यांनीही कॉंग्रेस मुंबईस भरवूं नये असा हट्ट धरला. यापूर्वी त्यांची व दास यांची भेट झाली होती व दास यांच्याकडून शेरवानी यांनी त्यांच्याकरिता कांही निरोप आणला होता.

### नागपूरचा झेंडा सत्याग्रह

या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन, वल्लभभाई नागपुरास होते त्यांच्याबरोबर विचार करून नक्की ठरवावें म्हणून आम्ही नागपुरास जाण्यासाठी निघालों. नागपुरास झेंडा-सत्याग्रह चालला होता. नागपूरच्या सिव्हिल लाईनमध्ये कॉंग्रेसचा झेंडा घेऊन जाण्याला मनाई करण्यांत आली होती; व त्या बाबतींत सत्याग्रह पुकारण्यांत आला होता. सर्व प्रांतांतील लोकांनी या सत्याग्रहांत भाग घेतला होता. आमच्या प्रांतांतील प्रमुख कार्यकर्त्यांपैकी डॉ. हर्डीकर, धारवाडचे श्रीनिवासराव जोग व बरेच स्वयंसेवक या सत्याग्रहास गेले होते. या चळवळीचें नेतृत्व जमनालालजी यांचेकडे

होतें. त्यांना शिक्षा झाल्यानंतर वर्किंग कमिटीकडून वल्लभभाईंची नेमणूक त्यांच्या स्थानीं झाली होती. या सत्याग्रहामुळे काँग्रेसच्या चळवळीला जोर येत चालला होता. स्वराज्य पक्षाच्या मंडळींची वृत्ती या सत्याग्रहांत तटस्थ होती. तथापि यशाचा वाटा आपल्याही पदरांत पाडून घेण्याकरिता 'बीच में मेरा चांद्भाई' म्हणून विठ्ठलभाई नागपुरास कांही दिवस जाऊन राहिले होते. स्थानिक स्वराज्य पक्षाचे पुढारी डॉ. मुंजे वगैरे मंडळी प्रतिकूलच होती, असें म्हणण्यास हरकत नाही. हा सत्याग्रह कसा काय चालला आहे हें पाहणेंही आम्हांला जरुरीचें वाटलें; म्हणून आम्हीं नागपूरला जाण्याचा बेत ठरविला होता.

त्या वेळीं मध्यप्रांत सरकारचे होम मेंबर मोरोपंत जोशी हे होते. त्यांच्या मध्यस्थीने हा लढा मिटवावा अशी खटपट चालली होती. झेंडा नेण्याला मना केलेल्या जागीं आम्ही गेलों होतों. तेथे हजारों लोक जमत असत. गावांतील शिबिरांतून झेंडा घेऊन सत्याग्रही निघत असत. या ठिकाणीं आल्याबरोबर त्यांना अटक करण्यांत येत असे. असा नित्यक्रम चालू होता. स्वाभिमानाचा भंग न होतां कांही तडजोड निघाल्यास ती मान्य करावी असाच सर्वांचा विचार ठरला. नागपुरास राजगोपाळाचार्य, राजेंद्रबाबू व मी अशीं तिघांचीं जाहीर सभेंत सत्याग्रहावर भाषणें झालीं. सभेंत अतिशय उत्साह होता. तेथून आम्ही मुंबईस आलों. पुष्कळ वाटाघाटीनंतर स्पेशल काँग्रेस मुंबईस भरविण्याचा विचार रद्द केला व दिल्लीस ती भरविण्याचें ठरविलें.

### काँग्रेसचे अध्यक्ष महमदअली

कोकोनाडाच्या वार्षिक काँग्रेसच्या बैठकीच्या पूर्वीं ही जादा काँग्रेस भरविण्याचा हेतू हा होता की, कौन्सिलप्रवेशाच्या प्रश्नाचा निकाल निवडणुकीपूर्वी होणें जरूर होतें. कोकोनाडा काँग्रेसच्या पूर्वीं महंमदअल्लींची सुटका होणार होती. कोकोनाडा काँग्रेसचें अध्यक्षस्थान त्यांनाच देण्याचें सर्व प्रांतिक काँग्रेस कमिट्यांनी ठरविलें होतें. तुरुंगांत असतांना त्यांचें मत कौन्सिलप्रवेशाच्या विरुद्ध होतें, अशा बातम्या आल्या होत्या. त्यांना विजापूर जेलमधून स्पेशल गाडीने येथे नेऊन सोडण्यांत आलें. ज्या दिवशीं त्यांना विजापूरहून नेण्याचें ठरलें होतें तो दिवस आगाऊ मला माहीत झाला होता. म्हणून त्या दिवसापूर्वी दोन दिवस विजापूरला मी गेलों होतों. तुरुंगांत त्यांची भेट घेणें शक्य झालें नाही; तेव्हा वेळ साधून स्टेशनावर भेट घ्यावी असा प्रयत्न मीं केला व त्यांत मला यश आलें. स्टेशनावर त्यांना आणतांच मी त्यांना भेटलों. ते बरेच अशक्त दिसत होते. त्यांचा पोषाख कैद्याचा होता. त्यांनी गळ्यांत कुराणाचें पुस्तक अडकविलें होतें. स्टेशनावर मी भेटल्याबरोबर त्यांनी मला मिठी मारली. त्यांना कोकोनाडा काँग्रेसचे अध्यक्ष निवडण्यांत आल्याची बातमी मीं त्यांना सांगितली आणि विजापुरास आमची प्रांतिक परिषद भरावयाची होती त्या परिषदेचें आमंत्रण दिलें व परत बेळगावास आलों.

यानंतर श्रीनिवासराव कौजलगी यांची सुटका झाली. त्या वेळीं मी पुन्हा विजापुरास

गेलों होतों. विजापूरच्या परिषदेच्या अध्यक्षस्थानीं राजगोपाळाचार्य यांची योजना करण्यांत आली व स्वागताध्यक्ष कौजलगी यांना निवडण्यांत आलें. दिल्लीच्या जादा काँग्रेसपूर्वीही परिषद् भरत असल्यामुळे कर्नाटकाचें मत प्रदर्शन करण्याला ही संधी चांगली मिळाली होती. त्याचप्रमाणे महंमदअल्लींच्या मताला त्या वेळीं विशेष महत्त्व असल्यामुळे, त्यांचें मत काय आहे हें समजून घेण्याला या परिषदेच्या योगाने सवड मिळाली होती.

ठरल्याप्रमाणे विजापूर येथें परिषद् भरली. राजगोपाळाचार्य यांनी आपल्या भाषणांत कौन्सिलबहिष्काराचें समर्थन केलें, व पुढील धोरण पुष्कळ अंशीं महंमदअल्लींच्या मतावर अवलंबून आहे असें सांगितलें. महंमदअल्लींनी स्पष्टपणें आपलें मत कौन्सिलबहिष्काराच्या वतीने दिलें व चळवळ जोरांत चालवून गांधींची मुक्तता केली पाहिजे असें सांगितलें. तुरुंगांतून सुटल्याबरोबर येरवडा तुरुंगाची किल्ली आपल्या हातांत आहे असें त्यांनी जाहीर केलें होतें. याचा अर्थ कोणाला नीटसा समजला नव्हता. पण विजापुरास त्यांनी जें धोरण स्वीकारलें होतें त्यावरून त्यांच्या म्हणण्याचा खुलासा झाला.

### *दिल्लीची जादा काँग्रेस*

यानंतर दिल्लीची जादा काँग्रेस अबुल कलम अझाद यांच्या अध्यक्षतेखाली भरली. ते वर्किंग कमिटीचे सभासद होते व तेही तुरुंगांतून सुटून आले होते. वर्किंग कमिटींत ते आपलें मत कौन्सिलबहिष्काराला अनुकूल असेंच आहे असें भासवीत असत. तथापि त्यांच्या मनांत बहिष्कार उठावा असें असावें, असें केव्हा केव्हा त्यांच्या भाषणावरून वाटत असे. अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेल्या भाषणांत स्वराज्य पक्षाकडे त्यांचा कल असल्याचें दिसून आलें.

दिल्लीच्या जादा काँग्रेसला राजगोपाळाचार्य हजर नव्हते. बाकी कौन्सिलच्या विरुद्ध असलेली वर्किंग कमिटींतील मंडळी हजर होती. आम्हीं सर्वांनी महंमदअल्लींबरोबर खासगी चर्चा केली. त्या वेळीं त्यांनी कौन्सिलसंबंधाने आपलें मत पूर्वीप्रमाणेच प्रवेशाच्या विरुद्ध असल्याचें सांगून दिल्लीच्या काँग्रेसच्या बैठकींत आमचें नेतृत्व घेण्याचें कबूल केलें. स्वराज्य पक्षाला काँग्रेसमध्ये कसा विरोध करावयाचा यासंबंधाने आम्हीं विचार करून दिशा ठरविली. ही चर्चा रात्रीं १२ वाजेपर्यंत चालली होती. पण दुसरे दिवशीं एकाएकीं महंमदअल्लींनी आपला मोर्चा फिरविला. त्यांनी पुन्हा राणीच्या बागेंत आमची गाठ घेतली. त्या वेळीं वल्लभभाई, जमनालालजी व मी असे होतों. कौन्सिलांत जाण्यासंबंधाने ज्या काँग्रेसच्या लोकांना धर्माची किंवा त्यांच्या विवेकबुद्धीची (conscience) अडचण वाटत नसेल त्यांनी कौन्सिलांत जावें, काँग्रेसने मतदानाविरुद्ध चळवळ करूं नये, असें आपलें मत झाल्याचें कळवून आपल्याला पाठिंबा देण्याकरिता तेच आम्हांला आग्रह करूं लागले. महंमदअल्लींची आग्रह करण्याची पद्धती अशी विलक्षण होती की, त्यांच्या-बरोबर काम करणाऱ्यांना त्यांच्या विरुद्ध जाणें कठीण होत असें. तथापि राजगोपाळाचार्य यांचें मत घेणें आम्हांला जरूर वाटलें. म्हणून आम्हीं त्यांना तार केली. महंमद-

अल्लींच्या सल्ल्याप्रमाणे वागणें बरें, असें त्यांचें उत्तर आलें. तेव्हा आमचा नाइलाज झाला. सर्व मुसलमान पुढारी महंमदअल्लींच्या बाजूला होते, असें दिसलें. त्यामुळे विशेष भांडण्यांत अर्थ नाही, असा आमचा ग्रह झाला. गया कॉंग्रेसनंतर भांडणांतच सर्व वेळ गेल्यामुळे संघटित कार्य कांहीच झालें नाही. स्वराज्य पक्षांतील पुढाऱ्यांच्या देशाभिमानासंबंधाने अथवा स्वार्थत्यागासंबंधाने सर्वांनाच आदर होता. तेव्हा त्यांच्या बरोबर भांडत राहून देशांत दुही वाढवणें शहाणपणाचें नाही, असें आम्हांला वाटून महंमदअल्लींच्या मताप्रमाणे वागण्याचें आम्हीं मान्य केलें. त्या वेळीं आमच्यापैकी कोंडा व्यंकटप्पया यांना फारच वाईट वाटलें. त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रू निघाले. गांधीजी तुरुंगांत असतांना, त्यांनी काढलेल्या चळवळीला आम्हीं—त्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांनी—मूठमाती दिली, अशा प्रकारचे निर्वाणीचे उद्गार त्यांच्यातोंडून निघाले. कौन्सिलबहिष्कार उठविण्याचा ठराव महंमदअल्लींनीच मांडला. तामीळनाड प्रांतांतील राजगोपाळाचार्य यांचे सहकारी व तरुण मित्र वरदाचारी यांनी विरोध केला. पण बहुमताने ठराव मंजूर झाला.

स्वराज्य पक्षांतील मंडळीं कॉंग्रेस सोडून जातील व त्यामुळे आपल्या अध्यक्षतेखाली भरणारी कोकोनाडाची कॉंग्रेस एकतर्फी होऊन तिचें महत्त्व कमी होईल व चळवळीचा जोर कमी होईल अशी भीती महंमदअल्लींना वाटली असावी.

### *कॉंग्रेसच्या ठरावाचा अर्थ व मर्यादा*

दिल्लीच्या कॉंग्रेसमध्ये कौन्सिलवरील बहिष्कार उठल्यानंतर स्वराज्य पक्षांतील बऱ्याच मंडळींनी निवडणुकींत भाग घेतला. प्रत्येक कामांत अडथळे उत्पन्न करून कौन्सिलें निरुपयोगी आहेत असें प्रत्ययाला आणून द्यावयाचें, असा त्यांनी आपला कार्यक्रम आखला होता. कॉंग्रेसने बहिष्कार घातला तरी तो पूर्णपणें अमलांत येणें शक्य नसल्याने सरकार पक्षाचीच मंडळी निवडून येत, असा अनुभव १९२१ सालीं आला होता. अशा निवडून आलेल्या मंडळींच्या सहकार्याने काम चालवून हिंदी प्रजेच्या इच्छेनुसार राज्यकारभार चालला आहे असें म्हणण्याची व त्याप्रमाणे जगाला दाखवण्याची संधी सरकारला मिळते, ती मिळूं न देण्याकरिता आपण कौन्सिलांत जाणार व तेथे सरकारला प्रत्येक कामांत विरोध करून कौन्सिलांचा फोलपणा उघड करणार, अशा बाण्याने स्वराज्य पक्षाने निवडणुकींत भाग घेतला. आणि पुष्कळ ठिकाणीं व विशेषतः मध्यप्रांत, बंगाल हे प्रांत व मध्यवर्ती मुख्य असेंब्ली यांमध्ये त्यांना यशही आलें. इतर प्रांतांतही स्वराज्य पक्षाचे बरेच लोक निवडून आले. कॉंग्रेसच्या ठरावाने फक्त कौन्सिलांत जाण्याची इच्छा करणाऱ्यांना सवलत देण्यांत आली होती, इतकेंच. नाहून कॉंग्रेसने कौन्सिलमध्ये गेलेंच पाहिजे असा विधिदर्शक ठराव केला नव्हता. त्याकारणाने व स्वराज्य पक्षाने आखलेलें धोरण टिकाऊ नाही असें वाटल्याने नाफेरपक्षांतील प्रमुख लोकांनी निवडणुकींत भाग न घेण्याचें ठरविलें होतें.

### दळवींना मीं कां मदत केली ?

आमच्या दक्षिण भागाकरिता असेंब्लीमध्ये एक जागा आहे व त्या जागेकरिता स्वराज्य पक्षातर्फे वेळवी उभे राहिले. विरुद्ध बाजूनें करवीरप्पा म्हणून एक गृहस्थ उभे होते. बेळगाव जिल्ह्यातर्फे दोन जागा होत्या; पण स्वराज्य पक्षातर्फे कोणीच उभें राहण्याला पुढे आलें नाही. त्या कारणाने या दोन जागांकरिता कॉंग्रेसशीं संबंध नसलेले असे चार उमेदवार होते. ते म्हणजे लठ्ठे, चिकोडी, अंगडी व दळवी. त्यांपैकी लठ्ठे व चिकोडी हे ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी; अंगडी (लिंगायत) आणि दळवी (मराठे) हे प्रत्यक्ष ब्राह्मणेतर पक्षातर्फे जरी नसले तरी त्यांचा कल प्रच्छन्नपणें ब्राह्मणांना प्रतिकूलच होता. कॉंग्रेसतर्फे कोणीच उमेदवार नसल्याने मी पूर्वी पूर्ण उदासीन होतों. लठ्ठे व चिकोडी हे अनुक्रमें असेंब्लीचे व मुंबई कौन्सिलचे १९२१ सालापासून मेंबर होते. दोघेही कर्नाटकांत ब्राह्मणेतर पक्षाचे उत्पादक व मुख्य आधारस्तंभ असल्याने ते निवडून येण्याचा संभव होता. या दोघांनीही कॉंग्रेसवर, टिळकांवर व ब्राह्मणांवर वेळींअवेळीं हल्ले चढवले होते. कौन्सिलांत त्यांच्या कामाचा आढावा काढल्यास त्यांनी सरकारची बाजूच उचलून धरली होती असें दिसत होतें. पण कॉंग्रेसची मंडळीं उदासीन असल्यामुळे मला तिकडे लक्ष देण्याचें मुळीच कारण नव्हतें.

अशी स्थिती असतां माझे एक स्नेही कै. नरसिंहराव बाळेकुंद्री हे दळवी यांना घेऊन माझ्याकडे एक दिवस आले. दळवींना निवडणुकींत मदत करण्याबद्दल सांगूं लागले. बेळगावास अखिल मराठा राजकीय परिषद भरली होती. (त्याबद्दलची हकीकत पूर्वी आली आहे.) त्या वेळीं दळवींनी राष्ट्रीय पक्षाच्या राजकारणाला पाठिंबा दिला होता व ते होतकरू होते. त्यांचा व गोविंदराव याळगींचा थोडा स्नेहसंबंध आला होता. त्यामुळे चिकोडी पडून ते आले तर मला नको होते असें नाही. त्यांचीं मतें ब्राह्मण जातीच्या विरुद्ध असल्याबद्दलचा संशय होता. म्हणून त्याबद्दल त्यांनी (दळवींनी) खुलासा करून हा संशय निराधार असल्याचें सांगितलें व या बाबतींत नरसिंहरावांनीही खात्री दिली. त्याचप्रमाणे बेळगावांतील मराठे पुढारी व माझे स्नेही यांनीही खात्री दिली. या सर्व कारणांमुळे दळवींना मदत देण्याचें मीं कबूल केलें. त्यांनी 'स्वराज्य पक्षाला' सामील व्हावें व नंतर त्यांना मीं मदत करावी अशी सूचनाही माझ्या कित्येक स्नेह्यांनी मला केली. पण केवळ निवडणुकीकरिता त्यांना 'स्वराज्य पक्षाला' मिळण्याला सांगून त्या शर्तीवर मदत करणें हें मला योग्य वाटेना. निरपेक्षबुद्धीने त्यांना मदत केल्यास व आमच्या मदतीने ते निवडून आल्यास सरकारची भीडमुर्वत न धरतां ते लोकहिताचें काम करतील अशी मला आशा वाटत होती. त्यांच्या सार्वजनिक व खासगी भाषणांत त्यांनी तेंच आपलें धोरण राहील असें जाहीरही केलें होतें. एवढें त्यांचें आश्वासन मला पुरे वाटलें व त्यांना मदत करण्याचें मीं वचन

दिलें. निवडणुकीला पंधरावीस दिवसांचा अवकाश होता. जिल्ह्यांतील प्रमुख काँग्रेस-कार्यकर्त्यांना व माझ्या आतेष्टांना मीं निकडीचीं पत्रें लिहिलीं, व दळवींकरिता खटपट करण्याबद्दल कळविलें. मी नाफेर पक्षांतील प्रमुखांपैकी एक असल्यामुळे माझें हें करणें कांही लोकांना चमत्कारिक वाटलें. पण मीं जाहीर भाषणांत व जाहीर पत्रकांत माझें मत कौन्सिलबहिष्काराला अनुकूल असलें तरी दिल्ली काँग्रेसनंतर परिस्थितींत थोडा फरक पडल्यामुळे केवळ सरकारच्या बाजूचे धडधडीत दिसणाऱ्या उमेदवारांना निवडून येण्याची संधी देण्यापेक्षा दळवींसारख्यांना मदत करणें जास्त श्रेयस्कर आहे असा खुलासा केला. स्वराज्य पक्षातर्फे कोणी उमेदवार असता तर हा प्रश्नच नव्हता. पण ब्राह्मणाखेरीज कोणी स्वराज्य पक्षातर्फे उमेदवार राहिल्यास ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद जास्ती विकोपाला जाऊन काँग्रेसचें काम योग्य होणार नाहीं असें वाटलें, म्हणून कोणी ब्राह्मण उमेदवार पुढे आला नाही. अशा परिस्थितींत दळवींना निवडून देण्याबद्दल खटपट करणें बरें अशी आमची समजूत झाली. लिंगायत लोकांत दोन पक्ष झाले होते. चिकोडी व अंगडी यांच्यामध्ये चुरस होती. अंगडींचा पक्ष जास्ती श्रीमंत होता. त्यामुळे ते निवडून येतील असें वाटत होतें. म्हणून त्यांच्या निवडणुकीला विरोध करावयाचा नाही असें आम्हीं ठरविलें. पंधरा दिवसांत आमच्या मंडळींनी खूप खटपट केली, व दळवींना यश येण्याची जेथे अगदी आशा नव्हती त्या ठिकाणीं चांगलीं चिन्हें दिसूं लागलीं. निवडणुकींत शेवटीं दळवी यांना सर्वांत जास्ती मतें मिळून ते पहिले आले व अंगडी दुसरे आले. चिकोडी व लठ्ठे हे दोघेही पडले. या निवडणुकीमुळे बेळगाव जिल्ह्यांत काँग्रेस पक्षाचा बराच वचक बसला. (निवडणुकी झाल्यानंतर हे दोघेही कौन्सिलांतील ब्राह्मणेतर पक्षाला मिळाले व आमची त्यांनी पूर्ण निराशा केली. माझ्या धोरणाबद्दल कित्येक माझे मित्र मला अद्यापि खिजवतात. तथापि माझ्या धोरणांत चूक होती असें मला अद्यापि वाटत नाही.) असेंब्लीच्या जागेवर बेळवी निवडून आले.

प्रकरण बाविसावें

# कर्नाटकांत काँग्रेसला निमंत्रण

### *काँग्रेसला कर्नाटकाचें निमंत्रण*

याप्रमाणे निवडणुकीची धामधूम संपल्यानंतर कोकोनाडाची काँग्रेस भरली. कर्नाटकांतून बरेच प्रतिनिधी हजर होते. १९२४ सालच्या काँग्रेसला कर्नाटकतर्फे आमंत्रण देण्याचें ठरलें होतें. म्हणून त्या उत्साहानें कर्नाटकाची बरीच मंडळी कोकोनाडाला आली होती. दिल्लीच्या जादा काँग्रेसमध्ये कौन्सिलच्या प्रश्नाचा निकाल झाल्यामुळे कोकोनाडास या बाबतींत विशेष काम राहिलें नव्हतें. तथापि पंडित सुंदरलाल, अलाहाबादचे गौरीशंकर मिश्र, बाबू शामसुंदर चक्रवर्ती वगैरे मंडळींनी हा प्रश्न पुन्हा उकरून काढला. कर्नाटकाचा पाठिंबा मिळेल अशी त्यांना आशा होती. कर्नाटकाच्या प्रतिनिधींची संख्या मोठी होती. ते शिस्तींत वागतात अशी त्यांची ख्याती होती. तथापि या प्रश्नावर मतभेद होण्याचा संभव होता, म्हणून महंमदअल्लींनी मला कानडींत भाषण करण्यास सांगितलें. काँग्रेसमध्ये कानडींत भाषण होण्याचा हाच पहिला प्रसंग. आणि तो मान मला मिळाला याबद्दल मला थोडा अभिमान वाटला. पंधरा एक मिनिटें माझें भाषण झालें. एकदोन प्रतिनिधींखेरीज बाकीच्या सर्वांनी आमच्या बाजूनेच मतें दिलीं. एकदोन तटस्थ राहिले. कर्नाटकाच्या प्रतिनिधींनी आपलीं मतें विरुद्ध बाजूला दिलीं असतीं, तर कौन्सिल बहिष्काराचा ठराव मंजूर होण्याचा संभव होता.

### *काँग्रेसच्या चिटणिशीसाठी नाव*

१९२४ सालाकरिता महमदअल्लींनी चिटणिसाच्या जागेकरिता तीन नावें सुचवलीं. तीं हीं : पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. किचलू व तिसरें माझें नाव. मला जेव्हा त्यांनी विचारलें त्या वेळीं कर्नाटकांतील प्रतिनिधींचा सल्ला घेऊन मी कळवितों असें सांगितलें. त्याप्रमाणे कर्नाटकाच्या प्रतिनिधींची खासगी

सभा भरविली व त्यांचा सल्ला घेतला. सेक्रेटरीची जागा जोखमीची होती, त्याचप्रमाणे ती थोड्या प्रतिष्ठेचीही मानली जात असे. आमच्या प्रांतांतील प्रमुख कार्यकर्त्यांचा विचार न घेतां ही जागा पतकरल्यास कदाचित कोणाला तरी वाईट वाटण्याचा संभव आला असता; तो टळावा, कर्नाटकाची एकी कायम राहावी, म्हणून मीं मंडळींचा सल्ला घेतला. पुष्कळांना आनंद व अभिमान वाटला. विरोध कोणाचाच आला नाही. म्हणून मीं महंमदअल्लींना कबुली दिली. त्याप्रमाणे हीं तिन्ही नावें कॉंग्रेसमध्ये मंजूर झालीं.

### *कॉंग्रेस कुठे भरवावी ?*

पुढील कॉंग्रेस कोठे भरवावी यासंबंधाने विषय-नियामक कमिटींत प्रश्न निघाला. त्या वेळीं कर्नाटकाचें आमंत्रण देण्यांत आलें. आणखी एकदोन प्रांतांची मागणी होती. पण त्यांना विशेष पाठिंबा न दिसल्यामुळे व खुद्द अध्यक्ष महंमदअल्ली यांनी आमच्या आमंत्रणाचा पुरस्कार केल्यामुळे इतरांनी आपल्या मागण्या मागे घेतल्या आणि एकमताने कर्नाटकाचें आमंत्रण स्वीकारलें गेलें. कॉंग्रेसच्या बैठकींत श्री. श्रीनिवासराव कौजलगी यांनी जाहीरपणें आमंत्रण देण्याचा ठराव मांडला व तो मान्य झाला.

कर्नाटकांत कॉंग्रेस भरण्याचें ठरलें; पण कोठे भरवावयाची हें प्रांतिक कमिटीवर सोपविण्यांत आलें. त्याच वेळीं सर्वांच्या अनुमतीने जागा निश्चित केली असती तर फार उत्तम झालें असतें व पुढे या बाबतीत जीं तंटाभांडणें झालीं तीं टळलीं असतीं. गडबडींत हें काम उरकून घेण्यापेक्षा स्वस्थपणाने प्रांतिक कमिटींत या प्रश्नाचा निकाल करून घेणें हें मला जास्ती श्रेयस्कर वाटलें. एखादी जागा त्याच वेळीं निश्चित करून ठराव मांडण्याची तजवीज मीं केली असती तर वर्किंग कमिटींत किंवा विषयनियामक कमिटींत व कॉंग्रेसमध्ये माझें म्हणणें मंजूर झालें असतें. बेळगावला कॉंग्रेस भरवावी अशी माझे मित्र गोविंदराव यांची इच्छा होती. म्हणून बेळगावास कॉंग्रेस भरविण्याचा ठराव मांडावा असें एकदा वाटलें होतें. पण माझ्या मयत स्नेह्याच्या इच्छेपेक्षा कॉंग्रेस यशस्वी करणें हें मला जास्ती महत्त्वाचें वाटलें; म्हणून कॉंग्रेसला न आलेल्या लोकांचा व कार्यकर्त्यांचादेखील विचार घेऊन जागा ठरविण्याचें मीं ठरविलें व मोघमच कर्नाटकांत १९२४ सालची 'कॉंग्रेस' भरवावी असा ठराव पास झाला.

कोकोनाडा कॉंग्रेसनंतर मी विजापूरला कांही कामाकरिता गेलों होतों. त्या वेळीं श्रीनिवासराव कौजलगी यांच्या घरीं मला कांही व्यापारी मंडळी भेटली व त्यांनी कर्नाटकची कॉंग्रेस विजापूरला भरविणें योग्य आहे असें सांगून प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या सभेत विजापूरलाच मीं पाठिंबा द्यावा असा आग्रह धरला. कमिटींत या गोष्टीचा विचार होईल, तोपर्यंत मी कांहीच निश्चित मत देत नाही, असें मीं त्यांना सांगितलें. त्यामुळे ही मंडळी माझ्यावर नाराज झाली. स्वतः कौजलगी या बाबतींत कांही बोलले नाहीत. वास्तविक विजापूरचे पुढारी या नात्याने त्यांनी ही गोष्ट माझ्याजवळ काढावयाला पाहिजे होती. पण त्यांनी तसें केलें नाही, व कॉंग्रेसचा विशेष संबंध नसणाऱ्यांनी ही

गोष्ट काढली, याबद्दल मला आश्चर्य वाटलें आणि तेव्हापासूनच कॉँग्रेसची जागा मुक्रर करण्याचें काम सुरळीतपणें होणार नाही असें मला वाटूं लागलें.

### *हुबळींतील बेळगावची शिफारस*

कॉँग्रेसची जागा निश्चित करण्याकरिता हुबळीस प्रांतिक कॉँग्रस कमिटीची सभा मीं बोलाविली. माझी इच्छा बेळगावास कॉँग्रेस भरवावी अशी होती. गोविंदरावांची इच्छा त्यांच्या पश्चात तरी सफल करावी असें मला वाटत होतें. हा भावनेचा प्रश्न एकीकडे ठेवला तरी एकंदरींत बेळगावचें वातावरण मला बरेंच अनुकूल दिसलें. आमच्या प्रांतांत ब्राह्मणब्राह्मणेतर वाद विकोपाला पोचला होता व निवडणुकीमुळे त्यांत भर पडली होती. बेळगाव जिल्ह्यातर्फे कोणी ब्राह्मण उमेदवार न राहिल्यामुळे या वादाचें स्वरूप थोडेंसें सौम्य झालें होतें. शिवाय कॉँग्रेसच्या खटपटीने ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी लठ्ठे व चिकोडी निवडणुकींत अयशस्वी झाले होते. त्यामुळे कॉँग्रेसची प्रतिष्ठाही वाढली होती. म्हणून ब्राह्मणेतर पक्षही थोडा कमजोर झाला होता, व कांही स्थानिक कामांत त्या पक्षाला कॉँग्रेसच्या मदतीची अपेक्षा भासत होती. निवडून आलेल्या दोघाही उमेदवारांचा—दळवी व अंगडी यांचा—कॉँग्रेसशीं संबंध असल्यामुळे ते कॉँग्रेसच्या विरुद्ध जाणें शक्य नव्हतें. पण एवढ्यावरच मी अवलंबून राहिलों नाही. मी स्वतः जाऊन चिकोडी व लठ्ठे आणि इतर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची भेट घेतली. आणि बेळगावला कॉँग्रेस भरविण्याचें ठरलें तर त्यांचें धोरण काय राहील याबद्दल त्यांना विचारलें. त्यांचें धोरण विरुद्ध असल्यास त्यांनी स्पष्टपणें तसें सांगावें, म्हणजे मी या भानगडींत पडणार नाही, असेंही मीं त्यांना सांगितलें. त्या सर्व मंडळींनी कसेंही करून बेळगावासच कॉँग्रेस भरविण्याची खटपट करा असा मला आग्रह केला. त्या मंडळींत माझे कांही व्यक्तिगत स्नेही होते. त्यांच्या मार्फत मीं खासगी व नक्की बातमी काढली. त्यावरूनसुद्धा बेळगाव जिल्ह्याचा ब्राह्मणेतर पक्ष विरुद्ध जाणार नाही, इतकेंच नव्हे तर शक्य ती मदत करण्याला तयार आहे अशी माझी खात्री झाली. कर्नाटकांतील खिलाफत कमिटीचें मुख्य केंद्र बेळगावासच होतें. त्या कमिटीचा मी सभासद होतों. मला त्या कमिटीचा अध्यक्ष होण्याबद्दल बेळगावच्या मुसलमान समाजाकडून अनेक वेळां सांगण्यांत आलें होतें; पण ती गोष्ट मीं नाकारली होती. तरी खिलाफत कमिटीचें सर्व काम माझ्या सल्ल्याने चालत असे. १९२० सालापासून खिलाफत कमिटी व कॉँग्रेस कमिटी मिळूनच सहकार्याने कामें करीत असत. बहुतेक सर्व सभा दोन्ही कमिट्यांच्या मार्फत भरत असत. सभेची जागा मुसलमानांच्या एका दर्ग्यातच असे. बरेच मुसलमान कॉँग्रेस कमिटीचे सभासद होते. ही सर्व परिस्थिती बेळगावला जितकी अनुकूल होती तितकी दुसऱ्या ठिकाणीं नव्हती.

कर्नाटकांत मोठीं शहरें म्हणजे दोन : एक हुबळी व दुसरें बेंगळूर. बेंगळूर हें म्हैसूर संस्थानांत असल्यामुळे तेथे कॉँग्रेस भरविण्याचा प्रश्नच नव्हता. हुबळीची

लोकसंख्या इतर सर्व शहरांपेक्षा मोठी होती व तो गाव कापसाच्या व्यापाराचें केंद्र होता. तेथील मंडळींच्या मनांत असतें तर काँग्रेसच्या कामाला पैशाची अनुकूलता सर्वांत जास्ती झाली असती. पण त्या वेळीं काँग्रेस हुबळीस भरवण्याला तेथील काँग्रेसच्या मंडळींची उत्सुकता नव्हती. धारवाडचे लोकही फारसे उत्सुक नव्हते. तीच गोष्ट बल्लारी व कारवार जिल्ह्यांची. धारवाडास थोडे तरी लोक तेथें काँग्रेस भरवावी म्हणणारे होते. पण बल्लारी व कारवार जिल्ह्यांतील मंडळी पहिल्यापासून आपल्याकडून निभावणार नाही असेंच म्हणत होती. खरी चढाओढ तीन जिल्ह्यांत होती. ते म्हणजे बेळगाव, विजापूर व बेंगळूर. पण या जिल्ह्यांत काँग्रेसच्या पूर्वतयारीला लागणारें भांडवल मिळविणें कठीण होतें. प्रथमारंभीं हातांत पन्नास हजारांपर्यंत तरी रक्कम असल्याखेरीज कामाला सुरुवात करणें अदूरदर्शीपणाचें झालें असतें. याकरिता मी बेळगावांतील व शहापुरांतील कांही प्रमुख व्यापाऱ्यांना भेटलों. दोन्ही गावच्या या मंडळींनी सुरुवातीस खर्चाकरिता तीस हजार रुपये देण्याची हमी घेतली. त्याप्रमाणे आकडे घालून त्यांनी आपल्या सह्यांचा कागद माझ्याजवळ दिला. त्यामुळे मला धैर्य आलें. तीस हजार रुपये एका वर्गातूनच ॲडव्हान्स म्हणून मिळण्याची खात्री झाल्यानंतर आणखी पंचवीसतीस हजार रुपयांची रक्कम जिल्ह्यांतील इतर ठिकाणांहून व बेळगाव शहरच्या इतर लोकांकडून मी सहज उभी करूं शकेन अशी खात्री होती. याशिवाय कांही इमारती, लाकडाचे व्यापारी व बांबू, तट्टे वगैरे पुरवठा करणारे व्यापारी मदत देण्याला तयार झाले. बेळगावच्या टिळकवाडी येथील पन्नास एक बंगल्यांच्या मालकांनी बंगले देण्याचें कबूल केलें. माळजागा तर तेथे मुबलक होती व रेल्वे लाइनलाच टिळकवाडी लागून असल्यामुळे रेल्वे कंपनीने एखादें हंगामी स्टेशन उघडल्यास वाहतुकीचा खर्च फारच कमी येण्यासारखा होता. या सर्व सोयी मीं पाहून ठेवल्या होत्या. रेल्वेच्या डिस्ट्रिक्ट ट्रॅफिक सुपरिंटेंडेंटला भेटून हंगामी स्टेशन उघडण्याचें त्यांचेकडून वचन घेतलें होतें. म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष चौगुले, मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन, बेळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीचे चिटणीस व माझे स्नेही भीमराव पोतदार हेच होते. डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे अध्यक्ष चिकोडी हे होते. या दोन्ही संस्थांची मदत मिळण्याची पूर्ण खात्री होती. एवढी तयारी मीं हुबळीच्या सभेपूर्वी करून ठेवली होती. याखेरीज पैशाची वगैरे तूट येण्याचा प्रसंग आल्यास मी स्वतः ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा सेक्रेटरी व वर्किंग कमिटीचा एक सभासद असल्यामुळे आणि काँग्रेसचे खजीनदार जमनालालजी यांचा व माझा बराच स्नेहसंबंध आला होता त्यामुळे तिकडूनही मला खात्रीने मदत मिळाली असती.

याप्रमाणे बेळगावची जागा प्रांतिक कमिटीला मान्य झाल्यास सर्व प्रकारची अनुकूलता आहे अशी खात्री करून घेतल्यानंतर आमच्या जिल्ह्यातर्फे प्रांतिक काँग्रेस कमिटींत जे सभासद होते त्यांचा सल्ला घेतला व त्यांनीही अनुकूल मत दिलें. तेव्हा सर्वांना सभेच्या दिवशीं हुबळीस हजर राहण्याला मीं कळविलें. तथापि सव्वीस सभासदांपैकी फक्त

बाराच लोक हुबळीला आले. मीच अध्यक्ष असल्यामुळे व इतर गोष्टींमुळे माझेंच वजन कमिटींत पडून बेळगावचें स्थान मुक्रर होईल अशी खात्री वाटून कांही मंडळी गैरहजर राहिली व मींही त्यांना विशेष आग्रह केला नाही. केवळ मताधिक्यावर ही गोष्ट ठरविण्यापेक्षा कॉंग्रेस यशस्वी रीतीने कोठे होईल या एकाच गोष्टीचा विचार करून ठरविणें बरें असें मला वाटलें. कर्नाटक मागसलेला व लहान प्रांत. नवीनच कॉंग्रेसच्या घटनेंत स्वतंत्र स्थान मिळालेलें व मी पहिलाच प्रांतिक कमिटीचा अध्यक्ष. अशा परिस्थितींत सर्वांच्या सहानुभूतीने काम झाल्यास कॉंग्रेस भरविण्याचें काम यशस्वी होण्याचा संभव अधिक या एकाच गोष्टीकडे माझें लक्ष होतें. त्यापूर्वीच्या कॉंग्रेसच्या सर्व बैठकी सर्व सोयी असलेल्या मोटमोठ्या शहरांतच भरत आल्या होत्या. तेव्हा लहान व गैरसोयीच्या गावांत कॉंग्रेस भरविण्याचें काम मला जोखमीचें वाटत होतें. सर्वांच्या एकजुटीनेच कार्य यशस्वी होण्याचा संभव असल्यामुळे मी कोणत्या एकाच गावाच्या आग्रहाने हुबळीला गेलों नव्हतों.

## *हुबळीस दिसलेला देखावा*

हुबळींस गेल्यानंतर मला निराळाच देखावा दृष्टीला पडला. विजापूर, मंगळूर, कारवार जिल्ह्यांची सर्व मंडळी आली होती. आपापल्याकरिता मतें मिळवण्याची खटपट करून तयारीने ते आल्याचें मला दिसून आलें. सभेच्या पूर्वीं खासगी रीतीने प्रत्येक जिल्ह्यांतील प्रमुख लोकांबरोबर वाटाघाट करून कांही तरी ठरवावें म्हणून मीं प्रयत्न केला. पण तो साध्य झाला नाही. मंगळूर जिल्ह्यांतील मंडळींचा आपल्या येथेच कॉंग्रेस भरवण्याचा इतका आग्रह होता की, ते या बाबतींत खासगी रीतीने चर्चा करण्यालादेखील तयार नव्हते. त्यांनी उत्तर कर्नाटक व दक्षिण कर्नाटक असा भेद करून उत्तर कर्नाटकांतील म्हणजे बेळगाव, धारवाड, विजापूर या जिल्ह्यांतील लोक आपल्याला कस्पटासमान मानतात असा कांगावा करण्याला प्रारंभ केला. बेळगाव जिल्ह्यांत व विशेषतः बेळगाव शहरांत कानडी भाषेपेक्षा मराठी भाषेलाच प्राधान्य दिलें जातें याकरिता कर्नाटकची म्हणून पहिल्यांदाच भरणारी कॉंग्रेस बेळगावास न भरवितां ती अस्सल कानडी वातावरणांतच भरली पाहिजे, असा कित्येकांचा आग्रह होता. बेळगाव जिल्ह्यासंबंधाने हा जो आरोप निघाला त्याबद्दल मला आश्चर्य वाटलें. भांडणाची मर्यादा प्रांताप्रांतांत होती ही गोष्ट मला माहीत होती, व ती एक आपत्ती आहे असें मला वाटत होतें आणि अद्यापिही माझें मत कायम आहे. पण ही मर्यादा आकुंचित होऊन एका प्रांतांतील जिल्ह्या-जिल्ह्यामध्ये तंटे, मत्सरभाव उत्पन्न होण्याचा संभव आहे असें पाहून मला अधिकच वाईट वाटलें. कर्नाटकांत कॉंग्रेस भरवून बहुजन-समाजांत कॉंग्रेसबद्दल जागृती उत्पन्न करावी व कॉंग्रेसच्या द्वारें चार ठिकाणीं भंगलेल्या प्रांताला एका सूत्रांत गोवावें याकरिता मीं प्रयत्न केला. पण हुबळीच्या सभेंतील गोंधळामुळे सर्वच विपरीत प्रकार दिसूं लागला. करावयाला जावें एक, व्हावें भलतेंच,

असें म्हणतात त्याप्रमाणे झालें! कोकोनाडासच जागा ठरवून घेतली असती किंवा जागा ठरविण्याचा अधिकार वर्किंग कमिटीकडे सोपविला असता तर हा बखेडा तरी उत्पन्न झाला नसता असें मला वाटूं लागलें. (१९३० सालीं कराचीस काँग्रेस भरल्या-वेळीं १९३१ सालचें आमंत्रण महाराष्ट्राने द्यावें, असा विचार महाराष्ट्रीय प्रतिनिधींत निघाला होता. पण सोलापूरला काँग्रेस भरवावी की पुण्याला भरवावी, याबद्दल वाद निघून प्रतिनिधींत तट पडले व याचा बभ्रा वर्किंग कमिटीपर्यंत व पर्यायाने ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभासदांत जाऊन महाराष्ट्रांत तंटे आहेत असें वाटून महाराष्ट्राचें आमंत्रणच स्वीकारण्यांत आलें नाही. त्या प्रसंगीं आमच्या प्रांतांतील या विषयाच्या बाबतींत झालेल्या चढाओढीची मला आठवण झाली होती.)

### बेळगावच्या बाजूने कौल

प्रांतिक कमिटीच्या सभेला सुरुवात झाल्या-बरोबर माझ्या प्रास्ताविक भाषणांत चढाओढीच्या दृष्टीने या गोष्टीचा विचार न करिता समतोल बुद्धीने व सोयीच्याच दृष्टीने हा प्रश्न सोडवावा अशी विनंती मीं केली, व सूचना मांडण्याला सांगितले. मंगळूर डिस्ट्रिक्ट काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कर्नाड सदाशिवराव यांनी सूचना मांडली. विजापूर जिल्ह्यातर्फे हणमंतराव कौजलगी यांनी सूचना मांडली. धारवाडतर्फे एका सभासदाने मांडली. या सर्वांनी आपल्या भाषणांत आपापल्या स्थळाच्या वर्णनावरच विशेष जोर दिला होता. विजापूर बोलून-चालून पूर्वीच्या बादशाही वैभवाचें शहर. मंगळूरचें सृष्टिसौंदर्य उत्कृष्ट. बेळगावास या दोन्ही गोष्टींची उणीव होती ही गोष्ट खरी आहे. बेळगावातर्फे सूचना मीं स्वतः मांडली व बेळगावचे ऐतिहासिक दृष्टीने किंवा सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीने वर्णन न करितां तेथे सोयी काय काय आहेत व मीं या बाबतींत पूर्वतयारी काय केली आहे याची माहिती दिली. जे लोक कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह करून आले नव्हते त्या लोकांवर मीं दिलेल्या माहितीचा परिणाम झाला. पहिल्या दिवसाची बैठक संपली. रात्रीं पुन्हा मीं खासगी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. पण तोही फसला. दुसरे दिवशीं पुन्हा सकाळीं सभेला सुरुवात झाली. भाषणांवर भाषणें होऊं लागलीं. पण तीं भलत्याच मुद्द्यावर होऊं लागलीं. तथापि मीं कोणाला थांबविलें नाही. सकाळच्या सभेंत निकाल लागला नाही. पुन्हा दोनप्रहरीं सभा भरली तेव्हा मात्र या प्रकरणाचा निकाल लावल्याखेरीज उठावयाचें नाही, असें ठरविल्याचें मीं जाहीर केलें.

सभेला सुरुवात झाल्यानंतर धारवाडचे गोपाळराव देशपांडे व श्रीनिवासराव कौजलगी यांनी मला बाहेर बोलाविलें. श्रीनिवासरावांनी मला बेळगावची सूचना मागे घेण्याबद्दल आग्रह केला. येथपर्यंत कांही गैर नव्हतें. पण यापुढे जाऊन विजापुरास काँग्रेस भरण्याचें ठरल्यास स्वागत कमिटीचें अध्यक्षपद मला देण्याचें आपण ठरविलें आहे असें ते सांगूं लागले! त्यामुळे मला वाईट वाटलें व थोडी चीडही आली. गोपाळराव देशपांड्यांचा व

त्यांचा विशेष स्नेह. पण त्यांनाही ही गोष्ट आवडली नाही, असें त्यांच्या बोलण्यावरून दिसलें. कौजलगी यांच्या मनांत विजापूरलाच काँग्रेस व्हावी असें फार आहे, त्यांच्या इच्छेला मान देण्याकरिता मीं बेळगावचा आग्रह सोडावा, असें ते म्हणत होते. स्वागत कमिटीच्या अध्यक्षपदाची गोष्ट निघाली नसती तर कदाचित मीं माघार घेतली असती; पण मी केवळ स्वत:च्या महत्त्वाकरिता बेळगावचा आग्रह धरीत आहें असा कौजलगींच्या बोलण्यावरून ध्वनी निघत होता त्यामुळे माघार घेण्याचें मीं मान्य केलें नाही.

शेवटीं हें बोलणें संपल्यानंतर आम्ही सभेत आलों. बहुमत बेळगावला मिळेल असें वाटल्यावरून किंवा अन्य कारणामुळे मतें देण्याची एक नवी पद्धत कौजलगी यांनी सुचवली. चार सूचना आल्या होत्या हें वर सांगितलेंच आहे. मत देतांना पहिला नंबर ज्या जागेला मिळाला असेल त्याला चार मार्क मिळाले असें समजावें, दुसऱ्या नंबरला तीन मार्क, तिसऱ्या नंबरला दोन मार्क व चवथ्या नंबरला एक मार्क असें समजून सर्वांत जास्ती मार्क ज्याला मिळतात तेथे काँग्रेस भरवावी अशी सूचना त्यांनी केली व ती पास झाली. त्या वेळीं एका सभासदानें आपल्याला एकच स्थळ पसंत असून दुसरें कोणतेंही पसंत नाही, किंवा दोन स्थळेंच पसंत आहेत पण बाकीचीं नाहीत, असें असल्यास काय करावें याबद्दल रूलिंग मागितलें. जितक्या जागा पसंत असतील तितक्यांपुरतींच नंबर-वारीनें मतें द्यावीं व एकच जागा पसंत असल्यास तेवढ्याच जागेपुरतें मत द्यावें असा निकाल मीं दिला. दुसऱ्यानें अशा एकाच जागेला दिलेल्या मताला मार्क किती धरणार असा प्रश्न केला, त्याचें उत्तर चार मार्क असें मीं दिलें. याबद्दल कोणीं तक्रार केली नाही. बेळगावच्या प्रतिनिधींनी या गोष्टीचा फायदा घेण्याचें ठरविलें. इतरांचें लक्ष तिकडे फारसें गेलें नाही. बेळगावच्या मंडळींत ठाणेदार या नावाचे एक गृहस्थ होते (ते हल्लीं मयत आहेत). त्यांनी बेळगावच्या मंडळींना एकीकडे बोलाविलें, व मीं जें रूलिंग दिलें होतें त्याचा फायदा घेण्याचा आपला बेत त्यांना कळवला. विजापूर व मंगळूर जिल्ह्यांतील प्रत्येक प्रतिनिधी आपल्या जिल्ह्याला पहिल्या नंबरचें मत देण्याला तयार होता. पण त्या जिल्ह्यांतील प्रतिनिधींना आपल्याला यश न मिळाल्यास काँग्रेस बेळगावलाच व्हावी असें वाटत होतें. त्याचप्रमाणे धारवाड, बल्लारी जिल्ह्यांतील कांही लोकांना बेळगावलाच पहिल्या नंबरचें मत द्यावें असें वाटत होतें, व ज्या कोणाला धारवाडला काँग्रेस व्हावी असें वाटत होतें तेदेखील बेळगावला दुसऱ्या नंबरचें मत देण्याला तयार होते. म्हणजे बेळगावला दुसऱ्या नंबरचें मत देण्याला बहुतेक कोणी नाकबूल नव्हतें. या गोष्टीचा फायदा पूर्णपणें आपल्या पदरांत पडावा व आपल्या मताचा दुसऱ्या कोणाला उपयोग होऊं नये, म्हणून बेळगावच्या मंडळींनी एका बेळगावलाच आपलें मत द्यावयाचें व इतर ठिकाणांना मत द्यावयाचें नाही असें ठरवलें आणि त्याप्रमाणें बेळगावच्या सर्व मंडळींनी केलें. मंगळूरच्या कांहीं मंडळींनी आपल्याच गावापुरतें मत दिलें. मी दिलेलें रूलिंगही आम्हांला अनुकूलच होतें. इतरांनी तसेंच केलें असतें, तर माझ्या रूलिंगप्रमाणे तें बरोबरही झालें असतें. पण त्यांनी तसें केलें नाही. बहुतेकांनी

बेळगावला दुसऱ्या नंबरचीं मतें दिलीं व इतर जिल्ह्यांतील कांहींनी बेळगावला पहिल्या नंबरचीं मतें दिलीं. त्यामुळे बेळगावला सर्वांत जास्ती मार्क मिळाले व बेळगाव हीच जागा हुबळीच्या सभेंत निश्चित झाली. इतर जिल्ह्यांतील सर्व प्रमुख लोकांनी बेळगावचें अभिनंदन केलें व आपल्या भाषणांत बेळगावशीं सहानुभूतिपूर्वक सहकार्य करण्याचें आश्वासन दिलें. त्यामुळे मला समाधान वाटलें. जागेबद्दल थोडी चुरस जरी झाली होती तरी शेवट परिणाम बरा झाला असेंच मला वाटलें. पण ही माझी चूक होती असें पुढे घडलेल्या हकीकतीवरून दिसून येईल.

## *कॉँग्रेसच्या तयारीला प्रारंभ*

हुबळीच्या सभेंत बेळगाव हें निश्चित ठरल्यानंतर मी स्वस्थ बसलों नाही. ज्या व्यापारी मंडळींनी तीस हजार रुपये ॲडव्हान्स देण्याचें वचन दिलें होतें त्यांच्याकडे मागणी केली. त्याप्रमाणे त्यांनी पैसे आपल्यापैकी एकाकडे ठेवले, व लागतील त्याप्रमाणे मीं ते काढावेत अशी योजना केली. परगावांत व बेळगावांत स्वागत मंडळाचे सभासद मिळविण्याला प्रारंभ मीं केला. बेळगाव जिल्ह्यांतील पाच लोकांनी नुकसान आल्यास प्रत्येकीं पाच हजार रुपयांची नुकसानी सोसण्यास तयार असल्याबद्दल माझी खात्री केली व मला त्याप्रमाणे लिहूनही दिलें. माझे मित्र याळगी बंधू यांनी सर्वस्वी या कामाला वाहून घेण्याचें ठरविलें. त्यामुळे पैशाबद्दलची माझी काळजी बरीच दूर झाली.

बेळगावास नळ नाहीत. घरोघर लहान आडें (विहिरी) आहेत. लहानलहान आडांतून कॉँग्रेसच्या वेळीं पाण्याचा पुरवठा होणें सोईचें झालें नसतें व शक्यही झालें नसतें. म्हणून म्युनिसिपालिटीच्या जागेंत एक मोठी विहीर खणावयाला प्रारंभ केला व कर्मधर्मसंयोगाने एक मोठा झरा लागला व विहीर खोदण्याचें काम बंद करावें लागलें. पाण्याची गैरसोय दूर झाली अशी खात्री झाली. त्यानंतर टिळकवाडींतील बंगल्यांचे व म्युनिसिपालिटीच्या मालकीच्या खुल्या जागांचे कागदपत्र रीतसर करून सर्व जागा आमच्या कबजांत घेतल्या.

ही तयारी करीत असतां गांधीजींचें अपेंडिसायटिसकरिता ऑपरेशन करण्यांत आल्याचें समजलें, म्हणून मी पुण्याला आलों. स्टेशनवरूनच परस्पर ससून हॉस्पिटलला गांधींना भेटण्याकरितां गेलों. ऑपरेशन होऊन चारपाच दिवस झाले होते व प्रकृती सुधारत चालली होती. मी पुण्यास सातआठ दिवस होतों. त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये पहारा जरी होता तरी त्यांच्या आतेष्टांना भेटूं देत असत. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये त्यांच्या शुश्रूषेकरिता दिवसांतून सातआठ तास राहण्याची सवड मिळाली. त्यांची प्रकृती पुरी बरी झाल्यानंतर त्यांची पुन्हा तुरुंगांत रवानगी होणार नाही असें मला वाटलें. चळवळही मंदावली होती. तेव्हा गांधीजींच्या आजाराचें निमित्त करून त्यांना सोडण्यांत येईल असें मला वाटूं लागलें होतें आणि तसें झाल्यास बेळगावच्या कॉँग्रेसचे अध्यक्ष

त्यांनाच करणें योग्य होतें असें माझ्या मनानें घेतलें. गांधींची प्रकृती सुधारण्याच्या मार्गाला लागल्यानंतर मी बेळगावला परत आलों.

### बेळगावाला पुन्हा विरोध

इतक्यांत मंगळुरास एक जाहीर सभा भरून, हुबळीच्या सभेचें काम गैरकायदेशीर व अयोग्य रीतीनें झालें, म्हणून पुन्हा प्रांतिक काँग्रेस कमिटीची सभा भरवून काँग्रेसच्या जागेबद्दल फेरविचार व्हावा, अशा प्रकारचा एक ठराव पास झाल्याची हकीकत समजली. अशा प्रकारच्या सभा मंगळूर जिल्ह्यांत आणखी तीनचार ठिकाणीं झाल्या. एकदा निकालांत आलेला प्रश्न पुन्हा उकरून काढून चालू झालेल्या कामांत खीळ घालूं नये, म्हणून मीं मंगळूर जिल्ह्याचे काँग्रेसचे पुढारी सदाशिवराव कर्नाड यांना पत्रें लिहिलीं. पण उपयोग कांही झाला नाही. उलट प्रांतिक काँग्रेस कमिटीची पुन्हा सभा भरवून विचार व्हावा म्हणून कांही सभासदांच्या सहीनें माझ्याकडे एक विनंतीपत्र आलें. विजापूरचे एक-दोघे आपल्या गावीं काँग्रेस भरत नाही म्हणून थोडे नाराज झाले होते. म्हणून त्यांनीही मंगळूरच्या मंडळींच्या प्रयत्नाला उत्तेजन दिलें होतें. बेळगावला कामाला सुरुवात केली होती, हजार दोन हजार रुपये खर्चही झाले होते. बंगल्यांच्या व जागांच्या मालकांबरोबर करारमदारही झाले होते. अशा स्थितींत ही भानगड उपस्थित करण्यांत आली. अध्यक्ष या नात्यानें पुन्हा कमिटी भरविण्याचें नाकारणें माझ्या हातीं होतें. पण या अधिकाराचा उपयोग केला तर प्रांतांत जास्ती द्वेष वाढेल व काँग्रेसच्या कामाला हरकत येईल असें मला वाटलें. म्हणून मी पुन्हा हुबळीसच दुसरी सभा बोलावली. या सभेला मात्र बेळगावचे बहुतेक सर्व प्रतिनिधी हजर होते. शिवाय गावांतील प्रमुख व्यापारी, वकील वगैरे मंडळी आली होती. सदाशिवराव कर्नाड गांधींना भेटले व त्यांच्या कानावर आपली हकीकत त्यांनी घातली. एकतर्फी हकीकत ऐकून गांधी तरी काय निकाल देणार? पण त्यांची इच्छा बेळगावास काँग्रेस भरावी अशी होती हें मला माहीत होतें. तथापि त्यांनी पहिल्या सभेंत कांही गैरशिस्त घडलें असल्यास त्याची दुरुस्ती करावी एवढा सल्ला दिला. याशिवाय ते तरी जास्ती काय सांगणार?

हुबळीच्या या सभेला पुष्कळ मंडळी जमली होती. पण एकदा ठरलेली जागा बदलावी किंवा पुन्हा या प्रश्नाचा विचार व्हावा असें म्हणणाऱ्यांची संख्या अगदी कमी होती. बहुमतानें बेळगाव पुन्हा ठरलें असतें. पण होतां होईतो या बाबतींत एकमत व्हावें अशी माझी इच्छा होती. म्हणून वाटाघाट करून एक ठरावाचा मसुदा तयार केला व त्यांत असें नमूद केलें की पूर्वीच्या सभेंत मतें देतांना कांहींचा (कोणाचा हें नमूद केलें नाही) गैरसमज झाला होता ही गोष्ट जरी खरी असली, तरी पूर्वीच्या ठरावांत फेरबदल न करितां बेळगावची काँग्रेस यशस्वी करण्याला अखिल कर्नाटकानें मनःपूर्वक मदत करावी. हा ठराव सर्वांना मान्य झाला व हा प्रश्न एकदाचा मिटला. ‘यंग

इंडिया' मध्ये गांधींनी या बाबतींत एक नोट लिहिली व आपसांत तंटा मिटविल्याबद्दल कर्नाटकचें अभिनंदन केलें. यानंतर सुरळीतपणें कामाला प्रारंभ केला.

स्वागत मंडळाच्या सभासदांची संख्या बरीच नोंदली गेल्यानंतर सर्व कामांची व्यवस्था लावण्याकरिता व स्वागत मंडळाचे अधिकारी नेमण्याकरिता स्वागत मंडळाची बेळगावास सभा भरविली. या सभेला स्वागत मंडळाचे अध्यक्ष मला निवडण्यांत आलें. वस्तुतः बेळवी माझ्यापेक्षा वयाने वडील होते, व सार्वजनिक कामांत त्यांनीही आपल्या शक्त्यनुसार भाग घेतला होता. लोकमान्यांच्या प्रमुख अनुयायांपैकी ते एक होते. कायदे-कौन्सिलांत त्यांनी पूर्वी काम केलें होतें व असेंब्लीचे ते सभासद होते. या सर्व दृष्टींनी त्यांना हा मान मिळणें योग्य होतें. पण त्यांनी होऊन आपल्यापेक्षा या मानाला मीच जास्ती योग्य आहें असें जाहीर केलें होतें. हा खरोखर त्यांच्या मनाचा मोठेपणा होता. त्यांना उपाध्यक्ष निवडण्यांत आलें व त्यांनी ती जागा पत्करण्याचें आनंदानें मान्य केलें. त्यांच्याबरोबर उपाध्यक्षाच्या जागेकरिता आणखी कांही नावें सुचवण्यांत आलीं त्यांत श्रीनिवासराव कौजलगी यांचें नाव होतें; पण स्वागत मंडळांत कोणतीही अधिकाराची जागा स्वीकारण्याचें त्यांनी कबूल केलें नाही—तथापि काम करण्याचें आश्वासन दिलें. मधुराव केंभावी, भीमराव पोतदार, बाबासाहेब सोमण या तिघांना चिटणीस निवडण्यांत आलें व निरनिराळ्या पोटकमिट्या नेमल्या. कोकोनाडा येथे हिंदुस्थानी सेवादलाचा व कॉंग्रेसचा संबंध आला होता. या संस्थेचे चिटणीस डॉ. हर्डीकर होते. म्हणून त्यांच्याकडे स्वयंसेवकांचें पथक तयार करण्याचें काम दिलें. निरनिराळ्या खात्यांकरिता बजेटें मंजूर करून घेतलीं.

### एकदिलानें काम चालू

स्वागताध्यक्षाची माळ माझ्या गळ्यांत पडल्यामुळे माझ्यावरची जबाबदारी वाढल्याप्रमाणे मला वाटूं लागलें व एक प्रकारची कामाची चिंता लागली. याळगी, पोतदार, लाकडाचे व इमारतीचे कंत्राटदार गजाननराव देशपांडे, भुसारी जिनसांचे प्रमुख व्यापारी वामनराव कलघटगी, ब्राह्मणेतर पक्षापैकी खेमाजीराव गोडसे इत्यादि माझ्या स्नेह्यांनी मनोभावाने मदत करण्याचें मला आश्वासन दिल्यामुळे माझी चिंता कमी झाली. मोठ्या गावांत पैसा मुबलक मिळतो व बाकीच्या सर्व सोयी तयार असल्यामुळे कसलीही अडचण पडत नाही. बेळगावासारख्या तीस-पस्तीस हजार वस्तीच्या लहान गावांत कॉंग्रेस भरवण्याचा प्रसंग पहिलाच असल्यामुळे आम्हांला काळजी वाटणें साहजिक होतें. एकजुटीने काम करण्याचा आम्हीं निश्चय केल्यामुळे आमच्या अडचणी दूर होऊं लागल्या. ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाऱ्यांनी मदत करण्याचें पूर्वींच मला आश्वासन दिलें होतें. त्याप्रमाणे त्यांनी मदत करण्याला सुरुवातही केली. त्या पक्षांतील कांही लोक स्वागत मंडळाचे सभासद झाले.

होतांहोईतो भक्त्याने कामें द्यावयाचीं नाहीत असें मीं प्रथमपासूनच ठरविलें होतें.

मक्ते दिल्याने स्वागतकमिटीवरील बोजा कमी होतो ही गोष्ट खरी आहे. तथापि पैसा पुष्कळ खर्च होतो व मनासारखें काम झालें नाही म्हणजे मक्तेदाराबरोबर तक्रार सुरू होते. याचा मला १९१६ सालीं प्रांतिक परिषद भरविल्यावेळीं थोडासा अनुभव आला होता. माझा निर्णय सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना पसंत पडला.

रीतीप्रमाणे वेगवेगळ्या कामांकरिता निरनिराळ्या पोटकमिट्या नेमल्या होत्या. तथापि मी व माझ्या खास कांही स्नेही मंडळींनी प्रत्येक कमिटीशीं प्रत्यक्ष संबंध ठेवला होता. कोणत्याही कमिटींत विनाकारण ढवळाढवळ न करितां, प्रत्येक कमिटीच्या कामाची मला माहिती दररोज मिळत असे व माझ्याच सल्ल्याने बरींच कामें होत असत. त्यामुळे कामांत एकसूत्रीपणा राहिला. भिडेखातर किंवा नावाखातर अशी फार मंडळी कमिटींत घातली नव्हती. खऱ्या कळकळीने कामें करणारी व माझ्यासंबंधाने प्रेमादर अथवा आत्मीयता असणारी अशीच मंडळी पुष्कळ होती. म्हणून सर्व कामें सुरळीत होत गेलीं.

### *वल्लभभाईंची चौकशी*

कॉंग्रेसच्या कॅंपची रचना (plan) वगैरे तयार करण्याचें काम आमचे स्नेही बी. कृष्णराव (पेन्शनर सुपरिंटेंडिंग इंजिनियर) यांच्या सल्ल्याने केलें होतें. म्युनिसिपालिटीला नवीन एक्सटेन्शनकरिता नवे रस्ते बांधावयाचे होते. ते कॉंग्रेसच्या पूर्वी तयार करून देण्याचें म्युनिसिपालिटीने ठरविलें होतें. या रस्त्यांना धरूनच आम्हीं कॅंपची रचना केली होती. त्यामुळे रस्ते, गटारें वगैरे बांधण्याचा खर्च परस्पर गेला. बेळगावास पावसाळा जास्ती असल्यामुळे प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करणें सोयीचें नसतें. तथापि बांबू, खांब, वासे, इत्यादि जंगलांतील सामान जवळ कोणत्या जंगलांत सोयीने मिळतें याचा तपास करून दसऱ्या-नंतर त्याची तोडण करण्याची व्यवस्था केली होती. हें सामानदेखील बाजारांत विकत न घेतां जंगलांत आकार भरून आमच्या खर्चाने तोडवून आणण्याची व्यवस्था केली. या व्यवस्थेमुळे कंत्राटदारांना किंवा व्यापाऱ्यांना जो नफा मिळावयाचा तो वाचला. कोकोनाडाला नेहमीप्रमाणे मांडव न घालतां एक मोठा तंबू उभारण्यांत आला होता. तोच तंबू आम्हीं खरेदी केला. त्यामुळे मंडपांचा बराच खर्च वाचला. अशा प्रकारें प्रत्येक बाबतींत प्रथमपासूनच काटकसरीने खर्च करण्याचें धोरण ठरविलें होतें.

कर्नाटकांतील लोक उदार हस्ताने कॉंग्रेसला मदत करून ती यशस्वी करतील अशी माझी खात्री होती. पण वारंवार त्यांच्यामागे टोचणी लावणें जरूर होतें. म्हणून स्वागत मंडळाचे सभासद होऊन कॉंग्रेसच्या खर्चाकरिता आर्थिक मदत लवकर द्यावी, म्हणून एक तातडीचें विनंतीपत्र वर्तमानपत्रांतून मीं प्रसिद्ध केलें. तें वल्लभभाईंच्या पाहण्यांत आलें. तेव्हा मी बऱ्याच अडचणींत आहें असें त्यांना वाटून त्यांनी कांही मदत पाहिजे की काय अशी चवकशी केली. पण बाहेरून मदत घेण्याचा प्रसंग नाही, असें मीं त्यांना कळवलें.

## जळगावची महाराष्ट्र प्रांतिक परिषद

याच संधीला जळगावास (पूर्व खानदेश) महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरावयाची होती. तिचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल मला स्वागत मंडळाकडून पत्र आलें. पण मी कॉंग्रेसच्या तयारीच्या कामांत गुंतलों असल्यामुळे मला सवड नाही असें मीं कळविलें. त्यानंतर दास्ताने व शंकरराव देव स्वतः आले, व त्यांनी मला फारच आग्रह केला. माझा नाइलाज झाला व मीं त्यांचें म्हणणें मान्य केलें. या वेळीं गांधीजींची सुटका झाली होती आणि ते मुंबईजवळ जुहू येथे जाऊन राहिले होते. स्वराज्य पक्षासंबंधाने त्यांनी आपलें मत जाहीर केलें नव्हतें. तेव्हा कौन्सिलांच्या बाबतींत त्यांचें धोरण काय राहील याबद्दल तर्कवितर्क चालू होते. स्वतः पंडित मोतीलाल नेहरू जुहूला जाऊन त्यांच्याशीं वाटाघाट करीत होते. महाराष्ट्रांत हा वाद पुरा मिटला नव्हता. अशा स्थितींत जळगावच्या परिषदेमध्ये या विषयासंबंधाने मीं काय बोलावें याबद्दल गांधींचा सल्ला घेतलेला बरा, असें मला वाटून मी त्यांना भेटण्याकरिता जुहूला गेलों. त्यांची प्रकृती चांगली सुधारली नव्हती. महाराष्ट्रांत कौन्सिलच्या बाबतींत तीव्र मतभेद आहे, मला स्वतःला कौन्सिलबहिष्कारच पसंत आहे, तेव्हां जळगावास यासंबंधाने मी काय धोरण स्वीकारावें, असें त्यांना मीं विचारलें. आपला विचार ठरला नाही म्हणून त्याविषयीं जळगावास कांही न बोलणें बरें, असा त्यांनी सल्ला दिला. मी जळगावला त्यानंतर गेलों. तेथे पटेलबंधू विठ्ठलभाई व वल्लभभाई आले होते. महाराष्ट्रांतील नाफेर पक्षाचीच मंडळी आली होती. त्यांत शिवरामपंत परांजपे, वासूकाका जोशी, देव, दास्ताने वगैरे प्रमुख होते. कौन्सिलबहिष्कारासंबंधाने माझें मत मीं स्पष्टपणें मांडावें असें त्यांचें मत पडलें. वल्लभभाईंचें मत तसेंच होतें. तथापि या बाबतींत गांधीजींचा सल्ला लक्षांत घेऊन आणि दिल्ली व कोकोनाडा येथील कॉंग्रेसने पास केलेल्या त्या ठरावाला अनुसरून माझें स्वतःचें मत निश्चितपणें न मांडतां मीं मोघम भाषण केलें; व गांधीजींची प्रकृती बरी झाल्यानंतर हा वाद मिटेल असें सांगितलें. पटेलबंधू हे जातीने पाटीदार आहेत. खानदेशांतही या जातीचे लोक पुष्कळ आहेत. त्यांच्यातर्फे या दोघांना मानपत्रें देण्याचा समारंभ झाला. त्या वेळीं दोघा भावांच्या भाषणांत कौन्सिलच्या संबंधाने एकमेका-विरुद्ध विचार प्रदर्शित करण्यांत आले. त्यामुळे लोकांना मौज वाटली.

## अहमदाबादची वादग्रस्त बैठक

जळगाव कॉंग्रेसनंतर महंमदअल्लींनी अहमदाबादेस ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा बोलावली होती. गांधी बंधमुक्त झाल्यानंतरची ही पहिलीच ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा होती. या प्रसंगीं गांधी हे आपलें धोरण ठरावाच्या रूपाने जाहीर करणार होते. म्हणून या कमिटीला बरेंच महत्त्व होतें.

१९२३ सालीं वर्किंग कमिटीने असहकारितेच्या कार्यक्रमांत कोर्टांवरील बहिष्काराच्या संबंधाने फेरबदल केला होता. तो म्हणजे, कोर्टावरील पूर्ण बहिष्कार काढून दिवाणी, मुलकी व राजकीय स्वरूपाच्या खटल्यांखेरीज इतर फौजदारी कामांत भाग घेण्याला हरकत नाही असें ठरवलें होतें. कॉंग्रेसचे लोक कोर्टांत जात नाहीत असें पाहून पुष्कळ लोकांनी जुने वाद उपस्थित करून एकतर्फी पुरावा देऊन आपला फायदा करून घेण्याला प्रारंभ केला होता. त्यामुळे बऱ्याच कॉंग्रेसच्या लोकांचें नुकसान होऊं लागलें. स्वतः माझी अशा प्रकारें वार्षिक तीन-साडेतीन हजार रुपये उत्पन्नाची मिळकत गेली होती. पण कोर्टात मीं माझ्यातर्फे पुरावा मांडल्यानंतर या प्रकरणाचा अपिलांत माझ्या वतीने निकाल लागला. तथापि मीं विरुद्ध पक्षकारांशीं आपसांत तोड करून घेतली. वकिली सोडलेल्यांपैकी बरेच वकील परत आपापल्या कामाला लागले होते. ही स्थिती लक्षांत घेऊन वर्किंग कमिटीने वर नमूद केलेला ठराव पास केला होता. ही गोष्ट गांधीजींच्या नजरेला आणल्यामुळे त्यांनी वर्किंग कमिटीपुढे व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीपुढे नागपूर येथे १९२० सालीं जो कार्यक्रम कॉंग्रेसमध्ये पास झाला तो जशाचा तसा मांडला. वर्किंग कमिटींत त्याबद्दल विचार होत असतांना कोर्टाच्या बाबतींत पूर्वी वर्किंग कमिटीने केलेला ठराव मीं त्यांच्या नजरेला आणला. तेव्हा यासंबंधाने ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत मी फिरून विचार करीन असें त्यांनी सांगितलें. वर्किंग कमिटींत गांधींनी मांडलेला ठराव जशाचा तसा पास झाला. पण त्यापूर्वीच मी कोर्टात हजर होऊन काम चालवीत होतो. म्हणून मी वर्किंग कमिटीच्या सभासदत्वाचा व चिटणिशीच्या जागेचा राजीनामा दिला. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत गांधी हे त्या ठरावाच्या बाबतींत कांही सुधारणा करणार आहेत, तेव्हा राजीनामा देण्याचें कारण नाही, असें सांगून महमदअलींनी राजीनामा परत दिला.

दुसरा एक महत्त्वाचा ठराव गांधींनी मांडला होता. बंगालमध्ये एका युरोपियन अधिकाऱ्याचा गोपीनाथ साहा या नावाच्या मनुष्याने खून केला होता. या अत्याचाराबद्दल पूर्ण निषेधात्मक असा गांधीजींचा ठराव होता. यापूर्वी सिराजगंज येथे बंगाल प्रांतिक परिषद दास यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्या वेळीं गोपीनाथाच्या अत्याचाराच्या कृत्याबद्दल निषेध करून त्याचें धैर्य व देशाभिमान याबद्दल त्याचें अभिनंदन करण्यांत आलें होतें. अशा प्रकारचा निषेध गांधींना नको होता. त्यांच्या मताप्रमाणें असे ठराव पास केल्यास अत्याचारांना बसावा तसा आळा बसत नाही. गांधींनी मांडलेल्या ठरावाला दासबाबूंनी व इतर कांही मंडळींनी कसून विरोध केला. पण, गांधींचा ठराव बहुमताने पास झाला. कॉंग्रेसच्या कार्यक्रमासंबंधाने गांधींनी आखलेल्या ठरावालाही स्वराज्य पक्षाकडून विरोध आला. यवतमाळच्या डॉ. बाबासाहेब परांजपे यांनी तर गांधीजींना राजकारण सोडून हिमालयांत तपश्चर्या करीत बसण्याचा उपदेश केला! ही गोष्ट मोतीलाल व दास यांना आवडली नसावी असें मला वाटलें. त्यांना गांधींनी राजकारणांतून आपलें अंग काढून घ्यावें असें वाटत नव्हतें; पण त्यांनी आपल्या म्हणजे

स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाला पाठिंबा द्यावा अशी त्यांची इच्छा होती. या प्रश्नावर वादविवाद झाल्यानंतर तो मताला टाकण्यापूर्वी मोतीलालजींनी एक स्टेटमेंट वाचलें. त्यांत, स्वराज्य पक्षाचीं मतें व कार्यक्रम थोडक्यांत ग्रथित करून आपला पक्ष त्याच धोरणाने काम करीत राहणार, तथापि ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत हजर राहून गांधींच्या विरुद्ध मत देण्याल आपण तयार नाही, असें नमूद केलें होतें. ज्यांना आपल्या मताप्रमाणे वागावें असें वाटत असेल त्यांनी आपल्याबरोबरच कमिटीची सभा सोडून बाहेर यावें असें त्यांनी सांगितलें. त्यानंतर ते व त्यांची मंडळी सभा सोडून बाहेर गेली. त्यामुळे एकमताने गांधींनी मांडलेला ठराव मंजूर झाला. तथापि ज्यांनी सभागृह सोडलें होतें त्यांचीं मतें ठरावाला विरुद्ध म्हणून मोजण्यांत आलीं. तरी गांधींच्याच तर्फे मताधिक्य होत होतें. ही सर्व भानगड संपण्याला बराच वेळ लागला. म्हणून संध्याकाळपर्यंत सभा तहकूब झाली. ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत नागपूरच्या काँग्रेसचा ठराव जशाचा तसा पास झाल्यानंतर मीं राजीनामा लिहून पुन्हा महंमदअल्लींकडे दिला. तेव्हा गांधी कोर्टाच्या बहिष्काराच्या बाबतींत दुसरा ठराव संध्याकाळच्या सभेंत आणणार आहेत, याकरिता राजीनामा देण्याची जरुरी नाही, असें सांगून त्यांनी तो पुन्हा मला परत दिला.

### *गांधींचें 'रुदनपर्व'!*

संध्याकाळच्या सभेला स्वराज्य पक्षांतील बहुतेक पुढारी हजर नव्हते. कोर्टाच्या बहिष्काराच्या बाबतींत पूर्वी वर्किंग कमिटीने जो फेरबदल केला होता त्याला अनुसरून गांधींनी पुन्हा ठराव मांडला. अर्थात हा ठराव त्याच दिवशीं सकाळीं पास झालेल्या ठरावांत कोर्टाच्या बाबतींत फेरबदल करणारा होता. दोन्ही ठराव आपणच मांडीत असल्याने, व असें कां करावें लागलें याचें स्पष्टीकरण केल्यानंतर, कोणी हरकत घेणार नाही असें गांधीजींना वाटलें होतें. पण ठरावाच्या समर्थनार्थ त्यांचें भाषण झाल्यानंतर सिंधचे डॉ. चोइतराम यांनी हा ठराव सकाळीं मंजूर झालेल्या ठरावाच्या विरुद्ध असल्यामुळें तो गैरकायदेशीर आहे अशी तक्रार केली, आणि अध्यक्षांचा या बाबतींत निकाल मागितला. स्वतः गांधींनीच ठराव मांडला होता, म्हणून अशा प्रकारची हरकत येणार नाही, अशी महंमदअल्लींची अपेक्षा होती. तथापि रूलिंग मागितल्यानंतर तें देणें त्यांना भाग होतें. तरी एकदोन मिनिटें रूलिंग देण्याला त्यांनी उशीर केला. त्याबरोबर आपल्या मुर्वतीखातर रूलिंग देण्याला अध्यक्ष कचरतात असें गांधींना वाटून त्यांनी रूलिंग देण्याला त्यांना कळविलें. गांधींचा ठराव नियमबाह्य आहे असें रूलिंग अध्यक्षांनी दिलें. कायद्याच्या दृष्टीने पाहतां त्यांनी दिलेलें रूलिंग बरोबरच होतें. तथापि डॉ. चोइतरामांनी आपण आणलेल्या ठरावाला कायद्याच्या शब्दावर भिस्त ठेवून अशा प्रकारची हरकत घ्यावी ही गोष्ट गांधींना लागली. अहिंसात्मक असहकाराचें तत्त्व राजकारणांत आणण्याचा प्रयत्न प्रथमच हिंदुस्थानांत होत असतांना व त्याचें पुरस्कारित्व आपल्याकडे असतां कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या करूं नयेत हें

१९२३ सालीं वर्किंग कमिटीने असहकारितेच्या कार्यक्रमांत कोर्टावरील बहिष्काराच्या संबंधाने फेरबदल केला होता. तो म्हणजे, कोर्टावरील पूर्ण बहिष्कार काढून दिवाणी, मुलकी व राजकीय स्वरूपाच्या खटल्यांखेरीज इतर फौजदारी कामांत भाग घेण्याला हरकत नाही असें ठरवलें होतें. कॉंग्रेसचे लोक कोर्टांत जात नाहीत असें पाहून पुष्कळ लोकांनी जुने वाद उपस्थित करून एकतर्फी पुरावा देऊन आपला फायदा करून घेण्याला प्रारंभ केला होता. त्यामुळे बऱ्याच कॉंग्रेसच्या लोकांचें नुकसान होऊं लागलें. स्वतः माझी अशा प्रकारें वार्षिक तीन-साडेतीन हजार रुपये उत्पन्नाची मिळकत गेली होती. पण कोर्टांत मीं माझ्यातर्फे पुरावा मांडल्यानंतर या प्रकरणाचा अपिलांत माझ्या वतीने निकाल लागला. तथापि मीं विरुद्ध पक्षकारांशीं आपसांत तोड करून घेतली. वकिली सोडलेल्यांपैकी बरेच वकील परत आपापल्या कामाला लागले होते. ही स्थिती लक्षांत घेऊन वर्किंग कमिटीने वर नमूद केलेला ठराव पास केला होता. ही गोष्ट गांधीजींच्या नजरेला आणल्यामुळे त्यांनी वर्किंग कमिटीपुढे व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीपुढे नागपूर येथे १९२० सालीं जो कार्यक्रम कॉंग्रेसमध्ये पास झाला तो जशाचा तसा मांडला. वर्किंग कमिटींत त्याबद्दल विचार होत असतांना कोर्टाच्या बाबतींत पूर्वी वर्किंग कमिटीने केलेला ठराव मीं त्यांच्या नजरेला आणला. तेव्हा यासंबंधाने ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत मी फिरून विचार करीन असें त्यांनी सांगितलें. वर्किंग कमिटींत गांधींनी मांडलेला ठराव जशाचा तसा पास झाला. पण त्यापूर्वीच मी कोर्टांत हजर होऊन काम चालवीत होतों. म्हणून मी वर्किंग कमिटीच्या सभासदत्वाचा व चिटणिशीच्या जागेचा राजीनामा दिला. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत गांधी हे त्या ठरावाच्या बाबतींत कांही सुधारणा करणार आहेत, तेव्हा राजीनामा देण्याचें कारण नाही, असें सांगून महमदअल्लींनी राजीनामा परत दिला.

दुसरा एक महत्त्वाचा ठराव गांधींनी मांडला होता. बंगालमध्ये एका युरोपियन अधिकाऱ्याचा गोपीनाथ साहा या नावाच्या मनुष्याने खून केला होता. या अत्याचाराबद्दल पूर्ण निषेधात्मक असा गांधीजींचा ठराव होता. यापूर्वी सिराजगंज येथे बंगाल प्रांतिक परिषद दास यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्या वेळीं गोपीनाथाच्या अत्याचाराच्या कृत्याबद्दल निषेध करून त्याचें धैर्य व देशाभिमान याबद्दल त्याचें अभिनंदन करण्यांत आलें होतें. अशा प्रकारचा निषेध गांधींना नको होता. त्यांच्या मताप्रमाणें असे ठराव पास केल्यास अत्याचारांना बसावा तसा आळा बसत नाही. गांधींनी मांडलेल्या ठरावाला दासबाबूंनी व इतर कांही मंडळींनी कसून विरोध केला. पण, गांधींचा ठराव बहुमताने पास झाला. कॉंग्रेसच्या कार्यक्रमासंबंधाने गांधींनी आखलेल्या ठरावालाही स्वराज्य पक्षाकडून विरोध आला. यवतमाळच्या डॉ. बाबासाहेब परांजपे यांनी तर गांधीजींना राजकारण सोडून हिमालयांत तपश्चर्या करीत बसण्याचा उपदेश केला ! ही गोष्ट मोतीलाल व दास यांना आवडली नसावी असें मला वाटलें. त्यांना गांधींनी राजकारणांतून आपलें अंग काढून घ्यावें असें वाटत नव्हतें; पण त्यांनी आपल्या म्हणजे

स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाला पाठिंबा द्यावा अशी त्यांची इच्छा होती. या प्रश्नावर वादविवाद झाल्यानंतर तो मताला टाकण्यापूर्वी मोतीलालजींनी एक स्टेटमेंट वाचलें. त्यांत, स्वराज्य पक्षाचीं मतें व कार्यक्रम थोडक्यांत ग्रथित करून आपला पक्ष त्याच धोरणानें काम करीत राहणार, तथापि ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत हजर राहून गांधींच्या विरुद्ध मत देण्याला आपण तयार नाहीं, असें नमूद केलें होतें. ज्यांना आपल्या मताप्रमाणे वागावें असें वाटत असेल त्यांनी आपल्याबरोबरच कमिटीची सभा सोडून बाहेर यावें असें त्यांनी सांगितलें. त्यानंतर ते व त्यांची मंडळी सभा सोडून बाहेर गेली. त्यामुळे एकमतानें गांधींनी मांडलेला ठराव मंजूर झाला. तथापि ज्यांनी सभागृह सोडलें होतें त्यांचीं मतें ठरावाला विरुद्ध म्हणून मोजण्यांत आलीं. तरी गांधींच्याच तर्फे मताधिक्य होत होतें. ही सर्व भानगड संपण्याला बराच वेळ लागला. म्हणून संध्याकाळपर्यंत सभा तहकूब झाली. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत नागपूरच्या कॉंग्रेसचा ठराव जशाचा तसा पास झाल्यानंतर मीं राजीनामा लिहून पुन्हा महंमदअल्लींकडे दिला. तेव्हा गांधी कोर्टांच्या बहिष्काराच्या बाबतींत दुसरा ठराव संध्याकाळच्या सभेंत आणणार आहेत, याकरिता राजीनामा देण्याची जरुरी नाहीं, असें सांगून त्यांनी तो पुन्हा मला परत दिला.

### *गांधींचें 'रुदनपर्व'!*

संध्याकाळच्या सभेला स्वराज्य पक्षांतील बहुतेक पुढारी हजर नव्हते. कोर्टांच्या बहिष्काराच्या बाबतींत पूर्वी वर्किंग कमिटीनें जो फेरबदल केला होता त्याला अनुसरून गांधींनी पुन्हा ठराव मांडला. अर्थात हा ठराव त्याच दिवशीं सकाळीं पास झालेल्या ठरावांत कोर्टांच्या बाबतींत फेरबदल करणारा होता. दोन्ही ठराव आपणच मांडीत असल्यानें, व असें कां करावें लागलें याचें स्पष्टीकरण केल्यानंतर, कोणी हरकत घेणार नाहीं असें गांधीजींना वाटलें होतें. पण ठरावाच्या समर्थनार्थ त्यांचें भाषण झाल्यानंतर सिंधचे डॉ. चोइतराम यांनी हा ठराव सकाळीं मंजूर झालेल्या ठरावाच्या विरुद्ध असल्यामुळें तो गैरकायदेशीर आहे अशी तक्रार केली, आणि अध्यक्षांचा या बाबतींत निकाल मागितला. स्वतः गांधींनीच ठराव मांडला होता, म्हणून अशा प्रकारची हरकत येणार नाहीं, अशी महंमदअल्लींची अपेक्षा होती. तथापि रूलिंग मागितल्यानंतर तें देणें त्यांना भाग होतें. तरी एकदोन मिनिटें रूलिंग देण्याला त्यांनी उशीर केला. त्याबरोबर आपल्या मुर्वतीखातर रूलिंग देण्याला अध्यक्ष कचरतात असें गांधींना वाटून त्यांनी रूलिंग देण्याला त्यांना कळविलें. गांधींचा ठराव नियमबाह्य आहे असें रूलिंग अध्यक्षांनी दिलें. कायद्याच्या दृष्टीनें पाहतां त्यांनी दिलेलें रूलिंग बरोबरच होतें. तथापि डॉ. चोइतरामांनी आपण आणलेल्या ठरावाला कायद्याच्या शब्दावर भिस्त ठेवून अशा प्रकारची हरकत घ्यावी ही गोष्ट गांधींना लागली. अहिंसात्मक असहकाराचें तत्त्व राजकारणांत आणण्याचा प्रयत्न प्रथमच हिंदुस्थानांत होत असतांना व त्याचें पुरस्कारित्व आपल्याकडे असतां कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या करूं नयेत हें

ठरविण्याच्या कामीं केवळ कायद्याच्या शब्दच्छलाचा उपयोग केला जावा याबद्दल त्यांना वाईट वाटलें. तें इतकें कीं, त्यांना झालेलें दुःख त्यांना आवरतां आलें नाही व त्यांना रडूं आलें. सभा स्तब्ध झाली. चोइतरामांनी आपली चूक कबूल केली. इतरांनीही गांधींच्याच सल्ल्याप्रमाणे वागण्यास तयार असल्याबद्दलचीं भाषणें केलीं. पण गांधी कांही बोलले नाहीत. सभेचें काम आटोपलें. मीं पुन्हा राजीनामा महंमदअल्लींकडे दिला व त्यांनी गांधींच्या सल्ल्याने तो मंजूर केला. या सर्व हकीकतीची चर्चा सुरू झाली. गांधींनी राजकारणांतून निवृत्त व्हावें असें म्हणणाऱ्यांचा पक्ष महाराष्ट्रांत प्रबळ होता. त्यांना हें हत्यार चांगलेंच सापडलें. गांधींवर निंदाप्रचुर टीका सुरू झाली. 'केसरीं'त तर या सर्व प्रकाराला 'रुदनपर्व' असें नाव देण्यांत आलें व त्यावर एक अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्यांत मी गांधींचा अनुयायी असल्यामुळे माझ्या वर्तनाच्या समर्थनार्थच गांधींनी विसंगत ठराव मांडला अशी गांधींवर टीका केली! आपल्या मनाला पटत नाही अशी एखादी गोष्ट गांधी आपल्या स्नेह्याच्या अगर अनुयायाच्या भिडेखातर करतील ही गोष्ट अगदी असंभवनीय आहे. तथापि ज्यांनी गांधींवर कांहीही आरोप करून कॉंग्रेसमध्ये असलेलें त्यांचें वजन कमी करण्याचें व्रतच पत्करलें आहे त्यांना गांधींच्या खऱ्या गुणांची पारख होणें कठीण आहे व झाली तरी ती प्रांजलपणें मानणें हें त्यापेक्षाही कठीण आहे. असो.

यानंतर मीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या व प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. पुढे कांही दिवसांनी कॉंग्रेसच्या स्वागतमंडळाची कमिटीची सभा भरली. त्या वेळीं याही कमिटीच्या अध्यक्षपदाचा मीं राजीनामा दिला. पण स्वागत-मंडळ ही कांही कॉंग्रेसच्या कॉन्स्टिट्यूशनप्रमाणे कॉंग्रेसचे ठराव अमलांत आणणारी कमिटी नाही, या मुद्द्यावर माझा राजीनामा मंजूर झाला नाही. केवळ कॉंग्रेसची बैठक भरविण्याची तयारी करण्यापलीकडे स्वागतमंडळाचें काम नसतें व त्या कमिटीच्या सभासदांना कॉंग्रेसच्या कामकाजांत मत वगैरे देण्याचादेखील अधिकार नाही; म्हणून मला अध्यक्ष या नात्याने काम करण्यास कांही हरकत नाही असें वाटलें व मींही या बाबतींत जास्ती आग्रह धरला नाही.

### *गांधीजींचा २१ दिवसांचा उपवास*

अहमदाबादच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी-नंतर कांही दिवसांनी कोहट येथे हिंदुमुसलमानांत मोठा दंगा झाला, म्हणून गांधी व शौकतअल्ली तिकडील हकीकत समजून घेण्याकरिता तिकडे गेले आणि कांही माहिती घेऊन त्यांनी एक रिपोर्ट केला. पण त्या बाबतींत दोघांचा मतभेद झाला. या आणि हिंदु-मुसल्मानांच्या बाबतींतील आणखी कांही कारणामुळे गांधींनी एकवीस दिवस उपवासाला दिल्ली येथे प्रारंभ केला. त्या वेळीं ते दिल्लीस महंमदअल्लींच्या घरीं उतरले होते. या संबंधाने महंमदअल्लींची मला तार आली. दिल्लीस सर्व पक्षांची परिषद भरविण्याचें त्यांनी

ठरविलें. या परिषदेला येण्याबद्दल महंमदअल्लींकडून मला आमंत्रण आलें. त्याप्रमाणे मी दिल्लीला गेलों. उपवासामुळे गांधीजींना अशक्तपणा येत चालला होता, तरी त्यांची स्मरणशक्ती किंवा हुषारी कमी झाली नव्हती. मी गांधींना भेटलों. पांचसात मिनिटें त्यांच्याशीं बोललों. सूत कातणें, दोन्ही वेळच्या प्रार्थना करणें वगैरे नित्यकर्मे पूर्वीप्रमाणेच ते करीत असत. पुष्कळ मुसलमान मंडळी भेटावयाला येत असत, व हिंदु-मुसलमानांत एकी घडवून आणण्याचीं आश्वासनें देत. या उपवासाच्या दिवसांतच दिल्लीजवळच एका ठिकाणीं कोठे हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. ही बातमी गांधीजींना उपवासांत कळवावी किंवा नाही याबद्दल मंडळींत वाटाघाट झाली. अशक्तपणांत ही बातमी कळविल्यास त्यांना वाईट वाटून प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होईल असें कित्येकांना वाटत होतें. पण उपवास संपल्यानंतर ही दंग्याची हकीकत त्यांना समजणारच आणि ती आपल्याला कळविण्यांत आली नाही म्हणून त्यांच्या मनावर जास्ती वाईट परिणाम होण्याचा संभव अधिक, असें वाटून ही बातमी त्यांना कळविली. बातमी ऐकून ते थोडा वेळ स्तब्ध झाले व विचार करूं लागले. पण यापेक्षा जास्ती अनिष्ट परिणाम कांही झाला नाही. कदाचित उपवासाचें प्रायश्चित्त हाच यावर योग्य उपाय असें त्यांना वाटून समाधान झालें असावें. डॉ. अनसारींच्या व इतर मित्रांच्या आग्रहानें त्यांनी एवढी गोष्ट कबूल केली की, उपवासानें प्राणांतिक प्रसंग आल्यास व त्याप्रमाणे डॉक्टर अनसारी व इतर डॉक्टर यांचा अभिप्राय पडल्यास उपवासाचें व्रत आपण मोडूं. पण तसा प्रसंग आला नाही. एक दिवस प्रकृति फार बिघडली होती. डॉ. अनसारी रात्रभर गांधींजवळ बसले होते. प्रकृती जास्ती घसरत गेली असती तर एक जालीम औषध देण्याचें त्यांनी ठरवलें होतें. पण तसा प्रसंग आला नाही. सकाळीं डॉ. अनसारींना मी भेटलों, तेव्हा त्यांच्या तोंडांतून 'Thank God! the crisis is passed. It is a miracle!' असे उद्गार त्यांनी माझ्याजवळ काढले.

सर्व पक्षांच्या परिषदेंत नेहमीप्रमाणें ठराविक भाषणें झालीं, व मामुली ठराव पास झाले. पण दिलसफाई होईल अशी फारशी आशा मला दिसली नाही. गांधींच्या उपवासाच्या प्रभावाने कांही काम झालें असेल इतकेंच.

या वेळीं दिल्लीस सी. एफ. अँड्र्यूज हे गांधींच्या शुश्रूषेकरिता आले होते. त्यांना मीं प्रथमच पाहिले.

दासबाबू पत्नीसहित गांधींना भेटण्याकरिता आले होते. त्या भेटीच्या वेळीं मी तेथें हजर होतों. गांधी अगदी हळू बोलत होते. उपवासांतून उठल्यानंतर बरें वाटल्यावर कांही गोष्टी ठरवावयाच्या आहेत असें गांधी त्यांच्याजवळ बोलले. पुढे घडून आलेल्या हकीकतीवरून कॉंग्रेसमध्ये जी दुही झाली होती ती मोडण्याच्या विचारांत कदाचित गांधीजी असतील.

पुढे पाटणा येथे वर्किंग कमिटीची सभा भरली व त्या सभेंत अखिल भारतीय चरखा संघ स्थापन करण्यांत आला, व तें काम गांधींनी आपल्याकडे घेऊन बाकीचीं कॉंग्रेसचीं

सर्व कामें व विशेषतः कौन्सिलसंबंधाचें काम दास व मोतीलाल यांच्यावर सोपविलें. अखिल भारतीय चरखा संघाची घटना मंजूर करण्यांत आली, व त्याची व्यवस्था ट्रस्टींकडे सोपविली. प्रथम ट्रस्टींमध्ये मी नव्हतों; पण पुढे मला व राजगोपाळाचार्य यांना घेण्यांत आलें, व तेव्हापासून तें काम मी करीत आहे. चरखा संघानें मला कर्नाटक प्रांताबद्दल एजंट नेमलें व त्या प्रांतांतील खादी संघाचें काम माझ्या मार्फत होत असतें. ही हकीकत पुढे येईल.

प्रकरण तेविसावें

# बेळगावची कॉंग्रेस

### *बेळगाव कॉंग्रेसचे अध्यक्ष*

पाटण्याहून अहमदाबादला गांधी आल्यानंतर चरखा संघाची सभा भरली होती. त्या वेळीं बेळगावच्या कॉंग्रेसचे अध्यक्ष होण्याचें कबूल करण्याबद्दल मीं त्यांना विनंती केली होती. प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनी त्यांचें नाव सुचविलें होतें. पण त्या वेळीं त्यांनी ही गोष्ट मान्य केली नाही व आणखी कांही दिवस गेल्यानंतर निश्चित उत्तर देईन असें म्हणाले.

पुढे मुंबईस सर्वपक्षीय परिषद भरली. त्या वेळीं कांही ब्राह्मणेतर पुढारी हजर होते. पहिल्या दिवशीं सर दिनशा पेटिट अध्यक्ष होते. दुसरे दिवशीं ते आले नाहीत म्हणून श्रीनिवास शास्त्री अध्यक्ष झाले. सर्व पक्षाच्या लोकांनी राजकारणांतील आपापलें धोरण व्यक्त केलें, त्यांत बरीच एकवाक्यता दिसून आली. त्यामुळे त्या वेळीं गांधींनी बेळगावच्या कॉंग्रेसचे अध्यक्ष होण्याचें ठरवलें, व त्यांनी मला त्याप्रमाणे सभेचें काम संपल्याबरोबर कळवलें. मला अतिशय आनंद झाला. त्यांच्याखाली सरोजिनीबाईचा नंबर लागला होता. गांधींनी नाकबूल केलें असतें तर बाई बेळगाव कॉंग्रेसच्या अध्यक्ष झाल्या असत्या. कर्नाटकांतील लोकांची इच्छा गांधींनाच अध्यक्ष करावें अशी होती. गांधींनी अध्यक्ष होण्याचें कबूल केल्यानंतर कर्नाटकांत कॉंग्रेससंबंधाने जास्ती उत्साह आला व कामाला जास्ती जोरांत सुरुवात झाली.

### *बेळगाव कॉंग्रेसचा तंबू*

कॉंग्रेसकरता तंबू उभारण्याचें ठरलें होतें हें पूर्वी आलेंच आहे. तंबू बेळगावला कोकोनाडाहून आणला होता. पण माहितगाराखेरीज तो उभारण्याचें काम होणें शक्य नव्हतें. म्हणून तंबू तयार करणारे व कोकोनाडास

तो उभा करणारे कलकत्त्याचे मुकर्जी यांच्याबरोबर पत्रव्यवहार चालला होता. आम्हांला त्यांची जरुरी आहे असें त्यांना वाटल्यावरून तंबू उभा करण्याच्या मेहनतान्याबद्दल त्यांनी भलतीच मागणी केली. त्यामुळे त्यांचें व आमचें जुळेल असें वाटेना. शेवटीं मुंबईच्या सर्वपक्षीय परिषदेच्या वेळीं दासबाबूंजवळ ही गोष्ट काढून त्यांच्यामार्फत हा वांधा मिटवावा असा मीं विचार केला. परिषदेचें काम संपल्याबरोबर मी त्यांना भेटलों व हकीकत कळविली. त्याबरोबर ते विशेष बोलले नाहीत; पण माझ्याकडून तारेचें फार्म मागून घेऊन कलकत्त्याला मुकर्जीला तार केली. तारेंत मजकूर असा होता : 'Deshpande saw me. Accept Belgaum work. I am responsible for your charges.' कांही विशेष विचारपूस न करता केवळ कॉंग्रेसचें काम म्हणून व माझ्या शब्दावर विश्वास ठेवून या गृहस्थाने एवढी जोखीम अंगावर घेतली याबद्दल मला आनंद झाला आणि त्यांच्या मोठेपणाबद्दल कौतुक वाटलें. बेळगावला मी मुंबईहून परत आलों तोपर्यंत मुकर्जींची अमुक दिवशीं निघतों, काळजी करूं नये, अशी तार माझ्या नावें आली होती. त्याप्रमाणे ते आले व तंबू उभारण्याचें काम त्यांच्या देखरेखीखाली झालें. आम्हीं दिला तो चार्ज त्यांनी आनंदाने घेतला व दासबाबूंना त्याप्रमाणे कळविण्यांत आलें. दासबाबूंच्या दिलदारपणाच्या अनेक गोष्टी ऐकिवांत आहेत. त्यापैकीच वरील एक म्हणून तिचा निर्देश केला आहे.

कॉंग्रेसच्या कॅंपची मुहूर्तमेढ मोठ्या समारंभाने आम्हीं दसऱ्याच्या दिवशीं रोविली होती. तेव्हापासून मी, याळगी, वगैरे मंडळी कॅंपवरच राहूं लागलों. त्यामुळे कामावर देखरेख करण्याचें काम चांगलें होऊं लागलें. कॅंपच्या रचनेच्या कल्पना सुचूं लागल्या. अगोदर प्लॅन केला होता खरा. पण त्यांतही पुढे सुधारणा करण्यांत आल्या.

### *सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः*

बेळगाव, धारवाड, मंगळूर व बल्लारी या चार जिल्ह्यांत फंड गोळा करण्याकरिता मीं दौरा काढला होता. मंगळूरखेरीज सर्व जिल्ह्यांनी अपेक्षेप्रमाणे मदत केली. बल्लारी जिल्ह्याच्या वाटणीला आम्हीं पाच हजार रुपये घातले होते. पण तेथील वकील बी. भीमराव, गुराजीराव वगैरेंच्या खटपटीने जवळ जवळ दहा हजार रुपये मिळाले. बेळगाव जिल्ह्याची रकम तीस हजारावर गेली. चारपांच लोकांनी प्रत्येकीं एक हजार रुपये दिले. धारवाड जिल्ह्यांतूनही चांगली मदत मिळाली. जोग वकिलांनी एक हजार रुपये दिले.

कारवार जिल्हा अगदी गरीब म्हणून आम्हीं त्या जिल्ह्यांतून तीन हजार रुपयांपेक्षा जास्ती मिळतील असा अंदाज केला नव्हता. त्या जिल्ह्यांतही मी जाणार होतों. पण तेथील कार्यकर्त्यांनी माझ्या कामाची धांदल पाहून व अडचण लक्षांत घेऊन मी न गेलों तरी चालेल असें कळविलें. तेथील मंडळींनी स्वागत मंडळाचे सभासद मिळविण्याची खटपट तर केलीच. त्या मार्गाने त्यांच्या वाटणीला घातलेल्या रकमेची भरतीही केली.

पण एवढ्यावर स्वस्थ न बसतां त्या जिल्ह्याचा बहुजनसमाज अत्यंत गरीब असला तरी काँग्रेसबद्दल व गांधींबद्दल विशेष श्रद्धा व भक्ती बाळगणारा असल्यामुळे त्यांच्याकडून दोन आण्यांपासून वर्गणी घेतली व जवळजवळ सहा-सात हजार रुपये या उपायाने मिळवून पाठविले. १९२० सालीं कॉलेज सोडून या जिल्ह्यांत काम करण्याकरितां गेलेल्या मंडळींनी या कामीं बरीच मेहनत घेतली. त्यांमध्ये शंकरराव गुळवांडी, कोपीकर हे प्रमुख होते. १९३० च्या व चालू चळवळींत याच जिल्ह्यांतील गोरगरिबांनी भाग घेऊन जंगलसत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह, करबंदीची चळवळ केली. मंगळूरच्या कर्नाड सदाशिवरावांनी बरीच खटपट केली. पण त्या जिल्ह्यांत आम्हांला यावें तितकें यश आलें नाही, म्हणून त्यांना त्या वेळीं विषाद वाटला असावा. पण बेळगावची काँग्रेस झाल्यानंतर मंगळूरच्या कित्येक गृहस्थांनी मंगळुरास काँग्रेस भरली नाही हें एका परीने बरें झालें, आपल्याकडून एवढा खटाटोप झाला नसता, असे उद्गार माझ्याजवळ काढले.

म्हैसूर संस्थानांतून चांगली मदत मिळाली. हिंदी राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग. त्यामुळे त्यांना बराच उत्साह आला होता. त्याचप्रमाणे ब्रिटिश कर्नाटकाशीं या काँग्रेसच्या योगाने पहिल्यांदाच त्यांचें दळणवळण सुरू झालें. १९३०च्या व हल्लीच्या चळवळींत तेथील लोकांनी बराच भाग घेतला, व खादीकार्याला चांगली मदत केली.

म्हैसूर सरकारने बेळगावच्या काँग्रेसच्या प्रदर्शनाकरिता आपल्या म्यूझियममधून कांही जिनसा आपल्या खर्चाने पाठवल्या होत्या. त्यांत प्राचीन उंची कापडाचे नमुनेही होते. त्याचप्रमाणे आपल्या खर्चाने गवई, बीनकार, वाजंत्री वगैरे पाठविले होते. त्यांत हिंदुस्थानांत रुद्रवीणा वाजविण्यांत प्रवीण असे शेषण्णा होते. त्यांचें वय बरेंच झालें होतें, तरी वीणावादनाचें त्यांचें कौशल्य पाहून मंडळी चकित झाली. स्वतः गांधीजी दीड तासपर्यंत त्यांचें वादन एकाग्रतेने ऐकत होते.

पुण्यास ऐतिहासिक मंडळाच्या संग्रहालयांत नाना फडणीस यांचा एक अंगरखा आहे. तो पाहिल्यास त्या काळांत कोणत्या प्रकारचें कापड निघत होतें याची कल्पना येण्यासारखी आहे. म्हणून तो पाठवण्याबद्दल मीं विनंती केली होती. पण जागेवरून तो हलवावयाचा नाही या सबबीवर तो येऊं शकला नाही! तथापि म्हैसूर राजवाड्यांतील त्या अंगरख्यापेक्षाही पुरातन कालांतील वस्त्रें आल्याने आमचें काम थोडें तरी भागलें.

### 'विजयनगर'ची आठवण

प्रांतिक काँग्रेस कमिट्यांनी गांधीजींना अध्यक्ष-पदाकरिता निवडलें होतें, तरी स्वागत मंडळानें ती निवडणूक कायम करण्याचें औपचारिक काम राहिलेंच होतें. म्हणून स्वागत मंडळाची सभा मीं बेळगावास बोलाविली. सभेंत एकट्या बेळवींनी विरुद्ध मत दिलें; आणि काँग्रेस ही राजकारणी संस्था आहे व

गांधी मोठे आहेत हें मान्य असलें, तरी त्यांना राजकारण कळत नाही म्हणून आपला विरोध आहे असें सांगून त्यांनी आपलें मत सरोजिनीबाईना दिलें ! पण यानंतरची व विशेषतः राउंड टेबल कॉन्फरन्सच्या प्रसंगीं गांधींनी केलेली कामगिरी पाहून, १९३१ सालीं गांधीजयंतीसंबंधाने बेळगावास भरलेल्या जाहीर सभेंत, गांधींना राजकारण समजत नाही अशी आपली कल्पना होती, पण ती चुकीची होती, अशी त्यांनी जाहीर रीतीने कबुली दिली. काळाचा महिमा ! दुसरें काय ?

याच स्वागतमंडळाचे सभेंत कँपला कर्नाटकाच्या प्राचीन साम्राज्याच्या मुख्य राजधानीचें—विजयनगरचें—नाव देण्याचें ठरलें आणि मोठ्या विहिरीला रामायणांत उल्लेखित असलेल्या व विजयनगरांत प्रसिद्ध असलेल्या पंपा सरोवराचें नाव दिलें. त्याचप्रमाणे रस्त्यांचीं नावें आधुनिक हिंदी देशभक्तांचीं न ठेवतां कर्नाटकांतील जुन्या ऐतिहासिक प्रसिद्ध पुरुषांचीं देण्यांत आलीं. उदाहरणार्थ, विद्यारण्य रस्ता. सर्व पाट्या कानडींत व हिंदींत लिहाव्या असें ठरलें. विजयनगरच्या विरूपाक्षाच्या देवालयाच्या प्रवेशद्वाराला एक उंच गोपूर आहे. त्याचें निदर्शक म्हणून काँग्रेसच्या तंबूच्या महाद्वारावर गोपूर करण्याचें ठरलें. एकंदरींत कर्नाटकाचें वैशिष्ट्य दाखवण्याची जी हौस कित्येक मंडळींची होती ती त्यांच्या इच्छेप्रमाणे पुरी करणारे सर्व ठराव एकमताने मंजूर झाले.

## रागलोभांतील विवेक

यानंतर काँग्रेसचें काम संपेपर्यंत मीं स्वागत मंडळाची सभा भरविली नाही. मोठ्या सभेंत वादविवादाला पुष्कळ फाटे फुटतात व कामें उरकण्यापेक्षा मतभेदाचें प्रदर्शनच जास्ती होतें. वेळेचा अपव्यय होतो व पुष्कळ वेळां मनांत विकल्प उत्पन्न होतात. हें सर्व टाळण्याकरिता स्वागत मंडळाची सभा न बोलावितां जी मंडळी कामाला हजर असत व ज्यांनी आपला सर्व वेळ याच कामाला देण्याचें ठरविलें होतें त्यांच्या मदतीने कामें संपविण्याचें ठरविलें. या कामीं मुख्य चिटणीस मधुराव केंभावी (विजापूर) यांची मला फार मदत झाली. विनबोभाट्याने कामें उरकण्याचीं त्यांची हातोटी फार चांगली आहे. त्याचप्रमाणे प्रदर्शनाकडील काम हणमंतराव कौजलगी यांनी आपल्या जबाबदारीवर केलें. बाकी बहुतेक सर्व कामें कृष्णराव याळगी हे करीत असत. साधारणपणें आठदहा मंडळींची बैठक दररोज भरून झालेल्या कामाचा अहवाल व दुसऱ्या दिवशींच्या कामाबद्दल निश्चित दिशा आम्ही ठरवीत होतों. त्यामुळे स्वागत मंडळांतील कांही मंडळी आमच्यावर रागावली, आणि आम्ही सर्व सत्ता आमच्याच हातीं ठेवून घेऊन कामें करतों असे आमच्यावर आरोपही येऊं लागले. पण तिकडे आम्हीं लक्ष दिलें नाही. मोठ्या कामांत सर्वांचें समाधान करणें शक्य नसतें. ज्यांना ज्यांना कामें प्रत्यक्ष करावयाचीं असतील त्यांनी कँपमध्ये राहण्याला यावें व आपापलीं कामें करावींत, असें एक पत्रक सर्व कमिटीच्या सभासदांना पाठविलें होतें. त्याप्रमाणे जे आले ते कामाला लागले. त्यामुळे सर्व कामें सुरळीत व

एकमतानें झालीं. या पद्धतींत कांही दोष असतील. पण अडचणीच्या प्रसंगीं वेळेवर कामें होण्याकरिता ती अंगिकारावी लागते असें मी अनुभवानें म्हणतों.

अशा कामांत उगाच दोष काढण्याची कित्येकांना सवय असते. त्याचप्रमाणे कित्येक मत्सरालाही बळी पडतात व विघ्नें उत्पन्न करण्याचा उपद्व्याप करतात. पण मुख्य कार्यकर्त्यांनी तिकडे लक्ष न देतां शांतपणानें आपलें धोरण न सोडतां काम केल्यास सर्व उत्तम प्रकारें निभावतें असा माझा अनुभव आहे. आम्हांला हें धोरण कां स्वीकारावें लागलें हें समजण्याकरिता एक उदाहरण देतों.

एका कमिटीकडे गायनवादनाची व्यवस्था करण्याचें काम दिलें होतें. त्या कमिटीची एकदा बैठक भरल्यावेळीं कोणाकोणाला गायनाकरिता आमंत्रणें द्यावीं असा प्रश्न निघाला. याच बाबतींत आंध्रचे सांबमूर्ति यांचेकडून मला एक पत्र आलें होतें; त्यांत त्यांनी आंध्र देशाचे एक प्रसिद्ध गवई आहेत त्यांचा येण्याजाण्याचा खर्च दिल्यास ते आपले जलसे करतील असें लिहिलें होतें. त्याचप्रमाणे विष्णुबुवा पलुसकर यांनाही आमंत्रण देण्याचा विचार होता. म्हैसूरहून कर्नाटकाचे प्रसिद्ध गवई येणारच होते. विशेष खर्च न होतां निरनिराळ्या पद्धतीचें गाणें कसें असतें हें निरनिराळ्या प्रांतांतील लोकांना समजण्याला ही संधी चांगली होती, असें मनांत आणून मीं ही सूचना कमिटीपुढे मांडली. माझ्या हेतूचा *विपर्यास करून महाराष्ट्रांतील गवयांना प्रवेश* मिळवून देण्याकरिता मी हा उपद्व्याप करीत आहें, असा माझ्यावर आरोप करण्यांत आला; आणि कमिटीचे अध्यक्ष मुदवेडकर यांनी कर्नाटकांतील गवयांखेरीज इतर कोणत्याही प्रांतांतील गवयांचें गाणें होऊं देणें हें कर्नाटकाला कमीपणा आणणारें आहे असें सांगितलें! याच मुद्द्यावर वादविवाद सुरू झाला. दोनअडीच तास वादविवादांत गेले. वादविवादानें मला इतकें वाईट वाटलें कीं, मीं कमिटीनें काय वाटेल तें करावें असें सांगून उठून गेलों. खर्च जास्ती होतो या सबबीवर कोणीं हरकत घेतली असती तर मला कांही वाईट वाटलें नसतें. पण ज्या कारणाकरिता हरकत घेण्यांत आली तें किती पोरकटपणाचें व दुरभिमानाचें द्योतक होतें हें पाहिलें म्हणजे या हतभागी देशांत एक-राष्ट्रीयत्वाची कल्पना येण्याला किती काळ लागेल याबद्दल विचार येऊं लागतात व मन थोडें तरी खिन्न झाल्यावाचून राहत नाही. काँग्रेसच्या कामांत कार्यकर्त्यांमध्ये तीव्र मत-भेद होऊन तें बिघडूं नये हीच माझी दृष्टी होती. त्यामुळे या प्रकरणांत मीं माघार घेतली. पण यानंतर बाकीच्या कामांत अशी चूक होऊं नये म्हणून खबरदारी घेतली. चिटणिसांचा मला पूर्णपणें पाठिंबा व सहकार्य मिळाल्यामुळे सर्व कामें यशस्वी रीतीनें तडीलाही गेलीं.

## *स्वयंसेवक दल आणि सफाई खातें*

स्वयंसेवकांचें एक मुख्य जबाबदारीचें खातें असतें. निरनिराळ्या मंडपांची व्यवस्था ठेवणें, मुख्य तंबूंत बंदोबस्त राखणें, डेली-

गेटच्या कँपावर देखरेख करणें, रस्त्यावरील गर्दीला व्यवस्थितपणा आणणें, ध्वजवंदन, इत्यादि कामें स्वयंसेवकांचे मुख्य डॉ. हर्डीकर यांच्याकडे देण्यांत आलीं होतीं. त्यांनी हीं सर्व कामें फारच व्यवस्थितपणें केलीं. 'हिंदुस्थानी सेवादल' स्थापून एक वर्ष झालें होतें. कॉंग्रेसच्या सारखीं जबाबदारीचीं कामें यशस्वी करून दाखवण्याचा दलाला पहिलाच प्रसंग होता. तरी त्यांनी त्यांना दिलेलीं कामें चांगल्या प्रकारें करून शिस्तींत सर्व गोष्टी असल्यास थोड्या लोकांकडून देखील कामें कशीं अनायासें उरकतां येतात हें दाखवून दिलें.

काका कालेलकरांना मला मदत करण्यासाठी पाठवण्याकरिता मीं गांधींना लिहिलें होतें. त्याप्रमाणे काकासाहेब कॉंग्रेसच्या पूर्वीं बरेच दिवस बेळगावला आले होते. त्यांनी मला बऱ्याच उपयुक्त सूचना वेळोवेळीं केल्या. त्यांनी स्वतः आपल्याकडे सफाईचें काम घेतलें होतें. त्यांच्या हाताखाली खास दोनशें स्वयंसेवक देण्यांत आले होते. त्यांचा व हर्डीकरांचा संबंध फारसा नव्हता. शौचकूप, मुताऱ्या, पाण्याच्या मोऱ्या यांवर देखरेख करण्याच्या कामापासून स्वतः आपल्या हातांनी हीं कामें करण्यापर्यंत या स्वयंसेवकांनी आपली जबाबदारी पार पाडली. सत्याग्रह-आश्रम ज्यांनी पाहिला असेल त्यांना तेथे स्वच्छतेबद्दल किती काळजी घेण्यांत येते त्याबद्दलची कल्पना येईल. महात्माजींचें सफाईचे बाबतींत विशेष लक्ष असतें हें मला माहीत होतें. म्हणून हें काम मीं मुद्दाम काकासाहेबांच्याकडे दिलें होतें. सत्याग्रहाश्रमांत त्यांना मिळालेल्या सर्व अनुभवाचा फायदा त्यांनी आम्हांला दिला व हीं कामें चोख रीतीने झालीं. गांधीजी स्वतः या कामाची तपासणी करण्याकरिता दररोज सकाळीं पायीं जात असत. हें काम स्वयंसेवकांनी उत्तम प्रकारें केल्याबद्दल या खात्यांतील स्वयंसेवकांचें त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केलें.

सफाईखात्याकरिता स्वयंसेवक पसंत करतांना स्थानिक आणि ब्राह्मण स्वयंसेवक अधिकाधिक पुढे यावेत अशी काकांनी मागणी केली होती व त्याप्रमाणे ते त्यांना मिळालेही.

कँपचें आरोग्य राखण्याकरिता डॉक्टर लोकांची एक कमिटी नेमली होती. हॉस्पिटल, दवाखाना वगैरे रीतीप्रमाणे काढले होते. बेळगावचे सिव्हिल सर्जन (युरोपियन) हेही व्यवस्था पाहण्याकरिता मुद्दाम दोनतीन वेळां आले होते. जरूर लागेल त्यावेळीं आपल्या हॉस्पिटलची व तेथील डॉक्टरांची मदत घेण्यास त्यांनी आम्हांस सांगून ठेवलें होतें. त्यांच्या सूचनेप्रमाणें आम्हीं आमच्या हंगामी हॉस्पिटलची व्यवस्था केली होती. पण बेळगावच्या कॉंग्रेसच्या वेळीं एकही रोगी हॉस्पिटलमध्ये नेऊन उपचार करण्याची पाळी आली नाही. उत्कलचे गोपबाबू दास हे येतांना गाडींतच तापाने आजारी होऊन आले. पण बेळगावला आल्यानंतर दुसरे दिवशींच त्यांचा ताप उतरला. याशिवाय कँपमध्ये असणाऱ्या प्रतिनिधींपैकी अथवा प्रेक्षकांपैकी एकही आजारी पडल्याचें उदाहरण आमच्या नजरेला आलें नाही. ही गोष्ट गांधींना कळल्यानंतर त्यांना बरेंच समाधान वाटलें.

## भोजनाची आदर्श व्यवस्था

मुदपाकखाना (स्वयंपाक) मक्त्याने देण्याची पद्धत असते. तसें आम्हीं केलें नाही. हैदराबादच्या वामन नायकांमार्फत चांगले स्वयंपाकी आम्हीं आणविले होते. आमच्या मंडळींच्या देखरेखीखालीं मालमसाला, सामानसुमान देऊन स्वयंपाक होत असे. आमच्या बेळगांव जिल्ह्यांत व खुद्द बेळगाव शहरीं ताजें लोणी मुबलक मिळतें. तें खरेदी करून उत्तम साजूक तूप तयार करून ठेवण्यांत आलें होतें. बेळगावास तुपाचा व्यापार मोठा चालतो व तेथील तुपाची प्रसिद्धी आहे. म्हणून हें काम थोडक्या खर्चांत व उत्तम प्रकारें झालें. त्याचप्रमाणे बेळगावच्या माळी लोकांनी—व विशेषतः माळणींनी—उत्तम ताज्या भाज्या सोयीने दिल्या. दूधदुभत्याचा पुरवठाही उत्तम प्रकारें होत असे. सांगलीस पुष्कळ व स्वस्त दूध मिळतें. पण तेथून दूध आणल्यास तें बेळगावला येईपर्यंत नासेल, म्हणून तेथे तें विरजून उत्तम दह्याचे डबे दररोज आगगाडीने आणविण्याची व्यवस्था केली होती. त्यामुळे दही, मठ्ठा हीं उत्तम प्रकारची व मुबलक मिळून दररोज श्रीखंडाचें पक्वान्न आम्हांला देतां आलें. गावांतील अजमासें दोनशे स्त्रिया स्वयंसेवक या नात्याने या (स्वयंपाक) खात्यांत काम करीत असत. त्यामुळे चटण्या, कोशिंबिरी, रायतीं, लोणचीं हे पदार्थ करण्याची आम्हांला उत्तम सोय झाली.

कागवाड, गणेशवाडी, मिरज, सांगली येथील तरुण मंडळी वाढण्याच्या कामीं अत्यंत दक्ष व कुशल आहेत. १९१६ सालच्या कॉन्फरन्सच्या वेळीं आम्हांला त्यांचा अनुभव आला होता. ही मंडळी सुशिक्षित असून चांगल्या घराण्यांतील आहेत. त्यामुळे हे लोक उत्तम प्रकारें हें काम हौसेने करतात असें मला माहीत होतें. त्यांना मुद्दाम आमंत्रण देऊन मीं बोलाविलें होतें. यांपैकीं बरेच लोक आपल्या खर्चाने आले होते. कित्येक पायीं चालत आले होते. यावरूनच त्यांची कळकळ दिसून आली. मी कॉंग्रेसकरता पुष्कळ ठिकाणीं गेलों आहें. पण स्वयंपाकाची व वाढण्याची व्यवस्था जितकी असावी तितकी दिसून येत नाही. स्वयंपाक चांगला असला तरी स्वच्छता कमी असते. वाढण्याच्या बाबतींत तर पूर्ण बेबंदनगरी असते. वाढणें ही एक कला आहे व ती साध्य करून घ्यावी लागते ही कल्पनाच त्यांना नसते. त्यामुळे पंक्तींत आरडा-ओरडा व अव्यवस्थितपणा दिसून येतो. बाकीचा थाटमाट, डामडौल भरपूर असतो. पण या खात्यांत पुष्कळ हयगय होते. फक्त महाराष्ट्रांत व आमच्याकडील लोकांत या बाबतींत विशेष काळजी घेण्यांत येते. त्यामुळे कॉंग्रेसकरता आलेले पुष्कळ लोक बाहेरच्या दुकानां-वर निर्वाह करीत असतात. पण आमच्या स्वयंपाकाचा फायदा घेणाऱ्यांपैकी दुकानांना आश्रय देणारे फारच थोडे असतील. बाहेरून या कामाकरता आलेल्या लोकांखेरीज स्थानिक मंडळींनी—त्यांत कित्येक वैदिक मंडळी होती—बरीच मदत केली. या खात्यांत स्वयंपाक्यांशिवाय आम्हांला दुसरा कोणताही खर्च करावा लागला नाही. सामाना-

सुमारद्दलचा खर्च वेगळा हें सांगावयाला नको. भात, पोळी, वरण, आमटी, कर्नाटकी सार, कढी, दूध, तूप, दहीं, मठ्ठा, श्रीखंड, दोन भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, रायतें, वगैरे उत्तम जेवण—दोन वेळचें—आम्हांला दीड रुपयांत परवडलें. लहान भांड्यांखेरीज सर्व मोठीं भांडीं भांड्यांच्या व्यापाऱ्यांनी दिलीं होतीं. आमचें काम झाल्यानंतर आम्हीं त्यांना तीं परत केलीं. त्यांवर पुन्हा ठोके मारून त्यांनी तीं नवीनप्रमाणे तयार केलीं. त्यांचेंही नुकसान झालें नाही व आमचें कामही सोईनें झालें. लहान भांडीं सर्व विकलीं व त्यांपैकी बरींच मूळ किमतीलाच गेलीं. कांही हरवलीं असतील. अशीं फारच थोडीं होतीं. तितक्या भांड्यांपुरतीच नुकसानी भरावी लागली. या खात्यांत धारवाडचे गोपाळराव देशपांडे, बेळगावचे हणमंतराव देशपांडे, कानडे वकील यांनी बरीच मेहनत घेतली.

### *खादीचा 'राजवाडा'*

खुद्द महात्माजींना राहण्याकरिता अजमासें साडेतीनशे रुपये खर्च करून एक झोपडी घातली होती. या झोपडीला पुन्हा विक्री करतां येईल असेंच सामान वापरण्यांत आलें होतें. पण झोपडी साधी ठेवून तिला शोभा उत्तम प्रकारें आणली होती. त्यामुळे गांधींनी आम्हांला भपका केल्याबद्दल दोष दिला. त्यांनी 'Young India' मध्ये वल्लभभाई ज्याप्रमाणे अहमदाबादच्या कॉंग्रेसच्या वेळीं डामडौलाला बळी पडले त्याप्रमाणेच माझेंही बेळगावला झालें, अशी टीका करून आपल्या झोपडीचा दाखला दिला होता. त्यांनी असें लिहिलें होतें की, "I had bargained for a khaddar hut but I was insulted with a khaddar palace." या पॅलेसला साडेतीनशे रुपये खर्च आला होता व यांतील सामान विकून अडीचशे रुपये वर परत जमा झाले होते. ही गोष्ट मीं पुढे मोठ्या अभिमानानें गांधींना कळविली व त्यांची टीका चुकीची होती असें मीं दाखविलें.

रेल्वेलाइनला लागून कँप होता व नवीन स्टेशन रेल्वे कंपनीनें उघडल्यामुळे वाहतुकीचा खर्च फारच कमी आला. डेलिगेटांना स्थानिक गाडीभाड्याबद्दल खर्च आला नाही. फक्त हमाली द्यावी लागली व तीही बेताचीच.

दिवाबत्तीच्या बाबतींत बेळगावला इलेक्ट्रिक लाइटची सोय नसल्यामुळे सर्वस्वी विजेवर अवलंबून राहणें खर्चाचें झालें असतें व आयत्या वेळीं कोठे कांही बिघडल्यास अंधारांत बसण्याची पाळी आली असती. म्हणून शोभेच्या जागीं तेवढी इलेक्ट्रिक लाइटची सोय केली होती आणि जरूरीच्या सर्व ठिकाणीं किटसन व पेट्रोमॅक्सचे दिवे लावले होते. हे दिवे विकत घेतले होते व काम झाल्याबरोबर विकण्यांत आले. त्यामुळे शेकडा ९० प्रमाणे किंमत परत जमा झाली. शोभेच्या ठिकाणीं इलेक्ट्रिक लाइटमध्येही कांही बिघाड झाला नाही, त्यामुळे दिवाबत्तीची व्यवस्था उत्तम झाली. स्वतः गांधींनी या बाबतींत "The lighting arrangement was perfect" असा 'Young India' मध्ये शेरा दिला आहे. हें काम जीवनराव याळगी—गोविंदरावांचे कनिष्ठ बंधु—यांच्याकडे होतें.

झोपड्या घालणें, मंडप उभारणें वगैरे कामें सोयींत पण भपक्यांत—गांधींच्या पॅलेसप्रमाणेच—झालीं होतीं. या कामावर कृष्णराव याळगी—गोविंदरावांचे धाकटे बंधु, गजाननराव देशपांडे—इमारतीचे कंत्राटदार व लाकडाचे व्यापारी, व खेमाजीराव गोडसे—मेस्त्री ही मंडळी मुख्यतः होती. खेमाजीराव हे मराठे असून सत्यशोधक पक्षांतले आहेत. ते काँग्रेसचे सभासद नव्हते. पण आपल्या गावीं काँग्रेस भरते व देशांतील नामांकित लोक येतात, तेव्हा बेळगावचा लौकिक वाढावा याच हेतूने अगदी निरपेक्ष-पणाने काँग्रेसच्या अभिमान्यांच्या बरोबरीने ते मनःपूर्वक काम करीत असत हें त्यांना खरोखर भूषणावह आहे. उलट काँग्रेसचे व कर्नाटकाचे अभिमानी म्हणून प्रतिष्ठेने मिरविणारे, आपल्यावर कोणतीही जबाबदारी न घेतां प्रत्येक कामांत चूक काढणारे कांही हरीचे लालही होतेच. त्यांनी उपस्थित केलेल्या अडचणी दूर करण्याला आम्हांला थोडा-बहुत त्रास झालाच. गांधींनी खादीप्रसाराचें काम हातीं घेतलें होतें, त्यामुळें सूत कातणारे पुष्कळ प्रतिनिधी येण्याचा संभव होता; म्हणून मुद्दाम एक मांडव घालून शंभरदीडशे चरखे ठेवले होते व सूत कातणाऱ्यांना पेळूचा पुरवठा करण्याची सोय केली होती. पुष्कळांनी याचा फायदा घेतला. गांधींना ही योजना फारच पसंत पडली होती.

### काँग्रेस अधिवेशनाचे मदतगार

म्युनिसिपालिटी व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड यांनी पुष्कळ मदत केली. त्यामुळेही बराच खर्च वाचला. म्युनिसिपालिटीने रस्ते आपल्या खर्चाने करून दिले. त्याचप्रमाणे तिच्या आरोग्यखात्याची मदत पूर्ण होती. चीफ ऑफिसर व हेल्थ ऑफिसर यांनी कॅंपची स्वच्छता राखण्याच्या कामीं चांगली मेहनत घेतली.

दक्षिण भागाचे त्या वेळीं पेंटर हे कमिशनर होते. धारवाडच्या गोळीबाराच्या प्रकरणा-पासून त्यांचा दुर्लौकिक बराच झाला होता. पण बेळगावास कमिशनरच्या जागेवर आल्यापासून त्यांची कारकीर्द बरीच सरळपणाची होती. काँग्रेसच्या वेळीं त्यांनी कोणत्याही प्रकारची अडचण उत्पन्न केली नाही अथवा दुसऱ्या कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्याकडून होऊं दिली नाही. पोलिसांची तर पूर्ण सहानुभूती होती. कॅंपच्या बाहेर पण लागूनच त्यांचा तळ होता. कॅंपच्या आंत आम्हीं मदत मागितली तरच त्यांनी ती द्यावी, विनाकारण ढवळाढवळ करूं नये, अशी व्यवस्था केली होती. सरकारी रस्त्यावर मात्र त्यांचा बंदोबस्त होता व त्यांत ढवळाढवळ करण्याची आम्हांला जरूरीही नव्हती. उलट त्यांच्या बंदोबस्ताने आम्हांला आमचें ओझें हलकें झालें असें वाटलें. कमिशनर पेंटर, कलेक्टर, ॲसिस्टंट कलेक्टर, पोलीस सुपरिंटेंडेंट, सिव्हिल सर्जन इत्यादि सर्व स्थानिक अधिकाऱ्यांनी सहानुभूती दाखविली.

त्याचप्रमाणे सदर्न मराठा रेल्वे कंपनीने पुष्कळ सवलती दिल्या होत्या व सोयीही करून दिल्या. काँग्रेसकरिता खास स्टेशन उघडण्यांत आलें होतें, हें पूर्वी सांगितलेंच

आहे. पाण्याचा साठा करण्याकरिता आम्हांला मोठमोठीं टाकीं पाहिजे होतीं. तीं बेळगावास मिळणें शक्य नव्हतें. मुंबईत खरेदी करावयाचीं तर बरेंच खर्चाचें काम झालें असतें. भाड्याने वगैरे आणावयाचीं तर खर्च बराच आला असता. म्हणून रेल्वेचे एंजिनियरकडे मीं सहज गोष्ट काढली. त्यांच्याकडे टाकीं बरींच असतात, तेव्हा त्यांपैकी कांही सवलतीने देण्याबद्दल मीं विनंती केली. ती त्यांनी मान्य केली व कांही भाडें न घेतां व वाहतुकीचा खर्चसुद्धा आमच्याकडून न घेतां आम्हांला लागतील तितकीं टाकीं आणून दिलीं. तीं कोठे व कशीं बसवावींत यासंबंधाने स्वतः येऊन ते सूचना करीत असत. त्यामुळे पाण्याची सोय थोड्या खर्चात चांगली झाली.

काँग्रेसच्या कँपजवळ मिलिटरीची हद्द आहे. त्या हद्दींत कँटोनमेंटचा पाण्याचा मोठा साठा आहे. ज्या विहिरींतून पंपाने पाणी घेतात त्या विहिरींतील पाण्याचा पुरवठा १९२४ सालच्या उन्हाळ्यांत कमी झाला होता. त्याच वेळीं आम्हीं आमची विहीर खोदली होती व आमच्या विहिरीला पाणी मुबलक होतें. त्यामुळे लष्करी अधिकाऱ्यांना वाटलें की, आपल्या विहिरीकडे येणारा झरा आमच्या विहिरीकडे फिरला व आपलें पाणी कमी झालें. म्हणून आम्ही खोदलेली विहीर भरून काढावी म्हणजे बुजवावी, अशी सूचना त्यांनी मुंबई सरकारकडे केली. यामुळे आम्हांला हें एक नवीनच विघ्न उत्पन्न झालें असें वाटलें. पण मुंबई सरकारने मरडॉक म्हणून त्यांचे एक मुख्य एंजि-नियर होते त्यांना पुण्याहून मुद्दाम तपास करण्याकरिता पाठविलें. त्यांनी येऊन स्वतः सर्व तपासणी केली. जागा पाहिल्या व झरे कसे वाहतात याची चौकशी केली. शेवटीं लष्करच्या विहिरींचा व आमच्या विहिरीचा कांही संबंध नाही, असा रिपोर्ट केला व आमच्यावरील हें संकट टळलें.

### बेळगावची 'काँग्रेस विहीर'

काँग्रेस संपल्यानंतर ही विहीर पुन्हा भरून जागा पूर्वीसारखी करून देण्याचा आम्हीं करार केला होता. भरण्यालादेखील आम्हांला तीनचार हजार रुपये खर्च आला असता. अशी चांगल्या पाण्याची आयती झालेली सोय नाहीशी करणें हें योग्य वाटलें नाही, म्हणून ती विहीर दगडांनी बांधून काढण्याच्या खर्चाकरिता स्वागत मंडळाने पाच हजार रुपये म्युनिसिपालिटीला द्यावे, बाकीचा खर्च म्युनिसिपालिटीने करावा व विहीर आपल्या ताब्यांत घ्यावी, अशी सूचना आम्हीं केली. ती स्वागत मंडळाला व म्युनिसिपालिटीला मान्य झाली. त्याप्रमाणे दहाबारा हजार रुपये खर्च करून एक सुंदर विहीर बांधण्यांत आली आहे. म्युनिसिपालिटीने तिचा उपयोग शहरांतील लोकांच्या पोहण्याकरिता केला आहे. कांही पाणी बागाइतीकरिता आजूबाजूचे शेतकरीही घेत असतात. ही विहीर बेळगाव काँग्रेसचें एक सुंदर स्मारकच झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाही. विहिरीचें नाव 'पंपासरोवर' हें कायम ठेवून १९२४ सालीं म. गांधींच्या अध्यक्षतेखाली एकुणचाळिसावी राष्ट्रीय सभा भरली होती वगैरे

अक्षरें खोदलेला एक संगमरवरी दगड विहिरीवर बसवण्यांत आला आहे. पुष्कळ लोक या विहिरीचा पोहण्याकरिता फायदा घेत असतात.

जमाखर्च रोजच्या रोज लिहिण्याची खबरदारी घेतली होती. हिशेबाचें काम फारच चोख ठेवण्यांत आलें होतें. रोजचा जमाखर्च त्या दिवशीं लिहून पुरा केलाच पाहिजे, अशी व्यवस्था केली होती. त्यामुळे आमची आर्थिक स्थिती कशी आहे हें ताबडतोब समजत असे. आमच्या हातीं वर्गणीच्या रूपाने ॲडव्हान्स म्हणून पुरेशी रक्कम असल्यामुळे सर्व व्यवहार रोखीने करण्यांत येत असे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडे डेलिगेटांच्या फीपैकी कांही रक्कम पोंचवावी लागते. पुष्कळ काँग्रेसच्या स्वागतमंडळां-कडून ही रक्कम वेळेवर पोंचत नाही हें मला माहीत होतें. अशा कांही रकमा मुळीच अद्यापि आल्या नाहीत. कांही बुडीत खातीं खर्च लिहून हिशेब पुरे करावे लागले आहेत, हेंही मला माहीत होतें. म्हणून काँग्रेसची बैठक संपल्यानंतर ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे खजीनदार शेट जमनालालजी बेळगावहून जावयाला निघाले तेव्हा त्यांच्याकडे मीं या रकमेचा चेक दिला. त्यांना या आमच्या तत्परतेबद्दल समाधान वाटलें. हिशेब रोजच्या रोज लिहून काढण्याची पद्धत ठेवल्यामुळे ताळेबंद काढण्याला उशीर झाला नाही. काँग्रेसची बैठक संपल्यानंतर पांचसहा दिवसांच्या आंत विक्री होणाऱ्या सर्व जिनसा विकल्या गेल्या व मूळ किमतीच्या सरासरीने शेकडा ६० टक्क्यांपर्यंत रक्कम जमा झाली. ॲडव्हान्स आणलेल्या सर्व रकमा परत दिल्या व सर्व बिलें दिल्यानंतर सुमारें तीस हजार रुपये शिल्लक राहिले. ते प्रांतिक काँग्रेस कमिटीकडे देण्यांत आले.

कोणतेंही काम उभारतेवेळीं लोकांना उत्साह असतो त्यामुळे कामें झपाट्याने होतात. पण सर्व आटोपल्यानंतर तें निस्तरण्याच्या वेळीं थकवा आलेला असतो, म्हणून आळस होतो; त्यामुळे नुकसान होतें. मक्ते देऊन कामें दिलीं तर मक्तेदार निस्तरण्याचींदेखील कामें ताबडतोब करतात. पण आम्हीं मक्त्याने कामें दिलीं नसल्याने हें शेवटचें काम आम्हांलाच करावें लागलें. या कामाकरिता आम्हीं एक स्वतंत्र कमिटी नेमली होती. त्यामुळे हें काम ताज्या दमाच्या कमिटीकडून चांगलें व झपाझप झालें. काँग्रेसचा रिपोर्ट लिहून छापवून प्रसिद्ध करण्याचें काम देखील काँग्रेस संपल्यानंतर थोड्याच दिवसांच्या आंत झालें.

याच शिलकेंतून पुढे पांचसहा वर्षे बरींच कामें प्रांतिक काँग्रेस कमिटीला करतां आलीं.

## घोडस्वार स्वागताध्यक्ष

स्वागत मंडळाचा अध्यक्ष म्हणून माझ्यावर मोठी जबाबदारी आहे असें मला प्रथमपासून वाटत होतें. ज्या दिवशीं बेळगावला काँग्रेस व्हावयाची ठरली, त्याच दिवशीं कोणावर रागवायचें नाही व मनाची शांती ढळूं द्यावयाची नाही असा मीं निश्चय केला होता. चिडण्याचे अनेक प्रसंग आले तरी मी शांतपणानेच वागत होतों. हा अनुभव मला प्रथमच आला व त्याचा फायदाही कळून आला.

गोविंदराव याळगी नसल्याने माझ्यावर जास्ती ओझें पडेल असें मला आरंभीं वाटलें होतें. पण त्यांच्या दोन्ही बंधूंनी म्हणजे जीवराज व कृष्णराव यांनी गोविंदरावांची उणीव मला भासूं न देतां माझ्यावरील जोखीम बरीच हलकी केली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. त्यांना सार्वजनिक कामाची हौस तर आहेच. पण माझ्याशीं त्यांचा आपलेपणा असल्यामुळे माझ्या सुखदुःखाचे ते वाटेकरी आहेत. यामुळे मला कोणत्याही कामांत त्रास पडत नाही.

काँग्रेसचा कँप तयार होत असतां व काँग्रेसच्या बैठकीच्या वेळीं मी स्वतः देखरेख करण्याकरिता कँपमध्ये पुष्कळ हिंडत असें. इतकें पायीं हिंडणें कठीण होतें. मोटारींतून किंवा टांग्यांतून सगळीकडे जाणें शक्य नव्हतें. बायसिकलवरूनदेखील हें हिंडणें त्रासाचें झालें असतें. म्हणून माझा घोडा मीं मुद्दाम बेळगावास आणविला होता. तो चांगला शिकलेला होता व माझ्या काबूंत राहात असे. कितीही गर्दींत किंवा दंग्यांत नेला तरी बुजत नसे. म्हणून मी घोड्यावर बसूनच सगळीकडे जात असें. अलीकडे अलीकडे घोड्यावर बसण्याचा परिपाठ आपल्या समाजांत मोडल्यामुळे माझ्यासारख्या वृद्ध मनुष्याने घोड्यावर बसून सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामें करीत हिंडणें हें पुष्कळांना कौतुकाचें वाटत होतें आणि अद्यापपर्यंत पुष्कळ लोक याची आठवण मला देतात. याप्रमाणे व्यवस्थेसंबंधाने ढोबळ गोष्टी मीं दिल्या. आतां खुद्द काँग्रेसच्या कामकाजासंबंधाने थोडी हकीकत द्यावयाची आहे.

### *स्वराज्यपक्षाशीं समेट*

पाटण्याच्या वर्किंग कमिटीने केलेला ठराव नाफेरपक्षांतील पुष्कळ लोकांना मान्य नव्हता व तो ठराव काँग्रेसच्या मंजुरीकरिता येणार होता. म्हणून नाफेरपक्षांतील प्रमुख मंडळींना गांधींनी बेळगावला काँग्रेसच्या बैठकीपूर्वी बोलाविलें होतें. त्यांच्याशीं वाटाघाट करून त्या परिस्थितींत स्वराज्य पक्षाशीं समेट करणें हेंच देशहिताच्या दृष्टीनें योग्य होतें, हें नाफेरपक्षांतील प्रमुख कार्यकर्त्यांना पटवून देण्याचें काम गांधींना काँग्रेसच्या पूर्वीं करावयाचें होतें. त्याकरिता गांधी हे तीन-चार दिवस अगोदर आले होते. त्याच दिवशीं नाफेरपक्षांतील बहुतेक प्रमुख मंडळी आली होती. गांधींना मिरवणुकीसारख्या दिखाऊ डामडौलांत वेळ घालविणें मनापासून पसंत नसतें, हें मला माहीत असल्यामुळे त्यांची मिरवणूक काढायची नाही, असें मीं ठरविलें होतें. त्यांना नवीन स्टेशनावरच उतरून घेण्यांत आलें. येथून त्यांची राहण्याची जागा दोन फर्लांगावरच होती. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हजारों लोक उभे होते. आपल्या जागेवरूनच टाळ्या वाजवून व त्यांच्या नावाचा जयघोष करून ते बिऱ्हाडीं जात असतांना त्यांनी त्यांचें स्वागत केलें. त्यांच्या बरोबर त्यांचे गाडींत महंमदअल्ली होते. स्टेशनावर उतरल्यापासून त्यांच्या बिऱ्हाडीं जाईपर्यंत पंधरा मिनिटें देखील लागलीं नाहीत. या व्यवस्थेमुळे गांधींना बरें वाटलें.

दोनप्रहरीं जेवणखाण झाल्यानंतर संध्याकाळपर्यंत नाफेरपक्षांतील आलेल्या लोकांशीं गांधींनी खासगी चर्चा केली. त्याच दिवशीं सायंकाळीं बेळगाव शहरांत म्युनिसिपालिटी व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डातर्फे त्यांना मानपत्रें देण्याचा समारंभ झाला. त्या वेळींही गावांतून जातांना मिरवणूक न काढतां ठरलेल्या रस्त्याने सकाळच्याप्रमाणेच त्यांना नेण्यांत आलें. गाडी मात्र सावकाश नेण्यांत आली. प्रत्येक चव्हाट्यावर मात्र पाचपाच मिनिटें गाडी उभी करण्यांत येत असे. तेथे पानसुपाऱ्या, हारतुरे देण्यांत येत असत. या व्यवस्थेमुळे गर्दी न होतां सर्वांना त्यांचें दर्शन चांगल्या प्रकारें झालें. आलेली सर्व पुढारी मंडळी गांधींच्या गाडीच्या मागच्या गाड्यांतून होती. गाड्या नंबराने लावल्या होत्या व कोणत्या नंबरच्या गाडींत कोण पुढारी आहेत हें हजारो जाहिराती वाटून आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. त्यामुळे इतर पुढाऱ्यांना पाहण्याची लोकांची हौस अनायासें भागली. काँग्रेस पाहण्यापेक्षा गांधींना व इतर नामांकित पुढाऱ्यांना पाहण्याची हजारो खेड्यापाड्यांतील लोकांची हौस अधिक होती. म्हणून ही व्यवस्था केली होती.

म्युनिसिपालिटीचें मानपत्र भीमराव पोतदार व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचें मानपत्र पंडितप्पा चिकोडी यांनी वाचून दाखविलें. गांधींनी हिंदींत दोन्ही मानपत्रांना एकच उत्तर दिलें. अतोनात गर्दी झाली होती व लाउडस्पीकरची व्यवस्था न केल्यामुळे हा कार्यक्रम गडबडींत झाला.

यानंतर दोन दिवस पुन्हा वाटाघाटींतच गेले. स्वराज्य पक्ष कौन्सिलच्या कामाला कंटाळून लवकरच कौन्सिलच्या बाहेर पडल्याशिवाय राहणार नाही, असें गांधींनी भाकीत केलें होतें. आणि या वेळीं त्यांच्याशीं ते सांगतील त्या अटींवर समेट केल्यास ते ज्या वेळीं कौन्सिलें सोडतील त्या वेळीं पुन्हा नाफेरपक्षाच्या मताप्रमाणे असहकारितेला किंवा त्यापेक्षा अधिक जाज्वल्य चळवळीला संधी मिळेल अशी गांधींची अपेक्षा होती. मतभेदाच्या वातावरणांत असहकारितेची किंवा कायदेभंगाची चळवळ यशस्वी होणें कठीण आहे. याकरिता काँग्रेसमध्ये एकोपा आणण्याकरिता स्वराज्यपक्षाशीं समेट करणें इष्ट आहे असें त्यांचें म्हणणें होतें. "I am stooping to conquer" असें ते म्हणत असत. बऱ्याच मंडळींना त्यांचें हें म्हणणें पटलें व कित्येकांना जरी पटलें नाही तरी त्यांचा नाइलाज झाला. त्यामुळे हा मुख्य ठराव काँग्रेसमध्ये जशाच्या तसाच एकमताने पास होणार अशीं चिन्हें दिसू लागलीं. कांही मंडळींनी विरोधी पक्ष उभारण्याची खटपट केली. पण त्यांना यश आलें नाही.

ज्यांना कौन्सिलचा कार्यक्रम पसंत नव्हता अशांकरिता खादीप्रसार, अस्पृश्यतानिवारण, राष्ट्रीय शिक्षण, जातीजातींतील ऐक्य इत्यादि अनेक प्रकारचा विधायक कार्यक्रम गांधींनी आखला होता. पण या कामांचा विशेष गाजावाजा होत नाही व फळही लवकर दृष्टीला पडत नाही, त्यामुळे बऱ्याच लोकांना हा कार्यक्रम पटला नाही. असल्या कामांत राजकारण कोठे आहे असा प्रश्न निघत असे. गांधींनी समर्पक उत्तरें देऊन त्यांचें समाधान करण्याचा प्रयत्न केला.

ज्यांना कौन्सिलचा कार्यक्रम पसंत नाही अशा काँग्रेसच्या मंडळींनी, कांही काळपर्यंत अज्ञातवास पत्करावा व धीमेपणानें काँग्रेसचा विधायक कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता खटपट करीत राहावें असें त्यांचें सांगणें होतें. बेळगावच्या काँग्रेसमध्ये स्वराज्य पक्षाला विरोध करण्याचें गांधीजींनी ठरवलें असतें तर त्यांच्या बाजूने बहुमत खात्रीने मिळालें असतें. पण त्यांना या वेळीं पं. नेहरू, दासबाबू यांच्यासारख्यांबरोबर विरोध नको होता, त्यामुळे काँग्रेसमध्ये भयंकर दुही होऊन देशाचें अनहितच झालें असतें व पुढे तीस-बत्तीस सालीं ज्या प्रचंड चळवळी झाल्या त्यांना जय मिळाला नसता. यावरून गांधींचें धोरण किती दूरदर्शीपणाचें होतें, हें सहज समजण्यासारखें आहे.

विषयनियामक कमिटी भरावयाच्या दिवशींच मोतीलालजी व दासबाबू येऊन पोचले. विषयनियामक कमिटींत एकदोघांनी मुख्य ठरावांत कांही दुरुस्त्या सुचविल्या; पण त्यांना पाठिंबा न मिळाल्यामुळे मुख्य ठराव पाटण्याच्या ठरावाप्रमाणेच मंजूर झाला. बाकीचे ठराव विशेष तक्रारीचे नसल्यामुळे लवकरच पास झाले. प्रतिपक्षाचें म्हणणें ऐकण्यांत गांधी हे अगदी शांत वृत्तीने वागतात, हें प्रसिद्धच आहे. ही वृत्ती कायम ठेवून गांधींनी अध्यक्ष या नात्यानें उत्तम काम केलें व बरेच भानगडीचे प्रश्न अगदी थोडक्यांत उरकण्यांत आले. गांधींना ही कला उत्तम साधली आहे.

### *भाषणांवर मर्यादा घातली*

काँग्रेसच्या बैठकीच्या दिवशीं मला गांधींनी बोलावून, विनाकारण भाषणांत वेळ न घालवितां होतां होईल तितक्या लवकर काम आटोपावयाचें आपल्या मनांत असल्याचें सांगितलें. बेळगाव काँग्रेसपर्यंत तीन दिवसांच्या आंत कोणत्याही काँग्रेसचें काम संपलें नव्हतें. कांही बैठकी तर पाचसहा दिवसांपर्यंत गेल्या असतील. पुष्कळ वेळां विषयनियायक कमिटीचीं कामें न आटोपल्याकारणाने एखादाच औपचारिक ठराव काँग्रेसपुढे मांडून काँग्रेसची बैठक त्या दिवसापुरती तहकूब करण्याचेही प्रसंग आले आहेत. त्यामुळे मुख्य किंवा वादग्रस्त ठराव येण्याला बराच कालावधी होत असे व लोक कंटाळलेल्या स्थितींत असतांना असे ठराव काँग्रेसच्या पुढे येत. त्यामुळे लोकांना उत्साह राहात नसे. पहिला दिवस बहुतेक स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांच्या भाषणांत जाई. दुसऱ्या दिवशीं दुय्यम प्रतीचे ठराव येत व तिसऱ्या दिवशीं अगर पुढे मुख्य ठराव येत. ही पद्धत मोडून थोडक्यांत काम कसें आटोपतां येतें हें गांधींनी बेळगावच्या काँग्रेसमध्ये दाखविलें.

गांधींनी हा विचार मला कळविला. मीं त्याला संमती दिली. त्याबरोबर त्यांनी माझें भाषण वाचण्याला किती वेळ लागेल अशी पृच्छा केली. पंधरा मिनिटांपेक्षा जास्ती लागणार नाही, असें मीं त्यांना सांगितलें. गांधींची पद्धती मला माहीत असल्याकारणाने मीं माझें भाषण थोडक्यांत लिहून काढलें होतें. स्वागताध्यक्षाचें मुख्य काम म्हणजे स्वागत करण्याचें. बहुतेक स्वागताध्यक्ष आपल्या भाषणांत चालू परिस्थितीची सांगोपांग

चर्चा करून प्रचलित प्रश्नांसंबंधानें आपले विचार मांडीत असतात. या मार्गाचा अवलंब मीं केला नाही. कर्नाटक प्रांताची माहिती उत्तर प्रांतांतील लोकांना नसल्यामुळे मीं ती थोडक्यांत माझ्या भाषणांत दिली होती, व ठराव कोणतेही मंजूर होवोत, त्या ठरावांची बजावणी करणें हें मुख्य व महत्त्वाचें काम आहे, म्हणून जनतेनें तिकडे लक्ष द्यावें हा विचार मांडला होता.

पंधरा मिनिटें माझें भाषण वाचण्याला लागतात असें मीं गांधींना कळवल्यानंतर ते थोडा वेळ स्वस्थ बसले, आणि हसतहसत यापेक्षा कमी वेळांत भागणार नाही काय, असा त्यांनी मला प्रश्न केला. ही सूचना करावी की नाही, हा विचार त्यांच्या मनांत येऊन ते थोडा वेळ स्तब्ध बसले असतील. भाषण समग्र न वाचतां मी त्यांतील सारांश आमच्या प्रांताच्या भाषेंत (कानडींत) पाचसात मिनिटांत सांगू शकेन, असें मीं त्यांना सांगितलें. ही कल्पना त्यांना फारच पसंत पडली आणि माझें भाषण छापून तयार असल्यास त्याच्या प्रती अगदी थोड्या किंमतीला अगोदरच विकण्याची व्यवस्था करा किंवा प्रतिनिधींना फुकट द्या असें त्यांनी सांगितलें. आपलें भाषण त्यांनी छापवून आणलेंच होतें. त्याची व्यवस्थाही माझ्याच भाषणाप्रमाणे करण्यास सांगितलें. पाचसात मिनिटांत माझें भाषण संपल्यास अर्ध्या तासाच्या आंत आपलें हिंदी भाषण आपण संपवूं, असें त्यांनी सांगितलें. म्हणजे तीसचाळीस मिनिटांचे आंत दोन्ही भाषणें संपवून मुख्य ठराव त्यानंतर लागलीच घ्यावयाचा, असा त्यांनी त्या दिवशींचा कार्यक्रम ठरविला. बैठकीच्या प्रारंभीं गाण्यांत वगैरे वेळ जातो म्हणून बैठक सुरू होण्यापूर्वीच गाण्याला प्रारंभ करावा व कामाला सुरुवात होण्यापूर्वी एखादें पद पाचदहा मिनिटांत संपवावें असें त्यांनी सांगितलें. बैठक सुरू होण्यापूर्वी मंडपांत उगीच गलबला होत असतो. गाणें चालू असलें म्हणजे लोकही शांत असतात हा एक फायदा होतो असें ते म्हणाले. कॉंग्रेसचे अध्यक्षच ते असल्यामुळे त्यांच्या इच्छेप्रमाणे सर्व व्यवस्था केली जावी, असें मला प्रथमपासूनच वाटत होतें. म्हणून त्यांच्या सांगण्याप्रमाणे सर्व कार्यक्रम मीं ठरविला.

### *गांधीजींची प्रार्थना*

बैठक सुरू होण्यापूर्वी दहा मिनिटें बिऱ्हाड सोडावयाचें, असें त्यांनी ठरविलें. निघण्याच्या पूर्वीं पंधरा मिनिटेंपर्यंत बिऱ्हाडांतील सर्व मंडळीबरोबर त्यांनी प्रार्थना केली. 'वैष्णव जन' हें त्यांचें आवडतें पद म्हणण्यांत आलें. त्या वेळीं त्यांचा चेहरा अगदी गंभीर होता. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होणें म्हणजे केवढी मोठी जबाबदारी आपण आपल्या शिरावर घेत आहों याची त्यांना पूर्ण जाणीव वाटून, त्या जबाबदारींतून पार पाडण्याकरिता परमेश्वराची प्रार्थना किती जरुरीची त्यांना वाटत होती, याचें चित्र त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें दिसत होतें. प्रार्थना झाल्यानंतर नेहमीच्या पद्धतीप्रमाणे माजी अध्यक्ष, वर्किंग कमिटीचे सभासद,

चिटणीस व प्रांतनिहाय प्रमुख पुढारी यांच्यासह मंडपांत आम्हीं प्रवेश केला. मंडप गच्च भरला होता व महात्माजींच्या इच्छेप्रमाणे गाण्याला प्रारंभ झाला होता. सर्व मंडळी स्थानापन्न झाल्यानंतर दहा मिनिटांत गाणें आटोपलें व मीं माझ्या भाषणाला प्रारंभ केला. गांधीजींनी मला दहा मिनिटांत भाषण संपवायला सांगितलें होतें, हें वर सांगितलें आहे. त्याप्रमाणे कानडींत मीं भाषण केलें व बरोबर दहाच मिनिटांत तें संपविलें. माझें भाषण संपल्यानंतर गांधीजींनी आपल्या भाषणाला प्रारंभ केला. अजमासें पाऊण तासांत त्यांनी आपलें भाषण संपविलें. विषयनियामक कमिटी पूर्वीच भरली होती व तींत काँग्रेसपुढे येणारे सर्व विषय ठरले होते. काँग्रेस स्वराज्य पक्षाच्या हातीं द्यावयाची व पाटण्याच्या वर्किंग कमिटींत मंजूर झालेल्या ठरावाला मान्यता द्यावयाची, हाच ठराव मुख्य होता. या विषयावर विषयनियामक कमिटींत बराच वादविवाद झाला होता. नाफेरपक्षांतील प्रमुख लोकांबरोबर बरीच चर्चा केली होती. तथापि या नाफेरपक्षांतील बऱ्याच लोकांचें समाधान झालें नव्हतें, व स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाने कांही फायदा होईल असें त्यांना वाटत नव्हतें. तथापि गांधीजींच्या आग्रहामुळे त्यांनी ठरावाला विरोध करायचा नाही असें ठरविलें होतें.

### *आधी पाठिंबा; मग टाळाटाळ*

मुख्य ठराव पहिल्याच दिवशीं काँग्रेसच्या अधिवेशनांत मांडला गेला व तो मंजूरही झाला. सुताच्या वर्गणीची अट मान्य नसतांही तात्यासाहेब केळकरांसारख्या मंडळींनी ठरावाला पाठिंबा दिला व भाषणेंही केलीं. ठरावावर विश्वास नसतां पाठिंबा देणें व पुढे ठराव अंमलांत आणण्याच्या बाबतींत टाळाटाळी करणें ही खोड कित्येकांना लागून गेलेली दिसते. यामुळे जनतेंत बुद्धिभेद होऊन शिस्त बिघडते व अखेर कार्याची हानी होते, याची कल्पनाही या मंडळींना नसावी. किंवा कल्पना असून आपला सवता सुभा उभारण्यांतच या लोकांना धन्यता वाटत असावी. संघटना करण्याचें सोडून ठरलेल्या कार्यक्रमाविरुद्ध बंड उभारण्यांतच आपली स्वतंत्र बुद्धी प्रस्थापित होते असें या मंडळींचें मत असावें. दास-नेहरूंच्या नेतृत्वाखाली या मंडळींनी म. गांधीजींच्या कार्यक्रमाविरुद्ध बंड उभारलें व पुढे आपले पुढारी जे नेहरू त्यांनाही विरोध करून नवीन एक पक्ष काढलाच. या पक्षाला कोणी अनुयायी मिळाले नाहीत हा भाग निराळा. पण या मंडळींच्या स्वभावाची मात्र चांगली परीक्षा होते !

मुख्य ठराव पहिल्याच दिवशीं मंजूर करून घेण्यांत काँग्रेसचें अधिवेशन शक्य तितक्या लवकर संपवण्याचा गांधीजींचा हेतू होता. वेळेवरच नियमितपणाने सर्व कामें आटोपण्याकडे गांधीजींचा विशेष कटाक्ष असतो. पहिल्याच दिवशीं महत्त्वाचें काम संपल्यामुळे दुसऱ्या दिवशीं अधिवेशन समाप्त होईल असें आम्हांला वाटलें. दोनच दिवसांत काम आटोपल्याने तिकिटांची तिसऱ्या दिवसाची विक्री होणार नाही व त्यामुळे

उत्पन्नांत घट होईल असें स्वागत समितीच्या कांही सभासदांना वाटलें व त्यांनी एक दिवस अधिवेशन लांबवावें म्हणून गांधीजींना एक विनंतीपत्र पाठविलें. गांधीजींनी तें मला दाखविलें व माझें मत विचारलें. केवळ पैशाकरिता अधिवेशन लांबविणें मला योग्य वाटलें नाही. गांधीजींचें मतही तसेंच होतें. पण पैशाची तूट येते म्हणून एक दिवस लांबवण्याचा मीं आग्रह धरला असता तर कदाचित् त्यांनी तसें करण्याला संमती दिलीही असती.

दुसरे दिवशीं बेझंटबाई येणार होत्या म्हणून मी त्यांना घेण्याकरिता स्टेशनावर गेलों होतों. स्टेशनावर कॉंग्रेसचें काम कोठवर आलें आहे म्हणून त्यांनी मला विचारलें. मुख्य ठराव कालच मंजूर झाला असें मीं त्यांना कळविलें. त्याबरोबर त्यांनी त्याच दिवशीं परत जाण्याचें ठरवून जागा रिझर्व केल्या. मुख्य ठरावाला विरोध करण्याचा त्यांचा विचार होता. पण तें काम आधींच संपलें असल्याकारणाने विनाकारण आपला मुक्काम वाढविण्याची त्यांना जरुरी भासली नाही. तथापि दुसऱ्या दिवसाच्या अधिवेशनांत भाषण करून आपले विचार त्यांनी मांडलेच.

## चोख हिशेब दिला

म. गांधींच्या इच्छेप्रमाणे दोन दिवसांत कॉंग्रेसचें अधिवेशन पुरें झालें. म. गांधी हे अत्यंत नियमितपणाने काम करणारे असून त्यांना वेळेची किंमत अतिशय उत्तम रीतीने कळते. त्यांचीं सर्व कामें त्यांच्या नियमितपणामुळे वेळेवर उरकतात. म्हणूनच इतका मोठा व्याप असूनही त्यांचीं कामें व्यवस्थित होतात.

कॉंग्रेसचें अधिवेशन संपल्यानंतर महात्माजींचा मुक्काम एक दिवस बेळगावासच 'विजयनगर'मध्ये होता. बाकीची पुढारी मंडळीं अधिवेशन संपल्यानंतर परत जाऊं लागली.

कॉंग्रेस अधिवेशनाकरिता आलेल्या प्रतिनिधींकडून जी फी वसूल होते त्यापैकी कांही अंश A. I. C. C. ला द्यावा लागतो. पण बहुतेक ठिकाणीं ही रक्कम वेळेवर दिली जात नाही. याचा उल्लेख पूर्वीं आलेलाच आहे. नागपूरच्या १९२० सालच्या कॉंग्रेसच्या वेळीं उरलेली बरीच रक्कम A. I. C. C.ला मिळाली नाही म्हणून वर्किंग कमिटीपुढे तक्रारी येत असत याची मी वर्किंग कमिटींत असल्यामुळे मला माहिती होती. त्यामुळे नागपूर स्वागत कमिटीसंबंधाने व विशेषतः त्या कमिटीचे चिटणीस डॉ. मुंजे यांचे-संबंधाने कोणत्या प्रकारची टीका होत असे, हें मला ठाऊक होतें. म्हणून A. I. C. C.चें देणें प्रथमच मीं देऊन टाकलें. श्री. शेट जमनालालजी बजाज हे खजीनदार असल्यामुळे ते बेळगावहून निघतांना त्यांच्या हातीं मीं आठ हजार रुपयांचा चेक दिला. तेव्हा त्यांना समाधान वाटलें. साधारणपणें हिशेबाची मीं चाचणी केली तेव्हा शिल्लक रक्कम व मालाची विक्री वगैरे करून येण्याची रक्कम यांतून खर्च वजा जाऊन पंचवीस

ते तीस हजारपर्यंतची बचत होईल असा अंदाज केला होता व अखेर तो खरा ठरला. एवढी मोठी काँग्रेस इतक्या व्यवस्थितपणें आणि इतक्या काटकसरीने पार पडलेली हीच पहिली असावी. सर्व कामें बिनबोभाट झालीं याचें श्रेय सर्व कार्यकर्त्यांना आहे.

### महात्माजींची तत्त्वनिष्ठ वृत्ती

महात्मा गांधींनी सर्व व्यवस्थेची स्वतः फिरून बारकाईने पाहणी केली होती. सफाई, रस्ते, दिवाबत्ती, जेवण, स्नान इ. कडे त्यांचें लक्ष विशेष असतें. त्यांनी ' Young India ' मध्ये आपला अभिप्राय नमूद केला आहे.

काँग्रेस अधिवेशनापूर्वी पंधरावीस दिवस मला महात्माजींनी कळविलें होतें की अधिवेशन हें कामाकरिता आहे, डामडौलाकरिता नाही. डामडौल व थाटमाट हा प्रदर्शन किंवा इतर कार्यक्रमाकरिता राखून ठेवावा. वेळ वाया जाऊं नये म्हणून त्यांची मिरवणूक वगैरे काढूं नये अशी त्यांनी सक्त ताकीद दिली होती. त्याचप्रमाणे आपण बेळगावला आगाऊ पाचसात दिवस जात असल्याकारणाने लोकांची गर्दी तेव्हापासून होत जाईल म्हणून तशी गर्दी करूं नये अशी त्यांनी ' यंग इंडिया 'मधून सार्वजनिक सूचना देऊन-देखील आम्ही कोठे चुकलों हें महात्माजींनी आपल्या अभिप्रायांत नमूद केलें आहे.

महात्माजींना काँग्रेसचें अध्यक्षपद स्वीकारण्यांत आपण एक मोठी जबाबदारी आपल्यावर घेत आहों असें वाटत होतें असें त्यांनी ता. २७ नोव्हेंबरच्या ' यंग इंडियां 'त लिहिलें आहे. बेळगाव काँग्रेसच्या वेळीं ' फेर ' ' नाफेर ' पक्ष जोरांत होते. दोन्ही पक्षांतील वाद भराला आला होता व मतमोजणीवरच पक्ष-प्रतिपक्षाचें सामर्थ्य मापण्याचा प्रसंग आला असता तर ' नाफेरवाल्यां 'ना बहुमतही मिळालें असतें. खुद्द महात्माजीच ' नाफेरवाल्यां 'पैकी होते व तेच अध्यक्ष असल्यामुळे बहुमत कोणी-कडे झालें असतें याबद्दल शंका नव्हती. तथापि महात्माजींनी आपल्या सत्याग्रही वृत्तीला अनुसरून ' फेरवाल्या ' पक्षांतील पुढारी देशबंधू दास व पं. मोतीलालजी यांच्याशीं तडजोड करून कौन्सिलप्रवेशाचा जो मुख्य वादाचा प्रश्न होता तो मिटविला होता. ही तडजोड त्यांनी व्यक्तिशः आपल्या जबाबदारीवर केली होती. या तडजोडीला A. I. C. C. व काँग्रेस यांची मान्यता पाहिजे होती, ती बेळगाव काँग्रेसने दिली. तडजोड झाल्यापासून नाफेरपक्षांत असंतोष माजत चालला होता, म्हणून महात्माजींना काळजी वाटत होती.

नाफेरपक्षाचें बहुमत होण्याचा संभव असूनही आपलें तत्त्व न सोडतां गांधीजींना काँग्रेसमध्ये भांडण नको होतें. भांडणाच्या वातावरणांत खादी, हिंदु-मुसलमानांचें ऐक्य, अस्पृश्यतानिवारण इत्यादि विधायक कार्याला वाव मिळत नव्हता. म्हणून नाफेर-पक्षाला व स्वतः आपल्याला पसंत नसलेल्या कौन्सिलचें काम स्वराज्य पक्षाकडे पूर्णपणें सोपवण्यांत आलें, व स्वतः त्या कामाची जबाबदारी न घेतां स्वराज्य पक्षाला अन्य प्रकारें साहाय्य करण्याचें ठरविण्यांत आलें. महात्मा गांधींची ही कार्य करण्याची

पद्धती आहे. स्वराज्य पक्ष तडजोडीप्रमाणे संपूर्णतया जर वागला तर विधायक कार्याचें पाऊल झपाट्यानें पुढें पडून कौन्सिलकार्याला वळकटी येईल, असें महात्माजींना व दास-नेहरूंना वाटत होतें. म्हणूनच ही तडजोड शक्य झाली. आपल्या विरुद्ध जे आहेत तेही प्रामाणिक आहेत असें मानून व आपलें तत्त्व न सोडतां आणि तपशिलावर भांडणें भांडत बसल्यानें संशयाचें वातावरण उत्पन्न होतें व त्यामुळें कार्यहानी होते हें जाणून महात्माजी आपलीं पावलें टाकीत असतात. आपण केलेली तडजोड अक्षरशः स्वतः पाळतात व दुसऱ्यांना पाळण्यास सांगत असतात. केलेली तडजोड कशी फिसकटून टाकावी हा विचार त्यांना शिवत नाही.

### *महाराष्ट्राची खोड*

परंतु या बाबतींत केळकर व त्यांचे अनुयायी या बुद्धीनें वागले नाहीत. कॉंग्रेसच्या मंडपांतच ता. २७ रोजीं कुलाबा जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष व चिटणीस यांनी महात्माजींना 'नोटीस' देऊन सुताची शर्त आपल्याकडून पाळली जाणार नाही असा इशारा दिला! केवळ स्वराज्य पक्षाच्या शिस्तीला अनुसरून आपण ठरावाला अनुकूल मतें दिलीं किंवा तटस्थ राहिलों असें 'नोटिशींत' नमूद केलें आहे! अशा प्रकारच्या बंडखोरीची खोडच महाराष्ट्रांतील त्या वेळच्या कित्येक कार्यकर्त्यांना लागली होती. आणि अशा वृत्तीला 'महाराष्ट्र स्वतंत्र विचाराचा' असें म्हणण्याचा प्रघात पडत चालला होता. स्वतःचें कांही असावयाचें नाही, दुसऱ्यांनी केलेल्यांत व आपणही मान्य केलेल्यांत दोष काढीत बसावयाचें, ही वृत्ती कलकत्याच्या १९२०च्या कॉंग्रेसपासून प्रसृत होत होती. महाराष्ट्रांतील कांही मंडळीच्या वृत्तीचें अनुकरण करणारे व स्वतःला टिळक पक्षाचे म्हणवून घेणारे बेळगावचे वेळवी व विजापूरचे श्री. निवासराव कौजलगी वगैरे थोडी मंडळी होती. पण, त्यांचें कांही चाललें नाही. हे दोघेही पुढे कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहिले. त्यांना नाफेरपक्षांतील लोकांची मदत पाहिजे होती. म्हणून त्यांनी बंड उभारण्याचें काम केलें नाही. बेळवी निवडून आले व कौजलगी पडले. त्यामुळे कौजलगी बरेच चिडले होते व त्यांचा असंतोष तसाच धुमसत होता. असो. कॉंग्रेसचा इतिहास लिहिण्याचा माझा हेतू नाही. म्हणून हा विषय येथेंच संपवितों.

शेवटीं आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. कॉंग्रेसकरिता एक नवीन विहीर खोदली होती व तिला 'पंपा सरोवर' असें नाव देण्यांत आलें होतें हें मागे सांगितलेंच आहे. कॉंग्रेसचें काम संपल्यानंतर ही विहीर बुजवून म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत देण्याचा करार होता. पण अशी विहीर बुजवणें व त्याकरिता नवीन खर्च करणें हें बेळगावच्या लोकांना पसंत नव्हतें. विहीर दगडांनी चांगली बांधून घ्यावी व एकदा ती बांधवून 'पंपा सरोवर' हें नाव कायम करावें म्हणजे कॉंग्रेसचें एक कायमचें स्मारक राहील असें आम्हांला वाटून त्याप्रमाणे करण्यास म्युनिसिपालिटीची परवानगी घेतली.

पण तेवढ्याने काम भागण्यासारखें नव्हतें. स्वागत कमिटीच्या सभेंत या कामाला मान्यता मिळवणं आवश्यक होतें. हा प्रश्न जेव्हा स्वागत कमिटीपुढे आला त्या वेळीं बेळगावला काँग्रेस भरवूं नये असें म्हणणाऱ्या कांही गृहस्थांनी श्रीनिवासराव कौजलगी यांच्या नेतृत्वाखाली त्याला विरोध केला. पण बहुमताने सूचना मंजूर झाली. आज ही विहीर उत्तम स्थितींत असून प्रेक्षणीय झाली आहे. पोहण्याकडे या विहिरीचा उपयोग पुष्कळ लोक करीत असतात. माझ्या मनांत या विहिरीच्या आजूबाजूच्या जागेंत एक सुंदर बाग करावी व म्युनिसिपालिटीने ती आपल्या खर्चाने व्यवस्थित ठेवावी किंवा विहिरीच्या आसपासच्या जागेवर हरिजनांकरिता नमुनेदार घरें बांधवावीं व विहिरीचा उपयोग त्यांच्याकरिता व्हावा असें होतें. पण या दोन्ही गोष्टी साधल्या नाहीत! हल्ली म्युनिसिपालिटीने विहिरीजवळील सर्व जागा घरें बांधण्याला दिल्याने विहिरीची शोभा बरीच कमी झाली आहे व सार्वजनिक दृष्ट्या या जागेचा उपयोग कांही झाला नाही.

### काँग्रेसबरोबरच्या इतर परिषदा

काँग्रेस अधिवेशनाबरोबरच गोरक्षण परिषद, सामाजिक परिषद, हिंदुसभा, शिक्षण परिषद, खिलाफत कॉन्फरन्स इ. लहानमोठ्या परिषदा भरल्या होत्या. त्यांपैकी गोरक्षण परिषद व शिक्षण परिषद यांच्याशीं महात्माजींचा संबंध होता. गोरक्षण परिषदेचे ते अध्यक्षच होते. माझ्याच विनंतीवरून त्यांनी अध्यक्ष होण्याचें कबूल केलें होतें. गोरक्षणाबद्दल त्यांचीं मतें रूढ मतांपेक्षा भिन्न होतीं. तीं लोकांना पटणार नाहीत, असें त्यांना वाटत होतें. म्हणूनच अध्यक्षस्थान स्वीकारण्यास ते मागेपुढे पाहात होते. पण स्वागताध्यक्ष श्री. चिकोडी यांना महात्माजींचीं मतें मान्य असल्याचें मीं कळवल्याने त्यांनी संमती दिली. चिकोडी यांनी विचार करून किंवा महात्माजींचीं मतें समजून घेऊन तीं आपल्याला मान्य असल्याचें मला कळवलें असावें असें मला वाटत नाही. महात्माजींना कसेंही करून अध्यक्षपद देऊन आपण ज्या परिषदेचे स्वागताध्यक्ष आहोंत तिला प्रतिष्ठा मिळवून द्यावी एवढाच चिकोडींचा उद्देश असावा! कारण, पुढे केव्हाही चिकोडींना या विषयाबाबत स्मरणदेखील होत असेल असें मला वाटत नाही. त्यांचा व माझा पुढे बराच संबंध आला. पण या बाबतींत त्यांची कांहीच हालचाल दिसून आली नाही.

गोरक्षण परिषदेंत महात्माजींनी आपल्या अध्यक्षीय भाषणांत आपल्या विचारांचें विस्तृत विवेचन केलें आहे. त्यावरून त्यांचे विचार रूढ विचारांहून किती भिन्न आहेत हें स्पष्ट दिसतें. यानंतर महात्माजींनी गोरक्षणाचा विषय आपल्या हातीं घेऊन 'यंग इंडिया' पत्रांतून व इतर प्रकारें त्याचा प्रचार करण्याचें काम चालविलें. इतकेंच नाही तर साबरमती आश्रमांत व वर्धा येथे त्यांनी प्रत्यक्ष प्रयोगही करण्याचा उपक्रम केला आणि अलीकडे गोदुग्धपानाचा प्रचार ते मोठ्या निकराने करीत असतात. आपल्या अनुयायांपैकी पुष्कळांना त्यांनी गाईच्या दुधातुपाची दीक्षा दिली. (मीही त्यांपैकीच एक आहें. पण

माझ्याकडून याचें पालन जितक्या प्रकारें व्हावें तितक्या प्रकारें होत नाही. मला बाहेर फिरावें लागतें व ज्यांच्या घरीं मी पाहुणा म्हणून जातों त्यांची गैरसोय होते असें मला आढळून आलें. तथापि बेळगावास याळगींच्या घरीं मात्र माझ्याकरिता गायीच्या दुधातुपाची व्यवस्था नेहमी ठेवलेली असते. मीही प्रवासांत पुष्कळ वेळां गाईचें तूप माझ्याबरोबर ठेवीत असतों.) गाईच्या दुधातुपासंबंधाने महात्माजींचा इतका कटाक्ष आहे की गांधी सेवक संघाचीं जीं पुढे संमेलनें भरलीं त्यांत गाईचें दूध, दही, तूपच वापरावयाचें हा निर्बंध घालण्यांत आला. स. १९३७ चें संमेलन हुदलीस भरल्यावेळीं या बाबतींत माझी किती तारांबळ उडाली याबद्दलची हकीकत पुढे येईलच.

शिक्षण परिषदेचा उपक्रम मात्र नवा होता. काकासाहेब कालेलकरांची ही कल्पना होती ती मीं अमलांत आणली. या परिषदेंत बरीच उद्बोधक चर्चा झाली. मला स्वतःला इतर कामाच्या धांदलीमुळे या परिषदेंत कांही भाग घेतां आला नाही.

हिंदुसभेचें अधिवेशन पं. मालवीयजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलें होतें. या अधिवेशनाकरिता हैदराबादच्या श्रीमंत मारवाडी घराण्यांतील शेठ पित्ती हे मुद्दाम आले होते. पं. मालवीयजींच्या भाषणाला मी गेलों होतों. या परिषदेकरिता तिकिटें वगैरेचें उत्पन्न चारपाच हजार रुपये झालें असावें. ती रक्कम बेळगावच्या हिंदुसभेच्या शाखेकडे अद्यापि असावी. केशवरावजी आजरेकर हे त्या शाखेचे प्रमुख होते. पण या शाखेचें काम असें मुळीच होत नाही. हल्ली बेळवी हे अध्यक्ष आहेत असें समजतें. पण ही शाखा सुप्त स्थितींतून अद्यापि जागी झाल्याचें लक्षण नाही.

सामाजिक परिषदेचे अध्यक्ष शंकरन् नायर होते. या परिषदेला ब्राह्मणेतर पुढारी हजर होते. मला वाटतें की कॉंग्रेसबरोबर भरलेली सामाजिक परिषद हीच शेवटची असावी.

१९२५ जानेवारींत कॉंग्रेसच्या अधिवेशनासंबंधाने सर्व कामें आटोपल्यानंतर पुढे काय करावें हा प्रश्न माझ्यापुढे प्रामुख्याने आला. ज्याला प्रत्यक्ष राजकारण म्हणतात असें काम स्वराज्य पक्षाकडे गेल्याने आणि मी त्या पक्षांत नसल्याने मला खादीच्या उत्पादनाच्या या कार्याकडे विशेष लक्ष द्यावें असें मला वाटूं लागलें. परंतु हें काम बेळगावास राहून होण्यासारखें नव्हतें. म्हणून हुदलीसच राहण्याचें मीं ठरवलें.

## परिशिष्ट १ लें

# कोल्हापूर प्रकरण : वस्तुस्थिती

(पान १८३ मध्ये कोल्हापूरसंबंधानें कांहीं मजकूर आला आहे. पण तो सर्वस्वी खरा नाही. खरी सर्व हकीकत मीं तुरुंगांत मित्रांना सांगितली होती. पण टिप्पण करतांना खरी हकीकत लिहिल्यास टिप्पण-पुस्तकें सरकारकडून परत मिळालीं नसतीं आणि माझ्यावर व इतर मंडळीवर पुन्हा खटले भरले गेले असते हें लक्षांत घेऊन, ती हकीकत सर्व दिली नाही आणि जी दिली आहे तिच्यांतील कांही भाग वस्तुस्थितीस धरून नाही. इतकी खबरदारी घेऊनदेखील माझीं टिप्पणें जेल-अधिकाऱ्यांकडून, माझी सुटका झाल्यानंतर पाचसात महिन्यांनी मिळालीं. मीं सारखा तगादा लावला होता. पण 'जेलच्या कारकून मंडळीचें वाचन चालू आहे. तें संपल्यानंतर देतों' असें ते सांगत होते. जेलचे कारकून वाचीत होते की पोलिसांकडे तीं टिप्पणें पाठविलीं होतीं हें मला कळलें नाही.)

१९०६ सालापासून मी लोकमान्यांच्या कार्यांत भाग घेऊं लागलों. बंगालच्या विभागणी-संबंधानें पुष्कळच चळवळ केली. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, वगैरे अनेक कार्यक्रम हातीं घेऊन मी मनापासून काम करीत होतों. या कामांतच दे. भ. शिवरामपंत परांजपे, काकासाहेब खाडिलकर, वासूकाका जोशी वगैरेंचा निकट संबंध आला. यांच्या-शिवाय अनेक लहानसहान कार्यकर्त्यांच्या ओळखीदेखी झाल्या होत्या; त्या वेळींच मवाळ राजकारणाने कांही होणार नाही असें मला वाटूं लागलें होतें. पुढे बंगालमध्ये खून-दरोडे होऊं लागले व त्यांचा परिणाम मनावर होऊं लागला. सशस्त्र क्रांतीची तयारी करण्या-करिता म्हणून व्यक्तिशः खून करणें आवश्यक आहे, असे विचार माझ्या मनांत येऊं लागले. वर उल्लेखिलेल्या मंडळींपैकी टिळक व खाडिलकर सोडून परांजपे व वासूकाका यांच्याशीं माझ्या मनांत येऊं लागलेल्या विचारांसंबंधी मी चर्चा करूं लागलों. त्यांचेकडून या विचारांना स्फूर्तीच मिळत गेली. लो. टिळक फार मोठे म्हणून व काका खाडिलकर फारसे बोलत नसत म्हणून त्यांच्याशीं प्रत्यक्ष चर्चा करण्याचे प्रसंग फारच कमी आले. त्यांना या गोष्टी पसंत नसतील असें वाटण्याचे प्रसंगही आले नाहीत. बंगालमध्ये चाललेल्या दंग्याचें एका परीनें समर्थन मी त्यांचे तोंडून केव्हा तरी ऐकत होतों. शिवाय

'केसरीं'तील लेख वाचून माझा ग्रह अशा चळवळींना अनुकूलच झाला. माझें वय त्या वेळीं चाळिशीच्या आंत होतें व भावनाही खूप उद्दीपित होत असत.

इकडे बेळगावांत गोविंदराव याळगी, हणमंतराव देशपांडे, शामराव काळकुंद्री यांच्याशीं संबंध दृढ होत चालला होता व आम्ही सर्वच दिवसारात्रीं या अत्याचारांच्या गोष्टींचा खल करीत होतों. मी सगळ्यांत वडील असल्याने व माझी 'देशभक्तां'त गणना होऊं लागल्यामुळे माझें वजन साहजिकपणे या मंडळीवर पडे. या मंडळींत गोविंदराव हेच उच्च प्रतीचे व कळकळीचे तरुण होते. त्यांच्यामध्ये धडाडी होती व त्यागबुद्धी होती. त्यामुळे बेळगाव शहरांत त्यांनी अनेक कामें हातीं घेतलीं व तीं नेटानें तडीला नेलीं. त्यांचा प्रभाव सामान्य बहुजनसमाजावर चांगला होता. सशस्त्र क्रांतीचे ते पुरस्कर्ते होते. त्याकरिता व्यक्तीचे खून करण्यांत कांही वाईट आहे असें ते मानीत नव्हते. त्यामुळे माझें व त्यांचें विशेष जुळलें. तो संबंध १९२३ पर्यंत सारखा वाढतच गेला. त्यांच्या मृत्यूपूर्वीच गांधींचें कार्य सुरु झालें होतें व त्यांतही गोविंदराव पूर्णपणें रमले होते. त्यांच्या पश्चात् त्यांच्या घराण्याचा व माझा संबंध कायम आहे.

हणमंतराव देशपांडे सज्जन आहेत; पण गोविंदरावांत जी त्यांची स्वतःची म्हणून स्फूर्ती होती ती हणमंतरावांत नव्हती. तथापि आम्हांला शक्य तें साहाय्य करण्याची हणमंतरावांची वृत्ती होती.

तिसरे इसम काळकुंद्री. हे आम्हांत जास्ती श्रीमंत. त्यांचेकडून आम्हांला आमच्या कामाला द्रव्यसाहाय्य होईल अशी आशा होती. पण ती सफल झाली नाही. उलट त्यांनी जे थोडेबहुत पैसे खर्च केले होते त्यापैकी बरीच रक्कम आमचेकडून त्यांनी वसूल केली. गोविंदरावांवर किंवा हणमंतरावांवर जे प्रसंग आले होते ते शामरावांवर आले असते तर आमची गठडी केव्हाच वळली असती.

गोविंदरावांनी कांही शस्त्रें या वेळीं जमविलीं होतीं व पुष्कळ तरुणांचा मेळावाही मिळविला होता. प्रक्षोभ उत्पन्न होईल अशा प्रकारच्या भाषणांचा मीं धूमधडाका चालविला होता. तरुण लोक—व पुष्कळ प्रौढदेखील—माझ्या भाषणाने प्रभावित होत. त्याचप्रमाणे बंगाल्यांत घडणाऱ्या गोष्टींमुळे व वर्तमानपत्रांतील लेखांमुळे, स्वातंत्र्याची वेळ अगदी जवळ आली. आम्हीं आपलें कर्तव्य करावयाला अगदी सज्ज असलें पाहिजे, अशी एकच भावना माझ्या व गोविंदरावांच्या मनांत सारखी खेळत होती. बेळगावांतील देशी लष्कर कसें फितवावें, आमच्या गावाकडील बेरड लोकांना आमच्या चळवळींत ओढून त्यांची संघटना कशी करावी, व त्यांतच वैयक्तिक अत्याचाराचे प्रसंग कसे आणावेत, या गोष्टींचा सारखा विचार आम्ही करीत होतों व जुळवाजुळवीचें कांही कार्य करीत होतों. लष्करांतील शिपायांपर्यंत आम्ही फारसे पोहोचलों नव्हतों. पण पोलिसांतील कांही लोक आम्हांला अनुकूल होत होते. इतर जनतेला—सुशिक्षित व सामान्य—आमच्याविषयी मनांतून सहानुभूती वाटत होती, असा आम्हांला अनुभव येत असे.

लो. टिळकांबद्दल सार्वत्रिक आदर व त्यांच्याशीं माझा संबंध, यामुळे मलाही लोक मानीत असत.

सरकारच्या दडपशाहीमुळे देशांतील वातावरण १९०८ सालीं बरेंच प्रक्षुब्ध झालें होतें. सुरतेची कॉंग्रेस मोडल्यानंतर आपल्याला लवकरच तुरुंगांत जावें लागणार, असें लोकमान्यांना वाटत होतें. महाराष्ट्रांत प्रत्यक्ष बॉंब उडाले नव्हते, पण ब्याच तरुणांच्या मनांत बॉंबच्या कल्पना येत होत्या.

पुण्याला नाना नागपूरकर या नावाचे एक गृहस्थ होते. ते एम्. एजी. झाले होते व त्यांच्यावर डॉ. मॅन, प्रिन्सिपॉल, ॲग्रिकल्चरल कॉलेज, पुणे, यांची मर्जी होती. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी एक बॉंब तयार केला होता व तो एका झाडावर टाकून प्रयोग यशस्वी करून दाखविला होता. नाना हे जरी पुण्यास होते तरी त्यांचा मूळ गाव कोल्हापूरकडेच आहे. ताईमहाराजांच्या खटल्यांत लो. टिळकांच्या विरुद्ध जी मंडळी होती त्यांत नानांचे चुलते बळवंतराव नागपूरकर हे प्रमुख होते. नानांचें व या नागपूरकरांचें अगदी जवळचें नातें होतें. नानांचे आप्त बेळगावला होते. त्यांचा व आमचा स्नेहसंबंध होता. लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यानंतर आम्ही कांही मंडळी अगदी हवालदिल झालों होतों. या सरकारच्या कृत्याचा सूड घेतलाच पाहिजे अशा विचारांत आम्ही होतों. आणि तो सूड म्हणजे टिळकांना शिक्षा देणारे दावर यांचा खून करणें हाच एक आहे अशी आमच्या मनाची स्थिती झाली होती.

अशा स्थितींत आम्ही असतांना कोल्हापूरचे राहणारे दामोदर हरी जोशी या नावाचे गृहस्थ आम्हांला भेटण्याकरिता आले. ते आमचे स्नेही व येथे आमच्या प्रयत्नाने स्थापन झालेल्या 'गणेश विद्यालयां'तील मुख्य शिक्षक कृष्णाजी हरी दीक्षित यांचेकडे उतरले होते. त्यांची व आमची भेट दीक्षितांनी करून दिली. त्याच वेळीं कोल्हापूरच्या शिवाजी क्लबचा आपला संबंध असून त्या संस्थेचे चालक हणमंतराव कुळकर्णी यांचे-बरोबर आपण नेपाळांत काकासाहेब खाडिलकर यांचेकडे होतों व तेथे काडतुसें तयार करण्याचा कारखाना काकांनी काढण्याचा प्रयत्न केला होता असें जोशांनी आम्हांला सांगितलें आणि कांही कामगिरी असल्यास ती करण्यास आपण तयार आहों असेंही कळविलें. त्याचप्रमाणे नाना नागपूरकर यांनी बॉंब केला होता, त्याचा प्रयोगही पुण्यास झाला व ही गोष्ट माझे स्नेही वासूकाका जोशी यांना माहीत आहे, वगैरे हकीकत आम्हांला कळवून आमचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

यांतील खरें किती, खोटें किती, याचा तपास केल्याखेरीज या माणसाबरोबर बोलणें योग्य नाही असें मला वाटलें. म्हणून त्याला पुन्हा येण्याबद्दल सांगून निरोप दिला. तो गेल्यानंतर मीं काका खाडिलकरांकडे पत्राने 'कोल्हापूरचा दामू जोशी या नावाचा गृहस्थ आपल्या माहितीचा आहे का, व असेल तर तो कसा आहे' वगैरे चौकशी केली. काकांचें उत्तर आलें तें येणेंप्रमाणें होतें: "माल चांगला आहे. सावधगिरीने उपयोग करून घ्यावा." 'माल चांगला आहे' एवढ्या उत्तराने आमचें समाधान झालें.

त्यानंतर मी पुण्यास गेलों त्या वेळीं वासूकाका जोशांकडे चौकशी केली. त्यांनी दामू जोशाची शिफारस केली. त्याच वेळीं नागपूरकर वगैरेंनी केलेल्या बाँबची चौकशी केली. ती गोष्ट खरी असल्याचें त्यांनी मला सांगितलें. ही गोष्ट लोकमान्यांनाही माहीत आहे असें वासूकाका म्हणाले; पण लोकमान्यांना मीं त्याबद्दल कांही विचारलें नाही.

बेळगावला परत आल्यानंतर गोविंदरावांना मीं मला पुण्यांत कळलेल्या गोष्टी सांगितल्या. साधनें मिळणार व दामूसारखा मनुष्य त्यांचा उपयोग करणार याबद्दल आमची खात्री झाली व पुढील योजनांचा आम्ही विचार करूं लागलों.

पुण्याहून मी परत आलों हें दामूला समजल्यानंतर तो पुन्हा बेळगावला आला. त्या वेळीं आमच्या घरीं किंवा गोविंदरावांच्या घरीं तो उतरला असावा. या भेटींत व त्यानंतरच्या भेटींत त्याने कोल्हापूरच्या अनेक हकीकती सांगितल्या. कोल्हापूरचे भास्करराव जाधव व बाळासाहेब गायकवाड यांचें परस्परांत वाकडें होतें व त्या द्वेषांत भास्करराव जाधवांविरुद्ध महाराज होते. म्हणून भास्कररावांना चोप देण्याचा त्यांनी घाट घातला व आपल्या साहाय्यानें ती गोष्ट घडवून आणली असें दामूने सांगितलें.

वरच्या गोष्टीशिवाय अत्यंत महत्त्वाची एक बातमी त्याने आम्हांला सांगितली. ती म्हणजे कोल्हापूरचे शाहूमहाराज हे वरून कितीही राजनिष्ठ असले तरी आंतून ते पूर्ण राष्ट्रीय वृत्तीचे आहेत व सशस्त्र क्रांती घडवून आणावी म्हणून त्यांची तयारी चालू आहे. आपल्या कटांत गायकवाड, शिंदे, होळकर वगैरे संस्थानिकांना ओढण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असून, तो बहुतेक यशस्वी होत आहे; लष्करांतील मराठे शिपाई व अंमलदार हे अनुकूल आहेत; वगैरे हकीकत महाराज आपल्याला सांगतात व आपली खात्री पटविण्याकरिता त्यांनी सचैल स्नान करून आपल्या समक्ष त्यांच्या दंडांत असलेल्या ताइतांतील श्रीशिवाजीमहाराजांची शपथ घेतली आहे असें सांगितलें ! ही हकीकत आम्हांला खोटी वाटली नाही. हें सर्व ऐकून आमच्या अंगावर रोमांच आले व हिंदुस्थान मुक्त होण्याचा काल समीप आला असें आम्हांला वाटलें !

दामू जोशी त्या वेळीं तीसबत्तीस वर्षांचा असावा. अंगाने धट्टाकट्टा असून शरीर तालमीने पीळदार झालें होतें. बोलण्याचालण्यांत तो हुषार होता. त्यामुळे त्याच्या बोलण्याची छाप दुसऱ्यावर सहज पडे. त्याच्याविरुद्ध कांही सांगणारा एकही मनुष्य आम्हांला भेटला नाही. आम्हीही स्वातंत्र्यलालसेने भारलेले होतों. मार्गाबद्दल निश्चित होतों. त्यामुळे दामू जोशाच्या शब्दावर आमचा विश्वास बसत असे. त्यापैकी कांही हकीकती मीं वासूकाकांना व काका खाडिलकरांना सांगितल्या. त्यांनाही या खोट्या वाटल्या नाहींत.

दामू सांगत असे त्या गोष्टी खऱ्या तरी असल्या पाहिजेत किंवा केवळ थापाही असतील. त्या खऱ्या आहेत असें मानलें तर शाहूमहाराजांचा तसें करण्यांत हेतू काय असावा असा एक प्रश्न डोळ्यापुढे येतो. महाराज राष्ट्रीय वृत्तीचे असून सशस्त्र क्रांती घडवून आणण्याच्या प्रयत्नांत ते होते असें आज वाटत नाही. त्या वेळींदेखील मला

अडकविण्याकरिता त्यांनी स्वतः ज्या कारवाया केल्या त्या पाहिल्या म्हणजे महाराज हे सरकारांत आपलें प्रस्थ वाढवण्याकरिता या युक्त्या करीत होते असेंच म्हणावें लागतें. (शालिग्राम यांची हकीकत जीवनकथेंत दिली आहे. तिजवरून तीच गोष्ट सिद्ध होते.) दामू जोशासारख्याला हातीं धरावा व त्याच्याकडून माहिती मिळवावी, व त्याला उत्तेजन देऊन प्रमुख लोकांना गोवावें, हाच उद्देश महाराजांचा होता यांत मला तरी शंका वाटत नाही. महाराजांचीं कारस्थानें इतकीं होतीं की त्यांवर पांघरूण घालण्याकरिता म्हणून सरकारला कटाची बातमी पुरवून आपला बचाव करून घेण्याची आवश्यकता त्यांना भासत असावी. दामूसारख्याने जरी गुप्ततेचा स्फोट केला तरी महाराजांविरुद्ध दामूचा पुरावा कितीसा उपयोगी पडणार ? ही जाणीव महाराजांना असल्यामुळे ते बिनधोकपणें कांही तरुणांना भुरळ पाडून उत्तेजन देत असले पाहिजेत, असा विचार माझ्या मनांत येतो. किंवा महाराजांचा संबंध कांही नसतांना, आमच्यावर वजन पाडण्याकरिता, दामू हा मुद्दाम आम्हांला अशा प्रकारच्या थापा देत असावा, हें संभवनीय नाही असेंही म्हणवत नाही. अशा प्रकारें आमची फसगत करण्यांत दामू आपला कांहीं तरी स्वार्थ साधत होता असेंही म्हणवत नाही. त्याला कांही तरी करावयाचें होतें व त्याकरिता तो मनुष्यबल, द्रव्यबल जमवीत होता. या त्याच्या प्रयत्नाला यश यावें म्हणून तो अशा गोष्टी सांगत असावा असेंही अनुमान करण्यास जागा आहे.

दामूला पकडल्यानंतर व तो तुरुंगांतून पळून गेल्यानंतर आतापर्यंत त्याची व माझी भेट झाली नाही. त्यामुळे यासंबंधाने निश्चित कांही सांगवत नाही. हें जरी खरें असलें तरी दामू सर्व हकीकत खोटीच सांगून आम्हांला झुलवीत होता असेंही म्हणवत नाही.

दामूच्या एका भेटींत त्याने कांही रक्कम आमचेकडे मागितली. ती रक्कम किती होती हें आज आठवत नाही, पण आमच्या आटोक्यांतीलच होती. कोल्हापूरचे महाराज जर अनुकूल आहेत तर लहानशा रकमेकरता आम्हांकडे त्याने कां यावें असा प्रश्न आमच्यापुढे आला व तो आम्हीं त्याला विचारला. तेव्हा ही रक्कम लहानसहान शस्त्रें (बंदुका, पिस्तुलें, रिव्हॉल्वर वगैरेकरिता) पाहिजे आहे, तेव्हा तेवढ्या रकमे-करिता महाराजांना विचारणें बरोबर नाही, असें त्यानें आम्हांला सांगितलें. तें आम्हांला खरें वाटलें व त्याने मागितलेली रक्कम आम्हीं त्याला दिली. पुढे कांही दिवसांनी येतेवेळीं एक रिव्हॉल्वर, एक पिस्तूल व कांही काडतुसें व एक फिरकीचा तांब्या आणून दामूने आमचेजवळ दिला. आम्हीं दिलेल्या रकमेंतून या जिनसा खरीदल्या असतील अशी आमची समजूत झाली.

याच संधीला आबासाहेब रामचंद्र हें नाव धारण करणाऱ्या गृहस्थाचा व आमचा संबंध आला होता. (आबासाहेबासंबंधीची हकीकत जीवनकथेंत दिली आहे.) तो एक क्रांतिकारक आहे अशी आमची समजूत झाली होती. आम्हीं आबासाहेबाची हकीकत दामूला कळविली. आबासाहेब दिसतो कसा, बोलतो काय, व राहतो कसा, वगैरेचें वर्णन आम्हीं त्याला सांगितलें. इतक्या खाणाखुणा कळल्यानंतर आबासाहेब

आपल्या ओळखीचा असावा असें दामूला वाटलें. म्हणून त्याला घेऊन मी व गोविंदराव मडगावला गेलों. तेथे दामूने त्याला ओळखलें व काशीला हा 'रावसाहेब' या नावाने वावरत होता व पुण्यांतील वासूकाका जोशांना त्याची माहिती आहे, असें दामूने सांगितलें. आबासाहेबांच्या आठवणींत ही हकीकत दिली आहे. पण आबासाहेबाला ओळखणारा दामू जोशी आहे हें नाव दिलें नाही. आमच्या बरोबरच्या एका गृहस्थाने 'आबासाहेब' व 'रावसाहेब' एकच आहेत असें ओळखलें असें तिथें लिहिलें आहे.

वर लिहिलेल्या फिरकीच्या तांब्यांत तांबूस रंगाची पूड होती. तिचा उपयोग बॉंबमध्ये कसा करावा वगैरे माहिती आम्हांला दामूनें दिली होती.

बेळगावांत आमच्या मंडळींत खटाव व निलजकर म्हणून दोन गृहस्थ होते. हे दोघेही जपानला जाऊन आलेले होते. दोघे परम स्नेही होते. खटाव यांना कांही शास्त्रीय ज्ञान होतें. बेळगावांत जपानी मागांचा कारखाना, आगकाड्यांचा कारखाना, वगैरे काढण्याच्या प्रयत्नांत ते होते. आमच्याबरोबर जपानच्या गोष्टी बोलत व हिंदुस्थानांत इंग्रजांविरुद्ध उठाव झाल्यास जपान आम्हांला मदत करील असें आश्वासनपूर्वक सांगत. याशिवाय बॉंब वगैरे तयार करण्याच्या क्रिया आपल्याला अवगत आहेत व प्रसंग येईल तेव्हा आपण तयार करून देऊं असें सांगत. त्यामुळे आमचा व त्यांचा स्नेह जमला होता. त्यांना बॉंब करतां येतात की नाही हें आम्हीं कधी प्रत्यक्ष पाहिलें नाही. पण त्यांच्या बोलण्यावर आमचा विश्वास होता व गाठीभेटी वारंवार होत.

दामू जोशानें आमचेकडे जो तांब्या दिला होता तो आम्ही खटाव-निलजकरांकडेच दिला होता. तांब्यांत जी पूड होती तिचा उपयोग बॉंब करण्याकडे होईल की नाही हें तपासून कळविण्यास त्यांना सांगितलें. त्या वेळीं दामू त्यांच्याकडे आला होता. एक-दोन दिवसानंतर त्यांच्या भेटीला मी, गोविंदराव व दामू असे तिघे गेलों होतों. त्यावेळीं त्यांनी तांब्यांतील पूड बॉंबची आहे व दामू सांगत होता तसें केल्यास बॉंबप्रमाणे उपयोग होईल असें सांगितलें. याची प्रचीती पाहण्याकरिता म्हणून एक चिमूट पूड एका ऐरणीवर ठेवून, एक घाव घातला. त्याबरोबर मोठा स्फोट होऊन आवाज निघाला. त्यावरून पुडीबद्दल खात्री पटली. तांब्या, रिव्हॉल्वर व पिस्तूल हीं गोविंदरावांकडे राहिलीं. स्वतः गोविंदरावांनीही कांही पिस्तुलें व रिव्हॉल्वर्स जमविलीं होतीं. तीं त्यांनी गोव्यांतून मिळविलीं होती.

यानंतर कोल्हापुरास महाराजांच्या कन्या आक्कासाहेब महाराज यांचा लग्नसमारंभ झाला. त्याच सुमारास कर्नल फेरिस, पोलिटिकल एजंट, हे निवृत्त होऊन विलायतेला जाणार होते. कर्नल फेरिस यांचा खून लग्नमंडपांत व्हावा असें कित्येक कोल्हापूरच्या मंडळींच्या मनांत होतें व त्या मंडळींत दामूही असावा असें स्मरतें. पण त्या वेळीं हें साध्य झालें नाही. म्हणून फेरिस विलायतेला जातांना, ज्या गाडींतून मुंबईला जाईल त्या गाडींतच त्याचा खून करावा असा कोल्हापुरास बेत झाला. या बेतांत माझे स्नेही गणपतराव मोडक हे होते. गणपतरावांचा व माझा चांगला स्नेह होता व क्रांतीच्या वगैरे गोष्टी त्यांच्याशीं

माझ्या होत होत्या. महाराज स्वतः फार चांगले आहेत, पण संस्थानांत ज्या वाईट गोष्टी होतात त्या फेरिसमुळे होतात, अशी या मंडळींची समजूत होती. म्हणून त्याला मारण्याचा बेत झाला होता. शिवाय एका इंग्रजाला मारण्याचें श्रेयही मिळणार होतेंच. पण आमच्या बेळगावच्या मंडळींचा या कटाशीं कांही संबंध नव्हता.

हा बेत झाल्यानंतर दामू येथे आला व कोल्हापुरांत घडलेली हकीकत त्याने सांगितली. फेरिसला गाडींत मारण्याची कामगिरी आपल्यावर सोपविली आहे व ती आपण घेतली आहे असें दामूनें सांगितलें; व आमच्याजवळ असलेलें रिव्हॉल्वर, पिस्तूल, काडतुसें त्याने मागितलीं. फुरसुंगीपर्यंत फेरिस ज्या गाडीने जाणार होता त्याच गाडीने जावयाचें व सकाळीं फुरसुंगी स्टेशनावर फेरिसवर गोळ्या झाडून मारावयाचें असें ठरल्याचें दामूनें सांगितलें. त्याचप्रमाणे आपल्याबरोबर एखादा चांगला, असल्या विचाराचा, मनुष्य देण्याबद्दल त्याने मागणी केली. गोविंदरावांनी हत्यारें त्याच्याकडे दिलीं व त्याच्या माहितीच्या, येथील व्हेटर-नरी हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या गोपाळ पाचलग या तरुणाची जोड दिली. पाचलगाने तावडतोब रजेचा अर्ज दिला व तो दामूबरोबर जाण्यास सिद्ध झाला. या कामांत दामूला यश यावें म्हणून सर्व बेताची चर्चा त्याचेबरोबर केली. गोपाळलाही दामूने कसें वागावें व आपल्याला पकडल्यावर रिव्हॉल्वर घेऊन कसें पळावें वगैरे सर्व गोष्टी सांगितल्या. मागचापुढचा विचार न करता आम्हीं दामूची सर्व तयारी करून दिली. त्याला व गोपाळला पोहोचविण्याकरता गोविंदराव स्टेशनावर गेले होते. पुढे तीनचार दिवस आम्ही फेरिसचा खून झाल्याची किंवा निदान त्याच्यावर गोळीबार झाल्याची बातमी वाचण्याच्या नादांत होतों. पण तशी बातमी आली नाही.

लगेच दामू परत आला. गोपाळही आला. अटकळ केल्याप्रमाणे फेरिस सकाळीं फुरसुंगी स्टेशनावर उठून बसला होता, व खिडकीचीं दारें मोकळीं होतीं, पण आयत्या वेळीं रिव्हॉल्वरचा घोडा ओढला तरी काडतूस उडालें नाही, अशी हकीकत दामूने सांगितली. आम्हां सर्वांनाच त्या हकीकतीमुळे निरुत्साह वाटला. पण दामू सांगतो ती हकीकत खोटी आहे असें वाटलें नाही.

त्यानें रिव्हॉल्वर व पिस्तूल गोविंदरावांकडे दिलें. तांब्या गोविंदरावांकडे होताच. त्यांनी तीं सर्व हणमंतराव देशपांडे यांजकडे ठेवण्याकरता दिलीं.

बॉंब तयार कसे करावेत, पूल, इमारती, रेल्वेचे रस्ते उडवण्याकरिता सुरुंग कसे लावावेत, यांचे अनेक प्रकार असलेलें एक पुस्तक दामूने दिलें होतें. त्याची नक्कल दोनतीन दिवसांत आम्हीं केली व मूळ पुस्तक परत दिलें. जिन्नस हणमंतरावांजवळ दिले हें दामूला माहीत होतें. पुढे कांही दिवसांनी कोल्हापुरास पकडापकडी सुरू झाली. कोल्हापूरच्या महाराजांचें खरें स्वरूप बाहेर पडूं लागलें. महाराजांनी एका प्रतिष्ठित गृहस्थाच्या कुटुंबांतील मुलीशीं अनाचार केला होता व त्यामुळे त्या गृहस्थाने जीव दिला अशी वदंता उठली होती. त्या गृहस्थाने आत्महत्या केली होती ही गोष्ट कांही खोटी नव्हती. मुंबई सरकार व वरिष्ठ सरकार यांच्यापर्यंत तारा वगैरे गेल्या होत्या, असें

म्हणतात. हे सर्व छपवण्याकरता महाराजांनी, महाराष्ट्रांत एक राजद्रोही कट असून त्यांत लोकमान्यांपासून लहानसहान कार्यकर्त्यांपर्यंतचे लोक आहेत व बॉंब वगैरे तयार करण्याचें काम चालू आहे अशी सरकारला बातमी दिली आणि कोल्हापुरांतील लोकांना पकडलें, अशी वार्ता आमच्या कानावर आली. महाराज आपल्या बचावाकरिता वाटेल त्याला बळीं देतील ही कल्पना आम्हांला नव्हती असें नाही. आणि तो काळ इतक्या धामधुमीचा व नाजूक होता की सरकारला खऱ्याखोट्या बातम्या पुरवून स्वार्थ साधण्याची संधी पुष्कळांनी घेतली.

या परिस्थितींत दामूही पकडला जाईल अशी आम्हांला शंका येत होती व ती आम्हीं दामूला बोलूनही दाखविली. तथापि त्याने महाराजांचा आपल्यावर पूर्ण विश्वास असल्याने ही गोष्ट होणार नाही असें सांगितलें. पण पुढे दामूलाही पकडण्यांत आलें. ही बातमी दुसरे दिवशीं आम्हांला समजली. त्याबरोबर तो फिरकीचा तांब्या व रिव्हॉल्वर वगैरे नष्ट करण्याला मीं गोविंदराव व हणमंतराव यांना सांगितलें.

हणमंतरावांनी तांब्या व बॉंब वगैरे तयार करण्याचें माहितीचें पुस्तक आपल्याच घरीं मजगावास ठेविलें होतें. रिव्हॉल्वर व पिस्तूलही आपल्या एका स्नेह्याकडे अनगोळास ठेवण्याकरिता दिलें होतें. दामूला पकडल्यानंतर पुस्तक जाळण्यांत आलें व तांब्या नाहीसा करण्याकरता आपल्या घरीं असलेल्या नागेश या नावाच्या मनुष्याला सांगितलें. त्याला तांब्याचा मोह उत्पन्न झाला व त्याने त्यांतील पूड तळ्यांत टाकिली व तांब्या स्वच्छ घासूनपुसून आपल्या एका स्नेह्याजवळ ठेविला! सर्व जिन्नस नाहीसे केले काय? असें मीं हणमंतरावांना विचारलें व त्यांनी नाहीसे केल्याचें मला सांगितलें. ज्या गोष्टी त्यांनी स्वतः करावयाला पाहिजे होत्या त्या न करता दुसऱ्याला सांगितल्या; व त्या मनुष्याने त्या सांगितल्याप्रमाणे न करतां, केल्याचें हणमंतरावांना सांगितलें. असो. हणमंतरावांनी आमच्या सूचनेप्रमाणे सर्व काम झाल्याचें सांगितल्यानंतर आम्ही निर्धास्त झालों. मुद्देमालच जर आमच्याकडे मिळाला नाही तर दामूने कांही जबाब दिला तरी आमचें कांही होणार नाही असें आम्हांला वाटलें. तथापि झालेली चूक अंगावर आली व हणमंतराव देशपांडे यांचेवर खटला भरण्यांत आला.

दामूला अटक झाल्यानंतर त्याचे बरेच हाल करण्यांत आले. मारामुळे हैराण होऊन त्याने कबुलीजबाब दिला. त्यांत अनेक खऱ्याखोट्या गोष्टींचें भारत दामूनें रचलें.

या जबानीच्या आधारें दामूला घेऊन पोलिसपार्टी आली व रात्रींच मजगावला जाऊन हणमंतरावाला अटक केली व घराची झडती वगैरे काम सुरू झालें. त्या वेळीं देखील दामू हणमंतरावांना 'कांही सांगू नका' असें बजावीत होता. अर्थात् हें पोलिसांना चुकवूनच दामूला करावें लागत होतें असें मला कळलें.

मी त्या दिवशीं मुंबईला जाण्याकरता निघालों होतों. दुसऱ्या दिवशीं गोविंदराव याळगी, शामराव काळकुंद्री, हणमंतराव देशपांडे यांचें बेळगावांतील घर व आमचें घर अशा झडत्या झाल्या. याबद्दलची हकीकत आठवणींत आहे.

पिस्तूल व रिव्हॉल्वर दुसरीकडे अनगोळ येथे ठेवली होतीं. ती पोलिसांना मिळालीं. हणमंतरावांनी तीं ठेवण्याला दिलीं होतीं असा पुरावा करून त्यांचेवर खटला भरला गेला. खटल्याचा निकाल वगैरे आठवणींत आहे.

लेखन : ता. २४-६-४९ ते ता. २७-६-४९

परिशिष्ट २ रें

# माझ्या मनावर उमटलेले बेळगावचे ठसे

माझ्यावर झालेले पुष्कळसे परिणाम सर्वच एकाच वेळीं गर्दी करून बाहेर पडण्यास धडपडतात, त्या वेळीं त्यांची नोंद करण्याची स्थिती स्पृहणीय असत नाही. माझ्या मनावर उमटलेल्या बेळगावच्या ठशांची नोंद करण्यास माझ्या हातांत मीं लेखणी घेतांच माझीही तीच दशा झालेली आहे. तथापि मी तसा प्रयत्न करून पाहतों इतकेंच.

गंगाधरराव देशपांडे व त्यांचे सहकारी कार्यकर्ते यांची शक्ती या कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळीं चांगलीच कसाला लागली, व त्यांत ते संपूर्णतः यशस्वी ठरले. त्यांचें 'विजयानगर'—अद्यापि स्वराज्याच्या दृष्टीने नसलें तरी संघटनेच्या दृष्टीने—यशोभूषित झालें आहे. बारीकसारीक सर्व गोष्टीही विचारपूर्वक योजलेल्या होत्या. डॉक्टर हर्डीकरांचे स्वयंसेवक चुणचुणीत, एकचित्त व सावध होते. रस्ते रुंद व स्वच्छ राखलेले होते. तात्पुरत्या दुकानांच्या सोयीच्या दृष्टीने व हजारो प्रेक्षकांच्या वापराच्या सोयीच्या दृष्टीने रस्ते अधिक रुंद आखले असते तर बरें झालें असतें. दिवाबत्तीची व्यवस्था आदर्श होती. भव्य तंबूमध्ये शिरतांना, तंबूपुढेच मध्यावर असलेला संगमरवरी कारंजा सर्वांचें लक्ष आकर्षित केल्याशिवाय राहात नव्हता. त्या भव्य तंबूमध्ये कमींत कमी सतरा हजार लोकांची व्यवस्था होण्यासारखी होती. स्वच्छतेची व्यवस्था उत्तम असली तरी त्यापेक्षाही ती अधिक शास्त्रोक्त असणें आवश्यक होतें. सांडपाण्याच्या निकासाची पद्धती अगदीच जुनीपुराणी होती. पुढील वर्षी, म्हणजे स. १९२५ सालीं, कॉंग्रेसचें अधिवेशन भरविण्याचें सौभाग्य कानपूरच्या कार्यकर्त्यांना लाभणार आहे. त्यांचें लक्ष मी आजपासून या गोष्टीकडे वेधूं इच्छितों, की शिबिर-स्वच्छतेच्या अत्यंत परिणामकारक पद्धतीकडे अत्यंत अभ्यासपूर्वक त्यांनी लक्ष द्यावें, आणि असल्या गोष्टींचा विचार अगदी ऐन वेळीं करण्याकरिता राखून ठेवूं नये.

कॉंग्रेस नगरामध्ये आदर्श संघटनाचातुर्य दिसून येत असल्याबद्दल दोन स्तुतिपर शब्द काढीत असतांना, माझ्या ध्यानांत ही गोष्ट आल्याशिवाय राहात नाही की, वरिष्ठ दर्जाच्या पाहुण्यांसाठी फाजील सुखसोयी करण्याची परंपरागत पद्धती अनुसरण्याच्या बाबतींत आणि दर्शनी भाग भपकेबाज करण्याच्या बाबतींत गंगाधररावांना मोह आवरतां

आलेला नाही. उदाहरणार्थ, अध्यक्षांचीच 'कुटी' घ्या. मीं 'खादीची-कुटी' मागितली होती आणि मला 'खादीचा-राजवाडा' देऊन अपमानित करण्यांत आलें. अध्यक्षाकरिता राखून ठेवलेली 'जागा' अगदी जरुरीची होती यांत शंका नाही. मला पाहण्यासाठीं येणाऱ्या हजारो लोकांच्या झुंडींपासून माझें रक्षण होण्यासाठी, त्या जागेभोवतीं कुंपण किंवा कांपाउंड असणें अत्यंत आवश्यक होतें. पण मी कॉन्ट्रॅक्टर असतों तर अध्यक्षांना इतक्याच जागेंत इतक्याच सुखसोयी, झाला त्याच्या अर्ध्या खर्चांत देऊं शकलों असतों, याची मला खात्री आहे. फाजील खर्चाच्या अनेक बाबींपैकी ही एकच बाब उदाहरणार्थ दिली आहे. विषयनियामक कमिटीच्या सभासदांना व इतरांना पुरविलेल्या फराळाच्या पदार्थांवर व्यर्थ अनवश्यक खर्च करण्यांत आला आहे. ज्या प्रकारच्या वस्तू पुरविण्यांत आल्या होत्या त्यांमध्ये ताळमेळ मुळीच नव्हता. त्यांत मी कोणासच व्यक्तिशः दोष लावूं इच्छीत नाही. उदार व थोर अंतःकरणांतूनच हा फाजील खर्च झालेला आहे, व तो सर्व सद्धेतुमूलक होता. चाळीस वर्षांची परंपरा—आणि ती कोणी कांही बिलकुल ऐकून न घेतां, थोडें कांही कमी पडलें तर उठल्यासुठल्या त्यावर टीकाच करीत बसणार अशा वेळीं—एका दिवसांत चुटकीसरशी बदलली किंवा नाहीशी केली जाणें शक्य नाही. मला हें माहीत आहे की स. १९२१ सालीं, या गोष्टीची सुरुवात करण्यास मी जेव्हा श्री. वल्लभभाईंना सुचविलें होतें, त्यावेळीं त्यांनी मला स्पष्ट टोमणा मारून सांगितलें होतें की, 'मी साधेपणा आणण्याचा व फाजील खर्च टाळण्याचा प्रयत्न करीत असतांना माझा लाडका गुजरात कद्रू आहे हा ठपका मात्र येऊं देणार नाही.' हजारो रुपये खर्चून एक कारंजा केला नाही तर तेवढ्याने गुजरातला कोणीही कद्रू समजणार नाही, ही गोष्ट मी त्यांच्या गळीं उतरवूं शकलों नाही. जें कांही तुम्ही कराल, त्याचेंच अनुकरण तुमच्या जागीं येणारे लोक किंवा वारसदार नक्की करणारच, ही गोष्टदेखील मीं त्यांना सांगून ठेविली होती. 'कद्रू' म्हणून ठपका लावून घेण्याची वल्लभभाईंची इच्छा नव्हती. हें मार्गदर्शन कानपूरने करावें असा सल्ला मी त्यांना देऊं इच्छितों. कानपूरचा कद्रूपणा हा उद्याचा फाजील खर्च समजला जाणार आहे. अशा कित्येक गोष्टी आहेत की ज्या वल्लभभाईंनी फेकून दिल्या. पण आवश्यक भासणाऱ्या कोणत्या बाबीच्या उणिवेबद्दल कोणाकडूनही टीका झाल्याचें मीं ऐकलेलें नाही. ज्यांना हिंदुस्थानचा कणा म्हणतां येईल त्या दरिद्री व श्रमजीवी लोकांचें प्रतिनिधित्व करण्याचा कॉंग्रेसचा हेतू आहे, ही गोष्ट आपण लक्षांत वागविली पाहिजे. त्यांच्या जीवनाशीं सुसंगत असेल असेंच आपल्या करणीचें मान असावयास पाहिजे. म्हणून आपण चिकू व अकार्यक्षम न बनतां, उत्तरोत्तर अधिकाधिक काटकसरी बनत गेलें पाहिजे.

राहण्याची व जेवणाखाणाची व्यवस्था व सोय माझ्या मतें फारच जबर खर्चाची होती. स्वामी श्रद्धानंदजी यांच्या पुस्तकांतून आपण धडा न घेऊं, तर यापेक्षा अधिक खर्चिक बनूं. स. १९१६ मध्ये गुरुकुलवर्धापन दिनानिमित्त येणाऱ्या पाहुण्यांसाठी ज्या

झोपड्या त्यांनी बांधविल्या होत्या, त्या मला अजून आठवतात. मला वाटतें की, सुमारें दोन हजार रुपयांत त्यांनी पाहुण्यांसाठी गवताच्या झोपड्या उभारल्या होत्या. उपाहारगृहें जमिनीवरच थाटविण्यास त्यांनी मक्तेदारांना आवाहन केलें. त्यासाठी जागाभाडें मुळीच आकारलें नाही. त्यांच्या व्यवस्थेविषयी कोणाला तक्रार करण्यास जागाच नव्हती. कशाची अपेक्षा करावी हें लोकांना चांगलें माहीत झालें होतें. थोडीही गैरसोय किंवा अडचण न होतां, व जवळजवळ कांहीही खर्च न येतां, सुमारें चाळीस हजार लोकांची राहण्याची व खाण्याजेवण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. विशेष हें की प्रत्येकाला पाहिजे असलेली वस्तू मिळत असे. शिवाय प्रत्येकास आपापल्या इच्छेप्रमाणे श्रीमंतीने अथवा गरिबीने राहतां येण्यासारखें होतें.

याचा अर्थ असा नव्हे की, स्वामीजींची व्यवस्थापद्धती जशीच्या तशी अनुसरली जावी असें मला म्हणावयाचें आहे; परंतु मी हें जरूर सुचवूं इच्छितों की, हल्लीपेक्षा अधिक चांगली व अधिक स्वस्त पद्धतीची खास आवश्यकता आहे. प्रतिनिधिशुल्क रु. १० वरून रु. १ वर आणण्याची मागणी सर्वतोमुखीं आहे. राहण्याचें व जेवणा-खाण्याचें शुल्क कमी केल्यास लोकांना तें अधिकच आवडेल.

प्रवेशासाठी श्रोत्यांकडून नाममात्र आकार घेऊन जमेची बाजू राखतां येईल. मनोरंजनाबरोबरच बोध देणाऱ्या एका यात्रेचें स्वरूप काँग्रेसच्या अधिवेशनास आलें पाहिजे. विचारजागृतीच्या दृष्टीने काँग्रेसच्या कार्यक्रमांत लोकशिक्षणाला प्राधान्य मिळत गेलें पाहिजे. म्हणून या वर्षीसारख्या सुयोग्य समयीं हा बदल घडून यावा आणि सर्व कार्यक्रम धार्मिक बुद्धीने अगदी वेळच्या वेळीं पार पाडिले जावेत.

काँग्रेसच्या अनुषंगाने एका आठवड्यामध्ये इतर कित्येक परिषदांची खेचाखेच करण्यापासून कांही विशेष राष्ट्रकार्य घडून येत असावें याची मला खात्री वाटत नाही. काँग्रेसच्या कार्याला पोषक व काँग्रेस बलसंपन्न होईल अशाच इतर परिषदा काँग्रेससप्ताहांत त्या ठिकाणीं भरविल्या जाव्यात. अध्यक्ष व त्यांचें कार्यकारी मंडळ यांच्याकडून, काँग्रेस-कार्याशिवाय इतर कोणत्याही कार्याची दखलगिरी घेण्याची अपेक्षा कोणींही राखूं नये. मला ही गोष्ट माहीत आहे की, माझ्या वेळेवर इतर कोणत्याही कार्यक्रमाचें आक्रमण होऊं दिलें नसतें तर माझ्यावर सोपविलेलें कर्तव्य मी अधिक चांगल्या रीतीने पार पाडूं शकलों असतों. मला स्वस्थपणें विचार व मनन करण्यास क्षणाचीही सवड मिळूं शकली नाही. काँग्रेसची सूतवर्गणी यशस्वी करण्याचे दृष्टीने आवश्यक त्या शिफारसी लिहून काढणें मला शक्यच झालें नाही. अनेक परिषदांचे भिन्नभिन्न संयोजक आपापलीं कामें गंभीरपणें करीत नसतात, ही वस्तुस्थिती आहे. परंपरागत रूढी संभाळण्याची एक 'फॅशन' म्हणून ते या परिषदा भरविण्याचा खटाटोप करीत असतात. भिन्नभिन्न दिशांनी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या शक्तीचा हा वार्षिक अपव्यय टाळावा अशी माझी त्यांना आग्रहाची विनंती आहे.

देशी किंवा स्थानिक कलाकृती अथवा छोटेछोटे उद्योगधंदे यांचें प्रदर्शन भरविण्याची

बाब अशी आहे की ती प्रतिवर्षी वाढतच गेली पाहिजे. संगीत जलसा ही तर एक मेजवानीच होती. हजारो लोकांनी तिचा आस्वाद घेतला असेल. कापडासारख्या सर्वांत मोठ्या राष्ट्रीय उद्योगधंद्याचा शोचनीय ऱ्हास कसकसा होत गेला आणि त्याच्या पुनरुज्जीवनाची शक्यता किती आहे, हें दिव्यांच्या साहाय्यानें पडद्यावर दाखविणारीं चित्रें व त्याविषयीचीं व्याख्यानें प्रसंगानुसार बोधप्रद आणि मनोरंजक रीतीने उत्तम संयोजित केल्याबद्दल श्रीमान् सतीशबाबू यांचें मी अभिनंदन करतों. कताईस्पर्धा ही अशा वेळीं एक कायमची प्रथा राखिली गेली पाहिजे. स्पर्धकांची संख्या, परीक्षेंत त्यांनी दाखविलेलें नैपुण्य, आणि देणगीदारांची संख्या, यावरून या स्पर्धांची लोकप्रियता अनुभवास येते. या कताईस्पर्धा स्त्रियांना त्यांच्या घरकोंबडेपणापासून किंवा एकलकोंडेपणापासून बाहेर आणतात. ही गोष्ट दुसऱ्या कशानेही साधतां आली नसती. पारितोषिक जिंकणाऱ्या अकरापैकी चार स्पर्धक स्त्रीवर्गापैकी होते. त्यांना कोणतीही विश्वविद्यालयीन उपाधी कधीच देऊं शकली नसती, ती योग्यता, ती कार्यक्षमता व तो आत्मविश्वास त्यांना या कताई-स्पर्धेमुळे लाभलेलीं आहेत. या कामीं त्यांचा सक्रिय सहकार पुरुषांच्या इतकाच अगत्याचा आहे. एवढेंच नव्हे तर असली मदत व सहकार, पुरुषांपेक्षा अधिक सौलभ्याने नसला तरी पुरुषांइतका तरी त्या देऊं शकतात, याची जाणीव त्यांना होऊं लागली आहे.

माझ्या मनावर उमटलेले वेळगावचे ठसे नमूद करण्याचें संपविण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख करण्याचें मी टाळूं शकत नाही. कॉंग्रेसनगरमध्ये संडाससफाई व स्वच्छतेच्या कामीं भाग घेणारे सुमारें पाऊणशे स्वयंसेवक—आणि तेही बहुतेक ब्राह्मण-वर्गांतीलच—होते. म्युनिसिपल भंग्यांचाही उपयोग करून घेतला जात होता, पण त्यांत स्वयंसेवकांचाही अंतर्भाव करणें आवश्यक मानलें गेलें. या कामाची जबाबदारी ज्यांच्यावर सोपविली होती, ते श्री. काका कालेलकर मला सांगतात की, ही स्वयंसेवकांची तुकडी नसती तर तें काम जितकें समाधानकारक रीतीने झालें तितकें झालें नसतें. ते पुढे मला असेंही सांगतात की, या स्वयंसेवकांनी आपलें काम अत्यंत खुषीने व हौसेने केलें. सामान्यतया हें काम अंगावर घेण्यास फारच थोडे लोक तयार झाले असते. या कामांत कुचराई करणारा एकही स्वयंसेवक आढळून आला नाही! एका दृष्टीने पाहिलें तर ही सेवा सर्वांत अधिक थोर मनाची व श्रेष्ठ मानाची होती. खरोखरच सफाईकाम स्वयंसेवकांच्या शिक्षणांतील सर्वांत पायाभूत मानलें गेलें पाहिजे.

१ जानेवारी १९२५<br>'यंग इंडिया'

**मो. क. गांधी**

# परिशिष्ट ३२

[श्री. गंगाधरराव देशपांडे यांनी श्री. दा. वि. गोखले यांना लिहिलेल्या एका पत्रांतील श्री. गंगाधरराव देशपांडे यांनी सत्याग्रह करण्याबाबतचा उतारा]

A talk on 22-11-1940.

Regarding Shri Gangadharraoji he (Mahatmaji) said that he (Mahatmaji) would not like him (Gangadharrao) to go (in jail). Shri Jamanalalji remarked that his (Gangadharraoji's) tendency would not allow him to stay outside.

Gandhiji said, he must learn self-control which is necessary. I have not allowed Konda Venkatappayya, Rajendra Prasad, Syad Mohamad. I want to preserve them for a greater fight against Hitlerism.

Regarding fast, "It may come at any time. That would be a great fight and I can take work from men like Gangadharrao at that time. I must preserve them for that."

# सूचि

## अ


अणे, माधव श्रीहरी १६३, ३३७, ३६६, ३६७, ३७५
अन्सारी, डॉक्टर ३७०, ४०३
अभ्यंकर, बॅ. १४३, ३७८
अमृत २२७-२२९, २३२, २४६, ३०९
अयोध्यानाथ, पंडित ४७
अय्यंगार, कस्तुरीरंग ३०४, ३२७, ३४०, ३७१
अर्ताळ, रुद्रगौडा २६०, २६१, २९२
अलीबंधू ३०६, ३१६, ३१७, ३२३, ३२४, ३२६-३२८, ३३५, ३५४, ३५५, ३५९, ३६३, ३८३-८५, ३८८, ३८९, ४००-४०३, ४१६
अष्टेकर ८८, ९०-९४
अळेकर १४३


## आ


आक्कासाहेब महाराज ४३१
आगरकर, गो. ग. ४०, ४८, ५२, ५६, ५८, ३६९
आगाशे, मोरोपंत ६१
,, (संपादक, इंग्रजी मराठा, पुणे) ३, ५३
आजरेकर, के. र. ३९, २३१, २३३, ४२५
,, प्रो. श्रीपाद ४०, ४८
आझाद, मौलाना अबुल कलाम ३८४
आठल्ये, डॉ. ३५६
,, भाऊसाहेब २२२
आनिखिंडी, कृष्णराव ५३-५५, ५७, ५९, ६२, ६३, ७४, ७७
आनंद (स्वामी) १६४
आपटे गुरुजी ३
आपटे, महादेव चिमणाजी २७-२९, ६५
,, लक्ष्मणराव ऊर्फ आण्णासाहेब १५८, १६३
आय्यर, कृष्णस्वामी १३५
आर्गाइल, ड्यूक ऑफ ९३
आर्विन ३७२


## इ


इन्व्हॅरॅरिटी २१७, २१८, २३६, २३७, २४६


## उ


उचगावकर, बंडोपंत ९५-९९, १९५, २३०, २३१
उधोजी ३१६
उमचगी, डॉक्टर ३८०


## ओ


ओक, गोविंदराव ५३, ६१, ८८, २३८
ओगले, गोपाळराव १६३

## अं

अंगडी (वकील) ३७३, ३८६, ३८७, ३९०

अँड्र्यूज, सी. एफ्. ४०३

## क

कपूर (जेलर) ३६०

करगुप्पीकर, आप्पासाहेब ३२

,, कृष्णराव (वकील) २९७, २९९

,, गोविंदराव ३२, ४८

,, डॉक्टर २

,, विठ्ठलराव ऊर्फ बंडोपंत ३२, ३४

करमरकर ३७२

करवीराप्पा ३८६

करंदीकर, तात्यासाहेब ३५४

,, दादासाहेब २४२, २५६, २६८, २७४, २७५, २८५, २९१, २९४, ३११, ३२२, ३२५, ३२७, ३५६

कर्टिस २७७

कर्नल फेरिस १८४, १८५

कर्नाड, सदाशिवराव ३९३, ३९६, ४०७

कर्वे ३

कर्वे, आण्णासाहेब १६९, १७३, १७४, १७७

कलघटगी, वामनराव ३९७

कस्तुरबा, सौ. २७९

कॅंपबेल २७

कॅंबेल, कॉलिन (लॉर्ड) ९३

काडादि ३११

काथवटे, प्रो. ६७

कानडे (वकील) ४१२

कानिटकर ३०६-३०८

कान्हेरे १७७

कामटे १७५

कामत (मंगळूर) ३०३

कामत, बी. एस्. (पुणें) ३०६, ३०८

कालकुंद्री, विठ्ठलराव ८८

,, शामराव १८५, १८७, २१४, २१५, २२१, २२२, ४२७, ४३४

कालकुंद्रीकर, सौ. कमलाबाई २२६

,, हरिनाना २२६-२३२, २३५-२३७, २३९-२४१, २४४-२४६

कालेलकर, काकासाहेब १, १६४, १६६, १६९, १७४, २५७-२५९, २६५, २७०, २८०, २९५, ३३९, ३५४, ३८०, ४१०, ४२५, ४३८

काशिनाथबुवा १८१

काळे (बनारस) ३१६

कॉटन, सर हेन्री १०९

किचलू, डॉक्टर ३०४, ३५४, ३८८

कित्तूर ८८

किर्लोस्कर, अण्णासाहेब २३, २४, १२८

,, गणपतराव २७, १२८, १३३

किंकेड (डि. जज्ज) १८५, १९२

कीर्तिकर ७५

कुलकर्णी, के. डी. १९२, २०१, २०५

,, वामनराव ८८

,, वासुदेवराव १७१, १७२, १७५-१८८

,, सखारामपंत १२६, २७५

,, हणमंतराव ४२८

कृष्णराव, डॉ. बी. ३९८

कृष्णानंद सरस्वती, स्वामी १८२, १८३

केतकर, श्रीधरपंत २७६
केळकर, कृष्णाजी हरी ७४
,, कृष्णाबाई २५०
,, न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब २, ५३, ६१, १४३, १६१, २०६, २५३, २५६, २६१, २६६, २७४, २७५, २७८, २९०-२९२, ३०९, ३११, ३१२, ३१६-३१८, ३२३-३२५, ३२७, ३३७, ३३८, ३४०, ३४१, ३४३, ३४४, ३४६, ३४७, ३५३, ३५५, ३५६, ३५९, ३६५-३६८, ३७१, ३७५, ३७६, ४२०, ४२३
,, बन्याबापू २४
कैंभावी, मधुराव ३९७, ४०८
कोगजे १७५
कोठारी, वालचंद ३१०
कोप्पीकर ४०७
कोल्हटकर, अच्युत बळवंत १४३, ३०५, ३१७-३१८, ३१९
,, भाऊराव २४
,, श्रीपाद कृष्ण ५३, ६१, ६५,
कोंडा, व्यंकटप्पय्या ३७५, ३८१, ३८२, ३८५
कौजलगी, श्रीनिवासराव ५३, १२१, १४७, २१४-२१८, २२०-२२२, ३५३, ३५६, ३६४, ३६६, ३६७, ३७१, ३७३, ३७४, ३८३, ३८४, ३८९, ३९३, ३९४, ३९७, ४२३, ४२४
,, हणमंतराव ३६३, ३९३, ४०८
क्यारप्पा २७६
क्रंप (जज्ज) २३५, २३६, २३८
क्लार्क, सिडनहॅम (गव्हर्नर) १७१
क्लेमेंट २०५, २०७

## ख

खटाव, गोवर्धनदास ११०
खत्री ३०६, ३०७
खरे, दाजीसाहेब २६८
,, बाबासाहेब १३५, १६१, १७०, १७१, १७४, २९०, २९१
खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर ५३, १४३, १६१, १६३, १७९, २४७, २५६, २९३, २९४, ३१६, ३२३, ३४१, ३६६-३६८, ३७५, ४२६, ४२७-४२८, ४२९
खाडिलकर (चालक, युवक संघ, पुणें) ३, २७५, २८१
खापर्डे, दादासाहेब १४५, २१५, २५५, २५६, २५९-२६१, २६५, २६९, २७४, २९०, २९१, २९४, ३१६, ३१७, ३२३, ३२५
खेर, कृ. गो. १६९, १७८, १९६, १९७-२००, २०९
,, श्रीधर हरी १३३
खोत ८७, ८८
खोत, रावजी ११४

## ग

गर्दे, जनार्दन बाळकृष्ण २६
गागाभट्ट १८३
गाडगीळ, महेश्वरपंत ३९, १९४
,, विष्णुपंत १९४-१९८, २३०, २३१

गायकवाड, बाळासाहेब २०७, २०८, ४२९
गायडर १७५, १७६, १९२, २०४, २०५
गायतोंडे, विठ्ठल विश्वंभर ५३
गावडे २०२-२०५
गांधी, महात्मा ३, ५०, ५७, १२५, १२६, १३०, १३६, १५८, १६४, १६५, २५७-२६२, २६४, २६५, २६८-२७२, २७४, २७५, २७७-२८२, २८४-२८६, २८९, २९४-३०२, ३०५, ३१४, ३१७, ३२३-३४०, ३६९-३७२, ३८४, ३८५, ३९५-३९७, ३९९-४०३, ४०५, ४०७, ४०८, ४१०, ४१२-११४, ४१६, ४१७, ४१८, ४१९, ४२०-४२५
,, रामदास २५९
गिडवानी, डॉक्टर चोईतराम ४०१, ४०२
,, प्रो. ३४४
गिलगंची, गुरुसिद्धाप्पा २६१
गुडी (इन्स्पेक्टर) १५७, १५९
गुत्तल ३५१
गुलाबचंद २१८, २१९-२२१
गुळवाडी, शंकरराव ४०७
गेज्जी, कृष्णराव १८
गोखले, सौ. अवंतिकाबाई २७८, ३२९
,, केशवराव ३६३
,, नामदार ४८, ५०, ५६, ७८, ८३, ८४, १०४-१०६, १३४, १४४, १४७, १७१-१७३, २५३, २५८, २७०, ३५९, ३६६, ३६९
गोखले, बबन २७८
,, बापू १३१
,, बाबुराव (दा. वि.) १७९, २१२, २६४, २६७, २६८, २९०, [illegible], [illegible], ३४४, ३५६, ३५७, ३५८, ३६०, ३६५, ३६७, ३६८
गोंडसे, खेमाजीराव ३९७, ४१३
गोवर्धनदास लल्लुभाई ९४-९६
गोविंद कवि १७०
गोविंदानंद स्वामी २९६
गौर, बॅरिस्टर ३३७

घ

घोष, अरविंद १३४, २९८
,, मोतीलाल बाबू ३१६
,, डॉक्टर राशबिहारी १४४

च

चक्रवर्ती, बाबू शामसुंदर ३८८
चंदावरकर (सर) ४४, ४९, ५०, ६८, ७७, २८५
चाफेकर ७५
चिक्कोडी ३०९, ३१९, ३२०, ३२१, ३८६, ३८७, ३९०, ३९१, ४१७, ४२४
चितळे, राम ५३, ३०२
चिन्नम्मा ४१, ४२
चिरोल, व्हॅलंटाइन १८३-१८६, २०७, २४६, २८८, २८९, ३००, ३०१, ३१७, ३१८
चेम्सफर्ड, लॉर्ड २७४, ३०४
चौगुले ८८, २६२, ३०९, ३१९, ३२०, ३९१

चौधरी, रामभुजदत्त ३०४
चौबळ (सर) २७

### छ

छत्रे, लक्ष्मण हरी २१३-२१५, २२२, २८०
,, श्रीपादराव १९, ८५, ८७, ११९, १२१, १२७

### ज

जगन्नाथ महाराज (पंडित) १८०, २९०, २९२
जठार, काशिनाथ श्रीराम ५३
,, नाना ९३
जमनादास द्वारकादास २५४, २७३, २८५, ३१७
जम्नादास, शेठ ३
जयकर, बॅ. ३०२, ३५५
जलालपूरकर १५
जॅक्सन ९४, १७३-१७५, ३६०
जाधव, प्रभाकर १८४
,, भास्करराव २०६, २०७, २६१, ४२९
जाफर इमाम २२८, २३३, २४७, २४८
जार्डिन, बॅ. २३५
जालियनवाला बाग ३०२, ३०४
जालिहाळ, कृष्णराव ८८
जास्कर (सोलापूर) ३१०
जॉर्ज लॉइड ३१५
जिन्सीवाले ५२
जीना, बॅ. २५४, २६९, २७०, २८५, ३२७, ३२८, ३३९
जे. आबासाहेब रामचंद्र १५२, १५३-१५९, ४३०, ४३१
जोग, बाळासाहेब १७५
,, विष्णुबुवा १२८
,, श्रीनिवासराव ३८२, ४०६
जोशी, रावबहादुर गणेश व्यंकटेश १६३
,, दामू १८५, १८६, १८८-१९२, १९५, १९६, २०१, २०५, २०६, ४२८, ४२९, ४३०, ४३१, ४३२
,, नारायणराव (वकील) १२६, ३६३
,, सर मोरोपंत ३८३
,, (वकील, जुन्नर) ३०६
,, वामन मल्हार १९२
,, वीर वामनराव १६२-१६४, २१५, २७६, २९२, ३१८
,, वासूकाका ६१, १२७, १४३, १६३, १७९, २४७, २९०, २९४, ३२३, ३६८, ३९९, ४२६, ४२८, ४२९, ४३१
,, विठ्ठलराव १२१
,, विनायकराव (धारवाड) ३५१, ३५२
,, व्यंकटराव २, ११५
,, शामराव (अकोला) २
जोशीराव ११२

### ट

टकर ६६
टागोर, रवींद्रनाथ २५७
टाटा ११२
टिळक, लोकमान्य ३, ४०, ४८, ५०, ५२, ५५-५७, ५९-६१, ६५, ७५, ७६, ८१, ८४, ८५, ८७, १०४, १०६, ११६-१३८, १४०-१५०, १५३, १५४, १६०, १६३-

१६९, १७१-१७३, १७७, १८०, १८१, १८३-१८५, १८७, १९०, १९१, १९४, १९६, १९९, २११, २२२, २२४, २४०-२४२, २४६, २५१-२६०, २६२, २६५-२७८, २८०-२८८, २८९-२९५, ३००-३१९, ३२२-३२७, ३२९, ३३०, ३३८, ३४१, ३४७, ३५३, ३६६-३६९, ३८०, ३८६, ३९७, ४२६ ४२८, ४२९


## ठ

ठाकुर (काठेवाडकडील) ३६३
,, (भागीदार) ११४, १२५, २२१
ठाणेदार ३९४


## ड

डायर, जनरल ३३०
डावरे (पुणें) ३
डिग्बी १०३
डेव्हिडसन ५१
डोंगरे १८३, २६१
ड्यू (कमिशनर, दक्षिण भाग) ९७


## त

तरखड ६९
ताईमहाराज २०५, २२८, २९०
तांबे, काकासाहेब ३४६
तिरुमलराव ८७
तिळवे, दत्तोपंत ८३-८५
तेलंग २७, ६१, ६२, ६७, ७७, ८१-८४, ९१, ९७, १०१-१०४, ११३, ११८, ११९, १२३, १२५, ३६९
तेलंग, बाळशास्त्री १८२
तैयेबजी, अब्बास ३५१
,, बद्रुद्दिन ४३, ४४


## द

दत्त, अश्विनीकुमार १३४
दत्त, सी. सी. (I.C.S.) ११५
दळवी, भुजंगराव २९२, ३८६, ३८७, ३९०
द्रवीड ५३
दातार, नारायणराव शेषगिरीराव ५३
,, बळवंतराव ३४७
दादरकर ७५
दामले, मो. के. ५३
,, सीतारामपंत १४९, १५०, १६०
दावर (जज्ज) १४८, १५०, २१९, २२०, ४२८
दास, गोपबाबू ४१०
,, बॅ. चित्तरंजन २३९, २७७, २७८, ३०२, ३१४, ३२७, ३२८, ३३७, ३३९, ३६३, ३७५, ३७६, ३७८, ३७९, ३८१, ३८२, ४००, ४०३, ४०४, ४०६, ४१८, ४२०, ४२२
,, मनमोहन १६७
दास्ताने ३९९
दिवाकर, रंगनाथ ३४७, ३५१, ३५२, ३५३, ३६३
दिवेकर, महादेवशास्त्री १४२, २५५, ३३९
दीक्षित, कृष्णाजी हरी ४२८
,, चिदंबर १२८, १३१
दुबर्क २५-२७
दुग्गाल, गोपाल कृष्णय्या ३८२
देव, डॉक्टर २७८

देव, शंकरराव ५३, २८०, ३९९
देशपांडे, बॅ. केशवराव २५७, ३४५
,, गजाननराव ३९७, ४१३
,, गोपाळराव ४०, ३५१, ३५३, ३९३, ४१२
,, जलालपूरकर ३
,, बाबासाहेब २०८
,, बाळकृष्णपंत (लेखकांचे वडील) १५, १३७, १३८, १५८, १५९, १६०, १७५, १८२, २०९, २२३-२२५, २४०, ३०८
,, बाळासाहेब (नगर) ५३, १७०, १७५, १७७
,, (मॅजिस्ट्रेट) २३२
,, शंकर २२६-२२९, २३१, २४८
,, श्रीनिवासराव २
,, हणमंतराव १२६, १८५-१९०, २०५, २०९, २२६, २२९, २३०, ४११, ४२७, ४३२-४३४.
देशमुख, डॉक्टर नानासाहेब २८, ७५, १२७, १४५, २२२, २६६, ३२३, ३४१
,, डॉक्टर (सोलापूर) ३१०
,, बळवंतराव २७६
,, बाबासाहेब २९२, २९३, ३८८
,, बॅ. रामराव २९२-२९४
देसाई, रा. ब. अच्युतराव १०९, ११५
,, (अंकलगी) २३१, २३२
,, (कित्तूर) ४१
,, यू. एस्. (एम्. ए.) २१५, २२१
,, वामन अच्युत ७४, ७५, ७९, १०९, ११०, ११२-११४
देसाई, (वकील, विजापूर) १२१
,, हणमंतराव ३५१, ३५२

## न

नगरकर, श्रीधर बळवंत ११३
नरगुंदकर, गुरुनाथराव ८८
,, दादासाहेब ५३, १२२
,, बाबासाहेब भावे ४१
,, सदाशिवराव ८८
नरवणे, डॉक्टर ३४६
नवरे, श्रीपाद शंकर ३४६
नाईक, तिम्माप्पा ३३२
,, वामन ३२१, ४११
नागपूरकर, नाना १९२, ४२८
,, बळवंतराव ४२८
नातू, कृष्णाजी रघुनाथ २६, ५२
,, रामभाऊ ३९
,, विष्णु रघुनाथ ३९, ४४, ४८-५०, ८७, ९६, ९७, १०२, १०३, ११४, ११८, ११९, १२१, १२६, १२७
नानल ५३
नामजोशी ६१
नायडू, सरोजिनीबाई १, ३८२, ४०५, ४०८
नायर, शंकरन् ४२५
नॉर्टन बॅ. ४४, ४५, २३७, २३९, २४०, २४२-२४४, २४६
निलजकर ४३१
नेने, आण्णासाहेब १५०, २६६, ३४१
,, (केसरीचे खजिनदार) ३१७, ३१८
नेवासकर ३
नेहरू, जवाहरलाल २८७, ३६८, ३८८

नेहरू, मोतीलाल ३१६, ३२७, ३७०, ३७२, ३७३, ३७५, ३७६, ३७८, ३७९, ३८१, ३९९-४०१, ४१७, ४२०, ४२२
,, शामलाल ३७६
नौरोजी, आरदेसर ९६, ९८, ९९
,, दादाभाई १३४, १३६, ३४१

## प

पटवर्धन, अच्युतराव ३
,, आप्पासाहेब १६१-१६३
,, ह. भ. प. दत्तोपंत २६४
,, रामभाऊ ३३६
पटेल, वल्लभभाई ३१२, ३७५, ३७६, ३८१, ३८४, ३९८, ३९९, ४१२, ४३६
,, विठ्ठलभाई २५५, २५८, २७०, २८२, ३४४, ३७०, ३७१-३७३, ३७८, ३८३, ३९९
परांजपे, रँ. आप्पासाहेब ३०६, ३११, ३२३
,, (डॉक्टर) बाबासाहेब १६३, १६४, १६७, २१५, २३७, २३८, २४३, २६६, २६७, २८६, २८७, ३११, ३३७, ३६८, ३७५, ४००, ४२६
,, शिवरामपंत ५३, १२९, १३१, १३३, १४३, १६१, १६२, १७९, २५६, २७५, ३०९, ३९९
पलुसकर, विष्णुबुवा ४०९
पंतप्रतिनिधि, श्रीमंत बाळासाहेब ५३
पागे १८७-१८९, १९२-१९५, २००, २०१, २०६, २०८
पागे, हणमंत रामकृष्ण १३३
पाचलग, गोपाळराव ४३२
पाटणकर, गोपाळराव १६९, १७४, १७८, ३३७
पाटील, काका १२७, १२८, १४९, १५७, १६३, १७०, १७२, १७५, १८८-१९०, २१४-२१७, २२०, २२२, २२९-२३३, २३५-२३७, २३९, २९९
,, भीमराव ९२, ९३, ११४, १२६, १९३, २९२
पाध्ये १८४, १८६, १८७, १९६
पारसनीस २१८
पारेख, गोकुळदास १४४
,, छोटालाल २१३-२२१
पाल, बिपिनचंद्र १३४, २८१, ३२७, ३२८
पावरी ७५
पितळे (युनिव्हर्सिटी रजिस्ट्रार) ३८
पित्ति, शेठ ४२५
पित्रे (वकील) १२१
पुणतांबेकर ३३४
पुनमचंद ३७८
पुरोहित ३४३
पुंडलीकजी कातगडे १, २, २६३-२६५, २७९, २८०, ३३२, ३४२, ३५६
पेटिगारा १६६
पेटिट, सर दिनशा २८६, ४०५
पेंटर (क्लेक्टर) ३५१, ३५२, ३५४, ३५९, ४१३
पेंडसे, बाबासाहेब १४५
पोतदार, भीमराव बाळाजी २९८, २९९, ३५४, ३९१, ३९७, ४१७
,, शेठजी ३५४

प्रसादे १८४, १८५, १९६

## फ

फडके, वासुदेव बळवंत ४०
फडणीस, अंतुकाका ३५६, ३५८
,, नाना ४०७
फणसळकर ३२७
फर्नांडिस १८६, १८७, १९५, १९६, २०६
फाटक, हरिभाऊ १६३, १७५
फेरिस, कर्नल १९२, १९३, १९७, २०१, ४३१, ४३२

## ब

बखले, सदाशिवराव १८७
बजाज, जमनालाल ३४०, ३७०, ३७८, ३८२, ३८४, ३९१, ४१५, ४२१
बर्क, कर्नल १६१, १६२
बॅनर्जी, सुरेंद्रनाथ ४३, ४४, ४६, ७५, ७६
बॅप्टिस्टा, बॅ. १४७, १४९, १५७, १६१, १७२, १७३, १७५, १७८, १८८, १८९, २१५, २२२, २३६, २५३, २५६, २६२, २९०, ३०२, ३०४, ३०५, ३१२, ३२५, ३२८, ३३७, ३३८
बॅरेट, प्रोफेसर ६६, ६७
बँकर, शंकरलाल २५४, २७३, ३४४, ३४५, ३६४
बानर्जी, जितेंद्रलाल ३१६
बापट ७४
बापट, पांडुरंग महादेव १५९, २८३, ३६७, ३६९
,, सदाशिवराव २६०
बापासाला ७५
बाबामहाराज १८०
बाळकोबा २४
बाळेकुंद्री, नरसिंहराव ३८६
,, पंतमहाराज ९४
बॉईस, डॉक्टर ५४
बिनिंग, बॅ. २३९-२४१, २४५, २४६
बीमन (डि. जज्ज) ८६
बेझंट बाई ४, २५३, २५४, २७३, २७४, २७७, २८६, २९०, ३०३, ३११, ३१६, ३१७, ३२७, ३२८, ४२१
बेन, प्रो. ६६, ६७
बेळवी, दत्तात्रय व्यंकटेश ३६, ५३, ८७, ८८, ११९, १२६, १२७, १४९, २५१, २५४, २५५, २६७, २७४, २७६, ३१९, ३२०, ३३५, ३३९, ३५१, ३७१, ३८६, ३८७, ३९७, ४०७, ४२३
बोटेस्वामी १२८
बोडस, माधवराव २०४
ब्रह्मगिरीबुवा १७१, १७७
ब्रह्मनाळकर १८१-१८३
ब्रॅडला, चार्लस ४८
ब्रॅन्सन, बॅ. २४३
ब्रॅडन, बी. ए. १३३
ब्रिजकिशोर बाबू २७८
ब्रेलवी, सय्यद ३

## भ

भगवानदीन ३७८
भट, डॉक्टर विष्णुपंत १६५, १६९, १७०, १७४, १७८, ३२३
भडकमकर, डॉक्टर ८८, १०९, ११०,

११२, ११३, ३२३, ३४१, ३६७, ३६९, ३८०
भडभडे, शिवराम गोविंद २६
भरूचा, सोराबजी २६
भागवत, बाळाजी आबाजी २१८, २१९
,, राजाराम शास्त्री ५८
भाटे, भाऊसाहेब १९, ३९, ५१
भाटे १२१, १२७
भानू, प्रो. १५८, १८७
भावे, रामदुर्गकर १३१
भांडारकर, डॉक्टर ५३, ५५, ६०, ६१, ६४, ६६, ६८, ६९, ७१, ७७
भोपटकर, ल. ब. ३३१, ३७१

म

मजली, दत्तोपंत २९७-२९९, ३३२, ३३३, ३३७, ३६३
मट्टुभाई २१९, २२०
मणेरीकर, भास्करराव ५८, ५९, ८५, ९७, २३८
मदगिरी ८८
मनमोहनदास २१३
मराठे, मोरोपंत ८८, ९७, ९८, ३०९
मर्डोक (एन्जीनियर) ४१४
महाजनी, रामचंद्र विष्णु ५६, ७६
मॅन, डॉक्टर ४२८
मॅनसन, कर्नल २७
माने, गणपतराव २९१
मालवीय, पं. मदनमोहन २७४, २७५, २८६, २९४, ३०२, ३२७, ३२८, ४२५
मावजी, पुरुषोत्तम विश्राम २१२-२१६, २२०
माळी, अनंतराव २६७
मॉंटगॉमेरी (सर) २४६
मॉंटेग्यू २७४, २८६, २९२, ३०१, ३०२, ३०४
मॉंटेग्यू-चेम्सफर्ड ३०४
मिलर ९८, ९९, २३१
मिश्र, गौरीशंकर ३८८
मिस्त्री ७५
मुकर्जी ११०, ११२
,, (कलकत्ता) ४०६
मुदवेडकर, कृष्णराव १२१, १२९, ३५१, ३५२, ३६३, ४०९
,, व्यंकटराव ३५१
मुरारजी, नरोत्तमशेठ ११०
मुंजे, डॉक्टर १४३, १५६, २१५, २७४, ३२३, ३२५, ३३७, ३६६, ३६९, ३७०, ३७५, ३७८, ३८३, ४२१
मूलराज ११०
मेथा ७६
,, चुनीलाल ७५
,, जमनादास ३७७
,, फेरोजशहा २७, ५०, १३४, १३६, १४३, १४४, २७१, २७३
मेहेंदळे, वैद्य बापूसाहेब ३०
,, रामभाऊ ३०
मोडक, गणपतराव ७४, १२७, १२९, १४८-१५०, १५९, १६०, १७९, १८४, १८७, १९२, १९३, २००-२०३, २०५, २०७, ४३२
,, गोविंदराव ऊर्फ बापू ६८
,, प्रो. बाळाजी प्रभाकर १९३
,, वामन आबाजी ६७-६९
मोहिते, बाळू २२८

## य

यशवंतराव महाराज २७३
याळगी, कृष्णराव १६४, २६३, २९९, ३८०, ३९५, ३९७, ४०६, ४०८, ४१३
,, गोविंद व्यंकटेश १०८, १०९, ११२, ११७, ११८, १२०, १२३, १२६, १२९, १३४, १३९-१४२, १५३, १५४, १५६, १५९, १६०, १६४, १७९, १८५-१८८, १९३, १९४, १९६, २०९, २१२, २२१, २२२, २२९-२३५, २४७, २६३, २८३, २९७-३००, ३२०, ३२२, ३२४, ३३७, ३३९, ३५५-३६०, ३६६, ३८०, ३८१, ३८६, ३८९, ३९०, ४१६, ४२५, ४२७, ४२९, ४३१, ४३२-४३४
,, जीवनराव २६३, ३८०, ३९५, ३९७, ४०६, ४१२

## र

राजगोपालाचार्य २७८, ३०४, ३७०-३७२, ३७५-३७९, ३८१-३८५, ४०४
राजवाडे, वि. का. ५३
राजा, सर टी. माधवराव ४४
राजेंद्रप्रसाद २७८, ३७५, ३८१, ३८३
राजोपाध्ये १८१
रानडे, ४८, ५५, ५६, ५९, ६५, ७६, ७७
रानडे, डॉक्टर ६८
रानडे, न्यायमूर्ति ६७, ६८, ६९, ७५, ३६९
रामचंद्र ७३
रामजी, मोहनदास १६०
राय, राजा राममोहन ६८
रायटर ७५

## ल

लजपतराय, लाला १४४, १४७, २७५, ३१४, ३२४, ३२६, ३२८, ३३९, ३४०, ३५२, ३५५
लठ्ठे, आण्णासाहेब १८४, २०७, २०८, २६१, २६२, २९२, ३०९, ३२१, ३८७, ३९०
ललित, सीताराम ३६०
लागू, डॉक्टर ३
लाड, बाळकृष्ण मल्हार ११४, १२६, २९२
लाड, डॉ. भाऊ दाजी १६०
लिमये, गणपतराव १९
,, गंगाधर विष्णु ८६
ली वॉर्नर ७३
लुक्तुके (नगर) ३

## व

वडवी, रामचंद्र व्यंकटेश ३३१
वरदाचार्य ३८५
वाच्छा, दिनशा ५०, ७६, २८६
वाडिया २१८
वारद ३११
वालिंजर ११८, १९२
वॉटरफील्ड ३६०
वॉनलेस, डॉक्टर [illegible]
विक्हॅम ३५[illegible]


ग्रंथालय ठाणे ४५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम क्रमांक
वि:
नों: दि:

विजयकर ७५
विजयराघवाचार्य ३२७, ३२८
विजापूरकर १९२
विद्वांस, धोंडोपंत २९०, २९१
विन्सेंट (पोलीस कमिशनर) १५९
वुडहाऊस २६०
वेडरबर्न, सर वुइल्यम ५०
वेलणकर, डॉक्टर २५६, २७०
,, वामनराव ४८, ४९, ५६
वैद्य, गजाननराव ७६
,, चिंतामणराव १२७, १५०, ३०९, ३१६, ३७१, ३७५
,, दामुअण्णा १०४
व्यंकटराव, प्रोफेसर ७३
व्हेल, डॉक्टर २५०

## श

शंकराचार्य, कुर्तकोटी ३६६, ३६७
,, द्वारका पीठ ३५४
शास्त्री, श्रीनिवास २७३, ३०५, ४०५
शाहूमहाराज, कोल्हापूरकर ११५, १८०-१८३, १९३, १९९-२०२, २०६-२०८, २०९, २६१, २८५, २८८, ३२४, ३५७, ४२९, ४३०, ४३२, ४३३
शाळिग्राम २०२-२०५, ४३०
शांताराम नारायण २९
शिरगावकर, डॉक्टर वि. ज. ५४, ५५, ५८, ५९, ६२, ७३, ९१, ९७, ९८
शिराळकर २१२, ३५६
शिवाजी महाराज १८३, २६९, ३०८, ४२९
शिव्या बेरड २२८, २४७, २४८
शिंदे, विठ्ठलराव २९२, २९३
,, संस्थानिक ४२९
शूरपाल १९२
शेट्टी, धरणेंद्रप्पा ४५
,, नूरेंद्रप्पा ३१९, ३२२
शेरवानी ३७०, ३८२
शेषप्पा (वीणावादक) ४०७

## स

सकलातवाला ११२
सट्टा (नगर) ३
सत्यपाल, डॉक्टर ३०४
सदावर्ते १७५-१७८
सप्रू, तेजबहादुर ३१७
सबनीस, (दिवाण, कोल्हापूर) १८४
,, हणमंतराव ५३, ६२
सरदेसाई, १५०, १६०
,, गणपतराव १६३
,, नारायणराव १६३
,, बापू (कोल्हापूर) १२७, १५०, १७९
सरय्या, चुनीलाल २१३
संकेश्वर, वामनकाका ४७
संगोळी, रायण्णा ४२
संजाना ५३
साठे, डॉक्टर २५६, २७०, २७४, २७७, २९
सातवळेकर, पंडित १९२
सावरकर, डॉ. नारायणराव १७८, ३११
,, बंधु १६९, १७०, १७४
,, बाबासाहेब १७०, १७८, ३६०
सावंत, आबाराव २९२
साभळदास, केलुभाई २८६
सामंत, जगन्नाथराव ३७२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक
विभाग
क्रमांक

सार्जंट, सर चार्लस (चीफ जस्टिस)
सोहो, गोपीनाथ ४०१
साळवेकर २२१
सांगलीकर, संस्थानिक २१२, २२०, २३६
सांबमूर्ती ४०९
सिडनहॅम २११, ३०१
सुपेकर २९
सुंदरलाल, पंडित ३८८
सेटलवाड २१८, २८६
सेटलूर ७५
सेन गुप्ता ३७७, ३७८
सेल्बी, प्रो. ६६, ७३
सोची ५३
सोबानी, उमर २५४, २७३, ३४४, ३४५
सोमण, बाबासाहेब ८८, १६१, १६२, २१५, २२१, २६४, २७८, २७९, २८६, २९८, ३४१, ३६६, ३९७
„ भाऊसाहेब ३५६
सोलापूरकर ५३
स्ट्रॉंगमन २१८
स्वामीनारायण ३४४
स्वामी श्रद्धानंद ४३७

ह

हकीम अजमलखान ३६३, ३७०, ३७२, ३७३, ३७६
हरिदास नानाभाई २८
हरी रामोशी ४०
हर्डीकर, डॉक्टर ३६०, ३८२, ३९७, ४१०, ४३५
हसन इमाम २८६
हळदीपूरकर ३४७
हॅरिस, लॉर्ड ७४
हॉर्निमन २७३, २८५
हुईलगोल, डॉक्टर व्यंकटराव ६३, ३८०
हुक्केरीकर ३४७
हुचराव ८७
हेब्बाळ, गणपतराव ७८
हेरलेकर, रामकृष्णपंत २८
हेवर्ड ३५१
होळकर ४२९
ह्यूम ४३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम..........
विभाग..........
क्रमांक ..........
नों. दि. .......
REFBK-0010980